खंड : दोन

# मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास

संपादन

**शमसुद्दिन तांबोळी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ




# मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास

## खंड २

## संपादन : शमसुदिद्न तांबोळी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

**पुस्तकाचे नाव** : मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास : खंड २

**संपादक** : शमसुदिद्न तांबोळी

**आयएसबीएन** : ९७८-८१-९९०२६०-०-१

**प्रथमावृत्ती** : २०२६

**प्रकाशक** : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

**© प्रकाशकाधीन**

**मुखपृष्ठ** : गिरीश सहस्रबुद्धे

**मुद्रक** : व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१

**किंमत** : रु. २६०/-

या पुस्तकात व्यक्त झालेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही. सदर पुस्तकातील मजकुराची संपूर्ण जबाबदारी ही संपादकाची आहे.

समाजसुधारणेचा विचार मांडताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा पाया घेऊ नका. धार्मिक पुनरुत्थानाचा पाया घेतला की प्रबोधनाची भूमिका मागे पडते.

हमीद दलवाई




रेखाटन : गोपाळ नांदुरकर

## ऋणनिर्देश

डॉ. सदानंद मोरे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई),
डॉ. बाबा आढाव (ज्येष्ठ सत्यशोधक नेते आणि कार्यकर्ते),
सय्यदभाई ('मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे संस्थापक सदस्य आणि माजी अध्यक्ष),
अब्दुल कादर मुकादम (मुंबई),
विनोद शिरसाठ (संपादक, साप्ताहिक 'साधना'),
पन्नालाल सुराणा (ज्येष्ठ समाजवादी नेते-अभ्यासक),
मा. अशोक धिवरे (निवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य),
डॉ. श्रद्धा कुंभोजकर (इतिहास विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे),
मा. सुरेश शिपूरकर (सामाजिक कार्यकर्ते, कोल्हापूर),
अन्वर शेख (ज्येष्ठ कार्यकर्ते, मुस्लीम सत्यशोधक मंडळ),
डॉ. अभिजित वैद्य (समाजवादी नेते, कार्यकर्ते आणि लेखक, पुणे),
मीनाक्षी रा. पाटील (मुंबई), रामेश्वर मु. रोकडे (मुंबई),
डॉ. बेनझीर तांबोळी (पुणे), प्रा. सायरा मुलाणी (कोल्हापूर),
नबाब अल्ताप हुसेन (सातारा), दिलावर शेख (पुणे),
प्रा. समीना पठाण (नाशिक), गुलाब अत्तार (कोल्हापूर),
बेनझीर काझी (सोलापूर), प्रा. जमीर शेख (भोर),
प्रा. अझरुद्दीन पटेल (कराड), समीर शेख (पुणे),
श्रीरूपा बागवान (पुणे), डॉ. बी. टी. काझी (तुळजापूर)
आणि
मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आजी-माजी कार्यकारिणी सदस्य,
मंडळाचे विविध मंच प्रमुख आणि कार्यकर्ते,
असीम सय्यद (पुणे), प्रा. मोईन खान (बार्शी),
सुनील अंबिके (पुणे), भाग्यश्री भागवत आणि राम जगताप (डोंबिवली),
अभिजित सोनावणे (पुणे) आणि गिरीश सहस्रबुद्धे (पुणे)
या सर्वांचे आभार.

# निवेदन

समाजप्रबोधक हमीद दलवाईनी मुस्लीम समाजात आधुनिक आणि मानवतावादी मूल्ये रुजवण्यासाठी वैचारिक आणि संघटनात्मक प्रयत्न केले. समाजप्रबोधनासाठी जनसंवाद, जाणकारांसोबत बैठका, अभ्यास दौरा अशा पाच-सहा वर्षांच्या तयारीनंतर निवडक कार्यकर्त्यांसमवेत २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. १९६६ चा सात मुस्लीम महिलांचा मुंबई विधानसभेवरील मोर्चा हा आरंभ बिंदू समजला तर मुस्लीम सत्यशोधकचा कार्यकाळ सहा दशकांचा आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा द्विखंडात्मक इतिहास संपादित केला आहे. यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे वैचारिक अधिष्ठान, संघटनात्मक बांधणी, संघर्षात्मक कार्यक्रम तसेच विधायक कार्याचा सविस्तर तपशील मांडला आहे.

पहिल्या खंडात मंडळाची पार्श्वभूमी, हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखालील संघर्षमय प्रबोधनकार्य, समाजाचा प्रतिसाद आणि प्रामुख्याने हमीद दलवाईनी एका दशकात केलेल्या शतकभराच्या कार्याचा इतिहास आहे.

दुसऱ्या खंडात हमीद दलवाई नंतरच्या सामूहिक नेतृत्वातील जवळपास पन्नास वर्षांच्या प्रबोधनात्मक कार्याचा आणि संघटनात्मक योगदानाचा सविस्तर आढावा घेतला आहे. या दोन्ही खंडांना स्वतंत्र आणि विस्तृत प्रस्तावना दिली आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रेरणा, प्रबोधन कार्य आणि सामाजिक योगदान याचा हा महत्त्वाचा दस्तावेज अभ्यासक व वाचकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. हा द्विखंडात्मक इतिहास प्रकाशित करताना मंडळास आनंद वाटतो.

**– डॉ. सदानंद मोरे**

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई.

माझे मुस्लिम समाजावर प्रेम आहे. या समाजाचे भले व्हावे, त्यात
बुद्धिवादी, उदारमतवादी आणि मानवतावादी प्रवाहांची निर्मिती
व्हावी म्हणून मी परंपरांशी लढणार आहे.

हमीद दलवाई



# अनुक्रमणिका

भूमिका / १२
संपादकीय / १४
१. मंडळाच्या प्राधान्याचे विषय / ८५
१.१ दहशतवाद / ८५
१.२ मुस्लीम आरक्षण / ९१
१.३ वैज्ञानिक दृष्टीकोन / ९७
१.४ अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धा निर्मूलन / १०६
१.५ उपसंहार / ११२

२. मंडळाचे मंच आणि नियमित कार्यक्रम / ११८
२.१ सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच आणि आधार केंद्र / ११८
२.२ हमीद दलवाई पुरस्कार आणि पार्श्वभूमी / ११९
२.३ मंडळाचे अन्य पुरस्कार / १२२
२.४ हमीद दलवाई स्टडी सर्कल आणि विविध शैक्षणिक उपक्रम / १२४
२.५ हमीद दलवाई – दिनकरराव जवळकर स्मृतिदिन / १२५
२.६ मौलाना आझाद जयंती व राष्ट्रीय शिक्षण दिन / १३२
२.७ बकरी ईदनिमित्त रक्तदान उपक्रम / १२७
२.८ तिमिरभेद मंच / १२९
२.९ आंतरधर्मीय विवाह आणि नोंदणी विवाह / १३०
२.१० संविधान साक्षरता आणि समुपदेशन / १३१
३. मंडळाचे विविध कार्यक्रम / १३२
३.१ मंडळाचे वर्धापन दिन / १३२
३.२ अभ्यास शिबीर, परिषद आणि मेळावा / १४१
३.३ मुस्लीम महिलांच्या समस्या निवारणार्थ कार्यक्रम / १५०
३.४ आंदोलन, मोर्चा, निदर्शने आणि निवेदने / १५९
३.५ हमीद दलवाई स्मृतीदिन / १६१
३.६ व्याख्यान, चर्चासत्र आणि परिसंवाद / १६८
३.७ राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक-धार्मिक सलोखा / १७६
३.८ ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स / १८८
३.९ शैक्षणिक उपक्रम / १९१
३.१० बकरी ईद निमित्त रक्तदान अभियान / १९६
३.११ अनुषंगिक कार्यक्रम / १९६

३.१२ निवडक कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती / २०२
३.१२.१. कुटुंब न्यायालयाची मागणी / २०२
३.१२.२. मुस्लिमांचाही लोकसंख्येला आळा / २०२
३.१२.३. मुस्लिमांतील समता आणि राष्ट्रीय एकात्मता / २०४
३.१२.४. धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार / २०४
३.१२.५. तलाकप्रश्नावर मंडळाचे कार्य / २०५
३.१२.६. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे शिबिर / २०९
३.१२.७. श्रीगोंदा येथील मंडळाचे शिबिर / २१२
३.१२.८. सामाजिक परिषद / २१५
३.१२.९. फलटण येथे महिलांच्या प्रश्नांवर परिसंवाद / २१५
३.१२.१०. कुटुंब नियोजन आणि इस्लाम / २१७
३.१२.११. अखिल भारतीय परिषदेचे आयोजन / २१८
३.१२.१२. मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर शिबिर / २२१
३.१२.१३. हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटयूट / २२३
३.१२.१४ मंडळाचा नवा जाहीरनामा / २२५
३.१२.१५. मंडळाची जनहित याचिका / २२६
३.१२.१६. मुस्लीम महिला अधिकार परिषद / २२७
३.१२.१७. पंतप्रधानांशी चर्चा आणि तलाकबंदी विधेयक / २२८
३.१२.१८. वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम / २३१

४. मंडळाचे काही मैलाचे दगड / २३४
४.१ समान नागरी कायदा स्वार्थासाठी नको / २३४
४.२ मंडळाचे मुस्लीम महिला मदत केंद्र / २३६
४.३ महिला मदत केंद्राचे ईद मिलन / २३९
४.४ तलाक देण्याची कारणे – अनंत बागाईतकर / २४०
४.५ मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर समिती / २४३
४.६ दुसऱ्या लग्नाचा बँड थांबवून पहिलीस तलाक / २४६
४.७ तलाकप्रश्नी विचारमंथन / २४६
४.८ एकतर्फी तलाकच्या विरोधात मंडळ समिती स्थापणार / २४६
४.९ पोटगीचा अधिकार / २४७
४.१० शहाबानो प्रकरण / २५०
४.११ तलाक मुक्ती मोर्चा – कोल्हापूर ते नागपूर / २७५
४.१२ महिला अत्याचार रोखण्यासाठी संघटन / २६६
४.१३ पोटगी बचाव परिषद / २६६
४.१४ शहाबानोची निवाडा मागे घेण्याची मागणी / २७०

४.१५ मुस्लीम महिला विधेयकासंबंधी / २७२
४.१६ हमीदनबी प्रकरण / २७४
४.१७ शबानाबानो विरुद्ध इम्रान खान / २७६
४.१८ शबानाबानो निवाड्यावरील चर्चासत्र / २७८
४.१९ शायराबानो आणि इतर महिलांचा लढा / २८१
४.२० मुस्लीम दत्तक विधान सर्वोच्च न्यायालयात / २८२
४.२१ मुस्लीम महिलांचे विविधांगी प्रश्न / २९०

५. विरोध, वाद-प्रतिवाद आणि प्रतिसाद / २९३
५.१ हमीद दलवाई मुसलमान नव्हता / २९३
५.२ सिनेमाबंदीचे आंदोलन / ३९५
५.३ पीडित मुस्लीम स्त्रियांना न्याय मिळावा / २९७
५.४ एशियाड व मुस्लीम स्त्री / २९८
५.५ धर्मगुरूंना वेतन निषेधार्ह! / ३००
५.६ झियांच्या विधानाचा निषेध / ३०१
५.७ इस्लाम धर्मात लुडबुड? / ३०२
५.८ तलाक संदर्भात अहले हदिसची भूमिका आणि चर्चा / ३०३
५.९ अतिरेक्यांचा निषेध / ३०५
५.१० महिला प्रश्नावरील वाद आणि प्रतिवाद / ३०६
५.११ मंडळांतर्गत वाद आणि प्रतिवाद / ३२७

६. मंडळाशी निगडीत लेख, मुलाखती आणि भाषणे / ३२८
६.१ हमीदभाईंच्या निधनानंतरचे आव्हान - हेमलता राईरकर / ३२८
६.२ मुस्लीम सत्यशोधक चळवळ-शोध आणि बोध - अब्दुल कादर मुकादम / ३३०
६.३. हमीद दलवाई : एक प्रचंड ज्वालामुखी - प्रा. फक्रूद्दिन बेन्नूर / ३३४
६.४ अँग्री यंग मॅन: हमीद दलवाई - डॉ. कुमार सप्तर्षी / ३४६
६.५ मुस्लीम महिलांना दिलासा देणारे केंद्र - यदुनाथ थत्ते / ३५६
६.६ मुस्लीम सत्यशोधकचे कामकाज - प्रतिभा रानडे / ३५८
६.७ सत्यशोधक मुस्लीम - सदा डुम्बरे / ३६५
६.८ प्रबोधनाचा रौप्यमहोत्सव - प्रा. शमसुद्दिन तांबोळी / ३६८
६.९ संघर्षाची पंचवीस वर्षे – हुसेन जमादार / ३७१
६.१० सत्यशोधकांची चाळीशी! – हरीश कैंची / ३७८
६.११ एकगठ्ठा मतदानासाठी मुस्लीम वेठीस धरले जातात - सय्यदभाई / ३८१
६.१२ मशिदी प्रबोधनाची केंद्रे व्हावीत - हुसेन जमादार / ३८४

६.१३ हिंदू-मुस्लीम समस्या - हुसेन जमादार / ३८६
६.१४ मुस्लीम सत्यशोधक संदर्भात माझे आकलन – डॉ. नरेंद्र दाभोलकर / ३९१
६.१५ हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ – अन्वर शेख / ३९६
६.१६ मुस्लीम सत्यशोधकांना साथ हवी – डॉ. नरेंद्र दाभोलकर / ४०१
६.१७ मुस्लीम सत्यशोधक मंडळ - डॉ. राजेखान शानेदिवाण / ४०४
६.१८ बुद्धिप्रामाण्य भाई वैद्य यांची मुलाखत - समीर शेख, साजिद इनामदार / ४०९
६.१९ सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांची मुलाखत - समीर शेख / ४१७
६.२० सत्यशोधकांची कोंडी - विनोद शिरसाठ / ४२३
६.२१ मुस्लीम शिक्षण परिषदेतील ठराव – प्रा. शमसुद्दिन तांबोळी / ४२८
६.२२ धर्मातीततेचे प्रतीक : बाबुमियाँ बँडवाले - प्रा. ना. द. शिरोळकर / ४३३
६.२३ भारतमातेसाठी (भाषण) - बाबुमियाँ बँडवाले / ४३६
७. मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते / ४३८
७.१ आरंभापासूनचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य / ४३८
७.२ मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीतील निमंत्रित मान्यवर / ४४०
७.३ आरंभापासूनचे अध्यक्ष / ४४१
७.४ विद्यमान कार्यकारिणी / ४४३
७.५ विद्यमान मंच प्रमुख / ४४३

८. परिशिष्टे / ४४४
८.१ तक्रार निवारणाकरिता अर्ज / ४४४
८.२ पंतप्रधान राजीव गांधी यांना दिलेले निवेदन / ४४७
८.३ पाचवी राष्ट्रीय मुस्लीम सामाजिक परिषद / ४५४
८.४ भिन्न धर्मीय बुद्धिवाद्यांच्या बैठकीचा अहवाल / ४६१
८.५ नवा 'निकाहनामा' / ४६३
८.६ जाहीरनामा – नवी दिशा / ४६७
८.७ मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषद / ४७०
८.८ मंडळाच्या शिष्टमंडळाकडून देण्यात आलेले निवेदन / ४७३
८.९ हमीद दलवाई यांची ग्रंथसंपदा / ४६६
८.१० हमीद दलवाई यांच्याविषयीची संदर्भसाधने / ४७७
८.११ संदर्भसूची / ४७८

वृत्तचित्र / ४८३
निवडक छायाचित्रे / ४९९
संपादकाचा अल्प परिचय / ५१५



समाजसुधारणा कोणत्याही जमातीत केल्या तरी त्याचा
परिणाम समाजावर एकत्रितपणे होणार आहे हेही मानले जाते.
हिंदू असोत अगर मुस्लीम असोत, रूढीग्रस्तांशी सामना
देण्याने भारतीय एकात्मता बलवत्तर होणार आहे.

हमीद दलवाई




# भूमिका

'महाराष्ट्र' ही संत, साहित्यिक आणि प्रबोधकनकार यांची भूमी आहे. त्यांच्या व्यापक जीवनदृष्टीमुळे सामाजिक बदल स्वीकारण्याची सकारात्मक मनोभूमिका निर्माण होण्यास मदत झाली. परिणामी, समाजामध्ये नवीन विचार रुजण्यास अनुकूलता निर्माण झाली. तसेच भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातही महाराष्ट्राच्या अनेक सुपुत्रांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचा इतिहास आहे. महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आणि त्यांच्या समकालीन प्रबोधकांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीस वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक स्थान आहे. या चळवळीशी केवळ नामसाधर्म्य न ठेवता विचारसाधर्म्य असणारी 'मुस्लीम सत्यशोधक चळवळ' महाराष्ट्रात सुरू होणे, हा केवळ योगायोग नाही, तर त्यास विशेष अर्थ आणि नाते आहे. समाज सुधारक हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली, २२ मार्च १९७० रोजी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना झाली. तत्पूर्वी पाच वर्षे याची पेरणी झाली होती. १८ एप्रिल १९६६ रोजी काढलेला 'सात मुस्लीम महिलांचा मोर्चा' ही मंडळाच्या स्थापनेची नांदी म्हणायला हरकत नाही.

महाराष्ट्रातील दिग्गज साहित्यिक, विचारवंत, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि राजकीय नेत्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे केवळ स्वागत केले नाही, तर ही चळवळ रुजावी, तिचे अभिसरण व्हावे आणि तिला समाजमान्यता मिळावी, यासाठी तिचे हरप्रकारे समर्थन केले आणि तिला मनापासून सहकार्य दिले. मंडळाच्या पाच दशकांच्या वाटचालीत अनेक घटना घडल्या, समाजहित आणि देशहित लक्षात घेऊन मंडळाने वेळोवेळी कळीच्या भूमिका घेतल्या; लोकशिक्षणासाठी, जाणीव-जागृतीसाठी कार्यक्रम घेतले. या घटना-घडामोडींना अनेकांनी विरोध

केला, मात्र अत्यंत सामंजस्याने आणि संवादीपणे हा विरोध समजून घेत, त्याचा प्रतिवाद करीत, प्रतिकूल परिस्थितीत मंडळाने प्रबोधनाचे कार्य कायम ठेवले आहे. येथे घेतलेला मंडळाच्या कामकाजाचा एकूण आढावा वर्तमानासाठी आणि भविष्यात अनेक क्षेत्रांसाठी, अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरणार आहे.

'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'च्या कार्याचा इतिहास लिहिला जावा' अशी अपेक्षा साप्ताहिक साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांच्यासह अनेकांनी व्यक्त केली. मुस्लीम सत्यशोधक मंडळासदेखील त्याची गरज जाणवली. याच काळात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'समग्र हमीद दलवाई' प्रकल्पास मान्यता दिली. हमीद दलवाई यांचे ललित आणि वैचारिक साहित्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित होणार आहे, ही खूप आनंदाची बाब आहे. परंतु हमीद दलवाई यांचे साहित्य जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच त्यांचे सामाजिक कार्य आणि समाज-प्रबोधनासंबंधीचे विचारही महत्त्वाचे आहेत. दलवाई यांनी स्थापना केलेल्या 'मुस्लीम सत्यशोधक चळवळी'स एक ऐतिहासिक महत्त्व आहेच, शिवाय दलवाईंनंतर जवळपास पाच दशके ही चळवळ चालली-विस्तारली, यासही अनन्यसाधारण महत्त्व आहे. यास्तव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या द्विखंडात्मक इतिहास-लेखन प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावास साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी मान्यता दिली. या मान्यतेमुळे हा प्रकल्प हाती घेता आला आणि तो पूर्ण करण्यात यश आले, याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळास विशेष आनंद वाटतो.

आरंभी हे डोंगराएवढे मोठे काम वाटत होते. तसेच 'हे काम वेळेत पूर्ण होईल का?' अशी शंका होती. सर्व संदर्भ साहित्य मिळवण्याचे एक मोठे आव्हान होते. मात्र हे आव्हान स्वीकारणेही तेवढेच महत्त्वाचे होते. सर्व अडचणी आणि आव्हाने यांवर मात करून हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वाकडे जात असल्याचा खूप आनंद वाटतो.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या द्विखंडात्मक इतिहासातील पहिल्या खंडात सर्वसाधारणपणे दीड दशकाच्या कालखंडाचा समावेश आहे. साधारणपणे १९६५-६६पासून सुरू झालेला इतिहास दलवाई यांच्या मृत्यूपर्यंत (१९७७) संपतो. परंतु दलवाईंच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा आणि झंझावाती कर्तृत्वाचा प्रभाव त्यांच्यानंतरही तीन वर्षे टिकून होता. म्हणून १९८०पर्यंतच्या कालखंडाचा पहिल्या खंडात समावेश केला आहे. त्यापुढील कालखंड दुसऱ्या खंडात घेतला आहे.

प्रा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि या मंडळाचे सर्व सदस्य, कर्मचारी यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन यांमुळेच हा प्रकल्प पूर्ण करणे शक्य झाले आहे. याबद्दल सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत आहे. संगणकीय कामकाजासाठी प्रा. मोईन खान, खंडाची मांडणी आणि मुखपृष्ठ यासाठी अनुक्रमे अभिजित सोनावणे आणि गिरीश सहस्त्रबुद्धे, तसेच दोन्ही खंडांच्या संपादनकार्यात डॉ. बेनझीर तांबोळी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**– संपादक**

# संपादकीय




भारतातील सुप्रसिद्ध इतिहासलेखक डॉ. रामचंद्र गुहा यांचा 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' हा ग्रंथ प्रकाशित झाला. या पुस्तकाचा मराठी अनुवाद शारदा साठे यांनी 'आधुनिक भारताचे विचारस्तंभ' या नावाने केला आहे. प्रस्तुत ग्रंथात १९ विचारवंतांच्या व्यक्तीरेखा आणि त्यांच्या वैचारिक भूमिका एकंदर २१ प्रकरणांत मांडल्या आहेत. त्यात तीन मुस्लीम विचारवंतांचा उल्लेख आहे. या तीनमध्ये समाजसुधारक हमीद दलवाई यांचा समावेश आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात या क्रियाशील विचारवंतांनी आपला देश आणि समाज यांच्याविषयी अधिकारवाणीने वैचारिक मांडणी केली आहे. आपला देश आधुनिकतेला कसा सामोरा गेला आणि आधुनिक बनत गेला, याचे चित्रण केले आहे. या ग्रंथाचे शेवटचे प्रकरण हमीदभाई यांच्याविषयी असून त्याचे शीर्षक 'शेवटचा आधुनिकतावादी' असे आहे.

सामाजिक कार्य आणि वैचारिक लेखन या दोन्हींसाठी सुमारे एक दशकाचा कालावधी मिळालेल्या हमीदभाईंचा हा यथायोग्य सन्मान आहे. त्यांना हे 'महात्म्य' देण्याचे कारण माझ्या मते त्यांची निर्भीड, प्रामाणिक आणि बुद्धिप्रामाण्य धडपड हे असावे. हमीदभाई ज्या परिस्थितीत वाढले, त्यांच्यावर जे संस्कार झाले, त्याचे त्यांनी निरपेक्षपणे निरीक्षण केले, त्यावर चिंतन आणि चर्चा केली, काही अनुमान काढले. मानव आणि समाज यांच्या संदर्भात त्यांच्या बुद्धीला काही सत्यं पटली. ती त्यांनी समाजाला सांगण्याचे धाडस केले.

सर्वसाधारणपणे प्रवाहाविरुद्ध, लोकमानसाविरुद्ध जाणारे सत्य आपल्या धर्मातील लोकांना सांगणारे आणि त्यांचा विरोध व शत्रुत्व ओढवून घेण्याचा निर्भीडपणा दाखवणारे अपवादात्मक

सुधारक असतात.

अशा सुधारकांना सर्वसाधारणपणे समाजमान्यता मिळत नाही आणि त्यांना जवळ करणे हे राजकीय नेत्यांना अडचणीचे वाटते. परंतु हमीदभाईंच्या कार्याचे मोल लक्षात घेऊन मा. शरद पवार यांनी त्यांना आजारपणाच्या काळात साथ दिली. हमीद दलवाई यांची मुस्लीम समाज प्रबोधनाबद्दलची अत्यंतिक निष्ठा, तळमळ आणि समाजहिताचे कार्य असामान्य असल्याचे मा. शरद पवार यांच्या लक्षात आले. हमीदभाईंची पहिली भेट साधनाचे तत्कालीन संपादक यदुनाथ थत्ते यांच्याकडे झाली आणि यांच्यात वैचारिक जवळीकता निर्माण झाली. त्यांच्या गप्पांच्या मैफिली वाढल्या आणि हमीदभाईंचा समाजसुधारणेविषयीचा प्रखर आग्रह मा. शरद पवार यांना भावला. मा. शरद पवार यांनी तत्कालीन मुस्लीम आमदारांशी हमीदभाईंविषयी बोलले असता त्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या संदर्भातील तपशील मा. शरद पवार यांनी 'लोक माझे सांगाती' या पुस्तकात मांडला आहे. हमीदभाईंना जडलेल्या मूत्रपिंडाच्या आजारपणात पवार साहेबांनी स्वत:च्या निवासस्थानी हमीदभाई आणि कुटुंबियांची राहण्याची व्यवस्था केली. या काळात झालेल्या परस्पर संवादातून लक्षात आलेली हमीदभाईंची वैचारिक ऊंची पवार साहेबांनी या पुस्तकात मांडली आहे. हमीदभाईंनी आपल्या मृत्यू पश्चात दफन न करता दहन करण्याची नोंद इच्छापत्रात् लिहून ते अ. भि. शहा, गोविंदराव तळवळकर आणि पवार साहेबांकडे दिले होते. यावेळी मा. शरद पवार यांनी घेतलेली भूमिका आणि तत्कालीन परिस्थितीचे वर्णन या पुस्तकात मांडले आहे. तसेच हिंदू मुस्लीम समाजातील प्रबोधन कार्याचा निमित्ताने केलेले भाष्यही महत्त्वाचे आहे. (लोक माझे सांगाती..., शरद पवार, राजहंस प्रकाशन, पृष्ठ क्र. ३५१ ते ३५३, सुधारित आवृत्ती २०२३)

हमीदभाईंना 'काफर' ठरवले गेले, खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ केली गेली, आरोप केले गेले, अपमान केला गेला, हल्ले झाले, तरीही ते बोलत आणि लिहीत राहिले. केवळ इतकेच करून थांबले नाहीत, तर त्यांनी 'मुस्लीम सत्यशोधक चळवळ' उभी केली. संघटितपणे संघर्ष केला आणि ठामपणे जनजागृती व लोकशिक्षणाचे कार्य केले. कार्यकर्त्यांचा समूह निर्माण झाला असतानाही हमीदभाई भारतातील मुस्लीम समाजाच्या अनिष्ट रूढी-परंपरेविरोधात एकांड्या शिलेदारासारखे लढले.

हा इतिहास 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'च्या कार्याच्या इतिहासाच्या पहिल्या खंडात मांडण्यात आला आहे. मंडळाच्या कार्यकाळातील बराच इतिहास त्यांच्याभोवती केंद्रित होणे स्वाभाविक आहे. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे कार्य पुढे घेऊन जाताना आजही हमीदभाईंच्या निधर्मी, निरीश्वरवादी विचाराचे, तसेच मरणोत्तर दहन करण्याच्या त्यांच्या भूमिकेचे भांडवल करून मंडळाच्या समाजप्रबोधनाच्या कार्यास विरोध करण्यात येतो. 'मुस्लीम सत्यशोधक चळवळ' ही नास्तिकांची आहे, असा गैरसमज मुस्लीम समाजात रुजवण्यात विरोधकांना यशही मिळाले आहे.

मुस्लीम समाजाला आधुनिक, प्रगतशील बनवण्यासाठी हमीदभाईंप्रमाणेच एम. आर. ए. बेग, एम. सी. छगला, प्रा. असफ ए. ए. फैजी, प्रा. मोहम्मद मुजीब यांच्यासारख्या मान्यवरांनी प्रयत्न केले. वास्तविक भारतीय मुस्लिमांनी मुस्लीम समाजाला आवश्यक असणारे उदारमतवादी नेतृत्व

दुर्लक्षित करून आपली हानी करून घेतली आहे. स्वातंत्र्यापूर्वी २५ वर्षे आणि स्वातंत्र्यानंतर २५ वर्षे ज्यांनी कृतिशील योगदान केले, असे एम. आर. ए. बेग अनेकांना माहीतही नसतील.

एम. आर. ए. बेग यांचे २९ एप्रिल १९७८ रोजी वयाच्या ७३व्या वर्षी निधन झाले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते भारतीय मुस्लीम समाजाची चिंता वाहत राहिले. भारतीय मुस्लीम कालांतराने आपल्या अंधश्रद्धेपायी मागासलेल्यात जमा होतील की काय, ही चिंता त्यांना जाळत होती. तसे काही घडू नये म्हणून ते धडपडत होते. परंतु त्यांचा स्वीकार समाजाकडून झाला नाही. मात्र न्या. राजेंद्र सच्चर समितीच्या अहवालाने बेग यांचे म्हणणे खरे ठरवले. त्यांनी मुस्लीम समाजाला एक धक्का दिला. त्यांनीही हमीदभाईंप्रमाणे आपल्या प्रेताचे दफन न करता दहन करावे, अशी इच्छा व्यक्त केली, आणि त्याप्रमाणे त्यांचे दहन करण्यात  आले. हमीदभाईंच्या दहनाचे भांडवल करणाऱ्यांनी बेग, छगला, हिदायतुल्लाह, इस्मत चुगताई यांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा स्वीकार करून समाजहिताच्या विचाराकडे निरपेक्ष पद्धतीने पाहायला हवे.

एम. आर. ए. बेग हे बॅ. मोहम्मद अली जिना यांचे खाजगी सचिव होते. एवढेच नव्हे तर जिनांची  अनेक भाषणे, लेख त्यांनीच तयार केले होते. लष्करी नोकरी संपवून त्यांनी १९३४ मध्ये जिनांची सोबत केली, कारण आधुनिक विचारांचे जिना मुस्लीम समाजाला कल्याणाचा मार्ग दाखवतील, असे बेग यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी काही काळ जिनांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न केला. १९४०मध्ये जिनांच्या नेतृत्वाखाली 'मुस्लीम लीग'ने पाकिस्तानचा ठराव केला आणि बेग यांची निराशा झाली.

पाकिस्तानची मागणी करून भारतीय मुस्लिमांनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला, असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी जिनांचा निरोप घेतला आणि मुस्लीम समाजाच्या कल्याणासाठी स्वतंत्रपणे कार्य करण्यास सुरुवात केली. जिनांच्या निधनानंतर पाकिस्तानला जी उतरती कळा लागली, ती पाहून बेग यांची शंका प्रत्यक्षात उतरली आणि बेग यांना मुस्लिमांची कीव वाटू लागली. मुस्लीम प्रबोधनासाठी ते अखेरपर्यंत तळमळत होते. हमीदभाईंच्या पद्धतीने कार्य केल्यास मुस्लीम दुखावतील व मुस्लीम प्रबोधनात अडथळा निर्माण होईल, असे त्यांना प्रारंभी वाटत होते. परंतु नंतर मात्र ते हमीदभाईंप्रमाणे मुस्लीम समाजाला वैचारिक धक्के दिल्यावाचून तो विचार प्रवृत्त होणार नाही, अशा निष्कर्षाला आले. ३ मे १९७७ रोजी हमीदभाईंचे निधन झाले. त्यांचे 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' पुढे चालवण्यासाठी ही चळवळ कायम राहावी म्हणून 'मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी'ची स्थापना झाली. या वेळी बेग यांनी स्वतः २५० रुपयांची देणगी देऊन हमीदभाईंच्या प्रबोधनाच्या कार्यास सक्रीय पाठिंबा दिला होता. सुरुवातीला हमीदभाईंच्या मार्गाबद्दल साशंक असणारे एम. आर. ए. बेगसुद्धा हमीदभाईंच्या विचारांकडे वळले.

एम. आर. ए. बेग यांची दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांचे आत्मचरित्र 'इन डिफ्रन्ट सॅडल्स' आणि 'मुस्लीम डायलेमा इन इंडिया' या पुस्तकांत त्यांनी भारतीय मुस्लिमांच्या प्रश्नांची सखोल चिकित्सा केली आहे. या पुस्तकाचा  अच्युत खोडवे यांनी 'भारतातील मुसलमानांपुढील पेच' या शीर्षकाने मराठी अनुवाद केला असून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी ते प्रकाशित केले आहे. त्यात ते म्हणतात, "भारतातील मुस्लिमांपुढे आज एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. भारतीय समाज जीवनाशी एकरूप झालो, तर आपले अस्तित्व धोक्यात येईल अशी त्यांना

एका बाजूला धास्ती वाटते, पण भारतीय लोकजीवनांशी फटकून राहिल्यास आपली अस्मिता टिकवल्याचे समाधान मिळाले, तरी हे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी त्यांना जबर किंमत मोजावी लागेल." आणि झालेही तसेच!

प्रबोधनाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी काही सूचना केल्या आहेत. मुस्लीम बहुसंख्येच्या देशातील इस्लाममध्ये परिस्थितीनुसार फेरफार करूनच त्याचा अंमल मुस्लीम अल्पसंख्येच्या देशात करणे क्रमप्राप्त आहे. त्यांना समान नागरी कायद्याला संमती द्यावी लागेल. याचा परिणाम असा होईल की, भारतात एक प्रॉटेस्टंट इस्लाम विकसित होईल. याच पुस्तकात ते म्हणतात, "भारतीय मुस्लिमांचे प्रश्न अंधश्रद्धेतून निर्माण झाले आहेत. अनेक समजुतींचा पगडा भारतातील मुसलमानांवर आहे, अनेक प्रथा-परंपरा आणि चालीरिती यांच्या वेटोळ्यात मुसलमान सापडले आहेत. त्यांनी भूतकाळाच्या बेड्या तोडून बाहेर पडले पाहिजे." हे घडवून आणण्यासाठी त्यांनी काही सूचना केल्या आहेत.

जमातवाद हा मुस्लीम समाजाला सर्वांत अधिक अपायकारक ठरेल. याउलट मानवतावादाचा त्यांनी स्वीकार केला, तरच त्यांचे सर्वांत जास्त कल्याण होईल. सामाजिक, आर्थिक विकास हाच जमातवादातून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. इस्लामी तत्त्वज्ञानामुळे आर्थिक व सामाजिक क्षेत्रात अडथळे निर्माण होतात आणि मुस्लिमांची प्रगती खुंटते.

गैर-मुस्लिमांची बरोबरी करण्याचा प्रयत्न इस्लामच्या कुंपणात राहून शक्य होणार नसेल, तर त्यांनी सामाजिक, आर्थिक संकल्पनांची फेरतपासणी केली पाहिजे. हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या काळाच्या मर्यादा विचारात घेता, त्यांना अनेक गोष्टींची कल्पना करणे शक्य नव्हते आणि त्याबाबतचे आदेश सुन्नाहमध्ये मिळणे शक्य नाही. कालसापेक्ष, उदारमतवादी अर्थनिर्वचन केलेला सुधारित इस्लाम हा भारतीय समाज कुटुंबाचे घटक असलेल्या मुसलमानांना जपता आला पाहिजे. कोणताही समाज स्थिर राहू शकत नाही. त्याला एकतर मागे जावे लागते, नाहीतर पुढे तरी जावे लागते. मुसलमानांनी भारतीय म्हणून राहावयाचे की, भारतीय कुटुंबाचे मुस्लीम घटक बनायचे, याचा निर्णय इथल्या मुसलमानांना घ्यावाच लागेल.

आज त्यांची स्थिती मोठी चमत्कारिक आहे. धर्मनिरपेक्षता हे अंतर्गत धोरण आणि अलिप्तता हे परराष्ट्रीय धोरण भारताच्या हिताचे ठरेल, असे एम. आर. ए. बेग यांचे स्पष्ट मत होते. पाकिस्तानला आपल्या अस्तित्वासाठी भारताशी शत्रुत्वाची भूमिका घ्यावी लागेल आणि त्यामुळे पाकिस्तान हा भारतीय मुस्लिमांचा सर्वांत मोठा शत्रू ठरेल असे त्यांचे प्रतिपादन होते. समाज प्रबोधनाबाबत ते असे स्पष्ट करतात की, विकासोन्मुख देशात सुधारणा करण्यासाठी कायदा अस्तित्वात आणावा लागतो.

विकसित देशातील कायदा लोकमत निदर्शक असतो, तर अविकसित देशातील लोकमानस ही अविकसितच असल्याने कायद्याला लोकमानस घडवावे लागते. भारतीय समाज आणि कायद्याच्या संदर्भात हा महत्वाचा मुद्दा आहे. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेबद्दल ते असे म्हणतात की, सनातनी मने कमी सनातनी बनल्याशिवाय समाजपरिवर्तन अशक्य आहे.

हिंदू समाजाबद्दलचे त्यांचे विवेचनही अतिशय मार्मिक आहे. जातीयवादी हिंदू हे मुसलमानांमध्ये अन्यायपीडित असल्याची जाणीव निर्माण करून त्यांना जातीयतेच्या विळख्यात

ढकलतात आणि उदार हिंदू धर्मनिरपेक्षतेबद्दलच्या चुकीच्या कल्पना कवटाळून आणि मुस्लीम सुधारणांविषयी मौन बाळगून तेच कार्य दुसऱ्या प्रकारे पार पाडत असतात.

या विवेचनातून असे लक्षात येते की, त्यांचे निष्कर्ष हमीदभाईंच्या निष्कर्षाशी तंतोतंत जुळतात. बेग पुढे म्हणतात, धर्मनिरपेक्षता ही अर्थपूर्ण कल्पना असेल, तर ती जाती-जमातीच्या विरोधात उभी राहिली पाहिजे. पण आपण बहुजाती-जमातवाद म्हणजे निधर्मीपणा, अशी समजूत करून घेतो. एखाद्या संत्र्याकडे वरून पाहिले, तर ते एकसंध वाटते. पण त्याची साल काढल्याबरोबर आतल्या फोडी वेगळ्या होतात. भारतीय ऐक्य हे त्या सालीतील संत्र्यासारखे आहे. भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या प्रयत्नाला उपमा देताना ते म्हणतात, 'भारतीय समाजात धर्मनिरपेक्ष समाज प्रस्थापित करणे, म्हणजे उकडलेल्या अंड्यापासून ऑम्लेट तयार करण्यासारखे आहे.'

'भारतातील मुसलमानांपुढील पेच' या पुस्तकाच्या मनोगतामध्ये शेवटी ते म्हणतात, "धर्माच्या बाबतीत मी कोणत्याही निषेधाची पर्वा करीत नाही. माझ्यामधील दैवी उपदेशाशिवाय मी कोणाचेही मार्गदर्शन कबूल करीत नाही. माझा सद्सद्विवेक माझा सल्लागार, श्रोता व न्यायाधीश आहे. मी जे काही लिहिले ते त्याच्या (आतला आवाज) आज्ञेवरून. त्यात कोठलीही टाळाटाळ नाही की, आडपडदा ठेवलेला नाही. मी एकदा प्रारंभ केला की, त्याप्रमाणे पुढे जाण्यास तो मला आज्ञा करतो. मग त्याचा परिणाम काहीही होवो. म्हणून प्रत्येक वाचकाने माझ्या धार्मिक मतांचा कोठलाही अपवाद न करता निषेध केला तरी मी जे सांगितले, त्याबद्दल मला वाईट वाटणार नाही आणि ते पुन्हा-पुन्हा सांगण्यापासून मी स्वतःला रोखणार नाही. काहीही झाले तरी मला हितकारक वाटले व म्हणून हे जे वाचतील, त्यांना यापासून काही अपाय होईल असे मला मुळीच वाटत नाही."

हमीदभाईंच्या व्यक्तित्वाबद्दल मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्यापासून पु. ल. देशपांडे यांच्यापर्यंत अनेकांनी गौरवोद्गार काढण्यात आले, तसेच टीकाकारांनी त्यांच्या तथाकथित मर्यादा दाखवण्याचाही प्रयत्न केला. मर्यादा दाखवताना या टीकाकारांनी असा आक्षेप नोंदवला की, हमीदभाईंचा इस्लामचा अभ्यास तोकडा होता, त्यांनी इस्लामकडे सकारात्मकतेने न पाहता इस्लामची चिकित्सा केली वगैरे. ही टीका तथाकथित म्हणण्याचे कारण असे की, हमीदभाईंनी इस्लामचा अभ्यास केला असला तरी, स्वतःला इस्लामचे गाढे अभ्यासक वगैरे म्हणून घेतले नाही. त्यांच्या अभ्यासात आणि विचारात धर्मचिकित्सा कमी आणि धर्मवादी-जमातवादी, राजकीय मानसिकता, धर्मवर्चस्व आणि धर्मांधतेच्या प्रभावातून होणाऱ्या परिणामाची चिकित्सा जास्त होती. धर्मातील चांगल्या किंवा सकारात्मक बाबींपेक्षा धर्मातील वाईट आणि विद्रूप प्रथा-परंपरेबद्दल चिंता व्यक्त करून या विद्रूप आणि आधुनिकतेविरुद्ध असणाऱ्या अन्यायी-विषम प्रथा-परंपरा नष्ट करण्याचा त्यांनी चंग बांधला होता.

ते म्हणत, "माझे मुस्लीम समाजावर प्रेम आहे. या समाजाचे भले व्हावे; त्यात बुद्धिवादी, उदरमतवादी आणि मानवतावादी प्रवाहांची निर्मिती व्हावी, म्हणून मी परंपरांशी युद्ध लढणार आहे. भारतातील मुस्लीम संस्कृतीने मला घडविले आहे. या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत, त्यांचा मला अभिमान आहे आणि तिच्यात ज्या विद्रूप गोष्टी आहेत, त्या बदलल्या पाहिजेत."

हमीदभाईंना धर्मसुधारक व्हायचे नव्हते; त्यांचा पिंड समाजसुधारकाचा होता. असे असतानाही त्यांनी धार्मिक सकारात्मकता किंवा धर्मसुधारणांचे प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनी अशा सुधारणा करण्याचे प्रयत्न करणाऱ्या मान्यवरांना कधी विरोध केला नाही आणि त्यांच्यावर टीकाही केली नाही. मौलाना आझाद, फैजी किंवा त्यांचे समकालीन असगर अली इंजिनिअर यांच्या प्रयत्नांबाबत त्यांनी शंका उपस्थित केली नाही. मात्र धर्माचे उदात्तीकरण करताना आढळून येणाऱ्या ढोंगी मानसिकतेचा त्यांनी समाचार घेतला.

हमीदभाई असेही प्रतिपादन करत, "प्रेषितांविषयी मला अतिशय आदर आहे आणि इतिहासात उदयाला आलेल्या सर्वश्रेष्ठ व्यक्तींपैकी ते एक आहेत, असे मी मानतो; पण प्रेषित स्वतःच सांगत त्याप्रमाणे ते 'केवळ एक माणूस' होते आणि मानवी प्रकृतीत असलेली दौर्बल्ये त्यांच्याही ठिकाणी होती." तसेच हमीदभाई हेही स्पष्ट करतात की, "महंमद पैगंबरांनंतर दुसरा पैगंबर होणार नाही, या 'कुराणा'तील सिद्धान्ताने मुस्लिमांतील वैचारिक परिवर्तन रोखले गेले आहे."

मानवाच्या ऐहिक आणि सार्वजनिक जीवनात धर्माचा प्रभाव कमीत कमी असावा. सामाजिक सुधारणेचा विचार मांडताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा आधार घेऊ नये. धार्मिक पुनरुत्थानाचा पाया घेतला की, प्रबोधनाची भूमिका मागे पडते. ही हमीदभाई यांची भूमिका होती. तीच भूमिका कायम ठेवून 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' धर्मातीत आणि धर्मापलीकडे पाहणारी चळवळ व्हावी यासाठी मंडळाने कार्य केले..

तथापि मुस्लीम समाजावरील धर्माचा प्रभाव, मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे धर्मविरोधी आहे, अशी सातत्याने होणारी टीका याचा समाजप्रबोधनाच्या प्रयत्नावर होणारे परिणाम लक्षात घेऊन, तसेच इस्लामविषयी नकारात्मकता आणि गैरसमज प्रसारित करण्यासाठी वाढता अपप्रचार लक्षात घेऊन मंडळाने पुढील काळात आपली भूमिका सौम्य करण्याचा किंवा उद्दिष्ट गाठण्यासाठी सुधारणा करण्याचा विचार मांडला. त्यातून मंडळाने नवा जाहीरनामा प्रकाशित करून मंडळाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली. मंडळाच्या मूळ उद्दिष्टांमध्ये गुणात्मक बदल न करता काही विषयाच्या प्राधान्यक्रमात बदल करून पुढील भूमिका निश्चित केली– "इस्लाममध्ये 'कुराणा'चा अर्थ सामान्य माणूससुद्धा लावू शकतो. तरीही मुस्लीम समाजात पुरोहित वर्ग निर्माण झालाच. इस्लामी धर्मशास्त्राचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच असून, तो अर्थ सर्वांनी मान्य केला पाहिजे, अशी टोकाची भूमिका घेऊन उलेमांनी मुस्लीम समाजावर आपले प्रभुत्व व नेतृत्व लादले आहे. या पारंपरिक उलेमांच्या प्रभावातून मुस्लीम समाजाला मुक्त करणे, ही 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची प्राथमिकता राहील. त्यासाठी 'कुराणा'च्या प्रागतिक व उदारमतवादी भाष्यकारांचा आधार घेऊन 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' यापुढे आपली वाटचाल करील." मात्र मुस्लीम जातीयवाद संपविण्यासाठी इस्लामी रूढीबद्ध परंपरेची चिकित्सा करणारी भूमिका मंडळाने कायम ठेवली आहे.

मुस्लीम समाजाच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी विचार प्रबोधन करणे, हा मंडळाचा महत्त्वाचा उद्देश आहे. त्याला पोषक अशा वैज्ञानिक दृष्टीकोनाची जोड मिळावी, धर्माकडे पाहण्याचा मुस्लिमांचा दृष्टीकोन बदलावा आणि हा समाज राष्ट्रीय विचारप्रवाहात सामील व्हावा, असे झाल्यास खऱ्या अर्थाने भिन्न धर्मीय समाजघटकांत ऐक्याची भावना वाढण्यास मदत होईल,

या दृष्टीने मंडळ समाज प्रबोधनाच्या प्रयत्नाकडे पाहते.

सेक्युलर-मानवतावादी विचारांच्या हमीदभाईंना मंडळाच्या नावातील 'मुस्लीम' शब्दाबद्दल बराच विचार करावा लागला; परंतु महात्मा जोतीराव फुलेंचा सत्यशोधकी वारसा आणि मुस्लीम प्रबोधनातील दरी भरून काढण्यासाठी ही अनिवार्यता स्वीकारावी लागली. असे असतानाही मंडळाच्या जाहीरनाम्यात ते स्पष्ट करतात- "वास्तविक, स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना विशिष्ट धर्मगटासाठी मंडळे काढण्याची आवश्यकता असायला नको होती याची जाणीव आहे. परंतु मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची दरी नष्ट होईल, तेव्हा हे मंडळ मुस्लीम समाजापुरते कार्य करणार नाही. आधुनिक विचारांच्या, सर्वधर्मीय, राष्ट्रवादी परंपरा मानणाऱ्या सर्वच भारतीयांच्या इच्छा-आकांक्षांनुसार एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही. ती अवस्था यावी आणि लवकर यावी म्हणून हे मंडळ कार्य करत राहील."

'मंडळाच्या स्थापनेनंतर तुम्ही कोणता कार्यक्रम हाती घेतला?' असा प्रश्न ज्येष्ठ पत्रकार व 'रियासत'कार स. मा. गर्गे यांनी हमीदभाईंना विचारला होता. त्याचे उत्तर देताना त्यांनी मंडळाची भूमिका आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. सुरुवातीच्या काळातील ही त्यांची पंचसूत्री होती -

१) सर्वांत प्रथम देशात 'समान नागरी कायदा' झाला पाहिजे. ही मागणी हेच आमचे महत्त्वाचे कार्य आहे. कारण राज्यघटनेत तसे आश्वासन देऊनही इतक्या वर्षांत राज्यकर्त्यांनी त्या दिशेने काहीही केले नाही.

२) आम्ही मुस्लिमांनी उर्दू भाषेऐवजी प्रादेशिक भाषेत शिक्षण घेतले पाहिजे; ज्यामुळे रोजगाराचा प्रश्न मिटेल, परकेपणा कमी होईल.

३) भारतीय समाजात प्रबोधनाच्या मार्गाने इहवादी मूल्ये रुजवली पाहिजेत. हे तत्त्व मुस्लीम समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

४) मुस्लीम स्त्रियांना समान हक्क मिळावेत.

५) मुस्लीम समाजातही कुटुंबनियोजनाचा प्रचार करून लोकसंख्यावाढीला नियंत्रण घालण्याची गरज पटवून दिली पाहिजे.

या पाचपैकी कमी-अधिक प्रमाणात दोन उद्दिष्टे साध्य होताना दिसतात. मराठी भाषा बोलणारे, या भाषेत शिकणारे व लिहिणारे मुस्लीम वाढत आहेत. दुसरे म्हणजे कुटुंबनियोजन. लोकसंख्या नियंत्रणाच्या बाबतीत समाजात अंमलबजावणी वाढत आहे. संघपरिवाराने व प्रसारमाध्यमांनी मुस्लिमांच्या लोकसंख्येचा टक्का वाढला असा अपप्रचार केला असला, तरी गेल्या काही दशकांत मुस्लीम जन्मदर हिंदूंच्या तुलनेत कमी झाल्याचे स्पष्ट होत आहे. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न आणि या विषयावरील समज-गैरसमज यावर प्रकाश टाकणारे आणि सद्यपरिस्थितीचा आढावा घेणारे 'द पॉप्युलेशन मिथ्स' हे भारताचे १७वे मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. एस. वाय. कुरेशी यांनी लिहिलेले पुस्तक समजून घेतले पाहिजे.

ज्येष्ठ विचारवंत नरहर कुरुंदकर म्हणतात, ''महात्मा फुले यांच्यापेक्षा हमीदभाईंचे कार्य अधिक बिकट होते. हमीदभाईंना महान विचारवंत म्हणून कीर्ती मिळवण्याची इच्छा नव्हती.

त्यांना समाजपरिवर्तनाचे आंदोलन अधिक प्रिय होते. महंमद पैगंबर आणि ‘कुराणा’बाबत चर्चा करून समाजाचे मन दररोज दुखवावे आणि पुरुषार्थ मिरवावा, असे त्यांनाही वाटत नव्हते. हमीदभाई स्वतः नास्तिक आणि अश्रद्ध होते; पण मुस्लीम समाजाने - (अथवा मंडळाने) नास्तिक व अश्रद्ध झालेच पाहिजे, असा त्यांचा आग्रह नव्हता.”

हमीदभाईंच्या नास्तिकतेचा बाऊ करून मंडळाच्या कार्यात अडथळे आणण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. त्यांची ही भूमिका पूर्णतः व्यक्तिगत होती. तिच्याशी ते प्रामाणिक होते. मंडळ आस्तिक-नास्तिकता ही व्यक्तीस्वातंत्र्याचा भाग मानते व त्याचा आदर करते, हे हमीदभाई असताना आणि नंतरच्या चाळीस वर्षांत मंडळाने पुनःपुन्हा स्पष्ट केलेले आहे, तरीही यासंदर्भात संभ्रम बाळगून काही कार्यकर्ते मंडळापासून दूर गेले याचे दुःख आहे.

मंडळाचा दुसरा टप्पा हमीदभाईंच्या निधनानंतर सुरू होतो. त्यांच्या निधनानंतरची दोन-अडीच दशके हमीदभाईंच्या मुशीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी मंडळाचे कार्य जोमाने पुढे नेण्यासाठी वापरली. मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई, वजीर पटेल, फक्रुद्दीन बेन्नूर, हुसेन जमादार, अन्वर शेख, सय्यद मुनीर, अ. का. मुकादम यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी पहिल्या दशकात मोठे योगदान दिले.

एखादी संस्था किंवा चळवळ पाच दशकांहून अधिक काळ चालवताना अनेक अडचणी आणि आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामुळे हमीदभाईंनंतर मंडळ बंद पडेल, असे अनेकांना वाटत होते, परंतु मंडळाने आपले अस्तित्व टिकवून उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने मार्गक्रमण केले आहे. मंडळाच्या पाच दशकांचा संक्षिप्त आढाव्याकडे दृष्टिक्षेप टाकणे उपयुक्त ठरेल.

**मंडळाचे पहिले दशक**

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनकाळात आधुनिक विचारांचा प्रसार होत राहिला. तथापि या विचारांना मिळणारा प्रतिसाद मात्र संमिश्र राहिला. एका बाजूला परकियांबरोबर संघर्ष करत असतानाच धर्मवर्चस्ववादी विचारमानसिकता डोके वर काढत होती. यातूनच हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जमात-ए-इस्लामी यांसारख्या संघटनांनी जनसामान्यांवर आपल्या विचारांची छाप पाडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. या विभाजनवादी विचाराला प्रतिबंध घालून, सर्वसमावेशक धोरण आखून नवसमाज निर्मितीसाठी ‘राष्ट्र सेवा दला’सारख्या समतावादी संघटना उभ्या राहिल्या. हमीदभाईंवर बालवयात ‘राष्ट्र सेवा दला’ने राष्ट्रप्रेम, समता आणि सुधारणेचे संस्कार केले.

देशाला स्वातंत्र्य मिळाले, ते देशाच्या विभाजनाची किंमत मोजून! मात्र फाळणीनंतरही धर्मवादी संघटना आणि जमातवादी मानसिकता खदखदत राहिली. मुस्लीम समाजातील धर्मवादी नेतृत्वाने आधुनिकतेकडे घेऊन जाणाऱ्या विचाराला त्या काळात कडाडून आणि आक्रमकपणे विरोध केला. सर सय्यद अहमद खान आणि त्यांच्या धर्तीवर धर्मसुधारणा करणाऱ्यांचीही अवहेलना केली. उलट, हिंदू समाजात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्या परंपरेला विरोध होत राहिला, तरी सुधारणावादी विचार रुजत गेला. महात्मा गांधी आणि त्यांच्या समर्थकांनी हिंदुत्ववाद व हिंदू जमातवाद परतवून लावला. परिणामी, आधुनिक राष्ट्र घडवणारे भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली तयार झाले. मौलाना आझाद, डॉ. झाकीर हुसेन, बद्रुद्दीन तय्यबजी आदी मंडळींना मुस्लीम जमातवादी मानसिकता रोखता आली नाही.

अशरफी म्हणजे उच्चवर्णीयांनी पाकिस्तानची वाट धरली; मात्र या मातीशी एकरूप झालेला गरीब, बलुतेदार, श्रमिकवर्ग भारतात राहिला. या सामान्य मुस्लीम समाजाला आधुनिकतेची दिशा देण्याऐवजी त्यांचे मागासपण आणि धर्मवादी मानसिकता कायम ठेवणारे नेतृत्व वरचढ झाले.

या काळातील मुस्लीम समाजाचे चित्रण हमीदभाई वयाच्या अठराव्या वर्षापासून साहित्यरूपात मांडत राहिले. 'इंधन' या कादंबरीतून आणि जवळपास पन्नास कथांतून हमीदभाईंनी खऱ्या अर्थाने मुस्लीम मराठी साहित्य जन्मास घातले. मुस्लीम समाज त्याच्या निरक्षरतेमुळे आणि मराठी भाषेविषयीच्याच्या पूर्वग्रहदूषित वर्तनामुळे हमीदभाईंच्या साहित्याला प्रतिसाद देऊ शकला नाही.

भारतीय समाजप्रबोधनाच्या चळवळीत मुस्लीम समाज मागे राहिला, तर या समाजात अनेक समस्या निर्माण होतील आणि या प्रबोधनाचे समतोल उद्दिष्ट साध्य करण्यात अपयश येईल, ही जाणीव हमीदभाईंना अस्वस्थ करत होती. जगातील समाजप्रबोधनाच्या चळवळीचा प्रारंभ स्त्रीदास्यमुक्तीच्या मूल्यापासून सुरू होतो. हा धागा विचारात घेऊन त्यांनी मुस्लीम महिलांच्या मानवी हक्कांचा मुद्दा सर्वप्रथम हाती घेतला.

हमीदभाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी आपली पत्नी, बहीण आणि इतर पाच महिला अशा सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला, मूल दत्तक घेण्यास असणारा मज्जाव या विषम-अन्यायी तरतुदींविरोधात इस्लामच्या इतिहासातील पहिला आवाज उठवला आणि 'समान नागरी कायद्या'ची मागणी करणारे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना दिले.

महिलांनी संघटितपणे आपल्या हक्कांची लढाई पुढे घेऊन जावी, यासाठी त्यांनी 'सदा-ए-निसवाँ' (महिलांची हाक) ही संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. मात्र तिला हवा तसा प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यानंतर त्यांनी मुस्लीम जमातवादाची चिकित्सा केली. जमातवादी मानसिकता आधुनिक राष्ट्रवादाच्या उभारणीतील पहिली अडचण आहे, असा त्यांचा विश्वास होता. या निमित्ताने त्यांनी भारतातील विचारवंत आणि मुस्लीम बुद्धिजीवींशी चर्चा केली. देशाच्या सीमांलगतच्या भागांचा दौरा केला. दै. 'मराठा'तील लेखांतून 'इस्लामचे भारतीय चित्र' रेखाटले. मुस्लीम बुद्धिजीवी, तथाकथित राष्ट्रवादी मुस्लीम आणि मुस्लीम नेतृत्वाशी केलेल्या चर्चेतून त्यांचे 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप - कारणे व उपाय' हे पुस्तक आकाराला आले.

साधना प्रकाशनाने हे विचार पुस्तकरूपाने प्रकाशित केले. दिलीप चित्रे यांनी हमीदभाईंची मुलाखत घेऊन या पुस्तकात भर घातली आणि 'मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया' हे इंग्रजी पुस्तक १९६८मध्ये नचिकेत प्रकाशन, मुंबई यांच्यातर्फे प्रकाशित केले. त्याच वर्षी प्रा. अ. भि. शहा, हमीदभाई आणि इतर सेक्युलॅरिस्ट मंडळींनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली. या सोसायटीचे शहा अध्यक्ष आणि हमीदभाई उपाध्यक्ष होते. या सोसायटीमार्फत 'द सेक्युलॅरिस्ट' हे नियतकालिक प्रकाशित केले जाऊ लागले आणि त्यातून विज्ञाननिष्ठा आणि सेक्युलॅरिझम या संकल्पना अधिक स्पष्ट करण्यात येऊ लागल्या. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक मनोभूमिकेवर आधारलेला हा सेक्युलॅरिझम भारतीय समाजात रुजावा, ही भूमिका घेऊन त्यांनी

केलेले प्रयत्न हे सेक्युलॅरिझमच्या संकल्पना विकासातील मोठे योगदान आहे. पण हमीदभाईंना अपेक्षित असणारी सेक्युलॅरिझमची परिभाषा मुस्लिमांना सोडा, पण आधुनिकतेचे वारे लागलेल्या हिंदू समाजालाही परवडत नव्हती.

१९६६ ते १९७० हा काळ मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या जडणघडणीचा काळ. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवरील पहिला मोर्चा, अभ्यास दौरा, संवाद अभियान, वैचारिक पुस्तकांचे लेखन, लेखमाला, इंडियन सेक्युलर सोसायटी, हे सर्व बुद्धिजीवी वर्गापुरते मर्यादित राहत होते. पण ज्या समाजातील प्रबोधनाची दरी भरून काढायची होती, तो समाज उदासीन, जैसे थे आणि प्रभावहीन होता. म्हणून हमीदभाईंना मुस्लीम समाजकेंद्रित संघटना उभारणे जास्त महत्त्वाचे वाटले. ही चळवळ 'क्लास'मध्ये अडकून न पडता 'मास'मध्ये जायला हवी, या तळमळीतून त्यांनी समविचारी मित्रांशी संवाद केला. या कामी भाई वैद्य, बाबा आढाव यांच्यासह 'साधना' आणि समाजवादी परिवारातील विचारवंत कार्यकर्त्यांनी साथ दिली. भाई वैद्य यांच्या घरात अनेक बैठका झाल्या. त्या काळात 'राष्ट्र सेवा दला'च्या संपर्कात असलेल्या उदारमतवादी मुस्लीम कार्यकर्त्यांची ओळख भाई वैद्य यांनी करून दिली. मुस्लीम समाजात प्रबोधनाचा विचार, चिकित्सेचा मुद्दा मुस्लिमांनी घेऊन जायला हवा. यासाठी समाजातील लोकांनी 'आपले घर' दुरुस्त करण्याच्या भूमिकेतून संघटना उभारावी, असा विषय मांडला गेला. मग समविचारी कार्यकर्त्यांची बैठक 'साधना' कार्यालयात घेण्यात आली. २२ मार्च १९७० रोजी झालेल्या त्या ऐतिहासिक बैठकीत डॉ. बाबा आढाव यांनी या संघटनेला 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' हे नाव सुचवले. सर्वानुमते त्यास संमती मिळाली.

मंडळाच्या स्थापनादिनी बाबा आढाव बैठकीस मिरवणुकीने गाजावाजा करत आले होते. यदुनाथ थत्ते, ग. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी आणि इतर काही समाजवादी–समतावादी मंडळींनी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे स्वागत व समर्थन केले. आरंभीच्या काळात ए. जे. शेख यांनी काही काळ मंडळाचे अध्यक्ष म्हणून साथ दिली. मंडळाची स्थापना होत असल्याची वर्तमानपत्रात आलेली बातमी वाचून स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले हे श्रीगोंदा येथून बैठकीला आले होते. नि:स्पृह, धार्मिक आणि सात्त्विक विचाराच्या बाबुमियाँनी मंडळाचे अध्यक्ष व्हावे, अशी इच्छा हमीदभाईंनी व्यक्त केली. बाबुमियाँनी ही जबाबदारी आनंदाने घेतली.

'साधना ट्रस्ट'ने हमीदभाईंचे व्याख्यान १९६८मध्ये आयोजित केले होते. तेव्हा सय्यदभाई आणि हमीदभाई यांचा परिचय झाला. त्यांनीही चळवळीत सक्रिय व्हायची भूमिका घेतली. हमीदभाईंशी कोल्हापूरहून पत्रव्यवहार करणारे हुसेन जमादार मंडळाशी जोडले गेले. अमरावतीचे वजीर पटेल यांनी 'यंग मुस्लीम असोसिएशन' या नावाची संस्था काढून मुस्लीम विकासाचे काम सुरू केले होते. त्यांनी हमीदभाईंच्या कार्यात वाहून घेतले.

याशिवाय मरियम रफाई, पत्रकार सय्यद मुनीर, हुसेन दलवाई, अब्दुल कादर मुकादम, अन्वर शेख, महंमद नगारजी, बशीर शेख, अमीर शेख, ॲड. नजमा, रशिद शेख, फजल शेख, मुमताज रहिमतपुरे, मुमताज मोमीन, डॉ. शमीम अत्तार; मुंबईचे महंमद दलवाई, ॲड. मुलाणी, लतीफ खाटिक, राजसाब मुलाणी; कोल्हापुरातील महंमद सोलापुरे, नसरुद्दीन बारगीर, खदिजा बागवान, गणी फरास; अहमदनगर येथील निसार बाटलीवाला, मेहबूब बँडवाले, पठाण टेलर; चिपळूणचे

दादाभाई पटेल, जोहरा भाटकर; सातारा जिल्ह्यातील इलाही मोमीन, करीम खान, प्रा. ए. डी. अत्तार, डॉ. बाबालाल मणेर, प्रा. विलायत शेख, महमूदमियाँ दारूवाले व इतर; अमरावतीचे अजीज बारी; सोलापुरातील प्रा. फक्रूद्‌दिन बेन्नूर, सय्यद मुनीर, महमंद हनीफ, बालम शेख ही मंडळी जोडली गेली आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे दूत होऊन कामाला लागली.

हमीदभाईंच्या निधनानंतर अन्वर राजन, शमसुद्‌दिन तांबोळी, चाँदसाब, रजिया सुलताना, समद खान, बानू शेख, समीर मणियार, मुसा मुलाणी, बशीर तांबोळी, प्रा. अमिन मोदी, प्रा. तसनीम पटेल, प्रा. ऐनुल अत्तार, प्रा. आशा अपराद, बाबासाहेब काझी, शबनम सोमजाळ अशा अनेक कार्यकर्त्यांनी मंडळाला बळ दिले.

हमीदभाईंच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी मेहेरून्निसा दलवाई यांनी मंडळात सक्रिय होऊन मंडळाचे नेतृत्व केले. मंडळाच्या पहिल्या दशकातील कार्यकर्त्यांची यादी बरीच मोठी आहे, ती जवळपास तीनशेच्या आसपास भरेल. हमीदभाईंच्या सत्यशोधकी भूमिकेला साथ देणारी ही फक्त महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची यादी आहे.

हमीदभाईंच्या मुस्लीम समाजप्रबोधनाला पाठिंबा देणाऱ्यांत प्रा. कुलसुम पारेख, प्रा. मोईन शाकीर, ॲड. अब्दुल शेख, प्रा. असफ ए. ए. फैजी, एम. आर. ए. बेग या बुद्‌धिजीवी व्यक्तींचाही समावेश आहे. मंडळाच्या पहिल्या दशकास 'सुवर्णकाळ' असे म्हणावे लागेल. कारण हा हमीदभाई यांच्या हयातीतील झंझावाती कार्यक्रमांचा काळ आहे. इस्लामच्या जगतातील ही अद्‌वितीय चळवळ पहिल्या दशकातच एका उंचीवर गेली होती. कारण हमीदभाईंचे प्रत्यक्ष नेतृत्व आणि बुद्‌धिप्रामाण्य विचारांचे भक्कम अधिष्ठान लाभले होते.

या चळवळीचे क्रांतिकारकत्व मंडळाच्या दीड-दोन पानांच्या जाहीरनाम्यात दिसून येते - ''मुस्लीम समाजप्रबोधनाच्या आरंभीच्या काळातील प्रयत्न वगळल्यास एरवी निराशाच पदरी पडली. सर सय्यद अहमद खानांचा सुधारणेचा गाडा विभक्ततावादाच्या दलदलीत रुतून बसला. हिंदू समाजात पुरोगामित्वाचे प्रयत्न होत असताना, मुस्लीम समाज मात्र कालसुसंगत बदलांविरुद्‌ध आटापिटा करीत होता. बहुसंख्य हिंदू परिवर्तनवादी मंडळीही कळत-नकळत या प्रक्रियेला हातभार लावत होती. बदललेल्या परिस्थितीचे भान आणि आव्हान समाज स्वीकारू शकला नाही. प्रजासत्ताक भारतात मुस्लीम समाज एक सन्माननीय घटक म्हणून नांदण्यासाठी लोकशाही, धर्मनिरपेक्ष, समतावादी मूल्य स्वीकारले नाही, तर संविधानाचा पाया कमकुवत राहील. हे कार्य व्हावे म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात येत आहे. मंडळाचे हे नाव महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव म्हणून या मंडळाच्या संस्थापक सभासदांपुढे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात अशी सुधारणावादी चळवळ विशिष्ट धर्मगटासाठी नको होती, परंतु मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी मंडळाचे कार्यक्षेत्र या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. सामाजिक बदलाची दरी नष्ट झाल्यास हे मंडळ मुस्लीम समाजापुरते काम करणार नाही. मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही. अशी अवस्था यावी म्हणून हे मंडळ कार्य करीत राहील.''

हा मंडळाची ध्येय-धोरणे आणि वैचारिक अधिष्ठानाचा आत्मा आहे. मंडळाने आरंभीच्या काळात घेतलेले कार्यक्रम हे मुस्लीम महिलांना पुरुषप्रधान मानसिकतेतून मुक्त करून, त्यांना

समानतेचा संविधानात्मक हक्क मिळवून देणे, धर्मनिरपेक्षता व लोकशाही मूल्यांशी बांधीलकी म्हणून 'समान नागरी कायद्या'ची मागणी, जमातवादी-विघटनवादी मानसिकतेविरुद्ध संघर्ष करून, मुस्लीम चिकित्सा करून समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाण्यासाठी कार्यक्रम घेणे, मुस्लीम समाजाच्या ऐहिक विकासासाठी आधुनिक शिक्षण, प्रादेशिक भाषेचा सन्मान व स्वीकार आणि कुटुंबनियोजनासाठी लोकाधार मिळवून देणे, यास प्राधान्य देण्यात आले. राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाच्या प्रस्थापनेबरोबरच मुस्लीम समाजप्रबोधनासाठी पहिल्या दशकात मंडळाने विविध कार्यक्रम आयोजित केले.

८ एप्रिल १९७० रोजी मंडळाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या पंधरवड्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' आणि 'इंडियन सेक्युलर सोसायटी'तर्फे ५०० मुस्लीम स्त्री-पुरुषांच्या सह्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना देण्यात आले. यात 'समान नागरी कायद्या'ची मागणी करण्यात आली होती.

३१ मे १९७० रोजी मंडळाच्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन वि. स. खांडेकर यांच्या हस्ते आणि माधवराव बागल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कोल्हापूर भागात मंडळासाठी अनेकांनी सहकार्य केले. १६ ते १८ जून १९७० काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामान्य मुस्लिमांशी त्यांच्या मोहल्ल्यात जाऊन संवाद करण्याची मोहीम आखली. पुण्यातील मोमिनपुरा भागात हमीदभाईंनी संवाद करण्यासाठी कार्यक्रम आखला. मात्र गैरसमजाने पछाडलेल्या मुस्लिमांनी त्यांच्यावर हल्ला केला. यासंदर्भात महाराष्ट्रातील अग्रणी वर्तमानपत्रांत अग्रलेख छापून आले. हमीदभाईंना पोलीस तक्रार नोंदवण्याचा सल्ला देण्यात आला, मात्र त्यांनी तक्रार न नोंदवण्याची भूमिका घेतली. ३ ऑगस्ट १९७० रोजी मंडळाच्या वतीने 'परमवीरचक्र अब्दुल हमीद व्याख्यानमाले'ची सुरुवात करण्यात आली.

पुण्यातील अहिल्या आश्रमात स्वातंत्र्यवीर मोहन रानडे आणि कायदेतज्ज्ञ प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे व्याख्यान झाले. १८, १९ सप्टेंबर १९७१ रोजी गणेश मंगल कार्यालय, कोल्हापूर येथे पहिले कार्यकर्ता शिबिर आयोजित करण्यात आले. यात हमीदभाई, प्रा. अ. भि. शहा या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. ४ नोव्हेंबर १९७१ रोजी 'इस्लामचा आधुनिक दृष्टीकोन' या विषयावर प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे कोल्हापूर येथे व्याख्यान झाले. याच महिन्यात गांधी भवन, पुणे येथे कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शहा-दलवाई, यदुनाथ थत्ते, अनिल अवचट यांनी मार्गदर्शन केले.

देशातील पुरोगामी विचारवंतांना एकत्र करून दिल्लीत 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम' परिषद आयोजित करण्यात आली. भारत-पाक युद्धाच्या काळात झालेल्या या परिषदेसाठी लखनौ, अलिगढ अशा मुस्लीमबहुल भागांतून प्रतिनिधी आले होते. २७-२८ नोव्हेंबर १९७१ रोजी पुणे येथे मुस्लीम महिला परिषद आयोजित करण्यात आली. यात सुमारे २०० महिला उपस्थित होत्या. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांबरोबरच अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली येथील अनेक महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. तलाकपीडित महिलांनी आपल्या व्यथा मांडल्या. फकर बेगम (दिल्ली) आणि जहाँआरा बेगम (कलकत्ता) यांनी मुस्लीम महिलांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची मागणी केली. १९७१मध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तत्कालीन

राज्यपाल अलियावर जंग यांची भेट घेऊन 'समान नागरी कायद्या'साठी निवेदन दिले. तसेच या वर्षात दिल्ली, बुलंद शहर, तंजावर, बंगलोर, हैदराबाद, लखनौ, मुंबई, पुणे, कोल्हापूर येथील सुमारे ५०० मुस्लीम महिलांची त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी पाहणी केली. यामध्ये १५० महिला तलाकपीडित असल्याचे लक्षात आले.

४-५ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स'चे आयोजन करण्यात आले आणि महाराष्ट्रात सुरू झालेली मुस्लीम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न मंडळाच्या वतीने करण्यात आला.

१९७१ हे वर्ष मंडळासाठी कार्यक्रमांच्या धूमधडाक्याचे म्हणावे लागेल. कोल्हापूरप्रमाणेच या वर्षात अहमदनगर (श्रीगोंदा), सोलापूर, पंढरपूर येथे मंडळाच्या शाखा स्थापन झाल्या. मंडळाच्या सुधारणावादी विचाराचा परिणाम म्हणून धर्मवाद्यांनी 'मुस्लीम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटी' स्थापन केली. ती नंतर 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' म्हणून कार्यरत राहिली.

८ जुलै १९७२ रोजी मंडळाने वेळोवेळी दिलेली निवेदने, आयोजित केलेले कार्यक्रम विचारात घेऊन महाराष्ट्राचे तत्कालीन कायदामंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी महाराष्ट्र विधानसभेत मुस्लिमांसाठी 'द्विभार्या प्रतिबंधक कायदा' अस्तित्वात आणण्याचे आश्वासन दिले. महाराष्ट्रातर्फे केंद्र सरकारकडे असा कायदा आणण्यासाठी पाठपुरावा करू, असे बॅ. अंतुलेंनी सांगितले.

२३-२४ सप्टेंबर १९७२ दरम्यान आंतरभारती हायस्कूल-कोल्हापूर येथे अभ्यास आणि स्नेहमीलन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात हमीदभाई, बाबुमियाँ बँडवाले, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, अ. का. मुकादम, हुसेन जमादार, बानूबी पठाण यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले.

जानेवारी १९७३मध्ये कोल्हापुरातून मंडळाचे मुखपत्र 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' सुरू करण्यात आली. अंकाच्या संपादनाची जबाबदारी हुसेन जमादार यांनी घेतली. कोल्हापूर येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकरांच्या भारती मुद्रणालयात ती छापण्यात येत असे. कोल्हापुरातून पत्रिकेचे सुरुवातीचे पहिले पाच अंक प्रकाशित झाले. १९७४पासून पुण्यातून पत्रिका काढण्याचा निर्णय झाला. पत्रकार सय्यद मुनीर यांनी संपादनाची जबाबदारी स्वीकारली.

देशप्रेम, राष्ट्रभक्ती ही धर्मातीत असते. मुस्लीम जमातवाद्यांकडून 'वंदे मातरम्'ला केला जाणारा विरोध अनाठायी असल्याची भूमिका घेऊन मंडळामार्फत 'वंदे मातरम्'च्या पहिल्या दोन कडव्यांच्या गायनासाठी फेब्रुवारी १९७३मध्ये अभियान सुरू करण्यात आले. हमीदभाईंनी व्याख्याने आणि लेखांतून लोकशिक्षण केले. ११ मार्च १९७३ रोजी मराठा मंदिर मुंबई- येथे 'महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषद' आयोजित करण्यात आली. समता, शिक्षण, कायदा या विषयांवर चर्चा करण्यात आली. यात कुलसुम पारेख, हमीदभाई, प्रा. असफ ए. ए. फैजी, अ. भि. शहा, डॉ. मोईन शाकीर यांची भाषणे झाली.

११-१२ ऑगस्ट १९७३ दरम्यान कोल्हापुरात २०० कार्यकर्त्यांसाठी शैक्षणिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हमीदभाई, भाई वैद्य, अ. भि. शहा, बाबुमियाँ बँडवाले आदींनी मार्गदर्शन केले. १९७३मध्ये सनातनी मुस्लीम बांधवांनी 'समान नागरी कायद्या'स विरोध करण्यासाठी 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ची स्थापना करण्यासाठी मुंबईत परिषद

घेतली. तिला सुमारे १०,००० प्रतिनिधी होते. या परिषदेच्या ठिकाणी हमीदभाईंसह कार्यकर्त्यांनी निषेधाची निदर्शने केली. ३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी कोल्हापूर येथे मुस्लीम शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली. महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे ८०० प्रतिनिधी उपस्थित होते. यात आधुनिक शिक्षण, प्रादेशिक भाषेचा स्वीकार, मदरशांचे आधुनिकीकरण या विषयांवर चर्चा झाली. अनेक ठराव मांडण्यात आले. शिक्षणक्षेत्रातील अनेकांनी उपस्थिती लावली.

९ जून १९७४ रोजी चिपळूण येथे मुस्लीम महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या वेळी सनातनी मंडळींनी निदर्शने केली, रस्ते अडवले, धमक्या दिल्या. आदल्या दिवशी मिरजोळी येथील हमीदभाईंच्या घरी मध्यरात्री दोन ट्रक आणि जीप्समधून मोठ्या संख्येने आलेल्या विरोधकांनी दंगा करून वातावरण तापवले. अशा परिस्थितीत डॉ. शमीम अत्तार यांनी मेळाव्याचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी मेहेरून्निसा दलवाई होत्या.

लोकसंख्यावाढ नियंत्रणात ठेवली नाही, तर भारतीय समाज समृद्ध व सदृढ होणार नाही. मुस्लीम समाजात कुटुंबनियोजनाचे प्रमाण वाढवले पाहिजे, त्यांचे गैरसमज दूर केले पाहिजेत, या कामी अमरावतीचे वजीर पटेल यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली. १९७४मध्ये त्यांनी स्त्री-पुरुषांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करून लोकसंख्या नियंत्रणाविषयी जणीवजागृती केली. हमीदभाई हयात असेपर्यंत वजीर पटेलांनी दर वर्षी कुटुंबनियोजनाचा उपक्रम धाडसाने आणि जीव धोक्यात घालून राबवला. ‘बागबान’ नावाचे उर्दू साप्ताहिक चालवून समाजजागृती केली.

२ नोव्हेंबर १९७५ रोजी खादी ग्रामोद्योग केंद्र, कोल्हापूर येथे तलाकपीडित महिलांची विभागीय परिषद आयोजित करण्यात आली. कोल्हापुरात मंडळातर्फे मोफत ‘कायदा सल्ला केंद्र’ सुरू करण्यात आले.

१५ नोव्हेंबर १९७५ रोजी तलाकपीडित महिलांच्या शिष्टमंडळाने सांगलीला मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन तोंडी तलाक रद्द करण्यासाठी निवेदन दिले. २३ नोव्हेंबर १९७५ रोजी पुणे येथे ‘जिहाद-ए-तलाक’ या राज्यव्यापी सामाजिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ५०० महिला उपस्थित होत्या. सय्यदभाईंच्या पुढाकारातून भरलेल्या या परिषदेत प्रा. कुलसुम पारेख, ॲड. नजमा शेख आणि अन्य महिला प्रतिनिधींनी मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर विचार मांडले.

१९७६मध्ये हमीदभाईंच्या मूत्रपिंडाचा आजार वाढला होता. थोडे बरे वाटल्यानंतर हमीदभाई अमेरिकन स्वातंत्र्याच्या द्विशताब्दीनिमित्त फिलाडेल्फिया येथे आयोजित केलेल्या परिषदेला उपस्थित राहिले होते. या वेळी त्यांनी अमेरिका, जर्मनी, इंग्लंड असा दौरा केला. कार्यकर्त्यांशी चर्चा, विविध शाखांना भेटी चालूच होत्या. हमीदभाईंच्या मूत्रपिंडाच्या आजारपणाच्या काळात मा. शरद पवार, विचारवंत अ. भि. शहा, माजी सनदी अधिकारी वसंत नगरकर, संपादक गोविंदराव तळवलकर आणि इतरांनी सहकार्य केले. तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री निधीतून ५०,००० रुपये उपचारासाठी दिले.

३ मे १९७७ रोजी हमीदभाईंचे निधन झाले. त्यांच्या निरीश्वरवादी, निधर्मी भूमिकेप्रमाणे त्यांनी मृत्युपत्र तयार केले होते. कोणतेही धार्मिक विधी न करता चंदनवाडीतील विद्युतदाहिनीत

शरीरदहन केले. हे दु:खाचे सावट असतानाही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करून हमीदभाईंना अभिवादन केले. 'साधना साप्ताहिका'ने १४ मे १९७७ रोजी 'हमीद दलवाई स्मृतिविशेषांक' काढून मान्यवरांचे लेख प्रकाशित केले.

२२ मे १९७७ ते २ जून १९७७ दरम्यान कोल्हापूर येथील जिल्हा ग्रामोद्योग संघात मुस्लीम महिलांचे दहा दिवसांचे शिबिर आयोजित केले. महिलांना कौशल्य-प्रशिक्षणाबरोबरच समानता, एकात्मता, शिक्षण यांवर बौद्धिक देण्यात आले. यात कुलसुम पारेख, कमल पाध्ये, नरहर कुरुंदकर, यदुनाथ थत्ते, दत्ता शिंदे, बापूसाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले. २३ ऑक्टोबर १९७७ रोजी अहमदनगर येथे तलाकपीडित मुस्लीम महिला मेळावा आयोजित केला. यामध्ये १०० महिलांनी भाग घेतला. २६ डिसेंबर १९७७ रोजी अमरावती येथे विदर्भातील सुमारे ७०० महिलांची 'जिहाद-ए-तलाक' परिषद घेण्यात आली.

नरहर कुरुंदकर, मेहेरून्निसा दलवाई, मुमताज रहिमतपुरे, श्रीमती बारी, वजीर पटेल आदींनी मार्गदर्शन केले. या परिषदेत तलाकपीडित महिला इतक्या प्रमाणात उपस्थित होत्या की, पुरुषांना महिलांसाठी सभागृह रिकामे करून द्यावे लागले. मंडळाच्या इतिहासातील ही सर्वांत मोठी परिषद वजीर पटेल यांनी अमरावती येथे आयोजित केली होती.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य पुढे चालले पाहिजे. भारतीय संविधानात म्हटल्याप्रमाणे जात, धर्म, वंश, प्रदेश, स्त्रीपुरुष भेदरहित अखिल भारतीय नागरिकत्व विकसित व्हावे. हमीदभाईंचे सत्यशोधकी विचारकार्य कार्यरत राहावे, म्हणून 'साधना'चे संपादक यदुनाथ थत्ते यांनी पुढाकार घेऊन मेहेरून्निसा दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, बाबा आढाव आणि यदुनाथ थत्ते आदींचे विश्वस्त मंडळ स्थापन करण्यात येणार असल्याचे घोषित करून आर्थिक साह्याचे आवाहन केले आणि यासाठी मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी निर्माण करून 'साधना'च्या पत्त्यावर धनादेश मागवण्यात आले. याप्रसंगी 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चा विशेषांक काढण्यात आला.

३ मे १९७८ रोजी हमीदभाई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त पुणे कोल्हापूर आणि त्या-त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून मंडळाच्या मागण्यांबाबत निवेदने दिली.

मुंबई शाखेने पत्रक काढून वितरित केले. ६ मे १९७८ रोजी सातारा येथे 'जिहाद-ए-तलाक' परिषद घेण्यात आली. त्यात महिला प्रतिनिधींबरोबरच डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी मार्गदर्शन केले. ३ मे १९७९ रोजी हमीदभाईंच्या द्वितीय स्मृतिदिनी पुणे-कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कचेरीवर विविध मागण्यांसाठी उपोषण करण्यात आले. मे १९७९मध्ये नेरळ येथे मुस्लीम तरुणांचे अभ्यास शिबिर आयोजित केले. १० दिवसांच्या या शिबिरकाळात न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, कुलसुम पारेख, वसंतराव नगरकर, यदुनाथ थत्ते, असगर अली इंजिनिअर यांनी अभ्यासवर्ग घेतले. याच शिबिरामध्ये नरहर कुरुंदकर यांनी सलग तीन दिवस विविध विषयांवर बौद्धिके घेतली.

मंडळाच्या वैचारिक भूमिकेचा सर्वसामान्य वाचकांना परिचय व्हावा, या हेतूने 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ने 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ-उद्देश व भूमिका' हे पुस्तक प्रकाशित करून मंडळास सहकार्य केले. मंडळाचे कार्यकर्ते अन्वर शेख यांनी या पुस्तिकेच्या लेखनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच यासाठी मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेही मार्गदर्शन लाभले

आहे. २६ जानेवारी १९७९ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकास मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले यांनी प्रस्तावना लिहिली आहे. (या पुस्तकाची सुधारित आवृत्ती मंडळाने ४७व्या वर्धापनदिनी पुन्हा प्रकाशित केली.)

मंडळाचा हा कार्यकाळ विविध कार्यक्रम, आंदोलने, लोकशिक्षणासाठी केलेल्या विविध उपक्रमांनी भरला आहे; तसेच याकाळात विचारवंतांच्या विचारमंथनातून मंडळाचे वैचारिक अधिष्ठान तयार झाले आहे. मंडळाच्या दृष्टीने हे 'सुवर्णदशक' आहे.

**हमीदभाईंनंतरची चार दशके**

हमीदभाईंनंतरची मंडळाची दुसऱ्या दशकातील वाटचाल आव्हानात्मक आणि नेते व कार्यकर्त्यांच्या कसोटीची होती. हे आव्हान समजून घेण्यासाठी पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही काही घटना व कार्यक्रमाचा मागोवा घेणे आवश्यक वाटते.

हमीदभाईंनी पेटवलेली सत्यशोधकी मशाल त्यांच्या मृत्यूनंतर विझेल आणि सत्यशोधकी विचार व मंडळ उरणार नाही, असा भ्रम विरोधकांनी बाळगला होता; परंतु त्यांचा भ्रमनिरास झाला. हमीदभाईंनी आपल्या हयातीत इतर अनुषंगिक विषयांबरोबरच दोन महत्त्वपूर्ण बाबींवर सर्वाधिक लक्ष दिले. त्यातील पहिली गोष्ट– धर्मनिरपेक्ष एकात्मिक समाजासाठी धर्मवादी राजकारणावर आणि धर्मांधतेवर घाला. दुसरी महत्त्वपूर्ण गोष्ट अशी– आधुनिक, समतावादी समाजासाठी 'समान नागरी कायद्या'ची मागणी.

हमीदभाई म्हणत, ''समान नागरी कायद्याशिवाय समान नागरिकत्वाची भावना लोकमानसात रुजणार नाही, याबाबत लोकशिक्षण झाले पाहिजे. लोकानुनयाला मर्यादा असली पाहिजे. मागासलेल्या देशातील लोकांची मनेही मागासलेली असतात. केवळ लोकानुनय करीत राहिले, तर असे देश कायमचे मागासलेले राहतील. अभिक्रमशील राजकारणात केवळ लोकानुनय पुरेसा नसतो. समान नागरिकत्वाच्या पायावरच राष्ट्रीय एकात्मतेची इमारत उभी राहील.''

नंतरच्या काळात संघपरिवाराने 'समान नागरी कायद्या'चा विषय आपल्या अजेंड्यावर घेतला असला; तरी त्यांची समान नागरी कायद्याविषयीची धारणा ही समान नागरिकत्वाच्या, समतेच्या व आधुनिकतेच्या विचारावर आधारित नव्हती. 'इंडियन सेक्युलर सोसायटी' आणि 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या दोन्ही संस्था धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर 'समान नागरी कायद्या'साठी मोर्चे, निवेदने, परिषदा यांचे आयोजन करत राहिल्या.

मंडळाच्या १२व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानसभेवर 'समान नागरी कायद्या'च्या मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला. तो संस्मरणीय ठरला. १९८१मध्ये हमीदभाईंच्या पुण्यतिथीनिमित्त प्रा. अ. भि. शहा यांचे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे 'इस्लाम आणि संस्कृती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

शहांचा मंडळाला मोठा आधार होता, परंतु ११ ऑक्टोबर १९८१ रोजी त्यांचे हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. त्यामुळे मंडळावर मोठा आघात झाला. याबरोबरच कायदा व धर्मशास्त्राचे अभ्यासक असणारे आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन मार्गदर्शन करणारे प्रा. असफ ए. ए. फैजी यांचेही निधन झाले. सय्यद मुनीर आणि फजल शेख

यांनी वैयक्तिक कारणातून मंडळाचा राजीनामा दिला. या सर्व घटनांमुळे मनोबलावर परिणाम झाला, तरी मंडळाने माघार घेतली नाही, ही मोठी जमेची बाजू होती.

पुणे, मुंबई, कोल्हापूर, नगर, अमरावती भागात अनुक्रमे सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार, बाबुमियाँ बँडवाले, वजीर पटेल यांच्या सामूहिक नेतृत्वात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उद्दिष्टांना अनुसरून अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले. या काळात सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन यांच्यासह अनेक नवे कार्यकर्ते मंडळाशी जोडले गेले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा प्रचार व्हावा, कार्यकर्ते मिळावेत, यासाठी नोव्हेंबर १९८१मध्ये सातारा, कराड, वाई, लोणावळा, खंडाळा, खोपोली, सासवड, बारामती, फलटण अशा भागात जाऊन स्थानिक मुस्लीम नेते आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. १३ जून १९८२ रोजी पुण्यात 'विद्यार्थी सहाय्यक समिती'च्या वसतिगृहात मंडळाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. मुस्लीम महिलांना विविध प्रकारच्या कौटुंबिक कलहांना सामोरे जावे लागते. त्यांच्या अडचणी समजून घेऊन, त्यांना मार्गदर्शन करणारे कोणतेही मंच नाहीत. तोंडी तलाक, अंधश्रद्धा, दुसरे लग्न आणि इतर कारणांमुळे हतबल, असहाय्य महिलांना मदत व मार्गदर्शन करता यावे, या उद्देशाने 'मुस्लीम महिला मदत केंद्र' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुस्लीम मोहल्ल्यात समाजवादी व सेवा दल परिवारातील डॉ. श्री. न. देशपांडे दवाखाना चालवत. त्यांनी पुण्यातील रास्ता पेठेमधील कादरभाई चौकात मुस्लीम महिला मदत केंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिली. या केंद्रात सय्यदभाई, अन्वर राजन, रशिद शेख, शमसुद्दिन तांबोळी आणि महिला कार्यकर्त्या नित्यनियमाने सायंकाळी जमत. काही वकील मंडळींनी या कामी महिलांना कायदेशीर सल्ला देण्याची जबाबदारी स्वीकारली. महिलांना हक्काची जागा मिळाली. त्या मंडळाशी जोडल्या जाऊ लागल्या. या केंद्रात कुटुंबनियोजन, अंधश्रद्धा, कायदा, अशा अनेक विषयांवर चर्चा, व्याख्याने आयोजित केली जात.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांनी शहाबानो प्रकरणात २३ एप्रिल १९८५ रोजी 'तलाकपीडित मुस्लीम महिलांना १२५ कलमाप्रमाणे पोटगी मिळवण्याचा हक्क देणारा 'ऐतिहासिक' निकाल दिला. त्याचे मंडळाने स्वागत केले, मात्र धर्मवादी मुस्लीम पक्ष आणि संघटनांनी त्या विरोधात मोठे आंदोलन उभे केले. या संघर्ष काळात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ने मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर मोठे आंदोलन उभे केले. याची सविस्तर माहिती पुढे देण्यात आली आहे.

मंडळाच्या कार्याचा आलेख दुसऱ्या दशकातही चढता राहिला. पुण्यात सय्यदभाई, अन्वर राजन, अन्वर शेख, शमसुद्दिन तांबोळी, रशिद शेख यांनी कार्यविस्तार केला. मुंबईत मेहेरून्निसा दलवाई या महंमद दलवाई, अब्दुल कादर मुकादम आणि आपल्या निवडक कार्यकर्त्यांसह कार्य करत होत्या. कोल्हापूर येथे हुसेन जमादार यांनी प्रा. मुमताज रहिमतपुरे, आशा अपराध, मोहम्मद गौस नाईक, प्रा. आय. एन. बेग, गाझीयोद्दीन सलाती, ऐनुल अत्तार व इतरांसोबत मिळून मंडळाचे कार्य केले; तसेच स्वतंत्र अशा 'मुस्लीम समाजप्रबोधन संस्थे'ची स्थापना करून विधायक कार्य करण्यास प्रारंभ केला.

दुसऱ्या दशकाच्या उत्तरार्धात सामूहिक कार्यापेक्षा स्वतंत्रपणे कार्य होत राहिले. काही प्रमाणात

संघटना व्यक्तीकेंद्रित व्हायला सुरुवात झाली. काही मतभेदांवर चर्चा होऊ लागली, ज्याचे परिणाम मंडळाच्या तिसऱ्या दशकात जाणवू लागले. मंडळाचे समर्थक असणाऱ्या आणि हमीदभाईंचे चाहते म्हणून मंडळाचे कार्यकर्ते असणाऱ्यांपैकी अनेकांनी साथ सोडली. वजीर पटेल यांनी मुस्लीम समाजाची माफी मागून, तोबानामा देऊन मंडळ सोडले. प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर यांनी वेगळा मार्ग अवलंबला. अ. का. मुकादम असगर अली इंजिनिअरकडे आकर्षित झाले. फजल शेख, ॲड. नजमा शेख, सय्यद मुनीर, मकबूल तांबोळी या कार्यकर्त्यांनी काही कारणे देत मंडळापासून लांब राहणे पसंत केले. यामुळे मंडळाच्या कामाची गती मंदावली, पण कार्य थांबले नाही!

'इस्लामच्या इतिहासातील अद्‌वितीय संघटना' असे संबोधले जाणाऱ्या 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना समाजाला धर्मापलीकडची दृष्टी देण्याच्या उद्‌देशातून झाली. तथापि जागतिक पातळीवर लोकशाही विचारांचे स्वागत होत असताना, मुस्लीम समाज मात्र स्वरचित कोषाबाहेर येऊन खुलेपणाने विचार करण्यासाठी धजावत नव्हता. परिणामी, मुस्लीम समाजातील धार्मिक मूलतत्त्ववाद, दहशतवाद, अल्पसंख्याकपणाची गंड भावना आणि अस्मितेचे प्रश्न सातत्याने पटलावर येत राहिले. त्यामुळे या समाजातील जातिव्यवस्था, दारिद्र्याचा प्रश्न, शिक्षण आणि इतर प्रश्न दुर्लक्षित झाले.

मुस्लीम समाजाची ही अवस्था होऊ नये म्हणून मंडळाची स्थापना करताना हमीदभाईंनी मूलभूत विचार मांडले होते. ते म्हणत, ''हा देश समर्थ व्हावा, जगातील शक्तिमान राष्ट्रांच्या पंक्तीला बसावा; त्यासाठी या देशातील समाजशास्त्रीय आणि विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनावर आधारलेला, भौतिक श्रद्‌धा बाळगणारा व चैतन्यशील बनला पाहिजे. समाजाला आधुनिक आणि प्रगतीशील बनविण्याच्या आड ज्या धर्मश्रद्‌धा येतात, त्या दूर सारण्याची प्रक्रिया पुढे चालविणे म्हणजेच आपण धर्मनिरपेक्षतेकडे वाटचाल करणे आहे.'' या विचारातून हमीदभाईंचे भारतीय समाजासंदर्भातील अभ्यास आणि विश्लेषण दूरदृष्टीचे होते, असे दिसते.

मंडळाच्या तिसऱ्या दशकाचा आढावा घेताना लक्षात येते की, या काळात शहाबानो प्रकरणातून देशातील धर्मनिरपेक्षतेचे आव्हान कोणत्या स्वरूपाचे आहे, हे समाज अनुभवत होता. या प्रकरणात विचलित झालेल्या राजीव गांधी सरकारने, १९५०पासून अयोध्येतील रामलल्ला मूर्तीच्या जागी लावलेले कुलूप १९८७मध्ये उघडले आणि हिंदुत्ववाद्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने अनुभवलेला घटनाक्रम पाहिल्यास भारतातील राजकारण कोणत्या दिशेने जाणार, हे भाकीत करण्यासाठी कोणा भविष्यकर्त्याची गरज नव्हती. धर्मवादी राजकारण आणि त्याचा देशाच्या एकात्मतेवर होणाऱ्या परिणामांना सामोरे जाणे अपरिहार्य होते. देशासमोर नवे आव्हान उभे राहिले आणि धार्मिक ध्रुवीकरणातून सामाजिक-धार्मिक वातावरण दूषित झाले. जागतिक आणि देशांतर्गत दहशतवादाला अनुकूलता लाभली; ज्याची किंमत धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेला मोजावी लागली. या तणावाच्या काळात मुस्लीम सत्यशोधक मंडळाला सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करणे आणि दहशतवाद विरोधी भूमिका घेणे आवश्यक वाटले. त्या दृष्टीने मंडळाने अनेक उपक्रम हाती घेतले. यासाठी समाजात कार्यरत असलेल्या समविचारी संघटनांच्या समन्वयाने कार्यक्रम

आखण्यास मंडळाने प्राधान्य दिले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या जन्मापासून त्याची बांधीलकी ही समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, उदारमतवादी विचारांशी राहिली. राष्ट्र सेवादल, युवक क्रांती दल, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, साधना परिवार, आंतरभारती, समाजवादी महिला सभा यांच्यासारख्या समतावादी संस्था-संघटनांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळास समर्थन आणि सहकार्य केले. समन्वयाची भूमिका घेऊन मंडळाच्या उपक्रमात सहभाग नोंदवला. मंडळाचे मनोबल वाढवले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वाढ आणि विकासात योगदान देणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, यदुनाथ थत्ते, प्रा. मे. पुं. रेगे, वसंतराव नगरकर, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, डॉ. सत्यरंजन साठे, डॉ. देवदत्त दाभोळकर, पु. ल. देशपांडे, दिलीप चित्रे, गं. बा. सरदार, स. मा. गर्गे, विद्या बाळ, वसुधा धगमवार, कॉ. रा. प. नेने, कुमार सप्तर्षी, मधु लिमये, व्ही. एन. राव, पन्नालाल सुराणा आणि अनेकांच्या मदतीचा व मार्गदर्शनाचा उल्लेख आवश्यक वाटतो.

मुस्लीम समाज-प्रबोधनाच्या कार्याची निकड आणि हमीदभाईंसारख्या निखळ मानवतावादी सुधारकाच्या अडचणी लक्षात घेऊन या मंडळींनी मंडळास सतत प्रोत्साहन दिलेले आहे. परंतु मंडळाचे समाजप्रबोधनाचे विषय आणि उपक्रम उजव्या विचारसरणीच्या लोकांनी सोयीप्रमाणे वापरले, जे मुस्लीमविरोधी राजकारणासाठी सोयीचे होते. तसेच मुस्लीम जमातवादी लोकांनीही मंडळ हे संघधार्जिणे असल्याचा अपप्रचार केला. मंडळाच्या समाजप्रबोधनाच्या मुद्द्यांचा विपर्यास करून मुस्लीम समाजात मांडला. परिणामी ही चळवळ मुस्लीम समाजात रुजताना मर्यादा आल्या. मंडळाविरोधातील मुस्लीम नेत्यांनी या उजव्यांचा संदर्भ घेऊन मंडळास बदनाम करण्याचे आणि विरोध करण्याचे प्रयत्न सातत्याने केले.

मुस्लीम समाजाकडून होणारा विरोध परतावून लावण्यात मंडळ काही प्रमाणात यशस्वी झाले असले, तरी संघटनात्मक पातळीवर मुस्लीमविरोधाचा मुद्दा विचारात घेऊन काही प्रमुख कार्यकर्त्यांनी ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळाने नाव बदलून काम करावे. त्यामुळे मुस्लीम समाजाचा विरोध होणार नाही’, अशी भूमिका घेतली होती. त्या वेळी मंडळाने पुण्यातील हमाल भवनमध्ये झालेल्या कार्यकरिणी बैठकीत असा ठराव केला की, काही जातीयवादी शक्तींकडून होणारा विरोध मंडळाच्या नावाला नसून मंडळाच्या भूमिकेला व कामाला आहे. नाव बदलल्यामुळे विरोध संपणार नाही, म्हणून मंडळाचे नाव न बदलता कार्य करण्यात यावे. हा विषय येथे मांडण्याचे कारण असे की, या ठरावामुळे विषय येथे संपला नव्हता, तर हाच विषय व विचार मंडळाच्या कार्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या दशकात मध्यवर्ती राहिला. संघटनात्मक बांधणीवर त्याचा परिणाम होत राहिला. हमीदभाईंचे मुस्लीम समाज प्रबोधनातील क्रांतिकारक विचार, मुस्लीम जमातवादी राजकारणाचे केलेले विश्लेषण आणि लेखन यामुळे त्यांना एक ऊंची मिळाली, त्यांनी मंडळामार्फत विविध कार्यक्रम राबवले. त्यामुळे मंडळासही प्रतिष्ठा मिळाली. परंतु हमीदभाईंच्या अल्पायुष्यामुळे त्यांना संघटनात्मक बांधणी करण्यासाठी वेळ मिळू शकला नाही. आपल्यानंतर ही चळवळ कशी चालेल, याची काळजी त्यांना आजारपणात वाटत होती.

मंडळाच्या जन्मानंतरच्या दुसऱ्या दशकाच्या उत्तरार्धातच आणखी एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, प्रमुख कार्यकर्त्यांनी समांतर-स्वतंत्र संस्था-संघटना स्थापन करण्याचा मार्ग आरंभला.

मंडळाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते असणारे हुसेन दलवाई यांनी 'मुस्लीम समाजातील पुरोगाम्यांचे एखादे व्यासपीठ असावे' या हेतूने 'अंजुमन तरक्की पसंद मुस्लिमीन' स्थापन केले. या अंजुमनच्या वतीने १५, १६ फेब्रुवारी १९८६ रोजी मुस्लीम कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. त्यात डॉ. इम्तियाज अहमद, डॉ. मोईन शाकीर, डॉ. राही मासूम रजा, डॉ. अनिस सय्यद, प्रा. आबिदा समीउद्दीन, तसेच एस. एम. जोशी, डॉ. य. दि. फडके, प्रा. राम बापट, डॉ. बाबा आढाव, पन्नालाल सुराणा व इतर मान्यवरांना निमंत्रित केले होते. या संघटनेच्या स्थापनेनंतर हुसेन दलवाईंनी मंडळासोबतचा संपर्क कमी केला.

मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते हुसेन जमादार यांनी कोल्हापूर भागात मंडळाचे कार्य जोमाने केले. हे कार्य करत असतानाच त्यांनी स्वतःचे 'पुरोगामी मुस्लीम' हे मासिकपत्र सुरू केले. मुस्लीम समाजप्रबोधन व शिक्षण संस्था स्थापन केली. तलाकपीडित महिलांतर्फे भाजी-भाकर केंद्र या संस्थेच्या वतीने चालवले, तसेच तलाकपीडितांच्या मुलांचे वसतिगृह चालवण्याचा प्रयत्न स्वतंत्रपणे केला. फलटण येथे प्रा. वि. अ. शेख, प्रा. आमिन मोदी आणि इतर कार्यकर्ते होते. त्यांनी १९८८मध्ये 'फलटण तालुका मुस्लीम समाज उन्नती प्रतिष्ठान'ची स्थापना केली.

पुण्यात सय्यदभाईंनी मंडळाच्या पुढाकारातून 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'मार्फत कार्य सुरू केले. राष्ट्रीय पातळीवरचे एक स्वतंत्र व्यासपीठ असावे, ही त्यामागची भूमिका होती. नंतर या व्यासपीठाची 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम' या नावाने नोंदणी करण्यात आली. मेहेरून्निसा दलवाई यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षात 'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटयूट'ची स्थापना झाली. ही संस्था मंडळाच्याच पुढाकारातून स्थापन झाली असली, तरी पुढे तिचे मंडळापासून वेगळे अस्तित्व निर्माण झाले. याची जन्मकथा स्वतंत्र आहे. एका अर्थाने हा प्रयोग म्हणजे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा विस्तार असे म्हणता येईल किंवा नेतृत्व पातळीवर स्वतंत्र अस्तित्व राखण्याचा प्रयत्न वाटेल. तिसरा एक अर्थ काढता येऊ शकतो, तो म्हणजे मंडळास एकत्रित व सामुदायिक नेतृत्व करण्यात येत असलेल्या अडचणींमुळे असे घडले असावे.

असे असतानाही तिसऱ्या दशकात मंडळाने अनेक कार्यक्रम आयोजित केले. संघटनात्मक व सामाजिक आव्हाने आणि धर्मवादी राजकारणातून उभे राहिलेले शहाबानो प्रकरण, बाबरी मशिदीचा पाडाव, साखळी बॉम्बस्फोट यासारखी आव्हाने पेलत असताना केलेला संघर्ष, याकडे महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिला पाहिजे.

मंडळाच्या वतीने १९९० या वर्षात 'राष्ट्रीय एकात्मता सामाजिक सलोखा' या विषयावर अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या काळात काश्मीरमध्ये विभाजनवादी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात कार्यरत होत्या. भारतातील सर्वसामान्य मुसलमानांच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक होती. पाकिस्तान या प्रवृत्तींना चिथावणी देत होता. धर्माच्या नावाने होत असलेल्या या कारवाया देश आणि समाजहितविरोधी असल्याने मंडळाने यासंदर्भात मेळावे व परिसंवाद आयोजित केले. 'शिवजयंती' साजरी करून शिवरायांचा खरा इतिहास जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला.

हमीदभाईंच्या स्मृतिदिनी म्हणजे ३ मे १९९२ रोजी मंडळाने शिवजयंती उत्सव साजरा केला. शिवचरित्रावर ना. कुलकर्णी यांचे 'पिंपळपानावरचे शिवचरित्र प्रदर्शन' आयोजित केले. त्याचे उद्घाटन कोल्हापूरचे जिल्हाधिकारी मा. अजितकुमार जैन यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी न्या.

ख्वाजा एहतेशाम देशमुख होते. हा कार्यक्रम करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे झाला. याच दिवशी रात्री नऊ वाजता राष्ट्रीय एकात्मतेवर कवीसंमेलन झाले. शाहू स्मारकातील या संमेलनाचे उद्‌घाटन दै. 'केसरी'चे तत्कालीन संपादक वासुदेव कुलकर्णी यांनी केले होते.

मंडळाचे कार्य राष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरस'च्या वतीने ३०-३१ मे १९९२ रोजी पुण्यात भारत इंग्लिश स्कूल येथे पाचवी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. यात राष्ट्रीय पातळीवरील अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. यात महिलांचे संविधानात्मक अधिकार, काश्मीरचा प्रश्न आणि राममंदिर - बाबरी मशीद या विषयावर चर्चा झाली. पुढे ६ डिसेंबर १९९२ रोजी झालेला बाबरी मशिदीचा पाडाव आणि नंतर झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांमुळे देशातील एकात्मता व धार्मिक सलोखा यांवर परिणाम झाला, आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली. समाजप्रबोधनाचा विषय मागे पडत होता, धार्मिक अस्मितेच्या राजकारणाने देश हिंसकपणा व अशांतता अनुभवत होता. भीती आणि असुरक्षिततेच्या वातावरणात धर्मनिरपेक्षतावादी संभ्रमात पडले. यावर उपाय शोधणे आवश्यक होते. १६ जानेवारी १९९३ रोजी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' आणि 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'च्या वतीने पुण्यात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. 'राष्ट्रापुढील आव्हाने' या विषयावर कायदेतज्ज्ञ डॉ. सत्यरंजन साठे यांचे बीजभाषण झाले. सर्वसामान्य मुस्लीम समाज आणि मुस्लीम नेते यांत फरक आहे, हे नमूद करून देशाच्या एकात्मतेला, राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला व राज्यघटनेलाच कशा प्रकारे धोके आहेत, हे या सत्रात मांडण्यात आले. या चर्चासत्रात भिन्नधर्मीय नेते आणि अभ्यासकांनी सहभाग घेतला.

मंडळामार्फत शांतता आणि सलोखा राखण्यासाठी मेळावे, निवेदने, चर्चासत्र आणि अभ्यास शिबिराचे उपक्रम राबवले. राममंदिराचा मुद्‌दा आक्रमक पद्‌धतीने मांडला जात असल्यामुळे मुस्लीम समाजात असुरक्षिततेची भावना वाढली आणि आणि हिंदू समाजातील अस्मितेचा मुद्‌दा अधिक आक्रमकपणे मांडला जाऊ लागला. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी मंडळाच्या पुढाकारातून १९९३मध्ये 'मंदिर-मस्जिद सुलाह कमिटी'ची स्थापना करण्यात आली.

मुस्लीम समाजाने बहुसंख्य हिंदूंच्या भावना विचारात घेऊन त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरवण्यात आले. यासाठी मुस्लिमांनी वादग्रस्त जागेवरील आपला हक्क सोडावा आणि हिंदुत्ववाद्यांनी यानंतर धार्मिक स्थळांच्या जागेवरून वाद निर्माण करू नये, संसदेने १९९१मध्ये धार्मिक स्थळांची १५ ऑगस्ट १९४७ रोजी असलेली स्थिती 'जैसे थे' ठेवण्यासाठी केलेल्या कायद्याचा सन्मान राखावा, धार्मिक गटांत सद्‌भाव निर्माण करून देशाची एकात्मता जपावी, हे मुद्‌दे घेऊन दोन्ही समाजांतील धर्मवादी संघटनांशी संवाद करण्यात आला.

यासाठी राष्ट्रीय पातळीवरील परिषद आयोजित केली. यात बॅ. वि. म. तारकुंडे, ॲड. सी. आर. दळवी, देवदत्त दाभोळकर, निळू फुले, रा. प. नेने, ताहेर पूनावाला, प्रा. कुलसुम पारेख, मा. आय. नाझनीन, मोहम्मद मुस्तफा (कालिकत), अब्दुल लतीफ आझमी हे सदस्य होते; तर सय्यदभाईंनी अध्यक्ष, डॉ. श्रीराम लागू यांनी उपाध्यक्ष आणि हुसेन जमादार यांनी सचिव म्हणून कार्य केले.

या समितीमार्फत काही बैठका झाल्या. हिंदुत्ववादी गटांशी चर्चा झाली. मात्र कोणतेही ठोस

आश्वासन मिळाले नाही. कालांतराने ही कमिटी निष्क्रिय झाली. काही महिन्यांनी सय्यदभाई आणि हिंदुत्ववादी विचारवंत स. ह. देशपांडे यांनी व्यक्तिगत पत्रक काढून या विषयावर आवाहन केले. मात्र मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते व पुरोगामी कार्यकर्ते या पत्रकातील विवादास्पद आवाहनामुळे नाराज झाले. मंदिर-मस्जिद वाद मिटवणे हे मंडळाच्या शक्तीबाहेर होते. त्याला अनेक मर्यादा होत्या. सुलाह कमिटीतील सदस्यांनाही हा आवाक्याबाहेरचा विषय हाताळता येणार नाही, याचा साक्षात्कार झाला. परिणामी मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये एक प्रकारची असहायता निर्माण झाली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे विचार, उद्दिष्ट आणि कार्यपद्धती हा विषय घेऊन मंडळाचे कोल्हापूर येथील कार्यकर्ते प्रा. बी. टी. काझी यांनी संशोधनात्मक प्रबंध शिवाजी विद्यापीठात ६ ऑक्टोबर १९९४ रोजी सादर केला. या प्रबंधाच्या सादरीकरणाअगोदर आणि नंतर मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यात बैठका झाल्या. यात प्रा. काझी यांनी त्यांच्या निदर्शनास आलेल्या मंडळाच्या मर्यादा आणि त्यावर केलेल्या शिफारसी मंडळापुढे मांडल्या. त्यातून काही मतभेदाचे मुद्दे पुढे आले, त्यावर चर्चाही झाली. या शिफारशींमध्ये मंडळाने मुस्लीम समाजप्रबोधनाची परिणामकारकता वाढवण्यासाठी 'मुस्लीम विरोधक' अशी प्रतिमा झालेल्या हमीदभाईंचे नाव व वारसा पुढे चालवू नये, तसेच 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' हे नावसुद्धा बदनाम झालेले असल्यामुळे अन्य नावाने ही चळवळ चालवावी, असे सुचवण्यात आले होते. एका अर्थाने ही शिफारस भविष्यातील मतभेदांचे बीजारोपण होते. कारण अधून-मधून हा विषय या ना त्या निमित्ताने प्रकट होत गेला.

मंडळाचे तिसरे दशक अनेक आव्हानांनी भरलेले, मंडळाच्या वाढ व विकासात योगदान देणारे होते. मात्र या चळवळीतील नेतृत्व काही प्रमाणात व्यक्तीकेंद्रित झाले. मंडळाच्या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मुस्लीम समाज शिक्षण व प्रबोधन संस्था, प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स, हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट अशा संस्थांमार्फत कार्यक्रम चालवले. मंडळाच्या ध्येय-धोरणास अनुरूप असणाऱ्या या संस्था मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून कार्यरत झाल्या होत्या, पुढे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. तरीही या काळात मुस्लीम आणि हिंदू समाजातील जमातवादी, दहशतवादी कारवायांचा निषेध करत, त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करत, जमेल त्या पद्धतीने मुस्लीम समाजप्रबोधनाचे प्रधान्याचे विषय हाताळत मंडळाने तिसरे दशक पूर्ण केले.

मुस्लीम समाजाला धर्मापलीकडची दृष्टी देऊन त्याच्या ऐहिक जीवनात आमूलाग्र बदल झाले पाहिजेत, ही भूमिका घेऊन मंडळाने आरंभापासून प्रयत्न केले. मुस्लीम समाजातील बुद्धिवादी, आधुनिक दृष्टी असणाऱ्या मित्रांनी मंडळाला साथ दिली. मंडळामार्फत चालवण्यात येत असलेल्या मुस्लीम महिला मदत केंद्राच्या कार्यातून समाजप्रबोधन, महिला संघटन करणे हेही एक उद्दिष्ट होते. आपल्या कौटुंबिक कलहाच्या समस्या घेऊन अनेक महिला मदतकेंद्रात येत; मात्र आपल्या समस्या सुटल्या की, मंडळाच्या कार्यविचाराशी त्यांचा संबंध उरत नसे. असे असले तरी समाजाशी संपर्क आणि संवाद टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असते. एकूणच समाजप्रबोधनाचा विषय हा जटिल असतो. डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणतात तशी 'ही

दशकांची नव्हे तर शतकांची लढाई असते'. व्यक्तिगत जीवनातील वैचारिकता क्रांतिकारी असली, तरी समाजव्यवहारात, स्थानिक पातळीवर काम करताना काही तडजोडी करत समाजप्रबोधनाचा गाडा पुढे घेऊन जावा लागतो.

मंडळास आपली उद्दिष्टे आणि भूमिकांशी प्रामाणिक राहून अशा तडजोडी कराव्या लागल्या. हा सत्यशोधकी आंदोलनाचा एक भाग होता. सामाजिक चळवळीला सामान्य माणसे बिचकत असतात, म्हणून समाजप्रबोधनाच्या लढ्यात त्यांच्या प्रत्यक्ष सहभागावर मर्यादा असतात. हमीदभाईंचा लढा हा तर सामान्य लोकांच्या क्षमतेबाहेरचा होता. कारण असाही मुसलमान असतो, यावर त्यांचा विश्वास बसत नाही. राजकीय आणि धर्मवाद्यांसाठी तर असे सुधारक शत्रूच असतात.

हमीदभाईंच्या भूमिकेबद्दल, कार्याबद्दल अनेक गैरसमज आहेत. प्रा. नरहर कुरुंदकरांनी 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. ते लिहितात, ''दलवाईंना मुस्लीम समाजात फारसा पाठिंबा कधीच नव्हता; तो असणारही नव्हता, हे उघड आहे. मुस्लीम समाजातील सर्व राजकीय नेते हमीदभाईंना विरोध करत होते. हमीदभाईंनी अतिरेकी भूमिका घेतली होती, म्हणून मुस्लीम समाज त्यांच्यामागे गेला नाही, हे म्हणणे खरे नाही. दलवाईंनासुद्धा महान विचारवंत म्हणून कीर्ती मिळवण्याची इच्छा नव्हती. त्यांना समाजपरिवर्तनाचे आंदोलनच अधिक प्रिय होते.''

हा संदर्भ येथे देण्याचे कारण असे आहे की, मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि ऑल इंडिया मुस्लीम कॉन्फरन्स यांच्या वतीने पुण्यातील एस. एन. डी. टी. महाविद्यालय कॅम्पसमध्ये २० व २१ नोव्हेंबर १९९९ दरम्यान मुस्लीम महिला अधिकार परिषद आयोजित केली होती. यात महाराष्ट्र आणि राज्याबाहेरच्या अनेक महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. पुण्यातील मुस्लिमेतर समविचारी महिला संघटनांसह, मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या इतर राज्यांतील संघटनांनीही उपस्थिती लावली. तमिळनाडू अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षा ॲड. बदर सईद आणि प्रा. आय. नाझनीन यांनी उद्घाटनाच्या सत्रात मार्गदर्शन केले.

या परिषदेचे वैशिष्ट्य असे की, मंडळ आणि अखिल भारतीय पुरोगामी परिषदेने 'शरीयतच्या चौकटीत इन्साफ पसंद निकाहनामा' याचे प्रारूप तयार केले. निकाह हा करार असतो आणि निकाहावेळी काही अटी-शर्ती घालून विवाह केला जाऊ शकतो, ही यामागची भूमिका होती. असा प्रयत्न भारतात डॉ. झीनत शौकत अली यांनी व इतर काही संघटनांनी पूर्वी केला होता.

'तोंडी तलाक देणार नाही, पत्नीची परवानगी असल्याशिवाय दुसरे लग्न करणार नाही' वगैरे अटी या निकाहनाम्यात असतात. हा निकाहनामा समाजात प्रसारित करून महिलांच्या कौटुंबिक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न होता. समाजात शरीयतवर आधारित न्याय्यप्रिय (इन्साफ पसंद) निकाहनाम्याचे उदाहरण घालून देण्यासाठी काझी शेख शकील अहमद यांच्यासमोर सय्यदभाई-अख्तरून्निसा, समीर जमादार-परवीन महालदार, गाझीउद्दीन सलाती-शमशाद या विवाहित जोडप्यांचे नव्या निकाहनाम्याप्रमाणे ऑल इंडिया मुस्लीम कॉन्फरन्समध्येच निकाह लावण्यात आले.

अर्थात हा प्रयोग मुस्लीम व्यक्तिगत कायद्याच्या पार्श्वभूमीवर किती टिकाव धरणार, ही शंका

होती. इस्लामिक कायद्याच्या कक्षेत तयार करण्यात आलेला हा सुधारित निकाहनामा अस्तित्वात असलेल्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील विषम तरतुदींच्या काही प्रमाणात विरोधात होता. या कार्यक्रमात लावण्यात आलेल्या मुस्लीम रितीरिवाजानुसारच्या निकाह सभारंभात महिला साक्षीदार म्हणून रजिया पटेल, तर पुरुष साक्षीदार म्हणून अन्वर राजन यांनी स्वाक्षरी केली होती.

मंडळाच्या या उपक्रमाबद्दल परिवर्तनवादी वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. या परिषदेच्या निमित्ताने 'साधना'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी 'पुरोगामी पाऊल की पीछेहाट?' या शीर्षकाचा संपादकीय लेख 'साधना' साप्ताहिकात प्रसिद्ध केला. 'कायद्याचा व धर्माचा संबंध नसावा, अशी एखादी भूमिका घेणाऱ्या, पुरोगामी म्हणवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या या कार्यक्रमात 'नवा निकाहनामा'सारखे उपक्रम हे तडजोडवाद आहे की धर्माचे परिष्करण करण्याचा प्रयत्न आहे' अशा काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु धर्मापलीकडे पाहणाऱ्या आणि संविधानवादी भूमिका घेणाऱ्या मंडळाच्या या प्रयत्नाकडे समाजाशी संवाद साधण्याचा, दोन पाऊले पुढे जाण्याचा आणि मुस्लीम समाजाच्या जवळ जाण्यासाठी केलेला एक प्रयोग म्हणून पाहायला हरकत नाही, असे वाटते.

८ व ९ जुलै २००० दरम्यान कोल्हापुरात शाहू स्मारक भवन येथे मंडळाची सर्वसाधारण सभा झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी मेहेरून्निसा दलवाई होत्या. या सभेत संघटनात्मक दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. मंडळाच्या ध्येय-उद्दिष्टाचा महत्त्वाचा भाग म्हणजे मंडळाचा 'जाहीरनामा'. मंडळाच्या स्थापना काळात तयार केलेल्या जाहीरानाम्याला ३० वर्षे पूर्ण झाली होती. मंडळाने मुस्लीम जमातवादाविरोधात भूमिका घेऊन उपक्रम राबविण्यावर भर दिला, मात्र मुस्लीम जमातवादाबरोबरच हिंदू जमातवाद आक्रमक स्वरूप धारण करून पुढे येत असल्याचे दिसत होते. कायदा हातात घेऊन बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यापर्यंत हिंदुत्ववाद्यांची मजल गेली होती. मुस्लीम समाजाच्या अस्तित्वाचे नवे प्रश्न पुढे आले. मुस्लीम समाजाकडे संशयाने पाहून त्यांच्याप्रती पक्षपात वाढू लागला. मुस्लीम समाजातील मागासवर्गीयांचे प्रश्न अनुत्तरित आहेत. मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजावरील हल्ले वाढत आहेत. जागतिकीकरणातून काही नवे प्रश्न मुस्लीम समाजासमोर निर्माण होत आहेत. यानिमित्ताने मंडळाने आपल्या उद्दिष्टांत व्यापकता आणावी, त्यावर अभ्यास करून मांडणी करावी, यासाठी प्रा. विलायत शेख, प्रा. आय. एन. बेग, हुसेन जमादार, अन्वर राजन, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, डॉ. बी. टी. काझी, प्रा. ऐनुल अत्तार यांची एक समिती स्थापन करण्यात आली.

२००२मध्ये गुजरातमध्ये भयानक हिंसाचार आणि प्रार्थना स्थळांची जाळपोळ झाली. संपूर्ण देशाला हादरवून टाकणारी ही घटना होती. धर्मनिरपेक्षता, धार्मिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेला कलंकित करणाऱ्या या घटनेमुळे देश हादरला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिष्टमंडळाने सूरत, अहमदाबाद, बडोदा येथे जाऊन लोकांशी संवाद आणि विविध भागांत कार्यकर्त्यांच्या बैठका आयोजित केल्या. देशासमोरील धर्मवादाची आव्हाने आणि त्याचे स्वरूप मांडण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांत बैठका आयोजित केल्या. याच काळात सातारा जिल्ह्यातील वाई येथे हिंदू-मुस्लीम दंगल झाली.

समाजात भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्ताने सर्वोदय मंडळ, राष्ट्र

सेवादल यांच्या सहकार्याने मंडळाने 'सद्भावना अभियाना'चे आयोजन केले. शाळा, महाविद्यालय, समविचारी संघटना व समाजाशी संवाद करून भिन्नधर्मीय समाजात सद्भावना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्र सेवा दलाने बाबरी मशीद-रामजन्मभूमी वादाच्या निमित्ताने निर्माण झालेले वातावरण व गुजरात हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या सद्भावना यात्रेस समर्थन देऊन सेवादलाच्या सैनिकांना आपापल्या भागांत सहकार्य करण्यासाठी पत्रक पाठवले. समाजातील धार्मिक विद्वेषाचे वातावरण निवळावे, मुस्लीम समाजातील असुरक्षितता कमी व्हावी, हिंदू संघटनांना विचार करण्यास भाग पाडावे; म्हणून मंदिर-मशिदीसंदर्भात मंडळाच्या तोडग्यास राष्ट्र सेवा दलाने समर्थन दिले. या तोडग्यात प्रामुख्याने तीन मुद्दे होते-

१) बहुसंख्याकांच्या भावनांचा आदर करत मुस्लीम समाजाने बाबरी मशीद जागेवरील आपला हक्क बहुसंख्याकांना आपण होऊन बहाल करावा.

२) अन्य जागी मशीद उभी करण्यास बहुसंख्याकांनी मदत करावी.

३) मंदिर-मशीदसंदर्भात अन्य कुठल्याही ठिकाणाबद्दल अशा प्रकारे वाद उकरून न काढता संघपरिवाराने १९४७ची 'जैसे थे' स्थिती मान्य करावी.

या भूमिकेमुळे तणावग्रस्त वातावरणात सद्भावनेसाठी एक पाऊल पुढे जाता येईल, अशी आशा होती. या भूमिकेतून सेवा दल सैनिकांनी आपली भूमिका न सोडताही मंडळाच्या सद्भावना यात्रेत सहभागी व्हावे, असे पत्र सेवा दलाने आपल्या कार्यकर्त्यांसाठी दिले होते. या वेळी सेवा दलाचे अध्यक्ष भाई वैद्य, महामंत्री प्रा. विकास देशपांडे, अन्वर राजन आणि राष्ट्रीय संघटक प्रा. सुभाष वारे होते. सय्यदभाईंनी हीच भूमिका घेतली होती. मात्र या तोडग्यावर मंडळातील आणि मंडळाबाहेरील कार्यकर्त्यांत मतभेद होते. (९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यात पुरावे, सुनावणी विचारात घेऊन हाच तोडगा योग्य असल्याचे अधोरेखित केले. फरक एवढाच की, हा निवाडा सर्वोच्च न्यायालयाचा आहे. त्याला वेगळे महत्त्व आहे. या निवाड्याबद्दल पुन्हा वाद आणि मतभेद शिल्लक राहतातच.)

देशातील जमातवाद, दहशतवाद, धार्मिक दंगली या वातावरणाचा महाराष्ट्रावर परिणाम होऊ नये, सामाजिक सद्भावना व सामाजिक ऐक्य टिकावे; यासाठी मंडळाची कोल्हापूर शाखा, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, राष्ट्र सेवा दल यांच्या संयुक्त विद्यमाने एस. एम. जोशी व युसुफ मेहरअली जन्मशताब्दीनिमित्त ८ ते ३० जानेवारी २००४ दरम्यान सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरात 'सद्भावना अभियानदौरा' आयोजित केला. आरंभ पाचगणी येथील बांधा हायस्कूल – जेथे महात्मा गांधी प्रार्थनेला बसत – या ठिकाणाहून केला. या वेळी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, भाई वैद्य, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवाडी, अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील, स्वातंत्र्यसेनानी भिलारेगुरुजी उपस्थित होते.

या अभियानाचे संघटक म्हणून हुसेन जमादार यांनी काम पाहिले. मंडळाचे प्रा. वि. अ. शेख, एम. ए. नाईक, गुलाब इनामदार, बाबासाहेब नदाफ, प्रा. आय. एन. बेग आणि पन्नालाल सुराणा, सुभाष जोशी, जयंत मठकर व समविचारी कार्यकर्त्यांनी भाग घेतला. अभियानाचा समारोप ३० जानेवारी २००४ या हुतात्मादिनी कोल्हापुरात झाला. त्यात डॉ. बाबा आढाव व इतर मान्यवर उपस्थित होते.

मंडळाच्या चौथ्या व पाचव्या दशकांत मंडळाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या कार्यक्रमांत समविचारी, समाजवादी कार्यकर्ते आणि संघटनांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला. या दशकातील घडामोडी अधिक आव्हानात्मक होत्या. जमातवाद थोपवून सलोखा-सद्भावना निर्माण करणे, दहशतवादाचे परिणाम सामान्यांना सांगून एकात्मता वाढवणे, या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत असतानाच मुस्लीम महिलांच्या संविधानात्मक हक्कांचा लढा कायम ठेवणे, मुस्लीम समाजातील मागास गटांच्या समस्यांवर आवाज उठवणे; तसेच न्या. सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग डॉ. मेहमूद-उर्-रहमान अभ्यासगट यांच्या शिफारशींसंदर्भात लोकशिक्षण, जाणीव-जागृती करून सरकार दरबारी न्याय मागणे, जागतिक पातळीवरील मुस्लीम जमातवादी शक्तींच्या कारवाया, तसेच हिंदुत्ववाद्यांकडून होणारे धार्मिक द्वेषाचे वातावरण, उदारमतवादी इस्लामचे समर्थन इत्यादी घटना आणि या निमित्ताने मंडळाने तयार केलेला मंडळाचा 'नवा जाहीरनामा', आयोजित केलेले कार्यक्रम, उपक्रम यांचा चौथ्या व पाचव्या दशकांत समावेश आहे.

पाचव्या दशकाच्या उत्तरार्धातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती सुभाष यांनी दिग्दर्शित आणि निर्मित केलेला 'हमीद दलवाई : अनसंग ह्युमॅनिस्ट' हा लघुपट. नसिरुद्दीन शहांच्या सहभागामुळे या लघुपटाला महत्त्व होते. या लघुपटाचे ठिकठिकाणी झालेले प्रदर्शन आणि त्यानिमित्ताने झालेला संवाद मुस्लीम सत्यशोधक मंडळ व हमीदभाईंच्या विचाराने कार्य करणाऱ्यांसाठी, चाहत्यांसाठी एक उपलब्धी होती.

याच काळात महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतून हमीदभाई यांचे साहित्य आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य भाषा, इतिहास आणि समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. अनेक विद्यार्थी हमीदभाई व मुस्लीम सत्यशोधक मंडळावर विविध स्तरांवर संशोधन प्रबंध सादर करत आहेत, जे मंडळाचे विचार आणि कार्य यांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे.

गेल्या साडेतीन दशकांत भारताची बहुसांस्कृतिकता, धार्मिक संवाद आणि सलोखा बिघडवणाऱ्या अनेक घटना घडल्या आहेत. जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या दहशतवादी कारवाया, कपोलकल्पित 'लव्ह-जिहाद'च्या निमित्ताने होणारा अपप्रचार, हत्या, गोवंशहत्याबंदी कायद्यानंतर कायदा हातात घेऊन दलित-अल्पसंख्याकांवर होणारे हल्ले-हत्या, धार्मिक विद्वेष पसरवणारी वक्तव्ये आणि धार्मिक ध्रुवीकरण, यांमुळे सामान्य समाजाच्या शांततापूर्ण सहजीवनात तेढ निर्माण झाली. मुस्लीम समाजातील गरजूंना विकत किंवा भाड्याने घरेसुद्धा नाकारली जातात. तसेच मुस्लीम धर्मवादी-राजकारणी लोकांचा 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय', सिनेमागृहातील राष्ट्रगीत, तलाकबंदी या गोष्टींना होणारा विरोध, मुल्ला मौलवींकडून निघणारे विविध प्रकारचे फतवे आणि या निमित्ताने धर्मवाद्यांकडून केली गेलेली वक्तव्ये समाजास अस्वस्थ आणि असुरक्षित करणारी होती.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ केवळ मुस्लीम महिलांच्या प्रश्नांभोवतीच फिरते. प्रबोधनाचे अनेक विषय असतात, मात्र मंडळ ते हाताळत नाही, अशी मंडळासंदर्भात एक आक्षेपवजा टिप्पणी केली जाते. मात्र मंडळाने आयोजित केलेल्या पाचव्या दशकातील कार्यक्रमांकडे पाहिले, तर या

आक्षेपाचा दुबळेपणा लक्षात येतो. मंडळाने स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांचे आयोजन करत असताना अनेक प्रतिष्ठित कार्यकर्ते, विचारवंत, लेखक, कलाकार यांना निमंत्रित केले. यात राष्ट्रीय एकात्मतेविषयीचा परिसंवाद, 'यशदा'मध्ये आयोजित कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम, बकरी ईदनिमित्त आयोजित करण्यात येत असलेले रक्तदान अभियान, स्पर्धा परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना 'हमीद दलवाई स्टडी सर्कल'तर्फे केली जाणारी मदत आणि मार्गदर्शन, शैक्षणिक प्रयोजकत्व इत्यादि. तसेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकासासाठी विविध आयोग आणि अभ्यासगटांनी केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले. मुस्लीम समाजातील मागासजातींना शिक्षणात ५ टक्के आरक्षण असावे, यासाठी मुंबई उच्च न्यायालयात मंडळाने याचिका दाखल केली आणि न्यायालयाने त्यास अनुकूल निवाडा दिला. मात्र सत्ताधाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली नाही. या उपक्रम आणि कार्यातून मंडळ महिला व तलाक या पलीकडचे विषय हाताळतो, हे लक्षात येते.

याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यात कुटुंब न्यायालयांची स्थापना करावी, यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंडळाने पाठपुरावा केला आणि त्यासही अनुकूल प्रतिसाद मिळाला आहे. तलाकबंदी विधेयक येत असताना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन संभावित विधेयकात काय असावे, यावर चर्चा केली आणि या काळात तलाकपीडित महिलांचे संघटन वाढवण्याचा प्रयत्न केला. मंडळाला स्वतःचे कार्यालय नाही, ते उपलब्ध व्हावे म्हणून राष्ट्र सेवा दलाकडे विनंती केली आणि डॉ. अभिजित वैद्य हे विश्वस्त असताना तेथील एक खोली मंडळाच्या कामकाजासाठी त्यांनी उपलब्ध करून दिली. यामुळे जागेचा प्रश्न काही प्रमाणात सुटला.

मध्यंतरीच्या काळात खंडित झालेली 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' आता त्रैमासिक स्वरूपात प्रकाशित होते आहे. मंडळाने मागील दशकांत विविध पुरस्कारही सुरू केले आहेत. त्यामार्फत समाजात वेगवेगळ्या पद्धतीने योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांशी जोडून घेतले जाते. हे पुरस्कार महाराष्ट्राबाहेरील कार्यकर्त्यांनाही प्रदान केले आहेत.

मंडळाच्या विविध कार्यक्रमांत माजी मंत्री आरिफ मोहम्मद खान, अभिनेता अमोल पालेकर, नसिरुद्दीन शाह, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, विचारवंत प्रा. जहीर अली, भारतीय मुस्लीम महिला आंदोलनाच्या प्रमुख कार्यकर्त्या, साहित्यिक डॉ. नूर जहीर, उत्तराखंडच्या शायराबानो, त्यांना साथ देणारे वकील ॲड. बालाजी श्रीनिवासन, 'कास्टलेस सोसायटी ऑफ इंडिया'चे मोहम्मद वाहिद, पसमांदा मुस्लीम प्रश्नावर आवाज उठवणारे लेखक, कार्यकर्ते आणि माजी खासदार अली अन्वर अन्सारी, न्या. राजेंद्र सच्चर अशा अनेक दिग्गजांनी वेळोवेळी सहभाग नोंदवला आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने प्रतिकूल परिस्थिती असतानाही सुवर्णजयंती वर्ष साजरे केले. या कालावधीत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी तिमिरभेद मंच, फातिमाबी शेख महिला मंच, हमीद दलवाई स्टडी सर्कल, शैक्षणिक प्रायोजकत्व उपक्रम अशा नव्या उपक्रमांची सुरुवात केली.

ही सर्व जमेची बाजू असतानाच मंडळाच्या दृष्टीने काही अप्रिय आणि दुःखद घटनाही या काळात घडल्या. त्यामध्ये स्थापना काळातील प्रमुख कार्यकर्ते हुसेन जमादार, प्रा. विलायत शेख,

मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई आणि प्रा. कुलसुम पारेख, रशीद शेख यांचे निधन झाले. यातील काहींनी आपली आत्मकथने प्रकाशित केली आहेत. 'साधना प्रकाशना'ने हमीदभाईंची अप्रकाशित आणि आऊट ऑफ प्रिंट झालेली पुस्तके, विशेषांक काढून मंडळाच्या कार्यविस्तारात उपयुक्त ठरणारे साहित्य प्रकाशित केले आहे.

हमीदभाईंसारखे नेतृत्व, त्यांचासारखा कामाचा झपाटा व दृष्टी, वैचारिक अधिष्ठान आणि निर्भीडपणे संघर्ष करण्याची ताकद असणारे नि:स्पृह कार्यकर्ते–नेते मंडळास मिळाले नाहीत. हमीदभाईंशी जोडले गेलेले आणि त्यांच्यानंतरची चार दशके झपाट्याने कार्य करणारे कोल्हापूर येथील कार्यकर्ते हुसेन जमादार यांनी मंडळासाठी मोठे योगदान दिले आहे. परंतु मंडळाच्या कार्याला समाजाचा अनुकूल प्रतिसाद मिळत नाही, या भावनेतून ते वैफल्यग्रस्त झाले. हमीदभाईंची नास्तिकता आणि निधर्मीपणा यांवरच त्यांनी उघडपणे भूमिका घेतली आणि जाहीरपणे मंडळाच्या कोल्हापूर भागातील प्रमुख कार्यकर्त्यांसह मंडळास सोडचिठ्ठी दिली. हुसेन जमादार आणि सहकाऱ्यांनी 'अखिल भारतीय सलोखा भाईचारा मंच' नावाची वेगळी संघटना सुरू करून काही उपक्रम आयोजित केले. या सर्व ताण–तणावांतून त्यांनी पुढील काही महिन्यातच आपले आयुष्य संपवले.

हा सर्व घटनाक्रम त्यांनी 'जिहाद' या आत्मकथनाच्या चौथ्या आवृत्तीच्या शेवटी मांडला आहे. मंडळासाठी हा फार मोठा आघात होता. असे अनेक चढउतार आणि संघर्षाचे प्रसंग मंडळाच्या इतिहासात घडले आहेत.

प्रस्तुत ग्रंथात मंडळाच्या कार्याच्या निमित्ताने आयोजित केलेले कार्यक्रम, वेळोवेळी मांडलेले विचार आणि भूमिका, यानिमित्ताने झालेले वाद–प्रतिवाद यांचा समावेश नोंदवला आहे. याबरोबरच महत्त्वाचे उपक्रम, प्रबोधनाचे विषय, घडलेल्या घटना आणि त्यानिमित्ताने घेतलेली भूमिका येथे नोंदवणे आवश्यक वाटते.

### महिला मदत केंद्राचा दिलासा

मुस्लीम समाजातील स्त्रियांची परिस्थिती इतर समाजातील स्त्रियांपेक्षा अधिक गंभीर आहे. मुस्लीम महिलांना आजही घराबाहेर पडताना पडदा–बुरखा वापरावा लागतो. परपुरुषाशी मोकळेपणाने बोलता येत नाही. सिनेमा पाहण्यास बंदी आहे. कोणाबरोबर लग्न करायचे, याचा निर्णय घेता येत नाही. उर्दू माध्यमातून शिक्षण घ्यायचे आणि अर्धवट सोडून द्यायचे, या सामाजिक दोषांबरोबरच बालविवाह, तोंडी तलाक, बहुपत्नीत्वाची टांगती तलवार, पोटगीचा अभाव, मूल दत्तक घेता न येणे, अशा प्रकारच्या अन्यायकारक परिस्थितीशी झुंज देत स्वतःचा कोंडमारा करण्यातच संपूर्ण आयुष्य घालवावे लागते. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यास बळी ठरलेल्या असंख्य महिलांना 'मुस्लीम महिला मदत केंद्र' एक आधार वाटतो. त्या याच्याकडे आशावादी दृष्टीकोनातून पाहतात.

परदेशात विशेषतः पाकिस्तान, बांगलादेश आणि इतर इस्लामिक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. काळाची पावले ओळखून, नवीन गरजा विचारात घेऊन धार्मिक कायदे बाजूला ठेवण्याची तयारी केली जात आहे. उदा. शरीयतच्या कायद्यात बदल करून एकतर्फी तोंडी

तलाक बंद केला आहे. तलाक द्यायचा असेल, तर कारणे सिद्ध करावी लागतात. दुसरे लग्न करताना त्याची गरज स्पष्ट करून पहिल्या बायकोची पूर्ण व्यवस्था करावी लागते. कुटुंब नियोजनाच्या बाबतीतसुद्धा आधुनिक दृष्टीकोनातून विचार करून लोकप्रसार आणि सुविधा देण्यात येत आहेत.

भारतात मात्र धर्माच्या तथाकथित 'आयडेंटीटी'साठी किंवा स्वार्थासाठी सामाजिक प्रथांना धार्मिक रंग देऊन चुकीच्या पद्धतीने हाताळण्यात येत आहेत. तोंडी तलाक बंद व्हावा, बहुपत्नित्वावर मर्यादा घालाव्यात, सोडून दिलेल्या बायकोला नवऱ्याकडून पोटगी मिळावी आणि १९८६मध्ये शहाबानोनंतर निर्माण केलेला कायदा (तलाकपीडित महिलांसाठी) रद्द करून मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल करावा, यासाठी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' प्रयत्न करत आहे.

'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'मध्ये मूल दत्तक घेण्याची तरतूद नाही, यासाठी सय्यदभाईंनी १९८५ साली सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. भारतात धर्मनिरपेक्ष लोकशाही असताना धर्माच्या नावाखाली मानवी हक्कांपासून स्त्रियांना वंचित ठेवण्याचा सततचा प्रयत्न होतो. त्याविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी 'मुस्लीम महिला मदत केंद्र' विविध ठिकाणी स्थापन होत आहेत.

मुस्लीम महिलादेखील कोणाची न कोणाची आई, बहीण, मुलगी, नातेवाईक असते. त्यापैकी कोणाला न कोणाला व्यक्तिगत कायद्याचे भक्ष्य बनावे लागते. अशा वेळी लोक 'मुस्लीम महिला मदत केंद्रा'कडे धावतात, न्याय मिळवून देण्याची मागणी करतात. सुरुवातीच्या काळात विरोध करणारे, गैरसमज पसरवणारे, केंद्र बंद पाडण्यासाठी प्रयत्न करणारेच आता 'मुस्लीम महिला मदत केंद्रा'ची शिफारस करू लागले आहेत.

शहाबानो प्रकरणात मंडळाची पिछेहाट झाली. त्यानंतर महिलांची स्थिती 'ना घर का ना घाट का' अशी झाली. झालेली पिछेहाट भरून काढून महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. मुस्लीम महिलांमध्ये मंडळाविषयी व मुस्लीम महिला मदत केंद्राविषयी एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला आहे. मदत केंद्रांना चांगला प्रतिसाद मिळत आहे आणि ठिकठिकाणी केंद्रे उभी राहत आहेत. ही केंद्रे मुस्लीम लोकशिक्षणाची साधने ठरत आहेत. त्यातूनच मंडळास कार्यकर्ते मिळतात, समाजापर्यंत पोहचता येते, व्यक्तिगत कायद्याचे स्वरूप स्पष्ट करता येते, अंधश्रद्धा दूर करता येतात, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास करता येतो, कुटुंबनियोजनाचा प्रसार होतो, प्रांतीय भाषेतून शिक्षणास प्रेरणा देता येते. राष्ट्रीय एकात्मता रुजवता येते. धर्मनिरपेक्ष कायदे निर्माण करता येतात आणि मुख्य म्हणजे मुस्लीम सत्यशोधक मंडळाची ध्येय-उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी समाजापर्यंत निकोप संदेश पोहचवता येतो.

या केंद्राबरोबरच मंडळाच्या वतीने २०१५पासून 'सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचा'ची सुरुवात करण्यात आली आहे. 'समान नागरी कायदा' अथवा 'व्यक्तिगत कायद्या'त सुधारणा कराव्यात म्हणून विविध कार्यक्रम घेण्यात येतात. विवाहपूर्व-विवाहोत्तर समुपदेशन, मार्गदर्शन, कायदा सल्ला व सहकार्य करतानाच महिलांना सन्मानाने जगता यावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात, शिक्षणाचे प्रमाण वाढावे म्हणून मंच कार्यरत आहे. महिला सबलीकरण, जनजागृती आणि संघटन

या मंचामार्फत होते. या मंचाच्या वतीने 'महिला अधिकार दिवस', महिलांच्या प्रश्नावरील आंदोलने, महिलांना स्वावलंबनासाठी आर्थिक मदत इत्यादी उपक्रम राबवण्यात येतात.

**मुस्लीम महिला हक्क : संघर्षाची ५५ वर्षे**

इस्लामच्या इतिहासात मुस्लीम महिला हक्कासंदर्भात क्रांतिकारी भूमिका घेऊन त्यांच्या न्याय हक्कांसाठी आवाज उठवण्याचे श्रेय सर्वप्रथम समाजसुधारक व 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे संस्थापक हमीदभाईंनाच द्यावे लागते. मंडळाच्या स्थापनेपूर्वी त्यांनी 'आवाज-ए-निस्वाँ' ही संघटना स्थापन केली होती. मुस्लीम महिलासंबंधी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तोंडी एकतर्फी त्रिवार तलाक, बहुपत्नित्व व हलाला या प्रथा कशा अमानवी आणि भारतीय संविधानाच्या समानतेच्या हक्काविरोधात आहेत, हे स्पष्ट करून हमीदभाईंनी १९६६मध्ये सात मुस्लीम महिलांचे नेतृत्व करत विधानसभेवर मोर्चा नेला होता. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातून या अन्याय तरतुदी काढून टाकण्यासाठी निवेदन दिले होते. त्या वेळी हमीदभाईंनी भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष भूमिकेनुसार 'समान नागरी कायद्या'चीही मागणी केली होती. या ऐतिहासिक घटनेला आता जवळपास सहा दशके पूर्ण होत आहेत. तेव्हाचा हा क्षीण आवाज आज देशपटलावर मोठ्या प्रमाणात घुमत आहे.

सर्वोच्च न्यायालयात एकाकी लढा देणाऱ्या चाँदबी, हमीदनबी, शहाबानो, शबानाबानो ते शायराबानोपर्यंतच्या मुस्लीम महिलांच्या पाठीशी आज देशातील ५०हून अधिक संघटना आहेत. स्त्रियांवरील विषमताजनक तरतुदी दूर करून 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'त सुधारणा करण्याची मागणी करत आहेत. सध्या सर्वोच्च न्यायालय, विधी आयोग आणि केंद्र सरकार मुस्लीम महिलांवर होणाऱ्या अन्याय निवारण्यासाठी अनुकूल दिसत आहे, मात्र मुस्लीम जमातवादी शक्ती व संघटना अजूनही दुराग्रही भूमिका घेऊन काळानुरूप बदलण्यास विरोध करत आहेत.

हमीदभाईंच्या स्त्री समानतेच्या भूमिकेला विरोध दर्शवण्यासाठी 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ची स्थापना झाली, हा एक इतिहास आहे. या बोर्डाने आतापर्यंत मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणेस सातत्याने विरोध दर्शवला आहे. इतर मुस्लीम देशांतून हद्दपार करण्यात आलेल्या या तरतुदी धर्मनिरपेक्ष भारतामध्ये टिकवून ठेवण्याच्या आग्रहातून मुस्लीम महिला व समाजाची दुरवस्था झाली आहे. १९८५च्या शहाबानो खटल्यादरम्यान मुस्लीम जमातवादी शक्ती व त्यांचा अनुनय करणाऱ्या सरकारच्या भूमिकेमुळे काही हिंदुत्ववादी शक्तींना अप्रत्यक्ष बळ मिळाले. या शक्तींचे उग्र स्वरूप आज आपल्यासमोर येत आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी मुस्लीम महिलांच्या समस्यांचे भांडवल करून वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न चालवले आहेत.

अलीकडेच हिंदू महासभेच्या नेत्यांनी असे आवाहन केले आहे की, 'तलाकपीडित मुस्लीम महिलांनी हिंदू धर्म स्वीकारावा. त्या आमच्या लेकी आहेत. त्यांचे विवाह हिंदू तरुणांशी लावून देऊ व त्यांचे जीवन आम्ही सुखी करू'. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांची धर्मनिरपेक्ष भूमिकेतून उकल करण्याऐवजी या प्रश्नांना धर्मवादी रंग देऊन पुन्हा एका सामाजिक प्रश्नाचे राजकारण होते की काय, अशी शंका निर्माण होत आहे.

'समान नागरी कायद्या'बाबतीतही असेच झाल्याचे लक्षात येते. धर्मनिरपेक्षता, समान

नागरिकत्व, राष्ट्रीय एकात्मकता आणि स्त्री-पुरुष समानता या परिप्रेक्ष्यातून 'समान नागरी कायद्या'कडे न पाहता, धार्मिक अस्मितेच्या व जमातवादी राजकारणाच्या भूमिकेतून पाहिले जाते. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वातील एका महत्त्वपूर्ण उद्दिष्टाला अडगळीत टाकण्यात येते. हीच गत तलाकपीडित मुस्लीम महिलांबाबत झाल्यास त्यांचे प्रश्न पुन्हा अनुत्तरीत राहतील का, अशीही शंका निर्माण होते.

मुस्लीम महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्याच्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मागणीस भारतातील पुरोगामी संघटना, स्त्री संघटना, तसेच अलीकडच्या काळात भारतीय मुस्लीम महिला आंदोलन, अजमेर शरीफ दर्गा ट्रस्ट व शिया पर्सनल लॉ बोर्डानेही पाठिंबा दर्शवला आहे. सर्वसामान्य अन्यायपीडित महिला माध्यमांसमोर येऊन तोंडी एकतर्फी तलाक विरोधात आवाजही उठवत आहेत.

या मुक्या महिलांना बोलते करण्याचे बळ हमीदभाईंनी १९६६मध्ये काढलेल्या क्रांतिकारी ऐतिहासिक महिला मोर्चापासून ते मंडळाने केलेल्या कार्यातून मिळाले आहे. मुस्लीम महिलांच्या संदर्भात 'तोंडी त्रिवार तलाक' हा एक प्रश्न आहे. या व्यतिरिक्त बहुपत्नीत्व, हलाला आणि इतरही अनेक प्रश्न आहेत. समान न्याय व समान अधिकार हे राज्यघटनेचे मूल्य मुस्लीम महिलांच्या पदरात टाकण्यासाठी, तसेच इतर धर्मीय महिलांच्या न्याय हक्कांसाठी 'समान नागरी कायदा' अस्तित्वात आणणे हाच एकमेव उपाय आहे. त्याचा मसुदा तयार करण्याची सक्रियता सरकारकडून व्यक्त झालेली नाही. असा मसुदा उपलब्ध न करताच पुन्हा पुन्हा 'समान नागरी कायद्या'ची चर्चा धार्मिक ध्रुवीकरणाच्या हेतूनेच केली जात आहे. यामुळे भारतीय नागरिक या मुद्द्यावर संभ्रमावस्थेत दिसून येतात. या संदर्भात लोकशिक्षण करण्याऐवजी राजकीय हेतूने पुन्हा या किंवा त्या बाजूने लोकानुनय होताना दिसत आहे. ही भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाहीसमोरील एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ५५ वर्षांपूर्वी उठवलेला आवाज आज बुलंद झाला आहे, याची दखल घेऊन सरकारने 'समान नागरी कायद्या'चा मसुदा तयार करावा, याकडे लक्ष वेधण्यासाठी मंडळाने १८ एप्रिल २०१७ रोजी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यासाठी स्मरण मोर्चाचे आयोजन केले होते. ३ मे २०१७ रोजी हमीदभाईंच्या ४०व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून तलाकपीडित मुस्लीम महिलांबरोबरच अन्य धर्मीय परित्यक्त्या महिलांचाही मेळावा आयोजित करण्यात आला होता. १७ डिसेंबर २०१७ रोजी पंतप्रधानांना भेटून मुस्लीम कायद्यामध्ये सुधारणा करण्याबाबतचे निवेदन मंडळातर्फे देण्यात आले.

हमीदभाईंचा लढा मानवमुक्तीसाठी होता. मुस्लीम महिलांची मुक्ती हा या व्यापक लढ्याचा भाग आहे. संविधानातील समता-समान संधी, धर्मनिरपेक्ष एकात्म समाज आणि लोकशाही जीवन पद्धत भारतीय समाजाने अंगिकारावी. या दृष्टीने भारतात प्रबोधन करणाऱ्या व्यक्ती व संघटना आहेत. तशी संघटना मुस्लीम समाजात असाव्यात, भारतीय समाज प्रबोधनाला बळकटी यावी.

हमीदभाई मुस्लीम समाजात जन्मले म्हणून त्यांनी मुस्लीम प्रबोधनाचा विषय हाती घेतला. वास्तविक त्यांचा संघर्ष हा वैश्विक होता. त्यांची धर्मनिरपेक्षतेबद्दलची आस्था, आधुनिक समताधिष्ठित समाजाची अपेक्षा ही मानवी जीवनास वरदान ठरणारी असल्याची खात्री पटल्याने

'हिंदूंनासुद्धा एका हमीद दलवाईची आवश्यकता आहे' असे भाजपनेते व माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी हमीदभाईंच्या निधनानंतर म्हटले होते. या विधानाची सत्यता आजघडीला तीव्रतेने जाणवते.

**कायदा कालसापेक्ष करावा**

मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा घडवून आणण्यासाठी आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ने एप्रिल २००१मध्ये स्त्री हक्कांसाठी लढणाऱ्या मुस्लीम स्वयंसेवी संघटनांच्या कार्यकर्त्यांची आणि विचारवंतांची बैठक दिल्लीतील जामिया-मिलिया विद्यापीठात आयोजित केली होती.

मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नावर, म्हणजे तलाक, बहुपत्नीत्व, पोटगी, वारसा हक्क, मूल दत्तक घेणे इ. बाबत जवळपास ५५ वर्षांपासून 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' कार्यरत आहे. भारतात हमीदभाईंनी या प्रश्नाबाबत सर्वप्रथम महिलांना संघटित केले.

शहाबानो प्रकरणाच्या वेळी आणि त्यानंतर ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स आणि मंडळाच्या वतीने या प्रश्नासंबंधी जाणीवजागृती आणि प्रचलित कायद्यात सुधारणा व्हावी, यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करण्यात आले.

ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाई यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र, तमिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, दिल्ली इत्यादी ठिकाणी मुस्लीम महिलांच्या परिषदांचे आयोजन करण्यात आले आणि देशभरात ठिकठिकाणी या विषयावर संघटन उभारण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर ठिकठिकाणच्या स्त्री संघटनांनी या प्रश्नावर आवाज उठवण्यास सुरुवात केली. परिणामी याची 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ला दखल घेणे भाग पडले. त्यांनी देशभरातील स्त्री संघटनांना निमंत्रित करून चर्चा घडवून आणली. या बैठकीस मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस हुसेन जमादार, कार्यकर्त्या प्रा. ऐनुल अत्तार, ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे अब्दुल वकाणी, डॉ. के. एस. दुराणी आदी कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार या परिषदेत अनेक महिला प्रतिनिधींनी स्वतःवर झालेले अन्याय सांगून तलाक, बहुपत्नीत्व व पोटगी यांवर निर्भयपणे टीका करून, त्यात सुधारणा करण्याची मागणी केली.

या महिला व्यासपीठावरून बोलत असताना बोर्डाचे आणि 'जमात-ए-इस्लामी'चे पुरुष सभासद अस्वस्थ आणि हतबल झाल्याचे दिसत होते. महिला बोलत असताना 'महिलांनी डोक्यावर पदर घेऊन बोलावे, हळू आवाजात बोलावे, जास्त बोलू नये' अशा सूचना ते करत होते. या वेळी एका महिलेने खडसावून सांगितले की, डोक्यावर पदर न घेता बोलणारी स्त्री पाहवत नसेल, तर पुरुषांनी तोंडे फिरवून बसावे, परंतु आमच्या तक्रारी ऐकल्या पाहिजेत.

परिषदेत अनेक सूचना करण्यात आल्या. त्यांपैकी एक सूचना अशी होती की, सध्या अस्तित्वात असलेल्या कौटुंबिक न्यायालयात स्त्री प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करून मुस्लीम कौटुंबिक खटले चालवावेत. दुसरी सूचना करण्यात आली, ती म्हणजे 'शरीयत कायद्या'च्या आधारेच किंवा इस्लामी तत्त्वाच्या चौकटीत या प्रश्नासंबंधी उपाय सुचवावेत. या

दोन्ही सूचनांना मर्यादा आहेत आणि त्यातून स्त्रियांचे मूळ प्रश्न सुटतील का, हा महत्त्वाचा प्रश्न शिल्लक राहतो. परंतु यानिमित्ताने 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ला स्त्री प्रश्नांची दखल घ्यावी लागली आणि त्यांची हतबलता, असमर्थताही उपस्थितांच्या लक्षात आली.

सध्या भारतात असलेला शरीयत कायदा मूळ स्वरूपात नाही. त्यात अनेक सुधारणा झाल्या आहेत. तथाकथित शरीयतवर आधारित 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा' फक्त कौटुंबिक प्रश्नांपुरताच मर्यादित राहिला आहे. त्यातही वेळोवेळी सुधारणा झाल्या आहेत. त्यात आणखी कोणत्या सुधारणा करता येतील, हे प्रा. असफ ए. ए. फैजी यांच्या 'द रिफॉर्म ऑफ मुस्लीम पर्सनल लॉ इन इंडिया' या पुस्तकात स्पष्ट केलेले आहे.

पाकिस्तान, बांगलादेश, इराण, इंडोनेशिया, जॉर्डन या इस्लामी देशांमध्ये शरीयत कायद्यात सुधारणा करून कालबाह्य तरतुदी रद्द करण्यात आल्या आहेत. कायदा सुधारण्याची ही प्रक्रिया इस्लामी देशांमध्ये केव्हाच सुरू झाली आहे. या संदर्भात आपण मागे का आहोत, हा प्रश्न अनेक सुजाण आणि सुधारणावादी लोकांना अस्वस्थ करतो.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा कशा प्रकारे होत आहेत, याचे एक उदाहरण म्हणजे, बांगलादेशातील उच्च न्यायालयाने दिलेला निवाडा. पत्नीशी संबंध दुरावून एका दमात तीन वेळा 'तलाक' उच्चारून दिलेला तलाक बेकायदा असून, अशा प्रकारे देण्यात आलेल्या तलाकला मान्यता देता येणार नाही. त्याचबरोबर या प्रथेच्या समर्थनार्थ धार्मिक पुढारी किंवा मौलवींकडून काढण्यात येणारे फतवे बेकायदेशीर आणि अनधिकृत असल्याने ते मुस्लीम समाजावर बंधनकारक नाहीत, असा दूरगामी परिणाम घडवू शकणारा निवाडा तेथील उच्च न्यायालयाने दिला आहे.

हा निवाडा भारतातील न्यायालयांवर बंधनकारक नसला, तरी येथील न्यायालयांच्या मनोभूमिकेवर प्रभाव टाकणारा आहे. 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'चा अर्थ लावताना अनेक वेळा तांत्रिक अडचणी येतात. न्यायालयांनी वेळोवेळी यासंदर्भात निवडे दिले आहेत आणि त्यासंदर्भात समाजांतर्गत प्रतिक्रियाही उमटल्या आहेत. यामुळे भारतात हा कायदा अतिशय संवेदनशील आणि वादग्रस्त झाला आहे. संदिग्धता आणि अनिश्चितता असतानाही त्याची पकड घट्ट आहे. त्यामुळे स्त्रियांना न्यायालयामार्फत न्याय मिळवणे अवघड जाते. न्यायालयाने या संदर्भात काही भूमिका घेतल्यास मुस्लीम समाजात त्याचे पडसाद कसे उमटतात, हे १९८६मध्ये शहाबानो प्रकरणाच्या निमित्ताने दिसले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्लंडमधील प्रीव्ही कौन्सिल हे सर्वोच्च न्यायालय मानण्यात येत असे. या कौन्सिलने १८९७मध्ये काही राजकीय कारणांसाठी पारंपरिक तत्त्वांना मान्यता दिली होती. 'कुराणात असलेला आणि मुस्लीम विद्वानांनी काढलेला अर्थच न्यायालयाने ग्राह्य धरावा आणि या कायद्यासंदर्भात न्यायाधीशांनी स्वतःचे मत तयार करू नये', या धोरणाद्वारे पुराणमतवादी मुस्लिमांना खूष ठेवण्यात आले. मात्र कायदा मागासलेल्या अवस्थेत राहिला आणि ब्रिटिशांचा साम्राज्य टिकवण्याचा हेतूही सफल झाला. देश स्वतंत्र झाल्यानंतरही या कायद्यात फारशा सुधारणा झाल्या नाहीत.

बांगलादेशातील उच्च न्यायालयाने १९९५मध्ये दोन पावले पुढे जाऊन असे स्पष्ट केले की, 'कुराण' समजून घेणे त्याचा अर्थ लावणे, ही काही मूठभर व्यक्तींची मक्तेदारी होऊ शकत नाही.

अलीकडच्या परिस्थितीच्या संदर्भात इस्लामचा अन्वयार्थ लावला नाही, तर इस्लाम संकुचित होऊन त्याच्या कक्षा कमी होतील. इस्लामचा उगम जिथे झाला, त्या स्थळ आणि काळाशीच तो मर्यादित राहील.

सध्या भारतात अस्तित्वात असलेला व्यक्तिगत कायदा 'कुराण'आणि 'सुन्नाह' यांच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे, असे अनेक सुधारणावादी मुस्लीम विचारवंत सांगतात. परंतु अजून तरी या विसंगती दूर करण्याचे धाडस कोणी दाखवलेले नाही. या कायद्यातील विसंगती आणि उणिवा प्रामुख्याने दोन कारणांमुळे आल्या आहेत. पहिले कारण म्हणजे इस्लामी कायद्याचे मूळ स्रोत हे अरबी आणि फारसी भाषेत असल्यामुळे न्यायालयाचा या स्रोतांशी प्रत्यक्ष संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे न्यायालये अनधिकृत, चुकीच्या भाषांतरावर आणि समीक्षेवर आधारित निवाडे देत. दुसरे कारण म्हणजे जनप्रक्षोभाच्या भीतीमुळे कायदे मंडळ या कायद्यात सुधारणा करण्याच्या बाबतीत धीमे, उदासीन आणि अनुत्सुक राहिले. परिणामी तलाक, पोटगी व बहुपत्नीत्वाच्या संदर्भात धर्मग्रंथात आधार नसतानाही त्यांचा कायद्यात समावेश झाला आणि न्यायालयांमार्फत त्याची अंमलबजावणी झाली.

इस्लामी देशांत 'तलाक' देण्यापूर्वी लवाद स्थापन करण्याची तरतूद आहे. लवादाच्या निर्णयानंतर तीन महिन्यांनी तलाकची प्रक्रिया पूर्ण होते. इराण आणि जॉर्डनमध्ये विवाहाबरोबरच तलाकची नोंदणी करणे अनिवार्य आहे. मुस्तफा कमाल पाशा यांच्या १९२६च्या 'सिव्हिल कोड'मध्ये घटस्फोटित स्त्रियांना पोटगीचा हक्क दिला आहे. इजिप्तमध्येही मुस्लीम महिलांना तलाकचा हक्क देण्यासाठी 'खुलाह'ची तरतूद लागू करण्यात आली आहे आणि बांगलादेशात तलाक संदर्भात देण्यात आलेल्या निवाड्यात वेळोवेळी मुल्ला, मौलवी आणि धर्मगुरूंनी काढलेले फतवे बेकायदेशीर ठरवण्यात आले आहेत.

भारतात या प्रकारच्या सुधारणा होऊ शकल्या नाहीत, याचे प्रमुख कारण आहे 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' आणि 'जमात-ए-इस्लामी'सारख्या नेतृत्वाची पुरुषधार्जिणी भूमिका! बोर्डाची स्थापना सुधारणावादी प्रवाहाला रोखण्यासाठीच झाली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २६ व २७ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात 'मुस्लीम महिला परिषद' आयोजित केली होती. यात प्रथमच फार मोठ्या संख्येने मुस्लीम महिला एकत्र आल्या आणि अन्यायकारक कायद्याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. त्या अर्थाने केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील ही पहिली महिला परिषद होती. त्यामुळे देशभरातील वर्तमानपत्रांतून यास मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली आणि चर्चा सुरू झाली. या प्रवाहाला रोखण्यासाठी १९७२मध्ये 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटी'ची स्थापना करण्यात आली आणि १९७३ हे नाव बदलून 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' असे ठेवण्यात आले. देशभरात गाजलेल्या शहाबानो प्रकरणानंतर काही महिन्यात लखनौ उच्च न्यायालयाने हमीदनबी या महिलेस पोटगी मंजूर केली.

परिस्थितीच्या रेट्यामुळे आणि मुस्लीम स्त्रियांच्या वाढत्या दबावामुळे आता मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने दिल्लीत परिषद आयोजित केली होती. ज्यांचा मूळ हेतूच शरीयत आणि व्यक्तिगत कायद्याला संरक्षण देण्याचा आहे, ते स्त्रियांना न्याय देण्यासाठी काही ठोस उपाय सुचवतील, अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. या संदर्भात आमच्या मर्यादा आहेत, असे बोर्डाने कबूलही केले.

मग प्रश्न राहतो या सुधारणा कोणी आणि कोणत्या मार्गांनी करायच्या? भारतातील न्याय मंडळ आणि कायदे मंडळच या संदर्भात काही करू शकते. सर्वप्रथम गरज आहे ती मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचे लेखन (कोडीफिकेशन) लवकरात लवकर करणे. त्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेणे आवश्यक आहे. मुस्लीम महिलांची, कायद्यात सुधारणा करण्याची वाढती मागणी विचारात घेऊन सरकारने योग्य ती भूमिका घ्यावी आणि मुस्लीम महिलांना न्याय द्यावा, ही मंडळाची अपेक्षा आहे.

मुस्लीम महिलांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात कालसापेक्ष बदलास धर्माची अडचण नाही. काही संघटना मुस्लीम महिलांच्या प्रश्नांची उत्तरे इस्लामच्या शिकवणुकीत शोधण्याचा प्रयत्न करतात. इस्लामचा उदारमतवाद काही प्रमाणात याचे उत्तर देऊ शकेल, मात्र एकविसाव्या शतकात निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मध्ययुगीन काळात शोधणे, हेसुद्धा इस्लामच्या उदारमतवादी विचारांच्या विरोधातच आहे.

'कुराण', हदिस, इज्तिहाद आणि कयास हे इस्लामचे आधारस्तंभ किंवा कायदे करण्याचे स्त्रोत आहेत. यातील इज्तिहाद (ज्येष्ठ अनुभवी तज्ज्ञाचे मार्गदर्शन) आणि कयास (तर्कशुद्ध, विवेकवादी भूमिका) तेराव्या शतकातच बंद करण्यात आले आहे. इस्लाम न्यायशास्त्रात आणखी एक तरतूद आहे, ती म्हणजे 'तकस्सुर'. इतर देशात, पंथात जर एखाद्या कालबाह्य प्रथा, कायदे यांच्या बाबतीत सुधारणा झाली असेल, तर ती स्वीकारावी. अनेक मुस्लीम देशांत, तसेच शिया कायद्यात तोंडी तलाकची तरतूद नाही. दुसरा विवाह करताना विविध मुस्लीम देशांत लवाद मंडळ किंवा काही यंत्रणा निर्माण केल्या आहेत. दुसरा विवाह करणाऱ्याने त्याची समर्थनीय कारणे नमूद केली असतील आणि पहिल्या पत्नीची त्यास संमती असेल, तर या विवाहाला परवानगी दिली जाते. अनेक देशांत हलालासारख्या कालबाह्य प्रथा अस्तित्वात नाहीत. या गोष्टी लक्षात घेऊन 'तकस्सुर'च्या तत्त्वाप्रमाणे, भारतातील व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्यात काय हरकत आहे?

**दत्तक विधान व मुस्लीम समाज**

'जामिया मिलिया इस्लामिया'चे दलित आणि अल्पसंख्याक अभ्यासकेंद्र आणि दिल्ली येथील 'महिला विकास अभ्यास केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने 'दत्तक विधान' या विषयावर फेब्रुवारी २००९च्या पहिल्या आठवड्यात चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यात न्या. राजिंदर सच्चर यांच्यासह अनेक विचारवंतांनी भाग घेतला.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यांतर्गत मूल दत्तक घेण्याच्या अधिकाराला कायदेशीर मान्यता नाही, असे सांगून न्या. सच्चर म्हणाले, "अशा परिस्थितीत मूल दत्तक घेण्याच्या प्रश्नाचा विचार धर्माच्या चौकटीतून झाल्यास अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. मूल नसलेल्या दाम्पत्याने मूल दत्तक घेणे, ही मानवी गरज आहे. म्हणून मूल दत्तक घेण्याचा विचार धर्माच्या अंगाने न करता मानवी दृष्टीकोनातून केला जावा. मूल दत्तक घेणे, हे 'शरीयत कायद्या'च्या विरोधात आहे. त्यामुळे त्याला 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'नेही मान्यता दिली नाही. 'गार्डियनशिप ऑफ वॉर्ड' हा कायदा मुस्लिमांना फक्त मुलांचे पालकत्व स्वीकारण्यास मुभा देतो;

मात्र त्याला वारसाहक्काने मालमत्तेसंबंधी अधिकार देत नाही. यासाठी कोणालाही मूल दत्तक घेण्याचा अधिकार असण्यासाठी कायदा करण्यात यावा; मात्र या कायद्यात मूल दत्तक घेण्याची सक्ती नसावी." अल्पसंख्याक समाजाला मूल दत्तक घेण्यात अडसर ठरणाऱ्या या प्रश्नावर सर्वांनी समान निष्कर्षावर यावे, या उद्देशाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष सय्यदभाई आणि त्यांच्या पत्नी अख्तरून्निसा यांनी मुस्लीम समाजाला मूल दत्तक घेता यावे, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र ही याचिका पडून राहिली, नंतर सुमारे २० वर्षांनंतर ही याचिका काढून टाकण्यात आली. मुस्लीम विवाहित जोडप्यांना मूल दत्तक घेत यावे, यासाठी पुन्हा न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्याचे मंडळाने ठरवले होते. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्यात यावी, असा आग्रह गेल्या ५५ वर्षांपासून मंडळातर्फे करण्यात येत आहे. व्यक्तिगत कायद्यातील ज्या तरतुदी अन्यायकारक व मानवी अधिकाराचा संकोच करणाऱ्या आहेत, त्यावर निर्बंध घालण्यात यावेत, असे देशभरातील मुस्लीम महिला संघटनांना वाटते. महिलांना संविधानात्मक हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी लढा चालू आहे.

'समान नागरी संहिता' म्हणजे 'हिंदू कायदा' नव्हे, तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारलेला धर्मनिरपेक्ष कायदा आहे. त्यामुळे एखाद्या समाजाच्या परंपरा, रितीरिवाज किंवा विधी तशाच राहून विवाहाच्या नोंदणींसह सर्वांच्या घटनात्मक अधिकाराचे रक्षण होईल. युरोप, अमेरिका, चीन या देशांत आणि भारतात गोव्यात 'समान नागरी कायदा' अस्तित्वात आहे. या सर्व ठिकाणी मुस्लीम समाज आहे व तो आपले धार्मिक स्वातंत्र्य उपभोगतो.

**समान नागरी कायदा**

'समान नागरी कायदा' हा समजून घ्यायला अवघड आणि गोंधळून जाण्यासाठी सोपा विषय आहे. आपला समाज परंपराप्रिय असल्याने नवे काही स्वीकारण्यास तो लवकर तयार होत नाही. उलट नव्या पर्यायांस तो प्रतिकार करतो. प्राचीनतेला कवटाळणे आणि आधुनिकतेला हेटाळणे, हा प्रस्थापित व्यवस्थेचा स्वभाव गुण असतो. यामुळे सर्वच धर्मवाद्यांनी 'समान नागरी कायद्या'स विरोध केला. याला अपवाद होते आधुनिकतावादी, समाजवादी आणि धर्मनिरपेक्षतावादी. आरंभी या विषयाचा पुरस्कार आणि प्रचार पुरोगाम्यांनी केला, मात्र कालांतराने हा विषय संघपरिवाराने 'हायजॅक' केला आणि पुरोगामी, समाजवाद्यांनी आपली चोच वाळूत खुपसली. परिणामी हा विषय समता, सामाजिक न्याय, समान संरक्षण, समान संधीचा ठरण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचा आणि सत्तासंपादनाचा ठरला. हा विषय समजून घेताना थोडी पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाली. पुरोगामी, उदारमतवादी, सर्वसमावेशक नेतृत्व लाभल्यामुळे महाराष्ट्र हा पुरोगामी राज्य अशी प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्रात सर्वप्रथम 'समान नागरी कायद्या'ची मागणी करणारी संघटना म्हणजे मुस्लीम सत्यशोधक मंडळ. प्रथम हमीदभाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा मुंबई विधानसभेवर नेऊन मुस्लीम महिलांना संविधानिक अधिकार उपभोगता यावेत, यासाठी समान नागरी कायदा

अस्तित्वात आणावा, अशी मागणी केली. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना निवेदन दिले. १९७१मध्ये ५०० स्त्री-पुरुषांच्या सह्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री, राज्यपाल आणि पंतप्रधानांना दिले. हा कायदा भारतीय संविधानास अपेक्षित असणारा, समता, समानता बहाल करणारा आणि धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाच्या निर्मितीसाठी योगदान देणारा होता.

'समान नागरी कायदा' म्हणजे काय? संविधानास अपेक्षित 'समान नागरी कायदा' कोणता? आणि या संदर्भात होणारे धर्मवादी राजकारण समजून घेतले पाहिजे. भारतीय संविधान पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर असताना हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. परंतु या महत्त्वाच्या विषयाची चर्चा संविधानिक कर्तव्याच्या बांधीलकीतून न होता मतपेटीच्या दृष्टीने होते, हे आत्तापर्यंतच्या राजकीय पक्षांच्या धोरणातून स्पष्ट झाले आहे. समता, सामाजिक न्याय, समान संधी, समान संरक्षण आणि धर्मापलीकडे पाहण्याची दृष्टी देणारा हा कायदा आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी असताना एक वाक्य ऐकायला मिळायचे- "पावसाळा आला की रस्त्यावर छत्र्या दिसतात, तसे निवडणुका आल्या की, 'समान नागरी कायद्या'ची चर्चा होते." आता पाऊस कधी पडेल हे सांगता येत नाही आणि कोणत्या निमित्ताने 'समान नागरी कायद्या'चा विषय चर्चेला येईल, याचा अंदाज बांधता येत नाही. अलीकडे सगळेच बेभरवशाचे झाले आहे.

'समान नागरी कायदा', अधिक योग्य शब्द वापरायचा तर 'समान नागरी संहिता' ('कोड' या शब्दाचा अर्थ संहिता आहे. परंतु कायदा हा शब्द प्रचलित असल्याने तोही वापरण्यात आला आहे.) संविधान निर्मितीच्या काळापासून चर्चा, विरोध, वाद-प्रतिवादाचा आणि चिंतेचा विषय आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात तर हा विषय अधिकच संवेदनशील बनला आहे. फरक एवढाच आहे की, सर्वच धर्मांनी महिलांना दुय्यम स्थान दिले आहे, धार्मिक कायदे महिलांवर अन्याय करतात, त्यामुळे शोषण होते आणि विषमता जोपासली जाते. स्वातंत्र्यानंतरचा भारत समता, आधुनिकता आणि मानवतावादी बनवायचा असल्याने संपूर्ण भारतासाठी आणि सर्वधर्मीयांसाठी 'समान नागरी संहिता' अस्तित्वात आणावी, अशी संविधानकर्त्यांची इच्छा होती.

या संविधानाला 'इकडून तिकडून आणलेल्या कापडांची बनवलेली गोधडी' अशी संभावना करणारे आणि त्या काळात 'समान नागरी संहिते'स विरोध करणारे हिंदुत्ववादी आज त्याचीच भाषा करतात. हा जो फरक पडला आहे तो हिंदुत्ववाद्यांचे मतपरिवर्तन झाले, ते आधुनिकतावादी झाले किंवा समतावादी झाले म्हणून पडला आहे का? या प्रश्नाचे उत्तर अगदी उघड आणि सोपे आहे. आरंभी 'समान नागरी संहिते'च्या बाजूने समतावादी, समाजवादी होते, आधुनिकतावादी, विज्ञानवादी, उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष, पुरोगामी आणि परिवर्तनवादी विचारांवर निष्ठा बाळगणारे होते. यात समतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते, समाजवादी डॉ. राममनोहर लोहिया होते, आधुनिकतावादी पंडित नेहरू होते, बुद्धिप्रामाण्यवादी बॅरिस्टर एम. सी. छगला होते आणि नंतरच्या काळात धर्मनिरपेक्षतावादी हमीदभाई होते.

विरोधक कोण होते? तर धर्मवादी, विषमतावादी, अलगतावादी, मूलतत्त्ववादी, जमातवादी, संप्रदायवादी, परंपरावादी आणि प्रतिगामी. यात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन होते. बहुतेक सर्व धर्मांच्या, पंथांच्या संघटना आणि राजकीय पक्ष होते. भारताला स्वातंत्र्य मिळत असताना

धर्मवर्चस्ववाद्यांच्या अविवेकी वर्तनामुळे दुर्दैवाने देशाची फाळणी झाली. या संवेदनशील परिस्थितीत 'समान नागरी संहिता' अंमलात आणताना पंडित नेहरूंनी अल्पसंख्याक समाजाची भावनिक असुरक्षितता विचारात घेतली आणि सर्वसमावेशकतेची धारणा समोर ठेवून हा विषय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांत (कलम ४४) ठेवण्यात आला.

योग्य परिस्थिती निर्माण झाली की, समान नागरी संहिता अस्तित्वात आणण्याचा मानस व्यक्त केला होता. म्हणजेच देशात लोकशाही रुजली, धर्मनिरपेक्षता अंगीकारली, महिलांकडे सन्मान-समानतेने पाहण्याची दृष्टी विकसित झाली आणि भारतीय समाज आधुनिकतावादाच्या दिशेने वाटचाल करू लागला की, समान नागरी संहिता अस्तित्वात आणणे, हे धर्मनिरपेक्ष लोकशाहीची एक प्रकारे निष्पत्ती ठरेल.

हा 'समान नागरी संहिते'चा मसुदा विकसित करण्यासाठी संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि आधुनिकतावादी मूल्ये बाळगली. त्यानुसार एकानंतर एक कायदे निर्माण झाले. ऐच्छिक स्वरूपातील 'विशेष विवाह कायदा' (१९५४) अस्तित्वात आला. 'हिंदू कोड बिल' मांडण्यात आले, तेव्हा प्रचंड विरोध झाला. ५ फेब्रुवारी १९५१ रोजी हे विधेयक संसदेत मांडले असता चर्चेत भाग घेणाऱ्या २८ सदस्यांपैकी २३ सदस्यांनी विरोध केला. पाच दिवस वादळी चर्चा झाली. ज्या १४ सदस्यांनी भाषणे केली त्यापैकी १३ सदस्यांनी विरोध केला. पश्चिम बंगालमधील सदस्य नझिरुद्दीन अहमद यांनी हे विधेयक भेदभाव करणारे असल्याचे सांगितले. हे विधेयक मुस्लीम समाजालाही लागू करावे, अशीही त्यांची मागणी होती.

एकूणच विरोधाचे स्वरूप पाहून या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राजीनामा द्यावा असे वाटले आणि त्यांनी मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. शेवटी १९५५मध्ये 'हिंदू कोड बिल' संमत करण्यात आले. नंतरच्या काळात वेळोवेळी पारशी, ख्रिश्चन, शीखांच्या व्यक्तिगत कायद्यात संविधान अनुरूप सुधारणा झाल्या. अनेक कायदे झाले. त्याची यादी अगदी 'कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्या'पर्यंत आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंना जेव्हा विचारण्यात आले की, पंतप्रधान म्हणून त्यांना देशातील सर्वांत मोठे आव्हान कोणते वाटते? तेव्हा नेहरू म्हणाले, "अनेक धर्म असलेल्या या देशाला सेक्युलर बनवणं". पंडित नेहरूंनी बाबासाहेब आंबेडकरांना कॅबिनेटमध्ये घेऊन देशाच्या धोरण निर्मितीच्या कार्यात त्यांना अग्रस्थानी आणले. 'समान नागरी संहिता' बनवण्यासाठी नेहरू डॉ. आंबेडकरांवर विसंबले होते. डॉ. आंबेडकरांनी कायम 'सेक्युलॅरिझम' आणि 'समानता' या तत्त्वांचा पुरस्कार केला.

डॉ आंबेडकर म्हणतात, "निवडणुका या अशा मुद्द्यांवर लढल्या जायला हव्यात की, ज्यांचा धर्माशी काही संबंध नसेल. राजकीय पक्षाला कोणत्याही भावनेच्या आधारे - ज्या भावनेचा लोकांच्या रोजच्या भौतिक जीवनाशी काही संबंध नसेल, अशा भावनेच्या आधारे - आवाहन करण्यास परवानगी असता कामा नये."

पंडित नेहरू किंवा डॉ. आंबेडकर जेवढे 'राष्ट्रवादी' होते, तेवढेच सेक्युलर, लोकशाहीवादी आणि आधुनिकतावादी होते. 'समान नागरी संहिता' आणण्याबाबत गंभीरपणे विचार करत होते. त्यांची समता, सामाजिक सुधारणा आणि आधुनिकतेवर निष्ठा होती.

आजच्या राजकीय नेत्यांची वक्तव्ये विचारात घेतली, तर स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत परिस्थिती पुढे गेली की, पुन्हा शून्यावर आली, हे लक्षात येईल. मा. नरेंद्र मोदी २०१४च्या निवडणुक प्रचारादरम्यान म्हणाले, "आपण हिंदू कुटुंबात जन्माला आलो, आपण एक राष्ट्रवादी आहोत आणि म्हणून हिंदू राष्ट्रवादी आहोत." भाजपचे केंद्रातील एक मंत्री अनंत कुमार हेगडे म्हणाले होते की, 'भाजपला संविधान बदलायचे असून सेक्युलर ओळख पुसून टाकायची आहे.' तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, 'सेक्युलर मूल्ये ही स्वतंत्र भारतातील सर्वांत मोठी थाप आहे'.

वास्तविक 'धर्मनिरपेक्षता' हा भारतीय राष्ट्रवाद संकल्पनेचा एक अविभाज्य घटक आहे. मात्र देशाला 'हिंदू राष्ट्र' बनवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. राममंदिर, गोरक्षा, 'लव्ह-जिहाद', 'घरवापसी', या विषयांच्या यादीत 'समान नागरी संहिता' जर आणली जात असेल, तर त्या कायद्याची प्रत कशी असेल, याची कल्पना करणे सहज शक्य आहे. सावरकरांनी हिंदूची व्याख्या करताना ज्यांची जन्मभूमी आणि पुण्यभूमी या दोन्ही सिंधू नदीच्या पूर्वेस आहेत, तोच खरा हिंदू असे म्हटले. तर संघप्रमुख मा. मोहन भागवत मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजाला हिंदू धर्माच्या छत्राखाली आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांना 'समानते'ऐवजी 'समरसता' महत्त्वाची वाटते.

या पार्श्वभूमीवर प्रथम 'समान नागरी संहिते'ची आवश्यकता आणि समर्थन कशासाठी? आणि हिंदुत्ववाद्यांची जबरदस्ती कशासाठी? या दोन मुद्द्यांवर प्रकाश टाकणे आवश्यक वाटते.

**'समान नागरी संहिते'ची आवश्यकता**

१) सर्व धर्माच्या महिलांना संविधानाने भारतीय नागरिक म्हणून दिलेल्या समता, समानता या मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी आणि शोषण आणि विषमतेच्या निर्मूलनासाठी.

२) सर्व महिलांचा सन्मान, कायद्याचे समान संरक्षण, समान संधी आणि समान न्यायाची हमी देण्यासाठी.

३) भारतातील सर्वधर्मीय नागरिकांना समान नागरिकत्व आणि समान नागरी हक्क उपभोगता यावेत यासाठी.

४) धर्मवादी, जमातवादी शक्तींचा प्रभाव कमी करून धर्मनिरपेक्षता अस्तित्वात आणण्यासाठी.

५) अलगतावादी मानसिकता कमी करून आधुनिक धर्मनिरपेक्ष एकात्म असा भारतीय समाज निर्माण करण्यासाठी.

६) संविधानिक कर्तव्याशी बांधील राहण्यासाठी.

**हिंदुत्ववादी 'समान नागरी संहिते'ची मागणी का करतात?**

१) भारतीय समाजाला 'आधुनिक' बनवायचे असेल, तर या देशात बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजातील महिलांवरील अन्याय, शोषण दूर करून त्यांना समान अधिकार देणारी संहिता अर्थात 'हिंदू कोड बिल' अमलात येऊ नये, यासाठी हिंदुत्ववादी संघटना आणि नेत्यांनी प्रचंड विरोध केला. तरीही पंतप्रधान नेहरूंनी तो अमलात आणला. सुधारणा आमच्यातच कशाला

ते अन्य धर्मीयांच्या कायद्यातही असावी, ही एक भावना होती. ते झाले नाही. त्याचा राग आणि प्रतिक्रिया म्हणून 'समान नागरी संहिते'ची मागणी अजेंड्यावर आली.

२) आमच्या कायद्यात बदल केले. मात्र मुस्लिमांना त्यांचे स्वतंत्र कायदे. या भावनेतून मुस्लीम द्वेष निर्माण झाला. 'आम्हाला कायदा आणि तुम्हांला मात्र फायदा' अशी स्पर्धात्मक ईर्ष्या निर्माण झाली. त्यामुळे मुस्लिमांना विरोध या भावनेतून समान नागरी कायद्याची मागणी .

३) मुस्लीम पुरुष आपल्या बायकोला कधीही तलाक देऊ शकतो. तो दुसरे-तिसरे लग्न करू शकतो. आम्हाला मात्र ही सोय किंवा सवलत नाही, तर मुस्लिमांनाही नको. पुढे मुस्लिमांप्रती असलेल्या आकस आणि मत्सराच्या भावनेने मुस्लीम महिलांसाठी सहानुभूतीची जागा घेतली. 'मुस्लीम महिलांवर अन्याय होतो' अशी सबब पुढे आणण्यात आली.

४) एक मुस्लीम पुरुष चार-चार बायका करतो. एका बायकोला चार-पाच अपत्ये जन्माला येतात, असा गैर अर्थ काढून 'हम पांच हमारे पच्चीस' असा अतार्किक मुद्दा पुढे आणला गेला. 'मुस्लीम फोबिया' तयार करण्यासाठी मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचा वापर सुरू झाला.

५) मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तरतुदींमुळे मुस्लिमांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून, त्यांची लोकसंख्या हिंदूंपेक्षा जास्त होईल. ही अवास्तव भीती निर्माण केली. मुस्लिमांना वठणीवर आणण्यासाठी 'समान नागरी संहिता' हाच उपाय वाटला.

६) भारतात द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे, मात्र तो मुस्लिमांना लागू नाही. भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा आहे, मात्र तो मुस्लिमांना लागू नाही. हिंदूंसाठी मूल दत्तक घेण्याची सुविधा आहे, तर मुस्लीम कायदा मूल दत्तक घेण्यास विरोध करतो. त्यामुळे मुस्लीम पुरुषाला दुसरे लग्न करण्यास प्रोत्साहन मिळते, अशा धारणा निर्माण झाल्या.

७) 'समान नागरी संहिते'चा विषय काढला की, मुस्लीम समाज चिडून उठतो, प्रतिक्रिया देतो, भडकतो, 'इस्लाम खतरे में हैं' म्हणतो, म्हणून हा मुद्दा डिवचण्यासाठी एक हत्यार बनते, तसेच मुस्लिमांविरुद्ध हिंदूंना एकत्र करता येते. हे एक ध्रुवीकरणाचे अवजार बनवता येते. 'हिंदू व्होट बँक' तयार करण्याची संधी मिळते. यासाठी हिंदुत्ववाद्यांना या कायद्याची आवश्यकता वाटते.

समाजवादी विचारवंत नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी 'चोखंबा' या मुखपत्रात १९५४मध्ये दीर्घ लेख लिहून 'समान नागरी कायद्या'ची गरज व्यक्त केली होती. हमीदभाईंनी डॉ. लोहियांपासून प्रेरणा घेतली.

संघपरिवाराने जसा 'समान नागरी कायद्या'चा विषय हातात घेतला, तसा काही समाजवादी मंडळींनी आपले हात भाजतील, या भीतीपोटी हा महत्त्वाचा विषय सोडून दिला आणि अबोला स्वीकारला. सर्वसमावेशकता, बहुविविधता, धर्मस्वातंत्र्य, अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक हक्क अशा सबबीखाली डाव्यांनी आणि तथाकथित पुरोगाम्यांनी समान नागरी कायद्याचे शस्त्र टाकून दिले, ते हिंदुत्ववाद्यांनी उचलले.

वास्तविक 'समान नागरी संहिता' हा संविधानिक नैतिकतेचा आणि संविधानिक कर्तव्याचा भाग आहे. मुस्लीम महिलांना मानवी अधिकार देण्याचा मुद्दा आहे. धर्मापलीकडे जाऊन मानवतावादी विचार रुजवण्याचा तसेच अलगतावाद बाजूला सारून धर्मनिरपेक्षत एकात्म समाज

निर्माण करण्याबाबतची कटीबद्धता आहे. याचसाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासून आणि आजतागायत या कायद्याचे केवळ समर्थनच नाही, तर तो अस्तित्वात आणण्यासाठी जनजागृतीचे उपक्रम घेतले आणि आजतागायत सरकारदरबारी विनवण्या करत आहे.

आजच्या घडीला संघपरिवार आणि भाजप निवडणुका डोळ्यासमोर ठेवून 'समान नागरी संहिता' तयार करण्याबाबत बोलबाला करते, तेव्हा या काही प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत.

१) संघपरिवाराची भारतीय संविधानावर आणि संविधानिक मूल्यांवर निष्ठा आहे का?

२) महिलांना समान अधिकार देऊन समानता प्रस्थापित करण्यासाठी कटीबद्ध आहेत का? तशी असती, तर शबरीमला संदर्भात न्यायालयाने दिलेल्या निवाड्यावर काय भूमिका घेतली? बिल्किसबानो बलात्कार प्रकरणातील आरोपींच्या शिक्षेत सवलत देऊन सुटका करण्यात कोणती प्रेरणा आहे?

३) भारतातील सर्व धर्मीयांबद्दल अपभाव, बंधुभाव व्यक्त करून समान नागरी हक्क आणि संधी दिली जाते का? भाजपच्या निवडणुकीतील उमेदवारात मुस्लीम उमेदवार असतात का? साध्वी निरंजन ज्योती जे हिंदू नाहीत, ते 'हरामजादे' असे म्हणतात आणि योगी आदित्यनाथ 'मृत पावलेल्या मुस्लीम महिलेवरही बलात्कार करा', असे वादग्रस्त वक्तव्य करतात, तेव्हा त्यांच्यावर काय कारवाई केली? मुस्लिमांना दुय्यम नागरिक बनवण्याकडे जे प्रयत्न चालू आहेत, ते समान नागरी हक्कांसाठी दिलेली शाश्वती आहे?

४) संविधानिक राष्ट्रवादापेक्षा उघडउघड 'हिंदू राष्ट्रा'चे पुरस्कर्ते म्हणून घेणारे कोणत्या मूल्यावर 'समान नागरी संहिता' आणू इच्छितात हे समजायला पाहिजे.

५) आज शहरांची, रस्त्यांची, बगिच्यांची, राष्ट्रीय वास्तूंची नावे बदलून सर्वसमावेशक इतिहासाची पाने पुसण्याचे प्रयोग कशाचे निर्देश आहेत.

६) अनेक याचिका हाताळताना सर्वोच्च न्यायालयाला वेळोवेळी असे लक्षात आले की, मुस्लीम महिलांची होणारी मुस्कटदाबी आणि संविधानिक अधिकाराचे हनन मुस्लीम व्यक्तिगत कायद्यामुळे होते. अगदी शहाबानो प्रकरणाच्या निवाड्यातही 'समान नागरी संहिता' अस्तित्वात येण्याची गरज व्यक्त केली.

न्या. यशवंतराव चंद्रचूड आणि नंतर न्या. कुलदीपसिंग, न्या. व्ही. एन. खरे आणि इतरही न्यायाधीशांनी समान नागरी कायद्याची शिफारस केली. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आजपर्यंत कोणते प्रयत्न केले, याची सविस्तर माहिती १६ ऑगस्ट १९९६पर्यंत सरकारने न्यायालयाला द्यावी, असा आदेश दिला होता. तेव्हा सरकारने याचे सकारात्मक उत्तर देण्याऐवजी 'असा प्रश्न विचारण्याचा न्यायालयाला अधिकार नाही' असे उत्तर दिले.

याचप्रमाणे भाजपप्रणित सरकार असताना भाजपचे गोरखपूरचे खासदार योगी आदित्यनाथ यांनी लोकसभेत 'समान नागरी कायद्या'विषयी खाजगी विधेयक मांडले होते. परंतु तेव्हाही या विषयावर सर्व सहमतीचे वातावरण निर्माण होत नाही, तोवर थांबणे आवश्यक आहे, असे कारण जाहीररित्या देण्यात आले होते. ऑक्टोबर २०१५मध्ये पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सांगितले की, नोव्हेंबर २०१५पर्यंत सरकारने 'समान नागरी कायदा' आणण्यासाठी

काय प्रयत्न केले, याचा तपशील सादर करावा. सरकारने कोणता व काय तपशील दिला किंवा दिला नाही, ही माहिती पुढे आली नाही. याचा अर्थ असा होतो की, हा कायदा अस्तित्वात आणण्याबाबत केंद्र सरकारचा प्रामाणिकपणा दिसून येत नाही.

७) 'समान नागरी कायदा' हा संविधानिक मुद्दा आहे. तो निवडणुकीत हिंदू किंवा मुस्लीम मतपेटीवर डोळा ठेवायचा मुद्दा नाही. २०२२च्या उत्तराखंड, गुजरात आणि हिमाचल प्रदेशमधील निवडणुका तोंडावर असताना या विषयाला तोंड फुटले. गुजरातमध्ये तर मंत्रीमंडळाने 'समान नागरी कायद्या'साठी समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला. खरे म्हणजे उत्तर प्रदेशात जर 'लव्ह-जिहाद'चा मुद्दा पुढे करून जर 'धर्मांतरविरोधी कायदा' आणला जातो, तर या कायद्याबद्दल अद्याप प्रयत्न का झाले नाहीत? विविध राज्यांच्या निवडणुका असताना हा विषय अजेंड्यावर आणण्याऐवजी केंद्र सरकार या कायद्यासाठी समिती गठीत करून, त्याचा मसुदा तयार करून, तो जनतेसमोर ठेवून, त्यावर चर्चा का घडवून आणत नाही?

हा विषय जरी समवर्ती सूचीत असला आणि राज्य व केंद्र सरकार कायदा तयार करू शकत असले, तरी तो केंद्राने तयार करणे जास्त संयुक्तिक आहे. असे न करणे हा दुटप्पीपणा आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जातो. गोहत्या किंवा गोवंश हत्या प्रतिबंध कायदा काही भाजपप्रणीत राज्यांत सोयीचा आहे आणि काही राज्यांत राजकीयदृष्ट्या गैरसोयीचा आहे, याचा अर्थ असा होतो की, राजकीय सोय लक्षात घेऊन कायद्यांचे राजकारण करण्यात येते. पोर्तुगिजांनी तयार केलेला 'समान नागरी कायदा' गोव्यात अजूनही अस्तित्वात आहे. मात्र तेथे आज भाजप सरकार असतानाही गोहत्या प्रतिबंधक कायदा नाही. यावरून 'समान नागरी कायद्या'ला राजकीय मुद्दा ठरवून त्याचा संविधानिक आत्मा संपवण्यात येत आहे, हे स्पष्ट होते.

एका उजव्या विचारसरणीच्या मित्राशी गप्पा मारताना, मुस्लीम सत्यशोधक मंडळ समान नागरी कायद्याची मागणी करते, हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा ते म्हणाले, "तुम्ही मुस्लिमांनी 'समान नागरी कायद्या'ची मागणी केली, तर आम्ही कोणते राजकीय हत्यार वापरणार?"

भारतात मुस्लीम जमातवाद्यांसाठी संसदेपेक्षा शरीयत महत्त्वाची आहे. त्यांची ही धर्मवादी मानसिकता अनेक अनर्थांचे कारण आहे. मुस्लीम जमातवादी संघटना आणि राजकीय पक्षांनी यांबाबत सतत आक्रमक भूमिका घेतली आहे. व्यक्ती प्रतिष्ठेपेक्षा धर्म प्रतिष्ठेला प्राधान्य दिले. अगदी अलीकडे 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने' मुस्लीम मुलीच्या विवाहासाठी सोळा वर्षांपर्यंतची अट असावी आणि भारतात अस्तित्वात असलेल्या 'बालविवाह प्रतिबंधक कायद्या'तून मुस्लिमांना वगळावे, अशी मागणी केली. तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला आणि हिजाब यांसारख्या विषयावर जुनाट भूमिका घेऊन महिलांना मानसिक गुलाम बनवण्यात आले आणि संविधान, संसद आणि सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध अनावश्यक आकांडतांडव करण्यात आले. यातून मुस्लीम समाजाचे प्रश्न वाढले. त्याचा फायदा हिंदुत्ववाद्यांना घेता आला. मुस्लीम समाज जितका सुधारणेस विरोध करेल, तेवढ्या प्रमाणात हिंदुत्ववादाला बढावा मिळणार आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी 'समान नागरी कायदा' हा समाजप्रबोधनाचा मुद्दा आहे. समाजाच्या अनेकअंगी समस्या सोडवण्यासाठी या कायद्याची मागणी मंडळ करते. समाजाचे

आधुनिकीकरण आणि भारतीयीकरण करण्यासाठी हा कायदा हवा आहे. शुद्ध हेतू ठेवून हा कायदा अस्तित्वात येणार असेल, तर मुस्लीम सत्यशोधक मंडळ त्याचे स्वागतच करणार. मात्र मुस्लीम द्वेष, ध्रुवीकरण, निवडणुका, हिंदू मतपेटी आणि 'हिंदू राष्ट्र' निर्माण करण्यासाठी एक हत्यार म्हणून या कायद्याचा वापर होत असेल आणि त्यात धर्मनिरपेक्षता, समता आणि संविधानिक मूल्यांचा बळी जाणार असेल, तर येऊ घातलेला कायदा 'औषधांपेक्षा रोग बरा' असे म्हणण्याजोगा ठरण्याची शक्यता आहे.

पुणे येथील आय. एल. एस. विधी महाविद्यालयाचे दिवंगत प्राचार्य आणि विधीतज्ज्ञ डॉ. सत्यरंजन साठे यांनी त्यांच्या प्राध्यापक सहकाऱ्यांसमवेत 'समान नागरी कायद्या'चा एक मसुदा तयार केला होता. तो तसेच सध्या ऐच्छिक स्वरूपात अस्तित्वात असलेल्या विशेष विवाह कायदा (१९५४) आणि गोव्यात अस्तित्वात असलेला 'समान नागरी कायदा' यांना एकत्रित करून त्यातील त्रुटींचा अभ्यास करून आणि आवश्यक त्या सुधारणा करून मसुदा तयार करावा. हा मसुदा विविध धर्मातील अभ्यासक आणि कायदेतज्ज्ञांच्या समिती समोर ठेवावा. यातून निर्माण झालेल्या सर्वसमावेशक कायद्याच्या मसुद्यावर चर्चा घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारनेच पुढाकार घेणे हिताचे ठरणार आहे. मात्र हा कायदा समवर्ती सूचीत असल्याने तो राज्य सरकारही करू शकतो. विविध राज्यांतहा कायदा अस्तित्वात आणण्यासाठी पुढाकार घेतला आणि तो अस्तित्वात आला, तर त्यातील गुण-दोष लक्षात घेऊन त्यात सुधारणा करणे शक्य आहे. अशा पद्धतीने राज्या-राज्यांत कायदे झाले, तरी तो सामाजिक सुधारणेचा पुढचा टप्पा म्हणून पाहता येईल. मात्र अंतिमतः सर्व भारतीयांना समान पद्धतीने लागू होणारा कायदा केंद्र शासनाने आणणे, हेच अधिक योग्य असेल.

७ फेब्रुवारी २०२४ रोजी उत्तराखंड राज्यात 'समान नागरी कायदा' संमत झाला. मुस्लीम महिलांना कायद्याचे संरक्षण आणि विषमतेचे उच्चाटन करण्यासाठी हा कायदा मुस्लीम महिलांना वरदान ठरणार आहे. मात्र तो भारतीय संविधानास अपेक्षित असणारा असेल का? हा कायदा सर्व भारतीयांना लागू असला पाहिजे, मात्र या कायद्यातून आदिवासी समाजाला वगळण्यात आले आहे. 'लिव्ह इन रिलेशन' संदर्भातील तरतुदी व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला घालतात. अशा विवाहांची नोंदणी अनिवार्य केली आहे. नोंदणी नाही केल्यास तीन वर्षांचा तुरुंगवास किंवा पंचवीस हजार रुपये दंड द्यावा लागणार आहे. या तरतुदींचा महिला संघटनांनी विरोध नोंदवला आहे. विवाहासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे ठेवण्यामागे कोणते तर्कशास्त्र आहे, हे समजणे कठीण आहे. सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणून हिंदू अविभक्त कुटुंबांना जी कर सुविधा आहे, ती कायम ठेवली आहे. ही सवलत बिगर हिंदू समाजाला मिळत नाही. असे असेल तर उत्तराखंडमधील कायदा खरोखर समान आहे का, असा प्रश्न शिल्लक राहतो.

'समान नागरी कायदा' समाजाला प्रगतीशील बनवणारा आणि सर्वधर्मीयांना समानतेने सामावून घेणारा हवा. या कायद्याची बांधीलकी जर धर्मनिरपेक्षतेशी असेल, तर तो संमत झाल्यानंतर 'जय श्री राम'च्या घोषणा का दिल्या गेल्या? यातून कोणता संदेश घ्यायचा?

'समान नागरी कायद्या'बद्दल अद्याप मोठ्या प्रमाणात गैरसमज आणि अपप्रचार होत असतो. तो थोपवण्यासाठी आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी लोकानुनयापेक्षा

लोकशिक्षण महत्त्वाचे आहे.

**स्वागतार्ह आणि निषेधार्ह**

भारतीय समाज धर्मनिरपेक्ष व्हावा, या बहुधार्मिक देशामध्ये धर्मस्वातंत्र्याबरोबरच शांतता-सद्भाव, सुव्यवस्थेला अडचण निर्माण होऊ नये, सामाजिक न्याय-लोकशाही मूल्ये प्रस्थापित व्हावीत म्हणून भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. पण दुर्दैवाने राजकीय पक्षांनी मात्र सातत्याने धर्माचे राजकारण करून भारतीय समाजात धर्मवाद आणि जमातवादाला खतपाणी घातले. लोकशिक्षणापेक्षा लोकानुनय करण्यातच धन्यता मानली. समाजविकासाच्या योजना राबवण्याऐवजी भावनिक मुद्द्यांना प्राधान्य दिले. त्यातून भिन्न धर्मियांमध्ये द्वेष आणि तिरस्काराची बीजे पेरली.

गेल्या अनेक वर्षांपासून हज यात्रेसाठी अनुदान, हजयात्रा केंद्र स्थापन करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उलाढाल केली गेली. हज यात्रेसाठी केंद्र शासनातर्फे देण्यात येणारे ६०० कोटी रुपयांचे अनुदान यात्रेकरूंऐवजी एअर इंडियाला देण्यात येते. तोट्यात चालणाऱ्या एअर इंडियाला त्याचा लाभ होतो. हज यात्रेसाठी देण्यात येणारे सरकारी अनुदान चुकीचे असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने ८ मे २०१२ सांगितले. तसेच हज यात्रा अनुदान योजना दहा वर्षांत संपुष्टात आणण्याचा आदेश दिला. वास्तविक हे अनुदान ताबडतोब रद्द करण्याचा आदेश द्यावयास हवा होता. कदाचित धर्मवादी लोकांकडून असंतोष व्यक्त होईल आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, म्हणून तर दहा वर्षांचा कालावधी देण्याची खबरदारी घेतली नसेल ना? तसे असेल, तर ते शोभणारे नाही. धर्मनिरपेक्षतेच्या आड येणाऱ्या तरतुदी तांदळातील खड्याप्रमाणे काढल्या पाहिजेत. या निर्णयाला विरोध न करता त्याचे स्वागत करण्याची सुबुद्धी राजकीय नेते, मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाचे पदाधिकारी यांना झाली ही समाधानाची बाब आहे.

वास्तविक, 'अल्ला व पैगंबरावर श्रद्धा, नमाज, रोजा, जकात आणि हज यात्रा' या 'इस्लाम'च्या पाच स्तंभांपैकी जकात आणि हजयात्रा धनवान, श्रीमंत लोकांकडून पूर्ण व्हावी, अशी आज्ञा आहे. हज यात्रेचे कर्तव्य करताना - जीवनातील सर्व कर्तव्ये, स्वतःच्या मुला-बाळांविषयी सर्व जबाबदाऱ्या ज्याने पार पाडल्या आहेत, ज्याने प्रवासाचा खर्च प्रामाणिक श्रमातून उभारला आहे, कोणतेही कर्ज नाही किंवा कोणाची मेहेरबानी नाही अशा पैशातूनच हज यात्रा करावी, अशी आज्ञा असताना - हज यात्रेला देण्यात येणारे केंद्र सरकारचे अनुदान इस्लामच्या शिकवणीनुसार अमान्य आहे. तरीही मुस्लीम समाज व्यावहारिक सोय म्हणून या हज अनुदानाचा वापर करत होता. न्यायालयाच्या निवाड्यावर कुठलीही प्रतिक्रिया न देता हा निवाडा मुस्लिमांनी स्वीकारला.

'हज यात्रेला देण्यात येणारी मदत थांबवून तो निधी अल्पसंख्याकांच्या शिक्षणाकडे वळवावा', अशी सूचना आता नेत्यांनी केली आहे. शिक्षणाबद्दल आस्था निर्माण झाली आहे, याचेही स्वागतच आहे, परंतु धर्मनिरपेक्ष शासनाने मदरसासाठी अनुदान देऊ नये, हैद्राबाद विद्यापीठातील बीफ फेस्टिवल, गोमांस भक्षणाचे प्रदर्शन चुकीचे आहे, दारूल उलूम देवबंदने 'दारूच्या नशेत दिलेला तलाक ग्राह्य आहे', अशा सारख्या फतव्यांविरोधात कायद्यातील सुधारणे संदर्भात ही

नेते मंडळी कधी तोंड उघडणार आहेत? लोकप्रिय नेत्यांनी लोकप्रियतेचा विनियोग करून समाजाला शिक्षण द्यायचे असते! लोकानुनय नव्हे, तर लोकशिक्षणास प्राधान्य द्यायला हवे.

न्यायमूर्ती अल्तमश कबीर आणि रंजना देसाई यांच्या पीठाने वरील निर्णय देत असतानाच हज समितीचे कामकाज आणि हज यात्रेकरू निवडण्याच्या पद्धतीची तपासणी न्यायालय करेल, असे स्पष्ट केले आहे. याचा अर्थ या ठिकाणीसुद्धा इमानापेक्षा बेईमानी-भ्रष्टाचार होत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाला बाजूला ठेवून राजकीय स्वार्थासाठी आपण करत असलेल्या या योजनेबाबत अपराधीपणा न वाटता, सुनावणीच्या वेळी अनुदानाचे केंद्र शासनाकडून समर्थन करण्यात आले. यात्रेसाठी देण्यात येणारी मदत आयुष्यात एकदाच मिळेल, अशा पद्धतीने धोरणाची आखणी केल्याचे स्पष्ट केले गेले. यापूर्वी ही मदत पाच वर्षांतून एकदा देण्यात येत होती. नव्या धोरणानुसार हज यात्रा पहिल्यांदाच करणाऱ्या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येणार आहे, असे सरकारी प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

हज यात्रेकरूंबरोबर जाणाऱ्या सरकारी शिष्टमंडळालासुद्धा न्यायालयाने फटकारले आहे. पीठाने असे स्पष्ट केले आहे की 'असे शिष्टमंडळ पाठवणे अनुचित असून, त्यात ९ ते १० जणांचा समावेश करण्याची आवश्यकता नाही. ही संख्या दोनपर्यंत मर्यादित असावी.' धर्म हा पूर्णतः खाजगी भाग असताना धार्मिक कर्तव्य पूर्ण करणाऱ्या हज यात्रेकरूंसोबत सरकारी शिष्टमंडळ हवे, हेसुद्धा तर्कशास्त्रात बसत नाही. शिष्टमंडळास परवानगी म्हणजे धार्मिक कार्यात राजकीय हेतू साध्य करण्यास हिरवा कंदिल दाखवल्यासारखेच आहे.

मध्यंतरी म्हणजे दोन-तीन महिन्यांपूर्वी हैद्राबाद येथील विद्यापीठात एका जंगी फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. त्याचे नाव होते 'बीफ फेस्टिव्हल'. त्यात गोमांस भक्षणाचे प्रदर्शन भरवण्यात आले. अशा प्रकारच्या फेस्टिव्हलची गरज काय? मांस भक्षण करणे हा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा भाग असला, तरी त्याच्या अशा हिडीस प्रदर्शनाचे प्रयोजन काय? भारतात भिन्नधर्मिय सलोखा-सद्भाव यांसाठी प्रयत्न होत असताना अशा प्रदर्शन-फेस्टिव्हलचे आयोजन म्हणजे जखमेवरची खपली काढण्यासारखेच आहे.

वास्तविक, गोमांस भक्षण करणारे फक्त मुस्लीमच नसतात तर ख्रिश्चन, दलित व अन्य समूहातही ते खाल्ले जाते. तसेच काही उच्चवर्णीय सुद्धा गोमांस भक्षण करतात. सर्वच मुस्लीम गोमांस खातात असेही नाही. विशेष म्हणजे बाबरानेसुद्धा आपल्या मुलास लिहिलेल्या पत्रात 'भारतामध्ये गाय पवित्र मानण्यात येत असल्यामुळे आपल्या राज्यात गोहत्या बंदी करावी' असे म्हटले आहे. या पत्रात हिंदू-मुस्लीम ऐक्यावर भर दिला आहे. हे पत्र नॅशनल म्युझियममध्ये ठेवण्यात आले आहे. स्वा. सावरकरांनीसुद्धा या संदर्भात घेतलेली भूमिका सर्वांना माहीत आहे.

मध्यंतरी दारूल उलूम देवबंदच्या धार्मिक व्यासपीठाने फतवा काढून 'दारूच्या नशेत दिलेला तलाकसुद्धा इस्लामला मान्य आहे' असे घोषित केले होते. शरीयत ॲक्ट १९३७ किंवा मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात अशा अप्रगत, बिगर इस्लामी परंपरेला मान्यता दिली असली, तरी हे इस्लामला अपेक्षित नाही. अनेक मुस्लीम देशांमध्ये या परंपरा अस्तित्वात नाहीत. अनेक देशांतील कायदे सुधारले आहेत. भारतात मात्र या कायद्यांत सुधारणा केली जात नाही. मुस्लीम राजकीय-

धार्मिक नेते आवाज उठवत नाहीत. हे धर्मनिरपेक्ष देशात किती काळ चालवणार? आता भारतीय संविधानातील चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीसाठी आवाज उठवण्याची गरज आहे.

सुरुवातीच्या काळात भारतात आलेल्या मुस्लीम टोळ्या अप्रगत होत्या. त्यांनी इस्लाम स्वीकारला, परंतु स्थानिक संस्कृती, जुनी परंपरा चालवत राहिले. इस्लामचा सुधारणावादी आशय बाजूला राहिला. आता गरज आहे मुस्लिमांनाच आपल्या धर्माच्या शिकवणुकीला आधुनिक पद्धतीने अभ्यासण्याची. मौलाना आझादांना किंवा डॉ. असगर अली इंजिनिअर यांसारख्या विद्वानांना अपेक्षित असणाऱ्या उदारमतवादी इस्लामची. हा उदारमतवाद जनसामान्यांच्या आचरणाचा भाग झाल्यास जमातवादी, धर्मवादी, तालिबानवादी शक्ती क्षीण होण्यास मदत होईल. म्हणून गरज आहे उदारमतवादी इस्लामला पाठिंबा देण्याची, 'मुल्ला की जबान, अल्लाह की जबान नहीं' हे समजावून सांगण्याची. असे झाले तर तर्कविसंगत फतवेगिरीही बंद होईल आणि सामान्य मुस्लीम आपल्या बुद्धीने इस्लामचा अर्थ लावतील आणि मग इस्लामला मान्य नसलेली पुरोहितशाही कमी होईल. धर्माचा उदारमतवादी अर्थ लावून त्यानुषंगाने सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या अशा प्रयत्नांचे मंडळाने स्वागत केले आहे.

**सुधारणेला कायद्याचे अधिष्ठान**

'ऑल इंडिया मुस्लीम महिला पर्सनल लॉ बोर्ड'ने तीन वेळा तलाक शब्दाचा उच्चार करून देण्यात येणारा तलाक अमान्य केला आहे; तसेच 'मॉडेल निकाहनामा' जाहीर केला आहे. काही मर्यादेपर्यंत अशा बदलांचे महत्त्व असल्याने मुस्लीम महिलांच्या न्याय हक्कांसाठी चालणाऱ्या संघटित प्रयत्नांना प्रतिसाद म्हणून या भूमिकेचे स्वागत केले पाहिजे.

या निकाहनाम्यात 'एका दमात तीन तलाक' ही लग्नाच्या बंधनातून झटपट मुक्त होण्याची पुरुषाची सोय रद्द करून तलाकपूर्व तडजोडीसाठी तीन महिन्यांचा कालावधी ठरवला आहे ('तलाक-ए-हसन' याचे समर्थन); तसेच टेलिफोन, एसएमएस, ई-मेलमार्फत देण्यात येणारा तलाक (तलाक-ए-बिद्दत) अमान्य केला आहे. या भूमिकेचे मुस्लीम समाजातील उदारमतवादी, सुधारणावादी गटांनी स्वागत केले आहे. मुस्लीम महिलांवरील अन्याय निवारणाच्या दृष्टीने आशावादी वातावरण निर्माण होण्यास याचा उपयोग होईल.

वास्तविक भारतातील मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात अशा प्रकारच्या सुधारणा व्हाव्यात म्हणून कायदेतज्ज्ञ प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. ताहेर मेहमूद, डॉ. झीनत शौकत अली यांसारख्या मुस्लीम विचारवंतांनी यापूर्वी असे निकाहनामे तयार केले आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकाराने अस्तित्वात आलेल्या 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'तर्फे १९९९मध्ये पुण्यात आयोजित केलेल्या मुस्लीम महिला अधिकार परिषदेत सुधारणावादी व शरीयतवर आधारित 'इन्साफ पसंद निकाहनामा' जाहीर करण्यात आला होता. त्याच्या अंमलबजावणीसाठी भारतातील विविध राज्यांत कार्यक्रम घेण्यात आले. त्यानुसार काही विवाहसुद्धा झाले आहेत. भारतात मुस्लीम समाजातील अन्यायकारक प्रथा व कायद्यांविरुद्ध आवाज उठवण्याचे कार्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडून झाले आहे.

सध्या इतर विषयांबरोबरच मुस्लीम महिलांना संरक्षण देणारे कायदे करावेत, यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध संघटना काम करत आहेत. पाकिस्तान, बांगलादेश, इंडोनेशिया आणि तुर्कस्तान यांसारख्या इस्लामी राष्ट्रांत कायद्यात सुधारणा करून पुरुषांच्या मनमानी वागण्यावर निर्बंध लादले आहेत. अशा कायद्यांचा अभ्यास करावा व त्याप्रमाणे कायद्यात सुधारणा करून महिलांना संरक्षण द्यावे, अशी पुरोगामी मुस्लीम संघटनांची मागणी आहे; परंतु शासन व धार्मिक नेतृत्व याकडे लक्ष देत नाही.

भारतातील स्त्री संघटना व महिला विचारवंतांनी 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ची पुरुषधार्जिणी भूमिका नाकारून 'ऑल इंडिया मुस्लीम महिला पर्सनल लॉ बोर्डा'ची स्थापना केली आहे. त्यांनी इस्लामच्या शिकवणीवर आधारित 'सुधारित निकाहनामा' तयार केला. हे प्रयत्न समाजप्रबोधनाच्या चळवळीतील एक पुढचे पाऊल असले, तरी जोपर्यंत त्यास कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होत नाही, तोपर्यंत त्याला अंगभूत मर्यादा असणारच. खऱ्या अर्थाने मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा झाल्यानंतरच मुस्लीम महिलांची तलाकच्या कात्रीतून सुटका होणार आहे. सामाजिक प्रबोधनासाठी कायद्यांचे अस्तित्व महत्त्वाचे ठरते. कायदाशास्त्रामध्ये एक तत्त्व आहे, समाजांतर्गत होणाऱ्या घडामोडी कायदा करण्यास सहाय्यकाची भूमिका करतात, समाजाच्या गरजेनुसार कायदे बनवण्यात येतात. कायदा आणि प्रबोधन एकमेकांना पूरक ठरते. मुस्लीम कायद्यातील सुधारणांच्या संदर्भात हाच दृष्टीकोन ठेवला पाहिजे.

तलाक, पोटगी, बहुपत्नित्व इत्यादींसंदर्भात भारतातील न्यायसंस्थेने वेळोवेळी मुस्लीम महिलांसंदर्भात योग्य भूमिका घेतली आहे. महिलांना मानवी अधिकार व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची सूचना व शिफारस शासनाकडे केली आहे; परंतु राजकीय हितसंबंध विचारात घेऊन राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वाकडे शासनाने उदासीन दृष्टीनेच पाहिले आहे. व्यक्तिगत कायदा व भारतीय घटना यात श्रेष्ठ कोण, याबद्दलचा वाद अजूनही चालूच आहे. त्यामुळे यापुढेही संघर्ष चालूच राहणार व नवनवीन विवादास्पद मुद्दे निर्माण होतच राहणार, हे गृहीत धरावे लागेल.

भारतातील मुस्लीम समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती न्या. राजेंद्र सच्चर समितीने स्पष्ट केली आहे. ही स्थिती निर्माण होण्यास राजकीय व धार्मिक कारणे आहेत, हे विचारात घेऊन दोन्ही पातळ्यांवर समाजविकासाचे नवे प्रयत्न सुरू झाले आहेत.

### व्यापक दृष्टी हवी

स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिमांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी विविध समित्या, आयोग आणि अभ्यासगटांची स्थापना करण्यात आली. परंतु त्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी मात्र झाली नाही. १९५५ची काकासाहेब कालेलकर समिती, मंडल आयोग, गोपाल सिंह समिती, सच्चर समिती, रंगनाथ मिश्रा आयोग यांच्या अहवालांत मुस्लीम समाजातील मागास जातींचा उल्लेख आहे. परंतु मुस्लीम समाजातील धर्मवर्चस्ववादी प्रवाह, राजकीय दृष्टीकोन आणि हिंदुत्ववाद्यांच्या भूमिकेमुळे मुस्लीम मागासांचा प्रश्न नेटक्या पद्धतीने सोडवण्याचे प्रयत्न झाले नाहीत.

मुस्लीम समाजाचे प्रश्न अनेकांगी आहेत. त्यांचा एकत्रित विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी मुस्लीम नेतृत्वाने आत्मपरीक्षण करण्याचीही गरज आहे. मुस्लिमांचे प्रश्न टिकून राहण्यात आणि ती वाढवण्यात राज्यकर्ते व हिंदुत्ववादी जबाबदार आहेत. अनेक वेळा डाव्या पुरोगामी पक्ष व संघटनांनी मुस्लीम समाजसुधारणेसंदर्भात बोटचेपी भूमिका घेतली आहे. मात्र मुस्लीम मागासलेपणास मुस्लीम जमातवाद आणि अशरफांची भूमिका हे घटक कारणीभूत आहेत, याचीदेखील निरपेक्ष मीमांसा झाली पाहिजे.

इस्लाम शांततावादी धर्म आहे, परंतु बहुतेक मुस्लीम राष्ट्रे अशांत आहेत. इस्लामला हिंसा मान्य नाही, परंतु इस्लामच्या नावानेच धर्मांध संघटना मुस्लीम देशांत हिंसा करतात. अल्लाहला तलाक सर्वाधिक नापसंत आहे, परंतु मुस्लीम समाजात एकतर्फी तोंडी तलाकचा सुळसुळाट झालेला आहे. मुस्लीम महिलांना समानता व सन्मान देणाऱ्या धर्मात आज मुस्लीम महिलांची काय स्थिती आहे? हजरत पैगंबर शिक्षणाला प्राधान्य देतात, परंतु तालिबानी लोक मलालासारख्या मुलीच्या डोक्यात गोळ्या घालतात. या आंतरविसंगत वर्तनातून निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण केले पाहिजे.

गेल्या काही वर्षांपासून मुस्लीम समाजातील जातीव्यवस्था, पसमांदा मुस्लीम आणि मुस्लीम आरक्षण या विषयावर चर्चा होत असते. यासंदर्भातील वास्तव समजून घेतले पाहिजे. डॉ. राजेंद्र प्रसाद भारताचे राष्ट्रपती असताना १९५०मध्ये त्यांनी राष्ट्रपतीचा संविधानात्मक आदेश काढून एस.सी./एस.टी. (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती)साठीचे आरक्षण हिंदूधर्मातील मागासजातींसाठीच मर्यादित असल्याचे सांगितले. कालांतराने त्यात सुधारणा करून शीख व बौद्ध धर्मियांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. मुस्लीम व ख्रिश्चन धर्मसमूहातील मागास जातींना मात्र आजतागायत या आरक्षणाचा लाभ मिळालेला नाही. हा राष्ट्रपतीचा संविधानात्मक आदेश अस्तित्वात आता तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री, मौलाना आझाद शिक्षणमंत्री होते आणि पं. नेहरू पंतप्रधान होते. मग मागास मुस्लिमांना या सवलतीपासून दूर का ठेवण्यात आले? याचे स्पष्टीकरण असे सांगितले जाते की, मौलाना आझादांसारख्या मान्यवर नेत्यांनी सांगितले की, इस्लामला जातीव्यवस्था मान्य नाही, त्यामुळे मुस्लीम समाजातील मागासजातींचा प्रश्न निर्माण होत नाही. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुस्लीम समाजातील मागासजातींच्या आरक्षणाच्या बाजूने मत व्यक्त केले होते. तथापि पंडित नेहरू यांनी अशी भूमिका घेतली की, मौलाना आझादांसारखे नेते जर मुस्लीम मागासजातीच्या आरक्षणाच्या विरोधात असतील, तर मुस्लीम मागास जातींचा प्रश्न निर्माण होत नाही. मौलाना आझादांच्या सूचनेवरून मुस्लिमांना १९५०च्या राष्ट्रपतीच्या संविधानात्मक आदेशातून बाजूला ठेवण्यात आले.

१९५५मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगाने भारतीय मुस्लीम समाजात जातीव्यवस्था असल्याचे नोंदवले आहे. मंडल आयोगाने मुस्लीम समाजातील काही मागासजातींचा इतर मागासवर्गीय जातींमध्ये (ओबीसी) समावेश केला आहे. मुस्लीम समाजाचे सर्वांगीण मागासलेपण दूर करण्यासाठी मुस्लीम नेत्यांनी जकात आणि सदका यांसारखी सामाजिक उत्तरदायितत्वाची भान देणारी धार्मिक संकल्पना, तसेच वक्फ बोर्डाकडे असणारी कोट्यवधींची मालमत्ता किंवा हजचे अनुदान इत्यादी क्षमतांचा व्यवस्थित वापर केल्यास मुस्लीम मागासांचा प्रश्न सोडवणे सहज

शक्य आहे. हा प्रश्न आत्मबळाच्या साहाय्याने सोडवता येऊ शकतो, हा आत्मविश्वास समाजाला देणे गरजेचे आहे.

मुस्लीम समाजाच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या विकासासाठी शिफारसी कराव्यात, यासाठी महाराष्ट्र शासनाने २००८मध्ये डॉ. महंमद-उर-रहमान यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटाने त्यांचा अहवाल २०१३मध्ये सादर केला. त्यात नोकरभरतीसाठी मराठी भाषेची अनिवार्यता शिथिल करून ती भाषा अवगत करण्यासाठी काही काळाची सवलत द्यावी, अशी शिफारस केली आहे. आजच्या वस्तुस्थितीस हे अनुकूल असले, तरी मुस्लीम समाजाने अट्टाहास बाजूला ठेवून प्रादेशिक भाषाकौशल्य प्राप्त करणे आवश्यक आहे.

मुस्लीम नेते मुस्लीम समाजातील मागासजातींऐवजी (भंगी, दरवेश, मदारी, छप्परबंद, शिकलगार, पिंजारी व अन्य) संपूर्ण मुस्लीम समाजालाच आरक्षण देण्याची मागणी करत आहेत. ही मागणी किती संवैधानिक आहे, याचा विचार झाला पाहिजे कारण भारतात आरक्षणाची तरतूद ही धर्माधिष्ठित नसून ती मागासजातींसाठी आहे. भारतात मुस्लीम समाजासमोर शिक्षण, दारिद्र्य, सामाजिक सुरक्षा इत्यादी संदर्भातील प्रश्नांचे मोठे आव्हान आहे. ते सोडवण्यासाठी राज्य व केंद्र सरकारमार्फत काही प्रमाणात सवलती, शिष्यवृत्ती व अन्य उपाययोजना केल्या आहेत. त्यांचा लाभ व्यवस्थितपणे समाजास घेता यावा, या दृष्टीने प्रयत्न होणे अपेक्षित आहे.

**उदारमतवाद्यांनी एकत्र यावे**

ब्रिटिशकाळातील विल्यम हंटर (१८७१) पासून न्या. सच्चर समिती (२००६)पर्यंत आलेल्या विविध अहवालांमध्ये स्पष्ट झालेल्या माहितीवरून असे लक्षात येते की, मुस्लिमांमध्ये शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा आहे. मुस्लिमांच्या या परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या घटकांचा तपशील समाजाच्या प्रगतीसाठी लक्षात घेतला पाहिजे. समाजाच्या अधोगतीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांची मीमांसा होणे, हे त्या समाजाच्या प्रगतीच्या उपाययोजना ठरवताना आवश्यक आहे. विकासाचे बाह्य घटक जसे महत्त्वाचे असतात, तसेच समाजांतर्गत विकासाच्या प्रेरणाही महत्त्वाच्या असतात. यासाठी अधोगतीस कारणीभूत ठरणारी समाजाची पारंपारिक मानसिकताही बदलली पाहिजे.

मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व नोकरीतील प्रमाण व समाजाची विदारक परिस्थिती समाज नेतृत्वाला आरसा दाखवणारी आहे. समाजविकासासाठी 'समूह विकास योजना, समान संधी आयोग, उद्योजकता विकास कार्यक्रम, उद्योजकीय साक्षरता इत्यादींसारख्या शिफारशी सच्चर समितीने सुचवल्या आहेत. मुस्लीम समाजाच्या विकासाची इच्छाशक्ती असणाऱ्यांनी त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

शासकीय नोकरी, उच्चशिक्षण यांत मागे असणारा समाज मात्र स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. मुस्लीम समाजात स्वयंरोजगाराचे प्रमाण ६१ टक्के असून, हिंदू समाजात ते ५५ टक्के आहे. सामाजिक असुरक्षा, संधीचा अभाव, आर्थिक मागासलेपण इ. घटक याबाबतीत कारणीभूत आहेत; तसेच मुस्लीम समाजाची मानसिकताही यास जबाबदार आहे. 'तबलिग',

'जमात-ए-इस्लामी' आणि तत्सम धर्मप्रसारासाठी कार्यरत असणाऱ्या संघटना मुस्लीम समाजास शासकीय नोकरी मिळवण्यापासून परावृत्त करतात. 'शासकीय नोकरी करताना नमाज-रोजा-इबादत यांसारखी अग्रक्रमाची असणारी कर्तव्ये पूर्ण करता येत नाहीत, म्हणून भौतिक सुख-सुविधांच्या मागे लागण्यापेक्षा छोटे-मोठे उद्योग करून कुटुंब चालवावे - पारलौकिक, इबादतच्या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत,' असा उपदेश काही प्रभावी मुस्लीम धार्मिक संघटनांकडून सातत्याने करण्यात येतो. परिणामी, समाजास उच्च व आधुनिक शिक्षणाबद्दल उदासीनता निर्माण होते व उच्चशिक्षण, श्रमताधिष्ठित शिक्षण नसल्यामुळे नोकरीची संधी गमावली जाते. या दुरावस्थेस जबाबदार असणारी समाजांतर्गत मानसिकता बदलण्याची गरज आहे.

**मदरसे आणि आधुनिक शिक्षण**

मदरसा शिक्षणाचे मर्यादा सांगून आधुनिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची भूमिका मंडळाने घेतली. गेल्या काही दशकांत 'मदरसा' वेगवेगळ्या दहशतवादी, धार्मिक आणि राजकीय कारणांनी प्रसारमाध्यमे आणि जनमानसांत मोठ्या प्रमाणात चर्चेत असणारा विषय ठरला आहे. गल्लत-गफलत, समज-गैरसमज आणि अनभिज्ञता, यांमुळे हा विषय संशयाचा, संभ्रमाचा आणि कुतुहलाचा ठरला आहे.

'मदरसा' या मूळ अरबी शब्दाचा अर्थ 'शाळा' असा आहे. धर्मशिक्षण हा सर्वच धर्माचा संस्काराचा, ज्ञानाचा विषय असल्यामुळे सर्वच धर्मगटांत सुरुवातीच्या काळात शिक्षणात धर्म, धार्मिक तत्त्वज्ञान, संस्कृती यांसारख्या आशयाचा समावेश होता. काळानुरूप मदरसा शिक्षणच्या अभ्यासक्रमात सुधारणा झाली. धर्मशिक्षणासाठी स्वतंत्र पीठे तयार झाली. शाळा माणसाला घडवण्यासाठी असते. अप्रगत अवस्थेतून प्रगत अवस्थेकडे घेऊन जाणारी ती प्रक्रिया असते. ज्ञान कौशल्य-संस्कार यांसाठी शाळांची समाजाला आवश्यकता असते. ती गरज मदरसा माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न होत गेला.

मदरशाबाबत मात्र मुस्लीम आणि मुस्लिमेतर बांधवांमध्ये कायमच एक गूढ वलय निर्माण झालेले दिसून येते. मदरसा शिक्षण आणि 'दीनी तालीम' म्हणजेच 'धर्मशिक्षण' असे एकजिनसी अविभाज्य नाते आहे. आजच्या आधुनिक व विज्ञान तंत्रज्ञान काळात मदरशांमध्ये जाणाऱ्यांची प्रेरणा कोणती? त्यांचे ध्येय-उद्दिष्ट काय? मदरश्यात विद्यार्थी स्वतःच्या पसंतीने जातात की, त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा रेटा असतो, याचाही विचार केला पाहिजे. त्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणाची संधी आहे का? या संस्था चालवणाऱ्यांची मानसिकता काय? या सर्वांचा विचार झाला पाहिजे. आज महाराष्ट्रात १९७९ मदरसे आहेत, तर केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अहवालानुसार एकट्या उत्तर प्रदेशमध्ये १० हजारांहून अधिक मदरसे आहेत.

मदरश्यात जाणाऱ्यांना 'तलबा' वा 'तालिबान' म्हणजे 'विद्यार्थी' वा 'ज्ञानार्थी' म्हटले जाते. अफगानिस्तानातील तालिबानवाद्यांकडून केल्या जाणाऱ्या कृत्यांतून त्यांच्यावर कोणी कोणते संस्कार केले, हे लक्षात येते येते. इस्लामचा उदारमतवादी दृष्टीकोन आणि सर्वसमावेशकता मदरसा शिक्षणात किती प्रमाणात आहे याबद्दलची चर्चा होत असते. या सर्व घडामोडींमुळे आज 'मदरसा' हा शब्द उच्चारला की, डोळ्यांसमोर चित्र उभे राहते- ते पांढरा शर्ट-पायजमा आणि

अर्धे डोके झाकलेली टोपी आणि कंबरेपासून डोक्यापर्यंत मागे पुढे हालत-डोलत 'कुरआन' पठण करणारी मुले आणि काळ्या बुरख्यातील व ओढणीने नखशिखान्त लपेटलेल्या पठण करणाऱ्या मुली. वास्तविक भारतातील मदरसे प्रामुख्याने उत्तर प्रदेशातील दोन प्रकारांत मोडतात. पारंपरिक धर्माचा आधार घेऊन कट्टरता तसेच धर्मरक्षक म्हणून संस्कार करणारे आणि अलीकडे आधुनिक विषयांचा समावेश करून गणित, विज्ञान, संगणक आदींचा समावेश असणारे शिक्षण देणारे. पाकिस्तानात मदरश्यासंदर्भात होणाऱ्या घडामोडी तसेच अमेरिका व इतर युरोपियन देशांतील मदरशांवरील बंदीमुळे मदरसे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. त्यामुळे भारतातही मोठ्या प्रमाण मदरश्यांकडे अविश्वासाने पाहणे सुरू झाले आणि ते अपप्रचाराचे लक्ष्य ठरले आहेत.

'कुराण', 'हदिस', इस्लामचा इतिहास आणि धर्माशी निगडित असणाऱ्या सर्व मूल्यांचा अभ्यासक्रम शिकवणे, हे मदरशाचे ध्येय असते. उर्दू, अरबी, फारशी या भाषाही शिकवण्यात येतात. प्रश्न असा पडतो की, इस्लामचा अभ्यास करताना, धर्माचे शिक्षण देताना कोणती मूल्ये शिकवली जातात? मोहंमद पैगंबरांना, मौलाना अबुल कलाम आझादांना, डॉ. असगर अली इंजिनीअर यांना अपेक्षित असणारी धर्म शिकवण दिली जाते की, उलट्या दिशेने काटे फिरवणारे शिक्षण दिले जाते? इस्लामला अपेक्षित असणारी शांतता, अहिंसा, जिहादी- तालिबानी लोक किती प्रमाणात दाखवतात?

पैगंबरांनी उपदेश केला आहे की, 'ज्ञानर्जन करण्यासाठी चीनपर्यंत जा'. पाकिस्तानात शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या कोवळ्या वयातल्या मलालास त्याची किंमत कशी मोजावी लागली, हे जगाने पाहिले. हा माथेफिरूपणा आला कोठून? पुरोहितवर्ग इस्लामला मान्य नाही. परंतु पुरोहितवर्गच (मुल्ला, मौलवी, उलेमा इ.) या समाजावर नियंत्रण ठेवत आहे. आपण आजच्या मदरसा पद्धतीतून कोणते शिक्षण देत आहोत, याचे आत्मपरीक्षण मुस्लीम समाजधुरीण करत नसल्याचा हा पुरावा आहे.

१९७३मध्ये हमीदभाईंच्या नेतृत्वाखाली मुस्लीम सत्यशोधक मंडळाने कोल्हापूर येथे शिक्षण परिषद घेऊन शिक्षणाच्या माध्यमाविषयी, शैक्षणिक प्रश्नांविषयी जागृती करण्याचा प्रयत्न केला. त्याला आता ५० वर्षे झाली आहेत. परंतु मुस्लीम नेतृत्वाने उर्दू भाषा, मदरसा शिक्षणाचा आग्रह धरला. आजही उर्दू माध्यम- मदरसा शिक्षणाच्या एकूणच मर्यादा विचारात घेऊन मुख्य प्रवाहातील शिक्षणासाठी लोकशिक्षण करण्याची गरज जाणवत आहे. सरळ मुख्य प्रवाहातील शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेऊन अडचणींवर मात करून अनेक तरुण-तरुणी शैक्षणिक प्रगती करत असल्याचे दिसत आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी फक्त ४ टक्के विद्यार्थी मदरसा पद्धतीच्या शिक्षणाकडे वळतात, याची कारणे समजून घेतली पाहिजेत. मुस्लीम समाजातील शैक्षणिक मागासलेपण, हे या समाजाच्या एकंदर मागासलेपणाचे कारण आहे.

मदरशांना अटी घालून, अनुदान दिल्यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शाळांची देखभाल करता येईल व योग्य दिशाही देण्यात येईल. प्रामुख्याने समाज आधुनिक व विज्ञानवादी होईल व पारंपरिक नेतृत्वालासुद्धा आत्मपरीक्षण करण्यास संधी मिळेल. वास्तवाचा विचार, त्याचा स्वीकार आणि अपेक्षित आदर्शाकडे वाटचाल, असे स्वरूप असल्यास मदरशांचे समर्थन व स्वागत करणे आवश्यक आहे.

या विषयाच्या निमित्ताने इतर काही मुद्दे समोर येतात. धर्मनिरपेक्षता हे संविधानात्मक तत्त्व शासनाच्या या धोरणामुळे बाजूला जाते का? भारत सरकारने शिक्षणाचा हक्क आणि जगण्याचा हक्क नागरिकांना दिला आहे. मोफत व सक्तीचे शिक्षण मान्य केले आहे. प्रस्तुत शासकीय अनुदान हे मदरसा किंवा धर्मशिक्षणासाठी नसून गणित, विज्ञान, संगणक, समाजशास्त्र या विषयांसाठी आहे. त्यासाठी नियमावली, अटी तयार करण्यात आल्या आहेत. परंपरावादी, जमातवादी धर्मवादी शक्ती यास विरोध करण्याची दाट शक्यता आहे, कारण त्यांना विज्ञानवाद नकोच आहे. अशी मानसिकता बाळगणे आत्महत्याच ठरणार आहे.

हमीदभाई अशा धर्मांध विचारवंतांना सांगत, ''आम्ही तुम्हाला आत्महत्या करू देणार नाही. तुम्हाला आधुनिक शिक्षण घेतलेच पाहिजे. पशू अवस्थेतून मानवी मूल्यांकडे जाण्यासाठी हे संजीवन आहे." समाजाला आधुनिक विज्ञानवादी घडवण्यासाठी शासनाने सक्ती करावी. जे अनुदान घेणार नाहीत, त्यांच्यावर लक्ष ठेवणारी यंत्रणाही उभी करावी.

वास्तविक, प्रवाही शिक्षणाकडे मुले कशी येतील, या दृष्टीने अथक प्रयत्न झाले पाहिजेत. धर्मवादी राजकारण करणाऱ्यांनी मुस्लीम समाजाच्या विकासासाठी आणि प्रबोधनासाठी आजपर्यंत ठोस प्रयत्न केलेले नाहीत. पैगंबर जयंतीला सुट्टी जाहीर करणे, हज यात्रेला (धर्माची मान्यता नसताना) अनुदान देणे, तलाकपीडितांना गुन्हेगारी कायद्यातील कलम १२५मधून वगळणे, यालाच प्राधान्य दिले. यामुळे समाजाचे कल्याण कमी आणि बदनामी जास्त झाली. जमातवादी शक्तींनी याचा फायदा घेतला, धर्मद्वेष पसरला. मदरसा शिक्षण, आधुनिक शिक्षणाच्या अनुदानाचे असेच होऊ नये.

मदरशांचे आधुनिकीकरण, मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना उर्दू भाषा शिक्षण ऐच्छिक स्वरूपात आणि उर्दू माध्यमातील शालेय विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकण्याची संधी देण्यात येणार असल्याचा स्वागतार्ह निर्णय घेण्यात आला. तसेच मध्यंतरी मदरशांतील शिक्षण शालाबाह्य समजण्यात येणार असल्याच्या बातमीने राजकीय वादळ उठवले. वास्तविक कोणत्याही धार्मिक शिक्षणासाठी शासकीय अनुदान नसते आणि धार्मिक शिक्षण देणाऱ्या सर्वच संस्था शालाबाह्यच असतात. धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेने अशा संस्थांना शासकीय अनुदान देणे अपेक्षितही नाही.

महंमद पैगंबरांना इस्लामचा संदेश येताना जो पहिला शब्द आला, तो 'इकरा'. त्याचा अर्थ 'वाचन' असा आहे. वाचन करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुराणात 'इल्म' हा शब्द अनेक वेळा आला आहे. म्हणजे 'शिक्षण घेणे'. आपले जीवन समृद्ध करण्यासाठी जगातल्या कोणत्याही देशात (अगदी चीनपर्यंत) जाऊन, तेथील भाषा अवगत करून, वैयक्तिक व सामाजिक सुधारणा करावी, अशी पैगंबराची शिकवण आहे.

खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वैद्यकशास्त्रातील मूलभूत संशोधनात मुस्लीम संशोधकांनीही योगदान दिले आहे. इस्लामच्या 'भाषांतर-युगा'त ग्रीस तत्त्वज्ञान, विज्ञान अरबी भाषांत अनुवादित केले गेले. नंतर ते युरोपीयन लोकांनी अरबीतून आपल्या भाषांमध्ये अनुवाद केले.

सध्या परिस्थितीचे वर्णन करताना मलेशियाचे माजी पंतप्रधान मुसाअर महंमद असे म्हणाले होते की, इस्लामच्या सुरुवातीच्या काळात शैक्षणिक प्रगती होत गेली. नंतर मात्र धार्मिक व

राजकीय नेत्यांना मुस्लीम समाजाला धार्मिक शिक्षणापर्यंतच मर्यादित ठेवले. त्यातून आधुनिक शिक्षणाचे महत्त्व कमी झाले आणि बौद्धिक क्षेत्रात मुस्लिमांची पीछेहाट झाली. महमंद यांचे हे विधान मुस्लीम समाजाच्या नेतृत्वाला अंतर्मुख करावयास लावणारे आहे.

मदरशांबाबत होणारी चर्चाही अशीच अंतर्मुख करणारी आहे. मदरसा ही संकल्पना नेमकी काय आहे, त्यांमध्ये किती मुस्लीम शिक्षण घेतात, तेथे दिले जाणारे शिक्षण नेमके कसे आहे, यांबाबत अनेकांना फारशी कल्पनाही नसते. न्या. सच्चर समितीच्या अहवालानुसार केवळ ३ ते ४ टक्के मुलेच मदरसा शिक्षणाकडे वळतात. धार्मिक शिक्षणाचे आकर्षण, पुरोहित वर्ग निर्माण करणे, दारिद्र्यामुळे पारंपरिक शिक्षण न परवडणे, स्थलांतरानिमित्त येणाऱ्या कामगारांची मुले आणि अन्य परिस्थितीजन्य कारणांमुळे पालक आपल्या मुलांना मदरशांमध्ये पाठवतात. अशा मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणाकडे वळवण्यासाठी गणित, विज्ञान, भाषा आणि संगणकाचे शिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी मदरसा शिक्षणाच्या 'आधुनिकीकरणा'चे स्वागतच केले पाहिजे.

उत्तर प्रदेशातल्या 'दिनी तालिमी कौन्सिल'ने काही प्रसंशनीय प्रयत्न केले आहेत. तेथील शाळांचा अभ्यास केला असता त्यांच्या लक्षात आले की, हिंदी माध्यमाच्या शाळांतून हिंदू धर्मप्रेरित शिक्षण पद्धतीचा अवलंब केला जातो आणि मदरशांमधून मुस्लीम धर्मप्रेरित शिक्षण दिले जाते. यातून मार्ग काढण्यासाठी धार्मिक व आधुनिक शिक्षणाचा मिलाफ करून शिक्षणसंस्था स्थापन केल्या. त्यामध्ये भिन्नधर्मीय शिक्षणाबरोबरच विज्ञान, इतिहास, गणित असे आधुनिक विषय अनिवार्य केले. उत्तर प्रदेशातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण परिषदेतर्फे तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राबवण्यात येतो. सरकारी मदत मिळवण्यासाठी तेथील मदरशांना आपल्या अभ्यासक्रमात बदल घडवून आणावा लागला. यामुळे तेथील बहुतेक मदरशांची सरकार दप्तरी नोंदणी आहे.

अशा प्रकारे अभ्यासक्रमातील एकरूपता व त्याचे केंद्रीय स्वरूप निश्चित करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न निश्चितच उपयोगी पडतील. त्यामुळे भारतीय समाजसमूहात निकोप वातावरण निर्माण होऊ शकेल.

'शिक्षण हक्क कायद्या'त 'शाळा' या संकल्पनेचे विवेचन करण्यात आले आहे. त्याचा अर्थ समजावून घेण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर धार्मिकपीठाकडून देण्यात येणारे आणि मुख्य प्रवाहापासून दूर असणारे शिक्षण 'शालाबाह्य' ठरवल्यास ते चुकीचे नाही. मात्र, केवळ रोगाचे निदान न करता त्यावर सकारात्मक उपाययोजनाही केल्या पाहिजेत. त्याचाच एक भाग म्हणून सध्याच्या शिक्षणव्यवस्थेत मागास मुस्लिमांसाठी आरक्षणाची तरतूद करायला हवी.

आजच्या विज्ञानयुगात राहून आधुनिक शिक्षण नाकारणे, ही एक प्रकारची आत्मप्रतारणा आहे. राज्यघटनेत मूलभूत हक्कांच्या जोडीने मूलभूत कर्तव्यांचाही समावेश आहे. नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवता आणि शोधवृत्ती जोपासली पाहिजे, असे त्यात स्पष्ट करण्यात आले आहे. या दृष्टीकोनातून पाहिल्यास मदरशांचे आधुनिकीकरण, मुस्लिमांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठीचे पर्याय आणि मुस्लीम समाजातील मागासांना शिक्षणात आरक्षण, अशा बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. केवळ मदरशांना दोष देऊन चालणार नाही, तर त्यासाठी चांगला पर्याय उपलब्ध करून देण्याबाबतही विचार झाला पाहिजे.

आधुनिक व्यवसायाभिमुख शिक्षणाबरोबरच महाराष्ट्रातील मुस्लिमांनी मराठीला मातृभाषा समजले पाहिजे, मराठी माध्यमातून शिक्षण घेतले पाहिजे आणि ही भाषा आपल्या रोजच्या व्यवहारात वापरली पाहिजे. मराठी भाषा अवगत करून त्याचा वापर करणे, हे व्यक्तिगत हिताचे ठरेलच, शिवाय समाजाची उन्नती होईल आणि व्यापक अर्थाने हे सर्वांच्याच हिताचे ठरणार आहे, अशी भूमिका घेऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळ तसे प्रचारकार्य करत आहे.

**फतव्यांचे राजकारण**

ज्येष्ठ मानवतावादी विचारवंत एम. एन. रॉय यांनी भारतीय मुस्लिमांबद्दल असे वक्तव्य केले आहे की, इस्लामच्या बाबतीत सर्वांत जास्त अनभिज्ञ असणारा समाज हा मुसलमान आहे. मुस्लीम समाजात धार्मिक निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे. ते अनेक वेळा सल्ला-मसलतीसाठी समाजातील उलेमा वर्गावर अवलंबून असतात. या उलेमांनी वेळोवेळी फतवे काढले आहेत, जे अनेक वेळा वादग्रस्त ठरले आहेत. उदाहरणार्थ, ‘इस्लामला जुगार आणि व्याज या दोन्ही गोष्टी मान्य नसल्यामुळे आयुर्विमा (लाईफ इन्श्युरन्स) काढणे हे इस्लामविरोधी असून, मुस्लीम बांधवांनी आयुष्याचा विमा उतरवू नये,’ असा फतवा ‘दारूल उलूम देवबंद’ येथील प्रमुख उलेमांनी काढला होता. लखनौतील सलीम चिश्ती यांनी स्थानिक विमा कंपनीचे एजंट होण्याबाबत ‘दारूल उलूम देवबंद’कडे मार्गदर्शन मागितल्यानंतर हा फतवा काढण्यात आला. ‘अखिल भारतीय मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळा’चे उपाध्यक्ष आणि ‘ऐशबाग इदगाह’चे इमाम मौलाना खलिद रशीद यांनीही या फतव्याचे समर्थन केले आहे.

‘इस्लाम हा विज्ञानवादी धर्म असल्याने आणि त्यातील तरतुदी आधुनिक असल्याने आयुर्विमा ‘नाजायज’ ठरवणे तर्कसंगतच आहे,’ असे त्यांनी म्हटले आहे. याउलट“अखिल भारतीय शिया मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळा’चे अध्यक्ष मौलाना मिर्झा महंमद अख्तर यांनी हा फतवा शियापंथीयांना बंधनकारक नसून, त्याची आवश्यकताही नसल्याचे स्पष्ट केले आहे.

इम्राना प्रकरण, झोपेत तलाक दिल्याचे प्रकरण आणि हैदराबाद येथील उलेमांनी ‘वंदे मातरम’संदर्भात काढलेले वादग्रस्त फतवे, या साऱ्या बाबी मुस्लीम समाजजीवनाचे मागासलेपण दाखवणाऱ्या; तसेच भारतीय समाजात तणाव निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. अशा प्रकारचे धार्मिक फतवे काढणाऱ्या संस्था भारतात ठिकठिकाणी असून, ‘दारूल उलूम देवबंद’ ही त्यातील अग्रणी संस्था आहे. अशा धार्मिक संस्थांकडून काढण्यात येणारे फतवे आणि त्यातील आदेश मुस्लीम समाजावर बंधनकारक नसतात. अनेक वेळा विशिष्ट परिस्थितीत कुणी मार्गदर्शन मागितल्यास हे फतवे काढण्यात येतात. सरसकट सर्व फतवे समाजास बंधनकारक असून, समाज त्याचे पालन करतो, हा एक गैरसमज आहे.

अशा प्रकारचे फतवे काढणाऱ्यांकडे परिस्थितीचे आकलन, गांभीर्य आणि त्याच्या परिणामांबद्दलची दृष्टी असतेच असे नाही. एखाद्या विषयाची सर्वांगीण माहिती घेऊन अभ्यासपूर्ण निर्णय देण्याऐवजी जे पुस्तकात आहे, तेच यांत्रिक व आंधळेपणाने व्यक्त केले जाते.

वेळोवेळी येणारे फतवे हे स्वयंप्रेरणेने काढून समाजावर लादण्यासाठी असतात, असा एक गैरसमज आहे. वास्तविक अनेक वेळा मुस्लीम समाजातील निरक्षर, गरीब, अज्ञानी व खेड्यातील

लोक विशिष्ट प्रकरणात मार्गदर्शनासाठी या केंद्राकडे जातात, तेव्हा जे मत व्यक्त करण्यात येते; तो फतवा असतो.

'दारूल उलूम'चे मुफ्ती (फतवा काढणारे अधिकारी) मुस्लीम समाजातील अग्रभागी असणारे धार्मिक नेते असतात. एखादा फतवा काढताना धार्मिक यांत्रिकतेऐवजी आजच्या काळाची गरज व इतर बुद्धिवंतांचे मत विचारात घेणे आणि कालसापेक्ष भूमिका घेऊन फतवे काढणे समाजहिताचे ठरते. उत्तर प्रदेशातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेणाऱ्या सर्व मुस्लीम महिलांनी बुरखा वापरल्याशिवाय बाहेर पडू नये आणि मतदारांना भेटताना पडदानशीन असावे, असा फतवा २००५मध्ये 'दारूल उलूम देवबंद'मार्फत काढण्यात आला होता.

आधुनिक जगात अनेक मुस्लीम स्त्रिया सार्वजनिक जीवनात उतरत आहेत. पाकिस्तान व बांगलादेश यांसारख्या मुस्लीम देशांतसुद्धा स्त्रिया पंतप्रधानपदापर्यंत पोचल्या आहेत. अशा बदलत्या परिस्थितीत एखाद्या धर्मसंस्थेने बुरखा वापरण्याचे फर्मान काढणे हास्यापद ठरते. इस्लाम हा परिपूर्ण धर्म आहे, त्यामुळे जे 'कुराणा'त आहे ते इस्लामिक आणि जे 'कुराणा'त नाही, ते इस्लामविरोधी, अशी भूमिका घेऊन जीवनाची आखणी करणे आजच्या काळात विसंगत व अशक्य आहे. परंतु मुस्लिमांच्या दैनंदिन व्यवहारात शिरलेल्या इस्लामेतर प्रथा समूळ नष्ट करणे, हे उद्दिष्ट आजच्या काळात तरी शक्य नाही. मात्र तसा प्रयत्न धर्मसंस्थेकडून करण्यात येतो. प्रेषितांनी घालून दिलेला मार्ग सोडून दिल्यामुळेच मुस्लिमांची दुर्दशा झाली आहे, अशी बतावणी करून गतवैभव प्राप्त करण्यासाठी इस्लामच्या विचारांशिवाय पर्याय नाही, असा दुराग्रह केला जातो.

छायाचित्र काढणे, आयुर्विमा उतरवणे आणि यांसारख्या गोष्टी धार्मिक चौकटीत बसत नसल्या, तरी त्या आजच्या सामाजिक व अर्थव्यवहारातील आवश्यक बाबी आहेत. परंतु समाजविकासाच्या नावाखाली कोणतेही बदल करण्यास देवबंदसारख्या संस्थांचा तीव्र विरोध असतो. माहिती तंत्रज्ञान, जागतिकीकरण, मानवी हक्क यांना प्राधान्य असणाऱ्या काळात घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा प्रयत्न करणे आणि विमानयुगात उंटांचा आग्रह धरणे व चाकोरीबद्ध जीवनाची आखणी करणे, हे प्रकार करताना आपला धार्मिक प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी असे फतवे स्वतःहून काढतात. वास्तविक 'फतवा' या शब्दाचा अर्थ सल्ला देणे असा आहे आणि तो कोणी मागितल्यावरच द्यायचा असतो. तरीही भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाही देशात फतव्यांद्वारे स्वतंत्र राज्य चालवण्याची मानसिकता एकूणच समाजाला कोणत्या दरीत ओढणार आहे, याचा विचार केला पाहिजे.

**लोकसंख्या : धर्माधारित विरोध नको!**

लोकसंख्या नियंत्रण हा मंडळाच्या दृष्टीने प्राधान्याचा विषय आहे. मंडळाने पहिल्या दशकापासून या दृष्टीने भूमिका घेतली आहे. परिणामी मुस्लीम लोकसंख्या वाढीचा दर कमी होत असल्याची निरीक्षणे वेळोवेळी नोंदवण्यात आली आहेत. असे असतानाही शत्रुभाव वाढवण्यासाठी आणि ध्रुवीकरणासाठी हा विषय घेऊन अपप्रचार करण्यात येतो. मुस्लीम समाजातील काही जमातवादी नेते या विषयावर धर्मवादी भूमिका घेऊन लोकसंख्या नियंत्रण कायद्यास विरोध

दर्शवतात. परिणामी मुस्लीमविरोधी अपप्रचाराला खतपाणी मिळते.

लोकसंख्या नियंत्रण हा एक जागतिक विषय आहे. चीनसारख्या काही मोजक्या देशांत लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रयोगांतून काही प्रश्न उपस्थित झाले खरे, मात्र बहुसंख्य अविकसित आणि विकसनशील देशांत लोकसंख्यावाढ ही देश आणि समाजाच्या मागासलेपणास कारणीभूत ठरत आहे. भारतात लोकसंख्या नियंत्रणासाठी राष्ट्रीय धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी झाली. अलीकडे जवळपास सर्व धर्मसमूहांना लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व पटले आहे. कुटुंबनियोजनाची विविध साधने वापरण्यात येत आहेत. तथापि धार्मिक आणि राजकीय नेते गेल्या काही वर्षांपासून लोकसंख्येचा विषय घेऊन धार्मिक ध्रुवीकरण वाढवत आहेत.

लोकसंख्याविषयक अपप्रचारावर आणि खोट्या माहिती आधारित अशा ध्रुवीकरणाचे एक उदाहरण म्हणजे, 'मुस्लिमांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणांत वाढत असून ते लवकरच देशात बहुसंख्य होतील' अशी अनाठायी भीती उभी करून हिंदूंनी अधिक अपत्यांना जन्माला घालावे, असा सल्ला देण्यात येतो (उदाहरणार्थ, २०१५ साली ज्योतिर्मठाचे शंकराचार्य वसुदेवानंद सरस्वती यांनी अलाहाबाद येथे जाहीरपणे 'हिंदूंनी दहा मुले जन्माला घालावीत' असा सल्ला दिला होता!). दुसरीकडे, 'लव्ह जिहाद'चे अतिरंजित चित्र उभे करून उत्तर प्रदेशात धर्मांतर विरोधी कायदाही आणला गेला.

वास्तविक 'राष्ट्रीय लोकसंख्या धोरण-२०००'ला अत्यल्प प्रतिसाद देणारे राज्य म्हणजे उत्तर प्रदेश. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात लागू झालेल्या या धोरणाने २०१०पर्यंत देशातील जननदर २. १पर्यंत आणण्याचे उद्दिष्ट ठेवले, पण उत्तर प्रदेशचा जननदर २०११मध्येही ३.१ होता आणि आता त्यात प्रगती होऊन तो २.६ झाला असला, तरी इराण (२.११५) किंवा बांगलादेश (१.९) या देशांपेक्षा उत्तर प्रदेश हे राज्य बरेच मागे आहे. या पार्श्वभूमीवर, उत्तर प्रदेशातील लोकसंख्या-नियंत्रणासाठी अलीकडेच जाहीर झालेले प्रस्तावित उपाय स्वागतार्ह ठरतात.

जागतिक 'लोकसंख्या दिना'चे औचित्य साधून उत्तर प्रदेश सरकारने राज्य विधि आयोगामार्फत 'उत्तर प्रदेश लोकसंख्या (नियंत्रण, स्थैर्य आणि कल्याण) विधेयक २०२१' तयार केले. यातील अनेक तरतुदी सरकारी पदे, तसेच लाभ यांसाठी पात्रता-अपात्रता ठरवण्यासाठी 'दोन वा त्याहून कमी मुले' अशी अट घालणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढवण्यास बंदी, तसेच सरकारी नोकरीसाठी अर्ज करण्यास अपात्र ठरणे.

याउलट, दोन अपत्यांचे पालन करणाऱ्यांना विविध सरकारी लाभ मिळतील, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष सवलती वा लाभ मिळतील. काही तरतुदी विकासात्मक आहेत. उदा., माध्यमिक शाळांमध्ये लोकसंख्या नियंत्रण विषय अनिवार्य, या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य लोकसंख्या निधीची स्थापना करण्यात येणार. मात्र या विधेयकास काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि विश्व हिंदू परिषदेने विविध कारणांनी विरोध दर्शवला आहे. विशेषतः समाजवादी पक्षाचे खासदार शफिकुर रहमान बर्क यांनी आगीत तेल ओतणारी विधाने केली आहेत.

'युद्ध झाल्यास मनुष्यबळ कुठून आणायचे?' आणि 'पृथ्वीवर किती जीव जन्माला घालायचे

हे अल्लाह ठरवतो' अशी हास्यास्पद विधाने शफीकुर रहमान बर्क यांनी केली आहेत. आपण कोणत्या काळात आणि कोणत्या देशात राहतो, याचे भान नसलेले नेते समाजप्रतिनिधी म्हणून संसदेत आहेत, हीच या समाजाची शोकांतिका आहे. लोकसंख्या नियंत्रणाबाबतीत लोकशिक्षण करण्याऐवजी विसंगत वक्तव्य करून बर्क समाजाची दिशाभूल करून हिंदुत्ववाद्यांच्या हातात पुन्हा कोलीत देत आहेत.

जगातील जवळपास सर्व मुस्लीम राष्ट्रांतसुद्धा समाज आणि देशहित विचारात घेऊन लोकसंख्या नियंत्रणाची धोरणे आखली जात आहेत. लोकसंख्या नियंत्रणाची साधने वापरण्याचे प्रमाण वाढत आहे. तालिबानसारख्या मूलतत्त्ववादी संघटनांचा प्रभाव असणाऱ्या अफगाणिस्तानातसुद्धा अनेक उलेमा, मौलवी आणि धार्मिक नेत्यांनी कुटुंबनियोजनाच्या बाजूने प्रचार-प्रसार करून यासंदर्भात लोकशिक्षण केल्याचे दाखले आहेत. इंडोनेशिया, बांगलादेश यांसारख्या देशांनीही लोकसंख्या नियंत्रणास प्रोत्साहन दिले आणि त्याचे तेथील मुस्लिमांनी स्वागत केले आहे. या जगापेक्षा बर्क यांचा इस्लाम आणि 'कुराण'काही वेगळे आहे का?

राजकीय हेतूने प्रेरित होऊन तर्कविसंगत वक्तव्ये करायची आणि घड्याळाचे काटे उलट्या दिशेने फिरवणारी, ही भूमिका विविध अनर्थ घडवणारी ठरू शकते. भारतात लोकसंख्या नियंत्रणाचा विषय घेऊन अशास्त्रीय वा तथ्यहीन मांडणी करून धार्मिक ध्रुवीकरण होत असताना बर्क यांच्यासारख्या संसद सदस्याने असे वक्तव्य करणे अधिकच निषेधार्ह आहे. मुस्लीम समाजाच्या विकासाचे अनेक मुद्दे असताना त्याला बगल देत मुस्लीम नेते विक्षिप्त वक्तव्य करून समाजाला अडचणीत आणत आहेत. अज्ञानी लोकांचे अज्ञान दूर करण्याऐवजी धर्माच्या नावाने राष्ट्रीय कार्यक्रमांना खो घालण्याचा प्रयत्न करत आहेत.

विज्ञानयुगात निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मध्ययुगातील शिकवणुकीत सापडणार नाहीत. भारतीय मुस्लीम कुटुंबनियोजनाची विविध साधने वापरत आहेत, मुस्लिमांचा जन्मदर घटत आहे, हे वास्तव गेल्या सात दशकांतील जनगणना, विविध अभ्यास आणि अहवालातून पुढे आले आहे. भारताचे माजी प्रमुख निवडणूक आयुक्त डॉ. एस. वाय. कुरेशी यांनी 'पॉप्युलेशन मिथ इस्लाम, फॅमिली प्लानिंग ॲण्ड इंडियन पॉलिटिक्स' या पुस्तकात भारतातील लोकसंख्या नियंत्रणाच्या सद्यःस्थितीवर प्रकाश टाकला आहे. एका अर्थाने धर्मवाद्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे हे पुस्तक आहे.

देश आणि समाजहित लक्षात घेऊन जर कायदे करण्यात येत असतील, तर त्याचे स्वागत केले पाहिजे. समाज बदलाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी 'दंडशक्ती आणि प्रलोभन' ही युक्ती उपयोगी ठरते. लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने, सरकारी लाभ घेण्यासाठी पाल्यांच्या संख्येवरून पात्र किंवा अपात्र याचे निकष महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी काही बाबतीत वापरलेले आहेत. त्याच्या प्रमाणाबाबत वाद होऊ शकतो, पण कायद्याच्या उद्दिष्टांबाबत नाही. अशा कायद्याचे सर्व धर्मसमूहांनी समर्थन केले पाहिजे. विरोधासाठी विरोध करणे, हे स्वतःच्या पायांवर कुऱ्हाड पाडून घेण्यासारखे आहे. प्रस्तावित 'लोकसंख्या नियंत्रण विधेयक' असो किंवा 'समान नागरी कायदा' असो, हे समाज आणि देशहिताचे असल्याने त्याबद्दल समाजाने सकारात्मकता बाळगली पाहिजे.

'कुटुंबनियोजनापेक्षा उत्पादन वाढवा' किंवा 'साधनापेक्षा संयम बाळगा' हा मतप्रवाह मूळ प्रश्नाला बगल देणारा ठरू शकतो. दारिद्र्य हे जसे लोकसंख्यावाढीस कारणीभूत आहे, तसेच लोकसंख्या वाढ ही दारिद्र्य टिकवण्यास कारणीभूत आहे. हे दुष्टचक्र भेदण्यासाठी जनजागृती आणि कायदा, ही दोन्ही हत्यारे अटळ आहेत. मात्र अशा साधनांचा वापर न्यायबुद्धीने केला पाहिजे. नवे कायदे अन्याय्य ठरणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. शिक्षण आणि नोकरी असणारे तसे श्रीमंत असतात, त्यांची अपत्ये कमी असतात. शासकीय सवलती- सुविधा मिळाल्यामुळे ते अधिक श्रीमंत होतील. अशिक्षित, गरिबांना अपत्ये जास्त असतात, त्यांच्या सुविधा काढून घेतल्यामुळे ते पुन्हा गरीब होणार.

समाजातील दुर्बलांना शिक्षा आणि सशक्तांनाच शक्ती मिळवून देण्यासाठी कायद्याचा वापर काय कामाचा? यातून करुणाभावाने मार्ग काढायला हवा. अन्यथा सूडभावाने पेटलेले याचा दुरुपयोग करू शकतात.

कायद्याच्या उद्दिष्टांना हरताळ फासला जातो, म्हणून कायदेच नकोत, असेही म्हणणे अयोग्य. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात 'लोकसंख्या नियंत्रण कायदा' आधीपासूनच अस्तित्वात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील उमेदवारीसाठी दोन अपत्यांची अट आहे, तसेच बारावीपर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत असले, तरी मुलगी हे तिसरे अपत्य असल्यास तिला ही सवलत मिळत नाही. राजकीय लाभ घेण्यासाठी राजकारणी मंडळींना पळवाटा माहीत असतात, हे महाराष्ट्रातही दिसते. उत्तर प्रदेशाबद्दल अशा शंका काढताना 'येत्या काळातील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे विधेयक आणले जात आहे,' असे म्हटले जाते. या दाव्यात सत्यता असली, तरी हे कोणत्याही पक्षांसाठी नवे नाही. समाज आणि देशहित साध्य करणारे हे विधेयक असल्याने केवळ विरोधासाठी विरोध न करता ते अधिक चांगले होण्यासाठी व्यवहार्य सूचना कराव्यात, हे उत्तम!

**मुस्लीम प्रबोधन**

मुस्लीम समाजाअंतर्गत काही घटना सातत्याने घडत असतात. त्यातून निर्माण होत असलेल्या क्रिया-प्रतिक्रिया बऱ्याच बोलक्या आणि समाजाला अंतर्मुख होऊन विचार करण्यास भाग पाडणाऱ्या असतात. या घटनांकडे मुस्लीम समाजाने अधिक डोळसपणे पाहण्याची गरज आहे. या समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांनी जबाबदारी लक्षात घेऊन समाजाला आधुनिकतेकडे नेले पाहिजे. केवळ भारतीयच नव्हे, तर जागतिक संदर्भातही मुस्लीम समाज एका निर्णायक संक्रमणावस्थेतून वाटचाल करत आहे.

मध्यंतरी फ्रान्समध्ये प्रेषित मोहंमद पैगंबर यांचे व्यंग्यचित्र काढून इस्लामची शिकवण ही हिंसावादी व दहशतवादी असल्याचे दाखवून जाणीवपूर्वक मुस्लीम समाजाला उत्तेजित करण्याचा प्रयत्न झाला. परिणामी, मुस्लीम समाजातून जागतिक पातळीवर अतिशय उग्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटल्या व हिंसक घटनाही घडल्या. भारतातील काही प्रमुख शहरांमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात निषेध, निदर्शने व प्रक्षोभक वक्तव्ये करण्यात आली. या व्यंग्यचित्रामुळे मुस्लीम समाजाच्या भावना दुखावणे स्वाभाविक होते. हे व्यंग्यचित्र काढणारे व ते प्रसिद्ध करणाऱ्या

वर्तमानपत्राचा मूळ उद्देश केवळ अभिव्यक्तीस्वातंत्र्यापुरता मर्यादित स्वरूपाचा नव्हता, तर मुस्लीम समाजाची नकारात्मक प्रतिमा दृढ करण्याचा होता.

भारतातील ज्येष्ठ चित्रकार एम. एफ. हुसेन यांनी आक्षेपार्ह चित्रे काढून भारतीय समाजाच्या व प्रामुख्याने हिंदू बांधवांच्या भावना दुखावल्या. याचा निषेध मात्र मुस्लीम समाजाकडून करण्यात आला नाही. हे धार्मिक मूलतत्त्ववादाच्या मूळ प्रेरणेशी सुसंगत असेच आहे. धर्मनिरपेक्ष व इतर धर्मीयांच्या भावनांचा आदर करणाऱ्या एखाद्या मुस्लीम व्यक्तीने किंवा संघटनेने एम. एफ. हुसेन यांचा निषेध करून त्यांच्याविरुद्ध धार्मिक भावना दुखावून, सामाजिक तणाव निर्माण केल्याबद्दल गुन्हा दाखल करणारी जनहितार्थ याचिका दाखल केली असती, तर ती एक प्रतीकात्मक स्वरूपात धार्मिक सद्भावना व्यक्त करणारी कृती ठरली असती.

मध्यंतरी मुस्लीम उलेमांकडून वेगवेगळ्या स्वरूपाचे वादग्रस्त फतवे काढण्यात आले. धर्मनिरपेक्ष लोकशाही मानणाऱ्या समाजात अशा फतव्यांची आवश्यकता नाही. त्यामुळे निकोप सामाजिक संबंध जोपासण्याच्या प्रक्रियेला तडे जाण्याची शक्यता असते आणि समाजात तणाव निर्माण होऊ शकतात.

अखिल भारतीय मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाने असे स्पष्ट केले होते की, धर्मगुरूंचा फतवा हे केवळ त्यांचे व्यक्तिगत मत असते. त्यातील आदेश बंधनकारक नसतात. फतवे काढणारे 'दार-उल-कझा' (फतवा काढणारे केंद्र) हे न्यायालयांना समांतर नाहीत. फतवे, शरीयत अदालत, मदरसा यांसारख्या गोष्टींचा आग्रह धरणे, हे धर्मनिरपेक्ष लोकशाही मानणाऱ्या समाजाशी विसंगत आहे. याव्यतिरिक्त असे फतवे मुस्लीम समाजाच्या मूळ प्रश्नांना बगल देऊन त्यांच्या आधुनिक समाजसापेक्ष विकासास हानी पोहोचवतात.

मुस्लीम समाजाच्या विकासासाठी शैक्षणिक व आर्थिक विकास अतिशय आवश्यक आहे, हे विचारात घेऊन काही धोरणात्मक व नियोजनबद्ध कृती आराखडा आखून त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. मुस्लीम समाजाचे प्रश्न स्वतंत्र पक्ष काढून किंवा सत्तेत वाटा मागून सुटणार नाहीत.

मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासाबरोबरच समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथा आणि सध्या अस्तित्वात असणाऱ्या कालबाह्य पद्धती, तसेच विषमतेवर आधारित अन्यायकारक कायद्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजातील नेतृत्वाने पुढाकार घेणे तेवढेच गरजेचे आहे. पाकिस्तान, इंडोनेशिया, इराण या देशांमध्ये महिलांना न्याय देणारे व कुटुंबनियोजनास प्रोत्साहन देणारे कायदे होत असतील, तर ते भारतासारख्या धर्मनिरपेक्ष, लोकशाही देशात का होऊ नयेत?

अलीकडच्या काळात मुस्लीम समाजातही धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व्यक्ती व संघटना कार्यरत होत आहेत. महिलांमध्ये आपल्या हक्कांबद्दलची जाणीव-जागृती होत आहे. कला, क्रीडा व साहित्य या क्षेत्रांतही मुस्लीम तरुण-तरुणी आपला ठसा निर्माण करत आहेत. त्यांचे कौतुकही होत आहे. गरज आहे ती फक्त मुस्लीम समाजाने आधुनिक काळाच्या गरजा ओळखून आत्मसुधारणा करण्याची.

**पसमांदा मुस्लीम**

हमीदभाई मुस्लीम समाजप्रबोधनाचा विचार मांडत असताना भारतातील विविध भागांत जाऊन, प्रत्यक्ष संवाद करून मुस्लिमांच्या विविधांगी समस्यांचा वेध घेत. त्यांची मुस्लीम महिलांच्या प्रश्नांबरोबरच पसमांदा मुस्लिमांच्या समस्यांवर काम करण्याचीदेखील इच्छा होती. मात्र त्या काळात महाराष्ट्रात पसमांदा प्रश्नाची तीव्रता उत्तर प्रदेश, बिहार राज्यांतील पसमांदांसारखी नसल्याने हा विषय मागे पडला.

अलीकडे अधिकाधिक प्रचलित झालेला 'पसमांदा' हा शब्द मुस्लीम समाजातील मागास जातींसाठी आहे, असा एक गैरसमज रूढ होत आहे. वास्तविक पसमांदा ही संकल्पना जातीवाचक नसून सर्व धर्मसमूहांतील मागासजातींसाठी वापरण्यात येणारी सर्वसमावेशक संकल्पना आहे. यात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख अशा विविध धर्मातील जातींचा समावेश होतो. त्यामुळे पसमांदा ही संकल्पना सर्व धर्मातील दलित, मागास आणि वंचित समूहांसाठी असून ती जातीवाचक नसून वर्गवाचक आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल.

पसमांदांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे, हे केवळ विशिष्ट जमातीचे विकास करणे नसून, भारताच्या वैविध्यपूर्ण समाजात सामावलेल्या क्षमतांना मान्यता आणि वाव देण्यासारखे आहे. अशा दुर्लक्षित घटकांच्या सशक्तीकरणामुळे भारत हा अधिक सर्वसमावेशक आणि समतावादी राष्ट्र बनेल. यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. शासन, सामाजिक संघटना आणि मुस्लीम समाज यांच्या सामुदायिक प्रयत्नातून पसमांदांच्या प्रगतीचा मार्ग मिळणार आहे. पसमांदांच्या समस्या लक्षात घेणे, त्याच्यावर धोरणात्मक आणि निर्णायक काम करणे, हे केवळ आपले नैतिक कर्तव्य नसून आपला देश अधिक बलवान करण्यासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

हमीदभाईंच्या निधनानंतर एका कार्यक्रमात त्यांचे स्नेही आणि समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांनी म्हटले होते की, हमीदभाई हयात असते, तर पसमांदा मुस्लिमांच्या प्रश्नांवर त्यांनी निश्चितपणे राष्ट्रीय पातळीवर काम उभे केले असते. त्यांच्या या वक्तव्यानंतर मंडळातील प्रमुख कार्यकर्त्यांना हा विषय समजून घेऊन तो मंडळाच्या प्राधान्याच्या विषयात घेण्याची प्रेरणा निर्माण झाली. त्यानुसार पटना (बिहार) येथील पसमांदा आंदोलनाचे नेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि राज्यसभेचे माजी खासदार अली अन्वर अन्सारी यांच्यासोबत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी संवाद करून या प्रश्नाची तीव्रता समजून घेतली. मुस्लीम समाजातील जातीव्यवस्था तसेच पसमांदांच्या समस्या समजून घेऊन या विषयावर काम करण्याचे मंडळाने ठरवले आहे. त्यासाठी मंडळाने राष्ट्रीय पातळीवरील पसमांदा मुस्लीम कार्यकर्त्यांसोबत समन्वय साधला आहे. धर्मनिरपेक्ष एकात्मसमाज निर्माण करण्याच्या प्रयत्नात मुस्लीम समाजातील जातीव्यवस्था आणि पसमांदा मुस्लिमांच्या समस्या गांभीर्याने समजून घेणे मंडळास आवश्यक वाटते.

श्रेणीबद्ध विषमता, शोषण, अन्याय आणि विविध क्षेत्रांतील दुय्यमत्व हे भारतातील जातीव्यवस्थेचे वैशिष्ट्ये राहिले आहे. याच कारणांसाठी भारतात अनेक संत व सुधारकांनी जातीनिर्मूलनाचा विचार मांडला. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने विषमता, शोषण, अन्याय निर्मूलनाच्या मूल्यांचा पुरस्कार केला आणि भारतीय समाजाला समता, समान संधी, समान न्याय आणि समान संरक्षण बहाल केले.

भारतीय उपखंडातील मुस्लिमांचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. भारतातील बहुसंख्य मुस्लीम

येथील स्थानिक विविध जाती-समूहांतून धर्मांतरित झालेले आहेत. त्यांना कनिष्ठ दर्जा देण्यात आला आहे. उर्वरित तथाकथित उच्च मुस्लीम समूहांचे मूळ मध्य आशियात असल्याचे सांगितले जाते. ते काही शतकांपूर्वी भारतात आले आणि येथील भारतीय उपखंडाशी एकरूप झाले. विविध कारणांमुळे भारतातील स्थानिक जातीसमूह इस्लाममध्ये धर्मांतरित झाले असले आणि त्यांनी नवी धार्मिक श्रद्धा, पूजाअर्चा, व्यवस्था स्वीकारली असली, तरी त्यांना त्यांच्या पूर्वीच्या जाती बदलणे शक्य झाले नाही. धर्मांतरामुळे त्यांचा पारंपरिक धंदा किंवा व्यवसाय बदलला नाही किंवा त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीतदेखील फारसा फरक पडला नाही. त्यांच्या भवतालच्या लोकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला नाही. तसेच धर्मांतरितांच्या सामाजिक स्थानात वा दर्जात फरक पडला नाही. ज्यांनी इस्लाम स्वीकारला त्यांचे फक्त धर्मग्रंथ, देव आणि उपासना पद्धती बदलली. यामुळे काही प्रमाणात मानसिक समाधान मिळाले असले, तरी धर्मांतरामुळे किंवा धर्मग्रंथामुळे त्यांच्या रंगात किंवा दिसण्यात काही फरक पडला नाही. तसेच त्यांचे जातीआधारित व्यवसाय, कौशल्य, वारसा आणि सामाजिक संबंधातही फारसा फरक पडला नाही.

हिंदू समाजाप्रमाणे मुस्लीम समाजात जातीयता नाही. मुस्लीम समाज एकजिनसी आहे. काही नेते इस्लामला जातीयता मान्य नाही, असे प्रतिपादन करत असतात, परंतु वस्तुस्थिती तशी नाही. भारतीय मुसलमानांत भरपूर जाती आहेत. मुस्लीम समाजातील जातीयतेने हिंदू समाजातील जातीयतेप्रमाणेच स्वतःचे अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. इस्लाममध्ये समानता, बंधुभाव आहे, हे सैद्धान्तिकदृष्ट्या सत्य असले, तरी धर्मांतर करताना आपली जात, व्यवसाय कायम ठेवला. जातीव्यवस्थेविरुद्धचा लढा हा केवळ हिंदू समाजापुरता मर्यादित नसून, तो सर्वच धर्मातील लढा आहे.

भारतातील मुस्लीम समाज ९५ टक्के मूळ निवासी आहे. इस्लामच्या आगमनानंतर मुस्लीम भारतातील शासक वर्ग झाला. त्यांच्याकडून जमीन, वतने, प्रतिष्ठा आणि सत्ता मिळावी म्हणून येथील उच्चवर्णियांनी इस्लामचा स्वीकार केला. आजही कुलकर्णी, देशमुख, दळवी, देशपांडे ही आडनावे मुस्लीम समाजात आहेत. त्यांची आर्थिक स्थिती इतरांपेक्षा चांगली आहे. दुसरा प्रकार, इस्लामच्या धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून प्रलोभन देऊन, जबरदस्ती करून इस्लाममध्ये धर्मांतरे करण्यात आली. तिसरा प्रकार, जो बहुसंख्य मुस्लिमांचा आहे, तो म्हणजे येथील दलित, अस्पृश्य, भटके आणि तळागाळातील समाजाने अन्यायातून मुक्तता व्हावी, न्याय मिळावा या अपेक्षेने इस्लाम स्वीकारला. चौथा प्रकार म्हणजे श्रद्धा, विचार, स्वातंत्र्य, सोय या कारणांतून धर्मांतरे झाली. अशा प्रकारे भारतातील मुस्लीम समाज मोघल, रोहिला, अफगाण वगळता भारतीय वंशातीलच आहे.

मुस्लीम समाजात प्रामुख्याने शिया-सुन्नी हे दोन प्रमुख विचारधारा आहेत. सुन्नीमध्ये पुन्हा हनफी, हंबली, शाफई आणि मालिकी असे उपपंथ आहेत. मुस्लीम समाजाची वर्गरचना विचारात घेतली, तर त्यामध्ये प्रामुख्याने तीन वर्ग आहेत-

१) अशरफ (उच्चवर्गीय, श्रीमंत, खानदानी, राजकारण यांत अग्रेसर असणारे) - यांची संख्या कमी आहे, परंतु त्यांचा प्रभाव बहुसंख्य मुस्लिमांवर आहे. यांनी सर्वसामान्य मुस्लीम

समाजाला आपल्या पद्धतीने वागवण्याचा, वाकवण्याचा आणि दिशा देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानमध्ये जाणाऱ्यांत यांचे प्रमाण जास्त होते. आजही आर्थिक राजकीय, सामाजिक, प्रतिष्ठा लाभलेला हा गट आहे.

२) अजलफ (मध्यम-कनिष्ठ मध्यमवर्गीय) - सर्वसामान्यपणे यांचा समावेश इतर मागासवर्गीयांत, बारा बलुतेदार यांच्यात होतो.

३) अरझल (अतिशय तळागाळातील समाज) - यांची स्थिती एस टी., एस. सी. यांच्यापेक्षाही वाईट असल्याचा निष्कर्ष सच्चर समितीच्या अहवालात नोंदवला आहे. शिकलगार, मेहत्तर, दरवेशी, छप्परबंद अशा जातीजमातींचा या गटांत समावेश होतो. मुस्लिमांमध्ये काही प्रमाणात जातीची उतरंड दिसते, मात्र स्पृश्य-अस्पृश्यता दिसत नाही.

भारतीय मुसलमानांची जातीयता अभ्यासताना जाणवणारी प्रमुख बाब म्हणजे प्रत्येक राज्य किंवा विभागातील जातीय स्थिती एकसारखी नाही. केरळमधील जातव्यवस्था व्यवसायावर आधारित नाही. तेथे मुस्लीम समाज 'थंगल' व 'मोपला' या दोन गटांत विभागला आहे. 'थंगल' स्वतःला अरबवंशीय मानतात. त्यांनी विवाहसंबंध स्वतःच्या वंशातच ठेवले आहेत. 'मोपला' समाज 'थंगल' समाजाचा आदर करतात व त्यांना पैगंबराचे वंशज मानतात. थंगल समाजसुद्धा इतरांशी प्रेमाने, सलोख्याने राहतो. इतरांना कमी शूद्र मानत नाहीत. फक्त वंशशुद्धतेबद्दल त्यांचा आग्रह आहे व मोपला हे मान्य करतात.

'मोपला'चा शब्दशः अर्थ 'घरजावई' असा आहे. हा शब्द सर्वप्रथम अरबी मुसलमांनासाठी वापरला गेला, जे स्थानिक स्त्रियांशी विवाह करून येथेच स्थायिक झाले. मोपलांमध्ये अनेक व्यवसाय आहेत. त्यांच्यात आपसात विवाह होतात. नवीन धर्मांतरित मुस्लिमांना 'मोपला म्हणजेच घरजावई' बनवले जाते व त्यांच्यात भेदाभेद केला जात नाही. तो कोणत्याही जाती-धर्मातील असला, तरी धर्मांतरानंतर समानतेने वागवले जाते.

तामिळनाडूमध्ये स्थानिक मुसलमानांना 'राऊत' म्हणतात. त्यांच्यात व्यावसायिक जाती किंवा भेदाभेद नाहीत. येथे उर्दू भाषिक म्हैसुरी पठाण आहेत. ते राऊतांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करत नाही. स्वतःला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजतात.

आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्रात व्यावसायिक जाती आहेत. ते स्वतःच्या जातीबाहेर विवाहास नकार देतात.

उत्तर भारतात मात्र 'अशरफ', 'अजलफ' हे गट दिसतात. तेथील उलेमा या गटाला धार्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न करतात. उत्तर प्रदेशात 'अशरफ'साठी 'गाडे' किंवा 'गवडे', तर अजलफसाठी 'तेली' हा शब्द वापरतात. 'गाडे' या गटात सय्यद, शेख, पठाण, मूगल तसेच धर्मांतरित ब्राह्मण, राजपूत, ठाकूर या जातींचा समावेश होतो आणि 'तेली'मध्ये सर्व व्यावसायिक जाती व धर्मांतरित मागासवर्गीय दलितांचा समावेश होतो. या दोन गटांत मोठ्या प्रमाणात तेढ किंवा दुरावा आहे. या गटांचे मदरसे स्वतंत्र आहेत.

अशा प्रकारे भारतीय मुस्लिमांमध्ये विविधता दिसून येते. वास्तविक, कोणत्याही स्वरूपाचे भेद, विषमता, वर्ग किंवा जातीयता पाळणे, इस्लामच्या मूलभूत शिकवणुकीशी विसंगत आहे. 'कुराणा'त एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'प्रत्येक शतकात एखादी व्यक्ती जन्माला येईल,

जी व्यक्ती मुस्लीम समाजात ज्या अनिष्ट प्रथा, परंपरा रुजतील त्या सुधारण्याचा प्रयत्न करील.' या सुधारकास 'मुजद्‌दीद' म्हणतात. मुहम्मद पैगंबरांनीही 'ईमाम मेहदी' या सुधारकाच्या येण्याच्या संदर्भात भविष्यवाणी केली होती, असे सांगण्यात येते.

त्यानुसार गेल्या शतकात हजरत मिर्जा गुलाम अहमद कादीया यांनी आपण ईमाम मेहदी असल्याची घोषणा करून एका पंथाची स्थापना केली. त्यास 'जमात-ए-अहमदीय' म्हणतात. या जमातीमध्ये कोणत्याही प्रकारची जातीयता नाही. सर्व पातळीवर समानता आहे. बेटी व्यवहार करताना वंश, जात, व्यवसाय यांची अजिबात चौकशी केली जात नाही. असे असले तरी, भारतातील सर्व भागांतील मुसलमानांनी त्याची दखल घेतली नाही. उलट त्याची टर उडवून त्रास देण्याचा प्रयत्न केला. आता हा समाज प्रवाहापासून एकटा पडला आहे. म्हणजेच वेगळ्या अर्थाने एका नव्या वर्गाची भरच पडली आहे.

याशिवाय आणखी एक सत्य समोर येते, ते म्हणजे भारतीय उपखंडात जी स्थिती आहे, ती इतर ठिकाणी दिसत नाही. याचा अर्थ मुस्लीम जातीयता ही अनेकार्थाने हिंदू जातीयव्यवस्थेची प्रतिकृती आहे. इतर इस्लामी देशांत माणसाच्या स्वकर्तृत्वाला मर्यादा घालणारी किंवा गिळंकृत करणारी जातीयता दिसत नाही. वेगवेगळे वंश असले, तरी भारतासारखी जातीव्यवस्था, उच्च-नीचता इतरत्र दिसत नाही.

मुस्लीम समाजात शेख हे आडनाव मोठ्या प्रमाणात दिसून येते, याची अनेक कारणे आहेत. 'शेख' या नावावरच उच्चवर्णियता स्पष्ट होत असली, तरी हे आडनाव मुस्लीम समाजातील बहुजन जातींनी स्वीकारल्यामुळे विशिष्ट जातीचा बोध होत नाही. अरबांमध्ये 'शेख' अनेक असतात. त्यांच्यापासून भारतीय स्त्रियांना झालेल्या मुलांनी शेख आडनाव म्हणून स्वीकारले. त्याचबरोबर आपली हिंदू समाजातील शूद्र समजली जाणारी जात ज्यांना लपवाविशी वाटली, त्यांनीही शेख आडनाव स्वीकारले. ज्या उच्चवर्गीयांनी इस्लाम स्वीकारला, त्यांनी आपली मूळ आडनावे कायम ठेवून उपनाम म्हणून किंवा इस्लामी आडनाव म्हणून 'शेख' हे आडनाव स्वीकारले.

या सर्व कारणांमुळे शेख आडनावावरून विशिष्ट व्यवसाय, वर्ग किंवा पूर्वीच्या जातीचा बोध होत नाही. त्यामुळे धर्मांतरित झालेल्या अनेकांना मूळ जात लपवता आली व उच्च जातीचा दर्जा मिळवता आला. अशा प्रकारे धर्मांतरितांमध्ये इस्लामी आडनावे घेऊन उच्च दर्जा प्राप्त करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. ज्यांनी जात, व्यवसाय आणि आडनावे सोबत ठेवली, ते जातीयवादाच्या रचनेचे बळी पडले, असे दिसते. त्यांना समानता, बंधुभाव, प्रतिष्ठा मिळाली नाही. अनेकांना विषमतेचे चटके सहन करत जगावे लागले, आजही लागत आहेत्.

मुस्लीम समाजातील जातीसंस्था, खानदान बऱ्याच वेळा आकलनाबाहेर दिसते. परंतु मंडल आयोगाचे फायदे, विविध शासकीय सवलती मिळवण्यासाठी मुस्लीम समाजातले अनेक जण आम्ही मागासजातीतील आहोत, हे दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. तसेच काही लोक तथाकथित उच्चजातीय प्रतिष्ठा मिळवण्यासाठी आपले आडनाव बदलून घेत असल्याचे दिसून येते. मुलाणी समाजातील अनेकांनी 'मुलाणी' हे आडनाव बदलून 'मुल्ला' हे आडनाव घेतले व आपण उच्च दर्जाचे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न केला; तसेच काही मुलाणी आडनाव असलेल्या लोकांनी मुलाणी जमात (संघटना) उभारून मागासवर्गीय दर्जा मिळवण्याचा प्रयत्न

केला आहे. याचप्रमाणे तांबोळी जातीतील अनेकांनी प्रतिष्ठेसाठी 'शेख' हे आडनाव घेतले, परंतु तांबोळी जात इतर मागासवर्गीयांत मोडते. त्यामुळे आडनाव बदललेले 'शेख' आम्ही 'तांबोळी'च आहोत, असे दाखले देऊन सवलतीदेखील घेतात. या समाजात शेख, सय्यद अशी अनेक आडनावे असतात आणि कागदोपत्री मात्र ते जुलाह, छप्परबंद, मदारी असतात. स्वार्थप्रेरित जातीसंस्था मुस्लीम समाजात आज दिसून येत आहे. मूळ इस्लाममध्ये जातिव्यवस्थेला स्थान नसताना आपण जातिव्यवस्था अधिक पीळदार बनवत आहोत, याचे भानही या समाजाला राहिलेले नाही.

मुस्लिमांमधील मणियार, तांबोळी, अत्तार, शिकलगार या चार जाती आपापल्या जातीत विवाह संबंध जोडण्याचा, बेटी व्यवहार करण्याचा प्रयत्न करतात. मणियार आपली मुलगी खाटिक किंवा बागवान जातीत देऊ इच्छित नाहीत. परंतु उच्च जातीतील एखादी मुलगी डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक असेल, तर खालच्या जातीतील समान नोकरी, दर्जा असणाऱ्या मुलाशी विवाहसंबंध जोडतात. शहरी भागात अलीकडे असे विवाह होतात, परंतु ग्रामीण भागात मात्र जातीव्यवस्था अधिक रुजलेली आहे.

हिंदू समाजाप्रमाणेच सवर्ण समजला जाणारा, इतर मागासवर्गीयांत मोडणारा व भटक्या समूहाचा समजला जाणारा, भिक्षा मागणारा 'फकीर' ही एक जमात आहे. मुस्लिमांमध्ये साप, प्राणी यांचे खेळ दाखवणारा जसा 'मदारी' समाज आहे, तसाच अस्वल घेऊन फिरणारा 'दरवेशी' आहे. या समाजाचा महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्त जमातीत समावेश केला आहे. त्यात जवळपास साठ ते पासष्ट जमातींचा समावेश आहे. यांना कोणत्याही जमातींच्या मशिदीमध्ये प्रवेश नाकारला जात नसला, तरी त्यांनी आपापल्या स्वतंत्र मशिदी बांधल्या आहेत. त्यांचे सण, लग्न- मृत्यू विधी, बोलीभाषा, जातपंचायती वेगवेगळ्या आहेत.

हिंदू आणि मुस्लीम समाजातील समान व्यवसाय करणाऱ्या जातींची आडनावे वेगळी आहेत. जसे, हिंदू-मुस्लिमांतील माळी-बागवान, न्हावी-हजाम, लोहार-मिस्त्री, खाटिक-कसाई (कसाब), विणकर-जुलाह (मोमीन), माकडवाला-बंदरवाला, कासार-अत्तार, गारूडी-मदारी, भंगी-मेहत्तर, परीट-धोबी, चर्मकार-मोची, पिंजारी-नदाफ, अशा प्रकारे जातीवाचक आडनावे वेगळी असली तरी त्यांचे व्यवसाय सारखे आहेत.

फकीर, मदारी, अस्वलवाले, साप गारूडी यांसारख्या खालच्या समजल्या जाणाऱ्या जाती आपले परंपरेने चालत आलेले व्यवसाय करत राहिले. जागतिकीकरण, पर्यावरण, प्राणीविषयक कायदे, बदल, अर्थव्यवस्था, यांमुळे हे व्यवसाय टिकून राहणे व अर्थार्जनाचे साधन म्हणून त्याकडे पाहणे आता शक्य नाही. शिक्षणाअभावी त्यांना नोकऱ्याही मिळत नाहीत. जिथे जीवन-मरणाचा प्रश्न आहे, तेथे शिक्षण त्यांच्या कल्पनेपलीकडचे आहे. मेहत्तर समाज सफाई कामगार, संडास वाहून नेणे, साफ करणे, ही कामे करणारा, म्हणून त्यांच्या वाट्याला खालचा दर्जा आला. वर्षानुवर्षे अशा प्रकारचे जीवन जगण्यापेक्षा व्यवसाय बदलून शिक्षण घेणे, तसेच शासकीय सुविधांचा लाभ घेणे, यासाठीची मानसिकता तयार करावी लागणार आहे.

मुस्लीम समाजातील नेतृत्वाने जातिव्यवस्थेमुळे कोणते नुकसान झाले? काय वाट्याला आले? यासंदर्भात लोकशिक्षणसुद्धा केले पाहिजे. स्वातंत्र्याची सात दशके होऊन गेल्यानंतरसुद्धा अप्रगत, आदिवासी स्वरूपाचे जीवन जगणारे समाजघटक आहेत. त्यांना स्वातंत्र्याचा लाभ झाला

नाही, मुख्य प्रवाहात येता आले नाही आणि दारिद्र्य, गरिबी यातूनही सुटका करून घेता आली नाही. तसा कोणी वाली त्यांना भेटला नाही किंवा विकासाची संधी दिली नाही. उलट जातव्यवसाय टिकवून धरण्याची वेळ त्यांच्यावर लादण्यात आली, ही खरी शोकांतिका आहे.

वरच्या जातींना खालच्या जातींची स्थिती सुधारावी, यासाठी लागणारी दृष्टी किंवा सहानुभूती नाही. राजकीय लोक या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असतात. मुस्लीम समाजातील विचारवंतांनी, परिवर्तनवाद्यांनी खरे तर त्यांच्यात जागृती निर्माण करून परिस्थितीत बदल घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ इस्लामला जाती मान्य नाहीत म्हणून जातिअंताचा विचार करणे चुकीचे ठरेल. त्यापेक्षा या मागासजातींना न्याय, समता, बंधुता आणि प्रतिष्ठा, मिळवून देऊन त्यांच्यावरील अन्याय दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे.

मुस्लीम समाजात आधुनिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत असताना काही सुधारणा होणे हे स्वाभाविक आहे. तथापि, या प्रक्रियेचा वेग फारच कमी आहे. शिक्षणामुळे नोकरी व्यवसायात बदल होतो, अर्थार्जनामुळे विवाहसंबंध जोडताना जातीपातीचा विचार केला जात नाही. त्यामुळे आंतरजातीय विवाह होत आहेत. मुस्लीम समाजात तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, बुरखा, पुरुषप्रधानता, या अन्यायकारक प्रथांमुळे स्त्रियांची स्थिती 'चुलाह, चादर और चार दिवारे' या पलीकडे जात नाही. याला प्रतिकार म्हणून शिकलेल्या अनेक मुली आंतरधर्मीय विवाहास पसंती देताना दिसतात. अशा मुलींची संख्याही वाढताना दिसत आहे. जातीअंताबरोबरच धर्मांधतेच्या अंतासाठी हे पोषकच आहे. अशा प्रयत्नांना एकाकी न पाडता प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्यांना सहकार्य व समर्थन कसे मिळेल, याकडेही लक्ष दिले पाहिजे.

१९५५ सालच्या काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील पहिल्या मागासवर्ग आयोगाने एकूण २३९९ जातींचा समावेश इतर मागासवर्गीयांत केला होता. त्यातील अनेक जाती मुस्लीम धर्मीय आहेत. या आयोगाने प्रथमच मुस्लीम, ख्रिचन, शीख अशा इतर धर्मियांत मागासलेल्या जाती आहेत, असे नमूद केले. १९८०च्या दुसऱ्या मागासवर्गीय मंडल आयोगाने संपूर्ण देशात ३७४३ जाती आहेत, असे नमूद केले. यातील ८२ जाती मुस्लीम धर्मीय आहेत. मंडल आयोगामुळे या समाजाला ओबीसींच्या सवलती मिळू लागल्या आहेत. परंतु शिक्षण, जनजागृती, जातीचे दाखले यांचा अभाव व अडचणींमुळे, मुस्लीम ओबीसीपेक्षा इतर समाजातील ओबीसींना याचा अधिक फायदा होतो. इतर ओबीसींपेक्षा मुस्लीम ओबीसी अधिक मागासलेले असल्याचे सच्चर समितीच्या अहवालात नमूद केले आहे.

याच अहवालात मुस्लीम समाजातील काही जाती एसटी, एससी, भटक्या विमुक्त जमातींपेक्षाही मागासलेल्या आहेत, असा उल्लेख आहे. अर्थात, ही परिस्थिती निर्माण होण्यास मुस्लीम समाजातील नेतृत्व , मुल्ला-मौलवींचा धार्मिक प्रभाव, शासनव्यवस्थेचे दुर्लक्ष, तसेच या समाजाची मानसिकता जबाबदार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका वाक्यात या परिस्थितीचा आढावा घेतला आहे. ते असे म्हणतात, "मी असे मानतो की, तत्वतः इस्लाम धर्म सामाजिक न्याय व मानवी समतेचा पुरस्कर्ता आहे, परंतु भारतातील मुसलमान लोक मनुच्या वर्णाश्रम धर्माप्रमाणे वागतात व तुम्ही (मुसलमानांनी) आपल्या समाजाची विभागणी जात-जातीत करून ठेवली आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'थॉटस् ऑन पाकिस्तान' या पुस्तकात लिहिले आहे की मुस्लीम समाजातील गुलामगिरी संपली, तरी या समाजात जातीव्यवस्था कायम आहे. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, मुस्लीम समाजात या वाईट प्रथा, परंपरा असणे हे खूप दु:खद आहे. परंतु त्याहून क्लेशकारक बाब ही आहे की अशा वाईट प्रथांच्या निर्मूलनासाठी मुस्लीम समाजातून सामाजिक सुधारणेसाठी संघटितपणे आंदोलन उभे राहिले नाही. त्याहून वाईट हे आहे की, मुस्लीम समाज या बाबतीत इतका असंवेदनशील आहे की, त्यांना या प्रश्नांची जाणीव नाही. प्रचलित वाईट परिस्थितीत कोणताही बदल किंवा परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नाला हा समाज विरोध करतो.

मुस्लीम समाज जर सर्वसमावेशक झाला, तर भारताच्या धर्मनिरपेक्ष ओळखीला अधिक बळकटी येईल. धर्मांतर्गत विदारक अशा जातीय पार्श्वभूमीमुळे जेव्हा एखादा महत्त्वाच्या घटकात दुर्लक्षितपणाची भावना निर्माण होते, तेव्हा सर्वांना समान वागणूक देताना परिणाम होतो, शिवाय धर्मनिरपेक्षतेच्या व्यापक विचारसरणीत दुबळेपणा निर्माण होतो.

धर्म आणि जातीव्यवस्था ही मानवी गरजेतून अस्तित्वात आली आणि ती मानवनिर्मितीच आहे. परंतु ही व्यवस्था अनेक वेळा मानवी विकासाच्या आड येते. बिहार राज्यामध्ये झालेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, तेथे मुस्लीम समाजातील जातीव्यवस्थेत उच्च-नीच भाव बाळगून ८० टक्के मुस्लीम समाज हा निम्न मुस्लीम जातींशी अस्पृश्यता पाळतो. ही जातीव्यवस्था नष्ट करून सर्वांना समान पातळीवर आणण्यासाठी आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी जातीनिर्मूलनाची गरज असून, तशी मानसिकता वाढवण्यासाठी अधिकाधिक आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन व समर्थन मिळायला पाहिजे, तसेच वर्षानुवर्षं दुर्लक्षित राहिलेल्या आणि विकासाच्या परिघाबाहेर पडलेल्या या समूहांसाठी कल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे राबवण्याची गरज आहे.

**मुस्लीम समाजप्रबोधनाचे भवितव्य**

मुस्लीम समाजात धर्मांधता, अलगपणा, पारंपरिकता, महिलांचे प्रश्न, शिक्षणाचा अभाव आणि अंधश्रद्धा आढळतात. मात्र ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजांतर्गत फारसे प्रयत्न होत नाहीत. भारतीय समाज प्रबोधनाच्या संतुलित विकासात मुस्लीम समाजानेसुद्धा योगदान दिले पाहिजे, हा 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'च्या स्थापनेचा उद्देश होता. हमीदभाईंनी 'समान नागरी कायद्या'ची आवश्यकता लक्षात घेऊन ही मागणी लावून धरली. हा कायदा समान नागरिकत्व, समानता, धर्मनिरपेक्षतेच्या आधुनिक मूल्यांची बांधीलकी असणारा आणि धर्मपुरस्कृत विषमतेला प्रभावहीन करणारा; तसेच धर्मनिरपेक्ष एकात्म समाजनिर्मितीच्या प्रक्रियेला चालना देणारा होता. तो केवळ मुस्लीम महिलांच्या प्रश्नावरचा उतारा नव्हता.

मंडळाने 'समान नागरी कायद्या'च्या मागणीसाठी वसंतराव नाईक, अलियावर जंग, इंदिरा गांधी यांना निवेदने दिली. विविध उपक्रमांद्वारे सतत पाठपुरावा केला. ४ जुलै १९७२ रोजी तत्कालीन कायदामंत्री बॅ. अब्दुल रेहमान बॅ. ए. आर. अंतुले यांनी याची दखल घेतली. त्यांनी मुस्लिमांसाठी द्विभार्या प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आणण्याचे आश्वासन दिले.

मंडळाच्या कार्याचे महत्त्व विचारात घेऊन महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण आणि इतरांनी मंडळाचा विवेकी आवाज समजून घेतला. माध्यमांतून सकारात्मक प्रसिद्धी मिळाली. मुस्लीम समाजाचाही पाठिंबा मिळण्यास सुरुवात झाली. रफिक झकेरिया, असफ ए. ए. फैजी, मोईन शाकिर, न्या. दाउद, असगर अली इंजिनिअर यांसारख्या अनेक उदारमतवादी मुस्लिमांनी मंडळाच्या भूमिकेचे स्वागत केले, तर धर्मवादी मुल्ला-मौलवींसह राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या प्रभावाचा वापर करून मंडळाच्या विरोधात १९७३मध्ये परिषद घेतली. त्यातूनच पुढे 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' अस्तित्वात आले. मंडळाला बदनाम करून मंडळाची धर्मविरोधी प्रतिमा निर्माण केली आणि मुस्लीम समाज प्रबोधनात अडसर आणला. आरंभी 'समान नागरी कायद्या'ला विरोध करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांनी नंतर हा विषय मुस्लीमविरोधी राजकारणासाठी वापरला. तेव्हा समाजवादी मंडळीने त्यातून अंग काढून घेतले.

हट्टाग्रही राजकारणाला आळा घालणाऱ्या धर्मनिरपेक्षतेशी फारकत ही गोष्ट मंडळाने गांभीर्याने घेतलेली आहे. सेक्युलॅरिझमचा खरा अर्थ समाजात रुजल्यास समाजप्रबोधनाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली असती, मात्र ही संकल्पना राजकीय नेतृत्वाला न परवडणारी आहे. मराठीत 'सेक्युलॅरिझम'साठी जे प्रचलित शब्द वापरले जातात, त्यातील सर्व शब्द एकत्र केले तरी त्याच्या गाभ्याला स्पर्श करू शकणार नाहीत. म्हणूनच धर्मनिरपेक्षता, धर्मतटस्थता, धर्मातीतता, निधर्मीपणा असे काही पर्यायी शब्द वापरले जातात.

या सर्वांपेक्षा सेक्युलॅरिझमच्या जवळपास जाणारा शब्द म्हणजे 'ईहवाद'. माणसाचे पृथ्वीवरील अस्तित्व असतानाचे व्यवहार आणि नीतिविचार असा एक अर्थ आहे. धर्माच्या पारलौकिकतेला यात थारा नाही. सेक्युलॅरिझममध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, स्त्री-पुरुष समानता, समान नागरिकत्व आणि सामाजिक न्याय अभिप्रेत आहे. प्रत्यक्षात सर्व धर्म अंधश्रद्धा, महिलांचे दुय्यमत्व, विषमता, अन्याय आणि शोषण यांचे स्रोत आहेत. त्यांना धर्मांधतेच्या प्रभावातून कमी करणारे तत्त्वज्ञान म्हणजे 'सेक्युलॅरिझम'.

ही मानवतावादी प्रक्रिया आहे. त्यात लोकशाही, बहुविविधता अंगभूत आहे. आधुनिक राष्ट्र घडवण्यातील एक महत्त्वाचे हत्यार बोथट करण्यासाठी राजकीय नेत्यांनी या तत्त्वज्ञानाला सर्वधर्मसमभावाची झालर लावली. धर्माच्या नावाने गोंधळ घालण्याची मुभा दिली आणि सत्ता संपादनाचा महामार्ग बनवला. सर्वधर्मसमभाव, सर्वधर्मसन्मान, बहुसांस्कृतिकता आदींबाबत आजची स्थिती चांगली नाही. प्रबोधनाची परंपरा असलेल्या महाराष्ट्रातही संकुचितवाद वाढतो आहे. धर्मवादी राजकारण्यांनी तर सेक्युलॅरिझमची थट्टाच केली. मुस्लीम मतपेटी वापरण्यासाठी राजकारण्यांनी धर्मानुनय केला, तर हिंदुत्ववाद्यांनी सेक्युलॅरिझम हद्दपार करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे समाज धार्मिक ध्रुवीकरणाकडे जलद गतीने जाताना दिसतो.

सांगली भागात सय्यद अमीन हे एक मराठी लेखक होते. त्यांच्या लेखनातले उतारे अनेक मराठी साहित्यिक शुद्ध मराठीचा उत्तम नमुना म्हणून दाखवत असत. काही मुस्लीम मराठी शिक्षकही होते. मुस्लिमांनी मराठीचा स्वीकार करून ते आत्मविकासाचे साधन करावे, आपल्या वेदना आणि प्रश्न साहित्यात प्रतिबिंबित करून मुस्लिमांबरोबरच सर्वधर्मीय समाजाला या

समस्यांच्या निवारण प्रक्रियेत सामावून घेण्याची गरज होती. मात्र अनेक मुस्लिमांनी उर्दू माध्यम आणि मदरसा शिक्षण कायम ठेवले. परिणामी शिक्षणातील गळती, उदासीनता, धर्मप्रभाव या दुराग्रहातून मुस्लिमांच्या ऐहिक जीवनात प्रश्न निर्माण केले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने याबाबत लोकजागृतीचा प्रयत्न केला. परिणामी मंडळ मुस्लीमविरोधी असल्याचा अपप्रचार केला गेला. ३०-३१ डिसेंबर १९७३ दरम्यान मंडळाने कोल्हापूरला 'मुस्लीम शिक्षण परिषद' आयोजित केली. उत्तर प्रदेश-बिहार सोडल्यास भारतात सर्वत्र प्रादेशिक भाषा वापरल्या जातात. मात्र उत्तरेकडील मुसलमानांनी उर्दूची धर्माशी सांगड घालून बुद्धिपुरस्सर अलगपणा जोपासला. परिणामी मुस्लीम समाज नोकरी मिळवण्याच्या स्पर्धेत मागे पडला.

सध्या मराठी भाषिक मुस्लिमांची संख्या, प्रादेशिक शिक्षण आणि उच्चशिक्षणातील टक्का वाढतोय. मराठी मुस्लीम साहित्यिकांची संख्या वाढत आहे. मुस्लीम मराठी साहित्य संमेलने, मुस्लीम समाजाचा अभ्यास आणि संशोधनातील प्रगती नक्कीच आश्वासक वाटते. अनेक सामान्य कुटुंबांतील मुले स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत आहेत. संघर्ष आणि प्रतिकूलता नशिबी असताना त्यावर स्वार होणारे विद्यार्थी आहेत. त्याचे स्वागत करण्याऐवजी काही खासगी दूरचित्रवाणी वाहिन्या अपप्रचार, विखारी वक्तव्य करून मुस्लीम प्रतिमा विद्रूप करतात. त्यांना मुस्लीम तरुण आयएएस होणे, ही प्रशासनातील घुसखोरी आणि 'आयएएस-जिहाद' वाटतो. जमातवादी शक्तीने समाजाला संशयाच्या भोवऱ्यात अडकवले. एखाद्या व्यक्तीच्या अपकृत्यामुळे सर्व समाजाची बदनामी होते. हिंदुत्ववाद वाढण्यामध्ये मुस्लिमांनी सुधारणेसाठी केलेला विरोधही कारणीभूत आहे.

समानतेचा अधिकार मुस्लीम महिलांसाठीसुद्धा आहे. तेव्हा 'धर्माने महिलांना समान अधिकार मिळवून दिले आहेत', हे सांगणे पुरेसे नसते. मंदिर-मशीद प्रवेशाचा विषय येतो, तेव्हा पुरुषप्रधान मानसिकता कशी चलाखी करते? आपल्याकडे कोणकोणते फतवे काढण्यात येतात? तलाकबंदी होऊ नये म्हणून, इस्तेमासाठी लाखोंचे मोर्चे निघतात; मात्र मुस्लीम समाजाच्या ऐहिक प्रश्नावर मोर्चे निघत नाहीत. धर्माने दिलेले अधिकार आम्हाला मिळाले पाहिजेत, अशी मागणी करण्यापेक्षा संविधानाने दिलेले अधिकार मागण्याची आज अधिक गरज आहे.

मंडळाने महिलांना स्वतःचा आवाज दिला, न्यायालयाचा दरवाजा दाखवला आणि कायदा होण्यासाठी संसदेला आव्हान करण्याचे बळ दिले. परिणामी शहाबानो, शबानाबानो, सायराबानो यांसारख्या महिला न्यायालयीन लढाई करत आहेत. मुस्लीम महिलांनी 'सीएए' आणि 'एनआरसी' विरोधातील 'शाहीनबाग'ला जगासमोर आणले. शहाबानो प्रकरणात देशव्यापी आंदोलन करून तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी, तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग आणि इतर मंत्र्यांना भेटून मुस्लीम महिलांच्या प्रश्नाची जाणीव करून दिली. सध्याचा तलाकबंदी कायदा येण्यापूर्वी मंडळाच्या शिष्टमंडळाने पंतप्रधानांना भेटून अपेक्षित बदलाचा मसुदा दिला. मात्र हा कायदा अपूर्ण-अर्धवट आहे. या कायद्याचा सकारात्मक परिणाम झाला, तरी हा लढा संपला नाही. आजघडीला मंडळाच्या प्रेरणेतून मुस्लीम तरुण-तरुणी नोंदणी विवाह करतात हे एक चांगले फलित आहे.

मंडळाने लोकसंख्या नियंत्रणासाठी लोकशिक्षण केले. जेथे निरक्षरता–दारिद्र्य जास्त, तेथे लोकसंख्या वाढ असे चित्र दिसते. कुटुंब नियोजनाबद्दल इस्लाम आणि मुस्लीम देशांत अनुकूल भूमिका असली, तरी धर्मवाद्यांनी नकारात्मक भूमिका घेऊन समाजाची दिशाभूल केली. महाराष्ट्र सरकारने 'दोन मुलांनंतर विनंती आणि तीननंतर सक्ती' असे धोरण जाहीर करून, तसे विधेयकही संमत केले. मंडळाने त्याचे स्वागत करून त्याबाबत जनमत अनुकूल होण्यासाठी कार्यक्रम घेतले. मंडळाचे कार्यकर्ते वजीर पटेलांनी कुटुंबनियोजन शिबिरे आयोजित करून हजारो मुस्लिमांच्या शस्त्रक्रिया घडवून आणल्या. मुस्लीम पुढाऱ्यांनी विरोध, टीका यांबरोबरच हल्लेही केले. गेल्या पन्नास वर्षांत लोकांत जागृती होऊन कुटुंबनियोजनाचे प्रमाण वाढले आहे. जनगणनेत मुस्लिमांचा जन्मदर कमी होत असल्याचे आकडेवारी सांगते; मात्र 'इस्लामोफोबिया' कमी झालेला नाही. 'हिंदूंनी जास्त मुलांना जन्म द्यावा' हा उपदेश मुस्लिमांना लक्ष्य करण्यासाठीच केला जात असतो.

मुस्लीम समाजप्रबोधन आणि विकासाची प्रक्रिया गती घेत असताना त्यांच्या अस्तित्वाचे आणि सुरक्षिततेचे प्रश्न समोर येत आहेत. द्वेषमूलक वक्तव्य, संशय आणि 'मॉब लिंचिंग'चे प्रकार वाढले आहेत. सेक्युलॅरिझम आणि लोकशाही मूल्ये; तसेच नागरिकांच्या मूलभूत कर्तव्याचे विस्मरण लोकप्रतिनिधींनाही होत आहे. मुस्लीम समाजसुधारणेचा आवाज फक्त दोन घटकच बुलंद करतील, अशी आशा हमीदभाईंना वाटत होती. त्यातील पहिला घटक म्हणजे अन्यायपीडित मुस्लीम महिला आणि दुसरा, आधुनिक शिक्षण घेऊन पुढे येणारा तरुण वर्ग. आज अन्यायाविरोधात लढणाऱ्या महिलांचा आवाज आपल्या कानी घुमत आहे आणि तरुण वर्ग हमीदभाईंच्या साहित्याचा अभ्यास व संशोधन करून या चळवळीकडे आकर्षित होत आहे. ही दोनही बलस्थाने आज मंडळासोबत आहेत. हमीदभाईंची लढाई ही हरणारी नाही, ती जिंकणारी आहे, हा आशावाद बळकट करत आहे.

दलित वर्गाच्या आत्मसन्मानाची व मानवी आधिकाराची लढाई पुढे घेऊन जाताना, उत्तरार्धात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांना म्हणाले होते, "मी दलित उद्धाराची ही चळवळ इथपर्यंत आणली आहे, आता समाजातील बुद्धिजीवी वर्गाने ही चळवळ पुढे नेली पाहिजे, तसे शक्य झाले नाही, तर किमान ही चळवळ मागे जाणार नाही, याची तरी काळजी घेतली पाहिजे."

अगदी तसेच हमीदभाईंनी मुस्लीम सत्यशोधक चळवळ त्यांच्या काळात एका उंचीवर नेली होती. त्यांच्या अभ्यासपूर्ण व चिकित्सक कृतिशीलतेमुळे मुस्लीम समाजातील काही विचारवंतांनी इस्लामचा उदारमतवाद अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. आजच्या जागतिक व भारतीय मुस्लीम जमातवादाच्या वातावरणात हा तथाकथित उदारमतवाद किती प्रभावी ठरला आहे, याचा अनुभव आपण घेत आहोत.

हमीदभाईंना विरोध करण्यासाठी अस्तित्वात आलेले 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' आजही मुस्लीम महिला, मुस्लीम समाज, भारतीय समाज आणि शासनाची दिशाभूल करण्यात आघाडीवर आहे. शहाबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध मुस्लीम जमातवादी शक्ती ज्या आक्रमक स्वरूपात 'शरीयत खतरे में है' म्हणत होत्या, तशी आक्रमकता आताच्या सायराबानोच्या निर्णयानंतर जाणवलेली नाही. २२ ऑगस्ट २०१७ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, तसेच तलाकबंदी कायदा अस्तित्वात येताना, 'तोंडी एकतर्फी तलाक

इस्लामला मान्य नाही' अशी भूमिका काही मुस्लीम नेत्यांनी घेतली. त्यामुळे धर्मवादी संघटना काही प्रमाणात थंडावल्या होत्या.

मात्र राजकीय पक्षांच्या भूमिका मांडून झाल्यानंतर आणि मुस्लीम जमातवादी शक्तींना काही राजकीय पक्षांकडून अभय मिळाल्यानंतर पुन्हा काही मुस्लीम जमातवादी 'शरीयतला हात लावू देणार नाही, इस्लाम खतरें में' वगैरे घोषणा देत मुस्लीम महिलांना रस्त्यावर आणण्याचे कार्यक्रम आखत आहेत. महाराष्ट्रातील मालेगाव, बारामती, कराड, सांगली, पुणे वगैरे ठिकाणी लाखोंच्या संख्येने बुरखाधारी महिलांना पुढे आणले गेले. म्हणजे मुस्लीम जमातवादी शक्तींची अनाक्रमकता ही तात्पुरती तडजोड होती. आक्रमकता हाच जमातवादाचा स्थायीभाव आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आज मुस्लीम समाजाच्या अस्तित्वाचे, सुरक्षिततेचे आणि विकासाचे प्रश्न जमातवादी राजकारण्यांना महत्त्वाचे वाटत नाहीत. त्यांना समाजातील बेरोजगारी, शैक्षणिक दूरवस्था व सामाजिक प्रश्नाविषयी भूमिका घेण्यात व समाजाच्या ऐहिक विकासात स्वारस्य नाही. तलाकबंदी विधेयक, 'भारत माता की जय', बाबरी मशीद हे मुद्दे त्यांना जास्त महत्त्वाचे वाटतात. याचाच वापर करून मुस्लीमविरोधी वातावरण निर्माण करण्यात हिंदुत्ववाद्यांना यश येत आहे.

या अशा प्रतिकूल परिस्थितीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मुस्लीम जमातवाद्यांबरोबरच हिंदुत्ववाद्यांविरुद्ध लढणे भाग पडत आहे. दलवाई-दाभोलकर यांच्या विचारांचा पाठपुरावा करत विवेकवादी विचारांची लढाई पुढे कशी घेऊन जावी, या विचारातून सध्या मुस्लीम सत्यशोधक मंडळ समविचारी संघटनांसोबत काही कार्यक्रम राबवत आहे.

मंडळाचा उद्देश मुस्लीम समाजात आत्मपरीक्षण व सुधारणेची मानसिकता विकसित करून त्यांना आत्मकल्याणाचे मार्ग शोधण्यास प्रवृत करणे, हा आहे. आपल्या दूरवस्थेचा दोष इतरांना देण्याची पद्धत या समाजात जास्त आहे, ती बदलण्याची गरज आहे. या दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने प्रयत्न केला की, हिंदुत्ववाद्यांना साथ दिल्याचा आरोप होतो. वस्तुतः मंडळ सर्वप्रकारच्या धर्मांधतेच्या विरोधात सातत्यपूर्ण भूमिका घेत आले आहे. उदा. मंडळाने संघपरिवाराच्या 'घरवापसी' अभियानास विरोध केला. 'लव्ह जिहाद'च्या नावाने केली जाणारी बदनामी, गोरक्षकांकडून होणाऱ्या घटना, मुस्लीम द्वेषमूलक वक्तव्ये व 'हिंदू राष्ट्रवादा'ची संकल्पना यांचाही मंडळाने वेळोवेळी समाचार घेतला आहे. परिणामी मंडळ 'मुस्लीमधार्जिणे' असल्याचा आक्षेप हिंदुत्ववाद्यांकडून होतो. मुस्लीम समाजात थोडा जरी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याचे स्वागत केले पाहिजे, ही हमीदभाईंची भूमिका होती. या दृष्टीने मंडळाने भारतीय मुस्लीम महिला आंदोलनास पाठिंबा दिला की, मंडळ हमीदभाईंशी द्रोह करत असल्याची ओरड ऐकावी लागते.

मंडळास असे वाटते की, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, त्याचबरोबर सर्व प्रकारच्या धर्मांधतेला आणि जातीयवादाला सतत विरोध करणे, ही भूमिका हिंदू-मुस्लीम राजकारणाला वळण देण्याबाबत उपयुक्त ठरेल. त्यामुळे मुस्लीम समाजात एका नव्या समंजस नेतृत्वाचा उदय होईल. आधुनिकतेचा संस्कार झालेले नवे मुस्लीम नेतृत्व ज्या क्षणी अल्पसंख्य-बहुसंख्य या जाणीवेतून विचार करायचे बंद करेल, त्या क्षणी मुस्लीम मानसिकतेत बदल व्हायला सुरुवात होईल. अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी मंडळास कार्य करावे लागेल.

मंडळाचे कार्य समाजात किती प्रमाणात रुजले, याचे संख्याशास्त्रीय मूल्यमापन करणे अशक्य आहे. तरीही मंडळाच्या विचार आणि कार्यामुळे मुस्लीम महिला संघटना अस्तित्वात आल्या आणि त्या निर्भीडपणे अन्यायाविरोधात आवाज उठवू लागल्या. अनेक महिलांनी उच्च व सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन 'मुस्लीम पर्सनल लॉ'मुळे होणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मागितली आहे. परिणामी किमान न्यायालयाने तोंडी एकतर्फी देण्यात येणाऱ्या तलाकवर बंदी घातली आणि संसदेने तलाकबंदी कायदा आणला. अर्थात या महिलांचे अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

त्याबरोबरच मुस्लीम समाजात मराठी भाषेची स्वीकृती वाढली आणि मराठी भाषेतून शिक्षण घेणाऱ्यांचेही प्रमाण वाढले आहे. तसेच आधुनिक आणि रोजगाराभिमुख शिक्षणात प्रमाण वाढले आहे. मुस्लीम मराठी साहित्यिकांची संख्याही जाणवण्याइतपत वाढली आहे. तसेच लोकसंख्या नियंत्रणाबद्दलची जागृती वाढून मुस्लीम समाजातील लोकसंख्येचा जन्मदर घटला आहे. असे अनेक सकारात्मक बदल मुस्लीम समाजात उघडपणे दिसून येत आहेत. अर्थात मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाचे सर्व मुद्दे संपले आहेत असे नाही, तर यात काही नव्या प्रश्नांची भर पडली आहे.

मंडळाने सातत्याने मुस्लीम जमातवादी राजकारणाची चिकित्सा केली. याचा अर्थ हिंदुत्ववादी राजकारणावर भाष्य केले नाही असेही नाही. मंडळाच्या आरंभकाळातही हिंदुत्ववादी पक्षपाती वर्तनाची हमीदभाईंनी चिकित्सा केली आहे. त्यांनी जमातवाद, मदरसा शिक्षण, पारंपरिक कालबाह्य श्रद्धा मुस्लीम प्रगतीच्या आड कशा येतात, हे सांगताना मुस्लीम समाजाच्या आधुनिकीकरणासाठी बहुसंख्य हिंदू समाजातही आधुनिकता कशी आवश्यक आहे, हेही वेळोवेळी विशद केलेले आहे. धर्मनिरपेक्ष एकात्म समाजनिर्मितीमध्ये धर्मवाद्यांचा अडथळा असतो. हमीदभाई म्हणतात, ''धर्मनिरपेक्षतेच्या प्रवाहाविरुद्ध अनेक ठिकाणी पाठ्यपुस्तके नेमलेली असतात. काही पुस्तकांत मुसलमान परकीय आहेत, असे म्हटले आहे. राम अथवा कृष्ण यांचे पाठ्यपुस्तकातील उल्लेख पुराणकथांचे (मायथॉलॉजी) महापुरुष म्हणून केलेले नसून, हिंदूंचे देव म्हणूनच केले जातात आणि हिंदूंचे देव या अर्थाने बिगर-हिंदू विद्यार्थ्यांनादेखील त्यांचे माहात्म्य सांगितले जाते.''

यांसारखी इतर उदाहरणे देत असतानाच आकाशवाणी केंद्रामार्फत उच्चवर्णीय हिंदूंचेच कार्यक्रम कशा पद्धतीने सादर केले जातात, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. हमीदभाईंनी शिक्षण, प्रशासन आणि पोलीस यंत्रणांकडून अनुभवास येणाऱ्या पक्षपाती वर्तनाचे दाखले दिले आहेत आणि भारतातील धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाचे प्रश्न किती अवघड आहेत, हेही सांगितले आहे.

मंडळाचा इतिहास मांडताना त्याच्या वैचारिक आणि कार्यात्मक भागाचा आढावा घेतला आहे. मुस्लीम सत्यशोधक चळवळीच्या इतिहासातून अनेक गोष्टींचा खुलासा होईल, तसेच मुस्लीम समाजप्रबोधनाला चालना मिळेल, असा विश्वास वाटतो.




# १. मंडळाच्या प्राधान्याचे विषय

## १.१ दहशतवाद

दहशतवाद हा प्रगत, सुसंस्कृत मानवी समाजास मिळालेला भयानक शाप आहे. संघटित आणि योजनाबद्ध हिंसाचाराच्या आधारे शांतताप्रिय समाजास वेठीस धरून आपली उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न म्हणजे दहशतवाद. त्याचे निराकरण अवघड आहे, पण अशक्य नक्कीच नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणातील दहशतवादाला अतिरेकी विचारांनी पछाडलेला, मानवी जीवनमूल्यांची चाड नसलेला आणि नीतिशून्य प्रवाह असे म्हणता येईल. दहशतवाद ही विकृत व हिंसात्मक प्रवृत्ती आहे. म्हणूनच ती अत्यंत घातक व निषेधार्ह आहे. 'जुलूम-जबरदस्तीच्या इतर हत्यारांप्रमाणेच दहशतवाद हे बलिष्टांचे अस्त्र आहे', असे अमेरिकन विचारवंत नोम चोमस्की म्हणतात. आज हे अस्त्र मानवतेविरुद्ध सर्रासपणे वापरले जात आहे म्हणूनच त्याचा सामना एकजुटीने करणे आवश्यक आहे.

भारतातच नव्हे, तर जागतिक मानवी समुदायासमोर असलेले दहशतवादाचे आव्हान सर्वाधिक गंभीर व चिंतादायक आहे. दहशतवादाची परिभाषा व्यापक आहे. पुरुषप्रधान मानसिकता दाखवणारी कुटुंबातील दहशत, सांस्कृतिक सण-उत्सवाच्या काळात दमदाटी करत वर्गणी गोळा करणे या सांस्कृतिक दहशतवादापासून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानव संहार करणाऱ्या दहशतवादापर्यंत याची व्याप्ती आहे.

भारतात महात्मा गांधींची हत्या, दाभोलकर-कलबुर्गी-कॉ. पानसरे यांची हत्या, गुजरातमधील हत्याकांड, मोहसीन शेख-महंमद अखलाक यांची हत्या, खैरलांजी- खर्डा- सोनई- कोपर्डी घटना सर्वपरिचित आहेत. हैद्राबाद, नागपूर, अजमेर, कानपूर, मालेगाव अशा ठिकाणी घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटांसह पंजाब, काश्मीर, आसाम या राज्यांतील अतिरेकी घटना, नक्षलवाद, सिमी, लष्करे तोयबा अशा विविध संघटनांद्वारे होणाऱ्या दहशतवादी कारवाया, बाबरी मस्जीद उद्ध्वस्त केल्यानंतर मुंबईत घडलेली बॉम्बस्फोट मालिका, अक्षरधाम-संसदेवरील दहशतवादी हल्ला, २६\११ या घटना अशी कितीतरी उदाहरणे आहेत.

सध्या जगात अल-कायदा, बोको हराम, तालिबान, आयसिस व अन्य नावांनी होणाऱ्या जागतिक पातळीवरील दहशतवादाचे आव्हान का व कसे निर्माण झाले, या संदर्भात अनेक अभ्यास ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेले आहेत.

इस्लामच्या नावाने जागतिक पातळीवरील दहशतवाद आणि त्याची भारतात होणारी लागण ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या दृष्टीने लक्ष वेधणारी बाब आहे. इस्लामचा उदारमतवाद, मानवतावाद या दहशतवादी कारवाया थांबवू शकत नाही, हे आतापर्यंतच्या अनुभवातून सिद्ध झाले आहे. त्यामुळे जगातील सर्वसामान्य मुसलमानच अधिक प्रमाणात बळी जातात, संशयाच्या भोवऱ्यात अडकतात आणि विषमता व असुरक्षितता अनुभवतात. परिणामी उदारमतवादी समाज घडवण्यात अडथळे निर्माण होऊन हा समाज पुन्हा जमातवादाकडे आकर्षित होतो.

धर्मपुरस्कृत दहशतवादाशी मुकाबला कसा करायचा, हा कळीचा प्रश्न आहे. जागतिक पातळीवर इस्लामच्या नावावर निर्माण झालेल्या अनेक दहशतवादी संघटना व त्यांच्या अतिरेकी कारवाया इस्लामला मान्य नाहीत, असा एक क्षीण आवाज आपण नेहमी ऐकतो, आणि असा आवाज काढणाऱ्यांच्याही हत्या या दहशतवाद्यांकडून होत आहेत. पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान ही भारता शेजारील मुस्लीम राष्ट्रे, तसेच इराण-इराक, सिरिया आणि इतर अनेक मुस्लीम राष्ट्रांतील दहशतवादी संघटना बिगर मुस्लीम राष्ट्रांपेक्षा मुस्लीम राष्ट्रांचीच दमछाक करतात.

हा दहशतवाद अमेरिकापुरस्कृत आहे वगैरे बोलले जाते; पण मानवतावादाची शिकवण देणारा इस्लाम अशा चिथावणीला बळी पडतो, हेही तितकेच खरे. या निमित्ताने इस्लामिक दहशतवादाची मुळे समजून घेणे आवश्यक ठरते. इस्लामला मान्य नसले, तरी इस्लाममध्ये विविध पंथ, विचारधारा आणि मतप्रवाह आहेत. जगात व भारतातही सर्व मुसलमान एकसारखे किंवा एक विचारधारा मानणारे नाहीत. जगात भारतात जशी बहुविविधता आहे, तशीच मुस्लीम समुदायातही दिसून येते. भारतात उत्तर भारतातील मुस्लीम व दक्षिण भारतातील मुस्लीम यांच्यात सांस्कृतिक, सामाजिक विविधता आहे. अगदी उत्तर भारतातही 'बरेलवी-देवबंदी' असे गट आहेत.

इस्लामपूर्व जमातींनी इस्लामच्या स्थापनेनंतर इस्लाम स्वीकारला; पण आपली मूळ संस्कृती जतन केली. यातूनही बहुविविधता दिसून येते; पण 'मी म्हणेल तोच धर्म, मी म्हणेल तीच संस्कृती, मी म्हणेल तोच राष्ट्रवाद' हे जसे 'हिंदू दहशतवाद्यां'च्या बाबतीत दिसते, तसेच 'इस्लामिक दहशतवाद्यां'च्या बाबतीतही दिसते. म्हणूनच 'पॅन इस्लामिझम' आणि 'विश्व हिंदू परिषद' यांत आपणास काही साधर्म्य दिसून येते. दोन्हीकडे सारखाच अट्टाहास आणि आटापिटा दिसतो.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका अशी आहे की, 'प्रथम आपण आपली घाण काढावी, आत्मटीका करावी, आत्मपरीक्षण व आत्मसुधारणा करावी'. याच हेतूने मंडळाची स्थापना झाली. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचीही 'मी जोपर्यंत माझे घर स्वच्छ करत नाही, तोपर्यंत इतरांची घाण काढण्याचा मी प्रयत्न करणार नाही', अशीच भूमिका होती. म्हणून मुस्लीम दहशतवादाची मुळे शोधण्यासाठी इस्लाममधील विविध विचारधारा समजून घेणे गरजेचे आहे. विशेषतः दहशतवादाला कारणीभूत ठरणारी विचारधारा समजून घेतली पाहिजे.

वहाबी आणि सलाफी विचारधारांचा आधार घेत अनेक मुस्लीम दहशतवादी संघटना

अस्तित्वात आल्या आहेत. अल्लाहच्या ९९ नावांपैकी 'अल-वहाब' म्हणजे 'दाता' हे एक नाव आहे; परंतु वहाबी चळवळीचा निर्माता मुहम्मद इब्न-अब्द-अल-वहाब याच्या नावावरून त्याच्या अनुयायांना 'वहाबी' म्हटले जाते. आपणच शुद्ध आणि मूळ इस्लामचे प्रतिनिधित्व करतो, असे वहाबींचे म्हणणे आहे. म्हणून ते स्वतःला 'सलाफी' म्हणवतात.

'वहाबी' आणि 'सलाफी' हे शब्द अनेक वेळा पर्यायवाचक व एकच असल्याचे समजले जाते; मात्र, यात थोडा फरक आहे. 'सलाफी'चा अर्थ 'आरंभीचा मुस्लीम' असा आहे. 'सलफ' म्हणजे पूर्वज. मुस्लिमांच्या पहिल्या तीन पिढ्यांना सन्मार्गी पूर्वज व आदर्श म्हणून समजले जाते. यात प्रेषितांचा सोबती (सहाबी), सोबत्यांचे अनुयायी (ताबियीन) आणि त्यांचे अनुयायी (तबे ताबियीन) यांचा समावेश होतो. इस्लाम कसा अनुसरावा याचा वस्तुपाठ या प्रारंभीच्या मुस्लिमांनी घालून दिला, अशी एक धारणा आहे. त्यांनी दाखवलेला मार्गच (मिनहाज अससलफ) अनुकरणीय व आदर्श असल्याचे सांगितले जाते. 'हिजरत'नंतरची म्हणजे इ. स. ६२२नंतरची तीनशे वर्षे हा सलाफींचा काळ होता. याला 'सुवर्णकाळ' असेही मानण्यात येते. या काळात जसे समाजजीवन व समाज व्यवहार होत, तसाच व्यवहार आजही सर्व मुस्लिमांनी करावयास पाहिजे, असा 'सलाफी' विचारसरणीचा आग्रह असतो.

मोहंमद पैगंबराच्या निधनानंतर शिया व सुन्नी असे दोन पंथ निर्माण झाले. सुन्नीमध्ये हनफी, हनबली, शाफी आणि मालिकी या विचारधारा निर्माण झाल्या. वहाबी हे तत्त्वतः या चारपैकी कोणत्याही प्रणालीचे अनुयायी असू शकतात; परंतु हनबली विचारधारा मानणारे त्यात बहुसंख्येने आहेत. असे असले तरी यापैकी कोणत्याही विचारधारेशी त्यांची बांधीलकी नाही.

'कुराण', 'हदीस', 'इज्मा', 'कियास' हे इस्लामचे चार मूळ स्त्रोत आहेत. यांपैकी वहाबी फक्त 'कुराण' व 'हदीस' यांच्या तंतोतंत पालनावर भर देतात. 'इज्मा' व 'कियास' या इस्लामचा उदारमतवाद दाखवणाऱ्या स्त्रोतांवर त्यांचा विश्वास नाही. प्रेषितांचा जन्मदिवस साजरा करणे, कबरीवर चादर-फुले घालणे, छायाचित्र काढणे, व्हिडिओ, गंडा-ताईत बांधणे, मद्यपान-धूम्रपान, संगीत, नृत्य यांसारख्या गोष्टींना त्यांचा टोकाचा विरोध असतो.

सलाफी विचारधारेत वहाबी व कुत्बी असे दोन प्रवाह आहेत. सैय्यद कुत्ब यांच्या अनुयायांना 'कुत्बी' म्हणतात. ही मंडळी स्वतःला 'सलाफी' म्हणवतात. अरब जगतातील पहिली मूलतत्त्ववादी संघटना 'मुस्लीम ब्रदरहूड' (१९२८) आणि नंतर निर्माण झालेल्या अनेक संघटनांवर सैय्यद कुत्बच्या विचारांचा प्रभाव आहे. इस्लामचे अनुकरण न करणाऱ्या मुस्लीम शासकांना पदच्युत केले पाहिजे, असे त्यांचे मत होते. या उलट इस्लामी राज्यातील मुसलमानांनी शासकाशी एकनिष्ठ असले पाहिजे, असे वहाबींचे म्हणणे असते. म्हणूनच सौदी शासकांविरुद्ध कारवाया करणारा ओसामा बिन लादेन हा वहाबी नसून कुत्बी आहे, असे काही विचारवंत म्हणतात.

आज जगात अल कायदा, आयसीस, आफ्रिकेतील बोको हरम, कहाव, हुत्शी या संघटना दहशतवादी कारवाया करण्याचे आवाहन करत असतात. लष्करे तोयबा, जैश-ए-महंमद यांच्या कारवाया काश्मीर आणि भारतात चालू आहेत.

'मी म्हणेल तोच धर्म व त्याचा अन्वयार्थ, मी म्हणेल तीच संस्कृती' अशा अट्टाहासाला पेटून, तसेच सुडाच्या भावनेतून जगात जो हिंसाचार चालू आहे, त्याचा इस्लामेतरांना धोका आहेच; पण मुस्लीम समाजात असणाऱ्या बहुविविधतेलाही आणि इस्लामच्या उदारमतवादालाही धोका आहेच. मुस्लीम जगतात आणि भारतातही सुफी संतांची एक परंपरा आहे. दर्गाह-कव्वाल गायन, एकेश्वरवाद, प्रेम, बंधुभाव, अध्यात्म, ऐक्य यांविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या सुफींवर व कव्वाल गायकांवर हल्ले करून त्यांच्या हत्या घडवण्याचे प्रकार अलीकडे वाढले आहेत. पाकिस्तानात अशा घटना गेल्या काही महिन्यांपासून पुन्हा पुन्हा घडताना दिसतात. 'सलाफीझम'चे 'सुफीझम'वर होणारे हल्ले इस्लामच्या कट्टरवादाचे दृश्य स्वरूप आहे.

कोणत्याही दहशतवादाला दुसरा दहशतवाद हा पर्याय होऊ शकत नाही. 'डोळ्यांचा बदला, डोळे फोडून' ही मानसिकता जगालाच आंधळे करून सोडणारी आहे. जग अंधारमय होऊ नये, यासाठी गांधीविचाराला पर्याय नाही. भारतात आणि अमेरिकेत दहशतवादाचा मुकाबला करण्याच्या निमित्ताने मुसलमानांना लक्ष्य केले जात आहे. इस्लाम हाच जगापुढचा एक प्रश्न असल्याचे बोलले जात आहे. याचा प्रतिकार करण्यासाठी उदारमतवादी-सेक्युलर मानवतावादी मुस्लीम समुदायाने दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सुसंगत धोरण-नियोजन केले पाहिजे. सर्वसामान्य लोकांमध्ये संवाद-समन्वय, सद्भाव निर्माण केला पाहिजे. जमातवादी व सनातनी मानसिकतेपासून सामान्यांची सुटका केली पाहिजे. भिन्न धर्मीय समुदायांत ध्रुवीकरण होणार नाही, यासाठी सातत्याने विवेकवादी कार्यक्रमांचे आयोजन करून लोकशाही मूल्यांचा प्रसार करण्यासाठी मंडळ आपली भूमिका पार पाडेल. यासाठी समविचारी-भिन्न धर्मीय समुदायांशी समन्वय करून कार्यक्रम आखण्यावर मंडळ भर देईल. २०१२पासून मंडळ ईद अल अजहा अर्थात बकरी ईदच्या निमित्ताने महाराष्ट्रात विविध ठिकाणी रक्तदान अभियान राबवून भिन्न धर्मियांत रक्ताचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

साचेबद्धपणा आणि एकसुरीपणा प्रवाही होऊ शकत नाही. इस्लामचा हा मूलतत्त्ववाद पुरस्कृत दहशतवाद केवळ लोकशाही-धर्मनिरपेक्षता, बहुविविधतेविरुद्धच नसून नवनिर्मिती, सृजनक्षमता, कला, साहित्य, संगीत, क्रीडा यांच्याही विरोधात आहे. विज्ञानाचे फायदे घेत वैज्ञानिक दृष्टीकोन नाकारणे, हे आजच्या धर्मवादाचे-दहशतवादाचे लक्ष्य ठरले आहे. मध्यंतरी काश्मीरमधील मुलींचे कलापथक आणि आसाममध्ये मुस्लीम मुलीने व्यासपीठावरून गाणे म्हणू नये म्हणून धर्मवादी मंडळींनी घेतलेली भूमिका, तसेच 'दंगल' या हिंदी सिनेमात अभिनय करणाऱ्या मुलींना जो विरोधाचा सामना करावा लागला, तो कालविसंगत असाच आहे. मुलींमध्ये वाढत असलेले बुरखा परिधानाचे प्रमाण हाही छुपा धर्मवाद-दहशतवादच आहे. 'इज्मा-कयास' नाकारणारे आज काय काय नाकारू शकतात, हे लक्षात आल्यामुळेच आपणास धर्मवाद आणि दहशतवादाविरुद्ध सज्ज झाले पाहिजे.

**दहशतवादविरोधी फतवे**

देवबंद येथील 'दारुल उलूम'ने दहशतवादविरोधात फतवा काढून इस्लाम हा शांतता आणि

सामंजस्याचा पुरस्कार करणारा धर्म आहे आणि जगात कोठेही दंगली, रक्तपात, लुटमार व निरपराध लोकांची हत्या करणे हे अमानवी कृत्य असून, असे करणे गुन्हा आहे, असे स्पष्ट केले. 'कुराणा'त सांगितल्याप्रमाणे एका निरपराध व्यक्तीची हत्या म्हणजे संपूर्ण मानवजातीचा संहार आहे. या प्रकारच्या कृतीतून बेबंदशाही निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळते. दारुल उलूमने यापूर्वीही दहशतवादविरोधात घेतलेल्या भूमिकेचे सर्व धार्मिक संघटनांनी स्वागत केले आहे.

ही संस्था दीडशे वर्षांपासून कार्यरत असून, ती लहान-मोठ्या हजारो धार्मिक व्यासपीठांना मार्गदर्शन करते. मुस्लीम जगतात कैरो येथील 'अल-अजहर विद्यापीठा'नंतर सर्वाधिक महत्त्व व प्रभाव असणारी ही संस्था आहे. तालिबानवादी व विविध जिहादी गटांनी येथूनच धार्मिक अध्ययन केले आहे.

उदारमतवादी गटांनी जिहादची मूळ संकल्पना विशद करून 'जिहाद' हा केवळ धर्माच्या रक्षणासाठी केलेले युद्ध नसून, आत्मशुद्धी, अन्यायनिवारण व अत्याचाराविरुद्ध पुकारण्यात येणारा लढा आहे, असे स्पष्ट करून सध्या अस्तित्वात असणाऱ्या जिहादी कारवाया इस्लामच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याने, त्या थांबवण्याचे आवाहन केले आहे. परिणामी दहशतवादी गटांनी 'जिहाद' या शब्दाऐवजी 'कत्तल' या शब्दाचा वापर करून आपल्या कारवाया चालू ठेवण्याचा निर्धार केला आहे, ज्यामध्ये मुस्लिमेतरांबरोबरच मुस्लिमांचीही हत्या करण्याची मुभा आहे.

'दारुल उलूम'ने गोहत्या विरोधातही फतवा काढला आहे, परंतु अनेकांना याबद्दल माहीत नाही. मुजफ्फरनगर येथील एका शेतकऱ्याने दारुल उलूमकडे गोहत्या, गोवंशभक्षण, कातडी व्यवसाय याला इस्लाममध्ये परवानगी आहे का, अशी विचारणा केली असता, या संस्थेने तीन सदस्य असणारी समिती नेमून त्यावर सखोल अभ्यास करून असा निर्णय दिला की, 'जरी इस्लामने अशा मांसाहारास परवानगी दिली असली, तरी ती एखाद्या देशातील कायद्याविरोधी कृती असेल, तर ती शरीयत अमान्य करते. भारतात जर गोहत्या, गोवंश मांसभक्षण व त्यांच्या कातडी व्यवसायावर बंदी असेल, तर ती कृती हराम अर्थात परमेश्वराला न आवडणारी असेल.'

या प्रकारचे फतवे आणि मागण्या सामाजिक स्वास्थ्य निर्माण करण्यास मदत करतीलच; त्याशिवाय धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या धर्मवादी संस्था व गटांचा प्रभाव कमी करण्याचे महत्त्वाचे काम करतील. पाकिस्तानातील मौलवींनी मात्र गोहत्या प्रतिबंधक फतव्याला विरोध केला आहे.

**भाषा आग्रहाचा दहशतवाद**

नमाज, लग्न व अन्य धार्मिक विधींपूर्वी करण्यात येणारी प्रार्थना ही अरबी भाषेत असते. 'कुराणा'चे वाचनसुद्धा अरबी भाषेतूनच केले जाते. संपूर्ण 'कुराण' पाठांतर करणारे अनेक 'हाफीज' आहेत. त्यांच्याबद्दल समाजात कौतुक व आदर असतो; परंतु अर्थाविना केलेली प्रार्थना व पाठांतरातून काय साध्य होते? अरबी ही 'अल्लाची भाषा' आहे, असे समीकरण करून, धार्मिक श्रद्धेच्या बाबी करून अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची प्रक्रियाच थोपवली जाते.

'कुराण', 'प्रार्थना' यांचे उर्दू किंवा प्रादेशिक भाषेतून पठण केल्यास धर्मातील सकारात्मक बाबींचा प्रसार होईल व समाजातील आत्मवंचनेच्या गाठी सुटण्यास मदत होईल.

आजही अनेक मुस्लीम बांधव उर्दू भाषा लिहिता-वाचता येत नसली, तरी तिचा मातृभाषा म्हणून उल्लेख करतात. अनेक कुटुंबांमध्ये मुलांनी 'मम्मी' हा इंग्रजी शब्द वापरण्यास विरोध नसतो; परंतु 'आई' हा मराठी शब्द वापरणे विक्षिप्तपणा ठरतो. समाजाची अस्मिता व अलगतावाद टिकवण्यासाठी मुद्दाम मराठी भाषेबद्दलचा दुजाभाव बाळगला जातो.

सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी इस्लाममधील उदारमतवादाचा प्रसार समाजप्रबोधनाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचे योगदान ठरू शकेल; परंतु व्यवहारातील प्रत्येक बाबीची धार्मिक अधिष्ठानावरच तपासणी करणे आणि धर्माचे समर्थन आहे वा नाही या चौकटीतूनच पाहणे योग्य होणार नाही. आजच्या संगणकयुगात इस्लामला मान्य नसलेल्या, परंतु जीवनावश्यक असणाऱ्या अनेक बाबी स्वीकाराव्या लागतात; तसेच धर्ममान्य असणाऱ्या, परंतु आधुनिक मूल्यांशी विसंगत असणाऱ्या बाबी टाकूनही द्याव्या लागतील. हे वास्तव स्वीकारल्याशिवाय वर्तमान काळाबरोबर जाणे शक्य होणार नाही. धर्मवादापेक्षा विवेकवाद व मानवतावाद हा अधिक व्यापक आहे, याचे भान निर्माण करावे लागेल. असे झाले तर कोणते फतवे 'फसवे' आहेत, हे सांगण्याची वेळ येणार नाही.

महाराष्ट्रात सुमारे दोन हजारांहून अधिक उर्दू शाळा आहेत. या शाळांतील मुलांना मराठी भाषा लिहिता-वाचता येत नाही. उर्दू शाळांच्या प्रतिनिधींच्या परिषदेत सुमारे तीनशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. यात मराठी भाषेचे बालवाडीपासून शिक्षण देण्यात यावे, असे मत व्यक्त केले. या शाळांमधून आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता, मराठी व इंग्रजीचे शिक्षण अनिवार्य करण्यात यावे, असा आग्रह धरण्यात आला. आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये उर्दू माध्यमातील विद्यार्थी प्रवाहाबाहेर फेकला जाऊ नये, यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवरून मराठीच्या अध्यापनास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

## १.२ मुस्लीम आरक्षण

मंडळाच्या आरंभकाळात सर्वाधिक प्राधान्याच्या विषय म्हणून महिलांच्या विविधांगी प्रश्नांवर भर दिला. परिणामी मुस्लीम समाजाचा प्रश्न म्हणजे मुस्लीम महिलांचे प्रश्न आणि मुस्लीम महिलांचे प्रश्न म्हणजे तलाकचा प्रश्न, असे एक समीकरण व्यक्त होऊ लागले. तथापि मुस्लीम समाजाची उन्नती आणि प्रबोधन करण्याचे प्रयत्न एकत्रित झाल्यास ते परस्परांना पूरक ठरतात.

मुस्लीम समाजासंदर्भात तलाकच्या प्रश्नानंतर सर्वाधिक चर्चेत असणारा विषय आरक्षण हा आहे. गेल्या दोन दशकांपासून मुस्लीम आरक्षणाबद्दल जास्त चर्चा होत असली, तरी संविधान स्वीकारल्या वर्षापासून ही चर्चा होत असल्याचा इतिहास आहे.

मुस्लीम समाजात दलित, अस्पृश्य, आदिवासी धर्मांतरितांची संख्या सर्वाधिक आहे. धर्मांतर केल्यामुळे काही प्रमाणात सामाजिक बदल झालेला असला, तरी त्यांची आर्थिक, शैक्षणिक स्थिती सुधारलेली नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुस्लीम समाजातील मागास जातींना आरक्षण ठेवण्याबद्दल अनुकूल होते; परंतु मौलाना अबुल कलाम आझादांसह इतर कोणत्याही मुस्लीम नेत्याने आरक्षणाचे समर्थन केल्याचा इतिहास नाही. म्हणूनच राष्ट्रपतींच्या संविधानात्मक आदेशान्वये (१९५०) फक्त हिंदू समाजातील मागासजातींना आरक्षणाची सुविधा देण्यात आली. डॉ. राजेंद्रप्रसाद हे तेव्हा राष्ट्रपती होते, तर पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान व सरदार वल्लभभाई पटेल गृहमंत्री होते. नंतरच्या काळात या आदेशात सुधारणा करून त्यात बौद्ध व शीख समाजाचा समावेश करण्यात आला.

१९५५च्या काकासाहेब कालेलकर आयोगाने मुस्लीम समाजात जातीव्यवस्था आहे व त्यात अनेक मागास जाती असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र मुस्लीम आरक्षणाची शिफारस करण्यात आली नाही. मुस्लीम समाजातील धार्मिक व राजकीय नेतृत्वाने आरक्षणाला विरोध केल्याची अनेक उदाहरणे आहेत. इस्लामला जातीव्यवस्था मान्य नाही व काही जातींना आरक्षण दिल्यास या समाजातील एकसंधपणा दुभंगेल, अशी भूमिका घेऊन मुस्लीम नेतृत्वाने आरक्षणापासून मुसलमानांना वंचित ठेवल्याचा इतिहास असताना, त्याचा दोष मात्र इतरांना दिला जातो.

१९८४च्या मंडल आयोगाच्या निमित्ताने मुस्लीम समाजातील काही मागास जातींचा इतर मागासवर्गीय वर्गात समावेश करून त्यांना आरक्षणाची सुविधा देण्यात आली. त्याचा काही मुस्लीम जातींना फायदा झाला, मात्र हा वर्ग इतर मागासवर्गीय वर्गापेक्षा मागासच राहिला.

गेल्या दशकापासून मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. २००७मध्ये न्या. राजेंद्र सच्चर समितीचा अहवाल आणि न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाचा अहवाल संसदेत सादर करण्यात आले. सच्चर समिती मुस्लीम समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा सविस्तर, साधार माहितीसाठी होती, तर मिश्रा आयोग भारतातील सर्व अल्पसंख्याक समाजाचा अभ्यास व शिफारसी करण्यासाठी होता. दुसरा फरक असा की, न्या. सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास व शिफारस करणारी समिती होती, तर न्या. रंगनाथ मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात

आला. समिती व आयोग यातील फरकही महत्त्वाचा आहे. २००५मध्ये स्थापन झालेल्या या समिती-आयोगाने २००७मध्ये आपापल्या शिफारसी सादर केल्या. या घटनेला दहा वर्षे झाली, मात्र त्यांच्या शिफारशींबद्दल अनास्थाच पदरात पडली. मुस्लिमांच्या पदरात काहीच पडले नाही, मात्र हिंदुत्ववाद्यांनी याचा फायदा उठवत 'मुस्लीम अनुनय', 'मुस्लीम लाड' असा प्रचार करून मुस्लीम विरुद्ध वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला.

मिश्रा आयोगाने केलेल्या शिफारशींमधील दोन शिफारसी महत्त्वाच्या होत्या. पहिली अशी की, १९५०च्या राष्ट्रपतींच्या संविधानात्मक आदेशात सुधारणा करून त्यात मुस्लीम, ख्रिश्चन व इतर अल्पसंख्याक समूहातील मागास जातींचा समावेश करण्यात यावा. दुसरी अशी की, अल्पसंख्याक समाजाला १५ टक्के शिक्षण व नोकरीत आरक्षण द्यावे. अल्पसंख्याक समाजात ७२ टक्के मुस्लीम व २८ टक्के इतर अल्पसंख्याक असल्याने मुस्लिमांना १० टक्के व इतर अल्पसंख्याक समूहासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात यावे.

सच्चर समितीने केलेल्या शिफारशीही महत्त्वाच्या आहेत; पण त्यात सर्व राज्यांतील, सर्व भागांचा व सर्व जातीसमूहांचा सखोल अभ्यास झाला नाही. जसे महाराष्ट्रात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा असे भाग आहेत. त्या त्या भागांतील मुस्लिमांची स्थिती भिन्न आहे. भारतातील सर्व राज्यांच्या, सर्व भागांच्या अभ्यासाचा अभाव या समितीत दिसतो.

आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडूमध्ये काही प्रमाणात मुस्लीम आरक्षण देण्यात आले, मात्र या आरक्षणाच्या संविधानात्मक बाजूबद्दल आक्षेप घेतले गेले. याचसाठी न्या. मिश्रांची पहिली शिफारस महत्त्वाची आहे.

महाराष्ट्रातही डॉ. मेहमूद-उर-रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना झाली. या गटाने मागास मुस्लिमांसाठी ८ टक्के आरक्षण असावे, अशी शिफारस केली. या आणि स्वातंत्र्योत्तर काळात नेमण्यात आलेल्या इतर आयोगाने ज्या शिफारसी केल्या, त्याचा आधार घेत महाराष्ट्र शासनाने मागास मुस्लिमांसाठी ५ टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली. त्यात महाराष्ट्रातील ५० जातींचा समावेश केला. पण या यादीत नमूद केलेल्या अनेक जाती अस्तित्वात असल्याचे मुस्लिमांनाही माहीत नाही. २०१४मध्ये महाराष्ट्रातील सरकार बदलले आणि मागील सरकारने काढलेला अध्यादेश पडून राहिला. मागास मुस्लिमांना शासनाने दिलेले ५ टक्के आरक्षण कायम राहावे, म्हणून अनेक लोक उच्च न्यायालयात गेले. मुस्लीम सत्यशोधक मंडळानेही जनहित याचिका दाखल केली होती. न्यायालयाने आपल्या निवाड्यात ५ टक्के आरक्षण शिक्षणात असावे, असा निवाडा दिला. मात्र बदललेल्या सरकारने पूर्वीच्या सरकारच्या अध्यादेशावर शिक्कामोर्तब केले नाही. म्हणून हा मुद्दा पुन्हा-पुन्हा ऐरणीवर येत आहे.

मुस्लीम समाजातल्या मागास जातींची यादी मोठी आहे. त्यांची स्थिती अन्य मागास जातींहून अधिक वाईट आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि समता, समान संधी व सामाजिक न्यायासाठी आरक्षण महत्त्वाचे आहे. समतोल विकास झाल्यास हा समाजसुद्धा देशाच्या उन्नतीमध्ये वाटा उचलू शकेल. तो इतरांपेक्षा मागे राहणार नाही, याची खबरदारी कल्याणकारी राज्याने घेतली पाहिजे. मात्र या संदर्भात समज-गैरसमज पसरवले

जातात. आरक्षणाची मागणी संविधानात्मक पद्धतीने होत असताना, त्याला जमातवादी स्वरूप येणार नाही, याचीही काळजी घेतली पाहिजे. मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढावे, अशी अपेक्षा बाळगणाऱ्यांनी आरक्षणाचे समर्थन केले पाहिजे.

सध्या आरक्षणाची बाजू मांडणारे अनेक गट संविधानात्मक अधिकार म्हणून आरक्षणाचे समर्थन करतात. मात्र आपल्याच समाजातील महिलांना संविधानात्मक हक्क मिळवून देण्यासाठी पुढे येत नाहीत. यामुळे भारतीय समाजात मुस्लीम नेतृत्व हवी ती प्रगल्भता व परिपक्वता सिद्ध करत नसल्याचे स्पष्ट होते. यामुळे 'शरीयत बचाने के लिए संविधान बचाओ' अशा घोषणांचा फज्जा उडतो.

मुस्लीम समाजाला आरक्षणाचा हवा तसा फायदा मिळाला नाही. तसेच पंतप्रधानांच्या 'पंधरा कलमी' कार्यक्रमानेसुद्धा मुस्लीम समाजाची फारशी स्थिती बदलली नाही. वरवरची मलमपट्टी दीर्घ आजारावर चालणार नाही. याच दृष्टीकोनातून मुस्लीम सत्यशोधक मंडळ आरक्षणाचे समर्थन करताना, मुस्लीम महिलांना संविधानात्मक हक्क मिळावेत आणि 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'त सुधारणा व्हावी, यासाठी पन्नास वर्षांपासून आग्रह धरत आले आहे.

भविष्यात मुस्लीम समाजाला आरक्षण मिळाल्यास, त्यातील ५० टक्के आरक्षण मुस्लीम महिलांसाठी आरक्षित करण्याची मागणी मंडळ करेल. कारण मुस्लीम महिलांच्या अनेकांगी समस्या सोडवण्यासाठी ते एक प्रभावी साधन असेल.

**मुस्लीम आरक्षणातील अडचण**

मागासवर्गीयांसाठी आरक्षण हा मुद्दा भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून, किंबहुना त्याही पूर्वीचा आहे. शाहू महाराजांनी समता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आरक्षणाचे समर्थन केले. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठा-मुस्लीम आरक्षणाची घोषणा करण्यात आली.

भारताच्या संविधानात मागास वर्गासाठी खास सवलती असाव्यात, या हेतूने कलम १६(४) ची तरतूद आहे. असे असले तरी घटनेत 'मागास वर्ग' या शब्दाची व्याख्या नाही. संविधानाच्या ३४०व्या कलमानुसार राष्ट्रपतींना आयोग नेमता येतो. त्याने 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास' कोण आहेत व कोणते खास उपाय योजावेत, हे सुचवावे असे नमूद केले आहे. या कलमात 'जात' असा शब्द नसून 'वर्ग' असा शब्द आहे. वर्ग म्हणजे काय? आणि सामाजिक-शैक्षणिक मागासलेपणा म्हणजे काय? हे आयोगाला निश्चित करावे लागते. हे अवघड व गुंतागुंतीचे काम आहे. या संदर्भात न्यायालयांनी मोठ्या प्रमाणात चर्चा करून अर्थ लावले आहेत.

राज्यघटनेत १५(४) हे कलम नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने मागास वर्गासाठी केलेल्या खास तरतुदी रद्द ठरवल्या, तेव्हा हे कलम घालण्यात आले. त्यासाठी घटनेत पहिली दुरुस्ती १९५१मध्ये करण्यात आली. ही दुरुस्ती करताना 'आर्थिक मागासलेपणा' असा शब्द असावा, असे सुचवण्यात आले होते, परंतु ते नाकारण्यात आले. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू म्हणाले होते, 'वेगवेगळ्या कारणांमुळे इथे असे वर्ग आहेत, जमाती आहेत, व्यक्ती

व गट आहेत, जे मागासलेले आहेत, ते अनेक रितीने मागासलेले आहेत. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इ. आपल्याला त्यांना प्रोत्साहन द्यायचे असेल, तर आपण त्यांच्यासाठी काही तरी खास केले पाहिजे.'

भारतातील मुस्लीम समाजाच्या प्रगतीसाठी मात्र आजतागायत असे 'खास' प्रयोग करण्यात आले नाहीत. पंधरा कलमी कार्यक्रम, अल्पसंख्याक आयोग आणि मंडल कमिशनने समाविष्ट केलेल्या मुस्लीम समाजातील इतर मागासवर्गीय सोडल्यास या समाजाच्या उत्कर्षासाठी दुर्लक्षच करण्यात आले. भारतीय मुस्लिमांमध्ये ९५ टक्के मुस्लीम येथील मूलनिवासी आहेत. फक्त ५ टक्के 'अशरफ' उच्चवर्गीय व वंशीय हे बाहेरच्या मुस्लीम देशांतील आहेत. यापैकी जवळपास ७५ टक्के समाज हा भारतातील अप्रगत आदिवासी, अस्पृश्य, दलित आहे. नाकारलेले, अस्पृश्य, अपमानित जीवन जगणारे हे लोक इस्लामच्या समता, बंधुता तत्त्वांकडे आणि सुफी संतांच्या प्रचारामुळे, तसेच काही प्रमाणात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या प्रलोभनामुळे व जबरदस्तीने धर्मांतरित झालेले आहेत. धर्मांतरामुळे त्यांच्या सामाजिक दर्जात फरक पडला असला, तरी शैक्षणिक, आर्थिक स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. या मुळात मागास असणाऱ्या समाजाला 'इस्लाम' स्वीकारल्यामुळे स्वातंत्र्योत्तर धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेत समान संधींपासून वंचित ठेवण्यात आले.

मुस्लीम समाजाच्या मागासलेपणास जसे धर्मांतर कारणीभूत आहे, तसेच माय-बाप सरकारने या समाजाच्या विकासासाठी ठोस उपाययोजना न करता समाजातील ५ टक्के उच्चवर्गीय (अशरफ) राजकीय-धार्मिक पुढाऱ्यांच्या लाभासाठी व स्वतःचे राजकीय स्वार्थ साधण्यासाठी निर्णय घेतले, हेही. मुस्लीम समाजातील मुल्ला-मौलवी गटानेसुद्धा समाजाची कायमच दिशाभूल केली. सुधारकांना, शिक्षणतज्ज्ञांना 'काफर' ठरवले आणि सामान्यांसाठी 'फतवे' काढले. मात्र, या समाजाचा दर्जा उंचावण्यासाठी लोकशिक्षण तर सोडाच, खऱ्या इस्लामची शिकवणही दिली नाही. खरी शिकवण देणाऱ्या मौलाना आझादांवरसुद्धा टीकास्त्र सोडले आणि त्यांनाही 'काफर' ठरवण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही, तर त्यांना ठेचून मारण्याची शिक्षाही सुनावली.

भारतातल्या सनातनी, जमातवादी हिंदू गटानेही मुस्लीम द्वेष जपला, अपप्रचार केला. विविध पद्धतीने मुस्लिमांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. धर्मनिरपेक्ष नेतृत्वाने सुद्धा मुस्लीम समाज सुधारण्यासंदर्भात स्पष्ट भूमिका घेतली नाही. (काही अपवाद वगळता) जागतिक पातळीवरील मुस्लीम देशांतील घडामोडींचा भारतीय मुस्लीम समाजावर परिणाम झाला, समाजसुद्धा प्रगतीऐवजी मुस्लीम जमातवादी शक्तीकडे आशेने पाहू लागला, यामुळेच तो अधिकाधिक मागास राहिला.

महाराष्ट्र सरकारने मराठा-मुस्लीम आरक्षणाचे नाणे वाजवले असल्याचा विरोधी पक्षांचा दावा आहे. तसेच वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून या विषयाकडे पाहण्यात येत आहे. प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा असला, तरी या निर्णयाचे समर्थन आणि स्वागत खालील कारणांमुळे करावे लागणार आहे-

१) १९५०च्या संविधानात्मक आदेशानुसार जेव्हा राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद होते, तेव्हा एस.सी.मध्ये फक्त हिंदू समाजातील मागास जातींचा समावेश करण्यात आला. नंतर त्यात सुधारणा करून बौद्ध आणि शीख या अल्पसंख्याक समाजाचा समावेश केला गेला. मात्र याच प्रमाणात मागास असणाऱ्या मुस्लीम समाजातील भंगी/मेहतर या समाजाचा आणि ख्रिश्चन धर्मातील मागासांचा समावेश नाही.

२) मुस्लीम समाजातही माकडवाले, अस्वलवाले, दरवेशी, शिकलगार, छप्परबंद, दर्जी, पिंजारी आणि भटक्या-विमुक्त जमाती आहेत. त्यांचा ओबीसी/एनटीमध्ये समावेश असला, तरी अन्य समाजातील ओबीसी/एनटीच्या स्पर्धेत ते टिकू शकत नाहीत. त्यांना स्वतंत्र आरक्षण नाही.

३) अनेक मुस्लिमांचे पारंपरिक व्यवसाय नामशेष झाले आहेत. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या युगात बांगड्यावाले, टांगेवाले, रिक्षावाले मागे पडले. खाटीक समाजाच्या पारंपरिक व्यवसायात अन्य समाजही उतरला आहे.

४) दारिद्र्य निर्मूलन, शिक्षणाचा अधिकार, समता, समानसंधी हे देशासमोरील प्रश्न आहेत. मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य, निरक्षरता आहे, नोकरीचे प्रमाण कमी आहे.

५) एकूण शिकणाऱ्या समाजापैकी ४ टक्के मुस्लीम मदरशांमधून शिक्षण घेतात. उपलब्ध संधींचा अभाव, दारिद्र्य हे त्याचे कारण आहे. उर्दू माध्यमातून शिकणाऱ्या मुलांमध्ये, विशेषतः मुलींमध्ये स्थगन व गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये संधी मिळाल्यास शिक्षणाचे प्रमाण वाढेल, शिवाय निकोप सामाजिकीकरणासाठी हे पाऊल उपयुक्त ठरेल. यामुळे राज्याचे कल्याणकारी उद्दिष्टसुद्धा साकारले जाईल.

६) शिक्षणातून व आर्थिक विकासातून समाजात एक बुद्धिजीवी वर्ग निर्माण होईल, जो की या समाजाला प्रगतीकडे जाण्याची प्रेरणा देईल. पारंपरिक नेतृत्वाला पर्याय देण्यासाठी असा बुद्धिजीवी वर्ग तयार करणे, समाजाच्या उन्नतीसाठी योगदान करू शकतो.

७) समाजातील हतबलता, नकारात्मकता घालवण्यासाठी आणि समाजात सकारात्मक विचार अधिक प्रमाणात रुजवण्यासाठी शिक्षण व स्थैर्य आवश्यक आहे. सज्ञान वाढल्यास प्रबोधनाचे विषय समाजात रुजतील व त्याला प्रतिसादही मिळेल. केरळमध्ये साक्षरता जास्त आहे, म्हणून मुस्लीम समाजातील लोकसंख्या नियंत्रणाचे प्रमाणही जास्त आहे.

**मुस्लीम आरक्षणासमोरील संभाव्य अडथळे**

१) आरक्षणाचा फायदा गरजूंनाच व्हायला पाहिजे; अन्यथा वरचे वर्ग खालच्या वर्गापर्यंत सुविधा पोहोचू देणार नाहीत. यासाठी नॉन-क्रिमिलेअरची अट असणारच. शिवाय सध्या ओबीसी/एनटीमध्ये समावेश असणाऱ्या मुस्लीम मागास जाती आणि मुस्लीम आरक्षण या संदर्भातील तपशील, लाभार्थ्यांची यादी इ. संदर्भात स्पष्टता दिसत नाही.

२) राष्ट्रपतींच्या संविधानात्मक आदेशात म्हणजेच १९५०च्या कायद्यात सुधारणा करून मुस्लीम समाजाचा समावेश केल्याशिवाय यास संविधानात्मक आधार मिळेल का? या

निर्णयाविरोधात न्यायालयात अर्ज गेल्यास न्यायालयाची भूमिका काय असेल? सध्या तमिळनाडूमध्ये ६८ टक्के व आंध्र प्रदेशात ६२ टक्के आरक्षण आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण ७३ टक्के होणार आहे. न्यायालयाने आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक असू नये, असा निर्णय यापूर्वीच दिला आहे. तमिळनाडू व आंध्र प्रदेशातील आरक्षणाचे प्रकरण न्यायालयात आहे. त्यावर अजून निर्णय झालेला नाही.

या संदर्भात, राज्य सरकारने काही गृहपाठ (होमवर्क) केला आहे का, याची माहिती नाही. तरी त्या संदर्भातील निवेदन-नोटीस त्या त्या विभागांना देण्यात आली नाही. या अडथळ्यांचा गांभीर्याने विचार करावा लागेल.

३) जगातला मुस्लीम एक आहे. 'उम्मत' संकल्पना, मुस्लीम समाजातील राजकीय पद आणि मुस्लीम समाजावर सत्ता गाजविणारा 'अशरफ' वर्ग, आरक्षणाच्या विरोधात जाऊ शकतो. समाजातील अज्ञान-दारिद्र्य सत्ता टिकवण्यासाठी उपयोगी पडते. आरक्षणामुळे मुस्लीम समाजात फूट पडू शकते आणि आपली पकड जाईल, अशी असुरक्षितता या समाजातील प्रस्थापित नेत्यांना वाटत असणार. कोल्हापूरमधील मुस्लीम नेत्यांनी आरक्षणाविरोधात वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली आहे.

४) मुस्लिमांचा विरोध हा काही राजकीय पक्षांचा अजेंडा आहे. तसेच सत्ताधारी पक्षाचे निर्णय हाणून पाडणे, हे राजकीय कार्य असते. अशा प्रसंगी सरकारला गांभीर्याने निर्णय घ्यावे लागतील, समाजातील अन्य धर्मीय या आरक्षणाकडे सकारात्मक पाहतील का? आरक्षणाविरोधात जनमत निर्माण करण्याचा प्रयत्न होईल.

५) १९५०च्या कायद्यात सुधारणा केंद्र सरकारच करू शकते. सध्या भाजपप्रणीत सरकार आहे. त्यांना हा विषय प्रिय आहे का? राज्यात कोणाचे सरकार येणार, हे सांगता येणार नाही, अशा प्रसंगी या महत्त्वाच्या विषयाचे भवितव्य अधांतरीच राहणार आहे. मुस्लीम आरक्षणाचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी अडचणींची यादीही न संपणारी आहे. पारदर्शक राजकीय इच्छाशक्ती असल्यास मार्ग काढणे अवघड असले, तरी अशक्य नाही. सर्व भारतीय समुदायाने याकडे मुस्लीम प्रश्न म्हणून न पाहता भारतीय प्रश्न म्हणून पाहणे सर्वांच्या हिताचे आहे.

## १.३ वैज्ञानिक दृष्टीकोन

वैज्ञानिक दृष्टीकोन तयार करणे, समाज विवेकी आणि आधुनिकतावादी बनवणे हे मंडळाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. असा दृष्टीकोन तयार झाल्यास मुस्लीम समाजप्रबोधनाच्या विषयालाही चालना मिळू शकते.

धर्म, धर्माधिष्ठित परंपरा, चालीरिती, संस्कृती आणि काही प्रमाणात भाषा, या चिरंतन असतात की तात्कालिक, यासंदर्भात विचार करण्यास दिशा मिळते असा मंडळास विश्वास आहे. जवळपास सर्व धर्मांनी ऐहिक आणि पारलौकिक जीवनाविषयी आपले तत्त्वज्ञान मांडलेले आहे. सर्वसाधारणपणे सर्व धर्मांनी आध्यात्मिकता (Spirituality), नैतिकता (Morality) आणि स्वतंत्र धार्मिक ओळख (Identity) या विषयावर भाष्य केलेले आहे. यातील चिरंतन आणि तात्कालिक बाबींवर सातत्याने वाद-प्रतिवाद, चर्चा होत आल्या आहेत. मानवाच्या उत्क्रांतीमध्ये धर्माचे योगदान वादातीत आहे. तथापि आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात धर्माच्या मर्यादा विविध प्रकारे अधोरेखित होतात. प्राचीनता आणि आधुनिकता यांतील संघर्ष अटळ आहे. प्रत्येक गोष्टींना त्या-त्या काळात काही अर्थ आणि उपयुक्तता असल्याशिवाय त्या गोष्टी अस्तित्वात येणार तरी कशा? जी गोष्ट हजार, पाचशे, शंभर वर्षांपूर्वी उपयुक्त होती, ती आज आहे का? यामुळे ज्या गोष्टी श्रद्धेच्या होत्या, त्या आजच्या बदललेल्या परिस्थितीत आणि निकषांवर तपासण्याची किंवा चिकित्सेची गरज वाटते. सामान्य लोकांना बदल नको असतो, भले त्यामुळे त्रास किंवा नुकसान सहन करावे लागले तरी!

मानवी इतिहासात विविध टप्प्यांवर प्रेषित, संत, सुधारक, तत्त्वज्ञ निर्माण झाले. वैज्ञानिकांनी विविध शोध लावून प्रचलित अनेक श्रद्धांना छेद दिला आणि विचार करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे समाजाची प्रगती होत राहिली. आज आपण एकविसाव्या शतकातील सुविधा उपभोगतो, तेव्हा 'जुने ते सोने' असे अधिकाराने सांगणे कठीण जाते. बदललेल्या काळाशी सुसंगत वर्तन करणारे आणि प्राचीनतेतील श्रद्धा-अंधश्रद्धांचे आचरण करणारे गट समाजात दिसायला लागतात. या गटांत संघर्ष होतो आणि नव्या पिढ्या जन्माला येतात. धर्माने व्यक्त केलेली आध्यात्मिकता ही मरणोत्तर काळातील अनिश्चिततेमुळे, अज्ञानामुळे आणि भीतीमुळे टिकून आहे.

यातून जशा श्रद्धांच्या बाबी निर्माण झाल्या, तशाच जवळपास सर्वच धर्मसमूहांत धर्माने अंधश्रद्धांनाही जन्मास घातले आहे. आज अनेक अंधश्रद्धांचे निर्मूलन झालेले आपण अनुभवतो, तसेच आपल्या आजूबाजूला अस्तित्वात असलेल्या अनेक अंधश्रद्धाही पाहतो. समाज त्याचा बळी ठरतो, तसेच वाहकसुद्धा! समाजातील सद्गुण, सदाचार, परोपकार या बाबी 'नैतिकता' दर्शवतात. अशा नैतिक गुणांमुळे समाजात 'चांगुलपणा' टिकून आहे. मात्र एकेकाळी जे नैतिक म्हटले जायचे, ते आजच्या काळात नैतिक असेलच असे नाही. विशिष्ट परंपरा-चालीरितींचे पालन ही धार्मिक नैतिकता समजली जायची; मात्र बदलत्या काळात असे वर्तन अनैतिक, आक्षेपार्ह आणि कायद्याच्या दृष्टीने अपराध ठरू शकते. धार्मिक नैतिकतेच्या अनेक

‘टिकावू’ प्रथा आज ‘टाकावू’ ठरल्या आहेत. ज्या समाजाने विज्ञानाचा आधार घेऊन टिकावू आणि टाकावू यात फरक केला, तो प्रगतिपथावर आहे.

ओळख, अस्मिता आणि वेगळेपणाच्या भावनेतून निर्माण झालेल्या आणि आजही अस्तित्वात असलेल्या सांस्कृतिक, भाषिक, प्रादेशिक वेगळेपणात सर्वच ‘टाकावू’ असण्याचे कारण नाही. समाजातील या विधायक विविधतेचा आपण सन्मान केला पाहिजे. मात्र विविधतेच्या आड लपलेल्या विषमतेचे निर्मूलन करण्यास तत्पर असले पाहिजे. आज या अस्मितेच्या आणि स्वतंत्र ओळख म्हणून अस्तित्वात असणाऱ्या परंपरा वाद–विवादास जन्म देत आहेत. यातून ‘सांस्कृतिक दहशतवाद’ जोपासला जात असल्याचे दिसते. एकेकाळी ज्याला स्वीकृती होती, त्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. मुस्लीम समाजातील बुरखा, मशिदीवरील अजानचा भोंगा, तलाक–बहुपत्नीत्व यांसारखे विषय वाद–विवादाच्या केंद्रस्थानी आहेत. एकेकाळी अजानचा आवाज ‘पवित्र’ वाटायचा, त्यात मुस्लिमेतरांना ‘गोडवा’ जाणवायचा. आज हा आवाज इतरांना कर्कश्श वाटत असेल किंवा ध्वनिप्रदूषणास कारणीभूत वाटत असेल, तर बदललेल्या परिस्थितीत त्याची उपयुक्तता, योग्य–अयोग्यता तपासली पाहिजे.

नमाजची आठवण करून देणारी अजान ही प्रथा निर्माण झाली, तेव्हाची सामाजिक–वैज्ञानिक स्थिती आणि आजच्या काळातील तंत्रज्ञानाने निर्माण केलेली स्थिती, यातील फरक समजून घेणे; आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही, शांतता–सुव्यवस्था बाधीत होणार नाही, याचा समंजस विचार समाजातील सभ्यता व्यक्त करतो. अनाठायी अट्टाहासातून अनेक विघ्ने निर्माण होतात.

‘ओळख’ (Identity) हे धर्माचे तिसरे अंग आजच्या काळाची गरज आहे का? त्यातून अलगतावाद जोपासला जातो का? ज्या गोष्टींत उपद्रवक्षमता नसते, त्या ‘वादा’च्या ठरू नयेत. हा समंजसपणा वाढला, तर धार्मिक सलोखा, सद्भाव आणि संवाद टिकून राहील.

आपला समाज अद्याप ‘धर्मचिकित्से’साठी तयार नाही. धर्माची स्थापना ईश्वराने केली, अशी एक श्रद्धा धार्मिक लोक बाळगतात. ‘धर्म आणि ईश्वर’ या विषयावर बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी आक्षेप नोंदवला आहे. ‘धर्म आणि ईश्वर’ ही अंधश्रद्धेची जननी आहे. या संकल्पनेमुळे समाजात अन्याय, अत्याचार आणि शोषण होते, अशी एक मांडणी केली जाते. एखाद्याची श्रद्धा दुसऱ्यांना अंधश्रद्धा वाटू शकते. आपण अंधश्रद्धेचे निर्मूलन करताना काहींच्या श्रद्धांना धक्का लागून भावना दुखावण्याची शक्यता असते. त्यामुळे एखादी बाब श्रद्धेची आहे की अंधश्रद्धेची, हे ठरवत असताना त्याची उपकृतक्षमता आणि उपद्रवक्षमता तपासली पाहिजे. व्यक्तिगत पातळीवरील एखादी कृती दुसऱ्यांच्या हितसंबंधांना उपद्रव करत नसेल, तर अशा कृतींकडे दुर्लक्ष करून त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची गरज नाही, असा सन्माननीय तोडगा काढता येतो. हा तोडगा एकदा मान्य केला की, अनेक गुंते सोडवणे शक्य आहे. त्यातून समाजाच्या प्रगतीसाठी निकोप वातावरण निर्माण होते.

जगात अस्तित्वात आलेले धर्म आणि धर्मसंस्थापक त्या–त्या काळातील समस्या सोडवण्याच्या हेतूने प्रेरित होते. प्रस्थापितांविरोधातील ते एक बंड होते. म्हणून प्रस्थापितांनी

अशा प्रेषित आणि धर्मसंस्थापकांचा छळ केला. तसेच काहींना मृत्यूदंड दिला. नवा धर्म स्वीकारला, तरी काही जुन्या गोष्टी सोडण्यात आल्या नाहीत. कालांतराने त्याच गोष्टी धर्मचौकटीत स्थिरावल्या. सुधारकांनी समाजाला शहाणे करण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला. प्रस्थापित श्रद्धा या अंधश्रद्धा कशा आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न केला. समाजाने त्यांचा सॉक्रेटिस आणि गॅलिलिओप्रमाणे छळ केला; पण नंतर समाजाला सॉक्रेटिस आणि गॅलिलिओंचे महत्त्व उमजले आणि आज आपण त्यांची 'महती' गातो.

धर्मस्थापनेचा काळ आणि आजचा काळ यातील अंतर पाहिल्यास, तसेच दोन्ही काळातील सामाजिक-धार्मिक-वैज्ञानिक स्थितीचा अभ्यास केल्यास, या दोन्ही काळातील तफावत लक्षात येईल. हिंदू समाजासाठी आस्थेचा आणि श्रद्धेचा ग्रंथ म्हणून 'श्रीमद् भगवतगीते'चा उल्लेख केला जातो. भगवतगीता सुमारे चार-पाच हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात आली. ख्रिश्चन बांधवाचा पवित्र 'बायबल' सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे. मुस्लिमांसाठी मार्गदर्शक असणारे पवित्र 'कुराण' चौदाशे वर्षांपूर्वीचे आहे. बुद्धिझमचे पवित्र 'धर्मपद', तसेच जैन धर्मियांचे पवित्र 'आगम' हे अडीच हजार वर्षांपूर्वीचे आहे. ज्यू धर्माचे 'तोराह' पाच हजार वर्षांपूर्वीचे, तर पारशी धर्मातील पवित्र 'अवेस्ता' तीन हजार वर्षांपूर्वीचे आहे. 'ताओ' आणि 'शिंतोइझम' अडीच हजार वर्षांपूर्वीचे आहे.

थोडक्यात, सर्व धर्मांचे आणि धर्मग्रंथांचे अस्तित्व साधारणपणे किमान दोन हजार वर्षांपूर्वीचे आहे. त्यातल्या त्यात इस्लाम आणि 'कुराण' सुमारे चौदाशे वर्षांपूर्वीचे असल्याने त्यास सर्वांत अलीकडचे म्हणता येईल.

ज्या अरबस्थानात 'इस्लाम' अस्तित्वात आला, त्या काळात तिथे मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा होत्या. अन्याय, अत्याचार, शोषण होते. मुलगी जन्मतः पुरून टाकण्याची पद्धत होती. पुरुषांनी किती महिलांशी विवाह करायचा यावर मर्यादा नव्हत्या. पुरोहित वर्गाकडूनही आर्थिक शोषण होत होते. सावकारशाही होती. महिलांना पळवून नेले जात होते. जुगार आणि व्यसनाधिनता होती. लूटमार करणाऱ्या टोळ्या होत्या. अशा परिस्थितीत मुहम्मद पैगंबरांनी 'इस्लाम'ची स्थापना केली, 'कुराण' अस्तित्वात आले.

इस्लामपूर्व काळातील काही परंपरा आणि नव्या परंपरा उदयास आल्या. अत्यंत कमी कालावधीत सर्वाधिक प्रभाव टाकणारा इस्लाम आणि पैगंबर मुहम्मद आकर्षणाचे केंद्र झाले. इतर धर्मांप्रमाणेच 'ईशवाणी'चा आधार घेण्यात आला. 'देववाणी' म्हटल्यावर त्यावरील 'श्रद्धा' अनिवार्य ठरवण्यात आली. त्यातून अपरिवर्तनशीतेला महत्त्व आले. पैगंबरांनंतर शिया-सुन्नी या पंथांची निर्मिती झाली. नंतर मतभेदांतून विविध उपपंथ आस्तित्वात आले. भारतात बरेलवी-देवबंदी प्रवाह निर्माण झाले. यामधील श्रद्धा-अंधश्रद्धा याची काही प्रमाणात चर्चा झाली असली, तरी बुद्धिप्रामाण्यवादी पद्धतीने इस्लाम चिकित्सा करण्याचे प्रयत्न फार थोडे झाले आहेत.

इस्लामचा पवित्र ग्रंथ 'कुराण' ईश्वरनिर्मित आहे की मानवनिर्मित, असा प्रश्न उपस्थित करणे, हा धर्मवाद्यांच्या दृष्टीने अपराध आहे. जे इस्लामचे अनुयायी आहेत, त्यांच्यासाठी प्रथम

अट आहे की, त्यांची अल्लाह आणि त्यांचा पैगाम देणाऱ्या रसूल अर्थात पैगंबरावर दृढ निष्ठा असली पाहिजे. 'इमान' असले पाहिजे. ज्यांचे 'इमान' नाही, तो मुस्लीम नाही, अशी एक मांडणी आहे. 'कुराण' आणि 'हदिस' (पैगंबरांच्या जीवनातील आचार-विचार यांचा संग्रह) हे इस्लामचे मूलाधार आहेत. ते सत्य आहेत, अशी मुस्लिमांची श्रद्धा आहे. याला 'अंधश्रद्धा' म्हणणाऱ्याला 'काफर' किंवा 'धर्मद्रोही' ठरवले जातो.

'कुराणा'वरील श्रद्धा म्हणजेच पोथीनिष्ठा आणि पैगंबरांवरील श्रद्धा म्हणजे व्यक्तीनिष्ठा, या स्वतंत्र विचाराला नियंत्रित करतात. शिकले-सवरलेले अशीही मांडणी करतात की, धर्माधिष्ठित रूढी, परंपरा कालबाह्य नसतात. अशा परंपरांना वैज्ञानिक आधार असतो. अशा मांडणीमुळे कालविसंगत परंपरा आणि श्रद्धा-अंधश्रद्धा बाजूला सारण्याऐवजी त्याची आधुनिक विज्ञानाशी सुसंगती दाखवण्याचा प्रयत्न होतो. लोकांची दिशाभूल करण्यासाठी 'छद्म-विज्ञान' मोठी भूमिका पार पाडत असते. यास कोणताही धर्मवादी समाज अपवाद असण्याचे कारण नाही.

धार्मिक तत्त्वज्ञान दोन गटांत विभागता येते. पहिला परलोक आणि दुसरा इहलोक. मुस्लीम समाजाबद्दल बोलायचे झाल्यास यालाच 'इबादत' आणि 'आदत' या भागांत विभागता येते. 'इबादत'मध्ये व्यक्तीचा परमेश्वराशी संबंध असतो, तर 'आदत'मध्ये व्यक्तींचा इतर व्यक्तींशी, माणसांशी, समाजाशी किंवा देशाशी संबंध असतो. या अर्थाने 'इबादत' ही व्यक्तीस्वातंत्र्याची किंवा धर्मस्वातंत्र्याची बाब आहे. 'इबादत' केल्याने त्याचे इतरांवर वाईट परिणाम होत नाहीत! 'आदत' ही दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्यामुळे ती परिवर्तनीय असली पाहिजे. जे परिवर्तनीय आहे, त्याला 'दैवी' म्हटल्यामुळे अंधश्रद्धा निर्माण होतात.

समाजातील मुल्ला-मौलवी, उलेमा या पुरोहित वर्गाने स्वतःचा इस्लाम सामान्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला आहे. 'जे 'कुराणा'त आहे ते इस्लामला अनुसरून आहे आणि जे 'कुराणा'त नाही ते इस्लामविरोधी आहे', असा संदेश देऊन अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. परिणामी समाज प्रगतीशील होण्याऐवजी कालबाह्य प्रथा, परंपरा आणि तथाकथित श्रद्धांच्या भोवती रेंगाळत राहतो.

अज्ञान-अंधारयुगात अपुऱ्या ज्ञानावर आधारित नवी दिशा दाखवून समाज नियंत्रणासाठी 'धर्म' संकल्पना अस्तित्वात आली. त्या अर्थाने ही प्रक्रिया 'तिमिराकडून तेजाकडे' जाणारी आहे. मर्यादित साधने, माहिती, निसर्गाचे आकलन आणि मानवाला प्रगतीशील बनवण्याच्या या खटाटोपात विज्ञानाने प्रवेश केला. मानवाचे आकलन विस्तारत गेले. काहींना प्रवाहाविरुद्ध जाण्याची किंमत द्यावी लागली. विज्ञानामुळे सृष्टीच्या नियमांची जाणीव झाली. ज्ञान विस्तारले गेले आणि नवी दृष्टी मिळाली.

आता जे काही चमत्कार पाहायला मिळतील, ते दैवी असणार नाहीत. हे सर्व चमत्कार विज्ञानामार्फत होत राहतील आणि आपण ते स्वीकारत राहू. असे करताना लोक बदलाचे श्रेय वैज्ञानिकांना देण्याऐवजी दैवी शक्तीलाच देतील हा भाग वेगळा. ती वैज्ञानिकांप्रती दाखवलेली एक प्रकारची कृतघ्नता आहे. मानवी बुद्धीला श्रेय देण्याऐवजी दैवी शक्तीला श्रेय देणे, ही माणसांची मर्यादा आहे.

नव्या काळातील आव्हाने सोडवण्यासाठी नवे तंत्र आणि मंत्र उपयोगाचे ठरतील. नव्या समस्या, नवी आव्हाने आम्ही हजार वर्षांपूर्वीच्या धर्मग्रंथांत शोधण्याचा प्रयत्न केल्यास समस्या सुटण्याऐवजी त्यांचा गुंता वाढेल. उदाहरण घ्यायचे झाल्यास लोकसंख्या नियंत्रण ही आजच्या काळाची गरज आहे. कुटुंब नियोजनास धर्म परवानगी देतो की नाही, याचे उत्तर धर्मग्रंथात शोधण्याची गरज नाही. मात्र आम्ही यासाठीसुद्धा धर्मग्रंथांचा आधार घेतो. ही ओढाताण कशासाठी करायची?

इस्लाम अस्तित्वात आला, त्या काळात पुरुषप्रधानता होती, महिलांना दुय्यम स्थान होते. अनियंत्रित विवाह केले जायचे. मुली जन्मतः मारल्या किंवा पुरल्या जात. गुलामांची प्राण्यांप्रमाणे खरेदी-विक्री होई. जनावरांप्रमाणे त्यांच्याकडून कामे करून घेतली जात. काळा-गोरा भेद केला जायचा. जुगार, सावकारशाही होती. या काळात इस्लामने जी शिकवण दिली, ती समानतेच्या दिशेने जाणारी होती. विषमता नष्ट करणारी आणि शोषणमुक्त समाज निर्मितीची होती. मात्र समानतेची ही तत्कालीन संकल्पना परिपूर्ण होती, असे म्हणता येणार नाही. आज समानतेचे निकष बदलले आहेत. समानता अधिक परिपक्व होताना दिसते. तेव्हा तलाक, बहुपत्नीत्व, हलाला या तरतुदींकडे बघताना त्याला आधुनिक समानतेचे निकष लावणार की, पारंपरिक धर्माधिष्ठित निकष लावणार? 'एका पुरुषाची साक्ष बरोबर दोन महिलांची साक्ष' हे तत्त्व त्या काळात क्रांती असेल, आज मात्र ते विषमतादर्शकच आहे.

भौगोलिक सामाजिक परिस्थिती, पुरुषप्रधानता, वैरभाव, अप्रगत मानसिकतेतून उदयास आलेला बुरखा, हिजाब, पडदापद्धती आज कालबाह्य ठरू शकतात. अनेकांनी त्याचा त्याग केला आहे. या गोष्टी 'इबादत' किंवा धर्मश्रद्धेच्या नसून त्या 'आदत'शी, रोजच्या व्यवहाराशी संबंधित आहेत. त्या कालसापेक्ष करण्यात धर्म आडवा येण्याचे काही कारण नाही.

याचबरोबर 'काफर', 'जिहाद' या संकल्पनांचा अर्थ त्या काळात त्या कोणत्या हेतूने अस्तित्वात आला? त्याचा मूळ अर्थ काय? हे समजून घेताना जे आज कालविसंगत वाटत असेल, ते गव्हातून खडा बाजूला काढतात, त्याप्रमाणे या गोष्टी बाजूला सारण्यातच 'माणूसपण' आहे. माणसांच्या दुनियेत माणसांनीच न्यायाचे राज्य आणले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी कुठलाही धर्म, रूढी, परंपरा यांचा अडसर येऊ नये. यासाठी प्रत्येकाने आपल्या धर्माचे परीक्षण करावे, धर्मचिकित्सा करावी. असे केल्याने श्रद्धांचे उन्नयन आणि अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्यास गती मिळेल.

सैद्धान्तिक इस्लामने अंधश्रद्धा आणि चमत्कारांना विरोध केला आहे. असे असतानाही इस्लामच्या संस्कृतीत आणि धार्मिक परंपरेत अनेक अंधश्रद्धा आहेत. या अंधश्रद्धा कोणत्या, याचा तपशील घेण्यापूर्वी धक्कादायक वस्तुस्थिती अशी आहे की, इस्लामचा धर्मग्रंथ 'कुराण' दैवी आहे, अल्लाहची वचने आहेत, मोहंमद पैगंबर हे प्रेषित आहेत, यावरील अटळ श्रद्धा बाळगणे हीच एक अंधश्रद्धा ठरू शकते. पैगंबरसाहेबांची दृष्टी, त्यांनी मानवतेला दिलेले योगदान हे निश्चितपणे वरदान आहे. त्याचे मूल्यमापन पैगंबर हे एक माणूस होते, या पद्धतीने केले, तर त्यांची थोरवी अधिक जाणवायला लागेल. तसेच माणूस असल्यामुळे त्यांच्या

व्यक्तिमत्त्वातसुद्‌धा त्रुटी, उणीवा असू शकतात, हे गृहीत धरता येईल. दैवी आणि परिपूर्णतेचा शिक्का मारला की, त्यात सुधारणेला फारसा वाव मिळणार नाही.

मानवनिर्मित काही वाद समाजासमोर येत असतात. उदाहरणार्थ काही धर्मवादी राजकारण करणाऱ्या मंडळींनी केलेले व्यक्तव्य चव्हाट्यावर आले. 'मी भारतमाता की जय' म्हणणार नाही, 'वंदे मातरम्' हे घोषवाक्य म्हणणार नाही, किंवा चित्रपटगृहात राष्ट्रगीत चालू झाले असताना उभे राहायचे की नाही, असे ते विषय होते. इस्लाम म्हणजे ईश्वरचरणी शरणागती – अल्लाहच सर्वश्रेष्ठ आहे आणि त्याच्याशिवाय मी कोणालाही श्रेष्ठ मानणार नाही किंवा कोणापुढेही नतमस्तक होणार नाही, याचा धर्मश्रद्‌धांशी काही संबंध येतो का? आणि आला तरी, या भूमिका सुसंगत आहेत का, याचा समंजस विचार झाला पाहिजे. आपण भारतीय नागरिक असल्याने संविधानातील भाग चारमधील कलम ५१ हे नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांची चर्चा करते, काही अपेक्षा करते. एक सुसंस्कृत नागरिक म्हणून करावे लागणारे वर्तन धर्मविरोधी कसे म्हणता येणार?

जगातील जवळपास छपन्न देशांत मुस्लिमांची सत्ता आहे. तसेच अनेक देशांत मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्या प्रत्येक देशात स्थानिक संस्कृती आणि परंपरेतून निर्माण झालेल्या अंधश्रद्‌धा अस्तित्वात आहेत. काळाच्या ओघात यातील काही अंधश्रद्‌धा कमी झाल्या असल्या, तरी आजही अशा अंधश्रद्‌धा दिसून येतात. याचा इस्लामशी संबंध कमी आणि स्थानिक रितीरिवाज, परंपरा, चालीरितींतून पुढे चालत आलेल्या या अंधश्रद्‌धा आहेत.

छायाचित्र काढणे, व्याज घेणे, संगीत, सिनेमा यावर इस्लामच्या नावाने बंधने होती. आज या गोष्टी जनजीवनातील अविभाज्य घटक झाले आहेत. छायाचित्र काढले नाही, तर मतदानकार्ड, आधारकार्ड, पासपोर्ट मिळणार नाही. व्याज घेतले नाही, तर बँका चालवता येणार नाहीत. संगीत-सिनेमा वगैरे मुस्लीम देशांत अस्तित्वात आहेतच! मग काही गोष्टींना धर्ममान्यता द्यायची आणि काहींना धर्मबंधनात अडकवायचे, म्हणजे आपल्या सोयीप्रमाणे धर्माचा अर्थ लावायचा, हा एक प्रकारचा दुटप्पीपणा म्हणावा लागेल.

मुस्लीम समाजात ज्या प्राण्यांचे मांस खाल्ले जाते, ते प्राणी कापताना 'हलाल' करण्याची प्रथा आहे. मुस्लीमेतर बांधव मुस्लिमांना बोलावून त्यांच्या हातून प्राणी कापून घेतात. आता अनेक शहरांत 'झटका' पद्‌धत आली आहे. हॉटेल्समध्ये मिळणारे मांसाहारी पदार्थ 'हलाल' आहेत की नाही, हे कसे कळणार? 'येथे हलाल मटण मिळेल' असे मुस्लिमेतर खाटकाच्या मटणाच्या दुकानावर पाटी दिसते. यात श्रद्‌धा किती आणि अंधश्रद्‌धा किती?

भारतातील बहुसंख्य म्हणजे जवळपास ९० टक्के मुसलमान हे स्थानिक जाती-जमातींतून धर्मांतरित झालेले आहेत. त्यातील बहुसंख्य मुस्लीम हिंदू आहेत आणि हिंदू समाजातील अनेक प्रथा व अंधश्रद्‌धा मुस्लीम समाजाकडून पाळण्यात येतात. मुस्लिमांनी महिलांच्या मासिक पाळी दरम्यान 'विटाळ' बाळगणे, मंगळसूत्र घालणे अशा प्रथा स्वीकारल्या आहेत. तसेच मुस्लीम महिलांनी टिळा, बिंदी लावू नये अशाही अंधश्रद्‌धा आहेत. काही वर्षांपूर्वी मराठीत बोलणेसुद्‌धा धर्मविरोधी मानण्यात येत होते. उर्दू लिहिता-वाचता येत नसले तरी उर्दू मातृभाषा म्हणून नोंदवली जाई. या गोष्टींचे डोळसपणे निरीक्षण केल्यास आपला समाज आजही किती झापडबंद आहे,

याची कल्पना येईल. भूत असणे, अंगात येणे, नवस करणे, नवस फेडणे इथपासून ते लिंबू-मिरच्या, बिब्बा, काळ्या बाहुल्या वापरणारी अनेक मुस्लीम कुटुंबे दिसून येतात. याचा आणि धर्माचा काहीही संबंध नाही.

मानव हा आपल्या आयुष्याचा शिल्पकार आहे आणि त्याने आपली स्थिती बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. 'लोकांनी आपण होऊन बदल घडवून आणल्याशिवाय सर्वशक्तिमान परमेश्वरही त्यांच्या स्थितीत बदल करणार नाही', असे अरबी भाषेत एक वचन आहे. परंतु प्रत्येक चांगल्या-वाईट गोष्टीसाठी 'अल्लाह की मर्जी' म्हणून पाहायचे, ही सवय अंगलट येऊ शकते. आजारपणात डॉक्टरांकडे न जाणारे अनेक मुस्लीम आहेत. ते म्हणतात 'जो होने का होनेवाला हैं; बचानेवाला, मारनेवाला उपरवाला हैं'. याला कय म्हणावे, श्रद्धा की अंधश्रद्धा?

स्वर्ग-नरक, जन्नत-जहन्नूम, पवित्र-अपवित्र, हलाल-हराम या गोष्टींचा मानवी जीवनावर प्रचंड प्रभाव आहे. 'प्रलोभने आणि शिक्षा' याचा उपदेश करत मानवाचे नियमन करण्याचा प्रयत्न होता. आजच्या विज्ञानयुगात या गोष्टी बुद्धी आणि तर्कशास्त्राच्या आधारे तपासून पाहण्याची दृष्टीच तारक ठरणार आहे. 'कुराणा'त मानवी जीवनाला दोन भागांत विभागले आहे – मृत्यूपूर्वीचा आणि मृत्यूनंतरचा काळ. मृत्यूपूर्वीचे जीवन, कर्मरूपी पेरणी करण्यासाठी आहे आणि मृत्यूनंतरचे जीवन आपल्या कर्माचा मोबदला प्राप्त करण्यासाठी आहे. यातही काही विषमता आहेत. चांगल्या कर्मासाठी पुरुषाला ज्या गोष्टी मिळणार आहेत, त्या गोष्टींपासून महिला वंचित ठेवल्या आहेत.

'कुराणा'त असे म्हटले आहे की, ''जेव्हा मूसाने आपल्या लोकांसाठी (अल्लाहकडे) पाणी मागितले, तेव्हा आम्ही त्याला म्हणालो, 'तुझी काठी (अमूक) खडकावर मार'. मग त्यातून पाण्याचे स्त्रोत उसळून बाहेर पडले.'' महिलांबद्दल असे म्हटले आहे- ''तुमच्या पत्नी तुमच्यासाठी शेतजमिनीप्रमाणे आहेत, म्हणून तुम्हाला जेव्हा व जसे आवडेल, तेव्हा व तसे आपल्या जमिनीकडे जा.''

अशा प्रकारे अनेक ठिकाणी आजच्या काळात विसंगत वाटणाऱ्या, अंधश्रद्धा 'कुराणा'तील 'आयात'मध्ये दिसतात. तेव्हा 'कुराणा'चा अर्थ लावताना त्यातील तात्कालिक काळाशी सुसंगत असणाऱ्या मात्र आज विसंगत वाटणाऱ्या बाबी ठरवता आल्या पाहिजेत आजच्या संदर्भात अर्थनिर्णयन केले पाहिजे. आपल्या बुद्धीचा वापर करून आपल्या श्रद्धा आणि परंपरा परत परत तपासल्या पाहिजेत. आपल्या विचार-वर्तनात बदल केला पाहिजे. अन्यथा आपले विचार आपल्या प्रगतीत खोडा बनतात. आपली बुद्धी गहाण टाकणे, हा आपला अपराध, तसेच अनर्थास कारणीभूत ठरू शकतो.

इस्लामचे संस्थापक मुहंमद पैगंबर यांच्या मृत्यूनंतर खिलाफत (सत्ता) कोणाकडे जावी, यावरून वाद झाला आणि शिया-सुन्नी संप्रदाय अस्तित्वात आले. शियांमध्ये पुन्हा बोहरा, खोजा, इस्माईल असे उपपंथ निर्माण झाले. 'कुराणा'चा, 'हदिस'चा अर्थ लावण्यावरून मतभेद झाले आणि सुन्नी पंथात हनफी, हनबळी, शाफी, आणि मालकी असे उपपंथ त्या त्या विचारवंतांच्या नावाने अस्तित्वात आले. भारतात देवबंदी आणि बरेलवी, तबलिगी, अहले

हदीस असे काही गट दिसून येतात; पण जवळपास ९० टक्के मुस्लिमांना आपण कोणत्या गटात येतो, याचा थांगपत्ता नसतो.

मुस्लीम समाजातील पुरोहित वर्गाच्या वर्चस्वामुळे कुराणाचे स्वयंअध्ययन झाले नाही. 'कुराण' पाठांतर करणारे अनेक 'हाफीज' आहेत; मात्र आपल्याला जे पाठ आहे, त्याचा अर्थ त्यांना माहीत नाही. यामधूनच 'फतवा' संस्कृती उदयास आली आणि सामान्य माणसे, अशा फतव्यांवर विसंबून राहत होती. वास्तविक इस्लामला पुरोहित वर्गाची संकल्पना मान्य नाही. प्रत्येकाने आपल्या बुद्धीप्रमाणे 'कुराण'चा अर्थ लावण्याची आणि त्याप्रमाणे वर्तन करण्याची मुभा दिलेली आहे.

हिंदू आणि इतर धर्म समुदायांत इस्लाम आणि मुस्लीम समाजाबद्दल अनेक गैरसमज आहेत. 'जिहाद' या संकल्पनेचा 'धर्मयुद्ध' असा संकुचित अर्थ लावून प्रत्येक मुसलमान 'जिहादी' असतो, असा एक गैरसमज आहे. 'जिहाद' हा आत्मशुद्धीचा मार्ग असून स्वसंरक्षणार्थ हिंसेचा वापर करावा, असा त्याचा अर्थ आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करून उद्दिष्ट साध्य करणे, असाही 'जिहाद'चा अर्थ सांगितला जातो.

हिंदुत्ववादी इस्लाम आणि मुस्लिमांचा अपप्रचार करताना प्रत्येक मुसलमान 'गजवा-ए-हिंद'चा सैनिक असतो, असे सांगितले जाते. मुस्लीम समाजातील ९० टक्के लोकांना याचा अर्थ माहीत नाही. ज्यांना माहीत आहे, त्यांचा याच्यावर विश्वास नाही.

'गजवा-ए-हिंद' म्हणजे भारताचे इस्लामिक राज्यात रूपांतर करण्यासाठी म्हणजेच भारत 'दारूल-इस्लाम' करण्यासाठी प्रत्येक मुसलमान सैनिकाप्रमाणे कार्यरत असतो. दुसरा गैरसमज 'काफर' संकल्पनेसंदर्भात आहे. मुसलमान मुस्लिमेतरांना 'काफर' म्हणून संबोधतात आणि त्यांना इस्लामचे शत्रू मानतात', असा तो अपप्रचार आहे. 'काफर'चा मूळ अर्थ 'सत्य लपवणारा' असा आहे.

पैगंबरांच्या काळातील मूर्तिपूजक, इस्लामद्वेष्टे यांनाही 'काफर' संबोधले जाई. नास्तिकांनाही 'काफर' म्हटले जात असे. 'अल-किताबिया' (स्वतःचे धर्मग्रंथ असणारे धर्मसमूह)व्यतिरिक्त सर्व 'काफर' असाही एक गैरसमज आहे. आज आपण ज्या परिस्थितीत आणि कायदा-संविधान काळात राहतो, तेथे अशा संकल्पनांवर श्रद्धा ठेवणे किंवा त्यांच्या अंमलबजावणीचा विचार आणणे, हासुद्धा गुन्हा आहे. तेव्हा मुस्लिमांबद्दल द्वेष-वैरभाव पसरवण्यासाठी अशा संकल्पना किंवा बनावट 'लव्ह जिहाद'च्या संकल्पना समाजस्वास्थ्यासाठी, शांततापूर्ण सहजीवनासाठी धोकादायक आहेत. सर्व मुस्लीम एकजिनशी किंवा एकसंध असतात, सर्व जण फतव्याची अंमलबजावणी करतात, वगैरे संदर्भात निकोप माहिती आणि मानसिकता निर्माण झाली पाहिजे. मुस्लीम आणि मुस्लिमेतरांनी याची खबरदारी घेतली पाहिजे.

मुस्लीम समाजातील मीरावलीबाबाच्या दर्ग्यावरील भूत उतरवण्याचे प्रकार, कटगुणच्या दर्ग्यावरील जहरी नागदंशावरील मंत्र देण्याचा दुआ प्रकार, कमरअली दर्ग्यावरील लंगरचा चमत्कार, तसेच मूल प्राप्त व्हावे म्हणून मांत्रिक उपचार करणारा मौलाना, जन्नत मिळवण्यासाठी आत्मघातकी वर्तन करणे, हे आणि यांसारख्या अंधश्रद्धा समाज शोषणास कारणीभूत ठरतात.

महाराष्ट्र शासनाने अस्तित्वात आणलेला जादू-टोणा विरोधी कायदा मुस्लीम समाजालाही लागू आहे. मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा दूर करणे आणि या समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासून कार्य केले आहे.

मंडळाच्या वतीने 'तिमिरभेद' मंच स्थापन करण्यात आले आहेत. या मंचांच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसनाचे कार्य केले जाते. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांत आणि नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांत वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यास महत्त्व दिले आहे. हे केवळ एका संघटनेचे किंवा चळवळीचे कार्य ठरू शकत नाही. आपण सर्वांनी यासाठी सजगपणे लोकजागृती केली पाहिजे. तिमिराकडून तेजाकडे घेऊन जाणाऱ्या या प्रवाहात आपण सर्वांनी जोडून घ्यायला हवे. यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार आणि लोकशिक्षण खूप महत्त्वाचे आहे.

## १.४ अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धा निर्मूलन

हिंदू समाजातील अंधश्रद्धांची जेवढ्या प्रमाणात चर्चा होते आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयत्न होतात, तसे मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा अस्तित्वात असूनही त्याची चर्चा आणि निर्मूलनाचे प्रयत्न पद्धतशीरपणे होत नाहीत. म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी अंधश्रद्धा निर्मूलन हा विषय महत्त्वाचा राहत आला आहे.

महाराष्ट्रात जादूटोणा, अघोरी प्रथा अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा झाला आणि पुणे परिसरात या गुन्ह्याची पहिली नोंद झाली. विश्रांतवाडी परिसरातील एक मौलवी अनेक वर्षांपासून गुप्तधन प्राप्त करून देतो आणि अन्य चमत्कार करून आपल्या इच्छा, अपेक्षा पूर्ण करून देतो, असे सांगत लोकांकडून पैसे काढणे, मार्गी लावणे व लैंगिक अत्याचार करणे, असे उद्योग करत होता. या निमित्ताने मुस्लीम समाजातही भोंदूगिरी, बाबागिरी करणारे व अंधश्रद्धेला खतपाणी घालून समाजशोषण करत त्यावर जगणारे बाबा-बुवा मोठ्या प्रमाणात आहेत, हे उघड झाले. 'इस्लाम'ला मान्य नसले तरी समाजात श्रद्धेच्या, संस्कृतीच्या, परंपरेच्या नावाखाली अस्तित्वात असणाऱ्या अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात आहेत.

'मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा' या विषयावर मंडळाने काम करण्याचे ठरवले. अंधश्रद्धा निर्मूलनाबरोबरच वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याच्या कार्यक्रमांना प्राधान्य दिले. २०११पासून मंडळाने 'बकरी ईद'च्या (ईद-उल-अजहा)च्या निमित्ताने प्राण्यांच्या आहुतीऐवजी रक्तदान करून मानवता जपावी, तसेच रक्ताला धर्म व जात नसते, हा संदेश देण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन केले. हा उपक्रम आजतागायत अखंडितपणे चालू आहे. समाजात सद्भाव, सलोखा वाढवण्यासाठीही अशा उपक्रमांचा उपयोग होतो आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसनासही चालना मिळते.

इस्लामपूर्व काळातील एक आख्यायिकेवरून सुरू झालेली कुर्बानीची प्रथा मंडळाला तर्कशुद्ध वाटत नाही. शाकाहार किंवा मांसाहार हा व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग आहे, परंतु देवा-धर्माच्या नावाने चालणारी 'बकरी ईद'ची प्रथा श्रद्धा आहे की अंधश्रद्धा, यावर विचार करण्यासाठी प्रवृत्त करते.

अल्लाहशिवाय कोणापुढेही शरणागती नाही म्हणणाऱ्या समाजात मोठ्या प्रमाणात 'दर्गाह संस्कृती' आहे. 'आपण पैगंबर आहात तर चमत्कार करून दाखवा', म्हणणाऱ्या लोकांना 'मी जादूगार नाही, मी एक माणूस आहे' असे उत्तर देणाऱ्या व मूर्तिपूजा, व्यक्तीपूजा नाकारणाऱ्या मुहंमद पैगंबरांनाच अवतार मानण्यात येते. तसेच मुस्लीम समाजात 'तबलीग'सारख्या संघटना आहेत. त्या नवस करणे, दर्ग्याच्या ठिकाणी उरुस भरवणे आणि अन्य प्रकारच्या अंधश्रद्धांना विरोध करतात. मात्र वेगवेगळ्या पद्धतीने धर्माचा दबाव निर्माण करण्याचाही प्रयत्न करतात. मुस्लीम समाजात दृश्य स्वरूपात आढळणाऱ्या अंधश्रद्धा म्हणजे न्याज करणे, मन्नत (नवस) मागणे, तावीज बांधणे, दर्ग्यावर जाणे, हा इस्लामचा भाग नसून ती हिंदू समाजातल्या अंधश्रद्धांचीच एक आवृत्ती आहे.

इस्लामचा स्वीकार करणाऱ्या अप्रगत आदिवासी, दलित समाजात पूर्वीपासून काही चालीरिती व परंपरा होत्या. या अप्रगत समाजाने इस्लामचा स्वीकार केल्यानंतरही या गोष्टी चालू ठेवल्या आणि संक्रमितही केल्या. मन्नत (नवस) पूर्ण करण्यासाठी काही लोक जरब बसवतात. जीभ टोचून घेणे, कानातून-गालातून मोठ्या सुया, दाभण आरपार घालणे, या प्रथा अघोरी अंधश्रद्धाच असतात. आई-वडिलांची मन्नत पूर्ण करण्यासाठी मुलांना असे टोचून घ्यावे लागते.

हिंदू समाजात जशी 'देवदासी' प्रथा आहे, तशी काही ठिकाणी मुस्लीम समाजातही आहे. लाल शाहबाज कलंदर हा सिंधचा प्रसिद्ध संत होता. तो कलंदर व ब्रह्मचारी होता. (इस्लाममध्ये मुसलमानांनी अविवाहित राहू नये, अशी अपेक्षा केली आहे.) सेहवान येथे १२७४मध्ये तो मरण पावला. त्याच्या कबरीला अतिशय मान असून दरवर्षी खोनवती या मुस्लीम जातीतील मुलीचे त्याच्या कबरीशी लग्न लावतात आणि नंतर तिला कोणत्याही पुरुषासोबत लग्न करण्याची मोकळीक नसते.

मुंबईचा प्रसिद्ध संत मकदूम फकी हा अरबी वंशाचा होता. तो चौदाव्या शतकात होऊन गेला. ठाणे जिल्ह्यातील माहीम या ठिकाणच्या मुसलमानांचा तो काझी होता. त्याची कबर समुद्रकिनाऱ्यावर असून उरसाच्या वेळी कबरीच्या दर्शनासाठी अनेक लोक येतात. तेथे करावयाच्या विधीपैकी एक मुख्य विधी म्हणजे त्याच्या कबरीवरून ओवाळलेले पाणी पिणे व अंगारा खाणे. त्याच्या कृपाप्रसादामुळे फेफरे, फिट येणे, पिशाच्च बाधा दूर होतात, असा समज आहे.

भारतात मुस्लीम समाजात अजमेरची दर्गाह प्रसिद्ध आहे. तिथे देशातील, खासकरून पाकिस्तान-बांगलादेश येथून लोक, राजकारणी (भारतातील प्रमुख पक्षाचे लोकही) चादर चढवण्यासाठी येतात. सीस्तान येथे खाजा मोईनुद्दीन हसन चिश्ती यांचा जन्म ११४२मध्ये आणि मृत्यू अजमेर येथे १२३६मध्ये म्हणजे वयाच्या ९६व्या वर्षी झाला. अजमेर हे मोठे यात्रास्थान समजले जाते. आपला नवस फेडण्यासाठी सम्राट अकबर तेथे पायी जात असे.

सूफी संतांच्या संदर्भात अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. शमसुद्दिन महंमद तबरिजी हा प्रसिद्ध सूफी संत होता. त्यांच्या अंगावरील कातडी सोलण्यात आली, तेव्हा त्याच्या मदतीला कोणी आले नाही. तेव्हा आपले मांस भाजण्यासाठी त्याने सूर्याची प्रार्थना केली. या कामासाठी जेव्हा सूर्य खाली उतरला, तेव्हा जग विनाशाच्या काठावर आले, असे पाहून त्याने सूर्याला स्वर्गात उतरण्याची आज्ञा केली. त्यांच्या अनुयायांना 'शम्सी' (सूर्योपासक) म्हणतात. या अनुयायांच्या धर्मश्रद्धेत हिंदू धर्म व इस्लाम या दोन्हींचे मिश्रण आढळते. पंजाबच्या शहापूर जिल्ह्यात शम्सपूर येथे त्याची कबर असून अनेक लोक आपले रक्त सांडण्यासाठी तेथे जातात. त्याजागी रक्ताचा वास येतो, असे सांगितले जाते. (संदर्भ- 'इस्लामची जीवन पद्धती', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ क्र. ८९)

मुस्लीम समाजाचा प्रसार करणाऱ्यांमध्ये सूफी संतांचे मोठे योगदान आहे. प्रेम, दया, बंधुभाव, एकेश्वरवाद, साधेपणा, त्याग या गोष्टींबरोबरच मानवतेचा संदेश देणाऱ्या सूफींबाबतीत आजही मोठ्या प्रमाणात समर्थन केले जाते. परंतु या संतांमार्फत मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा निर्माण कशा

झाल्या, या बाबतीत फारशी चर्चा होताना दिसत नाही.

भारतामध्ये खास करून दक्षिण भारतातील महिलांनी मशिदीत नमाज पढण्यासाठी आंदोलन केले. स्त्रियांना मशिदीत प्रार्थना करण्यास प्रेषितांनी मनाई केली नव्हती; परंतु नंतर स्त्रियांना मशिदीत प्रार्थना करण्याऐवजी खाजगीत करणे चांगले, असे मानण्यात आले. जगातील मुस्लीम देशांत या बाबतीत निरनिराळे चित्र दिसते. काही ठिकाणी एकत्र प्रार्थना होते; परंतु वेगळे बसावे लागते. आग्रा येथील मोती मशीद व अहमदनगर येथील मशिदीत स्त्रियांसाठी प्रार्थनेचे सज्जे आहेत. आग्रा येथे स्त्रियांसाठी नगिना नावाची मशीद आहे. तिथे सज्जांना संगमरवरी जाळ्या असतात. त्यामुळे सज्जातील स्त्रिया दिसत नाहीत.

हिंदू धर्मात ज्याप्रमाणे काही मंदिरांमध्ये महिलांना प्रवेश नाकारला जातो, तसेच मुस्लीम समाजात महिलांना काही दर्ग्यामध्ये मनाई आहे. या सर्व अंधश्रद्धा प्रचलित होण्यात पुरुषसत्ताक, बाजारी अर्थकारण व्यवस्था कारणीभूत असल्याचे लक्षात येते. मुस्लीम समाजातील काही अंधश्रद्ध लोक भूत, पिशाच्च मानतात. काहींचा असा समज आहे की, पिशाच्चांना शरीर असते, पण ते अदृश्य असतात. इब्लीस किंवा शैतान हा भूतांचा बाप आणि मारिया ही त्यांची आई, अशा काही अंधश्रद्धा प्रचलित आहेत. पिशाच्चांपैकी सुष्टांना 'जिन' म्हणतात, तर दुष्टांना 'शैतान' म्हणतात. यांच्याबद्दलच्या अनेक आख्यायिका आहेत. एखाद्याला भूत लागावे म्हणून म्हणायचे मंत्र पुष्कळ आहेत. भूतबाधा झालेल्या माणसावर दहीभात, मासे, कोंबडे, अंडी, बकरी, दारू, मिठाई, फळे इ. ओवाळतात. नंतर ती नदीकाठी किंवा झाडाच्या बुडाशी ठेवली जातात. अनेक वेळा मांत्रिक भूतबाधा झालेल्यास केस धरून लोळवतो. केस उपटून बाटलीत घालून बूच लावतात व ही बाटली पुरून टाकतात.

काही मांत्रिक मेणाच्या बाहुल्या करून बाटलीत धूर भरून या बाटलीत बाहुली ठेवतात आणि ते दाखवून लोकांकडून पैसे मिळवतात. मांत्रिक विशिष्ट प्रकारचे ताईत त्यांच्या गळ्यात किंवा दंडावर बांधतात. असे अनेक प्रकार महिलांमध्येही आढळतात. त्यांना निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या दर्ग्याच्या परिसरात सोडून दिले जाते. तेथे त्यांच्या अंगात येते, केस सोडून त्या मान माथा हलवतात, रडतात, ओरडतात, त्यांचा काही लोक गैरफायदाही घेतात. अज्ञान-अंधश्रद्धांचा पगडा मोठ्या प्रमाणात गरीब, दुर्लक्षित समुदायावर असतो. योग्य मानसोपचार, पुनर्वसन करण्याऐवजी दुर्लक्ष आणि अंधश्रद्धेचे सोपे मार्ग अवलंबले जातात. या बाबतीत साक्षरता येणे गरजेचे आहे.

वशीकरण, रोगांवर उपाय म्हणून अनेक अंधश्रद्धा बाळगण्यात येतात. तसेच उत्तर हिंदुस्थानात रात्री पायाच्या अंगठ्याला पाच रंगाचा दोरा तीन वेळा गुंडाळतात, असे पंधरा दिवस करतात. यामुळे मूळव्याध बरा होतो, असा गैरसमज आहे. किकराच्या झाडाला सात वेळा दोऱ्याचे वेढे घालतात आणि आजारी माणसाला त्या झाडाला अलिंगन देण्यास सांगतात. यामुळे ताप बरा होतो, असे सांगण्यात येते. एखादी व्यक्ती दीर्घकाळ आजारी असेल, मूल होत नसेल, मुले वाचत नसतील, पती-पत्नीचे पटत नसेल, तर त्यावर उपाय म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या गमतीदार पद्धतींचा वापर करतात.

जादू करणे, जादूच्या साहाय्याने चोरांचा शोध घेणे, प्रवासाला जाताना शुभाशुभ दिवस ठरवणे, याही अंधश्रद्धा आहेत. जुन्या काळातील लोक सांगतात. कोणी शनिवारी प्रवासाला निघाला, तर त्याने मासे खाऊन निघावे, त्यामुळे इच्छा पूर्ण होतात. सोमवारी प्रवासाला निघताना आरसा पाहून निघावे, त्यामुळे भरभराट होते. मंगळवारी धान्याचे बी खाऊन निघावे, म्हणजे प्रवास सुखाचा होतो व खूप लाभ होतो. अशा अंधश्रद्धा पाळणाऱ्यांची संख्या पूर्वी समाजात मोठ्या प्रमाणात होती, ती आजही अस्तित्वात आहे.

मुस्लीम समाजात फकीर ही एक जमात आहे. त्यांच्यामध्ये दोन प्रकार आहेत. काही फकीर श्रद्धावान असल्याने इस्लामचे कर्तव्य पूर्ण करतात; तसेच काही फकीर अफू, गांजा, दारू यांचे व्यसन करतात. फकिरांचा एक वर्ग 'आजाद' नावाने ओळखला जातो. ते ब्रह्मचारी असतात. फकिरांच्या आश्रयस्थानाला, धर्मशाळेला 'तकिया' म्हणतात. फकिरांमध्ये काही सज्जन असतात. भिक्षा मागून घरसंसार करून ते आपले जीवन साधेपणाने जगतात; परंतु काही धंदेवाईक, व्यभिचारी व ढोंगीही असतात. त्यांना घरदार नसते, बाजार हेच त्यांचे घर असते. ते आपणास चमत्कार करता येतो, असा दावा करतात. त्यावर काही अंधश्रद्ध लोक विश्वास ठेवून बळी ठरतात.

अनेक प्रथा आणि अंधश्रद्धा तत्कालीन सामाजिक, अप्रगत परिस्थितीतून उदयास आल्या, तसेच पुरुषप्रधान मानसिकतेतूनही निर्माण झाल्या. वास्तविक आशा अनेक प्रथांचा आणि धर्माचा तत्त्वतः संबंध नसतो. तरीही या प्रथांना श्रद्धास्थानी ठेवून तो धर्माचा अविभाज्य भाग समजून, त्याचे पालन व जतन करण्याचा अट्टाहास केला जातो.

या प्रथा केवळ आधुनिक मूल्यांशी विसंगत नाहीत, तर त्या प्रगतीच्या आड येतात आणि शोषणास कारणीभूत ठरतात. काही अंधश्रद्धा आणि प्रथा महिलांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवणाऱ्या व अवमानकारक असतात. शिया पंथीय बोहरा समाजात महिलांची सुंता करण्याची प्रथा पाळण्यात येते. याविरोधात शिकलेल्या तरुणींनी आंदोलन उभारले आहे.

'हलाला' ही अशीच एक प्रथा आहे. पतीने रागात, चुकून, गैरसमजातून आपल्या पत्नीला तलाक दिला आणि पश्चात्ताप झाल्यानंतर त्याच पत्नीशी पूर्ववत वैवाहिक संबंध प्रस्थापित करायचे असल्यास मान्यता नाही. जरी पती-पत्नी एकत्र राहू इच्छित असतील, तर त्यांना 'हलाला' करावा लागतो. हलाला म्हणजे पवित्र करून घेणे. यासाठी त्या महिलेला अन्य पुरुषाबरोबर विवाह करावा लागतो. विवाहानंतर त्या पुरुषाने वैवाहिक शारीरिक संबंध करायचे, नंतर 'तलाक' द्यायचा आणि मग पहिल्या पतीशी पुन्हा विवाह करायचा. ही प्रथा आजच्या काळात किती सुसंगत आहे? ती श्रद्धेचा भाग होऊ शकते का? भारतातील मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात ही तरतूद आहे. अनेक महिला या तरतुदीच्या बळी ठरतात. अशा प्रथांचे महिलाही समर्थन करतात. या कुप्रथांचे निर्मूलन म्हणजे 'इस्लाम खतरे में है' असे त्यांना वाटते.

कुटुंब नियोजन किंवा गर्भनिरोधक साधने वापरण्याबाबत अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज आहेत. असे गैरसमज जाणीवपूर्वक निर्माण करण्यात येतात. असे बिंबवले जाते की, 'बच्चा पैदा होना अल्लाह की मर्जी हैं. इस्लाम में कुटुंब नियोजन जायज नहीं, अल्लाह बोलेगा मैंने तो

आपको सही सलामत भेजा था, तू ऐसा काट-पिटकर क्यों आया?' तसेच गर्भनिरोधक साधनांचा वापर करण्याबाबत काही अंधश्रद्धा पसरवण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ, गर्भनिरोधक साधने वापरल्यास बेडरूममध्ये शैतान येतो. 'कुटुंब नियोजन केले तर जन्नत मिळत नाही'. अशी मानसिकता बाळगणारे वैज्ञानिक दृष्टीकोनापासून किती दूर आहेत, याची जाणीव होते. लोकसंख्या नियंत्रणावर कार्य करत असताना असे अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा मंडळाच्या निदर्शनास आल्या आहेत.

विषमताधिष्ठित अंधश्रद्धेचे उदाहरण म्हणजे काही ठिकाणी अशी प्रथा आहे की, मृत्यूनंतर पुरुषासाठी कंबरेएवढी कबर खोदण्यात येते, तर महिलांसाठी छाती इतक्या उंचीची कबर असते. महिला जास्त चंचल असतात, अशी एक भावना या पाठीशी आहे.

इस्लाममध्ये जसे रमजान महिन्यास महत्त्व आहे, तसेच मोहरम या महिन्यालाही महत्त्व आहे. मोहरम हा सण साजरा करण्याचा नसून शोक व्यक्त करण्याचा आहे. इस्लामच्या इतिहासात याला 'शहीद दिवस' म्हणून संबोधण्यात येते. काही लोक उपवास, नमाज, 'कुराण'पठण करतात. मात्र भारतात याचे स्वरूप फारच विचित्र आहे. ताजे-सवाऱ्या बसवणे, मिरवणूक काढणे, अंगात येणे, नवस करणे, अग्नीवरून चालत जाणे, सोंग करणे असे प्रकार केले जातात.

या सणात मुस्लिमांबरोबर हिंदू बांधवही सहभागी होतात. शिया पंथीय या दिवशी मातम करतात. मिरवणुकांत आपल्या छातीवर हाताने मारत शोक व्यक्त करतात. काही तरुण आपल्या वाढवलेल्या नखांमध्ये ब्लेडचे पाते अडकवतात आणि स्वतःच्या छातीवर मारून जखमा करून घेतात. अंगावरील जखमा पाहून ते स्वतःवरच खूश होतात. त्यांना वाटते, आपण अल्लाहला खूश केले आणि अल्लाहप्रेमी झालो. हा श्रद्धेचा भाग कसा असेल? यापेक्षा गोरगरिबांना, गरजूंना अन्नधान्य देणे, आर्थिक मदत करणे किंवा इतर समाजोपयोगी उपक्रम राबवल्यास मोहरमची उपयुक्तता वाढेल. मात्र असे पर्याय निर्माण करणे व त्याचा समाजाकडून स्वीकार होण्यासाठी मंडळास काम करावे लागेल.

इस्लामची शिकवण अशी आहे की, आपण ज्या देशात जातो, तेथील संस्कृती, भाषा आणि मातीशी आपण एकरूप झाले पाहिजे. अगदी दाढी वाढवली पाहिजे, असेही इस्लाममध्ये नोंदवलेले नाही. मात्र 'क्या मियाँ दाढी नहीं रखते? दाढ़ी रखना सुन्नत हैं' आणि ही दाढी कशी असावी, तर मिशा नसलेली. आपण इस्लामच्या संदेशाला महत्त्व द्यायचे की, त्याच्या सांगाड्याला? आपल्या अंतरंगात मानवता, सज्जनता, सभ्यता, परोपकार निर्माण करणे, ही धर्माची शिकवण आहे. मात्र आपण बाह्य बाबींना जास्त महत्त्व देतो. धर्माच्या खऱ्या शिकवणुकीपासून दूर जात आहोत, हे जेव्हा लक्षात येईल, तेव्हा 'अल-फातिहा'मध्ये केलेल्या मागणीप्रमाणे योग्य दिशेने जाऊ!

आजही मुस्लीम समाजात श्रद्धेच्या नावाखाली, संस्कृतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा प्रचलित आहेत. आजच्या संदर्भात जाणकार, शिकलेल्या, उदारमतवादी लोकांनी यासंबंधी नवी भूमिका घेणे गरजेचे आहे. धार्मिक सण अधिकाधिक समाजाभिमुख करण्याची आजच्या काळाची गरज आहे. आरोग्यशास्त्राचे वरदान लक्षात घेऊन समाजातून मरणोत्तर

देहदान व अवयवदान यासारख्या गोष्टींना चालना देण्यात सर्व समाज घटकांनी पुढे यायला पाहिजे, यासाठीही मंडळ प्रयत्नशील आहे.

माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध विधी करण्यात येतात. यातील वैज्ञानिकता आणि अंधश्रद्धा कोणत्या, याबद्दल लोकशिक्षण झाले पाहिजे. विवेकवादी-विज्ञानवादी विचारांची परंपरा समाजात रुजवण्यासाठी अनेक वर्षे काम करावे लागेल.

## १.५ उपसंहार

मुस्लीम समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट समोर ठेवून मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. मुस्लीम जातीयवादाचे नेमके मूळ कशात आहे, याचा शोध घेत असताना दलवाई आणि समकालीन कार्यकर्त्यांच्या लक्षात आले की, यासाठी इस्लाम धर्माची व मुस्लीम इतिहासाची कठोर चिकित्सा करणे आवश्यक आहे. आणि मग मुस्लीम जमातवादी मानसिकतेची कठोर चिकित्सा करून ती जनतेसमोर मांडण्याची सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणून मुस्लीम समाजातील उच्चवर्गीय आणि नेतेमंडळींत खळबळ उडाली, मुल्ला-मौलवी खवळून उठले आणि मंडळाविरुद्ध विषारी अपप्रचार सुरू केला. दलवाईंच्या निधनानंतरही मंडळ केवळ अस्तित्वात राहिले नाही, तर त्याची आगेकूच सुरू आहे, हे पाहून मुस्लीम सनातनी वर्ग अत्यंत अस्वस्थ झाला आणि मंडळाविषयी जनमत कलुषित करण्याचा प्रयत्न करू लागला. या काळातही मंडळाच्या विचारांचा प्रसार होत गेला आणि अनेक तरुण मंडळाकडे आकर्षित झाले. अशा तरुणांचे शंकानिरसन करणे, मंडळाचे विचार समजावून सांगणे आणि मुस्लीम प्रबोधनाचे फायदे लक्षात आणून देण्याचे काम मंडळाने केले.

या कामी 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे त्रैमासिक, वर्तमानपत्रांतील लेख, व्याख्याने, मेळावे, शिबिर यांचा उपयोग झाला. मंडळाचे ध्येय आणि उद्दिष्ट समजावून सांगण्यासाठी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'च्या सहकार्याने 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ - उद्देश व भूमिका' ही पुस्तिकाही प्रकाशित करण्यात आली. समाजातील विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि समतावादी कार्यकर्ते, लेखक आणि विचारवंत यांनी मंडळाला पाठिंबा दिला.

समाजपरिवर्तनाची प्रक्रिया अधिक खोलवर जाणे अपेक्षित असते. त्याची गती आणि दिशा ठरवण्यासाठी विचारवंत आणि सामाजिक दृष्टी लाभलेले कार्यकर्ते उपयोगी ठरतात. मुस्लीम समाजात ही प्रक्रिया अधिक मंद वेगाने पुढे जाते, कारण या समाजाची ठेवण अधिक परंपरानिष्ठ आहे. तसेच या समाजात या पद्धतीने कार्य उभे करणाऱ्यांची संख्याही तुलनेने कमी आहे.

'मुस्लीम सत्यशोधक मंडळ - उद्देश व भूमिका' या पुस्तिकेत उल्लेखलेले प्राधान्य क्रमाचे विषय मंडळाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडात मांडले आहेत. काळानुरूप महत्त्वाच्या ठरलेल्या विषयांना प्राध्यान्यक्रम देऊन त्यावरसुद्धा मंडळ कार्य करत आहे. दहशतवाद, मुस्लीम आरक्षण, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अनिष्ट प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलन या विषयांचा समावेश या खंडात केला आहे.

'भारतीयत्वाचा अभिमान आणि संविधानाचा सन्मान' हे ब्रीद घेऊन मंडळ कार्य करत आहे. मुस्लीम समाजप्रबोधनात मानवाधिकार आणि व्यक्तीस्वातंत्र्य याला महत्त्व आहे. या संकल्पना आधुनिक काळाशी सुसंगत असून त्या वैश्विक मूल्यांवर आधारलेल्या आहेत. प्रचलित धर्म ही संकल्पना प्राचीन असून आधुनिक मूल्यांशी तिचा संघर्ष होण्याची अनेक वेळा शक्यता निर्माण होत असते. यामुळे समाजप्रबोधनाचे निकष ठरवत असताना कालसुसंगत आणि तर्कशुद्ध विचार केला पाहिजे.

जागतिक संदर्भात समाजप्रबोधनाचे अधिष्ठान वैश्विक मानवाधिकाराचा उद्घोष (Universal Declaration of Human Rights) आणि भारतीय संदर्भात भारतीय संविधानात समाविष्ट केलेले मूल्य महत्त्वाचे ठरतात. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा प्रबोधनाचा विषय प्राधान्याने मुस्लीम समाजकेंद्रित आहे. मुस्लीम समाजात प्रबोधनाची पातळी ठरवताना काही निकष समोर येतात, जसे महिलांच्या दुय्यम दर्जाच्या जागी त्यांना सामाजिक आणि कायदेशीर समानता लाभलेली आहे का? त्यांना विचार आणि कृती स्वातंत्र्य आहे का? त्या एकट्याने हिजाब, बुरखा न वापरता प्रवास करू शकतात का? महिलांना पुरुषांइतकेच मालमत्तेचे आणि वारश्याचे हक्क आहेत का? आणि न्यायालयात त्यांची साक्ष पुरुषांच्या बरोबरीची मानली जाते का?

याबरोबरच जिथे तरुणींना लग्नाची सक्ती नाही, वैवाहिक परिपक्वता आल्याशिवाय लग्न करू दिले जात नाही, पालकांच्या आणि नातेवाईकांच्या परवानगीशिवाय त्या स्वःइच्छेने एखाद्या पुरुषाशी लग्न करू शकतात, त्याचबरोबर मुस्लीम स्त्रिया बिगर मुस्लीम तरुणाशी लग्न करू शकतात किंवा घटस्फोटही देऊ शकतात, अशी स्थिती असेल, तर त्या महिला मानवाधिकाराचा वापर करू शकतात, असे म्हणता येईल.

पुरुषांच्या बरोबरीने महिलांना धर्मनिरपेक्ष शिक्षणाची संधी आहे, उच्चशिक्षणाची आणि हव्या त्या अभ्यासक्रमाची मोकळीक आहे, आपल्याला हव्या त्या व्यवसायात जाता येते किंवा आपली जीवनशैली ठरवून सार्वजनिक जीवनात भाग घेता येतो; राजकारण, क्रीडा, कला, विज्ञान अशा क्षेत्रांत जाऊन आपल्या क्षमतेप्रमाणे विकास करू शकतात, म्हणजे या स्त्रियांना समानतेची संधी उपलब्ध आहे, असे म्हणता येईल. जिथे कायद्यासमोर वंश, धर्म, संप्रदाय आणि लिंग असा भेदभाव न करता सर्व नागरिक समान असतात, तिथे मानवाधिकार जपले जातात.

याबरोबरच जिथे भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, स्वेच्छेने विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य, बौद्धिक आणि वैज्ञानिक शोध घेण्याचे स्वातंत्र्य असते, तसेच धर्मांतर करण्याचे किंवा धर्म न मानण्याचेही स्वातंत्र्य असते, देवावरील विश्वास किंवा निरिश्वरवादी राहण्याचे स्वातंत्र्य असते, तेथे स्वातंत्र्य नांदते. अशा निकोप वातावरणात धर्मचिकित्सा करण्याचा अधिकारही गृहीत धरलेला असतो.

या संदर्भात असे लक्षात येते की, मुस्लीम जग पाश्चिमात्यांपेक्षा मागे आहे. बांगलादेशातील लेखिका तस्लिमा नसरीन किंवा साहित्यिक सलमान रश्दी, इब्न वर्राक अशा लेखकांच्या साहित्यावर बंदी घातली जाते आणि या साहित्यिकांना आपला जीव मुठीत ठेऊन फिरावे लागते. याचा अर्थ त्यांचा धर्म व समाजचिकित्सेचा अधिकार समाज अमान्य करतो.

अनेक उदारमतवादी अभ्यासक धर्म व मानवाधिकार यांना सोबत ठेवण्याचे किंवा धार्मिक ग्रंथांच्या आधारे मानवाधिकार देण्याचे समर्थन करतात, म्हणजेच धर्म आणि मानवाधिकार हे स्वतंत्र ठेवण्याची गरज नाही, यावर शिक्कामोर्तब करतात. उदारमतवाद्यांचे म्हणणे असते की, खरा इस्लाम मानवाधिकाराशी सुसंवादी आहे, खरा इस्लाम स्त्री स्वातंत्र्यवादी आहे, खरा इस्लाम समतावादी आहे आणि खरा इस्लाम परधर्माबद्दल सहिष्णू आहे. काही प्रमाणात धर्मग्रंथांचा नवा

अर्थ आणि भाष्य लावून असे म्हणता येईल, मात्र धर्मग्रंथातील लवचीकपणा अमर्याद नसतो. धार्मिक ग्रंथांचा अर्थ किंवा निष्कर्ष, मतितार्थ दोन व्यक्ती परस्परविरोधी काढू शकतात आणि तसे दाखलेही देऊ शकतात. मात्र कितीही बौद्धिक कोलांटउड्या मारल्या, तरी हे मान्य करावे लागेल की, धर्म आणि मानवाधिकार हे स्वतंत्र क्षेत्र आहेत. काही लोक उदार, मवाळ किंवा मूलतत्त्ववादी, कर्मठ असणे हा व्यक्ती स्वभावाचा भाग आहे. त्याचा आणि धर्माचा संबंध नसतो. याच दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक मंडळ 'इबादत' आणि 'आदत' हे दोन स्वतंत्र भाग आहेत, या प्रतिपादनाचे समर्थन करतो.

मंडळाने आजच्या काळाची गरज लक्षात घेऊन मंडळाचा नवा जाहीरनामा तयार केला आणि समाजप्रबोधनासाठी उदारमतवादी 'कुराण' भाष्याचा आधार घेण्याचे ठरवले. तसेच 'कुराण'च्या शिकवणीचा आधार घेऊन नवा 'निकाहनामा' तयार केला. त्यामध्ये पती-पत्नी आपल्या अटी आणि शर्ती करार स्वरूपात नोंदवू शकतात. प्रबोधनाच्या प्रक्रियेतील काही प्रयोग म्हणून अशा गोष्टींचे महत्त्व असले, तरी अशा प्रयोगाला मर्यादा असतात, हेही लक्षात घेऊन प्रबोधनाची चळवळ पुढे घेऊन जायला पाहिजे.

मानवाधिकाराचे प्रश्न धार्मिक कक्षेबाहेर, पण शासनाच्या कक्षेत आणले पाहिजे, म्हणजेच धर्माला शासनापासून विभक्त केले पाहिजे. मात्र बहुतेक मुस्लीम देश अशी फारकत घेताना दिसत नाहीत. असे असेल तर मुस्लीम देशांत धर्मनिरपेक्ष समाजगट निर्माण करणे शक्य आहे का? पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मुस्लीम जगतात ऐहिक आणि पारलौकिक किंवा धर्मनिष्ठ आणि धर्मातीत अशा स्वतंत्र बाजू नाहीत. हेही खरे आहे की, इस्लामच्या इतिहासात व्यावहारिक दृष्टीकोनातून शासन आणि धर्माधिकार यांच्यात पूर्ण फारकत असल्याचे कालखंड होऊन गेले आहे. उदाहरणार्थ, पाकिस्तानात मोहम्मद अली जीना, इजिप्तमधील नासेर, इंडोनेशियातील सुकार्नो असे राज्यकर्ते आधुनिक औद्योगिकीकरणात गुंतलेल्या समाजाचे प्रश्न सोडवण्यात व्यस्त होते. हे सांस्कृतिक अर्थाने मुस्लीम देशातील नेतृत्व होते आणि तरी त्यांनी धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन स्वीकारला. तथापि भ्रष्टाचार, वशिलेबाजी, पात्रतेचा अभाव आणि मुख्यतः मुल्ला-मौलवींची मनधरणी, तसेच आर्थिक आघाड्यांवरील पराभव, यातून मुस्लीम मूलतत्त्ववादाचा उदय झाला. त्यांनी ही संधी घेऊन सार्वजनिक जीवनात धर्माचा अधिकाधिक शिरकाव करून घेतला.

मुस्लीम समाज धर्मनिरपेक्ष वागू शकतो, हे इराणमध्ये काही प्रमाणात दिसते, याचे आश्चर्य वाटते. पाश्चात्य लोकशाहीमधील अनेक तंत्रे आणि व्यवस्था इराणने स्वीकारली आहे. त्यांचा तत्त्वतः किंवा ऐतिहासिक वास्तव म्हणून इस्लामशी काही संबंध नाही. उदाहरणार्थ, सार्वजनिक निवडणुका, लोकसभेचा अंगीकार, तसेच फ्रेंच राज्यघटनेपासून बनवलेली राज्यघटना, इत्यादी.

धर्मनिरपेक्षता हे समाजप्रबोधनाचे एक ध्येय आहे. हे करण्यासाठी धर्मग्रंथांची चिकित्सा, विवेकी वर्तन साध्य होईल, असे धर्मनिरपेक्ष शिक्षण, बहुधार्मिकता आणि बहुविविधता यांचे समर्थन, लोकशाही जीवनशैलीला प्रेरणा आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून आत्मपरीक्षण, या गोष्टींना महत्त्व आहे.

अनेक पाश्चिमात्य देशात अशी धर्मनिरपेक्षता अस्तित्वात आली, कारण ज्ञानक्षेत्रात विशेषतः

विज्ञानविषयक ज्ञानात तिथे भर पडली. परिणामी विवेकीविचार करण्याची क्षमता विकसित झाली. तसेच 'बायबल'ची समीक्षा आणि चिकित्सेमुळे अनेक धर्मभोळ्या अशास्त्रीय गोष्टींना आळा बसला आणि धार्मिक विविधता व परधर्म सहिष्णुता वाढली. याबरोबरच आस्तिक आणि नास्तिक यांचे अस्तित्वही मान्य करण्यात आले. अशा सद्सद्विवेकी उत्क्रांतीतून युरोपचा बराचसा भाग धर्मनिरपेक्ष झाला.

पाश्चिमात्यांनी केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या प्रक्रियेपासून मुस्लीम जगतात बोध घेण्यासारखे बरेच काही आहे. जसे, धर्मग्रंथांच्या चिकित्सेला प्रोत्साहन देणे. त्यामुळे धर्मग्रंथात काही असहिष्णू भाग असेल तर धर्मांध होऊन जाण्यापासून आपण परावृत्त होऊ. अनेक बुद्धिजीवी लोक धार्मिक समूहातील हळव्या धार्मिक समजुतींना न दुखवण्याबद्दल दक्षता बाळगतात. संवेदनशील विषय म्हणून अशा विषयांना बगल देतात. आपण प्रबोधनाच्या मूल्यांपासून दूर राहून सामाजिक सुधारणा आणि समाजहित साध्य करू शकणार नाही. शिक्षणाने विवेकशक्तीची वाढ झाली पाहिजे, यासाठी धर्मनिरपेक्ष शिक्षणाची गरज आहे. म्हणजे आधुनिकतावादी शिक्षण देण्यासाठी धार्मिक मदरशांना टाळे लावले पाहिजे, कारण अशा मदरशात निम्न व गरीब स्तरातील मुले धार्मिक शिक्षण घेतात, त्यातील बऱ्या-वाईटांचे संस्कारही होतात. प्रसंगी धर्मांधतेचे धडेही गिरवत असतात.

उदाहरणार्थ, पाकिस्तान सरकार आपल्या सर्व नागरिकांना मोफत शिक्षण आणि आर्थिक सुस्थिती पुरवण्यात असमर्थ झाले, त्यामुळे मदरशांचे पेव फुटले. तेथे गरीब मुलांना थोडेफार शिक्षण व फुकट जेवण दिले जाते. कारण त्यांचे पालक तेवढेही देऊ शकत नाहीत. पाकिस्तानातील असे बहुतांश मदरशे सौदी अरेबियाच्या पैशांवर चालतात, असे सांगण्यात येते. ही स्थिती सुधारण्यासाठी पाश्चिमात्य सरकारांनी सौदी अरेबियाचा हा तात्त्विक आणि आर्थिक प्रभाव दूर करून, त्या ठिकाणी सर्व मुलांना मोफत धर्मनिरपेक्ष शिक्षण पुरवण्याच्या कामी मदत केली पाहिजे. त्यामुळे विवेकी विचार करणारा आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणारा समाज निर्माण होईल. बहुविविधता वाढवण्यासाठी अशा पद्धतीचे प्रयत्न आवश्यक आहे.

आपल्या अनेक समस्यांचे खापर इतरांच्या डोक्यावर फोडण्याची एक सवय असते. त्यांच्यात आत्मपरीक्षण करण्याची क्षमताच विकसित झालेली नसते. नेत्यांनी लोकांना लोकशाहीकडे घेऊन गेले पाहिजे. सभ्य, सुसंस्कृत समाज आणि राज्य निर्माण करणाऱ्या शक्ती निर्माण झाल्या पाहिजेत. धार्मिक संस्थांचा वरचष्मा नसतानाही नागरिकांना धार्मिक श्रद्धा, योग्य धर्माचरणाची मुभा असावी. धर्म, धर्मस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता याची समज असलेले नागरिक निर्माण झाले, तर आत्मपरीक्षण अधिक निकोप आणि प्रगतिकारक होऊ शकते.

मंडळाने घेतलेल्या प्राधान्यक्रमाच्या विषयांसोबतच इतरही कमी-अधिक तीव्रतेचे समाजप्रबोधनाचे मुद्दे आहेत. विशेषतः भारतीय मुस्लीम समाजाची जी एकूण दुरावस्था झाली आहे, त्यातून बाहेर पडण्यासाठी या दुरावस्थेच्या कारणांची मीमांसाही केली पाहिजे. ही कारणे प्रामुख्याने पुढीलप्रमाणे-

१) भविष्यवेधी नेतृत्वाचा अभाव :

समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाणारे जसे फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर असे प्रभाव टाकणारे नेतृत्व हिंदू समाजात उदयास आले, तसे सर्वसमावेशक धर्मनिरपेक्ष, आधुनिकतावादी नेतृत्व मुस्लीम समाजात निपजले नाही. यास सर सय्यद अहमद खान, मौलाना आझाद, एम. सी. छगला अशा काही नेत्यांचा अपवाद आहे. मात्र अशा भविष्यवेधी नेतृत्वाला समाजाने स्वीकारले नाही.

२) मुल्ला–मौलवी–उलेमांचा प्रभाव :

समाजात सर्वसमावेशक, उदारमतवादी नेतृत्वास मान्यता न देता, ते इस्लामविरोधी असल्याचे गैरसमज पसरवून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा सतत प्रयत्न या वर्गाकडून करण्यात आला. ऐहिक जीवनाबद्दलची अनास्था आणि पारलौकिक जीवनाबद्दलचे आकर्षण निर्माण करून समाजाला धर्मप्रभावाखाली ठेवण्यात आणि फतवा, मदरसा अशा पारंपरिकतेला महत्त्व देऊन समाजाला मध्ययुगीन मानसिकतेकडे वळवण्यात या वर्गाने सातत्याने यश मिळवले.

३) सत्ताधारी व राजकीय पक्षांकडून घेण्यात येणारी भूमिका :

मुस्लीम समाजाच्या मूलभूत विकासाकडे दुर्लक्ष करून त्यांच्या भावनिक आणि तथाकथित अस्मितांच्या प्रश्नांचे भांडवल करून समाजाचा 'वोटबँक' म्हणून वापर केला. समाजाच्या कल्याणकारी योजनांपेक्षा तात्कालिक आणि धार्मिक गोष्टींना बळकटी देण्यात आली. अनेक वेळा लोकानुनय आणि लांगुलचालन करून या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यात अडथळे निर्माण केले.

४) हिंदुत्ववादी व जमातवादी शक्तिंकडून होणारे आघात :

धार्मिक कट्टरतावाद जपत असतानाच परधर्मद्वेष आणि शत्रुत्व वाढवण्यात या शक्तींनी यश मिळवले. यामुळे सर्वसामान्य समाजात असुरक्षितता, अविश्वास आणि शंका निर्माण केल्या. मुस्लीम व्यक्तिगत कायदा, लोकसंख्या नियंत्रण, हिजाब यांसारखे प्रश्न हाताळून मुस्लीम समाजाबद्दल शत्रूभाव निर्माण करण्यात आला. दोन्ही समाजातील जमातवादी संघटनांनी समाजाच्या प्रबोधन आणि विकासात अडचणी निर्माण केल्या.

५) आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडी :

मुस्लीम जगतामध्ये अनेक अतिरेकी आणि दहशतवादी कारवाया करणाऱ्या संघटना आहेत. अफगाणिस्तानातील बुद्ध मूर्तींचे भंजन, डॅनिश चित्रकाराने काढलेले पैगंबरांचे व्यंग्यचित्र आणि मूलतत्त्ववादी मानसिकतेतून निर्माण होणाऱ्या घटना मुस्लीम समाजाची नकारात्मक प्रतिमा तयार होण्यास कारणीभूत ठरतात.

६) समाजातील पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी शक्तींचा क्षीण प्रभाव :

मुस्लीम समाजात अशा शक्तींचा अभाव आहे, तसेच अन्य धर्मियांतील या शक्ती मुस्लीम सामाजिक सुधारणेऐवजी त्यांच्या भावनिक आणि अस्मिता या प्रश्नांकडेच अधिक लक्ष देतात. मुस्लीम समाजातील कालबाह्य प्रथा दूर करण्यासंदर्भात अशा संघटना मौन बाळगतात. त्यामुळे मुस्लीम समाजात आधुनिकता, धर्मनिरपेक्षता आणि कालसुसंगतता

निर्माण करण्यास बळकटी मिळाली नाही. परिणामी समाज प्रगतिशील होऊ शकला नाही. समाजाचा विकास आणि प्रबोधन करण्यासाठी त्यांच्या आड येणाऱ्या कारणांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना केली पाहिजे. विकास आणि प्रबोधन समांतर पद्धतीने घडून येण्यासाठी नवे उपक्रम, नव्या योजना आणि नवी दृष्टी निर्माण करण्याचे समाजापुढे आव्हान आहे.




# २. मंडळाचे मंच आणि नियमित कार्यक्रम

## २.१ सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच आणि आधार केंद्र

मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर मंडळाने सुरुवातीपासूनच अधिक लक्ष दिले आहे. मुस्लीम महिला मदत केंद्राबरोबरच मंडळाच्या वतीने २०१५पासून 'सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचा'ची सुरुवात करण्यात आली. 'समान नागरी कायदा' अथवा 'व्यक्तिगत कायद्या'त सुधारणा कराव्यात म्हणून विविध कार्यक्रम घेण्यात येतात. विवाह, विवाहपूर्व-विवाहोत्तर समुपदेशन, मार्गदर्शन, कायदेशीर सल्ला व सहकार्य करतानाच महिलांना सन्मानाने जगता यावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात, शिक्षणाचे प्रमाण वाढावे, म्हणून हा मंच कार्य करत आहे. महिला सबलीकरण, जनजागृती आणि संघटन या मंचामार्फत होते. तसेच महिला अधिकार दिवस, महिलांच्या प्रश्नावरील आंदोलने, महिलांना स्वावलंबनासाठी आर्थिक मदत इत्यादी उपक्रम राबवण्यात येतात.

## २.२ हमीद दलवाई पुरस्कार आणि पार्श्वभूमी

मुस्लीम समाजप्रबोधनाचे काम कोणी एक व्यक्ती किंवा संघटना करू शकत नाही. अनेकांच्या विविधांगी योगदानातून समाजप्रबोधनाचा कार्यास अनुकूल वातावरण निर्माण होत असते. मंडळाने याची जाणीव ठेवून मंडळाव्यतिरिक्त मुस्लीम समाजप्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवता यांना बढावा देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रकाशात आणण्यासाठी 'हमीद दलवाई पुरस्कार' देण्याचे निश्चित केले. मुस्लीम समाजात विज्ञानवादी, राष्ट्रवादी आणि धर्मनिरपेक्षपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज वाढली आहे. भारतात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात काही हातावर मोजण्याइतके संघटना आणि व्यक्ती या दिशेने प्रयत्न करत आहेत. शिक्षणसंस्था, साहित्यनिर्मिती आणि एक वैचारिक बांधीलकी मानून समाजप्रबोधनाचे काम करणारे कार्यकर्ते पुढे येत आहेत. मंडळाच्या दृष्टीने या व्यक्ती आणि संघटना सहकारी मित्र आहेत. अशा प्रकारचे काम वाढवणे हे मंडळाचे ध्येय आहे. म्हणून त्यांना प्रेरणा देण्यासाठी 'हमीद दलवाई पुरस्कारा'ची कल्पना पुढे आली. मा. भाई वैद्य यांनी ही कल्पना सुचवून या पारितोषिकासाठी ५०००/– रुपयांची देणगी दिली आणि मंडळाच्या वतीने हमीद दलवाई यांच्या स्मृतीदिनी ३ मे १९८९ रोजी हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला हमीद दलवाई पुरस्कार निवड समितीमध्ये मा. भाई वैद्य, डॉ. नरेंद्र दाभोलकर, मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार आणि सय्यदभाई यांचा समावेश होता.

हमीद दलवाई यांच्या नावाने देण्यात येणारा पुरस्कार मंडळाच्या दिवंगत कार्यकर्त्या प्रा.




*ताहेरभाई पूनावाला यांना हमीद दलवाई पुरस्कार, प्रमुख उपस्थिती नानासाहेब गोरे.*




***संस्कृत पंडित गुलाम दस्तगीर बिरासदार यांना हमीद दलवाई पुरस्कार, प्रमुख अतिथी निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू.***



*शफाअत अब्बास खान यांना हमीद दलवाई पुरस्कार डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते.*




***डॉ. जब्बार पटेल यांना हमीद दलवाई पुरस्कार. प्रमुख उपस्थिती कॉ. गोविंदराव पानसरे, प्रा. कुलसुम पारेख, डॉ. मोहन आगाशे.***

मुमताज रहिमतपुरे यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नंतरच्या काळात ज्येष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी कार्यकर्ते ताहेर पूनावाला, डॉ. जब्बार पटेल, संस्कृतपंडित पंडित गुलाम दस्तगीर, प्रा. फ. म. शहाजिंदे, तामिळनाडू येथील प्रा. नाझनीन अशा मान्यवरांना प्रदान करण्यात आला. कालांतराने हा पुरस्कार 'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटट्यूट'च्या वतीने देण्यास प्रारंभ झाला. नंतर यात खंड पडला, म्हणून पुन्हा मंडळाच्या वर्धापन दिनी 'हमीद दलवाई समाजप्रबोधन पुरस्कार' नव्या स्वरूपात देण्यास सुरुवात झाली. यामध्ये डॉ. असगर अली इंजिनिअर, राजन खान, मुमताज शेख, प्रा.जहीर अली, डॉ. एम. बी. शेख, नूरजहाँ सफीया नियाज, महंमद वाहिद, ज्योती यदुल्ला, डॉ. पी. ए. इनामदार अशा मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मे.पुं.रेगे, डॉ.श्रीराम लागू, निळू फुले, डॉ.विजय तेंडुलकर, नानासाहेब गोरे, दिलीप चित्रे, कॉ. गोविंदराव पानसरे, दया पवार, भाई वैद्य, बाबा आढाव, चंद्रशेखर धर्माधिकारी, रावसाहेब कसबे अशा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## २.३ मंडळाचे अन्य पुरस्कार

**बाबुमियाँ बँडवाले राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार :**

मंडळाच्या स्थापनेची बातमी वर्तमानपत्रात वाचून श्रीगोंदा येथून स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले कार्यक्रमास आले होते. शुद्ध चारित्र्य, देशभक्ती, त्याग-समर्पणाची भावना असणारे गांधीवादी बाबुमियाँ मंडळाच्या अध्यक्षपदी असावेत, अशी दलवाईंनी इच्छा व्यक्त केली. त्यास तत्काळ होकार देऊन बाबुमियाँ यांनी दोन दशकांहून अधिक काळ अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली. अनेक वेळा तुरुंगवास भोगलेले, पूर्ण शाकाहारी, मराठी भाषिक बाबुमियाँ संगीतकार आणि कलाकार होते. त्यांनी नाटकांचे प्रयोग करून जमवलेली रक्कम चीन आणि पाकिस्तान युद्धात शहिद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबीयांना दिली. बँडवाले यांनी विविध सामाजिक संस्थांनाही अनेक वेळा देणग्या दिल्या.

शासनाने देऊ केलेली आठ एकर जमीन आणि सोयीसुविधा नाकारणारे बाबुमियाँ हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते. त्यांनी केलेल्या योगदानाचे सातत्याने स्मरण व्हावे, तसेच धर्मनिरपेक्षता, धार्मिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता यासाठी भरीव योगदान देणाऱ्यांना त्यांच्या नावे पुरस्कार द्यावा, असा निर्णय घेऊन त्यांच्या नावाने 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' मंडळातर्फे सुरू करण्यात आला.

साहित्यिक आणि पत्रकार राज काझी, आंतरधर्मीय विवाह आणि जोडीदार निवडण्याच्या स्वातंत्र्याचे पुरस्कार, प्रचार आणि सहकार्य करणाऱ्या दिल्लीस्थित राष्ट्रीय पातळीवरील धनक या संस्थेचे संस्थापक आसिफइकबाल आणि राणू कुलश्रेष्ठा, याबरोबरच भिवंडी येथील राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सद्‌भावासाठी कार्य करणारे निवेदक सल्लाऊद्‌दिन शेख, तसेच मानवाधिकार, शांतता कार्यकर्ता फिरोज मिठीबोरवाला यांना या पुरस्काराने आजवर गौरवण्यात आले आहे.

**सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार :**

स्त्रीदास्य मुक्ती आणि महिला सबलीकरण हा मंडळाचा प्राधान्याचा विषय आहे. मंडळाने ठरवलेल्या ध्येय व उद्‌दिष्टांना अनुरूप आणि समांतर कार्य करणाऱ्या अनेक महिला समाजात आहेत. त्यांना आणि त्यांच्या कार्यास प्रोत्साहन द्यावे, ते प्रकाशात आणावे आणि त्यांना मंडळाशी जोडून घ्यावे, हा हेतू समोर ठेवून हा पुरस्कार सुरू करण्यात आला. आजतागायत मानवाधिकार कार्यकर्त्या ॲड. दिलशाद मुजावर, सामाजिक कार्यकर्त्या शमीम मडकी, आंतरराष्ट्रीय महिला कब्बडी पंच सायराबानो शेख, शिक्षण व सामाजिक कार्यकर्त्या ॲड. तब्बसूम इनामदार, आंतरराष्ट्रीय क्रीडापटू अल्मास शेख, मराठी भाषा आणि व्याकरण तज्ज्ञ डॉ. यास्मिन शेख, पुरोगामी कार्यकर्त्या आणि अभ्यासक डॉ. झीनत शौकत अली आणि विविध

प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करून प्रशासकीय अधिकारी झालेल्या वसीमा हैदर शेख यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हे पुरस्कार माजी केंद्रीयमंत्री मा. आरिफ मोहंमद खान, नसीरूद्‌दीन शाह, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, भारत सासणे, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर आणि डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते देण्यात आले आहेत.

मंडळाच्या युवा कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाचे दिवंगत उपाध्यक्ष आणि फलटण येथील कार्यकर्ते प्राचार्य वि. अ. शेख यांच्या नावाने 'युवा गौरव पुरस्कार' देण्यात येतो.

## २.४ हमीद दलवाई स्टडी सर्कल आणि विविध शैक्षणिक उपक्रम

कार्यकर्त्यांचा अभ्यास व प्रशिक्षणासाठी मंडळातर्फे स्टडी सर्कल सुरू करण्यात आले. केवळ कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाकडे लक्ष न देता मुस्लीम समाजातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देऊन तो शासकीय, निमशासकीय नोकरीत यावा, या हेतूने मार्गदर्शन वर्ग सुरू केले. गरीब विद्यार्थ्यांना महागडे मार्गदर्शन परवडत नाही, म्हणून मुस्लीम विद्यार्थ्यांबरोबरच अन्य धर्मीय गरजू विद्यार्थ्यांना 'स्पर्धा मार्गदर्शन वर्गा'त प्रवेश दिला जातो. अनेक विद्यार्थ्यांना पुणे येथील युनिक अकादमी, ज्ञानदीप अकादमी, ज्ञानज्योती अकादमीमध्ये नियमित प्रवेश मिळवून दिला जातो. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन इ. सुविधा देण्यात येतात.

विंग कमांडर अभय जोशी यांनी त्यांच्या वडिलांच्या नावाने 'एस. एम. जोशी शिक्षण व आरोग्य निधी' स्थापन केला. या योजनेअंतर्गत गरीब व गरजू विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत असे. त्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने शिफारस केलेल्या ५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात आली. आयटीआय, रोजगाराभिमुख आणि नियमित शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा फायदा झाला. मा. अभय जोशी यांच्या निधनानंतर हा उपक्रम खंडित झाला.

विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन, महाविद्यालय प्रवेश, व्यक्तीमत्त्व विकास या दृष्टीने सहाय्यभूत होण्यासाठी आणि आधुनिक शिक्षणात मुस्लिमांचा टक्का वाढवण्यासाठी 'हमीद दलवाई विविध शैक्षणिक उपक्रम' हा मंच सुरू करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, शैक्षणिक शुल्क आणि साहित्य देण्याचे काम मंडळाने केले. २०२४मध्ये विवेकवादी कार्यकर्ते जगदीश काबरे यांनी त्यांच्या पत्नी माधुरी काबरे यांच्या स्मरणार्थ मंडळास ३ लाख रुपयांची देणगी दिली. त्याच्या येणाऱ्या व्याजाचा उपयोग गरीब विद्यार्थांना आर्थिक सहकार्यासाठी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यातून मंडळाच्या कार्यकारिणीने 'हमीद दलवाई शैक्षणिक प्रायोजकत्त्व उपक्रम' सुरू करण्याचा निर्णय घेतला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या निधीत भर घातली आणि २२ मार्च २०२४ रोजी मंडळाच्या ५४व्या वर्धापन दिनी या उपक्रमाची सुरुवात केली.

## २.५ हमीद दलवाई – दिनकरराव जवळकर स्मृतिदिन

'३ मे' हा सत्यशोधक दिनकरराव जवळकर आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई या दोघांचा स्मृतिदिन. महात्मा फुल्यांची सत्यशोधक विचारधारा हा या दोन्ही व्यक्तिमत्त्वातील समान दुवा आहे. मंडळाच्या उभारणीत व विकासात मोलाचे योगदान असणारे डॉ. बाबा आढाव हे 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान'चे संस्थापक आहेत. ही संघटना १९७३मध्ये स्थापन करण्यात आली.

अल्प आयुष्यात विपुल लेखन व प्रत्यक्ष कार्यक्रम आखणाऱ्या या दोन्ही सत्यशोधकांचे स्मरण मंडळ आणि म. फुले समता प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येते. व्याख्यान, परिसंवाद, सत्कार व प्रकाशन, महिला मेळावे यांसारखे कार्यक्रम या निमित्ताने आयोजित केले जातात.




***३ मे, हमीद दलवाई – दिनकरराव जवळकर स्मृतिदिन प्रसंगी बोलताना शमसुदिद्न तांबोळी, उपस्थित – भाई वैद्य, डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्रा. सदानंद मोरे, सुभाष वारे, डॉ. बाबा आढाव.***

## २.६ मौलाना आझाद जयंती व राष्ट्रीय शिक्षण दिन

स्वातंत्र्य आंदोलनात महात्मा गांधींसमवेत पूर्ण ताकदीने सहभागी झालेले स्वातंत्र्यसेनानी, परंपरागत अर्थ नाकारून धर्माचा कालसापेक्ष अर्थ लावणारे इस्लामचे गाढे अभ्यासक, तत्त्वचिंतक, बहुभाषा पंडित, पत्रकार आणि विचारवंत मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या राष्ट्रनिष्ठेवर शत्रूही शंका घेणार नाही. 'जिहाद', 'काफर', दारुल हर्ब' यांसारखे विचार त्या-त्या काळात स्वार्थ, राजकारण व भ्रष्टाचार यांनी प्रेरित होऊन निर्माण झाले आहेत, असा विचार मांडणारे मौलाना आझाद हे मुस्लीम अभ्यासक होते. त्यांनी 'हदीस' हे मानवी भाष्य असून त्यात चुका असू शकतात व आहेत, अशा प्रकारचे वक्तव्य करून इस्लामच्या परंपरेला धक्का दिला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि भाई वैद्य यांनी स्थापन केलेल्या 'अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभे'च्या वतीने 'मौलाना आझाद जयंती व राष्ट्रीय शिक्षण दिन' संयुक्तपणे आयोजित करण्यात येतो. २००८पासून केंद्र शासनाने परिपत्रक काढून मौलाना आझाद यांचा ११ नोव्हेंबर हा जन्मदिन 'राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. या निमित्ताने मौलाना आझाद यांच्या शैक्षणिक योगदानाबरोबरच त्यांच्या उदारमतवादी विचारांचे स्मरण करण्यात यावे, अशी अपेक्षा या परिपत्रकात नमूद करण्यात आली. ११ नोव्हेंबर २००९पासून हा उपक्रम राबवण्यात येतो.




***समाजवादी अध्यापक सभा आणि मंडळाच्या वतीने मौलाना आझाद जयंती तथा राष्ट्रीय शिक्षण दिन कार्यक्रमात डॉ. बेनझीर तांबोळी, मा. भाई वैद्य, अब्दुल कादर मुकादम, प्रा. शरद जावडेकर.***

## २.७ बकरी ईदनिमित्त रक्तदान उपक्रम

वैज्ञानिकता, आधुनिकता आणि मानवता या मूल्यांचा प्रसार करून समाजातील कालबाह्य परंपरा आणि अंधश्रद्धा बाजूला सारणे, हे मंडळाचे एक उद्दिष्ट आहे. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास केवळ व्यक्तीच्या हिताचाच नसून, तो सांविधानिक कर्तव्याचाही एक भाग आहे, असा मनोभाव निर्माण करण्यासाठी मंडळामार्फत जाणीवपूर्वक काही उपक्रम आयोजित केले जातात.

मुस्लीम समाजातील एक महत्त्वाचा सण म्हणजे बकरी ईद अर्थात ईद-उल-अजहा. त्याला 'कुर्बानीची ईद' असे संबोधले जाते. यामध्ये ईश्वरनिष्ठा आणि श्रद्धा व्यक्त करण्यासाठी त्याग, बलिदान याला महत्त्व दिले गेले आहे. इस्लामपूर्व काळातील प्रेषित इब्राहिम आणि त्यांचा पुत्र इस्माईल यांच्याशी निगडित काही आख्यायिका आहेत. बकरी ईद दिनी मुस्लीम जगतात सामूहिक नमाज पठण आणि प्राण्यांची कुर्बानी देण्यात येते.

धार्मिक सण अधिक समाजाभिमुख, विज्ञानाभिमुख, पर्यावरणस्नेही आणि मानवतावादी होण्याच्या दृष्टीने मंडळाने २०११मध्ये रक्तदान करण्याचे आवाहन केले आणि कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. ऑक्टोबर २०१२मध्ये त्यास सामुदायिक अभियानाचे स्वरूप देऊन बकरी ईद दिनी रक्तदान शिबिर आयोजित केले. डॉ. बाबा आढाव, डॉ. नरेंद्र दाभोलकर, सनदी अधिकारी सुरेश खोपडे, सय्यदभाई या उपक्रमात उपस्थित होते. प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी या उपक्रमाची सुरुवात केली.

विज्ञान व विवेकवाद पुढे घेऊन जाण्यासाठी जात-धर्मापलीकडची दृष्टी देण्यासाठी आणि माणसाने माणसाच्या उपयोगी यावे, हा संदेश देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाला प्रारंभी मुस्लीम समाजातून विरोध दर्शवण्यात आला, पण नंतरच्या काळात मुस्लीम समाजाने याचे स्वागत केले आणि ठिकठिकाणी हा उपक्रम स्वतंत्रपणे राबवण्यास सुरुवात झाली. प्रारंभी ईदच्या दिनी आयोजित केला जाणारा हा उपक्रम महाराष्ट्राच्या विविध भागांत आठवडाभर आयोजित केला जाऊ लागला आणि त्यास 'राज्यस्तरीय रक्तदान अभियान सप्ताहा'चे स्वरूप प्राप्त झाले.

मंडळाच्या कार्यकर्त्यांबरोबर 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती' आणि इतर समविचारी संघटनांचे कार्यकर्ते यात सहभागी होऊ लागले. मुस्लीम समाजातील धार्मिक संघटनांनीसुद्धा या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देऊन रक्तदान शिबिर आयोजित करण्यास सुरुवात केली. पुण्याव्यतिरिक्त कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड, गोंदावले, नागपूर, पनवेल, जालना, लातूर, नंदुरबार आणि इतर ठिकाणी रक्तदान शिबिर सामुदायिक पद्धतीने आयोजित करण्यात येत आहेत. तसेच काही कार्यकर्ते स्थानिक रक्तपेढीत जाऊन रक्तदान करतात.

करोनाकाळात रक्तदानाबरोबरच मंडळाने 'प्लाझ्मादान' करण्याचे आवाहन केले आणि त्यालाही उत्तम प्रतिसादही मिळाला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बकरी ईदची कुर्बानी न करता तो पैसा पूरग्रस्त बांधवांना देण्याचा निर्णय घेतला आणि त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. मंडळातर्फे




*बकरी ईद निमित्त रक्तदान कार्यक्रमात प्रा. शमसुद्दिन तांबोळी, डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. बाबा आढाव आणि सय्यदभाई.*

कोल्हापूर आणि सांगली भागातील २५ अंध कुटुंबीयांना संसारोपयोगी भांडी आणि वस्तू देण्यात आल्या. याबरोबरच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि साहित्यासाठी मदत केली.

गेल्या १५ वर्षांपासून मंडळाच्या वतीने हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात येतो. जून २०२४च्या बकरी ईद दिनी रक्तदानाबरोबरच मंडळाच्या वतीने मरणोत्तर देहदान आणि अवयवदान करण्याचा संकल्प केला आणि कार्यकर्त्यांनी त्यासाठी प्रतिज्ञापत्र मंडळाकडे सादर केले. यात मंडळाव्यतिरिक्त इतर कार्यकर्त्यांनीही सहभाग नोंदवला. कुर्बानी न देता अनेकांनी शैक्षणिक प्रायोजकत्व या उपक्रमासाठी आर्थिक देणगी मंडळाकडे सुपूर्द केली. या उपक्रमासाठी अनेकांनी मदतीचा हात पुढे केला आहे.

मंडळाच्या या मानवतावादी उपक्रमाला चालना व समर्थन देण्यासाठी समाजातील नामांकित मान्यवर कार्यकर्ते, साहित्यिक, सनदी अधिकारी उपस्थित राहून शुभेच्छा देतात.

## २.८ तिमिरभेद मंच

अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास हा मंडळाचा एक प्राधान्याचा विषय आहे. इतर धर्मांप्रमाणेच मुस्लीम समाजात अनेक अंधश्रद्धा आहेत. त्या समाजाच्या निकोप विकासात अडथळा निर्माण करतात आणि शोषणासही कारणीभूत ठरतात. या अंधश्रद्धांची चर्चा करून त्यांचे निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास करण्यासाठी स्वतंत्र मंचाची स्थापना करावी, असा विचार अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी मांडला. या प्रस्तावास कार्यकारिणीने तत्काळ मान्यता देऊन 'तिमिरभेद मंच' सुरू करण्यात आला. या मंचाचे प्रमुख म्हणून प्रा. उम्मीद शेख आणि शाहिद शेख काम पाहतात. रक्तदान, अवयवदान आणि मरणोत्तर देहदान करण्याचा विचार समाजात रुजावा, संविधानिक, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि मानवतेचा प्रसार व्हावा, तसेच अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धांचे निर्मूलन व्हावे, हा या मंचाचा उद्देश आहे. धर्मचिकित्सा आणि काळानुरूप विचारांचा प्रसार करणे, यासाठी हा मंच काम करतो.

## २.९ आंतरधर्मीय विवाह आणि नोंदणी विवाह

हमीद दलवाई आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाहाचे समर्थक होते. अशा विवाहांची खास परंपरा भारतात आहे, मात्र अशा विवाहांना अजूनही धर्ममान्यता आणि समाजमान्यता या अडथळ्यांचा सामना करावा लागतो. धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाच्या निर्मितीत आंतरधर्मिय विवाह महत्त्वाची भूमिका पार पाडतात, अशी मंडळाची धारणा आहे. जोडीदाराची विवेकी निवड करताना येणारे अडथळे दूर करण्यास मंडळ सहकार्य करते. धर्मांतर न करता विवाह करता यावा, मुस्लीम महिलांना संविधानात्मक अधिकारांची अंमलबजावणी करता यावी आणि मुस्लीम वैयक्तिक कायद्यातील अन्यायी, विषम तरतुदींना फाटा देता यावा, यासाठी अशा विवाहांसाठी प्रोत्साहन, मदत आणि मार्गदर्शन केले जाते. या विवाहाच्या समर्थनार्थ आणि संबंधित दाम्पत्यांच्या सहजीवनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर 'चयन' या नावाने संघटनांचे एक नेटवर्क तयार करण्यात आले आहे. त्याच्याशी मंडळ संलग्न आहे. यानिमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमात मंडळाचा सहभाग असतो.

मुस्लीम महिलांच्या प्रश्नांचे निराकरण आणि धर्मनिरपेक्ष विवाहाची आधुनिक पद्धत म्हणजे विशेष विवाह कायदा, १९५४. मंडळ या नोंदणी विवाहाच्या प्रचारार्थ काम करते, तसेच अशा विवाहांच्या नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नोंदणी पद्धतीनेच विवाह करण्याची प्रतिज्ञा केलेली आहे.

आजच्या काळात शिक्षण, स्वावलंबन आणि स्वप्रतिमा विकसित झाल्यामुळे अनेक तरुण आणि तरुणींचे विवाहासंदर्भातील विचार बदलले आहेत. अविवाहित राहणाऱ्यांचे प्रमाणही वाढत आहे. 'लिव्ह-इन रिलेशनशिप'सारख्या नव्या संकल्पनांना कायद्याचेही संरक्षण आहे. एका बाजूला ही परिस्थिती असताना आंतरधर्मीय विवाहाचे प्रमाण वाढत आहे. यातून 'मॉब-लिंचिंग व ऑनर किलींग'च्या घटना घडत आहेत. काही राज्यात आंतरधर्मीय विवाहासंदर्भात नवीन कायदे आणि नियम तयार केले आहेत. यानिमित्ताने अनुचित प्रकार होऊ नये, याबद्दल मुस्लीम सत्यशोधक मंडळ दक्षता बाळगते. तसेच व्यक्तीस्वातंत्र्याचा भाग म्हणून अशा विवाहांना प्रोत्साहन देते.

गेल्या दशकात मंडळाच्या वतीने अशा अनेक आंतरधर्मीय विवाहितांना सहकार्य करण्यात आले आहे. रूबिना शेख, आफरोज इनामदार आणि इतर काही मुस्लीम तरुणींनी स्वतः तलाकच्या शिकार झाल्यानंतर मंडळाच्या पुढाकाराने आंतरधर्मीय आणि नोंदणी पद्धतीने विवाह केला आहे. मात्र 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'प्रमाणे आजही तलाक न्यायालयाबाहेर होतात. अशा मुलींना नोंदणी विवाह करताना कायदेशीर अडचण येते. कारण नोंदणी विवाह करताना न्यायालयातून झालेल्या तलाकच्या कागदपत्रांना प्रमाणित करून घ्यावे लागते. या वेळी अर्ज करून तलाक झालेले पती-पत्नी शपथपत्र सादर करतात आणि न्यायालय त्याची छाननी करून प्रमाणित करते. यासाठी वेळ आणि पैसा मोजावा लागतो. अशा वेळी मंडळ गरजू जोडप्यांना आधार देते.

## २.१० संविधान साक्षरता आणि समुपदेशन

'भारतीयत्वाचा अभिमान आणि संविधानाचा सन्मान' हे ब्रीद घेऊन मंडळ संविधानिक मूल्यांचा प्रचार करते, संविधनात्मक अधिकाराचे उपयोजन करता यावे म्हणून जनजागृती करते. मंडळाने या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यशदा आणि इतर सामाजिक संस्थांच्या समवेत कार्यशाळा, चर्चासत्र, व्याख्याने आयोजित केली आहेत. धर्मनिरपेक्षता, मानवाधिकार, समान नागरी कायदा यांच्या प्रचारार्थ मंडळाने 'सेंटर फॉर प्रमोशन ऑफ डेमॉक्रसी अँड सेक्युलॅरिझम'सोबत चर्चासत्रांचे आयोजन केले आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय यांच्या समन्वयातून 'भारतीय संविधान' या विषयावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थी, कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये संविधान साक्षरता वाढवण्यासाठी एकत्र उपक्रम राबवण्याचा सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. त्याचबरोबर कौटुंबिक सल्ला, समुपदेशन आणि कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी एकत्रित समुपदेशन केंद्र चालवण्याचे ठरवण्यात आले.




# ३. मंडळाचे विविध कार्यक्रम

## ३.१ मंडळाचे वर्धापन दिन

- २२ मार्च १९८० :
  श्रीमती शहजादी हकीम यांचे 'मुसलमानांचे शैक्षणिक प्रश्न' या विषयावर व्याख्यान झाले.
- २९, ३० मार्च १९८० :
  मंडळाच्या दशकपूर्ती वर्षाच्या निमित्ताने पुण्यातील हमाल भवन येथे सर्वसाधारण सभा, कार्यकर्त्यांचे शिबिर आणि जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. जाहीर सभेत 'मुस्लीम समाजाचे प्रबोधन' या विषयावर प्रा. अ. भि. शहा, डॉ. बाबा आढाव, यदुनाथ थत्ते आणि बाबुमियाँ बँडवाले यांनी विचार मांडले. कार्यकर्त्यांचे अनुभवकथन आणि पुढील कार्यक्रमाची दिशा ठरवण्यात आली.
- २२ मार्च १९८१ :
  चंदावरकर यांचे मुंबईत शैक्षणिक प्रश्नावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. मंडळाच्या मुंबई शाखेतर्फे मुस्लीम महिलांना समुपदेशन आणि कायदाविषयक सल्ला देण्यासाठी केंद्र सुरू करण्यात आले. महिलांना शिलाई प्रशिक्षण देण्यासाठी वर्ग सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य अभ्यासक्रम मार्गदर्शन आणि आर्थिक सहकार्य करण्यात आले.
- २२ मार्च १९८२ :
  महाराष्ट्र विधानसभेवर 'समान नागरी कायदा' आणि इतर मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला.
- १७ मार्च १९८७ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सुमतीबाई सरदार स्त्रीमुक्ती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्ह्यातील फलटण येथे महिला शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये वसुधा



***मंडळाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात डॉ. शमसुद्दिन तांबोळी, प्रा. जहीर अली, मा. आरिफ मोहंमद खान, नूर जहीर आणि जकिया सोमण.***

सरदार, सय्यदभाई, डॉ. नरेंद्र दाभोलकर, सौदामिनी राव, प्रा. नलिनी पंडित, ऐनुल अत्तार, सुहासिनी माने, रजिया सुलताना, विलायत शेख आणि कुलसुम पारेख यांनी मार्गदर्शन केले.

- २२ मार्च १९९० :

  मंडळाच्या वतीने तलाकपीडित मुस्लीम स्त्रीला पोटगीचा हक्क पुन्हा मिळावा, असा ठराव करून त्यावर चर्चा आयोजित करण्यात आली. डॉ. बाबा आढाव, रशीद शेख, बानो सय्यद, सय्यदभाई, शमसुद्दिन तांबोळी, अन्वर राजन यांनी सभेत विचार मांडले. शहाबानो प्रकरणानंतर १९८६मध्ये तयार करण्यात आलेला कायदा हा 'मजहब खतरे में हैं' असे म्हणणाऱ्या जातीयवाद्यांच्या दबावाखाली सरकारने तयार केला. यामुळे मुस्लीम महिलांचा न्याय्य हक्क नाकारण्यात आला. शिवाय देशात धार्मिक तणावही निर्माण झाला. या संदर्भात शासनाने पुनर्विचार करावा, असे आवाहन मंडळाने केले.

- २२ मार्च १९९२ :

  कार्यक्रमाचे आयोजन बॅ. नाथ पै सभागृह, साने गुरुजी स्मारक, पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे, अनिल अवचट, शाहीर काशिनाथ गोरे, शमसुद्दिन तांबोळी, रशीदभाई, सय्यदभाई इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये व्यसनमुक्तांचा ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

  "रूढी आणि धार्मिक प्रश्नांबरोबरच व्यसनमुक्तीसारखी चळवळ हाती घेणाऱ्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम समाज मागासलेला राहू नये, यासाठीही प्रयत्नशील राहायला हवे", अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले

की, “अशा प्रकारच्या कामाची गती ही नेहमीच मंद असते. अलीकडे दारूच्या सेवनामुळे आपण मोठे झालो आहोत, अशी भावना समाजात दृढ होत आहे. एकीकडे महात्मा गांधींचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे दारूचे दुकाने काढायची, असे समाजकारण सध्या चालू आहे. जाहिराती, सिनेमे आणि दूरदर्शन या माध्यमाद्‌वारे दारूला सातत्याने प्रतिष्ठा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर व्यसनमुक्तीसारख्या चळवळीचे फायदे लगेच मिळाले नाहीत, तरी किमान पुढच्या पिढीला त्याचा लाभ निश्चित मिळेल म्हणून हे काम सतत चालू ठेवले पाहिजे.”

‘देशात जातीयवाद, धर्मवाद, प्रांतवाद आणि विघटनवादी शक्तींचा दहशतवाद उफाळून आलेला आहे. त्यामुळे राष्ट्र एकसंध ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक निर्धाराने उभे राहावे’, असे आवाहन करणारा ठराव मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त संमत करण्यात आला. शेख नूर मोहंम्मद चाँदसाहेब, गफूर शेख या कार्यकर्त्यांनी आपापल्या शाखांचा अहवाल या वेळी सादर केला. दिनशा सैय्यद, सायरा मुलाणी या महिला कार्यकर्त्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. प्रा. शमसुद्‌दिन तांबोळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

- २१ मार्च १९९३ :
  मंडळाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा मेळावा आणि कार्यकारिणीची बैठक मेहेरून्निसा दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली. यात राष्ट्रीय पातळीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करून मंडळाची भूमिका ठरवण्यात आली.
- २६, २७ मार्च १९९४ :
  कोल्हापूर येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत प्रा. बी. टी. काझी यांनी संघटनात्मक कार्यपद्‌धतीवर भाष्य केले. मंडळाने या भाष्यावर आत्मपरीक्षण करणे व धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक होते.
- २४ मार्च १९९६ :
  पुण्यातील भारत इंग्लिश स्कूलमध्ये मुस्लीम महिलांची एक दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेत तलाकपीडित महिलांनी अनुभवकथन केले. मंडळाचे हुसेन जमादार, सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, प्रा. ऐनुल अत्तार, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, डॉ. सत्यरंजन साठे, मा. भाई वैद्य आणि जावेद कुरेशी यांची या परिषदेत भाषणे झाली.
- २३ मार्च १९९७ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. यामध्ये ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व पत्रकार स. मा. गर्गे यांनी मार्गदर्शन केले. धर्मग्रंथामध्ये बदलत्या काळानुसार आणि स्वार्थासाठी महिलांच्या प्रश्नाविषयी वेगवेगळे अर्थ काढले गेले असून, चौदाशे वर्षांपूर्वीचे धर्मग्रंथ कालबाह्य ठरत आहेत. त्यामुळे या ग्रंथांमधून आवश्यक तेवढेच घ्यावे, असा सल्ला ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या भावी कार्याची दिशा’ या विषयावर बोलताना गर्गे यांनी दिला. समाजाचे मूलभूत प्रश्न काय आहेत आणि ते सोडवण्यासाठी काय केले पाहिजेत, याचे




***मंडळाच्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलताना डॉ. बाबा आढाव. उपस्थित श्रीपाल सबनीस, डॉ. अभिजित वैद्य, भाई वैद्य आणि इतर.***

परीक्षण करण्याची गरज गर्गे यांनी व्यक्त केली. समाजात ५० टक्के असलेल्या महिला असंतुष्ट असतील तर समाज सुधारला, असे म्हणता येणार नाही. महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुरुषांनी त्याग केला पाहिजे. मुस्लीम तरुणांच्या उत्कर्षासाठी उर्दूचा आग्रह न धरता प्रादेशिक भाषेत शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. परंतु प्रादेशिक भाषेचा प्रचार करणाऱ्यांच्या हेतूचा विपर्यास केला जात असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. मेळाव्यात सय्यदभाई, विलास चाफेकर, तेज निवळीकर, निर्मलाताई पुरंदरे, डॉ. अन्वर शेख, सुरैया शेख, रशीद शेख, शमसुद्दिन तांबोळी यांनीही आपले विचार मांडले.

- २२ मार्च १९९८ :

  मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले यांचे ८ डिसेंबर १९९७ रोजी निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी २८व्या वर्धापनदिनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे केले होते. याप्रसंगी गांधीवादी नेते मा. बाळासाहेब भारदे, कुमार सप्तर्षी, रजिया पटेल, मेहेरून्निसा दलवाई, ताहेरभाई पूनावाला आणि श्रीगोंद्याचे नगराध्यक्ष एकनाथराव आळेकर, तसेच विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे कार्यकर्तेही उपस्थित होते.

  या प्रसंगी 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'च्या बाबुमियाँ बँडवाले विशेषांकाचे प्रकाशन मा. भारदे यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार बबनराव पाचपुते या कार्यक्रमास उपस्थित होते. याच दिवशी श्रीगोंदा आणि इतर भागांतून आलेल्या मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत चर्चाही आयोजित करण्यात आली होती.

● २० मार्च २००६ :
मंडळाचे कार्यकर्ते आणि समर्थकांची बैठक पुण्यात आयोजित करण्यात आली. समतेवर आधारित समान नागरी कायदा देशात लागू व्हावा, म्हणून सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात पाठपुरावा करण्याचा आणि मुस्लीम समाजात सुधारणांसाठी पुरोगामी विचारांचे राष्ट्रीय व्यासपीठ स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. या चर्चेमध्ये मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई, मा. भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, रा. प. नेने, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, ताहेरभाई पूनावाला, शांताबाई रानडे, सुरेश शिपूरकर, अरविंद बाळ, अस्लम जमादार उपस्थित होते.

● २३ मार्च २००८ :
मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते आणि हितचिंतक यांची सच्चर समितीच्या शिफारसीची अंमलबजावणी, राष्ट्रीय एकात्मता आणि महिलांच्या समस्यांवर कार्यक्रम आखण्यासंदर्भात वर्धापन दिनाचे औचित्य साधून बैठकीचे आयोजन करण्यात आले.

● २२ मार्च २००९ :
'मुस्लीम प्रबोधनाची सद्यस्थिती' आणि 'प्रबोधनाची भावी दिशा' या विषयांवर चर्चासत्र आणि स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मा. भाई वैद्य, ताहेरभाई पूनावाला, रा. प. नेने, विलास वाघ, बशीर शेख, अन्वर शेख, लता जाधव, नितीन पवार, सय्यदभाई आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. धर्मवाद संघटित होऊन त्यास दहशतवादाचे स्वरूप येत आहे; परिणामी मुस्लीम जगतात अनेक बदल होत असल्याचे भाई वैद्य यांनी सांगितले. त्यांनी संघटनेच्या विस्तारासाठी पंचसूत्री सांगितली. यात हिंसक जिहादला सक्त विरोध, जबानी तलाक पद्धतीला विरोध, समान नागरी कायद्याचा आग्रह, मुस्लीम राष्ट्रांचा गट या संकल्पनेला विरोध आणि भारत, पाकिस्तान, बांगलादेश यांच्या महासंघाच्या स्थापनेची भूमिका घ्यावी, यात भूतान व नेपाळचा समावेश करावा, या पंचसूत्रीचा भारतभर प्रसार करावा, असे वैद्य यांनी सुचवले.

● २२ मार्च २०१० :
४०व्या वर्धापनदिनानिमित्त मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे मंडळाचे कार्यकर्ते शमसुद्दिन तांबोळी लिखित 'मुस्लीम समाजप्रबोधन आणि विकास', 'मुस्लीम समाज – व्यक्ती, विचार आणि साहित्य' आणि 'शहाबानो ते शबानाबानो' या पुस्तकांचे प्रकाशन प्रा. फ. म. शहाजिंदे, साहित्यिक राजन खान आणि सय्यदभाई यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. बाबा आढाव, मा. भाई वैद्य आणि प्राचार्य भाऊसाहेब जाधव उपस्थित होते.

● १ एप्रिल २०१२ :
'मुस्लीम समाज : स्थिती आणि प्रगती' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात मा. भाई वैद्य, शमसुद्दिन तांबोळी, हुसेन जमादार, सय्यदभाई आणि मंडळाचे अध्यक्ष मोहम्मद गौस नाईक उपस्थित होते. या वेळी मंडळाने नवा जाहीरनामा प्रकाशित केला. 'जाहीरनामा : नवी दिशा' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. चर्चासत्रामध्ये राम पुनियानी, जहीर अली, फक्रूद्दीन बेन्नूर , अब्दुल कादर मुकादम, आफाक



*वर्धापन दिन कार्यक्रम नूरजहाँ शफिए यांचा सत्कार करताना नसीरुद्दीन शाह आणि इतर.*

खान, आय. एन. बेग, रुबिना पटेल यांनी विचार मांडले.

या प्रसंगी भाई वैद्य म्हणाले, “कोणत्याही धर्माचा विचार मानववंशशास्त्राप्रमाणे केला पाहिजे. कुठलाही धर्मग्रंथ दैवी म्हणून चालणार नाही. ते समाजासाठी धोकादायक आहे. मुस्लीम समाज धक्कादायक विचार ऐकण्यासही तयार असतो, हे हमीद दलवाईंच्या अनुभवावरून सिद्‌ध झाले आहे. त्यांनी मांडलेल्या योग्य भूमिकांमुळे राष्ट्रवादाला बळकटी मिळाली.”

मंडळाच्या नवीन जाहीरनाम्यामध्ये पुढील ठळक मुद्द्यांचा समावेश करण्यात आला :

१) उदारमतवादी ‘कुराण’ भाष्याचा आधार

२) समाजासमोरील जमातवादाचे आव्हान

३) सेक्युलॅरिझमबाबतची भूमिका

४) मुस्लीम समाजाचे विकासाचे प्रश्न

५) महिलांच्या समस्या

६) देशासमोरील संवेदनशील समस्या

- २२ मार्च २०१४ :

अभ्यास शिबिर, ‘मुस्लीम सत्यशोधक पत्रिके’चे प्रकाशन आणि पुरस्कार प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले. यात ‘मुस्लीम समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रश्न’ या विषयावर जहीर अली, जावेद आनंद, इरफान इंजिनिअर, अब्दुल कादर मुकादम, आशा अपराद, ऐनुल अत्तार, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, राजन खान, प्रा. सत्तार शेख, अंजुमन तांबोळी, सय्यदभाई, प्रा. जमीर शेख, बेनझीर तांबोळी, तमन्ना इनामदार, हुसेन जमादार,

डॉ. शमसुद्दिन तांबोळी आदींनी विचार मांडले. याच कार्यक्रमात साहित्यिक राजन खान यांना मंडळाच्या वतीने डॉ. बाबा आढाव आणि मा. भाई वैद्य यांच्या हस्ते 'समाजप्रबोधन पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.

- २२ मार्च २०१५ :
  'मुस्लीम समाजासमोरील आव्हाने' या विषयावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात डॉ. बाबा आढाव, मा. भाई वैद्य, प्रा. जी. ए. उगले, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. अभिजित वैद्य, डॉ. शमसुद्दिन तांबोळी, सय्यदभाई, अब्दुल कादर मुकादम, डॉ. तसनिम पटेल यांनी विचार मांडले. तर 'मुस्लीम महिलांसमोरील आव्हाने' या सत्रात प्रा. हसीना मुल्ला, तमन्ना इनामदार, शहनाज शेख, प्रा. सायरा मुलाणी, शाजिया शेख, खातून शेख यांनी विचार मांडले.
- २० मार्च २०१६ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांचा राज्यस्तरीय मेळावा, 'सत्यशोधक पत्रिके'चे प्रकाशन, तसेच 'मुस्लीम महिलांच्या समस्या : शोध आणि बोध', 'समान नागरी कायदा : अपेक्षा आणि वास्तव' या पुस्तकांच्या प्रकाशनाबरोबरच मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्या मुमताज शेख यांना 'समाजप्रबोधन पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी मा. भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, विश्वंभर चौधरी, डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी मा. भाई वैद्य यांनी ओवेसीच्या भडकावू वक्तव्याला विरोध केला. तथापि 'भारत माता की जय' असे म्हणणे अनिवार्य केले, तर मीही तसे म्हणणार नाही, अशी भूमिका स्पष्ट केली.
- २३ मार्च २०१७ :
  '२१ वे शतक : भारतातील धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही' या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादात माजी केंद्रीय मंत्री आणि इस्लामचे अभ्यासक आरिफ मोहम्मद खान, प्रा. जहीर अली, डॉ. नूर जहीर आणि भारतीय महिला आंदोलनाच्या अध्यक्षा जाकिया सोमण, शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.
  त्याचबरोबर मंडळाचे पूर्वाध्यक्ष 'स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले' हा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक राज काझी यांना प्रदान करण्यात आला. 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कारा'ने कायदा अभ्यासक तबस्सुम इनामदार, कार्यकर्त्या शमीम मडकी, युवा खेळाडू अल्मास शेख, आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच सायराबानो शेख आणि मानवाधिकार कार्यकर्त्या ॲड. दिलशाद मुजावर या पाच महिलांना सन्मानित करण्यात आले.
  याच वर्षी राष्ट्र सेवा दलाने मंडळाच्या दैनंदिन कामकाजासाठी जागा उपलब्ध करून दिली. मंडळाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने साने गुरुजी स्मारकात मुस्लीम महिला मदत केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.
- २१ मार्च २०१८ :
  सर्वोच्च न्यायालयाचे ॲड. बालाजी श्रीनिवासन यांना 'कृतज्ञता सन्मान' आणि डॉ. नूरजहाँ



*शायराबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडणारे ॲड. बालाजी श्रीनिवासन यांचा सत्कार करताना नसीरुद्दीन शाह, उपस्थित आरिफ मोहम्मद खान आणि इतर.*

शफिए (भारतीय मुस्लीम महिला आंदोलन) यांना ज्येष्ठ अभिनेते नसीरूद्दीन शाह यांच्या हस्ते 'समाजप्रबोधन पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. माजी केंद्रीय मंत्री आरिफ मोहम्मद खान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे होते.

- २२ मार्च २०१९ :
  डॉ. झीनत शौकत अली यांना 'सत्यशोधक फातिमा शेख पुरस्कार', दिल्ली येथील 'धनक' संस्थेस बहुसांस्कृतिकतेबाबत 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार', शाहीर बशीरभाई मोमीन-कवठेकर यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल 'कृतज्ञता सन्मान' देण्यात आले.
  या कार्यक्रमात 'हमीद : द अनसंग ह्युम्यानिस्ट' हा माहितीपट दाखवण्यात आला. या कार्यक्रमाला जगविख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आणि त्यांच्या पत्नी डॉ. मंगला नारळीकर यांची विशेष उपस्थिती होती.
- २२ मार्च २०२० :
  मंडळाच्या सुवर्णजयंती वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला विविध पुरस्कार व प्रकाशन कार्यक्रम कोरोना परिस्थितीमुळे रद्द करून तीन वर्षांचे वर्धापन दिन कार्यक्रम २०२२मध्ये आयोजित करण्यात आले.
- २२ मार्च, २०२१ :
  'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चा विशेषांक प्रकाशित करण्यात आला; परंतु कोरोनाच्या

दुसऱ्या टप्प्यातील वाढत्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन आणि सार्वजनिक कार्यक्रमांवर मर्यादा आल्याने मंडळाचा आझम कॅम्पस, पुणे येथील पुरस्कार प्रदान कार्यक्रम रद्द करावा लागला. मात्र, या वर्धापनदिनानिमित्त छोटेखानी स्नेहसंवाद आणि पत्रिकेचा '५१वा वर्धापनदिन विशेषांक प्रकाशन समारंभ' पुण्यातील एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे, डॉ. बाबा आढाव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी अध्यक्षस्थानी होते.

- २२ मार्च २०२२ :
  रोजी वर्धापनदिन समारंभ एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. वर्षे २०२०, २०२१, २०२२ या वर्षांचे पुरस्कार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. भारत सासणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ डॉ. यास्मिन शेख यांच्या हस्ते मा. भारत सासणे यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव या कार्यक्रमाला उपस्थित होते.
- २२ मार्च २०२३ :
  वसिमा हैदरसाब शेख यांना 'फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार' अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. जहीर काझी यांना 'हमीद दलवाई समाजप्रबोधन पुरस्कार' देण्यात झाला. या प्रसंगी पसमांदा मुस्लीम कार्यकर्ते व राज्यसभेचे माजी खासदार आणि लेखक मा. अली अन्वर अन्सारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. विविध पुस्तके आणि 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' विशेषांकाचे प्रकाशन झाले.
- २२ मार्च २०२४ :
  रोजी एस. एम. जोशी सोशलिस्ट फौंडेशन, पुणे येथील मुख्य सभागृहात आयोजित करण्यात आला. प्रकाशन, पुरस्कार, परिसंवाद, पारितोषिक आणि सन्मान असे या वर्धापन दिनाचे स्वरूप होते. या वर्धापनदिन कार्यक्रमात मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात 'शैक्षणिक प्रायोजकत्व' छात्रवृत्तीचे वाटप करण्यात आले. या वेळेस प्रा. जहीर अली आणि प्रा. भाऊसाहेब जाधव यांचा वयाच्या पंचाहत्तरीनिमित्त 'कृतज्ञता सन्मान' करण्यात आला. मोहम्मद वाहिद आणि ज्योती यदुला यांना 'हमीद दलवाई पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. फिरोझ मिठीबोरवाला यांना 'बाबुमियाँ बँडवाले राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

  'संविधानाची ७५ वर्षे' या विषयावरील परिसंवादात जहीर अली, मुमताज शेख, मोहम्मद वाहिद, फिरोझ मिठीबोरवाला यांनी विचार मांडले. डॉ. बाबा आढाव, अशोक धिवरे, सुरेश शिपूरकर, जगदीश काबरे आणि शमसुद्दिन तांबोळी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रावसाहेब कसबे होते.

## ३.२ अभ्यास शिबीर, परिषद आणि मेळावा

- जून १९८२ :
  'मुस्लीम प्रबोधन संवाद' हे नियकालिक मंडळाच्या कोल्हापूर शाखेने सुरू केले. गाझियोद्दिन सलाती यांनी इचलकरंजी येथे जवळपास शंभर कार्यकर्त्यांसाठी अभ्यास शिबिरांचे आयोजन केले.
- १३ जून १९८२ :
  पुणे येथे विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वसतिगृहात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. त्यात तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, पोटगी, सिनेमा बंदी, कुटुंब नियोजन, बुरखा पद्धत, महिलांचे शिक्षण आणि देशातील धार्मिक व जातीय दंगली या संदर्भात कार्यक्रम ठरवण्यात आले. हा मेळावा बाबुमियाँ बँडवाले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.
- डिसेंबर १९८२ :
  इचलकरंजी येथे चर्चाशिबिर आयोजित करण्यात आले. यात ८० शिबिरार्थी सहभागी झाले, त्यात ३५ महिला होत्या.
- २८-२९ मे १९८३ :
  मुंबईत मंडळाच्या कार्यकर्त्यांचे शिबिर आयोजित करण्यात आले.



***शिबिरात मांडणी करताना नानासाहेब गोरे.***

● ४-५ जून १९८३ :

हमाल भवन, पुणे येथे मंडळाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्‌घाटन एस. एम. जोशी यांच्या हस्ते झाले. 'मुस्लीम कायद्यातील सुधारणा' या विषयावर डॉ. सत्यरंजन साठे, ॲड. एस. ए. रेहमान, ॲड. अब्दुल शेख, ॲड. नूरजहाँ रज्जाक आणि ॲड. एम. ए. शेख यांनी विचार मांडले. तर महिलांविषयक प्रश्नांवर कुलसुम पारेख, मुमताज रहिमतपुरे, मेहेरून्निसा दलवाई, रजिया पटेल, नजमा बांगी, नीलम गोऱ्हे आणि विद्या बाळ यांनी विचार मांडले. 'जातीय दंगली - कारणे व उपाय' या सत्रात डॉ. बाबा आढाव, व्ही. व्ही. नगरकर, वजीर पटेल, रत्नाकर महाजन, अलीम वकील यांनी विचार मांडले. 'समाजप्रबोधन' या सत्रात विनायकराव कुलकर्णी, असगर अली इंजिनिअर, वि. अ. शेख, अब्बास खान, आणि प्राचार्य डी. डी. अत्तार यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप नानासाहेब गोरे यांनी केला. नंतर बाबुमियाँ बँडवाले यांच्या अध्यक्षतेखाली संघटनात्मक चर्चा झाली. अन्वर राजन यांनी आभार मानले.

● ३०, ३१ जुलै १९८३ :

मंडळाच्या नव्या-जुन्या कार्यकर्त्यांचा मेळावा हमाल भवन, मार्केटयार्ड, पुणे येथे आयोजित करण्यात आला.

● १-२ मे १९८५ :

पुण्यातील हमाल भवन, मार्केटयार्ड, गुलटेकडी येथे मंडळाच्या वतीने 'राज्यव्यापी सामाजिक परिषदे'चे आयोजन करण्यात आले. परिषदेत प्रा. आतार (सातारा), प्रा. कुलसुम पारेख, रशीदा मुजावर (गोवा), रजिया पटेल, ताहेरभाई पूनावाला यांनी विचार मांडले. सय्यदभाई आणि अन्वर राजन यांनी परिषदेचे संयोजन केले.




***शिबिरात मांडणी करताना प्रा. कुलसुम पारेख***

याच दिवशी तोंडी एकतर्फी तलाक विरोधात निषेध व्यक्त करण्यासाठी कोल्हापुरातील कार्यकर्त्यांनी उपोषण केले.

- १७ ऑगस्ट १९८५ :
  मेहेरून्निसा दलवाई यांच्या नेतृत्वाखाली पोटगी बचाव परिषदेचे मुंबई येथे आयोजन.
- २१ ते २४ जानेवारी १९८८ :
  मंडळ आणि लेस्ली सहानी सेंटर, देवळाली यांच्या वतीने मुस्लीम व्यक्तिगत कायदा, महिलांचे प्रश्न त्यासंदर्भातील गुन्हे, कायद्यातील सुधारणा आणि 'समान नागरी कायदा' यासंदर्भात शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- २५ मार्च १९८९ :
  मंडळाचे कार्यकर्ते आणि हितचिंतक यांचा मेळावा हमाल भवन, गुलटेकडी येथे आयोजित करण्यात आला. यामध्ये विनायकराव कुलकर्णी, बाबा आढाव, डॉ. जब्बार पटेल, डॉ.श्रीराम लागू, सईद मिर्झा अख्तर, कुमारी सीमा काझी, सुधीर बेडेकर यांनाही निमंत्रित करण्यात आले. मेळाव्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाची २० वर्षांची वाटचाल व पुढील कार्याची दिशा' या विषयावर विचारमंथन करण्यात आले.
- ३, ४, ५ मे १९८९ :
  मंडळाच्या वतीने कार्यकर्त्यांचे प्रबोधन शिबिर कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले. ३ मे रोजी मुमताज रहिमतपुरे यांना जाहीर कार्यक्रमात मरणोत्तर 'हमीद दलवाई पुरस्कार' देण्यात आला.
- १९८९ :
  या वर्षभरात हैद्राबाद, बेंगलोर येथे ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने




***प्रबोधन शिबिरात मार्गदर्शन करताना भाई वैद्य.***

महिला व सामाजिक प्रश्नांवर परिषदांचे आयोजन करण्यात आले.

- ४-५ ऑगस्ट १९९० :
  महात्मा फुले स्मृतिशताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुणे हमाल भवन येथे मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी बौद्धिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात 'आंतरराष्ट्रीय पातळीवर मुस्लीम महिलांच्या समस्यांवर काम करणाऱ्या संघटना', 'समान नागरी कायदा', 'काश्मीर समस्या' आणि 'स्वातंत्र्य आंदोलनातील मुस्लिमांचा सहभाग' या विषयांवर चर्चा करण्यात आली. यात बाबा आढाव, विनायकराव कुलकर्णी, रजिया पटेल, डॉ. सत्यरंजन साठे, रा. प. नेने, ग. प्र. प्रधान, डॉ. रावसाहेब कसबे, मा. भाई वैद्य, ताहेरभाई पूनावाला, तसेच मंडळाचे शमसुद्दिन तांबोळी, अन्वर शेख, अन्वर राजन आणि सय्यदभाईंनी विचार मांडले. या दोन दिवसीय शिबिराच्या अध्यक्षस्थानी मेहेरून्निसा दलवाई होत्या.
- २२ सप्टेंबर १९९२ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर मंगलधाम, इचलकरंजी येथे आयोजित करण्यात आले. सदाशिवराव सुलतानपुरे यांनी शिबिराचे उद्घाटन केले. शिबिरात 'मुस्लीम समाजाचे ज्वलंत प्रश्न', 'मुस्लीम समाजाचे शैक्षणिक व आर्थिक प्रश्न' आणि 'राष्ट्रीय एकात्मता व मुस्लीम समाज' या विषयांवरील चर्चासत्रांत अनुक्रमे हमीदा गोरवाडे, मुमताज मुल्ला आणि मेहेरून्निसा दलवाई अध्यक्षस्थानी होते. शिबिरात रहिमान खलिफा, बानूबी पठाण, कुमार शिराळकर, बी. टी. काझी, शमसुद्दिन तांबोळी, एन. जी. अत्तार, आय. एन. बेग, मौला सय्यद, एम. एम. पिरजादे, हुसेन जमादार, गाझीयोद्दिन सलाती आणि सय्यदभाईंनी विचार मांडले.




***प्रबोधन शिबिरात बोलताना यदुनाथ थत्ते.***

- २२ ऑक्टोबर १९९२ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांचे राज्यस्तरीय शिबिर पुण्यातील विद्यार्थी सहायक समिती, पुणे येथे आयोजित करण्यात आले. शिबिरात 'हिंदू-मुस्लीम प्रश्न व राष्ट्रीय एकात्मता', 'मुस्लीम महिलांचे प्रश्न व महिला आयोग' या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन गांधीवादी नेते बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई, हुसेन जमादार, महंमद गौस नाईक, आय. एन. बेग, शमसुद्दिन तांबोळी, गाझियोद्दिन सलाती, रजिया पटेल, नीलम गोऱ्हे, मुमताज मुल्ला आणि यदुनाथ थत्ते यांनी विचार मांडले. पंजाब व काश्मीरमधील अतिरेकी कार्यवायांना पाकिस्तान मदत करत असल्याबद्दल त्याचा निषेध केला. शिबिराचा समारोप यदुनाथ थत्ते यांनी केला.
- २३ फेब्रुवारी १९९५ :
  मुंबई येथे मुस्लीम सामाजिक परिषदेचे आयोजन करण्यात आले.
- ३०-३१ मे आणि १ जून १९९८ :
  वाई, जिल्हा सातारा येथे मुस्लीम सत्यशोधकच्या कार्यकर्त्यांचे शिबिर आयोजित करण्यात आले. मंडळाची स्थापना झाल्यानंतर मंडळाने मुस्लीम समस्यांवर काम केले. यामुळे थोड्याफार प्रमाणात परिस्थितीत बदल झाला असला, तरी समस्यांचे निवारण झाले नाही. प्रबोधनाचा विचार पुढे गेला पाहिजे, त्या दृष्टीने मुस्लीम प्रबोधन चळवळीत असलेल्या कार्यकर्त्यांचे तीन दिवसांचे शिबिर मंडळ आणि प्राज्ञ पाठशाळा यांच्यातर्फे वाई येथे घेण्यात आले. शिबिरात प्रा. मे. पुं. रेगे, वसंत पळशीकर आणि मंडळाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.



***कार्यशाळेत बोलताना विधिज्ञ सत्यरंजन साठे.***

- २८, २९, ३० जुलै १९९८ :
  मंडळ आणि हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे प्रा. मे. पुं. रेगे यांचे 'भारतातील मुसलमान व इहवाद' या विषयावर तीन दिवसांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा. रेगे यांच्या 'इहवाद आणि सर्वधर्मसमभाव' या विषयावरही खुली चर्चा झाली. हा कार्यक्रम स्नेहसदन, शनिवार पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला.
- २५, २६ मार्च २००० :
  मंडळाच्या ३०व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यकर्त्यांचे शिबिर आणि कार्यकारिणी बैठक कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली. 'भारतीय दंडसंहिता १२५' पुन्हा मुस्लिमांना लागू करण्यात यावी, यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवण्यात आले. 'हिंदू-मुस्लीम जमातवाद' या विषयावर सय्यदभाई, वि. अ. शेख, आय. एन. बेग, बी. टी. काझी, हुसेन जमादार यांनी विचार मांडले. श्रीमती मेहेरून्निसा दलवाई अध्यक्षस्थानी होत्या.
- ३ मे २००१ :
  मुंबई येथे कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर. मार्गदर्शक : एम. ए. नाईक, अब्दुल कादर मुकादम. स्थळ : नित्यानंद नगर हॉल, अंधेरी (पू.), मुंबई. याच दिवशी सायंकाळी ६ वाजता नसीमा मोहम्मद अमिन हुरजूक यांना साहित्यिक दिलीप चित्रे यांच्या हस्ते 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी भाई वैद्य होते. स्थळ : सुरेन्द्र गावस्कर सभागृह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पू.), मुंबई.
- ३०-३१ ऑगस्ट २००३ :
  मंडळाचे चिंतन शिबिर पुण्यात आयोजित करण्यात आले. यात मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई, रशीद शेख, मोहम्मद गौस नाईक, ॲड. झाकीर मणियार, बशीर मुजावर, अजीज सय्यद, वाईचे दिलावर शेख उपस्थित होते.
- १० ते १३ डिसेंबर २०१३ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी यशदा, पुणे येथे प्रशिक्षण आणि अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले. यशदाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने अशा प्रकारचे पाच शिबिरे २०१४-१६ या वर्षादरम्यान यशदामध्ये आयोजित करण्यात आले.
- ७ एप्रिल २०१६ :
  आरोग्यदिनाचे औचित्य साधून महिलांच्या आरोग्यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महिलांना कौशल्य प्राप्त करून देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली. युवामंच आणि महिलामंच सातत्याने मंडळाचे उपक्रम राबवण्यात पुढाकार घेतात. 'धार्मिक उच्छाद' या विषयावरील परिसंवादात समीर शेख, बेनझीर तांबोळी, रुक्सार मुल्ला प्रा. लता जाधव, कलीम अजीज, अन्सार शेख, शहनाज शेख, तन्वीर इनामदार यांनी भाग घेतला. रुक्साना पाटील, मिनाज लाटकर, हलिमा कुरेशी, हिना खान, शबनम पूनावाला, सायरा मुलाणी, मुमताज इनामदार, तमन्ना इनामदार, आर्शिया बागवान, अप्सरा आगा, साजिद इनामदार, अझरुद्दीन पटेल आणि इतर कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

- १३ नोव्हेंबर २०१६ :
  'मुस्लीम सत्यशोधक युवा मंच'च्या वतीने कराड येथे 'मुस्लीम युवकांपुढील आव्हाने' या विषयावर युवा परिषदेचे आयोजन. यात मा. राज काझी, डॉ. राजेंद्र कांकरिया, डॉ. राजेखान शानेदिवाण, डॉ. हमीद दाभोलकर व डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. अझरुद्दीन पटेल, नियाज अत्तार यांनी परिषदेचे समन्वयक म्हणून काम केले.
- ३० सप्टेंबर २०१८ :
  हमीद दलवाई यांच्या ८६व्या जयंतीनिमित्त मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी राज्यस्तरीय अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये जगविख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, गणित-अभ्यासक डॉ. मंगला नारळीकर, 'साधना' साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. खुल्या सत्रात अझरुद्दीन पटेल, समीर शेख, बेनझीर तांबोळी, जमीर शेख, तमन्ना इनामदार यांनी मनोगते व्यक्त केली.
- २९ सप्टेंबर २०१९ :
  दलवाई जयंतीनिमित्त युवा शिबिराचे आयोजन. यामध्ये डॉ. अनिल अवचट, डॉ. हमीद दाभोलकर, शमसुद्दिन तांबोळी, सदा डुम्बरे यांनी मार्गदर्शन केले.
- १४ फेब्रुवारी २०२१ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांचे राज्यस्तरीय अभ्यास शिबिर सुसंस्कार शिक्षण मंडळ, कदमवाडी, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले. यात श्रीराम पवार, एम. बी. शेख, ऐनुल अत्तार, मिरासाहेब मगदूम, ॲड. दिलशाद मुजावर, डॉ. राजेखान शानेदिवाण आणि मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिर समन्वयक म्हणून प्रा. सायरा मुलाणी आणि गुलाब अत्तार यांनी काम केले.



***अभ्यासशिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. नरेंद्र दाभोलकर.***

- ३ ऑक्टोबर २०२१ :
  हमीद दलवाई यांच्या जन्मदिनाच्या पार्श्वभूमीवर 'कार्यकर्ता अभ्यास शिबिर' आयोजित करण्यात आले. यात 'मुस्लीम मूलतत्त्ववादी विचारधारा' आणि 'जागतिक पडसाद मुस्लीम उदरमतवादी विचार आणि सद्यस्थिती' या विषयांवर प्रा. जहीर अली यांनी मार्गदर्शन केले. याच दिवशी 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार' भाषातज्ज्ञ डॉ. यास्मिन शेख यांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. प्रा. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मा. भानु काळे यांनी डॉ. यास्मिन शेख यांचा परिचय करून दिला.
- १० मे २०२२ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या वतीने 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. मंडळ आणि दलवाई यांच्या कार्यविचारांवर संशोधन करणारे विद्यार्थी, ज्येष्ठ कार्यकर्ते, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. संशोधक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले, काही सूचना केल्या. याप्रसंगी 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर, मा. अशोक धिवरे, डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. जमीर शेख यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमात चर्चा आणि प्रश्नोत्तरे झाली.
- ४ डिसेंबर २०२२ :
  हमीद दलवाई स्टडी सर्कल, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे सेंटर फॉर कॉन्स्टिट्यूशनल स्टडीज यांच्या वतीने 'भारतीय संविधान आणि आम्ही भारताचे लोक' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. नितीश नवसागरे यांच्या बीजभाषणाने झाले. अध्यक्षस्थानी मा. अशोक धिवरे होते. डॉ. भगवान गवळी, डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. समीना पठाण यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेत ॲड. निलेश खानविलकर, अझरूद्दीन पटेल यांनी मार्गदर्शन केले. नबाब अल्तापहुसेन, बेनझीर तांबोळी, अप्सरा आगा, आफरोझ इनामदार, समीना पठाण यांनी आयोजन केले. यात महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांबरोबरच आझम शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. प्राचार्या क्रांती देशमुख यांचे सहकार्य लाभले.
- ३० सप्टेंबर – १ ऑक्टोबर २०२३ :
  हमीद दलवाई जयंतीनिमित्त दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यकर्ता अभ्यास शिबिराचे आयोजन नळदुर्ग येथील 'आपलं घर' येथे करण्यात आले. या कार्यक्रमात मा. पन्नालाल सुराणा, जयदेव डोळे, फ. म. शहाजिंदे, डॉ. बशारत अहमद, अन्वर शेख, मुज्तबा लोखंडवाला, मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी, सरफराज अहमद आणि मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.

- २६ ऑगस्ट २०२४ :
  प्रबोधन सभागृह, हमाल नगर, मार्केटयार्ड, पुणे येथे मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी राज्यस्तरीय संघटनात्मक शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन आरोग्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष व समाजवादी अभ्यासक डॉ. अभिजित वैद्य यांच्या हस्ते झाले.

## ३.३ मुस्लीम महिलांच्या समस्या निवारणार्थ कार्यक्रम

- ६ जुलै १९८२ :
  रास्ता पेठ, पुणे येथील डॉ. न. देशपांडे यांच्या 'आंतरभारती केंद्रा'त 'मुस्लीम महिला मदत केंद्र' सुरू करण्यात आले. तिथं दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मोफत कायदेविषयक सल्ला, कौटुंबिक समुपदेशन आणि मदत केली जात असे.
- २६ जानेवारी १९८३ :
  हुसेन जमादार यांनी तलाकपीडित महिलांच्या मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, बेळगाव या भागात मंडळाचे कार्य पोहोचवण्यासाठी जमादार आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांनी काम केले. स्थानिक पातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन केले. कोल्हापूर येथील वि. स. खांडेकर हायस्कूलमध्ये कार्यकर्त्यांचे मेळावे घेण्यात आले. सामाजिक सद्भाव वाढवणारे कार्यक्रम घेण्यात आले. अमरावती भागात वजीर पटेलांनी कुटुंबनियोजनाच्या कामाला प्राधान्य दिले. जातीयवादी मुस्लिमांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला, पण तरीही विचलित न होता, न डगमगता त्यांनी जिद्दीने काम पुढे नेले.
- १९८५ :
  टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे मंडळातर्फे शहाबानो यांचा सत्कार सामाजिक कार्यकर्ते ताज अहमद यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमिलाताई दंडवते प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.
- २१-२२ फेब्रु. १९८६ :
  तलाकपीडित महिलांसह मंडळाच्या शिष्टमंडळाने दिल्ली येथे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी आणि राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, केंद्रीय कायदामंत्री अशोक कुमार सेन आणि विविध पक्षांच्या खासदारांची भेट घेतली.
- ३१ जुलै १९८८ :
  अहमदाबाद, गुजरात येथील वुमन गार्डन येथे तलाकपीडित महिलांची परिषद आयोजित करण्यात आली. मुस्लीम सत्यशोधक मंडळ, प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स, तलाकपीडित महिला संघ, अहमदाबाद यांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. यासाठी अहमदाबादच्या सेल्फ एम्प्लॉइज वूमेन असोसिएशनचे सहकार्य लाभले. या परिषदेला सुमारे २०० तलाकपीडित महिला उपस्थित होत्या. जुबानी तलाक बंदी आणि १२५व्या कलमानुसार पोटगी यासाठी मागण्या करण्यात आल्या. यानिमित्ताने मंडळातर्फे तलाकपीडित महिलांचा प्रश्न महाराष्ट्राबाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- १४ फेब्रुवारी १९९० :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या महिला सबलीकरण कार्यास पूरक म्हणून हुसेन जमादार यांनी

‘तलाकपीडित महिला उद्योग’ ही संस्था कोल्हापूर येथे स्थापन केली.

- २४, २५ डिसेंबर १९९४ :
  पुणे येथे तलाकपीडित महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले.
- २६ व २७ जून १९९९ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने ‘ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स’ हा राष्ट्रीय पातळीवरील मंच स्थापन करण्यात आला. पुढच्या काळात या मंचाच्या वतीने मुस्लीम महिलांचे प्रश्न, विविध सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्न घेऊन विविध राज्यांत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच शासन दरबारी निवेदने देऊन, मोर्चे काढून या संदर्भात जनमत आणि राजकीय इच्छाशक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु त्यास अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे एक पर्याय म्हणून ‘नया निकाहनामा’ तयार करण्यात आला.

  इस्लाममध्ये निकाह (विवाह) हा एक करार असतो. त्याचा आधार घेऊन निकाहनाम्यात वधू-वर आपल्या अटी व शर्ती नमूद करून त्यास कराराचे स्वरूप देऊ शकतात. मुस्लीम सत्यशोधक मंडळानेसुद्धा असा एक निकाहनामा तयार केला आणि त्यावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले. यात सय्यदभाई, अन्वर राजन, रजिया पटेल, शमसुद्दिन तांबोळी, हुसेन जमादार, ॲड. झाकीर मणियार यांनी भाष्य केले. या संदर्भातील कायद्याच्या तांत्रिक बाबी स्पष्ट करण्यासाठी विधीज्ञ डॉ. सत्यरंजन साठे, प्रा. वैजयंती जोशी आणि प्रा. लक्ष्मी परांजपे यांनी विचार मांडले.

  नव्या निकाहनाम्याचे वाचन करून त्याबाबतीत ठराव मांडण्यात आला. त्याचा प्रसार आणि लोकशिक्षण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरवण्यात आले.




***मेळाव्यात बोलताना शमसुद्दिन तांबोळी.***

चर्चासत्राचा समारोप मेहेरून्निसा दलवाई यांनी केला.

- २०-२१ नोव्हें. १९९९ :
  पुणे येथील एसएनडीटी महिला विद्यापीठात मुस्लीम महिला अधिकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यात सय्यदभाई, 'आवाज-ए-निस्वा'च्या हसीना खान, अल्पसंख्याक आयोगाच्या तामिळनाडूच्या अध्यक्षा बदर सईद, रजिया पटेल, विद्या बाळ, ऑल इंडिया प्रोग्रेसीव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या अध्यक्ष आय. नाझनीन आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी पहिल्या सत्रात विचार मांडले.

  दुसऱ्या सत्रात महिलांनी स्वानुभव कथन केले. यात मेहेरून्निसा दलवाई, रेहाना बेगम, शाहिदाबी सय्यद, बेनझीर मोमीन, मेहताबबी शेख, ताहेराबी कुरेशी यांनी विचार मांडले.

  तिसऱ्या सत्रात महिला शक्ती मंडळ, मुंबईच्या शबाना शेख, ॲक्शन इंडिया, दिल्लीच्या शहनाज, झारखंड येथील सुधीर शाह, अहमदाबाद येथील सारा बादलीवाला, रांची येथील डॉ. नौशाबा बानो, कायदेतज्ज्ञ डॉ. वसुधा धंगमवार, अन्वर राजन यांनी विचार मांडले.

  परिषदेमध्ये 'इन्साफ पसंद निकाहनामा' प्रकाशित करण्यात आला. या अनुषंगाने शमसुद्दिन तांबोळी, रजिया पटेल, आयेशा जमादार, बशीर मुजावर, ॲड. निलोफर, ॲड. नजमा शेख, हुसेन जमादार व अन्वर राजन यांनी विचार मांडले.

  परिषदेमध्ये 'नया निकाहनामा'चा प्रसार करण्यासाठी उदाहरण म्हणून मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी काझीसमक्ष 'नया निकाहनामा' पद्धतीने त्यांचा निकाह पुन्हा लावून नोंदणी केली.

  या परिषदेत मुस्लीम महिलांच्या विकासासाठी 'कुराण' व 'शरीयत'च्या चौकटीत कायदे करावेत आणि त्यात महिलांचा सहभाग असावा, एकतर्फी तलाकची प्रथा बंद करावी, असे विचार व्यक्त करण्यात आले. मुस्लीम महिलांचे विवाहविषयक अधिकार, इतर मानवी अधिकार, शिक्षणाची गरज, पुरुषांची मानसिकता व समाज जागृती इत्यादी विषयांची परखड मांडणी करण्यात आली.

- ८-९ नोव्हेंबर २००१ :
  ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने कोल्हापूर येथे मुस्लीम महिला अधिकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. तिचे उद्घाटन तामिळनाडू येथील प्रा. आय. नाझनीन बरकत यांनी केले. स्वागताध्यक्ष क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी होते. परिषदेच्या अध्यक्षस्थानी सय्यदभाई होते. कार्यक्रमाचे आयोजन हुसेन जमादार, मेहेरून्निसा दलवाई आणि कोल्हापूर येथील कार्यकर्त्यांनी केले. या परिषदेत आवाज-ए-निसवाँ, ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स, मुस्लीम महिला तक्रार निवारण केंद्र, युवा, मुस्लीम सत्यशोधक मंडळ, स्पेशल सेल टू हेल्प वूमन ॲड चिल्ड्रन, वुमन्स रिसर्च ॲक्शन ग्रुप, भारतीय महिला फेडरेशन, मासूम, सहेली ग्रुप, महिला दक्षता समिती, स्वयंसिद्धा, मुस्लीम समाजप्रबोधन व शिक्षण संस्था इत्यादि संघटनांनी सहभाग घेतला होता.

या परिषदेत निकाहनामा तयार करण्यासाठी एक समिती बनवण्यात आली. त्यात पुढील सदस्य होते : हसिना खान (आवाज–ए– निसवाँ), प्रा. ऐनुल अत्तार, हुसेन जमादार (मुस्लीम सत्यशोधक मंडळ), सबा, अन्वर राजन (मासूम), नूरजहाँ (वूमन रिसर्च ॲक्शन ग्रुप), प्रा. शमशुद्दीन तांबोळी (हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटयूट), ज्योती नगरकर (युवा), डॉ. बी. टी. काझी (मुस्लीम समाजप्रबोधन संस्था)

- ११ जानेवारी २००५ :
  पुणे येथे हमाल भवनात 'तीन तलाक' हटाव परिषदेचे आयोजन करण्यात आले.
- १० जानेवारी २०१० :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ, मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने 'मुस्लीम महिला व पोटगीचा अधिकार' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन ज्ञानेश्वर सभागृह, मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने शहाबानो विरुद्ध इम्रान खान प्रकरणाचा निवाडा दिला आणि तलाकपीडित महिलांना कलम १२५नुसार पोटगीचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. या विषयाला केंद्रस्थानी ठेवून एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांच्या पुढाकारातून करण्यात आले. त्यात डॉ. बाबा आढाव, कुटुंब न्यायालयाचे न्यायाधीश डॉ. आर. व्ही. देशमुख, प्रा. नितीश नवसागरे, सय्यदभाई, डॉ. वैजयंती जोशी, डॉ. जया सागडे, अब्दुल कादर मुकादम, ॲड. शारदा वाडेकर, ॲड. जाकीर अत्तार आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.
- ६ एप्रिल २०१० :
  मुस्लीम महिलांची परिषद आयोजित करण्यात आली. शबानाबानो यांच्या पतीने १२५ व्या




***पोटगी बचाव परिषदेत मृणालताई गोरे आणि इतर.***

कलमानुसार पोटगी देण्याचे नाकारले त्यास ग्वाल्हेर उच्च न्यायालयाने पतीच्या बाजूने अनुकूल निवाडा दिला. अपीलात या निकालाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने शबानाबानोस १२५व्या कलमानुसार पोटगी मागण्याचा हक्क असल्याचा निवाडा दिला. शबानाबानोचे वकील ॲड. एस. एम. नक्वी आणि स्वतः शबानाबानो या परिषदेस उपस्थित होते. परिषदेत नसरीन शेख, नर्गिस नाईकवडे, प्रा. लता जाधव, सय्यदभाई, डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि कार्यकर्त्यांनी विचार मांडले. या परिषदेत कलम १२५ प्रमाणे मुस्लीम महिलांना पोटगी मिळाली पाहिजे, तोंडी तलाक आणि बहुपत्नीत्वावर बंदी आणावी, घटस्फोटासंदर्भातील खटले न्यायालयात चालवावे, मुस्लीम महिलांच्या समस्यांचा अभ्यास करण्याकरता देशपातळीवर मुस्लीम महिला आयोग स्थापन करण्यात यावा, महिलांसाठी असणाऱ्या राजकीय आरक्षणात मुस्लीम महिलांना सन्मानपूर्वक आरक्षण असावे आणि न्या. सच्चर व न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

- ३० नोव्हेंबर २०११ :
  कोल्हापूर येथे हुसेन जमादार यांच्या पुढाकाराने मुस्लीम महिला अधिकार परिषद आयोजित करण्यात आली.
- ८ मार्च २०१५ :
  मुस्लीम सत्यशोधक महिला मंचाच्या वतीने महिला अधिकार दिनानिमित्त 'मुस्लीम महिला स्थिती आणि प्रगती' आणि 'स्त्री सबलीकरण – आभास आणि वास्तव' या विषयावर निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
- ८ मार्च २०१६ :
  जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मंडळाच्या वतीने तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. या निवेदनात मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तोंडी तलाक, बहुपत्नीत्वाची तरतूद रद्द करण्याची, समान नागरी कायद्यासाठी समिती स्थापन करण्याची आणि सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग आणि डॉ. महमुद–उर–रहमान अभ्यास गटाच्या शिफारसी अंमलात आणण्यासाठी धोरण आखावे, या मागण्यांच्या समावेश होता. तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ निदर्शने करण्यात आली.
- १६ जुलै २०१६ :
  'मुस्लीम महिलांच्या समस्या सोडवण्याचे मार्ग' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.
- २७ ऑक्टोबर २०१६ :
  मुस्लीम महिलांच्या वाढत्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी महिला मेळावा आयोजित करण्यात आला. भारत सरकारच्या विधी आयोगाने प्रकाशित केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्रतिसाद देण्यासाठी मुस्लीम स्त्री–पुरुषांच्या सह्यांची मोहीम राबवण्यात आली.

- २६ नोव्हेंबर २०१६ :
  भारतीय संविधान दिनानिमित्त 'मुस्लीम महिला अधिकार परिषदे'चे आयोजन करण्यात आले.
- ७ मे २०१७ :
  राज्य महिला आयोगातर्फे मुंबई येथे आयोजित मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवरील परिषदेमध्ये मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या ३० महिला कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.
- २६ ऑगस्ट २०१७ :
  २२ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने 'तलाक-ए-बिद्दत' असंविधानिक ठरवून त्यावर बंदी घातली. या संदर्भात विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ३० ऑक्टोबर २०१७ :
  सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाने 'त्रिवार तोंडी तलाक'बाबत दिलेल्या निवाड्यानिमित्ताने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यात निवाड्याचे स्वागत करून यासंदर्भात संसदेने कायदा करण्यासाठी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली.
- १८ ते २१ डिसेंबर २०१७ :
  मंडळाचे अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी, विविध केंद्रीयमंत्री व संसद सदस्यांची भेट घेऊन त्यांना तलाकबाबतच्या प्रस्तावित विधेयकात समाविष्ट करण्यासाठी तरतुदींचे निवेदन दिले. दिल्ली येथे मंडळातर्फे पत्रकार परिषद घेण्यात आली. सर्वोच्च



***शहाबानो यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते ताज मोहम्मद.***

न्यायालयाचे न्यायाधीश आणि मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणावर अभ्यास करून २००७मध्ये संसदेला अहवाल सादर करणारे न्या. राजेंद्र सच्चर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन मंडळाच्या शिष्टमंडळाने चर्चा केली. मंडळाने पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनातील मागण्यांवर त्यांनी पूर्ण सहमती दर्शवली. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी, सचिव जमीर शेख, खजिनदार दिलावर शेख आणि युवा मंच प्रमुख समीर शेख उपस्थित होते.

- १२ जानेवारी २०१८ :
  पुणे श्रमिक पत्रकार संघात तलाकबंदी विधेयकातील त्रुटी समजून घेण्यासाठी 'जनसंवाद' आयोजित केला गेला.
- ३ फेब्रुवारी २०१८ :
  मुस्लीम महिला मंचच्या वतीने मुलींच्या कौशल्य विकासाबाबत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ७ मार्च २०१८ :
  'मुस्लीम महिलांचे हक्क' याविषयावर 'साधना' कार्यालय, पुणे येथे चर्चेचे आयोजन करण्यात आले. यावेळी साप्ताहिक 'साधना'च्या 'महिला दिन' विशेषांकाचे प्रकाशन झाले.
- १५ एप्रिल २०१८ :
  अत्याचारास बळी ठरलेल्या आसिफा प्रकरणात देशभरात निषेध करण्यात आला. पुण्यात आयोजित केलेल्या निषेध मोर्चात मंडळाने सहभाग घेतला.
- २६ नोव्हेंबर २०१८ :
  मंडळ आणि समविचारी संघटनांच्या वतीने संविधान दिनानिमित्त 'संविधान बचाव' जनजागरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
- ३० जुलै २०१९ :
  तलाकबंदी विधेयक राज्यसभेत मंजूर झाल्याच्या निमित्ताने मंडळाच्या कार्यकर्त्यांचा विविध प्रसारमाध्यमांशी संवाद केला.
- ८ मार्च २०२१ :
  महिला मंचच्या वतीने भारतीय मुस्लीम महिला आंदोलनाचे नूरजहाँ सफीया नियाज यांचे मुस्लीम महिला अधिकारांसंदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- ८ मार्च २०२२ :
  आंतरराष्ट्रीय महिला अधिकार दिनानिमित्त मंडळाच्या वतीने पथनाट्य प्रकाशन आणि परिसंवाद आयोजित करण्यात आला. दिवसभराच्या कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले वाड्यात डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाने झाले. पुण्यातील आझम कॅम्पस येथील शिक्षणशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले. साधना मीडिया सेंटर येथे रजिया सुलताना यांच्या 'कानोसा मुस्लीम मनाचा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'हिजाब–किताब आणि मी' या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी 'साधना' साप्ताहिकाचे

संपादक विनोद शिरसाठ होते.

- ९ जानेवारी २०२३ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे सत्यशोधक फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. यात अप्सरा आगा, श्रीरूपा बागवान, आबेदा शेख, समीना पठाण आणि बेनझीर तांबोळी यांनी विचार मांडले. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी यात सहभागी झाले. सभेनंतर हिंदू-मुस्लीम ऐक्य वाढवण्यासाठी कोणकोणते उपक्रम आयोजित करावेत, यावर चर्चा करण्यात आली. फातिमाबी शेख यांच्याबद्दलची अनभिज्ञता लक्षात घेऊन या दिवशी मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी वर्तमानपत्रे आणि समाज माध्यमांमार्फत फातिमाबी शेख यांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली.
- ८ मार्च २०२३ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि मंडळाचे सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचच्या वतीने महिला हक्क दिनाच्या निमित्ताने 'महिला अधिकार आणि मी' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात हिनाकौसर खान, मिनाज लाटकर, प्रा. समीना पठाण, श्रीरूपा बागवान, अप्सरा आगा यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी मंच प्रमुख डॉ. बेनझीर तांबोळी होत्या. पुण्यात एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे हा कार्यक्रम झाला.
- ११ डिसेंबर २०२३ :
  शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाने 'संविधान आणि महिला समुपदेशन' विषयावर एकत्रित काम करण्याचा करार केला. महाविद्यालयास महाराष्ट्र महिला आयोगाने प्रमाणित केलेले आहे. त्यानुसार कौटुंबिक सल्ला केंद्र संवर्धन



*मा. राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्यासोबत प्रतिभा रानडे, तलाक पीडित महिला आणि मंडळाचे कार्यकर्ते.*



***सर्वोच्च न्यायालयात पोटगीविषयक याचिका दाखल करणाऱ्या ग्वाल्हेरच्या शबानाबानो आणि त्यांचे वकील ॲड. नक्वी तसेच इतर.***

समारंभ मराठवाडा मित्र मंडळ, पुणे येथे आयोजित करण्यात आला. मा. रूपाली चाकणकर यांनी उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य भाऊसाहेब जाधव होते. प्राचार्या क्रांती देशमुख, डॉ. शमसुद्दिन तांबोळी, समुपदेशक गायके, डॉ. प्रवीण मोतीवाला आणि पुणे जिल्हा न्यायाधीश मा. सोनल पाटील यांनी विचार मांडले.

- ८ मार्च २०२४ :
  शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने महिला अधिकार दिनाच्या निमित्ताने 'स्त्री-पुरुष समानता आणि समान नागरी कायदा' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले.

## ३.४ आंदोलन, मोर्चा, निदर्शने आणि निवेदने

- २२ मार्च १९८२ :
  मंडळाच्या विविध शाखांच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा, मुंबई येथे समान नागरी कायदा आणि इतर मागण्यांसाठी मोर्चा काढून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.
- ११ एप्रिल १९८३ :
  पुणे येथे महर्षीनगरमध्ये पहिली पत्नी असताना दुसरे लग्न करणाऱ्या पती व कुटुंबीयांना रोखण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. लग्न लावणाऱ्या काझीला मंडळाची भूमिका योग्य वाटली. त्यांनी लग्न/निकाह लावण्यास नकार दिला. परंतु पोलिसांनी या नवरदेवाच्या पहिल्या पत्नीसह मंडळाच्या २६ कार्यकर्त्यांना अटक करून या दुसरे लग्न करणाऱ्या पतीस कायद्याचे संरक्षण दिले.
- १८ जून १९८५ :
  अन्यायी प्रकाराने दिलेल्या तलाकच्या निषेधार्थ कोल्हापूर येथे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपोषण केले.
- ३ ते १८ नोव्हें. १९८५ :
  कोल्हापूर ते नागपूर अशा पंधरा जिल्ह्यांत तलाकमुक्ती मोर्चाचे आयोजन करण्यात आले.
- १६ जानेवारी १९८६ :
  तलाकमुक्ती मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी नागपूर विधानसभेसमोर धरणे धरले आणि तत्कालीन मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवरील निवेदन दिले.
- ३१ ऑक्टोबर १९८६ :
  इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंडळाच्या वतीने पुण्यात तलाकपीडित महिलांना पूर्वीप्रमाणेच कलम १२५प्रमाणे पोटगीचा हक्क परत मिळावा, यासाठी आणि १९८६च्या मुस्लीम महिला तलाक हक्क संरक्षण विधेयकाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.
- १० एप्रिल १९९७ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील मुस्लीम महिलांचा मोर्चा मुंबईत विधानभवनावर नेण्यात आला. तत्पूर्वी विविध ठिकाणी या संदर्भात प्रचारसभा आयोजित केल्या होत्या. मोर्चाचे नेतृत्व सय्यदभाई, हुसेन जमादार आणि मेहेरून्निसा दलवाई यांनी केले. जवळपास ३०० महिलांचा मोर्चा मुंबईच्या आझाद मैदानातून निघाला. 'तोंडी तलाक कायद्याने बंद करा', 'समान नागरी कायदा लागू करा' अशा मागण्यांचे फलक घेऊन मोर्चा मार्गस्थ असताना सम्राट हॉटेलजवळ पोलिसांनी अडवला. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना मंडळाच्या शिष्टमंडळाने भेटून चर्चा केली आणि निवेदन दिले. मुख्यमंत्री यांनी द्विभार्या प्रतिबंधक कायदा मुस्लिमांनाही लागू करण्यासंदर्भात निर्देश दिले होते. तेव्हा

याबरोबरच तोंडी तलाक पद्धतही बंद करण्याची मागणी त्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली होती.

शिष्टमंडळाने या वेळी मनोहर जोशी यांना आठवण करून दिली की, वसंतदादा मुख्यमंत्री असताना बॅ. ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे कायदामंत्री होते. मुस्लिमांना द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करावा, अशा मागणीचा ठराव विधानसभेत मंजूर करून केंद्राकडे पाठवण्यात आला होता. मात्र पुढे काहीच झाले नाही. युती सरकारने या संदर्भात धाडस दाखवावे, अशी विनंती करण्यात आली.

- ८ डिसेंबर २००८ :

  २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि समविचारी संघटनांनी पुण्यात एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे निषेध करून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. तसेच मुस्लीम समाजातील महत्त्वपूर्ण समजली जाणारी बकरी ईद 'काळी ईद' म्हणून साजरी करण्यात आली. यात पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य जनतेला जीव गमवावा लागला. या घटनेनंतर दोन आठवड्यात आलेल्या बकरी ईदच्या दिवशी दहशतवाद्यांचा निषेध केला आणि हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ही ईद 'काळी ईद' म्हणून साजरी करण्याचा मंडळाच्या कोल्हापूर शाखेने निर्णय घेतला आणि तसे आवाहन वर्तमानपत्रांतून करण्यात आले. या आवाहनाला कोल्हापुरातील मुस्लीम बोर्डिंगनेही प्रतिसाद दिला. त्यांनी आणि मंडळाने काळ्या फिती व पिना मुस्लीम बांधवांना वाटल्या. कोल्हापूर जिल्ह्यात मुस्लीम बांधवांनी काळी फित लावून बकरी ईदची नमाज अदा केली.

- १८ एप्रिल २०१७ :

  पुणे येथे स्मरणमोर्चाचे आयोजन. हमीद दलवाई यांनी १८ एप्रिल १९६६ रोजी ७ मुस्लीम महिलांच्या ऐतिहासिक मोर्चाचे आयोजन केले आणि तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांना निवेदन दिले. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांच्या निवारणासाठी मंडळाच्या मागण्या लक्षात घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी त्या वेळी दिले होते. या ऐतिहासिक घटनेस ५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने तलाकपीडित महिला आणि इतर महिला कार्यकर्त्यांसमवेत सय्यदभाई आणि रशीदभाई, नियाज अत्तार यांनी मोर्चा काढला. मा. मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांना पुणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. मुस्लीम महिलांच्या मागण्यांबरोबरच सर्व जाती-धर्माच्या महिलांच्या कौटुंबिक कलह, तक्रार निवारण आणि न्यायासाठी प्रत्येक जिल्ह्यात कुटुंब न्यायालय स्थापन करण्यात यावे, अशीही एक मागणी करण्यात आली. त्यास महाराष्ट्र शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन मंडळास पत्राद्वारे कळवले. या मोर्चाचे नेतृत्व मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी केले.

## ३.५ हमीद दलवाई स्मृतीदिन

- ३ मे १९८० :
  सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीत डॉ. अल दस्तुर यांचे 'इस्लामिक फंडामेंटलिस्ट अॅड इंडियन मुस्लीम्स' या विषयावर मंडळाने व्याख्यान आयोजित केले. तसेच संयुक्तपणे घेता येणाऱ्या कार्यक्रमाबद्दल बॉम्बे सोशल रिफॉर्म असोसिएशन आणि मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक व चर्चा झाली.
- ३ मे १९८१ :
  प्रा. अ. भि. शहा यांचे 'इस्लाम आणि संस्कृती' या विषयावर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- ३ मे १९८२ :
  मुंबईत ज्येष्ठ विचारवंत आणि लेखक प्रा. आ. ह. साळुंखे आणि इस्लामचे अभ्यासक डॉ. असगर अली इंजिनिअर यांच्या भाषणांचे आयोजन करण्यात आले.
- ३ मे १९८३ :
  हमीद दलवाई यांच्या ५व्या स्मृतीदिनानिमित्त 'इस्लामचे भारतीय चित्र' या हमीद दलवाई यांच्या पुस्तकाचे प्रकाशन रजिया पटेल यांच्या हस्ते पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत करण्यात झाले.
- ३ मे १९९० :
  ताहेरभाई पूनावाला यांना 'हमीद दलवाई पुरस्कार' श्रीगोंदा येथे ज्येष्ठ विचारवंत नानासाहेब




*हमीद दलवाई स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमात बोलताना डॉ. बाबा आढाव. उपस्थित न्या. पी. बी. सावंत, डॉ. पंडित विद्यासागर, प्रा. भाऊसाहेब जाधव आणि इतर.*

गोरे यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी डॉ. झैनब पूनावाला, आ. बबनराव पाचपुते, बाबा आढाव आणि बाबुमियाँ बँडवालेंसह मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. समीर मणियार यांनी सूत्रसंचालन केले.

- ३ मे १९९२ :

  कोल्हापूर येथे शिवजयंती आणि हमीद दलवाई स्मृतिदिनाचे औचित्य साधून शिवचरित्र प्रदर्शन आणि राष्ट्रीय एकात्मतेवरील कवीसंमेलन आयोजित करण्यात आले.

- ३ मे १९९३ :

  ज्येष्ठ विचारवंत संस्कृतपंडित गुलाम दस्तगीर बिराजदार यांना 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रसिद्ध अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते राज्यशिक्षणशास्त्र संस्थेच्या महात्मा फुले सभागृहात प्रदान करण्यात आला.

  या वेळी डॉ. श्रीराम लागू म्हणाले की, ''विज्ञानपूर्व काळातील सर्व धर्म विज्ञानयुगात कालबाह्य झाले आहेत. भावी काळात आपल्याला सर्वधर्म समभावाऐवजी निधर्मीपणाकडेच जावे लागणार आहे. इहवादाशिवाय आपल्याला गत्यंतर नाही. मुस्लीम जातीयवादाला हिंदू जातीयवाद हे उत्तर नव्हे. आपण हा सुडाचा प्रवास थांबवला नाही, तर सबंध देश रक्तबंबाळ झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदू जातीवाद आज उफाळून आला आहे, तो म्हणजे मुस्लीम जातीयवादाची प्रतिक्रिया होय असे म्हटले जाते व ते खरे आहे, पण मुस्लीम जातीयतेचा प्रतिकार जातीयतेने करता येणार नाही, तो प्रबोधनानेच करता येईल. दोन समाजामध्ये वैचारिक अभिसरण जास्त प्रमाणात झाले पाहिजे. हिंदू जातीयवाद हे उत्तर नव्हे. सर्वांनी सलोख्याने व बंधुभावाने या देशात नांदले पाहिजे. आपण मुख्य प्रवाहात सामील झालो, तर सन्मान व सुखाने जगता येईल. याचा विचार मुस्लीम समाजाने केला पाहिजे. इस्लामची चिकित्सा होऊ शकत नाही, ही तेराशे वर्षांची परंपरा मोडणारा क्रांतिकारक म्हणजे हमीद दलवाई हा होता.''

  सत्काराला उत्तर देताना पंडित बिराजदार यांनी सांगितले की, "संस्कृतीचे काम, राष्ट्रीय एकात्मतेचे काम व सर्व मत समन्वयाचे काम मी कधीही बंद पडू दिले नाही. आजच्या समाजाची गरज पाहूनच आपण काम करीत राहिले पाहिजे. आज आमचे संपूर्ण राष्ट्रच भ्रष्टाचारामध्ये विकले गेले आहे. निदान आम्ही तरी प्रामाणिकपणा सोडू नये. इमानदारी जपली पाहिजे.''

  कार्यक्रमाचे अध्यक्ष अभिनेते निळू फुले यांनी प्रारंभीच काही प्रमुख मराठी वृत्तपत्रे जातीय प्रश्नाबाबतीत घाणेरडा प्रचार करत असल्याबद्दल खंत व्यक्त केली व पुढे म्हणाले की, "सहजीवनाशिवाय आम्हाला पर्याय नाही. भारतातील सारे धार्मिक, वाङ्मय संस्कृतमधून पर्शियन भाषेत नेण्याचे काम दारा शुकोहने केले होते. उर्दू भाषेतील सारे गाजलेले लेखक हिंदू होते. या साऱ्या परंपरा आम्हाला कोणी समजावून सांगितलेल्या नाहीत."

  मंडळाचे प्रमुख सय्यदभाईंनी सांगितले की, "हमीद दलवाई यांनी आम्हाला शिकविले की, आत्मपरीक्षण व सातत्याने सत्यशोधन केले पाहिजे. तलाकपीडित मुस्लीम महिलांना किमान

माणूस म्हणून जगू द्या, ही आमची मागणी असून त्या महिलांचा तो अधिकार आहे."

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विचारवंत नानासाहेब गोरे उपस्थित राहणार होते, परंतु १ मे १९९३ रोजी त्यांचे निधन झाले आणि या कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली. हुसेन जमादार यांनी प्रास्ताविक केले. मेहेरून्निसा दलवाई यांनी पुरस्काराची माहिती दिली. शमसुद्दिन तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आय. एन. बेग यांनी आभार मानले. सभागृहात व सभागृहाबाहेर साधारण पोलीस बंदोबस्तही होता.

● ३ मे १९९४ :

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई येथे पत्रकार निखिल वागळे यांच्या हस्ते प्रा. फ. म. शहाजिंदे यांना 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी साहित्यिक दया पवार होते.

● ३ मे १९९५ :

'हमीद दलवाई पुरस्कार' अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शब्बिरभाई शेख यांना मुंबई येथे विचारवंत प्रा. मे. पुं. रेगे यांच्या हस्ते देण्यात आला. या प्रसंगी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई, हुसेन जमादार, शमसुद्दिन तांबोळी, विलायत शेख आणि समीर मणियार उपस्थित होते.

या वेळी प्रा. मे. पुं. रेगे म्हणाले, "मुस्लिमांचे प्रबोधन करण्यासाठी हमीद दलवाई यांनी अंगिकारलेल्या मार्गाबाबत मूलतत्त्ववाद्यांचा विरोध आपण समजू शकतो. मात्र स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या, तसेच मार्क्सवादी मंडळींकडूनही हमीद दलवाई यांच्यावर टीका होते. त्या वेळी अशा मंडळींच्या बौद्धिक प्रामाणिकपणाविषयी शंका निर्माण होते.

हिंदू समाजातील जुनाट रूढी आणि परंपरेविरुद्ध लढा देणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हा जोतिबापासून परंपरागत वारसा लाभलेला असतानाही आजही हिंदू समाज अपक्व व रूढीग्रस्त असल्याचे दिसून येते. मुस्लीम धार्मिक परंपरांच्या संदर्भात धर्मचिकित्सा करण्याचे काम टाळता येण्याजोगे नाही. मग या संदर्भात मुस्लिमांमध्ये प्रारंभ करावयाचा नाही काय?"

दलवाईंचे विचार उलेमांना अप्रिय होते. मात्र काही पुरोगामी आणि मार्क्सवादी मंडळी दलवाईंच्या विचारावर टीका करून दलवाईंनी फार मोठा गुन्हा केला आहे, अशा भाषेत बोलत असत. त्या वेळी ही तथाकथित मंडळी कुणाचे हात बळकट करायला निघाली आहेत, असा सवालही रेगे यांनी उपस्थित केला.

● १ मे २००२ :

साधना प्रकाशनातर्फे हमीद दलवाई यांच्या 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' या अप्रकाशित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

● ३ मे २००३ : मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई येथे साहित्यिक शफाअत खान यांना डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी साहित्यिक दिलीप चित्रे होते.

- ३ मे २००९ :

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठान यांच्या वतीने दलवाई-जवळकर स्मृतीदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी शमसुद्दिन तांबोळी संपादित 'हमीद दलवाई : क्रांतिकारी विचारवंत' आणि य. दि. फडके संपादित 'दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय' या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि मा. भाई वैद्य यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. बाबा आढाव, डॉ. सदानंद मोरे, प्रा. सुभाष वारे, सय्यदभाई आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.

यावेळी ''घटनेने देशातील नागरिकांना समता, धर्मस्वातंत्र्य, उपासनेचा अधिकार दिला असला, तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या आड जर या गोष्टी येत असतील, तर त्याला विरोध होणे गरजेचे आहे. मुसलमान समाजाचे पहिले विचारवंत म्हणून हमीद दलवाई ओळखले जातात. त्यांनी देव या संकल्पनेलाच आव्हान दिले होते. त्यांचा हा विचार सत्यशोधक मंडळाने लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रबोधनाचा मार्ग चोखाळणाऱ्यांनी 'मी विवेकी, शोषणरहित समाजनिर्मितीसाठी वाद-संवादाचा मार्ग अवलंबेल, मात्र वैर करणार नाही', या भूमिकेतून काम केले तर लढणे शक्य आहे. मूलभूत प्रबोधन जोपर्यंत स्पष्ट होत नाही, तोपर्यंत लढावेच लागेल. हमीदभाईंनी इस्लामच्या मूलभूत श्रद्धेलाच आव्हानित केले, तरीही तो मुस्लीम म्हणूनच जगला,' असे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी व्यक्त केले.

- ३ मे २०१० :

रयत शिक्षण संस्थेचे साधना प्राथमिक विद्यालय, हडपसर, पुणे येथे मा. रौनक अफरोज शकील अहमद यांना मा. भाई वैद्य यांच्या हस्ते 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वेळी विद्या बाळ, रामभाऊ तुपे, सुभाष वारे, मेहेरून्निसा दलवाई, इत्यादि उपस्थित होते.

- ६ मे २०१२ :

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने देण्यात येणारा 'मुस्लीम समाजप्रबोधन पुरस्कार' आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभ्यासक आणि विचारवंत डॉ. असगर अली इंजिनिअर यांना ज्येष्ठ समाजवादी नेते मा. भाई वैद्य यांच्या हस्ते देण्यात आला. सय्यदभाई कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वेळी डॉ. असगर अली इंजिनिअर म्हणाले की, "कोणताही धर्म आपसात भांडत नाही, धर्माला कमाईचे साधन मानणारे आपसात भांडतात आणि भांडणेही लावतात. सर्वच धर्मांमध्ये सामायिकतेचे अनेक दुवे आहेत, ते शोधायला हवेत. समाजामध्ये चांगुलपणा आणण्यासाठी धर्म असायला हवा. त्यासाठी धर्मसुधारणांची कायमच गरज असते. या सुधारणा करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांनी स्वतः धर्माचा अभ्यास करायला हवा. मुस्लीम धर्मामध्ये सुधारणा करण्यासाठी समाजामध्ये साक्षरता वाढवण्याची गरज आहे."

भाई वैद्य म्हणाले की, "धर्माच्या नावाखाली चालत असलेली दलाली आणि फोफावत चाललेल्या जमातवादाविरुद्ध निकराने लढण्याची गरज आहे. प्रत्येक धर्मामध्ये पुरोहित

शाहीच्या विरोधात असणारा संघर्ष सुरूच आहे. तो संपत नाही, हे आपले दुर्दैव आहे. धर्माच्या दलालांनी त्यांची सामाजिक आर्थिक सत्ता निर्माण करण्यासाठी धर्माचा वापर करून घेतला आहे. त्यांनी निर्माण केलेल्या या धर्मवादाचे आता जमातवादामध्ये रूपांतर झाले आहे. हा जमातवाद रोखून मानवतावादाच्या आधारे समाजाची प्रगती साधणे आवश्यक आहे."

कार्यक्रमात हुसेन जमादार, प्रा. शमसुद्दिन तांबोळी आणि प्रा. आय. एन. बेग यांनी विचार मांडले.

- ३ मे २०१४ :

  मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या स्मृतीदिनानिमित्त मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठान यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात न्या. पी बी. सावंत यांच्या हस्ते शमसुद्दिन तांबोळी संपादित 'हमीद दलवाई – क्रांतिकारी विचारवंत' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पहिल्या देवदासी कार्यकर्त्या गौराबाई सलवादे यांची नात लक्ष्मी उर्फ योजना यांनी प्राणीशास्त्रात पीएच. डी. संपादन केल्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. बाबा आढाव, सय्यदभाई, प्राचार्य भाऊसाहेब जाधव होते. शमसुद्दिन तांबोळी यांनी यावेळी विचार मांडले. समाजातील शांतता व सलोखा धोक्यात आणण्यासाठी समाजकंटक प्रवृत्तीच्या माथेफिरूंनी महापुरुषांची विटंबना करणारी चित्रे फेसबुकवर टाकली. या गुन्हेगारांचा शोध लागलेला नसतानाही मुस्लीम समाजावर संशय करून मुस्लीम समाजात भीतीचे दहशतीचे वातावरण निर्माण केले आणि हडपसर येथे मोहसीन शेख या तरुणाची हत्या करून दंगल पेटवल्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाने निषेध केला.

  सामाजिक सलोखा आणि सद्भाव निर्माण करण्यासाठी आणि भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी विविध धर्मातील लोकांनी आणि पोलीस यंत्रणेने एकत्र येऊन काम करण्याची गरज व्यक्त केली.

- ३ मे २०१५ :

  महात्मा फुले समता प्रतिष्ठान, भवानी पेठ, पुणे येथे जवळकर-दलवाई स्मृतिदिनानिमित्त शमसुद्दिन तांबोळी, दत्ता काळेबेरे यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबा आढाव होते.

- ३ मे २०१६ :

  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यशोधक हमीद दलवाई आणि दिनकरराव जवळकर स्मृतिदिनानिमित्त 'सत्यशोधक विचारधारा आणि सद्यस्थिती' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. लेखक राजाभाऊ शिरगुप्पे, शमसुद्दिन तांबोळी, डॉ. बाबा आढाव, सय्यदभाई यांनी यात भाग घेतला. मंडळाच्या महिला कार्यकर्त्या आणि जालना येथील रिक्षा चालकाचा मुलगा अन्सार

शेख हा युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

- २० मे २०१६ :

  'हमीद दलवाई यांचे जीवनकार्य' या विषयावर 'साधना' साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांचे व्याख्यान मराठवाडा मित्र मंडळ येथे आयोजित करण्यात आले.

- ३ मे २०१७ :

  मुस्लीम सत्यशोधक मंडळ व महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने सर्वधर्मीय परित्यक्त्या व तलाकशुदा महिला मेळावा एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मा. न्या. पी. बी. सावंत, न्या. हेमंत गोखले, न्या. वि. वा. शहापूरकर, डॉ. बाबा आढाव आणि भाई वैद्य आणि मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी उपस्थित होते.

  या प्रसंगी न्या. पी. बी. सावंत म्हणाले की, ''देशातील सर्व धर्मात महिलांचे प्रश्न गंभीर आहेत. लाखोंच्या संख्येत असलेल्या घटस्फोटीत, परित्यक्त्या महिलांचे प्रश्न आणि त्यांच्या आयुष्यातील समस्या सोडवायच्या असतील, तर देशात सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थितीत बदल करून समाजवादी समाजाची निर्मिती आवश्यक आहे. समाजात घटस्फोटित, परित्यक्त्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. निरनिराळ्या कारणाने या महिला संकटात आहेत, हे आपल्या समाजाचे दुर्दैव आहे. कायद्याने पोटगी देण्याची तरतूद ही कोणात्याही धार्मिक, कौटुंबिक कायद्यापेक्षा मोठी आहे, मात्र त्यामध्ये आणखी सुधारणा करण्यास संधी आहेत. ती संधी आज दवडली तर कित्येक वर्षे महिलांचे प्रश्न आहेत, तसेच राहतील. महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रत्येक राज्याचे कायदा सल्लागार मंडळ आहे, मात्र त्याविषयी फारशी जनजागृती नाही. ती सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हावी. कौटुंबिक न्यायालयात महिलांना वकील दिले जातात, मात्र त्यांचे मानधन तुटपुंजे आहेत. त्यामुळे त्यात वाढ होणे आवश्यक आहे.

  कायद्यापेक्षा महिलांचे प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी मानसिकता बदलण्याची गरज आहे. घटस्फोट, तलाक, पोटगीची समस्या महिलांच्या आर्थिक गुलामगिरीतून निर्माण झाली आहे. समाजाने महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी दिली पाहिजे. त्यातून समाजवादी अर्थव्यवस्था ही कुटुंबात निर्माण होणे गरजेचे आहे. या माध्यमातून असे प्रश्न सोडवणे सोपे जाईल, कारण महिलांमध्ये आर्थिक सक्षमता आली, तर अनेक समस्या सुटतील यात शंका नाही.''

- ३ मे २०१८ :

  'महिला सक्षमीकरण वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर नाथ पै. सभागृह, राष्ट्र सेवा दल, पुणे येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात मुमताज शेख, डॉ. लता जाधव, डॉ. बेनझीर तांबोळी, ॲड. शारदा वाडेकर, तमन्ना इनामदार यांनी विचार मांडले.

- ३ मे २०१९ :
  ‘भारतीय संविधानातील मूल्ये, सत्यशोधक विचारधारा आणि सद्यस्थिती’ या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ. नागनाथ कोतापल्ले, विद्या बाळ, इरफान इंजिनिअर, सुभाष वारे, शमसुद्दिन तांबोळी इत्यादींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव होते.
- ३ मे २०२० : साहित्यिक, प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण यांचे ‘साहित्यिक आणि सुधारक हमीद दलवाई’ या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.
- १ मे २०२३ :
  एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे हमीद दलवाई स्मृतिदिनानिमित्त मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने दिल्ली येथील सिएसडीएसमधील सहयोगी प्राध्यापक, लेखक व राजकीय विश्लेषक डॉ. हिलाल अहमद यांचे ‘मुस्लीम सत्यशोधक विचार और आज के भारत में इसकी प्रासंगिकता’ विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबा आढाव होते.
- ३ व ६ मे २०२४ :
  मंडळाच्या वतीने इतिहासाचे प्राध्यापक मोईन खान यांचे ‘हमीद दलवाई का आठवावेत?’ या विषयावर ऑनलाइन व्याख्यानचे आयोजन करण्यात आले आणि ६ मे रोजी महात्मा फुले समता प्रतिष्ठान, भवानी पेठ, पुणे येथे डॉ. अभिजित वैद्य यांचे ‘सत्यशोधक हमीद दलवाई आणि दिनकरराव जवळकर यांच्या विचारांची प्रासंगिकता’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबा आढाव होते.

## ३.६ व्याख्यान, चर्चासत्र आणि परिसंवाद

- १२ मे १९८३ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने अलिगढ मुस्लीम विद्यापीठासंदर्भात रुईया महाविद्यालयात एक चर्चासत्र आयोजित केले. मुंबई केंद्राने विधायक कामातून प्रबोधनाकडे जाण्याची दिशा ठरवली आणि त्याप्रमाणे अंधेरीतील गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य वाटण्याचा कार्यक्रम घेतला. आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त १६० मुस्लीम मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.
  मंडळाच्या वर्धापनदिनी श्रीमती शाहजादी हकीम यांचे, तर दलवाई पुण्यतिथी रोजी डॉ. अल दस्तूर यांचे 'इस्लामिक फंडामेंटलिझम अँड इंडियन मुस्लीम' या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली. मेहेरून्निसा दलवाई यांनी पवनार, लातूर, ठाणे व राज्यातील विविध भागांत जाऊन मुस्लीम प्रश्नांवर मांडणी करत मुस्लीम महिलांना कायदेशीर मदत करण्याव्यतिरिक्त शिलाईचे व इतर कौशल्य-प्रशिक्षण देऊन काम मिळवून देण्याचे ठरवले.
- १६ जानेवारी १९९३ :
  'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' आणि 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'च्या वतीने पुण्यात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. 'राष्ट्रापुढील आव्हाने' या विषयावर कायदेतज्ज्ञ डॉ. सत्यरंजन साठे यांचे बीजभाषण झाले. सर्वसामान्य मुस्लीम समाज आणि मुस्लीम नेते यांत फरक आहे, हे नमूद करून देशाच्या एकात्मतेला, राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला व राज्यघटनेलाच कशा प्रकारे धोके आहेत, हे या सत्रात मांडण्यात आले. या चर्चासत्रात भिन्नधर्मीय नेते आणि अभ्यासकांनी सहभाग घेतला.
- ४ मे १९९४ :
  हमीद दलवाई यांचे निवासस्थान असलेल्या नित्यानंदनगर, अंधेरी, मुंबई येथील सभागृहात मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात विचारवंत वसंत पळशीकर यांनी मार्गदर्शन केले.
- २१ नोव्हेंबर २००० :
  मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षात स्थापन करण्यात आलेल्या हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटच्या वतीने विद्यार्थी सहायक समिती, पुणे येथे इन्स्टिट्यूटच्या वर्धापन दिनानिमित्त 'सद्यस्थितीत हमीद दलवाई यांच्या विचारांचे महत्त्व' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात कवी दिलीप चित्रे, भाई वैद्य, मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी भाग घेतला.
- १८ फेब्रुवारी २००१ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई रिसर्च इन्स्टिट्यूटच्या वतीने मराठवाडा मित्र मंडळाच्या ज्ञानेश्वर सभागृहात 'मुस्लीम स्त्रियांचे समकालीन प्रश्न', 'मुस्लीम समाजाचे

शैक्षणिक प्रश्न', 'भारतीय राजकारण व धर्मकारणात मुस्लिमांची भूमिका' या मुद्द्यांवर चर्चा आयोजित करण्यात आली. यात दिलीप चित्रे, मा. भाई वैद्य, मेहेरून्निसा दलवाई, सय्यदभाई, रजिया पटेल, अन्वर राजन, डॉ. अलका वाडकर, मुमताज इनामदार आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.

- ३१ मार्च २००७ :
  न्या. राजेंद्र सच्चर यांच्या अहवालावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात मा. भाई वैद्य, रा. प. नेने, सय्यदभाई, प्रा. शरद जावडेकर आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. मुस्लीम प्रबोधनाचा विषय हा राजकारणाचा विषय झाल्याने सामाजिक तणाव वाढत आहे आणि न्या. सच्चर समितीच्या सभासदात एकही महिला सभासद नसल्याने महिलांच्या प्रश्नांची चर्चा या अहवालात स्पष्ट झाली नसल्याचा सूर चर्चासत्रात मांडण्यात आला. तसेच जातीय हिंदुत्ववाद्यांनी मुस्लिमांचा अपप्रचार करण्यासाठी या अहवालाचा वापर करत असल्याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला. भाई वैद्य यांनी सच्चर समितीचे महत्त्व विषद करून शासनाने शिफारशींची अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले, तसेच सरकारद्वारे मुस्लिमांची पाठराखण केली जाते, हा आक्षेप सच्चर आयोगामध्ये खोटा ठरल्याचे मा. भाई वैद्य म्हणाले.
- २० मार्च २०११ :
  मुस्लीम समाजाच्या विविधांगी प्रश्नांवर प्रौढ निरंतर विभाग, पुणे विद्यापीठ आणि मंडळाच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात सय्यदभाई यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मा. भाई वैद्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चर्चासत्रात हुसेन जमादार, महंमद गौस नाईक, सय्यदभाई, फ. म. शहाजिंदे, डॉ. राजेखान शानेदिवाण, प्रा. सुभाष वारे,



***फलटण येथील कार्यक्रमात बोलताना बशीर तांबोळी.***

प्रा. जहीर अली, धनंजय लोखंडे आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.

- १५ जून २०१४ :
  'बदलती राजकीय स्थिती आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील चर्चासत्र वि. स. खांडेकर शाळेत मंडळाचे कार्यकर्ते आय. एन. बेग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले. यात कॉम्रेड गोविंदराव पानसरे, हुसेन जमादार, सुरेश शिपूरकर, एम. ए. नाईक, जमीर शेख, के. डी. धनवडे आणि सायरा मुलाणी यांनी विचार मांडले.
- ३० ऑगस्ट २०१४ :
  मंडळाच्या स्थापनेपासून 'समान नागरी कायदा' हा विषय आस्थेचा, प्रबोधनाचा ठरला आहे. या विषयावर लोकशिक्षण करण्यासाठी मंडळ सातत्याने उपक्रम राबवते. याचाच एक भाग म्हणून मंडळाच्या वतीने एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे चर्चासत्राचे आयोजन केले. यात भिन्न विचारप्रवाह आणि संविधानवादी कार्यकर्ते आणि अभ्यासकांना निमंत्रित करण्यात आले. ज्यात भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, जमात–ए–इस्लामीचे डॉ. इक्राम खान, डॉ. जया सागडे, प्रा. जहीर अली, सुभाष वारे, ॲड. सुरेखा दळवी आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. चर्चासत्राचा समारोप सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश पी. बी. सावंत यांनी केला.
- ३० ऑगस्ट २०१४ :
  मंडळ आणि एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने 'समान नागरी कायदा महिलांच्या अधिकारासाठी की राष्ट्रीय एकात्मतेसाठी?' या विषयावर दीर्घ चर्चासत्राचे आयोजन.
- २८ सप्टेंबर २०१४ :
  'हमीद दलवाई स्टडी सर्कल'ची सुरुवात करण्यात आली. दलवाई यांच्या जयंतीनिमित्त मंडळाच्या या स्टडी सर्कलच्या वतीने भाई वैद्य यांचे 'हमीद दलवाई यांचे विचार आणि जीवनकार्य' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई, शमसुद्दिन तांबोळी, प्रा. तेज निवळीकर उपस्थित होते. स्थळ : एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे.
- १८ जानेवारी २०१५ :
  हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या मार्गदर्शन वर्गात डॉ. अभिजित वैद्य यांचे 'विवेकवादाचा इतिहास' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. स्थळ : ज्ञानेश्वर सभागृह, मराठवाडा मित्रमंडळ, पुणे.
- ३ फेब्रुवारी २०१५ :
  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान साक्षरता आणि सन्मान' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.
- २० डिसेंबर २०१५ :

गांधीभवन, कोथरूड, पुणे येथे मुस्लीम महिला आणि तलाक प्रश्नावरील 'हलाल' या चित्रपटाचे परिशीलन आणि चर्चेचे आयोजन करण्यात आले.

- २६ जानेवारी २०१६ :
  मंडळाच्या विविध ठिकाणाच्या कार्यकर्त्यांसोबत मंडळाची संघटनात्मक बांधणी आणि आगामी काळातील कार्यक्रमाविषयी चर्चा करून निर्णय घेण्यात आले.
- २, ३, ४ मार्च २०१६ :
  मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी यशदा, पुणे येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, विश्वंभर चौधरी, हरी नरके, रवींद्र चव्हाण, मुमताज शेख, शमसुद्दिन तांबोळी, राजन खान, अब्दुल कादर मुकादम, सुरेश खोपडे यांनी मार्गदर्शन केले.
- १२ ऑगस्ट २०१६ :
  'मुस्लीम समाजाच्या समस्या आणि उपाय' या विषयावर इस्लामचे अभ्यासक व ज्येष्ठ कार्यकर्ते अब्दुल कादर मुकादम यांचे साधना मीडिया सेंटर, पुणे येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- २९ सप्टेंबर २०१६ :
  'हमीद दलवाई यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये समीर शेख, अझरुद्दीन पटेल, बेनझीर तांबोळी यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी 'साधना' साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ होते.
- ३० नोव्हेंबर २०१६ :
  माजी खासदार आरिफ मोहंमद खान यांच्याबरोबर मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे चर्चेचे आयोजन करण्यात आले.



***चर्चासत्रात बोलताना दिल्ली येथील डॉ. इम्तियाज अहमद.***

- १७ डिसेंबर २०१६ :
  ‘अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मुस्लीम साहित्य’ या विषयावर हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने चर्चा आयोजित करण्यात आली.
- २२ ऑगस्ट २०१७ :
  मुस्लीम महिलांच्या तलाकच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ३९५ पानांचे निकालपत्र जाहीर केले. हा एक ऐतिहासिक निवाडा असला तरी या निवाड्यामुळे किती सुरक्षित वाटते? या निकालाचा अर्थ आणि अन्वयार्थ काय? या विषयावर मंडळाच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. विधीज्ञ डॉ. जया सागडे यांनी सविस्तर विवेचन केले. महिलांच्या प्रश्नांवर ‘जरीना का क्या होगा?’ या लघुपटाचे सादरीकरण आणि कलाकारांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर ‘हलाल’ या चित्रपटाचे निर्माते व कलाकारांचाही या चित्रपटाचे कथालेखक राजन खान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
- २८-२९ सप्टेंबर २०१७ :
  साधना प्रकाशन, पुणे यांच्या सहकार्याने विनय हर्डीकर यांचे ‘हमीद दलवाई यांच्या २५ कथा आणि कादंबरी’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे हा कार्यक्रम पार पडला.
- २८-२९ सप्टेंबर २०१७ :
  एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे दलवाईंच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून मुस्लीम महिलांच्या प्रश्नावरील ‘जरीना का क्या होगा?’ या लघुपटाचे सादरीकरण करण्यात आले. या लघुपटातील दिग्दर्शक, निर्माते आणि कलाकारांचा साहित्यिक राजन खान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. जया सागडे यांचे ‘समान नागरी कायदा’ या विषयावर व्याख्यान झाले.
- २६ नोव्हेंबर २०१७ :
  संविधानदिनाच्या निमित्ताने मंडळाच्या कार्यालयात ज्येष्ठ लेखक आणि अभ्यासक प्रा. जहीर अली यांचे ‘मुस्लीम व्यक्तिगत कायदा’ या विषयावर व्याख्यान आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत प्रश्नोत्तरे झाली.
- १५ डिसेंबर २०१७ :
  मंडळ आणि शंकरराव चव्हाण विधि महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानेश्वर सभागृह, मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे ‘मुस्लीम व्यक्तिगत कायदा आणि प्रस्तावित सुधारणा’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रा. वैजयंती जोशी, डॉ. जया सागडे, डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि प्रा. क्रांती देशमुख यांनी विचार मांडले.
- ७ एप्रिल २०१८ :
  जागतिक आरोग्य दिनानिमित्त राष्ट्र सेवा दल, पुणे येथील मंडळाच्या कार्यालयात मुस्लीम महिला मंचच्या वतीने आहारतज्ज्ञ नेहा शिरसाट यांचे ‘शारीरिक, मानसिक आरोग्य’ यासंबंधी व्याख्यान व प्रश्नोत्तरे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

● १४ जून २०१८ :
मंडळाच्या कार्यालयात पाकिस्तान येथील लेखक, प्रकाशक अजमल कमाल आणि चित्रपट निर्मात्या गौरी पटवर्धन यांच्यासमवेत विविध सामाजिक प्रश्नांवर मुक्त चर्चा झाली.

● २९ सप्टेंबर २०१८ :
राष्ट्र सेवा दल येथील मंडळाच्या कार्यालयात हमीद दलवाई यांच्या जयंतीनिमित्त 'हमीद दलवाई आम्हाला का भावतात?' या विषयावर मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांसोबत संवाद करण्यात आले.

● १३-१४ डिसेंबर २०१९ :
'हमीद दलवाई यांचे साहित्य आणि कार्य' या विषयावर हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटय़ूट, 'साधना' साप्ताहिक आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या वतीने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

● १६ मे २०२० :
मंडळाच्या हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने हृदयरोगतज्ज्ञ आणि समाजवादी नेते डॉ. अभिजित वैद्य यांचे 'कोविड १९ आणि मानवतेसमोरील आव्हाने' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले.

● १९ सप्टेंबर २०२० :
ज्येष्ठ विचारवंत आणि मुस्लीम सत्यशोधक चळवळीचे आधारस्तंभ राहिलेले प्रा. अ. भि. शहा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यात शिवनादार विश्वविद्यालयातील प्रा. डॉ. अतुल मिश्रा यांचे 'राष्ट्र, राष्ट्रवाद आणि समकालीन



***मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी प्रतिनिधी.***

स्थिती' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

- ४ ऑक्टोबर २०२० :
  प्राध्यापक अ. भि. शहा यांच्या जन्मशताब्दी निमित्त स्मृतीदिनी मंडळाचे अध्यक्ष शमसुद्‌दिन तांबोळी यांचे 'अ. भि. शहा आज का आठवावे?' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
- ११ डिसेंबर २०२० :
  अ. भि. शहा जन्मशताब्दी व्याख्यानमालेत डॉ. राम ताकवले यांचे 'प्रा. शहा यांचे शैक्षणिक विचार आणि सद्यस्थिती' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- ११ जानेवारी २०२१ :
  अ. भि. शहा स्मृतिशताब्दी निमित्त डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर यांच्याशी 'विवेकानंदांची खरी ओळख' या विषयावर ऑनलाइन संवाद आयोजित करण्यात आला.
- ११ एप्रिल २०२१ :
  मंडळाच्या सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचच्या वतीने महात्मा फुले जयंती निमित्त 'तृतीयपंथी उपेक्षितांचे वास्तव आणि अंतरंग' या विषयावर मा. ॲड. दिलशाद मुजावर यांचे ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. बेनझीर तांबोळी यांनी समन्वयक म्हणून कार्य केले. आबेदा शेख यांनी आभार व्यक्त केले.
- २९ मे २०२१ :
  भारताचे प्रमुख निवडणूक आयुक्त आणि 'द पॉप्युलेशन मिथ, इस्लाम फॅमिली प्लानिंग ॲंड इंडियन पॉलिटिक्स' या पुस्तकाचे लेखक डॉ. एस. वाय. कुरेशी यांचे याच विषयावर ऑनलाइन व्याख्यान आणि संवाद आयोजित करण्यात आला. यास डॉ. बाबा आढावांसह, कुमार सप्तर्षी, अन्वर राजन, ॲड. फिरदौस मिर्झा आणि महाराष्ट्रातील मुस्लीम कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. बेनझीर तांबोळी, समीर शेख आणि शमसुद्‌दिन तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. बाबा आढाव यांनी महात्मा फुले यांच्या अखंडाचे गायन केले.
- २२ ऑगस्ट २०२१ :
  युवा पत्रकार आणि प्राध्यापक अभिषेक भोसले यांचे 'हिंसाग्रस्त भागातील धैर्यवान महिला पत्रकार' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
- २९ सप्टेंबर २०२१ :
  'धार्मिक अंधश्रद्‌धा आणि त्याचे निर्मूलन' या विषयावर डॅनिएल मस्करणीस यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- ५ जून २०२२ :
  मंडळाच्या वतीने 'आपण, संविधान आणि मानवता' या विषयावर कोल्हापूर येथे राजर्षी शाहू स्मारक भवनात राजू परुळेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक मा. अशोक धिवरे होते. कार्यक्रमात मा. सरोजमाई पाटील, डॉ. एम. बी. शेख, मा. सुरेश शिपूरकर, मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्‌दिन

तांबोळी यांनीही विचार मांडले.

- २९ सप्टेंबर २०२२ :
  मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या जयंती निमित्ताने ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यात जयपूर येथील पसमांदा मुस्लीम कार्यकर्त्या आमना अन्सारी आणि पाटणा येथील डॉ. फैयाज अहमद फैजी यांनी अनुक्रमे 'हिजाबच्या प्रश्नावरील भारतातील आणि इराणमधील आंदोलने' आणि 'पसमांदा मुस्लिमांच्या समस्या' या विषयावर मांडणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी होते.

## ३.७ राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक–धार्मिक सलोखा

- ३ मे १९८९ ते ३ मे १९९० :
  हे वर्ष मुस्लीम सत्यशोधक मंडळाने 'राष्ट्रीय एकात्मता वर्ष' म्हणून साजरे करण्याचे ठरवले. त्यानुसार हिंदू–मुस्लीम संमेलन, परिसंवाद, व्याख्याने आणि जनसंपर्क या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. पाकिस्तान पुरस्कृत कारवायांमुळे पंजाब पाठोपाठ काश्मीरमधील वातावरण पेटून उठले आणि देशात विभाजनवादी प्रवृत्ती देशातील एकात्मता खंडित करण्याच्या भूमिकेतून कार्यरत होत्या. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हा विषय गंभीरपणे घेऊन काश्मीर आणि भारतात जनसंपर्काच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचे उपक्रम हाती घेतले. महाराष्ट्रातही सभा, परिसंवाद आणि मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले. वर्षभर कार्यक्रम राबवून राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न मंडळाने केला.
- १६ मे १९८९ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे रमजान ईद व शिवजयंती निमित्ताने ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन रोजी पुण्यात करण्यात आले. या वेळी पुण्याचे तत्कालीन महापौर अंकुश काकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोहन धारिया, ॲड. एस. ए. रेहमान, डॉ. बाबा आढाव आणि पुण्याचे पोलीस आयुक्त आणि मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.
- २१ ऑगस्ट १९८९ :
  टिळक स्मारक मंदिर पुणे येथे 'राष्ट्रीय एकात्मता' विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात निळू फुले, जब्बार पटेल, दिग्दर्शक सईद मिर्झा, विजय तेंडुलकर यांनी भाग घेतला. कार्यक्रमात सय्यदभाईंनी प्रास्ताविक केले आणि मेहेरून्निसा दलवाई यांनी आभार व्यक्त केले.
- १३ फेब्रुवारी १९९० :
  पुण्यातील भारतीय इतिहास संशोधन मंडळात 'काश्मीर आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात असगर अली इंजिनिअर, प्रा. सत्यरंजन साठे, ताहेर पूनावाला, सय्यदभाई, शमसुद्दिन तांबोळी, अन्वर राजन यांनी विचार मांडले.
- १७ डिसेंबर १९९० :
  देशातील जातीय दंगलींचा निषेध करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री आरिफ मोहम्मद खान यांनी दिल्ली येथे बेमुदत उपोषण केले. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पुण्यात पुरोगामी सामाजिक संघटनांच्या वतीने प्रातिनिधिक उपोषण करण्याचा कार्यक्रम मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आयोजित करण्यात आला. यात मा. नानासाहेब गोरे, डॉ. बाबा आढाव, सय्यदभाई, ताहेर पूनावाला, अन्वर राजन, कमल पायगुडे, शमसुद्दिन तांबोळी आणि विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

● ३ मे १९९२ :

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने शिवजयंती व हमीद दलवाई यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून ना. कुलकर्णी यांचे पिंपळपानावरचे शिवचरित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन कोल्हापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी अमित कुमार जैन यांच्या हस्ते आणि जळगाव येथील न्यायाधीश ख्वाजा एहतेशाम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाले. हे प्रदर्शन करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले. तसेच शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे राष्ट्रीय एकात्मतेवरील कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्घाटन दै. 'केसरी'चे तत्कालीन संपादक मा. वासुदेव कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात मंडळाच्या वतीने सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार, प्रा. बी. टी. काझी, गाझियोद्दिन सलाती, प्रा. ऐनुल अत्तार, बशीर तांबोळी, एम. ए. नाईक, आय. एन. बेग आणि आयेशा जमादार यांनी सहभाग घेतला.

● १६ जानेवारी १९९३ :

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स यांच्या वतीने 'राष्ट्रापुढील आव्हान' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. चर्चासत्रात मशिदींवरील ध्वनिवर्धक, अयोध्येतील मंदिर-मस्जिद वाद, हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि धर्मनिरपेक्षता या विषयांवर विचार मांडण्यात आले. यात डॉ. सत्यरंजन साठे, हुसेन जमादार, सय्यदभाई, प्रा. एच. एम. शेख, फादर बेर्टी रोझारियो आणि पुण्याचे महापौर शांतीलाल सुरतवाला यांनी विचार मांडले. शमसुद्दिन तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.




*शिवजयंती-ईदमिलन कार्यक्रमात बोलताना डॉ. देवदत्त दाभोलकर. उपस्थित मोहन धारिया, ॲड. एस. के. रेहमान आणि इतर.*

- १९९३ :
मंडळातर्फे अयोध्यायेथील रामजन्मभूमी आणि बाबरी मस्जीद या वादावर समाज व देशहित लक्षात घेऊन भिन्न धर्मीय नेत्यांशी संवाद करून मार्ग काढण्यासाठी 'मंदिर मस्जीद सुलह कमिटी'ची स्थापना करण्यात आली.
- १६ ऑगस्ट १९९३ :
मंडळ आणि सर्वोदय मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय सांप्रदायिकता सद्‌भावना परिषदेचे कोल्हापूर येथे आयोजन करण्यात आले. काश्मीरमधील हजरतबाल दर्ग्यातील अतिरेक्यांच्या घुसखोरीचा मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सतर्फे निषेध करण्यात आला. भारताच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करून जातीय दंगली घडवून आणण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न हाणून पाडण्याचे आवाहन करण्यात आले. 'भारत हीच आमची मातृभूमी आहे. धर्माच्या नावाखाली या देशातील मुसलमानांना इतर धर्मियांपासून अलग करून देशाचे तुकडे करण्याची भाषा आम्ही सहन करणार नाही', अशी प्रतिज्ञा भारतीय मुस्लीम एकजुटीने करत आहेत, अशा अर्थाची तार पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांना पाठवण्यात आली.
- ३० सप्टेंबर २००० :
काश्मीरच्या ज्वलंत प्रश्नावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. भारतीय मुस्लिमांच्या दृष्टीने काश्मीर हा गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, ही मंडळाची भूमिका आहे. या प्रश्नावर मुस्लीम समाजात चर्चा व्हावी म्हणून मंडळ आणि ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सने विविध ठिकाणी उपक्रम राबवण्याचे ठरवले. त्याचाच एक भाग म्हणून 'काश्मीर प्रश्नाचा ऐतिहासिक आढावा', 'काश्मीर प्रश्नाचे बहुविध पैलू' आणि 'काश्मीरच्या स्वायत्ततेचा प्रश्न', या विषयांवर अनुक्रमे रा. प. नेने, ब्रिगेडियर के. जी. पित्रे आणि डॉ. सत्यरंजन साठे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सय्यदभाई होते.
- २७ जानेवारी २००२ :
मुस्लीम सत्यशोधक मंडळ, हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटय़ूट आणि पुणे विद्यापीठ बही:शाल शिक्षणच्या वतीने पुणे विद्यापीठात 'दहशतवाद' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. दै. 'लोकमत'चे मुख्य संपादक कुमार केतकर यांनी व्याख्यान दिले. यामध्ये ग. प्र. प्रधान, प्रा. तेज निवळीकर, भाई वैद्य, मेहेरून्निसा दलवाई, शमसुद्दिन तांबोळी, प्रा. राम ताकवले, डॉ. यशवंत सुमंत, दिलीप चित्रे, अब्दुल कादर मुकादम उपस्थित होते. स्थळ : शिवाजी सभागृह, मुख्य इमारत, पुणे विद्यापीठ.
- फेब्रुवारी-मार्च २००२ :
गुजरातमधील गोध्रा प्रकरणानंतर मोठ्या प्रमाणात हिंसाचार घडवून आणला गेला. मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी झाली. या वेळी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या एक शिष्टमंडळाने सुरत, बडोदा, अहमदाबाद आणि परिसरात घडलेल्या हिंसाचारग्रस्त छावण्यांना भेट दिली.

स्थानिक समविचारी संघटनांसोबत बैठका आयोजित करून एकंदर परिस्थितीचे गांभीर्य समजून घेतले. जाळपोळ झालेल्या मशिदींची पाहणी करून स्थानिक लोकांशी संवाद केला. या संदर्भातील अहवाल प्रसिद्ध केला. शिष्टमंडळात हुसेन जमादार, आय. एन. बेग, शमसुद्दिन तांबोळी, बी. टी. काझी, बशीर तांबोळी आणि आयेशा जमादार यांचा समावेश होता.

- ३ मे २००२ :
  बाबरी मशीद, रामजन्मभूमी प्रश्नातून देशात हिंदू-मुस्लीम एकतेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. या प्रश्नाला बहुसंख्याकांच्या अस्मितेचा प्रश्न असे स्वरूप देण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर हिंसाचार आणि जातीय दंगलीत वाढ होऊन मुसलमानांची वित्त व प्राण हानी होत आहे. हिंदू-मुस्लीम द्वेषाचे वातावरण खेड्यापाड्यातही पोहोचले आहे. या प्रश्नाची भयानकता लक्षात घेऊन विध्वंस थांबवण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने तोडगा तयार केला. त्याचा प्रचार करण्यासाठी सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देणे, सभा, बैठका, पोस्टर प्रदर्शन असे कार्यक्रम आखून जनमत संघटित करण्याचे ठरवले. हमीद दलवाई स्मृतिदिनी कोल्हापूरातून या अभियानाची सुरुवात करण्याचा आणि महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन मुंबई येथे त्याची सांगता करण्याचे निश्चित केले. या काळात मुस्लीम व हिंदुत्ववादी संघटना तसेच लोकप्रतिनिधींना भेटून संवाद करण्याचेही ठरवण्यात आले. मंडळाचा तोडगा पुढीलप्रमाणे होता :
  इतिहासात मंदिरे पाडण्याच्या घटनांची किंमत आज सर्वसामान्य मुसलमानांना मोजावी लागू नये. तरीही रामजन्मभूमी-बाबरी मशीद वादाच्या संदर्भात बहुसंख्याकांच्या भावनेचा आदर करत मुस्लीम समाजाने बाबरी मशीद जागेवरील हक्क बहुसंख्याकांकडे आपणहून बहाल करावा आणि दुसरीकडे मशीद उभी करण्यास बहुसंख्याक समाजाने सहकार्य करावे. हा प्रश्न




*राष्ट्रीय एकात्मतेसाठी धरणे कार्यक्रमात सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहेरून्निसा दलवाई आणि इतर.*

सोडवत असताना मंदिर–मशीद संदर्भातील अन्य विवादीत स्थळांबाबत संघपरिवाराने मुद्दा उकरून न काढता १९४७ची 'जैसे थे' स्थिती मान्य करावी. या उपक्रमास राष्ट्र सेवा दलाने ९ एप्रिल २००२ रोजी पाठिंबा देत असल्याचे पत्रक काढले.

- ८ ते ३० जानेवारी २००५ :
सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरात 'सद्भावना अभियान दौऱ्या'चे आयोजन करण्यात आले.
- ४ ऑगस्ट २००६ :
भारत इतिहास संशोधन मंडळ, सदाशिव पेठ, पुणे येथे 'हिंदुस्थान, पाकिस्तान आणि बांग्लादेश' यांचे परस्परसंबंध या विषयावर मंडळाच्या वतीने परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात पत्रकार अरविंद गोखले, विचारवंत प्रा. राम बापट, प्रा. श्रीकांत परांजपे आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सय्यदभाई होते.
- ७ डिसेंबर २००६ :
मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरमच्या वतीने 'दहशदवाद : कारणे व उपाय' आणि 'भारतातील धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादासमोरील आव्हाने' या विषयांवर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- २२ डिसेंबर २००७ :
देशात विविध धर्मातील मूलतत्त्ववादी प्रवृत्ती तसेच दहशतवाद राष्ट्रीय एकात्मतेवर आघात करीत आहे, यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी आणि भिन्न धर्मियांत सुसंवाद वाढवण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात डॉ. दाऊद दळवी, अब्दुल कादर मुकादम, डॉ. बाबा आढाव, रा. प. नेने, मा. भाई वैद्य आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.
- ६ जानेवारी २००९ :
मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली दहशतवादाविरोधात सभा आयोजित करण्यात आली. परिषदेत प्रा. विलास वाघ, अस्लम जमादार, सिकंदर मुलाणी, अन्वर शेख, प्राचार्य एम. डी. लॉरेन्स, साहित्यिक राजन खान आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी संबोधित केले.
- २९ जानेवारी २००९ :
पुणे विद्यापीठ प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम यांच्या वतीने 'राष्ट्रीय एकात्मता – स्वरूप व आव्हाने' या विषयावर सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. मा. भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, डॉ. यशवंत सुमंत, डॉ. श्रीकांत परांजपे, प्रा. तेज निवळीकर, प्रा. शमसुद्दिन तांबोळी आणि सय्यदभाई यांनी विचार मांडले.
- २० फेब्रुवारी २००९ :
'राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने' या विषयावर सभेचे आयोजन करण्यात आले.
- ३ मार्च २००९ :

निवारा सभागृह, नवी पेठ, पुणे येथे 'राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने' या विषयावर सभेचे आयोजन करण्यात आले. यात माजी केंद्रीय गृहसचिव डॉ. माधवराव गोडबोले, डॉ. असगर अली इंजिनिअर, शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी सय्यदभाई होते.

- २६ नोव्हेंबर २००९ :
  मुंबई येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात अनेक पोलिस अधिकारी आणि सामान्यांचा बळी गेला. २६/११च्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी आयोजित केलेल्या 'व्यर्थ न हो बलिदान' या कार्यक्रमात मंडळाचा सहभाग होता.
- २०१० :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाने विविध धर्मातील सामाजिक संघटनांसह धार्मिक सुसंवाद, सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी आणि भिन्न धर्मीय समुदायात परस्पर आदर व बंधुभाव निर्माण करण्यासाठी 'आंतरधर्मीय सुसंवाद आणि सलोखा' या उपक्रमाचे आयोजन २०१०पासून सुरू करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून २०१०मध्ये गणेशोत्सव आणि रमजान ईद शांतता आणि सलोख्याच्या वातावरणात साजरी केली जावी, यासाठी उपक्रम आखले. राज्यात काही वर्षांपासून गणेशोत्सवाच्या काळात घडलेल्या अप्रिय घटना आणि जखमा कायम असताना निकोप वातावरण तयार करून सणांचा आनंद घेण्यासाठी जाणीवपूर्वक भूमिका घेणे आवश्यक आहे.

  छत्रपती शिवाजी महाराज यांची धार्मिक सहिष्णुता, औदार्य आणि सर्वधर्म बांधवांसाठी निरपेक्ष सन्मान, याबाबत सर्वसामान्य मुस्लीम समाजातही आदराचीच भावना आहे. अफजल खान किंवा त्यासारख्या दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती कोणाच्याही आदरास पात्र नाहीत. आजच्या परिस्थितीत अफझल खान वधासारखे देखावे उभे केल्यास समाजकंटक त्याचा गैरवापर




*गुजरात येथील हिंसाग्रस्त भागात सलोखा बैठकीत शमसुद्दिन तांबोळी, बाबासाहेब काझी, बशीर तांबोळी, हुसेन जमादार, आय. एन. बेग, आयेशा जमादार*

करून भिन्न धर्मियांत विद्वेषाची ठिणगी पाडतात आणि शांतता, सुव्यवस्था आणि सद्भाव बिघडवून सामाजिक व धार्मिक दुरावा निर्माण करतात. त्यासाठी इतिहासातील नकारात्मक देखाव्यांऐवजी विश्वास आणि सद्भाव वाढवणारे देखावे उभे करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे मंडळाने आवाहन केले. अनेक वेळा गणेशोत्सव, पर्यूषण पर्व, रमजान ईद, ख्रिसमस, दिवाळी असे सण एकत्र येतात. त्यांचा आनंद घेण्यासाठी आणि सर्व धर्मीयांमध्ये ऐक्याची भावना निर्माण करण्यासाठी अशा सणांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ, स्वच्छंद पुणे, पुणे धर्मप्रांत यांच्या यांच्या पुढाकारातून हा मंच स्थापन करण्यात आला. रमजान ईद, ख्रिसमस, दिवाळी पहाट याबरोबरच राष्ट्रीय सणांच्या पार्श्वभूमीवर धार्मिक सुसंवादाचे विचारमंथन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांत विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संकुल आणि प्रशासकीय अधिकारी यांचा सहभाग असतो. विद्यार्थी, कार्यकर्ते आणि लोकसहभाग यातून या कार्यक्रमांना गेली १५ वर्षे उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

- १७ ऑक्टोबर २०१० :

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम मंचाच्या वतीने राष्ट्रीय प्रश्नावर जनजागृती करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. अयोध्येतील वादग्रस्त जागेबद्दल उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालासंदर्भात वेगवेगळे मतप्रवाह असले, तरी व्यापक जनहित लक्षात घेऊन वादग्रस्त जागेवरील मुस्लिमांचा हक्क मागे घेण्यात यावा आणि या संदर्भात जनजागृती करावी, असे आवाहन प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरमच्या वतीने आझम कॅम्पस पुणे येथे आयोजित केलेल्या चर्चासत्रात ठरवण्यात आले. या बैठकीत जहीर अली, जावेद आनंद, अब्दुल कादर मुकादम, इरफान इंजिनिअर, फक्रूद्दिन बेन्नूर, मुनव्वर पिरभॉय, लतिफ मगदूम, डॉ. अन्वर शेख, अब्दुल करीम अत्तार, प्रा. आफाक खान, प्रा. फ. म. शहाजिंदे, नर्गिस नाईकवडे, फोरमचे अध्यक्ष सय्यदभाई, सरचिटणीस शमसुद्दिन तांबोळी, खजिनदार रशीद शेख यांच्यासह विचारवंत, साहित्यिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

काश्मिरी जनतेच्या भावना समजावून घेण्यासाठी व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी फोरमने 'काश्मीर फॅक्ट फाइंडिंग कमिटी' (काश्मीर सत्यशोधक समिती) ची स्थापना केली आहे. या चर्चासत्रात पुढील ठराव मांडण्यात आले :

"अयोध्या येथील रामजन्मभूमी-बाबरी मस्जीदविषयी अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यातील श्रद्धेचा मुद्दा भारतीय संविधानाच्या आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे, याची नोंद घेऊन, भिन्न धर्मियांच्या सद्भावनेला महत्त्व आणि संभाव्य समस्या विचारात घेऊन मशिदीसाठी दिलेला एक तृतीयांश भागावरील हक्क सोडून द्यावा", अशी प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरमची भूमिका आहे. जनतेशी संवाद साधून जनमत तयार करण्यासाठी आणि भविष्यात धर्म व धार्मिक स्थळे याबाबत वाद होऊ नये, यासाठी भिन्नधर्मिय विचारवंतांची समिती स्थापन करण्यात यावी. भारतात ऐरणीवर असणाऱ्या घटना विचारात घेऊन या लढाईकडे प्रामुख्याने फॅसिझम विरुद्ध लोकशाही, धर्मांधता विरुद्ध

धर्मनिरपेक्षता, कायदा पाळणारे विरुद्ध कायदा मोडणारे या दृष्टीकोनातून पाहावे लागणार असल्याचे चर्चेत नोंदवण्यात आले.

- २२ ते २४ जून २०१४ :
  हमाल भवन, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे येथे झालेल्या विषमता निर्मूलन शिबिराच्या आयोजनात मंडळाचा सहभाग होता.
- ७, ८ फेब्रुवारी २०१५ :
  'धर्मनिरपेक्ष एकात्मता आणि मुस्लीम समाजाचे प्रश्न' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राचे पुणे विद्यापीठामध्ये आयोजन करण्यात आले. यात श्रीपाल सबनीस, जहीर अली, अब्दुल कादर मुकादम, आय. एन. बेग, फ. म. शहाजिंदे, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, हाजी महंमद गौस नाईक, सय्यदभाई यांनी मार्गदर्शन केले. मुस्लीम युवकांपुढील पेच आणि मुस्लीम महिलांचे अनुत्तरित प्रश्न या विषयावर मंडळाच्या युवामंच व महिला मंचच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.
- ३१ मार्च २०१५ :
  राष्ट्रीय एकात्मता समितीमध्ये सहभागी संघटना म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे उपोषण, धरणे, जाहीरसभा आयोजनात सहभाग घेतला.
- १८ जून २०१५ :
  डायोसिसि ऑफ पुणे (पुणे धर्मप्रांत), स्वच्छंद पुणे आणि मंडळाच्या वतीने आंतरधर्मीय सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ३० ऑगस्ट २०१५ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग यांच्या वतीने ज्ञानेश्वर सभागृह, मराठवाडा मित्र मंडळ, पुणे येथे 'राष्ट्रीय




***एकात्मता चर्चासत्रात मांडणी करताना अमोल पालेकर.***

एकात्मतेसमोरील आव्हाने' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्रात माजी आय. पी. एस. अधिकारी एस. एम. मुश्रीफ, सुरेश खैरनार आणि अशोक धिवरे, भाऊसाहेब जाधव, डॉ. धनंजय लोखंडे, सतीश शिरसाठ आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. धार्मिक सुसंवाद व सामाजिक ऐक्य या विषयावर अब्दुल कादर मुकादम, बिशप थॉमस डाबरे, भंते सदस्सन आणि कार्यकर्त्यांनी विचार मांडले.

- १८ डिसेंबर २०१५ :
  हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने 'मुस्लीम समाज आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद' यावर प्रा. जहीर अली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष प्रा. शमसुद्दिन तांबोळी होते.
- १७ जानेवारी २०१६ :
  झुंडबळी, दहशतवादी कारवाया आणि वाढती धर्मांधता यामुळे समाजात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील गणेश कला क्रीडा केंद्र या ठिकाणी राष्ट्रीय एकात्मता परिषदेचे आयोजन मंडळ आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आले. यात २६/११ च्या हल्ल्यात हुतात्मा झालेल्या अधिकाऱ्यांचे कुटुंबीय, डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे यांचे कुटुंबीय आणि हडपसर, पुणे येथे हत्या करण्यात आलेल्या मोहसीन शेख यांचे वडील यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेचे निमंत्रक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबा आढाव होते.
- २७ मे २०१६ :
  'सेक्युलॅरिझम आणि समाज परिवर्तन' या विषयावर चर्चेचे आयोजन करण्यात आले.
- १७ जून २०१६ :
  साधना मीडिया सेंटर, पुणे येथे 'मुस्लीम जमातवादाचे आकलन' या विषयावर मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. अन्वर शेख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- १४ ऑगस्ट २०१६ :
  डायोसिस ऑफ पुणे (पुणे धर्मप्रांत), स्वच्छंद पुणे आणि मंडळाच्या वतीने आंतरधर्मीय सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ३ सप्टेंबर २०१६ :
  हमीद दलवाई यांच्या जयंती निमित्त 'हमीद दलवाई स्टडी सर्कलत'र्फे 'हिंदू-मुस्लीम भाईचारा' या विषयावरील व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. ज्येष्ठ नेते पन्नालाल सुराणा या विषयावर बोलताना म्हणाले, "एकमेकांविषयीचा तणाव आणि संघर्षामुळेच हिंदू-मुस्लिमांमध्ये ऐक्य नाही. हे चित्र बदलण्यासाठी हिंदू-मुस्लिमांनी धर्माच्या पलीकडे जाऊन आपण भारताचे नागरिक आहोत, याची जाणीव निर्माण करावी. तणाव व संघर्ष बाजूला सारून ऐक्य व बंधुभाव वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा. यातून नक्कीच बदल घडू शकेल. हिंदू-मुस्लिमांमधील बंधुभाव मजबूत करण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. आज एकमेकांवरील संशय, तणाव आणि संघर्ष यामुळे या दोन धर्मांतील लोकांमध्ये द्वेष निर्माण झाला आहे. या

दोन्ही धर्मातील भाईचारा जोपासला जावा, ही सकारात्मक भूमिका प्रत्येकाने घेतली पाहिजे. दहशतवाद आणि मुस्लीम समाज असा संबंध जोडणे चुकीचे आहे. मुस्लीम समाज या देशाचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावा.”

- १५ जानेवारी २०१७ :
  प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे हमीद दलवाई स्टडी सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भारतीय समाजाचे प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता’ या विषयावर राज्यस्तरीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. यात डॉ. अभिजित वैद्य, डॉ. बाबा आढाव, डॉ. विश्वंभर चौधरी, प्रा. सुभाष वारे, अन्वर राजन, रजिया पटेल, अश्विनी सातव-डोके, धनंजय लोखंडे, सतीश शिरसाठ, शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. मा. भाई वैद्य यांनी समारोप केला. स्थळ : एस. एम. जोशी. सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे.
- १ जुलै २०१७ :
  मंडळाचे कार्यकर्ते आणि समविचारी संघटनांचे प्रतिनिधी यांच्यात धार्मिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर चर्चा करून रमजान ईद निमित्त ‘ईद मिलन’ मेळावा साधना मीडिया सेंटर, पुणे येथे आयोजन करण्यात आला.
- १३ ऑगस्ट २०१७ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या वतीने ‘सामाजिक एकात्मतेचे विविध पैलू’ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. याचे उद्‌घाटन अभिनेते, दिग्दर्शक अमोल पालेकर यांच्या हस्ते झाले. यात डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, अशोक धिवरे सर, विश्वंभर चौधरी, ऐनुल अत्तार, लेखक संजय पवार, कार्यकर्ते संजय नहार, सुरेश खैरनार, लक्ष्मीकांत




*आंतरधर्मीय सुसंवाद कार्यक्रमात शमसुद्दिन तांबोळी, प्रा. सदानंद मोरे, बिशप थॉमस डाबरे आणि रवींद्र शाळू.*

देशमुख, भरत महोदय, तेज निवळीकर, दिलशाद मुजावर, बिशप थॉमस डाबरे, धनंजय लोखंडे आणि शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले.

- ३० जानेवारी २०१८ :
  डायोसिस ऑफ पुणे (पुणे धर्मप्रांत), स्वच्छंद पुणे आणि मंडळाच्या वतीने मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे आंतरधर्मीय सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात डॉ. सदानंद मोरे, डॉ. दत्तात्रय तापकीर, डॉ. थॉमस डाबरे, प्रा. भाऊसाहेब जाधव, प्रा. रवींद्र शाळू आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले. एकात्मतेवर आधारित गीतांचे सादरीकरण करण्यात आले.
- १९ फेब्रुवारी २०१८ :
  समविचारी संघटना, मंडळ आणि राष्ट्रीय एकात्मता समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली.
- १४ ऑगस्ट २०१८ :
  स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे डायोसिस ऑफ पुणे (पुणे धर्मप्रांत), स्वच्छंद पुणे आणि मंडळाच्या वतीने आंतरधर्मीय सुसंवाद आणि राष्ट्रभक्तीपर गीतांचा कार्यक्रम.
- १९ फेब्रुवारी २०१९ :
  समविचारी संघटना, मंडळ आणि राष्ट्रीय एकात्मता समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली.
- १२ जून २०१९ :
  आंतरधर्मीय, मिश्र विवाहास प्रोत्साहन देणाऱ्या दिल्लीयेथील धनक संस्थेचे संस्थापक आसिफ इक्बाल आणि राणू कुलश्रेष्ठा यांच्याशी 'आंतरधर्मीय विवाह आणि सद्यस्थिती' या विषयावर राष्ट्र सेवा दल, पुणे येथील मंडळाच्या कार्यालयात चर्चेचे आयोजन करण्यात आले.
- ८ मार्च २०२० :
  आंतरराष्ट्रीय महिला अधिकार दिनानिमित्त मंडळाच्या वतीने शाहिनबाग दिल्लीच्या महिलांना पाठिंबा देत, सीएए, एनआरसी, एनपीआर निमित्ताने धार्मिक ध्रुवीकरणाचे होणारे कारस्थान, प्रक्षोभक विधाने करून धार्मिक तेढ वाढवण्यास प्रोत्साहन दिले गेले. त्यातूनच दिल्ली येथे हिंसाचार घडवून आणला. याचा निषेध करण्यासाठी 'संविधान बचाओ देश बचाओ', 'अमन चाहिए दमन नहीं' या घोषणा देत, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता राखण्याचे आवाहन करण्यासाठी पुण्यात राणी लक्ष्मीबाई पुतळा, बालगंधर्व रंगमंदिरासोर, निदर्शने करण्यात आली.
- १५ नोव्हेंबर २०२० :
  दीपावलीनिमित्त डायोसिस ऑफ पुणे (पुणे धर्मप्रांत), स्वच्छंद पुणे आणि मंडळाच्या वतीने धार्मिक सुसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बिशप थॉमस डाबरे, दत्तात्रय

तापकीर, शमसुद्दिन तांबोळी यांनी विचार मांडले आणि स्वच्छंदचे गायक कलाकार यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

- २३–२५ डिसेंबर २०२० :
  मंडळ, समाजवादी अध्यापक सभा आणि राष्ट्र सेवा दल यांनी आयोजित केलेल्या 'धार्मिक ध्रुवीकरण आणि धर्मनिरपेक्ष एकात्म समाजासमोरील आव्हाने' या विषयावर मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन यांची सुसंस्कार शिक्षण संस्था, कोल्हापूर; साधना हायस्कूल, गडहिंग्लज आणि साने गुरुजी विद्यालय, कुरुंदवाड येथे व्याख्याने झाली.
- १८ डिसेंबर २०२२ :
  आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि मिश्र विवाहास मानवाधिकाराच्या दृष्टीने प्रोत्साहन, संरक्षण आणि सहकार्य करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील विविध राज्यांतील संघटनांचे संघटन 'चयन' या नावाने कार्यरत आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ या नेटवर्कसोबत संलग्न आहे. या संघटनांचे प्रतिनिधी आणि विविध राज्यातून आलेले विवाहित जोडपे यांची परिषद पुण्यात आयोजित करण्यात आली. मंडळाने या परिषदेचे आयोजन केले.
- ७ आणि ८ ऑक्टोबर २०२३ :
  'चयन'तर्फे उत्तर प्रदेशातील लखनौ येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी यांनी पुरोगामी महिला कार्यकर्त्या शाहिस्ता अंबर यांनी महिलांसाठी बांधलेल्या मस्जिद आणि मुस्लीम महिला निवारा केंद्रास भेट दिली.
- २२ डिसेंबर २०२४ :
  याच प्रकारची चयन परिषद कोलकाता येथे आयोजित करण्यात आली.

## ३.८ ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स

- २६-२७ सप्टेंबर १९८७ :
  कोल्हापूर येथे समविचारी संघटनांची परिषद आयोजित करून ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सची स्थापना करण्यात आली आणि त्यानंतर ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने हैदराबाद येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले.

- २७-२८ फेब्रुवारी १९८९ :
  ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या विविध राज्यातील सभासदांची बैठक अब्दुल लतिफ आझमी (दिल्ली) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या बैठकीत राष्ट्रीय पातळीवरील परिस्थिती आणि दिल्ली येथील परिषदेसंदर्भात चर्चा करण्यात आली. ही बैठक नित्यानंद नगर, अंधेरी, मुंबई येथे आयोजित करण्यात आली.
- १ ऑक्टोबर १९८९ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकारातून स्थापन करण्यात आलेल्या ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने बेंगलोर येथे 'मुस्लिमांच्या सामाजिक समस्या' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे सिनेट हॉल सेंट्रल कॉलेज, बेंगलोर येथे आयोजन करण्यात आले. प्रा. बशीर हुसेन यांनी उद्घाटन केले. दिल्लीचे अब्दुल लतिफ आझमी अध्यक्षस्थानी होते. दिवसभराच्या चर्चासत्रात श्रीमती सारा अबूबकर, मेहेरून्निसा दलवाई, मोहम्मद पीर, प्रा. हसन मन्सूर, सय्यदभाई, बरागुरू रामचंद्रप्पा, पी. ए. कादर यांनी विचार मांडले. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. एम. डी. नानजुंदास्वामी होते.




*ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या बेंगलोर येथील परिषदेत अब्दुल लतीफ आझमी आणि इतर.*

- २७ जानेवारी १९९० :
  मदुराई (तामिळनाडू) येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यात राष्ट्रीय एकात्मता आणि काश्मीर प्रश्न, मुस्लीम महिलांचे प्रश्न, या विषयांवर सत्र आयोजित करण्यात आले. पाकिस्तानी कारवायांचा निषेध करणारा ठराव मांडण्यात आला.
- ३०-३१ मे १९९२ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकारातून कोल्हापूर येथे १९८७ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने राष्ट्रीय अधिवेशन अहमदाबाद, बेंगलोर, मदुराई, मंगळूर येथे आयोजित करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात भारत इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर येथे ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे ५वे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले.

  परिषदेचे उद्घाटन 'हमीद दलवाई पुरस्कारा'ने सन्मानित जिल्हा सत्र न्यायाधीश ख्वाजा एहतेशामुद्दिन देशमुख यांच्या हस्ते झाले. परिषदेत मुस्लीम महिलांच्या समस्या, मुस्लिमांचा आर्थिक व सामाजिक समस्या, हिंदू-मुस्लीम प्रश्न व राष्ट्रीय एकात्मता या विषयांवर चर्चा करण्यात आली. परिषदेत दिल्ली येथील के. एस. दुराणी, श्रीमती सुरैया दुराणी, केरळचे सी. एम. मामु, बिहारचे शाहिद कमाल, कर्नाटकच्या सारा अबूबकर, गुजरातचे अब्दुलभाई वकानी, तामिळनाडूच्या ॲड. हाफिझा आणि प्रा. नाझनीन आणि मान्यवर उपस्थित होते. मंडळाचे मेहेरून्निसा दलवाई, रजिया पटेल, सय्यदभाई, अन्वर राजन, नजमा शेख, हुसेन जमादार, प्रा. ऐनुल अत्तार, शमसुद्दिन तांबोळी, प्राचार्या कुल्सुम पारेख, प्रा. आय. एन बेग, बाबासाहेब काझी, प्रा. अमीन मोदी, ॲड. मोहम्मद मुस्तफा, शेख चाँद, डॉ. म. अ. तांबोळी, डॉ. नीलम गोऱ्हे, शांतीलाल मुथा यांनी विविध सत्रांत विचार मांडले. परिषदेचा




*कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सय्यदभाई, उपस्थित मा. विनायकराव कुलकर्णी आणि इतर.*

समारोप ज्येष्ठ विचारवंत नानासाहेब गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

- १०-११ सप्टेंबर १९९४ :
  गोखले इन्स्टिटयूट, पुणे येथे मुस्लीम समाजातील बुद्धिजीवी आणि प्रागतीक विचाराचे कार्यकर्ते आणि विचारवंत यांचे ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स तर्फे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये न्या. दाऊद, प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर, फ. म. शहाजिंदे, इम्तियाज अहमद, कुलसुम पारेख, असगर अली इंजिनिअर आणि मंडळाचे प्रमुख कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

## ३.९ शैक्षणिक उपक्रम

- ११ जून १९८९ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या खडकी शाखेच्या वतीने दरवर्षी गरीब विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य वितरण करण्याचा कार्यक्रम अग्रवाल समाज कार्यालय, औंध रोड, खडकी, पुणे येथे आयोजित करण्यात आला. प्राचार्य कुलसुम पारेख याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. १९३६मध्ये बर्लिन हॉकी ओलंपियन विजेते बाबू नीमन यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सय्यदभाई, अन्वर राजन, चांद अब्दुल शेख आणि रशीदभाई यांनी केले.
- २२ मार्च १९९५ :
  मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षात हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली.
- ३-४ मे १९९५ :
  कोल्हापूर येथे शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले.
- ५ ऑक्टोबर २००८ :
  मंडळ आणि मंडळाचे प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम यांच्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा महाविद्यालयीन विद्यार्थी आणि खुल्या गटांसाठी आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन मा. शोभनाताई रानडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे पारितोषिक वितरण एस. एम. जोशी सभागृहात ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. परीक्षक म्हणून साहित्यिक राजन खान, लता जाधव आणि मंदार बेडेकर यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी




*मार्गदर्शन करताना डॉ. प्रतिभा रानडे, रा. प. नेने, मेहेरून्निसा दलवाई.*

रा. प. नेने, सय्यदभाई, शमसुद्दिन तांबोळी उपस्थित होते.

याप्रसंगी लागू म्हणाले, ''दहशतवाद आणि धर्मवाद अलीकडच्या काळात समांतर पद्धतीने चाललेल्या गोष्टी आहेत. यावर उपाय म्हणून विवेकवाद आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणे आवश्यक आहे. 'देव' या संकल्पनेतून मोठ्या प्रमाणात दहशतवाद जोपासला जातो. धार्मिक स्थळातून जेवढा निधी गोळा होतो, तो निधी धर्मांधता वाढवण्यासाठीच वापरला जातोय. हा निधी विधायक कार्यास वापरल्यास अनेक सामाजिक समस्या सुटू शकतील.''

- ११ नोव्हेंबर २०१० :
  नाथ पै. सभागृह, राष्ट्र सेवा दल, पुणे येथे मंडळ आणि अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा यांच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मा. भाई वैद्य, मा. अब्दुल कादर मुकादम, प्रा. बेनझीर तांबोळी यांनी मार्गदर्शन केले.
- ११ नोव्हेंबर २०११ :
  मंडळ आणि समाजवादी अध्यापक सभेच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त प्रा. डॉ. अलीम वकील यांचे व्याख्यान एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे आयोजित करण्यात आले.
- १२ फेब्रुवारी २०१२ :
  भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांच्या पुण्यतिथीनिमित्त ज्ञानेश्वर सभागृह, मराठवाडा मित्रमंडळ, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात प्रा. शमसुद्दिन तांबोळी संपादित 'आझाद कलाम' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी भाई वैद्य होते.
- ११ नोव्हेंबर २०१४ :
  अध्यापक सभा आणि मंडळाच्या वतीने राष्ट्रीय शिक्षणदिनानिमित्त प्राचार्य शहाबुद्दीन शेख यांच्या व्याख्यानाचे आयोजन एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन येथे करण्यात आले.
- २९ सप्टेंबर २०१५ :
  मंडळाच्या हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन विवेक सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी अशोक धिवरे, सारंग आव्हाड, कविता पवार, मा. भाई वैद्य, प्राचार्य भाऊसाहेब जाधव आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी मार्गदर्शन केले.
- ११ नोव्हेंबर २०१५ :
  राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त मंडळ आणि समाजवादी अध्यापक सभेतर्फे शिक्षण विशेषांकाचे प्रकाशन साहित्य परिषदेत करण्यात आले.
- १० जून २०१६ :
  मराठवाडा मित्रमंडळ येथे विविध परिक्षांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

- ९-१० जुलै २०१६ :
  हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने पुण्यातील प्रतिष्ठित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात निःशुल्क प्रवेश मिळवून देण्यासाठी गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी लेखी परीक्षा आणि मुलाखती घेण्यात आल्या.
- ४ सप्टेंबर २०१६ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आरंभीचे अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले यांच्या जयंतीनिमित्त मंडळाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि खुल्या गटांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे आयोजित करण्यात आले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण ज्येष्ठ साहित्यिक आणि मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. परीक्षक म्हणून डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. लता जाधव, किरण किसनराव आणि अभिषेक भोसले यांनी काम पाहिले.

  या वेळी डॉ. सबनीस म्हणाले, “देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली राज्यघटना आहे. त्यानुसार नागरिकांसाठी ‘समान नागरी कायदे’ आहेत. असे असताना हिंदू, मुस्लीम, बौद्ध अशा कोणत्याही धर्मांच्या लोकांसाठी ‘पर्सनल लॉ’ ठेवण्याचे कारणच नाही. ‘पर्सनल लॉ’ हे राज्यघटनेतील तत्त्वांना विरोध करण्यासारखे आहे. सर्व भारतीयांमध्ये समानतेची भावना आणि समान नागरीकत्व निर्माण करायचे असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेच्या निकषांचा आधारच घ्यावा लागणार आहे. त्याद्वारे नागरिकांना धार्मिक, सामाजिक व आर्थिक ऐक्य मिळणार आहे. ‘पर्सनल लॉ’ची संकल्पना ही राज्यघटनेच्या समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष ध्येयधोरणांना विरोध करणारी आहे. त्यामुळे विविध धर्मातील




***राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण. प्रमुख पाहुणे डॉ. श्रीराम लागू, रा. प. नेने, राजन खान. बोलताना प्रा. बेनझीर तांबोळी.***

लोकांना 'पर्सनल लॉ'ची आवश्यकता नाही. इस्लाम धर्माची शिकवण ही खूप चांगली आहे. बगदादी, लष्कर-ए-तोयबा, इंडियन मुजाहिद्दीन आणि दहशतवाद्यांचा इस्लाम हा खरा इस्लाम नाही. पैगंबरांचा शुद्ध इस्लामच या लोकांनी 'हायजॅक' करून टाकला आहे. त्यामुळेच जगातील ३४ देशांमधील लोक या दहशतवादाच्या विरोधात लढत आहेत. भारतात देखील मौलवी, इमाम आणि मुस्लीम संघटना या दहशतवादाच्या विरोधात काम करत आहेत.'' सामाजिक कार्यकर्त्या मुमताज शेख आणि सुभाष वारे यांनीही मार्गदर्शन केले.

- ११ नोव्हेंबर २०१६ :
  राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' व 'शिक्षणहक्क पत्रिके'च्या शिक्षणदिन व दीपावली विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.
- ३१ डिसेंबर २०१६ :
  मेहेरून्निसा दलवाई यांचा हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या विद्यार्थ्यांबरोबर साधना मीडिया सेंटर, शनिवार पेठ, पुणे येथे संवाद.
- १७ ऑक्टोबर २०१७ :
  सर सय्यद अहमदखान यांच्या २००व्या जयंतीनिमित्त मंडळ आणि अध्यापक सभेतर्फे राष्ट्र सेवा दल येथील मंडळाच्या कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ११ नोव्हेंबर २०१७ :
  महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथे राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त 'धर्मनिरपेक्षता आणि भारतातील शिक्षण पद्धती' यावर विषयावर प्रा. जहीर अली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या वेळी अध्यक्षस्थानी जे. यु. नाना ठाकरे व भाई वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती.
- २२ जून २०१८ :
  ज्येष्ठ समाजवादी विचारवंत आणि मंडळाचे मार्गदर्शक भाई वैद्य यांच्या जयंतीनिमित्त मंडळ आणि सेवा दलाच्या वतीने बॅ. नाथ पै सभागृहात दहावी, बारावी आणि स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य भाऊसाहेब जाधव, डॉ. अभिजीत वैद्य आणि बाबा कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
- ११ नोव्हेंबर २०१८ :
  राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने अध्यापक सभा आणि मंडळाच्या वतीने विश्वंभर चौधरी यांच्या हस्ते 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' व 'शिक्षणहक्क पत्रिके'च्या शिक्षण दिन व दीपावली विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.
- ११ नोव्हेंबर २०१९ :
  राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त अध्यापक सभा आणि मंडळाच्या वतीने प्रा. शुजा शाकीर यांचे 'भारतातील धर्मनिरपेक्ष लोकशाही समोरील आव्हाने' यावर व्याख्यान झाले.
- ११ नोव्हेंबर २०२० :
  मौलाना आझाद यांचा जन्मदिन व राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने डॉ. श्रद्धा कुंभोजकर

यांचे व्याख्यान राष्ट्र सेवा दलातील बॅ. नाथ पै सभागृह, पुणे येथे आयोजित करण्यात आले.

- ११ नोव्हेंबर २०२३ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा आयोजित मौलाना आझाद जयंती आणि राष्ट्रीय शिक्षण दिन कार्यक्रम. स्थळ : शाहू स्मारक, कोल्हापूर. 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' आणि 'शिक्षणहक्क' दिवाळी विशेषांक प्रकाशन आणि शैक्षणिक प्रश्नावर चर्चा आयोजित करण्यात आली. यामध्ये डॉ. वसंत भोसले, प्रा. रमेश पाटील, डॉ. शरद जावडेकर, डॉ. शमसुद्दिन तांबोळी आणि इतर मान्यवरांनी विचार मांडले. मंडळाच्या वतीने विविध शाळेतील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, आर्थिक मदत देण्यात येते. यवत, जि. पुणे येथील ऊसकामगार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबरच सायकलचे वाटप करण्यात आले. कात्रज येथील उर्दू माध्यमाच्या शाळेत मराठी आणि इंग्रजी भाषाकौशल्य विकासाचे वर्ग घेऊन त्यांच्यात वाचनसंस्कृती वाढावी म्हणून पुस्तक भेट उपक्रम आयोजित केला. आझम कॅम्पस, पुणे येथील विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयात बोर्डाच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि स्पर्धा परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव समारंभ बॅ. नाथ पै सभागृह, राष्ट्र सेवा दल, पुणे येथे आणि मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आला.



*बाबुमियाँ बँडवाले जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना डॉ. मनिषा गुप्ते, मुमताज शेख, शमसुद्दिन तांबोळी, प्रा. रोशनआरा शेख, परीक्षक डॉ. लता जाधव.*

## ३.१० बकरी ईद निमित्त रक्तदान अभियान

२०११मध्ये कार्यकर्त्यांनी व्यक्तिगत पातळीवर बकरी ईदनिमित्त रक्तपेढीत किंवा रुग्णालयात जाऊन रक्तदान करण्यास सुरुवात केली. याला सार्वजनिक स्वरूप देऊन सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरण जाणीव-जागृती आणि मानवता ही मूल्ये वाढवण्यासाठी बकरी ईदनिमित्त रक्तदान अभियान सुरू केले. नंतर देहदान आणि मरणोत्तर अवयवदान करण्यासंदर्भात निर्धार करून त्यासंदर्भात प्रचार मोहीम व शपथपत्र उपक्रम हाती घेतला. याबरोबरच बकरी ईदनिमित्त आर्थिक मदतीचे आवाहन करून जमा झालेली रक्कम पूरग्रस्त, दिव्यांग आणि वस्तीपातळीवरील कुटुंबीयांना वाटप करण्यात आली. तसेच ही रक्कम शैक्षणिक प्रायोजकत्व उपक्रमासाठीही वापरण्यात येते.

२५ ऑक्टोबर २०१२ रोजी बकरी ईद दिनी या उपक्रमाची मंडळाच्या वतीने अधिकृतपणे सार्वजनिक पद्धतीने सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. बाबा आढाव, सेवानिवृत्त सनदी अधिकारी सुरेश खोपडे आणि मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

या नंतरच्या वर्षी आयोजित केलेल्या उपक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन समितीनेही सहभाग नोंदवला. डॉ. हमीद दाभोलकर आणि मुक्ता दाभोलकर यांनीही या उपक्रमात रक्तदान केले. पुढे प्रत्येक बकरी ईदला हा उपक्रम राबवण्यात आला. पुण्याबरोबरच कोल्हापूर, सातारा, सांगली, नागपूर, लातूर, पनवेल, चंद्रपूर, नंदुरबार आणि इतर जिल्ह्यातही असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमाला राज्यस्तरीय रक्तदान सप्ताह अभियानाचे स्वरूप प्राप्त झाले. हा उपक्रम अखंडितपणे सुरू आहे.

या कार्यक्रमात डॉ. बाबा आढाव, मा. अशोक धिवरे, सुरेश खोपडे, न्या. वि. वा. शहापूरकर, शाम देशपांडे, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख आणि इतर मान्यवर लेखक, पत्रकार आणि कार्यकर्ते उपस्थित राहतात. इतर समविचारी संघटनाही यात सहभागी होतात. एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, राष्ट्र सेवा दल आणि मराठवाडा मित्रमंडळ पुणे यांचे आयोजनात सहकार्य मिळते.

या उपक्रमाला मुस्लीम समाजातूनही उत्तम प्रतिसाद मिळतो आणि मंडळाव्यतिरिक्त अन्य संघटनाही इतर ठिकाणी अशा कार्यक्रमाचे आयोजन करतात. अखंडित पद्धतीने हा उपक्रम चालू आहे.

## ३.११ अनुषंगिक कार्यक्रम

- नोव्हेंबर १९८१ :
  सातारा, कराड, वाई, लोणावळा, खोपोली, सासवड, बारामती, फलटण याठिकाणी मुस्लीम समाजाशी संवाद करण्यासाठी आणि तरुणांना मंडळाकडे आकर्षित करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सय्यदभाईंनी पुढाकार घेतला.
- २७ डिसेंबर १९८१ :
  बाबुमियाँ बँडवाले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारिणी सभेत दिवंगत अ. भि. शहा आणि असफ ए. ए. फैजी यांना आदरांजली वाहून दुखवटा ठराव संमत करण्यात आला. मंडळाच्या १२व्या वर्धापनदिनानिमित्त तलाकपीडित महिलांचा मुंबईत मोर्चा काढून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्याचे ठरवण्यात आले. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी धर्म व कुटुंब नियोजनासंदर्भात विवेकी आणि तर्कशुद्ध भूमिका घेतल्याबद्दल मंडळातर्फे त्यांचे अभिनंदन करणारे ठराव पारित करण्यात आले. तसेच महाराष्ट्रात व कर्नाटकात काही ठिकाणी महिलांना सिनेमा पाहण्यास मुस्लीम सनातन्यांनी मज्जाव केला. त्यांच्या या गुंडगिरीचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडून निषेध करण्यात आला.
- १९८१ :
  मेहेरून्निसा दलवाई यांचा सातारा जिल्ह्यात तीन दिवसांचा व्याख्यान दौरा आयोजित करण्यात आला.
- जून १९८२ :
  ‘मुस्लीम प्रबोधन संवाद’ हे मराठी नियतकालिक कोल्हापूर येथे हुसेन जमादार यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले.
- ११-१२ जून १९८३ :
  अहमदाबाद येथे मंडळाचे कार्य उभे करण्यासंदर्भात मेहेरून्निसा दलवाई यांनी तेथील कार्यकर्त्यांशी चर्चा केली.
- १९८८ :
  मुस्लीम प्रबोधनाच्या कामासाठी फलटण तालुका मुस्लीम समाज उन्नती प्रतिष्ठानची मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून फलटण येथे स्थापना.
- ३० मे १९९३ :
  मिरज-सांगली येथे वसंत व्याख्यानमालेत सय्यदभाई यांचे ‘समान नागरी कायद्या’वर व्याख्यान झाले.
- २६-२७ फेब्रुवारी १९९४ :
  कोल्हापूर येथे ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे भावी ध्येयधोरण’ या विषयावर मेहेरून्निसा दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली वैचारिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले. प्रा. आय. एन. बेग, एम. ए. नाईक, प्रा. बी. टी. काझी, हुसेन जमादार, शमसुद्दिन तांबोळी, अन्वर

राजन, प्रा. वि. अ. शेख इत्यादी संमेलनात उपस्थित होते.

- २१ ऑगस्ट १९९४ :
  पुणे येथे मेहेरून्निसा दलवाई यांच्या कृष्णकुंज सोसायटी, पुलगेट, पुणे येथील निवासस्थानी कार्यकर्त्यांची बैठक. मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांची चर्चा तसेच राष्ट्रवाद या संकल्पनेविषयी मंडळाची भूमिका मांडण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मेहेरून्निसा दलवाई होत्या.
- १७ जानेवारी २००७ :
  मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली. यात महाराष्ट्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत न्या. राजेंद्र सच्चर समितीने मुस्लीम समाजाच्या विकासासाठी सुचवलेल्या शिफारसी केंद्र सरकारने त्वरित लागू कराव्यात, अशी मागणी मंडळाकडून करण्यात आली, तसेच यासंदर्भात जनजागृती आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाचे सचिव शमसुद्दिन तांबोळी यांनी सांगितले.
- ११ ते १३ जानेवारी २०१४ :
  चिपळूण येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पत्रिकेवर परशुरामाचे छायाचित्र आणि कार्यक्रमस्थळी पुतळा उभारण्याच्या निर्णयास महाराष्ट्रातील पुरोगामी संघटना आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आक्षेप नोंदवला. स्थानिक धर्मवादी मुस्लिमांच्या भूमिकेमुळे मराठी साहित्यिक हमीद दलवाई यांच्या घरापासून निघणारी ग्रंथ दिंडी रद्द करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला. हा दलवाई आणि पुरोगामी विचारांचा अपमान आहे, असे प्रतिपादन करणारे पत्रक मंडळाचे सरचिटणीस शमसुद्दिन तांबोळी यांनी काढले आणि या घटनेचा निषेध व्यक्त केला. ८६व्या साहित्य संमेलनाच्या एका प्रवेशद्वाराला दलवाई यांचे नाव देण्याचे ठरवण्यात आले होते. तोही निर्णय आयोजकांनी रद्द केला. 'इंधन' आणि 'लाट' या ललित साहित्यकृतींना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्याचा पुरस्कार मिळाला आहे. असे असतानाही दलवाईंचा विरोध दु:खद अनाकलनीय असल्याने सत्यशोधक कार्यकर्त्यांनी दलवाई यांची ग्रंथदिंडी त्यांचे जन्मगाव मिरजोळीपासून ते चिपळूणयेथील साहित्य संमेलनाच्या कार्यक्रम स्थळापर्यंत काढली. तेथे ही ग्रंथदिंडी पोहोचताच संमेलनाध्यक्ष डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी दिंडीचे स्वागत केले.
- १९ फेब्रुवारी २०१४ :
  भारतात अस्तित्वात असेलल्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यानुसार मुस्लीम दाम्पत्यांना मूल दत्तक देण्याची तरतूद नाही. यामुळे अनेक वेळा बहुपत्नीत्वाला चालना मिळते. इतर धर्मियांप्रमाणेच मुस्लीम समाजालाही मूल दत्तक घेण्याचा कायदेशीर अधिकार असावा, यासाठी मंडळ आग्रही आहे. मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई आणि अख्तरून्निसा सय्यद यांना मूल होत नाही, म्हणून मूल दत्तक घेण्याची इच्छा होती. त्यानुसार त्यांनी मूल दत्तक घेतले. परंतु यातील कायद्याची अडचण दूर व्हावी यासाठी अख्तरून्निसा सय्यद यांनी सर्वोच्च

न्यायालयात याचिका दाखल केली. ती अनेक वर्षे प्रलंबित राहिली. हा एक प्रकारचा मानवाधिकारावरील संकोच आहे. मुस्लीम समाजासाठी मूल दत्तक घेण्यासंदर्भात ऐच्छिक तरतूद करणारा कायदा अस्तित्वात आला, त्याचे मंडळाने स्वागत केले आहे. यासारख्या अनेक अन्यायकारक तरतुदी दूर करण्यासाठी मंडळ समान नागरी कायद्याची मागणी करते. तसेच समान नागरी कायदा म्हणजे हिंदू कायदा नाही किंवा समान नागरी कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात येत नाही, यासंदर्भात मंडळ लोकशिक्षण करते.

दिल्ली येथील सामाजिक कार्यकर्त्या शबनम हाशमी यांनी २००७मध्ये सर्वोच्च न्यायालयात संविधानाच्या कलम ३२प्रमाणे सर्व धर्मियांना मूल दत्तक घेण्यासंदर्भात अधिकार असावा यासाठी याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयातील न्या. रंजन गोगोई यांनी १९ फेब्रुवारी २०१४मध्ये निवाडा दिला. त्यामध्ये स्पष्ट केले की, मूल दत्तक घेणे हे भारतातील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० (Juvenile Justice (care and protection) act 2000) हे कोणत्याही लिंग, जात, धर्म, वंश इत्यादींना हा कायदा लागू होतो. या निवाड्यामुळे मुलांचे कल्याण आणि सर्वधर्मीय पालकांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार अधोरेखित झाला आणि मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील मूल दत्तक घेण्याच्या मर्यादेवर मार्ग निघाला.

- १४ फेब्रुवारी २०१५ :

  दिल्लीस्थित आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन आणि सहकार्य करणाऱ्या धनक संस्थेच्या 'साहस २०१५' या दिल्ली येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात मंडळाने सहभाग घेतला.

- १ ते ५ एप्रिल २०१५ :

  पंजाबमधील घुमान येथे संत साहित्यिक आणि अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. संत नामदेव यांची कर्मभूमी आणि संतांची पार्श्वभूमी असणाऱ्या या संमेलनात मंडळाने सहभाग घेतला. मंडळाचे अध्यक्ष हुसेन जमादार यांच्या नेतृत्वाखाली श्रीगोंदा येथील संत शेख महंमद यांच्या नावे साहित्य दिंडी घेऊन घुमान संमेलनात भाग घेतला. या वेळी पंजाबमधील अहमदिया पंथाच्या कादियान या गावी जाऊन तेथील अहमदिया मशिदीला भेट देऊन अहमदिया लोकांशी संवाद केला. यात हुसेन जमादार, शमसुद्दिन तांबोळी, मरियम जमादार, प्रा. फ. म. शहाजिंदे इत्यादी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

- २६ ऑगस्ट २०१५ :

  संगीतकार ए. आर. रेहमान आणि चित्रपट निर्माते माजिद माजिदी यांनी बनवलेला 'मुहम्मद–द मेसेंजर ऑफ गॉड' हा चित्रपट मुस्लीम समाजाच्या भावना दुखावणारा असल्याचे सांगून या चित्रपटाच्या विरोधात फतवा काढण्यात आला. या फतव्याचा, तसेच रझा अकॅडेमी आणि हा फतवा काढणारे इमाम मुफ्ती महमुद अख्तर यांचा मंडळाच्या वतीने निषेध करण्यात आला.

- २६ ऑक्टोबर २०१५ :
  मंडळाचे आघाडीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी प्रा. वि. अ. शेख आणि हुसेन जमादार यांना आदरांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले.
- ७ जानेवारी २०१७ :
  महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका)च्या वतीने हमीद दलवाई यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार घोषित करण्यात आला. दलवाई यांच्या कार्याची दाखल घेऊन दोन लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असणारा हा पुरस्कार बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे ज्येष्ठ इतिहास संशोधक रामचंद्र गुहा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार दलवाई यांच्या पत्नी मेहेरून्निसा यांनी स्वीकारला. या पुरस्काराची रक्कम मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटय़ूट या संस्थांना देण्यात आली.
- १० जून २०१७ :
  मंडळाच्या आघाडीच्या कार्यकर्त्या आणि पदाधिकारी मेहेरून्निसा दलवाई यांच्या निधनानिमित्ताने समविचारी संघटनांकडून आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले.
- १८ ऑगस्ट २०१७ :
  बुद्धिप्रामाण्य, सुधारणावादी कार्यकर्ते ताहेरभाई पूनावाला यांच्या निधनानिमित्ताने मंडळासह समविचारी संघटनांतर्फे आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले.
- १० सप्टेंबर २०१७ :
  डॉ. मोरेश्वर व लक्ष्मीबाई आगाशे ट्रस्ट, सातारा यांनी मंडळास रु. ५१,०००/–चा पुरस्कार दिला. याच वेळी पुरस्काराव्यतिरिक्त बेहेरे व भट्ट यांनी मंडळासाठी २५,०००/– रुपयांची देणगी दिली. मंडळास राष्ट्र सेवादलाच्या जागेत कामकाजासाठी देण्यात आलेल्या कार्यालयाचे उद्घाटन सेवादलाचे विश्वस्त डॉ. अभिजीत वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले.
- २५ फेब्रुवारी २०१८ :
  मंडळाला महात्मा प्रा. ह. ना. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने 'फुले सेवाभावी पुरस्कार' जळगाव येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.
- १७ जून २०१८ :
  'हमीद दलवाई : अनसंग ह्युमॅनिस्ट' या हमीद दलवाई यांच्या जीवनकार्यावर आधारित लघुपटाचे सादरीकरण राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पुणे येथे करण्यात आले. यात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.
- २ डिसेंबर २०१८ :
  पुण्यातील शिवाजीनगर भागातील पाटील इस्टेट येथे लागलेल्या आगीमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बाधित कुटुंबीयांना मंडळातर्फे अन्नधान्य आणि अत्यावश्यक वस्तूंची मदत करण्यात आली.
- ९ डिसेंबर २०१८ :
  मंडळाच्या सुवर्णजयंती वर्षानिमित्त आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमांची चर्चा

करण्यासाठी मंडळाच्या समर्थक आणि हितचिंतकांची बैठक एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, पुणे येथे आयोजित करण्यात आली.

- ८ सप्टेंबर २०१९ :
  सांगली, कोल्हापूर परिसरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरस्थितीमुळे अनेक कुटुंबाचे अपरिमित नुकसान झाले. या भागातील अंधबांधवांच्या कुटुंबीयांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटप मंडळाच्या वतीने कोल्हापूर येथील मुख्याध्यापक संघाच्या सभागृहात करण्यात आले.
- २०-२२ ऑक्टोबर २०१९ :
  पोलिस अधिक्षक, बुलढाणा यांनी बुलढाणा जिल्ह्यातील गावांमध्ये आयोजित केलेल्या धार्मिक-सामाजिक सलोखा पंधरवड्यात आठ सभांमध्ये मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी यांनी सहभाग घेतला.
- १७ नोव्हेंबर २०१९ :
  NRC आणि CAA संदर्भात मंडळ आणि समविचारी संघटनांनी विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले.
- २७ जानेवारी २०२० :
  'हम भारत के लोग'तर्फे आयोजित एनआरसी, सीएए आणि एनपीआर या विषयांवर कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिरात मंडळाच्या कार्यकर्त्यांचा सहभाग घेतला.
- ११ मे २०२१ :
  करोना काळात अनेकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागले. हातावर पोट असणाऱ्यांना याचा मोठा फटका बसला. मुस्लीम समाजातील रिक्षा चालकांसह १०० कुटुंबांना ईदच्या निमित्ताने धान्य आणि अत्यावश्यक वस्तूंचे वाटप मुस्लीम सत्यशोधक मंडळ, स्वच्छंद पुणे आणि डायोसीस ऑफ पुणे यांच्या वतीने करण्यात आले. हा कार्यक्रम बिशप हाऊस, पुणे येथे आयोजित करण्यात आला.
- १० एप्रिल २०२२ : मंडळाचे माजी अध्यक्ष मा. सय्यदभाई यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि समविचारी संघटनांच्यावतीने नाथ पै सभागृह, राष्ट्र सेवा दल, पुणे येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

## ३.१२ निवडक कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती

*(या प्रकरणातील माहिती तत्कालीन वर्तमानपत्रांतील बातम्या, सदर, लेख व संपादकीय यांचे संकलन व अभिप्रायावर आधारित आहे.)*

### ३.१२.१. कुटुंब न्यायालयाची मागणी

महिलांविषयक अपघात आणि हुंड्यासारख्या गुन्ह्यांचे खटले चालवण्यासाठी स्वतंत्र कुटुंब न्यायालय अस्तित्वात येणार असल्याचे केंद्र सरकारने घोषित केले. या निर्णयाचे मुस्लीम सत्यशोधक मंडळाने स्वागत करून तत्कालीन केंद्रीय गृह खात्याचे राज्यमंत्री पी. वेंकटसुबैय्या यांना तार करून या न्यायालयाची अधिकार कक्षा वाढवून स्त्रीविषयक इतर गुन्ह्यांचाही समावेश करावा, अशी विनंती केली आहे. कुटुंब न्यायालये धर्मनिरपेक्ष स्वरूपाची असली पाहिजेत ज्यात मुस्लीम महिलांच्या तलाक, पोटगी व बहुपत्नीत्वविषयक याचिकांवर विचार होऊन अशा महिलांना न्यायालयीन संरक्षण व न्याय मिळू शकेल.

*(संचार, २१ जुलै १९८२, महाराष्ट्र हेराल्ड २२ जुलै १९८२)*

कुटुंब न्यायालयाची प्रक्रिया अधिक सुलभ असून समुपदेशक व जलद प्रक्रिया असल्यामुळे सर्वच महिला घटकांसाठी आणि विशेषतः मुस्लीम महिलांसाठी कुटुंब न्यायालयाचा उपयोग होतो. मंडळाच्या असे निदर्शनास आले की, कुटुंब न्यायालयामुळे मुस्लीम महिला न्यायालयात जाण्यास अनुकूल होतात. कुटुंब न्यायालयांची संख्या मर्यादित व शहरी भागांपुरतीच असल्याने अनेक महिलांना या संधीपासून वंचित राहावे लागते. मंडळाने ही बाब महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच ग्वालियरच्या शबानाबानो विरुद्ध इम्रान खान प्रकरणात कुटुंब न्यायालयांमुळेच शबानाबानोस पोटगीचा अधिकार मिळाला. याची नोंद घेऊन मंडळाने शासनाकडे प्रत्येक जिल्ह्यात कुटुंब न्यायालय स्थापन करण्याची विनंतीवजा मागणी केली. त्यास शासनाने अनुकूल प्रतिसाद दिला. आज महाराष्ट्राच्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये असे कुटुंब न्यायालय अस्तित्वात आहेत. मंडळाच्या या मागणीस प्रतिसाद मिळाल्याबद्दल मंडळाने समाधान व्यक्त केले.

### ३.१२.२. मुस्लिमांचाही लोकसंख्येला आळा

या राष्ट्राचा आर्थिक व सामाजिक विकास झपाट्याने व्हावा, असे सर्वांना वाटते, परंतु लोकसंख्यावृद्धीचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर सोडवल्याशिवाय आमचा देश प्रगती करू शकणार नाही, याची सर्वांनी जाणीव ठेवावी, असे उद्गार अमरावती विभागाचे कमिशनर ललित दोशी यांनी यंग मुस्लीम स्पेशल असोसिएशन व मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या वतीने आयोजित




*अमरावती येथील नसबंदी कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन सहकार तथा उद्योग उपमंत्री यशवंत शेरेकर आणि इतर.*

'पुरुष नसबंदी शिबिरा'चे उद्‌घाटन करताना व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुस्लीम समाजाचे वयवृद्‌ध नेते मोहम्मद साबिर यांनी भूषवले होते.

या शिबिरात १०१ पुरुषांच्या नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या, त्यात पंचावन्न मुस्लीम बांधवांचा समावेश आहे. दोशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वजीर पटेल यांच्या कामाबाबत मी पुष्कळ ऐकून होतो, परंतु आज प्रत्यक्ष त्यांच्या कार्याचा अनुभव घेऊन मी धन्य झालो आहे. त्यांच्या या राष्ट्रीयकार्यात मी सर्वतोपरी मदत करीन, असे आश्वासनही याप्रसंगी दोशी यांनी दिले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना मुस्लीम समाजाचे गणमान्य नेते मोहम्मद साबिर म्हणाले की, प्रचंड लोकसंख्यावाढीमुळेच या देशात भ्रष्टाचार वाढला आहे. आपल्या मुलीच्या लग्नात हुंडा देता यावा, आपल्या सर्व मुलांचे उच्चशिक्षण व्हावे व आपले कुटुंब सुखी व्हावे, असे सरकारी नोकरांना वाटत असल्यामुळेच सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. आणि म्हणून लोकसंख्या वृद्‌धीचा प्रश्न सुटल्याशिवाय भ्रष्टाचार थांबणार नाही, असेही मोहम्मद साबिर यांनी प्रतिपादन केले.

शिबिराचे आयोजक वजीर पटेल यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन सांगितले की, कुटुंब कल्याण हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे व तो राबवताना जातपात, धर्म, पंथ याचा विचार न करता सर्वांनी त्यात सहभागी झाले पाहिजे. मुस्लीम समाजाला स्वतःची प्रगती करवून घ्यायची असेल, तर त्याने कटुंब मर्यादित ठेवण्यावर जास्त भर दिला पाहिजे.

२७ ऑगस्ट ते २५ सप्टेंबर, १९८२ पर्यंत तीन शिबिरे आयोजित करून ३२० पुरुषांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यात २०० मुस्लिमांचा समावेश आहे.

*(महाराष्ट्र टाइम्स, ७ ऑक्टोबर १९८२)*

### ३.१२.३. मुस्लिमांतील समता आणि राष्ट्रीय एकात्मता

६ डिसेंबर १९८२ रोजी मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाई यांचे सातारा येथील एकता शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी मंडळाची भूमिका मांडताना ते म्हणाले, "मुस्लीम समाजात जोपर्यंत आंतरिक एकात्मता येत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मता साध्य होणार नाही. या समाजात समतेचा अभाव आहे, एकात्मता येणार कशी? शिखांच्या खलिस्तान मागणीचा उल्लेख करून ते म्हणाले की, अमृतसरला पवित्र शहर म्हणून मान्यता देण्याचा राज्यकर्त्यांचा विचार चुकीचा आहे, कारण देशात अनेक धर्म व त्यांची अनेक शहरांत मोठी धर्मस्थळे आहेत. अशा शहरातील बहुसंख्य असलेले धर्मगट तेथे आपापल्या धार्मिक स्थळास अनुसरून अशाच पवित्र शहराची मागणी करतील व देशात बेदिली माजेल, हे ओळखून राज्यकर्त्यांनी ही मागणी मान्य केली नाही.

हिंदी भाषेचा प्रश्न, प्रांतवाद, काश्मीरचे पुनर्वसन विधेयक, सत्ताधाऱ्यांचे त्यांच्या धर्मानुरूप होणारे भूमिपूजनासारखे समारंभ यावर टीका करून राष्ट्रीय एकात्मतेस बाधक आहेत, असे प्रतिपादन केले. तसेच समान नागरी कायदा राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र शासनाच्या आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातील आक्षेपार्ह वाक्याचा विचार करून एका शब्दासाठी तो संपूर्ण धडा वगळणे, हे शासनाचे धोरण चुकीचे होते. पाठ्यपुस्तकात पैगंबरांच्या संदर्भात उल्लेख करताना 'हिजरत'चा अर्थ 'पलायन' असा केल्यामुळे हा वाद उद्‌भवला होता. त्यावरून धार्मिक वातावरण तापले. 'हिजरत'चा अर्थ 'पलायन' असा नसून 'स्थलांतर' करणे असा होतो. *(सकाळ, ७ डिसेंबर १९८२)*

### ३.१२.४. धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि प्रबोधन संवाद यांच्यावतीने २२ डिसेंबर १९८२ रोजी इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीमध्ये 'मुस्लिमांच्या समस्या-कारणे व उपाय' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‌घाटन मेहेरून्निसा दलवाई यांनी केले. या वेळी त्या म्हणाल्या की, इस्लामच्या सुरुवातीच्या काळात मुस्लीम स्त्रियांना जे अधिकार होते, तेसुद्‌धा आज त्यांना मिळत नाहीत. धर्माच्या नावाने चाललेले महिलांवरील अत्याचार थांबवले पाहिजेत. तलाकच्या बेडीतून मुस्लीम स्त्रियांची सुटका झाली पाहिजे आणि त्यासाठी त्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हुसेन जमादार होते. ते म्हणाले, "आपण आज विज्ञानयुगात वावरत आहोत, मात्र मुस्लीम समाजावर अज्ञानाचा पगडा आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी मुस्लीम नेते समाजाला चुकीच्या मार्गावर नेत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपल्यातील तरुण पिढीने पुढे आले पाहिजे. तसेच मुस्लीम स्त्रियांमध्ये स्वाभिमानाची जाणीव निर्माण करून देणे

आवश्यक आहे."

दुपारच्या सत्रात प्रा. ऐनुल अत्तार, सिराज मुजावर, एम. जी. मुल्ला, बी. आर. मुजावर, श्रीमती आयेशा शेख, बागवान रहीम खलिफा, सेवा दलाचे राम पटवर्धन यांनी विचार मांडले. प्राचार्य ए. डी. अत्तार यांनी पाठवलेले मुस्लिमांच्या शिक्षणासंदर्भातील भाषण चर्चासत्रात वाचून दाखवण्यात आले.

मुस्लीम प्रबोधनाच्या चळवळीची वैचारिक भूमिका स्पष्ट करून 'समान नागरी कायद्या'ची मागणी मुस्लिमांनी करावी, असे जमादारांनी समारोपाच्या वेळी आवाहन केले. उर्दूच्या विकासाला पूर्ण संधी मिळावी, मात्र मुस्लिमांनी उर्दू माध्यमाच्या शाळांचा आग्रह धरू नये, तसेच राजकीय स्वार्थासाठी चुकीची आंदोलने उभी करणाऱ्या नेत्यांमागे मुस्लिमांनी जाऊ नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे लढाऊ नेतृत्व मुस्लीम समाजात निर्माण झाले पाहिजे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गाझिउद्दिन सलाती यांनी आभार मानले. या चर्चासत्रासाठी १००पेक्षा जास्त लोक होते, त्यात सुमारे ३५-४० मुस्लीम महिला होत्या. *(महाराष्ट्र टाइम्स, २२ डिसेंबर १९८२)*

### ३.१२.५. तलाकप्रश्नावर मंडळाचे कार्य

२६ जानेवारी १९८३ रोजी पुणे जिल्ह्यातील तलाकपीडित महिलांचा मेळावा मुस्लीम सत्यशोधक मंडळाने नाना पेठेतील महात्मा फुले हायस्कूल येथे आयोजित केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. कुलसुम पारेख होत्या.

मुस्लीम समाजान प्रबोधन व्हावे, धर्माच्या नावाखाली स्त्रियावर होणारे अन्याय थांबवावे, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ १३ वर्षांपूर्वी स्थापन झाले. गेल्या १३ वर्षांत विविध प्रश्नांवर ठिकठिकाणी अनेक मेळावे, परिषदा, मोर्चे, निदर्शने इ. मार्गाने समाजात जागृती आणण्याचे




***तलाकपीडित महिलांच्या मेळाव्यासाठी जमलेल्या महिला.***

प्रयत्न मंडळातर्फे करण्यात आले. वेळोवेळी शासनाकडे या प्रश्नावर आपली बाजू मंडळ मांडत राहिले आहे. या काळाच्या दरम्यान स्त्रियांना जुबानी तलाक व सवत पद्धती (बहुपत्नीत्व)मुळे होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य मंडळाने नेटाने चालवले आहे. आतापर्यंत त्यासाठी केलेले प्रयत्न खालीलप्रमाणे :

१) ९ एप्रिल १९७० रोजी समान नागरी कायद्याची मागणी करणारे पाचशे मुस्लिमांच्या सह्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना देण्यात आले.

२) २८–२९ नोव्हेंबर १९७० रोजी पुण्यात मुस्लीम महिलांची सामाजिक समता परिषद भरवण्यात आली. तिला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

३) ६ जून १९७१ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल नवाब अलीयावर जंग यांना मुस्लीम जातीयवादी संघटनाविरुद्ध उपाययोजना करण्याविषयी निवेदन देण्यात आले.

४) ४–५ डिसेंबर १९७१ रोजी दिल्लीत 'ऑल इंडिया फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम कॉन्फरन्स'चे आयोजन करण्यात आले.

५) २६–२७ डिसेंबर १९७१ जगातील पहिली पुरोगामी मुस्लीम महिला परिषद झाली.

६) ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटी, मुंबई येथे भरलेल्या कॉन्फरन्सच्या विरुद्ध हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली जाहीर निदर्शने करण्यात आली.

७) २५ मार्च १९७३ रोजी मुंबईत मुस्लीम सामाजिक परिषद घेण्यात आली.

८) डिसेंबर ७३मध्ये कोल्हापूर येथे मंडळातर्फे शैक्षणिक परिषद आयोजित करण्यात आली. त्यात मुस्लिमांनी आपल्या आर्थिक प्रगतीकरिता प्रादेशिक भाषेत शिक्षण घ्यावे. उर्दू माध्यमाचा आग्रह धरू नये, असे सुचवण्यात आले. तसेच 'कुराण' व इतर धार्मिक साहित्य प्रादेशिक भाषेत उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करावेत, असे सुचवण्यात आले.

९) १९७५ सालात कोल्हापूर येथे तलाकपीडित महिला परिषद घेण्यात आली. १९७६–७७मध्ये




***तलाकपीडित महिलांच्या मागण्यांसाठी काढलेला मोर्चा.***

महाराष्ट्रात तलाकपीडित महिला परिषद घेण्यात आली.

वरील प्रयत्नांमुळे पहिले यश मंडळाला १९७८मध्ये मिळाले आणि तलाकपीडित महिलेला पोटगी देण्याचे पतीवर बंधनकारक असण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. कृष्णा अय्यर यांनी दिला. याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे व त्या आधारे न्यायालयात तलाकपीडित महिलेला न्याय मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य मंडळाने हाती घेतले. जून १९७८मध्ये पुण्यात 'मुस्लीम महिला मदत केंद्र' सुरू करण्यात आले. या केंद्राला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने महाराष्ट्रात इतर जिल्ह्यातदेखील असे केंद्र सुरू करण्यात आले. या केंद्रात बेबनाव झालेल्या पती-पत्नीमध्ये समझोता करण्याचा प्रयत्न केला जातो. (पुण्याच्या केंद्रामार्फत अनेक प्रकरणात यशस्वी मध्यस्थी करून समझोता घडवून आणण्यात आला!) ज्या प्रकरणात समझोता शक्य होत नाही, त्यात स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व प्रकारची कायदेशीर मदत देण्यात येते. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या तलाकपीडित स्त्रियांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

अर्थात पोटगीचा निर्णय झाल्याने सर्व प्रश्न सुटले असे होत नाही. अजूनही जुबानी तलाकचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही. बहुपत्नीत्वाची परवानगी असल्याने पहिल्या बायकोला तलाक न देता माहेरी पाठवणे व दुसरे विवाह करणे, याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यावर प्रभावी उपाय योजल्याशिवाय हे प्रकार थांबणार नाहीत, असे मंडळाला वाटते.

या प्रश्नावर सर्वांगीण विचारविनिमय करण्यासाठी तलाकपीडित व मुस्लीम स्त्रियांचा मेळावा पुण्यात घेण्यात आला. मुस्लीम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटीला यापेक्षा अधिक प्रभावी दुसरे उत्तर असू शकत नाही. *(सकाळ, २६ जानेवारी १९८३)*

याप्रमाणे बुधवार दिनांक २६ जानेवारी १९८३ रोजी मुस्लीम समाजातील तोंडी तलाक पद्धत बंद करून न्यायालयामार्फत तलाक मिळावा, तसेच चार विवाहाची सवलत रद्द करावी, असे



***तलाकबंदीसाठी केलेले धरणे. छायाचित्रात सय्यदभाई, दलवाईभाभी, जमादार आणि प्रा. तांबोळी.***

ठराव तलाकपीडित महिलांच्या मेळाव्यात संमत झाले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने प्रजासत्ताकदिनी फुले हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या मेळाव्यात हे ठराव संमत करण्यात आले. अध्यक्षस्थानी नझमा शेख होत्या. मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी हे ठराव मांडले. त्यामध्ये म्हटले आहे की, तलाकपीडित महिलांच्या मुलामुलींना शासनाने मोफत शिक्षण द्यावे व अग्रक्रमाने रोजगार उपलब्ध करून द्यावा. तोंडी तलाकच्या विरोधीत सामाजिक संघर्षासाठी मुस्लिमांनी कृती समिती निर्माण कराव्यात. सवतबंदी कायदा करावा. तसेच तलाकपीडित महिलांना मिळणाऱ्या पोटगीविरोधी संसदेमध्ये सादर केलेल्या खासगी विधेयकाबद्दल संबंधितांचा निषेध करण्यात आला.

भारतीय मुस्लीम हे 'शरीयत' कायद्यातील सवलतींचा गैरफायदा घेत आाहेत. त्यासाठी प्रचलित तोंडी तलाक कायद्यामध्ये महिलांना अनुकूल सुधारणा करावी, अशी मागणी नझमा शेख यांनी अध्यक्षीय भाषणांत केली. समाज बदलण्यासाठी 'कुराण'मध्ये बदल करण्याची गरज नाही, असे स्पष्ट करून शेख पुढे म्हणाल्या की, मुस्लिमांच्या वैवाहिक जीवनातील मतभेदांची चौकशी करण्यासाठी इस्लामी राष्ट्रांप्रमाणेच कायदा मंडळ अथवा सामाजिक न्यायालय स्थापन करावीत.

विधि महाविद्यालयाचे प्राचार्य सत्यरंजन साठे : शरीयत कायद्यामध्ये महिलांना अनुकूल अशी तरतूद करावी व समान नागरी कायदा निर्माण करावा. हिंदू व मुस्लीम महिलांची सामाजिक अवस्था समान आहे. त्यासाठी सर्वच धर्मियांनी महिला दास्यमुक्ति चळवळ हाती घेऊन महिलांना समान न्याय हक्क व अधिकार मिळून द्यावेत.

रत्नाकर महाजन : कालबाह्य 'शरीयत' कायद्यामध्ये त्वरित कायदेशीर दुरुस्ती करावी व समान नागरी कायदा निर्माण करावा.

या सभेत 'स्त्री' मासिकाच्या संपादिका श्रीमती विद्या बाळ, ॲड. बाळासाहेब सुपेकर



*तलाकमुक्ती मोर्चात हुसेन जमादार आणि मेहेरून्निसा दलवाई.*

यांचीही भाषण झाली.

तोंडी तलाकच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयांत लवकरच फिर्याद दाखल करण्यात येईल, तसेच बेकायदेशीररीत्या दुसरा विवाह करणाऱ्या व्यक्तीस घेराओ करण्याचा इशारा सय्यदभाईंनी समारोपाच्या भाषणात दिला. बेकायदेशीररीत्या विवाह करणाऱ्या मुस्लिमांच्या विवाह समारंभात संघटितरित्या निदर्शने व विरोध करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी शहनाझबानू, फरीदाबी, मासुमबी, मेहेरून्निसाबी, मीना इनामदार, शहनाझ बंदानवाज आदि तलाकपीडित महिला तसेच याकुबभाई दारूवाले, बाबुभाई, शमशुद्दिन तांबोळी यांनी अन्यायकारक तोंडी तलाक पद्धतीचा निषेध केला. महिलांनी त्याच्यावरील अन्यायाची माहिती दिली. अन्वर राजन यांनी आभार मानले. या मेळाव्यासाठी अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील तलाकपीडित महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. *(केसरी, २८ जानेवारी १९८३)*

प्रजासत्ताकदिनी आयोजित करण्यात आलेल्या या तलाकपीडित महिलांच्या मेळाव्यात काही तलाकचा समर्थन करणाऱ्या मुस्लीम पुरुषांनी गोंधळ माजवण्याचा प्रयत्न केला. परंतु या मेळाव्यासाठी आलेल्या जवळपास २५० तलाकपीडित महिलांनी या सनातनी पुरुषांवर प्रश्नांची एवढी सरबत्ती केली की, त्यांना माघार घ्यावी लागली. या मेळाव्यातील महिला आपल्या व्यथा सांगताना भावनाविवश झाल्यामुळे त्यांना बोलणेही कठीण झाले होते.

या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी मंडळाच्या पुढाकारातून 'सामाजिक कृती समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिली पत्नी असताना दुसरे लग्न करू पाहणाऱ्या नवऱ्यांवर समाजाकडून दडपण आणण्याचे काम ही सामाजिक कृती समिती करील. तलाक, बहुपत्नीत्वावर बंदी आणण्याची एकमुखी मागणी करतानाच तलाकपीडित महिलांच्या मुलांचे विनामूल्य शिक्षण आणि रोजगार हमी याची जबाबदारी शासनाने घ्यावी, असे आवाहन दुसऱ्या एका ठरावाद्वारे तलाकपीडित महिलांना मिळणाऱ्या पोटगी विरुद्ध ओरड करणाऱ्या सनातनी मंडळींचा निषेधही करण्यात आला.

मंडळाच्या वतीने चालवण्यात येत असलेल्या महिला मदत केंद्रात आलेले तलाकची प्रकरणे विनामोबदला चालवणारे ॲड. बाळासाहेब सुपेकर व त्यांच्या सहकाऱ्यांचा मेळाव्यात सत्कार करण्यात आला. *(जानेवारी १९८३)*

### ३.१२.६. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे शिबिर

४-५ जून १९८३ रोजी पुण्यातील गुलटेकडी भागात हमाल भवन येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांचे राज्यपातळीवरील अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्या हस्ते झाले. यात चार विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात आले. 'मुस्लीम कायद्यातील सुधारणा' या परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. सत्यरंजन साठे आणि वक्ते शेख अब्दुल, एम. ए. शेख आणि नूरजहाँ शेख होत्या.

‘स्त्रीमुक्ती’वरील परिसंवादात अध्यक्ष प्रा. कुलसुम पारेख आणि वक्ते प्रा. मुमताज रहिमतपुरे, मेहेरून्निसा दलवाई, रजिया पटेल, नजमा बांगी, जया सागडे, निलम गोऱ्हे आणि विद्या बाळ सहभागी झाल्या होत्या. ‘जातीय दंगली : कारणे व उपाय’ या विषयावर डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. यात वजीर पटेल, रत्नाकर महाजन, अलिम वकील हे वक्ते होते. ५ जून रोजी ‘समाजप्रबोधन’ या विषयावर स्वातंत्र्यसैनिक विनायकराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. यात असगर अली इंजिनिअर, विलायत शेख, अब्बास खान, वजीर पटेल, हे वक्ते होते. शिबिराचा समारोप ज्येष्ठ विचारवंत नानासाहेब गोरे यांच्या हस्ते झाला.

शिबिरानंतर सायंकाळी आत्रे सभागृहात जाहीर सभा झाली. यामध्ये कुटुंब नियोजनाबद्दल जनजागृती करून नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल आणि जातीवादी गुंडांनी प्राणघातक हल्ला केल्यानंतरही कुटुंब कल्याणाच्या चळवळीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने मोहीम चालवणारे ‘बागबान’ या उर्दू साप्ताहिकाचे अमरावतीचे वजीर पटेल आणि मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले यांचा सत्कार अभ्यासक व सनदी अधिकारी मा. वसंत नगरकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी ‘समाज प्रबोधनाची दिशा’ या विषयावर प्रा. गं. बा. सरदार यांचे व्याख्यानही झाले. शिबिरामध्ये मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले, सय्यदभाई, ताहेर पूनावाला आणि इतर कार्यकर्त्यांनी विचार मांडले.

उद्घाटन प्रसंगी एस. एम. जोशी म्हणाले की, केवळ ‘समान नागरी कायदा’ करून मुस्लिमांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. या दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतलेले समाजप्रबोधनाचे कार्य अभिनंदनीय आहे. प्रत्येक धर्म हा परिवर्तनवादी असला पाहिजे, असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, धर्मस्थापनेच्या मौलिक तत्त्वाचा पुढे विसर




***बौद्धिक शिबिरात बोलताना प्रा. वि. अ. शेख, बाबुमियाँ बँडवाले, विनायकराव कुलकर्णी आणि वजीर पटेल.***

पडतो. धर्म म्हणजे सर्वसामान्यांना न्याय देणारे तत्त्वज्ञान होय. महंमद पैगंबरांनी प्रारंभीच्या काळात महिलांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. आज त्यांचे अनुयायी इस्लामच्या मूळ तत्त्वज्ञानापासून भरकटले आहे. त्यामुळे मुस्लीम महिलांवर अन्याय होत आहे. दलित वर्गाने हिंदू धर्मातील 'मनुस्मृती' जाळली, परंतु महिलांनी ही 'मनुस्मृती' का जाळली नाही, याचे आश्‍चर्य वाटते. 'हिंदू कोड बिला'मुळे महिलांना काही हक्क मिळाले, परंतु त्याची अंमलबजावणी होते का? असा प्रश्न उपस्थित करून एस. एम. जोशी म्हणाले, आज सर्वच लोक धर्माचा वापर सत्ता टिकवण्यासाठी करत आहेत. धर्माच्या नावावर अधर्म बोकाळला आहे. धर्मामध्ये राजसत्तेला स्थान आहे. परंतु सर्व राजसत्ता म्हणजे धर्म नव्हे. राजसत्तेकडे माणसे ओढली जात आहेत, त्यामुळे परिस्थिती अधिक बिघडली आहे. धर्माचरण हे सोयीप्रमाणे चालू आहे. यासाठी धर्माच्या नावावर चालू असलेला हेकटपणा थांबवण्याची गरज आहे.

कोणत्याही भारतीय नागरिकाला अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. धर्माच्या नावावर हा अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न झाल्यास समाजातील जाणकार लोकांनीच त्या विरोधात संघटितरित्या संघर्ष करण्याची गरज आहे, असे डॉ. बाबा आढाव यांनी सांगितले. पुढे ते असे म्हणाले, यासंदर्भात केवळ हिंदू वा मुस्लीम अशी चर्चा करू नये, कारण हिंदू धर्मातही जातीरिवाजाप्रमाणे पहिल्या पत्नीस सोडचिठ्ठी देऊन दुसरा विवाह करण्यात येतो. विधानसभेतील दोन आमदारांनी नुकतेच अशा प्रकारचे विवाह केले आहेत. त्यापैकी एक पुणे जिल्ह्यातील आहे. समाज व्यवस्था बिघडली आहे. या परिस्थितीमध्ये महिलांना कायद्याचा अधिकार दिल्यास नवऱ्याच्या बेबंदशाहीस पायबंद बसेल. केवळ कायद्यामुळे महिलांना संरक्षण भेटण्याची खात्री नाही, यासाठी जाणकार कार्यकर्त्यांनी संघर्ष करण्याची गरज आहे, असे बाबा आढाव यांनी स्पष्ट केले.

तसेच ते म्हणाले, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर स्वातंत्र्याची उभारणी करण्याऐवजी




*शिबिरात मार्गदर्शन करताना विनायकराव कुलकर्णी.*

त्यांचा बळी देऊन आज राजकारण केले जाते. राजकारणाच्या सोयीसाठी आज सर्वधर्म समभावाची भाषा बोलली जाते, ते योग्य नव्हे. राष्ट्रवादाची उभारणी धर्मातीत पायावरच झाली पाहिजे.

बौद्ध आणि मुस्लीम महिलांवरील अन्यायाची माहितीही सत्यरंजन साठेंनी दिली. कोणताही कायदा परिवर्तनीय आहे. 'कुराण' व 'बायबल'मधील कायदे मानवनिर्मित असल्यामुळे त्यामध्ये कालानुरूप बदल, सुधारणा अपरिहार्य असल्याचे डॉ. सत्यरंजन साठे म्हणाले. 'आमचा धर्म असा आहे, त्यामध्ये बदल करू नका' असे सांगणे म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वाला विरोध करणे होय. राज्यकर्ते हे निवडणुकीतील मतदानाच्या मागे असल्यामुळे कायद्यामध्ये बदल करण्यास उत्सुक नसतात, असेही प्रा. साठे यांनी स्पष्ट केले.

वजीर पटेल आणि बाबुमियाँ बँडवाले यांच्या सत्कार प्रसंगी प्रा. गं. बा. सरदार म्हणाले की, समाजपरिवर्तनाचे काम राजकीय पक्षांच्या कार्याला पूरक आहे. तेव्हा परिवर्तनवादी शक्तींना त्यांनी सतत पाठिंबा व संरक्षण दिले पाहिजे. प्रबोधन म्हणजे केवळ ज्ञानाचा प्रसार नव्हे, तर कार्यकर्त्यांना व्यापक दृष्टी मिळणे. समग्र क्रांतीशिवाय कोणताही प्रश्न सुटू शकत नाही. एकेक प्रश्न घेऊन संघर्ष केल्याशिवाय क्रांती होत नाही. छोट्या छोट्या क्षेत्रांत व्यापक दृष्टीने काम करणेही महत्त्वाचे आहे, कारण त्यातूनच मोठी कामे उभी राहणार. परिवर्तनवादी शक्तीत फूट पाडण्याचा प्रयत्न स्थितीवादी नेहमी करणारच! त्यांना धैर्याने तोंड दिले पाहिजे.

शोषित मुस्लिमांत जाऊन काम करणे महत्त्वाचे आहे, असे निवृत्त पोलीस महानिरीक्षक वसंतराव नगरकर यांनी अध्यक्षपदावरून बोलताना सांगितले. हा सत्कार समारंभ चालू असताना अल्-फताह आणि भारतीय मुस्लीम सेवा संघ या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सभा उधळून लावण्याच्या उद्देशाने मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या विरुद्ध घोषणा देऊन सभागृहाबाहेर सुमारे अर्धा तास निदर्शने केली. पोलिसांनी या प्रकरणी ४४ जणांना ताब्यात घेऊन नंतर सोडून दिले. *(सकाळ, ३ जून १९८३), (केसरी, ५ जून व ६ जून १९८३)*

### ३.१२.७. श्रीगोंदा येथील मंडळाचे शिबिर

श्रीगोंदा या २५-३० हजार लोकसंख्या असलेल्या गावात मुस्लिमांचे प्रमाण जवळ-जवळ ३५-४० टक्के एवढे आहे. म्हणजे जवळ- जवळ १०,००० मुस्लीम या गावात आहेत. ते शेतकरी,छोटे व्यवसाय, हमाली करणारे व टांगे चालवणारे आहेत. पूर्वीपासून या गावात तबलिगचा प्रभाव, पण मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाल्यापासून या नवीन विचारांचे स्वागत करणारी मंडळीदेखील या गावी आहेत.

या गावात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शाखेने २० नोव्हेंबर रोजी एक चर्चासत्र आयोजित केले होते. महादजी शिंदे शाळेत भरलेल्या या चर्चासत्राच्या पहिल्या सत्राची सुरुवात श्रीगोंद्यातील सत्यशोधकांचे तरुण कार्यकर्ते समीर मणियार यांच्या स्वागतपर व प्रास्ताविकाच्या भाषणाने झाली. त्यानंतर मंडळाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस सय्यदभाईंनी संघटनेची भूमिका, केलेले कार्य,

आलेल्या अडचणी व मिळालेला प्रतिसाद याची माहिती दिली.

१९७०पासून आजपर्यंत भरलेल्या मुस्लीम महिला मेळावे, शैक्षणिक परिषद, तलाकपीडित महिला परिषद, दिल्लीला भरविण्यात आलेली प्रगतिशील मुस्लीम कॉन्फरन्सची सविस्तर माहिती त्यांनी भाषणात दिली. तसेच कोणाच्याही दडपणाला न भिता व सहानुभूतीचा दृष्टीकोन कायम ठेवून केलेल्या कामामुळे सर्वसामान्य मुस्लिमांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. अनेक विरोधक कालांतराने मंडळाचे हितचिंतक बनले. पुणे-मुंबई या शहरात ज्या भागात हिंडणे अवघड, तिथे मंडळाच्या बैठकी होऊ लागल्या, हे त्यांनी लोकांच्या लक्षात आणून दिले.

दुसरे यश म्हणजे पूर्वी तलाक झालेल्या महिलांना पोटगी मिळण्याची तरतूद नव्हती, पण या चळवळीमुळे न्यायालयाने फौजदारी कायद्यातील कलम १२५ खाली तलाक झालेल्या मुस्लीम महिलांना पोटगीचा हक्क दिला. त्या आधारे इथे अनेक महिलांना न्याय मिळवून देण्याचे कार्य चालू आहे. तसेच मंडळाच्या कोल्हापूर, फलटण, मुंबई, अमरावती व इतर केंद्रात चालू असलेल्या कार्याची माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली.

नंतर इस्माईल युसुफ कॉलेज (मुंबई)च्या माजी प्राचार्या कुलसुम पारेख यांनी शैक्षणिक प्रश्नाबद्दल आपले विचार मांडले. पारेख इतिहासाच्या प्राध्यापिका असल्यामुळे त्यांच्या भाषणात अनेक नवीन मुद्दे होते. विशेषतः पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत धार्मिक संस्थांद्वारा दिले जाणारे शिक्षण व त्यातला अभ्यासक्रम याची त्यांनी अभ्यासपूर्ण माहिती दिली. मुस्लिमांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणात कुराणाच्या अभ्यासावर भर असे म्हणून मुस्लिमांत धर्म सोडून इतर बाबींकडे दुर्लक्ष झाले. त्यानंतर इंग्रजांच्या काळातदेखील मुस्लिमांनी इंग्रजी शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. त्याचे परिणाम आजच्या मुस्लीम पिढीला भोगावे लागत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

आजच्या शिक्षण पद्धतीत अनेक दोष आहेत. सामाजिक जाणीव निर्माण करण्याची क्षमता आजच्या शिक्षणात नाही, हे विचार सांगितल्यानंतर त्यांनी एक महत्त्वाची सूचना मांडली. ती अशी- आजच्या शिक्षणात सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास असणारा एक विषय असावा. विभाजनानंतर मुस्लिमांत काही लोकांच्या गैरवर्तणुकीने, देशाबाहेर असलेल्या निष्ठेमुळे आणि अलगतावाद जोपासण्याच्या वृत्तीमुळे मुस्लिमांबद्दल इतर समाजात विश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकलेले नाही. त्यामुळे नोकऱ्या मिळवणे व इतर बाबतीत मुस्लिमांना त्रास सहन करावा लागतो, म्हणून असल्या लोकांच्या प्रभावातून समाज मुक्त करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विसाव्या शतकाच्या अखेरीसदेखील मुस्लीम स्त्रियांना सिनेमाबंदी करण्याच्या प्रयत्नातून स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन मुस्लीम समाजामध्ये अजूनही बदललेला नाही, हे यावरून सिद्ध झाले होते असे स्त्रियांच्या प्रश्नावर बोलताना अन्वर राजन यांनी सांगितले. हा प्रश्न फक्त सिनेमाबंदी पुरताच मर्यादित नसून मुस्लीम स्त्रियांना मशिदीतदेखील पुरुषांच्या बरोबरीने नमाज पढण्याचा हक्क दिला जात नाही. मुस्लीम स्त्रियांना सामाजिक जीवनात एकत्र येण्याच्या प्रसंगच येत नाही, असे ते म्हणाले.

मुलींच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले जाते. उर्दू शाळेत हल्ली काही शहरात मुलांपेक्षा मुलींचे

प्रमाण वाढले आहे. त्याचे खरे कारण मुस्लीम पालक आपल्या मुलांना मराठी किंवा इंग्रजी शाळेत पाठवतात, पण आपल्या मुलींना मात्र उर्दू शाळेतच पाठवण्याचा आग्रह धरतात हे आहे. त्या शिवाय मुलींचे लहान वयात लग्न करणे, हिंदू समाजाकडून हुंडा पद्धती शिकल्यामुळे त्याचेही बळी मुस्लीम समाजात पडतात. एवढे होऊनही एकतर्फी तलाक व सवतीची लटकती तलवार डोक्यावर कायमची अशा अवस्थेत मुस्लीम स्त्री मानसिकदृष्ट्या पूर्णतः विकसित होऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

ज्या समाजाचा निम्मा भाग अपंग (मानसिकदृष्ट्या अविकसित) असतो, तो समाज प्रगती कशी करेल, असा प्रश्न त्यांनी जमलेल्या लोकांपुढे उभा करून मुस्लिमांनी स्त्रियांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलावा, असे आवाहन केले.

त्यानंतर इचलकरंजीचे डॉ. मुजावर यांनी आपले अनुभव सांगितले. गावातले मुल्ला-मौलवी आपल्याला बोलावतात आणि गाय गवत खाते व मानव जातीसाठी दूध देते; हा कसा चमत्कार आहे म्हणून तुम्ही अल्लावर विश्वास ठेवा  असे शिकवण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक वैद्यकीय शास्त्रात याचे खुलासे व माहिती सविस्तर दिलेली आहे. तेव्हा बदलत्या काळात वैज्ञानिक दृष्टीकोन घेतल्याशिवाय समाजाची प्रगती होणे शक्य नाही, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या घरातले अनुभव ऐकल्यावर असे लक्षात आले की, बुरखा पद्धती रद्द करण्यात घरातल्या पुरुष मंडळींनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे.

शेवटी श्रीगोंदा ग्रामपंचायतीचे सदस्य  मुरलीअण्णा होनराव यांनी हिंदू-मुस्लिमांनी एकत्र येऊन देशाच्या प्रगतीसाठी कार्य करावे, विचारांची देवाणघेवाण करावी, असे आवाहन केले.

दुपारच्या सत्रात मंडळाचे सरचिटणीस सय्यद भाई यांनी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटी व त्याचे परिणाम यांची सविस्तर माहिती दिली. तसेच एकतर्फी तलाक देण्याच्या पद्धतीवर बंदी घालण्यात यावी, सवतबंदी (द्विभार्या प्रतिबंधक कायदा) करण्यात यावी. तलाकच्या प्रकरणात आताच्या कायद्याप्रमाणे ७ वर्षे वयानंतर मुलांवर पित्याचा हक्क असतो, तो रद्द करून संतानाच्या हक्काबाबत आईला प्राधान्य देण्यात यावे. दत्तक घेण्यास कायदेशीर मान्यता द्यावी व बालविवाह प्रतिबंधक कायदा मुस्लिमांना लागू करावा, अशी मागणी केली.

त्यानंतर श्रीगोंद्यातील एक शिक्षक जनाब शेख यांनी आपल्या भाषणात समाजातले धार्मिक नेते, मुल्ला मौलवी व हाफिज समाजाला गैरमार्गावर नेत आहेत, अंधारात ठेवत आहेत. लोकांनी त्यांच्यापासून सावध राहावे, असे आवाहन केले.

श्रीगोंद्याचे प्रा. कांबळे यांनी मुस्लीम समाजात चाललेल्या सुधारणेच्या चळवळीला पाठिंबा देणारे व शुभेच्छा देणारे विचार मांडले. या सत्रात उपस्थित श्रोत्यांपैकी अनेकांनी वेगवेगळे प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे अन्वर राजन, सय्यदभाई, कुलसुम पारेख यांनी दिली.

समारोपाच्या भाषणात मंडळाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष व स्वातंत्र्यसैनिक तसेच श्रीगोंद्यातील ज्येष्ठ नागरिक बाबुमियाँ बँडवाले यांनी हमीद दलवाईंचा गौरव करताना सांगितले की, मुस्लिमांच्या इतिहासात स्त्रियांचे प्रश्नासाठी संघटना तयार करून चळवळ उभी करणारे हमीद दलवाई हे पहिलेच आहेत. आता जरी लोकांना त्यांचे विचार पटत नसले, तरी काही वर्षांनी

त्यांच्याच विचाराचा स्वीकार मुस्लीम समाज करणार आहे.

या चर्चेला सुमारे १२५ लोक उपस्थित होते. त्यात १८ मुस्लीम स्त्रिया होत्या. *(सकाळ, ७ डिसेंबर १९८३)*

### ३.१२.८. सामाजिक परिषद

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने १ व २ मे १९८५ रोजी परिषद आयोजित केली. यात प्रागतिक आणि सुधारणावादी मुस्लीम आपल्या समाजातील व्यक्तिगत कायद्यातून समर्थन मिळालेली तोंडी तलाक आणि बहुपत्नीत्वाच्या विषयावर परिषदेत चर्चा करण्यात आली. गोवा येथील महिला कार्यकर्त्या रशिदा मुजावर यांनी परिषदेचे उद्घाटन केले. जवळपास ५०० प्रतिनिधी असलेल्या या परिषदेत डॉ. सत्यरंजन साठे यांच्या अध्यक्षतेखाली समान नागरी कायद्यावर परिसंवादही झाला. मुस्लीम महिलांचे आरोग्य, शिक्षण, पडदा, सिनेमाबंदी आणि इतर सामाजिक समस्यांवर प्रा. कुलसुम पारेख यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. परिषदेत रजिया पटेल, शहनाज राजन, मुमताज इनामदार, मेहेरून्निसा दलवाई, मुमताज रहिमतपुरे, जे. एम. वाघमारे, अन्वर राजन, डॉ. बाबा आढाव, हुसेन जमादार, अलीम वकील, वि. अ. शेख, सय्यदभाई, नानासाहेब गोरे आणि बाबुमियाँ बँडवाले यांनी या परिषदेत विचार मांडले.

या परिषदेत मांडण्यात आलेला संक्षिप्त वृत्तांत पुढीलप्रमाणे –

समारोपप्रसंगी नानासाहेब गोरे म्हणाले, केवळ मुस्लीमच नव्हे तर सर्वच धर्मात सत्यशोधनाची आवश्यकता आहे. पण धर्माचे अवडंबर माजले आहे आणि मूळ धर्म बाजूला राहिला आहे. हल्लीच्या विज्ञान युगात बदलाचे दोन मार्ग आहेत. त्यातील पहिला म्हणजे सरकारने बडगा हाती घेऊन निर्णय लादणे आणि दुसरा म्हणजे समाजानेच काळाची पावले ओळखून बदलणे. आपल्या देशात केवळ मुस्लीम समाजच नाही, तर संपूर्ण समाजच बदलण्याची आवश्यकता आहे. सर्व समाजात पुरुष काहीही करायला मोकळे असतात. धर्म सांभाळण्याची जबाबदारी मात्र स्त्रियांची असते. पूर्वीच्या इतिहासाचे अवास्तव अभिमान बाळगण्यापेक्षा आधुनिक दृष्टीने सगळ्या घटनांकडे पाहायला हवे. तसेच विज्ञान माणसाळायला हवे, नाहीतर ते पिसाटासारखे वागते. इराण–इराक यांच्यामध्ये असलेले झालेले युद्ध त्याचेच एक निदर्शक आहे. शेवटी त्यांनी तरुणांनी ही नवे आव्हाने स्वीकारावीत, असे आवाहन केले आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

सामाजिक परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ‘समान नागरी कायदा’ या विषयावर परिसंवाद झाला. ‘हिंदू कोड बिल’प्रमाणे ‘समान नागरी कायद्या’लाही विरोध झाला आहे, होईल; पण राष्ट्राच्या सामाजिक एकात्मतेसाठी समान नागरी कायदा हवा, असे मत लातूरचे प्रा. जनार्दन वाघमारे यांनी मांडले.

‘प्रबोधन, सनदशीर मार्ग, संघर्षाचे मार्ग सर्वांचा अवलंब करून ‘समान नागरी कायदा’ आणायला हवा. कोणतेही राजकीय पक्ष याबाबत ठाम भूमिका घेत नाहीत, म्हणून ही भूमिका

दबाव गटांनीच निभवायची आहे', असे पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. सत्यरंजन साठे यांनी या परिसंवादाचे अध्यक्षपदावरून सांगितले.

कोणत्याही धर्माचा सर्वसामान्य माणूस हा धर्मवादी नाही, पण काही धार्मिक संघटनांकडून त्यांच्या भावना भडकवल्या जातात. सरकारचाही जातीय दंगे घडवून आणण्यात पुढाकार असतो, हे काम सूचकतेने केले जाते. अशा वेळी सर्वसामान्यांनी संघटित होऊन, एकमेकांशी प्रेमाने वागायला हवे. संवाद साधण्याचे निरनिराळे मार्ग शोधायला हवेत असे विचार डॉ. बाबा आढाव यांनी जातीय दंगली व उपाय' या परिसंवादाचा समारोप करताना मांडले.

प्रा. केशवराव जाधव यांनी हैदराबादच्या जातीय दंगलींची सविस्तर माहिती सांगून आपल्याकडील राजनीति यास कारणीभूत आहे, असे मत व्यक्त केले. ग्रामीण भागात हिंदू-मुसलमान यांच्यात द्वेषाचे वातावरण नाही, असे मी स्वतः पाहिले आहे. आज जे जातीयवादाचे वर्चस्व वाढले आहे, ते बघता माणुसकी हा एकच धर्म सर्वांना पाळायला लावून प्रत्येक खाजगी धर्म घरातच राहायला हवा, असे मत प्रा. वि. अ. शेख यांनी 'ग्रामीण भागातील जातीयवाद' या विषयावर बोलताना मांडले.

या परिषदेत काही ठराव मांडण्यात आले. शासनाने तोंडी एकतर्फे तलाकवर बंदी घालावी, द्विभार्या प्रतिबंधक कायदा त्वरित लागू करावा, त्वरित समान नागरी कायदा करावा, दत्तक विधान कायदा मुस्लिमांनाही लागू करावा. या मागण्या करण्यात मुस्लीम महिलांचाही सहभाग होता. पोटगीचा हक्क कायम करणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नुकताच दिला. परिषदेने या निर्णयाचे स्वागत केलेले आहे. शासनाच्या कुटुंब नियोजनाच्या कार्यास मुस्लीम समाजाने प्रतिसाद द्यावा. त्यामुळे त्यांचे दारिद्र्य दूर होऊ शकेल आणि समाजाची पर्यायाने देशाची प्रगती होईल, असेही आवाहन एका ठरावात करण्यात आले.

मिरज, धुळे, जळगाव, दिल्ली, बिहार अशा अनेक ठिकाणांहून जवळजवळ २०० प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते. *(सकाळ, ३ मे १९८५)*

## ३.१२.९. फलटण येथे महिलांच्या प्रश्नांवर परिसंवाद

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शाखा विविध ठिकाणी निर्माण होऊन मुस्लीम महिलांचे प्रश्न घेऊन त्या ठिकाणी कार्य केले जात होते. फलटण येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. त्याच्या अध्यक्षस्थानी बशीरभाई तांबोळी होते. फलटण येथे १० नोव्हेंबर १९८५ रोजी महिलांच्या प्रश्नांवर परिसंवाद आयोजित केला होता. या प्रसंगी सय्यदभाई म्हणाले की, तलाक ही मुस्लीम समाजास लागलेली कीड आहे. ती आपण नष्ट केलीच पाहिजे. मुस्लीम स्त्रियांना लागलेला हा कलंक असून, तो मंडळाच्या वतीने पुसण्याचा प्रयत्न होत आहे. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी दिलीपसिंह भोसले होते.

मुधोजी महाविद्यालयात शिपायाची नोकरी करत शिक्षण घेऊन एम. ए. ची पदवी संपादन करून त्याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करणारे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे

कार्यकर्ते प्रा. अमिन मोदी यांचा सत्कार नगरसेवक धनराज बाबुराव नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. मुस्लिमांनी देशाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे, असे आवाहन प्राचार्य वि. अ. शेख यांनी केले. तर 'उपरा'कार लक्ष्मण माने म्हणाले की, स्त्रियांना पुरुष सहजासहजी सुखी होऊ देणार नाही, त्यासाठी स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारून अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. त्यांनी स्वतः जागृत झाले पाहिजे.

मंडळाच्या कार्यकर्त्या मुमताज इनामदार यांनी स्त्रीचे दुःख स्त्रीच जाणते, त्यामुळे स्त्रियांनीच अग्रभागी राहिले पाहिजे, असे प्रतिपादन केले. अन्वर राजन, रवींद्र बेडकीहाळ यांची भाषणे झाली. अध्यक्षीय भाषणात दिलीपसिंग भोसले म्हणाले की, मुस्लीम भगिनींसाठी हा लढा आम्ही निर्धाराने लढवू व त्या साठी सर्व प्रकारचे साहाय्य देऊ. फलटण शाखेचे अध्यक्ष बशीर तांबोळी आणि त्यांचे सहकाऱ्यांनी सभेचे आयोजन केले, यात मोठ्या प्रमाणात मुस्लीम महिला उपस्थित होत्या. *(सकाळ, ११ नोव्हेंबर १९८५)*

## ३.१२.१०. कुटुंब नियोजन आणि इस्लाम

कुटुंब नियोजन हा कोणत्याही विशिष्ट जमातीचा प्रश्न नाही, तर साऱ्या राष्ट्रापुढील ती एक गंभीर समस्या आहे. धर्माचा आधार घेऊन काही सत्ताकांक्षी गट जनसामान्याला कुटुंब नियोजनापासून परावृत्त करतात. परंतु इस्लामच्या धर्मपरंपरेत तलाकशुदा महिलेला 'खावटी' (पोटगी) देणे आणि कुटुंब कल्याण पोषक कर्तव्य बजावणे इत्यादीचे स्पष्ट समर्थन आढळून येते, असे विचार मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे नेते वजीर पटेल यांनी येवले नगरपरिषदेतर्फे आयोजित कुटुंब कल्याण प्रचार सभेत बोलताना व्यक्त केले. 'कुराणा'च्या आयातांमधून हे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, माणसाने प्रथम घराची व आर्थिक सुरक्षेची सोय करावी आणि जो गरीब असेल त्याने संयमाने राहावे, म्हणजे लग्न मुळीच करू नये. जो मुले जन्माला घालून त्यांच्या पोषणास असमर्थ आहे, त्यास मुले जन्माला घालण्याचा अधिकार काय? 'कुराणा'च्या ९व्या आयातीमध्ये म्हटले आहे की, जास्त संतान झाल्यावर स्त्री ही रमजानचे रोजे करू शकत नाही किंवा नमाजही पढू शकत नाही, कारण जास्त मुले तिच्या जीवनावर ओझे होतात.

मातेच्या आरोग्य सुरक्षेसाठी इस्लामची धर्मपरंपरा कुटुंब कल्याणाचा मार्ग स्पष्टपणे दाखवतो. याचा निर्देश करताना पटेल पुढे म्हणाले की, बादशाह औरंगजेबाने बोलावलेल्या ५०० उलेमांच्या सभेने १६७०मध्ये असा निर्णय दिला आहे की, आपल्या पत्नीच्या मर्जीनुसारच मूल पैदा व्हावे. १२० दिवसानंतर गर्भस्त मुलात जीव निर्माण होतो. म्हणून या कालावधीनंतर गर्भपात करू नये. धर्माचा बुरखा घेऊन लोकांना फसवण्याचे राजकारण करणाऱ्यांनी मात्र या बाबतीत मुसलमान जनतेची दिशाभूल केली आहे. या उलेमांच्या धर्मसभेने हेही मान्य केले आहे की, १२० दिवसानंतर जर मातेच्या आरोग्यास धोकादायक सिद्ध होत असेल, तर नवऱ्याच्या संमतीने स्त्री गर्भपात करू शकते.

आपल्या व्याख्यानाच्या शेवटी वजीर पटेलांनी आव्हान केले की, 'कुराणा'चा खरा अर्थ

जाणून मुस्लीम बांधवांनी कुटुंब नियोजनाच्या उपक्रमात सहभागी व्हावे. स्थानिक मुस्लीम जमातवाद्यांचा या व्याख्यानास विरोध असूनही मुस्लीम मोठ्या संख्येने सभेस उपस्थित होते. नगराध्यक्ष प्रभाकर दादा कासार आणि मुख्याधिकारी रघुनाथ रणदिवे यांनी वजीर पटेलांचे स्वागत केले.

**वजीर पटेल यांच्या निषेधार्थ मुस्लिमांचा मोर्चा**

अमरावती येथील मंडळाचे कार्यकर्ते वजीर पटेल यांच्या येवले भेटीच्या निषेधार्थ तेथील मुस्लीम नागरिकांनी तहसील कार्यालयावर एक मोर्चा नेला होता. पटेल मुस्लीम विरोधी प्रचार करतात, त्यामुळे शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून त्यांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात यावी, असे मोर्चातील शिष्टमंडळाने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

मंडळाच्या वतीने हमीद दलवाई यांच्या निर्देशानुसार वजीर पटेल यांनी कुटुंब नियोजनाची अनेक शिबिरे आयोजित केली आणि त्याच्या प्रचारार्थ उपक्रम राबवले, म्हणून मुस्लीम जमातवाद्यांनी अनेक ठिकाणी मंडळ आणि वजीर पटेल यांचा निषेध व्यक्त केला. *(केसरी, २३ जानेवारी १९८६)*

## ३.१२.११. अखिल भारतीय परिषदेचे आयोजन

शहाबानो प्रकरणानंतर पुरोगामी मुस्लीम वर्तुळात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. विविध राज्यांत त्याचे पडसाद उमटले. या पार्श्वभूमीवर मंडळाने राष्ट्रीय स्तरावर मुस्लीम महिलाविषयक काम उभे उभे करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २६ आणि २७ सप्टेंबर १९८७ रोजी कोल्हापूर येथे 'अखिल भारतीय मुस्लीम सत्यशोधक परिषदे'चे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्‌घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दाऊद यांच्या हस्ते झाले. बाबुमियाँ बँडवाले हे अध्यक्षस्थानी होते. परिषदेचे उद्‌घाटन शाहू स्मारक भवनात झाल्यानंतर २७ सप्टेंबरचे कार्यक्रम अक्षता मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले. परिषदेत मुस्लीम तरुणांसमोरील आर्थिक, शैक्षणिक व इतर आव्हाने, मुस्लीम समस्यांचे राजकीय विश्लेषण, देशातील जातीय दंगली व राष्ट्रीय एकात्मता, तसेच मुस्लीम कायदा व स्त्रियांचे प्रश्न अशा प्रमुख ठरावांवर चर्चा झाली. परिषदेस दिल्ली, उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र या भागातील प्रतिनिधी उपस्थित होते. राजस्थानचे माजी मंत्री मेहबूब अली यांच्यासह ३००हून अधिक प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते.

उद्‌घाटनप्रसंगी 'भारतातील सार्वजनिक धार्मिक जीवनाचे निधर्मीकरण' या विषयावर बोलताना न्यायमूर्ती दाऊद म्हणाले की, घटनेची चौकट बनवणाऱ्यांनी धर्मनिष्ठा, उपनिष्ठा यांचा पूर्ण विचार केला आहे. उपनिष्ठांच्या बाबतीत स्वातंत्र्य वा स्वायत्तता देताना राष्ट्र ऐक्याला आणि सार्वभौमत्वाला कुठेही बाधा येणार नाही, याचा विचार घटनाकारांनी केला आहे. या देशात विविध धर्म, भाषा, जाती, प्रांत असले, तरी हा देश एकसंध राहण्यासाठी सोशिकता,

सार्वजनिक प्रबोधन, सर्वांना समान न्याय मिळावा आणि मानवी मूल्यांचा आदर राखला जावा, या दृष्टीने सर्व अनिष्ट बाबींचे निर्मूलन ही तत्त्वे सर्वांनी पाळली पाहिजेत. घटनेने ते बंधनकारक आहे.

घटनेच्या तिसऱ्या भागात कलम १४ ते १६ अन्वये कायद्यापुढे सर्व समान आहेत, तसेच या देशात महिला व मुले हे कमकुवत घटक राहू नयेत, म्हणून त्यांच्यासाठी विशेष कायद्यांची तरतूद आहे. कलम १७ व १८ अन्वये केवळ जन्माने कोणी मोठा ठरू शकत नाही. जन्माने कुणाला खास हक्क मिळू शकत नाही. कलम २० ते २३मध्ये महिला व मुले यांच्या हक्क रक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. कलम २३चा हेतू महिला व मुलांवरील अत्याचाराला आळा बसावा हाच आहे. दुर्दैवाने आपल्या देशात धार्मिक स्वातंत्र्य हे सार्वजनिक हितापेक्षा वरचढ होऊ पाहत आहे.

प्रथम राष्ट्र व नंतर धर्म हे तत्त्व प्रत्येक भारतीयाने आचरणात आणले, तरच भारतीय संविधानाचे अस्तित्व अबाधित राहणार आहे. धर्म, जात, भाषा यांचा वृथा अभिमान न बाळगता परस्पर चर्चेने आपल्यातील मतभेद दूर करावेत. परस्पर समन्वय, सुसंवाद, चर्चा यांतून एकमेकांच्या मनातील शंका-कुशंकांचे सावट दूर होईल. घटनेच्या चौथ्या भागात मूलभूत हक्कांसंदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यात आली असली, तरी न्यायालयाच्या आधारे त्यांचे पालन करता येतेच असे नाही. तत्त्वतः भारतीय स्त्रीने गगनाला गवसणी घातली असली, तरी व्यवहारात तिचे अस्तित्व घरापुरतेच आणि प्रत्यक्षात ते स्वयंपाक घरापुरतेच मर्यादित आहे. हे चित्र बदलले पाहिजे. राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाचा मान राखलाच पाहिजे. भारत हा केवळ एक देश नाही, तर महान वैश्विक संस्कृतीचा वारसा लाभलेल्या उपखंडाचा एक भाग आहे. या भावनेने आपण एक एकसंध राहिलो, तरच सामाजिक आर्थिक समता प्रस्थापित होईल. विवेकाची कास धरूनच आपली प्रगती होईल. रस्त्यावर येऊन, दगडफेक करून, हिंसाचाराच्या आहारी जाऊन किंवा दुसऱ्याला नावे ठेवून प्रश्न सुटणार नाही. पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी मार्गानेच प्रश्न सुटतील.

अस्पृश्यता, स्त्रियांवरील अत्याचार, बालकामगार ही समस्या कायद्याने जेवढ्या प्रमाणात सुटेल, त्यापेक्षा सामाजिक जाणिवेतून अधिक प्रमाणात सुटेल. समाजाने आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून स्त्रीला गुन्हेगार समजले आहे, ही समजूत पूर्णपणे चुकीची आहे. भारतीय संविधानात स्त्रीला पूर्ण संरक्षण व अधिकार आहे.

मंडळाच्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष हुसेन जमादार यांनी प्रास्ताविक केले. परिषदेचा हेतू सांगताना सय्यदभाई म्हणाले की, मुस्लीम महिलांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी आम्ही कार्य करतो, पण आम्हाला 'धर्मद्रोही' समजले जाते. निराधार स्त्रीला आधार मिळावा म्हणून एखाद्याने केलेले प्रयत्न कोणत्याही धर्मात पाप म्हणून उल्लेखले जाणार नाही.

दिल्लीहून आलेले रेवती शरण शर्मा म्हणाले की, धर्म अलग असला तरी मानव जात एकच आहे. प्रत्येकाने आपापल्या धर्माचा अभिमान बाळगताना धर्मग्रंथांत दिलेल्या तत्त्वांचे आचरण करावे. प्रसंगी रूढी-परंपरांविरुद्ध विज्ञानाची साथ धरावी. रूढी-परंपरांना चिकटून राहणे म्हणजे संस्कृतीचे रक्षण ही समजूत चुकीची आहे.

या वेळी राजस्थानचे माजी मंत्री मेहबूब अली खान, ॲड. सी. आर. दळवी, डॉ. दुर्राणी, पन्नालाल सुराणा, अब्दुल लतिफ आझमी, प्रा. सारा अबुबकर, कु. सीमा काझी, केशवराव जाधव यांची भाषणे झाली. तसेच बाबुमियाँ बँडवाले, मेहेरून्निसा दलवाई, रजिया पटेल, मोहम्मद कुद्दस, सारा अबुबकर, रेहमान खान आणि मंडळाच्या ज्येष्ठ नेत्यांनी परिषदेत विचार मांडले. या वेळी तलाक मुक्ती मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांचा न्यायमूर्ती दाऊद यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या परिषदेच्या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य घेऊन जाऊन पुरोगामी मुस्लिमांचे राष्ट्रीय व्यासपीठ स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. ही परिषद त्यादृष्टीने मुहूर्तमेढ ठरली.

परिषदेपूर्वी परिषदेला कोल्हापुरातील जात्यंध मुस्लीम पुढाऱ्यांनी विविध पद्धतीने विरोध करण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी खंबीर भूमिका घेऊन परिषदेच्या ठिकाणी कुठलीही गडबड होणार नाही, याची दक्षता घेतली आणि तसा इशारा परिषद विरोधी पुढाऱ्यांना दिला. परिषदेत नागरी वेशातील पोलीस उपस्थित होते. अक्षदा मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापकांना परिषदपूर्व दोन दिवस फोनवरून धमक्या दिल्या जात होत्या. परिषदेला जागा देऊन मोठी चूक केली आहे, कार्यालयाचे नुकसान झाले, तर ती तुमची जबाबदारी राहील, अशा इशारेवजा धमक्या येत असल्याचे व्यवस्थापकांनी पोलिसांना सांगितले. कोल्हापूर येथील ऑल मुस्लीम जमात फेडरेशन नामक जात्यंध संघटनेने जाहीर विरोध केला आणि या परिषदेला मुस्लीम व हिंदू समाजाने उपस्थित राहू नये, असे वातावरण तयार केले.

या परिषदेत प्रागतिक विचार वाढवून जमातवादी प्रवृत्ती थोपवण्यासाठी आणि लोकशाही समाजवादी प्रवाह बळकट करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स' या संघटनेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पुरोगामी परिषदेच्या ठिकाणाला 'श्रीमती मुमताज रहिमतपुरे नगर' असे नाव देण्यात आले होते. ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स या राष्ट्रीय संघटनेमार्फत मुस्लिमांच्या उन्नतीसाठी आणि मुस्लीम महिलांच्या हक्कासाठी कार्य करण्यात येईल, बाबरी मस्जिद, रामजन्मभूमीसारखे प्रश्न सामंजस्य व सामोपचाराने सोडवण्यात यावे, असा ठराव संमत करण्यात आला.

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लीम समाजाची शैक्षणिक व आर्थिक प्रगती करण्यासाठी सक्रिय राहण्याचा ठरावही संमत करण्यात आला. तसेच मानवी हक्क व न्याय तत्त्वांची पायमल्ली करणारा १९८६चा मुस्लीम महिला कायदा हा विषय कायद्याच्या पुस्तकातून काढून टाकावा, अशी मागणी करणारा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. राजस्थानमधील सती प्रकरणी या वेळी तीव्र संताप व खेद व्यक्त करून निषेध करण्यात आला. मुस्लीम महिलांना जुबानी तलाक देण्याची प्रथा रद्द करण्याचा कायदा करण्यात यावा, बहुपत्नीत्व प्रथा संपुष्टात आणण्यासाठी कायदा करावा, असे विविध ठराव एकमताने परिषदेत मांडण्यात आले.

याप्रसंगी स्थापन करण्यात आलेल्या 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'ची 'ॲडव्हाक समिती' स्थापन करण्यात आली. यामध्ये अब्दुल लतिफ आझमी, डॉ. के. एस. दुर्राणी (दिल्ली), सय्यद

जमील अहमद, एम. ए. कुद्दुस (आंध्र प्रदेश), मोहम्मद शमसुद्दिन, अक्रम अली (बंगाल), सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार (महाराष्ट्र), यासीन दलाल, कलाम मोकाशी (गुजरात), मेहबूब अली (राजस्थान), मोहम्मद रऊफ, रिझवान अहमदखान (उत्तर प्रदेश), रशीदा मुजावर (गोवा), रहिमान खान, सीमा काझी (कर्नाटक), सय्यद अहमद (तामिळनाडू) यांचा समावेश आहे. समितीचे समन्वयक म्हणून सय्यदभाई यांची नियुक्ती करण्यात आली.

वरील मान्यवरांबरोबरच चर्चासत्रात हुसेन दलवाई, ऐनुल अत्तार, डॉ. बाबा आढाव यांनीही विचार मांडले. *(दै. पुढारी, २६ सप्टेंबर १९८७; दै. सत्यवादी, तरुण भारत, २७ सप्टेंबर १९८७; केसरी, पुढारी, सत्यवादी, सकाळ, २८ सप्टेंबर १९८७)*

### ३.१२.१२. मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर शिबिर

१० व ११ सप्टेंबर १९९४ रोजी पुण्यात मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर दोन दिवसांचे राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र झाले.

या चर्चासत्राचे आयोजन ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने करण्यात आले. या चर्चासत्रात मुस्लीम सत्यशोधक मंडळ, तसेच देशातील इतर पुरोगामी संघटनांचा सहभाग होता. या चर्चासत्राच्या वृत्तांताच्या निमित्ताने मुस्लीम समाजातील प्रबोधनाचा आढावा पुढे घेतला आहे.

१९६६ साली हमीद दलवाई यांनी 'समान नागरी कायद्या'च्या मागणीसाठी मुंबईला मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना एक निवेदन दिले. याच घडीला भारतातील मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर प्रथम वाचा फोडली गेली. दलवाई सर्व भारतभर फिरून मुस्लीम समाजात प्रबोधनासाठी मुस्लीम तरुणांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या प्रयत्नाला चार वर्षांनी यश येऊन २२ मार्च १९७० रोजी पुण्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना करण्यात आली. या वेळी आपल्या भाषणात दलवाई म्हणाले, खऱ्या अर्थाने मुस्लीम जातीयवाद्यांविरुद्धचा लढा, मुस्लीम महिलांच्या समतेसाठी संघर्ष, मुस्लीम समाजात कडवा राष्ट्रवाद रुजवण्यासाठी चळवळ आजपासून सुरू होत आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाल्यानंतर कार्याची सुरुवात मुस्लीम महिलांच्या समान अधिकारांचा प्रश्न हाती घेऊन केली. हा संघर्ष दलवाई हयात असताना आणि त्यानंतरही आजतागायत चालू आहे.

१९८४साली इंदूरच्या शहाबानो यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देऊन तलाकपीडित मुस्लीम महिलांची पोटगी कायम ठेवली. त्याबद्दल मुस्लीम सत्यशोधक मंडळाने शहाबानो यांना पुण्यात आणून त्यांचा जाहीर सत्कार केला. लागलीच काही दिवसांनी देशातील धर्मांध व जातीयवादी सनातनी मुस्लीम संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाने पोटगी कायम केल्याबद्दल प्रचंड गदारोळ उठवला. त्या वेळीही मंडळाने आपल्या कुवतीनुसार 'पोटगी बचाव मोहीम' समाजात व शासनापर्यंत नेली. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रात मंडळातर्फे तलाकपीडित मुस्लीम महिलांचा ऐतिहासिक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चावर माथेफिरू जातीयवादी मुस्लीम

संघटनांकडून ठिकठिकाणी हल्ले करण्यात आले. या हल्ल्यातून सुदैवाने सर्व महिला व कार्यकर्ते बचावले. शहाबानोची पोटगी रद्द करू नये, यासाठी दिल्लीत मंडळाने तलाकपीडित महिलांचे एक शिष्टमंडळ नेऊन कायदामंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती आणि अनेक खासदार यांना भेटून पोटगी कायद्यातून मुस्लीम महिलांना वगळू नये, अशी निवेदने दिली. परंतु नेहमीप्रमाणे नकाराचे राजकारण पुढे आले आणि १९७९पासून देशातील तलाकपीडित मुस्लीम महिलांना मिळणारी पोटगी रद्द गेली. म्हणजे तलाकपीडित मुस्लीम महिलांना सदर कायद्यातून वगळून मुस्लीम समाजातील जातीयवादी मुस्लिमांना खुश करण्यात आले.

शासनाच्या या चुकीच्या निर्णयामुळे देशातील मुस्लीम महिलांनी आणि कमीअधिक प्रमाणात मुस्लीम महिला हक्कांसाठी झटणाऱ्या अनेक संघटनांनी एकत्र येऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकाराने १९८७ साली 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'ची राष्ट्रीय पातळीवर स्थापना केली. तिच्या वतीने देशात मुस्लीम महिला प्रश्न विशेषतः तोंडी एकतर्फी तलाक आणि पोटगीच्या संदर्भात देशातील अनेक शहरांत मुस्लीम महिला परिषदा, मोर्चे, परिसंवाद घेऊन जागृती करण्यात आली. या कॉन्फरन्सने देशातील कानाकोपऱ्यात मुस्लीम महिलांचे खरे प्रश्न पोचवले. त्यामुळे मुस्लीम महिला अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्या संघटनाही मुस्लीम महिला अधिकाराच्या बाजूने बोलू लागल्या. याचे जिवंत उदाहरण म्हणून एका दमात तीन तलाक देण्याची मुभा नसावी, अशी भूमिका मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डात 'अहलेहदीस' अशा अनेक संघटनांनी घेतली आहे. या भूमिकेचे स्वागत देशात व परदेशांत अनेक मुस्लीम संघटनांनी केले. याचाच एक भाग म्हणून १९९३मध्ये दिल्लीत देशातील २०० मुस्लीम विचारवंतांनी एकत्र येऊन मुस्लीम महिला हक्कांसंबंधी पुरोगामी भूमिका घेतली.

या कामी ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सने तोंडी तलाक व पोटगी या विषयांवर देश ढवळून काढला आहे. मुस्लीम समाजात तोंडी एकतर्फी तलाक आणि पोटगी यांविषयी मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली आहे व ती वाढत आहे.

या कामाचा एक भाग म्हणून १०–११ सप्टेंबर १९९४ दरम्यान पुण्यात राष्ट्रीय पातळीवर दोन दिवसांचे मुस्लीम महिला प्रश्नावर चर्चासत्र घेण्यात आले. त्याला दिल्लीचे विचारवंत डॉ. इम्तियाज अहमद आणि मुस्लीम चिंतक असगरअली इंजिनिअर, तसेच मदुराईच्या प्रा. श्रीमती नाझनीन, हैद्राबादच्या महजबीन, गुजरातमधील अंकलेश्वर येथील प्रो. अब्दुलभाई वाकानी आणि मंडळाचे व ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे कार्यकर्ते, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चर्चासत्राचे यश म्हणजे आमच्या संघटनांचे सदस्य नसलेल्या अनेक मान्यवर मुस्लिमांनीही आवर्जून उपस्थित राहून पुरोगामी भूमिका मांडली. या सर्व उपस्थितांमध्ये एक समान धागा होता, तो म्हणजे मुस्लीम महिलांना जन्मसिद्ध समान मानवी अधिकार मिळाले पाहिजेत. दीड दिवस चाललेल्या या चर्चासत्रात अतिशय शिस्तबद्ध व मुद्देसूद विचार मांडले गेले.

शेवटी ठराव पास करण्यात आला. तो पुढीलप्रमाणे :

धर्माच्या नावाने मुस्लीम समाजात तलाक, तसेच बहुपत्नीत्व यांसारखे अनेक प्रश्न निर्माण

झालेले आहेत. या प्रश्नांमुळे मुस्लीम महिलांचा विकास खुंटला आहे. पण या संदर्भात आपले धर्मनिरपेक्ष शासन काहीही प्रयत्न करत नाही. मुस्लीम समाजाची प्रगती व्हावी, असे इच्छिणाऱ्या सर्व मुस्लीम सामाजिक-धार्मिक व राजकीय संघटना आणि सर्व महिला संघटनांना ही परिषद विनंती करते की, मुस्लीम महिलांना जन्मसिद्ध अधिकार मिळवून देण्यासाठी एक प्रभावी आंदोलन उभे करावे.

ही परिषद शासनाकडे मागणी करते की, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात योग्य बदल करून मुस्लीम महिलांवर तलाक व बहुपत्नीत्व या संदर्भात होणारा अन्याय दूर करावा. मुस्लीम महिलांना शिक्षण व इतर बाबतीत न्याय मिळेल, याबद्दल शासनाने लक्ष घालावे. मुस्लीम महिला प्रश्नांसंदर्भात विचार करताना मुस्लीम महिला प्रश्नांसंबंधी काम करणाऱ्या संघटनांशी राष्ट्रीय महिला आयोगातर्फे विचारविनिमय करण्याची भूमिका शासनाने घ्यावी, असे या परिषदेचे मत आहे.

या ठरावावर एक तास चर्चा होऊन तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. परिषदेच्या शेवटी या पद्धतीचे चर्चासत्र देशाच्या कानाकोपऱ्यात घेऊन समाज व शासन यांचे प्रबोधन करावे, असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

या चर्चासत्राला इंडियन सेक्युलर सोसायटीने बहुमोल साहाय्य केले आहे. याबद्दल परिषदेत सोसायटीचे आभार मानण्यात आले.

*('साधना' साप्ताहिक, १७ सप्टेंबर १९९४, पृष्ठ क्र. १७-१८)*

### ३.१२.१३. हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट

१९९५ हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे रौप्य महोत्सवी वर्ष होते. या निमित्ताने मंडळाच्या वतीने हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली. हमीद दलवाई यांनी त्यांच्या मृत्यूपत्रात अशी एक मोठी इन्स्टिट्यूट व ग्रंथालय असावे, ज्यामधून इस्लामिक जगतातील घडामोडी आणि साहित्य या संदर्भात अभ्यास व संशोधन होईल, त्याचबरोबर मंडळाच्या कार्यास अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. २२ मार्च १९९५ रोजी पुण्यातील मराठा चेंबर ऑफ कॉमर्समध्ये हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या हस्ते आणि प्रा. मे. पुं. रेगे हे अध्यक्षस्थानी होते. हमीद दलवाई यांच्या शिक्षिका प्रा. कुलसुम पारेख आणि ज्येष्ठ विचारवंत विनायकराव कुलकर्णी, प्रा. ग. प्र. प्रधान प्रमुख पाहुणे होते.

ग्रामीण मुस्लिमांच्या जातिव्यवस्थेचे विश्लेषण होण्याची गरज असून या विषयावर या इन्स्टिट्यूटने शोधकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करून शहाजिंदे म्हणाले की, या देशातील ९० टक्क्यांहून अधिक मुस्लीम हा धर्मांतरित आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या दलित समाजाने मोठ्या प्रमाणावर धर्मांतर करून इस्लाम धर्म स्वीकारला. ते पुढे म्हणाले, खेड्यामध्ये राहताना स्वतःची ओळख मुस्लीम म्हणून करून देतानाही जातीची चौकशी केली जाते, ही वस्तुस्थिती आहे.

ग्रामीण भागातील मुस्लिमांच्या जातीचा अभ्यास ही आजची एक महत्त्वाची गरज आहे. इस्लाममध्ये जात-पात नाही, असा डंका पिटला जात असताना या समाजात जातीयता किती प्रखर आहे, याचे उदाहरण देताना त्यांनी प्रख्यात उर्दू शायर जोश मलिहाबादी यांच्या एका कर्मठ मुस्लिमांशी झालेल्या संवादाचे उदाहरण दिले. इस्लाममधील जातीयतेविषयी या कर्मठ मुस्लिमांबरोबर जोश यांचा संवाद चालू असताना इस्लाममधील समता वगैरे सर्व ठीक आहे, परंतु काल खालच्या जातीतील असणाऱ्यांनी आज मुस्लीम होऊन आम्हाला समता शिकवावी, हे आम्हाला सहन होत नाही, असे अतिशय कडवटपणे सांगून त्यांनी जोशसारख्या कवीला निरुत्तर केले होते, ही वस्तुस्थिती आहे, असे ते म्हणाले.

धर्मांतरित दलित ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण मुस्लिमांना धार्मिकतेशी काही देणे-घेणे नाही. ग्रामीण मुस्लीम वांशिकदृष्ट्या याच मातीतील आहोत. त्याला जातीयतेचे चटके बसतात. मूळ जात सांगताना मला भीती वाटते. मेल्यानंतर कब्रस्तानात तरी जागा मिळेल की नाही, अशी भीती आम्हाला वाटत राहते. याच भीतीपोटी चळवळ वाढू शकली नाही. ग्रामीण मुस्लिमांच्या या मानसिकतेचा अभ्यास होणे गरजेचे आहे. भारतीय मुस्लिमांचा अभ्यास करताना त्यांच्या जातीयवादी रूपांचा अभ्यास केला पाहिजे, असे नमूद करून शहाजिंदे म्हणाले की, मुस्लिमांचे पहिले रूप या भूमीवर राज्य करणारे म्हणून आहे. परंतु राज्यकर्ते मुस्लीम हे स्थानिक नव्हते, ही गोष्ट आपण विसरतो. ते येथील मुस्लिमांना तुच्छ लेखत असत. दुसरे रूप आहे ते फकीर, अवलिया या उदारमतवादी मुस्लिमांचे. त्यांनी येथे 'दर्गाह संस्कृती' रुजवून समाजात सांस्कृतिक ऐक्य घडवून आणले. ही दर्गाह संस्कृती तळा-गाळातील मुस्लिमांपर्यंत पोहोचली आहे. याचा प्रसार व्हायला हवा. कट्टर धर्मवादी मुस्लीम आणि ग्रामीण भागातील धर्मांतरित दलित हे या समाजाची अन्य रूपे आहेत. यातील अन्य घटकांचा अभ्यास सुरू आहे, मात्र ग्रामीण भागात राहणारे धर्मांतरित दलित यांचा अद्याप विचार होऊ शकलेला नाही. त्यांच्या प्रश्नाकडे अद्याप




*विनायकराव कुलकर्णी मार्गदर्शन करताना.*

दुर्लक्षच झाले आहे.

विनायकराव कुलकर्णी म्हणाले, देशाचा इतिहास अतिशय खोडसाळपणे लिहिला गेला आहे. हिंदू कालखंड आणि मुस्लीम कालखंड अशी विभागणी करताना, तार्किक संगतीप्रमाणे पुढला कालखंड ख्रिश्चन कालखंड असायला हवा. मात्र तसे न होता त्यांची विभागणी ब्रिटिश शासन काळ म्हणून करण्यात आली. याचे कारण असे की, त्यांना हिंदू आणि मुस्लीम यांच्यात दुही माजवूनच या देशात राज्य करावयाचे होते. सत्ता संपत्तीपासून वंचित राहणाऱ्यांनी धर्मांतराचा आधार घेतल्याचे स्वामी विवेकनंदांनीही सांगितले आहे. मात्र हिंदुत्ववादी या गोष्टींचा प्रचार करत नाहीत. समतेला पोषक असलेले कार्य या संस्थेकडून व्हावे, अशी अपेक्षाही कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

प्रा. कुलसुम पारेख म्हणाल्या, या संस्थेने इतिहासाचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. इतिहासाचा काळा कालखंड म्हणून ज्यांचे वर्णन केले जाते, त्या मुस्लीम राज्यकर्त्यांच्या कालखंडाचा विवेचक अभ्यास व्हावयास हवा. कारण इतिहास लिहिणारे इस्लामी मूलतत्त्ववादी होते. त्या काळात मंदिरे पाडली गेली नाहीत, असे नाही. मात्र एक मंदिर पाडले गेले की, शंभर मंदिरे पाडण्यात आली, असा खोटा इतिहास लिहिला गेला. त्याने आज दोन समाजातील दरी वाढली आहे. या इतिहासाचे साक्षेपी पुनर्लेखन आवश्यक आहे. इतिहास लिहिला जात असताना सुफी संतांचे कार्य जाणीवपूर्वक डावलले गेले आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. रेगे म्हणाले, तलवारीच्या जोरावर धर्मप्रचार करणारे अशी मुस्लिमांची प्रतिमा आहे. वस्तुतः ऐतिहासिक सत्याशी ती विसंगत आहे. जगातील इस्लामी राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्याची प्रचिती येते. इस्लामी राजवटीत ख्रिश्चनांना सहिष्णू वृत्तीने वाढवले गेले. ग्रीसमधील ख्रिश्चन राजवट मात्र तशी सहिष्णू नसल्याचे इतिहास सांगतो. मात्र या इतिहासाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत ग. प्र. प्रधान यांनी स्वतःच्या आणि बहिणीच्या स्मृत्यर्थ २०००/- रुपयांची देणगी दिली. मंदाकिनी किर्लोस्कर, विजूभाऊ देसाई यांनीही प्रत्येकी १०००/-च्या देणग्या दिल्या.

मंडळाचे सय्यदभाई आणि मेहेरून्निसा दलवाई यांनीही विचार मांडले. हुसेन जमादार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विलायत शेख यांनी आभार मांडले. आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. *(सकाळ, २३ मार्च १९९५)*

### ३.१२.१४ मंडळाचा नवा जाहीरनामा

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या एकोणचाळीसाव्या वर्धापनदिनानिमित्त 'मुस्लीम समाजाची स्थिती आणि प्रगती' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्घाटन मा. भाई वैद्य यांच्या हस्ते झाले. या वेळी मंडळाचे हुसेन जमादार, सय्यदभाई आणि प्रा. शमसुद्दिन तांबोळी उपस्थित होते. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष हाजी महंमद गौस नाईक होते.

एकूण बदललेल्या परिस्थितीचा विचार करून मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पूर्वीच्या जाहीरनाम्यात काही नव्या विषयांचा समावेश करून मंडळाचा 'जाहीरनामा – नवी दिशा' याचे प्रकाशन करण्यात आले. त्यात उदारमतवादी 'कुराण' भाष्याचा आधार, समाजासमोरील जमातवादाचे आव्हान, सेक्युलॅरिझमबाबतची भूमिका, मुस्लीम समाजाचे विकासाचे प्रश्न, महिलांच्या समस्या, देशासमोरील संवेदनशील समस्या या मुद्द्यांचा या नवीन जाहीरनाम्यात समावेश केला आहे. संपूर्ण दिवसभर चाललेल्या या चर्चासत्रात 'जमातवादाचे आव्हान' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत राम पुनियानी, जहीर अली, फक्रूद्दीन बेन्नूर, अब्दुल कादर मुकादम यांनी विचार मांडले. महिलांच्या स्थितीवर रुबिना पटेल व प्रा. बेनझीर तांबोळी आणि 'सामाजिक सद्भावना' या विषयावर औरंगाबाद येथील डॉ. आफाक खान यांनी विचार मांडले. *(महाराष्ट्र टाइम्स, १ एप्रिल २०१२)*

### ३.१२.१५. मंडळाची जनहित याचिका

मंडळाने मुस्लीम आरक्षणाबाबत भूमिका घ्यावी असा आग्रह शमसुद्दिन तांबोळी यांनी केला. मुस्लीम समाजात मागास जाती आहेत, हे १९५५च्या काकासाहेब कालेलकर आयोगाने अधोरेखित केले. तसेच मंडल आयोगानेही इतर मागासवर्गीयात मुस्लीम समाजातील काही मागास जातींचा समावेश केला आहे. मुस्लीम समाजात अशा अनेक मागास जाती आहेत, ज्या शिक्षण आणि शासकीय नौकरी पासून वंचित आहेत. परिणामी त्यांच्यात शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण मोठ्या प्रमाणात आढळून येते. अशा मुस्लीम मागास जातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक आरक्षणाची सोय करण्यात यावी आणि याचा तपशील लक्षात घेऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाने मागास मुस्लीम जातींच्या आरक्षणासाठी शासनाला शिफारस करावी, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २२ ऑगस्ट २०१४ रोजी याचिका दाखल करण्यात आली. (PIL No. २०३ ६०/२०१४)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाबरोबरच अन्य संघटना आणि व्यक्तींनीही मुस्लीम मागास जातींच्या आरक्षणाच्या बाजूने आणि विरोधात याचिका दाखल केलेल्या होत्या. या सर्व याचिका विचारात घेऊन मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनाला मुस्लीम मागास जातींसाठी शिक्षण संस्थांमध्ये ५ टक्के आरक्षणाची शिफारस केली. मंडळाच्या वतीने हे कामकाज पाहण्यासाठी अय्युब हैदर इनामदार यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील मागास मुस्लीम जातींसाठी शिक्षणात ५ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली असली तरी शासनाने या शिफारसीची दखल घेतली नाही आणि मुस्लीम मागास जातींच्या आरक्षणाचा विषय अजूनही अनुत्तरित आहे.

(मंडळाच्या दफ्तरातून)

## ३.१२.१६ मुस्लीम महिला अधिकार परिषद

मुस्लीम महिलांच्या अनेक अनुत्तरित प्रश्नांचा ऊहापोह करण्यासाठी आणि त्यांना संविधानात्मक अधिकार मिळवून देण्यासाठी संविधानदिनी म्हणजेच २६ नोव्हेंबर २०१६ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने मुस्लीम महिला अधिकार परिषद आयोजित करण्यात आली. साने गुरुजी स्मारक, राष्ट्र सेवा दल, पुणे येथील निळू फुले नाट्यगृहात या परिषदेचे आयोजन करण्यात आले. तलाक आणि बहुपत्नीत्व प्रथेच्या बळी ठरलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या उत्तराखंड राज्यातील काशीपूर येथील शायराबानो आणि त्यांचे भाऊ अर्शद अली यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या परिषदेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लेखिका आणि कार्यकर्त्या डॉ. नूर जहीर यांनी केले. महिलांच्या प्रश्नांवर मुमताज शेख, रूबिना पटेल, खातूनबी, विद्या बाळ आणि मंडळाच्या महिला कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात मा. भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव यांनीही मार्गदर्शन केले. शायराबानो म्हणाल्या, “माझ्या सासरच्या लोकांनी माझ्यावर अत्याचार केले. मानसिक आणि शारीरिक शोषणही करण्यात आले. मला मुलांना भेटू दिले जात नाही. दावा मागे घेण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जात आहे. मात्र, सरकारने माझी बाजू उचलून धरत सहकार्याचे आश्वासन दिले असून याबाबत न्यायालयीन लढाई सुरू आहे. मुस्लीम संघटना आणि महिला माझ्या पाठीशी आहेत. त्यामुळे मला निश्चितच यश मिळेल.”

त्या पुढे म्हणाल्या, “मुस्लीम समाजात हलाला, तोंडी तलाक, ट्रिपल तलाक अशा अनेक बुरसटलेल्या अमानुष प्रथा अस्तित्वात आहेत. या प्रथा स्त्री सन्मानाच्या विरोधात असल्याने तातडीने बंद व्हायला हव्यात. मुस्लीम समाजात कधीपर्यंत या प्रथा राहतील, हा प्रश्न आपल्याला पडायला हवा. माझ्या पतीचा माझ्याशी असणारा व्यवहार अतिशय अमानुष असाच होता. मी त्याच्या विरोधात माझ्या मानवी हक्कांसाठी एक स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून उभे राहिले.”

तसेच उद्घाटनाच्या भाषणामध्ये नुर जहीर म्हणाल्या, “मुस्लीम म्हणजे फक्त मागासच, अशी परिस्थिती मुद्दाम निर्माण केली जात आहे. वास्तव तसे नाही. मुस्लीम समाजातील महिलांची बाजू मांडली जाईल, अशी वेळ कधी येणार, हा प्रश्न आम्हाला पडतो. अगदी नेहरूंनीही हे केले नाही. महिला हक्काची मोहीम फक्त ट्रिपल तलाकवर अवलंबून नाही. महिलांनाही पुरुषांना तलाक देता येण्याचा अधिकार आणि पोटगीचा मुद्दाही यात आवश्यक आहे. शायरा यांच्याप्रमाणे प्रत्येकच महिला सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकणार नाही, त्यांच्यामागे आपण उभे राहायला हवे.”

या परिषदेमध्ये पुढील मागण्या करण्यात आल्या–

१) मुस्लीम महिलांशी संबंधित तलाक, बहुपत्नीत्व, पोटगी इत्यादी विषय न्यायालयीन प्रक्रियेद्वारे सोडवले जावेत.

२) भारतीय संविधानाला अपेक्षित समानता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर आधारित असलेला ‘समान नागरी कायद्या’चा मसुदा तयार करून त्यावर चर्चा घडवून आणावी.

३) प्रत्येक जिल्हा पातळीवर कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करावी.

४) मुस्लिमांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण कमी करण्यासाठी न्यायमूर्ती राजेंद्र सच्चर समिती, न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा आयोग आणि डॉ. मेहमूद-उर-रेहमान अभ्यासगट यांनी केलेल्या शिफारसींची अंमलबजावणी करावी.

मंडळाच्या तरुण, अविवाहित कार्यकर्त्यांनी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा किंवा समान नागरी कायदा अस्तित्वात येईपर्यंत आपले विवाह विशेष विवाह कायदा, १९५४ अंतर्गत नोंदणी करून करतील, अशी सार्वजनिकरित्या शपथ घेतली होती.

परिषदेसाठी महाराष्ट्राबाहेरील अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमात 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'च्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. सदर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी आणि कार्यकर्त्यांनी केले. *(सकाळ, लोकसत्ता, २७ नोव्हेंबर २०१६)*

## ३.१२.१७. पंतप्रधानांशी चर्चा आणि तलाकबंदी विधेयक

*(सर्वोच्च न्यायालयाने २२ ऑगस्ट २०१७ रोजी तोंडी एकतर्फी तलाक असंविधानिक व बेकायदेशीर ठरवला. या निमित्ताने शासन तलाकबंदी विधेयक आणणार असल्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. नंतर संसदेत विधेयक मंजूर झाले.)*

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासूनच मुस्लीम महिलांच्या विविधांगी प्रश्नांवर आवाज उठवला. समाजात या संदर्भात जनजागृती केली. परिणामी अनेक मुस्लीम महिलांचे मनोबल वाढले आणि त्यांनी अन्यायाविरुद्ध कंबर कसली आणि संघर्ष करण्याची भूमिका घेतली. विशेषतः शायराबानो (काशीपूर, उत्तराखंड), इशरतजहाँ (हावरा), गुलशन परवीन (रामपूर, उत्तरप्रदेश), अतिया साबरी (सहारनपूर, उत्तर प्रदेश), आफरिन रेहमान (जयपूर, राजस्थान) या महिलांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून व्यक्तिगत कायद्यातील अन्यायी तरतुदींना आव्हान दिले. मंडळाने या संघर्ष करणाऱ्या महिलांना पाठिंबा दिला. शायराबानो यांना मंडळाने पुण्यात बोलावून जाहीर सत्कार केला. सर्वोच्च न्यायालयाने शायराबानोच्या याचिकेला केंद्रस्थानी ठेवून २२ मार्च २०१७ रोजी निवाडा दिला. ज्यामध्ये 'तलाक-ए-बिद्दत' म्हणजेच तोंडी, एकतर्फी, एकाचवेळी दिलेला तलाक हा इस्लामचा अविभाज्य भाग नाही. त्यावर मुस्लीम देशांत बंदी घातली आहे. तसेच संविधानाच्या मूलभूत हक्कांचे हनन करणारे आहे. यामुळे अशा प्रकारचा तलाक बेकायदेशीर ठरवण्यात आला. या संदर्भात संसदेने सहा महिन्यात कायदा करावा, अशी शिफारसवजा सूचना केंद्र शासनाला न्यायालयाने केली. मुस्लीम महिलांच्या दृष्टीने हा एक ऐतिहासिक आणि दिलासावर्धक निवाडा असल्याने मंडळाकडून त्याचे स्वागत करण्यात आले. मंडळाच्या वतीने या विषयावर जाहीर चर्चा घडवून आणली.

सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारसीला गांभीर्याने घेऊन केंद्र शासनाने तलाकबंदी विधेयक

आणण्याच्या दृष्टीने हालचाल सुरू केली आणि त्या पद्धतीच्या बातम्या प्रसारमाध्यमांतून येत असताना मंडळाने कार्यशाळा, कायदेतज्ज्ञांच्या भेटी आयोजित करून या संदर्भात जनमत तयार करण्याचे ठरवले. मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी यांनी चर्चासत्रांचे आयोजन केले. मा. भाई वैद्य, डॉ. जया सागडे, अॅड. आव्हाड आणि न्या. पी. बी. सावंत यांच्याशी सल्ला-मसलत करून एक निवेदनाचा मसुदा तयार केला आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना १८ डिसेंबर २०१७ रोजी प्रत्यक्ष भेटून शिष्टमंडळामार्फत निवेदन देण्याचे निश्चित करण्यात आले. या शिष्टमंडळात सय्यदभाई, शमसुद्दिन तांबोळी, जमीर शेख, दिलावर शेख आणि युवा कार्यकर्ता समीर शेख यांचा समावेश होता. खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यासाठी सहकार्य केले.

या शिष्टमंडळासमवेत डॉ. विनय सहस्त्रबुद्धेही उपस्थित होते. पंतप्रधानांनी या विषयावर सविस्तर चर्चा केली आणि मंडळाच्या वतीने प्रस्तावित विधेयकात समाविष्ट करावयाच्या तरतुदींचे निवेदन देण्यात आले. त्यामध्ये नमूद करण्यात आले होते की, केवळ तलाक-ए-बिद्दत संदर्भातच विधेयक न आणता तलाकच्या सर्व प्रकारांचा समावेश विधेयकात असावा. तसेच तलाक व्यतिरिक्त बहुपत्नीत्व, निकाह हलाला यावरही बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. प्रामुख्याने तलाकची प्रकरणे न्यायालयाच्या कक्षेबाहेर न होता न्यायालयीन प्रक्रियेद्वारेच सोडवली जावीत आणि जोपर्यंत न्यायालयीन प्रक्रियेद्वारे घटस्फोट होत नाही, तोपर्यंत पतीने केलेला दुसरा विवाह बेकायदेशीर समजण्यात यावा.

यावर पंतप्रधान म्हणाले, "त्रिवार तलाक हा विषय धार्मिक नसून तो मुस्लीम महिलांच्या अधिकारासंदर्भात आहे. आम्ही जाणीवपूर्वक विधेयकाचा मसुदा परिणामकारक व्हावा यादृष्टीने प्रयत्न करत आहोत." पंतप्रधानांनी अशी ग्वाही दिली की, शासन मंडळाने केलेल्या सर्व शिफारसी लक्षात घेऊन, त्या पद्धतीची राजकीय इच्छाशक्ती तयार करून एक सर्वसमावेशक, सर्व मुद्द्यांना



*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत खासदार विनय सहस्त्रबुद्धे आणि शिष्टमंडळ.*

स्पर्श करणारा मसुदा तयार करेल. पंतप्रधानांसमवेत झालेली ही चर्चा आशादायी होती. या शिष्टमंडळाने अनेक केंद्रीय मंत्री आणि विविध पक्षांच्या खासदारांना भेटून त्यांनाही निवेदन दिले.

दरम्यान मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळ, जामियात उलेमा-ए-हिंद आणि धर्मवादी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यास आणि शासनाच्या प्रस्तावित विधेयकास कडाडून विरोध केला.

प्रस्तावित विधेयकामध्ये तलाक-ए-बिद्दतचा वापर करणाऱ्या पतीस तीन वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि हा कायदा दखलपात्र आणि अजामीनपात्र असणार असल्याचे कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने २२ ऑगस्ट २०१७ रोजी ३ विरुद्ध २ असा निवाडा देऊन वर्षानुवर्षे प्रचलित असलेला 'तलाक-ए-बिद्दत' रद्द केला. यात न्या. रोहिंग्टन एफ. नरिमन, उदय ललित आणि कुरियन जोसेफ यांनी ही पद्धत इस्लामबाह्य असल्याचे व धर्माचा अविभाज्य भाग नसल्याचे स्पष्ट केले. तर भारताचे प्रमुख न्यायाधीश जे. एस. खेहर आणि न्या. एस. अब्दुल नजीर यांनी विरुद्ध भूमिका मांडली.

शेवटी २८ डिसेंबर २०१७ रोजी तोंडी तिहेरी तलाकबंदी विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले, पण राज्यसभेत ते प्रलंबित राहिले. त्यामुळे वटहुकुमाद्वारे हे विधेयक मंजूर करण्यात आले. या विधेयकामध्ये पुढील पाच महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश आहे.

१) पत्नी, तिचे रक्ताचे नातेवाईक किंवा वैवाहिक नातेवाईकांनी तक्रार केल्यास दखलपात्र गुन्हा

२) तोंडी तलाक अजामीनपात्र गुन्हा ठरणार असून, त्यानुसार पतीस तीन वर्षांचा तुरुंगवास

३) हा गुन्हा दाखल झाल्यानंतर पतीला जामीन मिळण्याचा मार्ग बंद होणार

४) जामीनासाठी दंड अधिकाऱ्यांसमोर जावे लागेल, तेथेही पत्नीच्या पुढाकारानेच तडजोड शक्य

५) पत्नीची बाजू ऐकून घेतल्यानंतरच न्यायदंडाधिकाऱ्याला जामीन देता येईल.

३० जुलै २०१९ रोजी राज्यसभेत ९९ विरुद्ध ८४ मतांनी विधेयक संमत करण्यात आले आणि तिहेरी एकतर्फी तलाकवर (तलाक-ए-बिद्दत) बंदी आणणारे ऐतिहासिक विधेयक अस्तित्वात आले. यामध्ये वरील तरतुदींबरोबरच जवळच्या नातेवाईकांनाच गुन्हा दाखल करण्याचा अधिकार असल्याचे आणि पती-पत्नीमध्ये समन्वय झाल्यास न्यायालयाच्या आदेशाने पतीविरोधातील गुन्हा मागे घेण्यास वाव ठेवण्यात आला. मा. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर 'तिहेरी तलाकबंदी कायदा' अस्तित्वात आला.

मुस्लीम महिलांच्या अधिकाराचा लढा काही पाऊले पुढे सरकल्यामुळेया विधेयकाचे मंडळाने स्वागत केले. यासंदर्भात मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी स्पष्ट केले की, ''तिहेरी तलाकविरोधी विधेयक राज्यसभेतही मंजूर झाले, याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाला आनंद आहे. मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात हा योग आला, याचाही विशेष आनंद आहे. मात्र, मुस्लीम महिलांच्या स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या मुक्ततेसाठी अजून व्यापक लढ्याची गरज आहे. अजूनही मुस्लीम पती एक एक महिन्याच्या अंतराने तलाक म्हणत घरी बसून तलाक देऊ शकतो. मुस्लीम महिलांना न्यायालयाशिवाय अन्य मार्गाने तलाक मिळू नये, त्याचबरोबर हलाला,

बहुपत्नीत्व यासारख्या अन्यायकारक प्रथांविरोधात लढा द्यावा लागणार आहे. हे सर्व प्रश्न एकमेकांमध्ये गुंतलेले आहेत. ते एकत्रितच सोडवणे आवश्यक आहे.” *(लोकसत्ता, सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, २३ ऑगस्ट २०१७; महाराष्ट्र टाइम्स, ५ डिसेंबर २०१७; इंडियन एक्स्प्रेस १९ डिसेंबर २०१७; टाइम्स ऑफ इंडिया, २३ डिसेंबर २०१७; लोकसत्ता, ३१ जुलै २०१९; महाराष्ट्र टाइम्स, १ ऑगस्ट २०१९)*

### ३.१२.१८. वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या ४८व्या वर्धापनदिनानिमित्त ‘हमीद दलवाई समाजप्रबोधन पुरस्कार’ मुस्लीम महिलांच्या हक्कांसाठी ‘भारतीय मुस्लीम महिला आंदोलन’ या संस्थेमार्फत लढा देणाऱ्या कार्यकर्त्या डॉ. नूरजहाँ सफीया नियाझ यांना ख्यातनाम अभिनेते नसीरुद्दीन शाह यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी काशीपूर येथील शायराबानो यांचा खटला सर्वोच्च न्यायालयात विना मोबदला चालवून त्यांच्या बाजूने निकाल लागण्यास कारणीभूत ठरलेले ॲड. बालाजी श्रीनिवासन यांना ‘कृतज्ञता पुरस्कार’ माजी केंद्रीय मंत्री मा. आरिफ मोहम्मद खान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ॲड. बालाजी श्रीनिवासन यांनी न्यायालयीन लढाईत यश मिळवले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने २२ ऑगस्ट २०१७ रोजी त्रिवार तोंडी तलाक बेकायदेशीर ठरवला होता.

या वेळी आरिफ मोहम्मद खान यांचे ‘मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणा’ या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी ते म्हणाले, ‘‘मुस्लीम महिला किती मोठ्या प्रमाणावर मुस्लीम धर्मातील पितृसत्ताक रूढीच्या बळी ठरल्या आहेत, हे वेळोवेळी दिसून येते. मुस्लीम पितृसत्ताक रचनेत त्यांचा शब्दशः बुद्धिभेद घडवला गेला आहे. हा याचाच परिपाक आहे की, एकीकडे तिहेरी तलाकबंदी हा निर्णय महिलांच्या भल्यासाठी केला गेला असला, तरी आज ठिकठिकाणी आम्हाला ‘आमच्या धर्मात हस्तक्षेप नको’ म्हणणाऱ्या हजारो मुस्लीम महिलांचे प्रतिमोर्चे निघत आहेत. खरे तर, बुद्धिभेद झालेल्या हजारोंच्या संख्येने मुस्लीम महिलांना हेतूपुरस्सर प्रतिगामी समाजघटक रस्त्यावर आणत आहेत.

‘‘जे ‘कुराणा’तील लेखनही मानत नाहीत आणि या देशाच्या संविधानासही सरसकट झुगारतात, अशा लोकांना मुस्लीम महिलांच्या हक्कांची पायमल्ली करू देत रस्त्यावर बिनदिक्कतपणे मोकळे फिरू कसे द्यावे? मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड आणि त्यांच्यासारख्या संघटना संविधानाची थट्टा करत फिरणे, हे या देशाच्या कायद्याच्याच नव्हे तर, मुस्लीम महिलांच्या सन्मानाच्या दृष्टीनेही भयंकर आहे. ‘तुम कानून बनाते जाओ, हम तीन तलाक देते जाएंगे,’ असे उच्चरवाने म्हणणाऱ्यांना आपण कधीतरी चाप लावणार आहोत की नाही? तिहेरी तलाकविरोधी कायदा शक्य तेवढ्या लवकर करून तिहेरी तलाक हा दखलपात्र गुन्हा ठरायला हवा. तसे न झाल्यास हा कायदा तयार होऊनही त्याची धार नसलेल्या बोथट हत्यारासारखी अवस्था होऊन बसेल”, असा इशारा माजी खासदार आरिफ महंमद खान यांनी दिला. ‘‘फतवे

नाही, आपल्या मनाचे ऐका. आपण आधी माणूस आहोत, मग भारतीय आणि नंतर एखाद्या धर्माचे आहोत. तिहेरी तलाकचा प्रश्न हा प्रश्न केवळ महिलांचा नाही, तर तो मानव अधिकार हननाचा प्रश्न आहे,'' असेही त्यांनी स्पष्टपणे मांडले.

नसीरुद्दीन शाह म्हणाले, ''वंशवाद हा प्रश्न जेवढा गंभीर आहे, तेवढाच समाजातील महिलांचा प्रश्न गंभीर आहे. मुस्लीम समाजातील महिलांच्या गंभीर प्रश्नांना अतिशय प्रतिकूल काळात हमीद दलवाई यांनी वाचा फोडली आणि त्या महिलांच्या न्यायासाठी ते अखेरपर्यंत लढत राहिले. ते शिवधनुष्य पेलणे क्वचितच कुणाला जमू शकेल. आज तसे काम मुळातून करायचे म्हटले, तर दलवाईंना जो विखार सहन करावा लागला, त्याहीपेक्षा कदाचित जास्त विखार आणि विरोध निर्माण होईल, अशी भीती मला वाटते.''

पुढे ते म्हणाले, ''फाळणीच्या काळामध्ये देशात जातीय दंगली, तणावाचे वातावरण होते. त्या वेळी मुस्लीम समाज आणि धर्मातील सुधारणांबद्दल दलवाई यांनी मोठ्या हिमतीने विचार मांडले. दलवाई यांचे विचार ही एक परंपरा असून असंख्य ज्ञात व अज्ञात कार्यकर्ते त्यांची परंपरा कार्याच्या माध्यमातून पुढे नेत आहेत.''

नसीरुद्दीन शाह यांनी हमीद दलवाई यांच्या 'मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया' या पुस्तकातील काही उतारे वाचून दाखवले.

पुरस्काराला उत्तर देताना नूरजहाँ सफीया म्हणाल्या की, "देशातील मुस्लीम महिलांचे प्रश्न वरून दिसतात, त्यापेक्षाही कितीतरी गंभीर असल्याचे विदारक वास्तव एका राष्ट्रीय पाहणीतून पुढे आले आहे. या पाहणीनुसार, मुस्लीम समाजातील महिलांना केवळ अधिकारांपासून वंचितच ठेवण्यात येत नसून, त्यांचे अनेक प्रकारे शोषणसुद्धा केले जात असल्याचे पुढे आले आहे. सुमारे ४७ टक्के विवाहित मुस्लीम महिलांकडे त्यांचा 'निकाहनामा' नाही, तब्बल ७८ टक्के तलाक हे एकतर्फी (पुरुषांच्या बाजूने) होतात, ८२ टक्के विवाहित महिलांकडे स्वतःच्या नावावरील मालमत्ता नाही, तर सुमारे ५५ टक्के मुस्लीम मुलींचे विवाह त्यांच्या वयाच्या १८ वर्षांच्या आत केले जात असल्याचे ही पाहणी सांगते.

"मुस्लीम महिलांना अनेकदा त्यांच्या हक्कांची जाणीवच करून दिली जात नाही. आजही सुमारे ७८ टक्के गृहिणी या कुठल्याही आर्थिक स्रोताविना आपल्या नवऱ्यावर अवलंबून राहतात. तब्बल ७५ टक्के महिलांशी बोलल्यावर लग्नाचे वय १८पेक्षा अधिक असावे, असे त्यांनी सांगितले. तर, ९१ टक्के मुस्लीम महिला या बहुपत्नीत्वाविरुद्ध आहेत.

"आमचा मुस्लीम समाज स्वातंत्र्योत्तर भारताच्या ७० वर्षांनंतरही मागास राहिला, त्याचे कारण म्हणजे आम्हाला रसातळाला नेणारे आमचे नेतृत्व. आता आमचा धर्म त्यांच्या हातातून पुन्हा हिसकावून आमचे हक्क आम्हाला परत हवेत. आम्ही त्यासाठी लढू. 'कुराण' आम्हीच वाचू आणि त्याचा अर्थही लावू."

डॉ. नूरजहाँ सफिया नियाझ यांनी देशभरातील सुमारे पाच हजार मुस्लीम महिलांशी व्यक्तीशः बोलून पाहणीतील अनुभव आणि निरीक्षणातून वरील माहिती दिली.

ॲड. बालाजी श्रीनिवासन हे गेले अनेक वर्ष सर्वोच्च न्यायालयात काम करत आहेत. मुस्लीम

महिलांच्या प्रश्नांबद्दल आस्था बाळगून त्यांना न्याय मिळवून देण्याच्या भावनेतून त्यांनी हा लढा लढला आणि त्यात त्यांना यश आले.

याप्रसंगी नसीरुद्दीन शाह यांच्या सहभागातून मुस्लीम महिलांच्या हक्कासाठी लढा देणारे हमीद दलवाई यांच्या आयुष्यावर अभिनेत्री ज्योती सुभाष माहितीपट तयार करत असल्याची घोषणा केली. मंडळाच्या वतीने अभिनेत्री ज्योती सुभाष यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी मंडळाची भूमिका स्पष्ट केली. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धापनदिनाचा हा कार्यक्रम बुधवार दि. २१ मार्च २०१८ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे पार पडला.

*(महाराष्ट्र टाइम्स, इंडियन एक्स्प्रेस, सकाळ, २२ मार्च २०१८)*




# ४. मंडळाचे काही मैलाचे दगड

## ४.१ समान नागरी कायदा स्वार्थासाठी नको

भारतीय संविधानाला अपेक्षित असणारा आणि स्त्री-पुरुषांना समान संधी, समान संरक्षण आणि समान न्याय देणारा 'समान नागरी कायदा' अस्तित्वात यावा, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासूनच मागणी केली आणि त्यासाठी आंदोलनही उभारले. यापाठीमागे असणारी भूमिका आधुनिकतावादी, मानवतावादी आणि समाजकल्याणाची आहे. हा कायदा पुढे करून काही तथाकथित समर्थक मुस्लीम द्वेष आणि अपप्रचार करतात. याचाच एक भाग म्हणजे समान नागरी कायद्यासंदर्भात जनजागरण अभियान आयोजित करून महाराष्ट्रात काही ठिकाणी गैरप्रकार घडवून आणला. यात समान नागरी कायद्याचा पुरस्कार केला जात आहे, पण यामुळे त्याचा अपप्रचारच होण्याची शक्यता असल्याने स्वार्थी राजकारणासाठी त्याचा दुरुपयोग केला जाऊ नये, असे आवाहन मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी पत्रकाद्वारे केले आहे.

सय्यदभाईंनी पत्रकात म्हटले आहे की, जनजागरणाच्या काळात 'समान नागरी कायद्या'चा पुष्कळ वापर करण्यात आला. वास्तविक पाहता याला अनेकांचा विरोध आहे. अशा वेळी फक्त मुस्लीम समाजाला दोष देणे योग्य नाही. तसेच अखिल मराठा महासंघाचे अध्यक्ष राहिलेले अण्णासाहेब पाटील यांनी हमीद दलवाई यांची स्वप्नपूर्ती म्हणून 'समान नागरी कायद्या'च्या मागणीची मोहीम सुरू केली आणि सर्व मुस्लीम समाजावर दोषारोप ठेवून सामान्य मुस्लिमेत्तरांच्या मनात मुस्लिमांविषयी तिटकारा निर्माण केला. वास्तविक दलवाईंना समतेसाठी, मानवी हक्कांसाठी हवा असलेला 'समान नागरी कायदा' हा पाटील यांना अभिप्रेत नाही, याचा मंडळास खेद वाटतो. दलितांना मानवी हक्क मिळावेत, असेही हमीद दलवाईंचे स्वप्न होते. तथापि पाटील हे आरक्षणविरोधी असून ते राखीव जागांच्या विरोधात आंदोलन उभे करतात.

ज्या भागात कुटुंबनियोजनाचा योग्य प्रचार झाला, तेथे मुस्लिमांनी हिंदूंच्या बरोबरीने मोठ्या प्रमाणावर कुटुंब नियोजन केले आहे, हे आकडेवारीने सिद्ध झाले आहे. तरी आपले स्वार्थी राजकारण साधण्यासाठी कोणीही दुसऱ्या समाजावर शिंतोडे उडवून राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोचवू नये. तसेच समाजपरिवर्तनाचे खरे कार्य करणाऱ्यांची अडचण करू नये, असे आवाहन सय्यदभाईंनी केले.

पुणे व सोलापूर येथे झालेल्या दंगलीचा शासनाने निःपक्षपातीपणे छडा लावून दोषी व्यक्तींना शासन करावे, अशी मागणी करून सय्यदभाईंनी मुस्लीम लीगचे ए. एम. बनातवाला यांना पोलीस आयुक्तांनी पुणे-प्रवेशबंदी केल्यामुळे पोलिस आयुक्तांचे अभिनंदन केले. *(सकाळ, २२ फेब्रुवारी १९८२)*

## ४.२ मंडळाचे मुस्लीम महिला मदत केंद्र

मंडळाच्या वतीने मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर जनजागृती आणि या प्रश्नांच्या निवारणासाठी व्यक्तिगत कायद्यातील अन्यायकारक तरतुदी रद्द करण्याची मागणी सातत्याने करत असताना अनेक महिला पुढे आल्या. त्यांनी धाडसाने आपल्यावरील अन्यायाची कैफियत मांडायला सुरुवात केली. नजमा बांगी किंवा रजिया पटेल यांच्यासारख्या समतावादी कार्यकर्त्यांनी धाडसाने पुढे येऊन आंदोलनात्मक पवित्रा घेतला. त्यामुळे सर्वसामान्य मुस्लीम महिलांना बळ मिळाले आणि त्यांनी घराबाहेर पडून मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे आपले प्रश्न मांडायला सुरुवात केली. अशा अनेक महिलांना कायमस्वरूपी मदत, मार्गदर्शन, समुपदेशन आणि कायद्याचे पाठबळ देण्यासाठी मंडळाच्या वतीने ६ जुलै १९८२ रोजी पुण्यात 'मुस्लीम महिला मदत केंद्र' स्थापन करण्यात आले. शहरातील आणि जिल्ह्यातील तलाकपीडित आणि अन्य अन्यायग्रस्त महिला अधिकाधिक संख्येने महिला मदत केंद्राकडे धाव घेऊ लागल्या.

त्यांना महिला म्हटल्याने त्या तिशीपस्तीशीच्या अथवा त्यावरील वयाच्या स्त्रिया असाव्यात असा समज होतो, पण वस्तुस्थिती तशी नाही. त्यातील बहुसंख्य १४ ते २२ वर्षांच्या मुली आहेत. संसाराविषयीची त्यांची गोड स्वप्ने, नंतरच्या उदध्वस्त जीवनातून निर्माण झालेला कडवटपणा, समाजाविषयीची चीड या कोणत्याही समाजातील युवतींच्या भावभावनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यथा आहेत.

त्यांची तलाकची अथवा नवऱ्याने टाकून देण्याची कारणे तीच जी इतर समाजातही दिसतात. अर्थात इतर समाजात तलाक अथवा घटस्फोट सहजासहजी मिळत नाही आणि त्याहीपेक्षा इतर समाजात घटस्फोटाला सामाजिक मान्यता नाही, हा मोठा फरक आहे. त्यामुळे इतर समाजात कौटुंबिक संघर्ष होतात, काही वेळा मुलींचा छळही होतो, पण त्यांना बेवारशी होऊन दुसऱ्याच्या, बहुधा माहेरच्या घरात तुकडे मोडून परित्यक्तेचे जीवन जगण्याची पाळी येते.

### अत्यंत दयनीय अवस्था

मुस्लीम समाजात तलाकला सामाजिक आणि धार्मिक मान्यता असल्याने मुस्लीम तरुणींची स्थिती अत्यंत दयनीय असते, असे मुस्लीम महिला मदत केंद्रात मदतीसाठी आलेल्या तरुणींच्या संख्येवरून स्पष्ट होते.

या सर्वांची तलाकची कारणे जवळपास सारखीच असतात. नवऱ्याला बायको आवडत नाही. सासूला सून आवडत नाही, बायकोला मूल होत नाही, नवरा दारुड्या असतो, त्याचे बाहरचे प्रकरण असते, वगैरे वगैरे. ही सर्वसाधारणतः गरीब समाजातील कारणे. तर वकील, डॉक्टर नवरेमंडळी माहेरच्याकडून अद्ययावत फर्निचर, स्कूटर-कारची मागणी करतात. ती पूर्ण न झाल्यास तलाक दिला जातो.

फिलिप्सच्या कारखान्यात चार आकडी पगार मिळवणाच्या कर्मचाऱ्याची २२ वर्षांची

तलाकपीडित पत्नी म्हणते की, मी शिकलेली असल्याने नोकरी करीन. माझ्या माहेरच्यांना भार होणार नाही. पण मी तलाक मिळालेली म्हणून माहेरी बसले, तर माझ्या धाकट्या बहिणींची लग्ने कशी होणार? मी कोर्टातून नोटीस दिली, तर दिराने शूट करण्याची धमकी दिली. दरम्यान नवऱ्याने दुसरे लग्नही केले.

या व अशा निवेदनांवरून मुस्लीम समाजातील परंपरावाद्यांचा दांभिकपणा सिद्ध होतो. या परंपरावाद्यांच्या मते तलाकपीडित महिलेला दुसरा निकाह केव्हाही करता येतो, हे साफ खोटे आहे. उलट तलाकपीडित महिला एकमुखाने सांगतात की, तलाक मिळाला की हिंदू समाजाप्रमाणेच मुस्लीम समाजातही नेहमी मुलींनाच दोषी धरले जाते. तिच्यात काही शारीरिक अथवा मानसिक दोष असला पाहिजे किंवा तिचे प्रेमप्रकरण असले पाहिजे, असेच समाज मानतो, मग तिच्या बहिणीविषयीही प्रवाद उठतात. शेवटी उपाय एकच, ५०-६० वर्षांच्या वृद्धाशी निकाह लावून घ्यायचा.

**सार्वत्रिक घटना**

मुस्लीम महिला मदत केंद्रात आलेल्या या दुर्दैवी मुलीच्या सांगण्यावरून आणखी एक गोष्ट सिद्ध झाली की, तलाक ही सार्वत्रिक घटना आहे. त्यांच्यातील सिद्धान्तवाद्यांचा असा दावा असतो की, धर्माने तलाकाची सर्रास परवानगी दिली असली, तरी प्रत्यक्षात असे तलाक फारसे कोणी घेत नाहीत आणि ही परवानगी नवऱ्याप्रमाणे बायकोलाही असते. व्यवहारात फारशा बायका तलाक मागतच नाही आणि मागितला तरी तो मिळत नाही.

दुसरे म्हणजे हा तलाक इतका सर्रास दिसतो की, या तलाकपीडित मुलींच्या माहेरी तिची आई अथवा मोठ्या बहिणी आणि नणंदा वगैरेही तलाकपीडित असतात. हेच दुःख पुण्यात सासर असलेल्या आणि आता तासगाव तालुक्यातील एका खेड्यात माहेरी जाऊन राहिलेल्या विशीतल्या मुलीचे होते. ती म्हणाली, “माझे तिसरीपर्यंत शिक्षण झाले. एक मुलगी होताच दुधपित्या मुलीसह नवऱ्यानं मला टाकून दिले. आईही घटस्फोटित. एक बहीणही तशीच. कशी गुजराण करावी आम्ही?” धार्मिक वातावरणात वाढलेली ही मुलगी पुढे भाबडेपणाने म्हणते, “अल्ला, आमच्यासारख्या गरिबांचा पालनकर्ता आहे. आमच्या मुस्लीम कायद्यात माझ्यासाठी आणि माझ्या छोट्या मुलीसाठी काहीतरी सोय असली पाहिजे.”

दुर्दैवाने तशी सोय मुस्लीम कायद्यात नाही, पण क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्ये आहे. याबाबतीत मुस्लीम महिलांना हक्काचा पोटगीचा आधार मिळवून देण्याचे महान कार्य सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी केले होते. १९७८मध्ये या कायद्याच्या १२५व्या कलमाखाली कोणत्याही जातीधर्माच्या घटस्फोटितेला पोटगी मिळवून घेण्याचा हक्क शाबित केला. या ऐतिहासिक निवाड्याच्या आधारे मंडळाने आतापर्यंत महाराष्ट्रातल्या सुमारे १५० महिलांना पोटगी मिळवून दिली.

यात पोटाप्रमाणेच आर्थिक प्रश्नही गुंतलेला असतो, हे मंडळाकडे आलेल्या महिलांच्या अडचणीतून लक्षात आले. म्हणूनच मंडळ तलाक प्रकरणात दोन्ही बाजूंची, खरे म्हणजे वरपक्षाची

समजूत काढून घर पुन्हा नांदावे यासाठी प्रयत्न करते. त्यासाठी कार्यकर्त्यांना एस.टी.तून खेडोपाडी चकरा माराव्या लागतात. जमातीच्या बुजूर्गांना पटवून द्यावे लागते. अशा प्रकारे उदध्वस्त होऊ पाहणारे दोनशेपेक्षा अधिक संसार मंडळाने नव्याने जुळवले. नाईलाज झाला तेथेच पोटगीचे दावे लावले. मंडळाच्या या मानवतावादी कार्याला सहकार्य देण्यासाठी सबंध महाराष्ट्रातून कार्यकर्ते पुढे येतात. त्यात महिलाही मागे नाहीत. पुण्यात ॲड. श्रीमती नजमा शेख व अन्वर राजन हे जसे काम पाहत, तसेच साताऱ्याला गुरुवार पेठेत एन. ए. शेख यांच्या घरातील महिला मदत केंद्रात डॉ. श्रीमती मणेर व हरून पटेल मदत करत. अमरावतीला शेख वजीर पटेल, सोलापूरला स्टेशन रोडवर महंमद हनीफ तांबोळी, फलटणला शुक्रवार पेठेत प्रा. विलायत शेख, वाईला महमूदभाई दासवाले, नगरला शहाजी रोडवर इब्राहिम पठाण, कोल्हापूरला हुसेन जमादार, निपाणीला महंमद गौस नाईक असे कार्यकर्ते मुस्लीम महिलांचे विविध प्रश्न सोडवीत असत. मुस्लीम महिलाही एकेकट्या अथवा नातेवाईकांच्या मदतीने या केंद्रावर जाऊन आपल्या अडीअडचणी सोडवून घेत असत.

**कार्यक्षेत्र वाढवणार**

हे काम आणखी वाढवण्यासाठी सय्यदभाई आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भिवंडी, मालेगाव, मनमाड, निपाणी या ठिकाणी अशी महिला मदत केंद्रे उघडण्यासाठी हालचाली केल्या. या बाबत कोणा कार्यकर्त्यांना व इतरांना काही माहिती अथवा पत्रव्यवहार करावयाचा असल्यास त्यांनी सय्यदभाई, सरचिटणीस, मुस्लीम सत्यशोधक मंडळ, १२ बॉम्बे रोड, पुणे - ४११ ००३ या पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले होते.

*(महाराष्ट्र टाइम्स, २१ जुलै १९८२)*

## ४.३ महिला मदत केंद्राचे ईद मिलन

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुस्लीम महिला मदत केंद्रातर्फे २५ जुलै १९८२ रोजी रमजान ईद निमित्त रास्ता पेठ, पुणे येथे तलाकपीडित महिला आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात सुमारे ७० तलाकपीडित महिला मुस्लीम समाजातील कार्यकर्ते तसेच पत्रकार उपस्थित होते. मुस्लीम महिलांचे प्रश्न मुस्लीम कार्यकर्त्यांना लक्षात यावेत आणि प्रसारमाध्यमांतून त्यास प्रसिद्धी मिळावी, असा या कार्यक्रमाचा उद्देश होता. दै. ‘महाराष्ट्र हेराल्ड’चे संपादक एस. डी. वाघ, दैनिक ‘प्रभात’चे संपादक माधवराव खंडकर, मा. भाई वैद्य, अरविंद किर्लोस्कर, ॲड. एस. ए. रेहमान, ॲड. नजमा शेख, ऊर्जामंत्री प्रा. असिर यांच्या पत्नी शर्फुनिसा, मुलगी ताहिरा, शमशाद शेख, अय्याज सय्यद, डॉ. एस. एम. शेख, कमल पाध्ये, विद्या बाळ आणि अनेक सामाजिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

मंडळाच्या वतीने चालवण्यात येत असलेल्या कायदा सल्ला केंद्रास श्रीमती जनाबाई किसन बनकर यांनी १०१/- रुपयाची देणगी दिली. याप्रसंगी श्रीमती बानो शेख (२२), फरिदा शेख (१९), झुबेदा इनामदार (२२) आणि इतर तलाकपीडित महिलांनी सांगितले की, केवळ तलाक, पोटगी मिळाली म्हणून आमचा लढा संपलेला नाही. मुस्लीम समाजात जोपर्यंत पुरुषांप्रमाणे स्त्रीलाही समान अधिकार प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत आमचा लढा चालूच राहील.

अत्यंत क्षुल्लक कारणांवरून तलाक देऊन मुस्लीम महिलांचे आयुष्य बरबाद करण्यात येते. पुरुष दुसरे लग्न करून मोकळे होतात, मात्र महिलांचे पुनर्विवाह होऊन संसार उभे राहणे कठीण असल्याचे या महिलांनी प्रतिपादन केले.

*(केसरी, २६ जुलै १९८२; महाराष्ट्र टाइम्स, २७ जुलै १९८२)*

## ४.४ तलाक देण्याची कारणे – अनंत बागाईतकर

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २६ जानेवारी १९८३ रोजी पुणे जिल्हा तलाकपीडित महिलांचा मेळावा पुण्यात महात्मा फुले हायस्कूल, नाना पेठ येथे आयोजित करण्यात आला होता. यातील महिलांच्या समस्यांवरील लेख)

'कुछ नहीं, दिल से उतर गयी बोले और बस्स तलाक दे दिया!' हे होते बानूबीला तलाक देताना तिच्या नवऱ्याने दिलेले कारण. हा प्रकार केवळ अमानुष नाही. धर्माचा चुकीचा अर्थ लावून स्त्रियांना कस्पटासमान लेखणाऱ्या मुस्लीम पुरुषाच्या बेताल, बेलगाम प्रवृत्तीचा आरसा आहे.

बानूबीच्या तलाकसाठी दिलेले वरील कारण जितके किरकोळ आहे, तेवढीच तकलादू कारणे इतर स्त्रियांचीही होती. केवळ आवडत नाही म्हणून अत्यंत सहजपणे जेथे तलाक दिला जातो, मग चारित्र्याची आणि अन्य खोटी कारणेही तलाकसाठी पुढे करणे सहज शक्य आहे.

मेहेरून्निसाची कहाणी फारशी वेगळी नाही. तिच्या लग्नाला आठ वर्षे झाली. पती-पत्नीत संबंध तसे चांगले होते, पण पतीच्या घरचे लोकच चमत्कारिक. त्यांनी दोघांत तेढ निर्माण केली. पती एका मोठ्या कंपनीत चांगल्या पगारावर काम करतो.

**अक्षरशः घराबाहेर**

सासरच्या लोकांनी आम्हाला दोघांना भेटू न देण्याचाच चंग बांधला होता, असे मेहेरून्निसाने सांगितले. ती म्हणाली, "पती कामावरून परत आला की, पोरे बाबा म्हणून चिकटायला जायची पण सासू माझ्यावर खेकसायची,आताच तो कामावरून आला आहे, त्याला त्रास देऊ नये एवढेही कळत नाही? तुझी पोरं घेऊन बाहेर जा.' मग मला पोरांसह अक्षरशः घराबाहेर उभे केले जाई."

मेहेरून्निसाची शोकांतिका इथेच संपलेली नव्हती. तिला तीन मुलांसह व पोटातल्या मुलासह सासरच्यांनी बाहेर काढले. तिच्याकडे हलाखीशिवाय दुसरे काहीच नव्हते. सुपारीच्या पुड्या भर, कपडे शिव, असे करून रोजची तीन ते साडेतीन रुपयांची कमाई सुरू झाली. आणखी एक वाईट प्रसंग म्हणजे इंदिरा कम्युनिटी किचनमध्ये काही कार्यकर्त्यांच्या मदतीने दीडशे रुपयांची नोकरी मिळण्याची शक्यता होती, पण महिलेने शस्त्रक्रिया करून घ्यावी, अशी अट होती. मेहेरून्निसाचे म्हणणे असे की, "मी शस्त्रक्रिया केली की, सासरच्यांना मला वाईट चालीची ठरविण्यास एक चांगले कारण मिळाले असते. मग माझी पोटगी तर दूरच, दावाही गेला असता." अखेर तिला ही नोकरी मिळाली नाही. सुपारीच्या पुड्या भरणे चालूच राहिले.

**चार दिवसांत दुसरे लग्न**

मरियमबीची हकीकतही अशीच. ती म्हणाली, "नवरा चाळीस वर्षाचा, एका पायाने अधू. बांगडयांचे दुकान चांगले चालणारे. घरी टी.व्ही.सुद्धा आहे. पण आता सांभाळायला तयार

नाही. घरातून हाकलून लावले. दुसरे लग्नही ठरवले. ते आता चार-पाच दिवसांत होईलही!

नवरा पोटगी द्यायलाही तयार नाही. कारण आपण गरीब असल्याचे सांगतो. पण एका पायाने अधू असल्याने अपंगांना संजय निराधार योजनेतर्फे मिळणारे चाळीस-पन्नास रुपयांचे अनुदान मात्र तो महिन्याला घेतो, असेही तिने सांगितले.

या शोकांतिकांना अंत नाही. एका महिलेस आपल्यावरील प्रसंग सांगतांना रडूच कोसळले. ती पुढे बोलूच शकली नाही. या महिलांमध्ये शाहनवाझसारख्या सातवीपर्यंत शिकलेल्या १६-१७ वर्षांच्या मुलीचाही समावेश आहे, लग्नानंतर आठ दिवसांतच तलाक मिळालेल्या तरुणीचा समावेश आहे. तर पती संभाळण्यास तयार नाही म्हणून जिद्दीने सायकल शिकून त्यावर भाजीपाला लादून भाजी विकून पोट भरणारी बानुआपाही या महिलांमधीलच आहे.

शिबिरास सव्वाशे ते दीडशे महिला उपस्थित होत्या. अनेक महिलांनी आपली गाऱ्हाणी सभेपुढे मांडली. संकोचत, अडखळत का होईना, पण या महिलांनी आपली कैफियत मांडली. काही महिलांच्या तोंडून प्रथम शब्दच फुटत नसत. तेव्हा सय्यदभाई व नजमा शेख यांना महिलांना बोलते करावे लागे, पण महिला बोलल्या. हमीद दलवाईंनी लावलेल्या रोपट्याला आजही हळूहळू का होईना पण पाने फुटत आहेत.

**बोलके उदाहरण**

मुळात मुस्लीम समाज, त्यांचा धर्म हा एक बंदिस्त कप्पा आहे आणि या कप्प्यातील महिला लोकांसमोर आपली गाऱ्हाणी मांडतात, याचे महत्त्व नाकारून चालणार नाही. इराणमध्येही आयतुल्ला खोमेनींच्या धर्मांध राजवटीने स्त्रियांवर लादलेल्या बंधनांविरुद्ध स्त्रियांनी मोठ्या प्रमाणांत निदर्शने केली होती, हेही विसरता कामा नये. याचे एकच बोलके उदाहरण शिबिरांतच घडले. मंचरहून बऱ्याच स्त्रिया शिबिरास येणार होत्या. पण त्यांना तेथे कळले की, पुण्याला आपल्याला एका मोर्चात भाग घ्यावा लागणार आहे. तेथे बरेच लोकही जमणार आहेत वगैरे. हे समजल्यानंतर अर्थातच यातल्या बहुतेक महिलांनी पुण्याला जाण्याचा विचार रद्द केला. पण तीन महिला शिबिराला आल्या. हा प्रकार सांगून त्या म्हणाल्या, "बाकीच्यांनी न येण्याचे ठरविले. पण आम्ही म्हटले की, आपण एकदा जायचे ठरविले ना! आता काहीही, मोर्चा असो किंवा नसो आपण पुण्याला जायचेच व आम्ही पुण्याला आलो." तीनजणी का होईना, त्या आल्या याला महत्त्व आहे.

या शिबिराला विधी महाविद्यालयाचे प्राचार्य सत्यरंजन साठे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. रत्नाकर महाजन, श्रीमती विद्या बाळ, मंडळाकडून आलेली तलाकची प्रकरणे कोणतीही फी न घेता चालवणारे वकील बाळासाहेब सुपेकर आदी उपस्थित होते.

**सर्वच स्त्रियांचा प्रश्न**

साठे, महाजन किंवा विद्या बाळ यांनी हा प्रश्न केवळ मुस्लीम स्त्रीचा नसून सर्व स्त्रीवर्गाचा आहे, असे मानून त्याविरुद्ध लढा दिला पाहिजे, असे सांगितले. मुस्लिमांमध्ये स्त्रीला सोडून

देण्याची पद्धत जितकी सोपी, त्याच्या उलट हिंदूमध्ये घटस्फोट देणे अत्यंत अवघड. पण शेवटी या दोन्हींचे पर्यवसान स्त्रियांच्या वाढत्या हालातच होते. या मुद्द्यावरच वक्त्यांनी भर दिला. महाजनांनी कालबाह्य रूढी आम्ही फेकून देणार आहोत की नाहीत, असा सवाल उपस्थित केला.

सय्यदभाई व नजमा शेख यांनीही शेवटी सांगितले की, 'कुराण' बदलण्याचा आमचा आग्रह नाही. तलाकची जी पद्धत आहे ती बंद करण्यासाठी आमचा लढा आहे. चार लग्ने करा, पहिल्या बायकोलाही सोडा, पण दुसरी बायको करताना पहिल्या बायकोला न्याय देणार आहात काय, हा आमचा सवाल आहे. यात चूक काय आहे? पण आमची पुरुषप्रधान संस्कृती, समाज-व्यवस्था आणि त्यास पोषक असणारे धार्मिक कर्मकांड आपले वर्चस्व अजून टिकवून आहे. आमची न्यायसंस्था व शासनही मूक आहे. न्या. कृष्णा अय्यर यांच्यासारखे एखादेच न्यायमूर्ती पुढे येतात की ज्यांच्या निकालामुळे मुस्लीम स्त्रीला पोटगीसाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यास तरी परवानगी मिळते. बुडत्याला काडीचा आधार मिळाला आहे. तो आता बुडणार नाही. *('केसरी', १ फेब्रुवारी १९८३)*

## ४.५ मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर समिती

मंडळामार्फत मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर चालवण्यात येत आलेल्या आंदोलनाची दखल घेऊन 'सिटिझन्स फॉर डेमोक्रेसी' या संघटनेने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व्ही. के. कृष्णा अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली. लोकशाही मूल्य सामाजिक जीवनात रुजावित यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सिटिझन्स फॉर डेमोक्रेसी प्रयत्नशील असतात. बालविवाह, तलाक, बहुपत्नीत्व, पत्नीच्या देखभालीकडे दुर्लक्ष अशा अनेक मुस्लीम महिलांच्या समस्यांबाबत समितीने चौकशी करण्याचे ठरविले. यासंदर्भात प्रागतिक मुस्लीम मतांचा विचार करून समितीमार्फत कायदेशीर उपाययोजनाही सुचविण्याचे निश्चित केले. अनेक रिवाजांमुळे मुस्लीम महिलांच्या सामाजिक आर्थिक भूमिकेचे अवमूल्यन झाले आहे.

'सिटिझन्स फॉर डेमोक्रेसी' ही संस्था जयप्रकाश नारायण यांनी स्थापन केली होती. या समितीत सामाजिक कार्यकर्ते डॉ. रत्नाकर महाजन, श्रीमती नूरजहाँ रज्जाक (MP), प्रा. मोईन शाकीर, प्रा. कुलसुम पारेख, प्रा. अलू दस्तुर आणि डॅनियल लतिफी यांचा समावेश होता. मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी लक्षात आणून दिले होते की, मुस्लीम महिलांना त्यांच्या पतीकडून अमानवी वर्तणूक देण्यात येते आणि विवेकाचा आधार न घेता तलाक व बहुपत्नीत्वाचा वापर करतात. तसेच तलाकनंतर मुलांचा ताबाही आईकडे देण्यात येत नाही. त्यामुळे काही भावनिक प्रश्न निर्माण होतात. मुस्लीम समाजाला मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील दुष्परिणामांबद्दल अज्ञान असल्याने मुस्लीम नेते या कायद्याचा राजकीय शस्त्र म्हणून वापर करतात. म्हणूनच सामान्य मुस्लीम 'समान नागरी कायद्या'ला विरोध करतो. *(सकाळ, इंडियन एक्स्प्रेस, २८ मार्च १९८३)*

## ४.६ दुसऱ्या लग्नाचा बँड थांबवून पहिलीस तलाक

मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे मनमानी तलाक देण्याचे आणि मनमानी सवत आणण्याचे अनेक प्रकार समोर येत असत. १० डिसेंबर १९८४ रोजी पहिल्या बायकोला नांदवणार नाही आणि तिला तलाकही देणार नाही. उलट तिला 'सडा-सडा के मारूंगा' अशी दहशत घालून दुसऱ्या लग्नासाठी 'सेहरा' बांधून सज्ज झालेल्या नवरदेवाला आपल्या दुसऱ्या लग्नासाठी वाजणारा बँड थांबवून पहिल्या पत्नीला तलाक देण्यास मंडळाने भाग पाडले. ही घटना अशी की, पुण्यातील पुणे-मुंबई रस्त्यावरील पाटील इस्टेट या झोपडपट्टीशेजारी राहणाऱ्या अबूबकर मोमीन याचा दुसरा विवाह होता. पण ७ वर्षांपूर्वी विवाह झालेल्या नसीमबानो या पहिल्या पत्नीला त्याने तलाक दिला नव्हता. या दोघांमध्ये वाद सुरू झाल्यावर ३ वर्षांपासून त्याने नसीमबानोला व मुलीला माहेरी घालवून दिले होते. तिचे वडील कासम नदीम यांनी अबूबकर यांनी नसीमबानोला नांदवायला न्यावे यासाठी खूप प्रयत्न केले, पण ते व्यर्थ ठरले. शेवटी त्यांनी अबू बकरने नसीमला तलाक द्यावा, अशी मागणी केली, पण तीही त्याने धुडकावून लावली होती. १० डिसेंबर १९८४ रोजी त्याचा दुसरा विवाह होणार असल्याचे कासम नदीम यास समजल्यावर त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे संपर्क साधला. तेव्हा मंडळाचे काही कार्यकर्ते घेऊन सय्यदभाई लग्न मांडवात गेले व त्यांनी अबूबकर मोमीन यांना प्रथम नसीम बानोला तलाक द्या, मगच दुसऱ्या विवाहाला उभे रहा असे बजावले. तत्पूर्वी पुण्यातील मरीआई पोलीस चौकीवर कासम नदीम यांच्यातर्फे अबूबकर यांच्या दुसऱ्या लग्नाबद्दल तक्रारही नोंदवली आणि या लग्न मांडवासमोर मंडळातर्फे निदर्शने करणार असल्याचे ठरवले. मरीआई पोलीस चौकीचे फौजदार वसंतराव म्हेत्रे यांनी अर्जदाराला संरक्षणाचे आश्वासन दिले व ते त्यांच्याबरोबर लग्न मांडवाच्या ठिकाणी गेले. शेवटी लग्नमांडवात तंग झालेले वातावरण, बंद झालेला बँड आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा निग्रह, यापुढे अखेर अबूबकर मोमीन यांना हार पत्करावी लागली. त्यांनी नसीमबानो या पहिल्या पत्नीस तलाक लिहून दिला आणि मेहेरची रक्कमही दिली. *(सकाळ, ११ डिसेंबर १९८४)*

## ४.७ तलाकप्रश्नी विचारमंथन

तलाकच्या प्रश्नावर देशभर ठिकठिकाणी धर्मगुरू, विचारवंत आणि सुधारणावादी कार्यकर्ते यांच्यात चर्चा आणि वाद प्रतिवाद सुरू झाले. या निमित्ताने एका महत्त्वाच्या प्रश्नावर विचारमंथन सुरू आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. रविवार, ८ ऑगस्ट १९९३ रोजी दिल्ली येथे विचारवंतांची एक परिषद आयोजित केली गेली. त्यात विविध क्षेत्रांतील मान्यवर, विचारवंत, प्राध्यापक, पत्रकार, धर्माभ्यासक, वकील अशा लोकांना निमंत्रण देण्यात आले. विविध ठिकाणी, विविध नावांनी संघटना स्थापन होऊन तोंडी तलाक आणि व्यक्तिगत कायद्यातील सुधारणा या संदर्भात अधिकाधिक संघटना कार्यरत झाले आहेत. हयात मुस्लीम वुमेन सेंटर, कम्पॅरॅटिव्ह रिलीजन फोरम आदी संघटनांनी 'तलाक संदर्भातील तरतुदी आणि कौटुंबिक जीवनावर त्याचे परिणाम' या विषयावर ३१ जुलै १९९३ रोजी परिषद आयोजित केली. त्यात सय्यदभाईंनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय पातळीवर एकच व्यासपीठ तयार करून 'अहले हदिस' या संघटनेने घेतलेल्या तलाक संदर्भातील भूमिकेस पाठिंबा देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मानवतावादी व न्याय्य भूमिकेसाठी डॉ. के. एस. दुर्राणी आणि ज्योत्स्ना चटर्जी यांनी परिषदेचे आयोजन केले. ३१ जुलै १९९३ रोजी दिल्ली येथे आयोजित केलेल्या परिषदेनंतर लखनौमध्ये मुस्लीम महिला मदत केंद्र सुरू करण्यात आले. या परिषदेत अधिकाधिक तलाकपीडित महिलांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. *(सकाळ, ६ ऑगस्ट १९९३)*

मंडळाच्या वतीने देशाच्या राजधानीत तलाकपीडित महिलांची पहिलीच परिषद नोव्हेंबर १९९३ मध्ये आयोजित करण्यात येत असल्याचे सय्यदभाईंनी सांगितले. *(सकाळ, १५ ऑगस्ट १९९३)*

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या या प्रयत्नांचा परिणाम म्हणून मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने तीनदा तलाक उच्चारून घटस्फोट देणे, हे गुन्हेगारी कृत्य आहे, असे सांगितले. त्या निमित्ताने लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने सांगितले.

मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने तलाकच्या निमित्ताने चर्चा करून 'समान नागरी कायदा' आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आक्षेप नोंदवला. *(सकाळ, १० सप्टेंबर १९९३)*

## ४.८ एकतर्फी तलाकच्या विरोधात मंडळ समिती स्थापणार

एकतर्फी तोंडी तलाक देण्याची मुस्लीम समाजातील पद्धत बदलण्याबाबत लोकशिक्षण करण्यासाठी देशपातळीवर 'तलाक रोकथाम कमिटी' स्थापन करण्याचा प्रयत्न मुस्लीम सत्यशोधक मंडळ करणार असल्याचे या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते सय्यदभाईंनी १८ मार्च १९९६ रोजी पत्रकार परिषदेत सांगितले. महिलांचे मतही विचारात न घेता त्यांना तलाक देण्याचा हा प्रकार अन्यायकारक आहे. ही परिस्थिती बदलण्याकरता लोकशिक्षण करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने मंडळ देशभर लोकांशी संवाद साधणार. प्रस्तावित तलाक रोकथाम कमिटीची स्थापना त्याच दृष्टीने करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले.

कुटुंब नियोजनाची सक्ती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मुस्लीम समाजाच्या प्रश्नांबाबत युती सरकार उदासीन असल्याचे नमूद करून ते म्हणाले की, प्रादेशिक भाषेतून शिक्षण, कुटुंब नियोजन, हिंदू-मुस्लीम ऐक्य असे अनेक प्रश्न असतानाही राज्य सरकारचे तिकडे लक्ष नाही. मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रविवार, २४ मार्च १९९५ रोजी मुस्लीम महिलांची परिषद आयोजित करण्यात आली. पुण्यातील भारत इंग्लिश स्कूलमध्ये एक दिवसीय परिषदेत तलाकपीडित महिलांचे अनुभवकथन, मंडळाचे हुसेन जमादार, सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, प्रा. ऐनुल अत्तार, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, डॉ. सत्यरंजन साठे, मा. भाई वैद्य आणि जावेद कुरेशी यांचीही या परिषदेत भाषणे झाली.

मुस्लीम महिलांचे प्रश्न, त्यांचे अनुभव कथन आणि 'भारतीय धर्मनिरपेक्षतेसमोरील आव्हाने' या विषयावर परिषदेत सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. *(सकाळ, १९ मार्च १९९६, २५ मार्च १९९६)*

## ४.९ पोटगीचा अधिकार

सुमारे १२५ वर्षांपूर्वी, १८७२मध्ये आपल्या देशात प्रथम फौजदारी कायदा करण्यात आला. त्यानंतर २५ वर्षांनी, म्हणजे १८९८मध्ये त्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यात आले. या १८९८च्या फौजदारी कायद्याच्या ४८८व्या कलमात नवऱ्याने सोडलेल्या, टाकून दिलेल्या महिलांना उपजीविकेसाठी पोटगी मिळण्याची तरतूद केली होती. ही तरतूद विवाह, घटस्फोटविषयक कायद्यात न होता फौजदारी कायद्यात कशी झाली, याबाबत अनेकांना कुतूहल होते. इंग्लंड, अमेरिका यांसारख्या देशांमध्ये विवाह, घटस्फोट, वारसा, संपत्ती या विषयांवर सर्वांसाठी एकच 'समान नागरी कायदा' होता, परंतु भारतात असा कायदा करणे, येथील भिन्न धर्मियांमुळे शक्य नव्हते. हा भारतातील सर्व धर्मसमूहांना आपल्या कायद्यात / धर्मात हस्तक्षेप वाटला, म्हणून हिंदू नेत्यांसह सर्वांचा याला विरोध, आक्षेप होता. तेव्हाचा हिंदू कायदाही सनातनी स्वरूपाचाच होता. हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चनांसाठी स्वतंत्र कायदे झाले.

त्या काळात परित्यक्तांची स्थिती अत्यंत वाईट होती. अशा महिलांना किमान आर्थिक आधार मिळावा त्यांना मॅजिस्ट्रेटकडे जाऊन तक्रार करता यावी, सुस्थितीतील नवऱ्याकडून ५०० रुपयांपर्यंत त्वरित पोटगी मिळावी असा विचार ठेवण्यात आला होता. पोटाची खळगी भरण्यासाठी तिने वाईट मार्गाचा अवलंब करू नये, म्हणून ही तरतूद सर्व धर्मियांसाठी केली होती. काही दशकांपूर्वी हिंदूतही कायदेशीर घटस्फोटाची तरतूद नव्हती. ख्रिश्चनांना घटस्फोट घेणे फारच कठीण. मुस्लिमांत तलाकची तरतूद होती. 'क्रिमिनल कोड'चा हेतू विफल करण्यासाठी लोक तोंडी एकतर्फी तलाकचा वापर करत होते. 'इद्दत' काळाची (तलाकनंतरचे तीन महिने) पोटगी दिली की, आपली जबाबदारी संपली, असा प्रघात समाजात रुजत होता. इद्दत काळात समझोत्याचे प्रयत्न व्हावेत, सोडलेल्या बायकोला दिवस गेले आहेत का, याची खात्री व्हावी, संभाव्य जनकत्वासंबंधी गुंतागुंत टाळता यावी, हा हेतू त्यामागे होता. तलाक दिला आहे, मेहेरची रक्कम पाठवली आहे, इद्दत कालावधी संपला आहे, असा युक्तिवाद करून सोडून दिलेल्या पत्नीला पोटगीचा हक्क आहे, परंतु तलाक दिलेल्या महिलांना तो हक्क नाही, कारण ती आता पत्नी राहिली नाही, असे सांगण्यात येत असे.

हिंदू समाजात पूर्वी कायदेशीर घटस्फोट नव्हते. साधारण १९४६ सालानंतर महाराष्ट्रातील (जुन्या मुंबई प्रांतात) हिंदूंमध्ये घटस्फोटाचे काही प्रमाणात किरकोळ स्वरूपात प्रकार सुरू झाले. नंतर १९५५मध्ये 'हिंदू मॅरेज ॲक्ट' अस्तित्वात आला आणि हिंदू पुरुषांनीही (पोटगी टाळण्याच्या बाबतीत) मुस्लिमांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला. बायकोला घटस्फोट दिला आहे, त्यामुळे ४८८वे कलम लागू पडत नाही, असे युक्तिवाद न्यायालयात होऊ लागले. न्यायाधीशांनाही ते मान्य करावे लागत असत. मग 'पत्नी' कोणाला म्हणायचे असा प्रश्न उपस्थित झाला. ४८८व्या कलमातील पत्नीची व्याख्या फारच मर्यादित होती.

या सर्व प्रश्नावर विधी आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्ये

सुधारणा करून 'पत्नी' या शब्दाची व्याख्या व्यापक करण्यात आली. या ४८८व्या कलमाचे रूपांतर १९७३च्या क्रिमिनल कोडच्या १२५, १२६ आणि १२७ या कलमांत झाले. १२५व्या कलमातील तरतुदीनुसार जिला नवऱ्याकडून घटस्फोट मिळाला आहे, पण जिने पुन्हा लग्न केलेले नाही, अशी 'पत्नी'ची व्याख्या करण्याबरोबरच औरस-अनौरस संतती, अज्ञान मुले, स्वसामर्थ्य नसणारी पंगू मुले, आई-वडील या सर्वांची सोय करण्याची जबाबदारी घटस्फोट देणाऱ्या सुस्थितीतील पुरुषावर येऊन पडली. हे लोक वाऱ्यावर सोडले जाऊ नयेत, अशी भावना त्यापाठीमागे होती. परंतु या सर्वांसाठी मिळून दरमहा द्यायची रक्कम किंवा एकूण पोटगीची रक्कम पाचशे रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये, असे हे कलम सांगते. ही रक्कम वाढवण्याची तरतूद होणे आवश्यक होते.

कलम १२५ (३) नुसार नवऱ्याने दुसरे लग्न केले किंवा दुसऱ्या स्त्रीबरोबर संबंध ठेवले, तर तिला पोटगी मिळते. त्यानुसार म्हणजे १२५ (३)प्रमाणे मुस्लीम समाजातील बहुपत्नीत्वाचा आधार घेऊन दुसरे लग्न झाल्यास, पहिल्या पत्नीला पोटगी मागण्याचा अधिकार या तरतुदीत होता.

कलम १२७नुसार संबंधितांतील परिस्थितीत बदल झाल्यास काय करावे, या संबंधी उहापोह होतो. परिस्थितीत बदल म्हणजे घटस्फोटीत स्त्रीने पुनर्विवाह केल्यास, तिला पूर्वीच्या नवऱ्याकडून पोटगी मिळणार नाही; औरस-अनौरस मुलांसाठी कोणी मोठी संपत्ती दिल्यास, तशी तरतूद केल्यास त्यांना मदत मिळणार नाही; पोटगी देणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न घटले किंवा बंद झाले, तर त्या परिस्थितीत वेगळा विचार करण्याचे हे कलम स्पष्ट करते.

कलम १२७ (३) (ब) असे स्पष्ट करते की, एखाद्या महिलेचा घटस्फोट झाला असेल आणि त्या महिलेला तिच्या नवऱ्याकडून लग्नाच्या वेळी किंवा घटस्फोटानंतर तिच्या तरतुदीची रक्कम, त्यांच्या परंपरेनुसार, चालीरितीनुसार किंवा व्यक्तिगत कायद्यानुसार देण्यात आली असेल, तर कोर्टाने पोटगी संदर्भात दिलेला निवाडा रद्द करण्यात येईल. या कलमात अशा 'घटस्फोटासंदर्भात' हा उल्लेख फार महत्त्वाचा आहे. यावरूनच मोठे बदल निर्माण झाले होते. मुस्लीम समाजात लग्नाच्या वेळी 'मेहेर' दिला जातो. तो जास्तीत जास्त किती द्यायचा, हे 'कुराणा'त किंवा व्यक्तिगत कायद्यात सांगितलेले नाही. परंतु कमीत कमी दहा ड्रमस् (साधारण दहा रुपये) द्यायला हवेत, असा उल्लेख आढळतो. परंतु मुलाच्या कुवतीला शोभेल एवढी तरी रक्कम 'मेहेर' असावी अशी अपेक्षा दिसते. 'कुराणा'चा हवाला देणाऱ्यांनी आपण आपल्या आर्थिक क्षमतेनुसार 'मेहेर' देतो का, याबद्दलही आत्मपरीक्षण केले पाहिजे. (आजही अकरा रुपये मेहेर देणारी मंडळी आहेत.) 'मेहेर' लग्नाच्या वेळी देण्यात येतो किंवा काही भाग लग्नाच्या वेळी किंवा काही भाग विशिष्ट काळानंतर द्यावा. परंतु नंतर अशी प्रथा पडली की, तो लग्नाच्या वेळी, लग्नानंतर किंवा तलाकच्या वेळीही दिला जातो. कलम १२७ (३) (ब) ज्याचा वर उल्लेख केला, त्यानुसार घटस्फोटाच्या वेळी (पारंपरिक किंवा व्यक्तिगत कायद्यानुसार) काही रक्कम मिळाली असल्यास त्या महिलेला पोटगी मिळणार नाही, असे सांगते.

या पार्श्वभूमीवर 'मेहेर' म्हणजे काय? ती लग्नाच्या वेळी द्यायची रक्कम आहे की,

तलाकच्या वेळी द्यायची रक्कम आहे? या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने विस्ताराने उहापोह केला आहे.

१९७० साली न्या. कृष्ण अय्यर यांनी ताहिरा बेगम यांच्या खटल्यात पोटगीचा निर्णय दिला. या वेळीही खासदार शहाबुद्दीन यांनी त्या निर्णयाला विरोध करणारे बिल संसदेत मांडण्याचा प्रयत्न केला. या वेळी खा. प्रमिलाताई दंडवते व अन्य खासदारांनी विरोध केला व १२५ कलमात बदल होऊ दिला नाही.

## ४.१० शहाबानो प्रकरण

न्या. यशवंतराव चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्या. डी. ए. देसाई, न्या. ओ. चिन्नप्पा रेड्डी, न्या. वेंकट रामय्या आणि न्या. रंगनाथ मिश्रा यांच्या खंडपीठाने २३ एप्रिल १९८५ रोजी दिलेला निर्णय मुस्लीम समाजच नव्हे, तर एकंदर भारतीय समाजासाठी एक ऐतिहासिक निवाडा ठरला. या घटनेने अनेक पदरी प्रश्न निर्माण केले.

मध्यप्रदेशमधील इंदूरच्या शहाबानो बेगमला व्यवसायाने वकील असणाऱ्या नवऱ्याने म्हणजे महंमद अहमद खान यांनी १९७५ साली घराबाहेर काढले. १९३२मध्ये त्यांचा विवाह झाला होता. त्यांना तीन मुलगे व दोन मुली आहेत. शहाबानोच्या म्हणण्यानुसार (तेव्हा) त्यांच्या पतीचे, महंमद खान यांचे वार्षिक उत्पन्न साठ हजार रुपये आहे. एप्रिल १९७८मध्ये शहाबानोने दरमहा रु. पाचशे पोटगी मिळावी म्हणून दावा लावला. त्यातून निसटण्यासाठी नोव्हेंबर १९७८मध्ये महंमद खानने शहाबानोस तलाक दिला. तलाक दिल्यामुळे ती माझी बायको नाही व पोटगी देण्याची माझ्यावर जबाबदारी नाही, असा युक्तिवाद केला. असे असतानाही, दोन वर्षे दरमहा रु. २०० पोटगी, मेहेर व इद्दतची तीन हजार रुपयांची रक्कम न्यायालयात अनामत म्हणून ठेवली. त्यामुळे मी पोटगी देण्यास बांधील नाही, असाही त्याचा युक्तिवाद होता. परंतु मॅजिस्ट्रेटने तो अमान्य करून त्याने शहाबानोस दरमहा पंचवीस रुपये पोटगी द्यावी, असा आदेश दिला.

न्यायालयाच्या या आदेशाविरुद्ध शहाबानोने पोटगीची रक्कम वाढवून मिळावी म्हणून मध्यप्रदेश उच्च न्यायालयात अपिल केले. तेथेही महंमद अहमद खानचा युक्तिवाद अमान्य होऊन, त्याने शहाबानोला दरमहा १७९ रुपये २० पैसे पोटगी द्यावी, असा निकाल दिला. उच्च न्यायालयाच्या या निकालाविरुद्ध महंमद अहमद खानने सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली. तेथे हे प्रकरण आले, तेव्हा मुस्लीम व्यक्तिगत कायदे मंडळाने आपलेही म्हणणे ऐकून घ्यावे, अशी विनंती केली. ती सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली. 'जमात उलेमा-ए-हिंद' यांच्याकडून आलेली अशीच विनंतीही मान्य केली. या दोन्ही संस्थांनी महंमद खान यांना पाठिंबा दिला आणि या सर्व विषयावर 'कुराणा'त काय सांगितले आहे, यावर विवेचन केले. कायदेतज्ज्ञ महंमद युनुस सलान आणि शकील अहमद यांनी मुस्लीम बोर्डाची बाजू मांडली, तर नामवंत कायदेतज्ज्ञ, गुजरातचे पहिले मुख्य न्यायाधीश देसाई यांनी 'जमात उलेमा-ए-हिंद'ची बाजू मांडली. महंमद खान यांची बाजू पी. गोविंद अय्यर यांनी आणि शहाबानो यांची बाजू ॲड. डॅनियल लतिफ यांनी मांडली.

या अपिलासंदर्भात सर्वोच्च न्यायालयापुढे दोन मुख्य प्रश्न होते. त्यातील पहिल्या 'इद्दत' कालावधीत पोटगी दिली की, मुस्लीम नवऱ्याची आपल्या घटस्फोटीत पत्नीच्या पालनपोषणाची जबाबदारी संपते का? आणि दुसरा प्रश्न मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात घटस्फोटाच्या वेळी काही रक्कम देण्याची तरतूद आहे का?

या दोन प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शोधण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने १८७२

सालापासूनचा इतिहास विचारात घेतला. तसेच पोटगी संदर्भात 'कुराणा'त काय सांगितले आहे याचा अभ्यास केला. महंमद झफ्रूल्ला खान यांचा 'दि कुराण' हा ग्रंथ, तसेच डॉ. अल्लमा नूरी, डॉ. परस दिवान आॅर्थर अबरी, तय्यबजी, दिनशा मुल्ला, डॉ. ताहेर महमुद इ. तज्ज्ञांच्या विचारांची दखल घेतली. 'कुराणा'चा अर्थ सांगणाऱ्या पाकिस्तानात प्रसिद्ध झालेल्या मरमाड्यूक पिक्टहॉल यांच्या 'दि मिनिंग ऑफ ग्लोरिअस कुराण' या ग्रंथातील संदर्भाचा सर्वोच्च न्यायालयाने आढावा घेतला. त्याचबरोबर पाकिस्तान सरकारने नेमलेल्या विवाह व कौटुंबिक कायदे या संबंधातील मंडळाच्या अहवालाचाही न्यायालयाने आधार घेतला. असा सखोल अभ्यास करूनही धर्ममार्तंडांनी या न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून आरडाओरड का केली, याचे आश्चर्य वाटते.

महंमद खानचे अपील खर्चासह फेटाळून लावणारे आणि शहाबानो बेगम पोटगीच्या वाढीसाठी अर्ज करू शकेल, असे स्पष्ट करणारे निकालपत्र देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, "'मुस्लीम पर्सनल लॉ' आणि 'क्रिमिनल प्रोसिजर कोड'च्या १२५व्या कलमातील तरतुदींत परस्परविरोध, संघर्ष आहे, असे सुरुवातीला गृहीत धरून आम्ही आत्तापर्यंत विचार केला, खरोखरच तसा संघर्ष असेल तर १२५व्या कलमातील तरतुदीच अंतिमतः बंधनकारक राहतील, पण मुळात आमचे गृहीततत्त्वच चुकीचे आहे. कारण स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यास असमर्थ असणाऱ्या आपल्या घटस्फोटीत पत्नीच्या चरितार्थासाठी तिला पोटगी देण्याबाबत मुस्लीम व्यक्तिगत कायद्याने मुस्लीम पुरुषांवर घातलेले बंधन आणि १९७३च्या कलमातील तरतुदी यांच्यात कसलाच विरोध नाही. आपल्या घटस्फोटीत पत्नीला पोटगी देण्याचे बंधन 'कुराणा'नेच मुस्लीम नवऱ्यावर घातले आहे. 'मेहेर' हे पत्नीबद्दलच्या सन्मानाचे प्रतीक आहे. मेहेरमधून ठरलेल्या रकमेतून तिच्या लग्नाच्या व नंतरच्या काळातील सर्वसामान्य गरजा भागवल्या जाव्यात, अशी अपेक्षा असते. मुस्लीम व्यक्तिगत कायद्याच्या पाठ्यपुस्तकातील विवेचने पाहता, नवऱ्यावर अशी बंधने नसल्याच्या दाव्याला आधार मिळत नाही. फार तर घटस्फोटाच्या परिणामामुळे अगतिकता येत नसणाऱ्या किंवा ज्या स्त्रिया भटकल्या जाणार नाहीत, अशा मर्यादित स्त्रीवर्गापुरती ही विवेचने ग्राह्य धरता येतील आणि म्हणूनच स्वतःची उपजिविका करण्यास असमर्थ असणाऱ्या घटस्फोटीत स्त्रीच्या बाबतीत 'इद्दत' कालावधीपुरती पोटगी दिल्यानंतर नवऱ्याची जबाबदारी संपते, असा मुस्लीम व्यक्तिगत कायद्याच्या आधारे करण्यात येणारा युक्तिवाद अमान्य करून फेटाळायला हवा. स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यास ती समर्थ नसेल, तर क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५व्या कलमाचा आधार तिला घ्यायला हवा."

मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाने नामवंत वकील उभे करण्याबरोबरच एक लेखी निवेदनही सर्वोच्च न्यायालयाकडे सादर केले होते. एकदा 'मेहेर' दिल्यानंतर तलाकपीडित महिला आपला चरितार्थ कसा चालवते, याची चौकशी करणेसुद्धा अप्रस्तुत असल्याची खोचक टिपणी या निवेदनात आहे. 'मेहेर' घेतल्यानंतर घटस्फोटीतेने पुतणे, भाचे व अन्य नातेवाईकांवर अवलंबून राहावे, असा सल्ला कायदेमंडळाने दिला. बोर्डाच्या या भूमिकेबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र खेद प्रदर्शित केला. नवऱ्याला मोकळे सोडून पोट भरण्यासाठी नातेवाईकांवर अवलंबून राहावे

किंवा त्यांची लाचारी पत्करावी, हा सल्ला मुस्लीम महिलांनी स्वीकारावा व मान्य करावा, ही भूमिका स्त्रीबद्दलची मानसिकता व्यक्त करते.

खरे तर न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करून महिलांनी बोर्डाविरुद्ध आवाज उठवायला हवा होता, परंतु त्यांची दिशाभूल करण्यात आली व त्यांना उघड्यावर पाडण्याचे प्रयत्न झाले.

१२५व्या कलमातील तरतुदी सर्व धर्मियांना सारख्याच लागू आहेत आणि मेहेर म्हणजे घटस्फोटाच्या वेळी नव्हे, तर लग्नाच्या वेळी सन्मानाचे प्रतीक म्हणून दिलेली रक्कम आहे. म्हणूनच स्वतःची उपजिविका करू न शकणाऱ्या घटस्फोटीत मुस्लीम महिलेस पोटगी मिळवण्याचा अधिकार आहे, असा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना देशातील सर्वधर्मीय लोकांसाठी 'समान नागरी कायदा' करण्याचे राजकीय धैर्य दाखवण्याचे आवाहन राजकर्त्यांना केले आहे. कोणत्याही धर्मातील लोक आपल्या वैयक्तिक कायद्यात सुधारणा व्हावी, म्हणून पुढे येणार नाहीत आणि एक-दोन प्रकरणी आपद्ग्रस्तांना न्याय दिल्याने सर्वांना सारखा न्याय दिल्यासारखे होणार नाही. व्यापक न्यायदानाच्या दृष्टीकोनातूनही सर्व नागरिकांना विवाह, घटस्फोट, पोटगी, मदत इ. संदर्भात सारखा न्याय मिळण्यासाठी समान कायदा आणण्याची नितांत आवश्यकता आहे.

न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी निकालपत्रात म्हटले आहे की, 'क्रिमिनल प्रोसिजर कोड'मधील १२५वे कलम हे खरोखरच धर्मनिरपेक्ष आहे. स्वतःची उपजिविका करू न शकणाऱ्या, आगतिक म्हणता येईल, अशा वर्गातील लोकांना त्वरेने आणि लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात आला आहे. प्रामुख्याने रोगप्रतिबंधक स्वरूपाच्या या तरतुदी कोणत्याही धर्माच्या आड येणाऱ्या नसतात. अर्थात अशा तरतुदी संबंधितांच्या वैयक्तिक कायद्याची जागा घेऊ शकणार नाहीत, हे खरे आहे; पण त्याचबरोबर १२५व्या कलमाची कार्यकक्षा घटनात्मक मार्गांनी विशिष्ट धार्मिक गट वा समाजापुरती मर्यादित करण्यात आलेली नाही. तोपर्यंत संबंधितांचा धर्म अगर त्यांना लागू असणारा वैयक्तिक कायदादेखील १२५व्या कलमातील तरतुदींची कार्यवाही रोखू शकणार नाही. विपन्नावस्था आणि व्यक्तीची सामाजिक बांधीलकी आधारभूत मानूनच १२५व्या कलमात आपल्याजवळच्या अगतिक नातेवाईकांची पालनपोषणाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. कायद्याची नैतिक बाजू आणि सामाजिक नीतिमत्ता यांची धर्माशी सांगड घालता येणार नाही.

धर्म, शरीयत, मुस्लीम समाज यांची मक्तेदारी केवळ आमच्याकडेच आहे, असे समजणाऱ्या मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळ, जमात उलेमा-ए-हिंद आणि इतर धर्मांध नेते यांना धर्मनिरपेक्ष भूमिकेतून देण्यात आलेला हा निवाडा जिव्हारी लागला. हा शरीयत व इस्लाममधील हस्तक्षेप आहे, अशी ओरड सर्वत्र पसरवण्यात आली. सर्वसामान्य समाज आणि मुस्लीम महिलांची दिशाभूल केली गेली. मोठ्या प्रमाणात जनआंदोलन उभारून, प्रक्षोभक भाषणे करून, दबावतंत्राचा वापर करण्यात आला. जवळपास सर्व राज्यांतून मोर्चे, परिषदा भरवण्यात येऊ लागल्या. शासनावर, न्यायालयांवर आरोप होऊ लागले. 'कुतुबमिनार एवढ्या उंचीची प्रेते रचली गेली तरी चालेल, पण हा हस्तक्षेप सहन करणार नाही' अशी भाषा बोलली जाऊ लागली.

दुसरीकडे उत्तर प्रदेशात शहाबानोवर दबाव टाकून 'मला न्यायालयाचा हा निर्णय/निवाडा नको आहे' असे म्हणून अंगठा (सही) घेण्यात आली. तेव्हाचे पंतप्रधान राजीव गांधी व काँग्रेसवर दबाव वाढतच गेला. राजकीय स्वार्थ डोळ्यांसमोर ठेवून, निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून काँग्रेसला शरणागती पत्करण्यास धर्मवादी भाग पाडत होते. हिंदुत्ववादी, जमातवादी शक्तीही या वातावरणात आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत होत्या.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने या कालावधीत सर्व शक्ती एकवटून पुरोगामी विचार पुढे आणण्याचा प्रयत्न केला. सय्यदभाई यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान, राष्ट्रपती, कायदामंत्री, मुस्लीम खासदार, महिला खासदार यांना भेटून निवेदने देण्यात आली. न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करून शहाबानोला पुण्यात आणून त्यांचा सत्कारही केला. मोर्चे, उपोषणे, पत्रकार परिषदा, मेळावे घेऊन पोटगी व १२५वे कलम कायम राहावे, समान नागरी कायदा करावा, यासाठी मागणी करण्यात आली. या विषयावर भारतातील मुस्लीम विचारवंतांचे कार्यक्रम आखले.

पुरोगामी विचारवंतही ठिकठिकाणी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत, समर्थन करतानाच इस्लाममधील उदार तत्त्वे, तसेच धर्मनिरपेक्ष कायद्यांचा आग्रह करू लागले. काँग्रेस नेते आरिफ महंमद खान यांनीसुद्धा तेव्हा धर्मनिरपेक्ष भूमिका घेतली, मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हे होत असतानाच केवळ राजकीय फायद्या-तोट्याचा विचार करून राजीव गांधी सरकारने धर्मवाद्यांसमोर शरणागती पत्कारली आणि मुस्लीम समाजाला (न्याय?) देण्यासाठी महिलांना पोटगी मिळवण्याचा हक्क असलेल्या १२५ व्या कलमातून वगळण्यात आले आणि मुस्लीम महिला संरक्षण विधेयक १९८६ संसदेत २३ फेब्रुवारी १९८६ रोजी संमत करण्यात आले.

या कायद्यामध्ये अशी तरतूद करण्यात आली की, कलम १२५ मुस्लिमांना बंधनकारक असणार नाही. म्हणजे 'इद्दत'च्या कालावधीनंतर पोटगीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पती-पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी खर्च देणार नाही. जर पत्नी अगदीच असाहाय्य असेल, तर जवळचे नातेवाईक हा खर्च करतील आणि त्यांना शक्य नसेल, तर वक्फ बोर्ड तिच्या खर्चाचा बंदोबस्त करेल. अशा प्रकारचा कायदा मुस्लीम जमातवाद्यांनी पदरात पाडून घेतला.

या घटनेमुळे मुस्लीम महिलांवर मोठा अन्याय झाला. बहुसंख्याक असणाऱ्या हिंदू समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या, रामजन्मभूमी-बाबरी मस्जिद प्रकरणास खतपाणी मिळाले. राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हान निर्माण झाले आणि धर्मनिरपेक्ष पुरोगामी शक्तींना फार मोठा हादरा बसला. समाजात अस्वस्थता निर्माण झाली.

मुस्लीम धर्मात महिलांवर अन्यायकारक ठरणाऱ्या परंपरा आहेत. इस्लाम आणि 'कुराण'ने महिलांना पूर्णपणे संरक्षण दिले आहे, सन्मान केला आहे, समता दिली आहे, असे काही उदारमतवादी विश्लेषण करताना दिसतात, परंतु इस्लाममध्ये सर्वांत मोठा हस्तक्षेप करून १९३७ साली इंग्रजांनी शरीयत कायदा आणला. तो स्वीकारण्यात आला. त्याचे संरक्षण करण्याची ठेकेदारी मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाने घेतली. घटस्फोट, बहुपत्नीत्व, पोटगी, मूल दत्तक घेणे या संदर्भातील तरतुदी केवळ अन्यायकारक नसून भारतीय संविधानाच्या आत्म्याला छेद

देणाऱ्या आहेत.

भारतातील न्यायालयांनी या संदर्भात अनेक वेळा न्यायाची भूमिका घेऊन समान नागरी कायद्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले आहे. शासनाला हा कायदा कधी अस्तित्वात येणार? त्या दृष्टीने काय प्रयत्न होत आहेत? असे प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारले. परंतु उत्तर देण्याऐवजी न्यायालयाला असा प्रश्न विचारण्याचा अधिकारच नाही, अशी भूमिका घेऊन ते धुडकावून लावण्यात आला.

पोटगीसंदर्भात वरील निर्णय (मुस्लिमांना १२५वे कलम बंधनकारक नाही) झाला असला, किंवा मुस्लीम महिला सुरक्षा कायदा १९८६ अस्तित्वात आला असला, तरी पती-पत्नी एकमेकांच्या संमतीने, प्रतिज्ञापत्र देऊन त्यांचे खटले १२५व्या कलमानुसार चालावेत, अशी भूमिका घेऊ शकतात, न्यायालयास विनंती करू शकतात, ही तरतूदही १९८६च्या मुस्लीम महिला सुरक्षा कायद्यात आहे. कायद्यातील वेगवेगळ्या तरतुदींचा आधार घेत, योग्य परिस्थितीनुसार कायद्याचा अर्थ लावून देशातील मुंबई, लखनौ, इंदूर, इलाहाबाद, गुवाहाटी आणि अन्य उच्च न्यायालयांनी अनेक प्रकरणांत मुस्लीम महिलांना पोटगी मिळवून देण्याबाबत निवाडे दिले आहेत. कुटुंब न्यायालयांतूनही पोटगी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. शहाबानो प्रकरणानंतर किंवा नव्या कायद्याच्या अस्तित्वानंतर अनेक निवाड्यांतून मुस्लीम महिलांना पोटगीच्या रूपाने किंवा एकरकमी एकदाच मोठी रक्कम देऊन आधार देण्यात आला आहे. परंतु त्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात काही प्रश्न आहेत. अनेकांकडे कायमचे उत्पन्न नसते, काही सेवानिवृत्त झालेले असतात, पोटगी देण्याचे टाळण्याचे प्रयत्न होतात.

## ४.११ तलाक मुक्ती मोर्चा – कोल्हापूर ते नागपूर

तलाकपीडित महिलांचे प्रश्न आणि मुस्लीम महिलांना पोटगी मिळावी, यासाठी 'राज्यस्तरीय तलाक मुक्ती मोर्चा' काढण्याची कल्पना मंडळाच्या कोल्हापूर शाखेने योजली. १९८५चा राजर्षी शाहू पुरस्कार मंडळाच्या कार्यकर्त्या मेहेरून्निसा दलवाई यांना घोषित झाला. या कार्यक्रमानिमित्त त्या कोल्हापूर येथे गेले असता कोल्हापूरचे कार्यकर्ते हुसेन जमादार, मेहेरून्निसा दलवाई आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी राज्यस्तरीय तलाक मुक्ती मोर्चाबाबत विचारविनिमय करून कोरेगावकर ट्रस्ट, दलितमित्र बापूसाहेब पाटील, दत्त सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सा. रे. पाटील आणि इतर समविचारी संघटनांना भेटून त्याचे नियोजन करण्यात आले.

तोंडी तलाक कायद्याने बंद करा, मुस्लिमांना द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करा, शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलेस देऊ केलेली पोटगी कायम राहावी आणि जमातवादी मुस्लिमांच्या हस्तक्षेपास पायबंद घालावा, या मागण्या घेऊन तलाक मुक्ती मोर्चा काढण्याचे निश्चित केले. याकामी यदुनाथ थत्ते, राष्ट्र सेवा दल, सर्वोदय मंडळ, युवक क्रांती दल, समाजवादी महिला सभा आणि पुरोगामी विचारांच्या संघटना यांच्या सहकार्याने राज्यव्यापी मोर्चा काढण्याची तयारी करण्यात आली. याचे नेतृत्व मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार, बाबुमियाँ बँडवाले, एम. ए. नाईक, आय. एन. बेग, ऐनुल अत्तार, प्रा. मुमताज रहिमतपुरे, वजीर पटेल आणि इतर कार्यकर्त्यांनी केले.

कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी पथनाट्य, पोस्टर्स, भाषणे, बैठका आणि संवाद असा कार्यक्रम आखला. मोर्चाच्या मार्गावरील जिल्हाधिकाऱ्यांना याची कल्पना देऊन निवेदने देण्यात आले. या मोर्चासाठी महाराष्ट्र शासनाच्या राज्यपरिवहन महामंडळातील बस घेण्यात आली होती. प्रत्येक गावात मुस्लिमांच्या बैठका, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य, मुस्लीम मोहल्ल्यातून फेरी असा कार्यक्रम ठरवून पुढील मुक्कामी जाण्याचा आराखडाही तयार करण्यात आला. विविध गावामध्ये स्वागत समित्या तयार करण्यात आल्या.

या मोर्चामध्ये २२ महिला, १४ पुरुष व ८ मुले होती. ३ नोव्हेंबर १९८५ रोजी दुपारी ४ वाजता तलाक मुक्ती मोर्च्याला प्रारंभ झाला. यानिमित्ताने कोल्हापुरातील बिंदू चौकात सभा झाली. त्याला सुमारे २०० महिला आल्या होत्या. फुले–आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आला. कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांना पहिले निवेदन देऊन मोर्चा मिरजकडे निघाला. तिथे पोलीस संरक्षणात आणि स्थानिक मान्यवर, कार्यकर्ते आणि प्रतिष्ठांच्या उपस्थितीत मिरज येथील किसान चौकात मोठी सभा झाली. या वेळी तेथील धार्मिक मुस्लीम संघटनांनी काळे ध्वज आणि बोर्ड लावून या मोर्चाचा निषेध केला. त्यामुळे काही कार्यकर्त्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता मोर्चा सोलापूरकडे जायला निघाला. मिरज, कोल्हापूर येथील बातम्या वर्तमानपत्रांत आल्यामुळे लोकांमध्ये या मोर्चासंदर्भात साधकबाधक चर्चा रंगत

## तलाक मुक्ती मोर्चातील महिला व कार्यकर्ते










होत्या. सोलापुरात प्रा. फक्रूद्दिन बेन्नूर, पन्नालाल सुराणा, शंकर पाटील, बालम शेख यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालयाला निवेदन दिले आणि पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यानंतर जाहीर सभा घेण्यात आली.

पुढे मोर्चा उस्मानाबादला पोहोचला. तिथे मंडळाची सभा झाली. तिला आणि पोस्टर प्रदर्शन पाहायला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. लातूरमध्ये ॲड. मनोहर गोमारे, प्रा. जनार्दन वाघमारे, आरळीकर आणि पुरोगामी कार्यकर्त्यांनी मोर्च्याचे स्वागत केले. बसवेश्वर मंगल कार्यालयात मुक्कामाची व्यवस्था केली होती. तिथपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जवळपास २००० नागरिकांचा मोर्चा नेण्यात आला. जिल्हाधिकारी उमेश सरंगी यांना निवेदन देण्यात आले. लातूरकरांनी तलाक मुक्ती मोर्चासंबंधी चित्रप्रदर्शन भरवले होते. सायंकाळी ४ वाजता परिसंवाद, ६ वाजता पत्रकार परिषद आणि रात्री गांधी चौकात जाहीर सभा झाली.

या वेळी बाबुमियाँ बँडवाले ७५ वर्षांचे होते. आपल्या मनोगतात ते म्हणाले, “मला माहिती आहे की, आम्ही सुधारणावादी काम करतो, म्हणून माझा खून मुसलमानाकडूनच होईल.” त्यांच्या या भाषणामुळे उपस्थित भावनावश झाले. विविध ठिकाणी होणारा विरोध आणि निषेध लक्षात घेऊन या मोर्चातही दगडफेक किंवा अडथळे निर्माण करण्याचा विरोधक प्रयत्न करतील, हे मोर्चेकऱ्यांनी गृहीत धरले होते. लातूर येथील जनता पक्षाने तलाक मुक्ती मोर्चास पाठिंबा दिला. त्याच्या निषेधार्थ १२ मुस्लीम सदस्यांनी जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. ही बातमी वर्तमानपत्रांतही झळकली. ही पुढे होणाऱ्या विरोधाची नांदी होती.

७ नोव्हेंबर रोजी मोर्चा आंबेजोगाईला पोहोचला. मात्र तेथे स्वागत समिती नव्हती. सामाजिक कार्यकर्ते द्वारकादास व शैला लोहिया या पती-पत्नींनी राहण्याची व्यवस्था केली होती. मोर्चासंदर्भात कुतूहलाचे वातावरण असल्यामुळे लोक भेटत होते. मोर्चा तहसील कार्यालयावर गेला, तिथे उपजिल्हाधिकारी दिनेश गित्ते उपस्थित होते. प्रा. सबनीस यांच्या पुढाकाराने नगरपरिषदेच्या सभागृहात सभा झाली. स्थानिक मुस्लिमांनी चर्चा केली.

पुढे मोर्चा परळी वैजनाथ मार्गे परभणीकडे जात असताना परभणीजवळ मोटारसायकल वरून दोघे जण आले. त्यांच्याकडे काळे झेंडे होते. निषेध करत ते बसच्या पुढे चालू लागले. परभणीच्या सिमला लॉजवर उतरण्याची सोय केली होती. लॉजचे मालक मुस्लीम होते. ते हिंदू-मुस्लीम ऐक्य समितीचे पदाधिकारी होते. स्थानिक मुस्लिमांनी त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला होता. तरीही त्यांनी जागा दिली होती. शुक्रवारची नमाज झाल्यानंतर तीन-चारशे लोक संतप्तपणे घोषणा देत आमच्या बसमधील महिलांना अपशब्द वापरून घाबरवण्याचा प्रयत्न करू लागले. मोर्चा काढण्यास स्थानिकांनी विरोध केला, मात्र पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मुस्लिमांनी मोर्चेकऱ्यांना कोणत्याही घोषणा न देण्याची ताकीद दिली. शेवटी जिल्हाधिकाऱ्यांकडे मोर्चाने न जाता निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आतला. मोर्चा रद्द झाल्यामुळे स्थानिक मुस्लिमांनी जल्लोष केला आणि ‘नार-ए-तकबिर अल्लाहू अकबर’, ‘मुस्लीम पर्सनल लॉ कमिटी जिंदाबाद’ अशा घोषणा दिल्या. ‘मुस्लीम पर्सनल लॉ कमिटी’च्या अध्यक्षांनी जमावापुढे प्रक्षोभक भाषणही केले.

बस जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाली. जिल्हा पोलीस प्रमुखांची कार सोबत होती. थोड्याच वेळात जमलेल्या समुदायाने आमची बस अडवली. पोलिसांनी त्यांना बाजूला करण्याचा प्रयत्न केला, मात्र एकाएकी बसवर दगडफेक व्हायला सुरुवात झाली. मोर्चेकरी सीटखाली लपू लागले. शेवटी पोलिसांनी लाठीमार सुरू केला आणि लोक सैरावैरा पळू लागले. बसच्या मार्गामध्ये अडथळा आणण्यासाठी निदर्शकांनी अनेक प्रयत्न केले. ठिकठिकाणी कचराकुंड्या आडव्या टाकल्या होत्या. शेवटी पोलिसांच्या पाठलागामुळे निदर्शक पांगले, दुकाने बंद झाली आणि संचारबंदी सारखे वातावरण निर्माण झाले.

परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना भेटून निवेदन देण्यात आले. आक्रमक मुस्लिमांचा पवित्रा पाहून लॉज मालकाने तेथे थांबण्यास नकार दिला. स्थानिक पत्रकार आणि डाव्या कार्यकर्त्यांनी शासकीय विश्रामगृहात मोर्चेकऱ्यांची व्यवस्था केली. या सर्व वातावरणामुळे सायंकाळची सभा होऊ शकली नाही. अशा वातावरणातही कार्यकर्ते अन्वर अली आणि दोन बुरखाधारी स्थानिक महिला जिल्हाधिकारी कार्यालयात मोर्चाच्या शिष्टमंडळात सहभागी झाले होते.

८ नोव्हेंबर रोजी मोर्चा नांदेडला पोहोचला. तिथेही तणावाचे वातावरण होते. कला मंदिरापाशी मोर्चात सामील होण्यासाठी १० तलाकपीडित महिला जमल्या होत्या, परंतु सनातनी मुस्लिमांनी त्यांना धमकावून पळवून लावले. तरीही एक महिला तिथेच उभी राहिली आणि मोर्चात सहभागी झाली. शहरातील तणाव लक्षात घेऊन घोषणा न देता, घोषणांचे बोर्ड घेऊन मूक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला. या कार्यालयात वसंतराव सांगवीकर यांनी निवेदन स्वीकारले. स्थानिक ४००-५०० लोक मोर्चात सहभागी झाले होते. शासकीय दवाखान्याजवळ पोहचत असताना अचानक गल्लीमधून जमाव पुढे आला आणि बसवर दगडफेक सुरू केली. मात्र पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून वातावरण नियंत्रणात ठेवले. निदर्शकांनी ठिकठिकाणी बसवर दगडफेक केली. मात्र पोलीस बंदोबस्तामुळे प्रकरण चिघळले नाही. दंगल होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी जाहीर सभा टाळण्याचा सल्ला दिला. त्यामुळे रात्री पीपल्स कॉलेजच्या हॉलमध्ये सभा घेण्यात आली. स्थानिक मुस्लीम आणि काही मुस्लीम नगरसेवक या सभेला हजर होते.

हमीद दलवाईंशी मैत्री असणारे प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या महाविद्यालयात ही सभा झाल्यामुळे मोर्चेकऱ्यांना आनंद झाला. या सभेत जमादार आणि मेहेरून्निसा दलवाई यांची भाषणे झाली. गाडीवर होणारी दगडफेक लक्षात घेऊन मंडळाचे कार्यकर्ते आणि बसचे ड्रायव्हर हशमुद्दिन सय्यद यांनी बसच्या खिडक्यांना जाळ्या लावून घेण्याची सूचना केली. नांदेडच्या एस. टी. आगाराने ती मान्य करून जाळ्या बसवून दिल्या.

दुसऱ्या दिवशी बस चंद्रपूरकडे निघाली. परभणी आणि नांदेडमधील तणावाची स्थिती लक्षात घेऊन बसच्या पुढे व मागे पोलिसांच्या ९ गाड्या होत्या. नांदेड जिल्हा हद्द संपेपर्यंत त्या बससोबत होत्या. नांदेड, परभणी येथील दगडफेकीच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रांत पहिल्या पानावर प्रसिद्ध झाल्या. बसवर 'तलाक मुक्ती मोर्चा'चे बॅनर्स होते. त्यामुळे बस ओळखू येत असे, पुढे पोलीस बंदोबस्त नसल्यामुळे मोर्चेकऱ्यांना भीती वाटत होती. सायंकाळी चंद्रपूरला

‘आनंदवना’त पोहोचलो. डॉ. बाबा आमटे दौऱ्यावर असल्याने साधनाताईंनी स्वागत केले. पुढील दोन दिवस दिवाळी होती. त्यामुळे कोणताही कार्यक्रम घेतला नाही. बाबा आमटे यांनी तीन दिवस तिथेच राहण्या-जेवणाची सोय केली. तेथील जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन निवेदन देण्यात आले. त्यांनतर गांधी चौकात स्थानिक नागरिक कृती समितीच्या वतीने जाहीर सभेत तलाकपीडित शरीफ मुल्ला, लैला पटेल, फातिमा सरकार, नियाज परवीन यांनी आपल्या व्यथा मांडल्या. याच ठिकाणी मंडळाच्या कार्यकर्त्यांचे शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये एम. ए. नाईक, आय. एन. बेग, बाबुमियाँ बँडवाले यांनी मनोगत व्यक्त केले.

१३ नोव्हेंबर रोजी मोर्चा अमरावतीला पोहोचला. मंडळाचे कार्यकर्ते वजीर पटेल राहत असलेल्या छायानगरच्या मुख्य रस्त्यावर ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळा’चे कार्यालय होते. तिथे मोठी कमान उभी करून ‘तलाक मुक्ती मोर्चाचे स्वागत’ असे ठळक अक्षरातील बॅनर लावण्यात आले होते. तेथे मोर्चेकऱ्यांना हार घालून स्वागत केले आणि ढोल-ताशांच्या तालावर तलाक मुक्ती मोर्चाची मिरवणूक काढण्यात आली. वजीर पटेल चालवत असलेल्या कुटुंब नियोजन केंद्राच्या इमारतीत राहण्याची व्यवस्था करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी अमरावती आणि जवळपासच्या भागातून सुमारे ५०० मुस्लीम महिला आणि जवळपास चार ते पाच हजार पुरुष मोर्चासाठी जमा झाले. मोर्चात बँड पथक, विविध घोषणा, कापडी बॅनर्स असे एक छान वातावरण निर्माण झाले. जमलेल्या ५०० महिलांमध्ये अनेक बुरखाधारीही होत्या. रस्त्याच्या कडेला अनेक महिला उभ्या राहून कुतूहलाने पाहत होत्या. कोल्हापूरनंतर पहिल्यांदाच इतका चांगला प्रतिसाद पाहून कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. मेहेरून्निसाभाभींनी महात्मा फुलेंच्या पुतळ्यास हार घातला. मोर्चा पुढे चालू लागला, तितक्यात मोर्चाच्या दिशेने दोन दगड आले. पोलिसांच्या दक्षतेमुळे फार विपरीत घडले नाही. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यांनी ते मुख्यमंत्र्यांकडे पोहोचवण्याचे आश्वासन दिले. वजीर पटेल यांच्या प्रबोधनात्मक व विधायक कार्याची पार्श्वभूमी अमरावतीला होती. तेथे मोर्चेकऱ्यांची बैठकही झाली. या बैठकीत राष्ट्र सेवा दलाचे शाम पटवर्धन सहभागी झाले होते.

१५ नोव्हेंबरला मोर्चा बुलढाण्याकडे रवाना झाला. छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी सभेचे आयोजन केले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. इथेही जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. १६ नोव्हेंबरला दुपारी १२ वाजता जळगावला मोर्चा पोहोचला. तिथे भिकचंद शर्मा, भाऊ रायसोनी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या जनसमूहाने स्वागत केले. मोर्चामध्ये माजी खासदार वाय. एम. बोराळे व स्थानिक कार्यकर्ते अग्रभागी होते. नगरपालिकेने येथील एका चौकाला ‘हमीद दलवाई चौक’ असे नाव दिले आहे. या मोर्चासाठी मुंबईहून मुद्दाम प्रतिभा रानडे आल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास घालून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाला. उपजिल्हाधिकारी बनसोडे यांना मागण्यांचे निवेदन दिले.

रात्री नगरपालिकेच्या धर्मशाळा चौकात जाहीर सभा सुरू झाली, तेव्हा काही सनातनी मुस्लीम मंडळी स्टेजवर चालून आली, मात्र पोलिसांनी त्यांना अडवले. अकबर रहमानी या स्थानिक कार्यकर्त्याने शांतता प्रस्थापित करण्यासाठी मदत केली. सभेत प्रा. मुमताज रहिमतपुरे, श्रीमती

मेहेरून्निसा दलवाई यांनी भाषणे झाली. मात्र कार्यक्रम चालू असताना स्टेजकडे दगड भिरकावण्यात आले. त्यात एक पोलीस जखमी झाला, त्यामुळे पोलिसांनी सौम्य लाठीमार करून जमाव नियंत्रित केला.

१७ नोव्हेंबरला मोर्चा औरंगाबादला पोहोचणार होता. सकाळी दै. 'लोकमत'च्या पहिल्या पानावर महाराष्ट्रभर फिरत असलेल्या तलाक मुक्ती मोर्चास औरंगाबाद जिल्हाबंदी घोषित करण्यात आल्याची बातमी होती. स्थानिक मुस्लीम पुढाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून अशी बंदी घालण्याची मागणी केली होती. औरंगाबादमध्ये तलाक मुक्ती मोर्चाच्या विरोधात आणि समर्थनार्थही पत्रके काढण्यात आली होती. तसेच बैठका झाल्या आणि भिंतीवर घोषणाही लिहिल्या होत्या. औरंगाबादमधील वातावरण स्फोटक झाले असल्यामुळे अनुचित प्रकार टाळण्यासाठी ही जिल्हाबंदी करण्यात आली होती. परस्पर जिल्हाधिकाऱ्यांना भेटून निवेदन देण्याचा विचार केला, मात्र बंदीमुळे शक्य झाले नाही.

तलाक मुक्ती मोर्चाच्या स्वागत समितीच्या अध्यक्षा रजिया पटेल यांनी 'हा लोकशाही हक्क डावळण्याचा निंद्य प्रयत्न असून त्याचा आम्ही निषेध करत आहोत' अशी प्रतिक्रिया दिली. तसेच संपादक अनंत भालेराव, ॲड. कमरुद्दिन, माजी आमदार अशोक डोनगावकर, मोतीराज राठोड, सुभाष लोमटे, कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. सय्यद हबिबुद्दिन, कॉ. फक्रूद्दिन आणि इतर कार्यकर्त्यांनी पत्रक काढून जिल्हाबंदीचा निषेध केला. नियोजित पत्रकार परिषद आणि सरस्वती भुवन सभागृहातील सभा रद्द करून तिथे जिल्हाबंदीच्या निषेधात सभा होणार असल्याचे बातमीत म्हटले होते. फौजदाराने जिल्हाबंदीचे समन्स मेहेरून्निसाभाभींकडे दिले. हे समन्स हुसेन जमादार यांच्या नावे होते. फौजदाराने हुसेन जमादारांना सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांनी मोर्चाला जिल्हाबंदी केली आहे. मोर्चातील कोणीही औरंगाबाद जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केला, तरी अटक करण्यात येईल. त्यामुळे कायदा हातात न घेता जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश पाळण्यात आला.

दै. 'लोकमत'मध्ये शहाबानो विषयीची बातमी आली. त्यात शहाबानो पोटगी प्रकरणी पतीने त्यांना पोटगी द्यावी, असा सर्वोच्च न्यायालयाचा दिलेला निर्णय मागे घ्यावा, अशी विनंती खुद्द शहाबानो यांनी केली होती. शहाबानोच्या अंगठ्याचा ठसा असलेले पत्रक औरंगाबादमध्ये वाटण्यात आले होते. दरम्यान शहाबानो यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळानेही त्यांचा पुण्यात टिळक स्मारक मंदिरात सत्कार केला होता. मात्र या बातमीमुळे मोर्चाचा हेतूच कमकुवत झाला. परिणामी मंडळाच्या वतीने मोर्चा बंदीच्या निषेधाचे पत्रक काढून जळगावला मुक्काम करण्यात आला. मंडळाचे कार्यकर्ते शहाबानोने केलेल्या घुमजावाबद्दल चर्चा करत होते, तसेच शहाबानोबद्दल रागही व्यक्त करत होते.

औरंगाबादच्या दिल्लीगेटवर मोर्चाचे समर्थक, स्वागत समितीचे सदस्य आणि नागरिक जमा झाले. तसेच मौलाना आझाद महाविद्यालय, हरसूल, फुलंब्री येथे रस्त्यावर गटागटाने मोर्चाचे विरोधक मोठ्या प्रमाणात जमा झाले होते. १८ नोव्हेंबरला अहमदनगरकडे जायचे होते, परंतु जाताना औरंगाबाद जिल्ह्यातून बस नेता येणार नाही, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्याला वळसा घालून मालेगावकडून पुढे जाण्याचे ठरवले. मात्र पोलिसांनी हा रस्ताही टाळण्याची सूचना दिली. शेवटी नाशिककडून पुढे जात असताना हद्दीवर नाशिकचे डीएसपी अंकोला आपल्या पोलीस ताफ्यासह स्वागतास आले. मालेगावजवळ बस आल्यानंतर पोलिसांच्या गाड्यांची संख्या वाढली. पोलिसांच्या सहा बसेस सोबत होत्या. हत्यारबंद पोलिसांच्या बंदोबस्तात मालेगाव पार करून येवल्यापर्यंत पोलीस बंदोबस्त होता.

प्रतिभा रानडेंनी एका पोलीस अधिकाऱ्याला इतक्या मोठ्या बंदोबस्ताबद्दल विचारले असता, ते म्हणाले की, मालेगावच्या लोकांनी मोर्चेकऱ्यांसह बस जाळून टाकण्याची धमकी दिली होती. त्याची खबरदारी म्हणून सव्वाशे पोलिसांच्या ताफ्यासह बसला मालेगावच्या बाहेर काढले. दुपारी १ वाजता अहमदनगरमध्ये दिल्ली दरवाज्याजवळ बस येताच अचानकपणे बसवर जोरदार दगडफेक झाली, मोठा जमाव जमला. नगरपालिकेच्या हॉलवर उतरण्याची व्यवस्था होती. मात्र तिथे मोर्चेकऱ्यांच्या अगोदरच निषेध करणारे पोहोचले होते. जमावाची संख्या वाढतच होती आणि काळे निशाणे घेऊन 'मुर्दाबाद'च्या घोषणा दिल्या जात होत्या. मोर्चा विरोधात १५ दिवस अगोदरपासूनच जाहीर सभा होत होत्या. मशिदीत प्रक्षोभक भाषणे करून तणाव वाढवण्याचे कारस्थान रचले गेले होते. मोर्चाच्या दिवशी शहरातील मुसलमानांनी आपली दुकाने बंद ठेवून मोर्चाचा निषेध केला. कुठल्याही परिस्थितीत तलाक मुक्ती मोर्चा गावात येऊ द्यायचा नाही, असे विरोधकांनी ठरवले होते. जवळपास १०,००० मुस्लिमांचा मोर्चा ज्यात ३००हून जास्त महिला होत्या, त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून तलाक मुक्ती मोर्चाच्या विरोधात भूमिका मांडली होती. पोलिसांच्या माहितीनुसार ते मोर्चा आणि बसवर हल्ला करण्याच्या तयारीत होते.

एकूण स्फोटक परिस्थितीचा विचार करून हा मोर्चा रद्द करण्याचे ठरवण्यात आले. शेवटी सर्व मोर्चेकरी पोलिसांच्या आग्रहाखातर गाडीत बसले आणि पोलिसांनी सर्वांना सुरक्षितपणे पुण्याच्या दिशेने सोडण्याची तयारी केली, परंतु नगरमधील फाटकाबाहेर पडताना जमावाने मोर्चेकऱ्यांच्या गाडीवर जोरदार दगडफेक केली. मोर्चेकरी खूप घाबरलेल्या अवस्थेत होते. पोलिसांच्या दोन गाड्या सोबत असतानाही स्कूटरवरून दोघे जण पाठलाग करत होते. त्यांनी बसजवळ येऊन ड्रायव्हरच्या दिशेने शिसा फेकून मारला, त्यामुळे गाडीचा आरसा तुटून पडला. ड्रायव्हरला जखमी करून घातपात करण्याचा त्यांचा इरादा होता.

भीती आणि असुरक्षिततेच्या छायेत बस पुण्यात पोहोचली. साने गुरुजी स्मारक राष्ट्र सेवा दलात सर्व कार्यकर्ते विसावले. नाशिकचा दौरा रद्द करून हा मोर्चा परत कोल्हापूरला गेला. त्या ठिकाणी बापूसाहेब पाटील, सुरेश शिपूरकर यांनी स्वागत केले. फुले, आंबेडकर, महात्मा गांधी, शाहू महाराज यांच्या पुतळ्याला हार घालून सभा झाली. त्यात कॉम्रेड गोविंदराव पानसरे, स्थानिक कार्यकर्ते आणि मोर्चातील प्रमुखांची भाषणे झाली.

विधानसभेच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात तलाक मुक्ती मोर्चाचे निवेदन देण्यात आले. त्यासाठी आमदार ॲड. श्रीपतराव शिंदे, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. रूपा कुलकर्णी, डॉ. आरसेकर यांनी सहकार्य केले. नागपूर येथील विमलाबाई जठार सभागृहात जाहीर सभा झाली. त्यात डॉ. बाबा आढाव यांच्यासह अनेकांनी मनोगते व्यक्त केली. त्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या

कार्यास पाठिंबा व्यक्त केला. डॉ. बाबा आढाव, श्रीमती मृणाल गोरे यांच्यासह मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना निवेदन दिले. दरम्यान औरंगाबाद न्यायालयाने तलाक मुक्ती मोर्चास प्रतिबंध केल्याबद्दल नाखुशी व्यक्त केली.

निकाल पत्रात लिहिले होते, "तरुणांचे सामाजिक कृतिशील गट हे रूढ चाकोरीत न बसणारे असले व हितसंबंधी गटांचा त्यांना विरोध असला, तरीही ज्यांच्यावर अन्याय होतो. त्यांना संघटित करण्याचा ते प्रयत्न करतात व लोकांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतात." औरंगाबाद न्यायालयात रजिया पटेल यांच्यावतीने याचिका दाखल केलेली होती. ॲड. भारत लाला वाजपेयी, ॲड. नरेंद्र चपळगावकर, ॲड. अंकुश भालेकर यांनी काम पाहिले आणि राज्य सरकारच्या वतीने ॲड. आर. जी. देव यांनी काम पाहिले. न्यायालयाचा निकाल उशिरा लागला, मात्र तो मोर्चाच्या बाजूने होता. शेवटी कोल्हापूर ते नागपूर तलाक मुक्ती मोर्चाची १६ जानेवारी १९८६ रोजी नागपुरात सांगता झाली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सर्व शाखा प्रमुखांनी शहाबानो प्रकरणात दिल्लीला जाऊन राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री आणि संसद प्रतिनिधींना भेटून निवेदन देण्याचे ठरवले. २० फेब्रुवारी १९८६ रोजी भारतीय दंड विधान संहिता कलम १२५मधून मुस्लिमांना वगळून नवे विधेयक केंद्र सरकार मांडणार असल्याचे समजले. माजी खासदार प्रमिलाताई दंडवते यांनी या काळात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. मुंबई, कोल्हापूर, पुणे, अमरावती, अहमदनगर आणि अन्य ठिकाणाहून ३५ मुस्लीम महिला, ज्यात २२ तलाकपीडितांचा शिष्टमंडळामध्ये समावेश होता. मात्र लोकसभेच्या तांत्रिक कारणास्तव ही तारीख पुढे ढकलण्यात आली. तरीही २० फेब्रुवारीच्या राष्ट्रपतींच्या भाषणानंतर कायदामंत्री अशोक सेन यांना भेटण्याचे ठरले. खासदार मधू दंडवते यांनाही निवेदन दिले. त्यांनी लोकसभेत या विधेयकाला आम्ही विरोध करू, असे आश्वासन दिले होते. नंतर अशोक सेन यांना भेटून निवेदन देण्यात आले. मेहेरून्निसा दलवाई, वजीर पटेल, सय्यदभाईंनी आपले म्हणणे थोडक्यात सांगितले. मात्र मंत्री महोदय ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. ते म्हणाले, "आप लोग मुठ्ठीभर हैं, लेकीन आपको अपोज करनेवाले कई लाख हैं. उलटा यह नया 'मुस्लीम महिला विधेयक' मुस्लीम महिलाओंको न्याय देगा."

या वेळी सोबत प्रमिलाताई दंडवते होत्या. अशोक कुमार सेन त्यांना म्हणाले, "मुझे आप लोगोंसे सहानुभूती हैं, लेकीन इस मामले में मुझे कुछ बताने के बजाये आप लोग बनातवाला, खा. शहाबुद्दीन इन्हे मिलकर कन्विन्स क्यूं नहीं करते?"

दुसऱ्या दिवशी खासदार नजमा हेपतुल्लांना भेटण्यासाठी मोर्चेकरी गेले असता, त्यांनी पुरुषांना बाजूला थांबवून महिलांशीच संवाद केला. त्यात प्रतिभा रानडेही होत्या. नजमा हेपतुल्ला महिलांना त्यांची संस्कृती, पेहराव, आदि. बाबतीत उपदेश करत होत्या. हेपतुल्ला आणि मोर्चातील महिलांमध्ये वाद-प्रतिवादही झाले. नंतर राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांना भेटण्यासाठी महिला, कार्यकर्ते आणि मंडळाचे प्रमुख नेते गेले. घटनात्मक प्रमुख म्हणून राष्ट्रपतींना भेटून वस्तुस्थिती त्यांच्या कानावर घालण्याचा हेतू होता.

मेहेरून्निसा दलवाईंनी त्यांना निवेदन दिले आणि म्हणाल्या, "मुस्लीम नेता और मुल्ला

मौलवी के दबाव के कारण सरकार मुस्लीम औरतों के बारे में एक नया विधेयक लोकसभा में पेश करने वाले हैं, अगर वो विधेयक पास हो जाए तो मुस्लीम औरतों की हालत बहुत बुरी होने वाली हैं।" तेव्हा राष्ट्रपती म्हणाले, "आप मेरे पास आने के बजाये मुल्ला-मौलवीयों के पास क्यूं नहीं जाते? तुम्हारा कहना अगर उनके समझ में आए तो अच्छा हैं!" यावर महिलांनी आक्षेप नोंदवला आणि एक भारतीय नागरिक म्हणून मुस्लीम महिलांकडे राष्ट्रपतींनी पहावे अशी विनंती केली. तलाकपीडित महिलांनी आपल्या व्यथा राष्ट्रपतींना ऐकवल्या. त्यावर राष्ट्रपतींचा विश्वास बसत नव्हता. त्यांनी सहानुभूती व्यक्त केली आणि निवेदन स्वीकारले. पंतप्रधानांशी या संदर्भात मी बोलेन, असेही सांगितले.

२२ फेब्रुवारीला १९८६ रोजी सकाळी दहा वाजता पंतप्रधान राजीव गांधींनी त्यांच्या निवासस्थानी भेटण्याची वेळ दिली होती. बरोबर १० वाजता ते आले. ते म्हणाले, "हमारे सामने अनेक समस्याएं हैं, उस में से बहोत सी समस्याएं धार्मिक हैं। हम को किसी की धार्मिक भावना नहीं दुखाते हुए यह समस्या हल करनी हैं।" शिष्टमंडळाने सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा रद्द करू नये आणि नवीन विधेयक आणू नये, अशी विनंती केली. त्यामुळे मुस्लीम महिलांचे प्रश्न अधिक गंभीर होतील याची जाणीव करून दिली. तसेच समान नागरी कायद्याचाही विषय निघाला, या वेळी राजीव गांधी म्हणाले, "कॉमन सिव्हिल कोड लाना इतना आसान नहीं। उसके वास्ते सभी धर्म के कायदे कोडीफाय होना जरूरी हैं। मुस्लीम कायदे कोड़ीफाय नहीं हुए हैं। वह होने के बाद सभी धर्म के जो कायदे सभी को फायदे के रहेंगे. वे इकट्ठा कर के फिर उसका कॉमन सिविल कोड बनाया जायेगा। यह नया 'मुस्लीम महिला विधेयक' कॉमन सिविल कोड करने का पहला कदम हैं।"

राजीव गांधीनीही तलाकपीडित महिलांच्या व्यथा ऐकल्या. या महिलांबद्दलची सहानुभूती त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. शिष्टमंडळ आणि महिलांशी बोलताना ते म्हणाले की, ते या मागण्यांवर सहमत आहेत, परंतु आपली संख्या फार कमी आहे. अशा विषयावर समाजात अधिकाधिक वादविवाद आणि चर्चा होऊन अशा सुधारणेची मागणी लोकांकडून आल्यास अनेक गुंते कमी होतील आणि अपेक्षित कायदे करणे सोपे जाईल.

सर्व २२ तलाकपीडित महिलांच्या कहाण्या लक्ष देऊन ते ऐकत होते. मात्र विधेयक मागे घेण्याबाबत त्यांनी आश्वासन दिले नाही. मुस्लीम समाजात विवाहाची नोंदणीही होत नाही, हे त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी विवाहनोंदणी कायदेशीररित्या अनिवार्य करण्याचे आश्वासन दिले.

मोर्चेकऱ्यांनी २२ फेब्रुवारीला दिल्ली सोडली आणि २५ फेब्रुवारीला 'मुस्लीम महिला विधेयक १९८६' लोकसभेत मांडण्यात आले. तेव्हा स्वतंत्र, धर्मनिरपेक्ष विचार बाळगणारे आरिफ मोहम्मद खान हे ऊर्जा राज्यमंत्री होते. या नव्या विधेयकाला त्यांनीही विरोध केला होता. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचेही ते समर्थक होते. त्यांनी २५ फेब्रुवारी १९८६ रोजी मंत्रिपदाचा राजीनामा देऊन विरोध दर्शवला.

एप्रिल १९८६मध्ये मुस्लीम सत्यशोधक मंडळ, जनवादी महिला, महिला दक्षता समिती,

ऑल इंडिया वुमेन्स फेडरेशन या संघटनांच्या वतीने शासनाने आणलेले नवे विधेयक मागे घ्यावे, यासाठी दिल्ली येथे बोटक्लबवर निदर्शने केली. त्यात विविध राज्यांतील सुमारे २००० मुस्लीम महिला सहभागी झाल्या होत्या. सायंकाळच्या जाहीरसभेत राजस्थान, बंगाल, तामिळनाडू, केरळ, मध्यप्रदेश, कर्नाटक, आसाम, महाराष्ट्र आणि विविध राज्यातील महिला व्यक्त झाल्या. तलाकच्या विविध कथा आपल्या भाषेत सांगितल्या आणि पोटगीची जबाबदारी नवऱ्यावर दिली पाहिजे, अशी मागणी केली. या सभेला शहाबानो केसमध्ये असलेले ॲड. डॅनिएल लतीफी आणि आरिफ मोहम्मद खान यांच्या ॲडव्होकेट पत्नीही उपस्थित होत्या.

## ४.१२ महिला अत्याचार रोखण्यासाठी संघटन

शहाबानोने खंबीरपणे लढा देऊन पतीविरुद्धचा खटला लावलेला लढा जिंकला. त्यांच्या या धाडसी कार्याबद्दल मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे माजी खासदार प्रमिलाताई दंडवते यांच्या हस्ते त्यांचा पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांचा मुलगा जमीर अहमद खानही उपस्थित होता.

१८ जुलै १९८५ रोजी झालेल्या या कार्यक्रमात दंडवते म्हणाल्या, “तलाकपीडित महिलेला तिच्या नवऱ्याने पोटगी दिली पाहिजे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मुस्लीम समाजातील काही जातीयवादी शक्ती एकीकडून या निर्णयाच्या फेरविचाराची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे मुस्लीम पुरुषांना या निर्णयाचा त्रास होऊ नये, अशी मागणी केली जात आहे. त्या दृष्टीने राजकीय दबाव निर्माण करण्याचेही जोरदार प्रयत्न चालू आहेत. अर्थात याबाबतीत सर्व जाती धर्माच्या बहुसंख्य पुरुषांचा दृष्टीकोन समान असतो. हेही या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.” देशातील स्त्रियांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मानवतावादी भूमिकेतून संघटित होऊन कायद्याच्या आधारे लढा दिला पाहिजे, असे मतही दंडवते यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी श्रीमती कुलसुम पारेख म्हणाल्या, “अनेकदा धर्माच्या नावाखाली धर्मविरोधी वर्तन केले जाते. पत्नीला तलाक देतानाही धर्मातील तत्त्वांचे पालन केले जात नाही. उलट या अन्यायाविरुद्ध न्यायालयात दाद मागणाऱ्यांच्या विरोधात मोर्चे आयोजित केले जातात. असे मोर्चे काढणे म्हणजे न्यायालयाचाच अवमान असून संबधितावर याविरोधात खटले भरले पाहिजेत.”

डॉ. बाबा आढाव म्हणाले, “शहाबानो यांच्या पोटगीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय परिवर्तनवाद्यांचा विजय आहे, या देशात धर्मराज्य चालणार की, निधर्मीवादाच्या तत्त्वाची काटेकोर अंमलबजावणी होणार, हा सध्याच्या परिस्थितीत खरा प्रश्न आहे.”

सत्काराला उत्तर देताना शहाबानो यांनी आपल्या हक्कांबाबत महिलांनी सतत जागरूक राहून लढा द्यावा आणि आपल्या हक्कांचे रक्षण करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमात मेहेरून्निसा दलवाई, जमील अहमद खान, रशीदा मुजावर, शरिफाबी, मुमताज इनामदार यांची भाषणे झाली. मंडळाचे सय्यदभाई आपल्या प्रास्ताविकात असे म्हणाले की, सुमारे १४ वर्षांपासून मंडळ महिलांना पोटगी मिळावी म्हणून सातत्याने पाठपुरावा करत आहे. अन्वर राजन यांनी आभार मानले. *(सकाळ, १९ जुलै १९८५)*

यासंदर्भामध्ये मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने विविध ठिकाणी जाणीव जागृती कार्यक्रमांचे आयोजन करून तोंडी तलाक बंद व्हावा, सवतबंदी व्हावी, समान नागरी अस्तित्वात यावा यासाठी बैठका, परिषदा आणि सह्यांची मोहीम आखणार आहेत, असे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

मंडळाचे शिष्टमंडळ १३ ऑगस्ट १९८५ रोजी पंतप्रधान राजीव गांधी यांना भेटले असता "मुस्लीम महिलांवर अन्याय होणार नाही, याची मी काळजी घेईन, तसेच शहाबानो प्रकरणातील विरोधी विचारांचाही मागोवा घेईन" राजीव गांधींनी शहाबानोचा ऐतिहासिक महिला म्हणून उल्लेख केला. ते पुण्याला आले असता काही महिलांशी प्रत्यक्ष संवाद करून हा प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते.

सय्यदभाई पुढे म्हणाले, मध्यप्रदेश, हैदराबाद, नवी दिल्ली आणि काही राज्यांमध्ये लोकांशी संवाद करून वेगळा जनपाठिंबा मिळवण्याचाही प्रयत्न करत आहोत. दरम्यान जमात-ए-इस्लामी आणि मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड यांसारख्या संघटना शहाबानो प्रकरणाविरोधात मोठी रणनीती तयार करून सरकारवर दबाव टाकण्याचे प्रयत्न करत आहेत. *(इंडियन एक्स्प्रेस, १८ ऑगस्ट १९८५; महाराष्ट्र हेराल्ड, १८ ऑगस्ट १९८५; केसरी, १८ ऑगस्ट १९८५)*

## ४.१३ पोटगी बचाव परिषद

शनिवार, १७ ऑगस्ट १९८५ रोजी मुंबई येथील मराठा मंदिराच्या जयाजी शिंदे हॉलमध्ये मंडळाच्या वतीने पोटगी बचाव परिषद आयोजित करण्यात आली. शहाबानो केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत व या निर्णयाला विरोध करणाऱ्या ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डासारख्या प्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले. शहाबानो यांचा या परिषदेत मृणाल गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार होता, परंतु त्या मुंबईला येऊ शकल्या नाहीत. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले होते. मुमताज रहिमतपुरे यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन झाले. शमुन लोखंडवाला, मृणाल गोरे, प्रमिलाताई दंडवते, रशिदा मुजावर, सय्यदभाई यांची परिषदेत भाषणे झाली. मेहेरून्निसा दलवाई यांनी प्रास्ताविकात मुस्लीम स्त्रियांनाही जगण्याचा हक्क आहे, 'समान नागरी कायद्या'मुळे राष्ट्रीय एकात्मता वाढेल, असे खुद्द न्यायमूर्तींनीच म्हटले आहे, असे स्पष्ट केले. या प्रकरणात धार्मिक भावना भडकवल्या जात आहेत आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात दबाव वाढवण्यात येत असल्याने त्याविरुद्ध मंडळाने पोटगी बचाव परिषदेचे आयोजन केले असल्याचे सांगितले.

मुस्लीम सत्यशोधकच्या या परिषदेतही अडथळा आणण्याचा प्रयत्न केला गेला. ऑल इंडिया मुस्लीम युथ कॉन्फरन्स, स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया, तसेच जमात-ई-इस्लामीच्या महिला शाखेच्या सदस्यांनी मेहेरून्निसा दलवाई बोलत असताना गोंधळ घातला. आमचे म्हणणारे ऐकून घेणार असाल, तर आम्ही तुमचे ऐकू, असे त्यांचे म्हणणे होते. शेवटी त्यांना आवरण्यासाठी पोलिसांना धाव घ्यावी लागली. मृणाल गोरे यांनी पुन्हा पुन्हा शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र या तिन्ही संघटनांच्या सदस्यांनी परिषद सुरू झाल्यापासून 'मुर्दाबाद'च्या घोषणा देत जवळपास अर्धा तास गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला.

गोंधळाचा धुरळा खाली बसल्यावरही तणावाचे वातावरण होतेच. मुमताज रहिमतपुरे यांनी उद्‌घाटन करताना गडबड करणाऱ्या युवक-युवतींवर टीका केली. लोक मूलभूत प्रश्न समजून घेत नाहीत, अशी खंतही व्यक्त केली. कायदे करताना धर्माचा हस्तक्षेप नको, कारण न्याय मागताना माणूस हा माणूस असतो आणि कायदा माणसासाठी असतो, असे त्यांनी स्पष्ट केले. 'पुरोगामी मुस्लीम' या नियतकालिकाच्या मुस्लीम महिला पोटगी समर्थन परिषद विशेषांकाचे प्रकाशन मृणाल गोरे यांनी केले. या वेळी न्यायालयाच्या निर्णयाने सर्व मुस्लीम महिलांना आतून आनंद झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रमिलाताई दंडवते यांनी मंडळाच्या कामास पाठिंबा व्यक्त केला आणि शहाबानोवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचेही सांगितले. न्यायालयाच्या निर्णयामुळे धर्मावरच घाला घालण्यात आला आहे, असे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे. न्यायालयाचे निर्णय बदलू नये, यासाठी चारशे महिलांच्या सह्यांचे निवेदन प्रमिलाताई आणि शहाबानो यांनी पंतप्रधानांना

दिले. राजकीय दबावामुळे कायद्यात बदल करण्यात येणार नाही, असे स्पष्ट आश्वासन पंतप्रधानांनी दिल्याचे प्रमिलाताईंनी सांगितले. कायद्यात पोटगी देण्याची तरतूद असली, तरी प्रत्यक्षात पोटगी मिळत नाही, हे कटू सत्य असल्याचे त्या म्हणाल्या. मुस्लीम महिलांना आजादी म्हणजे काय, हेच माहीत नाही. पोटगी मिळण्याची आवश्यकता त्यांना पटवून दिली पाहिजे. 'मराठा मंदिर'चे बाबासाहेब गावडे यांनी मंडळाच्या कार्यास पाठिंबा दिला. हुसेन जमादार यांनी तलाक मुक्ती मोर्चासंदर्भात माहिती दिली. परिषदेत ठराव करून न्यायालयीन निर्णयाचे स्वागत केले आणि बाबुमियाँ बँडवाले यांच्या भाषणाने परिषदेचा समारोप झाला.

परिषद संपल्यावर निदर्शकांनी दगडफेक करण्याचा प्रकार केला, परंतु पोलिसांचा ताफा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तो आटोक्यात होता. मृणाल गोरे यांचा निदर्शकांनी बॉम्बे सेंट्रल रेल्वे स्टेशनपर्यंत पाठलाग केला. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. *(महाराष्ट्र टाइम्स, १८ ऑगस्ट १९८५)*

शहाबानो प्रकरणात मंडळाने घेतलेली भूमिका आणि आयोजित केलेल्या कार्यक्रमांना पठिंब्याबरोबरच मोठ्या प्रमाणात विरोधाचाही सामना करावा लागला. मंडळाने आपले कार्य थांबवावे, अशा धमक्याही सय्यदभाईंना आल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले. त्यांना येवला येथील मुस्लीम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटीचे अध्यक्ष डॉ. झेड. ए. शेख यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे की, हमीद दलवाईनंतर आपली चळवळ थांबेल असे वाटले होते, परंतु तसे नाही, म्हणून तुमच्याविरुद्ध ठोस पावले उचलू. मंडळाच्या कार्यास चांगला प्रतिसादही मिळत असून भारताच्या विविध भागांतून त्या पद्धतीची पत्रेही येत असल्याचे सय्यदभाईंनी सांगितले. पुणे जिल्ह्यात गेल्या पंधरा वर्षांत तलाकची जवळपास २००० प्रकरणे कोर्टामार्फत सोडवली, तर काही प्रकरणे पतीपत्नी यांना एकत्रित बसवून सोडवली असल्याचे सांगितले.

मंडळाच्या वाढत्या कामाची दखल घेऊन बेंगलोर, मंगळूर, कालिकत, विजापूर, मद्रास आदी दक्षिण भारताच्या शहरातून मंडळाच्या शाखा सुरू करण्याबद्दल विचार होत आहे. गुजरात राज्यात तलाकपीडित महिलांची संघटना स्थापन झाली आहे, अशी माहिती सय्यदभाईंनी पत्रकारांना दिली. *(संध्या, ७ सप्टेंबर १९८५; तरुण भारत, ९ सप्टेंबर १९९५)*

## ४.१४ शहाबानोची निवाडा मागे घेण्याची मागणी

शहाबानोच्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात ढवळाढवळ करणारा असल्याने तो मागे घ्यावा, अशी मागणी खुद्द शहाबानोनेच केली. शहाबानोच्या अंगठ्याचा ठसा असलेले पत्रक इंदूरमध्ये पत्रकार परिषदेत वाटण्यात आले. या वेळी सत्तरीतील शहाबानोने असे सांगितले की, तलाक देण्यात आलेल्या मुस्लीम स्त्रियांना पोटगीची तरतूद असणारे फौजदारी कायद्यातील कलम १२५ लागू करू नये. या खटल्यामुळे देशात जागोजागी गौरव करण्यात आलेल्या शहाबानो असेही म्हणाल्या की, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ न करण्याची सरकारने हमी द्यावी.

शहाबानो पडद्याआडून या पत्रकार परिषदेत बोलणार होत्या, परंतु पडदा काढण्याची पत्रकारांनी मागणी केल्याने पडदा काढण्यात आला. शहाबानो म्हणाल्या की, कोणत्याही दबावाखाली येऊन आपण हे निवेदन देत नाही. अनेक धार्मिक नेत्यांनी आपली भेट घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे धर्मावर काय परिणाम होऊ शकतात, याची मला माहिती दिली. शहाबानोने पत्रकार परिषदेत केलेल्या मागण्या मुस्लीम लीगचे खासदार जी. एम. बनातवाला यांनी लोकसभेत मांडलेल्या विधेयकाशी मिळत्याजुळत्या होत्या.

**मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे निवेदन**

मुस्लीम जातीयवाद्यांकडून आपणास धाकदपटशा दाखवण्यात येत आहे, त्यामुळे सरकारने आपणास संरक्षण द्यावे, अशी विनंती शहाबानोने पंतप्रधानांना केली होती. सरकारने तिला संरक्षण न दिल्याने सर्वोच्च न्यायालयाने पोटगीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी केली असावी, असे मत मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सय्यदभाईंनी व्यक्त केले. या वेळी मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाईंनी शहाबानो, त्यांचा मुलगा जमील अहमद खान आणि माजी खासदार प्रमिलाताई दंडवते यांनी पंतप्रधानांची भेट घेतली होती.

शहाबानो स्वतः निरक्षर असल्याने त्यांच्या वतीने त्यांच्या मुलाने पंतप्रधानांना निवेदन दिले. त्यात त्यांनी लिहिले होते, "मी मुस्लीम वस्तीत राहते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर इंदूरमध्ये माझ्यावर दडपणे येत आहेत, धाकदपटशाही दाखवण्यात येत आहे. तरी एक मुस्लीम महिला नव्हे, लक्षावधी मुस्लीम महिलांच्या वतीने आपणास प्रार्थना करते की, पंतप्रधानांनी आपल्या अधिकाराचा वापर करून मला योग्य ते संरक्षण द्यावे."

पंतप्रधानांनी या निवेदनाची गंभीर दखल घेतली नाही आणि योग्य ते संरक्षण दिले नाही, म्हणून शहाबानोने असे पत्रक काढले. हे भारत सरकारचे अपयश आहे, असे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी शहाबानो यांनी केली असली, तरी न्यायालयाच्या निर्णयानुसार आपण तिला पोटगी देण्यास बांधील आहोत, असे शहाबानो यांचे पती ॲड. अहमद खान यांनी सांगितले. "सर्वोच्च

न्यायालयाने निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी शहाबानो यांनी केली असली, तरी इतर न्यायालयात त्यांनी आपणाविरुद्ध दाखल केलेले खटले मागे घेतलेले नाहीत," असे अहमद खान यांनी सांगितले.

मंडळाच्या वतीने सय्यदभाईंनी पंतप्रधानांना तार पाठवून शहाबानो यांच्या नव्या पवित्र्याची सीबीआयतर्फे चौकशी व्हावी, अशी मागणी केली. त्याचबरोबर महाराष्ट्रात कोल्हापूर ते नागपूर असा तलाक मुक्ती मोर्चा काढला, आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे महत्त्व मुस्लिमांना पटवून देण्याचा प्रयत्न केली. त्यांना अडचण भासू नये, याची व्यवस्था महाराष्ट्र शासनाने करावी अशीही विनंती सय्यदभाईंनी केली. *(महाराष्ट्र टाइम्स, १६, १७ नोव्हेंबर १९८५; सकाळ, नवा काळ, नवभारत टाइम्स, १८ नोव्हेंबर १९८५)*

"व्यक्तिगत कायद्यास अनुकूल दुरुस्ती करणार. कोणत्याही धर्माच्या व्यक्तिगत कायद्याच्या आड येणारा दुसरा कायदा दुरुस्त करण्यासाठी शासनाची तयारी आहे. त्यादृष्टीने मुस्लीम समाजाला क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५व्या कलमातून वगळण्यासंबंधी गंभीरपणे विचार चालू आहे", या पंतप्रधान राजीव गांधी यांनी अखिल भारतीय मोमीन परिषदेत केलेल्या विधानाबद्दल समाजातील विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. पंतप्रधान जात्यंध मुस्लिमांच्या दबावाला बळी पडत आहेत, अशी प्रतिक्रिया मंडळाच्या वतीने सय्यदभाईंनी एका निवेदनाद्वारे व्यक्त केली. पुण्यातील बुद्धिजीवी विद्वानांनी आणि वकिलांनीसुद्धा एका पत्रकात अशीच कडक प्रतिक्रिया व्यक्त करून जातीयवादी मुस्लिमांच्या विरुद्ध लढ्याचे आवाहन केले.

"शहाबानो प्रकरणाच्या निकालामुळे कोट्यवधी मुस्लीम स्त्रियांना आशेचा किरण दिसत होता, परंतु पोटगीच्या कायद्यातील तरतूद रद्द करण्याचा सरकार गंभीरपणे विचार करत असल्याचे जे विधान पंतप्रधानांनी केले, ते धक्कादायक आहे. लाखो तलाकपीडित मुस्लीम महिलांना गुलामगिरीतून मुक्त होण्याची संधी डावलली जाण्याची भीती सर्वत्र व्यक्त केली जात आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी आणि लोकशाही मार्गाने लढा देऊन पंतप्रधान व सरकारला उलटी पावले टाकण्यापासून रोखले पाहिजे," असे पुण्यातील विद्वानांनी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

या पत्रकावर १२० वकिलांसह सह्या करणाऱ्यांमध्ये पुढील व्यक्तींचा सहभाग आहे – एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, गं. बा. सरदार, डॉ. बाबा आढाव, विद्या बाळ, मुमताज, डॉ. ह. कृ. परांजपे, प्राचार्य डॉ. सत्यरंजन साठे, ताहेर पूनावाला, झैनब पूनावाला, प्रा. एम. एम. शेख, अन्वर राजन, प्रा. कुलसूम पारेख, शेख रशीद, एस. के. पाषाणकर, एम. आर. परांजपे, एल. टी. सावंत, के. टी. गिरमे, श्रीमती मृदुला भाटकर, नीलिमा वर्तक, सलीम बागवान, एस. ए. काझी, एम. ए. पठाण, एम. एम. मिर्झा, शमसुद्दिन तांबोळी.

यानिमित्ताने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने व्यापक आंदोलन करून सरकार दरबारी निवेदने आणि लोकशिक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले. *(केसरी, सकाळ, ४ डिसेंबर १९८५; लोकसत्ता, ६ डिसेंबर १९८५)*

## ४.१५ मुस्लीम महिला विधेयकासंबंधी

२१ फेब्रुवारी १९८६ रोजी केंद्र सरकारने लोकसभा कामकाजाच्या पहिल्याच दिवशी मुस्लीम स्त्रिया (घटस्फोटाबाबत हक्क संरक्षण) विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला, पण सभापती बलराम जाखड यांनी तांत्रिक कारणास्तव परवानगी नाकारली. पंतप्रधानांनी या संदर्भात विरोधकांची बैठक बोलावली होती, परंतु विधेयकावर विचार करण्यास वेळ हवा, असे कारण सांगून विधेयक मांडण्यास विरोध केला. इस्लामी विचारवंत आणि ख्यातनाम व्यक्ती यांच्या सल्लामसलतीने विधेयक तयार करण्यात आले आहे, असे स्पष्टीकरण विरोधी नेत्यांना देण्यात आले. अधिवेशनात विधेयक मांडण्याऐवजी वटहुकूम जारी करावा, अशी मागणी काही मुस्लीम संघटनांनी केली होती, असे राजीव गांधी यांनी विरोधकांना सांगितले. गृहमंत्री शंकरराव चव्हाण, कायदामंत्री अशोक कुमार सेन, संसदीय कामकाज मंत्री एच. के. एल. भगत, राज्यमंत्री गुलाम नबी आझाद आणि कायदा खात्याचे राज्यमंत्री एच. आर. भारद्वाज पंतप्रधानांच्या बाजूस होते.

घटस्फोटीत मुस्लीम स्त्रीला नातेवाईक नसतील किंवा पोटगी देण्यासाठी उत्पन्नाची साधने नसतील, तर राज्य वक्फ (औकाफ) मंडळ तिला उदरनिर्वाहासाठी रक्कम देईल, अशी एक तरतूद विरोधकांना देण्यात आलेल्या विधेयकाच्या मसुद्यात होती.

शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर विधेयकात विचार करून सुसंगत विधेयक तयार करण्यात आला होता. घटस्फोटाच्या वेळी महिलांचे हक्क आणि हित यांचे संरक्षण करण्यावर विधेयकात भर देण्यात आला आहे.

'इद्दत'नंतरच्या काळात घटस्फोटीत मुस्लीम स्त्री स्वतःचा निर्वाह करू शकत नसेल, तर तिला तिच्या नातेवाईकांनी (तिच्या मृत्यूनंतर तिच्या मालमत्तेवर हक्क सांगतील ते) खर्चासाठी रक्कम द्यायला पाहिजे, असा हुकूम काढण्याचा अधिकार न्यायाधीशास असेल, असे म्हटले आहे. तिच्या नातेवाईकांना उत्पन्नाचे साधन नसेल आणि ते पोटगी देण्यास असमर्थ असतील, तर उत्पन्नाचे साधन असणाऱ्या नातेवाईकांनी तिला पोटगी द्यावी, असा आदेश न्यायाधीश काढतील असेही विधेयकात नमूद केले आहे.

मंडळाने या विधेयकाच्या विरोधात भूमिका घेतली आणि संकल्पित विधेयकावर खुली चर्चा व्हावी, अशी मागणी केली. दरम्यान संकल्पित विधेयकाचे शहाबानो यांच्याकडून स्वागत करण्यात आले.

केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री आरिफ मोहम्मद खान यांनी बुधवार, २६ फेब्रुवारी १९८६ रोजी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे पाठवला. शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी मांडलेल्या विधेयकाचा निषेध करण्यासाठी आरिफ मोहम्मद खान यांनी राजीनामा दिला. हे विधेयक घटस्फोटित मुस्लीम महिलांवर मोठा अन्याय करणारा आहे, असे त्यांचे मत होते. हे विधेयक मुस्लीम लीगसारख्या पक्षांशी चर्चा करून मांडण्यात आले होते, मात्र पुरोगामी मुस्लीम

नेत्यांची व संघटनांची मते या प्रश्नासंदर्भात विचारात घेण्यात आलेली नाहीत. शहाबानो प्रकरणी पुरोगामी मुस्लिमांनी घेतलेल्या भूमिकेला आरिफ मोहम्मद खान यांनी पाठिंबा दिला होता. दरम्यान पंतप्रधानांनी लोकसभेतही हे विधेयक महिलांच्या हिताचेच कसे आहे, हे सांगत जोरदार समर्थन केले होते.

मंडळाने हे विधेयक महिलांच्या हक्कावर गदा आणणारे प्रतिगामी असून, यामुळे राष्ट्रीय एकात्मतेस धोका होणार आहे. हे विधेयक मागे घेण्यात यावे, अशी मागणी करणारा ठराव एका सर्वपक्षीय सभेत मंजूर केला. या सभेत इंदिरा काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, समाजवादी काँग्रेस, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्याचबरोबर नारी समता मंच, छात्रयुवा संघर्ष वाहिनी, बोहरा सुधारणावादी संघटना यांचेही प्रतिनिधी होते. उपमहापौर सुरेश नाशिककर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे, भारतीय जनता पक्षाचे आलिम खान, समाजवादी पक्षाचे अंकुश काकडे, इंदिरा काँग्रेसचे सुरेश बोराटे, कम्युनिस्ट पक्षाचे एकनाथ बाराथे, शांताबाई रानडे, शिवसेनेचे विजय तडवळकर, नारी समता मंचच्या अंजली मायदेव, शुभा शर्मा यांची भाषणे झाली. सर्वांनी मुस्लीम महिला विधेयकास विरोध केला.

५ मे १९८६ रोजी विधेयकावर विविध अंगाने चर्चा झाली आणि निषेधाच्या घोषणांमध्येच हे वादग्रस्त विधेयक ६ मे १९८६ रोजी मंजूर करण्यात आले. याप्रसंगी ऐच्छिक समान नागरी कायद्याचा निर्वाळा देण्यात आला होता.

८ मे १९८६ रोजी मुस्लीम महिला (घटस्फोटितांचे हक्क संरक्षण विधेयक) राज्यसभेत मांडण्यात आले. १२ तासांच्या खडाजंगी चर्चेनंतर हे विधेयक ९ मे १९८६ रोजी प्रचंड गोंधळानंतर मंजूर झाले. *(महाराष्ट्र टाइम्स, २२, २३ फेब्रुवारी १९८६; केसरी, २७ फेब्रुवारी १९८६; महाराष्ट्र टाइम्स ६ मे १९८६; सकाळ, ७ मे १९८६; केसरी, १० मे १९८६)*

## ४.१६ हमीदनबी प्रकरण

शहाबानो प्रकरणानंतर उत्तर प्रदेश उच्च न्यायालयात हमीदनबी यांच्या तलाक संदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. या प्रकरणात मूलतत्त्ववादी संघटनाही सहभागी होत्या. न्यायालयाने या प्रकरणात दिलेला निवाडा वादग्रस्त ठरला. तो शहाबानो प्रकरणाइतकाच ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. कारण शहाबानो यांनी सर्वोच्च न्यायालयातून पोटगी मिळवली होती. मात्र त्यानंतर घटना दुरुस्ती होऊन नवा कायदा अंमलात आणला आणि पोटगीचा हक्क हिरावून घेण्यात आला. हमीदनबीच्या प्रकरणामुळे तलाकपीडित महिलेला दुसरे लग्न होईपर्यंत पोटगीचा अधिकार मिळाला. शहाबानो प्रकरणातील घटना दुरुस्तीला धक्का न लागता हे यश मिळाले. अर्थात या निकालाविरुद्ध विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी सुरू केली.

शहाबानो प्रकरणाच्या निमित्ताने संसदेवर दबाव टाकून नवे विधेयक अस्तित्वात आल्यानंतरसुद्धा लखनौ उच्च न्यायालयाने तलाकपीडित महिलेला दिलेली पोटगी हा मूलतत्त्ववाद्यांच्या दृष्टीने 'शरीयत'मधील हस्तक्षेप होता. त्यामुळे या लोकांचा या निवाड्याला विरोध होता. ते सर्वोच्च न्यायालयात जाऊन या निवाड्याच्या विरोधात दाद मागणार असल्याचे सांगितले जात होते. त्यामुळे मूलतत्त्ववादी संघटनांच्या मागणीच्या विरोधात ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. हे प्रतिपादन मंडळाच्या वतीने ५ मार्च १९९३ रोजी करण्यात आले होते.

उत्तर प्रदेशच्या लखनौ न्यायालयाच्या खंडपीठाने हमीदनबीच्या पोटगी संदर्भात दिलेला निवाडा हा हमीदनबीच्या प्रयत्नांना मिळालेले यश होते. मंडळाचे सेक्रेटरी आणि ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाईंनी सांगितले की, या खंडपीठाचा निवाडा हा ऐतिहासिक असून शहाबानो प्रकरणानंतर निर्माण झालेल्या कायद्यानंतर देण्यात आलेला आहे. जो कायदा मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांच्या दबावातून निर्माण झाला होता. या कायद्यानुसार मुस्लीम महिलेला ठराविक मुदतीनंतर पोटगी नाकारण्यात येणार होती. तलाकपीडित मुस्लीम महिलांना पोटगी दिल्यामुळे शरीयतवर परिणाम होणार नाही. सय्यदभाईंनी असे आवाहन केले की, ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने या प्रकरणात हस्तक्षेप करू नये. मुस्लीम धार्मिक संघटनांनी मुस्लीम महिलांचे हित लक्षात घेऊन या निवाड्याकडे पाहावे.

चाळीस वर्षीय हमीदनबी यांना दोन मुले होती. त्यांचा विवाह रफिक या गृहस्थाशी झाला होता. ते भारतीय रेल्वेमध्ये नोकरीस होते. तलाक दिल्यानंतर रफिक यांनी हमीदनबी यांना पोटगी देण्याचे थांबवले. त्यामुळे हमीदनबींना छोटी-मोठी कामे आणि शिवणकाम काम करून स्वतःचा आणि दोन मुलांचा उदरनिर्वाह करावा लागत होता. १९८६पर्यंत हमीदनबीला ४५०/- रुपये प्रति महिना पोटगी त्यांचे पतीकडून मिळत होती. शहाबानो प्रकरणानंतर आलेल्या नव्या कायद्यानुसार

त्याने पोटगी देण्याचे बंद केले होते.

जेव्हा हे प्रकरण लखनौ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे आली, तेव्हा रफिक यांना तलाक नंतर विधीत प्रक्रिया (तलाकनंतर अपेक्षित असलेली मेहेरची रक्कम आणि तीन महिन्यांच्या 'इद्दत' कालावधीत देखभाल करणे आणि कोणत्याही पद्धतीने पत्नीची जबाबदारी न टाळणे, ही विधीत प्रक्रिया आहे.) पूर्ण केल्याचे सिद्ध करता आले नाही. म्हणून उच्च न्यायालयाने असा आदेश दिला की, पतीने कोणत्याही पद्धतीचे अडथळे न आणता पोटगी आणि थकबाकी हमीदनबींना द्यावी. हा आदेश मिळाल्यानंतर रफिकने हमीदनबींना लेखी स्वरूपात तलाक दिला. असे असतानाही न्यायालयाने असा आदेश दिला की, हमीदनबीचा पुनर्विवाह होईपर्यंत रफिक यांना पोटगी देणे अनिवार्य आहे.

या संदर्भात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने कायदेतज्ज्ञांशी चर्चा करून हमीदनबी यांना पाठिंबा देण्यासाठी व न्यायालयीन लढ्याच्या तयारीसाठी मंडळाचे सय्यदभाई आणि शमसुद्दिन तांबोळी लखनौ व दिल्ली गेले होते. *(टाइम्स ऑफ इंडिया, पुणे प्लस, ६ मार्च १९९३; महाराष्ट्र टाइम्स, ७ मार्च १९९३)*

## ४.१७ शबानाबानो विरुद्ध इम्रान खान

(सर्वोच्च न्यायालयातील न्या. सुदर्शन रेड्डी आणि न्या. दीपक वर्मा यांनी ४ डिसेंबर २००९ रोजी दिलेला निकाल)

शबानाबानो आणि इम्रान खान यांचा मुस्लीम रिवाजाप्रमाणे २६ नोव्हेबर २००१ रोजी विवाह झाला. शबानाबानोच्या सांगण्यानुसार लग्नाच्या वेळी आवश्यक घरगुती साहित्य, वस्तू, भांडी देण्यात आली. तथापि इम्रान खान व त्यांच्या घरच्यांनी तिला सातत्याने वाईट वागणूक दिली आणि अधिकाधिक पैशाची, हुंड्याची मागणी करत होते. काही दिवसांनी गरोदर असताना माहेरी गेली, तेव्हा हुंड्याची रक्कम न दिल्यास सासरी परत घेऊन जाणार नाही, अशी धमकी दिली. बाळंतपण झाल्यानंतर नवऱ्याने कोणतीही कौटुंबिक जबाबदारी पार न पाडता आणि नांदवणार नाही, अशी भूमिका घेऊन मानसिक त्रास देत असल्यामुळे ग्वाल्हेरच्या कुटुंब न्यायालयात केस दाखल करून कलम १२५नुसार पोटगीचा दावा सादर केला. दरमहा १२ हजार रुपये उत्पन्न असणाऱ्या नवऱ्याने पत्नी आणि मुलाच्या उदरनिर्वाहासाठी काहीही तरतूद केली नाही, म्हणून दरमहा पोटगी म्हणून तीन हजार रुपये मिळावेत, अशी याचिका दाखल केली. पतीने सर्व आरोप फेटाळून दिले, शबाना पत्नी आहे, परंतु कलम १२५प्रमाणे पोटगी देणार नसल्याची भूमिका घेतली. त्यानंतर पतीने असा दावा केला की, ८ ऑगस्ट २००४मध्ये मुस्लीम पद्धतीने त्याने घटस्फोट (तलाक) दिला आहे आणि मुस्लीम महिला सुरक्षा विधेयकानुसार (१९८६चा कायदा) 'इद्दत' काळानंतर, पत्नीस पोटगी मागण्याचा अधिकार नाही. नवऱ्याने असेही सांगितले की, शबानाबानो खाजगी शिकवण्या घेऊन दरमहा सहा हजार रुपये कमावत आहे. ती स्वावलंबी आहे. स्वतःच्या मर्जीने माहेरी जाताना सर्व दागिने व एक हजार रुपये घेऊन गेल्यानंतर ती सासरी आली नाही. या सर्व कारणांमुळे ती पोटगी मिळवण्यास पात्र नाही.

यावर कुटुंब न्यायालयाने निवाडा देताना आदेश दिला की, 'नवऱ्याने दरमहा दोन हजार रुपये पोटगी द्यावी व ही पोटगी दावा दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजे २६-४-२००४ ते तलाकपर्यंतच्या २८-८-२००४पर्यंत व नंतर 'इद्दत' कालावधीपर्यंतचा असावा. इम्रान खानने स्वतःच्या व पत्नीच्या दाव्यासाठी लागलेला खर्च द्यावा.'

या निर्णयाप्रमाणे दोन हजार रुपये पोटगी दावा दाखल करण्यापासून ते तलाकपर्यंतच्या कालावधीपुरता व नंतर तीन महिन्यांपर्यंतच्या इद्दत कालावधी पुरताच मर्यादित राहिला. नंतरच्या कालावधीसाठी पोटगी नाकारण्यात आली होती. म्हणून शबानाबानोने या निर्णयाविरुद्ध ग्वालीयरच्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे धाव घेतली. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांनीही कुटुंब न्यायालयाच्या निर्णयाचे समर्थन करून शबानाबानोचा दावा अमान्य केला.

कुटुंब न्यायालयाचा निर्णय व उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेला निर्णय समोर ठेवून सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण दाखल झाले.

सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने शबानाबानोचा दावा फेटाळून मोठी चूक केली आहे. कलम १२५नुसार घटस्फोटानंतर पोटगीचा दावा मान्य होत नाही, असा चुकीचा अर्थ काढून आणि १९८४चा कुटुंब न्यायालय कायदा कलम ७ (१) (फ) विचारात न घेता हा दावा फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे या दाव्यासंदर्भात केस दाखल करून खालील गोष्टी विचारात घेण्यात आल्या–

१) घटस्फोटित मुस्लीम महिलेस कलम १२५नुसार पोटगीचा दावा करता येतो का?

२) मुस्लीम महिला सुरक्षा कायदा १९८६च्या कलम ४, ५ आणि ७मध्ये काय तरतूद आहे?

३) कुटुंब न्यायालय कायदा १९८४ कलम ७ (१) (फ) आणि २०मध्ये महिलांसाठी काय तरतूद आहे?

४) 'इद्दत'च्या कालावधीनंतर अशा घटस्फोटित महिलांना तिच्या पुनर्विवाहापर्यंत पोटगीचा हक्क आहे का?

५) 'क्रिमिनल प्रोसिजर कोड'च्या १२५व्या कलमानुसार कुटुंब न्यायालयात दावा चालवता येऊ शकतो का?

या सर्व घटकांचा विचार करून हे अपील दाखल करण्यात आले होते. यासाठी डॅनियल लतीफी आणि इतर विरुद्ध भारत केंद्र सरकार (२००१) आणि इकबाल बानो विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य व इतर (२००७) या सर्वोच्च न्यायालयात झालेल्या निवाड्यांचा संदर्भ घेण्यात आला. शहाबानो खटल्यात झालेल्या सर्व तपशीलाचाही अभ्यास करण्यात आला. कुराणातील सुरा क्र. २४१ व २४२ नुसार महिलांना कशी सन्मानपूर्वक वागणूक दिली आहे, त्यांच्या हक्काबद्दल काय सांगितले आहे, मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाची भूमिका काय आहे, या संदर्भात सखोल अभ्यास न्या. यशवंतराव चंद्रचूडांच्या अर्थात शहाबानो विरुद्ध मोहंमद अहमद खान केसमध्ये झाला होता. त्यामुळे या प्रकारची पुन्हा चर्चा करून, संशोधन करून वेगळा निष्कर्ष काढण्याची गरज नाही, असे या निकालाच्या वेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच दरम्यानच्या काळातील इकबालबानो विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर व विजय कुमार प्रसाद विरुद्ध बिहार राज्य (२००४) या दाव्यांचाही संदर्भ घेऊन न्यायालयाने स्पष्ट केले की, शबानाबानोच्या अपिलानुसार मुस्लीम महिलेला क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५व्या कलमानुसार घटस्फोटित महिलेस तिचा पुनर्विवाह होईपर्यंत पोटगी मिळवण्याचा हक्क आहे. ही पोटगी फक्त 'इद्दत' कालावधीपुरतीच मर्यादित राहू शकत नाही व कुटुंब न्यायालयास फौजदारी कायद्यातील १२५ कलमानुसार मुस्लीम महिलांसाठी दावे चालवण्याची तरतूद आहे.

### ४.१८ शबानाबानो निवाड्यावरील चर्चासत्र

मुस्लीम महिला आणि त्यांचे प्रश्न हा पुरोगामी चळवळींच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहे. शबानाबानोच्या या ४ डिसेंबर २००९ रोजी झालेल्या निवाड्यास नजरेसमोर ठेवून मुस्लीम सत्यशोधक मंडळ, म. फुले समता प्रतिष्ठान व मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाने १० जानेवारी २०१० रोजी एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले. 'मुस्लीम महिला व पोटगीचा अधिकार' या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन कुटुंब न्यायालय, पुणे येथील न्या. आर. व्ही. देशमुख यांनी केले. चर्चासत्रात डॉ. जया सागडे यांनी विषयाची सविस्तर मांडणी केली व या खटल्याच्या संदर्भात असणाऱ्या विविध पैलूंचा खुलासा केला. डॉ. वैजयंती जोशी, ॲड. जाकीर अत्तार, ॲड. शारदा वाडेकर, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, सय्यदभाई, डॉ. बाबा आढाव याव्यतिरिक्त कुटुंब न्यायालयातील समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते, विधी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि इतरांनी या चर्चासत्रात भाग घेऊन आपली मते व्यक्त केली. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

डॉ. जया सागडे यांनी आपल्या सविस्तर विवेचनात महत्त्वाचे मुद्दे मांडले. मुख्यतः या निर्णयातसुद्धा संदिग्धता असल्याचे सांगून म्हणाल्या की, न्यायाधिशांनी कुटुंब न्यायालय कायदा १९८४ व त्यातील कलम ७कडे लक्ष वेधले आहे. तसेच यापूर्वीच्या शहाबानो प्रकरणाचा आधार घेतला आहे. परंतु हा खटला कुटुंब न्यायालयाऐवजी अन्य न्यायालयाकडून आला असता, तर असा निवाडा देणे शक्य झाले असते का, असा प्रश्न उपस्थित केला. हा निर्णय कुटुंब न्यायालयाव्यतिरिक्त असणाऱ्या न्यायालयांना पाळणे बंधनकारक ठरेल का? सरसकटपणे १२५वे कलम सर्वत्र मुस्लीम महिलांना लागू होणार आहे का? या संदर्भात अजूनही अस्पष्ट व संदिग्ध असणारा हा निवाडा आहे. प्राचार्य वैजयंती जोशी यांनी मुस्लीम व इतर महिलांना पोटगी मिळवण्यासाठी व मिळवलेली पोटगी नियमितपणे उपलब्ध होण्यासाठी कसा त्रास होतो, या संदर्भात विवेचन केले आणि महिलांनी स्वावलंबी होऊन स्वाभिमानी जीवन जगण्याची गरज व्यक्त केली.

न्या. देशमुख आपल्या भाषणात म्हणाले की, सर्वसाधारणपणे कायदे हे समाजाला सुखशांती मिळवून देण्यासाठी असतात व कायद्याचा हेतू सामाजिक सुरक्षा आणि अन्याय दूर करण्याचा असतो. त्यामुळे कायदे पाळणे व कायदे मोडणे हे व्यवहारात कसे चालतात, याची अनेक उदाहरणे दिली. गुन्ह्याचे स्वरूप व त्या प्रमाणात शिक्षा यांचा समतोल साधणे आवश्यक असते, परंतु काही वेळा काही कायद्यांमुळे अतिरेकी शिक्षा होते, तर काही वेळा मोठ्या गुन्ह्यासाठी किरकोळ त्रास होतो, अशीही उदाहरणे घडतात. पोलीस, समाज आणि गुन्हेगार यांच्या संदर्भात आजची स्थिती कशी आहे, यावर त्यांनी भर दिला.

सय्यदभाईंनी सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी पुरुषप्रधान मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली. तसेच मुस्लीम स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. मूल

दत्तक घेण्याची तरतूद व्यक्तिगत कायद्यात नसल्याबद्दल खंत व्यक्त करून तोंडी तलाकवर बंदी आणावी व पोटगीची तरतूद असावी. यासाठी लढा देत असतानाच लोकशिक्षणाची गरज व्यक्त केली.

ॲड. शारदा वाडेकरांनी कष्टकरी, असंघटित महिलांना न्यायासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाबद्दल माहिती दिली. तसेच पोटगी मिळवणे व ती पदरात पाडून घेणे या व्यवहारात कशा अडचणी असतात, याबद्दल खुलासा केला.

ॲड. जाकिर अत्तार यांनी शहाबानो प्रकरणाचा संदर्भ देत असताना शबानाबानो प्रकरणात समाविष्ट असलेला तपशील विषद केला. न्या. सुदर्शन रेड्डी व न्या. दीपक वर्मा यांनी कोणते मुद्दे विचारात घेऊन हा निवाडा दिला, हे सविस्तरपणे सांगितले. प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी शहाबानो प्रकरणात मुस्लीम जमातवादी शक्तींनी आक्रमक होऊन भारतातील धर्मनिरपेक्ष कायद्याविरुद्ध जो हैदोस घातला, लाखोंच्या संख्येने पुढे येऊन शासनास नमवले व मुस्लीम महिलांवर अन्याय केला त्याबद्दल खेद व्यक्त केला. तसेच व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याची किंवा घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांतील ४४ व्या कलमात अपेक्षित असणारा समान नागरी कायदा निर्माण करण्याची आवश्यकता विशद केली. मात्र यासंदर्भात राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे स्पष्ट केले. तसेच महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कुटुंब न्यायालय असावे, राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणेच मुस्लीम महिलांसाठी स्वतंत्र आयोगाची आवश्यकता स्पष्ट केली. तसेच शरीयत, 'कुराण'मध्ये काय नमूद केले आहे, यापेक्षा सामाजिक वास्तव काय आहे? व्यक्तिगत कायद्यात कोणत्या तरतुदी आहेत? हे विचारात घेऊन भारतीय संविधानाच्या आधारावरच धर्मनिरपेक्ष कायदे निर्माण झाले पाहिजेत, यासाठी समाजमन तयार करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याची गरज व्यक्त केली. इतर मुस्लीम देशांतील कायदे बदलत असताना भारतात अशा सुधारणा का होऊ नये? असा प्रश्न उपस्थित केला.

अब्दुल कादर मुकादम यांनी मौलाना आझाद, महंमद इक्बाल यांच्या विचारांचा मागोवा घेऊन इस्लाममधील इज्तिहाद (अनुभवी, विविध क्षेत्रांतील व्यासंगी, तत्त्वज्ञ यांचे मत), कयास (तर्कशुद्ध विचारसरणी) यांचा संदर्भ देऊन मोहंमद पैगंबरांना कालसापेक्ष विवेकवाद अपेक्षित असणारी उदाहरणे दिली. शरीयत अपरिवर्तनीय असल्याचा दावा कसा निराधार आहे, हे त्यांनी स्पष्ट केले व शबानाबानो प्रकरणात पुन्हा शहाबानोसारखी परिस्थिती निर्माण झाल्यास कोणती रणनीती असावी, या संदर्भात मते मांडली.

या चर्चासत्रात कुटुंब न्यायालयातील समुपदेशक डॉ. प्रवीण मोतीवाला, गायके यांच्याबरोबरच सिकंदर मुलाणी, अस्लम जमादार, मुस्ताकभाई आणि इतरांनी मनोगत व्यक्त केले.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी असणारे प्राचार्य नितीश नवसागरे यांनी या लढ्याकडे व्यापक पद्धतीने पाहून, चर्चेतून कृतीप्रवणता कशी वाढेल व कार्यक्रमाच्या दिशेने पाऊल पुढे कसे जाईल, या संदर्भात विचार मांडला. धर्मनिरपेक्षता आणि समतेचा लढा अधिक सक्षम करण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली.

चर्चासत्राचा समारोप आदरणीय डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते झाला. प्रबोधनासाठी समाजमानस निर्माण करण्यासाठी समाजात संवाद कसा वाढेल, हे पाहावे लागेल. त्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विषमतेविरुद्धचा, अन्यायाविरुद्धचा लढा निर्माण करण्यासाठी अधिकाधिक महिलांनी, तरुणांनी पुढे येण्याची अपेक्षा व्यक्त केली. चर्चासत्रात दिवसभर उपस्थित झालेल्या प्रश्नांवर प्रकाश टाकून हा लढा अधिक समर्थपणे लढला पाहिजे, त्यासाठी म. फुले समता प्रतिष्ठान मुस्लीम सत्यशोधक मंडळास सर्व प्रकारचे सहकार्य करील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चासत्राला म. फुले प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. दादासाहेब नाईकनवरे, काका पायगुडे, काकी पायगुडे, बापू विरूळे व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.

## ४.१९ शायराबानो आणि इतर महिलांचा लढा

'तिहेरी तलाक'चा दीर्घ न्यायालयीन लढा मध्यप्रदेशच्या शहाबानो ते उत्तराखंडच्या शायराबानोपर्यंतचा आहे. उत्तराखंडच्या काशिपूरची शायराबानो यांचा २००२ला अलाहाबादच्या जमीन व्यावसायिक रिजवानसोबत विवाह झाला होता. लग्नानंतर कारसाठी पाच लाख रुपये आणावेत, यासाठी सासरच्या लोकांनी तगादा लावला. माहेरची परिस्थिती चांगली नसल्याने त्या पैसे देऊ शकल्या नाहीत त्यामुळे नवऱ्याने टेलिग्रामद्वारे 'तलाक' दिला. यावेळी शायराबानो यांचा मुलगा १३ वर्षांचा आणि मुलगी ११ वर्षांची होती. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. तिहेरी तलाक घटनाबाह्य आहे. घटनेतील कलम १४ आणि १५ नुसार महिलांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. शायराबानो व्यतिरिक्त पुढील तलाकपीडित महिलांनीही याचिका दाखल केल्या होत्या.

१) आफरीन रेहमान, जयपूर : २०१४मध्ये विवाहबद्ध झाल्यावर काही महिन्यांतच सासरच्यांनी त्रास दिल्याने माहेरी आली. पतीने स्पीड पोस्टाने घटस्फोट दिला.

२) गुलशन परवीन, रामपूर, उत्तर प्रदेश : एप्रिल २०१३मध्ये विवाह, नंतर अपत्य जन्म, दोन वर्षे सासरच्यांकडून हुंड्यासाठी छळ, २०१५मध्ये माहेरी असताना पतीने दहा रुपयांच्या स्टँप पेपरवर तलाकनामा पाठवून दिला.

३) इशरत जहाँ, हावडा : ३१ वर्षीय इशरतच्या विवाहाला १५ वर्षे आणि पदरात चार मुले असताना पतीने एप्रिल २०१५मध्ये दुबईहून फोनद्वारे तलाक दिला.

४) अतिया साबरी, सहारनपूर : २०१२मध्ये विवाहबद्ध झाल्यावर सासरच्यांनी २५ लाखांसाठी छळ आरंभला. तिने पोलिसात तक्रार दिली. पतीने कागदावर तीनदा तलाक लिहून दिला.




*विद्या बाळ यांच्या समवेत शायरा बानो, सोबत शमसुद्दिन तांबोळी, शकील अहमद.*

## ४.२० मुस्लीम दत्तक विधान सर्वोच्च न्यायालयात

(मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात तलाक, बहुपत्नीत्व या अन्यायकारक तरतुदीबरोबरच व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी तरतूद म्हणजे मुस्लीम दाम्पत्याला मूल दत्तक घेता येत नाही. मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई आणि पत्नी अख्तरून्निसा यांना अपत्य नसल्यामुळे मूल दत्तक घेण्यास व्यक्तिगत कायद्यामुळे अडचणी निर्माण झाल्या. समाजात असे अनेक पती-पत्नी असतात, ज्यांना विविध कारणांमुळे स्वतःचे मूल होत नाही. अशा मुस्लिमांना मूल दत्तक घेण्याची तरतूद असावी, या कारणास्तव अख्तरून्निसा सय्यद यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या संदर्भाचा तपशील.)

अख्तरून्निसा मेहबूब सय्यद यांचे वकील ॲडव्होकेट आर. के. राव यांनी भारताच्या सर्वोच्च न्यायालयात दत्तक विधानाच्या संदर्भात एक दावा दाखल केला होता. त्यात प्रतिवादी क्रमांक एक म्हणून भारत सरकारच्या समाजकल्याण खात्याचा समावेश केला होता. आपला नवरा सय्यद महेबूब गौस सैयद आणि दत्तक घ्यावयाच्या मुलाचे वडील सलीम शेख यांना प्रतिवादी क्रमांक दोन व तीन बनवले होते.

अख्तरून्निसा यांना मूल होत नव्हते. डॉक्टरी तपासणीत असे दिसून आले की, त्यांना मूल होण्यात अडचणी आहेत. त्यांच्या पतीस अनेकांनी दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला. मुस्लीम कायद्याप्रमाणे चार बायकांशी लग्न करण्याची मुभा आहे, अशीही फूस देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या पतीने हा सल्ला धुडकावून लावला आणि असीम नावाचा एक सहा महिन्यांचा मुलगा, त्यांनी त्याच्या आईवडिलांच्या संमत्तीने १९७४ साली दत्तक घेतला. दोघा पती-पत्नींना त्या मुलाचा लळा लागला आणि आपले स्वत:चे अपत्य म्हणून त्याचे पालनपोषण व शिक्षण उभयंता करू लागले, पण ‘मन चिंती ते वैरी न चिंती’ असे म्हणतात. अख्तरून्निसाच्या मनात अनेक शंकाकुशंकांनी घर केले आणि तिला मनःस्ताप होऊ लागला.

हे मूल आपल्याकडून त्याचे आईवडील हिरावून तर घेणार नाहीत ना? आपल्या नवऱ्याला पुढे-मागे दुसरे लग्न करण्याची दुर्बुद्धी झाली आणि दुसऱ्या बायकांपासून त्याला मुले झाली, तर असीमचे काय होईल, या प्रश्नांचा तिला घोर लागला आणि त्याचे निराकारण कसे करावे, याबद्दल ती चौकशी करू लागली. मूल दत्तक घेण्याला जमातवादी मुसलमानांचा विरोध आहे, हे तिला एकून माहिती होते. चौकशीअंती तिला जी माहिती कळली, ती आणखीनच चिंता वाढवणारी होती.

**कडवे सुन्नी मुस्लीम**

अख्तरून्निसा ही सुन्नी मुसलमान आहे आणि भारतात सुन्नींचीच बहुसंख्या आहे. सुन्नी मुसलमान भयंकर कडवे आहेत. ‘इस्लाम खतरे में’ अशी घोषणा करून ते सतत बदलांना विरोध करतात आणि मतांच्या मतलबासाठी एकजात सगळे राजकीय पक्ष त्यांना चुचकारतात. या

सर्वांचा विपरीत परिणाम मुस्लीम स्त्रियांना भोगावा लागतो.

१९७२ साली संसदेत दत्तकाबाबतचं एक विधेयक आले होते. सर्व भारतीयांना हे विधेयक समान रितीने लागू होणार होते. पण काही मुस्लीम नेत्यांनी ते 'इस्लामविरोधी' आहे, अशी ओरड सुरू केली आणि सत्ताधारी पक्षाने कच खाऊन विधेयक रद्द केले. १९८० साली सत्ताधारी पक्षाने मुसलमानांना वगळून हे विधेयक संमत करून घेतले. पारशांनी सदर विधेयकाला विरोध केला आणि अल्पसंख्याक आयोगाकडे हे प्रकरण नेले. आयोगाने असा अभिप्राय व्यक्त केला की, मुसलमानांना या विधेयकातून वगळणे, हे घटनेच्या चव्वेचाळीसाव्या कलमाला बाधा आणणारे आहे, परंतु त्याची दखल सत्ताधारी पक्षाने घेतली नाही.

**इस्लामविरोधी कायदा**

सध्या अस्तित्वात असलेला मुस्लीम कायदाच मुळात इस्लामविरोधी असल्याचे अनेक मुस्लीम विद्वानांचे मत आहे. अमीरअली नावाच्या कायदेतज्ज्ञांनी मुस्लीम व्यक्तिगत कायदा अर्थात १९३७चा 'शरीयत ॲक्ट' अस्तित्वात आणण्यात मोठे योगदान दिले आहे, परंतु हा कायदा अस्तित्वात आणताना त्यांनी महंमद पैगंबराच्या जीवनातील घटनांचीही नीटशी दखल घेतली नाही, असाही एक आक्षेप घेण्यात येतो. स्वतः महंमद पैगंबरांनी झैद नावाच्या एका मुलाला दत्तक घेतले होते. या गोष्टीकडे प्रचलित मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले असून कुराणाच्या सुरा ३३मधील ४ आणि २७ या आयतींचा हवाला दिला जातो. या आयतींनुसार स्वतःच्या मुलाचे व दत्तक मुलाचे अधिकार सारखे नाहीत, असे सांगितले आहे. दत्तकाला परवानगीच नसती, तर असा उल्लेख करण्याचे कारणच काय? पण या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून उलेमांनी असीमच्या दत्तक विधानाला हरकत घेतली.

अख्तरून्निसाच्या पतीने उलेमांच्या विरोधाची पर्वा केली नाही आणि असीमवर सख्ख्या वडिलांसारखे प्रेम केले. यानिमित्ताने उभयतांना काही मुसलमानांनी नावे ठेवली. त्यांना वाळीत टाकल्यासारखे वर्तन केले, तरी अशा प्रसंगांना या उभयतांनी मोठ्या धैर्याने तोंड दिले. या मुलाला आपला वारस करण्याची त्यांची कितीही इच्छा असली, तरी प्रचलित मुस्लीम कायदा त्यांना तसे करू देणार नाही आणि त्या मुलाचे भावी काळात हाल होतील आणि ज्यांचा हा दत्तक विधानाला विरोध होता, ती माणसेच संपत्तीवर हक्क सांगू लागतील. हे सर्व टाळण्याचा एकच मार्ग अर्जदारापुढे होता आणि तो म्हणजे सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा. अर्जदाराचा पती आणि असीमचे वडील यांचा तिला याबाबत संपूर्ण पाठिंबा होता.

संविधानाच्या चव्वेचाळीसाव्या कलमात स्पष्ट मार्गदर्शन केले असूनही सरकार सर्वांना समान रितीने लागू होईल असा कायदा करण्याची टाळाटाळ करत आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या संरक्षणाची जवाबदारी संविधानाच्या ४६व्या कलमाने सरकारवर टाकलेली असून त्याचाही भंग या प्रकरणी होतो आहे, कारण आईबाप असूनही मुलाची स्थिती अनाथासारखी झाली होती. संविधानाच्या ३९-अ कलमान्वये प्रत्येक भारतीय नागरिकाला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. संविधानाच्या ३८व्या कलमान्वये प्रत्येक नागरिकाला आर्थिक, सामाजिक

व राजकीय न्याय दिला जाईल, असेही आश्वासन देण्यात आले होते. परंतु या बाबींकडे दुर्लक्ष करून सरकार फक्त हिंदू, ख्रिश्चन, हरिजन व आदिवासी यांच्यासाठीच कायदे करते आणि मुस्लीम स्त्रीला मात्र वाऱ्यावर सोडते.

**हिंदू दत्तक कायदा**

मुस्लीम स्त्रीला हव्या असणाऱ्या सुधारणा मुस्लीम पुरुषाच्या मर्जीवर सोडण्यात सरकार, सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्यात एखादा अलिखित करार झाला आहे की काय न कळे! १९५६ साली सरकारने 'हिंदू दत्तक विधान'विषयक कायदा केला, हेच मुळी संविधानाला सोडून आहे. कारण संविधानाने नागरिका-नागरिकांत धर्म, जात, वंश, भाषा अशा कोणत्याही कारणास्तव भेद केला जाणार नाही, अशी ग्वाही दिलेली आहे. या कायद्यातील 'हिंदू' शब्द काढून त्या जागी 'भारतीय नागरिक' असा शब्द योजून हे सर्व टाळता आले असते. या सर्व उणिवा व दोष यांना सरकारच जबाबदार असल्याने त्याला प्रतिवादी क्रमांक एक करण्यावाचून अर्जदाराला गत्यंतरच नव्हते.

सर्वोच्च न्यायालयाने या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन नागरिकांना धर्माच्या नावाने विषम वागणूक देणारे सर्व कायदे रद्दबातल करावे, अशी अर्जदार अख्तरून्निसा यांनी मागणी केली होती. इस्लामची मूलतत्त्वे अल्ला एक आहे, पैगंबर एक आहे आणि 'कुराण' हा धर्मग्रंथ आहे, याला या निर्णयाने कोणतीही बाधा येणार नाही. किंवा कलमा पढणे, रोजा करणे, नमाज, जकात आणि हज या नियमानांही अशा निर्णयाने कोणतीही बाधा येणार नाही. याचाच अर्थ त्यांचे मुसलमानपण त्यामुळे बाधित होणार नाही व त्यामुळे धर्माचे परिपालन करण्याच्या संविधानाने दिलेल्या अधिकारालाही बट्टा लागणार नाही. अर्जदाराच्या वतीने असे अनेक संविधानविषयक मुद्दे त्यांच्या वकिलांनी मांडले होते. या निवाड्याचा परिणाम फार दूरगामी होणार होता. *(यदुनाथ थत्ते, लोकसत्ता, २३ जुलै १९८४)*

मूल दत्तक घेण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर बहुपत्निकत्व, घटस्फोट, दत्तक आणि मालमत्ता वारसा हक्क या प्रकरणेचा संपूर्ण मुस्लीम वैयक्तिक कायदा भारतीय राज्यघटनेचा भंग करणारा आहे, या कारणासाठी तो रद्द का करण्यात येऊ नये, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे केली होती. मुस्लीम पर्सनल लॉ ॲप्लिकेशन (शरीयत), १९३७ या कायद्याखाली परंपरागत कायदा मुस्लिमांना लागू करण्यात येतो. मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुरोधाने सर्व भारतीय नागरिकांना समान वैयक्तिक कायदा लागू करण्याची तरतूद कायद्यात करण्यासंबंधी आदेश भारत सरकारला का देण्यात येऊ नये, या संबंधीही स्पष्टीकरण केंद्र सरकारने केले पाहिजे असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. हे स्पष्टीकरण तीन आठवड्याच्या आत दिले पाहिजे असे यावेळी सांगण्यात आले. खटल्याची सुनावणी तातडीने व्हावी म्हणून सरन्यायाधीश य. वा. चंद्रचूड यांच्याकडे मागणी करावी, अशी अनुज्ञा न्यायमूर्तींनी अर्जदारांना दिली.

अख्तरून्निसा सय्यद यांचे वकील  आर. के. राव यांनी दाखल केलेल्या अर्जावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ई. एस. व्यंकटरमैय्याह आणि बी. इराडी यांनी हा आदेश दिला होता. लग्नाला २० वर्षे झाल्यानंतर आपल्याला मूल होणार नाही, या निर्णयाला सय्यद पती-पत्नी आल्यानंतर नोव्हेंबर १९७६मध्ये त्यांनी असीम नावाचा सहा महिन्यांचा मुलगा दत्तक घेतला. दत्तक घेतलेल्या मुलाचे भवितव्य अंधारमय होऊ नये, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. आपल्या अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत मुस्लीम व्यक्तिगत कायदा अंमलबजावणी स्थगित ठेवावी, अशी मागणी ॲड.  राव यांनी केली होती.

न्यायालयाची सकारात्मक भूमिका असतानाही सरकारची कायद्यातील बदल किंवा सुधारणा करण्याबाबत उदासीनता असल्याने हा विषय अनेक वर्ष प्रलंबित राहिला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केलेल्या समान नागरी कायद्याचा व्यापक अर्थ लावून ही याचिका मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाई आणि त्यांच्या पत्नी अख्तरून्निसा यांनी दाखल केली. शहाबानो प्रकरण, बाबरी मशीद-रामजन्मभूमी यांसारखे धार्मिक व संवेदनशील विषय पटलावर असताना धर्मवादी संघटनांचा आक्रमक पवित्रा राजकीय दबाव निर्माण करणारा होता. या संदर्भात न्यायालयापेक्षा शासनाचीच भूमिका महत्त्वाची असल्याने आणि विविध राजकीय उलथापालथ झाल्यामुळे या विषयावर अंतिम निवाडा झाला नाही. *(लोकसत्ता, २७ जुलै १९८४)*

अख्तरून्निसा सय्यद यांनी मूल दत्तक घेण्यासंदर्भात जसा अर्ज केला, त्याच पद्धतीने शहनाज शेख यांनी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तोंडी तलाक, बहुपत्नित्व ही तरतूद रद्द करून वारसा कायद्यात स्त्री-पुरुष समान लेखावे, मुला-मुलीला आई-वडिलांच्या संपत्तीत समान वाटा मिळावा, तलाकपीडित महिलेचे मूल मोठे झाल्यानंतर ते कोणाकडे राहावे याचा निर्णय आईच्या मर्जीवर ठेवावे, यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला.

या दोन्ही अर्जदारांचे विषय महिला अधिकारासंदर्भात असल्याने या दोन्ही रिट अर्जांची एकत्रित सुनावणी करण्याची गरज मंडळाने व्यक्त केली. समतावादी, विविध संघटनांची संयुक्त सभा रविवार, ५ ऑगस्ट १९८४ रोजी आयोजित करण्यात आली होती. मुस्लीम सत्यशोधक मंडळ, नारी समता मंच आणि आयएलएस लॉ कॉलेज, पुण्याच्या लिगल एड सेंटरच्या वतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी श्रीमती कुलसुम पारेख होत्या. सभेत डॉ. नीलम गोऱ्हे, संध्या गोखले, सय्यदभाई, अंजली मायदेव, शैला कुंचुर, सोनल शुक्ल आणि रिट अर्ज दाखल करणाऱ्या शहनाज शेख आणि अख्तरून्निसा सय्यद यांची भाषणे झाली. समानतेवर आधारित बदल मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात त्वरित करण्यात यावेत, अशी मागणी करणारा ठराव केंद्रीय कायदा मंत्र्याकडे या बैठकीत करण्यात आला.

व्यक्तिगत कायदा मुस्लीम स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय अन्यायकारक असून राज्यघटनेतील न्याय व समता या तत्त्वांचे उल्लंघन करणारा आहे. म्हणून त्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल केल्याची माहिती मुंबईच्या श्रीमती शहनाज शेख यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, "पुरुष आपल्या पत्नीला तोंडी किंवा तिच्या अनुपस्थितीतही घटस्फोट देऊ शकतो. तसेच

घटस्फोटानंतर संबंधित स्त्रीला पोटगी देण्याचे कायदेशीर बंधन त्याच्यावर नाही. याउलट स्त्रीला घटस्फोट हवा असल्यास संबंधित पुरुषाला त्याबद्दल काही रक्कम देणे तिच्यावर बंधनकारक आहे ('खुला तलाक' पद्धतीत महिलेचा 'मेहेर'वर अधिकार राहत नाही). कायद्यातील या गंभीर विसंगतीकडे रिट अर्जामध्ये न्यायालयाचे लक्ष वेधल्याचे त्यांनी सांगितले. या बरोबरच बहुपत्नित्व, वडिलोपार्जित संपत्ती आणि मुलाचा ताबा या संदर्भात मुस्लीम व्यक्तिगत कायदा पक्षपाती असल्याचे आपल्या अर्जात नमूद केले आहे, अशी माहिती शहनाज शेख यांनी दिली. त्या स्वतः प्रचलित मुस्लीम समाज व्यवस्थेचा बळी ठरल्याने त्याबाबत आवाज उठवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असल्याचे सांगून पुढे म्हणाल्या, नवऱ्याने घटस्फोट दिला. त्यानंतर वर्षभरात मुस्लीम समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि तज्ज्ञांना संपर्क साधला असता अशा पद्धतीने न्यायालयात जाणे, हे धर्मविरोधी बाब असल्याचे मत बहुतेकांनी व्यक्त केले. पण शहनाज शेख यांना तसे वाटले नाही. जमात-ई-उलेमा या मुस्लीम संघटनेने अर्जाच्या सुनावणीमध्ये शहनाजच्या विरोधात भूमिका घेतली. १४ डिसेंबर १९८३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने हा अर्ज दाखल करून घेतला आणि ९ जानेवारी १९८४ रोजी अर्जाची पहिली सुनावणी झाली. शहनाजच्या बाजूने वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

या विषयावर बोहरा सुधारणावादी व बुद्धिप्रामाण्य कार्यकर्ते ताहेर पूनावाला यांनी 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'ला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणाऱ्या अर्जाचे स्वागत केले. ते म्हणाले की, 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'वर वेळोवेळी चर्चा होत असते, वादविवाद होतात, मुस्लीम जातीवादी नेते धर्माच्या नावाखाली भडकावतात आणि अशिक्षित गरीब मुस्लिमांना गैरमार्गाने घेऊन जाण्याचे काम करतात.'

पाकिस्तानसारख्या देशात तोंडी तलाक कोणालाही देता येत नाही. तलाक द्यायचा झाला तर शासनाने नेमलेल्या बोर्डाकडे जावे लागते. बोर्ड दोन्ही बाजू ऐकून घेते आणि त्यावर आपला निर्णय देते. बोर्डाच्या परवानगीशिवाय तलाक होत नाही. त्याशिवाय अल्जेरिया, मोरोक्को, इजिप्त, ट्यूनिशिया यांसारख्या मुस्लीम देशांत बहुपत्नीत्वाला कायद्याने मनाई आहे. संपत्तीत स्त्री-पुरुषांना समान हक्क आहे.

खऱ्या अर्थाने 'कुराण' व 'हदीस'चे विश्लेषण केले, तर त्यात समाजाची रचना, समानता, न्याय, बंधुता, त्याग व सहिष्णुता यांवर आधारित असलेली दिसून येते. विधवा, अनाथ, अशक्त, गरीब व पीडितांना आपले बांधव समजून त्यांना मदत करण्यावर इस्लामने भर दिलेला बाहे. आवश्यकतेपेक्षा जास्त संपत्ती बाळगण्याबद्दल नापसंती व्यक्त केली आहे. असेही स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, स्वतः त्याग, कष्ट करून इतर गरजूंना मदत करावी.

आपल्या देशात 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'चा ज्या पद्धतीने वापर होत आहे, त्यात अनाथ, दुर्बल व स्त्रिया यांच्यावर अन्याय व जुलूमच करण्यात आला आहे. हेच मुळात 'कुराणा'च्या तत्त्वाविरुद्ध आहे, असे म्हणावे लागेल.

इतर मुस्लीम देशांत आपल्यापेक्षा पुरोगामी कायदे आहेत, ते 'कुराणा'वरच आधारित आहेत. पण प्रश्न असा आहे की, 'कुराणा'चा अर्थ कोणी आणि कसा लावायचा?

**मुस्लीम देशात पुरोगामी कायदे**

सामाजिक बहिष्कार बेकायदेशीर असल्याचा निर्णय मरहूम न्या. छगला यांनी ते मुंबई उच्च न्यायालयात असताना दिला होता. तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवला. त्यावर भाष्य करताना न्या. छगला आपल्या 'रोझेस इन डिसेंबर' या पुस्तकात म्हणतात की, सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नाचा विचार करताना तांत्रिक आधार न घेता सामाजिक न्यायाचा आधार घ्यायला हवा होता.

आज भारतात मुस्लीम समाजात स्त्रिया, विधवा व गरिबांवर जुलुम व अत्याचार होत आहेत. त्यांना पुरेसा न्याय मिळत नाही. जगात अनेक मुस्लीम राष्ट्रांत झिया-उल-हक, इदी अमीनसारखे हुकूमशहा निर्माण होत आहेत. याचे कारण इस्लामच्या मूळ तत्त्वापासून, शिकवणीपासून मुस्लिमानी घेतलेली फारकत ही होय. पाकिस्तानचे न्या. मुनीर आपल्या पुस्तकात म्हणतात की, इस्लाम गेल्या ६०० वर्षांपासून साचेबंद झालेला आहे, कारण काळांशी सुसंगत आवश्यक परिवर्तनाचे प्रयत्नच त्यात झालेले नाहीत, हे निर्विवाद सत्य आहे. आपल्या देशात 'कुराणा'चा अर्थ राजकीय नेते, मुल्ला मौलवी, सैयदनासाहेब आपल्या सोयीप्रमाणे लावत आहेत. त्यामागे त्यांचा स्वार्थ आहे.

भारतातला मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा इंग्रजांनी तयार केलेला 'अँग्लो-मोहमेडन लॉ' आहे. हा धड इस्लामवर आधारित नाही, धड न्यायावर आधारित नाही, तसेच आधुनिकतेवरही आधारित नाही. या एकतर्फी कायद्याला श्रीमती सय्यद यांनी दिलेले आव्हान व त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केलेली कारवाई स्वागतार्ह घटना होत. यांच्यातून मुस्लीम समाजाला एक वेगळी दिशा लाभण्याची आशा आहे. *(केसरी, सकाळ, ६ ऑगस्ट १९८४)*

मुस्लीम समाजात मूल दत्तक घेण्यासंदर्भात अनुकूलता निर्माण करावी आणि व्यक्तिगत कायद्यातील मर्यादा लोकांच्या लक्षात आणून द्यावे, या अनुषंगाने मंडळाने विविध पद्धतीने लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला.

१० ऑगस्ट १९८४ रोजी व्यक्तिगत कायद्यातून निर्माण होणारी विषमता, त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेसमोर उभी राहणारी आव्हाने टाळण्यासाठी समान नागरी कायदा हा एक उत्तम पर्याय आहे, हे लक्षात आणून देण्यासाठी घेतल्या गेलेल्या कार्यक्रमात इस्माईल मुल्ला लॉ कॉलेज, सातारा येथे जिल्हा लोकाधिकार समितीतर्फे सय्यदभाईंचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी व्यक्तिगत कायदा, मूल दत्तक घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका या संदर्भात विवेचन केले. याप्रसंगी मनोहरपंत भागवत, दिलावर मुल्ला, एन. आय. बागवान, डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्राचार्य केशवराव पाटील, लक्ष्मण माने, प्रा. अर्जुन जाधव, शौकत पठाण आणि कार्यकर्ते उपस्थित होते. याच पद्धतीने दिनांक, २४ सप्टेंबर रोजी वाई येथील किसनवीर महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. *(दैनिक ऐक्य, ११ ऑगस्ट १९८४; सकाळ, २५ सप्टेंबर १९८४)*

समाजवादी विचारवंत केशव गोरे यांच्या स्मृतीदिनी केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगाव, मुंबई येथे 'मुस्लीम स्त्री, धर्म आणि कायदा' या विषयावर २ फेब्रुवारी १९८५ रोजी सय्यदभाई यांच्या

व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यात 'स्पेशल मॅरिज ॲक्ट १९५४'नुसार मुस्लिमांनी विवाह नोंदणी करण्याचे महत्त्व सय्यदभाईंनी स्पष्ट केले. तसेच व्यक्तिगत कायद्याचा दुरुपयोग करून मुस्लीम महिलांवर कसा अन्याय केला जातो, याची काही उदाहरणे सांगितली. याप्रसंगी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी एकेक समस्या निवडून ती दूर करण्यासाठी कायदा करावा असेही प्रतिपादन करण्यात आले. यासंदर्भात काम करणारी मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही एकमेव संघटना असल्याचेही सांगण्यात आले. *(नवशक्ती, ३ फेब्रुवारी १९८५)*

**न्या. बेग आयोगाच्या शिफारशींना विरोध**

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील बदलास न्या. बेग यांच्या अध्यक्षतेखालील अल्पसंख्याक आयोगाने जो विरोध दर्शवला, तो केंद्र सरकारने मान्य करू नये, कारण हा विरोध विषमतेवर आधारित असून फक्त मुस्लीम पुरुषांचीच सोय पाहणारा आहे. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल केल्याशिवाय मुस्लीम स्त्रियांना समानता देता येणार नाही, अशा आशयाची तार मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी पंतप्रधान राजीव गांधी आणि केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांना केली होती.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील बदलास विरोध दर्शवणारा अहवाल अल्पसंख्याक आयोगाने गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांना सादर केला होता. या ४०० पानी अहवालात अल्पसंख्याकांच्या अनेक समस्यांची नोंद घेण्यात आली. त्यामध्ये पंजाब प्रश्न, अल्पसंख्याकांना हक्कांपासून वंचित ठेवणे आणि दुर्बल घटकांना आर्थिकदृष्ट्या प्रगत करण्याबाबत सूचना होत्या.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश बेग यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगाने भारताच्या धर्मनिरपेक्षतेत हस्तक्षेप होत नाही, तोपर्यंत धर्म वेगळा ठेवला पाहिजे, असे मत व्यक्त केले आहे. व्यक्तिगत कायद्याने जगात वाद निर्माण केला आणि अनेक धार्मिक नेत्यांनी वारसा, घटस्फोट, कुटुंब नियोजन, आदी बाबींवर एकमत असावे, असे प्रतिपादन केले असल्याचे अहवालात नोंदवले होते. मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायाधीश आणि न्यायालयावर राहू द्यावी, असे 'शरीयत'मध्येही सांगण्यात आले असल्याचे आयोगाने म्हटले होते. या अहवालास विरोध करताना सय्यदभाई आपल्या पत्रकात म्हणाले की, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात तलाक आणि बहुपत्नीत्वाचे नियम हे पूर्णपणे मुस्लीम पुरुषांच्या बाजूचेच आहेत. कारण पती आपल्या पत्नीला देत असलेला तलाक आणि करत असलेल्या दुसऱ्या लग्नाविरुद्ध पत्नीला न्याय मागण्याचा अधिकार मुस्लीम कायद्यात नाही.

या पत्रकात सय्यदभाई पुढे म्हणाले की, अल्पसंख्याक आयोगाने मुस्लीम पुरुषांची बाजू घेऊन मुस्लीम कायद्यात बदलास विरोध करण्यापूर्वी भारतातील लाखो तलाकपीडित महिलांपैकी काहींच्या मुलाखती घेतल्या असत्या, तर या मुस्लीम कायद्याची विषमता लक्षात आली असती. माझी अशी विनंती आहे की, अल्पसंख्याक आयोगाने अजूनही हा कार्यक्रम हाती घ्यावा, म्हणजे सत्य परिस्थिती त्यांच्या लक्षात येईल. मुस्लीम कायद्यातील विषमतेवरून किमान माणूस म्हणून न्याय मागण्याचा अधिकार मुस्लीम स्त्रीस मिळावा. मुस्लीम पुरुषास काही कारण न देता पत्नीस

तलाक देण्याचा अधिकार, तसेच दुसरे लग्न करण्याचा हक्क ताबडतोब रद्द करावा आणि तलाक घेण्यासाठी मुस्लीम पुरुषालाही न्यायालयात जाणे सक्तीचे करावे.

'मुस्लीम शरीयत कायदा' आणि 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा' ही मुळातच दोन टोके आहेत. व्यक्तिगत कायद्यात वारंवार बदल झालेले आहेत. केंद्रशासित गोव्यात कौटुंबिक कायदे धर्म जातीनुसार नसून तेथे सर्वांना लागू होणारा समान नागरिक कायदा आहे, असेही या पत्रकात नमूद करण्यात आले होते.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल होणार, अशा अफवांमुळे मुस्लीम राष्ट्रांत भारताबद्दल गैरसमज पसरून भारताची प्रतिमा डागाळण्याची शक्यता आहे, असे निवेदन या आयोगाचे अध्यक्ष न्या. बेग यांनी केले असल्याचे वृत्त एका प्रमुख उर्दू वृत्तपत्राने दिले होते. त्याला आक्षेप घेऊन सय्यदभाईंनी म्हटले आहे की, देशातील मुस्लीम स्त्रियांना विषमतेच्या अन्यायाच्या खाईत लोटून मुस्लीम देशातील भारताच्या प्रतिमेची काळजी वाहण्याचे न्या. बेग यांना काहीच कारण नाही. *(महाराष्ट्र हेराल्ड, १७ फेब्रुवारी १९८५; सकाळ, केसरी, १९ फेब्रुवारी १९८५; महाराष्ट्र टाइम्स, २० फेब्रुवारी १९८५)*

## ४.२१ मुस्लीम महिलांचे विविधांगी प्रश्न

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातून निर्माण झालेले मुस्लीम महिलांचे प्रश्न वेळोवेळी चव्हाट्यावर आणले गेले. मात्र पुरुषप्रधान मानसिकता आणि धर्मवादी विचारांची चौकट यातून वेळोवेळी निर्माण होणारे महिलांचे प्रश्न बदलत असले, तरी मूळ प्रश्न मुस्लीम महिला म्हणून कायम त्यांना दुय्यम लेखण्यात होते. हे जसे आंतरराष्ट्रीय इस्लामिक जगतातून दिसून येते, तसेच भारतातही लक्षात येते. विविध जातींमध्ये, अप्रगत समाजामध्ये जसे खाप पंचायत, जात पंचायत समांतर न्यायव्यवस्था निर्माण करतात आणि प्रसंगी संविधानात्मक मूल्यांच्या विरोधातही जातात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जानेवारी २०१३मध्ये पंजाबमधील मुस्लीम नेत्यांनी असाच कालचक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न केला होता. पंजाबमधील संगरुर या मुस्लीमबहुल जिल्ह्यातील मालेर कोटला या गावी देशातील पहिली शरीयत पंचायत स्थापण्याचा निर्णय घेतला आणि मार्च महिन्यात त्याचे उद्‌घाटनही करण्यात आले. ही पंचायत विवाह, घटस्फोट आणि वारसा हक्काचे निवाडे देणार आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटी कमी करून लिंगभेद विरहित कायदा अस्तित्वात आणावा, यासाठी प्रयत्न करत असताना अशा पद्धतीने शरीयत पंचायत स्थापना करणे, ही मुस्लीम समाजासाठी आपत्ती आहे आणि अशा समाजांतर्गत पर्यायी, तथाकथित न्याय देणाऱ्या व्यवस्था या महिलांच्या निकोप हक्कांवर गदा आणणाऱ्या ठरू शकतात म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळाने याचा विरोध केला होता.

दुसरा प्रकार म्हणजे विविध फतवे काढून मुस्लीम महिलांवर आणि त्यांच्या निकोप अभिव्यक्तीवर मर्यादा घालण्यात येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे फेब्रुवारी २०१३मध्ये मुस्लीम धर्मगुरूंनी काश्मीरमधील मुलींच्या रॉक बँड विरोधात फतवा काढून तो इस्लामबाह्य असल्याचे सांगितले. मुलींनी गायन आणि संगीत सोडून द्यावे, यासाठी धमक्या आणि अपमानास्पद वागणूक देण्यात आली होती.

पुरुषप्रधान वर्चस्व दाखवणारी आणखीन एक प्रथा स्लीम समाजात पुढे आली आहे. ती म्हणजे लग्नपत्रिकेत वधूचे नाव न टाकणे. त्याऐवजी तिच्या वडिलांचे नाव टाकून, त्यांची ही मुलगी आहे, असे सांगितले जाते. लग्न होणाऱ्या मुलीची ओळख नष्ट करून तिचे अस्तित्व आणि अस्मिता बाजूला ठेवण्याचा हा प्रकार महिलांच्या स्वतंत्र अस्तित्वाविरोधात पायंडा पाडण्याचा प्रकार आहे. महिलांचे स्वतंत्र स्थान नाकारून त्यांना वस्तू समान गणण्याचा हा प्रकार आहे. लग्नपत्रिका ही अनेक ठिकाणी एक पुरावा म्हणून वापरण्यात येते. मात्र हा प्रकार मुलींसाठी अडचणी निर्माण करणारा आहे.

भारतामध्ये मुलींसाठी १८ वर्ष वयाची अट कायदासंमत आहे. असे असतानाही मुस्लीम मुलगी १५ व्या वर्षी लग्न करू शकेल, असा निवाडा दिल्ली उच्च न्यायालयाने दिला. मुस्लीम मुलीने वयाच्या १५व्या वर्षी यौवनात प्रवेश केला असेल आणि ती स्वेच्छेने लग्न करू इच्छित असेल, तर त्यांच्या धर्मानुसार तिला तशी परवानगी आहे, असा निकाल दिल्ली उच्च न्यायालयाने दिला. मुस्लीम धर्मीयांचा कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाचा विचार करता एखादी

मुस्लीम मुलगी वयाच्या १५व्या वर्षी विवाह करत असेल, तर यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न हे गंभीर स्वरूपाचे असू शकतात. धर्माच्या नावावर अशा प्रकारचे विशेष कायदे अस्तित्वात आणणे, हे सामाजिक स्वास्थ्यासाठीही घातक आहे. यातून विविध वाद आणि अपसमज निर्माण होऊ शकतात.

केरळमध्ये जून २०१३मध्ये मुस्लीम मुलगी आणि मुलाचे वय अनुक्रमे १८ आणि २१ पूर्ण झालेले नसले, तरी त्यांनी धार्मिक नियमन संस्थेचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांच्या विवाहाची नोंदणी करण्याचे आदेश देणारे परिपत्रक स्थानिक प्रशासन विभागाच्या प्रधान सचिवांनी प्रस्तुत केले. यामुळे केरळमध्ये वाद उफाळून आला. या परिपत्रकाच्या विरोधात मंडळाने आणि पुरोगामी संघटनांनी आवाज उठवला. मात्र मुस्लीम विवाह कायदा, १९५७मध्ये वयोमर्यादेची अट नाही आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६मध्ये २१ वर्षांखालील मुलगा आणि १८ वर्षांखालील मुलगी यांचा विवाह अवैध असल्याचे नमूद केलेले नाही, असे स्पष्टीकरण शासनाकडून देण्यात आले.

लग्नपत्रिकेत महिलांची नावे छापली, निकाह लावताना वधूवरांना एकत्र व्यासपीठावर बसवले, यामुळे मुस्लिमांच्या भावना दुखावल्या आणि इस्लाम, शरीयत व निकाह पद्धतीला छेद देण्यात आला, असा आरोप करून बारामती येथील मुस्लिमांनी सोनवडी, सुपे येथील सय्यद व शेख कुटुंबीयांचा निषेध करून त्यांच्यासह त्यांचे आई-वडील, काझी साक्षीदार यांच्यावर कडक कारवाई करावी, असे धमकीवजा निवेदन प्रांताधिकाऱ्याकडे केले. मंडळाचे सरचिटणीस प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी याचा समाचार घेत बहिष्काराची भाषा करणाऱ्या विरोधातच गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आणि अशा विवाहास कोणतीही धार्मिक आडकाठी नसल्याचे स्पष्ट केले. बारामतीकरांची भूमिका जात पंचायत सदृश असल्याचे सांगितले. मुस्लीम समाजात अनेक विवाहित विवाहाची नोंदणी करत नाहीत. याकडे लक्ष वेधून अशी नोंदणी अनिवार्य करण्याबद्दल धोरणाची अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त केली.

तलाक हा वादग्रस्त आणि मुस्लीम महिलांसाठी अन्यायाचा विषय ठरलेला असताना दारुल-उलूम-देवबंद यांनी दारूच्या नशेत दिलेला फोनवरचा तलाक वैध मानण्यात येईल, असा फतवा जाहीर केला. दारुल उलूम देवबंदच्या दारुल इफ्ताने १३ मार्च २०१२ रोजी हा फतवा काढला. मद्याच्या नशेत असताना टेलिफोनवर दिलेला तलाक इस्लामी कायद्यात वैध मानण्यात यावा का, आणि अशा परिस्थितीत काय करावे, असा प्रश्न लग्न झालेल्या व दारूच्या नशेत पतीने तलाक दिल्यानंतर विवाहितेच्या भावाने विचारला होता. दारूच्या नशेत त्रिवार तलाक उच्चारला, मात्र त्यानंतर त्याला चूक लक्षात आली. ती दुरुस्त करण्याची इच्छा होती, अशा स्थितीत मुस्लीम कायद्यानुसार तलाक देण्यात आलेली महिला पत्नी म्हणून राहू शकते का? असे विचारले असता फतव्यात सांगण्यात आले की, हा तलाक वैध असल्याने पतीसाठी पत्नी हराम होते. योग्य पद्धतीने हलाला केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती तलाक दिलेल्या पत्नीसोबत दुसऱ्यांदा लग्न करू शकत नाही. यासाठी 'इद्दत'चे दिवस पूर्ण केल्यानंतर (३ महिन्यानंतर) दुसऱ्या पुरुषाबरोबर लग्न करून आणि त्याला तलाक देऊत्याच्याकडून तलाक घेऊन दुसऱ्यांदा 'इद्दत' पूर्ण केल्यानंतर पुन्हा आपल्या पहिल्या पतीसोबत निकाह करता येईल, असे स्पष्टीकरण देण्यात आले. या घटनेचा

मंडळाने निषेध केला.

याच पद्धतीने परधर्मियांशी प्रेम किंवा निकाह करणेसुद्धा इस्लामला नाकबूल असून अशा लग्नाला विरोध दर्शवणारा फतवा दारुल उलूमचे उस्ताद मुफ्ती आरिफ कासमी यांनी काढला. तसेच निकाहचे व्हिडिओ शूटिंग शरीयतला मान्य नसल्याने असे चित्रीकरण करणे किंवा निकाहाची छायाचित्रे काढणे, इस्लामला मान्य नसल्याचा फतवा दारुल उलूम देवबंदने काढला होता.

तोंडी तलाकच्या संदर्भात अनेक घटना समाजात घडत असतात. एका पतीने पत्नीला फोनवरून तलाक दिल्याचे सांगितले. परंतु पत्नीने 'मी हा तलाक ऐकला नाही', असे सांगून 'मला हा तलाक मान्य नाही' अशी भूमिका घेतली होती. तसेच झोपेत (शुद्धीवर नसताना) तलाक उच्चारल्याबद्दल धार्मिक नेत्यांनी 'कालबाह्य हलाला' पद्धतीचा आग्रह धरून या दाम्पत्यास धार्मिक बहिष्काराची धमकी दिली आहे. या संदर्भात काही मुस्लीम नेत्यांनी सुधारणावादी भूमिका घेऊन पती-पत्नीला एकत्र राहण्यात अडचण नसल्याचे स्पष्ट केले आहे. वास्तविक, मुस्लीम सत्यशोधक मंडळ व ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सने हा विषय गेल्या अनेक वर्षांपासून गांभीर्याने घेतला असून यासंदर्भात 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'त सुधारणा घडवून आणण्यासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री, खासदार यांना भेटून निवेदने दिली. चर्चाही केली. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. मंडळाने देशभरात आयोजित केलेल्या परिषदा, मोर्चे, उपोषण यामुळे कायदा बदलला नसला, तरी मुस्लीम महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण होऊन संघटना निर्माण झाल्या व कायद्यात सुधारणा करण्याची मागणी या संघटना करीत आहेत.

मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डातील काही सदस्यांनी तोंडी तलाकसारख्या पद्धती बदलण्याची भूमिका घेऊन त्यांनी महिला व मुस्लीम समाजातील नेत्यांबरोबर चर्चा केली, परंतु या बोर्डाची भूमिका अजूनही अस्पष्ट व संदिग्ध स्वरूपाचीच आहे. देशातील सर्व पुरोगामी व सुधारणावादी व्यक्ती व संघटनांनी अधिक धाडसाने एकत्र येऊन, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी व्यापक जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच कायद्यात बदल करण्याची मागणी कोणत्याही धार्मिक मंचाकडे न करता धर्मनिरपेक्ष अशा (संसद) कायदा मंडळाकडे केली पाहिजे. धर्मावर विश्वास ठेवण्याची किंवा न ठेवण्याची व्यक्तीची स्वायत्तता म्हणजे धर्मनिरपेक्षता, हा धर्मनिरपेक्षतेचा एक अर्थ विचारात घेऊन सर्व धर्मनिरपेक्ष लोकशाही मूल्यांशी बांधील असणाऱ्या व्यक्तींनी झोपेत, शुद्धीत नसताना 'तलाक' उच्चारणाऱ्या दाम्पत्यावर धर्माच्या नावावर अन्याय होऊ नये, यासाठी पाठिंबा व्यक्त करून समतेवर आधारित कायद्याची मागणी पुढे आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मंडळाची अपेक्षा आहे.

मुस्लीम सत्यशोधक अशा प्रकारचे वादविवाद आणि मुस्लीम महिलांवरील अन्याय दूर करण्यासाठी समताधिष्ठित समान नागरी कायद्याची मागणी करत असते. *(लोकमत, ३० मार्च २०१२; सकाळ, २ एप्रिल २०१२; महाराष्ट्र टाइम्स, १६ जानेवारी २०१३, १२ फेब्रुवारी २०१३; महाराष्ट्र टाइम्स, २० मार्च २०१३; सकाळ, २३ जून २०१३; लोकसत्ता, सकाळ, २९ ऑगस्ट २०१३)*




# ५. विरोध, वाद-प्रतिवाद आणि प्रतिसाद

*(मुस्लीम समाज प्रबोधनाचा विषय नवी वाट दाखवणारा असल्याने प्रस्थापित वर्गांना हा विषय अप्रिय असतो. मंडळाने सुरू केलेल्या कार्यास विरोध हा स्वाभाविक आहे. या विरोधाचे स्वरूप, समाजाची मानसिकता आणि मतभेदाचे मुद्दे लक्षात यावेत म्हणून या भागात मंडळाने घेतलेले कार्यक्रम, भूमिका आणि प्रतिसाद यासंदर्भात विविध वर्तमानपत्रांत आणि इतर नियतकालिकांत त्या वेळी प्रसिद्ध झालेला मजकूर जसाच्या तसा वापरला आहे.)*

## ५.१ हमीद दलवाई मुसलमान नव्हता

*(मुस्लीम सत्यशोधक मंडळाची पायाभरणी हमीद दलवाई यांनी केली. ही चळवळ हमीद दलवाईंचे सुधारणावादी विचार केंद्रस्थानी ठेऊन काम करते. हमीद दलवाईंच्या काळापासून विरोधकांनी विविध पद्धतीने हमीद दलवाई यांचे प्रतिमाभंजन करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांचे विचार आणि विरोध करण्याची भाषा कशा पद्धतीची होती, याची जाणीव दलवाई यांच्या निधनानंतर मुंबईच्या 'दाई' या उर्दू साप्ताहिकात आलेल्या लेखातून लक्षात येते. हा लेख रा. भि. जोशी यांनी अनुवादित केला असून तो 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'त १९७७मध्ये प्रकाशित झाला आहे.)*

काँग्रेस सरकारने सत्तेवर असताना मुसलमानांना त्यांच्या धर्मापासून दूर करून नागरी कायद्याचा रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी त्याने मुसलमानांमधले काही धर्म-विन्मुख लोक निवडून काढून, 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा' नष्ट करण्यासाठी, आणि सेक्युलॅरिझमच्या नावाखाली मुसलमानांची संस्कृती आणि सभ्यता विकृत करण्याकरता आपली सर्व शक्ती खर्च केली. याशिवाय पैशाने विकत घेतल्या गेलेल्या त्या मुसलमानांनी धर्माची चेष्टा करण्यात 'कुराण'ची व हदीसची तत्त्वे आणि नियम विकृत करण्यात आपल्या साथीदारांवरदेखील मात केली!

**कालनिंदित माणूस**

पैशाने विकत घेतल्या गेलेल्या (जरखरीद) अशा नामधारी मुसलमानांपैकीच हमीद दलवाईदेखील होता. अलीकडेच त्याचे निधन झाले आणि त्याच्या मृत्यूपूर्व इच्छेनुसार त्याची उत्तरक्रिया विजेच्या साहाय्याने केली गेली. ह्या कालनिंदित (रूसवा ए जमाना) माणसाने काही इस्लामविन्मुख स्त्रिया आणि पुरोगामी मुसलमान गोळा करून भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' ह्या नावाची एक संस्था पुण्यात स्थापन केली. 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा, पडदा पद्धती, तलाक, खुला, पत्नींची संख्या आणि इस्लामी दृष्टीकोन ह्यांची ह्या संस्थेत इस्लामच्या शत्रूपेक्षाही कितीतरी अधिक निर्लज्जपणे चेष्टा केली जात असे!

**कुकर्माचे फळ**

आपल्याला स्वतःला मुसलमानांचा सल्लागार आणि थोर मार्गदर्शक म्हणून सिद्ध करण्यासाठी जो हमीद दलवाई इस्लाम, 'कुराण' आणि हदीस ह्यांच्यापासून मुसलमानांना पराङ्गमुख करीत होता, दूर नेत होता आणि आपली सर्व शक्ती इस्लामच्या विरुद्ध वापरीत होता, त्याला अखेर आपल्या कुकर्माचे फळ मिळाले. मरण्यापूर्वी एक इच्छापत्र लिहून चार वेगवेगळ्या लिफाफ्यांत घालून ते त्याने चार काँग्रेस पुढाऱ्यांकडे पाठवले. त्याने त्यांत लिहिले होते, "मी नास्तिक आहे आणि नास्तिक म्हणूनच मरत आहे. माझा कोणत्याही धर्मावर विश्वास नाही. मृत्यूनंतर माझ्या देहाचे दहन करावे, आणि त्या प्रसंगी कोणत्याही प्रकारचा धार्मिक विधी करू नये."

**खरे स्वरूप उघड झाले**

मरणाऱ्याने आपले खरे स्वरूप अखेर उघड केले हे चांगले झाले. नाहीतर सरकार आणि सरकारचे कारभारी त्याला भारतीय मुसलमानांचा प्रतिनिधी आणि इस्लामचा भाष्यकार म्हणण्याचा हट्ट धरून बसले असते!

काँग्रेस सरकारने इस्लामी शिक्षणाच्या विरुद्ध नेहमीच नामधारी मुसलमानांच्या मध्यस्थीने पलटण उभी केली. आज इंदिरा सरकारचा सूर्य मावळला आहे. आज जनता सरकार अधिकारपदावर आले आहे. त्या कालनिंदित नास्तिकाचा, त्याच्याच म्हणण्याप्रमाणे, भारतीय मुसलमानांशी आणि 'मिल्लते इस्लामिया'शी काहीही संबंध नसताना हमीद दलवाईचा मृत्यू म्हणजे मुसलमानांची आणि हिंदुस्तानची फार मोठी हानी आहे, असे आमच्या परराष्ट्रमंत्र्यांना आणि जनता पक्षाच्या पुढाऱ्यांना वाटत आहे. त्यांचे हे म्हणणे हिंदुस्थानच्या करोडो मुसलमानांची अंतःकरणे दुखावणारे आहे. आम्ही आमच्या राज्यकर्त्यांना साफ साफ सांगतो की, हमीद दलवाई हा मुस्लीम समाज आणि संस्कृती ह्यांवरचा एक कलंक होता. उद्याचा इतिहासकार त्याचा उल्लेख 'इस्लामचा शत्रू' आणि 'मुसलमानांचा गद्दार' म्हणूनच करील.

## ५.२ सिनेमाबंदीचे आंदोलन

फेब्रुवारी १९८२मध्ये नजमा बांगी यांनी मुस्लीम महिलांचे अनेक प्रश्न चव्हाट्यावर आणले. हमीद दलवाईंनंतर मुस्लीम महिला आपल्या प्रश्नावर आवाज उठवतात, हे कौतुकास्पद होते. नजमा बांगी यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे समाजाला अंतर्मुख होण्यास भाग पाडणारे होते. मुस्लीम महिलांना करण्यात आलेली सिनेमा बंदी ही आजच्या आधुनिक काळात विसंगत असल्यामुळे या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. मुस्लीम महिलांना चित्रपट बंदी करणे, हा चीड आणणारा प्रकार असल्याने नजमा बांगी यांच्यासारख्या महिला त्याविरोधात आवाज उठवणारच. नजमा बांगी यांना समर्थन देण्यासाठी रजिया पटेलांनी तिला पाठिंबा दिला. जळगाव येथील पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्या रजिया पटेल यांनी पुराणमतवादी मुस्लिमांनी काढलेल्या फतव्यास आक्रमकपणे विरोध केला आणि तो फतवा धुडकावून लावला. महिला संघटन करून, या मुस्लीम महिलांना घेऊन वाजत-गाजतपणे 'मेरी आवाज सुनो' हा सिनेमा सामुदायिकपणे पाहिला. या घटनेनंतर रजिया पटेलांना मारण्याच्या व बहिष्काराच्या धमक्या येऊ लागल्या. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने रजिया पटेलांच्या आंदोलनास पाठिंबा दिला आणि या आंदोलनात उडी घेतली. मंडळाने पोलीस यंत्रणा आणि मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून रजिया पटेल आणि त्यांच्या समवेत चित्रपट पाहणाऱ्या ८० महिलांना संरक्षण देण्याची मागणी केली. धमकी व बहिष्कार घालणाऱ्या लोकांची चौकशी करून योग्य ते शासन करण्याची मागणी मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी पत्रकाद्वारे केली.

मुस्लीम समाजात पुरुषाने चित्रपट पाहिलेला चालतो, मग महिलांना चित्रपट पाहण्यासाठी बंदी का? महिलांनी चित्रपट पाहणे, धर्मविरोधी कृत्य आहे, असे कोणत्या मुस्लीम धर्मग्रंथात म्हटले आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ८ मार्च १९८२ रोजी मुस्लीम महिलांना बरोबर घेऊन मिरवणुकीद्वारे जळगाव येथील 'चित्रा' या चित्रपटगृहात जाऊन सिनेमा पाहणे आणि तथाकथित धार्मिक परंपरेविरुद्ध बंड पुकारणे, या कृतीचे प्रसारमाध्यमांनी कौतुक केले. दरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुस्लीम महिलांनी चित्रपट पाहू नये, असे आदेश काढून चित्रपट पाहण्यावर बंदी घालण्यात आली. अकोला, भुसावळ, जळगाव इत्यादी ठिकाणी पडसाद उमटले.

२ मे १९८१ रोजी रमझान ईदच्या दिवशी जळगाव येथील भिमपुरा भागात सुधारक समितीची बैठक झाली. त्यात असे ठरवण्यात आले की, मुस्लीम महिलांना चित्रपट पाहण्यास बंदी करण्यात यावी आणि कोणत्याही मुस्लीम महिलेने चित्रपट पाहिल्यास ५१/- रुपये दंड, दुसऱ्यांदा पाहिल्यास १०२ रुपये दंड आणि तिसऱ्यांदा पाहिल्यास सामाजिक बहिष्कार घालण्यात येईल, असे बैठकीत ठरले. समितीचा हा निर्णय अत्यंत संतापजनक होता, तसेच दंड व बहिष्कार भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांच्या विरोधात होता. अनेक ठिकाणी समितीतील निर्णयाची तथाकथित धर्मवाद्यांनी अंमलबजावणी करून चित्रपट पाहिल्यामुळे दंड वसूल केला. भिमपुरा भागातील एक महिला तिच्या पतीसोबत सिनेमा पाहण्यासाठी गेली असता, झरीना नावाच्या महिलेस तिच्या वडिलांसमक्ष शिवीगाळ करून वडिलांकडून ५१/- दंड वसूल करण्यात आला होता.

असे प्रकार अनेक ठिकाणी, अनेक चित्रपटगृहात घडले. यामुळे पंच-समितीच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे अपरिहार्य होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने धाडसाने चित्रपट पाहणाऱ्या महिलांना पाठबळ देऊन अशा महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. *(सकाळ, १२ मार्च १९८२; सकाळ, १२ मार्च १९८२; महाराष्ट्र टाइम्स, १९ मार्च)*

## ५.३ पीडित मुस्लीम स्त्रियांना न्याय मिळावा

२४-२५ ऑक्टोबर १९८२ रोजी पुण्यात बुद्धिप्रामाण्यवादी मंचाची परिषद झाली. यात झालेल्या सत्रात पुरोगामी बोहरा ताहेरभाई पूनावाला यांनी 'समान नागरी कायद्या'ची मागणी करणारा निबंध वाचला. त्यात ब्रिटिशांनी सतीच्या चालीवर निर्बंध घालणारा कायदा हिंदू समाजाच्या विरोधाला न जुमानता केला, त्याचप्रमाणे शासनाने मुस्लीम समाजाच्या विरोधाला न जुमानता समान नागरी कायदा करावा, असे विचार मांडले. त्यानंतर इस्मत चुगताई, सय्यद भाई, अन्वर राजन, न्यायमूर्ती जहागीरदार व इतरांनीदेखील 'समान नागरी कायद्या'ची आग्रहाची मागणी केली.

असे असताना दुपारी ठराव मांडण्याच्या सत्रात 'रॅशनालिस्ट असोसिएशन'चे पुरोगामी बोहरा याह्याभाई लोखंडवाला यांनी वेगळाच सूर लावला. त्यांनी वेगळा ठराव मांडला की, मुसलमानांकडून समान नागरी कायद्याची मागणी यावी, यासाठी शासनाने रेडिओ, टी.व्ही. व इतर प्रचारमाध्यमे मुसलमानाच्या लोकशिक्षणासाठी उपयोगात आणावी. याचाच अर्थ शासनाने मुस्लिमाकडून मागणी झाल्यावरच 'समान नागरी कायदा' करावा, असा होतो. वास्तविक पाहता स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्यांनी असे वागायला नको होते. सर्वोच्च न्यायालयाने तलाकपीडित महिलेला पोटगी देण्याचा जो योग्य निर्णय दिला, त्याचे स्वागत करण्याऐवजी तो निर्णय रद्द व्हावा, असे प्रयत्न मुस्लिमांचे स्वतःला नेते म्हणवणारे करत आहेत. त्यांचे प्रबोधन झाले नाही किंवा त्यांना हे प्रश्न माहीत नाहीत, असे नाही. परंतु स्वार्थी हेतूने व राजकारणात नेतृत्व टिकवण्यासाठी ही भूमिका हे नेते घेत आहेत. या वातावरणात अल्पशिक्षित समाज, विशेषतः ज्या स्त्रियांना या कायद्यामुळे अन्याय भोगावा लागतो, त्यांच्यावर अन्याय करणाऱ्यांकडून ही मागणी येईल, अशी आशा करणे मूर्खपणाचे ठरेल.

संधी मिळेल त्या ठिकाणी मुस्लीम महिला 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्या'विरुद्ध आवाज उठवत आहेत. परंतु पुरुषांच्या वर्चस्वात असल्यामुळे पाहिजे, त्या प्रमाणात मुस्लीम महिला रस्त्यावर येऊ शकत नाहीत. वास्तविक या मागणीला स्त्रियांचा म्हणजेच ५० टक्के मुस्लीम समाजाचा पाठिंबा आहे, असेच गृहीत धरून समान नागरी कायदा होण्याच्या दिशेने वाटचाल व्हावी.

तेव्हा या सर्व बाजूंचा विचार करून आपण पुरोगामी व बुद्धिप्रामाण्यवादी मंडळींनी पीडितांना न्याय कसा मिळेल, याचा विचार करावा.

– सय्यदभाई, अन्वर राजन, पुणे *(महाराष्ट्र टाइम्स, २७ नोव्हेंबर १९८२)*

## ५.४ एशियाड व मुस्लीम स्त्री

*(मुस्लीम महिलांच्या सार्वजनिक वावरात आक्षेप नोंदवून अशा महिलांनी क्रीडा स्पर्धेतही सहभाग घेऊ नये, अशी मानसिकता व्यक्त करणारे पत्र वर्तमानपत्रातून मुस्लीम वाचकांनी लिहिले. यामध्ये असे एक पत्र होते- )*

आपल्या दिनांक २७-११-८२च्या 'म. टा.'मधील फातिमा शेख व नरगीस नवाब व पुण्याचे सय्यदभाई व अन्वर राजन यांची पत्रं वाचण्यात आली. त्यांच्या मतांशी मी पूर्णपणे असहमत आहे. कुठलेही कारण शोधून इस्लाम धर्म, मुस्लीम चालीरिती व परंपरा यांचेवर टीका करण्याची अलीकडे एक फॅशनच झाली आहे. या तथाकथित सुधारणावाद्यांना कधी महमद पैगंबर यांनी मक्कापासून मदिनेला केलेला 'हिजरा', तर कधी एशियाड क्रीडास्पर्धा यांचे नुसते निमित्तच हवे असते. ह्यांना दुःख कशाचे तर मुस्लीम महिलांचा एशियाडमध्ये समावेश नसल्याचे! ह्यांना कुठली संस्कृती व परंपरा अनुकरणीय, तर जगाला नंगानाच शिकवणाऱ्यांची. वास्तविक घटनेप्रमाणे प्रत्येक जण आपआपल्या धर्माचे व संस्कृती-परंपरांचे अनुकरण व जतन करू शकतो. मग हे सुधारणावादी इस्लाम धर्माच्या मागेच हात धुऊन का लागले आहेत तेच न कळे! मुस्लीम महिलांनी इज्जत, अब्रू वेशीला टांगून नुसता नंगानाच करावा, अशी ह्यांची अपेक्षा आहे का? एशियाड निमित्ताने महिलांच्या विविध पोझेसमधील फोटो पहा. किती किळसवाणे वाटतात ते! सुधारणावादाच्या नावाखाली स्वतःच्या देहप्रदर्शनास एक खानदानी व धर्मप्रिय मुस्लीम स्त्री कधीही संमती देणार नाही! सुधारणावाद्यांनी याची दखल घेतलेली बरी.

– सय्यद मुनीर, इस्लामपूर (महाराष्ट्र टाइम्स, १५ डिसेंबर १९८२)

**स्त्री-देह प्रदर्शनाचा तमाशा?**

इस्लामपूरचे सय्यद मुनीर यांचे ११ डिसेंबर १९८२च्या म. टा.मध्ये पत्र वाचले, एशियाडमधील मुस्लीम महिलांची अनुपस्थिती आणि तलाकपीडित महिलांच्या दुःखाबद्दल लिहिलेले पत्र वाचून जनाब मुनीरसाहेब खूपच रागावलेले दिसतात. आमच्या पत्रामध्ये इस्लामला झोडलेले नसून इस्लामच्या नावाखाली आमच्या मुस्लीम भगिनींना पोलादी पडद्याआड ठेवून स्वार्थी घाणेरडे राजकारण करणाऱ्या धेंडांना मात्र निश्चित झोडले आहे.

एशियाडमध्ये मुस्लीम महिलांनी भाग घेणे म्हणजे नंगानाच होय, असा जावईशोध मुनीरसाहेबांनी लावलेला आहे. मुस्लीम स्त्रियांनी 'चूल नि मूल' या पलीकडे जाऊ नये अशी त्यांची धडपड.

डोळ्यावर झापड लावून जातीवादी बुद्धीतून एशियाड खेळावर टीका करणाऱ्या माणसाला मला सांगायचे आहे की, मुस्लीम महिलांचा नंगानाच एशियाडमध्ये नसून आपल्या शेजारीच मिरजेला आणि हैद्राबादला अरबांनी चालविलेला आहे. गरीब, श्रीमंत, खानदानी, धर्मप्रिय आमच्या मुस्लीम

माय–बहिणींशी अनेक लग्ने व तोंडी तलाकचा बाजार चौकाचौकातून उभारून खरोखरच नंगा नाच चालविलेला आहे, ते दिसत नाही वाटते? की आपलेच दात, आपलेच ओठ, म्हणून तेरी भी चूप मेरी भी चूप, असे तर नाही ना?

दुसरे असे, एशियाडमधील खेळातील महिलांचे निरनिराळ्या पोजेसमधील फोटो या सद्‌गृहस्थाला किळसपणे वाटले म्हणे. परत संकुचित दृष्टीकोन, स्त्री म्हटले की, फक्त उपभोगाचीच वस्तू, इतकीच बुद्‌धी पत्रलेखकाला दिसते. फोटोतील मुलींनी केलेल्या कसरती पाहाण्यापेक्षा पत्रलेखक त्यांचे शरीर न्याहाळत बसले.

आपण मुस्लीम महिलांचे रक्षक आहोत, असा आव मुनीरसाहेबांनी आणून धूळफेक केली आहे. मला त्यांना सुचवायचे आहे की, मुस्लीम तरुणींच्या देहप्रदर्शनाचा खरा किळसवाणा तमाशा मिरज आणि हैद्राबाद या ठिकाणी पैट्रोडॉलर घेऊन आलेल्या अरबांनी भारतीय मुस्लीम समाजाच्या साक्षीने राजरोस चालवला आहे. म्हणून त्याबद्‌दल तोंड उघडा ना! खरा नंगानाच हा आहे. वेड घेऊन पेडगावला जाण्यात काय अर्थ आहे?

– सय्यदभाई, पुणे (महाराष्ट्र टाइम्स, २२ डिसेंबर १९८२)

## ५.५ धर्मगुरूंना वेतन निषेधार्ह!

भारताने धर्मनिरपेक्षता हे संविधानिक मूल्य म्हणून स्वीकारले असले, तरी त्याची निश्चित व्याख्या करण्यात आलेली नाही, त्यामुळे या संकल्पनेबाबत अनेक वेळा गोंधळाची स्थिती निदर्शनास येते. शासनाने किमान कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार, पक्षपात करू नये. धर्म आणि शासन हे स्वतंत्र विषय असावेत, अशी अपेक्षा आहे, मात्र असे होताना दिसत नाही.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सोलापूर येथील आघाडीचे कार्यकर्ते प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर यांनी या संदर्भात 'महाराष्ट्र टाइम्स'मधील अग्रलेखास ('विजयाचा भुर्दंड') प्रतिसाद म्हणून भूमिका स्पष्ट केली–

तामिळनाडूमधील पेरियाकुलम या मतदार संघातील एका फार मोठ्या गैरप्रकारावर प्रकाश टाकला आहे. रामचंद्रन सरकारच्या मुल्ला–मौलवी व पेशइमाम यांना निवडणुकीच्या आधी मुस्लीम बहुसंख्य असणाऱ्या फक्त एका मतदारसंघातून रुपये २५०/– मासिक वेतन देण्याचा प्रकार हा खरोखरच निषेधार्ह आहे. या प्रकाराला न्यायालयात आव्हान दिले गेलेच पाहिजे. आज स्वातंत्र्याच्या ३५ वर्षांनंतरदेखील मुस्लीम धर्मगुरूंना निवडणुकांसाठी गोंजारणे आम्ही थांबविणार आहोत की नाही? याच मुल्ला–मौलवींनी व पेश इमामांनी सर्वसामान्य मुसलमानांना धर्मवेड व अंधश्रद्धा यांच्या दुष्टचक्रात गुंतवून टाकले आहे. ही मंडळी मशिदीतून सकाळ–संध्याकाळ भाकडकथा सांगून मुस्लिमांना आधुनिकतेकडे वळू देत नाहीत. याचे उच्चाटन केल्याखेरीज मुस्लीम समाजात प्रबोधन होणार नाही. परंतु राज्यकर्ते मंडळी स्वार्थासाठी यांना पोसत आहेत. म्हणजे मुस्लिमांतील कडव्या गटांना व धर्ममार्तंडांना पोसावयाचे आणि दंगली उसळल्या किंवा मुसलमानांनी सुधारणांना विरोध दर्शविला की, मुसलमान राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यास तयार नाही, म्हणून त्यांच्या राष्ट्रनिष्ठा शंकादायक आहेत, अशी ओरड करायची. असा मोह जनता कारकिर्दीतल्या राजकारण्यांनादेखील आवरता आला नाही. त्यांनी मौलाना बुखारींना हाताशी धरून राजकारण केले, त्याचे दुष्परिणाम सगळ्यांना भोगावे लागत आहेत. *(महाराष्ट्र टाइम्स, १ नोव्हेंबर १९८२)*

## ५.६ झियांच्या विधानाचा निषेध

पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल झिया यांनी २ एप्रिल १९८३ रोजी भारतातील मुस्लिमांबद्दल चिंता करणारे विधान केले. भारतातील मुस्लीम समाज हा असुरक्षित आणि भयभीत असल्याचे त्यांनी म्हटले. त्यांच्या या विधानाचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडून निषेध करण्यात आला.

मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाईंनी यासंबंधी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे, "भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध सुधारण्यासाठी वाटाघाटी चांगल्या वातावरणात होत असताना जनरल झिया यांनी अशी बेजबाबदार विधाने करून आपल्या कोत्या ज्ञानाचे प्रदर्शन केले आहे. वास्तविक पाकिस्तान किंवा अन्य कोणत्याही इस्लामिक देशांत मिळते, त्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य आणि लोकशाही हक्क भारतातील मुस्लिमांना मिळाले आहेत. आज बहुतेक इस्लामिक देशांत राजेशाही किंवा हुकूमशाही आहे. तर इराणसारख्या देशात अनेक लोकांच्या कत्तली होत आहेत."

पत्रकात पुढे म्हटले आहे, "भारतात काही ठिकाणी दंगे झाले असले, तरी त्यावरून इथल्या मुस्लिमांच्या अस्तित्वाला धोका पोहोचला आहे, असे म्हणणे मूर्खपणाचे आहे. दंग्यावरूनच असे विधान असेल, तर पाकिस्तानात सध्या ठिकठिकाणी शिया-सुन्नी दंगे चालू आहेत. त्यात जाळपोळ होणाऱ्या इमारती या पवित्र मशिदी असून, मरणारे व मारणारे हे मुसलमानच आहेत. तेव्हा झिया यांनी पाकिस्तानातल्या मुसलमानांच्या जीविताची काळजी घेणे योग्य ठरेल." *(नवशक्ती, २ एप्रिल १९८३; महाराष्ट्र टाइम्स, ५ एप्रिल १९८३)*

## ५.७ इस्लाम धर्मात लुडबुड?

मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे पुण्यात ४ व ५ जून १९८३ रोजी हमाल भवन, गुलटेकडी येथे 'मुस्लीम कायद्यातील सुधारणा आणि स्त्रीमुक्ती' याविषयावर अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला विरोध करणाऱ्या पुण्यातील काही मुस्लीम सनातन्यांनी पत्रक काढून विरोध केला. त्या पत्रकातील मजकूर पुढीलप्रमाणे :

सत्यसहायक समिती,
मुहम्मद हुसेन व हफीज बेबाक,
१५१५, भिमपुरा, पुणे - ४११००१

मुस्लीम कायद्यात सुधारणा? इस्लाम धर्माने चौदाशे वर्षांपूर्वी लोकांच्या रानटी प्रवृत्तीला माणुसकीचा व मुक्तीचा मार्ग दाखवून सुधारणा केली स्त्रियांवर होणारे अन्याय व अत्याचार प्रथमच इस्लाम धर्माने थांबवले त्यांना आपल्या हद्दीत राहून स्वतःचे हक्क व स्वातंत्र्य दिले.

कोणी मुस्लीम जर इस्लाम धर्माच्या कायद्यावर चालत नसेल, तर होणाऱ्या नुकसानीला ते स्वतः जबाबदार असतील.

इस्लाम धर्मात राहून जर कोणाचा श्वास कोंडत असेल, अधिक स्वातंत्र्य किंवा ते सुधारणा मागत असतील, तर जगात त्यांच्यासाठी अनेक धर्म आहेत. सत्यशोधकवाल्यांनी सरळ तेथे जावे. उदा. आपल्याला डायबिटीस झाला आहे आणि समोर ताटात गोड पदार्थ आहे, मग सरळ आपण ताट बदलावे.

सत्यशोधकवाल्यांना इस्लाम धर्माविषयी जर इतकी द्वेषाची भावना निर्माण झाली असेल, तर मग आपण इस्लाम धर्मात अद्यापपर्यंत का पडून आहात? प्रत्येक धर्मात सत्य असते, म्हणून लोकांचा धर्मावर विश्वास टिकून आहे. सत्यशोधकवाल्यांचा तर धर्मावरून विश्वास उडाला आहे, त्यांना मृत्यूनंतर दफन करणे त्यांना पसंत नाही, मग ते कसले मुस्लीम?

मुस्लीम कायदा सुधारलेला आहे. मुस्लीम कायद्यावर चालून सत्यशोधकवाले स्वतःला सुधारू शकतील.

इस्लामी कायद्यावर चला, मगच सर्व काही सुधारेल.

सत्यशोधक मंडळाचा जातीय तणाव निर्माण करणाऱ्या भाषणास व धार्मिक भावना दुखावणाऱ्या कृतीला सरकारने बंदी घालावी.

- हाजी हमीदुल्ला खान, ॲड. ए रहमानजी, ॲड. करीम बी. शेख, मोहम्मद हुसेन, हफिज बेबाक, नौशाद खान, रशीद खिजर, कादरभाई इब्राहिम खान, मोहम्मद हुसेन अब्दुल समद, सईद अहमद, मोहम्मद हनीफ, कादर शेख, महंमद रियाज शेख, अली अकबर तांबोळी, सत्तार मुल्ला, शब्बीर शेख, ख्वाजामिया कुरेशी, हिसामुद्दीन, श्रीमती फरिदा शेख, श्रीमती शकीलाबानु शेख, नजमुन्निसा शेख, श्रीमती आयेशा बी. शेख, श्रीमती मुमताज बेगम शेख, व इतर हजारो स्त्री पुरुष.

## ५.८ तलाक संदर्भात अहले हदिसची भूमिका आणि चर्चा

मुस्लीम समाजातील महिलांवर अन्याय करणाऱ्या तलाकच्या पद्धतीवर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने दोन दशके कार्य आणि संघर्ष केल्यानंतर काही प्रमाणात या प्रश्नांची जाणीव समाजातील विविध धार्मिक संघटनांना झाली आणि त्यांनीही या संदर्भात उदारमतवादी धोरण स्वीकारले. 'अहले-हदिस' या धार्मिक संघटनेने तीन वेळा 'तलाक' शब्द उच्चारून दिल्या जाणाऱ्या घटस्फोटाच्या प्रथेविरोधात ठराव केल्यामुळे मुस्लीम सत्यशोधक मंडळाने त्यांना पाठिंबा देण्यासाठी पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन केले. यात डॉ. बाबा आढाव, रजिया पटेल, विनायकराव कुलकर्णी, डॉ. सत्यरंजन साठे, अजित सरदार आणि अनुताई लिमये यांनी भाषणे करून ठरावाचे समर्थन केले. तसेच केंद्र शासनाने 'अहले हदिस'ची भूमिका लक्षात घेऊन तलाकबंदी विधेयक अस्तित्वात आणावे, अशी मागणी केली. इस्लामिक देशांमध्ये होत असलेले बदल आणि उदारमतवादी विचारातून अशा प्रश्नांवर सुसंगत भूमिका घेतली जाते, हे स्वागतार्ह आहे. या दृष्टीने 'अहले हदिस'च्या ठरावास मुस्लीम सत्यशोधक मंडळाने जाहीर पाठिंबा दिला. मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. इब्राहिम तांबोळी यांनी प्रास्ताविक केले. रशीद शेख यांनी आभार मानले.

नारी समता मंच, राष्ट्र सेवा दल, क्रांतिकारी महिला संघटना, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जनवादी महिला सभा, भारतीय महिला फेडरेशन, सुधारणावादी बोहरा, युवक क्रांती दल, पीपल्स युनियन फॉर सिविल लिबर्टी, जाणीव संघटना, युनिव्हर्सिटी वुमेन्स असोसिएशन, समाज विज्ञान अकॅडेमी, स्त्री आधार केंद्र, मिळून साऱ्याजणी आणि इंडियन सेक्युलर सोसायटी या संघटनांनी पाठिंबा दिला. (सकाळ, ७ जुलै १९९३; केसरी, १९ जुलै १९९३)

या पद्धतीच्या घडामोडी होत असतानाच 'जमियत उलेमा-ए-हिंद' या मुस्लीम धर्मगुरूंच्या मध्यवर्ती संघटनेने एकाच वेळी तीनदा 'तलाक' शब्द उच्चारून दिलेला 'तलाक' हाच 'कुराणा'ला मान्य असलेला घटस्फोट आहे, असा पवित्रा घेतला. त्यांनी 'अहले-हदिस'ने 'कुराणा'चा चुकीचा अर्थ लावून लोकांची दिशाभूल केल्याचा आरोप केला. इस्लाममधील सुन्नी मुस्लीम परंपरेत हनफी, मालिकी, शाफाई व हंबली या चारही पंथांमध्ये एकाच वेळी तीनदा तलाक म्हणून घटस्फोटाची पद्धत मान्यताप्राप्त असल्याचे जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना सय्यद असद मदनी यांनी सांगितले. यानंतर 'अहले-हदिस'ने जमियत उलेमा-ए-हिंद हे मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणांना खीळ घालत असल्याचे सांगितले. जमियत अहले हदिसचे उपाध्यक्ष हाफिझ मोहम्मद झकी बारी यांनी जमियत उलेमा-ए-हिंद यांच्या भूमिकेवर आक्षेप घेतला. जमियत अहले हदिसच्या तलाकविषयक भूमिकेला विरोध करणे म्हणजे 'कुराण'ने मुस्लीम महिलांना दिलेले हक्क नाकारण्यासारखेच आहे, असे बारी यांनी सांगितले. तलाकसारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर एकांगी विचार करू नये असे आवाहन बारी यांनी केले.

जागतिक पातळीवरील वुमेन, लिव्हिंग अंडर मुस्लीम लॉ या संस्थेने केलेला अभ्यास भास

आणि कार्य मुस्लीम महिलांना दिलासा देणारे आहे. लिंगाधिष्ठीत अधिकार महिलांवर अन्यायकारक असल्याने त्यात अमुलाग्र सुधारणा करण्याची गरज वक्त्यांनी व्यक्त केली. *(लोकसत्ता, १९ जुलै १९९३)*

## ५.९ अतिरेक्यांचा निषेध

काश्मीरमधील हजरतबाल दर्ग्यात घुसून अतिरेक्यांनी राष्ट्रीय एकात्मतेस धर्माचे आव्हान दिले, ही चिंतेची बाब आहे, अशा शब्दांत ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाने या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

भारताच्या अंतर्गत कारभारात धर्माच्या नावाने गोंधळ निर्माण करून हिंदू-मुस्लीम दंगली घडवण्याचा पाकिस्तान सतत प्रयत्न करत आहे, याचाही आम्ही तीव्र निषेध करतो, असे ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाईंनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

हजरतबल प्रकरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सर्व भारतीय नागरिकांनी संयम पाळून भारतीय शासन, सैन्य यांच्या पाठीशी एकजुटीने उभे राहावे आणि त्यांना योग्य रितीने काम करू द्यावे, असेही आवाहन सय्यदभाईंनी केले आहे.

भारत ही आमची मातृभूमी आहे, तेव्हा मुसलमान आणि इस्लामच्या नावाने कोणालाही देश तोडण्याची भाषा करू देणार नाही, अशी प्रतिज्ञा भारतीय मुस्लीम समाज एकजुटीने करत आहे, अशी तार पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. *(लोकसत्ता, २५ ऑक्टोबर १९९३)*

## ५.१० महिला प्रश्नावरील वाद आणि प्रतिवाद

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने उत्तर प्रदेशातील लखनौ आणि तामिळनाडूतील मदुराई येथे २७-२८ जानेवारी १९९० आणि २८ मार्च १९९३मध्ये दोन परिषदा घेण्यात आल्या. यात मेहेरून्निसा दलवाई, मा. सय्यदभाई, हुसेन जमादार, अन्वर राजन, प्रा. शमसुद्दिन तांबोळी आणि मंडळाच्या पुढाकारातून सुरू केलेल्या ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या स्थानिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. या काळात प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांचा लेख दै. 'सकाळ'मध्ये ८ फेब्रुवारी १९९० रोजी आणि सय्यदभाई यांचे दोन लेख ८ एप्रिल आणि ६ मे १९९३ रोजी प्रसिद्ध झाले. ते लेख आणि त्यावरील निवडक वाद-प्रतिवाद –

**भारतातील मुस्लीम महिलांना न्याय हवा!**

ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे चौथे अधिवेशन तामिळनाडू राज्यातील मदुराई शहरात ता. २७-२८ जानेवारी रोजी पार पाडले. तामिळनाडूमधील ही पहिलीच पुरोगामी मुस्लीम परिषद होती. ज्यामध्ये सुमारे दोनशे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेषतः महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. अधिवेशनामध्ये 'मुस्लीम महिलांचे प्रश्न' या विषयावर परिसंवाद व गटचर्चा होऊन काही महत्त्वाचे ठराव मांडण्यात आले. यापूर्वी कोल्हापूर (महाराष्ट्र), अहमदाबाद (गुजराथ) आणि बंगलोर (कर्नाटक) या ठिकाणी अधिवेशने घेण्यात आली.

ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाईंनी परिषदेच्या कामकाजाचे आणि या पूर्वीच्या तीन अधिवेशनांचे अहवाल प्रारंभी सादर केले ते म्हणाले, "मुस्लीम समाजात धर्माच्या गैरवापराने ऐहिक प्रश्न निर्माण झाले आहेत. सार्वजनिक जीवनात धर्माचा हस्तक्षेप वाढल्याने विविध समाजिक व मानवी प्रश्नांना राजकीय स्वरूप आले आहे. धर्म ही वैयक्तिक बाब असून, त्याला सार्वजनिक व सामाजिक क्षेत्रापासून दूर ठेवल्याशिवाय मुस्लीम समाजाचा आणि मुस्लीम महिलांचा सर्वांगीण विकास होऊ शकणार नाही. मुस्लीम महिलांचे प्रश्न इतर धर्मातील महिलांच्या प्रश्नापेक्षा अधिक तीव्र स्वरूपाचे असल्याने ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स महिलांच्या प्रश्नाकडे अधिक केंद्रित करीत आहे."

अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी तामिळनाडूतील सामाजिक कार्यकर्ते एम. अब्दुल अजीज म्हणाले, "सध्या मुस्लीम समाजाचे प्रश्न दिवसेंदिवस वाढताना दिसतात. धर्माचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने मुस्लीम समाज इतर समाजापेक्षा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागे राहिला आहे. मुस्लीम महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रस्थापित पद्धत अयशस्वी ठरली असून, नवीन मार्ग शोधण्याची वेळ आली आहे. ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स विधवा, तलाकपीडित, दलित आणि दुःखी लोकांसाठी आधार आहे. ही संघटना महिलांचे प्रश्न हाती घेऊन देशभर त्यांच्या परिस्थितीची जाणीव करून देत आहे, याचा मला अतिशय आनंद वाटतो. 'पुरोगामी' हा शब्द उच्चारण्यासाठी सोपा आहे, परंतु तो समाजात प्रसारित करताना संघर्ष करावा लागतो."

**गुलामगिरीचे जीवन**

'शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर श्रीमती प्रा. आय. नाझनीन यांनी विचार मांडले. त्या म्हणाल्या, "महिलांना शिक्षण नसल्याकारणाने त्या अज्ञानी, निरक्षर आणि गुलामगिरीचे जीवन जगत आहेत. शिक्षण नसल्याने आर्थिकदृष्ट्या परावलंबी जीवन जगावे लागते. आपल्या हक्कांची जाणीव नसल्यामुळे त्या संघर्ष करू शकत नाहीत. मुस्लीम महिलांना शिक्षण देताना पक्षपात केल्याने त्यांच्यावर फार मोठा अन्याय झालेला आहे. महिला हा देशातील महत्त्वाचा घटक आहे. जर त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळाले नाही, तर त्यांचा विकास होऊ शकणार नाही. देशातील, समाजातील आणि कौटुंबिक जीवनातील प्रश्न त्या सोडवू शकणार नाहीत, समाजाच्या प्रवाहात मिसळू शकणार नाहीत. मुस्लीम महिलांना आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष पद्धतीच्या शिक्षणाची अत्यंत आवश्यकता असून, त्यातूनच राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यास हातभार लागेल. शिक्षणाने अन्यायाची तीव्रता कमी होऊन ती राष्ट्रीय एकात्मतेस पूरक ठरेल."

'मुस्लीम महिला आणि कायद्याचे संरक्षण' या विषयावर बोलताना ॲड. ए. हफिजा म्हणाल्या, "भारतामध्ये मुस्लीम समाजाला लागू असणारा कायदा कालबाह्य झाला असून, तो महिलांच्या दृष्टीने अतिशय अन्यायकारक आहे. मुस्लीम महिलांना पदोपदी या कायद्याचे भक्ष्य बनावे लागते. भारतातील प्रतिगामी मुस्लीम लोकांनी शहाबानो प्रकरणाच्या निमित्ताने महिलांना मिळणारी पोटगी रद्द करून घेऊन, आपल्या समाजातील महिलांवर फार मोठा अन्याय केला आहे. बहुपत्नित्व, तोंडी तलाक आणि तलाकनंतर नवऱ्याकडून मिळणारी पोटगी रद्द केली. अशा पद्धतीने महिलांना त्यांच्या मूलभूत आणि मानवी हक्कांपासून वंचित ठेवले आहे."

'मुस्लीम महिला आणि सामाजिक न्याय' या विषयावर तामिळनाडूतील सामाजिक कार्यकर्ते एन. कादीर मोहिद्दीन म्हणाले, "मुस्लीम समाजातील प्रतिगामी पुरुषवर्ग हा महिलांवर अन्याय करणारा प्रभावी घटक आहे. कालबाह्य रूढी-परंपरा सोडण्यास तो तयार नाही. धर्माचा चुकीचा अर्थ लावून परंपरा, कायदे आणि पुरुषी अहंकार यांमुळे मुस्लीम महिलांवर अन्याय केला जातो. सामाजिक न्याय महिलांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे, परंतु शिक्षणात पक्षपात, चाकोरीबद्ध जीवन, हुंडा पद्धत, बुरखा पद्धत आणि सार्वजनिक जीवनात दुय्यम स्थान, यांमुळे त्यांचा विकास खुंटला आहे. मुस्लीम महिलांना न्याय मिळण्यासाठी समाजाने त्यांच्याकडे मानवी दृष्टीकोनातून पाहून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे."

**बुरखा कायमच!**

कर्नाटकमधील सामाजिक कार्यकर्त्या आणि प्रसिद्ध लेखिका प्रा. सारा अबुबकर या अध्यक्षस्थानी होत्या. त्या म्हणाल्या, "एकविसाव्या शतकात पदार्पण करीत असताना सहाव्या-सातव्या शतकातील कायदे आणि परंपरा स्वीकारून जर आपण पुढे जाणार असाल, तर निश्चितपणे समस्या निर्माण होतील." मुस्लीम महिला आणि लेखिका या दोन्ही भूमिका करीत असताना स्वतःवर झालेल्या अन्यायाचे अनुभव त्यांनी या वेळी कथन केले. कर्नाटक राज्यात महिलांवर कशा पद्धतीने अन्याय होतो, याचे विश्लेषण करून त्या म्हणाल्या, "मुस्लीम स्त्रीला आजही घराबाहेर पडताना

बुरखा घालावा लागतो. त्यांना सार्वजनिक ठिकाणी, चित्रपटगृहात जाता येत नाही. घराबाहेरचे जग त्यांना फारसे माहीत नसते. मुस्लीम महिलांना शिक्षणापासून दूर ठेवले आहे, परंतु मुस्लीम समाज सर्रासपणे दारूचे दुकान चालवू शकतो. महिलांनी शिक्षण घेऊन, स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या मानवी हक्कांसाठी आणि न्याय्य मागण्यांसाठी लढा दिला पाहिजे. स्वतः परावलंबी जीवन जगून कुटुंबाची, मुला-बाळांची जबाबदारी घेऊन स्वतःचे सर्वस्व गमवावे लागते. शिक्षण, स्वावलंबनानंतर मुस्लीम महिला बहुपत्नित्व, तोंडी तलाक, पोटगी यांसारख्या प्रश्नांसंबंधी संघर्ष करू शकतील. जोपर्यंत ती पुरुषवर्गाच्या आधिपत्याखाली असेल, तोपर्यंत तिची पिळवणूक होत राहील."

मुस्लीम समाजाला क्रिमिनल प्रोसिजर कोड १२५मधून वगळून महिलांना पोटगीचा हक्क नाकारला आहे. महिलांनी न्यायालयात न्याय मागणे, हा सामाजिक गुन्हा मानला जातो आणि न्यायालयामध्ये ती पूर्णतः असहाय्य असते. भारतातील मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा 'कुराण' आणि 'हदीस'वर पूर्णतः आधारित नसून, तो अप्रगत विचारांवर आधारित आहे. जगातील अनेक मुस्लीम देशांत महिलांना समान अधिकार देणारे कायदे अस्तित्वात आहेत. भारतात प्रतिगामी मुस्लीम समान नागरी कायद्यास विरोध करतात, याचे एकमेव कारण असे आहे की, त्यांना पारंपरिक धार्मिक ओळख नाहीशी होऊन आपल्या स्वतंत्र अस्तित्वाला तडा जाईल, अशी भीती वाटते. म्हणून सामाजिक विषयाला राजकीय स्वरूप आले आहे, असेही प्रा. सारा अबुबकर यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, "तलाकपीडित महिलांसाठी आश्रम काढून हा प्रश्न सुटणार नाही, कारण असे करणे म्हणजे झोपेचे सोंग घेणाऱ्या माणसावर पांघरूण टाकण्यासारखे होईल. त्यातून तलाकचे प्रश्न कमी न होता वाढण्याची शक्यता जास्त आहे. अशा प्रकारच्या उपायांतून अपराधी बाजूला राहतो, आणि इतरांना त्याचे ओझे वाहावे लागते. म्हणून या विषयावर अधिक गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. कुटुंबनियोजन, शिक्षण, स्वावलंबन, सामाजिक न्याय आणि कायद्याचे संरक्षण यांतूनच मुस्लीम महिलांची स्थिती सुधारू शकेल."

**काश्मीरची समस्या**

त्या म्हणाल्या, "धार्मिक आणि राजकीय नेतृत्वाच्या चुकीच्या धोरणातून राष्ट्रीय एकात्मतेला धोका असून, धार्मिक दंगली दिवसेंदिवस वाढताहेत. काश्मीरची समस्या अगदी टोकाला पोहोचली असून, त्यामुळे भारतीय मुस्लिमांसमोर फार मोठे आव्हान उभे राहिले आहे. भारतात सर्वत्र विखुरलेल्या सामान्य मुस्लीम समाजाने त्याचा निषेध करून आपले राष्ट्रीयत्व दाखवून दिले पाहिजे. काश्मीरचा प्रश्न जर हाताबाहेर चिघळला, तर त्याचे परिणाम निष्पाप सर्वसामान्य मुस्लीम समाजास भोगावे लागतील."

अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये 'तलाक', 'महिलांचे पुनर्वसन', 'राष्ट्रीय एकात्मता आणि काश्मीर प्रश्न' या विषयांवर चर्चा झाली. याप्रसंगी 'जमात-ए-इस्लामी'चे कार्यकर्ते आणि प्रतिगामी मुस्लीम उपस्थित होते. त्यांनी 'इस्लाम आणि 'कुराण' हेच सर्व प्रश्नांवरील उपाय आहेत', अशा पद्धतीने तर्कविसंगत विचार मांडून विरोध करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक गटातील प्रतिनिधीने

आपले अहवाल वाचून दाखवले आणि त्यानंतर श्रीमती मेहेरून्निसा दलवाई यांचे भाषण झाले.

अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी तामिळनाडूतील कार्यकर्ते ॲड. सरदार बाशा, सय्यद अहमद यांनी आपले विचार व्यक्त केले. तामिळनाडूतील प्रसिद्ध कवयित्री कविगन कलायन यांनी महिलांच्या प्रश्नावर काव्यवाचन करून अशी अपेक्षा व्यक्त केली की, ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स महिलांचे दुःख कमी करून त्यांना न्याय मिळवून देईल.

शेवटी अधिवेशनामध्ये पुढील चार ठराव बहुमताने संमत झाले :

१) मुस्लीम पुरुषांना एकतर्फी असलेला तोंडी तलाक देण्याचा अधिकार लवकरात लवकर रद्द करण्यात यावा.

२) बहुपत्नित्वाचा अधिकार रद्द करून मुस्लीम समाजाससुद्धा द्विभार्याप्रतिबंधक कायदा लागू करावा.

३) तलाकपीडित मुस्लीम महिलांना पतीकडून पोटगी मिळण्यासाठी कायद्यामध्ये योग्य ती सुधारणा करावी आणि मुस्लीम विमेन प्रोटेक्शन ॲक्ट (डायव्होर्स) ८६ रद्द करण्यात यावा.

४) काश्मीरमधील मुस्लीम अतिरेक्याच्या कारवाया आणि त्यांना मिळणारे पाकिस्तानचे सहकार्य व पाठिंबा याचा अखिल भारतीय पुरोगामी परिषद तीव्र निषेध करीत आहे.

ठराव मांडताना प्रतिगामी मुस्लीम आणि 'जमात-ए-इस्लामी'च्या कार्यकर्त्यांनी विरोध केला. अधिवेशनाचे नियोजन, स्थानिक जबाबदारी आणि संघटना ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे कार्यकारिणी सदस्य अब्दुलभाई यांनी केले.

(प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांचा दै. 'सकाळ'मध्ये ८ फेब्रुवारी १९९० रोजी प्रसिद्ध झालेला लेख)

**मुस्लीम सत्यशोधक मंडळाला लखनौमध्ये प्रतिसाद**

आपल्या समाजात अनेक मानवी प्रश्न असे आहेत, की जे रुढी, परंपरा, चालीरिती आणि धर्म यात अडकून ठेवलेले आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अनेक जण आपल्यापरीने प्रयत्न करताना दिसतात.

अशाच पद्धतीचा आमच्या मुस्लीम समाजात तलाकपीडित महिलांचा प्रश्न आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ४६ वर्षे झाली तरी तलाकपीडित महिलांचा प्रश्न आहे त्याच ठिकाणी संबंधित स्वार्थी शक्तींनी अडकवून ठेवला आहे. अधूनमधून या प्रश्नांबाबत एखादी चांगली अनुकूल घटना घडते, त्यातून काही आशेचे किरण दिसतात, पण स्वार्थी, धार्मिक आणि राजकीय मंडळी राजकारणी डावपेचांद्वारे पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' करून ठेवतात.

अजब प्रकार आहे. आपल्याच आई-बहिणींना कोणतेही कारण न दाखवता एकतर्फी तलाक देऊन त्यांना रस्त्यावर सोडून दिले जाते आणि अशा तलाक देणाऱ्या पुरुषाला एका शब्दाने जाब विचारण्याची विद्यमान मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात काडीचीही सोय नाही. स्वतंत्र भारताच्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीत हा आदर्श कायदा म्हणून मानला जाऊ शकतो? मलाची दलाली करणाऱ्या माणसांनी सामाजिक समतेचा अधिकच घोटाळा करून टाकला आहे. त्यातून तलाकपीडित मुस्लीम

महिलांचा प्रश्न काही प्रमाणात सुटूनही अधिक बिकट झाला आहे.

अशा परिस्थितीत मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि अखिल भारतीय पुरोगामी मुस्लीम परिषद मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन देशातील तलाकपीडित मुस्लीम महिलांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. असेच एक उदाहरण लखनौच्या हमीदनबीचे देता येईल. दै. 'सकाळ'मध्ये लखनौचे बातमीदार शरद प्रधान यांचा हमीदनबीच्या पोटगीबद्दल लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाच्या आधारे शरद प्रधानांशी संपर्क साधला आणि १३ मार्चला लखनौला पोहोचलो. तेथे आमच्या पुरोगामी मुस्लीम परिषदेचे स्थानिक कार्यकर्ते आहेत. त्यांना बरोबर घेऊन शरद प्रधान आणि नंतर हमीदनबी, त्यांचे वकील ॲड. महंमद वसीम आणि ॲड. महंमद शमीम यांना भेटून मिळालेल्या पोटगीबद्दल सविस्तर चर्चा केली.

हमीदनबीशी बोलत असताना मला असे जाणवले की, ती एक साधी सरळ संसारी महिला आहे. तिला आपल्या दोन मुलांची, त्यांच्या भवितव्याची काळजी आहे. ही बाई अतिशय अबोल, तिच्यावर झालेल्या अत्याचाराबद्दल बोलायला तिला शब्द सुचत नाहीत. आपले हितचिंतक कोण, शत्रू कोण हे तिला समजत नाही.

ती म्हणाली, "मला माझ्या दोन लहान मुलांसह रफिकसाहबने (पती) घराबाहेर काढले. न्याय मागण्यासाठी मी अनेकांच्या दारी खेटे घातले, सगळे म्हणाले, 'यह तुम्हारा आपसी मामला हैं इसमें हम कुछ नहीं कर सकते। अगर हमने तुम्हारे लिये कुछ किया तो तुम्हारा शोहर नाराज हो जाएगा। हमारी हमदर्दी तुम्हारे साथ हैं।' "

हमीदनबीची सर्व हकिगत ऐकून मी व बरोबरचे कार्यकर्ते व्यथित झालो. मी आमच्या संघटनेतर्फे हमीदनबीची इंटरमध्ये शिकत असलेली मुलगी व सातवीत शिकत असलेला मुलगा यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेतली. तसे हमीदनबी आणि ॲड. वसीम व शमीम यांना सांगितले,

पीडितांचे नुसते अश्रू पुसून काम भागणार नाही. हा ओलावा जरूर असावा; परंतु अशा भगिनींना त्यांच्या पायावर उभे करून न्याय मागण्यासाठी त्यांची पलटण उभी करावी लागेल आणि आम्ही अनेक ठिकाणी तसे करण्याचा प्रयत्न करतो. तेच आता लखनौत करायचे ठरविले आहे. लखनौ येथे तलाकपीडित मुस्लीम महिला मदत केंद्र सुरू करण्याबाबत वरील दोन्ही वकिलांशी बोललो. ते म्हणाले, "हे काम इथे सुरू झाले, तर हा अन्याय किती मोठा आहे, याची जाणीव इथल्या मुस्लीम समाजाला आणि सरकारला होईल."

ॲड. वसीम पुढे म्हणाले, "सय्यदभाई महाराष्ट्रातून आम्हाला धैर्य द्यायला इथे आले आहेत आणि इथले मुस्लीम पुढारी हमीदनबीसाठी काहीही करायला तयार नाहीत. उलट तिला न्याय मिळाला, तर तो हिरावून घेण्यासाठी या सर्वांनी कंबर कसली आहे आणि हेच पुढारी लखनौहून सर्व भारतामध्ये मुस्लिमांचे राजकारण चालवू पाहतात. आपल्याच समाजातील आया-बहिणींना घराबाहेर काढून त्यांचे राजकारण चालते. याच लोकांनी इस्लामला बदनाम केले आहे, त्याचे नुकसान केले आहे."

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे काम लखनौत सुरू करण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी सहकार्य देण्याचे आश्वासन दिल्यामुळेच एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लखनौत केंद्र सुरू करण्यात

येणार आहे. लखनौत आमच्या विचारांची बरीच माणसे आहेत, पण त्यांना एका व्यासपीठावर आणावे लागेल.

१३ मार्चला संध्याकाळी हिसामुल इस्लाम सिद्दिकी यांना शरद प्रधान यांच्याबरोबर भेटलो. सिद्दिकी हे लखनौमध्ये 'जदीद मरकज़' नावाचे देवनागरी लिपीतील उर्दू साप्ताहिक चालवितात. त्यांनी शाहबानो प्रकरणाच्यावेळी पुरोगामी भूमिका घेतली होती. हमीदनबीच्या बाबतीतही तिला योग्य न्याय मिळाला आहे, तो इतर महिलांनाही मिळावा, असे त्यांनी आपल्या साप्ताहिकात लिहिलेले मला दाखविले. त्यांचे म्हणणे असे की, महिलांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या स्वार्थी पुरुषांना इस्लाममध्ये शिक्षेची तरतूद आहे. त्यावर आधारित कायदा तयार केला पाहिजे.

लखनौत मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे केंद्र सुरू करण्याबाबत जेव्हा मी बोललो, तेव्हा त्यांनी सर्वतोपरी सहकार्य देण्याची हमी दिली. आमचे काम २५ वर्षे चालू आहे. याची त्यांना जाणीव होती. आणि तसेच येथेही सुरू होणे आवश्यक आहे, असे ते म्हणत होते.

१४ मार्चच्या रोजी सकाळी दहा ते दुपारी चारपर्यंत शहरातील हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी कार्य करणारे कार्यकर्ते (लखनौ एकता), तसेच समाजातील तळागाळातील सामान्य कार्यकर्ते, पुरोगामी मुस्लीम परिषद आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांची उद्दिष्टे, भूमिका या विषयावर सविस्तर चर्चा झाली. विशेष करून तलाकपीडित मुस्लीम महिलांच्या प्रश्नावर तपशिलाने चर्चा झाली. खूप उलटसुलट मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. शेवटी लखनौ येथे 'मुस्लीम महिला मदत केंद्र' सुरू करायचे निश्चित करण्यात आले.

या बैठकीत झालेल्या चर्चेतून मुस्लीम समाजातील अनेक प्रश्न समोर आले. या केंद्राद्वारे समाजाशी संवाद सुरू करावा, असे ठरले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य उत्तर प्रदेशात उभे राहिलेले नव्हते. हमीदनबी प्रकरणातून सामाजिक विषमतेला उत्तर प्रदेशात नव्याने वाचा फुटली आहे. दोन दिवसांत अनेकांशी चर्चा केल्यावर मुस्लीम महिलांना न्याय मिळालाच पाहिजे, अशी भूमिका जाणवली.

लखनौमध्ये मुस्लीम पर्सनल लॉ कमिटी आणि बाबरी मशीद कमिटीचे पदाधिकारी बरेच आहेत. त्यांना भेटून निरर्थक वाद टाळले. एकदा लखनौ येथे मुस्लीम महिला मदत केंद्र सुरू झाले, की या प्रश्नावर त्यांच्याशीही जरूर बोलता येईल. शेवटी कामातूनच अन्यायविरोधी शक्ती उभी करता येईल, असा आम्हा सत्यशोधकांचा विश्वास आहे.

*(सय्यदभाई यांचा दै. 'सकाळ'मध्ये ८ एप्रिल १९९३ रोजी प्रसिद्ध झालेला लेख)*

## तामिळनाडूत 'मुस्लीम सत्यशोधक'च्या कार्याला गती – सय्यदभाई

मंडळाच्या कामाद्वारेच १९८७मध्ये राष्ट्रीय पातळीवर 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'ची स्थापना झाली. सध्या संघटनेचे कार्य देशाच्या १२ राज्यांत चालते. मुस्लीम समाजप्रबोधनाच्या वा कार्यात तसे कार्यकर्ते कमीच आहेत; मात्र ते नियमित आहेत. संघटनेतर्फे गेल्या सहा वर्षांत अहमदाबाद (गुजरात), बंगलोर, मंगळूर, हसन (कर्नाटक), मदुराई (तमिळनाडू),

पुणे, कोल्हापूर (महाराष्ट्र) या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवरील परिषदा घेतल्या जाऊन मुस्लीम समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय प्रश्नावर चर्चा करून राष्ट्रीय पुरोगामी धोरण ठरवण्यात आले.

अशा परिषदांमध्ये देशांतील सामान्य मुस्लिमांचा अधिक भरणा असतो. याचे कारण असे, की वरील सर्व प्रश्न सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित आहेत, आणि मंडळाला त्यांनाच जागृत करायचे आहे. याउलट मुस्लीम पुढारी सामान्य मुस्लिमाला सतत अंधारात ठेवू पाहतात.

इतर राज्यांपेक्षा तमिळनाडूतील मुस्लीम समाजातला सुशिक्षित तरुण वर्ग मंडळाच्या कामात मोठ्या प्रमाणात भाग घेऊ लागला आहे, ही आमची जमेची बाजू म्हणावी लागेल. तमिळनाडूतील सहा वर्षांच्या कामात प्रा. आय. नाझनीन, ॲड. हफिझा, ॲड. सय्यद मुस्तफा, नसरीन खान, अब्दुलभाई हे प्रमुख कार्यकर्ते सर्वतोपरी जबाबदारी घेऊन काम करून मंडळाचे कार्य सामान्य मुस्लीम समाजापर्यंत पोचवीत आहेत.

येथे लोकांनी आपली तमिळी संस्कृती मनापासून जोपासली आहे. तमीळ भाषा, पोशाख, खाणेपिणे, आवडीनिवडी या जात, धर्म, वंश, भेद यांपलीकडे सगळ्यांच्या समान आहेत. येथील माणसे अतिशय धार्मिक असूनही धर्माला रस्त्यावर आणीत नाहीत. येथे हिंदू-मुस्लीम वाद अजिबात नाही, परंतु दोन्ही समाजांत अंतर्गत विषमतेचा प्रचंड गुंता आहे. हिंदू समाजातील अस्पृश्यतेमुळे येथे मीनाक्षीपुरम, रामनाथपुरमचे धर्मांतर घडले, तर दुसरीकडे मुस्लीम समाजात तलाकचे प्रमाण मोठे आहे. अशा तोंडी तलाकविरुद्ध कोणी हरकत घेतल्यास त्याला धर्माचे 'सर्टिफिकेट' पुरुष मंडळी आणि मुल्ला-मौलवी दाखवतात. आणि तलापीडित मुस्लीम महिलेचे तोंड बंद करतात. अधिक कोणी गडबड केली, तर 'अल्लाहने दिलेला तो अधिकार आहे आणि कोणाही पुरुषाला तो बदलण्याची परवानगी नाही', अशी उत्तरे दिली जातात.

ही झाली पुरुष मंडळींची बाजू. मुस्लीम महिलांचे असे म्हणणे आहे की, सतत उधळणाऱ्या घोड्याला आवरण्यासाठी लगाम मजबूत असतो, त्याप्रमाणे तलाक देणाऱ्या मुस्लीम पुरुषांना वठणीवर आणण्याकरिता पोटगीचा समावेश असलेले कलम १२५ लागू व्हावे. हा कायदा नको असेल तर सरळ एकतर्फी तोंडी तलाकवर बंदी आणावी. घरबसल्या कोणताही तलाक होता कामा नये. आम्हीही माणसे आहोत आणि आम्हालासुद्धा मानवी न्याय मिळाला पाहिजे. बरे, अधिक काही बोलावे, तर सरळ धर्माकडे बोट दाखवतात. 'खरेच धर्मात असे आहे काय? धर्माने आम्हा महिलांनाच का असे वेठीस धरले आहे?' माणुसकी जाणणाऱ्या माणसांच्या मस्तकात झिणझिण्या येतील, असे एक ना अनेक अनुत्तरित प्रश्न या आमच्या तलाकपीडित आया-बहिणी विचारतात.

म्हणूनच त्यांना वारंवार एकत्रित करून अन्यायी विषमतेविरुद्ध जाहीरपणे बोलायला लावून समाजाचे आणि शासनाचे डोळे उघडण्याचे काम मंडळ करत आहे. या कामाचा एक भाग म्हणून मदुराई येथे २८ मार्च १९९३ रोजी एक दिवसाची राज्यव्यापी मुस्लीम महिला परिषद घेण्यात आली होती. मदुराई येथील ही दुसरी परिषद होती. तत्पूर्वी २७ जानेवारी १९९० रोजी येथे राष्ट्रव्यापी मुस्लीम महिला परिषद घेण्यात आली होती. विरोधकांचे अडथळे असूनही त्या वेळी १५० मुस्लीम महिला परिषदेला हजर होत्या. त्यानंतर कामातून माणसे उभी राहिली आणि २८ मार्च १९९३च्या

परिषदेला विरोधाला न जुमानता तीनशे मुस्लीम महिला नुसत्या हजरच नव्हत्या, तर त्यांतल्या अनेक जणी आपल्या तलाकच्या 'सत्यकथा' सांगून समाजाला आणि शासनाला थपडा देत होत्या.

सकाळी नऊपासूनच सामान्य मुस्लीम महिलांच्या झुंडी पांढऱ्या चादरी अंगावर घेऊन परिषदेच्या ठिकाणी गांधी म्युझिअम येथे पोहोचू लागल्या. ठीक ११ वाजता तिरिचीच्या कार्यकर्त्या डॉ. शिरीन हजरत यांनी परिषदेचे उद्घाटन केले. त्यांनी उद्घाटनपर भाषणात महिलांना 'शिका आणि कमवा'चा सल्ला दिला आणि यातूनच आजचा मुस्लीम पुरुष वठणीवर येईल, असे विचार व्यक्त केले. त्यानंतर 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'च्या अध्यक्षा प्रा. नाझनीन यांनी 'तमिळनाडूतील मुस्लीम महिलांची स्थिती' यावर सखोल विचारविनिमय केला आणि महिलांना न्याय द्यायचा असेल, तर किमान कायद्यात बदल करून पुरुषांना असलेले कमाल अधिकार कमी करावेत, अशी मागणी केली.

त्यानंतर तलाकपीडित मुस्लीम महिलांनी आपले अनुभव कथन केले. त्यात १६ वर्षांपासून ते ६० वर्षे वयाच्या आया-बहिणी होत्या. त्यांपैकी खैरुन्निसा वय वर्षे साठ, पाच मुलांची आई. दोन जावई आहेत. पती रेल्वेत नोकरीला. खैरुन्निसाला पेन्शन, फंड वगैरेचा लाभ मिळू नये म्हणून नोकरीतून निवृत्त होण्याच्या अगोदरच तीन वर्षे पती हाशम शेख याने एकतर्फी तलाक देऊन टाकला.

म्हणजेच, मुस्लीम महिलांना किमान कायद्याचे संरक्षण तर नाहीच; याउलट तलाक देण्याचा गुन्हा करणाऱ्या पुरुषाला संपूर्ण संरक्षण आहे, असेच म्हणावे लागेल. बोलत असताना प्रत्येक तलाकपीडित महिलेचा असा एकतर्फी कायदा असेल, यावर विश्वासच बसत नव्हता असे लक्षात आले.

यानंतर हुसेन जमादार यांनी महाराष्ट्रातील महात्मा फुले यांच्या कार्याची संपूर्ण माहिती दिली. शेवटी सय्यदभाईंनी राष्ट्रीय पातळीवर तलाकपीडित मुस्लीम महिलांची स्थिती आणि त्याबाबत मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य याची माहिती सांगितली. परिषदेच्या शेवटी पुढील तीन ठराव संमत करण्यात आले :

१) भारताच्या अंतर्गत बाबतीत अनेक मार्गांनी पाकिस्तान हस्तक्षेप करत आहे. मुंबईच्या बॉंबस्फोटप्रकरणी पाकिस्तानचा हात आहे, हे सिद्ध झाले आहे; तसेच पंजाबी आणि काश्मिरी अतिरेक्यांना पाकिस्तान मदत करत आहे, याचा ही मुस्लीम महिला परिषद तीव्र निषेध करत आहे.

२) समान नागरी कायदा होईपर्यंत 'पोटगी कलम १२५' मुस्लिमांना ताबडतोब लागू करावे.

३) लखनौच्या हमीदनबीला मिळालेल्या पोटगीविरुद्ध 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'ने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करू नये, अशी ही परिषद आवाहन करते.

शेवटी राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

*(सय्यदभाई यांचा दै. 'सकाळ'मध्ये ६ मे १९९३ रोजी प्रसिद्ध झालेला लेख)*

## प्रतिक्रिया

### तलाकपीडित महिलांच्या पोटगीचा प्रश्न आणि वस्तुस्थिती – एस. एम. शेख

'सकाळ'मध्ये ८ एप्रिल रोजी प्रसिद्ध झालेला सय्यदभाईंचा लेख वाचला. मंडळ व सय्यदभाईंच्या कार्याचा केंद्रीय भाग तलाक देण्याची पद्धत व तलाकनंतर पीडितेच्या पोटगीशी संबंधित असून तोंडी तलाक नसावा; तसेच तलाक देताना स्त्रीला तिची बाजू मांडण्याची संधी दिली जावी, असा त्यांचा आग्रह आहे. मुळात शरीयतप्रमाणे 'तलाक' देण्याच्या प्रक्रियेस खूप वेळ लागतो. तीन तलाकमधील प्रत्येक तलाकच्या अंतरात काही महिन्यांचे अंतर ठेवणे आवश्यक असून, प्रत्येक तलाकमध्ये साक्षी-पुराव्यानुसार गुन्हा सिद्ध झाल्यानंतरच तलाक दिला जावा, असे 'कुराणा'चे आदेश आहेत. व्यभिचाराच्या आरोपाखाली जर तलाक घडत असेल, तर संबंधित मंडळी घराची अब्रू चव्हाट्यावर येईल, या भीतीने बैठका घेऊन तलाकप्रक्रिया पार पाडण्यास तयार नसतात. अशा परिस्थितीत ते तोंडी तलाकच देणे-घेणे पसंत करतात. परंतु जर पुरुषाच्या दु:प्रवृत्तीमुळे तलाक घडत असल, तर स्त्री व तिचे नातेवाईक गवगवा केल्याशिवाय राहत नाहीत. तसेच पटत नसेल व एकत्र संसार करणे शक्य होत नसेल, तरीही तलाक होऊ शकतो.

'तलाक' ही एक तरतूद असून, विशिष्ट परिस्थितीत व अटींवर वैवाहिक संबंध संपविण्याचा मार्ग असून, तो आपल्याला बंद करता येणार नाही. तलाकची तरतूद नाहीशी केल्यास मुस्लीम स्त्रियांवर हत्या, आत्महत्या, शारीरिक व मानसिक छळाची आपत्ती कोसळण्याची शक्यता आहे. मुस्लीम वैयक्तिक कायदा मुस्लिमांना जाचक वाटला असता, तर त्यांनी स्वतः तो रद्द करण्याची मागणी केली असती. मुस्लीम स्त्रियाही शरीयत कायद्याच्या विरोधात नसून त्यांनी त्या कायद्याविरुद्ध बंड केल्याचे दिसत नाही.

वैवाहिक संबंध टिकवण्याकरता व सुदृढ करण्याकरता आवश्यक बाबी जर दोघांकडून पूर्ण केल्या नाहीत, तर संबंधांमध्ये तणाव निर्माण होऊन मनात दुरावा निर्माण होतो; तो वेळीच न सावरला गेल्यास तलाकची परिस्थिती उद्भवते. तलाक हौसेखातर होत नसून एखाद्याच्या जीवनात तलाकची पाळी येण्यासारखी दुर्दैवाची व दुःखाची दुसरी गोष्ट असू शकत नाही. कोणतेही कारण न देता तलाक दिला जातो, हे सय्यदभाईंचे म्हणणे चुकीचे असून तलाक देणारे व घेणारे वैवाहिक बदनामी व आपल्या वैयक्तिक जीवनाची चर्चा समाजात होऊ नये, याकरता जे प्रयत्न करतात, त्यातून तोंडी तलाकसारखे प्रकार घडतात. तलाकसंबंधी सर्वस्वी पुरुषच जबाबदार आहे, असा जो समज सय्यदभाईंचा झालेला आहे, तो बरोबर आहे का?

मानवी प्रवृत्ती आणि त्यांच्या जीवनात येऊ शकणाऱ्या समस्या लक्षात घेऊन वैवाहिक संबंधांमध्ये ज्याप्रमाणे 'तलाक'ची तरतूद केली, त्याप्रमाणे तलाकपीडित स्त्रियांच्या तदनंतरच्या जीवनाचीही तरतूद केली आहे. 'कुराणा'त स्पष्ट आदेश आहे की, तलाकपीडित व विधवा स्त्रियांची लग्ने लावून द्या. यापेक्षा विपरीत परिस्थितीत तलाकपीडित स्त्रियांच्या पोट-पाण्याचा प्रश्न

‘शरीयत’ने नातेवाइकांवर व समाजावर टाकलेला आहे. मुस्लीम समाज तो इस्लाममधील जकात, फितरा व सदका या दानधर्माच्या प्रकारातून बैतुलमाल या (दानधर्मातून मिळालेल्या संपत्तीचे व्यवस्थापन करणारी व्यवस्था) व्यवस्थेला सोपवतो व ही व्यवस्था अशा महिला तसेच गोरगरिबांना मदत करतात. या व्यवस्थेबद्दल मुस्लीम समाजाची तक्रार नसून तिचे श्रद्धापूर्वक पालन ते करतात. इस्लामी वैवाहिक संबंधांमध्ये पत्नीच्या पोटापाण्याची जबाबदारी पुरुषावर वैवाहिक संबंध सुरळीत असेपर्यंत राहते. पती-पत्नींचा संबंधविच्छेद झाल्यानंतर परस्परांना ते परके होतात व परकीयांच्या पोटापाण्याची जबाबदारी वैयक्तिक पातळीवर कोणीही घेत नाही.

मुस्लीम समाजाला या प्रकरणी ‘नाजायज तलाक’ (तलाक-ए-बिद्दत)वर नियंत्रण ठेवण्याकरता, तसेच तलाकनंतरच्या तलाकपीडित स्त्रीच्या जीवनाकडे लक्ष देण्याकरता कायमस्वरूपी एखादी यंत्रणा असणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवन कसे सफल करावे, वैवाहिक बंधनांची कर्तव्ये व परस्परांशी वागण्याबाबत ‘कुराण’ व ‘हदीस’ने जे मार्गदर्शन केले आहे, त्याचे शिक्षण लग्नाआधी वर-वधूंना देण्याची व्यवस्था करावी.

केवळ तलाकपीडित स्त्रियांचे संघटन करून हे प्रश्न सुटणार नसून, समाजाचे प्रश्न समाजाच्या व्यासपीठावर मांडून समाजाचा विश्वास व सहकार्य न घेतल्यास समाजाच्या रोषास सामोरे जावे लागते. सय्यदभाईंनी आपल्या लेखात हमीदनबीचे जे उदाहरण दिले आहे, त्यात असे दिसून येते की, त्यांनी फक्त हमीदनबी व तिच्या वकिलांचीच भेट घेतली. हे कितपत बरोबर आहे? हमीदनबीच्या प्रकरणात काहीही निष्कर्ष काढण्याआधी तिचे पती व त्यांच्या वकिलांची भेट का घेतली नाही? त्यामुळे सय्यदभाईंचे निष्कर्ष एकतर्फी वाटतात व एकतर्फी निष्कर्ष विषयाला न्याय देऊ शकत नाहीत.

सय्यदभाईंनी त्यांच्या लेखामध्ये लिहिल्याप्रमाणे मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड व इतर बुद्धिवाद्यांशी चर्चा करणे त्यांना निरर्थक वाटते, हे कशाचे लक्षण आहे? आपली भूमिका पटवून देण्यात आपण कमी पडतो, असे होत नाही का? मुल्ला-मौलवींना व सत्ताधाऱ्यांना नावे ठेवून काहीही साधता येणार नाही. मुल्ला-मौलवींवर ‘कुराण’ व ‘हदीस’चे शिक्षण लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी असून, ते समाजाची दिशाभूल करतात, असे सय्यदभाई कशाच्या आधारे म्हणतात? ‘शरीयत’मध्ये ढवळाढवळ करण्याचे अधिकार मुल्ला-मौलवींसकट कोणासही नाहीत, याची माहिती असावयास हवी. तसेच घटनेने दिलेल्या हक्कांचे व अधिकारांचे रक्षण जो पक्ष करील, त्या पक्षाला मते देण्याची प्रवृत्ती समाजात राहीलच. सर्वसमावेशक धोरण तत्त्वानुसार घटनेने बहाल केलेल्या हक्कांचे पालन करण्यात सत्ताधाऱ्यांचे कोणते मतलबी व मतांचे राजकारण आहे? आपल्या अज्ञानाची आगपाखड 'सेक्युलर'वादी पक्षांवर करून तलाकपीडित स्त्रियांचे प्रश्न सुटणार आहेत काय? *(सकाळ, २१ मे १९९३)*

**गैरसमज पसरविणारा लेख – अख्तरून्निसा सय्यद**

एस. एम. शेख यांचा (सकाळ : २१ मे) लेख विचारपूर्वक वाचला. असे वाटते की, शेख यांना

वस्तुस्थिती माहीत नाही किंवा ते जाणूनबुजून असा खोटा प्रसार करतात. त्यांना तलाकपीडित मुस्लीम महिलेबद्दल जरासुद्धा सहानुभूती नाही. त्यांनी जी तरतूद नमूद केली आहे, त्या तरतुदीप्रमाणे कोणताही तलाक अस्तित्वात नाही. सर्वच्या सर्व तलाक सय्यदभाई म्हणतात त्याप्रमाणे एकतर्फी असतात. पुरुषांना जाचक वाटणारे 'शरीयत'चे कायदे पुरुषांनी सव्वाशे वर्षांपूर्वीच बदलून घेतले. सध्याचा कायदा पुरुषांना पोषकच आहे. तो फक्त तोंडी तलाकची तरतूद व चार लग्नांपुरताच मर्यादित आहे. इतर गुन्हेगारी कायदे पुरुषांना जाचक वाटत होते, म्हणून बदलून घेतले गेले आणि स्त्रिया बंडच काय; पण पती परमेश्वरासमोर तोंड वर करून बोलू शकत नाहीत. नाहीतर आहेच तलाकची टांगती तलवार.

शेख यांना विचारावेसे वाटते की, 'कुराणा'तल्या आदेशाप्रमाणे किती विधवा व किती तलाक घेणाऱ्यांची लग्ने लावण्यात आली? जर तलाकनंतर पत्नी पतीस परकी होत असेल व परकीयांच्या पोटापाण्याची जबाबदारी वैयक्तिक पातळीवर कोणीही घेत नसतील, तर त्या तलाकपीडित महिलेच्या व तिच्या मुलांच्या भवितव्याची जबाबदारी कोण घेणार? अशा परिस्थितीत एकतर्फी तलाक देणाऱ्या पुरुषावर जबाबदारी का टाकू नये? कोणत्याही अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी संघटन ही पहिली पायरी आहे. म्हणून तलाकपीडितांनी संघटन केल्यास अस्वस्थ होण्याचे कारण काय? *(सकाळ, ८ जून १९९३)*

**महिलांच्या पोटगीचा प्रश्न – इंदुमती राव, पुणे**

एस. एम. शेख, सय्यदभाई व अख्तरून्निसा सय्यद यांचे लेख व वाचकांच्या प्रतिक्रिया वाचल्या. त्यावर मला काय वाटते ते मी एक माणूस म्हणून आणि विशेषतः स्त्री या भावनेने सांगू इच्छिते, ते मी हिंदू आहे या दृष्टीने मुळीच नव्हे. हिंदू धर्मातसुद्धा खऱ्या धर्मभावनेच्या विरुद्ध जाणाऱ्या अनेक अनिष्ट चालीरिती परंपरेने शिरल्या आहेत व त्यांच्याशी आम्ही लढा देतच आहोत.

धर्म कुठलाही असो, धर्माज्ञा कितीही न्याय्य व नैतिक असो, समाजाची त्यातील सामान्य लोकांची प्रवृत्ती आपल्याहून दुर्बलाची म्हणजेच मुलांची, वृद्धांची, अपंगांची व स्त्रियांची पिळवणूक करण्याकडे असल्याचे आज हजारो वर्षांपासून दिसून येते. अनेक पुरुषप्रधान समाजात स्त्रियांना दुय्यम नव्हे, तर त्याहूनही खालचे स्थान मिळाले आहे. शेख यांच्या म्हणण्याप्रमाणे वैवाहिक संबंध संपल्यावर पत्नी परकी होते म्हणून त्यांच्या समाजात तिच्या पोटापाण्याची जबाबदारी वैयक्तिक पातळीवर कुणीच म्हणजे नवरा व तिचे कुटुंबीय घेत नाहीत. हे असे का?

पगारी नोकरी करणाऱ्यांना दरमहा निवृत्तीवेतन किंवा प्राव्हिडंट फंड अथवा दोन्हीही मिळते. निवृत्तीनंतर खरे तर त्या व्यक्तीचा आपल्या मालकाशी असलेला संबंध संपतो व ते दोघे एकमेकांना परकेच होतात. तरी पण मालकास पेन्शन व फंड द्यावाच लागतो. पत्नी तर वर्षानुवर्षे कुटुंबासाठी कष्ट करते. तरी पण वैवाहिक संबंध तुटल्यावर पगार घेऊन काम करणाऱ्या नोकराचासुद्धा तिला हक्क मिळू नये काय? मी 'कुराण' वाचले नाही, परंतु माझी अढळ श्रद्धा आहे की या पवित्र धर्मग्रंथाने स्त्रीचा हक्क हिरावून घेण्याचा अन्याय मुळीच केला नसेल.

**स्त्री–पुरुषांना सारखाच न्याय**

'महिलांच्या पोटगीचा प्रश्न' हे पत्र (सकाळ २९ मे) वाचले. 'तलाक'ची तरतूद 'शरीयत'मध्ये शिक्षेच्या स्वरूपात असून, वैवाहिक संबंधांच्या शर्तीप्रमाणे स्त्रीने न वागल्यास तो दिला जातो. तसेच पुरुषानेही न वागल्यास स्त्रीला खुलाच्या माध्यमाने (तलाकचा एक प्रकार) नवऱ्यापासून फारकत मिळवता येते.

लग्न सौदेबाजीचा विषय नसून सामाजिक प्रक्रिया आहे. नोकरी सौदेबाजीचा विषय असून, वेतन, सेवाशर्ती आधी निश्चित होतात त्यानुसार निवृत्तीनंतर पेन्शन, प्रॉव्हिडंड फंड वगैरे आर्थिक लाभ मिळतात. परंतु ते केवळ आपली सेवाकाळ इमानेइतबारे पूर्ण केल्यासच घडू शकेल. नोकरीच्या ठिकाणी भ्रष्टाचार, चोरी केल्यास तेथेही शिक्षा मिळते. नोकरीतून निलंबित अथवा प्रसंगी तुरुंगवास नशिबी येतो. तात्पर्य हे की, गुन्ह्याची शिक्षा गुन्हेगाराला मिळालीच पाहिजे. स्त्री आणि पुरुष ही परमेश्वराचीच निर्मिती असून कुराणात त्यांना सारखाच न्याय दिलेला आहे.

**योग्य नेतृत्व व दिशेची गरज – एस. एम. शेख**

'गैरसमज पसरविणारा लेख' या शीर्षकाचे वाचकाचे पत्र (सकाळ, ८ जून) वाचले. तलाकच्या संदर्भात 'शरीयत'मध्ये ज्या तरतुदी आहेत, त्याविषयी गैरसमज पसरवणे आज तरी शक्य नाही. कारण तलाकची जी प्रक्रिया माझ्या लेखात मी नमूद केली होती, ती जशीच्या तशी 'कुराण' व 'हदीस'मध्ये लिहिलेली आहे. तलाकपीडित स्त्रियांना दुसरे लग्न करण्याची मुभा आहे. दुसरे लग्न होईपर्यंत पोटापाण्याची व्यवस्था नातेवाइकांनी व समाजाने करावयाची आहे. या चौकटीबाहेर सहानुभूती दाखवण्याची समाजाला परवानगी नाही. सय्यदभाई सांगतात त्याप्रमाणे पुरुष एकतर्फी तलाक देतात, हे अनाकलनीय आहे. कारण तलाक देणारा प्रत्येक पुरुष सय्यदभाईंना आमंत्रण देत नाही. तलाक झाल्यानंतर तलाक–पीडितेची तक्रार असल्यास नंतरच त्यांना कळते व सदोष कार्यपद्धतीमुळे झालेल्या तलाकचे वास्तव चित्र पुढे येत नाही.

सव्वाशे वर्षांपूर्वी आपण पारतंत्र्यात होतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व धर्माच्या सामाजिक संहितेला आपण कायद्याचे स्वरूप दिले. असाधारण परिस्थितीत तोंडी व साधारण परिस्थितीत कुराणातील मार्गदर्शनानुसार तलाकच्या सर्व प्रक्रिया व सोपस्कार पूर्ण करणारा कायदा तलाकला मान्यता देण्यास आवश्यक आहे. तो पुरुषांना पोषक कसा? चार लग्ने अनिवार्य नसून विशिष्ट परिस्थितीत व अटींवर परवानगी दिलेली आहे. गुन्हेगारी स्वरूपाचे कायदे पुरुषांनी बदलून घेतले, हे पत्रलेखिकेचे म्हणणे अज्ञानावर आधारित आहे.

'शरीयत'चे गुन्हेगारी स्वरूपाचे जे कायदे आहेत, ते भारतात लागूच झाले नसल्यामुळे बदलण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. 'इस्लामी शरीयत'मध्ये पोटगीची कल्पना नसल्यामुळे पुरुषांवर त्याची जबाबदारी टाकता येणार नाही.

अन्यायाला वाचा फोडण्याकरिता संघटनेची आवश्यकता आहे हे खरे आहे. परंतु अन्यायाचे परिमार्जन ज्यांच्यामध्ये व ज्यांच्या सहकार्याने होऊ शकेल, त्यांच्याच 'शरीयत'वर जर हल्ला होत असेल, तर त्या संघटनेची व त्यांच्या उद्दिष्टांची पूर्ती कशी होऊ शकेल? तलाकपीडित

स्त्रिया संघटित होण्याने विचलित होण्याचे कारण नसून त्यांचे प्रश्न सुटण्याकरता योग्य नेतृत्व व दिशा त्यांना मिळू शकेल काय, या प्रश्नाने मन व्यथित होत आहे. *(सकाळ, २२ जून १९९३)*

### प्रतिवाद

### तलाकपीडित मुस्लीम महिलांच्या प्रश्नावरील एक वाद – शमसुद्दिन तांबोळी

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संघटक आणि ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाई यांचे तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशातील मंडळाच्या कामाच्या बाबतीत दि. ८ एप्रिल आणि ६ मे १९९३ रोजी दोन लेख दै. 'सकाळ'मधून प्रसिद्ध झाले. या लेखांना अनुसरून 'विरोधासाठी विरोध' करणारा एस. एम. शेख यांनी लिहिलेला लेखसुद्धा २१ मे १९९३ रोजी 'सकाळ'ने छापला. या लेखांवर अनेक प्रतिक्रिया आल्या. वाचकांच्या पत्रात पुण्याच्या सौ. इंदुमती राव यांनी काही प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांना उत्तर म्हणून पुन्हा वाचकाच्या पत्रात एस. एम. शेख यांनी मजकूर पाठवला. हा मजकूर अतार्किक, चुकीच्या दाखल्यावर आधारित, अस्पष्ट आणि समाजाची दिशाभूल करणारा आहे.

मुस्लीम समाजाने कालबाह्य रूढी, परंपरा आणि यासारख्या मानसिकतेचा त्याग करून, काळाची पाऊले ओळखून स्वतःमध्ये बदल करावा, यासाठी त्याचबरोबर मुस्लीम महिलांच्या संदर्भात असलेले तोंडी तलाक, पोटगी, मुलदतक घेणे, शिक्षणप्रसार या विषयावर मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई गेली पंचवीस वर्षे धडपडत करीत आहेत. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा या प्रलोभनापासून दूर राहून धर्मांध पुढाऱ्यांचा रोष पत्करून आणि प्रसंगी वैयक्तिक पातळीवरून होणारी टीका, अपमान, मानहानी स्वीकारूनही मुस्लीम महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी सय्यदभाई प्रयत्न करत असतात. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या व्यासपीठामार्फत ठिकठिकाणी मुस्लीम महिलांना आधार आणि दिलासा देण्यासाठी मुस्लीम महिला मदत केंद्र स्थापन केली आहेत. या मदत केंद्रांना इतर राज्यांत अतिशय चांगला प्रतिसाद मिळत असून, तोंडी तलाक, बहुपत्नीत्व आणि महिलांचे इतर प्रश्न केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील इतर भागातसुद्धा आहेत, हे आता सिद्ध झाले आहे.

हिंदू समाजात सुधारणावादी चळवळीची परंपरा आहे. राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, आंबेडकर, आगरकर, शाहू महाराज असे अनेक सुधारक हिंदू समाजात होऊन गेले. त्यांना त्या-त्या वेळी विरोध झाला, त्याचप्रमाणे मुस्लीम सत्यशोधक मंडळास विरोध होणार हे गृहीत धरलेले आहे. तलाकचा प्रश्न, महिलांचे इतर प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात्र धडपडण्याचा सय्यदभाई आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांनी निर्धार केला आहे. सय्यदभाई गेल्या २५ वर्षांपासून हे काम करत आहेत. मंडळाचे काम हेच त्यांच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. एका वाक्यात त्यांच्या आयुष्याचे, जीवनाचे वर्णन करायचे झाल्यास असे म्हणता येईल की, 'सय्यदभाई यांचे जीवन हेच 'जिहाद-ए-तलाक' असे आहे.' याची सुरुवात त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षांपासून झाली. जेव्हा त्यांच्या

धाकट्या बहिणीला तलाक देण्यात आला.

८ एप्रिल आणि ६ मे १९९३च्या दै. 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झालेले लेख हे उत्तर प्रदेशच्या दौऱ्यानंतर आणि तामिळनाडूमधील मदुराई येथे झालेल्या महिलांच्या परिषदेनंतर घेतलेला कार्याचा आढावा होता. नेहमीप्रमाणेच मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि सय्यदभाई यांची या संदर्भातील भूमिका त्यात मांडली आहे. विशेषतः 'शरीयत'प्रमाणे मुस्लीम पुरुषास मिळालेले अधिकार काही प्रमाणात कमी करून, स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न व्हावा, महिलेचा तलाक झाल्यास तिला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार हवा. तलाक शक्यतो न्यायालयात किंवा मशीदमध्ये काही लोकांच्या समक्ष व्हावा, मनमानी, एकतर्फी तोंडी तलाकवर बंधने असावीत. (कायद्याने किंवा शरीयतच्या तरतुदीने) घटस्फोटिताचा टाकून दिलेल्या महिलेचा पुनर्विवाह होईपर्यंत तिला आपल्या नवऱ्याकडून पोटगी मिळावी, कारण पोटगी द्यावी लागणे, हेच नवऱ्याला तलाक देण्यास बंधन आणणारे लगाम आहे. मूल होत नाही म्हणून दुसरे लग्न करण्याऐवजी मूल दत्तक घेण्याची कायद्यात तरतूद असावी. लग्नाच्या वेळी ज्याप्रमाणे मशीदमधील रजिस्ट्रमध्ये नोंद होणे, तशीच तलाकनंतरही नोंद असावी. यासाठी मंडळाचे कार्यकर्ते प्रयत्न करत असतात.

मुस्लीम महिला मदत केंद्रामध्ये विविध प्रकारच्या तक्रारी घेऊन महिला येत असतात. यामध्ये वयाच्या १४ व्या वर्षी तलाक झालेल्यांपासून वयाच्या ६०व्या वर्षी सोडून दिलेल्या महिलांचा समावेश असतो. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर या तोंडी तलाक आणि व्यक्तिगत कायद्यातील अन्यायी तरतुदींमुळे बळी ठरलेल्या हजारो महिला आहेत. सय्यदभाई यांचे विचार हे अनुभवावर आणि वास्तवतेच्या अभ्यासावर आधारित असल्याने आता सर्वसामान्य मुस्लीम मंडळाच्या पाठीशी उभा राहत आहे.

आता समाज या प्रश्नावर विचार करत आहे, तो अंर्तमुख होत आहे, आत्मपरीक्षण करत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुल्ला-मौलवींच्या फतव्यामध्ये एका वेळी तीनदा 'तलाक' उच्चारून घटस्फोट देणे अवैध ठरवले आहे. 'जमियात अहले हदिस' या मुस्लीम धर्मपंडितांच्या सर्वोच्च संस्थेने दिलेला हा निर्णय न्याय्य मागण्यांसाठी होत असलेल्या 'मुस्लीम सत्यशोधकच्या चळवळी'चे पुढे पडलेले पाऊल असे वर्णन करता येईल. या निर्णयाचे देशातील कायदेतज्ज्ञांशिवाय इतर अनेकांनी स्वागत केले आहे.

एस. एम. शेख यांनी आपल्या लेखात 'शरीयत' आणि 'कुराण' यांचा आधार घेऊन असे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे की, 'शरीयत'प्रमाणे 'तलाक' देण्याच्या प्रक्रियेत खूप वेळ लागतो. तीन तलाकमधील प्रत्येक तलाकच्या अंतरात काही महिन्यांचे अंतर ठेवणे आवश्यक असून, प्रत्येक तलाकमध्ये साक्षीपुराव्यानुसार गुन्हा सिद्ध झाल्यानंतरच तलाक दिला जावा, असे कुराणाचे आदेश आहेत.'

मंडळास याबाबतीत असे वाटते की, 'कुराणा'त आणि मूळ शरीयतमध्ये काय तरतूद आहे, यापेक्षा आजचा जो मुस्लीम व्यक्तिगत कायदा आहे, तो १९३७च्या 'शरीयत ॲक्ट'नुसार आहे. त्यात काय तरतुदी आहेत? तलाक हा न्यायालयात किंवा मशीदमध्ये किंवा जमातीसमोर व्हावा, यासाठी काही तरतूद आहे का? आजच्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यानुसार केवळ तोंडी तलाकच

नव्हे, तर साक्षीविना, त्याचबरोबर दारूच्या नशेत दिलेला तलाक ही भारतातील बहुसंख्य असलेल्या हनफी मुस्लीम पंथियांसाठी कायद्याने वैध आहे. तलाक-ए-बिद्‌दत योग्य नसले तरी, इस्लामला ते मान्य नसले, तरी कायद्याचे त्याला संरक्षण आहे. याविरुद्ध बोलण्यासाठी एस. एम. शेख पुढे का येत नाहीत?

एस. एम. शेख यांचा दुसरा आरोप असा आहे की, 'तलाकची पद्धत नाहीशी केल्यास मुस्लीम स्त्रियांवर हत्या, आत्महत्या, शारीरिक व मानसिक छळाची आपत्ती कोसळण्याची शक्यता आहे.'

यासंदर्भात प्रथम हे स्पष्ट आहे की, मुस्लीम सत्यशोधक मंडळ तलाक पूर्णपणे बंद व्हावा, असे म्हणत नाही. मुस्लीम समाज पूर्णतः तलाकमुक्त असावा, अशी भूमिका नाही. तलाक योग्य कारणासाठी आणि आवश्यक असल्यास मंडळाच्या मुस्लीम महिला मदत केंद्रातूनही तलाक झाले आहेत. मंडळाचा विरोध हा मनमानी, एकतर्फी, तोंडी तलाकच्या संदर्भात आहे. साधे पोस्टकार्ड आणि आंतरदेशीय पत्राद्वारे तलाक दिल्याची कितीतरी उदाहरणे मंडळाच्या मुस्लीम महिला मदत केंद्रात प्रा. शेखसाहेबांना पाहायला मिळतील. दुसरी महत्त्वाची बाब अशी की, तलाक झाल्यानंतर स्त्रियांचा मानसिक छळ होत नाही, जीवन उदध्वस्त होत नाही, आणि त्यांना बाजारात यावे लागणार नाही, हे सांगण्यासाठी एस. एम. शेख यांच्याकडे काही दाखले आहेत का?

मुस्लीम धर्मानुसार विधवा आणि तलाकपीडित महिलांचे पुनर्विवाह होण्याच्या बाबतीत तात्त्विक संमती आहे. परंतु आपल्या समाजात अशा कोणत्या संस्था आणि संघटना आहेत की, ज्या या समस्याग्रस्त महिलांच्या पुनर्विवाहासाठी, पुनर्वसनासाठी कार्य करतात? मंडळाच्या मदत केंद्रात वयाच्या १५व्या वर्षी तलाक झालेल्या महिला येतात. त्यांचे पुनर्विवाह होण्यास कितीतरी अडचणी येतात. शेखसाहेबांनी आपल्या लेखात केवळ कागदावर असणाऱ्या आणि अस्तित्वात नसणाऱ्या जकात, फितरा, सदका, बैतूलमाल यांचा मुस्लीम महिलांसाठी उपयोग होतो, असा उल्लेख केला आहे. आज या संस्था किती ठिकाणी कार्य करतात? साधे उदाहरण द्यायचे झाल्यास, शहाबानोच्या पोटगी प्रकरणानंतर वक्फ बोर्डाने किती तलाकपीडित महिलांना पोटगी दिली किंवा मदत केली?

अशा प्रश्नांची उत्तरे एस. एम. शेख यांच्याकडे नसावीत. उलट एस. एम. शेख स्वतःच्या समाधानासाठी असे म्हणतात की, 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा मुस्लिमांना जाचक वाटला असता, तर त्यांनी स्वतः तो रद्द करण्याची मागणी केली असती. मुस्लीम स्त्रियांही 'शरीयत कायद्या'च्या विरोधात नसून त्यांनी त्याबाबतीत बंड केल्याचे दिसत नाही.' वास्तविक पाहता मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा पुरुषाच्या बाजूने आहे. पुरुषाला अधिकाधिक अधिकार देणारा आहे. तेव्हा पुरुष तो अधिकार कमी करून घेण्यासाठी मागणी करेल का? एस. एम. शेख ती मागणी का करत नाहीत? यामागे त्यांचा पुरुषी अहंकार लपलेला आहे का? हे त्यांनी पडताळून पाहावे. स्त्रियांवर 'तलाक'ची टांगती तलवार ठेवण्यासाठी आणि पाहिजे तेव्हा दुसरे लग्न करता येण्याची संधी सोडून देण्यास मुस्लीम पुरुषाची मानसिकता अजून तयार झाली नाही, हे त्याचे कारण आहे. शेखसाहेब 'स्त्रिया बंड का करत नाहीत?' असा प्रश्न करतात, तेव्हा त्यांच्या हे लक्षात येत नाही की, स्त्रियांनी जर बंड केले, तर तलाकची तलवार त्यांच्या डोक्यावर कोसळेल. त्याशिवाय अनेक तरुण मुस्लीम महिला

सध्या बंड करतात. याकडे शेखसाहेब मुद्दामहून दुर्लक्ष करत आहेत, असे दिसते. पुढील काही उदाहरणावरून शेखसाहेबांच्या बंडाच्या बाबतीत असणाऱ्या गैरसमजुती लक्षात याव्यात, अशी अपेक्षा आहे–

१) 'इंडिया टुडे'च्या ३१ ऑक्टोबर १९९२च्या अंकात आलेला 'यंग मुस्लीम फौर्जिंग न्यू आयडेंटीटी' हा लेख पाहिल्यास त्यातील मुस्लीम मुलींच्या मुलाखतीत आणि फोटोंत बंड दिसेल. या तरुणी अलीगढ मुस्लीम विद्यापीठाच्या आहेत. त्यांनी उघडउघड तथाकथित मुस्लीम नेतृत्वाविरोधी भूमिका घेतली आहे.

२) मुस्लीम व्यक्तिगत कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या 'तलाक' पद्धतीचे भयानक स्वरूप पाहिल्यानंतर कितीतरी मुस्लीम तरुणी १९५४ सालच्या 'स्पेशल मॅरेज ॲक्ट'खाली म्हणजेच नोंदणी पद्धतीने विवाह करताना दिसत आहेत. एवढेच नव्हे, तर मुस्लीम तरुणी व्यक्तिगत कायद्यापासून बचाव करण्यासाठी धर्मांतर करून आंतरधर्मीय विवाहसुद्धा करताहेत, अशी अनेक उदाहरणे देता येतील.

३) शहाबानोच्या प्रकरणानंतर आपल्याच आया-बहिणीची पोटगी बंद केली. त्यानंतर कितीतरी सोडून दिलेल्या आणि तलाकपीडित महिला केवळ रस्त्यावरच आल्या नाहीत, तर तेव्हाचे राष्ट्रपती शैलसिंग, पंतप्रधान राजीव गांधी, कायदामंत्री अशोक सेन, खासदार नजमा हेपतुल्ला यांना दिल्लीला जाऊन 'तोंडी तलाक बंद करा, व मिळणारी पोटगी चालू ठेवा' असा कंठशोष त्यांनी केला.

४) महाराष्ट्रात तलाकपीडित महिलांनी कोल्हापूर ते नागपूर असा काढलेला तलाक मुक्ती मोर्चा हेसुद्धा बंडच आहे.

५) जागतिक पातळीवर मुस्लीम महिलांना न्याय मिळावा, यासाठी 'वूमन अंडर मुस्लीम लॉ' या नावाची संघटना गेली दहा वर्षे काम करत आहे, हे स्त्रियांचे बंड नाही का?

या उलट मदत केंद्राच्या असा अनुभव आहे की, मुस्लीम पुरुष आपल्या बहिणीला न्याय मिळावा म्हणून केंद्रावर येतो; परंतु स्वतः मात्र आपल्या बायकोला 'तलाक' देतो, अशा द्विधा मन:स्थितीत असणारा मुस्लीम पुरुष 'व्यक्तिगत कायद्या'च्या विरोधी बोलणे म्हणजेच चोराने 'मला शिक्षा करा' असे म्हणण्यासारखे आहे.

मुस्लीम पुरुषास इस्लाममधील गुन्हेगारी कायद्यापेक्षा भारतातीलच गुन्हेगारी कायदा हवा असतो. फक्त लग्न, घटस्फोट, पोटगी, बहुपत्नित्व यासाठी 'शरीयत कायद्या'चा हट्ट करणे, हे ढोंगीपणाचे लक्षण नाही का?

सय्यदभाई आणि एस. एम. शेख यांच्या लेखांना अनुसरून प्रतिक्रियात्मक रूपाने इंदुमती राव यांचे वाचकांच्या पत्रात (सकाळ २९ मे ९३) एक पत्र आले. ज्यामध्ये धर्मनिरपेक्षपणाने राव यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. एस. एम. शेख यांनी ३ जूनच्या 'सकाळ'मध्ये त्याला उत्तर दिले आहे, हे उत्तर किती हास्यास्पद आहे, हे वाचकांच्या लक्षात आले असेल. एस. एम. शेख या पत्रात नमूद करतात की, 'तलाक'ची तरतूद 'शरीयत'मध्ये शिक्षेच्या स्वरूपात असून, वैवाहिक संबंधाच्या शर्तीप्रमाणे स्त्रीने न वागल्यास तो दिला जातो. तसेच पुरुषानेही न वागल्यास स्त्रीला 'खुलाह'च्या माध्यमातून नवऱ्यापासून फारकत मिळवता येते.' या उत्तरातून शेखसाहेबांचे मुस्लीम व्यक्तिगत

कायद्याच्या बाबतीत असणारे अज्ञान व्यक्त होते.

वास्तविक पाहता शिक्षा ही एकतर्फीच का असावी? स्त्री चुकल्यास तिला शिक्षा म्हणून तलाक द्यावा. ज्यामध्ये पुरुषाने 'तलाक-ए-सुन्नत', 'तलाक-ए-हसन', 'तलाक-ए-अहसन', 'तलाक-ए मुबारत' या सारख्या तलाकच्या सर्व प्रकारचा वापर करावा, एवढेच नाही तर इस्लामला मान्य नसलेला, परंतु मुस्लीम व्यक्तिगत कायद्यासाठी मध्ये मंजूर असलेला 'तलाक-ए-बिद्दत' वापरावा आणि स्त्रीने मात्र 'खुलाह'साठी वर्षोनवर्षे न्यायालयात मागणी करत रहावी का?

शरीयत ॲक्टनुसार तलाक पद्धत ही एकतर्फीच आहे. तलाक देण्याचा अधिकार केवळ पुरुषालाच 'खुलाह'नुसार स्त्री आपल्याला तलाक मिळावा, यासाठी विनंती करू शकते. तलाक द्यावा का नाही, हे सर्वस्वी नवऱ्यावर अवलंबून असते. आणि अनेक वेळा तो या शस्त्राचा वापर करत असतो, तो नांदवतही नाही आणि तलाकही देत नाही 'मैं तुझे सडा-सडा के मारूंगा' अशी वाक्य पुन्हापुन्हा ऐकावी लागतात.

'खुलाह' तलाकची मागणी करणाऱ्या आणि टाकून दिलेल्या महिला वर्षानुवर्षे मुस्लीम महिला मदत केंद्रावर येत असतात. त्याचबरोबर न्यायालयात चकरा मारत असतात, तरी त्यांना 'तलाक' मिळत नाही. नवऱ्याने मात्र 'तलाक' देण्यासाठी न्यायालयात जावे, असे कोठेही म्हटलेले नाही. 'खुलाह'च्या तलाकच्या बाबतीत असणारी दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, 'खुलाह' तलाकनंतर स्त्रीला मेहेर, इद्दत आणि इतर हक्कांचा त्याग करावा लागतो.

मुस्लीम महिला मदत केंद्रावर अशी अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील. भोर येथील पन्नास वर्षीय महिलेस गेल्या ३० वर्षांपासून नवऱ्याने सोडून दिले आहे. गेल्या १५ वर्षांपासून पोटगी साठी ती प्रयत्न करते, तिला का सोडून दिले आहे, हेसुद्धा तिला माहीत नाही. मात्र त्यांचा नवरा दुसरे लग्न करून मजेत राहत आहे. नऊ मुले झाल्यानंतर नवरा आपल्या बायकोला 'तलाक' देत असल्याचे प्रकरण केंद्रावर आले होते.

शहाबानोच्या बाबतीतसुद्धा तथाकथित मुस्लीम पुढाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला की, वयाच्या ६० व्या वर्षी शहाबानोला पोटगीची काय आवश्यकता होती? त्यांनी असा सवाल का केला नाही की, वयाच्या ६०व्या वर्षी तिच्या नवऱ्याने तलाक द्यायची काय आवश्यकता होती?

तलाक देण्याच्या बाबतीत शरीयतमध्ये 'लिआन'ची तरतूद आहे. ज्यामध्ये नवऱ्याने जर आपल्या पत्नीवर व्यभिचाराचा, विवाहबाह्य संबंधाचा आरोप लावला आणि तो जर आरोप सिद्ध करू शकला नाही, तर पत्नी तलाकची मागणी करू शकते. त्याचबरोबर 'जिहाद'नुसार नवऱ्याने जर पत्नीची जवळच्या नातेवाईकांशी म्हणजे आई, मुलगी बहीण यांच्याशी तुलना केल्यास म्हणजेच 'तू माझ्या आईसारखी आहेस' असे म्हटल्यास तलाक होऊ शकतो. या संदर्भात थोर कायदातज्ज्ञ ए. ए. ए. फैजी म्हणतात की, इस्लाममधील तलाक ही पद्धत 'A one sided engine of oppression in the hands of the muslim husband' आहे.

एस. एम. शेख आणि त्यांच्या समर्थकांना अशी विनंती करावीशी वाटते की, त्यांनी शरीयतवर अस्तित्वात असलेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा 'कुराणा'वर आणि मानवतेवर किती प्रमाणात आधारित आहे, याचा चिकित्सक अभ्यास करावा. मानवी हक्क, धर्मनिरपेक्षता आणि समतेसाठी

कार्य करणाऱ्यावर आपल्या अज्ञानाची आगपाखड करू नये.

'स्त्री आणि पुरुष ही परमेश्वराची निर्मिती असून, 'कुराणा'त त्यांना सारखाच न्याय दिलेला आहे.' शेख यांच्या या वक्तव्यात किती अर्थ आहे. हे खालील काही प्रश्नांवरून लक्षात येईल.

१) मुस्लीम समाजात (धर्मात) बहुपत्नीत्वास संमती आहे.

२) तलाक केवळ नवराच देऊ शकतो, पत्नी 'खुलाह'नुसार तलाकची केवळ मागणी करू शकते.

३) इस्लामिक कायद्यानुसार दोन स्त्रियांची साक्ष ही एका पुरुषाच्या साक्षीबरोबर आहे.

४) पडदा, गोषा, बुरखा पद्धत केवळ महिलांसाठी आहे, पुरुषांना ही पद्धत नाही.

५) पुरुष गेल्यानंतर कमरेइतका खड्डा आणि स्त्री मेल्यानंतर दफनासाठी छातीपर्यंत खोल खड्डा असावा

तरीही 'कुराणा'त सर्वांना सारखाच न्याय आहे, असे कोणत्या आधारे म्हणता येईल? पाकिस्तानात बेनझीर भुट्टो पंतप्रधान झाल्यानंतर 'स्त्री' पंतप्रधान होऊ शकते का, असा प्रश्न उभा राहिला होता. ही स्त्री-पुरुष समता आहे का?

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची खंत ही आहे की, आपण धर्मनिरपेक्ष प्रणालीचा स्वीकार केला असताना एकतर्फी, अन्यायकारक, व्यक्तिगत स्वरूपाच्या कायद्यांना कशी मान्यता मिळते? कोणत्याही शासनाने या प्रश्नाकडे लक्ष दिलेले नाही, म्हणून सय्यदभाई धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली चालणाऱ्या धर्माच्या राजकारणास विरोध आहे.

१९७९पासून ताहेराबी प्रकरणापासून मिळणारी पोटगी शाहाबानोनंतर म्हणजे १९८५ नंतर बंद व्हावी, अशी येथील तथाकथित मुस्लीम पुढाऱ्यांनी मागणी केली. हे धर्माचे राजकारण नाही का? मतपेटीसाठी राजकीय पक्ष धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली वाटेल त्या प्रकारच्या समझौता करतात. तेव्हा या प्रकारच्या धर्मनिरपेक्षतेच्या स्वरूपास विरोध करणे आणि त्यातील दोष निदर्शनास आणणे, हे धर्मनिरपेक्षताविरोधी आहे का? धर्म बाजूला सारून, मानवतेवर आधारित कायदा असावा, ही मागणी करणे यापेक्षा वेगळी धर्मनिरपेक्षता कोणती?

एकूण मुस्लीम समाजरचनेत सुधारणा व्हावी, मुस्लीम समाज राष्ट्रीय प्रवाहात यावा, कालबाह्य पद्धतीचा त्याग करून, समाजाने काळानुरूप बदलावे, अशी मागणी करणारी मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही पहिलीच संघटना आहे. त्यास प्रतिगामी लोकांकडून विरोध होणारच. हिंदू धर्मात ही प्रबोधनाची चळवळ रुजवताना फुले, आंबेडकर, आगरकर, राजाराम मोहन रॉय यांना विरोध झालेलाच आहे. विरोध पत्कारून, त्रास सहन करूनच हे काम पुढे न्यावे लागणार आहे. हे पुरोगामी कार्यकर्त्यांना गृहीत धरावे लागते.

## प्रतिक्रिया

### मुस्लीम महिलांनाही मुक्त करावे – श्रीकृष्ण केसरी, उरूळी कांचन, पुणे

अलीकडे वर्तमानपत्रांतून 'तलाक' व मुस्लीम भगिनींवर होणारे अत्याचार, यांविषयी बरेच वाचनात येते. त्यात मुस्लीम लेखकांनीसुद्धा या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहेच. त्यात नुकतीच पत्रलेखकांची काही पत्रेपण वाचनात आली. 'मुस्लीम महिला मदत केंद्र – एक मोलाचा आधार' हा एस. एम. तांबोळी (लोकसत्ता, २९ मार्च १९९२) तसेच 'तलाकपीडित मुस्लीम महिलांची शोकांतिका' हा लेखक प्रा. शमसुद्दिन तांबोळी आणि 'मुस्लीम महिलांची मुक्ती अजूनही दूरच' हा लेखक मुझफ्फर हुसेन (केसरी, १७ जुलै ९३) हे लेख वाचनात आले. हिंदू धर्ममार्तंडांप्रमाणेच सनातनी, कडव्या, खोट्या धर्मवेडाने मुस्लीम महिलांना कसे गुलाम बनवत आले आहेत हे लक्षात येते. त्यामुळे तमाम मुस्लीम महिलांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध झगडावे आणि खऱ्या धर्माला जागणाऱ्या मुस्लीम बांधवांनी त्यांना सहकार्य करावे. 'अवघे धरू सुपंथ' असे म्हणून हिंदू बंधू–भगिनींनीसुद्धा त्यांना या कार्यात जरूर मदत करावी.

### तलाकप्रश्नावर 'अहले हदीस'ची भूमिका

भारतात अल्पसंख्याकांमध्ये मुस्लीम समाज सर्वांत मोठा आहे. पाकिस्तान, बांगला देश आणि इतर इस्लामिक देशांपेक्षाही अधिक मुस्लीम भारतात राहतात. जगातील इस्लामिक देशांमध्ये सर्वांत जास्त मुस्लीम असणाऱ्या राष्ट्रांमध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

मुस्लीम समाजामध्ये आजही अनेक कालबाह्य रूढी, परंपरा आणि कायदे आहेत. इतर इस्लामिक देशांमध्ये विवाह, घटस्फोट, बहुपत्नित्व या संदर्भातील कायदे बदलले आहेत. कुटुंब नियोजनाचा राष्ट्रीय गरज म्हणून प्रसार–प्रचार केला जातो. परंतु भारतीय मुस्लीम समाज बदलत्या परिस्थितीनुसार बदलण्यास अजूनही तयार नाही. विज्ञान–तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सर्व सुख–सुविधा मुस्लीम समाज उपभोगतो, परंतु वैज्ञानिक दृष्टीकोन आणि आधुनिक विचार स्वीकारण्यास तो तयार होत नाही. 'जे 'कुराणा'त आहे ते इस्लामिक आणि जे कुराणात नाही ते इस्लामविरोधी', अशी सर्वसाधारण भूमिका असल्यामुळे समाजात धर्मनिरपेक्षता, कुटुंब–नियोजन यांसारख्या कल्पनांना विरोध असतो. या संदर्भात सध्या समाजातील धार्मिक, राजकीय, सामाजिक विद्वानांमध्ये चर्चा चालू आहे.

मुस्लीम समाजामध्ये विवाह हा एक 'सामाजिक करार' समजला जातो, परंतु विवाह विघटनाच्या प्रसंगी किंवा तलाकच्या संदर्भात सर्व अधिकार पुरुषालाच असल्याने हा एकतर्फी करार आहे, असे सर्वांचेच मत आहे. तलाक देण्याचा अधिकार पुरुषालाच असल्याने, आणि बहुपत्नित्वाची सोय कायद्याने मान्य केली असल्याने मुस्लीम पुरुष अनेक वेळा या सवलतींचा गैरवापर करतो. बायकोची चूक असो वा नसो, कोणतेही सबळ कारण असो वा नसो, मुस्लीम पुरुष आपल्या बायकोला तलाक देऊ शकतो. आपल्याला तलाक का दिला, हे कारण विचारण्याची सोयसुद्धा

नाही. अशा प्रकारचा तलाक हा साक्षीदारांपुढे झालाच पाहिजे, असे बंधन नाही! तलाक लेखी तसेच तोंडीसुद्धा असू शकतो. साध्या पोस्टकार्डवर किंवा टेलिफोनच्या माध्यमातून दिलेला तलाकही कायद्याने मान्य केला आहे. एवढेच नाहीतर, नवऱ्याने रागाच्या भरात, केवळ लहरीखातर, विनोद म्हणून, इतरांच्या दडपणाखाली किंवा दारूच्या नशेत दिलेल्या तलाकही विधीग्राह्य समजला जातो.

उत्तर प्रदेशात एक घटना घडली. मेहुणीने आपल्या बहिणीच्या नवऱ्यास सांगितले की, 'तू माझ्या बहिणीस तलाक देऊन पाहा' आणि मेहुण्याने आपल्या बायकोला रागाच्या भरात तलाक दिला. नंतर त्या पुरुषास आपण रागाच्या भरात तलाक दिला म्हणून पश्चाताप झाला आणि बायकोने आपल्याकडे पहिल्यासारखे संबंध ठेवावेत असा आग्रह धरला. तलाक झालेल्या महिलेसही आपण नवऱ्याकडे जाऊन नांदण्याची इच्छा होती. यावर सल्ला मिळवण्यासाठी पतीपत्नी 'अहले हदीस' नावाच्या धार्मिक संघटनेकडे गेले. तेव्हा मौलवींनी असे सांगितले की, तीन तलाक हे एक महिन्याच्या अंतराने उच्चारले पाहिजे, एका दमात तीन वेळा तलाक म्हटल्याने तलाक होत नाही. तेव्हा तुम्ही पती-पत्नी म्हणून एकत्र राहायला हरकत नाही. परंतु या निर्णयाला 'जमाते-उलेमा हिंद' या परंपरावादी संघटनेने आक्षेप घेतला. त्यांच्या मते एका बैठकीत तीनदा तलाक उच्चारला की, तो वैध ठरतो आणि अशा तलाक झालेल्या स्त्री-पुरुषास जर पुन्हा एकत्र यावयाचे असले, तर त्यांचा 'हलाला' हा विधी व्हायला पाहिजे.

'हलाला'नुसार नवऱ्याने बायकोस तलाक दिला आणि त्याला पुन्हा त्या स्त्रीशी संसार करण्याची इच्छा असेल, तर त्या स्त्रीने दुसऱ्या पुरुषाशी लग्न करायचे, त्या पुरुषाची वैवाहिक संबंधाने किमान एक रात्र घालवायची. त्यापासून तलाक घ्यायचा आणि पुन्हा पहिल्या नवऱ्याशी लग्न करायचे.

'अहले हदीस' या संघटनेने घेतलेली भूमिका ही अधिक पुरोगामी स्वरूपाची आहे. सर्वसामान्य जनमत, विचारवंत आणि कार्यकर्ते 'अहले हदीस' या संघटनेचे समर्थन करतात. आणि या संदर्भात मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात चर्चा होते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळास सातत्याने असे वाटत आले आहे की, तलाक पद्धतीमध्ये पुरुषाला अधिक अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार कमी केल्याशिवाय मुस्लीम स्त्रियांना खरा न्याय मिळणार नाही. मुस्लीम समाजात बालविवाहसुद्धा होतात. वयाच्या १२-१३व्या वर्षी शिक्षण सोडून देऊन संसाराची जबाबदारी स्वीकारावी लागते. यात काही कसूर झाली की, तलाकचे शिकार व्हावे लागते. अशा प्रकारे वयाच्या १३व्या वर्षापासून ते वयाच्या ६०व्या वर्षीसुद्धा तलाक दिल्यामुळे स्त्रियांची कुंचबणा झाल्याची अनेक उदाहरणे समाजात आहेत.

तलाक झालेल्या स्त्रियांची नोंद कोठेही नसते. त्यामुळे समाजातील तलाकपीडित स्त्रियांची संख्या निश्चितपणे समजणे अवघड आहे. म्हणून मंडळास असे वाटते की, जशी लग्नाच्या वेळी मशिदीतल्या रजिस्टर नोंद करावी लागते, त्याचप्रमाणे तलाकचेही रजिस्टर असावे.

तलाक पद्धतीवर नियंत्रण यावे, यासाठी तलाकनंतर सोडून दिलेल्या स्त्रीला पोटगीची आवश्यकता आहे. किमान पोटगीच्या भीतीने तरी तलाकचे प्रमाण कमी होईल. शहाबानो प्रकारणानंतर संसदेने १९८६ साली 'मुस्लीम महिला संरक्षण कायदा' केला, परंतु त्यात अनेक दोष

आहेत. नवरा पोटगीच्या जबाबदारीतून मुक्त होतो. या कायद्याच्या अंमलबजावणीत एकवाक्यता नाही. याचाच परिणाम एकतर्फी तोंडी तलाकचे प्रमाण वाढले आहे.

धर्मशास्त्रानुसार दारूच्या नशेत, पत्नी गरोदर असताना, मासिक पाळी चालू असताना दिलेला तलाक हा अमान्य आहे. या प्रकारच्या तलाकला 'तलाक-ए-बिद्दत' म्हणतात. धर्माला मान्य नसले, तरी १९३७च्या शरीयत अ‍ॅक्टनुसार असा हा तलाक वैध ठरवला आहे. वास्तविक पाहता 'तलाक' हा परमेश्वराचा अल्लाचा सर्वांत न आवडता विषय आहे. तलाकची सवलत ही अप्रिय आहे', असे 'कुराणा'त म्हटले आहे. परंतु तलाक सर्रासपणे वापरला जातो, तो एक पोरखेळ झाला आहे. एकतर्फी तोंडी तलाकच्या बाबतीत, एका दमात तीन वेळा 'तलाक' उच्चारून तलाक देण्याच्या बाबतीत पुरोगामी मुस्लीम कार्यकर्त्यांनी, विचारवंतांनी नेहमीच विरोधी भूमिका घेतली आहे. परंतु 'अहले हदीस'सारख्या धार्मिक संघटनांनी याचा विरोध केला आहे. याचे स्वागत करण्यासाठी आणि पाठिंबा व्यक्त करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ व ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने १८ जुलै १९९३ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळात सभा घेतली. या सभेमध्ये विविध समविचारी संघटनांनी सहभाग घेतला. जवळपास ३० संघटनांनी पाठिंबा व्यक्त केला.

## ५.११ मंडळांतर्गत वाद आणि प्रतिवाद

हमीद दलवाई यांच्या निधनानंतर सामूहिक नेतृत्वाची गरज निर्माण झाली आणि त्याप्रमाणे जवळपास एक दशक मंडळाचे कार्य जोमाने आणि निर्विघ्नपणे होत राहिले. शहाबानो प्रकरणानंतर मंडळाच्या प्रमुख नेत्यांमध्ये काही मुद्द्यांवर मतभेद आणि विसंवाद होऊ लागले. मंडळाची कार्यसंस्कृती, वैचारिक अधिष्ठान, दलवाईंचा निरिश्वरवाद, उजव्या विचारसरणींचा हस्तक्षेप आणि नेतृत्वातील पारदर्शकतेबाबतची अस्पष्टता, हे वादाचे व मतभेदाचे मुद्दे ठरले. या मुद्द्यांवरून मंडळाच्या कार्यात विस्कळीतपणा लक्षात येत होता. काही प्रमुख कार्यकर्त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे नाव बदलण्याचे आणि हमीद दलवाई यांची प्रतिमा मुस्लीमविरोधी झाल्याने मंडळास समाज स्वीकारत नाही, त्यामुळे समाजप्रबोधनाच्या कार्यातून दलवाईंना बाजूला ठेवण्याचे धोरण मंडळाने अवलंबवावे, असा आग्रह धरला. यामुळे मंडळाच्या कार्यात नेतृत्व पातळीवरील समन्वयाचा अभाव निर्माण झाला. यावरून वाद आणि प्रतिवाद होत राहिले. यातून काही प्रमुख कार्यकर्त्यांनी मंडळास समांतर परंतु स्वतंत्र संस्था आणि नियतकालिके सुरू केली. यातूनही काही मतभेद पुढे आले. नंतरच्या काळात मंडळाचा नवा जाहीरनामाही तयार करण्यात आला. हा मंडळाच्या इतिहासातील एक प्रतिकूल आणि अंतर्गत संघर्षाचा काळ म्हणता येईल.

हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या कार्य आणि उद्दिष्टांवर विश्वास असणारे, तसेच हे कार्य वाढवण्याच्या बाबतीत कटिबद्धता बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांनी या प्रतिकूलतेवर मात करून हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांचा वारसा पुढे चालवण्याचा निर्धार केला आणि मंडळ त्याच विचारांवर कार्यरत आहे.




# ६. मंडळाशी निगडित लेख, मुलाखती आणि भाषणे

## ६.१ हमीदभाईंच्या निधनानंतरचे आव्हान – हेमलता राईरकर

हमीदभाईच्या निधनाची वार्ता ऐकली आणि मन अगदी सुन्न होऊन गेले. त्यांच्या मृत्यूपूर्वी ७–८ दिवस त्यांना भेटण्यास मी जसलोकमध्ये गेले होते. त्यांची स्थिती पाहून मनात चरकलेच! तरीसुद्धा प्रकृतीला आराम पडेल, अशी वेडी आशा होतीच, पण आता ते सर्व संपले आहे.

जयप्रकाशजींच्या 'स्वगत'मध्ये एक वाक्य आहे– 'चालले होते मारे आकाशातील चांदण्या वेचायला, आता जाऊन पडले नरकांत'. पण ह्या जगात जर कुणी काही केले असेल, तर ते चांदण्या वेचणाऱ्यांनीच केले आहे. मग त्यासाठी भले त्यांना प्राणांचं मोल का द्यावं लागलं असेना! अशा तारे वेचणारांच्या मालिकेत हमीदभाई एक होते. मुस्लीम समाजासारख्या परंपरावादी, पुराणमतवादी समाजात प्रबोधनाची ज्योत घेऊन जाणारा हा माणूस विलक्षण मनस्वी होता, उमदा होता. इतकं मोठं आव्हान समोर घेऊन काम करत असतानासुद्धा शांत मनाने सतत व्यासंग, चिंतन या गोष्टी चालू ठेवण्यासाठी लागणारी बुद्धीची झेप तर त्यांच्याजवळ होतीच, पण हाती घेतलेल्या कामाची तळमळही तितकीच विलक्षण होती. असा कामाचा ध्यास असल्याशिवाय हाती घेतलेल्या कामासाठी जीवनदान करण्यास कोणी उत्सुक असत नाही.

### माणसावर प्रेम करणारा माणूस

हमीदभाईच्या जीवनाला अनेक पैलू होते. ते सगळे फार सुंदर होते. गाण्याच्या मैफलीसारख्या गप्पांच्या मैफली रंगवणारा हा माणूस. माणसाच्या माणूसपणावर प्रेम असल्याशिवाय माणूस असे बोलूच शकत नाही. माणसावर प्रेम करणाऱ्या त्यांच्या कलावंत, संवेदनाशील हृदयाला जीवनाची कुरूपता सहन होणेच शक्य नव्हते आणि जीवनातील ही कुरूपता दूर करण्यासाठी ते आयुष्यभर लढत राहिले. त्यासाठी त्यांनी अनेक अंगांचा स्वीकार केला. साहित्यनिर्मिती असो, चर्चा असो, भाषणे असोत, सभा असोत, बरोबर जाणे असो की, रस्त्यावर येऊन मार खाणे असो, एकही माध्यम वापरायचे बाकी ठेवले नाही.

### जमेची बाजू

जातिधर्मातीत, लोकशाहीवर विश्वास असणारा, विज्ञानाभिमुख समाज निर्मिण्याचे त्यांचे स्वप्न होते आणि परंपरागत समाजात राहणाऱ्या प्रजेचे नागरिकांत स्थित्यंतर करण्याचे काम त्यांनी

हाती घेतले होते. राष्ट्रवादी, लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्षता मानणारा, विज्ञाननिष्ठ नागरिक निर्माण झाल्याशिवाय एकात्म भारतीय समाज निर्माण होऊ शकणार नाही, याची त्यांना जाणीव होती. हे काम एकट्यादुकट्याचे नाही, त्यासाठी कार्यकर्त्योची फळी उभारणे आवश्यक आहे, हे जाणून त्यातून 'मुस्लीम सत्यशोधक समाज'ची स्थापना झाली. समाज स्थापन होऊन थोडीच वर्षं झाली. त्यात अडचणी अनेक आल्या, वाटही बिकट आहे, पण कार्यकर्ते जिद्दी आणि चिकाटीचे आहेत, ही फार मोठी जमेची बाजू आहे.

हमीदभाई आजारी असताना पुण्यात झालेली तलाकपीडित मुस्लीम महिलांची परिषद ही कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. या एकाच कामाचा विस्तार जरी मुस्लीम सत्यशोधक समाजाने सातत्याने चालवला, तरी त्यातून एकात्म समाज निर्मिण्याची मोठी चळवळ उभी राहील. स्वतःला सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या समाजात तलाकपीडित महिला असणे, हीच एक लांच्छनास्पद बाब आहे. या स्त्रीला ताठ मानेने जगता येईल, अशी परिस्थिती जर आम्ही निर्माण करू शकलो नाही, तर ती गोष्ट फार नामुष्कीची ठरेल. ही स्त्री न्यायाची याचना करणारी आहे. तिचे रूपांतर अन्याय सहनच करणार नाही, अशा स्वाभिमानी स्त्रीमध्ये करावयाचे आहे, याची जाणीव सतत बाळगावयास हवी.

मुस्लीम सत्यशोधक समाजाला सत्यशोधनाच्या कामाबरोबर ते सत्य प्रत्यक्षात कसे उतरेल, त्याच्यासाठी कार्यसिद्ध व्हावयास हवे. प्रबोधनामुळे नव्या आयुष्याबाबत मनात पल्लवित होणाऱ्या आशा प्रत्यक्ष कामातूनच फलद्रूप होऊ शकतात.

**सर्वंकष परिवर्तन**

हमीदभाईसारखा समाजप्रबोधक ज्या समाजाचे स्वप्न पाहत असतो आणि ज्यासाठी समाजप्रबोधन करावयास उभा ठाकलेला असतो, ते परिवर्तन सर्वंकष असते. मुस्लिमांच्या मनात असलेली अलगपणाची भावना दूर करणे, धर्माच्या पगड्याखालून त्यांना बाजूस नेणारी चळवळ असो, दलित मुक्तीची चळवळ असो, संपूर्ण स्त्री-मुक्तीची चळवळ असो वा शोषितांना न्याय मिळवून देणे असो- या सर्वांचा सर्वंकष परिवर्तनात समावेश असतो. निरनिराळ्या स्तरांवर चालवलेल्या या कामाचा अंतिम उद्देश संपूर्ण परिवर्तनाचा असतो. तेव्हा हमीदभाईसारख्या समाजप्रबोधकांनी सुरू केलेले हे काम पुढे न्यावयाचे असेल, तर या सगळ्या कामांत आपण रस घेऊन परिवर्तनाचे काम चालू ठेवले पाहिजे.

जाती, धर्म, वंश, भाषा, स्त्री, पुरुष या कोणत्याही विषमतेच्या कारणाने खंडित होणार नाही, असे भारतीय नागरिक निर्माण करण्याचे आव्हान आजच्या युवाशक्तीने समर्थपणे पेलले, तर हमीदभाईसारख्या नेत्यास तीच मोठी श्रद्धांजली ठरेल.

*('मुस्लीम सत्यशोधक पत्रिका', जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पृष्ठ क्र. ६१ व ६२)*

## ६.२ मुस्लीम सत्यशोधक चळवळ–शोध आणि बोध – अब्दुल कादर मुकादम

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची चळवळ तूर्त एका संक्रमणावस्थेतून जात आहे. मंडळाची उद्दिष्टे गाठण्याचे विविध दृष्टीकोन, क्रम आणि अग्रक्रम यांचे वैविध्य, हे या अवस्थेचे प्रमुख कारण असावे, असे मला वाटते. आज हमीदभाई आमच्यात नसताना ही चळवळ सुरू करण्यामागे त्यांच्या मूळ प्रेरणा काय होत्या, याचा शोध घेणे पुढील वाटचालीच्या दृष्टीने उद्बोधक ठरेल.

१९७५ ते १९७७ या दोन वर्षांत मंडळाच्या काही शाखांनी विशेषतः पुणे आणि कोल्हापूर शाखांनी घटस्फोटित महिलांना पोटगी मिळवून देण्याच्या बाबतीत आणि काही अंशी त्यांचे पुनर्वसन करण्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. इतरही शाखांनी येत्या काही महिन्यांत अशा तऱ्हेचे कार्य करावे व ठिकठिकाणी घटस्फोटित महिलांच्या परिषदा घ्याव्यात, असा केंद्रीय कार्यकारिणीने निर्णय घेतला आहे.

समान नागरी कायद्याचा सतत आग्रह आणि त्याकरता मुस्लीम समाजात परिवर्तन घडवून आणण्याकरता मंडळ प्रतिज्ञाबद्ध असल्यामुळे, घटस्फोटित महिलांच्या बाबतीत होत असलेले आणि पुढेही होणारे कार्य मंडळाच्या उद्दिष्टांशी सुसंगत व म्हणूनच महत्त्वाचे आहे, याबद्दल दुमत होऊ नये. परंतु घटस्फोटित महिलांच्या बाबतीत होत असलेले कार्य हेच मंडळाचे अंतिम व एकमेव उद्दिष्ट नाही. मंडळ आज घटस्फोटितांच्या प्रश्नावर भर देत असल्याने जर असा समज निर्माण होत असेल, तर तो चुकीचा होय. हमीदभाईंच्या निधनानंतर पुण्यात घेण्यात आलेल्या दुखवट्याच्या सभेत या घटस्फोटित महिलांपैकी एकही महिला उपस्थित नव्हती ही घटना या संदर्भात बरीच बोलकी आहे.

मंडळाच्या रूपाने महिलांना काही आधार सापडला म्हणून या महिला सत्यशोधक मंडळाकडे आल्या आणि हमीदभाईंच्या दुखवट्याच्या सभेत त्या उपस्थित राहिल्या नाहीत; कारण त्यांच्या जीवनविषयक मूळ दृष्टीकोनात परिवर्तन घडून आले नव्हते. मग मंडळाने या क्षेत्रात केलेले कार्य वाया गेले असे समजायचे का? तसेही समजण्याचे कारण नाही. मुस्लीम स्त्रीवर होत असलेले अन्याय चव्हाट्यावर मांडणे, त्यांना न्याय मिळवून देण्याकरता प्रयत्न करणे, हा मंडळाच्या कार्यक्रमाचाच भाग आहे आणि म्हणून तो अपरिहार्य व आवश्यक आहे, परंतु हा कार्यक्रम हाती घेत असताना या चळवळीच्या मूळ उद्दिष्टांवरची नजर जराही ढळू न देण्याचे भान कार्यकर्त्यांनी सतत ठेवले पाहिजे, एवढाच अर्थ मला अभिप्रेत आहे.

### मूळ व पूरक उद्दिष्टे

इथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकेल की, या चळवळीची मूळ व पूरक उद्दिष्टे कोणती? कोणत्याही संघटनेला किंवा चळवळीला चार अंगे असतात– संघटनात्मक बांधणी, विधायक कार्य, संघर्षात्मक कार्यक्रम आणि वैचारिक किंवा सैद्धान्तिक भूमिका. मुस्लीम सत्यशोधक चळवळीच्या दृष्टीने विचार करायचा झाला, तर या चतुःसूत्रीपैकी मंडळाची केंद्रीय कार्यकारिणी,

तिचे पदाधिकारी, मंडळाच्या विविध शाखा इत्यादी बाबी मंडळाच्या संघटनात्मक बाबी म्हणून मानता येतील. घटस्फोटित महिलांकरिता होत असलेले कार्य किंवा समाजवादी महिला सभेच्या सहकार्याने कोल्हापूर शाखेने हाती घेतलेले कार्य, हा मंडळाच्या विधायक कार्याचा भाग आहे.

याउलट मोर्चे, निदर्शने हा संघर्षात्मक कार्यक्रम आहे आणि मुस्लीम समाजामध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्याकरता व त्यांचा राजकीय दृष्टीकोन बदलण्याकरता वैचारिक व मानसिक परिवर्तन घढवून आणणे, ही मंडळाची तात्त्विक किंवा सैद्धान्तिक भूमिका आहे. या चतुःसूत्रीकडे जरा बारकाईने पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट होऊ शकेल की, यापैकी संघटनात्मक बांधणी, विधायक कार्य, संघर्षात्मक कार्यक्रम या बाबी साधनस्वरूप असून वैचारिक क्रांती हे या चळवळीचे मूळ उद्दिष्ट आहे.

**मुस्लीम जनमानसाचे आधुनिकीकरण**

मंडळाच्या मूळ उद्दिष्टाविषयीची हीच भूमिका हमीदभाईंना अभिप्रेत होती. आपल्या व्याख्यानांतून, चर्चासत्रांतून, लिखाणातून त्यांनी ती अनेकदा स्पष्टपणे मांडली आहे. किंबहुना सत्यशोधक मंडळ हे केवळ नोकऱ्या मिळवून देणारे किंवा स्त्रियांच्या पुनर्वसनाचे केंद्र बनू नये, असा त्यांचा आग्रह असे. समान नागरी कायद्याची मागणी करताना विद्यमान कायद्यामुळे ज्या मुस्लीम स्त्रियांवर अन्याय झाला असेल, त्यांना उपलब्ध साधनांच्या आधारे न्याय मिळवून देणे, त्यांच्या पुनर्वसनासाठी व शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न करणे, हा एक विधायक कार्यक्रमाचा भाग म्हणून मंडळाने स्वीकारला असला, तरी मंडळाला तिथेच थांबता येणार नाही. किंबहुना त्यानंतरचे व त्यापलीकडील कार्य या चळवळीच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे.

समान नागरी कायद्याच्या मागणीमागे केवळ विद्यमान मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटींमुळे व कालबाह्य तरतुदींमुळे मुस्लीम स्त्रीवर होणारे अन्याय दूर करणे, एवढाच मर्यादित हेतू नाही. हा भाग महत्त्वाचा तर आहेच, परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचा भाग म्हणजे कुठलाही धार्मिक कायदा अपौरुषेय (परमेश्वरी) अतएव अपरिवर्तनीय असल्याच्या श्रद्धेतून मुस्लीम समाजाला बाहेर काढणे व त्याबरोबरच समान नागरी कायदा व पर्यायाने या देशाचे समान नागरिकत्व निष्ठेने स्वीकारण्याकरता मुस्लीम जनमानस तयार करणे, म्हणजेच ऐहिक बाबींसंबंधी मुसलमानांना ऐहिकवादी किंवा सेक्युलर दृष्टीकोन स्वीकारावयास लावणे, हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या नावाने सुरू झालेल्या या समाजातील प्रबोधनाच्या चळवळीचे अंतिम उद्दिष्ट आहे. मरहूम हमीदभाईंच्या मनात व विचारात ही भूमिका अतिशय स्पष्ट होती. या उद्दिष्टांपासून कार्यकर्त्यांनी जराही विचलित होऊ नये, म्हणून ते सतत जागरूक असत.

**धर्माचे चिकित्सक विश्लेषण**

मुस्लीम व्यक्तिगत कायदा ईश्वरीय नाही व म्हणून तो परिवर्तनीय आहे, ही भूमिका एकदा आपण स्वीकारली की, त्याहीपेक्षा व्यापक भूमिका घेणे अपरिहार्य होऊन बसते. एकूण धर्मसंस्थाच ऐहिक जीवनाच्या कक्षेत आणून, 'धर्म' ही एक ऐतिहासिक घटना (Historical

Phenomenon) आहे, असे मान्य करून, आजच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय गरजा, त्यातून निर्माण होणारे विविध प्रवाह व त्यांचे ताण आणि तगाव (Forces and Tensions) यांच्या संदर्भात धर्माचे चिकित्सक विश्लेषण करणे, हे या व्यापक भूमिकेचे स्वरूप आहे.

धर्माचे असे चिकित्सक विश्लेषण करू लागलो की, समाजातील अनेक प्रस्थापित रूढी व श्रद्धांना आपोआपच जबरदस्त धक्के बसू लागतात आणि मग सुधारक आणि सनातनी यांच्यातील संघर्ष तीव्र होतो. परंतु पारंपरिक व सनातनी समाजातील कालबाह्य रूढी व श्रद्धा उद्ध्वस्त झाल्याशिवाय, समाजाला त्याच्यापुढील परखड वास्तवाची जाणीवच होऊ शकत नाही, आणि अशी जाणीव जोपर्यंत त्याला होत नाही, तोपर्यंत त्या समाजापुढील समस्यांची उकल करण्याचे मार्गही त्याला सापडू शकत नाहीत. म्हणून मुस्लीम समाजाला त्याच्या पारंपरिक श्रद्धांतून बाहेर काढून त्याला वास्तवाची परखड जाणीव करून देणे, हे मुस्लीम सत्यशोधक चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट सुधारक आणि सनातनी यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्याशिवाय साध्य होऊ शकत नाही. .

### उद्दिष्टाचा आणखी एक पैलू

या उद्दिष्टाचा आणखी एक पैलूही आपण लक्षात घ्यायला हवा. या देशातील मुसलमानांचे राजकारण स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच जातीयवादी राहिले आहे. धार्मिक राष्ट्रवादावर अधिष्ठित पाकिस्तानची निर्मिती, हे या जातीयवादी राजकारणाचे फलित आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही; परंतु स्वातंत्र्योत्तर काळातही मुस्लीम राजकारणाने काही वेगळी दिशा घेतलेली नाही, ही खरी चिंतेची बाब आहे.

या जातीयवादी राजकारणामुळे अंती मुस्लीम समाजाचेच नुकसान होणार आहे. या जातीयवादी राजकारणाच्या दुष्ट चक्रातून मुस्लीम समाजाला बाहेर काढून, त्यांच्या राजकीय दृष्टीकोनात (Political attitude) बदल घडवून आणून, तो वास्तवाशी आणि काळाशी सुसंगत करणे आणि मुस्लीम समाजाला या देशातील मुख्य प्रवाहाशी समरस होण्यास प्रवृत्त करणे, हा मुस्लीम सत्यशोधक चळवळीचा दुसरा पैलू आहे.

### चतुःसूत्रीतील समतोल

या विविध पैलू व उद्दिष्टांचे स्वरूप प्रामुख्याने वैचारिक क्रांतीचे आहे. या क्रांतीला आवश्यक ती आणि तेवढीच संघटनात्मक बांधणी, या क्रांतीला पूरक ठरतील व तिची गती वाढवू शकतील, ते आणि तेवढेच संघर्षात्मक व विधायक कार्यक्रम स्वीकारणे, हेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे स्वरूप राहिले पाहिजे. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास वैचारिक अधिष्ठान, संघटनात्मक बांधणी, संघर्षात्मक कार्यक्रम आणि विधायक कार्य या चतुःसूत्रीत योग्य तो समतोल साधण्यानेच या क्रांतिकारी चळवळीची निरोगी वाढ होऊ शकेल.

विधायक कार्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झाल्यास, त्या क्रांतीचा वेग खंडित होण्याचा धोका नजरेआड करता येणार नाही; कारण विधायक कार्याचा, समाजातील सर्वच

घटकांना या ना त्या रूपाने लाभ होत असतो व तो घेण्याकरता, मूळच्या पारंपरिक श्रद्धा व वैचारिक सनातनी भूमिका कायम ठेवून ते या कार्यात सहभागी होत असतात. अशा रीतीने त्यांचे सांख्यिक बळ वाढले की, चळवळीच्या मूळ उद्दिष्टालाच ते आव्हान देऊ शकतात.

हा धोका टाळायचा असेल तर मुस्लीम व्यक्तिगत कायदा कालबाह्य झाला असल्यामुळे बदलला पाहिजे, या बिंदूपासून सुरुवात करून, एकीकडे सर्व धर्मसंस्थाच चिकित्सक अभ्यासाचा विषय करून, दुसरीकडे मुसलमानांना त्यांच्या जातीयवादी राजकारणाच्या व वेगळेपणाच्या प्रवृत्तीच्या दुष्ट चक्रातून बाहेर काढून, धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) राष्ट्रवादाचा स्वीकार करण्यास आणि न्याय व समता यावर आधारित एकात्म भारतीय समाजनिर्मितीच्या प्रक्रियेत आपला वाटा उचलण्यास त्यांना प्रवृत्त करणे, अशी क्रमाने विकसित होणारी व्यापक भूमिका घेऊनच मुस्लीम सत्यशोधक मंडळाला आपली वाटचाल करावी लागणार आहे.

*('मुस्लीम सत्यशोधक पत्रिका', जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पृष्ठ क्र. ९५ ते ९७)*

## ६.३ हमीद दलवाई : एक प्रचंड ज्वालामुखी – प्रा. फक्रूद्दिन बेन्नूर

हमीद दलवाईंच्या अकाली निधनाने केवळ मुस्लीम प्रबोधनाचीच नव्हे, तर भारतातील एकूण सामाजिक प्रबोधनाची फार मोठी हानी झाली आहे कारण हमीद दलवाईंनी मुस्लीम प्रबोधनाकडे मानवतेच्या व्यापक जाणिवेतून पाहिले. मुस्लीम प्रतिगामित्वाच्या ग्रानाइट तटबंदीला हमीद दलवाईंनी मानवी मूल्यांचे कवचकुंडल घेऊन प्रचंड धडक दिली आणि त्याला खिंडार पाडले. इस्लामच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व घटना होती! म्हणूनच त्यांच्या अकाली मृत्यूने मानवतेचा महान पाईक आपण गमावला आहे.

**दुर्दैवी घटना**

भारतीय इतिहासातील सध्याचा काळ जबरदस्त संक्रमणावस्थेचा आहे. स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेली साचेबंद चौकट नुकतीच कोठे ढासळू लागली आहे. भारतीय समाजाला सर्वांगीण क्रांतीच्या जाणिवांचे धुमारे फुटत आहेत. सत्तेच्या अखंड व निरंकुश उपभोगामुळे स्वातंत्र्यानंतर अभिप्रेत असणाऱ्या सर्वांगीण क्रांतीचे ध्येयच हरपल्यासारखे झाले होते. समतेच्या प्रक्रियेला खीळ बसलेली होती. उलट सत्तेच्या वापरासाठी धर्माचा, जातींचा व प्रतिगामित्वाचा वापर करण्यात येऊन भारतातील धार्मिक व जातीय तटबंदी आणखी मजबूत करण्याचे कार्य या काळातील राजकीय सत्तेने केले. परंतु भारतीय जनतेने अभूतपूर्व शांततामय क्रांतीने हे चित्र पार बदलून टाकले आहे आणि धार्मिक समतेच्या व सहिष्णुतेच्या प्रक्रियेला चालना मिळण्याला अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याचा काळ आला असतानाच हमीद दलवाईंचा मृत्यू व्हावा, ही भारताच्या दृष्टीने दुर्दैवाची घटना आहे.

**अकल्पित उदय**

हमीद दलवाईंचा उदय केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात किंबहुना अखिल मुस्लीम जगतातच अकल्पित आणि धक्काजनक होता  कारण इस्लामचा उदय झाल्यापासून असा क्रांतिकारक मुस्लीम समाजसुधारक आणि विचारवंत हमीदच्या रूपाने प्रथमच जन्माला आला होता. विशेष म्हणजे स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजजीवनात ज्या काळात मरगळ निर्माण झालेली होती, सामाजिक समता व क्रांतीची चक्रे केवळ थांबलेलीच नव्हती, तर अंधश्रद्धा व प्रतिगामी धार्मिक पुनरुज्जीवनवादाला चालना मिळून आपल्या समाजजीवनात जातिवाद, सांप्रदायिकता व हिंदू-मुस्लीम तेढ पुन्हा उफाळून येऊ लागली होती, अशा काळातच हमीद दलवाईंचे आगमन सुखद धक्का देणारे व मुस्लीम प्रबोधनाची सुरुवात करणारे होते.

**मानसिक संतुलन बिघडले**

फाळणीनंतर भारतातील मुस्लीम समाजाची स्थिती त्रिशंकूसारखी झालेली होती. भारतातील

मुसलमानांनी पाकिस्तानच्या निर्मितीला पाठिंबा देत असताना आपल्या भविष्याचा व फाळणीच्या व्यावहारिक, सामाजिक व मानसिक परिणामांचा फारसा विचारच केलेला नव्हता. धार्मिक राष्ट्रवादाची कल्पना त्यांनी उचलून धरल्याने पाकिस्तानची निर्मिती झाली. धार्मिक राष्ट्रवादाच्या फोलपणाची जाण त्यांना धर्मश्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे आलीच नाही. आणि नंतर फाळणीच्या स्फोटक परिणामांनी खचलेले मुसलमान आपले जीवन एका विचित्र अवस्थेत जगत होते.

त्यातच मुस्लिमांमधील काही अतिरेकी गटांच्या भ्रामक कल्पनांमुळे आणि हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजांतील अतिरेकी व जमातवादी संघटनांच्या कारवायांमुळे स्वातंत्र्यानंतरदेखील जातीय दंगली होतच राहिल्या आणि प्रत्येक दंगलीत मुस्लीम समाजाचेच अतोनात नुकसान होत राहिले. त्यांचे एकूण मानसिक संतुलनच बिघडले म्हणूनच अनामिक भय, अस्थिरता, न्यूनगंड आणि तथाकथित इस्लामी संस्कृती व अस्तित्व नष्ट होण्याच्या भीतीने त्यांना पछाडल्याचे दिसते. तशातच १९६५च्या पाकिस्तानी आक्रमणाने येथील मुसलमानांची परिस्थिती आणखीनच कठीण झाली. १९६२चे चिनी व १९६५चे पाकिस्तानी आक्रमण यांनी बिथरलेल्या भारतीय समाजात, हिंदू राष्ट्रवाद व मुस्लिमांबद्दलची अविश्वासाची भावना यांची वाढ झाल्याचे दिसते.

**मूलभूत चिकित्सेने प्रारंभ**

याच काळात, थोड्याबहुत फरकाने, फाळणीच्या धक्कादायक परिणामांच्या प्रभावातून मुस्लीम समाज मुक्त होत होता आणि त्यांच्यात पुन्हा धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा उदय होत होता. त्याच १९६६नंतरच्या काळात उत्तरेत अनेक प्रतिगामी मुस्लीम संघटना निर्माण झाल्या. पुनः जातीय दंगलींचे राजकारण सुरू झाले. या अशा विशिष्ट काळात महाराष्ट्राच्या क्षितिजावर हमीदचा झंझावाती उदय झाला, हमीदने आपल्या कार्याची सुरुवातच मुस्लीम मनाचे पिंड व न्यूनगंड याच्या मूलभूत चिकित्सेने केली. मुस्लीम समाजमनाची हमीदने केलेली तर्ककठोर चिकित्सा आकलन करण्याची जाण व सहिष्णुता मुस्लीम समाजात राहिलेलीच नव्हती.

**क्रांतिकारक, सुधारक नव्हे**

हमीदच्यापूर्वी अशा प्रकारची मूलगामी व तर्ककठोर आत्मपरीक्षणात्मक व प्रलयंकारी टीका कोणत्याही मुस्लीम विचारवंताने आपल्या मुस्लीम समाजावर केलेली नव्हती. म्हणूनच हमीदच्या उदयाचे परिणाम ज्वालामुखीच्या स्फोटासारखे होते. हमीदने मुस्लीम मनाची तर्ककठोर चिकित्सा करून मुसलमानातील न्यूनगंड, ऐतिहासिक भ्रम, धार्मिक अहंभाव आणि जमातवाद यांची सार्वजनिक चिरफाड केल्याने केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील सगळा मुस्लीम समाज, त्यांचे मुल्ला-मौलवी, काँग्रेसी व बिगरकाँग्रेसी मुसलमान पुढारी हे सर्व भयंकर बिथरले. हमीदने आपल्या तुफानी हल्ल्याने मुस्लीम प्रतिगाम्यांचे पलायनवादाच्या झाडावर सुस्तावत बसलेले मोहोळ जागे केले.

विशेष म्हणजे, हमीद दलवाईंना आपल्या कृतीच्या व अभिव्यक्तीच्या परिणामांची कल्पना होती. त्यांचा पिंड केवळ समाजसुधारकाचाच नव्हता, तर साऱ्या जगाशी एकाकी टक्कर देणाऱ्या

सव्यसाची क्रांतिकारकाचा होता. मुस्लीम समाजाला आपण न पेलणारे असे जबर दणके देत आहोत, याची त्यांना जाणीव होती आणि तसे हादरे दिल्याशिवाय मुस्लीम समाजात प्रबोधनाची प्रक्रिया सुरू होणार नाही, असे त्यांना वाटे. हमीदभाईंची ही कृती इस्लामच्या इतिहासातील एक अभूतपूर्व घटना होती. अशा प्रकारे, इस्लाममधील कर्मकांडाला व पोथीनिष्ठतेला प्रबोधनाच्या जाणिवेतून आव्हान देणारे हमीद दलवाई हे मुसलमानामधील पहिलेच विचारवंत होते.

### जिहादचा पुकारा

हमीद दलवाईंच्या आधी, मुस्लीम समाजामध्ये अनेक विचारवंत, राजकारणी पुरुष, पंडित होऊन गेले, परंतु कोणीही मुस्लीम मनाची हमीद दलवाई यांच्याप्रमाणे तर्ककठोर चिकित्सा केली नाही. त्यांच्या आधीच्या सर्व विचारवंतांनी मुसलमानांच्या अधःपतनाची मीमांसा करताना मूळच्या प्रश्नाला हातच घातल्याचे दिसून येत नाही.

अलीगढ चळवळीमधून पुढे आलेल्या, इंग्रजी शिकलेल्या तथाकथित मुस्लीम सुधारकांनी, मुसलमानांच्या मागासलेपणाला, ब्रिटिशांना व तथाकथित हिंदू जातीयवाद्यांना जबाबदार धरले मुल्ला-मौलवींचे काही प्रस्थापित सिद्धान्त व समीकरणे होती. त्यांच्या मते बिगर-मुसलमानी देशांत मुस्लीम संकटातच असतात. त्यांनी मुस्लिमांच्या मागासलेपणाची सर्वच जबाबदारी बिगर-मुसलमानांवर ढकलली होती. इस्लामचे व मुसलमानांचे सारे अस्तित्वच धोक्यात आल्याचा प्रचार करून अहर्निश संघर्ष व जिहादचा सिद्धान्त मांडलेला होता!

मुस्लीम सुधारणावादी विचारवंतांचेही काही प्रकार आहेत. अशा सुधारकांचा एक गट मुसलमानांचा अधःपात ते इस्लामच्या मूळ शिकवणीपासून ढळल्याने झाला; असे सातत्याने प्रतिपादन करत आला आहे. त्याच्या मते, मुसलमान हे 'कुराण'प्रणित मूळ शिकवणीला विसरले. इस्लामच्या शुद्ध आचरणापासून ढळले. त्यामुळेच त्यांचे अधःपतन झाले आहे आणि म्हणून मुसलमानांत सुधारणा आणायची असेल, तर त्यांनी 'कुराण'प्रणित शास्त्रशुद्ध आचरणांचा अवलंब करावा, कारण इस्लाम हा सर्वश्रेष्ठ, सर्वांगपरिपूर्ण व दोष-विरहित धर्म आहे. तो अल्लाहचा शेवटचा शब्द आहे. म्हणूनच पैगंबरकालीन जीवनाचे आचरण मुसलमानांनी स्वीकारावे, म्हणजे त्यांचा सर्वांगीण उत्कर्ष होईल. अशा प्रकारे या मूलभूततावादी मुस्लीम विचारवंतांनी मुस्लीम प्रबोधनाच्या नावाखाली काळाची चक्रे उलटी फिरवून १४०० वर्षांमागे नेण्याचा प्रयत्न केला व तसाच प्रयत्न अद्यापही करत आहेत.

### व्यक्ती बदलल्या, अभिव्यक्ती तीच

दुसऱ्या सुधारणावादी गटाने इंग्रजी विद्येचा अवलंब करून पाश्चात्य जीवनपद्धती अंगीकारल्याने मुस्लिमांची सुधारणा होईल असे प्रतिपादन केले; परंतु केवळ इंग्रजी शिक्षण घेतल्याने आधुनिकत्व व विज्ञाननिष्ठा निर्माण होत नाही, हे त्यांच्या लक्षात आले नाही. सर सय्यद अहमदखान यांनी सामाजिक सुधारणेची सुरू केलेली चळवळ त्यांच्या धार्मिक राष्ट्रवादावर आधारित अलगतेच्या राजकारणातच वाहून गेली! याही जगाला पोथीनिष्ठ व जीर्णमतवादी

मुस्लीम समाजाने विरोध केला होता.

असे दिसते की, पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या बहुतेक मुस्लीम विद्वानांनी इस्लामच्या बाबतीत समर्थनवादी (जस्टिफिकेशनिस्ट) दृष्टीकोन स्वीकारला. इस्लामच्या तथाकथित श्रेष्ठतत्त्वांचे समर्थन करणे व दोषांचे संदर्भ बदलून पळवाटा शोधून फसवणूक दाखवणे, हे त्यांच्या चिकित्सेचे स्वरूप होते आणि फुटीरवादी पंडित दुसऱ्या धर्माच्या त्रुटी व दोष दाखवून इस्लाम श्रेष्ठ कसा याचे रसभरीत वर्णने करण्यात धन्यता मानत होते.

आणखीन एका सुधारणावादी गटाने आपले सर्व लक्ष सत्ता व राजकारण यांच्याकडे वळवून मुसलमानांना सत्ता व सत्तेत भागी मिळाल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही, असे मानले होते व त्यावर आधारित त्यांचे राजकारण चालू होते व चालू आहे. त्यांनी मुस्लिमांची प्रगती राजकीय सत्तेच्या समीकरणात बसवून टाकली. त्याचप्रमाणे काही मुस्लीम अध्यापकांनी आणखी एक विचार मांडला होता. त्यांच्या मते मुस्लीम प्रबोधन म्हणजे इस्लाममधील व शरीयतमधील व मुसलमानांच्या प्रत्यक्ष जीवनातील तथाकथित प्रक्षिप्त भाग काढून टाकणे व इस्लामचा उदारमतवादी अर्थ लावून त्याला कालसुसंगत बनवणे हे होय.

हे करत असताना त्यांनी इस्लाममधील अनिष्ट प्रथांकडे दुर्लक्ष केले. मुस्लीम माणसाचे मन घडवणाऱ्या प्रकारांकडे डोळेझाक केली. इस्लाममधील दोषांबद्दल धैर्याने बोलणे त्यांना शक्य झाले नाही. हे सर्व विचार प्रवाह स्वातंत्र्यापूर्वी होते व नंतरही कायम राहिले. व्यक्ती बदलल्या पण अभिव्यक्ती कायम राहिली!

**विरोधाचा पाया न्यूनगंड**

अशा प्रकारे मुस्लिमांच्या सामाजिक व व्यक्तिगत जीवनाचा व त्यांच्या मानसिक प्रक्रियांचा कालसापेक्ष विचार कोणी केलेला नव्हता. या पार्श्वभूमीवर हमीद दलवाईंचे क्रांतीकारकत्व प्रकर्षाने जाणवते. हमीदभाईंनी मुस्लीम समाजाच्या मानसिक प्रक्रियेच्या व जमातवादी जाणीवांच्या मूलभूत समस्येला हात घालून प्रबोधनाला सुरुवात केली. या सर्व विचारप्रवाहांचा फोलपणा दाखवून दिला. या सर्वांनाच तर्ककठोर आव्हान दिले. हमीदभाईंनी मुसलमान जमातीच्या व त्यांच्या धार्मिक व राजकीय नेत्यांच्या न्यूनगंडाला, त्यांच्या ऐतिहासिक भ्रमांना आणि इस्लामच्या तथाकथित श्रेष्ठत्वालाच आव्हान दिल्याने सर्व प्रकारचे मुसलमान बिथरले! एकतर त्यांचा अहंभाव, ऐतिहासिक व धार्मिक श्रेष्ठत्वाच्या जाणीवा धोक्यात आल्या होत्या. दुखावल्या गेल्या होत्या.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदू व इतर धर्मियांच्या तुलनेत आपण श्रेष्ठ कसे आहोत, इस्लाम कसा समाजवादी आहे, याची प्रौढी मिरवत असतानाच हमीदने त्यांचे वस्त्रहरण करून त्यांचे व इस्लामचे दोष बिगरमुसलमानांना दाखवल्याने ते भयंकर दुखावले गेले. त्याचप्रमाणे असे दोष बिगरमुसलमानांना दाखवणे म्हणजे मुसलमानांना आणखीन दुबळे करणे व इस्लामचे अस्तित्व धोक्यात आणणे, असे त्यांना वाटे. त्यामुळे ते खवळून उठले. परिणामी दलवाईंना मुसलमानांच्या कडव्या विरोधाला तोंड द्यावे लागले.

**अशरफ चवताळले**

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हमीदच्या प्रतिपादनाने मुस्लिमांतील वरिष्ठवर्गीय पुढाऱ्यांचे वस्त्रहरण होत होते. दलवाई सामान्य मुसलमानांबद्दल बोलत होते, त्यांची नेत्यांकडून होणारी फसवणूक दाखवून देत होते. अशरफ मुसलमान नेत्यांच्या कारवायांवर प्रकाश टाकत होते त्यांच्याप्रमाणेच मुल्ला-मौलवींच्या अस्तित्वालादेखील त्यांनी आव्हान दिल्याने मुस्लीम पुरोहितवर्ग बेंबीच्या देठापासून ओरडत उठला!

हमीदभाईंनी मुसलमान मनांवर वर्चस्व गाजवणाऱ्या या दोन्ही शक्तींना एकाच समयी आव्हान दिले. परिणामी जीवाच्या आकांताने त्या सर्वांनी दलवाईंविरुद्ध जिहाद पुकारले. शेवटी मुस्लीम प्रतिगामी शक्तींशी लढता लढताच हमीदभाईंची सारी शक्ती व प्रतिभा खर्ची पडली. परंतु हमीदभाईंचा जन्मच मुळी त्यासाठी होता, असे म्हणावे लागते. नियतीने हीच अप्रिय कामगिरी त्यांच्यावर सोपवलेली असावी.

**व्यापक मानवतेची भूमिका**

हमीद दलवाईंनी मुस्लीम प्रबोधनाकडे मानवतेच्या व्यापक भूमिकेतून पाहिले. त्यांनी आपल्या चळवळीची सुरवातच मानवी ऐक्याच्या मूलभूत भूमिकेतून केली. प्रखर बुद्धिवादी व मानवतेवर आधारित राष्ट्रवादी प्रेरणा मुसलमानांत निर्माण करण्यासाठी आणि मानवी ऐक्याचा एक घटक असणाऱ्या, हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी ते आयुष्यभर झगडले. त्यांची प्रेरणा मुस्लिमांपुरतीच असलेली जमातवादी प्रेरणा नव्हती.

भारतीय समाजातील हा एक फार मोठा घटक परंपरेच्या साखळदंडांत जखडला जाऊन मागासलेला राहिला आहे. त्याची सर्वंकष प्रगती झाल्याशिवाय भारताच्या सर्वांगीण प्रगतीची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरूच होणार नाही, ही त्यांची धारणा होती. हिंदू-मुसलमानांतील वितुष्ट नष्ट करून मानवतेच्या पायावर त्यांचे ऐक्य साधणे, हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी मुस्लीम समाजात पुरेशी जाण आली पाहिजे, असे त्यांना वाटे आणि कोणत्याही समाजाची प्रगती ही केवळ ढोबळ शिक्षणावर व राजकीय संधीवर अवलंबून नसून त्या जमातीच्या सामाजिक विकासावर अवलंबून असते आणि सामाजिक विकास हा धार्मिक व वैचारिक प्रबोधनामुळे शक्य होत असतो, याच भूमिकेतून त्यांनी इस्लाममधील साचेबंद व कालबाह्य रूढींना आव्हान दिले.

मुस्लिमांची खरी सुधारणा व्हायची असेल, तर इस्लाममध्ये कालसापेक्ष बदल झाले पाहिजेत. धर्म अध्यात्मिक व व्यक्तिगत जीवनाची बाब बनली पाहिजे. तसेच मुस्लिमांच्या मनातील धार्मिक व ऐतिहासिक भ्रम दूर केले पाहिजेत. असा विचार मांडून त्यांनी इस्लाममधील कालबाह्य रूढी, तत्त्वे व विचार यांवर हल्ला चढवला.

**अल-गझालीने वाटा बंद केल्या**

मुस्लिमांनी 'कुराण'ला केवळ अपौरुषेयच मानले नव्हते, तर साक्षात ईश्वरवाणीच मानले. महंमद पैगंबरांनी 'कुराण'ची निर्मिती केलेली नाही. कारण जे साक्षात् ईश्वरीय आहे, ते निर्मित

असू शकत नाही! 'कुराण' हे पैगंबरांच्या साक्षात्काराच्या माध्यमांतून पूर्ण स्वरूपात अवतरले आहे, ही मुस्लिमांची भूमिका विज्ञानाच्या कसोटीवरून नाकारणारे हमीद दलवाई हे गेल्या १४०० वर्षांतील पहिलेच मुस्लीम विचारवंत होत!

(मुसलमानांतील एक गट, जिब्राईल या अल्लाहच्या दूताने पैगंबरांना अल्लाच्या जवळ असलेले 'कुराण'चे एकएक पान प्रत्यक्षात आणून दिले, असे मानतो.) अल–गझाली या इस्लामी धर्मपंडिताने इस्लामला साचेबंद व पोथीनिष्ठ करून टाकले. तत्त्वचर्चा व बुद्धिवाद यांना विरोध केला शास्त्रांच्या अभ्यासात श्रद्धा ढासळते म्हणून शास्त्र पाखंडी, असा युक्तिवाद केला आणि प्रगतीच्या, चिकित्सेच्या व आत्मपरीक्षणाच्या साऱ्या वाटा कायमच्या बंद करून टाकल्या. अल–गझालीच्या शिकवणीमुळे 'कुराण'ला अनिर्मित मानण्यापर्यंत मजल गेली, इतकेच नव्हे तर, मुसलमानांच्या हाती असणारा छापील ग्रंथ हादेखील अनिर्मितच असतो, असे मानले गेले!

**तेजोमय बुद्धिवाद**

इस्लामच्या तथाकथित वैचारिक उत्कर्षाच्या काळात, ग्रीक तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे बू–अलीसिना (अव्हिसेना)सारखे मुस्लीम विचारवंत निर्माण झाले तरी किंवा मोतजला विचारवंतांची बुद्धिवादी परंपरा निर्माण झाली तरी, त्या सर्वांच्या प्रतिपादनाची मजल 'कुराण' ही अनिर्मित नसून अल्लाहची निर्मिती आहे व अल्लाहला दुय्यम आहे, एवढेच सांगण्यापर्यंत जाऊ शकली होती!

हमीद दलवाईंनी या सर्वांच्या पुढे जाऊन, अल्लाह व 'कुराण'चे चिरंतनत्व व सर्वांग परिपूर्णतेवर मूलगामी हल्ला चढवला. हमीदभाईंचा बुद्धिवाद पढीक पंडिती नव्हता. प्रस्थापित धर्मश्रद्धा आणि पोथीनिष्ठा यांच्या समर्थनासाठी तर्कशास्त्राचा वापर करणे, एवढ्या इतपतच त्यांचा बुद्धिवाद मर्यादित नव्हता. शतकानुशतकांची जळमटे क्षणात भस्म करून नवसृजनाची क्षमता निर्माण करणारा तेजोमय बुद्धिवाद त्यांच्याकडे होता. त्याला मानवी करुणेची हृदयंगम किनार होती.

अपरंपार सहानुभूती आणि मानवी ऐक्य व प्रतिष्ठा हे त्यांच्या बुद्धिवादाचे स्थायीभाव होते, म्हणून मुस्लीम प्रबोधन म्हणजे केवळ इंग्रजी शिक्षण घेणे किंवा पैगंबरकालीन इस्लामचे पुनरुत्थान करणे किंवा इस्लामचा वा कोणत्याही धर्माचा उदारमतवादी अर्थ लावणे किंवा पंडिती थाटाने पारमार्थिक चवित–चर्वण करणे, असे त्यांनी मानले नाही. म्हणूनच असे ठामपणे म्हणता येईल की, अखिल इस्लामी इतिहासात, इस्लामच्या कालबाह्य रूढी व तत्त्वे यांवर प्रखर टीका करून 'शरीयत'च्या व 'कुराण'च्या तथाकथित ईश्वर वाणीला व चिरंतनत्वाला आव्हान देणारे हमीद दलवाई हे पहिलेच मुस्लीम विचारवंत होऊन गेले. त्यांच्याआधी प्रत्यक्ष 'कुराण' व शरीयत यांना आव्हान देणारे कोणी निर्माण झालेच नाहीत.

**अलौकिकत्व**

मुस्लीम मनाला जखडून टाकणाऱ्या 'कुराण' व शरीयतप्रणीत कालबाह्य धार्मिक व वैचारिक

भ्रम नष्ट केल्याशिवाय मुसलमानांत प्रबोधनाची प्रक्रियाच सुरू होणार नाही, अशी हमीदभाईंची धारणा होती. मानसिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने मुक्त होत नसतो, हे त्यांनी जाणले होते. मुसलमानांच्या मानसिक गुलामगिरीची ऐतिहासिक व वैज्ञानिक भूमिकेतून जाहीर चिकित्सा सर्वप्रथम हमीद दलवाईंनीच केली.

अशी चिकित्सा करणे म्हणजे इस्लामची मूलभूत तत्त्वे, 'कुराण', शरीयत व पैगंबरांची शिकवणूक यांनाच आव्हान देणे होते आणि मुस्लीम समाज हा अंधश्रद्ध, अर्धशिक्षित धर्मशास्त्रांची केवळ पोपटपंची करणारा आणि मुल्ला-मौलवींच्या विकृत व विपर्यस्त शिकवणुकीने जखडलेला असल्याने, हमीदने उपस्थित केलेल्या या जबरदस्त आव्हानामुळे, हमीद दलवाई म्हणजे कोणीतरी महाभयंकर व महाघातकी असा इस्लामचा व मुसलमानांचा शत्रू आहे, त्याला महारोग्याप्रमाणे टाळले पाहिजे, असा प्रचार सुरू होणे क्रमप्राप्तच होते!

मुसलमानांनी ज्या गोष्टींना, तत्त्वांना सर्वांगपरिपूर्ण शुद्ध व चिरंतन आणि कधीही चूक नसणारे मानले होते, त्या सर्वांनाच हमीदभाईंनी धडक दिली. हे खरोखरच भयंकर होते. मती गुंग करून टाकणारे होते आणि कोणत्याही मुस्लीम माणसाच्या जाणिवांच्या चौकटीतच बसणारे नव्हते. प्रचंड आत्मिक सामर्थ्य व अतुलनीय मानसिक धैर्याशिवाय हे शक्यच झाले नसते.

**मुस्लिमांची प्रतिक्रिया**

इस्लाममधील विवाह, तलाक आणि स्त्रीविषयक दृष्टीकोन यामुळे मुस्लीम स्त्री-पुरुषांची मानसिक घडण व कुटुंबपद्धती यांचे संतुलनच बिघडले आहे. त्याचे परिणाम मुसलमानांच्या कौटुंबिक जीवनावर व भौतिक दृष्टीकोनावर झाले आहेत. मुस्लीम मनामध्ये अनेक विकल्प निर्माण झाले आहेत. म्हणूनच त्यामध्ये बदल झाल्याशिवाय प्रबोधनच शक्य नाही, असा मूलभूत विचार हमीद दलवाईंनीच प्रथम मांडला आणि त्यासाठीच त्यांनी 'शरीयत'प्रणीत विवाह व तलाकच्या कायद्यांवर हल्ला चढवला.

शेकडो वर्षांपासून पीडित मुस्लीम महिलांच्या प्रश्नाला व अन्यायाला त्यांनी वाचा फोडली बिगर-मुसलमानांना हमीदभाईंमुळेच मुस्लीम महिलांच्या या हृदयविदारक स्थितीची जाण येऊ शकली. मुस्लीम महिलांवर होणारा हा प्रचंड अन्याय पाहून ते किंकर्तव्यमूढ होऊन गेले. कारण, मुस्लीम पंडितांकडून गेली कित्येक वर्षे इस्लामने मुस्लीम स्त्रियांना कशी समता व हक्क दिले आहेत, हीच भ्रामक पोपटपंची ते ऐकत आले होते.

इतर धर्मियांसमोर इस्लामचे दोष दलवाईंनी दाखवण्यास सुरुवात केल्यामुळे व त्यांच्या धार्मिक श्रेष्ठत्वाच्या मानचिन्हालाच धक्का लावल्यामुळे मुसलमान भयंकर संतापले. एक मुसलमान माणूस इस्लामचे धार्मिक श्रेष्ठत्व व समतेची लक्तरे जाहीरपणे धूत होता, हे इतर मुस्लिमांच्या दृष्टीने महाभयंकर होते. इस्लामच्या तथाकथित श्रेष्ठत्वाच्या भ्रमाचा भोपळा हमीदभाईंनी फोडल्यानंतर ऐतिहासिक न्यूनगंडाने पछाडलेले मुसलमान त्यांना क्षमा करणे शक्यच नव्हते. आपले एकाकाळचे साम्राज्य व सत्ता गेल्याने ते केवळ धार्मिक श्रेष्ठत्वाचे भ्रम उरी बाळगून कसेबसे जगत होते, आणि त्यालाही दलवाईंनी हात घातला होता. मानसशास्त्रीयदृष्ट्या

हे अति भयानक होते. अकल्पित होते. हमीदभाईंच्या या पातकाला शिक्षाच नव्हती!

इतिहासाचा एक विचित्र योगायोग असा की, इस्लामच्या इतिहासात मुस्लीम स्त्रियांचा कैवार घेणारे त्यांना हक्क व प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न करणारे, महंमद पैगंबर व हमीद दलवाई या दोन व्यक्ती होऊन गेल्या. पैगंबराच्या या काळातील सुधारणा खरोखरच क्रांतिकारक होत्या. त्यांनी लग्न व तलाकसंबंधी केलेले नियम, स्त्रियांना दिलले हक्क ही पश्चिमी जगातीलच नव्हे, तर मध्ययुगातीलच क्रांतीकारक समाज सुधारणा होती. परंतु त्याचबरोबर 'कुराण'च्या कायद्याला व पैगंबराच्या सुधारणेला कायद्याच्या मर्यादा होत्या. त्यात अनेक पळवाटा व कच्चे धागे होते. त्याचा गैरफायदा घेऊन पुढील मुस्लीम पिढ्यांनी स्त्रीला पुन्हा भोगवस्तू बनवले. गेल्या तीनशे-चारशे वर्षांत तर मुस्लीम स्त्रियांना कोणी त्राता राहिला नाही. मुस्लीम स्त्रियांच्या उद्धारासाठी जीवाचे रान करणारे हमीदभाई या काळातील पहिले व खरे समाजसुधारक होते.

मुस्लीम परित्यक्त महिलेचे उदध्वस्त जीवन पाहून हा माणूस अक्षरशः वेदनेने तळमळला. तिच्या मुक्तीसाठी, उद्धारासाठी वणवण फिरला. तिच्या दुःखाने पेटलेल्या आगीत स्वतःला त्यांनी जाळून घेतले. धर्मातील ढिसूळ कालबाह्य रूढी तिला न्याय मिळवून देणार नसतील, तर त्या नष्ट केल्या पाहिजेत, 'कुराण' 'शरीयत'मधील एखादे वचन तिच्या मुक्तीआड येत असेल, तर तेही न मानलेले बरे. ईश्वरी कायदा अन्यायी असेल, तर तो ईश्वरी कायदा नव्हे आणि असा अन्यायी कायदा व ईश्वर फेकून देणेच योग्य, अशी जबरदस्त क्रांतिकारी भूमिका त्यांनी घेतली.

**पुस्तकी घोळ घातलेला नाही**

मानवी मूल्यांच्या कसोटीवर टिकू न शकणारा धर्म व ईश्वर कल्पना ताज्य मानली पाहिजे, असे हमीदभाईंनी निःसंदिग्धपणे सर्वांनाच बजावले. 'कुराण'चे उदारमतवादी बोटचेपे समर्थन करण्याचा, आत्मवंचना करणारा प्रयत्न त्यांनी कधीच केला नाही. महंमद पैगंबर शेवटी एक माणूसच होते आणि माणूस हा स्खलनशील असतो, म्हणून पैगंबरप्रणीत विचारामध्येच चूक असू शकते, असे त्यांनी मुसलमानांना ठणकावून सांगितले. सर्व मुस्लीम विचारवंतांच्या पुढे जाऊन 'कुराण' ही ईश्वराची निर्मिती आहे किंवा ते अनिर्मित आहे किंवा ती विशुद्ध ईश्वरवाणी आहे, असा पुस्तकी घोळ न घालता, ''कुराण' म्हणजे एक विशिष्ट कालखंडात एका प्रादेशिक जमातीत निर्माण झालेला कायदा होय व तो चूक असू शकतो, कालबाह्य होऊ शकतो. अपौरुषैय व चिरंतन सत्य असणे तर शक्यच नाही. जगात चिरंतन व न बदलणारे काहीच नाही, अशी क्रांतिकारी आणि सर्व इस्लामी जगताला हादरवू शकणारी भूमिका हमीदभाईंनी घेतली.

त्यांच्या प्रखर बुद्धिवादाला तोंड देता न आल्याने, इस्लामी पंडितांनी व सनातन्यांनी गुंडगिरीचे अस्त्र वापरून त्यांचे तोंड बंद करण्याचा प्रयत्न केला. पण अखिल मुस्लीम समाजाची अवहेलना सहन करून हा मानवतेचा थोर उपासक अचल राहिला. आपल्या अंतिम श्वासापर्यंत लढत राहिला. मानवी कल्याणासाठी आपल्या उभ्या आयुष्यात कधीही तडजोड केली नाही. जीवनाशी तडजोड नाही म्हणूनच मी म्हणतो- हमीद दलवाई म्हणजे मानवतेच्या प्रेरणांनी जागृत झालेला ज्वालामुखी होता.

हमीद दलवाई म्हणजे मूर्तिमंत बंडखोरी. हमीद दलवाई म्हणजे युगा-युगांच्या मरगळीनंतर बहरलेले सदाबहार चैतन्य. हमीद दलवाई म्हणजे धर्माच्या कालबाह्यतेला मानवतेने दिलेले आव्हान आणि क्रांतीचा परिपूर्ण आविष्कार. एका अर्थाने हमीद दलवाई हे साक्षात क्रांतितत्त्वच होते. मानवतेच्या जाणिवा अवरुद्ध करणाऱ्या रूढी, धर्म व परंपरा यांच्याविरुद्ध आयुष्यभर त्यांनी लढा दिला. त्यांची मानवतेची भूमिका वैश्विक होती.

भारतातील मुस्लीम प्रबोधनामुळे केवळ हिंदू-मुसलमान प्रश्न सुटेल, असे न मानता मुसलमान सर्वच प्रदेशांत रहात असल्याने, मुस्लीम प्रबोधनामुळे, धार्मिक संघर्ष सुटण्याचा मार्ग सापडू शकेल, असे त्यांनी मानले होते. त्यांनी समान नागरी कायद्याचा पुरस्कार करून विविध जमातींमध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्याची कल्पना मांडली. भारतातील जातिसंस्थेवर व अस्पृश्यतेवर प्रखर हल्ले चढवले. समतेला छेद देणारे हे धर्माचे, जातींचे व परंपरांचे तट नष्ट करणे, आपल्या जीवनाचे कार्य मानले. अल-अक्सा मशीद जळिताचे प्रकरण असो की, बांगलादेशातील राक्षसी हत्याकांड असो, सर्वत्र मानवी मूल्यांचा प्रचार केला. सर्व प्रकारच्या भेदरहित मुक्त समाजाचे स्वप्न पाहिले. समता व मानवता यांचे वेड घेणाऱ्या या अफलातून क्रांतिकारकाला, राजकीय पक्षदेखील सामाजिक ऐक्याच्या जाणीवेत अडसर व विषमता निर्माण करतात, असे वाटल्याने, त्यांनी सर्व प्रकारचे पक्षीय राजकारण सोडून विशुद्ध मानव्यावर आधारित सर्वांगीण क्रांतीची अपेक्षा केली.

### नास्तिकतेचा उगम

ईश्वरकल्पना मानवी मनात मुक्तीचा व सुरक्षिततेचा मानसशास्त्रीय आभास निर्माण करू शकत असेल, परंतु ईश्वरकल्पनेला धर्म व श्रद्धा यांच्या मर्यादा पडतात. परिणामी, मानवी मनच मुक्तपणे विचार करू शकत नाही. म्हणून नास्तिकतेचा पुरस्कार हमीद दलवाई करत होते. त्यांचे नास्तिकत्व ईश्वराचे अस्तित्व विज्ञानाच्या कसोटीतून सिद्ध होत नाही, म्हणून निर्माण झालेले नव्हते, तर ईश्वर कल्पनेची गुलामगिरी मानवी मनाला छेद देते, यावर आधारित होते. मनुष्य हा धर्मासाठी नसून, धर्म ही एक कालसापेक्ष समाजव्यवस्था असते. ती कालानुरूप बदलावी लागते. धर्मापेक्षा मानवी मूल्ये व प्रतिष्ठा महत्त्वाची असतात. ईश्वरकल्पनादेखील माणसामाणसांत श्रद्धेच्या भीती निर्माण करते, असे सांगणारे हमीदभाई हे जगातील पहिले मुस्लीम विचारवंत होत. मी जगातील म्हणतो, याचे कारण भारताबाहेर किंवा इतरत्र कोठेही एवढा मूलभूत विचार करणारा धाडसी मुसलमान निर्माण झाला नाही.

### हिमालयाप्रमाणे अचल

मागे 'अल-अजहर विद्यापीठा'तील एका प्राध्यापकाने रमजानचे उपवास सक्तीचे नसल्याचा दावा केला होता. त्यानंतर त्याच्यावर मोठा गहजब झाला; त्याच्यावर दडपण आले. परिणामी, आपण चुकीचे विधान केले होते, अशी जाहीर कबुली त्याला द्यावी लागली, परंतु हमीद दलवाई प्रचंड धिक्कार व अवहेलना यांच्या गदारोळात हसतसुखाने हिमालयाप्रमाणे अचल उभे राहिले.

कधीही माघार घेतली नाही व आग्रह सोडला नाही.

हमीद दलवाईंचे क्रांतिकारत्व एवढे दाहक होते की, जसे त्यांनी आपल्या जीवनाने परंपरेला धक्के दिले, तसेच आपल्या मृत्यूनेदेखील धर्म व रूढींना सुरूंग लावला. कोणत्याही प्रकारचा धार्मिक आचार व संस्कार आपल्या शवावर केला जाऊ नये, तसेच इस्लामी परंपरेच्या पराकोटीच्याविरुद्ध जाऊन आपल्या शवाचे दहन केले जावे, असे सांगणारे हमीद दलवाई जसे एकमेव मुसलमान होते, तसेच कदाचित एकमेव नास्तिक असतील. त्यांची विज्ञाननिष्ठा व नास्तिकता केवळ जीवनापुरतीच मर्यादित नव्हती, तर ती मृत्यूनंतरही अविचल राहिली. असा नखशिखान्त पेटलेला माणूस युगायुगांतून एकदाच निर्माण होत असतो.

**सर्वांचे झालेले हमीदभाई**

हा माणूस योग्याप्रमाणे जबरदस्त सामर्थ्यशाली होता व तसाच पराकोटीचा विनम्र होता. आपल्या मृत्यूनंतर कोणतेही अवडंबर माजवले जाऊ नये, स्मारक नको, भाषणे नको, शोकसभा नको. मला सहजपणे एखाद्या उल्केसारखे निसर्गात विलीन होऊ द्या, असे म्हणणारा हा थोर पुरुष एक महान योगीपुरुष होता. त्यांच्या निधनाने प्रतिगामी शक्तींना खूप आनंद झाला! अमरावतीसारख्या ठिकाणी पेढेही वाटण्यात आले!! सोलापूरसारख्या शहरातही आनंद व्यक्त केला गेला. परंतु मृत्यू हा कोणालाच चुकत नसतो. मृत्यू ही एक नैसर्गिक घटना असते. माणूस मरतो परंतु विचार हे जिवंत असतात. हमीद दलवाईनी पेटवलेली विचारांची क्रांतिशलाका ही जिवंत आहे, तिला मृत्यू नाही, याचा विसर प्रतिगाम्यांना पडला.

प्रचंड आत्मविश्वास व ज्वालामुखीसारखा दाहक ध्येयवाद यांनीच समाज बदलत असतो. हमीद दलवाई हे क्रांतीचे सूत्र होते. मुस्लीम प्रबोधनाची गंगोत्री होते. त्यांचा विचार मंदगतीने फैलावत आहे. प्रबोधनाच्या गंगोत्रीचा उदय झाला आहे. भारतात, जोपर्यंत ज्ञान, विज्ञाननिष्ठा, धर्मनिरपेक्षता व हिंदू-मुस्लीम ऐक्य यांचे प्रतिपादन करणारे मुस्लीम तरुण पुढे येत आहेत, तोपर्यंत हमीद आमच्यात राहणारच आहेत. विचाराची मशाल घेऊन निघालेला मानवतेचा पाईक असा संपत नसतो. उलट हमीद दलवाई आता खऱ्या अर्थाने सर्वांचे झाले आहेत. ते आता केवळ मुस्लिमांचे सुधारक राहिलेले नाहीत.

*(साप्ताहिक साधना, १८ जून १९७७, पुणे, पृष्ठ क्र. ७ ते ११)*

*(प्रा. फक्रूद्दिन बेन्नूर : हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाशी आरंभकाळात जोडले गेलेले मुस्लीम विचारवंत, लेखक आणि कार्यकर्ते आहेत. त्यांनी लातूर व सोलापूर येथे राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन केले. नंतरच्या काळात मुस्लीम ओबीसी संघटन, अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषद यांच्या स्थापनेत मोलाचा वाटा उचलला. तसेच परिवर्तनवादी चळवळीतील एक आधारस्तंभ झाले.)*

## ६.४ अँग्री यंग मॅन: हमीद दलवाई – डॉ. कुमार सप्तर्षी

"मूळचा लोहियावादी असूनही प्रगल्भ झाल्यानंतर हमीदने त्यांच्या अनेक धोरणांचा व भूमिकांचा प्रतिवाद केला. तो निरीश्वरवादी बनला होता. तथापी महंमद पैगंबराबद्दल आणि त्यांच्या थोर सामाजिक कार्याबद्दल त्याला नितांत आदर होता. आपली बुद्धी वापरून धर्मासकट सर्व गोष्टींची चिकित्सा करणे, हा तर पैगंबराचाच संदेश आहे, असे तो मानायचा. त्याला अवघे ४४ वर्षांचे आयुष्य लाभले. एवढ्या अल्प आयुष्यात त्याने आपला सेक्युलर राष्ट्रवादाचा महान संदेश मागे ठेवला. त्याची जीवन कहाणी ऐकून आपण थक्क होतो. स्वत:ला ना हिंदू, ना मुसलमान मानतो. फक्त आधुनिक भारतीय नागरिक म्हणून विचार करू लागतो. अशा अँग्री यंग मॅन हमीद दलवाई विषयी..."

सन १९६७ सालातील गोष्ट! समाजवादी युवजन सभा ही संयुक्त सोशलिस्ट पार्टीची युवक आघाडी. त्यांच्यातर्फे कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा गडावर तीन दिवसांचे कार्यकर्ता शिबिर होते. त्यावेळी युक्रांदची स्थापना झालेली नव्हती. पुण्यात आमचा २०० तरुणांचा 'यूथ ऑर्गनायझेशन' नावाचा एक सक्रिय गट होता. मला व अनिल अवचटला या शिबिरासाठी निमंत्रण होते. त्या शिबिरात बापू काळदाते, बाबा आढाव, भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, विनायकराव कुलकर्णी आणि काही स्थानिक समाजवादी नेते मार्गदर्शन

करणार होते. मी व अनिल शिबिरात सहभागी झालो. तिथे हमीद दलवाई आलेला. हमीद तेव्हा पस्तिशीतला तरुण होता. कशी कोणास ठाऊक, पण हमीदची व आमची तिथे गट्टी जमली. शिबिरात आम्ही त्रिकूट म्हणूनच वावरत होतो. आमचे सूर जुळण्याचे मुख्य कारण म्हणजे हमीदचा गोष्टीवेल्हाळपणा! तो मोकळा ढाकळा वागायचा. बिनधास्त बोलायचा. तेही आत्मविश्वासाने. त्याच्याकडे किश्श्यांचे साक्षात भांडार होते. त्याला फिल्मी संगीताचा शौक होता. किस्से सांगताना त्याच्या चेहऱ्यावर जिवंत हास्य झळकायचे. मिष्कील अन हसरे डोळे मोठे होत लकाकायचे. किस्सा सांगून झाल्यावर शेवटी ऐकणाऱ्यांमध्ये हास्याचा कल्लोळ व्हायचा. तेव्हा खूश होऊन जीभ बाहेर काढून तो टाळी द्यायचा. तो रसिक होताच, त्याचबरोबर कलाकारही होता. कोणता राजकीय पुढारी मेल्यानंतर कोणत्या महिला सती जातील, याबद्दल अंदाज वर्तवायचा. तो माझ्यापेक्षा नऊ वर्षांनी मोठा. तरीही समवयस्कांसारखी आमची दोस्ती जमली. त्या शिबिरानंतर हमीदला सांगलीत काही काम होते. माझा कॉलेजातला मित्र किशोर मगदूम तिथल्या हॉस्पीटलमध्ये इंटर्नशिप करीत होता. तो आमच्या मुक्कामाची ऐनवेळी सोय करू शकला असता, म्हणून हमीदबरोबर सांगलीला जायचे ठरविले. त्या प्रवासात नि मुक्कामात आमच्या पोटभर गप्पा झाल्या.

समाजवादी पक्षात प्रवेश न करता, लवकरच समाजवादी युवकांची स्वतंत्र संघटना स्थापन करणार आहोत, हा आमचा विचार त्याला सांगितला. ही कल्पना त्याला फार भावली. तो संसोपात कार्यकर्ता म्हणून काम करीत असला, तरी महाराष्ट्रातील समाजवादी नेत्यांबद्दल त्याची भावना फारशी सकारात्मक वा अनुकूल नव्हती. तो व आम्ही डॉ. लोहियाप्रेमी होतो.

त्यामुळे आमची कुंडली जमली. जिंदादिली हा त्याचा गुण मला फार भावला. पुढे वारंवार आमच्या भेटी होत, गप्पा होत. त्याच्याकडून अफाट किस्से ऐकायला मिळत.

दलवाई मंडळी चिपळूण परिसरातले जमीनदार, खोत. मिरजोळी हे त्याचे गाव. गावात मुस्लीम बहुसंख्याक. त्यांची शेती कुळवाडी कसायचे. त्यांचे कसे शोषण होते हमीद त्यांना समजावून द्यायचा. गावात दुकाने दलवाईंच्याच मालकीची. रेशन कार्डावर मिळणारे रॉकेल ते कुळवाड्यांना देत नसत. रॉकेलचा साठा करून ठेवत. नंतर काळ्या बाजारात ते जास्त भावाने विकत. हमीदने कुळवाडी तरुणांना फितवून एके रात्री एका दलवाईचे त्याने लपविलेले रॉकेलचे साठे पळविले. मिरजोळी गावात तो एकटाच सेक्युलर होता. खोतांपैकी असूनही तो कुळवाड्यांमध्ये जास्त मिसळायचा, त्यांच्यामध्ये रमायचा. तो कुळवाड्यांविषयी सहानुभुती बाळगायचा. त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करायचा.

हमीदचा जन्म १९३२ सालातला म्हणजे ब्रिटिशांच्या सत्तेच्या कालखंडातला. त्याच काळात देशात स्वातंत्र्य संग्रामाचे अखेरचे पर्व चालू होते. त्याचा जबरदस्त परिणाम त्याच्या मनावर होत होता. स्वाभाविकच त्यांचा पिंड समाजवादी व निष्ठावंत राष्ट्रवादी बनला. 'राष्ट्र सेवा दल' या संघटनेत त्याने किशोर वयात प्रवेश केला. त्यामुळे राष्ट्रवादाचा जातिधर्मनिरपेक्ष आशय त्याच्या मनात पक्का झाला.

हमीदच्या जाणत्या वयात, त्याच्या भोवतालच्या मुस्लीम समाजात पाकिस्तानचे वारे वाहत होते. बॅ. मोहमंद अली जिना यांचे नेतृत्व मुसलमानांत लोकप्रिय होत होते. घराघरांत याबाबत चर्चा चालत. मुसलमानांचे सामूहिक मन कट्टर धर्मनिष्ठ! धर्माच्या पायावर होणाऱ्या देशाच्या फाळणीला व इस्लाम धर्माच्या अधिष्ठानावर निर्माण होऊ घातलेल्या पाकिस्तानला ते अनुकूलता दर्शवित. त्यांचे मन धर्मभावनेला इतके घट्ट चिकटलेले असते, की त्यांना अन्य बाबी गौण वाटतात. कट्टर हिंदुत्व आणि कट्टर इस्लामवाद यांच्यामध्ये प्रवृत्ती सारखीच. दोन्ही विचार प्रवाहांना राष्ट्रापेक्षा धर्म श्रेष्ठ असे वाटायचे. एका सभेत गावकरी 'पाकिस्तान झिंदाबाद'चे नारे देत होते. त्यावेळी हमीदने त्याच्या एका मित्रासह 'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा दिल्या. लोक दोघांना मारायला धावले. हमीद पळून गेला. पंधरा दिवस गावातून गायब झाला म्हणून वाचला. त्याच्या मित्राला मात्र गावकऱ्यांकडून बेदम चोप मिळाला.

मिरजोळी हे गाव खोती व्यवस्थेच्या वर्चस्वाचं! फरक एवढाच की तिथे खोत मुसलमान आहेत. देशावरचे पाटील आणि कोकणातील खोत यांच्यामध्ये काहीही गुणात्मक फरक नाही. गावातील बहुसंख्य शेतजमिनी खोतांच्या मालकीच्या. वतनदार मंडळी आपली शेती कधी स्वकष्टाने पिकवीत नसतात.

ते मजुरांकरवी वाटा पद्धतीने शेती करवून घेतात. खोत मजुरांना गुलामासारखी वागणूक देत. त्यांचे आर्थिक शोषण करीत. प्राचीन परंपरेप्रमाणे शूद्रांनी सवर्णांची सेवा करणे हाच आपला जीवनहेतू मानला पाहिजे अशी वरिष्ठ जातीची धारणा असे. 'शूद्र वर्ग' म्हणजे ज्याला जेमतेम जगण्यापुरता श्रमाचा मोबदला मिळतो तो वर्ग. त्यांच्याकडे कधीही संचित शिल्लक असता कामा नये हा समाजाचा दंडक आकस्मिक खर्चासाठी त्यांना वेळोवेळी कर्ज काढावे लागायचे. कर्ज

देणारा सावकार पूर्वाश्रमीचा सवर्णांपैकीच असणार. मिरजोळीत सावकारही मुसलमान.

मिरजोळीच्या खोतांच्या पूर्वजांनी इस्लामचा स्वीकार केला. पूर्वाश्रमीचे ते सवर्ण हिंदू धर्मांतर केल्यामुळे त्यांच्यामध्ये इस्लाममधील मानवता, बंधुता, समानता या मूल्यांनी मात्र प्रवेश केला नाही. ते जुन्या परंपरेनुसार वर्चस्ववादीच राहिले. विषमता, जातीय उतरंड, भेदाभेद ही हिंदू समाजरचनेतील ओझी सोबत घेऊनच त्यांनी नव्या धर्मात प्रवेश केला. धर्मांतराने त्यांची मूळ मानसिकता बदलली नाही.

गावकऱ्यांप्रमाणेच मागासलेपणा, पारंपरिक विचार, अंधश्रद्धा यांचा प्रभाव हमीदच्या कुटुंबातही होता. तो जसा राष्ट्रीय विचाराने प्रगल्भ होत गेला, तसे त्याचे मन भोवतालच्या परिस्थितीबद्दल बंड करू लागले. वडिलांनी चार विवाह केले. पहिल्या पत्नीला मूल होत नव्हते. तिनेच पतीसाठी दुसरी पत्नी शोधली. हमीदची जन्मदात्री आई दोन क्रमांकाची. तो दोन वर्षांचा असतानाच ती क्षयरोगाने वारली. वडिलांनी तिसरे लग्न केले. ती काही मुलांना जन्म देऊन वारली. हमीद सर्वात थोरला मुलगा. कुटुंबात सावत्र भावंडे. कुणाची साथ नसल्याने तो एकटा बंडखोरी करू शकत नव्हता. घुसमट वाढत होती.

मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर तो मुंबईला गेला. वयाच्या १४ व्या वर्षी. तिथे अर्थार्जनाची, राहण्याची नीट सोय होईना. वडिलांच्या चौथ्या विवाहाला त्याने विरोध केला. त्यामुळे गावी परतायचे नाही हे ठाम होते. मुंबईत त्याला क्षयरोगाने घेरले. त्या आजाराच्या काळात त्याने मराठी साहित्य सृष्टीत प्रवेश केला. तो कथा लिहू लागला. त्याच्या कथा दर्जेदार मासिकातून, त्यांच्या दिवाळी विशेषांकात प्रकाशित होऊ लागल्या. त्याची 'इंधन' ही कादंबरी गाजली. तिला महाराष्ट्र सरकारचे पारितोषक मिळाले. सामाजिक मान्यता मिळाल्याने त्याची घुसमट कमी होऊ लागली. मराठी साहित्य विश्वाला तोपावेतो ग्रामीण भागातील मराठी मुस्लिमांच्या अंतरंगाचे दर्शन झाले नव्हते. हमीदच्या लेखणीत सच्चेपणा होता. त्याच्या कथा-कादंबऱ्यातून ग्रामीण मुसलमानांची मानसिकता व्यक्त होत होती. अनोळखी प्रांतात त्याच्या लेखणीने विहार केला नाही. तो जन्माने मुसलमान, वृत्तीने राष्ट्रीय आणि संस्कृतीने मराठी बनला होता. त्याचे मित्रांचे वर्तुळ मोठे होते. मराठी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते.

काही काळ भणंग अवस्थेत काढल्यानंतर हमीदला आचार्य अत्र्यांच्या दैनिक 'मराठा' मध्ये पत्रकार म्हणून नोकरी मिळाली. अत्र्यांसारख्या मराठी भाषाप्रभूच्या सहवासामुळे त्याची मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. अत्र्यांचा तो लाडका पत्रकार बनला. पगार कमी असला, तरी या नोकरीमुळे त्याला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. तोपावेतो त्याला आपल्या आयुष्याचे प्रयोजन उमगू लागले होते. एकदा मनात आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित झाले, की अनुरूप असा जीवनसाथी शोधणे खरोखर खूप अवघड असते. लग्न केल्यामुळे आयुष्याला मानसिक स्थैर्य लाभते हे तर कळते. पण संसार मांडल्यानंतर अधिकाधिक स्थैर्याच्या मागणीला सामोरे जावे लागेल, ही भीती मनात असते. स्थैर्याच्या अतिरेकी मागणीमुळे अखेरीस ध्येयाचा बळी द्यावा लागतो, हे त्याला ठाऊक होते.

हमीदचे नशीब त्याच्या मदतीला आले. मेहेरून्निसा ही तरूणी केंद्र सरकारच्या खादी

कमिशनच्या ऑफिसमध्ये पर्मनंट नोकरी करीत होती. तिला पगार चांगला होता. तिची पार्श्वभूमी शहरी आणि सनातनी मुस्लीम कुटुंबाची. पण प्रेमाची जादू और असते. परिचयानंतर मेहेरून्निसा हमीदच्या प्रेमात पडली. तिने हमीदचे विचार मनापासून समजावून घेतले. अंतःकरणात साठवून ठेवले. तिच्या माहेरचे लोक नंतर पाकिस्तानात गेले. केवळ हमीदचे विचार स्वीकारले नाहीत, तर त्याचे जीवनध्येय तिने आपले मानले. मेहेरून्निसाने हमीदशी विवाह केला. त्याला प्रेम अन स्थैर्य दोन्ही मिळाले. कालांतराने हमीदने दै. 'मराठा'तील नोकरी सोडली. मुसलमानांना पुरोगामी व राष्ट्रवादी बनविण्याच्या ध्यासाने तो अहोरात्र काम करू लागला. घरात दोन मुली जन्माला आल्या. मोठी रूबिना आणि धाकटी इला! दोघींच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली चंदावरकर यांनी. चंदावरकर प्रार्थना समाजाचे पुढारी. त्यांना सर्वजण 'दादा' म्हणत. त्यांचा स्वभाव फार कनवाळू. पत्नीची त्यांना साथ होती. सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल त्यांना काळजी वाटे. त्यांच्या शिक्षणसंस्थेचे लोणावळ्याला रेसिडेन्शिअल स्कूल होते. त्यांनी रूबिना व इला या दोघींना आजोबाचे वात्सल्य देऊन आपल्या शाळेत व वसतिगृहात लहानाचे मोठे केले. हमीद तसा कुटुंबवत्सल! मुलींना वारंवार भेटायचा. खूप प्रेम द्यायचा. भाभी मुलींना शिस्त लावण्याचा जमेल तसा प्रयत्न करायच्या. हमीदची भटकंती चालूच होती. कौटुंबिक जबाबदारी भाभी सांभाळच्या. त्या मिरजोळीला जाऊन हमीदच्या कुटुंबात राहायच्या. त्या घरात ही सूनबाई लाडकी बनली होती.

राजकारणापासून हमीद कधीच दूर नव्हता. मुंबईत तो संयुक्त समाजवादी पक्षाचे काम करायचा. त्या काळात त्याच्यावर डॉ. राम मनोहर लोहिया व जयप्रकाश नारायण यांचा विशेष प्रभाव होता. जसा तो चिंतनाने, देशपरदेशात फिरल्यामुळे आणि सामाजिक कार्यात उतरून अनुभवाने समृद्ध होऊ लागला, तसा पोलिटिकली करेक्टही होत होता. स्वतः कट्टर समाजवादी असूनही समाजवादी नेते मुस्लीमविषयक धोरणात कसे चुकत गेले हे तो आपल्या भाषणातून स्पष्टपणे मांडायचा. त्याची मांडणी चित्तवेधक असे. वैचारिक धक्के देण्याची वक्तृत्व कला तो डॉ. लोहियांकडून शिकला असावा.

हा काळ होता १९६५ ते ७० चा. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फक्त वीस वर्षे लोटली होती. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. भारत चीनला रोखू शकला नव्हता. १९६४ साली पं. जवाहरलाल नेहरूंचे निधन झाले. १९६५ साली भारत-पाक युद्ध झाले. पाकिस्तानबरोबरचे युद्ध ताश्कंद करार होऊन थांबले. त्याच मध्यरात्री पं. नेहरूनंतरचे देशाचे पहिले पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे ताश्कंदला हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. सारा देश हळहळला. त्यांच्यानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. सत्तेच्या व्यवहारात त्या अनुभवी नव्हत्या. त्या नवख्या असल्याने प्रारंभीच्या काळात त्यांचा फारसा प्रभाव नव्हता. देशातले वातावरण निराशेचे होते. दोन युद्धांमुळे महागाई भडकलेली. भ्रष्टाचार वाढत होता. हा काळ काँग्रेसविषयी भ्रमनिरासाचा होता.

स्वातंत्र्योत्तर काळात वाढलेली पहिली पिढी निराश व संतप्त होती. एकूणच प्रस्थापितांविषयी त्या पिढीच्या मनात प्रचंड अनादर भरलेला. अशा वातावरणात अनेक क्षेत्रांत 'अँग्री यंग मॅन'

उदयाला आले. हमीद दलवाई हा त्यापैकी एक! संतप्त तरूणांचे प्रतिबिंब हिंदी चित्रपटांमध्ये अभिताभ बच्चनच्या रूपाने झळकत होते. आधीचा रोमँटिक हिरो राजेश खन्ना मागे पडला होता.

देशाच्या फाळणीनंतर सेक्युलर भारतात धर्मवादी पाकिस्तानपेक्षा मुसलमान अधिक संख्येने राहिले. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर त्यांच्यामध्ये काहीशी अपराधीपणाची भावना होती. त्यांनी सेक्युलर काँग्रेस पक्षाला सरसकट पाठिंबा देऊन सुरक्षितता मिळविली. मात्र एक धार्मिक समूह म्हणून मुसलमान स्वतः कधीच सेक्युलर बनला नाही, हे वास्तव होते. आपल्याला भारतामध्ये अल्पसंख्यांक म्हणून जगावे लागते हेच त्यांचे अंतर्यामीचे दुःख होते. अशा काळात त्यांनी स्वतःभोवती धर्माचे भक्कम कुंपण घातले. सार्वजनिक जीवनात त्यांचा सहभाग कमी होऊ लागला. ते अलग वस्त्या करून राहू लागले. इस्लामध्ये 'दारूल इस्लाम आणि दारूल हर्ब' अशी संकल्पना आहे. थोडक्यात, मुसलमानी सत्ता असताना कसे वागावे आणि अन्य धर्मियांची सत्ता असताना इस्लामच्या अनुयायांनी आपल्या वर्तनात कसा फरक करावा हे सांगणारी ती संकल्पना आहे.

वास्तविक, पाकिस्तान आपल्यामुळे निर्माण झाले असे मानून मुसलमानांनी अपराधी जाणीव बाळगायचे कारण नव्हते. ब्रिटिशांचा पाठिंब्यावर पोसलेले जमातवादी पुढारी फाळणीला जबाबदार होते. अनेक मुस्लीम संघटनांनी व नेत्यांनी देशाच्या फाळणीला व पाकिस्तान निर्मितीला जोरदार विरोध केला होता. सरहद्द प्रांतात गांधीवादी अब्दुल गफार खान, सिंध प्रांताचे मुख्यमंत्री खुदाबक्ष आणि पंजाब प्रांताचे युनियनस्ट पक्षाचे मुख्यमंत्री सिकंदर हयातखान (जे हिंदू व शीख यांच्या संयुक्त मंत्रिमंडळाचे नेते होते). हयातखान शेतकरी वर्गाचे नेते होते. शेतकऱ्यांमध्ये सर्वधर्मीय असतात, हा त्यांचा दावा होता.

ही मंडळी बॅ. जिना व मुस्लीम लीगला कडाडून विरोध करत होती. दुर्दैवाने, त्यांची पद्धतशीर विल्हेवाट लावण्यात आली. खुदाबक्ष यांना मुख्यमंत्री पदावरून हटविण्यात आले. त्यांच्या मंत्रिमंडळाच्या जागी सिंध प्रांतात दोन धर्मवादी पक्षांचे, म्हणजे हिंदू महासभा व मुस्लीम लीग यांचे संयुक्त सरकार सत्तेवर आले. त्या सरकारने सिंधच्या विधानसभेत बहुमताने फाळणीला पाठिंबा देणारा आणि पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा ठराव संमत केला. नंतर खुदाबक्ष यांचा खून करण्यात आला. एक मात्र खरे आहे, की नंतर भारताचे नागरिक झालेल्या मुसलमानांनी त्यावेळी रस्त्यावर उतरून, मोर्चे काढून, जिना यांचा व देशाच्या फाळणीचा जाहीरपणे तीव्र निषेध केला नव्हता. मुस्लीम समाज स्वातंत्र्यापूर्वी देशात एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के होता. आज तो १६ टक्के आहे. तो सेक्युलर भारतात नागरिक म्हणून गेली ७५ वर्षे राहतोय. पण तो स्वतः मात्र भारतीय राज्यघटनेतील सेक्युलरिझम हे 'जीवन मूल्य' म्हणून स्वीकारत नाही. धर्मकोशात राहून जगण्यातच तो धन्यता मानतो. हे समजून घेतल्यानंतरच हमीद दलवाई काय सांगत होता आणि यच्चयावत मुस्लीम त्याचा का राग करीत होते, या कोड्याचा उलगडा होऊ शकतो.

अ. भि. शहा हे हमीदचे घनिष्ट मित्र. हमीदचे आणखी एक घनिष्ट व ज्येष्ठ मित्र वसंतराव नगरकर. ते एसेम जोशींचे भाचे. पोलीस खात्यात ते वरिष्ठ पदावर होते. त्यांचा हिंदू-मुस्लीम समस्येबाबत सखोल अभ्यास होता. हमीदबरोबर त्यांचा नित्य संवाद व पत्रव्यवहार होत असे.

मधल्या काळात, नोव्हेंबर १९६७ मध्ये युक्रांदची स्थापना झाली. १९६९ सालात युक्रांदने हमीद दलवाईची लागोपाठ तीन व्याख्यानांची सलग मालिका पुण्यात आयोजित करण्याचे ठरविले. अर्थातच पुण्यात त्याच्या भोजन व निवासाची सोय करायची जबाबदारी संघटनेवर होती. रोजच्या व्याख्यानानंतर दुसऱ्या दिवशी लोकांच्या भेटीगाठी, चर्चा होणार. तीन दिवसांच्या मंथनामधून काहीतरी ठोस निर्माण व्हावे अशी हमीदची इच्छा होती. एवढ्या खर्चासाठी युक्रांदकडे व्यवस्था नव्हती. तरूणांचे म्हणजे स्वयंसेवकांचे बळ मात्र युक्रांदकडे भरपूर होते. सारे नियोजन उधारीवर करायचे ठरले. व्याख्यानाला तिकीट ठेवायचे आणि त्या पैशातून उधारी मिटवायची असा युक्रांदने विचार केला.

तिकीट लावून व्याख्याने करण्याची पुण्यात प्रथा नव्हती. अपवाद होता तो फक्त वसंत व्याख्यानमालेचा. ती व्याख्यानमाला महिनाभर चालायची. ती टिळक रोडवरील टिळक स्मारक मंदिरात व्हायची. आम्ही देखील तीच वास्तू या कार्यक्रमासाठी नक्की केली. टिळक स्मारक मंदिराचे तीन दिवसांचे आगाऊ बुकींग केले.

त्या काळात टिळक स्मारक मंदिर म्हणजे आजच्यासारखी मोठी वास्तू नव्हती. इमारत फक्त एक मजली. एक मोठा हॉल होता. इमारतीसमोर मोकळे आवार मात्र भरपूर होते. लोकमान्य आणि अन्य थोर नेत्यांच्या व्याख्यानांनी पुनीत झालेल्या त्या वास्तूला ऐतिहासिक परंपरा, पावित्र्य होते. सभागृहात खुर्चीवर बसणाऱ्यांना दररोज आठ आणे आणि मोकळ्या आवारात जमिनीवर बसून व्याख्यान ऐकणाऱ्यांना चार आणे असा या व्याख्यान मालिकेचा दर होता. आम्ही कार्यक्रमाची जोरदार जाहिरात केली. त्यासाठी हजारो हँडबिल्स वाटली. कार्यकर्त्यांनी पांढऱ्या चुन्याने भिंती रंगविल्या. कमी खर्चात निवडणुकीसारखे वातावरण निर्माण केले. कॉलेजात, रस्त्यांवर, दुकानांत पत्रके वाटली. वृत्तपत्रांमध्ये बातम्या छापून आणल्या. संघटनेजवळ स्वयंसेवकांची संख्या मोठी असल्याने हे सारे शक्य झाले. डेक्कन जिमखान्यावरील सुप्रसिद्ध 'हॉटेल पूनम' मध्ये हमीदच्या भोजनाची, निवासाची व दिवसभरात भेटायला येणाऱ्या पाव्हण्यांच्या चहापानाची सोय केली.

आमची तयारी, उदंड उत्साह पाहून पूनम हॉटेलचे मालक निळूभाऊ लिमये खूश झाले. तसे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. नंतर ते अगदी कमी शब्दात बोलले, "तुमचं सगळं मान्य आहे. पण त्यासाठी माझी एक अट तुम्हांला मान्य करावी लागेल. यानंतर हमीदसह पुढील काळात युक्रांदचे जेवढे पाहुणे पुण्यात येतील, ते सारे पूनममध्येच उतरले पाहिजेत. त्यांचे व त्यांच्या बरोबरच्या सर्व पाव्हण्यांचे भोजन व इतर गोष्टींची मोफत सेवा पूनममध्ये मिळेल. तुम्ही फक्त असेच जोमाने व चिकाटीने काम करीत रहा." आम्ही त्यांना धन्यवाद देऊन परतलो. सारा ताण संपला होता.

हमीदने पहिल्या दिवशी स्वातंत्र्यपूर्वकाळातील मुस्लीमांचे राजकारण या विषयावर सविस्तर दोन तास व्याख्यान दिले. त्यात अलीगढ विद्यापीठाची स्थापना, बॅ. जिनांचा द्विराष्ट्रवाद, त्यांचा अहंकार व हेकेखोरपणा, ब्रिटिशांची चालबाजी, शेवटी देशाची फाळणी हे विषय त्याने सविस्तरपणे व सोप्या भाषेत अत्यंत रोचकपणे सांगितले. दुसऱ्या दिवशीच्या व्याख्यानात

स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लिमांचे राजकारण हा विषय होता. शेवटच्या दिवशी आगामी काळातील राजकीय अंदाज यावर दीर्घ व्याख्यान दिले. श्रोत्यांची खचाखच गर्दी होती. नवीन तर्कशुद्ध मांडणी, धक्कादायक माहिती, अनेक संदर्भ यामुळे श्रोते संगीत मैफिलीत रंगावेत तसे आनंदात डुंबले होते. ही व्याख्यानमाला आयोजित केल्याबद्दल सर्वजण युक्रांदचे कौतुक करीत होते. त्या व्याख्यानानंतर महाराष्ट्रात हमीदचा एक 'नायक' म्हणून उदय झाला. त्याचबरोबर सुजाण पुणेकरांमध्ये युक्रांदचा पाया विस्तारला. तिकीट विक्रीतून जमा झालेले पैसे सारा खर्च भागून शिल्लक राहिल्यामुळे आम्ही हमीदला भरघोस मानधन व रेल्वेच्या फर्स्टक्लासच्या प्रवासाचे पैसे दिले. या यशाने त्याचा व आमचा उत्साह वाढला.

हमीदमुळे युक्रांदला नवीन दृष्टी मिळाली. भारतीय जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला आणि नव्या राष्ट्रबांधणीला हिंदूराष्ट्रवादी मंडळी अडथळे निर्माण करणार, याबद्दल आमची आधीपासूनच खात्री होती. परंतु भारतीय राष्ट्रवादाने स्वीकारलेली, स्वातंत्र्य लढ्यातून सिद्ध झालेली आणि राज्यघटनेत विशद केलेली मूल्ये, म्हणजे मानवतावाद, व्यक्तिस्वातंत्र्य, नागरिकांमधील बंधुता, सर्वांना समान न्याय व लोकशाही प्रणालीची मूल्ये या गोष्टी सार्वत्रिक पातळीवर रूजवल्या नाहीत, तर सर्वच समाज घटकांमधील परंपरावाद आधुनिक भारताच्या राष्ट्रबांधणीमध्ये अडथळा बनू शकेल, हे कळले.

मुस्लीम समाज धर्मवादी आहे, पण जसजसा हिंदू समाज धर्मवादी राजकारण जोमाने करू लागेल, तसतसा मुसलमान अधिकाधिक कट्टर धर्मवादी व परंपरावादी बनेल, ही दृष्टी हमीदकडून मिळाली. मुस्लिमांमध्ये उदारमतवादी विचार प्रवाह प्रबळ झाले पाहिजेत. हिंदू वा मुस्लीम या दोन समाजातील कट्टर धार्मिकतावाद एकमेकांना पोषक ठरतो. म्हणून मुस्लिमांमध्ये देखील उदारमतवाद वाढीस लागला पाहिजे. बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांकांच्या समुदायांमध्ये एकाच वेळी उदारमतवादाचे प्रवाह वृद्धिंगत झाल्यास हिंदुत्ववाद, कडवा इस्लामवाद या दोन्हींना चोख उत्तर मिळेल आणि भारतातील जातिधर्मनिरपेक्षतावाद अबाधित राहील. राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित होईल. जातीय दंगे टाळता येतील.

याशिवाय सर्वच धार्मिक समूहांतील भारतीय स्त्रियांची गुलामी नष्ट व्हायला हवी, असा हमीदचा आग्रह होता. भारतीय राज्यघटना कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा श्रेष्ठ आहे हे सर्वच भारतीय नागरिकांनी मनोमन मान्य करायला हवे. शांततामय मार्गाने अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्यास आपल्या राज्यघटनेने मुभा दिलेली आहे. त्यामुळेच स्त्री-मुक्तीच्या चळवळींना गेल्या काही वर्षांत बहर आला. ज्यांना जुनी समाजरचना परत आणायची आहे ते चातुर्वर्ण्याचे व स्त्रियांच्या गुलामगिरीचे समर्थन करतात. मुस्लिमांची भारत सरकारकडून सेक्युलर वर्तनाची अपेक्षा असते. पण सेक्युलरिझमचा त्यांनी लावलेला अर्थ मर्यादित असतो. सरकारने मुस्लीम समाजात ढवळाढवळ करू नये अशी त्यांची अपेक्षा असते. प्रत्येकाचे धर्मस्वातंत्र्य राज्यघटनेने अबाधित ठेवले आहे, मुस्लिमांसाठी वेगळा 'पसर्नल लॉ' आहे. वास्तविक मुस्लीम पसर्नल लॉ म्हणजे शरियतचा कायदा नव्हे. याचा अर्थ मुस्लीम व्यक्तींवर, विशेषतः महिलांवर होणारा अन्याय शासनाने डोळे मिटून व हात बांधून पाहावा अशी त्यांची अपेक्षा असते. सामाजिक स्तरावर

कोणत्याही धर्माच्या भारतीय व्यक्तीला, नागरिकाला न्याय मिळालाच पाहिजे या धारणेपोटी संघर्ष करणाऱ्या मुस्लीम महिलांच्यामागे सेक्युलर शासनाने भक्कमपणे उभे राहिले पाहिजे. ही दृष्टि आमच्यासाठी नवी होती.

हिंदुत्ववादी मंडळींच्या सततच्या द्वेषमूलक कारवायांमुळे मुस्लीम समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत राहते. गोहत्या बंदी, गोरक्षक दल, मुस्लीम नागरिकांवरील हिंदुत्वाद्यांच्या झुंडीचे हल्ले, लव्ह जिहाद, घरवापसी, पाकिस्तानात चालते व्हा यासारख्या घोषणा यामुळे मुसलमान कुटुंबे कायम चिंताग्रस्त असतात. हरिद्वार येथे झालेल्या हिंदू धर्म परिषदेत (पवित्र) भगव्या वेषधारकांनी मुस्लिमांच्या कत्तली करण्याचा संकल्प केला. या गोष्टींनी स्वाभाविकच मुस्लीम भयभीत होतात. मग ते अलग वस्ती करून, अधिक कट्टरपणे धर्माला चिकटून राहतात. जीवनातील सर्व प्रश्नांची सोडवणूक आपल्या पवित्र धर्मात आहे, असे ते मानू लागतात. इस्लाममध्ये सारे जग सामावलेले आहे असे त्यांना मौलवी नित्य सांगत असतात. त्यांना धर्मश्रद्धा एवढाच मानसिक आधार उरतो.

भारतातील हिंदू व मुस्लीम या दोन्ही समाजातील सेक्युलरवादी व मानवतावादी मंडळी यांनी एकजूट करून काम केले पाहिजे. त्यासाठी धर्माच्या नावावर मुल्लामौलवींनी आणि हिंदुत्ववाद्यांनी प्रसारित केलेल्या काही चुकीच्या कल्पना कालबाह्य झाल्या आहेत हे सामान्य मुस्लिमांना व सामान्य हिंदुना पटवून दिले पाहिजे. उदाहरणार्थ, 'मुस्लीम बादशहांनी भारतावर ७००-८०० वर्षे राज्य केले. त्यांना प्रशासनाचा दीर्घ अनुभव असल्याने मुस्लिमांकडेच राजकीय सत्ता असली पाहिजे', हा भ्रम दूर झाला पाहिजे. भारतीय राज्यघटना सर्व धर्मांच्या पलिकडे जाऊन आधुनिक मूल्ये सांगणारी आहे. गत इतिहास विस्मरणाच्या कप्प्यात ठेवून आधुनिक भारताची मूल्ये सर्वांनी स्वीकारली पाहिजेत. अन्यथा स्वातंत्र्यपूर्व काळात जसे हिंदू-मुसलमान दंगे झाले आणि त्याची परिणती फाळणीत झाली, त्याचीच पुनरावृत्ती होत राहील.

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू महासभा आणि मुस्लीम लीग हे वरवर परस्परविरोधी भासणारे धर्मवादी राजकीय पक्ष सत्तेसाठी एकत्र आले होते. तसे भविष्यात पुन्हा घडू शकते. दोन धर्मांध शक्ती हातमिळवणी करून पुरोगामी उदारमतवादी आणि सेक्युलर शक्तींना पराभूत करतील, हा मोठा धोका संभवतो.

दिवसेंदिवस हमीदचे चिंतन व्यापक होत होते, सखोलपणे प्रगल्भ होत होते. त्याचे वैचारिक लिखाणही चालू होते. त्यात तर्कशुद्धता होती. त्याच्याभोवती काही मुस्लीम तरुण गोळा होऊ लागले. १९७० साली त्याने पुण्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना केली. या संघटनेच्या स्थापनेपूर्वी त्याच्याबरोबर प्रदीर्घ चर्चा झाली. मी त्याला म्हणालो, "हमीद, राष्ट्र सेवा दलातून तुझी जडण घडण झाल्यामुळे तुला मुस्लिमांचा महात्मा फुले बनायचे आहे. त्यात काही चूक नाही. पण प्रबोधनाच्या चळवळीतील एक अडचण नीट समजून घे. प्रबोधन करणारा वैचारिक दृष्ट्या श्रेष्ठ आणि प्रबोधनाचे लक्ष्य असलेला सामान्य माणूस कनिष्ठ, अडाणी, अंधश्रद्धेचा बळी असतो, अशी भूमिका नकळत तयार होते. प्रबोधनाची एक पूर्वअट असते. ज्या समाजाचे प्रबोधन करायचे त्याविषयी प्रबोधनकर्त्याच्या मनात अतोनात प्रेम व जिव्हाळा

असावा लागतो. त्यांच्या भाषेत आणि त्यांच्याबद्दल आत्यतिक कळवळ्याने नवे विचार मांडावे लागतात. तरच ते त्यांच्या अंतःकरणात पोहोचतात. मग त्याच्या हिताचा तो विचार करू लागतो. त्यामुळे नव्या विचारांना कडवा विरोध होत नाही. तुला मुसलमानांविषयी आत्यतिक कळवळा असेल आणि 'बुडते हे जन न देखवे डोळा' ही तुझी धारणा असेल, तरच मुस्लिमांचे प्रबोधन फलदायी होईल. अन्यथा तो वांझोटा प्रयल ठरेल."

एक गोष्ट माझ्या ध्यानात आली होती. हमीदच्या पुण्यातील तिन्ही व्याख्यानांना जास्त गर्दी हिंदुत्ववाद्यांची होती. ते आधीपासूनच मुस्लीम विरोधी होते. हमीदने मुस्लिमांच्या, त्यांच्या पुढाऱ्यांच्या चुकीच्या धोरणांवर टीका केली की ते उत्साहाने टाळ्या पिटत. त्यामुळे हमीदच्या प्रतिप्रादनातून कदाचित हिंदुत्ववादाला अधिक बळ मिळत जाईल, अशी भीती माझ्या मनात होती. वास्तविक हमीद हिंदुत्ववाद्यांच्या कट्टर विरोधात होता. अनेक हिंदुत्ववाद्यांनी त्याला हिंदू धर्म स्वीकारण्याचा सल्ला दिला. तो त्याने धुडकावून लावला. हिंदुत्ववादी त्याला म्हणत, "तुमच्या पूर्वजांवर ते हिंदू धर्मात असताना मुसलमान राज्यकर्त्यांनी खूप अत्याचार केले. त्यामुळे हतबल होऊन त्यांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला. आता तुम्ही परत हिंदू धर्मात या." यावर हमीद त्यांना उत्तर देत असे, " माझ्या पूर्वजांवर किती अत्याचार झाले, याची काळजी तुम्ही कशाला करता? तुमच्या पूर्वजांनी हिंदूंमधील खालच्या जाती, स्त्रिया व अस्पृश्यांवर किती अत्याचार केले याच्या कहाण्या जगभर सर्वांना ठाऊक आहेत. जे हतबल होऊन नाईलाजाने मुस्लीम झाले तो वर्ग हिंदू धर्मातला शोषित व अन्याय पीडित समाज घटक होता. तुम्ही तर सवर्ण आहात. तुमच्यावर मुसलमान बादशहांनी कधीच अत्याचार केले नाहीत. याचा पुरावा प्रत्यक्ष तुम्हीच आहात. तसे नसते, तर तुम्हीही इस्लामी राजवटीत मुसलमान झाला असता.'

अ. भि. शहा आणि इतर विचारवंतांना एकत्र आणून हमीद 'इंडियन सेक्युलर सोसायटी' ही संस्था स्थापन केली. त्याच्या मृत्यूनंतर १९९५ साली मेहेरून्निसा दलवाई, अन्वर राजन, अन्वर शेख यांनी 'इस्लामिक रिसर्च इन्स्टिटयूट' ही संस्था स्थापन केली. ती आजही पुण्यात चालू आहे. हमीदच्या निधनानंतर अध्यक्ष या नात्याने मेहेरून्निसा दलवाई संस्थेचा कारभार सांभाळत होत्या. या काळात अन्वर राजन संस्थेच्या चिटणीसपदाची धुरा सांभाळत होते. आता अन्य कार्यकर्ते ही संस्था सांभाळत आहेत. हमीदची धाकटी कन्या इला दलवाई या संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष आहेत.

मुस्लीम समाजात हमीदविषयी प्रचंड संताप होता. आजही तो काही प्रमाणात आहे. ते त्याला जनसंघाचा म्हणजे शत्रुपक्षाचा एजंट मानत. त्याला 'काफिर' म्हणत. त्याच्या गावातील लोक (दलवाई भावकी) त्याच्या विरोधात होते. कोणी त्याला सैतान म्हणत. त्याच्यावर प्राणघातक हल्ले झाले. सुदैवाने तो त्यातून वाचला. हमीदचा मुस्लीम समाजावर परिणाम झाला तो काही अंशी मुस्लीम स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाबाबत.

'जुबानी तलाक' ही मुस्लीम समाजात अत्यंत अन्यायकारक प्रथा होती. १९६६ साली केवळ सात तलाकपीडित स्त्रियांना बरोबर घेऊन हमीदने मंत्रालयावर मोर्चा काढून तत्कालिन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि जुबानी तलाकच्या विरोधातील निवेदन त्याने मुख्यमंत्र्यांना सादर

केले होते. काँग्रेसचे बॅ. ए. आर. अंतुले यांचा, एक मंत्री म्हणून हमीदच्या मागणीला पाठिंबा होता. अन्वर राजन त्यावेळी संस्थेचे चिटणीस होते. तलाकपीडित महिलांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात त्याने जो आवाज उठवला त्याला अनेक मुसलमान पुरुषांनीदेखील पाठिंबा दिला. त्याला कारण होते. मुसलमान समाजामध्ये घराघरांत तलाकपीडित महिलांना त्यांच्या माहेरच्या लोकांना संभाळावे लागत होते. हमीदच्या कार्यात धडाडीने पुढाकार घेणारा सय्यदभाई हा तरुण याच कारणाने हमीदच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाला होता. तो कित्येक वर्षे आपल्या घरात थोरल्या तलाकशुदा बहिणीला सांभाळत होता. तिचे दुःख तो प्रत्यक्ष अनुभवत होता.

हमीदने तलाकपीडित महिलांच्या परिषदा भरवल्या. त्यात त्याला यश लाभले. पुण्यात पहिली तलाकपीडित महिलांची परिषद झाली. त्यावेळी त्याच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नव्हते. म्हणून युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी स्वयंसेवक बनून या परिषदेचे चोख व्यवस्थापन केले. वक्ते, परिसंवादातले विषय वगैरे आयोजन मात्र हमीदचे होते.

तलाकपीडित महिलांच्या परिषदा यांना जसा प्रतिसाद मिळाला, तसाच प्रतिसाद महाराष्ट्रातील मुसलमानांकडून मराठी माध्यमातून शिक्षण घ्यावे या विषयाच्या परिषदांनाही मिळाला. कोल्हापूर येथे 'मुस्लीम मराठी शिक्षण परिषद झाली. तिला भरघोस प्रतिसाद लाभला. अडथळे खूप होते तरीही. उर्दू माध्यमातून शिक्षण घेतलेल्या मुस्लीम तरुणांचे भवितव्य अंधाराने भरलेले असे म्हणून हा विचार मुस्लिमांना तर्कशुद्ध व इष्ट वाटत होता. करिअर, नोकरी, मुख्य प्रवाहातील सर्वसाधारण ज्ञान यासाठी त्या त्या प्रांतातील भाषेच्या माध्यमातून शिक्षण घ्यावे हा विचार सामान्य मुस्लिमांना नक्कीच पटत होता. उर्दू भाषेच्या माध्यमातून शिकलेला विद्यार्थी स्पर्धेत मागे पडायचा.

१९७५ साली देशावर आणीबाणी लागली. सारे क्रियाशील कार्यकर्ते तुरूंगात गेले. हमीदशी असलेला आमचा प्रत्यक्ष संपर्क तुटला. तरी बाहेर असलेले अनेक युक्रांदीय त्याला भेटत. त्याला किडनीचा विकार होऊन त्याची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली होती. त्यावर जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. त्या काळात जसलोक हॉस्पिटल सर्वात महागडे. फाशीची सजा झालेल्या एका पारशी कैद्याने आपली एक किडनी हमीदला डोनेट करण्याचे ठरवले. किडनी प्रत्यारोपणाची सर्जरी त्यावेळी फक्त जसलोकमध्येच व्हायची. तेव्हा शरद पवार काँग्रेसच्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. त्यांना हमीदचे ऐतिहासिक मोलाचे काम समजत होते. हमीदची आर्थिक स्थिती जसलोकमध्ये उपचार घेण्यासारखी नव्हती. शरद पवारांनी हमीदच्या कुटुंबाला आपल्या घरी आणले. आपल्या सरकारी बंगल्यातील गेस्ट हाऊसमध्ये त्यांच्या राहण्याची सोय केली. जसलोकपासून हे अंतर कमी होते. उपचाराचा सारा खर्च त्यांनीच मॅनेज केला. काँग्रेस पक्षातील कट्टर मुसलमानांनी काँग्रेस श्रेष्ठींकडे हमीदला मदत करण्याबाबत शरद पवारांविषयी तक्रार केली. तेव्हा काँग्रेस श्रेष्ठींनी एक गुप्त पत्रक काढले. महाराष्ट्रात जिथे मुस्लीम मतदार अधिक संख्येने आहेत तिथे सभेला वक्ते म्हणून शरद पवारांना बोलावू नये, असा आदेश काढला. शरद पवारांचे मोठेपण यात आहे की त्यांनी काँग्रेस श्रेष्ठींचा प्रासंगिक रोष ओढवून घेतला, पण मित्राला मदत करणे थांबवले नाही. त्या आजारातून शरीरात नवीन किडनी

बसवूनही हमीद पूर्णपणे बरा झाला नाही. पुन्हा जसलोक हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. तिथेच त्याचे ३ मे १९७७ रोजी निधन झाले.

तेव्हा लोकसभेची निवडणूक जाहीर झाली होती. आणीबाणी काही अंशी सैल झाली होती. २६ जानेवारी १९७७ रोजी येरवडा तुरूंगातून आमची सुटका झाली. निवडणुका झाल्या. जनता पक्ष अधिकृत स्थापनेपूर्वीच दिल्लीत सत्तेवर आला होता. त्यानंतर १ मे १९७७ रोजी दिल्लीत जनता पक्षाची अधिकृत स्थापना होणार होती. त्या समारंभाला हजर राहण्यासाठी मी व डॉ. अरूण लिमये दिल्लीला चाललो होतो. मुंबईत थांबून आम्ही ३० एप्रिलला हमीदची भेट घेतली. त्याच्या अंगाला अनेक नळया लावलेल्या. त्यामुळे तो प्रचंड वैतागलेला होता. त्यावेळी तो म्हणाला, "कुमार, तू डॉक्टर आहेस ना? माझ्या सगळ्या नळ्या काढून टाक. मला अशा बंधनात जगण्याचा खूप कंटाळा आलाय. मला सुखाने मरू द्यात." मी फक्त त्याच्या हताश चेहऱ्याकडे पाहात स्तब्ध उभा राहिलो. दोन दिवसांनंतर दिल्लीत त्याच्या निधनाची दुःखद वार्ता कळली. त्याचा अंत्यविधी मुस्लीम स्मशानभूमीत न होता मुंबईच्या चंदनवाडी या सार्वजनिक स्मशानात झाला. त्याबद्दल त्याने एक महिना आधीच तयार करून ठेवलेल्या आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवले होते. त्याच्या अंत्यविधीला उपस्थित राहण्यासाठी पुण्यातून माझी पत्नी उर्मिला व काही युक्रांदीय गेले होते.

भाभी सतत भेटत. सविस्तर माहिती देत. हमीदनंतर त्याच्या कार्यावर त्या अधिक आस्थेने प्रेम करू लागल्या. सक्रीय झाल्या. कौटुंबिक पातळीवर मुलींबरोबरच्या किरकोळ मतभेदात त्या माझ्या मध्यस्थीची वा हस्तक्षेपाची अपेक्षा करीत. मी देखील ती जबाबदारी आनंदाने पार पाडत असे. रूबिना व इला दोन्ही मुली काका या नात्याने माझ्याशी मोकळेपणाने शेअर करीत. आता दोघींची मुलेही मोठी झालीत. दोघींचे आंतरधर्मीय विवाह झाले. इस्लामिक रिसर्च इन्टिट्यूट या संस्थेची विद्यमान अध्यक्षा इला दलवाई. त्या आईच्या निधनानंतर पुण्यात राहून संस्थेचा दैनंदिन कारभार पाहतात. त्या वसईत शिक्षिकेची नोकरी करीत होत्या. त्यांनी नोकरीतून मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्ती घेतली.

आज हमीद दलवाई या व्यक्तिमत्वाबद्दल लिहिताना ४५ वर्षांचा काळ लोटलाय. त्याच्या कुटुंबाशी माझा संबंध त्याच्या निधनानंतर अधिक घट्ट झाला. मेहेरून्निसा भाभी निष्ठापूर्वक हमीदचा वारसा चालवित. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात त्या स्वतः लक्ष घालत. इस्लामिक रिसर्च इन्स्टिटय्यूटमध्ये त्या हयात असेपर्यंत लक्ष घालत होत्या. आता मुली व अन्य कार्यकर्ते त्या कामात लक्ष घालतात. सय्यदभाईंच्या निधनानंतर शमसुद्दिन तांबोळी मंडळाचे काम जोमाने पुढे नेतो आहे.

हमीदचा धाकटा भाऊ हुसेन दलवाई हा युक्रांदचा पूर्णवेळ कार्यकर्ता. तो नंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा पूर्णवेळ कार्यकर्ता बनला. नंतर महाराष्ट्राच्या काँग्रेसच्या मंत्रिमंडळात तो कामगार मंत्री बनला होता. नंतर काँग्रेस पक्षाने त्याला राज्यसभेत खासदार म्हणून निवडून दिले. हुसेनने युक्रांदमधील एकीशी आंतरधर्मीय विवाह केला. धाकटा भाऊ या नात्याने हुसेनवर हमीदचे खूप प्रेम होते. तो सावत्र भाऊ असला, तरी दोघात सख्ख्या भावाचे नाते होते. हुसेन त्याला

`दादा' म्हणत असे. हमीदच्या कामाचा व्याप वाढू लागला तेव्हा त्याला पूर्णवेळ कायकर्त्यांची निकड भासू लागली. त्यावेळी हमीदने युक्रांदची पूर्वसंमती घेऊन हुसेनला त्याच्या संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता नेमले.

मूळचा लोहियावादी असूनही प्रगल्भ झाल्यानंतर हमीदने त्यांच्या अनेक धोरणांचा व भूमिकांचा प्रतिवाद केला. `पं. जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल हे फाळणीचे खरे गुन्हेगार आहेत,' ही लोहियांची भूमिका त्याने संशोधनाअंती साफ नाकारली. तो निरीश्वरवादी बनला होता. तथापी महंमद पैगंबराबद्दल आणि त्यांच्या थोर सामाजिक कार्याबद्दल त्याला नितांत आदर होता. आपली बुद्धी वापरून धर्मासकट सर्व गोष्टींची चिकित्सा करणे, हा तर पैगंबराचाच संदेश आहे, असे तो मानायचा. सर्व भारतीय जनसमूहांमध्ये आपापल्या जाती व धर्मांकडे निरपेक्षपणे प्रत्येकाने चिकित्सक बुद्धीने पहावे व राष्ट्रहिताचे काय ते नेमके ओळखावे, हा त्याचा जीवन संदेश आहे. त्याला अवघे ४४ वर्षांचे आयुष्य लाभले. एवढ्या अल्प आयुष्यात त्याने आपला सेक्युलर राष्ट्रवादाचा महान संदेश मागे ठेवला. त्याची जीवन कहाणी ऐकून आपण थक्क होतो. स्वतःला ना हिंदू, ना मुसलमान मानतो. फक्त आधुनिक भारतीय नागरिक म्हणून विचार करू लागतो.

*(सत्याग्रही विचारधारा, ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ जोडअंक, पृ. ५८-७१)*

*(डॉ. कुमार सप्तर्षी : लेखक हमीद दलवाई यांचे स्नेही, सामाजिक कार्यकर्ते, माजी आमदार, युवक क्रांती दलाचे संस्थापक तसेच महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष आहेत.)*

## ६.५ मुस्लीम महिलांना दिलासा देणारे केंद्र – यदुनाथ थत्ते

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी १९८३च्या जुलै महिन्यात रास्ता पेठेत मुस्लीम महिला मदत केंद्र सुरू केले. रास्ता पेठेत दिनबंधू प्रेसच्या समोर नगरसेवक डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी आंतरभारती केंद्र सुरू केले, त्या जागेतच रोज सायंकाळी साडेपाच ते सात असे केंद्राचे काम चालते. अनेक सुशिक्षित मुस्लीम तरुण केंद्राच्या कामात लक्ष घालतात. महिन्याकाठी दहा–पंधरा प्रकरणे मदतीच्या आशेने येतात, त्यांना आवश्यक तो सल्ला व मदत केंद्रातर्फे दिली जाते. ही मंडळी मग मुस्लीम महिला मदत केंद्राचा प्रचार करतात. येणारी माणसे बहुदा निराश व आगतिक झालेली असतात, कारण त्यांच्या मदतीला कोणीही मजहबपरस्त आलेला नसतो. मानवी संबंधांचे प्रश्न इतके गुंतागुंतीचे असतात की, केवळ धर्मवचने उद्‌धृत करून ते सुटत नाहीत. मनातील गुंता हळुवार हातांनी सोडवण्याचा चिकाटीचा प्रयत्न करावा लागतो. अशा मामल्यात धसमसळेपणा करून चालत नाही. नवनवे अनुभव कार्यकर्त्यांना जसजसे येत आहेत, तसतसे त्यांचे कौशल्य वाढत चालले आहे.

महिला मदत केंद्र सुरू झाल्यानंतर चार महिन्यात शे–सव्वाशे प्रकरणे केंद्राकडे आली. या सर्व प्रकरणात स्त्रियांचा होणारा कोंडमारा आणि छळवाद यांच्या अंगावर शहारे यावे, अशा हकीगती कानी आल्या. इतर समाजात स्त्रियांचा छळवाद काही कमी होता असे नाही. काही प्रकरणात त्यांना जीवे मारले जाते किंवा त्या छळवादातून एकदाची सुटका करून द्यावी, म्हणून त्यांना आत्महत्या तरी करावी लागते. पण अशी प्रकरणे त्या समाजात आता वेशीवर टांगली जातात, मुस्लीम समाजात खामोशीत ती बुडवून टाकली जातात.

आजवर आपले दुःखाचे कड वाहू द्यायलादेखील मुस्लीम स्त्रियांना जागा नव्हती. मुस्लीम महिला मदत केंद्रामुळे अशी विश्वासाची जागा त्यांना निर्माण झाली आहे. आपल्या दुःखाचे कड अंधारात स्वतःच पिऊन टाकायचे आणि तो वडवानल पोटात वागवत राबराब राबायचे, अशी आजवर त्यांची हालत होती. आता दिलासा देणारी एक जागा त्यांना मिळाली आहे. बहुतेक प्रकरणी जबानी तलाक आणि सवत या प्रश्नांना धरूनच असतात. मारहाण, मुलांची आबाळ, पोटगी असे मामलेही असतात. मंडळाचे कार्यकर्ते संबंधितांना भेटून वस्तुस्थिती जाणून घेतात आणि शक्य तेथे समजोता करण्याचा कसोशीचा प्रयत्न करतात. वैद्यकीय व वकिली सल्ला उपलब्ध करून देतात. जेथे एकत्र नांदणे अशक्य असेल, तरी न्यायालयाची मदत घेतात. ॲड. नजमा शेख, ॲड. स्वामी, ॲड. सुपेकर, ॲड. विकास देशपांडे, काही डॉक्टर व मानसोपचारतज्ज्ञ सल्लामसलतीसाठी उपलब्ध असतात.

एकट्या पुणे जिल्ह्याचा विचार केला तरी केंद्राकडे लोणावळा, नारायणगाव, थेऊर, हडपसर, भिगवन, आळेफाटा, मंचर, कामशेत, जुन्नर इत्यादी गावातून मामले घेऊन माणसे आली आणि कार्यकर्ते त्या–त्या ठिकाणी जाऊन पोचले. हळूहळू मदत केंद्राची माहिती लोकांना होत आहे. अनेकदा मशिदीतील पेश इमामदेखील अशा व्यक्तींना केंद्राचा रस्ता दाखवतात असे दिसते.

सुरुवातीला माणसे भीत, दबकत येतात. कारण सत्यशोधक म्हणजे काहीतरी भयंकर अशी त्यांची समजूत धर्मांध मंडळींनी करून दिलेली असते. पण येथे आल्यावरती जी सहानुभूती त्यांना मिळते, ती त्यांना अपेक्षित वाटते.

शेवटी धर्म तरी कशासाठी असतो? मानवाचा दु:खभार हलका करणे, हाच धर्माचा उद्‌देश असतो. कार्यकर्त्यांची तळमळ पाहून मनावरचा अर्धा भार उतरतो. अशा प्रकरणी दुसरी बाजूही ऐकून घ्यावी लागते. सुरुवातीच्या प्रतिक्रिया थंडावल्या, अतिशयोक्ती कमी झाली म्हणजे समझोत्याच्या प्रयत्नांना सुरुवात होते. प्रकरणे विकोपाला न जाता सामोपचाराने मिटावी, यासाठी कसोटीचा प्रयत्न केला जातो. कधी माणसांना आपली चूक उमगलेली असते, पण स्वाभिमानाच्या खोट्या कल्पनांमुळे प्रकरण अडलेले असते. मध्यस्थ मिळताच अशी प्रकरणी मार्गे लागतात.

केंद्रात काम करणारी माणसे आपला नोकरीधंदा सांभाळून काम करतात. त्यामुळे केंद्राची वेळ बदलणे शक्य होत नाही. दुपारची वेळ ठेवली तर अधिक उपयोग होईल आणि दुसरी गोष्ट अद्याप सुशिक्षित समंजस मुस्लीम महिला कार्यकर्त्या केंद्राच्या कामासाठी उपलब्ध नाहीत. स्त्री कार्यकर्ता मिळाल्या तर स्त्रिया अधिक मोकळेपणाने आपली दुःखे मांडू शकतील. सुशिक्षित मुस्लीम स्त्रिया या कामासाठी अद्याप पुढे येत नाहीत याचे एक कारण असे की, शिकलेल्या स्त्रियांबाबत अपप्रचार आधीच पुष्कळ झालेला असल्याने त्या भितात, मुस्लीम समाजात सियासत परस्ती, महजब परस्ती पुष्कळ आहेत पण खिदमत परस्ती फार कमी आहे. मुस्लीम महिला मदत केंद्र हे त्या दृष्टीने अभिनव कल्पना आहे. अशी केंद्रे खूप उपयोगी काम करू शकतात.

*(सकाळ, ११ नोव्हेंबर १९८३)*

*(यदुनाथ थत्ते : ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चाहते आणि पाठीराखे. यदुनाथ थत्ते हे 'साधना' साप्ताहिकाचे संपादक होते. त्यांनी वर्तमानपत्रांत मुस्लीम प्रश्नांवरील अनेक लेख 'मुल्क परस्त' – म्हणजे 'देशभक्त' – या टोपणनावाने लिहिले आहे)*

## ६.६ मुस्लीम सत्यशोधकचे कामकाज – प्रतिभा रानडे

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ठिकठिकाणी जी 'मुस्लीम महिला केंद्रे' चालवली आहेत, तिथून मुस्लीम स्त्रियांना सल्ला व मदत विनामूल्य मिळते. सामाजिक सुधारणांची जेव्हा मागणी केली जाते, तेव्हा त्याच्या बरोबरीनेच सामाजिक समस्या सोडवण्यासाठी, मदतीसाठी संस्था असणे अत्यंत आवश्यक असते. त्याच्याशिवाय सुधारणांच्या मागणीला काही अर्थच उरत नाही. राजा राममोहन रॉय, फुले, अशांनी जर सुधारणेची चळवळ चालवली, पण त्या बरोबरीने संस्था चालवल्या नसत्या, तर त्यांची चळवळही हवेत विरून गेली असती, म्हणूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या मदत केंद्रांचे महत्त्व आहे.

मुस्लीम स्त्रियांसमोर असलेल्या समस्यांचे स्वरूप लक्षात घेता मंडळाचे काम त्या समस्यांच्या बरोबरीचे नाही, छोटे आहे. याचे कारण मदत केंद्राकडे येणाऱ्यांचे प्रमाणच कमी आहे. 'घरच्या गोष्टी वेशीवर कशाला टांगायच्या?' उलेमांची भीती, 'नशिबात असतं तसं होतं, त्याला कोण काय करणार?' किंवा मदत केंद्रांची माहितीच नसते. अशा कारणांमुळे सहसा लोक मदत केंद्राकडे जात नाहीत. तलाक देण्याच्या किंवा बायकोला टाकून देण्याच्या शंभर केसेस झाल्यावर त्यातील पाच किंवा सहा लोक मदतकेंद्राकडे येतात. परंतु शहाबानो प्रकरणानंतर मंडळाकडे येणाऱ्यांची संख्या वाढली आहे, हे निश्चित.

केंद्राची कामाची पद्धत अशी 'केस' आल्यावर प्रथम मुलीकडून मंडळाचा फॉर्म भरून घेतला जातो. ती माहेरी कधी आली? का आली? स्वतः आली की आणून सोडले? त्रास काय आहे? वगैरे गोष्टींची नोंद करून ठेवली जाते. मग त्या मुलींना काय हवे आहे ते विचारले जाते. काहींना परत जाण्याची इच्छा असते, तर काहींना सवतीबरोबर न राहता, वेगळे ठेवले तर परत जाण्याची इच्छा असते. अशा वेळी नवऱ्याशी चर्चा करून, तडजोडीचा प्रयत्न केला जातो. एकमेकांची गाऱ्हाणी ऐकून त्यावर उपाय सुचवून, तशी कबुली दोघांकडून घेतली जाते.

काही मुलींना तलाक हवा असतो कारण नवरा तलाक न देता फक्त घरातून हाकलून देतो. अशा वेळी मुलींना पुनर्विवाहाचा मार्ग बंद असतो, नवरा मात्र दुसरं लग्न करू शकतो. म्हणून त्यांना तलाक हवा असतो. अशा वेळी 'सडासडा के मारूंगा' अशी वृत्ती पुरुषांची असते.

पत्नीची पूर्ण बाजू ऐकून घेतल्यावर पत्र पाठवून पतीला केंद्रावर बोलवून घेतले जाते आणि पतीचे काय म्हणणे आहे, ते ऐकून घेतले जाते. तडजोड करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला जातो. इलाज राहिला नाही, तर मग कायदेशीर मार्ग अवलंबिला जातो.

पुण्याशेजारच्या लहान गावातली ही गोष्ट आहे. पठाण नावाचा एक तरुण दुसरे लग्न करतो आहे, अशी केस मंडळाकडे आली. हा पठाण टेल्को कंपनीत महिना दोन हजार रुपये पगारावर काम करतो. पहिल्या बायकोला लहान मुलगा आहे, दुसऱ्या वेळी ती गरोदर होती. अशा वेळी हा पठाण दुसरे लग्न करायला निघाला होता. त्याला पत्र पाठवून केंद्रावर बोलावून घेतले. तो संतापूनच आला होता. केंद्राने पत्र पाठवून बोलावून घेतले, याचा त्याला भयंकर अपमान वाटला

होता. 'तुम्ही माझ्या खाजगी आयुष्यात लक्ष का घालता? माझं मी काय करायचं ते बघून घेईन. दोन लग्न करायची परवानगी मला कुराणाने दिली आहे. नको म्हणणारे तुम्ही कोण?' अशा तऱ्हेचे रागारागाने बोलू लागला.

कार्यकर्त्यांनी त्याला समजुतीच्या गोष्टी सांगितल्या की, दोन बायकांचे दोन संसार मांडून निष्कारण गरिबीचं जिणं का पत्करतोस? तुला एक मुलगाही आहे, पुन्हा तुझी बायको गरोदर आहे. अशा स्थितीत तू दुसरं लग्न करणं म्हणजे तिच्यावर अन्याय नाही का? असं पुष्कळ सांगून बघितलं. परंतु पठाण काही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. चांगल्या मजबूत देहाचा पठाण दंडेली करू लागला. हाणामारीच्या धमक्या देऊन तो निघून गेला.

तो रस्त्यावर गेल्यावर मागून कार्यकर्त्यांनी त्याला परत हाक मारली. तो थांबला. मग कार्यकर्ते रस्त्यावर गेले आणि रस्त्यावरच पुन्हा त्याची समजूत घालू लागले. पुन्हा तो आरडाओरडा करू लागला. बघ्यांची गर्दी जमू लागली. बराच मोठा घोळका भोवतीनं जमल्यावर कार्यकर्ते गर्दीला उद्देशून म्हणाले, "हा एवढा चांगला मुलगा, याला पहिली चांगली बायको आहे, मुलगा आहे. तरी हा दुसरं लग्न करतोय. हा मुसलमान आहे म्हणून 'कुराणा'ची परवानगी आहे म्हणतो. पण हे असं करणं योग्य आहे का? हल्लीच्या काळात असं वागण बरोबर आहे का? आम्ही याला दुसरं लग्न करू नको म्हणतो, तर हा आम्हालाच दमदाटी करतोय, म्हणजे बघा!"

गर्दीनं लगेच आपापसांत चर्चा केली आणि पठाणला सांगितलं की, दुसरं लग्न करणं चांगलं नव्हे, त्याने कार्यकर्त्यांचे ऐकावं. अशा तऱ्हेच्या घटना प्रत्यही आपल्याकडच्या गावातल्या रस्त्यांवर घडताना आपण पाहतोच. रस्त्यात जरासं काही वेगळं घडलं की, लगेच गर्दी जमते आणि घडलेल्या घटनेवर आपलं मतही लगेच देते. रहदारीचे नियम मोडले म्हणून जर पोलीस कुणाला दंड वगैरे करू लागला तर लगेच लोक जमा होतात आणि 'जाऊ द्या की हवालदार...' म्हणून त्या पोलिसालाच सल्लाही देतात. अर्थात अशा गोष्टी मुंबईसारख्या मोठ्या शहरात घडत नसल्या तरी लहानमोठ्या गावांतून अजूनही घडतातच. पण टेल्कोत दोन हजार पगाराची नोकरी करणाऱ्या पठाणाला, रस्त्यातच अशी आपल्या खासगी आयुष्याची चर्चा होणे, हे अपमानास्पद वाटलं. कार्यकर्ते माझी जाहीर बदनामी करताहेत असे गर्दीलाच सांगून त्याने त्यांच्याविरुद्ध पोलिसांकडे तक्रार करायची धमकी दिली. शब्दाने शब्द वाढला, कारण आता गर्दीतले लोकही बोलण्यात भाग घेत होते. शेवटी ते सगळं लटांबर जवळच्या पोलीस चौकीवर गेलं.

तिथे पठाणने केंद्राचे सेक्रेटरी सय्यदभाई यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवायला सांगितला की, 'मी एवढा अब्रूदार माणूस, टेल्कोत दोन हजार रुपये मिळवतो, पण सय्यदभाईंनी मला मारलं, धमक्या दिल्या. भर रस्त्यात लोकांच्या देखत माझी बेअब्रू केली वगैरे...'

पोलीस चौकीवर पुन्हा एकदा त्याच्या होऊ घातलेल्या दुसऱ्या लग्नाची चर्चा झाली. ती ऐकून पोलीस इन्स्पेक्टरने पठाणालाच समजावले की, सय्यदभाई तुला तुझ्या हिताचेच सांगत आहेत. त्यांनी तुला मारहाण केली, ही गोष्ट तू सिद्ध कशी करणार? कारण गर्दी त्यांच्या बाजूचीच आहे. पोलीस चौकीवरचा एकंदर रागरंग बघून पठाण निघून गेला. पण दोन दिवसांनी दहाबारा गुंडांना घेऊन मंडळाच्या ऑफिसवर आला. हे सगळे गुंड हिंदू होते, पण फारसं काही झालं नाही.

'पठाणला मारणारा तो कोण? आम्ही त्याला बघून घेऊ' वगैरे धमक्या देऊन ते लोक निघून गेले.

सय्यदभाई म्हणाले, "पठाणने पुन्हा जर काही असला प्रकार केला असता, तर आम्हीही आमची माणसं तयार ठेवली होती."

माझ्या मनात आलं, जर हे प्रकरण आणखी वाढलं असतं, तर हिंदू-मुस्लीम दंगेसुद्धा सुरू होऊ शकले असते. हिंदू-मुस्लीम दंगे व्हायला कोणतंही कारण पुरतं. पण पठाण पुन्हा आपल्या मित्रांना घेऊन आला नाही म्हणून हे प्रकरण टळले. परंतु याची चर्चा मात्र पठाण राहत होता, त्याच्या आजूबाजूच्या वर्तुळात झाली आणि त्याच्याच भाईबंदांनी त्याला सांगितले की, 'तू सय्यदभाईच्या वाट्याला जाऊ नकोस. तो माणूस सरकारी-दरबारी पोच असलेला, समाजामध्ये नाव असलेला आहे. तू गप्प रहा.' पोलीस चौकीवरचा अनुभव पठाणला आला होताच. त्यामुळे त्याने पुढे काहीही हालचाल केली नाही. त्याचे दुसरे लग्न तेव्हा एकदा लांबले, ते रद्दच झाले. पहिल्या बायकोला मुलगी झाली. आता एक मुलगा, एक मुलगी असा छान टुकीचा संसार आहे त्याचा.

"पण तो बायकोला चांगलं वागवतो का? नाहीतर आपल्या मनातला राग तो बायकोवर काढत असणार." मी म्हटले.

सय्यदभाई म्हणाले, "बायकोला चांगलं वागवतो. पहिल्यापेक्षा चांगलं वागवतो, कारण त्याच्या अंगातली रग, खुमखुमी जिरली होती."

यावर विचार करताना माझ्या मनात आलं की, पठाण त्याच्या बायकोशी चांगला वागतो, त्याने दुसरं लग्नही केले नाही. कारण त्याच्यावर समाजाचं दडपण आलं. केंद्रावरचे कार्यकर्ते, गर्दीतले लोक, पोलीस चौकीवरचे अधिकारी, त्याचे शेजारीपाजारी, भाईबंद सगळेच त्याला दुसऱ्या विवाहाविरुद्ध सांगत होते. एरवी त्याचा दुसरा विवाह 'हा माझा वैयक्तिक मामला आहे,' 'कुराणाची परवानगी असताना नाही म्हणणारे तुम्ही कोण?' असे म्हणू तो करू शकला असता आणि लोक गप्प बसले असते.

दुसरे विवाह जेव्हा होतात, तेव्हा असेच होत असते. पण मंडळाने त्याला बोलावून सांगितलं, त्यानंतर त्याची एवढी चर्चा झाली, याचे भावनिक दडपण त्याच्यावर आले. तो त्याचा वैयक्तिक मामला राहिला नाही आणि शिवाय दमदाटी करून, धमक्या देऊनही कोणी गप्प बसत नाही; उलट स्वतःचीच बदनामी होते, आपण एकटे पडतो, हेसुद्धा पठाणच्या लक्षात आले. म्हणजेच 'मला हवं तसं मी वागेन, मला कोण विचारणार?' ही त्याची अहंता जिरली होती, म्हणून तो सरळपणाने वागू लागला असेल.

अर्थातच पुढे कधीतरी पुन्हा एकदा तो दुसरं लग्न करण्याचा, पहिल्या बायकोला तलाक देण्याचा किंवा फक्त टाकून देण्याचा विचार करणारच नाही, याची खात्री नाही. परंतु आपलं वैयक्तिक आयुष्य सामाजिक होऊ शकतं, याचा असा अनुभव घेतल्यावर बहुधा पुन्हा तो तसा विचार करणार नाही.

दुसरे उदाहरण आहे ते एका तलाकपीडित स्त्रीचे. तिच्या नवऱ्याचे सुगंधी अत्तराचे दुकान आहे. एकदा तलाक झाला की, मग त्याबाबतीत मंडळाला काहीही करता येत नाही. परंतु तलाक

झाल्यावर निदान त्या बाईला पोटगी मिळावी म्हणून मंडळ प्रयत्न करते. त्या दुकानदाराची बायको आपले गाऱ्हाणे घेऊन केंद्राकडे आली. केंद्राने पोटगीसाठी कोर्टात दावा लावला. पोटगी द्यायला लागणं ही गोष्ट मुसलमान पुरुष अत्यंत अपमानास्पद समजतात. त्याप्रमाणे त्या दुकानदाराला ही अपमानास्पद गोष्ट सहन होणे शक्यच नव्हते. म्हणून तो भांडायला केंद्रावर आला. या कामात आपल्याला यश यावे म्हणून तो साडेतीनशे रुपये किमतीचा मंतरलेला ताईत दंडाबर बांधून आला, पण कार्यकर्त्यांनी पोटगीचा दावा मागे घेतला नाही. शिवाय कोर्टाकडून दुकानदाराला दरमहा दीडशे रुपये पोटगी देण्याचा हुकूम निघाला, म्हणून संतापून तो मांत्रिकाकडे गेला आणि एवढ्या महागड्या ताईताचा उपयोग का नाही झाला म्हणून भांडू लागला. तेव्हा तो मांत्रिक म्हणाला, 'त्या तुझ्या सय्यदभाईनं सातशे रुपयांचा ताईत बांधला असावा. तुला हवे तर मी तुला हजार रुपयांचा ताईत देतो.' दुकानदार एवढंसं तोंड करून परत आला.

आता जमातीचे, आजूबाजूचे, नातेवाईक उघड उघड बोलू लागले, "अत्तरवाल्याला पोटगी बसली. ताईत बांधूनही पोटगी बसली. केंद्राची माणसं भारी, अत्तरवाल्यावर पोटगी बसवली."

पोटगी, एकापेक्षा एक वरचढ किमतीचे ताईत, केंद्रावरच्या माणसांचं भारीपण यांची चर्चा ऐकल्यावर अत्तरवाला घाबरला आणि त्याने सुरुवातीपासूनची तुंबलेली पोटगी रक्कम केंद्रावर आणून भरली. त्यानंतरही दर महिन्याला येऊन पोटगी देऊन जातो.

या दोन उदाहरणांवरून लक्षात येते की, किती वेगवेगळ्या अडचणींना मुस्लीम महिला मदत केंद्राच्या कार्यकत्यांना तोंड द्यावे लागते ते. मुस्लीम समाज अंधश्रद्ध आहे, म्हणून त्यांच्या सुधारणा येत नाहीत, हे असं जेव्हा म्हटलं जातं, तेव्हा त्या अंधश्रद्धेमुळेच भारी किमतीच्या ताईताला घाबरून अत्तरवाल्यासारखा माणूस मुकाट्याने पोटगीची रक्कम आपणहून पोहोचवूनही देतो! किंवा हाणामारी करू पाहणारा पठाण, यासारखा आणखी एक प्रकार पाहायला मिळतो.

सय्यदभाई म्हणाले, "अशा लोकांना आम्हाला मुख्यतः रिलेशनशिप्स, परस्परसंबंध, समजावून द्यावे लागतात. नवराबायकोचे चांगले संबंध म्हणजे काय, ते कसे असतात, ते तसे का असावे, हे समजावून सांगावे लागतात. त्यांना पटवून द्यावे लागतात. संसारात भावबंध का असावेत, ते कसे निर्माण करावे त्या बरोबर पतीपत्नीच्या जबाबदाऱ्या, कर्तव्येही त्यांना पटवून द्यावी लागतात. मदत केंद्रावर आम्हाला मॅरेज कौन्सिलिंगचेही काम करावे लागते, कारण या गोष्टी त्यांना माहीतच नसतात."

एक अतिशय मूलभूत अशी महत्त्वाची गोष्ट सय्यदभाईंनी सांगितली. प्रा. मुमताज रहिमतपुरेसुद्धा याच पद्धतीचं सांगत होत्या की, "आमच्यामध्ये मुलांवर चांगले संस्कारच होत नाहीत कारण मुलांच्या आईबापांवरही चांगले संस्कार झालेले नसतात."

वस्तुतः ही समस्या काही फक्त मुस्लीम समाजापुरतीच मर्यादित नाही. कोणत्याही धर्माच्या समाजात असा संस्कारहीन हिस्सा असतोच आणि तो दरिद्री लोकांत, झोपडपट्टीत राहणाऱ्यांमध्ये असतो, असेही नाही. उच्चवर्गीयांमध्येही संस्कारहीन लोक असतातच. फरक एवढाच की, मुस्लीम समाजातील या हिश्शातील लोकांना धर्माचा आधार मिळतो, त्यांच्यावर कुणाचाच अंकुश नसतो. खरे म्हणजे हा अंकुश फक्त संस्कारहीन लोकांसाठीच हवा असेही नाही. उत्तम

संस्कार झालेले लोकही दरवेळी उत्तम रीतीने वागतील असेही नव्हे कारण माणूस केव्हा कसा वागेल, याची काहीही शाश्वती नसते.

माणसाचं मन मोठं चंचल, म्हणूनच अशा बेशिस्त वागणुकीनं समाजाची घडी बिघडू नये, म्हणून काही नेमनियमांची, कायदेकानूनची आवश्यकता भासते. स्वतःचे स्वातंत्र्य जपताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यात्रर घाला घालणं, किंवा दुसऱ्याला पारतंत्र्यातच ठेवणं, हे होऊ नये म्हणून कायदे हवे असतात. ते जेव्हा केले जात नाहीत, स्वातंत्र्याचा अर्थ एकतर्फीच लावला जातो, तेव्हा मग त्यासाठी भांडावेही लागते.

गमतीची गोष्ट म्हणजे जेव्हा मुल्ला-मौलवी, कट्टरपंथीयांच्या पुनरुज्जीवनवाद्यांच्या घरातील मुलींनाच त्यांचे नवरे टाकून देतात, तलाक देतात ते लोक चोरून मारून वेगवेगळ्या ठिकाणाच्या केंद्रांवर मु. स. शो. मंडळाच्या कार्यकर्त्यांची मदत मागायला जातात आणि 'आमचे नाव कुणाला सांगू नका' असे सांगायलाही विसरत नाहीत, कारण जमातीमध्ये त्यांना स्वतःची प्रतिष्ठा शाबूत ठेवायची असते.

"पण मग तुम्ही ही नावं जाहीर का करत नाही? त्यामुळे तुमचे विरोधक उघडे पडतील. तुमचा फायदाच होईल त्यात." मी सय्यदभाईंना म्हटले.

हुसेन जमादार यांच्याप्रमाणेच त्यांनीही उत्तर दिले की, जर आम्ही त्यांची नावे जाहीर करू लागलो, तर ते लोक आमच्याकडे येणारच नाहीत. आणि त्यांच्या घरच्या मुलींच्या समस्या सोडवल्या जाणार नाहीत. आणि तेच तर आमचं मुख्य काम आहे. पण अशांची नावेगावे आमच्या फायलीमध्ये सर्व तपशिलांसह आहेत. उद्या तेवढीच वेळ आली, तर या लोकांची नावे आम्ही जाहीर करू शकतो.

सर्वोच्च न्यायालयाने शहाबानो यांना पोटगीचा अधिकार दिल्यानंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सेक्रेटरी सय्यदभाई, स्वतः शहाबानो आणि 'महिला दक्षता समिती'च्या प्रमिला दंडवते यांनी दिल्लीला जाऊन पंतप्रधान राजीव गांधी यांची भेट घेऊन, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले होते आणि घटनेच्या १२५व्या कलमामुळे मुस्लीम तलाकपीडित स्त्रियांचा जो फायदा होतो, त्याचे स्वागत केले.

ह्याचबरोबर मुस्लीम प्रतिगामी शक्ती आणि पुनरुज्जीवनवाद्यांच्या आहारी न जाता घटनेच्या ४४व्या कलमानुसार भारतामध्ये समान नागरी कायदा आणण्याचं आवाहनही केलं होतं. त्या वेळी कुणाच्याही मतांच्या आहारी न जाता, कुणाच्याही दडपणाखाली न येता या गोष्टींचा विचार करण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी दिले होते. त्याचप्रमाणे आपल्या महाराष्ट्रभेटीच्या वेळी तलाकपीडित महिलांची गाऱ्हाणी ऐकून घेण्याचे पंतप्रधानांनी मान्य केले होते.

परंतु त्यानंतर मुस्लीम प्रतिगाम्यांचे आणि पुनरुज्जीवनवाद्यांचे दडपण सतत वाढतच गेले. त्यानंतर सप्टेंबर १९८५मध्ये पंतप्रधान राजगडभेटीसाठी पुण्याला आले असताना आणि डिसेंबर १९८५मध्ये काँग्रेस शताब्दीच्या वेळी मुंबईला आले, तेव्हाही पंतप्रधानांशी भेट होऊ शकली नव्हती. दरम्यान झेड. ए. अन्सारी, बनातवाला, नजमा हेपतुल्ला, सय्यद शहाबुद्दीन या मंडळींनी मुस्लीम समाजाच्या धार्मिक भावना भडकावून देणारी वक्तव्ये करून सर्वोच्च

न्यायालयाच्या निर्णयाला तीव्र विरोध केला होता. अन्सारीनीं तर लोकसमेत प्रक्षोभक धमकीवजा असे भाषण करून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर ताशेरे झाडले. त्याबद्दल कित्येक लोकसभा सदस्यांनी आक्षेपही घेतले. नजमा हेपतुल्ला यांनी मुस्लीम समाजासाठी 'कुराण'प्रणीत अशा फक्त स्त्रियांबद्दलच्या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी करायला सुरुवात केली.

७ एप्रिल १९८५ रोजी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये नजमा हेपतुल्ला यांची मी स्वतःच घेतलेली मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. त्यामध्ये त्यांची म्हटल्याप्रमाणे, आजही त्या म्हणतात की, मोहंमदांनी मुस्लीम स्त्रियांना इतर कोणत्याही धर्मांने दिले नाहीत इतके अधिकार दिले आहेत. फक्त त्यांची अंमलबजावणी ठीक होत नाही. कुराणातील वचनांचा योग्य तो नीट अर्थ लावला जात नाही. तो अर्थ एकदा का नीटपणाने लावला गेला की, मुस्लीम स्त्रियांचे सगळे प्रश्न चुटकीसरशी सुटतील.

पण कुराणातील वचनांचा नीट अर्थ लावण्यामध्ये अडचण कुणाची? नीट अर्थ का नाही लावला जात? यावर त्यांचे उत्तर आहे की, या गोष्टी हळूहळू होतात. जसजसा समाज सुशिक्षित होईल तसतशा या गोष्टी होतील.

जमात-ए-इस्लामी या संस्थेने तर मुस्लीम समाजातील, मुस्लीम कुटुंबातील खटले चालवण्यासाठी शरीयत कोर्टे स्थापन करण्यात यावीत, अशी मागणी केली. कारण भारतीय न्यायालयांना, बिगर मुस्लीम न्यायाधीशांना शरीयतमधील कायद्यांचा अर्थ लावण्याचा हक्क नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

पण मग या शरीयत कोटांनी दिलेले निकाल वादी-प्रतिवादीपैकी कुणाला नामंजूर असेल, तर त्या निकालाची अंमलबजावणी कोण, कशी करणार? का त्यासाठी त्यांना वेगळी शासनसंस्थाही हवी आहे, असा विचार एखाद्याच्या मनात आल्यावाचून राहणार नाही. मुस्लीम पुनरुज्जीवनवादी फुटीर वृत्तीचे आहेत, देशाला धोकादायक आहेत, असे आरोप त्यांच्यावर केले जातात, ते याच विचारापोटी.

अन्सारी, नजमा हेपतुल्ला हे इंदिरा काँग्रेसचे सदस्य आहेत, तर शहाबुद्दीन हे जनता पार्टीचे आहेत. बनातवाला मुस्लीम लीगचे आहेत. हे लोक वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे असूनही, या सर्वांचे मुस्लीम स्त्रियांबद्दलच्या कायद्यासंबंधी मात्र एकमत होते ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. मुद्दामहून ध्यानात ठेवण्यासारखी आहे. यावरून एक स्पष्ट होते की, प्रत्येकाचा राजकीय पक्ष वेगळा असला, आपापली राजकीय मतं वेगवेगळी असली, तरी मुस्लीम असणे ही गोष्ट त्यांना एकत्र आणते. आपापल्या राजकीय पक्षाच्या मतांपेक्षासुद्धा त्यांना स्वतःचे इस्लामी व्यक्तित्व हे महत्त्वाचे वाटते. त्याच एका सूत्राने ते एकत्र बांधले जातात आणि धर्माचे असे एक वेगळेच राजकारण जन्म घेते.

तलाक मुक्ती मोर्चा अहमदनगरहून परत आला आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मुंबईमध्ये, मुस्लीम पुनरुज्जीवनवाद्यांनी जवळ जवळ एक लाख मुस्लीम पुरुषांचा प्रचंड मोठा मोर्चा काढला. तलाक मुक्ती मोर्च्याला त्यांचे हे उत्तर होते. या मोर्चामध्ये एकही मुस्लीम स्त्री नव्हती,

ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी.

या मोर्चामध्ये 'शरीयत बचाव'च्या घोषणा देण्यात आल्या. त्याचबरोबर इतरही अत्यंत प्रक्षोभक घोषणा देण्यात आल्या. दुर्दैवाने या मोर्थ्याच्या अगोदर सहा महिने कलकत्ता हायकोर्टात कुणा एकाने, ' 'कुराण' जातीयता शिकवते म्हणून बंदी घालावी' असा दावा आणला होता. अर्थातच तो खटला दाखलच करून घेतला नव्हता. तरीपण याचा फायदा घेऊन सरकार कुराणावर बंदी घालणार आहे. मुस्लिमांना मशिदीत जायला, नमाज पढायला बंदी येणार आहे.

अशा खोट्यानाट्या गोष्टी सांगून रस्त्यावर आणल्या गेलेल्या या जमावाबद्दल बोलताना 'हिंदुस्तानी मुस्लीम आंदोलना'च्या शहनाज शेख यांची महाराष्ट्र टाईम्ससाठी मी मुलाखत घेतली होती. तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, "मोर्चा एक लाखाचा होता. त्यामध्ये एकही बाई नव्हती, याला तसे काही महत्त्व नाही, कारण मुल्ला-मौलवींनी जर फतवा काढला, तर वाट्टेल तेवढी गर्दी, वाट्टेल तेवढ्या बायकासुद्धा मोर्चामध्ये येतील. कशासाठी मोर्चामध्ये जायचं हे सांगितलं नाही तरी, फक्त फतवा निघाला आहे म्हणून त्या मोर्चात जातील. सर्वांत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या मोर्चातील गर्दीने 'हसके लिया पाकिस्तान, लढके लेंगे हिंदोस्तान' या सारख्या भयंकर घोषणा मुंबईसारख्या शहरात भरदिवसा भर वस्तीत दिल्या होत्या! त्याचा परिणाम म्हणून शिवसेनासारख्या हिंदू जातीयवादी संघटनांनी जातीय तणाव निर्माण होतील, अशी वक्तव्ये करायला सुरुवात केली. हे सगळं फार भयंकर आहे. कशाचा कशाला काही संबंध?"

*(प्रतिभा रानडे, 'बुरख्याआडच्या स्त्रिया', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. २१३ ते २२१)*

*(प्रतिभा रानडे : महाराष्ट्रातील ज्येष्ठ लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या, मुस्लीम सत्यशोधक मंडळाने शहाबानो प्रकरणात उभ्या केलेल्या आंदोलनात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. त्यांचे मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवरील 'बुरख्याआडच्या स्त्रिया' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.)*

## ६.७ सत्यशोधक मुस्लीम – सदा डुम्बरे

मार्च २२, १९७०, महाराष्ट्रात या दिवशी एक क्रांतिकारक घटना घडली. मुस्लीम समाजातील एक विचारवंत व लढाऊ कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या प्रेरणेने पुण्यात 'साधना' कार्यालयातील 'आंतरभारती' सभागृहात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची अधिकृतपणे मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या क्रांतदर्शी घटनेची दोन वैशिष्ट्ये पहिल्या दिवसापासूनच डोळ्यांत भरतात. एक म्हणजे घट्ट पोलादी चौकटीत अडकलेल्या साचेबंद मुस्लीम समाजात, सनातन्यांचा प्रचंड विरोध असूनही काही कार्यकर्ते समाजसुधारणेसाठी जिवाची बाजी लावायला तयार झाले होते.

दुसरी गोष्ट म्हणजे या चळवळीचा बाज अस्सल मराठी वळणाचा होता. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा कृतीशील व परवलीचा शब्द म्हणजे 'सत्यशोधक'. महात्मा जोतिबा फुले यांनी १९व्या शतकात 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. समाजसुधारणेचा खऱ्या अर्थाने मूलगामी व सर्वंकष विचार त्यांनीच प्रथम मांडला. त्या विचाराशी व त्या चळवळीतील नंतरच्या नेत्यांशी या मंडळाची नाळ स्वाभाविकपणे जोडलेली दिसत होती.

भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील मुस्लीम समाज, धर्माचे आवरण दूर केले, तर येथील बहुजन समाजाचाच अविभाज्य घटक आहे, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती ज्याला माहीत आहे, आणि ती मान्य करण्याची ज्याची तयारी आहे, अशा माणसाच्या मनातच मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे नाव घर करू शकते.

या देशातील हिंदू बाहेर पाहू शकत नाहीत, असे प्रभाकर पाध्ये म्हणत त्या वेळी पाकधार्जिण्या मुस्लिमांकडे त्यांना अंगुलिनिर्देश करायचा असे. ज्या मुस्लिमांना या देशाबाहेर पाहण्याची इच्छा नाही, गरज नाही अशा देशी मुस्लिमांनी चळवळीची ही पताका त्या वेळी खांद्यावर घेतली होती. त्यांचा विसावा वर्धापनदिन पुण्यात साजरा होत आहे. गेल्या २० वर्षांत मंडळाच्या विचारांचा तोच गाभा कायम आहे. तावूनसुलाखून तो अधिक झळझळीत झाला आहे.

जगातील सर्व मुसलमान एकच आहेत, असा 'पॅन इस्लामिक' उद्घोष कोणी कितीही केला, तरी देश आणि समाज बदलेल, त्याप्रमाणे मुस्लीमही वेगळा असल्याचे सत्य कोणी नाकारू शकत नाही. मुस्लीम देशातील मुस्लीम आणि भारतीय मुस्लीम यांत गेल्या तीन–चार दशकांत मोठी दरी निर्माण झाली आहे. सगळं जगच बदलत आहे. 'आधुनिक' होत जाणाऱ्या या जगाकडे मुस्लीम राष्ट्रांनी पाठ फिरवली, तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

पाकिस्तान, इराण, इराक, इजिप्त कुठलेही मुस्लीम राष्ट्र घेतले, तर त्या त्या देशांचे सर्व महत्त्वाचे निर्णय 'राष्ट्रवादी' भूमिकेतूनच घेतले जातात. धर्म त्याच्या आड ते येऊ देत नाहीत. मग तो प्रश्न कायद्याचा असो, शिक्षणाचा असो की, समाजसुधारणेचा असो. जसा अमेरिकेतील कुठल्याही मुस्लिमाला पत्नीस तोंडी तलाक देता येत नाही, तसा इजिप्तमध्येही नाही. बहुसंख्य भारतीय मुस्लिमापेक्षा मुस्लीम राष्ट्रांतील बहुसंख्य समाज अधिक प्रागतिक, सुधारणावादी, शिक्षित आणि धर्माच्या चौकटीतही तुलनेने उदारमतवादी आहे.

मग भारतातच त्यांची स्थिती अशी का? त्याला कारण येथील राजकीय नेतृत्व, सत्तारूढ पक्षाचे आणि विरोधी पक्षाचेही. त्याचबरोबर मुस्लीम समाजातील राजकीय पुढारीही त्याला तेवढेच जबाबदार आहेत. मुस्लिमांकडे पाहण्याचा 'एक गठ्ठा मते' किंवा 'व्होट बँक' हा एकच समान दृष्टीकोन सर्वत्र दिसतो. त्यामुळे राजकीय पक्षांना तात्कालिक फायदा होतही असतो. परंतु देशाचे मात्र कायमचे नुकसान होत असते. राजकीय पक्षांना मुस्लिमांकडे 'माणूस' म्हणून पाहण्याची गरज एक वेळ वाटेत नसेल, परंतु मुस्लीम नेतृत्वालाही ती का वाटत नाही? 'पोलिटिकल कमॉडिटी' म्हणून ते आपल्याच समाजाकडे का पाहतात? त्या दृष्टीनेच सर्व मोर्चेबांधणी का करतात? ही प्रक्रिया अशीच चालू राहिली, तर मुस्लीम पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या बांधवांना राष्ट्रविहीनतेच्या कड्यापर्यंत घेऊन जातील यात शंका नाही. हा आत्मघात आपण ओढवून घ्यायचा का, याचा मुस्लीम समाजाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. हमीद दलवाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या समाजाला असलेला हा धोका नेमका ओळखला होता, आणि त्या दृष्टीनेच त्यांनी आतापर्यंत काम केले.

'अल्पसंख्याकांचे राजकारण' हे वर्षानुवर्षे वाजेल असे नाणे नाही. ते करण्यासाठी 'मुस्लीम आयडेंटिटी' ही आजची गरज आहे, परंतु ती आयडेंटिटी प्रस्थापित करताना आपण स्वतःच आपले माणूसपण नाकारतो आहोत, बदलाची स्वाभाविक प्रक्रिया रोखून धरत आहोत, हेही ओळखले पाहिजे. त्यामुळे मुस्लीमत्व टिकेल, परंतु त्याचा चेहरा जंगलात राहणाऱ्या 'केव्हमॅन'सारखा असणार आहे. स्वायत्तताही टिकेल, परंतु तीही जंगलात राहणाऱ्या टोळीसारखी असेल. पाकिस्तान असो की इराण, कुठलाच मुसलमान भारतीय मुसलमानासारखा दिसणार नाही, आणि त्याला जवळही करणार नाही. दारिद्र्य, बेकारी, मागासलेपणा, निरक्षरता, कर्मठपणा, विषमता, धर्मांधता ही भारतीय मुस्लिमांच्या परिचयाची परिमाणे म्हणून ओळखली जातील. ती स्वीकारार्ह आहेत काय?

येथे एक भाषेचे उदाहरण घेता येईल. मॉरिशसमध्ये शे-दीडशे वर्षांपूर्वी अनेक मराठी माणसे रोजगारासाठी गेली. आज ते मॉरिशसचे नागरिक आहेत आणि अधिकारावरही आहेत. त्यांनी त्या वेळची मराठी भाषा आणि संस्कृती जतन केली आहे. काही मराठी मंडळींना अलीकडेच भेटण्याचा योग आला. आपली मराठी त्यांना समजू शकत नाही आणि त्यांची मराठी ऐकताना आपण बखर वाङ्मय तर वाचत नाही ना, असे सारखे वाटत असते. कुठल्याही कारणाने का होईना एखादा समूह मुख्य प्रवाहापासून अलग पडला की, त्याची ही अवस्था होते. आता नवी मराठी शिकण्यासाठी तेथील मंडळींचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय राष्ट्रजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडल्यास मुस्लीम समाजाचेही हेच चित्र राहील.

मुस्लीम जातीयवाद ही हिंदू जातीयवादाची प्रतिक्रिया आहे, असे विश्लेषण अनेकदा केले जाते. दोन्ही बाजूंनी ते बरोबरही आहे. परंतु हिंदू जातीयवादी मुख्य प्रवाहापासून स्वतःला अलग पडू देत नाहीत आणि मुस्लीम नेमके त्याच्या उलटे करतात, हा त्यातील फरक आहे. जातीयवादी राजकारण केल्याने हिंदूंचे आणि मुस्लिमांचे सारखेच नुकसान होते, हे गणितही बरोबर नाही. मुस्लिमांचीच त्यात जास्त हानी होत राहणार आहे. म्हणून हिंदू जातीयवादाचे उत्तर मुस्लिमांनी

वेगळ्या पद्धतीने दिले पाहिजे. प्रागतिक, सुधारणावादी, आधुनिक आणि राष्ट्रवादी भूमिका घेऊनच ते करू शकतील. असे केले, तरच त्यांना आपले अस्तित्व आणि मुस्लीमत्वही टिकवता येईल.

धर्माची मूलतत्त्वे चिरंतन असली, तरी आचार मात्र परिवर्तनीयच राहिला आहे. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम, बौद्ध वगैरे सर्वच धर्मांचा इतिहास तेच सांगतो. धर्माचे मूलतत्त्व काय आणि अवडंबर काय हे तपासण्याचे, त्यातील भेद स्पष्ट करण्याचे काम तत्त्वचिंतक सातत्याने करत आले आहेत. इस्लामपेक्षा इतर धर्मांत ते अधिक जोमदारपणे, सर्वंकषपणे झाले. इस्लाममध्येही या प्रक्रियेचा वेग वाढला पाहिजे, असे हमीद दलवाई वगैरे मंडळींचे प्रयत्न होते. परंतु मंडळाने ती भूमिका कधीच घेतली नाही. काळाशी सुसंगत असे अगदी मोजके आणि प्राथमिक स्वरूपाचे सामाजिक प्रश्न त्यांनी गेल्या वीस वर्षांत नेटाने मांडले. मुस्लीम समाजातील महिलांवरील अन्याय दूर करण्याला अग्रक्रम मिळत गेला.

तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, पोटगी यावर आता संपूर्ण जगात कायद्याच्या बाबतीत एकवाक्यता असताना भारतातच ती नसावी, हे तर्कदृष्टपणाचे आहे, ही मंडळाच्या कार्यकर्त्यांची स्पष्ट भूमिका आहे. राजकीय फायद्यासाठी सराकरही अन्याय्य गोष्टींच्या पाठीशी उभे राहते, याचे त्यांना वैषम्य वाटते. परक्या इंग्रज सरकारलादेखील इथल्या स्त्रियांची दया आली आणि त्यांनी सतीबंदीसारखे कायदे केले. परंतु राजकीय स्वार्थाने अंध झालेल्या सध्याच्या सरकारला येथील मुस्लीम स्त्रीची कणव येत नाही, याबद्दल सय्यदभाईसारखे मंडळाचे कार्यकर्ते व्यथित होतात.

येथील हिंदूंनी राजकीय मुसलमान व सामान्य मुसलमान असा स्पष्ट भेद करून राजकीय मुसलमानांवरचा राग सामान्य मुस्लिमांवर काढू नये, असे ते म्हणतात. 'सेक्युलर' सरकारने राजकारणातीत काम करणाऱ्यांची किंमत वाढवली पाहिजे, असा ते आग्रह धरतात. या सर्व गोष्टी रास्त नव्हेत काय? भूतकाळाच्या जोखडात कायमचे बद्ध करणाऱ्या किंवा भविष्याकडे स्वप्नरंजन म्हणून पाहणाऱ्या वृत्तीचा त्याग करून येथील मुस्लीम समाजाने वास्तववादी भूमिका घेतली पाहिजे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे त्यासाठी चालू असलेले प्रयत्न यशस्वी व्हावेत, यासाठी अनेकांच्या शुभेच्छा आहेतच.

*(सदा डुम्बरे, 'प्रतिबिंब ९०', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. क्र ३० – ३२)*

*(सदा डुम्बरे : ज्येष्ठ पत्रकार, पत्रकारितेचे प्राध्यापक आणि साप्ताहिक 'सकाळ'चे संपादक. त्यांनी अनेक सामाजिक आणि राजकीय विषयांवर विश्लेषणात्मक लेखन केले आहे.)*

## ६.८ प्रबोधनाचा रौप्यमहोत्सव – प्रा. शमसुद्‌दिन तांबोळी

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष २२ मार्च १९९५ला सुरू होत आहे. त्या निमित्ताने या वैचारिक चळवळ करणाऱ्या मंडळाच्या कार्याची उजळणी...

'भारतातील मुस्लीम संस्कृतीने मला घडवले आहे. या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत, त्यांचा मला अभिमान आहे आणि ज्या वाईट गोष्टी निर्माण झाल्या आहेत, त्या बदलल्या पाहिजेत', अशी स्पष्ट भूमिका घेऊन हमीद दलवाई यांनी २२ मार्च १९७० रोजी काही निवडक मुस्लीम सहकाऱ्यांबरोबर मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. या वर्षी मंडळास पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत, म्हणजे या प्रबोधनकार्याचा रौप्यमहोत्सव होत आहे.

जबानी तलाकची पद्‌धत बंद व्हावी, बहुपत्नीत्वावर नियंत्रण यावे आणि तलाकपीडित महिलांना १२५व्या या कलमानुसार पोटगी मिळावी, यासाठी मंडळाने अनेक वेळा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मागणी केली. राष्ट्रीय एकात्मता वाढवून भिन्न धर्मीयांत बंधुभाव निर्माण करणे, जागतिक आणि धर्मनिरपेक्ष तत्त्वांचा प्रसार करणे, मुस्लीम समाजाची धर्ममार्तंडांच्या तावडीतून सुटका करणे, मुस्लीम समाजात कुटुंबनियोजनास प्रोत्साहन देणे, महिलांना कायद्याच्या आधारे सामाजिक न्याय मिळवून देण्याची मागणी करणे आणि कालबाह्य रूढी–परंपरांना विरोध करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गेल्या २५ वर्षांत विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आले.

दलवाई नेहमीच म्हणत, "मुसलमानांना चिकित्सेचा अंगीकार करायला लावणे हे काम इतके मोठे आणि कठीण आहे की, कोणीही एक माणूस त्याला पुरा पडणार नाही, याची मला जाणीव आहे; पण म्हणून या समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने या कामाचे महत्त्व किती आहे, हे ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे काम हाती घेतले पाहिजे. मी माझ्या अल्पकुवतीनुसार या कामाला वाहून घेतले आहे. हाच माझा लढा आहे आणि एक मुसलमान म्हणून मी तो लढवणार आहे."

मोकळ्या मनाने विचार करणारी, आत्मनिरीक्षणाची सवय असणारी, अंतर्मुख होऊन धर्मातीत विचार करणारी माणसे मुस्लीम समाजात बोटावर मोजण्याइतकीच सापडतील. यासाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष, आत्मनिरीक्षणपर, बौद्‌धिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात आहे आणि म्हणूनच सामाजिक परिवर्तनाच्या या चळवळीस मोठ्या प्रमाणात विरोध झाला.

भारतीय मुस्लीम समाजाला प्रगतीच्या मार्गाकडे वळवण्यासाठी, समाजाचे तथाकथित, कुचकामी नेतृत्व संपवण्यासाठी, धर्मांतर्गत सुधारणा, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी, समाजाला धर्मांधतेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी आणि आधुनिक धर्मनिरपेक्ष मूल्ये समाजात वाढवण्यासाठी मंडळाची स्थापना झाली.

मुस्लीम समाजात परिवर्तन आणि सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाने सातत्याने लढा दिला, अलीकडच्या काळात मंडळाच्या कार्यास चांगला प्रतिसादही मिळत आहे. शहाबानोच्या पोटगी प्रकरणाच्या वेळी मंडळास राष्ट्रीय पातळीवरील विचारवंतांशी चर्चा

करण्याची संधी मिळाली आणि देशाच्या कानाकोपऱ्यातील समविचारी पुरोगामी मुस्लिमांच्या प्रतिसादातून मंडळाच्या पुढाकाराने १९८७मध्ये 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'ची स्थापना झाली. मंडळामार्फत महाराष्ट्राबाहेर विशेषतः कर्नाटक, तमिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश आणि इतर ठिकाणी 'मुस्लीम महिला मदत केंद्रे' सुरू करण्यात आली. मंडळाचा हा व्याप वाढवण्यामध्ये मुख्यतः मंडळाचे सध्याचे संघटक व 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'चे सरचिटणीस सय्यदभाई, मंडळाचे सरचिटणीस हुसेन जमादार आणि कार्याध्यक्षा श्रीमती मेहेरून्निसा दलवाई यांचा वाटा आहे.

मुस्लीम समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती व्हायची असेल तर त्यांनी प्रादेशिक भाषांतून शिक्षण घेतले पाहिजे. मुस्लीम समाजाने उर्दू माध्यमाचा केवळ अस्मितेसाठी आग्रह न धरता स्वतःच्या विकासासाठी व्यवसायाभिमुख आणि तांत्रिक शिक्षणाचा स्वीकार केला पाहिजे. मुस्लीम स्त्रियांच्या समस्या खऱ्या अर्थाने कमी करण्यासाठी कायद्याबरोबर त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी पारंपरिक दृष्टीकोनाचा त्याग करून, आधुनिक शिक्षण स्वीकारून, काळानुरूप बदलण्यासाठी समाजात परिवर्तनशीलता निर्माण होण्याची गरज आहे, आणि ती शिक्षणाच्या माध्यमातूनच येऊ शकेल.

आधुनिक शिक्षण घेतल्यामुळे आपल्या धार्मिक प्रश्नांना तडे जातील या भीतीपोटी. तथाकथित मुस्लीम नेते आधुनिक शिक्षणास विरोध करतात आणि उर्दू माध्यमाचा आग्रह धरतात. हेच नेते स्वतःच्या मुलांना मात्र इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवतात. उर्दू माध्यमाच्या शाळेतून आपले वेगळेपण टिकवण्याचा प्रयत्न होतो. त्याचबरोबर कालबाह्य रूढी-परंपरांना जोपासले जाते.

उर्दू शिक्षणामध्ये आणखी बरेच दोष आहेत. विशेषतः या माध्यमाच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यास अनेक अडचणी येतात. परिणामी, गळतीचे प्रमाण वाढते नोकऱ्या मिळू शकत नाहीत, आणि एकूणच हा समाज विकासापासून दूर राहतो. मागासलेपणास पुन्हा आमंत्रण मिळते. हे दुष्टचक्र थांबवण्यासाठीच मंडळ आधुनिक शिक्षणाचा आग्रहाने स्वीकार करण्यास प्रवृत्त करते.

हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता या संदर्भात अनेक उपक्रम राबवण्यात आले. रामजन्मभूमी आणि बाबरी मशीद प्रकरणी न्यायालयाचा निर्णय दोन्ही समाजांनी स्वीकारावा, अशी मंडळाने भूमिका घेतली होती (शहाबानो प्रकरणीसुद्धा हीच भूमिका होती.); परंतु मशीद पाडल्यानंतर हिंदू-मुस्लीम समाजातील दरी पुन्हा वाढली आणि परिस्थिती अधिक गंभीर झाली. हा प्रश्न सोडवण्यासाठी मंडळाच्या पुढाकारातून राष्ट्रीय पातळीवर 'मंदिर मस्जिद सुलाह समिती' स्थापन करून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा धागा नावाप्रमाणेच महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, आगरकर अशा समाजसुधारकांच्या कार्याशी जोडलेला आहे. मुस्लीम समाजात अशा प्रकारच्या सुधारणावादी विचारांची नितांत गरज आहे. वैयक्तिक पातळीवर एम. आर. ए. बेग, डॉ. एम. सी. छगला, प्रा. मुजीब, मौलाना आझाद यांनी हा प्रयत्न केला, परंतु त्यास चळवळीचे स्वरूप आले नाही. मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न कमी करण्यासाठी अनेक ताहेराबी, शहाबानो आणि हमीदनबी निर्माण होण्याची गरज आहे.

अलीकडच्या काळात अनेक घडोमोडी झाल्या. त्याचा परिणाम म्हणून समाज अधिकाधिक अंतर्मुख होऊन बदललेल्या परिस्थितीनुसार विचार करीत आहे. शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे, कुटुंबनियोजनसाठी होणारा विरोध कमी झाला आहे, जागतिक पातळीवर स्त्रियांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या 'वुमेन अंडर मुस्लीम लॉ'सारख्या संघटना कार्य करत आहेत. पुरोगामी विचारवंतांप्रमाणेच मुस्लीम धार्मिक संघटनांनीसुद्धा तोंडी एकतर्फी तलाक पद्धतीवर टीका केली आहे आणि वैयक्तिक कायदा बदलण्याची मागणी ते करत आहेत.

या सर्व घटनांचा विचार करता भारतीय मुस्लीम समाजात सुधारणेला अनुकूल वातावरण निर्माण होत असल्याचे चिन्ह आहे. अलीकडच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारने महिलांच्या प्रश्नांचा विचार करून, महिलांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांना सामाजिक न्याय आणि घटनात्मक अधिकार मिळवून देण्यासाठी महिला आयोगाची स्थापना केली, परंतु या महिला आयोगामध्ये मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नांकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले आहे. या प्रश्नांबाबत उदासीनता दाखवली आहे, हे परिवर्तनवादी चळवळींच्या दृष्टीकोनातून दुर्दैव म्हणावे लागेल.

हमीद दलवाईंनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या रूपाने जी मशाल पेटवली, ती त्यांच्या निधनामुळे विझलेली नाहीच; पण अनेक मशाली तिच्यामुळे पेटलेल्या असून, त्या मशाली मार्ग प्रकाशित करत आहेत. महाराष्ट्राबरोबरच गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू आणि इतर राज्यांत मंडळाचे कार्य पोचले आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ, मुस्लीम महिला मदत केंद्र, ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सद्वारे मंडळ आपले ईप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात आहे.

मुस्लीम समाजाचा जागतिक पातळीवर अभ्यास व्हावा आणि इस्लामचा अभ्यास व्हावा, यासाठी 'इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट' असावी, अशी इच्छा हमीद दलवाई यांनी आपल्या मृत्युपत्रात नमूद केली होती. वैचारिक अधिष्ठान मिळण्यासाठी आणि शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्यासाठी अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता आहे. हमीदभाईंची ही इच्छा मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पूर्ण होत आहे. २२ मार्च १९९५ रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात 'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट'ची स्थापना करण्याचा समारंभ आयोजित केला आहे.

मुस्लीम समाजातील प्रबोधनाचे कार्य अतिशय अवघड आहे. हिंदू समाजात असणाऱ्या प्रबोधनाच्या चळवळी, उदारमतवाद मुस्लीम समाजात रुजण्यासाठी अनेक वर्षे कार्य करावे लागणार आहे. हिंदू समाजात उदारपणे विचार करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था आहेत, हे अगदी अलीकडच्या उदाहरणावरून लक्षात येईल. 'रोजा' चित्रपटातील लोकप्रिय संगीतकार रेहमान यांना फिल्म ॲवॉर्ड आणि फाय फाऊंडेशनचा पुरस्कार मिळाला आहे. रेहमान हे मूळचे हिंदू. धर्मांतर करून ते मुस्लीम झाले, तरी त्यांच्या कर्तृत्वाची कदर करणारे उदार हिंदू आहेत. (दै. सकाळ, १९ मार्च १९९५)

(डॉ. शमसुद्दिन तांबोळी : 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे कार्यकर्ते आणि अध्यक्ष आहेत. 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चे संपादक, हमीद दलवाईंचे अभ्यासक, इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त अध्यापक आहेत.)

## ६.९ संघर्षाची पंचवीस वर्षे – हुसेन जमादार

"आता तुम्ही सन्मानाने मुस्लीम सत्यशोधक मंडळ बरखास्त करा" असा अनाहूत सल्ला आमच्या हिचिंतकांनी दिला.

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद हिंदुत्ववाद्यांनी निषेधात्मक पद्धतीने उदध्वस्त केली आणि गैरमुस्लीम मित्राचा धर्मनिरपेक्षतेवरील विश्वास डळमळीत झाला व त्यांनी वरील सल्ला दिला.

त्या आमच्या मित्रांचा दृष्टीकोन मुस्लीम सत्यशोधक मंडळाबद्दल असा होता की, धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या योगदानात मुस्लीम समाजाच्या बाजूने मंडळ काम करते आहे. मुस्लीम समाजात सुधारणावादी चळवळ चालवत आहे, मुस्लीम समाजाला धर्मातीत रिंगणात आणण्याचा प्रयत्न मंडळ करत आहे.

या धर्मातीत भूमिकेला भारतीय जनता पार्टी व तत्सम हिंदुत्ववादी संघटनांच्या बाबरी मशीद उध्वस्त करण्याच्या कृतीने सुरुंग लागला आहे. 'मग फक्त तुम्हीच का या भूमिकेवर राहता?', असा त्यांचा प्रश्न होता. अर्थात हा क्षणिक राग होता.

२२ मार्च १९७० रोजी म. जोतीराव फुले यांच्या परिवर्तनवादी कार्याचा वारसा घेऊन मुस्लीम समाजात काम करण्यासाठी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना करण्यात आली.

१८२७पासून राजा राममोहन रॉयपासून सुधारणा चळवळीची परंपरा भारतात सुरू होते. ते १९५६पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरापर्यंत ही परंपरा आहे. त्या मानाने मुस्लीम समाजात मात्र अहमद बरेलवी (१७८६-१८३१) यांनी 'वहाबी चळवळ' सुरू करून इस्लामी चालीरितींचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न केला. पुढे बंगालमध्ये याचीच एक शाखा 'फराईजी चळवळ' होय.

मिर्झा गुलाम अहमद यांना इस्लामच्या पुनरुज्जीवनाच्या भूमिकेतून १८८९मध्ये 'अहमदिया चळवळ' चालवली. धर्माचे शुद्धीकरण व व्यक्तिमत्त्वाचे पावित्र्य निर्माण करण्यासाठी मौलाना इलियास यांनी प. भारतातील मेवाड येथे 'तबलीग जमात' ही चळवळ १९२७ला सुरू केली, खऱ्या धर्मापासून मुसलमान लांब गेले आहेत, त्यांना खऱ्या इस्लामकडे नेण्यासाठी ही चळवळ काम करते. तसे पाहता ही चळवळ पुनरुज्जीवनवादी आहे.

सर सय्यद अहमदखानांनी (१८१७-१८९८) 'अलीगढ चळवळ' सुरू केली. राजकीय जागृती व आधुनिक शिक्षणाचा पाया या चळवळीने घातला.

स्वातंत्र्योत्तरकाळात भारतीय मुस्लिमांमध्ये तबलीग जमात चळवळी १९७०पूर्वी अस्तित्वात आल्या. त्या नव्याने जोम धरू लागल्या होत्या. परंतु स्वातंत्र्यानंतर भारतीय प्रजासत्ताकाने स्वीकारलेली नवीन मूल्ये धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद, समानता न्याय, व्यक्ती स्वातंत्र्य, विज्ञाननिष्ठा, इहवाद व राष्ट्रीयत्व ही मूल्ये भारतीय मुस्लीम समाजात रुजताना आढळत नव्हती. शिवाय हिंदू मुस्लीम यांच्यात घटनेने समानता यावी, मुस्लीम स्त्रीस समानतेचे अधिकार मिळावेत, उर्दूच्या आग्रहापोटी मुस्लिमांनी आपले शैक्षणिक नुकसान करून घेऊ नये, आधुनिकीकरणास

मुस्लीम समाजाने सामोरे जावे, त्यासाठी जरूर तर धर्माची चिकित्सा करावी कुटुंब नियोजनाच्या राष्ट्रीय कार्यात आमच्या समाजाने सहभागी व्हावे आणि राष्ट्रीय एकात्मतेस भारतीय मुस्लिमांनी हातभार लावावा, ही काळाची गरज होती.

तसेच भारतीय मुस्लीम समाजाने जगातील इस्लामी राष्ट्रांशी आपले भावनिक संबंध न जोडता, आपण भारतीय वंशाचे आहोत, धर्मांतरीत आहोत, याचे भान ठेवून या देशातील संस्कृतीशी एकरूप व्हावे, या विचाराच्या प्रचारासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली होती.

### 'मुस्लीम' शब्दाबद्दल आग्रह

मंडळ स्थापनेच्यावेळी 'मुस्लीम' हे नाव घ्यावे की नाही, या विषयावर बरीच चर्चा झाली. आम्हा तरुण कार्यकर्त्यांना 'मुस्लीम' असे जमातवादी नाव नसावे, असे वाटत होते. मरहूम हमीद दलवाईंनी यावर आपला अनुभव सांगितला म्हणाले, “सुरुवातीला मी काम सुरू केले, तेव्हा मलाही तसेच वाटत होते. म्हणून आम्ही हेच काम करण्यासाठी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली. प्रा. ए. बी. शहा अध्यक्ष, मी उपाध्यक्ष म्हणून काम करत होतो. पुढे दोन वर्षांत माझ्याशिवाय दुसरा कोणी मुस्लीम या सोसायटीत आम्ही आणू शकलो नाही. अनेक मुस्लिमांना भेटलो, चर्चा केली, पण त्यांचा सहभाग लाभला नाही, कारण हे मुस्लिमांसाठी आहे, असे त्यांना वाटत नव्हते. दोन वर्षांनंतर आमच्या लक्षात आले की, 'मुस्लीम' हे नाव घेऊन काम केले, तरेच मुस्लीम समाज याची दखल घेतो. 'मुस्लीम' या नावामुळे ते आपल्यासाठी आहे, असे मुस्लिमांना वाटते, तेव्हा त्याला पर्याय नाही. आपल्या संघटनेच्या नावात 'मुस्लीम' हा शब्द असलाच पाहिजे.”

हमीदभाईंचे अनुभवांचे बोल होते, तरी आम्ही होय-नाही करत ते स्वीकारले. त्यामुळे 'मुस्लीम' हे नाव का घेतले, याचा खुलासा मंडळाच्या जाहीरनाम्यात करण्यात आला आहे. खुलासा असा, वास्तविक स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना विशिष्ट धर्मगटासाठी मंडळे स्थापण्याची आवश्यकता असायला नको होती याची जाणीव आहे. परंतु मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र त्या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची ही दरी नष्ट होईल, तेव्हा हे मंडळ मुस्लीम समाजापुरते कार्य करणार नाही. एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळया अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही. ती अवस्था यावी आणि लवकर यावी, म्हणून हे मंडळ कार्य करत राहील.

आज पंचवीस वर्षानंतर मात्र या अवस्थेकडे वाटचाल करण्याऐवजी 'मुस्लीम मराठी साहित्य परिषद', 'मुस्लीम ओ.बी.सी. संघटना' स्थापन झाल्या आहेत. याही आधी 'यंग मुस्लीम असोसिएशन' (अमरावती), 'तरक्की पसंद मुस्लिमिन' (समाजवादी पक्षात गेलेले हुसेन दलवाई यांनी स्थापन केलेली व अल्पायुषी ठरलेली संस्था), 'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स' (मुस्लीम सत्यशोधक मंडळाने स्थापन केलेले राष्ट्रीय व्यासपीठ, स्थापना १९८७, कोल्हापूर)

वरील संघटना व संस्था 'मुस्लीम' नावाचा अंतर्भाव करूनच उभ्या राहिल्या.

दुसऱ्या बाजूला धर्मनिरपेक्षता कुचकामी आहे, अशी उघड भूमिका घेऊन हिंदुत्ववादी संघटना अस्तित्वात आल्या.

**मुस्लीम समाजाशी बांधीलकी**

मुस्लीम सत्यशोधक मंडळ स्थापन करण्याच्या प्रक्रियेपर्यंत येईपर्यंत, आम्ही आपापल्यापरीने मुस्लीम समाजात काही काम करावे  या प्रेरणेने भारावलेलो होतो व कामही करत होतो.

मरहूम हमीद दलवाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी मुंबईत कौन्सिल हॉलवर सात मुस्लीम स्त्रियांचा मोर्चा काढला होता. या मोर्चाने द्विभार्या बंदी कायदा मुस्लिमांना लागू करावा, अशी मागणी केली होती.

प्रस्तुत लेखकाने १० डिसेंबर १९६९ रोजी 'सामाजिक सुधारणा यही लक्ष्य' या शीर्षकाचे पत्रक प्रसिद्ध करून कोल्हापूरातील मशिदीत चर्चा घडवून आणली होती. त्यात तोंडी तलाकपासून मुस्लीम स्त्रीस संरक्षण मिळावी, तिला शिक्षण मिळावे, कुटुंबनियोजन व द्विभार्या प्रतिबंधक कायदा मुस्लीम समाजाने स्वीकारावा, तसेच मशिदीतून सामाजिक सुधारणेचे शिक्षण दिले पाहिजे अशी मागणी केली होती.

याच काळात पुण्यात 'साधना' साप्ताहिकातर्फे हमीद दलवाईंची व्याख्याने आयोजित केली होती. तिथे सय्यदभाई, अमीर शेख व सय्यद मुनीर यांची हमीदभाईंशी भेट होऊन मुस्लीम समाजात काम करण्यासाठी एखादी संस्था सुरू करण्याविषयी चर्चा झाली होती.

पुढे आम्ही सर्व एकत्र आलो व मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.

**सामाजिक मंचाची निर्मिती**

मुस्लीम समाजातील मंडळींनी एकत्र येऊन आपल्या समस्याबद्दल विचार करणारा मंच अस्तित्वात नव्हता. मुस्लीम एकत्र यायचे ते मशिदीत किवा राजकीय मंचावर. ही कोंडी फोडण्याचे काम मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केले व त्याचे महत्त्व मुस्लीम समाजात काम करू इच्छिणाऱ्यांना पटले आणि ती मंडळी अनायासे मंडळाच्या कार्यात सहभागी झाली. उदाहरणादाखल सोलापूरचे प्रा. एफ. एच. बेन्नूर, अमरावतीचे वजीर पटेल, पुढे राजकारणात पडलेले हुसेन दलवाई, भारती विद्यापीठात काम करणारे प्रा. के. जी. पठाण, अब्दुल कादर मुकादम (कालांतराने ही मंडळी मंडळ सोडून गेली असली, तरी ते करत असलेल्या कार्यात मंडळ हस्ते परहस्ते मदत करतच आहे.)

प्रस्थापित जमातवादी मुस्लीम नेतृत्वाला बाजूला ठेवून प्रत्यक्ष सर्वसामान्य मुस्लिमांना भेटून त्यांच्याशी संवाद निर्माण करण्याचा कार्यक्रम मंडळाच्या वतीने सुरुवातीच्या काळात हाती घेण्यात आला. पुण्यात मोमिनपुऱ्यात जाऊन जनसंपर्काची मोहिम सुरू केली. जमातवादी नेतृत्वाने त्यास आक्षेप घेतला, पण त्यांना न जुमानता काम चालू ठेवले. तेव्हा हमीद दलवाई व कार्यकर्त्यांवर लाठीहल्ला झालेला आहे.

या विरोधाला मंडळ व मंडळाच्या नेत्यांच्या भूमिका कारणीभूत ठरल्या. उदा., मंडळाने घेतलेली समान नागरी कायद्याची भूमिका व मरहूम हमीद दलवाई यांची नास्तिकतेची भूमिका, १९६५च्या दरम्यान भारतीय जनसंघाने (भारतीय जनता पक्ष) मुस्लिमांच्या 'भारतीयीकरणा'ची घोषणा सुरू केली होती व सत्ताधारी पक्षातर्फे मुस्लिमांना अधिक सवलती दिल्या जातात, असा खोटा प्रचार सुरू केला होता. हिंदुत्ववाद्यांच्या या भूमिकेशी मंडळाची समान नागरी कायद्याची मागणी जोडण्यात आली. आणि दलवाईंच्या नास्तिकतेच्या भूमिकेने विरोधकांना मंडळाला बदनाम करण्यास दुसरे फारसे काही करावे लागले नाही.

खरे पाहता नास्तिकता ही दलवाईंची व्यक्तिगत भूमिका होती, म्हणून ती बाजूला ठेवून विचार करता, मुस्लीम समाजातील रूढीप्रियता तसेच शिक्षणाचा अभाव, त्यामुळे मुस्लीम महिलांना मिळणारी वागणूक पाहता आमचा समाज फार मागासलेला राहिला आहे. यासाठी कायद्याचे संरक्षण मुस्लीम भगिनींना मिळवून देणे आम्हा मुस्लीम सत्यशोधकांना आवश्यक वाटले, म्हणून आम्ही मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न पुढील काळात अग्रक्रमाने घेतले.

तसेच मुल्ला-मौलवीच्या चुकीच्या प्रचारामुळे मुस्लीम समाज रसातळाला जातो आहे. म्हणून महात्मा जोतीराव फुल्यांप्रमाणे पुरोहितशाही विरुद्ध आंदोलन करणे, हे मंडळाचे धोरण असल्याने धर्मचिकित्सेला मंडळाने सुरुवात केली, यातूनही मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नावर अधिक लक्ष केंद्रित झाले.

हिंदू-मुस्लीम यांच्यात घटनेने समानता यावी व मुस्लीम स्त्रीला आवश्यक ते अधिकार प्राप्त व्हावेत, यासाठी मंडळाने समान नागरी कायद्याचा पुरस्कार केला. तलाकपीडित महिलांच्या हक्कासाठी विशेषतः त्यांना पोटगी मिळावी म्हणून मंडळाने सतत संघर्ष केला. १९७४ ते १९८६पर्यंत उपलब्ध असलेल्या पोटगी कायद्याच्या आधारे अनेक तलाकपीडित महिलांना पोटगी मिळवून दिली. याच्यासाठी मदत केंद्रे चालवतो आहोत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतो आहोत, तलाकपीडित स्त्रियासाठी उद्योग केंद्र चालवतो आहोत.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य जाहीर सभा, परिषदा, मोर्चे, धरणे, उपोषणे, प्रकाशने, पत्रके, मुखपत्रे आणि स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर सहविचारी संघटनानी आयोजिलेल्या कार्यक्रमात सहभाग, सर्वेक्षण व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे अशा विविध पातळ्यांवर चालते.

मंडळाच्या स्थापनेपासून गेल्या पंचवीस वर्षांत २५ परिषदा, त्यापैकी राष्ट्रीय पातळीवर ११ (दिल्ली, गुजरात, तामीळनाड़, कर्नाटक, आंध्र व महाराष्ट्रात या परिषदा झाल्या.) राज्य पातळीवर ७, स्थानिक पातळीवर ७, १३ शिबिरे, १९ मोर्चे, निदर्शने, धरणे, उपोषणे आयोजित केली. शिवाय नोव्हेंबर१९८५ मध्ये ४० कार्यकर्त्यांनी- पैकी २२ स्त्रिया, महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांत चालवलेले जागृती अभियान 'तलाक मुक्ती मोर्चा' कोल्हापूर ते नागपूर आणि पुढे दिल्लीस गेला. तिथे पंतप्रधान व राष्ट्रपतींना मुस्लीम महिला भेटल्या व शहाबानो केस प्रकरणी लागलेला निकाल (घटस्फोटित मुस्लीम स्त्रीस तिच्या हयातीपर्यंत पोटगी मिळावी) कायम राहावा, अशी मागणी केली.

याशिवाय १४ चर्चासत्रे, ४ संपर्क मोहिमा व अनेक व्याख्याने आयोजिली, तसेच आपले विचार जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी मंडळाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी १२५ लेख विविध वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून लिहिले. ‘मुस्लीम सत्यशोधक पत्रिका’ व ‘पुरोगामी मुस्लीम’ ही नियतकालिके चालवली आाहेत.

मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नाव्यतिरिक्त महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषद (मुंबई), फॉरवर्ड बुकींग मुस्लीम कॉन्फरन्स (दिल्ली), मुस्लीम शिक्षण परिषद (कोल्हापूर), ऑल इंडिया प्रोग्रसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स (कोल्हापूर), राज्यस्तरीय सांप्रदायिक सद्भावना परिषद (कोल्हापूर), बाबरी मशीद सुलह समिती परिषद (पुणे), इ. कार्यक्रम घेतलेले आहेत.

हिंदू-मुस्लीम दंगलीचा अभ्यास करण्यासाठी १९७८ साली एक अभ्यास गट उत्तर प्रदेशातील अलिगढ  येथे गेला होता. या शिवाय महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील १२२ गावांतून व २० शहरांतून ५००० (पाच हजार) मुस्लीम कुटुंबाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सर्वे केलेला आहे. बाबरी मशिदीचा प्रश्न चिघळला, तेव्हा ‘बाबरी मशीद सुलह समिती’ स्थापन करून सामोपचाराने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.

**जमातवादी मुस्लीम नेतृत्व**

मुस्लिमांचे म्हणून जे नेतृत्व  आहे, ते आपमतलबी व स्वार्थी आहे आणि त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते मुस्लिमातील वरच्या वर्गाचे आहे. त्याचे प्रश्न व सर्वसामान्य मुसलमांनाचे प्रश्न वेगळे आहेत आणि त्यांनी त्या प्रश्नांशी कांही संबंध नसतो. आपलं नेतृत्व  बळकट करण्यासाठी ते असे प्रश्न वापरत असतात. उदा. बाबरी मशिदीचा प्रश्न. सर्वसामान्य मुसलमानांचा या प्रश्नांशी काही संबंध नव्हता. खरी तर ती मशीद मुस्लिमांतील अल्पसंख्य असलेल्या शिया पंथीयांची आहे. (मशिदीची बांधणी मीर बाकी या शिया मुस्लिमाने केली, परंतु कालांतराने त्याचे व्यवस्थापन आणि नियंत्रण सुन्नी मुस्लिमांकडून करण्यात आले.) एरवी या दोन पंथांत - शिया व सुन्नी - हाणामाऱ्या होत असतात. परंतु दिल्लीच्या सुन्नीपंथीय नेतृत्वाने  या प्रश्नावर मुसलमानांना लढवले. अर्थात हिंदुत्ववादी संघटनांनी ज्या पद्धतीने बाबरी मशीद उद्ध्वस्त केली, ती घटना निषेधार्ह आहे.

मुसलमानांचे दारिद्र्य, निरक्षरता, बेकारी, बेरोजगारी यापैकी एकाही प्रश्नावर मुस्लीम नेतृत्वाने  आंदोलन उभे केल्याचे दिसत नाही.

बाबरी मशिदीच्या प्रश्नावर सामोपचाराचा मार्ग स्वीकारून मशींद दुसरीकडे हलवली असती, तर देशभर हिंदू-मुस्लिमात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले असते व दुसऱ्या बाजूने धर्मनिरपेक्ष शक्तींशी सहकार्य निर्माण होऊन हिंदुत्ववाद्यांवर दबाब निर्माण करता आला असता. पण याचेही कारण बहुसंख्य म्हणजे एकूण मुस्लीम समाजापैकी ७५ टक्के असलेल्या खालच्या वर्गातील मुसलमानात जागृती नसणे व त्यांचे नेतृत्व नसणे हे आहे. त्यामुळे हा वर्ग या जमातवादी नेतृत्वाच्या मागे अंधपणाने जातो.

खरे पाहता या खालच्या वर्गात मोठ्या प्रमाणावर तलाक घेतात. त्याच्या दृष्टीने घटस्फोटित

स्त्रीस तहहयात पोटगी मिळावी, हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल म्हणजे वरदान होता. त्याप्रमाणे देशभरात अनेक तलाकपीडित स्त्रिया कोर्टात जाऊन पोटगी मिळवत होत्या. काही प्रमाणात एकतर्फी घटस्फोटाला लगाम बसला होता, परंतु जमात-ए-इस्लामी व इतर जमातवादी मुस्लीम नेतृत्वाने हा निकाल म्हणजे कुराणात हस्तक्षेप आहे असा पुकारा केला व मुस्लिमांचे मोर्चे संघटित केले, तेव्हा खालच्या वर्गातील मुस्लीम शेळ्या-मेंढ्याप्रमाणे त्यांच्या मागे गेलेला दिसला.

उलट आम्ही तलाक मुक्ती मोर्चा घेऊन प. महाराष्ट्रात विदर्भ-मराठवाड्यात फिरलो, तेव्हा अनेक मुस्लीम आम्हाला भेटत होते, 'हा कायदा कायम रहावा', असे सांगत होते, परंतु ते व्यक्तिगतरित्या मंडळाच्या मागणीला पाठिंबा देतात, पण समाज म्हणून ते मंडळाच्या विरोधात असतात असे चित्र दिसले.

या मुस्लीम नेतृत्वाने गेल्या पंचवीस वर्षांत उभी केलेली आंदोलने पाहिल्यास असे दिसते की, अरब-इस्त्राइल युद्धात अरबांना पाठिंबा दिला आणि अल-अक्सा मशीद अरबस्तानात जळाली तेव्हा भारतात निषेध मोर्चे काढले. (१९६८)

इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकात हजरत मुहम्मद पैगंबरांच्या संदर्भात 'मक्केहून मदिनेला पलायन केले' असे विधान होते. त्या विरुद्ध आंदोलन करून 'पलायन'ऐवजी 'स्थलांतर' असा बदल करून घेण्यात यशस्वी झाले. मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाची स्थापना केली.

१९७५ साली आणीबाणीच्या काळात मशिदीवर स्पीकर लावण्यास तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडून परवानगी मिळवली.

सलमान रश्दीनी लिहिलेल्या 'सटॅनिक व्हर्सेस्' या पुस्तकात पैगंबरसाहेबांची बदनामी झाली, म्हणून या पुस्तकावर भारतात बंदी घालावी, म्हणून ठिकठिकाणी निघालेल्या मोर्च्याला हिंसक वळण लागून काही गरीब मुसलमान पोलिसांच्या गोळीबारात मरण पावले. तर १९८५ साली शहाबानो केस निकाल प्रकरणी आंदोलन उभे करून, तो निकाल रद्द करून घेण्यात ते यशस्वी झाले. त्याला राजीव गांधी शासनाने 'मुस्लीम महिला विधेयक १९८६' हा 'काळा कायदा' पास करून हातभार लावला व अशातूनच पुढे बाबरी मशीद-राम जन्मभूमी वाद उफाळून आला.

तबलीग जमात या नावाने उभ्या असलेल्या मूलतत्त्ववादी चळवळीने मुस्लिमांना त्याच्या वेगळ्या 'आयडेंटीटी'ची जाणीव करून दिली व 'चेहरे पे दाढी, सरपे टोपी' आणि 'इस्लामिक लिबास' ही बाह्यावडंबरे निर्माण करून मुसलमांनाना भारतीय समाजापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला.

**मंडळांचे यशापयश**

मुस्लिमांचे प्रश्न, धर्मपरंपरेत सुधारणा या गोष्टी मंडळाने प्रथमच ऐरणीवर घेतल्या. मुस्लीम समाजाच्या सांस्कृतिक इतिहासात धर्मनिरपेक्षतावादी सुधारणा, हा संघटित पहिला प्रयत्न मंडळाने केला. या चळवळीला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली, पण ही चळवळ नास्तिक लोकांची चळवळ आहे, असा गैरप्रचार झाल्याने मुस्लीम यापासून काही प्रमाणात लांब राहिले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लिमांचे आर्थिक प्रश्न चळवळीचा मुद्दा बनवले नाहीत. त्यामुळे ही मुस्लिमांचा पाठिंबा कमी मिळाला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रा. मुमताज रहिमतपुरे व ॲड. अब्दुल शेख यांच्या मृत्यूनंतर कबरस्थानात दफन करण्यास विरोध झाला. त्याचा परिणाम म्हणून मंडळाच्या काही कार्यकर्त्यांनी मंडळाचा त्याग केला.

सुरुवातीच्या काळात मंडळाच्या काही नेत्यांनी 'जमातवादी मुस्लीम' नेतृत्वाऐवजी मुस्लीम समाजालाच 'राष्ट्रद्रोही' ठरवण्याची चूक केली. त्यामुळे मंडळावर 'हिंदुत्ववाद्यांचे हस्तक' असा आरोप झाला. मंडळाच्या सुरुवातीपासूनच मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत झाल्याने मुस्लीम युवक चळवळीपासून लांब राहिला.

असे असले तरी आता २५ वर्षांच्या अखेरीस मंडळाने विधायक कार्याकडे लक्ष पुरवले आहे. कोल्हापुरात तलाकपीडीत महिला उद्योग उभा राहिला. मुस्लीम समाजप्रबोधन व शिक्षण संस्था उभी राहिली. त्यातून युवकासाठी ट्रेनिंग कोर्सेस सुरू आहेत. महिलांना उद्योग मिळतो आहे.

कुटुंबनियोजनाच्या कामी विदर्भात वजीर पटेल यांनी मुस्लीम समाजात मोठे काम केले आहे.

पुण्यात नुकतीच 'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिटट्यूट' स्थापन करण्यात आली आहे. त्यातून इस्लाम व मुस्लीम समाजाचा अभ्यास व संशोधन सुरू होते आहे.

'ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स' हा मंच स्थापन करून सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.

मुस्लीम मराठी साहित्य परिषद निर्माण झाली आहे. त्यातून मुस्लीम समाजातील समस्या व संकल्पनावर लिखाण पुढे येऊ लागले आहे. यातून मुस्लीम समाजाची पाळेमुळे समोर येतील व येथील दलित व भटक्या विमुक्तांशी आमचा समाज जोडला जाण्याची प्रक्रिया सुरू होईल.

'मुस्लीम ओ.बी.सी. संघटने'ने ही प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे मुल्ला-मौलवींच्या इशाऱ्यावर अधांतरी जगणारा मुस्लीम समाज जमिनीवर पाय टेकेल व भारतीयत्वाशी एकरूप होईल आणि तळागाळातील मुस्लिमातील राजकीय व सामाजिक नेतृत्व तयार होईल व मुस्लीम प्रबोधनांची सुरुवात या वर्गातून पुढे येईल. तेव्हा मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची गरज उरणार नाही.

*(मुस्लीम महिला परिषद विशेषांक, एप्रिल १९९६, पृ. क्र. ५ ते ८)*

*(हुसेन जमादार : मंडळाच्या स्थापना काळातील कोल्हापूर भागातील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी अध्यक्ष, 'जिहाद' या पुस्तकाचे लेखक, 'पुरोगामी मुस्लीम'चे संपादक आणि 'मुस्लीम समाजप्रबोधन संस्था'चे संस्थापक अध्यक्ष.)*

## ६.१० सत्यशोधकांची चाळीशी! – हरीश कैंची

मुस्लीम जगतात चाळीस वर्षांपूर्वी एक क्रांतिकारी घटना घडली. रूढीचुस्त समजल्या जाणाऱ्या मुस्लीम समाजातील सुशिक्षित तरुणांनी हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात भारतीय मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली आणि केवळ मुस्लीम समाजाच्या दृष्टीनेच नव्हे, तर भारताच्या दृष्टीनेही आवश्यक असलेल्या अशा एका महत्त्वपूर्ण कार्याचा शुभारंभ केला. वास्तविक १९४७ साली देशाची फाळणी होऊन केवळ मुस्लीम भागाचे 'पाकिस्तान' हे वेगळे राष्ट्र निर्माण झाल्यावर, निधर्मी राजवटीचा डांगोरा पिटणाऱ्या भारतात हिंदू-मुस्लीम हा प्रश्न निर्माण व्हायला नको होता; परंतु धर्मांध मुस्लीम नेत्यांचे वाढते हट्ट आणि मतांच्या प्रलोभनापायी त्यांना सदैव झुकते माप देणारे स्वार्थी राज्यकर्ते, यांच्यामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र आणि गुंतागुंतीचा होत गेला आहे. अशा परिस्थितीमुळे 'येथील मुसलमानांची कधीही प्रगती होणे शक्य नाही, ते नेहमीच मागासलेले राहणार' हे शल्य दूर करण्यासाठी तळमळीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.

देशात समान कायदा त्वरित झाला पाहिजे, उर्दूचा हट्ट सोडून प्रादेशिक भाषेतून शिक्षण घ्यायला पाहिजे, मुस्लीम स्त्रियांना पुरुषांसमान हक्क मिळाले पाहिजेत, सवत आणणे आणि तोंडी तलाक देणे या गोष्टी कायद्याने बंद झाल्या पाहिजेत आणि भारतीय समाजात प्रबोधनाच्या मार्गाने इहवादाची-सेक्युलॅरिझमची मूल्ये रुजवली पाहिजेत, अशा पाच महत्त्वाच्या गोष्टींच्या पूर्ततेसाठी झटण्याचे कार्य मंडळाने स्थापनेपासूनच हाती घेतलेले आहे.

मंडळाच्या कामात अडचणींचे प्रचंड डोंगर आहेत. पूर्णतः अडाणी समाज, धर्मांध नेत्यांची हुकूमशाही, आर्थिक साहाय्य कोठूनही नाही, शारीरिक हल्ल्याची दहशत, अशाही बिकट परिस्थितीत मंडळाने आपले कार्य सुरू ठेवले आहे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी तलाकपीडित महिलांचे मेळावे घेऊन, त्यातून त्यांच्या वेदना बोलक्या केल्या आहेत. अशा परिषदा जगात बहुधा पहिल्यांदाच झाल्या असाव्यात.

कुटुंबनियोजनाचा प्रचार-प्रसार मुस्लीम महिला कार्यकर्त्यांनीच सनातनांच्या हल्ल्यांना तोंड देऊनही सातत्याने जारी ठेवला आहे. पुण्याच्या मोमिनपुरा परिसरात हमीद दलवाई आणि त्यांचे सहकारी मुस्लिमांना समजून सांगण्यासाठी आले असताना, त्यांना प्रचंड मारहाण झाली, रक्तबंबाळ झाले; पण त्यांनी आपले म्हणणे सोडले नाही. तेथे जमलेल्या मूठभर मुसलमानांसमोर आपलं म्हणणं निर्धारानं मांडलं.

असेच हल्ले देशातील इतरत्रही त्यांच्यावर झाले, पण घेतला वसा त्यांनी टाकला नाही; उलट मोठ्या जोमाने त्यांनी त्याचा विस्तार केला. हमीद दलवाईंचे निधन झाले. तथापि, या आघाताने खचून न जाता कार्यकर्त्यांनी आपलं काम चालू ठेवले आहे. बाबुमियाँ बँडवाले, सय्यदभाई, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, रशिद शेख आदी मंडळींनी ही जबाबदारी मोठ्या नेटाने चालवली आणि चालवताहेत. मुंबई, पुणे, नगर, कोल्हापूरपासून राज्यातील प्रमुख शहरात मंडळाला तळमळीचे

कार्यकर्ते लाभले आहेत.

पुरोगामी चळवळीला वाहिलेली 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' ही मराठीतून पुण्यातून प्रसिद्ध होत असे, तर अमरावतीहून 'बागबान' हे उर्दू साप्ताहिक प्रकाशित होते. मुस्लीम धर्माच्या स्थापनेपासून तेराशे वर्षांच्या काळात जे कधीही घडून आले नव्हते, पण सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनं एक अद्‌भुत घटना घडली. एक पणती पेटवली. अनेक पणत्या तिच्यावरून पेटवल्या जावोत आणि त्याचा प्रकाश मुस्लीम जगतावर लवकर उजळो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. त्याला आज चार दशके उलटली. प्रवाहाच्या विरोधात पोहताना दमछाकही होतेच, परंतु जिद्दीच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न सोडलेला नाही. 'हम होंगे कामयाब' या आशेवर आजही लवताहेत आधी राष्ट्र आणि नंतर धर्म! ही संकल्पना खरं तर प्रत्येकाच्या मनात असायला हवी, पण इतिहासात रममाण होणारी मंडळी या संकल्पनेच्या आड येताहेत. चाळीस वर्षांच्या खडतर वाटचालीनंतर आता कुठे सत्यशोधकांचा क्षीण आवाज दूरवर पोहोचतो आहे.

शैक्षणिक प्रगतीने अनुभवतो आहे. आजवर देशात असलेल्या मुस्लीम समाजाकडे 'व्होट बँक' म्हणून पाहिले गेले, किंबहुना त्यांची ओळख तशीच राहावी, यासाठी प्रयत्न झाले, पण त्यांना समान दर्जा देऊन राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला नाही, असे खेदाने म्हणावे लागेल. राजकीय मतलबांसाठी मुस्लिमांना धर्मांध बनवून त्यांना अलग ठेवले गेले. अयोध्येच्या प्रश्नानंतर हिंदू-मुस्लिमांमधील दरी आणखी रुंदावत गेली. याला सगळ्याच राजकीय पक्षांनी हातभार लावला. देश खरोखरीच निधर्मी असेल, तर राज्यकर्त्यांना आणि सर्व राजकारण्यांनी त्यांचे वर्तन शुद्ध ठेवायला हवे. सर्वांचे समान कायद्याबरोबरच कुटुंबनियोजनही व्हायला हवे.

अनेक मुस्लीम राष्ट्रांनी ते धोरण स्वीकारलंय. सर्वच नागरिकांना समान दर्जा मिळाला, तर जात आणि धर्माचे अवडंबर कमी होईल. राजकारणातील सारेच पक्ष या अशा विचाराने जाताना दिसत नाहीत; पण यातच दुहीची बीजे आहेत. हे घडले तर मुस्लीम राष्ट्रीय प्रवाहात येण्यास कोणतीच हरकत नाही. दुर्दैवाने असा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी कोणाचेच बळ नाही. वास्तविक अशा पुरोगामी, प्रागतिक मुस्लीम नेत्यांच्या पाठीशी राजकीय पक्षांनी खंबीरपणे उभं राहायला हवंय. आज ते एकाकी लढताहेत ते एकात्मतेसाठी, राष्ट्रीयत्वासाठी मुस्लिमांचे भारतीयकरण करण्यासाठी! त्यांच्या एकाकी लढ्याला या पुढील काळात यश लाभो हीच *सदिच्छा! चाळीसाव्या वर्धापनदिनाच्या शुभेच्छा!*

*(दै. 'पुण्यनगरी'मध्ये २२ मार्च २००९ रोजी प्रकाशित)*

*(हरीश कैंची : विविध वर्तमानपत्रांत पत्रकारिता, सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांशी संबंधित. 'पुण्यनगरी', 'सामना' या दैनिकांचे माजी संपादक.)*

## ६.११ एकगठ्ठा मतदानासाठी मुस्लीम वेठीस धरले जातात – सय्यदभाई

*प्रश्न : मुस्लीम समाजातील सद्यःकालीन स्थिती नेमकी कशी आहे?*

– आज समाजसुधारणा करण्याचा काळ राहिला नाही. सर्व जगातील मुस्लीम समाज आज भयभीत झाला आहे. स्थिरपणा नावालाही शिल्लक राहिलेला नाही. सगळा समाजच गुन्हेगार, दहशतवादी आहे, या नजरेनेच आज पाहिले जाते. दिवसेंदिवस समाजात बेकारी वाढत आहे. बेकारी जेवढी वाढेल, तेवढी गरिबी वाढते. जो समाज स्वतःच्या प्राथमिक गरजा भागवू शकत नाही, तो समाज निराशेपोटी मूलतत्त्ववादाकडे वळतो, हा इतिहास आहे.

भारतातील मुस्लीम समाजाची अवस्था यापेक्षा फारशी वेगळी नाही. ज्या मुस्लीम देशांत सुधारणा झाल्या, ते देशही आज पुन्हा मूलतत्त्ववादाला बळी पडत आहेत. समाजसुधारणेला योग्य वातावरण मिळत नाही. याचा परिणाम म्हणून प्रबोधन, परिवर्तनाची गती फारच मंदावली आहे.

*प्रश्न : भारतातील मुस्लीम समाजसुधारणेचा वेग का मंदावला आहे?*

– केवळ भारतातीलच नव्हे, तर जगभरातील मुस्लीम समाज आणि मुस्लीम समाजातील समाजसुधारणा या विषय नेहमीच परिवर्तनवाद्यांच्या जिव्हाळ्याचा ठरला आहे. किमान भारतात तरी मुस्लीम समाज सुधारणेबाबत हिंदू समाजाच्या शंभर वर्षे मागे आहे. इस्लाममध्ये 'कुराण' या धर्मग्रंथाला प्रमाण मानल्यामुळे सुधारणेला आणि परिवर्तनाला अत्यंत कमी वाव आहे. परिणामी जगभरातील मुस्लीम समाजात सुधारणेचा वेग अत्यंत कमी अथवा जवळपास नगण्य आहे. लोकशाही अथवा हुकूमशाही राज्यव्यवस्था असणाऱ्या इस्लाम राष्ट्रांत सामाजिक सुधारणा झालेली दिसत नाही, याचे मुख्य कारण कडवा मूलतत्त्ववाद हेच आहे.

भारताबाबतही हीच अवस्था आहे. शिवाय येथील समाज अल्पसंख्याक असल्याने समाज सुधारणेबाबत कोणताही प्रश्न ऐरणीवर आला की, 'इस्लाम खतरे में हैं!' अशी आरोळी ठोकून सर्व समाजाला रस्त्यावर येण्यासाठी प्रवृत्त केले जाते. शहाबानो पोटगी खटल्यात हेच पाहावयास मिळाले. मुळात सुप्रीम कोर्टने १९७४ सालीच 'ताहेराबी' यांना पोटगी मिळावी, असा निकाल दिला होता; मात्र भिंद्रनवाल्यांच्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर १९८४चा शहाबानो खटला समोर आल्याने आणि राजकीय दवाबगट निर्माण केल्याने राजीव गांधींनी ही पोटगी रद्द केली. यामुळे देशातील समाजसुधारणा चळवळीला मोठा फटका बसला.

मुळात शरीयत कायदा इंग्रजांनी जवळपास ९८ टक्के रद्द केला आहे. त्या वेळी कोणी 'इस्लाम खतरे में है!' अशी आरोळी दिली नव्हती. सध्या विवाह, तलाक, वारसा आणि दत्तक कायदा इतकाच शरीयत कायदा शिल्लक आहे. शरीयत कायदा १,५०० वर्षांपूर्वीचा आहे. त्या काळातील समाज आणि आजचा समाज यात जमीन–आसमानचा फरक आहे. त्यामुळे शरीयत कायद्याचे पुनर्मूल्यांकन करणे गरजेचे आहे. शिवाय संपूर्ण शरीयत कायदा सध्या कुठल्याच देशात पाळणे शक्य नाही. केवळ स्वतःच्या सोयीपुरताच हा कायदा पाळला जातो आणि तसाच

अर्थ लावला जातो. ज्या मुस्लीम देशांत सुधारणा झाल्या, ते देशही आज पुन्हा मूलतत्त्ववादाला बळी पडत आहेत, समाजसुधारणेला योग्य वातावरण मिळत नाही. याचा परिणाम म्हणून प्रबोधन परिवर्तनाची गती फारच मंदावली आहे.

***प्रश्न : महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचा फायदा समाजसुधारणेसाठी झाला का?***

– फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांमुळे महाराष्ट्रात प्रबोधनासाठी पोषक वातावरण आहेच. याचा फायदा हमीद दलवाई यांना नक्कीच झाला. हमीदभाईंनी फक्त सात महिलांना बरोबर घेऊन मंत्रालयावर मोर्चा काढला होता. चळवळ उभी करण्यासाठी त्यांनी पुणे शहराची निवड केली. पुण्यात त्यांना पोषक वातावरण मिळालेच, पण त्याचबरोबर बाबा आढाव आणि भाई वैद्य यांनी चळवळ उभी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. केवळ त्यांच्या सहकार्यामुळेच पुण्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना झाली. आज केवळ महाराष्ट्रात समाजसुधारणेसाठी काम करणाऱ्या जवळपास ४० महिला संघटना आहेत, ही नक्कीच समाधानकारक गोष्ट आहे. महाराष्ट्रात समाजसुधारणेला इतर राज्यांच्या तुलनेत चांगले वातावरण आहे. तरीही याचा योग्य फायदा राज्याला उठवता आलेला नाही. हमीदभाई यांच्यानंतर त्यांच्याएवढ्या प्रतिभेचा नेताही चळवळीला मिळाला नाही. हमीदभाई आणि शरद पवार यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे चळवळीला त्यांचा सक्रिय पाठिंबा होता. हमीदभाईंनंतर मुस्लीम समाजातील सुधारणा चळवळीला राजकीय पाठिंबाही राहिला नाही.

***प्रश्न : भारतीय मुस्लिमांचा राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम यावर दहशतवादाचा विपरीत परिणाम झाला का?***

हा प्रश्न विचारताच सय्यदभाई अक्षरशः पेटून उठले आणि म्हणाले :

– पकडला गेलेला प्रत्येक दहशतवादी मुस्लीम आहे, पण त्यामुळे सगळा मुस्लीम समाज दहशतवादी होऊ शकत नाही. सामान्य मुस्लीम बांधव भारतभूमीला मातृभूमीच मानतात. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची किंवा राष्ट्रवादाची परीक्षा पाहण्याची गरज नाही. प्रत्येक मुस्लिमाने 'वंदे मातरम्' म्हटलेच पाहिजे. त्यात काहीच गैर नाही. हिंदू-मुस्लीम यांच्यातील तेढ ही काही मोजक्या पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी जाणीवपूर्वक निर्माण केली आहे. बाबरी प्रकरणानंतर ही तेढ वाढली, त्यामुळे समाजात अस्थिरता वाढली. याचा फायदा पाकिस्तानने उठवत तरुणांना दहशतवादी कारवायांसाठी चेतवले. याचा परिणाम म्हणून भारतातील दहशतवादी कारवाया मोठ्या प्रमाणात वाढल्या. जेवढ्या कारवाया वाढल्या, तेवढा भारतीय मुस्लीम बदनाम झाला.

***प्रश्न : सध्या हिंदू दहशतवादही वाढीस लागलेला दिसतो आहे. मुस्लीम दहशतवादाला उत्तर देण्यासाठी हा दहशतवाद वाढीस लागला आहे, असे तुम्हाला वाटते का?***

– सध्या मुस्लीम दहशतवादाला प्रतिकार करण्यासाठी हिंदू दहशतवाद वेगाने पुढे येत आहे; पण 'मुस्लीम दहशतवादा'ला 'हिंदू दहशतवाद' पर्याय होऊ शकत नाही. याचा परिणाम भारताच्या

विघटनात होईल, जे सामान्य जनतेच्या हिताचे नाही. काश्मीरचे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहे. आजही काश्मीर पेटते आहे. कोणत्याही प्रकारची स्थिरता तेथे नाही. दहशतवादी कारवायांमुळे संपूर्ण काश्मिरी पंडित विस्थापित झाले आहेत. त्यांच्यावर अन्याय झाला आहेच. त्यांना मुस्लीम समाजाविषयी प्रेम वाटण्याचे कारणच नाही. अशा प्रकारे मुस्लीम समाजविरोधी जे गट तयार होतील, ते फारच धोकादायक असतील.

***प्रश्न : सच्चर समितीने समाजाचे वास्तव चित्र मांडले आहे का?***

– समितीने समाजाचे वास्तव रूप पुढे आणले आहे. समाजातील नेत्यांनी यापासून धडा घ्यावा. शिक्षणाचा ढासळलेला दर्जा आणि त्यामुळे बोकाळलेली बेरोजगारी पाहता येणारा काळ समाजासाठी फारच आव्हानात्मक असणार आहे. केवळ शिक्षण आणि उदारमतवादी विचारच समाजाला अस्तापासून रोखू शकेल. मदरशातील शिक्षण हे धार्मिक असते. धर्म जाणून घेण्यासाठी ते जरूर घ्यावे; पण तरुणांनी आजच्या परिस्थितीत उपयोगी पडणारे व्यावहारिक शिक्षण घेणे गरजेचे आहे.

***प्रश्न : भारतातील राजकीय पुढारी मुस्लीम समाजातील सुधारणांविषयी उदार भूमिका का घेत नाहीत आणि तुम्ही तुमच्या कार्याविषयी समाधानी आहात का?***

– आज मुस्लीम समाजाविषयी कोणताही निर्णय घेताना समाजाचे एकगठ्ठा मतदान मिळावे, या दृष्टीनेच विचार केला जातो. त्यामुळे राजकीय स्वार्थासाठी समाजाला वेठीस धरले जात आहे. देशात जनावरांबरोबर, जंगली प्राण्यांबरोबर मानवतेने वागावे यासाठी कायदे केले जातात; पण मुस्लीम समाजातील महिलांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक मिळत आहे, त्याविषयी कोणीच बोलत नाही. ही फारच वाईट गोष्ट आहे. लग्न करताना जशी त्यांची सहमती घेतली जाते, तशीच तलाक देतानाही सहमती घेतली पाहिजे. त्यांना वारसाहक्क मिळाला पाहिजे आणि दत्तक वारसासंबंधी कायदा झाला पाहिजे. हे केवळ आम्ही मुस्लीम आहोत म्हणून नव्हे, तर एक माणूस म्हणून जगण्यासाठी भारत सरकारने हे कायदे केले पाहिजेत. केवळ मानवी मूल्यांच्या गप्पा मारून उपयोग नाही.

हमीद दलवाई यांचा मृत्यू आणि शहाबानोची पोटगी रद्द करण्याचा निर्णय यांमुळे सुधारणा चळवळींना मोठा फटका बसला आहे. मी माझ्या कामावर समाधानी नाही. हमीदभाईंनी जे पेरले ते आता उगवत आहे. त्यांच्या विचारांना जोपासण्याचे काम फक्त मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी केले आहे. समाजातील आई-बहिणींसाठीच आम्ही लढा उभारला; पण समाजाने आम्हाला कधीच आपले मानले नाही. सुधारणेच्या कार्याला फार गती देता आली नाही आणि चळवळीसाठी कार्यकर्त्यांची नवी फळी उभारता आली नाही, या गोष्टीचा खेद वाटतो. हमीदभाईंनी अजून केवळ १० वर्षे जरी आयुष्य मिळाले असते, तरी किमान महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे वेगळे चित्र दिसले असते.

(दै. प्रभात, २० फेब्रुवारी २०११)

*(सय्यदभाई : हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळातील आघाडीचे कार्यकर्ते होते. बहिणीच्या तलाकमुळे अस्वस्थ झालेल्या सय्यदभाईंनी तहहयात याच प्रश्नावर कार्य केले. हमीद दलवाई नंतरच्या काळात मंडळाचे नेतृत्व  करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. 'दगडावरची पेरणी' या आत्मकथनाचे लेखक.)*

## ६.१२ मशिदी प्रबोधनाची केंद्रे व्हावीत – हुसेन जमादार

*प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक चळवळीच्या कार्याचे स्वरूप?*

– भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाची फाळणी झाली. फाळणीनंतर येथील २० टक्के मुस्लीमच पाकिस्तानमध्ये गेले. उर्वरित 'मेरा देश, मेरी मिट्टी' या भावनेतूनच इथेच राहिले; पण स्वातंत्र्यानंतर बहुसंख्य मुस्लीम या देशाच्या मुख्य प्रवाहात आले नाहीत. शिक्षण, नोकरी, राहणीमान या सर्वच बाबतीत बहुसंख्य मुस्लिमांची अवस्था दयनीय झाली. मुस्लीम स्त्रियांना तलाकसारख्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रबोधनाची चळवळ म्हणून हमीद दलवाई यांनी २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

*प्रश्न : मुस्लीम समाजाची प्रमुख सामाजिक समस्या कोणती?*

– मुस्लीम स्त्रियांना पतीकडून मिळणारा 'तलाक' आणि शिक्षणाचा अभाव या प्रमुख समस्या मुस्लीम समाजाला भेडसावतात. 'शरीयत'ने स्त्रियांवर अनेक बंधने लादलेली आहेत. तलाकमुळे स्त्रीला गुलामीचे जीवन जगावे लागते. शरीयतनुसार मुस्लीम पती तलाक म्हणून त्याच्या पत्नीला घटस्फोट देतो. लग्नापूर्वी तिची संमती घेतली जाते; पण तलाक घेताना मात्र तिची संमती घेतली जात नाही. मुस्लीम पुरुष चार विवाह करू शकतो. पतीच्या या कृतीला कोणतेही कायदेशीर बंधन नाही. यामुळे मुस्लीम स्त्रियांचे जीवन असुरक्षित होते. शिवाय कुटुंबनियोजनाची समस्याही उद्‌भवते. मुस्लीम महिलांची तलाकमधून सुटका करण्यासाठी समान नागरी कायदा अस्तित्वात येणे आवश्यक आहे. यासाठी पंतप्रधान मोदी यांची भेट घेणार आहे.

*प्रश्न : तलाक समस्येसाठी आपल्या चळवळीचे योगदान?*

– आम्ही १९८५मध्ये कोल्हापूर नागपूर तलाकमुक्ती मोर्चा काढला. तोंडी तलाक कायद्याने रद्द व्हावा, अशी मागणी सरकारकडे केली. तसेच पन्नास तलाकपीडित महिलांना घेऊन दिल्ली येथेही मोर्चा काढला. १९७२मध्ये पहिली मुस्लीम महिला परिषद पुणे येथे घेतली. इस्लामच्या इतिहासात महिलांच्या न्याय्य हक्कांसाठी आयोजित केलेली जगातील ही पहिली परिषद ठरली. तलाक दिलेल्या महिलांसाठी मोफत कायदा सल्ला, तसेच रोजगार केंद्रे सुरू केली. १९८७ साली ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स कोल्हापूर येथे आयोजित केली. या परिषदेतून देशभरात १० ते १२ मुस्लीम महिला संघटना उदयास आल्या. मुस्लीम महिलांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागृती निर्माण झाली.

*प्रश्न : मुस्लीम आरक्षणाबाबत आपली भूमिका काय आहे?*

– भारतामधील एकूण मुस्लीम लोकसंख्येपैकी सुमारे ८० टक्के मुस्लीम हे धर्मांतरित आहेत.

यांपैकी बहुतांश मुस्लीम बांधवांचे पोट हातावर आहे. साहजिकच दारिद्र्य, आरोग्य आणि निकृष्ट राहणीमान, आदी समस्या हे समाजापुढील मोठे आव्हान आहे. त्यामुळे नोकरी आणि शिक्षणामध्ये मुस्लीम समाजाला आरक्षण दिले पाहिजे. मुस्लीम समाज नोकरीच्या प्रवाहात येण्यासाठी शिक्षणातील आरक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

***प्रश्न : मुस्लीम युवावर्गाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?***

– मुस्लीम समाजातील युवक-युवतींनी समाजप्रबोधनाच्या लढाईत सहभागी होणे आवश्यक आहे. मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध मार्गदर्शन शिबिरांत सहभाग घेऊन समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथांविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. इस्लामी देशांच्या तुलनेत भारत, बांग्लादेश हा स्वातंत्र्यपूर्व भारताचाच भाग असल्यामुळे इथे सुधारणांचे वारे वेगाने वाहू शकते. सुधारणांच्या या लढाईत तरुणांनी स्वतःला झोकून दिले पाहिजे.

*(दै. लोकमत, ८ जानेवारी २०१५)*

*(हुसेन जमादार : मंडळाच्या स्थापना काळातील कोल्हापूर भागातील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी अध्यक्ष, 'जिहाद' या पुस्तकाचे लेखक, 'पुरोगामी मुस्लीम'चे संपादक आणि मुस्लीम समाजप्रबोधन संस्था याचे संस्थापक अध्यक्ष.)*

## ६.१३ हिंदू-मुस्लीम समस्या – हुसेन जमादार

इस्लामच्या इतिहासात धर्मचिकित्सेची परंपरा नाही. हिंदू धर्माच्या इतिहासात महात्मा जोतीराव फुले, राजा राममोहन रॉय, गो. ग. आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी सुधारकांची धर्मचिकित्सेची प्रदीर्घ परंपरा दिसते. तर थॉमस पेन, ब्रुनो, रॉजर बेकन, मार्टिन ल्युथर, इरॅस्मस आदींनी ही परंपरा ख्रिश्चन धर्माची कठोर चिकित्सा करून घालून दिली होती.

इस्लाममध्ये या परंपरेचा पाया हमीद दलवाईंनी घातला. कर्मठ व अंधश्रद्ध मुस्लीम समाजात दलवाईंइतके मूलगामी चिंतन करणारा निर्भय सत्यशोधक दुसरा नाही. ते म्हणत, "मुसलमानांना चिकित्सेचा अंगिकार करायला लावणे, हे काम इतके मोठे आणि कठीण आहे की, कोणीही एक माणूस त्याला पुरा पडणार नाही; पण म्हणून या समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने या कामाचे महत्त्व किती आहे, हे ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे काम हाती घेतले पाहिजे. मी माझ्या अल्पकुवतीनुसार या कामाला वाहून घेतले आहे. हाच माझा लढा आहे आणि एक मुसलमान म्हणून मी तो लढवणार आहे."

हा लढा हमीदभाईंनी ज्या भारतीय मुस्लीम समाजात लढवला तो समाज सनातनी, कर्मठ, अंधश्रद्ध व संघटित आहे. एकूण भारतीय समाजाप्रमाणेच तो दारिद्र्याने, निरक्षरतेने, बेकारी, महागाई इ. आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला आहे; पण धार्मिकतेचा पगडा धर्मचिकित्सा विरोध आदी बाबतीत तो अतिसंवेदनशील आहे. अनेक प्रकारच्या चळवळी व आंदोलने उभारून एकूण समाजाला पुढे नेण्याचा इतिहास असलेल्या संघटित मध्यमवर्गाचा त्यात अभाव आहे. अल्पसंख्य असल्याने या समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. आणि म्हणूनच या भावनेचा सतत राजकीय वापर होत राहिला आहे. याशिवाय आपल्या धर्मावर तो परिपूर्ण व सर्वश्रेष्ठ असल्याबद्दलची आंधळी व पराकोटीची श्रद्धा असल्याने मुस्लीम समाजाच्या बाबतीत धर्मनिष्ठा जास्त प्रभावी असल्याचे दिसते.

दलवाईंचे विश्लेषण असे की, "मोकळ्या मनाने विचार करणारी आत्मनिरीक्षणाची सवय असलेली, अंतर्मुख बनलेली आणि धर्मातीत विचार करणारी माणसे मुस्लीम समाजात बोटावर मोजण्याइतकीच सापडतील. यासाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष आत्मनिरीक्षणपर, बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात आहे, असे मला खेदाने म्हणावे लागते."

### पुरोगामी परंपरा नाही

भारतीय मुस्लीम समाजाच्या नेतृत्वाच्या इतिहासात पुरोगामी नेत्यांचा न अभाव आढळतो. समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रद्ध चौकटीमुळे उदारमतवादी नेतृत्वाचा विकास खुंटल्याने धार्मिक व सांप्रदायिक नेत्यांचा मुस्लीम समाजात सुळसुळाट आढळतो. दलवाईंनी या मुस्लीम नेतृत्वाचे वर्णन 'हेकेखोर, मुक्त चर्चाविरोधी, मूलतत्त्ववादी, इतरांना दोष देणारे व

आत्मनिरीक्षणाची पात्रता नसलेले' असे केले आहे. याला काही अपवादही आढळतात. उदा. मौलाना अबुल कलाम आझाद, रफी अहमद किडवाई, डॉ. झाकीर हुसेन. परंतु भारतीय मुसलमान पुरेशा संख्येने या नेत्यांच्या मागे गेले नाहीत व स्वातंत्र्यानंतरही आझादांच्या बाबतीत बोलायचे झाले तर, त्यांना शिक्षण खाते देण्यापलीकडे काँग्रेसने त्यांना महत्त्व दिले नाही. आजच्या काळात आरिफ मोहम्मद खान हे आझादांच्या अपयशी उदारमतवादी मुस्लीम नेतृत्वाची परंपरा स्पष्ट करतात.

भारतीय मुस्लीम समाजाला प्रगतीच्या मार्गाकडे वळवण्यासाठी त्या समाजाचे सध्याचे नेतृत्व कुचकामी आहे. मुस्लीम समाजातील धर्मांतर्गत सुधारणांबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक सुधारणा पडवून आणून मुस्लीम समाजाला सांप्रदायिकतेच्या व धर्मप्रामाण्यवादाच्या आंधळ्या जोखडातून मुक्त करण्याची कालोचित निकड आहे. आधुनिक लोकशाही समाजवादी मूल्ये व धर्मातीत इहवाद यांच्या मदतीनेच ते शक्य व्हावे.

**मुस्लीम सत्यशोधक मंडळ**

यासाठी २२ मार्च १९७० रोजी हमीद दलवाईंनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. त्यापूर्वी धर्मचिकित्सा नसली, तरी समाजसुधारणेच्या आधुनिक शिक्षण प्रसाराचे कार्य सर सय्यद अहमद खान यांच्या नावे नमूद आहे. फाळणीच्या दुःस्वप्नानंतर भारतीय मुस्लीम समाज इथल्या बहुसंख्य हिंदू समाजाशी सामंजस्य साधून नव्या धर्मातीत राष्ट्रात निर्माण झालेली राष्ट्रीय एकात्मतेची गरज भागवेल, अशी अपेक्षा होती, परंतु मुस्लीम समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणांचा अभाव असल्याने व अडेलतट्टू नेतृत्वामुळे याला म्हणावी तितकी गती मिळालेली नाही.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा म्हणतो– "भारतात सर्वधर्मिय राष्ट्रीयता निर्माण करण्याच्या झालेल्या प्रयत्नांत एक मूलभूत चूक सतत होत राहिली आहे. ती अशी की, हिंदू समाजाला आधुनिक, विशाल आणि पुरोगामी बनवण्याच्या आड येणाऱ्या जुनाट धर्मनिष्ठा बदलण्याचा एक सततचा प्रयत्न चालला असतानाच मुस्लीम समाजाच्या कालविसंगत अशा परंपरागत श्रद्धांना हात न लावण्याचा आटापिटा मुस्लीम समाजाकडून करण्यात येत होता. आजदेखील या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. मुस्लीम समाज जुन्याच श्रद्धांना चिकटून राहिला. यामुळे सुशिक्षित मुस्लिमांची मजल विभक्तवादी प्रवृत्तीपलीकडे कधी जाऊ शकली नाही."

हमीद दलवाईंसारखा सत्यशोधक आणि त्यांनी स्थापन केलेले मुस्लीम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रातच निर्माण व्हावे, याला महाराष्ट्रातील सव्वाशे वर्षांची महात्मा जोतीराव फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, सुधारक गोपाळ गणेश आगरकर, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटीलांपासून आजतागायत डॉ. बाबा आढावांपर्यंत अविरत चालत आलेली समाजसुधारकांची परंपरा कारणीभूत आहे. 'सत्यशोधक' शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ

आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या सभासदांपुढे आहे, असा उल्लेख मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या जाहीरनाम्यात आहे.

**इबादत व आदत**

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे तत्त्वज्ञान मनुष्य-केंद्रित आहे. 'इबादत' व 'आदत' हे धर्माचे दोन भाग आहेत' इबादत म्हणजे ईश्वरभक्ती ही व्यक्तीची खाजगी बाब आहे. 'आदत' म्हणजे समाजातील मुस्लिमांसह इतर सर्व व्यक्तींशी संबंध. रूढी-परंपरा या कालानुरूप बदलत जातात व त्या मानवी मूल्यांवर आधारीत असतात. असे मंडळ मानते. माणसाची भौतिक सुधारणा व विकास हा मुस्लीम सत्यशोधक विचारसरणीचा गाभा आहे.

स्वातंत्र्यसंग्रामात हिंदू-मुस्लिमांनी केलेल्या कामाचे योग्य मूल्यमापन होऊन इतिहासाचे धर्मनिरपेक्ष पुनर्लेखन मुस्लीम सत्यशोधकांना आवश्यक वाटते. याबाबत 'स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान' हे पुस्तक लिहून प्रा. य. दि. फडकेंनी सुरू केलेली प्रक्रिया मंडळाला मोलाची वाटते. धर्म ही सार्वजनिक जीवनातील एक सामाजिक गरज आहे आणि म्हणूनच त्यात सुधारणा झाली पाहिजे, असे मंडळ मानते. देशाची राज्यघटना व कायदे यांना मंडळ सर्वोच्च मानते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने अनेक प्रश्न हाती घेऊन ते धसास लावले आहेत. हिंदू-मुस्लीम यांच्यांत घटनेने समानता यावी व मुस्लीम स्त्रीला आवश्यक ते अधिकार प्राप्त व्हावेत, यासाठी समान नागरी कायद्याची मागणी मंडळ अनेक मार्गांनी आजतागायत अविरतपणे करत आहे. तलाकपीडित महिलांना कायद्याने पोटगी मिळवून देऊन आजपर्यंत कित्येत मुस्लीम स्त्रियांचा दुआ मंडळाने घेतला आहे.

मुस्लीम स्त्रियांनी शिक्षण घेऊन नोकऱ्या कराव्यात. स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी शक्य ते प्रयत्न मुस्लीम सत्यशोधक मंडळ करत आहे.

धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही या कल्पनांचा उगमच आधुनिक काळातील असल्याने त्याचा स्वीकार करायचा, तर तो अंधश्रद्धेचा पगडा दूर करूनच मुस्लिमांना स्वीकारता येईल, अशी मंडळाची धारणा आहे.

मुस्लिमांनी प्रादेशिक भाषा अनुसरावी व उर्दूचा आग्रह सोडून द्यावा, असा मंडळाचा आग्रह आहे, पण एक भारतीय भाषा म्हणून उर्दूचा विकास होणे मंडळाला महत्त्वाचे वाटते.

मुस्लीम समाजाविषयी अत्यंत प्रामाणिक तळमळ बाळगणाऱ्या हमीदभाईंना आपले समाजसुधारणेचे प्रयत्न तितकेसे सफल होताना दिसले नाहीत. त्यांच्या घणाघाती प्रहाराने अवाक झालेल्या व त्यांच्याविषयीच्या गैरसमजाने ग्रासलेल्या मुस्लीम समाजाने हमीदभाईंची घ्यावी तशी दखल घेतली नाही.

**हिंदूंचाही सनातनीपणा**

भारतात बहुसंख्याक, असलेल्या हिंदूंना दलवाईंचे सांगणे असे, "ज्या हिंदूंना मुस्लीम

जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे, ते हिंदूंना सनातनी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत, आणि ज्या हिंदूंना हिंदूसमाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यायचे आहे, ते मुस्लीम जातीयवाद्यांना मिठ्या मारत आहेत. हे दृश्य बदलले पाहिजे. मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या मी बाजूचा आहे, पण हिंदूंना सनातनी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा मी विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूंना आधुनिक बनवणाऱ्यांना माझा पाठिंबा आहे. परंतु मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे."

धर्माविषयी दलवाईंची भूमिका वेगळी व टोकाची होती, हे नमूद करणे आवश्यक आहे. 'आपण मुसलमान आहोत, म्हणून आपल्या समाजातील दोषांचे दिग्दर्शन करून ते सुधारणे, हे आपले पहिले कर्तव्य आहे', असा दलवाईंचा आग्रह होता. धर्म ही खाजगी बाब मानणारे दलवाई नास्तिक निरीश्वरवादी होते, पण आपली ही भूमिका त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळावर अथवा कार्यकर्त्यांवर लादायचा पुसटसाही प्रयत्न कधी केला नाही. नास्तिकता ही दलवाईची वैयक्तिक भूमिका होती, पण मंडळाची नास्तिकतेची भूमिका कधीही नव्हती व नाही.

समंजस मुस्लीम नेतृत्व मुस्लीम समाजाला न लाभल्याने बाबरी मशिदीचा प्रश्न चिघळला, त्या धक्क्याने मुस्लीम समाजातील मध्यमवर्गीय शिक्षित मुसलमान जागे झाले व पुरोगामी मुस्लिमांच्या दिल्ली व मुंबई येथे बैठका होऊन मंडळाने गेल्या २० वर्षांत ज्या भूमिकांचा पाठपुरावा केला, त्याच मागण्या पुढे आणल्या आहेत. याबाबतही हमीद दलवाईंनी मांडलेले विचार चिंतनीय आहेत.

**दोषांविरुद्ध झगडावे**

"मुसलमानांनी हिंदूप्रमाणे स्वतःच्या समाजातील दोष व कुप्रवृत्तीविरुद्ध झगडले पाहिजे. हे न घडल्याने मुसलमान समाज मागे पडला आहे. केवळ तक्रारी करून परिस्थिती बदलत नाही. जोपर्यंत मुस्लीम समाजात या देशाच्या राष्ट्रवादाशी आणि समान नागरिकत्वाच्या कल्पनेशी जुळते घेणाऱ्या प्रवृत्ती निर्माण होत नाहीत, तोपर्यंत हिंदू-मुस्लीम समस्या आपल्याला भेडसावीत राहणार आहेत. ती सोडवायची असेल, तर प्रथम मुस्लीम समाजाची मानसिकता आणि आकांक्षा समजावून घ्याव्या लागतील, इतर प्रश्नांसारखाच हा प्रश्न नाही, हे ओळखून तो अनेक आघाड्यांवर सोडवण्याच्या दृष्टीने पावले टाकावी लागतील. मुस्लीम समाजातच जेव्हा धर्मनिरपेक्ष, आधुनिक राष्ट्रवादी प्रवृत्ती मूळ धरतील, तेव्हाच या प्रश्नांची तीव्रता कमी होऊ शकेल. हे कार्य करत असताना मी फक्त मुसलमान समाजाबाबत बोलतो, असा माझ्याबद्दल सगळ्यांनी समज करून घेतला आहे.

त्यांचे म्हणणे बरोबर आहे. मुसलमानांविरुद्ध उठणाऱ्या हिंदूंना अडवणारे गांधीजी होते. पाकिस्तानात हिंदूंची ससेहोलपट झाली, तेव्हा मुसलमानांना अडवणारा कुणी नेता का निघाला नाही? बहुसंख्याक हिंदू गांधी-नेहरूंच्या मागे राहिले. मुसलमानांनी आझादांचा व्यापक धार्मिक दृष्टीकोन मान्य केलेला नाही. जोपर्यंत हा फरक आहे, तोपर्यंत मी काही हिंदूंच्या चुकांबद्दल बोलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मुसलमान जेव्हा व्यापक दृष्टीकोन बाळगणाऱ्यांच्या मागे

बहुसंख्येने येऊ लागेल, तेव्हा मग दोन्ही समाजातील जातीयवादाविरुद्ध मी बोलण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. सध्या मात्र पुरेशा चांगल्या हिंदूंना प्रतिसाद देणारे पुरेसे चांगले मुसलमान नाहीत, अशी माझी भूमिका आहे.

हिंदूंनी हिंदू जातीयवाद माजवून मुस्लीम जातीयवाद संपणार नाही, हे लक्षात घ्यावे. मुसलमान जातीयवादी आहेत असे सदाशिव पेठेत भाषण करूनही तो संपणार नाही. मुस्लीम जातीयवादाला विरोध म्हणजे सबंध मुसलमानांना विरोध होऊ नये. मुस्लीम जातीयवादाला रोखण्याच्या नावावर वर्णवर्चस्वाचा प्रयत्न होता कामा नये. मुसलमानांच्याबद्दल फाजील भीती वा संशयही बाळगता कामा नये. भौतिक विकासाच्या आड येणाऱ्या सर्व धर्मांच्या श्रद्धा मोडून काढल्या पाहिजेत.”

आजचा आक्रमक हिंदुत्ववाद पाहून फक्त मुस्लीम समाजाचे प्रबोधन करून हमीद दलवाईंचे धर्मनिरपेक्ष राज्याचे स्वप्न कसे साकार व्हावे, असे मुस्लीम सत्यशोधकांना अलीकडच्या घटनांमुळे वाटू लागले आहे. त्यासाठी सर्वधर्मीय कठोर प्रबोधनाची आवश्यकता आहे.

*(हुसेन जमादार : मंडळाच्या स्थापना काळातील कोल्हापूर भागातील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी अध्यक्ष, ‘जिहाद’ या पुस्तकाचे लेखक, ‘पुरोगामी मुस्लीम’चे संपादक आणि मुस्लीम समाजप्रबोधन संस्था याचे संस्थापक अध्यक्ष.)*

## ६.१४ मुस्लीम सत्यशोधक संदर्भात माझे आकलन – डॉ. नरेंद्र दाभोलकर

माझ्या माहितीप्रमाणे हमीद दलवाई यांचे कार्यक्षेत्र पुणे, मुंबई, कोल्हापूर येथे जास्त आहे. हमीद दलवाई हयात असताना माझा त्यांच्याशी फार जवळचा संपर्क आला नाही, परंतु नंतरच्या काळात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या अनेक उपक्रमांत मी सहभागी झालो आणि या चळवळीच्या वाटचालीचा एक साक्षीदार राहिलो. हमीद दलवाई यांचं अकाली निधन झालं आणि मला मुलगा झाला, तेव्हा मी माझ्या मुलाचं नाव हमीद असं ठेवलं. हे माझं मुस्लीम सत्यशोधक सोबत असोसिएशन आहे.

'सत्यशोधक' हे नाव घेऊन मुस्लीम समाजात काम करणं, हे अतिशय अवघड आहे. कारण मुस्लीम सत्यशोधकने सत्यशोधनाचं काम करणं म्हणजे पवित्र इस्लाम आणि अल्लाह यांच्यावर अविश्वास दाखवण्यासारखं आहे, कारण इस्लाममध्ये सत्य शोधण्यासारखं काही नाही. सत्य अस्तित्वात आहे, हे समजून घेणं हेच अपेक्षित आहे. म्हणून मुस्लीम समाजात 'सत्यशोधक' या नावाने काम करणे हेच अशक्य आहे.

आज हिंदू धर्मातही सत्यशोधन करणे म्हणजे आमच्यावर हल्ले होतात. ज्या इस्लामची १४००–१५०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा आहे, आणि त्यात चिकित्सा करण्याची परंपरा तर नाहीच व कोणी तशी हिंमतही केली नाही. सुफी परंपरा वेगळी. धर्म ही तपासण्यायोग्य बाब आहे, असं सामान्यपणे मानल्या जात नाही. केवळ तपासण्याची बाब नव्हे, तर त्यातील कालबाह्य, अयोग्य, अन्यायकारक गोष्टी आहेत, त्या नाकारायला पाहिजेत, हा विचार घेऊन हमीदभाईंनी ही चळवळी सुरू केली. धर्मातील न पटणाऱ्या गोष्टी बाजूला सारून मानवी जीवन उभारायला पाहिजे, असा प्रयत्न हमीदभाईंनी केला. उघडच आहे की, समाजाने त्यांना स्वीकारलं नाही.

आम्ही जे काही मांडतो ते स्वीकारत नसले, तरी ते ऐकून घेतात. मानलं नाही तरी तो एक ऐकण्याचा मुद्दा आहे. परंतु मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातून हमीदभाई जे मुद्दे मांडत होते, ते स्वीकारण्याचा प्रश्नच नाही. नुसतं ऐकणंसुद्धा एक प्रकारची धर्मनिंदाच आहे, असे मानणाऱ्या समाजातील ते काम आहे.

मानवतावाद, विवेक बुद्धिप्रामाण्य, धर्मनिरपेक्षता हे फार पुढचे स्वप्न झाले. धर्म तपासावा, त्यातील नको असलेला, न पटलेला भाग वापरू नये. म्हणजे नीतीला सहाय्य करणारे जे आहेत, ते मानावं आणि नसेल ते नाकारावं, अशी मांडणी केली असती, तर ती कदाचित कालसुसंगत झालं असतं. यात धर्माचा अवमान नाही, तर धर्माला कालसुसंगत करणं आहे. परंतु हे जे हमीदभाईंनी मांडले, ते मांडण्यासाठी जो अभ्यास करावा लागतो, तो त्यांनी केला. सुदैवाने शहा, कुरुंदकरांसारखे विद्वान, अभ्यासक त्यांच्यासोबत होते. प्रचंड निर्भयता, धाडस, वाद घेण्याची रग, खुमखुमी लागते, ती दलवाईंजवळ होती. समाजाला धक्का देण्याची ताकद होती. ते त्यांनी केलं, हे मान्य करायला पाहिजे.

महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या श्रेय नामावलीमध्ये दलवाईंचं नाव घेतलं पाहिजे.

महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त आम्ही नुकतीच एक मोहीम हाती घेऊन ५० दिवसांची यात्रा घेऊन महाराष्ट्रभर फिरलो. त्या मोहिमेचा नाव होतं– 'वारसा सुधारकांचा, विवेकाचा'.

आम्ही ज्या समाजसुधारकांची नामावली काढली, त्यामध्ये १८२३ ते १९७३पर्यंतचा दीडशे वर्षांच्या काळ होता. यामध्ये लोकहितवादी यांच्या जन्मवर्षापासून ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या मृत्यूपर्यंतची अखंड परंपरा आहे. यामध्ये लोकहितवादी, फुले दाम्पत्य, रानडे, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्वे, तुकडोजी महाराज, आंबेडकर, गाडगे महाराज येतात. तसे हमीद दलवाईसुद्धा येतात. अगदी कमी कालावधीसुद्धा येतात. त्यांना तुलनेने कमी कालावधी लाभला असला, तरी समाजावर वेगळा परिणाम त्यांनी टाकला.

मला असा प्रश्न पडतो की हा समाज धर्मनिरपेक्ष बनवण्याचा, त्यांच्याशी संवाद साधण्याचा, मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे कृती कार्यक्रम कोणता व कोठे आहे? म्हणजे धर्म ही गोष्ट विज्ञानपूर्व काळात निर्माण झाली, म्हणजे सर्वच धर्म कालबाह्य झाले आहेत. माणसाने माणुसकीने आणि विश्वस्त मंडळ म्हणून आपला अस्तित्व करावं, असे मानणारा एक प्रवाह समाजात निर्माण झाला आहे. भारतीय संविधानावर आधारित नव समाजनिर्मिती करावी, मानणारा हा प्रवाह आहे.

दुसरा प्रवाह आहे तो धर्माच्या पायावर आधारलेला हा समाज साहित्य, शिक्षण, अन्य सर्व काही, चुकीच्या पायावर उभा आहे. तो पाया बदलला पाहिजे, म्हणजे शोषण कमी होईल. या दोन्ही प्रवाहांपेक्षा आणि एक प्रवाह आहे. महाराष्ट्राच्या समाजसुधारकांची एक वेगळी भूमिका आहे. या परंपरेत एक आगरकर सोडले, तर बाकीच्या सुधारकांना धर्माची गरज का वाटली? फुल्यांनी 'सत्यशोधक धर्म' काढला, तर वि. रा. शिंदे यांनी स्वतःचा 'आध्यात्मिक धर्म' मांडला. आंबेडकरांनी धर्म म्हणजे नीती, आणि नीती म्हणजे धर्म मानले. गाडगे महाराजांनी 'देवकीनंदन गोपाला' हे भजन लिहिले. या सर्वांना असं वाटलं, धर्माला समवेत घेऊन बदलाव करावा.

हमीद दलवाई यांची अशी भूमिका होती. धर्मातील कालबाह्य तरतुदी काढल्या पाहिजेत. मुस्लीम महिलांवरील अन्याय दूर झाला पाहिजे. मग त्याबद्दल धर्मात काय आहे आणि नाही, हे पहायची गरज नाही.

दुसरा प्रवाह म्हणतो, 'कुराणा'चा आधार घेऊन मांडलं, तर लोकांना अधिक प्रवाहीपणे पटेल. मुस्लीम सत्यशोधक मंडळात दलवाईनंतर हे दोन्हीही प्रवाह दिसून येतात. आम्हालाही म्हणतात की, अंधश्रद्धा निर्मूलनच्याऐवजी 'श्रद्धा उन्नयन समिती' का चालवत नाही? मी म्हणतो, मग तुम्ही श्रद्धा उन्नयन समिती काढावी. आमचा त्याला विरोध नाही. परंतु या सर्व समाजसुधारकांनी ईश्वरकेंद्रित धर्म हा मानवकेंद्रीत केला, समाजाविन्मुख धर्माला समाजसन्मुख केले, परलोकवादी धर्म इहवादी केला. यासंदर्भामध्ये हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांची भूमिका नेमकी काय होती, याची मला पुरेशी माहिती नाही. पण माझ्या समजुतीप्रमाणे बुद्धीप्रामाण्याच्या आधारे धर्माला नकार देण्याची त्यांची भूमिका असावी, असे मला वाटते.

ही भूमिका निश्चितपणे एक गरज भागवते, तसेच कार्य म्हणून काही मर्यादा निर्माण करते. याचे उत्तर शोधण्यावर पुढची वाटचाल अवलंबून असते.

हमीद दलवाईंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर इस्लामच्या नावाने होणाऱ्या राजकारणाचे विश्लेषण केले. ते अभ्यासपूर्ण आहे. दलवाईंच्या निधनानंतर याची पुरेशी नोंद किंवा वर्धिष्णू संघटन म्हणून झालेलं दिसत नाही. याला काही संघटनेच्या आणि कार्यकर्त्यांच्या मर्यादा असतील. दलवाईंच्या वैचारिक भूमिका कितपत उपकारक आणि अपायकारक ठरल्या, यावर काय चर्चा झाली आहे, हे तपासायला पाहिजे. खरं तर रोजच्या प्रश्नांना सामोरे जाणाऱ्या कार्यकर्त्यांनी याचा विचार केला पाहिजे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने लावून धरलेला तलाकपीडित महिलांचा विचार, कार्य याबद्दल धर्म काय म्हणतो, यापेक्षा माणसाला विचार करायला लावणारा आहे आणि दलवाईंचा जो धागा आहे, तो काही प्रमाणात पुढे घेऊन जाण्यासाठी त्याचा उपयोग नक्कीच होईल. आज दलवाईंच्या नंतरही कार्यकर्त्यांनी ही चळवळ जिवंत ठेवली आहे, हे खूप मोठं काम आहे.

दलवाई ज्या कोकणच्या परिसरातून आले, या परिसरात हिंदू-मुस्लीम संबंध घरोब्याचे होते. सेवा दलाचे संस्कार होते. महाराष्ट्रातील इतर चळवळी १९७० साली निर्माण झाल्या. जयप्रकाश नारायण यांच्या बंडखोर विचारांचं वारं वाहण्यास अनुकूल वातावरण होतं. आपल्या धर्मात प्रचंड शोषण असल्यामुळे तो तपासून पाहायला पाहिजे, त्यात सुधारणा केली पाहिजे, असं मुस्लीम सत्यशोधकला वाटणं हे साहजिकच आहे. फुले-आगरकर दोघांमध्ये व्यापक मांडणी होती. जातीव्यवस्था, त्याचे नुकसान याबाबतीत फुलेंची जाण अधिक व्यापक होती. त्यांनी शाळा काढल्या, न्हाव्यांचा संप केला. आगरकरांनी सुधारकांच्या वारसा 'सुधारक' चालवलं. आगरकरांनाही जीवनकाळ मिळाला नाही. दलवाईंना डाव्या चळवळीची पार्श्वभूमी असल्यामुळे त्याची जाण होती. चळवळीला वैचारिक आणि कृतिशील पाया देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

दलवाईंनी जो दृष्टीकोन दिला, तो दृष्टीकोन या ना त्या स्वरूपात पुढील कार्यकर्त्यांमध्ये संक्रमित झाला आणि ही चळवळ विविध उपक्रम घेऊन कालसुसंगत विचार मांडत आहे, याला अनुकूल प्रतिसादही मिळत आहे आणि लोकशिक्षणाचीही प्रक्रिया मंडळाकडून चालू आहे, याचे समाधान वाटते.

*(नरेंद्र दाभोलकर : 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'चे कार्याध्यक्ष, अंधश्रद्धा आणि विज्ञान-विवेकावर आधारित पुस्तकांचे लेखन. भारत सरकारने २०१४मध्ये मरणोत्तर 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले.)*

## ६.१५ हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ – अन्वर शेख

हमीद दलवाई यांचा लेख १९६२–६३ दरम्यान 'मराठा'त वाचला. वडिलांच्या आवडीमुळे घरात वर्तमानपत्रे–पुस्तके होती. त्यामुळेच माझ्या वाचनाचा छंद वाढला. सेवादल शाखेच्या निमित्ताने दलवाई विचारांचा परिचय झाला. वयाच्या १७व्या वर्षी 'मराठा'तील लेखाचं नाव 'मित्रद्रोही नेहरू' वाचण्यात आलं. दलवाई त्या वेळेस पाकिस्तानला जाऊन आले होते आणि पाकिस्तानातील तुरुंगात ते खान अब्दुल गफारखान यांना भेटले होते. पाकिस्तान त्यांना मान्य नव्हते. नेहरूंनी आम्हाला तोंडघशी कसं पाडलं, या संदर्भात हा लेख लिहिला होता. हमीद दलवाई हे बंडखोर, तर्कशुद्ध, आधुनिक विचारसरणीचे असल्याने त्यांना भेटण्याची इच्छा निर्माण झाली.

दलवाई पुण्यात १९६५मध्ये आले, तेव्हा पुण्यात हल्याप्रकरणी दंगल झाली होती व राष्ट्रीय एकात्मतेसाठी काय करावे, यासाठी नाना पेठेत दलवाईंचे भाषण होते. वर्तमानपत्रातील स्थानिक सदरामध्ये बातमी वाचली आणि दलवाईंच्या पाच वर्षांपूर्वीच्या लेखाची आठवण झाली. बरेच मुस्लीम कार्यकर्ते जमले होते. त्या काळात त्यांच्या सभा उधळण्याचा अनेक ठिकाणी प्रयत्न झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांतून आल्या होत्या. तिथे जाऊन त्यांची ओळख करून घ्यावी आणि त्यांचे तर्कशुद्ध, बंडखोर विचार आवडतात, हे सांगावे म्हणून मी या सभेला गेलो होतो.

सभा संपल्यानंतर त्यांना भेटून पाच–सहा वर्षांपूर्वीच्या लेखाचा उल्लेख केला. तिथे सय्यदभाई भेटले. तेसुद्धा तिथे आले होते. भाई वैद्य यांना भेटलो. भाई म्हणाले, 'माझ्या घरी बैठक आहे, तू घरी ये.' समविचारी लोकांकडून चर्चा करून संघटना स्थापावी असा विचार होता.

हमीदभाई तेव्हा 'इंडियन सेक्युलर सोसायटी'चे कार्य करत होते. भाईंच्या घरी चार–सहा बैठका झाल्या.

दलवाईंकडे धर्माकडे पाहण्याची चिकित्सक बुद्धी होती. त्यांनी केवळ धर्मात सांगितलं म्हणून धर्माज्ञा स्वीकारल्या नाहीत, आपण स्वीकारत असलेल्या गोष्टी आपल्या बुद्धीला पटल्या पाहिजेत याविचारावर त्यांनी सातत्याने भर दिला. भाईंकडे होणाऱ्या बैठकीत अनेक मुस्लीम यायचे, पण फारच थोडे टिकले. यामध्ये सय्यदभाई, सय्यद मुनीर, ए. जे. शेख, सिद्दिकी, मकबूल तांबोळी अशी मंडळी होती. मुस्लीम समाजात प्रबोधन विचार पसरत नाही, तोपर्यंत मुस्लीम नावाने काम करावे. बाबा आढाव म्हणाले, 'ही चळवळ सत्यशोधकी विचाराची आहे, तेच नाव का घेत नाही?' मग मुस्लीम सत्यशोधक मंडळ की समाज? जेव्हा संख्या वाढेल, तेव्हा समाज होईल, आता त्याला मंडळ असंच म्हणूया, असं ठरलं.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सुरुवातीचे चार घटक महत्त्वाचे होते. २५ प्रमुख कार्यकर्ते, इंडियन सेक्युलर सोसायटी, राष्ट्र सेवा दल आणि युवक क्रांती दल या चार संस्थांमार्फत सुरुवातीच्या काळात कार्यक्रम आयोजित केले गेले. एकच विचारसरणीपूरक संघटना. नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी यांचा पाठिंबा होताच. आधुनिक कायदेशास्त्र, मानवी हक्क, महिला

अधिकार यासंदर्भात मुस्लीम व्यक्तिगत कायदा अन्यायकारक आहे. म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ समान नागरी कायदा विषय घेऊन, तसेच भाषा, शिक्षण, पेहराव, बुरखा, स्त्री प्रश्न या विषयांना घेऊन कार्य करेल, अशी भूमिका घेण्यात आली.

नंतर हमीद दलवाई यांची टिळक स्मारक मंदिरात तीन व्याख्याने झाली. 'साधना' कार्यालयात मीटिंग होणार असल्याचे वर्तमानपत्रात आले. तेथे बाबुमियाँ बँडवाले आले होते. याच बैठकीत दलवाईंनी त्यांना मंडळाचे अध्यक्ष होण्याची विनंती केली आणि ती त्यांनी स्वीकारली. पुण्यातील पूनम हॉटेलमध्ये हमीद दलवाई यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. ते पुण्यात आले की, पूनममध्ये राहत असत. या ठिकाणी कार्यकर्ते जमत आणि रोज संध्याकाळी उशिरापर्यंत चर्चा, वाचन, चिकित्सा केली जाई.

बुद्धिप्रामाण्य आणि चिकित्सक दृष्टीकोन याबद्दल कोणतीही तडजोड केली जात नव्हती. काय आणि कुठे बोलायचे ? हे ठरवून तर्कशुद्ध पद्धतीने दलवाई बोलत असत. बहुसंख्य मुस्लीम माझ्या सोबत यावेत, अशी दलवाईंची अपेक्षा नव्हती. दोन–चार चिकित्सक मंडळाची उद्दिष्टे आणि धोरणे मान्य असणारी मंडळीसुद्धा पुरेशी आहेत, कारण प्रबोधनाचे कार्य एका पिढीत होणारे नसते. ही एक संथ आणि दीर्घ प्रक्रिया आहे, याची पुरेशी जाणीव दलवाईंना होती, म्हणून बुद्धिजीवी वर्गात ही संघटना निर्माण करायची आणि नंतर समाजापर्यंत पोहोचवायचे धोरण हमीद दलवाई यांनी स्वीकारले होते.

पैगंबरांनासुद्धा सुरुवातीला पाचच अनुयायी होते. चळवळ सुरू करताना दलवाईंनी पैगंबरांचाच आदर्श समोर ठेवला होता. अ. भि. शहा म्हणायचे, 'दलवाई हे 'जॉन द बाप्टिस्ट' आहेत, ते शुभवार्ता देणारे आहेत, येशू ख्रिस्त नाहीत'. अशा पद्धतीने संघटित पातळीवर प्रयत्न करणारे हमीद दलवाई हे मुस्लीम समाजातील पहिलेच नेते होते. समाजाला समजावून सांगण्याची गरज आहे, याची त्यांना जाणीव होती. धार्मिक नेतृत्व, मौलवी यांच्या पकडीतून समाजाला सोडवले पाहिजे. समाजाची भौतिक प्रगती किंवा ऐहिक प्रगती करायची असेल, तर धर्मवादी मानसिकतेची चिकित्सा करण्याची दृष्टी निर्माण होणे आवश्यक आहे. जागतिक बंधूभाव हा समाजात रुजवला पाहिजे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही केवळ स्त्री अत्याचार निर्मूलनाची संघटना नाही. येथील धार्मिक प्रश्न, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक हित साधायचे असेल, तर धर्मांधता मोडकळीस काढली पाहिजे. लोकशाहीतच सर्व समाजाचे हित आहे. भारतीय एकात्मतेमध्येच मुसलमानांचे हित आहे. कारण मुस्लीम हे या देशातील अल्पसंख्य आहेत, शिवाय त्याला देशाच्या फाळणीची पार्श्वभूमी आहे. हा समाज जेवढा चिकित्सक बनेल, तेवढ्या प्रमाणात येथील राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल, हाही एक हेतू होता. दलवाईंची ही तर्कशुद्ध मांडणी असल्यामुळे केवळ भावनिकतेतूनच नव्हे, तर चिकित्सक, तर्कशुद्ध आणि बुद्धिवादी दृष्टीकोनातून मी दलवाईंकडे आकर्षित झालो.

ग्रामीण भागातील मुस्लीम प्रश्न मी अनुभवले होते. पुण्यात आल्यानंतर पुण्यातील दंगली आणि घरं पेटवणं, मोडतोड मी अनुभवले. मी पोलीस खात्यात असल्यामुळे जातीय सलोख्याचा

प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटत होता. स्त्री अत्याचाराचा प्रश्न मात्र नंतर जाणवला, मात्र राष्ट्रीय एकात्मता, हिंदू-मुस्लीम सलोखा, सद्‌भाव हा प्रश्न अधिक तीव्रतेने जाणवत होता. दलवाईंनी नेमके हेच प्रश्न घेऊन कार्य सुरू केल्यामुळे या चळवळीकडे मी अधिक आकर्षित झालो. यासाठी मुल्ला-मौलवींच्या मुठीतून समाजाला बौद्‌धिकदृष्ट्या सोडवण्याशिवाय राष्ट्रीय एकात्मतेकडे वाटचाल होणार नाही कारण डोकं पेटवण्याचे काम धर्मांध मंडळीच करत असतात.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने अनेक प्रश्न घेतले. त्यामध्ये शिक्षणाचा आणि मातृभाषेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. वास्तविक लोक ज्या प्रदेशात राहतात, तीच त्यांची मातृभाषा असते. आपण ज्या भागात राहतो, जेथे व्यवसाय, नोकरी करतो, तेथील भाषा स्वीकारावी, याच हेतूने मंडळाने कोल्हापूर येथे शिक्षण परिषद आयोजित केली. उर्दू ही मुस्लिमांची भाषा आहे, ही चुकीची समजूत आहे. मुस्लीम समाजात रोजगाराचाही प्रश्न आहे, या सर्व प्रश्नांवर चिंतन करून दलवाई दोन-तीन वर्षं आपले विचार तपासून घेण्यासाठी प्रचार दौऱ्यासाठी फिरत होते.

जोपर्यंत भारतात हिंदू-मुस्लीम सलोखा निर्माण होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारत-पाकिस्तान संबंध सुरळीत होणे डोईजड आहे. काही तणाव निर्माण झाला की, तेथील जमातवादी शक्ती एकमेकांकडे संशयाने पाहतात आणि दरी वाढवून मने पेटवण्याचा प्रयत्न करतात, हे दलवाईंचे निरीक्षण अनुभव आणि अभ्यासावर आधारित होते. म्हणून पाकिस्तान-भारत आणि हिंदू-मुस्लीम सलोखा बरोबर चालणे आवश्यक आहे. तसे झाले तरच यावर यश मिळेल, याची खात्री पटली. हे सर्व एका पिढीत न सुटणारे प्रश्न आहेत, मात्र त्याची सुरुवात केली पाहिजे, हा दलवाईंचा विचार होता.

लोकशाही जर यशस्वी करायची असेल, तर संविधान सार्वभौम मानून समाजजीवन उभं करायचं असेल, तर लोकशाही पाहिजे. लोकशाही पाहिजे असेल, तर सलोखा पाहिजे आणि सलोखा पाहिजे असेल, तर सहजीवनातील एकूण सलोखा पाहिजे. नागरिकांचे हक्क सुरक्षित ठेवायचे असतील, तर लोकशाही पाहिजे आणि त्यासाठी धर्मचिकित्सा केली पाहिजे व इहवाद रुजवला पाहिजे. सेक्युलॅरिझम स्वीकारला, तरच लोकशाही शक्य आहे आणि लोकशाहीतच प्रगती शक्य आहे. त्यासाठी लोकशाही जगली पाहिजे. सर्वच धर्मातील जमातवाद संपवला पाहिजे, असं झालं, तरच समाज खऱ्या अर्थाने नागरी हक्क वापरू शकतील व समाजाची अधिकाधिक प्रगती होईल.

हमीदभाई स्वतंत्र बुद्‌धीचे होते. बुद्‌धीला पटेल तेच ते स्वीकारत. याबाबतीत ते कोणाचीच तमा बाळगत नव्हते. संघवालेही त्यांना बोलावत, पण तिथे जाऊन ते आपल्याला हवं तेच बोलायचे. हमीदभाईंवर 'संघाचा प्रचारक' म्हणून आरोपही करण्यात आले. एकदा गोळवलकर गुरुजींनी त्यांना निमंत्रण दिलं होतं. ते हमीदभाईंना वापरायचा प्रयत्न करायचे आणि मुस्लीम जमातवादी त्याचा फायदा करून घेत. हमीदभाईंना वाटायचं की, "मुस्लीम आपल्याला बोलावत नाहीत, आपल्या व्यासपीठावर येत नाहीत. मला कोणाचं तरी व्यासपीठ वापरून माझे विचार मांडण्याची संधी मिळत असेल, तर ती मी का सोडावी. शेवटी संघाच्या व्यासपीठावर जाऊन मला जे मांडायचं आहे तेच मी मांडतो. त्यांना माझ्याकडून काय मांडून घ्यायचंय ते मी नाकारतो."

१९७२मध्ये कोथरूड येथे झालेल्या शिबिरात अच्युतराव पटवर्धन आले होते. गांधी भवनातील शिबिर मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर झाले होते. यात मुस्लीम सत्यशोधक मंडळ, इंडियन सेक्युलर सोसायटी, राष्ट्र सेवा दल आणि युवक क्रांती दल असे चारही बॅनर होते. अच्युतराव पटवर्धन यांनी दलवाईंना पूरक भूमिका घेऊन मांडणी केली. तो शुक्रवारचा दिवस होता. मुस्लीम स्त्री-पुरुषही आलेले होते. ते तलाकच्या प्रश्नावर आले होते. तेव्हा हमीदभाईंनी शुक्रवार असल्यामुळे दुपारी १ ते २ दरम्यान शिबिर स्थगित केले. मुस्लीम बांधवांना नमाज पठण करण्यासाठी, प्रार्थनेसाठी जायचं आहे, त्यांना आपला धार्मिक अधिकार पाळता यावा, याची जाणीव ठेवणारे दलवाई स्वतः नास्तिक असूनही आस्तिकांचा अधिकार मानणारे आणि आदर करणारे होते. ते इतरांचे अधिकार जपण्याचा प्रयत्न करणारे होते. कोणाचाही धार्मिक अधिकार हिरावून घेता कामा नये, 'इबादत'चा अधिकार संविधानात्मक आहे. "अगदी हिंदुत्ववाद्यांनी जर मुस्लिमांना नमाज पठण करता येणार नाही, अशी भूमिका घेतली, तर मुस्लिमांच्या नमाजच्या अधिकारासाठी सर्व शक्तिनिशी मी भांडायला तयार आहे, अगदी जीवसुद्धा देऊन!" असे दलवाई म्हणाले.

राष्ट्रीय एकात्मता आणि इतर सर्व विषय एकमेकांना पूरक होते. राष्ट्रीय एकात्मतेला धरूनच मुस्लीम व्यक्तिगत कायदा, उर्दू भाषा, भाषेचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न आणि धर्मनिरपेक्षता इत्यादींचा मुख्य धागा राष्ट्रीय एकात्मतेचा आहे.

हमीद दलवाई यांच्याबद्दल मित्रांमध्ये आकर्षण होते. हमीदभाईंच्या चिमटे काढणं, लोकांना हसवणं, नकला करणं, शाब्दिक कोटी करणं या शैलीमुळे ते मित्रांमध्ये प्रिय होते. त्यांचे जाहीर भाषण हे एक मेजवानी असायची. त्यांचा चेहरा, डोळे, हातवारे, अगदी काना-मात्रा, पहिली की दुसरी वेलांटीसुद्धा त्यांच्या बोलण्यातून दिसत असत व त्याचा एक वेगळाच प्रभाव पडायचा. मुंबईच्या मोर्चाविषयी किस्से सांगताना म्हणायचे, "'बेस्ट'च्या दाराशी आल्यानंतर विरोधकांनी अडवलं, तेव्हा पोलीस आले आणि माणसं पळायला लागली. हमीदभाई म्हणाले, "मुसलमानात पळण्याची सवयच आहे. मक्केहून पैगंबर पळाले, मुंबईत मोर्चातील मुस्लीम पळाले आणि हमीद दलवाईही पळाले."

हमीदभाई हे सुरुवातीला राष्ट्र सेवा दलात जात असत. भारत-पाकिस्तान फाळणी झाली. हमीदभाईंच्या काळात कोकणातील अनेक मुसलमान पाकिस्तानात गेले. स्वतः हमीदभाईंचे वडील पाकिस्तानच्या बाजूचे होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व राष्ट्र सेवा दल यांचं पोषक वातावरण दलवाईंना लाभलं. ग्रामीण भागातून एखादा मुसलमान शहरी भागात येतो, तेव्हा पहिल्यांदा त्यांना हिंदू-मुस्लीम कटुता जाणवते. अशा वेळी तो एकतर त्या कळपात जातो, नाहीतर वेगळ्या विचारांच्या कळपात जातो. हमीदभाईंना चांगलं वातावरण लाभलं. त्यांना जशी सेक्युलर माणसं भेटली, तसेच त्याच्या कुटुंबातच पाकिस्तानवादीही होते.

हसनैन उर्दू भाषेतून दलवाईंबद्दल लिहीत असे. शेवटपर्यंत ते दलवाईंचे समर्थक राहिले आणि दुसरे म्हणजे कायदेतज्ज्ञ असफ ए. ए. फैजी. हमीदभाईंचं वैशिष्ट्य म्हणजे ते जवळ येणाऱ्या माणसाची भीती, संकोच, ताणतणाव घालवत आणि त्याला मोकळे करत. संवाद करताना

हातावर थाप मारणं, आनंदी करणं, जवळीक साधणं दलवाईंना जमत असे. दलवाई अनेकवेळा फिल्म इन्स्टिट्यूटपासून डेक्कनवरील पूनमपर्यंत माझ्या गळ्यात हात घालून चालले. कोणाबद्दलही कटुता न बाळगणारे, चौफेर वाचन असणारे, मोठ्या माणसात वावरणारे हमीदभाई होते.

दोन माणसांची कधीच त्यांनी टिंगल टवाळी केली नाही. केवळ इतरांनी केली, तर त्यांना कधीच आवडत नसे. अ. भि. शहा आणि वसंतराव नगरकर या दोघांमुळे दलवाईंची राष्ट्रीय एकात्मतेबद्दलची संकल्पना आणि समाज अधिक प्रगल्भ झाली. त्यांच्या विषयीचा आदर प्रचंड होता. तसेच असगर अली इंजिनिअर यांच्याबद्दलही त्यांना आदर होता. तुम्हाला इस्लाम समजून घ्यायचा असेल, तर तुम्ही असगर अली इंजिनिअर यांचे साहित्य वाचले पाहिजे, असे ते कार्यकर्त्यांना म्हणायचे. ज्यांना इस्लामच्या इतिहासाबद्दल सखोल माहिती घ्यायची असेल त्यांनी इंजिनिअरना ऐकावे आणि वाचावे. पण ज्या इंजिनिअरबद्दल हमीदभाई आदर करायचे, त्या हमीदभाईंबद्दल इंजिनिअर मात्र चांगले बोललेले कधी ऐकले नाही. दलवाईंना महात्मा गांधीबद्दलही प्रचंड आदर होता.

हमीदभाईंवर ते 'संघी' आहे, 'संघाचा एजंट' आहे, असे पराकोटीचे आरोप आणि टीका झाली. डॉ. बाबा आढावांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावरून पंढरपूरच्या विठ्ठलाच्या शासकीय पूजेला विरोध करून पत्रक काढले. तेव्हा दलवाईंनी त्यावर सही केली. दलवाईंनी केलेल्या सहीमुळे शिवसेना आणि संघवाल्यांनी दलवाईविरोधी पवित्रा घेतला.

मुसलमानांना उघडे पाडण्यासाठी हमीदभाईंचा वापर केला पाहिजे, असं संघवाल्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी शिवाजी मंदिरात दलवाईंचे व्याख्यान ठेवले. संयोजकांना वाटले की, हमीदभाई अरब राष्ट्रांना, पाकिस्तानला, मुसलमानांना झोडपून काढतील. एस. ए. रेहमान, मारुफ खान या कार्यक्रमाला आले होते. हमीदभाई काय भूमिका घेतात, हे अनेकांना तपासायचे होते. मात्र दलवाईंनी या भाषणात अरब राष्ट्रांशी भारताने मैत्रीपूर्ण संबंध ठेवणं कसं महत्त्वाचं आणि हिताचं आहे, हे स्पष्ट केले आणि मी इस्रायलच्या विरोधात का आहे, हेदेखील लोकांना ऐकवले. उद्या वाजपेयी सत्तेवर आले, तर ते पहिली भेट अरब राष्ट्रांना देतील, असे दलवाई म्हणाले.

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तर्कशुद्ध अभ्यास आणि प्रचंड आकलन शक्ती असणाऱ्या दलवाईंच्या अंतःकरणात धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्राभिमान या गोष्टी होत्या. संविधानात्मक मूल्यांना धरून राष्ट्रीय प्रवाह निर्माण करण्याची गरज दलवाईंनी नेहमीच प्राधान्याने व्यक्त केली. मुस्लीम सत्यशोधक चळवळ याच मूल्यांसाठी स्थापन केली आणि त्यांच्या हयात काळात प्राधान्याने विषय हेच होते. धर्मनिरपेक्षता, आधुनिकता आणि लोकशाही हा हमीद दलवाई यांच्या विचारांचा गाभा होता. याच चिंतनातून मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जन्म झाला. मंडळाचे पहिले दशक आणि त्यातील प्राधान्याने विषय याच मूल्यांच्या केंद्रस्थानी होते. पहिल्या दशकात मंडळाचे एकूण कार्य दलवाईकेंद्री होते, असे म्हणायला हरकत नाही.

हमीद दलवाईंजवळ असणारी तर्कशुद्ध मांडणी, अभ्यासाचा अवाका, माणसं पारखण्याची

क्षमता, उद्दिष्टांसाठी करावी लागणारी लढाई आणि नेतृत्व  कौशल्य इत्यादी चळवळीसाठी लागणारे व्यक्तिमत्त्व इतरांकडे नव्हते. म्हणून सामुदायिक नेतृत्वाचा पर्याय निवडला. काही वर्षानंतर व्यक्तिगत महत्त्वकांक्षा, स्पर्धा यांसारख्या दौर्बल्यामुळे काही लोक मंडळापासून दूर जायला लागले. शिवाय हमीद दलवाईंना लाभलेले प्रा. अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, वसंतराव नगरकर, गोविंदराव तळवळकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गं. बा. सरदार आणि अशा इतरांचे सहकार्य काही काळ मिळाले. तसेच दलवाईंच्या काळातले मुस्लीम समाजातील विचारवंत मोईन शाकीर, असफ ए. ए. फैजी, एम. आर. ए. बेग अशा प्रतिष्ठित विचारवंतांचा सहभाग नंतरच्या काळात राहिला नाही. यातून एक मोठी वैचारिक पोकळी निर्माण झाली. हे खरं आहे की भाई वैद्य, बाबा आढाव, पन्नालाल सुराणा, प्रा. जहीर अली, प्रा. फ. म. शहाजिंदे, रावसाहेब कसबे आणि यांच्यासारखे काही लोक मंडळासोबत दीर्घकाळ राहिले, ही मंडळासाठी जमेची बाजू आहे.

शहाबानो प्रकरणकाळात महिलांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी मंडळाला भरपूर वाव मिळाला आणि ती संधी मंडळाने घेतली. मी स्वतः याचा साक्षीदार आहे आणि निर्णय प्रक्रियेतही मी होतो. पुढे जातीय दंगली, दहशतवाद, बॉम्बस्फोट, गुजरात हिंसाचार, अशा काही घटनांमुळे प्रबोधनाचे विषय हाताळणे अवघड झाले आणि राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सुरक्षितता अशा विषयांवर मंडळाला काम करावे लागले.

यादरम्यान मंडळाला राष्ट्रीय पातळीवरील जाण्याची संधी मिळाली आणि सय्यदभाईंनी त्या काळात यथाशक्ती प्रयत्नही केले. या सगळ्या गोष्टींमध्ये मंडळाची तर्कशुद्ध बुद्धिप्रामाण्य भूमिका, अभ्यास इत्यादी संदर्भात मर्यादा असल्यामुळे काही मतभेद निर्माण झाले आणि अनेकांनी आपल्या समांतर संस्था स्थापन केल्या. दुरावलेल्या लोकांना सहभागी करून घेणे, अभ्यास शिबिरांचे जास्तीत-जास्त आयोजन करणे, याकडे दुर्लक्ष झालं. यातून काही प्रमाणात मंडळाची पीछेहाटही झाली. परंतु गेल्या १०-१५ वर्षांत नवेनवे उपक्रम, तरुणांचा सहभाग, महिला मंडळाशी जोडल्या जात आहेत आणि यातून पुन्हा मंडळाच्या कार्याला गती येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

मुस्लीम धर्मवादी राजकारणाची चिकित्सा आणि समाजप्रबोधनाचे कार्य करत असताना हिंदुत्ववाद्यांमुळे काही नव्या प्रश्नांनीही आव्हाने निर्माण केली. मंडळाच्या प्रबोधनांच्या विषयांना घेऊन ध्रुवीकरणाचे षडयंत्र रचले जाऊ लागले. तोंडी तलाकबंदी झाली ही एक जमेची बाजू असली, तरी महिलांचे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. मुस्लीम समाजाची असुरक्षितता मोठ्या प्रमाणात वाढली आहे, ही केवळ मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठीच नाही, तर सर्व धर्मनिरपेक्ष आणि परिवर्तनवादी चळवळीपुढील आव्हाने आहेत.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने या काळात आपला प्रबोधनाचा विचार न सोडता नव्या प्रश्नांना सामोरे जाण्याची योजना आखायला हवी. महाराष्ट्रात मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा एक इतिहास आहे. मुस्लीमतर समाजात मंडळाबाबत आदर आणि विश्वास आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला दाद देऊन सोबत जाणे, ही मुस्लीम समाजाचीही अनिवार्यता ठरेल, या

संधीचा उपयोग करून मंडळाने मुस्लीम समाजातील कार्य वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

*(अन्वर शेख : मुस्लीम सत्यशोधक चळवळीतील सुरुवातीपासून कार्यकर्ते, धर्मनिरपेक्ष मानवी मूल्यांचे समर्थक आणि प्रसारक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ – उद्‌देश व भूमिका' या पुस्तकाच्या लेखनात मोलाचे योगदान, विविध सामाजिक संस्थांशी संबंधित आणि पोलीस सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी)*

## ६.१६ मुस्लीम सत्यशोधकांना साथ हवी – डॉ. नरेंद्र दाभोलकर

हमीद दलवाईचा स्मृतिदिन आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा चाळिसावा वर्धापनदिन पुणे येथे ३ मे रोजी एकत्रितपणे संपन्न झाले. हमीद दलवाईंच्या कार्यामध्ये 'साधना' सातत्याने, खंबीरपणे आणि अभिमानाने उभी राहिली. हमीद दलवाईंच्या कार्याचे आगळे-वेगळेपण नोंदवताना पु. ल. देशपांडे यांनी "महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या समाजप्रबोधनाच्या संपूर्ण इहवादी आणि 'माणुसकी हाच धर्म मानायला हवा' ह्या विचारवृक्षाला आलेले विसाव्या शतकातले सर्वांत रसरशीत फळ हमीद दलवाई होय" अशी नोंद केली आहे.

याबरोबरच नरहर कुरुंदकरांनी केलेली "दोन गोष्टींचे आश्चर्य वाटते. एक म्हणजे हमीदला नैसर्गिक मृत्यू आला आणि दुसरे म्हणजे छोट्या आयुष्यातही त्याला ३००-४०० मुस्लीम अनुयायी मिळाले" ही नोंद हमीद दलवाईंच्या कार्याची दाहकता व महत्ता स्पष्ट करते. त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाची वाटचाल मंद राहिली व अडखळत चालू आहे. त्यामध्ये ते कार्य चालू ठेवणाऱ्यांचा दोष नाही. अडथळे आणि अडचणीच प्रचंड आहेत.

इस्लामला 'सत्यशोधन' मान्य नाही. बाबरी मशीद पाडणे आणि गुजरात दंगल, यानंतर सुरक्षा हा मुस्लीम मानसिकतेचा अव्वल दर्जाचा प्रश्न बनला. रोजीरोटीचे प्रश्न तीव्र आहेतच. अशा मानसिकतेत प्रबोधन कोण ऐकणार? मात्र एका बाजूला सच्चर कमिशनने मागासांपेक्षा मागास असे पुढे आणलेले मुस्लीम समाजवास्तव आणि दुसरीकडे शेजारच्या पाकिस्तानमधले धर्माचे तालिबानी रूप, अशा बाबी इथल्या मुस्लीम मनाला नव्या विचाराची दिशा देणाऱ्या ठरू शकतात.

मुस्लीम समाजातील जातीयवादी विचारांबद्दल हमीद दलवाईंची भूमिका अतिशय स्पष्ट होती. त्याला विरोध करण्यासाठी सरसावलेल्या हिंदू जातीयवादाला त्याचा तेवढाच विरोध होता. मात्र उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष विचारांच्या हिंदूंची फळी ही मुस्लीम जातीयवादी विचाराला स्पष्टपणे विरोध करत नाही, याची हमीदला खंत होती. असा विरोध केला, तर मुस्लीम मानस आपल्यालाही हिंदू जमातवाद्यांच्या रांगेतच बसवेल, अशी भीती हिंदू उदारमतवादी बाळगतात. ती त्यांनी बाळगू नये, असे हमीद दलवाईंचे आवाहन होते. मुस्लीम समाजाने देशाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे, असे त्यांना वाटत होते. पण त्यांना हा प्रवाह हिंदू धर्माचा अभिप्रेत नव्हता; तर तो लोकशाही समाजवादाचा आहे व तो मुसलमानांना बरोबरीने न्याय देणारा आहे/असावा, अशी त्यांची धारणा होती.

या प्रवाहाला समतेची देणगी इस्लामकडून मिळू शकेल, असेही त्यांना वाटत होते. समाजप्रबोधनाचे कार्य करावयाचे तर दैनंदिन राजकारणापासून दूर राहणे श्रेयस्कर, हेही हमीद दलवाईंनी ओळखले होते. उदारमतवादी विचारांच्या व्यक्तींचा एक समूह जसा हिंदू समाजात दिसतो, तसा तो मुस्लीम समाजात निर्माण व्हावा आणि त्यांच्या परस्परप्रतिसादातून प्रबोधनाची ताकद कृतीत प्रगटावी, असे त्यांना वाटत होते.

हमीद दलवाईंच्या विचाराची खरी बंडखोरी त्यांनी केलेल्या इस्लामच्या धर्मचिकित्सेत आहे.

इस्लामच्या १३०० वर्षांच्या इतिहासात असे आव्हान इस्लामला कोणी दिलेले नाही. हमीद दलवाईंच्याच शब्दांत "मी मुसलमान आहे, पण माझा ईश्वरावर (अल्लावर) विश्वास नाही. म्हणून महंमद ईश्वराचा अखेरचा प्रेषित होता आणि 'कुराण' हा दैवी संदेश आहे, या गोष्टीवरही माझा विश्वास नाही. प्रेषिताविषयी मला अतिशय आदर आहे. इतिहासात उदयाला आलेल्या सर्वश्रेष्ठ व्यक्तींपैकी ते एक आहेत, असे मी मानतो. पण प्रेषित स्वतःच सांगत त्याप्रमाणे ते 'केवळ एक माणूस' होते आणि मानवी प्रकृतीत असलेली दौर्बल्ये त्यांच्याही ठिकाणी होती. भारतातील मुस्लीम संस्कृतीने मला घडविले आहे, या अर्थाने मी मुसलमान आहे. या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत, त्यांचा मला अभिमान आहे आणि तिच्यात ज्या विद्रूप गोष्टी आहेत, त्यांची मला लाज वाटते. आठशे वर्षांच्या इतर समाजांना पादाक्रांत करण्याच्या तिच्या इतिहासामुळे तिच्यात एक प्रकारचा पाशवीपणा भिनला आहे. तिला अंतर्बाह्य स्वच्छ केले, तरच ती मानवतेच्या सेवेच्या कारणी लागू शकेल, असे मला वाटते. इस्लामच्या प्रवक्तेपणाचा स्वतःच स्वतःकडे अधिकार घेतलेल्या व्यक्तींच्या पिढ्यानपिढ्यांनी त्याच्या अर्थाला ज्या अनेक कलाटण्या दिल्या आहेत, त्यामुळेही मुस्लीम सदसद्विवेक बुद्धीच अचेतन झाली आहे.

हा देश समर्थ व्हावा, जगातील शक्तिमान राष्ट्रांच्या पंगतीत बसावा असे आपल्याला वाटत असेल; तर या देशातील समाज हा शास्त्रीय व विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनावर आधारलेला, भौतिक श्रद्धा बाळगणारा आणि चैतन्यशील बनला पाहिजे, याबद्दल कुणाचे दुमत होईल, असे वाटत नाही. याकरता, समाज आधुनिक आणि प्रगतिकारक बनवण्याच्या आड ज्या धर्मश्रद्धा येतात, त्या दूर सारण्याची प्रक्रिया पुढे चालवणे म्हणजेच धर्मनिरपेक्षतेकडे वाटचाल करणे आहे."

इस्लामच्या मूलभूत श्रद्धेलाच आव्हानित करणे हा एक भाग आणि धर्माच्या नावाने होणारे शोषण, धर्मनिरपेक्ष विचाराला नकार याला विरोध करणे, हा दुसरा भाग. यातील दुसऱ्या मार्गावरून मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आपली वाटचाल चालू ठेवली आहे आणि ते योग्यच आहे. लोकांचे जे प्रश्न आहेत, ते घेऊन उभे राहिले की, मतभिन्नता असूनही लोक बरोबर येतात, हा त्यांचा अनुभव आहे. तो आश्वासक आहे.

तलाकपीडित महिला हा मुस्लीम समाजातील असाच एक वास्तवातला विदारक प्रश्न आहे. या प्रश्नावर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने लखनौ, दिल्ली, अहमदाबाद, कालिकत, बंगलोर, मंगळूर, मदुराई अशा भारतभर परिषदा घेतल्या. मुस्लीम महिलांना संरक्षण देणारे कायदे करण्याची मागणी केली. तलाक देण्याच्या सध्याच्या पद्धतीला पर्याय म्हणून नवा 'निकाहनामा' निर्माण केला. हा मूलभूत प्रयत्न होता. तो उपक्रमाच्या पातळीवरच राहिला, त्याला कायद्याचे स्थान प्राप्त होऊ शकले नाही. परंतु पर्यायाची चर्चा तरी सुरू झाली. प्रश्नाच्या आधारे चालणाऱ्या कामामुळे मर्यादित अर्थाने मान्यता प्राप्त झाली. म्हणूनच पुण्याच्या ज्या मोमिनपुऱ्यात हमीदभाईंवर ४० वर्षांपूर्वी हल्ले झाले, त्याच मोमिनपुऱ्यात तलाकपीडित महिलांचे केंद्र स्थानिक सहकार्यातून उभे राहू शकले.

मुस्लीम मानस धर्मनिरपेक्ष बनवण्याचे काम अधिकच बिकट आहे. 'जमात-ए-इस्लामी' ही

संघटना इस्लामिक राज्याची स्वप्ने पाहते. 'हिंदूराष्ट्र' अथवा 'इस्लामिक राष्ट्र' दोन्ही कल्पना धर्मनिरपेक्षतेचा म्हणजेच आधुनिक राष्ट्रनिर्मितीचा गळा घोटणाऱ्या आहेत. खरे तर राजकारणात धर्म आणू नये, हीच या देशातील सामान्य मुस्लिमाची भावना आहे. त्यामुळे काय उत्पात होतात, ते शेजारच्या पाकिस्तानात तो रोज पाहतो आहे. पण या विचाराला पर्याय मिळतो 'जमाते तबलीग'चा. तबलीगच्या दृष्टीने पारलौकिक जगात होणारे कल्याण हेच खरे. त्यासाठी कर्मठपणे करावयाची कर्मकांडे हेच इथल्या रोजच्या जीवनाचे स्वरूप असावयास हवे, हाही विचार धर्मनिरपेक्षता व आधुनिक राष्ट्रनिर्मिती यांपासून मुस्लीम मानसाला दूर नेणारा आहे. या संदर्भात मुस्लीम सत्यशोधक मंडळ करत असलेले प्रबोधन म्हणूनच अतिशय आवश्यक आहे. आपापल्या परीने सर्वांनी त्याला साथ द्यावयास हवी. उद्याचा अधिक चांगला भारत त्यातूनच घडणार आहे.

*(डॉ. नरेंद्र दाभोलकर, 'समता-संगर', साधना प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पुणे, २०१८, पृ. क्र. ११० ते ११३)*

*(नरेंद्र दाभोलकर : 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'चे कार्याध्यक्ष, अंधश्रद्धा आणि विज्ञान-विवेकावर आधारित पुस्तकांचे लेखन. भारत सरकारने २०१४ मध्ये मरणोत्तर 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले.)*

## ६.१७ मुस्लीम सत्यशोधक मंडळ – डॉ. राजेखान शानेदिवाण

समाजाचा विकास विचारांच्या गतिशीलतेवर अवलंबून असतो. ज्या समाजात नवा विचार मांडला जात नाही, त्या समाजाचे अस्तित्व काळाच्या ओघात संपून तरी जाते किंवा त्या समाजाला स्थितीशीलता तरी येते. भारतीय समाजजीवनाचा आलेख मांडताना दीर्घकाळाची स्थितीशीलता अनुभवता येते. व्यक्तीपेक्षा धर्मकांड अधिक प्रभावी ठरल्याच्या काळात माणसाला महत्त्वच उरले नव्हते. धर्मव्यवस्थेने संपूर्ण समाजाला वेठीस धरल्यासारखी परिस्थिती होती. अशा वेळी काही व्यक्ती नवा विचार घेऊन पुढे आल्या. विशेषतः एकोणिसाव्या शतकात अनेक सामाजिक चळवळींचा उदय झाला. महात्मा फुले, गो. ग. आगरकर, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा समाजसुधारक विचारवंतांनी समाजाला बदलवण्याचा संकल्प करून नवा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला. सुरुवातीला क्षीण प्रतिसाद लाभलेल्या या सामाजिक चळवळींनी हिंदू समाजातील साचलेपण दूर करून प्रागतिक विचारधारा सुरू होण्यास मदत झाली. आजचा प्रगत समाज या सामाजिक चळवळीचे फलित आहे.

हिंदू समाजाला वैचारिक नेतृत्व  लाभले, पण भारतातील इतर समुदायासंदर्भात असे विधान ठामपणे करता येत नाही. विशेषतः मुस्लीम समाजाचा हजार–बाराशे वर्षांचा इतिहास नजरेसमोर आणला, तर प्रागतिक विचार किंवा धर्मचिकित्सा या बाबीला मुस्लिमांनी थाराच दिलेला नाही, हे लक्षात येते. साधारणपणे सातव्या शतकात मुस्लीम भारतात आले. या समूहाचा मुख्य आधार 'कुराण' व पैगंबर महंमद यांच्यावरील प्रगाढ श्रद्धा हाच आहे. त्यामुळे अगदी सुरुवातीपासून ते आजपर्यंत इस्लामचे जे चित्र आहे, तसेच राखण्यात धन्यता मानण्यात येत आहे.

भारतीय संदर्भात याचा विचार वेगळ्या स्तरावरून करावा लागतो  कारण भारतातील मुस्लीम मूळचे भारतीय, भारतीय व्यवस्थेचा घटक असणारे आहेत. धर्म आणि जातींच्या जाचक बंधनाना कंटाळून, निराश होऊन त्यांनी इस्लाम स्वीकारला. धर्म बदलला, पण मूळचे जगणे तसेच राहिले. नाव बदलले, पण व्यवसाय तसेच राहिले. या देशातील अनेक मुस्लिमांना धर्मतत्त्वांचा नीटसा परिचयही नाही, 'कुराण' वाचता येत नाही. धर्मतत्त्व आणि श्रद्धा यांच्यासंदर्भात त्यांच्या मनात गोंधळ आहे. अशा वेळी त्यांना धर्म, धर्मतत्त्वे नीट समजून सांगून धर्मानुरूप आचरण करायला सांगण्याची तसदी फारशी कुणी घेतली नाही.

एवढेच नव्हे, तर धर्मतत्त्वांची तर्कनिष्ठ चिकित्सा करणाऱ्यांना 'धर्मद्रोही' ठरवण्यात आले. त्यामुळे जे काही घडते आहे, घडवले जात आहे, त्याचा निमूटपणे स्वीकार करण्याची भूमिका विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सुरू राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र इस्लामच्या तत्त्वांना लोकांपर्यंत नीटपणे पोहचवण्याच्या हेतूने, लोकांना प्रागतिक विचारांकडे नेण्याचा प्रयत्न म्हणून एका चळवळीचा जन्म झाला.

भारताच्या इतिहासातील ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना असून त्याचा उल्लेख 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' असा होतो. मुस्लीम समाजातील पुरोगामी विचारवंत हमीद दलवाई यांचे

विचार व प्रेरणा घेऊन या मंडळाची स्थापना समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांच्या घरी झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात हमीद दलवाईंनी संपूर्ण देशाचा प्रवास केला होता. या प्रवासातून त्यांनी भारतीय मुस्लीम समजून घेतला. त्यांच्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, भारतीय मुस्लीम मूलतः भारतीय संस्कृतीत वाढलेला, पण इस्लामी धर्मतत्त्वांमध्ये अडकलेला आहे. धर्मासंदर्भातील अज्ञान त्याच्या ठायी ठायी जाणवते. शिक्षणासंदर्भात अनास्था, स्त्रियांसंदर्भातील टोकाची पक्षपाती भूमिका, धर्माचा अतिरिक्त सोस, यांमुळे भारतीय मुस्लिमांना पुढे जाण्यासाठीची दिशा मिळत नाही. धर्माची भीती सातत्याने त्यांच्या मानगुटीवर असते.

ही सर्व परिस्थिती बदलायला हवी, याची जाणीव होऊन हमीद दलवाई यांनी मुस्लीम समाजाचे वैचारिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न सुरू केला. मुस्लीम समाजाची बंदिस्त चौकट लक्षात घेतली, तर या प्रयत्नांना मुस्लिमांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही, पण हिंदूतील सुधारणावादींनी हमीद दलवाईंना प्रोत्साहित केले. दलवाईंना पुढे जाण्याची वाट मिळाली. त्यातून मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा विचार मूळ धरू लागला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ स्थापन होणे, ही महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना होती. हमीद दलवाई, भाई वैद्य, बाबा आढाव, अ. भि. शहा यांच्यासह समाजवादी चळवळीतील अनेक मान्यवरांनी चर्चा करून मंडळाची दिशा व कार्यप्रणाली निश्चित केली. पुण्याच्या वर्तुळात या संदर्भातील चर्चा होत असतानाच २७ जानेवारी १९७० रोजी पुण्याच्या दै. 'प्रभात'मध्ये पहिल्यांदा या संदर्भात बातमी प्रसिद्ध झाली. संघटनेची प्राथमिक कार्यक्रमपत्रिका जाहीर करताना समान नागरी कायदा व वक्फ बोर्डाकडील अडीचशे कोटी निधीचा वापर शैक्षणिक कामासाठी व्हावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

यानंतर दीड महिन्यांनी म्हणजे १८ मार्च १९७० रोजी हमीद दलवाई यांनी मुस्लीम जागृतीसाठी सत्यशोधक मंडळ स्थापणार अशी घोषणा करताना, 'मुस्लीम समाजात राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि सामाजिक समतेची आधुनिक मानवी मूल्ये प्रस्थापित व्हावीत, या हेतूने २२ मार्चला मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होत आहे' असे जाहीर केले.

'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या नावाचा इतिहासही या निमित्ताने पाहावयास हवा. १९व्या शतकात जोतीबा फुले यांनी सनातनी धर्मतत्त्वांना विरोध करून मानवतावादी समाज निर्माण करण्याच्या हेतूने 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली होती. हिंदू धर्मामध्ये प्रथा-परंपरेच्या नावाखाली समाजातील एका मोठ्या वर्गातील स्त्री पुरुषांना गुलामीत ठेवण्यात आले होते. जोतीबांनी त्या विरोधात आवाज उठवून प्रत्यक्ष कृती केली.

हमीद दलवाईंसह इतरांच्या समोर जोतीबांचा आदर्श होता. त्यामुळे 'सत्यशोधक' नाव घ्यावे असे ठरले. त्या वेळी काहींनी 'प्रोग्रेसिव्ह मुस्लीम' असेही नाव सुचवले. चर्चेच्या अखेरीला हमीद दलवाई यांनी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या नावावर शिक्कामोर्तब केले. यावर काही मुस्लिमांनी या नावावरच आक्षेप नोंदवून 'मुसलमानांमध्ये काय हे सत्य शोधणार आहेत? येथे सर्व सत्यच आहे' अशा प्रतिक्रियाही नोंदवल्या. पण अखेरीला 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या नावाने मंडळाची स्थापना झाली. प्राथमिक स्तरावरील चर्चा झाल्यानुसार महिलांच्या संदर्भात

विषमतावादी शरीयत कायद्याच्या विरोधात हे मंडळ काम करणार होते. इस्लामच्या इतिहासात हे असे पहिल्यांदा घडत होते.

२२ मार्च १९७० रोजी 'साधना' साप्ताहिकाचे आंतरभारती सभागृह अक्षरशः तुडुंब भरले होते. एका ऐतिहासिक घटनेची नोंद होण्याची प्रतीक्षा सर्वांना लागलेली होती. व्यासपीठावर हमीद दलवाई, अ. भि. शहा, प्रा. यास्मीन लुकमानी, अध्यक्ष ए. जे. शेख आणि चिटणीस सय्यदभाई होते. येथे एक बाब लक्षात घ्यावयास हवी. ती ही की, हमीद दलवाई मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कोणत्याही पदावर नव्हते. मंडळाला बाहेर राहूनच मार्गदर्शन करण्याची त्यांनी भूमिका घेतली. स्थापनेच्या पहिल्याच दिवशी सय्यदभाईंनी तोंडी तलाक आणि बहुपत्नित्व रद्द करण्यासाठी मुस्लीम समाजात सह्यांची मोहीम आखणार असल्याचे जाहीर केले. प्रा. यास्मीन लुकमानींनी अधिकृतपणे मंडळाची स्थापना झाल्याचे जाहीर केले.

जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, त्या वेळी त्यांच्यासोबत विचारवंतांचा नैतिक पाठिंबा ठामपणे होता, कारण अशा सुधारणा व्हाव्यात, अशी हिंदू समाजाचीच धारणा होती. त्यामुळे जोतीबांनी पाऊल उचलल्याबरोबर त्यांना पाठिंबा देण्यासाठीची मानसिकता काही प्रमाणात का असेना निर्माण झाली. एकाअर्थी जोतिबांना समाजातील विशिष्ट वर्ग वगळता सर्वांचा पाठिंबा होता, पण हमीद दलवाईंसंदर्भात अशी परिस्थिती नव्हती. हमीद दलवाई धर्मविरोधात लोकांना भडकावत आहेत, अशी भावना तत्कालीन तथाकथित धर्मरक्षकांनी घेतली. त्यामुळे मुस्लीम सत्यशोधक मंडळाला भविष्यात कसा प्रतिसाद मिळेल, हे प्रश्नचिन्हच होते. पण स्वधर्म, स्वजनांच्या विरोधात उभं राहून मानवतावादी समाजाची उभारणी करण्याच्या हेतूने हमीद दलवाईंनी उचललेले हे पाऊल क्रांतिकारी होते.

आपल्या विचारांवर अढळ श्रद्धा ठेवून, शांत चित्ताने समोरच्याशी संवाद साधून ध्येयाकडे जाण्याचा मार्ग दलवाईंनी स्वीकारला. स्वातंत्र्योत्तर भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समानता या तत्त्वांना सामोरे ठेवून जीवाची पर्वा न करता कार्य करणारा हमीद दलवाईंसारखा कार्यकर्ता विरळच म्हणावयास हवा. किमान मुस्लीम समाजाच्या संदर्भात तर हे विधान तंतोतंत खरे मानावयास हवे.

हमीद दलवाईंच्या विचारांची दिशा स्पष्ट होती. त्यांच्या विचारांमध्ये गोंधळलेपण नव्हते. त्यामुळे व्यक्ती आणि समूहाशी संवाद साधताना त्यामध्ये तर्कनिष्ठ सैद्धान्तिक मांडणी असायची. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेच्या वेळी त्यांनी केलेले भाषण यादृष्टीने खूप महत्त्वाचे आहे. त्यांच्या मतानुसार समाजसुधारणेचा विचार मांडताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा पाया घेऊ नका. धार्मिक पुनरुत्थानाचा पाया घेतला की, प्रबोधनाची भूमिका मागे पडते. जी गोष्ट कालविसंगत आहे, जी तर्कशुद्ध विचाराला पटत नाही, ती करू नका, असे सांगण्याची वैचारिक भूमिका समाजसुधारकांनी घेतली पाहिजे. हमीद दलवाई यांनी अशा विचारधारेतून सामाजिक चळवळीचा आधार काय असायला हवा, याचे सूतोवाच केले आहे.

हमीद दलवाईंचा धर्माला विरोध नाही; पण जे कालविसंगत असेल, त्याच्या विरोधात बोललं

पाहिजे, असे सांगून जर धर्माचा आधार घेऊन सुधारणा करण्याचं पुनरुत्थानवादी धोरण आपण अवलंबलं, तर आपल्याला अनुयायी मिळतील, पण मग समाजप्रबोधनाच्या कार्याला मर्यादा पडतील, असे म्हटले आहे.

हमीद दलवाईंना राजकीय वातावरणाचे आकर्षण होते. त्यामुळे त्यांना मुस्लीम सत्यशोधक मंडळाला राजकीय पक्षापासून दूर ठेवणे अवघड जाईल असे वाटले. आपल्या भाषणात त्यांनी मुस्लिमांचे प्रश्न केवळ शिक्षण घेतल्यामुळे सुटतील असे नाही, तर ज्या परिस्थितीमुळे विषमतावादी प्रवृत्ती निर्माण होतात, त्यांना मुळातच विरोध करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना मुस्लीम समाजांतर्गत निर्माण झालेली विषमतेची दरी भरून काढण्याच्या हेतूने झाली. पंचेचाळीस वर्षांचा दीर्घ पल्ला पार करून ही सामाजिक चळवळ आपल्यापरीने कार्य करत आहे. या काळात मंडळाने अनेक योजना, उपक्रम राबवले असून मुस्लीम समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, अशीच भूमिका ठेवली आहे.

हमीद दलवाई यांच्या विचारांचे मूर्तरूप म्हणजे 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' होय. स्थापनेपासून चर्चेत राहिलेल्या या मंडळाने अनेक समाजोपयोगी कार्यांची सुरुवात केली. येथे एक बाब स्पष्टपणे लक्षात घ्यावयास हवी की, हमीद दलवाईंना मुस्लीम समाजातून अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला. याचा अर्थ ज्यांच्यासाठी सुधारणावादी चळवळ उभी राहिली, तीच मंडळी यामध्ये सहभागी झाली नाहीत; पण तरीही धर्माच्या तत्त्वांचा आधार घेत ज्यांनी अन्याय केला आहे, त्यांच्या विरोधात मंडळ ठामपणे उभे राहिले. यासंदर्भात अनेक कार्यक्रमांचा उल्लेख नोंदवता येईल.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ विशिष्ट ध्येय, हेतू आणि प्रेरणेने काम करत आहे. या चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या इतर चळवळीच्या तुलनेत कमी असली, तरी ही सर्व मंडळी ध्येयवादी आहेत. अगदी सुरुवातीपासूनच हमीद दलवाई यांच्याबरोबर काम करणारे सय्यदभाई, बाबुमियाँ बँडवाले, मेहेरून्निसा दलवाई आजही काही प्रमाणात कार्यरत आहेत. वजीर पटेल, फक्रुद्दीन बेन्नूर, अब्दुल कादर मुकादम यांनी मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. हुसेन जमादार यांचाही कृतिशील सहभाग मंडळाच्या वाटचालीत राहिला. वर्तमान स्थितीत नवविचारांनी प्रेरित झालेली नवी पिढी मंडळाच्या विचारधारेशी जोडलेली आहेत. यामध्ये प्रा. शमसुद्दिन तांबोळी, प्रा. सायरा मुलाणी, प्रा. जमीर शेख, बशीर शेख, अझरुद्दीन पटेल, तमन्ना इनामदार, दिलावर शेख, प्रा. बेनझीर तांबोळी आदींचा समावेश आहे. नव्या व जुन्या दमाच्या कार्यकर्त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य सुरू ठेवले आहे.

४५ वर्षाचा वैचारिक कृतीशील प्रवास करून मुस्लीम सत्यशोधक मंडळ पन्नाशीकडे वाटचाल करत आहे. हा काळ मंडळाच्या मूल्यमापनाच्या दृष्टीने तोकडा आहे. असे असले तरी हमीद दलवाईंच्या अथक परिश्रमातून उभी राहिलेली ही वैचारिक चळवळ ताकदीने पुढे जाण्यासाठी मुस्लीम समाजातील तरुणांनी पुढे यायला हवे. यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ 'मुस्लीमविरोधी' काम करते, अशी झालेली समाजाची मानसिकता संपवावी लागेल. दुर्दैवाने या मंडळाला 'धर्मविरोधी' संबोधून त्याकडे असूया, नकाराच्या भावनेने पाहिले जाते, ही गंभीर आणि

प्रबोधनाच्या चळवळीला धक्का पोहचवणारी बाब आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ' धर्माला विरोध करत नाही. धर्माचा आधार घेऊन होत असलेल्या शोषणाला विरोध करते. विशेषतः स्त्रियांसंदर्भातील 'शरीयत'चा दृष्टीकोन बदलायला हवा, अशी वैचारिकता घेऊन मंडळ कार्यरत आहे. ही भूमिका मानवतावादी असून माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी, याचा आग्रह धरणारी आहे. अशा वेळी आजच्या शिक्षित मुस्लीम तरुण-तरुणींनी धर्मतत्त्वांचा चिकित्सक वृत्तीने अभ्यास करून जे कालबाह्य व मानवताविरोधी आहे, त्याला विरोध करावयास हवा.

आजचे जग विज्ञानवादी विचाराने भारलेले आहे. कोणताही विचार मांडताना त्याला प्रामाणिक आधार घ्यावा लागत आहे. अशा वेळी इस्लामवर श्रद्धा असणाऱ्या प्रत्येकाला आपल्या श्रद्धा, निष्ठा, विचारांना काळाच्या कसोटीवर तपासून घ्यावे लागेल. मुस्लीम सत्यशोधक मंडळ अशाच विचारसरणीचा आग्रह धरत असून एकविसाव्या शतकामध्ये संपूर्ण जगभर मूलतत्त्ववादी विचारसरणी हैदोस घालत असताना, शांततामय जगाची स्थापना करण्याचे सामर्थ्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या विचारधारेमध्ये आहे, हे गंभीरपणे लक्षात घ्यावयास हवे.

*(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, वर्ष २, अंक ४, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६, पृ. क्र. ८ ते १५)*

*(डॉ. राजेखान शानेदिवाण : कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य, अनेक पुस्तके प्रकाशित आणि मुस्लीम मराठी साहित्याचे अभ्यासक, लेखक व व्याख्याते.)*

## ६.१८ बुद्धिप्रामाण्य भाई वैद्य यांची मुलाखत – समीर शेख, साजिद इनामदार

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाच्या प्रवासाचे सुरुवातीपासून साक्षीदार असलेले भाई वैद्य यांच्याशी मंडळाचे युवा कार्यकर्ते समीर शेख व साजिद इनामदार यांनी केलेली बातचीत)

***प्रश्न : एप्रिल १९६६ साली दलवाई यांनी सात महिलांना घेऊन तलाक, बहुपत्नीत्व या तरतुदींच्या विरोधात मोर्चा काढला. दलवाई यांच्या सामाजिक सुधारणा चळवळीची ती सुरुवात होती, असे म्हणता येईल. या वेळी दलवाई आणि तुमचा परिचय होता?***

– आता मला निश्चित साल आठवत नाही, त्या मोर्चाच्या आधीपासूनचा त्यांचा व माझा परिचय होता. एकतर ते समाजवादी चळवळीचे कार्यकर्ते होते. चिपळूणला राष्ट्र सेवा दलातही होते. त्यामुळे त्यांचा व माझा परिचय होताच. एक तर ते 'मराठा' वृत्तपत्रात होते आणि दुसरं म्हणजे त्यांच्या 'इंधन' या कादंबरीमुळे त्यांचे नाव चांगलेच चर्चेत होते. 'इंधन'मुळे त्यांच्या गावी वाद झाल्याचे मला आठवते.

***प्रश्न : हमीद दलवाई या व्यक्तीचे वेगळेपण तुम्हाला कधी व कसं जाणवलं?***

– दलवाई पुण्याला आले की, निळूभाऊ लिमये यांच्या 'पूनम' हॉटेलमध्ये थांबायचे आणि दर वेळी न चुकता मी त्यांची भेट घ्यायचो, चर्चा करायचो. त्यांचं एक भाषण इथे पुण्यात टिळक स्मारक मंदिरात धूमधडाक्यात झालं होतं. त्यात त्यांनी विविध धर्मीय जातीयवाद्यांवर तोफा डागल्या होत्या. मला आठवतंय, गांधींना 'मुस्लीमधार्जिणे' म्हणून तुम्ही दोष देता; पण 'लखनौचा करार' जिनांसोबत टिळकांनी केला, असं बिनतोड मत त्यांनी मांडले आणि सभेला गर्दी करून आलेले हिंदुत्ववादी nonplus झाले होते. यातून मला सांगायचं इतकंच आहे की, हिंदुत्ववाद्यांचे कानही त्यांनी टोचले. तेही अशा जाहीर सभेत– जेथे यांची लक्षणीय उपस्थिती होती. अशा हमीदशी माझी घनिष्ठ मैत्री झाली, आमच्यात स्नेह उत्पन्न झाला, याचा मला खरं तर खूप अभिमान आहे.

***प्रश्न : दलवाई यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या त्या ऐतिहासिक मोर्चाबाबत फारच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. त्या मोर्चात सहभागी झालेल्या महिलांपैकी अनेकांची नावेही आज उपलब्ध नाहीत. तुमच्या काही विशेष आठवणी त्या वेळच्या? तुम्हाला तो मोर्चा ऐतिहासिक का वाटतो?***

– त्यांनी सात मुस्लीम भगिनींना घेऊन जो मोर्चा मंत्रालयावर काढला, त्याबद्दल आम्हां सर्वांना आस्था होती. त्यांचं आम्ही अभिनंदनही केलं होतं. मुस्लीम समाजातील महिलांनी रस्त्यावर येऊन आपल्या संवैधानिक हक्काच्या आड येणाऱ्या धार्मिक रूढी–परंपरांविरोधात

निदर्शने करायची, ही काही सामान्य गोष्ट नव्हती. किंबहुना आता हे सर्वमान्य आहे की, अशा प्रकारची मागणी करणारा मुस्लीम महिलांचा तो जगातला पहिला मोर्चा होता. त्यामुळे तो मोर्चा त्या काळी खूप गाजला. एका बाजूला दलवाई आणि त्या सात महिला आणि दुसऱ्या बाजूला त्यांना विरोध करणारे हजारो सनातनी वृत्तीचे लोक; पण त्या महिलाही काही डगमगल्या नाहीत.

***प्रश्न : धर्माची मूलभूत चिकित्सा करणारे, सोबतच मुस्लीम महिलांच्या संवैधानिक हक्कासाठी लढणारे एखादे मंडळ किंवा संस्था असावी, असा विचार कधी व का आला असावा बरं त्यांच्या डोक्यात?***

– या मोर्चानंतरच दलवाई यांनी माझ्यासोबत आणि इतर अनेक सहकाऱ्यांसोबत चर्चा केल्या. मला ते म्हणाले की, 'भाई, मुस्लीम तरुणतरुणींची एक संघटना काढण्याचे माझ्या डोक्यात आहे.' मी त्या वेळी नगरसेवक होतो. मी ज्या भागातून निवडून आलो होतो, तिथे बहुसंख्य मुस्लीम लोक होते. माझे त्यांच्यासोबत अतिशय चांगले संबंध होते. त्यामुळे येथील मुस्लीम तरुणांना संघटनेशी जोडता येऊ शकतं, अशी मला आशा होती. ती मी त्यांना बोलून दाखवली होती. सोबतच मी राष्ट्र सेवा दलाच्या पुणे विभागाचाही प्रमुख होतो. त्यामुळे समाजवादी विचारांचे अनेक मुस्लीम तरुण–तरुणी या संघटनेसोबत जोडले जाऊ शकतील, असे मला वाटले. मी नगसेवक होतो, त्या वेळी सय्यदभाई एका महोत्सव समितीवर होते. मग मी एक मिटिंग बोलावली होती, ज्यात या तरुणांना दलवाई यांची व त्यांच्या प्रस्तावित संघटनेची ओळख करून दिली. दलवाई त्या मिटिंगला स्वतः हजर होते. सोबत आमचे मित्र व पुढे मंडळाचे कार्यकर्ते झालेले बशीर शेख, अमीर शेख, मकबूल तांबोळी, सय्यद मुनीर इत्यादी मंडळीही उपस्थित होती. अशी अनेक मंडळी मी जमा केली, मी बोलावल्यावर ते आवर्जून आले. हमीद दलवाईंनी सर्वांशी चर्चा केली. बहुतेक सर्व समाजवादी विचारांची मंडळी असल्यामुळे दलवाई यांची भूमिका व विचार त्यांना पटले होते. हमीद दलवाई सोबत काम करण्याची त्यांची तयारी होती. अशा प्रकारे मंडळाची पायाभरणी झाली. बाबा आढावही त्यात आले आणि त्यांनी महात्मा फुले यांचे 'सत्यशोधक' हे नावात घ्यावं, असं दलवाई यांना सुचवलं आणि सर्वांनी ते लगेच मान्य केलं.

***प्रश्न : या दरम्यान अ. भि. शहांसारखी अनेक मंडळी दलवाई यांच्या चळवळीशी जोडली गेली होती. याबद्दल...***

– अ. भि. शहा हा अत्यंत प्रखर बुद्धिवादी आणि सेक्युलॅरिस्ट असा माणूस. अ. भि. शहा, दाभोलकर, प्रधान मास्तर असा तो ग्रुपच होता. या सगळ्यांना हमीद आणि त्याच्या कार्याबद्दल आस्था होतीच. मात्र शहांनी हमीदला संघटन बांधणीसाठी खूप साथ दिली. त्या वेळी वसंत नगरकर हे आयजी होते. ते लेखक, विचारवंतही होते. 'चले जाव'च्या वेळी त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. हमीदला त्यांनीही खूप मदत केली. साधनेचे संपादक यदुनाथ थत्ते यांनीही हमीदला मोलाची साथ दिली. त्यामुळे 'साधना' हे हमीदच्या चळवळीला पूरक काम करणारे आणि

त्याला ही चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी जी मदत करणे शक्य आहे, ती मदत करणारे साप्ताहिक ठरले. अशी मदत दलवाईंना मिळत गेली. परंतु ही आम्ही जी काही मंडळी होतो, आम्ही काही मुस्लीम नव्हतो. त्यामुळे आम्ही मदत जरी करत असलो, तरी खरं काम दलवाई आणि त्यांच्या मंडळातील सहकाऱ्यांनाच करावं लागणार होतं, याची हमीदला कल्पना होती. माझ्याच घरी मंडळाची स्थापना झाली. माझे मित्र, सहकारी या संघटनेच्या सुरुवातीला कार्यकर्ते म्हणून मिळाले, याचा मला अभिमान आणि आनंदच आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना ही जागतिक महत्त्व असलेली एक ऐतिहासिक घटना होती, कारण अशा प्रकारे मुस्लीम समाजाची, इस्लाम धर्माची मूलभूत चिकित्सा करणं, ही काही सामान्य गोष्ट नव्हती. सनातनी लोकांना पचणारी अशी ही गोष्ट नव्हती.

***प्रश्न : हो, आणि मुस्लीम सनातन्यांकडून दलवाई यांच्यावर हल्ला करण्याचे प्रयत्नही अनेक वेळा करण्यात आले होते, असं ऐकलं आहे!***

– दलवाई यांनी फक्त मोर्चे काढले, काठावर बसून मुस्लीम समाजाच्या चुका काढल्या, असं कधी झालं नाही. ते मुस्लीम मोहल्ल्यात आवर्जून जात. विरोधकांशीही चर्चा करायचे सूत्र त्यांनी आयुष्यभर जपले. एकदा पुण्यातील मोमिनपुरा या मुस्लीमबहुल भागातील मुस्लिमांच्या घरी जाऊन त्यांना आपल्या कार्याची संघटनेची माहिती देण्याची त्यांची योजना होती. त्यांनी तेथे जाऊन महिला–पुरुषांशी संवाद सुरू केला. काही वेळातच शे–दीडशेचा जमाव लाठ्या घेऊन, काळे झेंडे दाखवत त्यांच्या अंगावर धावून आला. पोलिसांनी व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दलवाई यांना तेथून सुरक्षित बाहेर काढले. पोलिसांत तक्रार करण्यास दलवाई यांनी नकार दिला.

***प्रश्न : हमीद दलवाई यांना त्यांचे विरोधकही 'दिलदार शत्रू' म्हणत असत, असं वाचलं एके ठिकाणी. वैचारिक विरोध व्यक्तिगत मैत्रीच्या आड ते येऊ देत नसावेत!***

– हो, हमीद दलवाई यांचं वैशिष्ट्य असं आहे की, ते आपल्या विरोधकांचीही भेट घेत असत आणि त्यांच्याशी चर्चा करत. माझे आणि बाबा आढाव यांचे मित्र व 'चारभाई बिडी वर्क्स'चे मारुफ खान हे नाना पेठेत राहायचे. तेथेच त्यांचा मोठा कारखानाही होता. ते सनातनी वृत्तीचे होते. हमीदला त्यांनी कधीच पाठिंबा दिला नाही. दलवाई मात्र न चुकता त्यांच्याकडे जायचे. त्यांच्याशी चर्चा करायचे. म्हणजे सनातनी माणसाची मांडणी काय आहे, तिचा आपल्याला प्रतिवाद करता आला पाहिजे, हे त्यांच्या डोक्यात असायचं. मारुफ खानला पुढे पुढे हमीद दलवाईंबद्दल खूप प्रेम वाटायला लागलं. रहेमान वकील, डॉ. शेख अशा कट्टर विरोधकांशीही दलवाई यांचा स्नेह होता. दलवाई यांची 'कुराण', हदीस, धर्म यांची चिकित्सा त्यांना पचणारी नव्हती; पण दलवाई यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि त्यांच्या निःस्वार्थ कामामुळे ते दलवाई यांच्याकडे आकर्षिले जात. दलवाई ज्या पद्धतीने वागायचे, थट्टामस्करी करायचे आणि सहजपणे ते मित्रत्व निर्माण करायचे. विरोधकांबद्दलही चांगली भावना हे हमीद दलवाई यांचं वैशिष्ट्य होतं.

***प्रश्न : पुढे दलवाई यांनी देशभर दौरे केले. अनेक मुस्लीम विचारवंतांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने अनेक परिषदाही घेतल्या. मुस्लीम मानस जाणून घेण्याचा हा प्रयत्न होता का?***

– हो, दलवाई यांनी हे दौरे जाणीवपूर्वक आखले होते. देशातील मुस्लीम समाज हा एकजिनसी नाही. हे मानस समजून घ्यावयाचे असेल, तर देशभर फिरले पाहिजे. सर्वसामान्य मुस्लीम आणि सोबतच मुस्लीम विचारवंत यांच्या भेटीगाठी घ्यायला हव्यात, असे त्यांना वाटे. भारतातल्या विविध प्रांतांतले अत्यंत बुद्धिवान, विचारवंत अशी जी मंडळी होती, त्या सर्वांशी हमीद यांनी चर्चा केली. या दौऱ्यामध्ये अनेक वेळा दलवाई यांच्यावर हल्ले झाले, घोषणाबाजी झाल्या; पण हमीद डगमगला नाही. त्यांनी दिल्ली, अलिगढ, देवबंद, काश्मीर इ. दौरे केले. इतिहासकार मुहम्मद हबीब, मुशिरूल हसन, अलिगढचे कुलगुरू – प्राध्यापक, देवबंदच्या दारूल उलुमचे नेते सर्वांच्या भेटी त्यांनी घेतल्या. चर्चा केली. उर्दू वृत्तपत्रांच्या संपादकांना ते भेटले. जमात-ए-इस्लामी सारख्या सनातनी मुस्लीम संघटनेच्या नेत्यांना भेटले. इथे औरंगाबादला डॉ. आंबेडकर विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख व ज्येष्ठ मुस्लीम विचारवंत मोईन शाकीर यांच्याशीही त्यांनी अनेक चर्चा केल्या. जागतिक कीर्तीचे इस्लामचे अभ्यासक व भारताचे इजिप्तमधील माजी राजदूत, फैजी हे तर हमीद दलवाई यांच्यासोबत काम करायला तयार झाले होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या अनेक कार्यक्रमांत फैजी उपस्थित असत. मला आठवतंय, मंडळाची एक मिटिंग नाना पेठेतील अहिल्या आश्रममध्ये झाली. तेथे फैजी उपस्थित होते. तेथे फैजी जे बोलले ते मला आजही आठवत आहे. फैजी म्हणाले होते की, हमीद दलवाई यांचे विचार मला पूर्णपणे मान्य आहेत; पण त्यांच्याइतके धैर्य माझ्याजवळ नाहीये.

***प्रश्न : आपण दलवाई यांच्या धैर्याचा उल्लेख केलात. १९७० साली मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. तलाक व मुस्लीम महिलांचे इतर प्रश्न मंडळाने देशभर पोहोचवले. 'जिहाद-ए-तलाक', 'मेरी कहानी मेरी जुबानी' यासारख्या परिषदा घेऊन समाजाला आणि सरकारला जागे करण्याचे काम केले. मंडळाच्या या कामाला विरोध करण्यासाठी सनातनी मुस्लिमांनी 'मुस्लीम प्रोटेक्शन लॉ कमिटी' स्थापन केली. जिचे पुढे 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'त रूपांतर झालं. त्या कमिटीची पहिली सभा डिसेंबर १९७३ला मुंबईमध्ये झाली होती. ज्याला देशभरातून हजारो मुस्लीम उलेमा उपस्थित होते आणि परिषदेबाहेर दलवाई आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांना विरोध करण्यासाठी उभे होते. तुम्हाला ही घटना आठवते का?***

– हमीदवर आणि त्याच्या कार्यकर्त्यांवर अनेक वेळा हल्ले झाले. मंडळाच्या परिषदेला जाऊ नये म्हणून महिला कार्यकर्त्यांवर अनेक प्रकारे दबाव आणला जायचा. तरी शेकडो महिला हा दबाव झुगारून देऊन आपली कहाणी सांगण्यासाठी मंडळाच्या व्यासपीठावर आल्या आणि आपली करुण कहाणी त्यांनी जगापुढे मांडली. या परिषदेची देशभरची माध्यमे दखल घेऊ लागली. आणि मग तलाक आणि मुस्लीम महिलांच्या इतर प्रश्नांवर चर्चा होऊ लागली. सनातनी

मंडळींना वाटू लागले की, आता आपल्या मुस्लीम कायद्यात हस्तक्षेप होईल, म्हणून त्यांनी कमिटी स्थापन केली, ज्याचा उल्लेख वर आला. तिची सभा मुंबईला झाली होती. हजारो मुस्लीम उलेमा तिथे उपस्थित होते. दलवाई आणि त्यांचे मंडळातील सहकारी यांनी जोरदार घोषणाबाजी केली. हजारोंचा जमाव असूनही मंडळाचे कार्यकर्ते, ज्यामध्ये महिलाही होत्या, डगमगले नाहीत. जमावाने मंडळाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला केला. दलवाईसकट सर्वांना मारहाण केली. पोलिसांनी हस्तक्षेप करून या सर्वांचा जीव वाचवला. हमीद या ठिकाणी ज्या निर्भयतेने वागला, तीच निर्भयता त्याने आयुष्यभर जपली.

***प्रश्न : दलवाई यांच्यावर त्यांच्या विरोधकांनी वैयक्तिक हल्ले केले. दलवाई आणि मंडळ याबद्दल पराकोटीचा द्वेष या सनातनी मंडळींमध्ये का होता?***

– हमीद दलवाई आपल्या भाषणांतून आणि लिखाणातून अतिशय तर्कसंगत मांडणी व मूलभूत चिकित्सा करत. प्रखर बुद्धिवादी भूमिका तो मांडत असे. त्यामुळे त्याला जवाब देणे किंवा विचारांना विचाराने उत्तर देणे भल्याभल्यांना जमत नसे. त्यामळे हमीद 'काफिर' आहे, तो 'हिंदुत्ववाद्यांचा हस्तक' आहे, असा प्रचार विरोधक करत असत. वैचारिक पराभवाचीच ही लक्षणे होती.

***प्रश्न : मंडळावर ते हिंदुत्ववाद्यांना सुखावणारी भूमिका घेतात, त्यांचे 'हस्तक' आहेत, 'मुस्लीमद्वेष्टे आहेत' असे आरोप केले जातात. दलवाई असतानाही असे आरोप मंडळावर केलेच गेले असतील. त्या वेळी मंडळाची भूमिका काय असावी, असा त्यांचा कटाक्ष असायचा?***

– 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' हा जो त्यांचा ग्रंथ आहे, जो त्यांच्या मृत्यूच्या अनेक वर्षानंतर प्रकाशित झाला, त्यातील शेवटचे प्रकरण मुळी हिंदू जातीयवादावरच आहे. दलवाईंना हिंदुत्ववाद्यांचे हस्तक म्हणणाऱ्यांनी ते प्रकरण आधी वाचावे असा सल्ला मी त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिला आहे. औरंगाबादमधील दलवाई यांच्या सभेवर संघाच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. कारण दलवाई हे सर्व धर्मांतील जमातवाद, धर्मांधता, धर्माधिष्टीत राष्ट्र या संकल्पनांवर हल्ले चढवत असत. हिंदू व मुस्लीम जमातवाद परस्परपूरक आहेत; पण 'मी मुस्लीम समाजाचा भाग असल्यामुळे मी मुस्लीम जमातवादावर जास्त लक्ष देतो' अशी दलवाई यांची स्पष्ट भूमिका होती. त्यामुळे त्यांच्यावर करण्यात आलेले आरोप हे अज्ञानातून केले गेले होते.

***प्रश्न : मंडळाच्या स्थापनेनंतर दलवाई यांना संघटना बांधणी व विस्तारासाठी फार वेळ मिळाला नाही. तुम्ही दलवाई यांनी त्या ५–६ वर्षांत केलेल्या प्रचंड कामाचे साक्षीदार आहात. तुम्हाला काय वाटते याबद्दल?***

– हमीदने देशभर दौरे करून, परिषदा घेऊन, देशभर ज्या पद्धतीने मंडळासाठी समर्थन

मिळवले ते मोठं वैशिष्ट्यपूर्ण होते. दुर्दैवाने मंडळस्थापनेनंतर काही काळातच त्याला मूत्राशयाच्या आजाराने ग्रासले व त्या आजारातून तो पुन्हा बाहेरच येऊ शकला नाही. इतक्या थोड्या कालावधीमध्ये त्याने मराठी साहित्यावर आपला अमिट ठसा उमटवला. जगातील मुस्लीम समाजसुधारकांमध्ये त्याची गणना झाली. इतिहासकार रामचंद्र गुहा यांना तो 'नवभारताचा निर्माता' वाटला, कमी कालावधीत झपाटून जाऊन त्याने केलेल्या कामाची ती पावतीच म्हणावी लागेल. त्याला जर अजून काही अवधी मिळाला असता, तर त्याने जगभरातील सुधारणावादी मुस्लीम स्त्री-पुरुषांची संघटना उभी केली असती. आंतरराष्ट्रीय परिषदा घेऊन मुस्लीम प्रश्न जगभर मांडला असता. जगभरातील मुस्लीम सुधारणावादी चळवळींना आवाज देण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ होते. प्रखर बुद्धिवाद आणि अध्ययन याची शिदोरी त्याच्याजवळ होती. आज ५० वर्षांनंतर त्याने उपस्थित केलेल्या तलाकसारख्या प्रश्नावर संसदेत चर्चा होते आहे, हे उशिरा का होईना, पण त्याच्या परिश्रमाला आलेले फळ आहे.

***प्रश्न : जागतिक कीर्तीचे विचारवंत, लेखक, समाजवादी कार्यकर्ता असूनही, समाजवादी पक्ष किंवा त्यांचे नेते यांनी हमीद दलवाई यांना म्हणावी तशी साथ दिली नाही, पाठबळ दिले नाही, याची आपल्याला खंत वाटते का?***

– हमीद समाजवादी परिवाराचाच साथी कार्यकर्ता होता. एस. एम. जोशींनाही हमीदबद्दल प्रेमच होतं. एवढं खरं आहे की, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे हे त्याला सोशालिस्ट पार्टीचे तिकीट देऊ शकले नाहीत. पार्टीच्या विरोधात मग सबंध मुस्लीम समाज जाईल, असा धोका त्यांना वाटत होता; पण हमीदने त्याबद्दलही कधी तक्रार केली नाही. या सर्व मंडळींचा आपल्याला आणि आपल्या कार्याला वैचारिक पाठिंबा आहे; पण पार्टी म्हणून त्यांच्या काही मर्यादा आहेत, ही गोष्ट हमीदनेही लक्षात घेतली होती, असं मला वाटतं.

***प्रश्न : दलवाई यांच्या अकाली निधनानंतर मंडळाच्या कार्याला खीळ बसेल, अशी भीती आपल्याला वाटली होती का?***

– नाही, कारण हमीद गेल्यानंतर मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी कार्य सुरू ठेवले, ती संघटना जिवंत ठेवली, ती वाढवली. बाबुमियाँ बँडवाले यांच्यासारखा राष्ट्रीय स्वातंत्र्यसेनानी मंडळाला दलवाई यांच्यानंतर अध्यक्ष म्हणून मिळाला, या सगळ्या गोष्टी मोठ्या अद्‌भुत होत्या. १९७०च्या स्थापनेपासून आजतागायत मंडळाचे अवघड कार्य सुरू ठेवण्यामध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. त्याचे श्रेय या कार्यकर्ते, कार्यकारणी सदस्य, अध्यक्ष यांना देणे गरजेचे आहे.

***प्रश्न : गेल्या काही काळापासून मुस्लीम समाजाविषयी द्‌वेष वाढताना दिसतो आहे. काही व्यक्ती, संस्था हे काम जाणीवपूर्वक पण संघटनात्मक रितीने करत असल्याचे दिसते आहे. अनेक भारतीय व्यक्तींना फक्त ते मुस्लीम असल्यामुळे जमावाने मारून टाकल्याची अनेक***

*उदाहरणे देशभर पाहायला मिळत आहेत. अशा वेळी मंडळाची भूमिका काय असावी?*

– धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्म सोडून देणं, अशी कम्युनिस्टांसारखी भूमिका हमीदने कधी घेतली नव्हती. तो म्हणायचा, तुम्हाला धर्म पाळायचा अधिकार आहे; पण राष्ट्र हे ‘सेक्युलर’ असले पाहिजे. त्यामुळे हमीदला अभिप्रेत असलेली धर्मनिरपेक्षता मुस्लीम समाजात रुजावी, म्हणून मंडळाने काम केलं पाहिजे. राहिली गोष्ट हिंदुत्ववाद्यांची, तर संघाच्या स्थापनेपासून त्यांचा अजेंडा ठरलेला आहे. मुस्लीमद्वेष हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे असे हल्ले होणे, द्वेष पसरवला जाणे, या मागे कुठल्या शक्ती आहेत, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. त्यांना संविधानातील समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या गोष्टी मान्यच नाहीत. त्यामुळे सर्वांनी या जातीवादी शक्तीविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. संविधान आणि संवैधानिक मूल्ये यांच्या रक्षणासाठी पुढे आले पाहिजे. मुस्लीम समाजात त्यांच्या संवैधानिक हक्कांविषयी जागृती करायला हवी. मुस्लिमांच्या प्रबोधनासोबतच त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. सोबतच मुस्लीम समाजाची सामाजिक आर्थिक, शैक्षणिक प्रगती होण्यासाठी विधायक कार्यक्रम आखले गेले पाहिजेत.

*प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा नवा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला आहे. त्याची आवश्यकता होती का?*

– मौलाना आझाद किंवा असफ ए. ए. फैजी ते डॉ. असगर अली इंजिनिअर अशा धर्म सुधारकांची एक परंपरा आहे. याच पद्धतीने हिंदू समाजातही न्या. रानडे आदींची परंपरा आहेच. माझ्या माहितीप्रमाणे हमीद दलवाईंनी अनेक राष्ट्रवादी मुस्लीम विचारवंतांच्या मर्यादा लक्षात आणून दिल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांच्या हेतूवर शंकाही उपस्थित केली आहे. परंतु इस्लामचे अभ्यासक आणि नेते मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या हेतूवर शंका किंवा टीका हमीद दलवाईंनी केल्याचे मला आढळत नाही. किंवा असगर अली इंजिनिअर यांच्यासारखे प्रयत्न हे सुधारणेसाठी पूरकच ठरू शकतात, असेही दलवाई यांना वाटत होते. हमीद दलवाई हे स्वतः धर्माच्या अंगापेक्षा तर्कशुद्ध, विवेकवादी, बुद्धिप्रामाण्य आणि मानवकेंद्रित विचार मांडणाऱ्या पैकी होते. त्यामुळे त्यांची दृष्टी ही धर्मापलीकडे पाहणारी होती. दलवाईंनी आपल्या प्रबोधनाच्या कामात धर्माचा वापर कमी प्रमाणात केला, किंबहुना तो केलाही नाही. धर्मात जे चांगले आणि उदात्त आहे, त्याविषयी त्यांनी कायम आदरच बाळगला, परंतु धर्मामुळे जिथे अन्याय होतो, विषमता निर्माण होते आणि चिकित्सेला बाधा पोहोचते, अशा गोष्टींवर त्यांनी कायम टीकास्त्र सोडले.

हमीद दलवाई यांनी धर्माची सकारात्मक किंवा नकारात्मक चिकित्सा कमी केली, मात्र धर्माच्या नावाने केले जाणारे राजकारण आणि त्याविरुद्धचा लढा हा दलवाईंच्या कार्याच्या केंद्रस्थानी होता. तथापि अलीकडच्या काळात ‘कुराण’ आणि पैगंबर यांच्याविषयी काही मंडळींनी नकारात्मक, विखारी दृष्टी बाळगून अपप्रचाराची मोहीम उघडली आहे. त्याचबरोबर दुर्दैवाने मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे ‘धर्मविरोधी’ असल्याची चुकीची प्रतिमा धर्मवादी मुस्लीम

पुढाऱ्यांनी निर्माण केलेली आहे. तेव्हा असे हिंदुत्ववादी आणि मुस्लीम जमातवादी अपप्रचाराला उत्तर देण्यासाठी काही प्रमाणात नव्या जाहीरनाम्याचा निश्चितच मंडळाच्या कामामध्ये उपयोग होणार, यात मला तिळमात्र शंका नाही.

मला असं वाटतं की, कोणत्याही धर्माचा विचार मानववंशशास्त्राप्रमाणे केला पाहिजे. कुठलाही धर्मग्रंथ दैवी मानून चालणार नाही, ते समाजासाठी धोकादायक आहे. मुस्लीम समाज धक्कादायक विचार ऐकण्यासही तयार असतो, हे हमीद दलवाईंच्या अनुभवावरून सिद्ध झाले आहे. त्यांनी मांडलेल्या योग्य भूमिकांमुळे राष्ट्रवादाला बळकटी मिळाली आहे. तसा मंडळाचा नवा जाहीरनामाही काही मर्यादेपर्यंत मंडळाचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी फायद्याचा ठरेल, अशी मी आशा बाळगतो आणि त्याचे स्वागत करतो. नाहीतरी मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे काही नास्तिकांचं मंडळ असावं, अशी दलवाई किंवा त्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या कार्यकर्त्यांची इच्छा नव्हती. आणि हा विचार मी मंडळाचा नवा जाहीरनामा प्रकाशित होत असतानाही मांडला आहे.

*(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, वर्ष ४, अंक ३, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१८, पृ. क्र. १६ ते २३)*

*(भाई वैद्य : ज्येष्ठ समाजवादी नेते, महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री आणि परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई यांचे कट्टर समर्थक आणि पाठीराखे.)*

## ६.१९ सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांची मुलाखत – समीर शेख

*(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाच्या प्रवासाचे सुरुवातीपासून साक्षीदार असलेले, किंबहुना हमीद दलवाई यांना संघटनेच्या नावामध्ये 'सत्यशोधक' हे नाव घ्यावे, असे सुचवलेल्या बाबा आढाव यांच्याशी मंडळाच्या एकूण प्रवासाविषयी मंडळाचे युवा कार्यकर्ते समीर शेख यांनी केलेली बातचीत)*

***प्रश्न : बाबा, मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासूनचे आपण साक्षीदार आहात. मंडळ काही वर्षांत सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे. या पार्श्वभूमीवर आपली मुलाखत घेत आहोत.***

– मंडळाला सत्यशोधक हे नाव सुचवण्यात जरी माझा सहभाग असला व संघटनेच्या जन्मापासून ते आतापर्यंत मी साक्षीदार आहे, या कृतज्ञतेच्या भावनेतून आपण माझी मुलाखत घेत आहात, याबद्दल मी आपला आभारी आहे; पण मला वाटते, मुस्लीम समाजातील विचारवंतांच्या जास्त मुलाखती घ्याव्यात. आपल्याला चळवळ पुढे न्यावयाची असेल, तर समाजातील विचारवंतांशी संवाद आवश्यक आहे, असे मला वाटते.

***प्रश्न : हमीद दलवाई यांनी एप्रिल १९६६ साली तलाक, बहुपत्नीत्व इ. कुप्रथांविरुद्ध सात मुस्लीम महिलांना घेऊन मोर्चा काढला. बहुदा अशा प्रकारचा तो जगातील पहिलाच मोर्चा असावा. या क्रांतिकारी मोर्चानंतर दलवाई यांनी जवळपास चार वर्षांनी १९७० साली मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. अशी एखादी संघटना काढण्याच्या निर्णयापर्यंत दलवाई आले, त्यामागे त्यांची काय भूमिका होती?***

– दलवाई तसे आमचे ज्युनिअर होते. आम्ही समाजवादी चळवळ व राष्ट्र सेवा दलाचे सहकारी. दलवाई हे कोकणातले. कोकणाचे वैशिष्ट्यं म्हणजे इथे तशी कुठली मुस्लीम राजवट नव्हती, जी आपल्याला मराठवाड्यात वगैरे दिसते. त्या त्या राजवटीची संस्कृती तयार होते. जशी गोव्यात ७०० वर्षे पोर्तुगिजांनी राज्य केल्यामुळे त्यांच्या संस्कृतीच्या खुणा आजही दिसतात. कोकणातला प्रदेश तसा याबाबतीत मुक्त राहिला. दलवाईही त्यामुळेच मुक्त होते. या पार्श्वभूमीतून दलवाई मुंबईत आले आणि मुंबईत आल्यानंतर त्यांचा येथील व्यापक समाजाशी संपर्क आला. 'मराठा'त पत्रकारिता सुरू झाली आणि ते हलकेच सामाजिक विषयांकडे वळले. पत्रकार असलेले, 'इंधन' कादंबरी, ललितलेखन करणारे हमीद दलवाई सामाजिक सुधारणांकडे आणि तेही मुस्लीम सामाजिक सुधारणांकडे कसे वळले, हा संशोधनाचा विषय आहे.

देशाला मिळालेलं स्वातंत्र्य, भारतीय राज्यघटनेची निर्मिती व त्याद्वारे राष्ट्र घडवण्याचे जे कार्य सुरू होते, दलवाई त्या काळाचे साक्षीदार होते. 'मराठा' वृत्तपत्रात असल्यामुळे अत्रे, आंबेडकर व एकूणच पुरोगामी विचार हे त्यांच्या भोवताली असल्याचे दिसते. स्वातंत्र्य

चळवळीतले मुस्लीम, मुंबईचा मुस्लीम समाज, बॅ. जीना यांचे मुंबईचे घर, फाळणीनंतरचा मुस्लीम समाज, त्यात आलेला कडवेपणा त्यांनी अनुभवला. कोकणातला मुक्त मुसलमान आणि उपनगरातील मुसलमान यांत असलेला प्रचंड विरोधाभास त्यांना जाणवला. त्यातच पुढे १९६९ साली शिवसेनेचा जन्म झाला. त्या काळी नोमान कॉन्ट्रॅक्टरसारखी मंडळी बोहरा समाजातील रूढी, परंपरांविरुद्ध लढत होती. मात्र, एकएकटी. दलवाई या सगळ्यांचा वेध घेत होते. ते मग हिंडू-फिरू लागले, लोकांच्या गाठीभेटी घेऊ लागले. मंडळ स्थापन करण्याच्या निर्णयापर्यंत दलवाई एका दिवसात आले नव्हते. त्यामागे इतके मोठे विचारचक्र अव्याहतपणे फिरत होते आणि मी याचा साक्षीदार होतो.

***प्रश्न : दलवाई स्थापन करत असलेल्या मुस्लीम धर्म चिकित्सा, सामाजिक सुधारणा चळवळीला 'सत्यशोधक' हे नाव आपण सुचवले. या चळवळीचे महात्मा फुले यांच्या चळवळीशी नाते जोडावे असे आपल्याला का वाटले?***

– हिंदू धर्मचिकित्सेची फार मोठी परंपरा जरी असली, तरी महात्मा फुले धर्माच्या, स्त्रियांच्या बाबतीत फार मूलभूत आणि महत्त्वाचे बोलताहेत, यावर आम्हां दोघांचे एकमत होते. दलवाई सर्वधर्म समभाव वगैरेवर बोलत असतानाच त्यांचा उद्देश मात्र धर्माच्या पलीकडे मानवतेच्या, स्त्री-दास्यमुक्तीच्या दिशेने जाणारा आहे, हे मला माहिती होते. दलवाई आणि फुले या दोहोंमधील हे साम्यस्थळ आहे, असे मला वाटले.

***प्रश्न : मंडळाच्या स्थापनेच्या दिवशी वाद्ये वाजवून 'साधना' कार्यालयात दलवाई यांचे स्वागत केले होते. मंडळाची स्थापना त्या काळाचा आणि एकूण परिस्थितीचा विचार करता ऐतिहासिक होती असे आपल्याला का वाटते?***

– डॉ. आंबेडकरांचे सामाजिक सुधारणेचे क्रांतिकारी कार्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही सुरू होते. पुढे १९५६ साली त्यांनी धर्मांतराचा घेतलेला निर्णय, मुंबईत ठिकठिकाणी होणारे कार्यक्रम, सभा याने वातावरण भारलेले होते. दलित समाज यानंतर एक नवी झेप घ्यायला उत्सुक होता. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हा समाज त्या दिशेने जोमाने पाऊले टाकत होता. मुस्लीम समाजाची परिस्थिती मात्र याच्या बिलकूल उलट होती. फाळणीचे दुःख होतेच. मात्र, आता समाजाकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाऊ लागले होते. त्यांच्या देशनिष्ठेवर प्रश्न उपस्थित करणारे वातावरण सर्वत्र होते. समाज भेदरलेल्या अवस्थेत होता. डावे व इतर सेक्युलर मंडळी यांचा विचार करायला अजिबात तयार नव्हती.

दलवाई यांचे मूलगामी चिंतन तेव्हा सुरू झाले. त्यांनी अफाट वाचन सुरू केले. लोकांशी भेटीगाठी केल्या. या समाजाला अशा करुण अवस्थेतून बाहेर कसे काढता येईल, या एकाच विचाराने ते पछाडलेले होते. मुस्लीम समाजाचे अंतरंग समोर आणण्याचे कटू काम त्यांनी हाती घेतले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना ही त्याचीच फलश्रुती होती. जगभरात अशी इस्लाम धर्माची चिकित्सा करून मुसलमानांना सामजिकदृष्ट्या सुदृढ बनवण्याची चळवळ उभी

राहिली नव्हती. हे पहिल्यांदाच होत होते, म्हणून ही ऐतिहासिक घटना होती.

***प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याआधी दलवाई यांनी १९६९ साली अ. भि. शहा वगैरे मंडळीसोबत 'इंडिअन सेक्युलर सोसायटी'ची स्थापनाही केली होती. ते या संस्थेचे सचिव होते. मात्र, लगेच पुढच्याच वर्षी त्यांनी मंडळ स्थापन केले. या मागे काय भूमिका असावी?***

– अगदी बरोबर. अ. भि. शहा वगैरे मंडळी आणि विशेषतः दलवाई हे अतिशय कार्यप्रवण लोक होते. 'सेक्युलॅरिझम'शी त्यांची बांधीलकी होती. त्यातूनच 'इंडिअन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना झाली. शहा वगैरे मंडळी प्रचंड बुद्धिप्रामाण्य विचार करणारी होती, विद्वान होती. आम्हाला नेहमी वाटायचे की, दलवाई यांनी 'अभिजनवादी' राहू नये, त्यांनी जनवादी व्हावे. दलवाई यांचा स्वतःचाही तोच प्रयत्न होता. म्हणूनच त्यांनी मंडळाची स्थापना केली. 'सत्यशोधक' हे नाव स्वीकारावे की नाही, याबद्दलही शहा थोडे सावधच होते. ते याकडे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद या दृष्टीकोनातून पाहत असावेत. मात्र इथला मुस्लीम समाज हा बहुजन असून त्यांच्यामध्ये ही चळवळ रुजली पाहिजे, हा दलवाई आणि आमचा हट्ट होता. मंडळाची स्थापना झाली, त्या दिवशी आम्ही गणेश पेठसारख्या मुस्लीमबहुल भागातून मिरवणूक काढली होती. मुस्लीम सनातनींना हा मोठा धक्का होता. त्या मिरवणुकीत सामील झालेल्या मुसलमानांची नावे हमाल पंचायतीमधून मिळवून त्यांना आमच्या विरुद्ध बंड करायला भाग पाडले गेले होते. मात्र दलवाई यांनी तलाक आणि स्त्री-मुक्तीचा प्रश्न लावून धरल्यामुळे ही सगळी सनातनी मंडळी बॅकफूटला गेली.

***प्रश्न : म्हणजे स्थापनेपासूनच सनातन्यांचा मंडळाला विरोध होता तर!***

– मंडळ हे मुस्लीम धर्मचिकित्सा आणि सामाजिक चळवळीसाठी जरी असलं, तरी आपला सनातनी हिंदूंनी, हिंदुत्ववाद्यांनी वापर करू नये, याची दक्षता दलवाई यांनी बाळगली होती. मात्र, या कोकणी माणसाने मुस्लीम समाजातील फाटाफूट, जातीव्यवस्था, रूढीवादी सनातनी मानसिकतेमुळे त्यांचे होणारे शोषण याचा बारकाईने अभ्यास केला. फाळणीमुळे तर या समाजाला 'आयसोलेट' करणे आणखी सोपे झाले. मुस्लीम समाजाचे शोषण करणाऱ्या रूढी-परंपरा याबद्दलची जाणीवजागृती करणे, हाच त्यांचा उद्देश होता. साहजिकच त्याला सनातन्यांनी प्रचंड विरोध केला. मोमिनपुरा भागात तर शेकडोच्या जमावाने त्यांच्यावर लाठीहल्ला केला. दलवाई यांनी त्या विरुद्ध पोलिसांत तक्रार केली नाही, तर ते परत काही दिवसांनी त्या ठिकाणी संवाद करण्यासाठी गेले. समाजाविषयी त्यांना प्रेम व आपुलकी होती, म्हणूनच त्यांनी हे केले. त्यामुळे ते मुस्लीमद्वेष्टे होते वगैरे जो आरोप सनातनी करत होते, त्याला काडीचा आधार नव्हता.

***प्रश्न : मंडळाच्या स्थापनेनंतर ४–५ वर्षांतच दलवाई यांना मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रासले. त्यांना फारच कमी कालावधी मिळाला.***

– मंडळाची स्थापना हीच महत्त्वाची घटना होती. मुस्लीम समाजाचे अंतरंगच यामुळे पहिल्यांदा लोकांच्या समोर आले. तलाकसारखे मुस्लीम महिलांचे प्रश्न पहिल्यांदा समाजासमोर आले. आज ५० वर्षांनंतरही ते महत्त्वाचे वाटतात. दलवाई यांच्या दूरदृष्टीचे याहून मोठे उदाहरण काय हवे! मंडळाच्या स्थापनेनंतर दलवाई खूप हिंडले. मुस्लीम महिला परिषदा, दिल्ली दौरे, मोर्चे यांसाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. वसंत नगरकर आणि त्यांच्या दरम्यानचा पत्रव्यवहार पाहिला, तर दलवाई यांची उमेद व त्यांच्या एकूणच आवाक्याचा अंदाज आपल्याला येतो. मात्र, त्यांच्या अकाली निधनाने चळवळीला मोठा धक्का बसला. मात्र, त्यांच्या निधनानंतर प्रत्येकाने आपल्या मर्यादा ओळखून मंडळाचे कार्य नेटाने पुढे चालवले. बाबुमियाँसारखे स्वातंत्र्यसैनिक पुढे अध्यक्ष झाले. त्यांनंतर सय्यदभाई असतील व इतर ज्येष्ठ कार्यकर्ते असतील, सर्वांनी आपापल्यापरीने मंडळ जिवंत ठेवले. आता मंडळाकडे तरुणांचा ओढा वाढताना दिसतो आहे. नावीन्यपूर्ण उपक्रम मंडळ राबवत आहे. अध्यक्ष तांबोळी यांची मेहनत यातून दिसून येते.

***प्रश्न : मंडळाच्या स्थापना काळातील आपण एक साक्षीदार आहात. आज मंडळाविषयी आपणास काय वाटते?***

– मंडळाच्या बहुतांश कार्यक्रमांत माझा सहभाग असतो. गेल्या एक–दीड दशकांमध्ये मंडळाने ज्या पद्धतीने काम पुढे चालवले आहे, त्याबद्दल मी निश्चितच समाधानी आहे. मध्यंतरीच्या काळात हे मंडळ संपत चालले आहे, अशा प्रकारची भावना निर्माण होण्यासारखी परिस्थिती झाली होती. परंतु एखाद्या वाळलेल्या झाडाला पुन्हा कोंब फुटावा, नवीन पालवी यावी, अशी स्थिती पुन्हा निर्माण झाली आहे. याचा माझ्यासारख्यांना खूप आनंद वाटतो. विशेषतः आज मंडळासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आहे. सर्वच बाजूंनी कोंडमारा होत असताना तग धरून उभं राहणं हेच जिथं मुश्किल असतं, तिथं मंडळ आपापल्या पद्धतीने नवे उपक्रम घेऊन वाटचाल करत आहे, समाजाशी संवाद करण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या दृष्टीने हे खूप मोठं आहे.

ज्या हिंदू समाजात फुले, आंबेडकर झाले, त्या समाजात आज काय चाललेलं आहे, हे आपण पाहतोय. आता मंडळाला यांचाही सामना करावा लागतोय. तलाकपीडित महिलांचं काम संपलेला नाही. नवनवीन विषय निर्माण केले जातात. अशा परिस्थितीत प्रबोधनाविषयी बोलणं हेच मुश्किल आहे, पण ते बोलतात. बकरी ईदनिमित्त रक्तदानासारखे कार्यक्रम, मुस्लीम समाजातील अंधश्रद्धांविषयी बोलणं, बाहेरच्यांची साथ नसतानाही हे सगळं टिकवून ठेवणं, हे सगळं अवघड काम आहे.

आमच्या सारख्यांना वाटत असतं की, 'सेवासदन'सारखी एखादी संस्था मुस्लीम महिलांसाठीही निर्माण व्हायला पाहिजे होती. मंडळाने हातावर पोट असणाऱ्यांची संघटना सुरू केली पाहिजे, पण हे शक्य झाले नाही. ज्या पद्धतीने मंडळाने गेली ५० वर्षे आपले काम

चालवले आहे, ते खूप विलोभनीय आहे. आम्ही कायम त्यांच्याबरोबर आहोत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे पाहण्याचा मुस्लीम समाजाचा दृष्टीकोनही बदलत चालला आहे कारण या मंडळींना मंडळाविरुद्ध भडकवण्याचे काम झाले असल्याचे आम्ही पाहिले आहे. आता काही माणसं गळतात, अनेक जण थकत आहेत, तरीपण शमसुद्दिन मुस्लीम सत्यशोधक ज्या पद्धतीने सर्व काही सांभाळत आहे, ते खूप महत्त्वाचं आहे. बाहेरची आव्हानात्मक परिस्थिती असतानाही ज्या आत्मविश्वासाने तो काम पुढे घेऊन जात आहे, त्याचं आश्चर्य वाटतं.

आज मुस्लीम समाजात शांत डोक्याने विचार करणारी माणसे आहेत. या समाजाला भडकवण्याचे प्रयत्न चालू आहेत. तरीही कुठे गडबड गोंधळ होत नाही, याचे सर्व क्रेडिट मुस्लीम सत्यशोधक मंडळाला जाते. भारतीय राज्यघटना सोबत घेऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही हे मूल्य घेऊन पुढे जाण्याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

माझा आग्रह एवढाच आहे की, आता बोलताय, करताय ना, ते आणखीन आत्मविश्वासाने ठासून केले पाहिजे. ते अधिक संघटितपणे केले पाहिजे, असे माझे म्हणणे आहे. निराशा तर येते, सगळं काही होतं, असे असतानाही शमसुद्दिन तांबोळी आणि त्याची सगळी टीम हे जे सर्व काही काम करतायत, आणि जे चाललंय त्या कामाला सलाम!

मी मुस्लीम सत्यशोधक मंडळाला साथ देतोय, याचा मला अभिमान आहे.

***प्रश्न : सध्या मंडळाच्या वाटचालीबद्दल आपण समाधानी आहात, हे वरच्या उत्तराच्या शेवटी कळले. आता भविष्यात मंडळाची वाटचाल कशी असावी?***

– कसं आहे, दलित चळवळीमुळे शिक्षण घेऊन एक मध्यमवर्ग तयार झाला. तो लिहू लागला. आपली मते, प्रश्न समाजाच्या भाषेत मांडू लागला. समाजही मग त्याकडे गांभीर्याने पाहू लागला. मुस्लीम समाजाची गोची अशी की, त्यांच्यामध्ये मध्यमवर्ग तयारच होऊ शकला नाही. त्यात उर्दूच्या आग्रहामुळे इथली प्रादेशिक भाषा, त्यात तो आपली गाऱ्हाणी, मतं समाजापुढे मांडूच शकला नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ही पोकळी काही प्रमाणात भरण्याचे महत्त्वाचे काम केले, पण पुढची आव्हाने मोठी आहेत. हिंदूंमधला सुशिक्षित मध्यमवर्ग आता अधिक संकुचित व जातीवादी होऊ लागला आहे, असे चित्र आहे. त्याला जाणीवपूर्वक मुस्लीमद्वेषाचे खाद्य पुरवले जात आहे. त्यामुळे एकूणच मुस्लीम समाजाविषयी संशयाने पाहिले जाते आहे. त्यामुळे समाजाला 'आयसोलेट' होऊ न देणे, त्यांच्या प्रश्नांना तुमच्या कार्यक्रमात स्थान देणे, सोबतच मूलगामी धर्मचिकित्सेची कासही न सोडणे, असा समतोल साधत काम करण्याची मोठी गरज निर्माण झाली आहे. देशाचे चित्र पाहिले असता असं कार्य करणारी मंडळाशिवाय दुसरी संस्था दिसत नाही. त्यामुळे मुस्लीम समाजाच्या शोषणाच्या प्रश्नावरही मंडळाने आवाज उठवायला हवा. मात्र, सोबतच त्या समाजाचे प्रबोधनही करायला हवे.

१९७३ साली महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला शंभर वर्षे होणार होती. त्याआधी ३-४ वर्षे राज्यभर आमचे समता मोर्चे, समता दिंडी जोरात चालू होत्या.

*(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, वर्ष ४, अंक ३, जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०१८, पृ. क्र. २४ ते २८)*

*(बाबा आढाव : ज्येष्ठ सत्यशोधक व कामगार नेते, महात्मा फुले समता प्रतिष्ठान आणि राष्ट्रीय एकात्मता समितीचे अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आरंभ काळापासूनचे पाठीराखे)*

## ६.२० सत्यशोधकांची कोंडी – विनोद शिरसाठ

१५ ऑगस्ट १९४८ रोजी साने गुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले, तेव्हा 'साधना'चे कार्यालय मुंबई शहरात होते, १९५६मध्ये ते पुणे शहरात हलवण्यात आले. त्या आठ वर्षांत साधनाच्या भावी वाटचालीची भक्कम पायाभरणी झाली, ती साने गुरुजी, आचार्य जावडेकर व रावसाहेब पटवर्धन या तीन संपादकांच्या काळात. त्यानंतरचे पाव शतक यदुनाथ थत्ते 'साधना'चे संपादक होते आणि तो काळ खऱ्या अर्थाने 'साधना'चे 'उत्कर्षपर्व' म्हणता येईल. कारण विविध क्षेत्रांतील व्यक्ती, संस्था, संघटना यांना बळ पुरवण्याचे काम त्या काळात मोठ्या प्रमाणात घडून आले. त्या काळात ज्या व्यक्तींना व त्यांच्या कार्याला 'साधना'ने सतत व जोरदार पाठिंबा दिला, त्यातले एक प्रमुख नाव म्हणजे हमीद दलवाई.

१९५८मध्ये 'साधना'ने कुमार विशेषांक प्रकाशित करायला सुरुवात केली. त्या पहिल्याच अंकात 'आहमद' या शीर्षकाची कथा प्रसिद्ध झाली. त्या कथेच्या शेवटी आहमद नावाच्या शालाबाह्य मुलाने, अगदीच असह्य झाल्यावर पळायचे थांबवून, जिवाच्या आकांताने सर्व शक्ती एकवटून दगड उचलले आणि (त्याची टिंगलटवाळी करणाऱ्या) शाळेतील मुलांच्या दिशेने भिरकावले. सुन्न करून सोडणारा तो शेवट! ती कथा वाचणाऱ्या कोणाही वाचकाला ते दगड आपल्याच दिशेने आले, असे वाटले असणार, आजही वाटेल. त्या कथेचे लेखक होते हमीद दलवाई, तेव्हा वय वर्षे पंचवीस. त्यानंतरची वीस वर्षे तो लेखक व त्याचे कार्य आणि 'साधना' यांचे घट्ट नाते राहिले.

हमीद दलवाई यांना आयुष्य मिळाले अवघे ४५ वर्षे. त्यातील २५ वर्षे सार्वजनिक म्हणावे असे, त्यातील अर्धा कालखंड ललितलेखक म्हणून, तर अर्धा कालखंड वैचारिक लेखन व मुस्लीम समाजसुधारणा. १९६६ हे वर्ष त्यांच्यासाठी 'टर्निंग पॉईंट' म्हणावे असे होते. त्या वर्षी चार महत्त्वाच्या घटना त्यांच्या आयुष्यात घडल्या.

पहिली – 'इंधन' या नावाजलेल्या व वादग्रस्तही ठरलेल्या कादंबरीचे लेखक म्हणून ते प्रसिद्धीला आले.

दुसरी – सात तलाकपीडित मुस्लीम महिलांचा ऐतिहासिक ठरलेला मोर्चा त्यांनी मुंबईत मंत्रालयावर काढला.

तिसरी – 'मराठा'मधील उपसंपादक ही नोकरी सोडून पूर्णवेळ सामाजिक काम करायला त्यांनी सुरुवात केली.

चौथी – कोल्हापूर येथील कोरगावकर ट्रस्टकडून फेलोशीप मिळवून भारतभ्रमण करायला प्रारंभ केला.

त्यानंतरची दहा वर्षे म्हणजे दलवाई नावाचा झंझावात. त्या दशकात त्यांनी काय नाही केले? मूलगामी व विचारप्रवर्तक म्हणावे असे अनेक लेख लिहिले, वादळी म्हणावीत अशी शेकडो भाषणे केली, थोर-थोर विद्वानांशी वादविवाद केले, जीर्ण पुराणमतवाद्यांना टक्कर दिली,

अनेक परिषदा आयोजित केल्या, शिबिरे भरवली, मोर्चे-आंदोलने केली. महाराष्ट्र पिंजून काढला, देशातला बराच भूप्रदेश पायाखालून घातला, विदेशातही घोडदौड करण्याची आकांक्षा बाळगली. १९७६मध्ये अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याला दोनशे वर्षे पूर्ण झाली, तेव्हा अमेरिका व युरोपचा दौरा केला. आणि त्यानंतरच्या वर्षी मृत्यू आला. त्यामुळे एक झंझावात अकाली संपुष्टात आला.

दलवाई यांनी मांडलेला विचार, घेतलेल्या भूमिका आणि प्रत्यक्ष रणांगणात उतरून केलेले कार्य हे सारे एकमेवाद्वितीय आहे. भारताच्या इतिहासात असे उदाहरण अद्याप नाही, जागतिक इतिहासात शोधावे लागेल. तो विचार, त्या भूमिका व ते कार्य काय स्वरूपाचे होते? मुस्लीम समाजातील सुधारणा हे त्याचे मध्यवर्ती केंद्र होते, मुस्लीम मूलतत्त्ववाद हे त्यांचे लक्ष्य होते. पण मूलतः तो लढा शोषणाच्या व अन्यायाच्या विरोधात होता, समतेच्या व मानवतेच्या बाजूने होता. तो सारा आटापिटा हे राष्ट्र एकात्म व्हावे, आधुनिक व्हावे, धर्मनिरपेक्ष व्हावे, यासाठी होता.

अशा या हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना २२ मार्च १९७० रोजी केली, स्थापनेची सभा 'साधना' कार्यालयाच्या आंतरभारती सभागृहात झाली. मंडळाच्या स्थापनेनंतर दलवाईंना केवळ सात वर्षांचे आयुष्य लाभले, पण त्या दशकभरात त्यांनी इतकी पायाभरणी केली होती की, त्यानंतरचे दशकभर त्यांच्या अनुयायांनी तो लढा मोठ्या हिकमतीने चालू ठेवला.

मात्र १९८६ हे वर्ष त्या सर्वांचे खच्चीकरण करणारे ठरले, शहाबानो या महिलेला पोटगी देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राजीव गांधी सरकारने संसदेत कायदा करून रद्दबातल ठरवला. तो प्रकार संपूर्ण देशासाठी प्रचंड मोठा आघात होता. त्यानंतर देशाच्या एकूणच राजकारणाला किती मोठी कलाटणी मिळाली, याबाबत आतापर्यंत खूप बोलले/लिहिले गेले आहे. पण त्या निर्णयाचा सर्वाधिक फटका ज्या संस्था-संघटनांना बसला, त्यात अग्रभागी होते मुस्लीम सत्यशोधक मंडळ. त्यानंतर मंडळाचा सूर हरवला, कार्यकर्ते सैरभैर झाले, समर्थक निराशेच्या गर्तेत अडकले. पुढील तीन दशके मंडळाचे काम चालू राहिले, पण तो झंझावात पुन्हा निर्माण झालेला नाही, अद्यापही! आता ते मंडळ ५० वर्षांचे झाले आहे, त्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष २२ मार्च २०२० रोजी संपत आहे.

अर्थातच, हमीद दलवाई यांच्याबरोबर काम करणारे वा त्यांची साथसंगत करणारे बहुतांश लोक आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत, काही आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर आहेत, काहींनी त्या विचारांची साथसंगत सोडलेली आहे. मात्र मंडळाचे विद्यमान कार्यकर्ते व हितचिंतक स्वतंत्रपणे वा एकत्रितपणे शक्य तेवढे प्रयत्न करत आहेत. पण मुळात अपुरी साधने व आर्थिक बळाचा अभाव यामुळे त्यांना अनेक मर्यादा येत आहेत. मात्र 'या मर्यादा एकवेळ परवडल्या, पण चहूबाजूंनी होणारी कोंडी नको' अशी त्यांची अवस्था आहे. ही कोंडी कमालीची त्रासदायक आहे, त्यांनी समाजविन्मुखच व्हावे अशी आहे. या कोंडीमुळेच मुख्यत: नवे कार्यकर्ते त्यांच्याकडे येण्याला मर्यादा पडत आहेत. या कोंडीच्या चार बाजू कशा आहेत?

साहजिकच पहिली बाजू अडवली आहे, ज्या मुस्लीम समाजासाठी हे सत्यशोधक काम करतात, त्या समाजातील पुराणमतवाद्यांनी! 'हे सत्यशोधक देव आणि धर्म नाकारणारे आहेत,' असा त्यांचा अपप्रचार आहे. जुन्या व जाचक रूढी-परंपरांना कवटाळून बसलेल्या या लोकांकडून सत्यशोधकांवर काही टीका जाणूनबुजून, तर काही टीका अजाणतेपणातून होत असते. आपले हितसंबंध जपण्यासाठी व कमजोर घटकांचे शोषण करून स्वत:चे वर्चस्व राखण्यासाठी, हे काही जणांकडून घडते. मात्र उर्वरित जनता अज्ञानाच्या व धर्माच्या नावाखाली अडकलेल्या बेड्यांमधून बाहेर पडलेली नसल्याने, मुस्लीम सत्यशोधकांकडे 'पाखंडी' म्हणूनच पाहते; त्यांना शत्रूस्थानीच मानते. साहजिकच, मुस्लीम सत्यशोधकांना समर्थन तर सोडाच, जागोजागी कडवा विरोध करत राहते.

सत्यशोधकांची दुसरी बाजू अडवली आहे, या देशातील बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाने. मुळात हिंदू समाजातील बहुतांश लोकांच्या मनात मुस्लीम समाजाविषयी या ना त्या प्रकारचा राग, द्वेष, वा दुरावा आहे. त्याचे कारण काहींच्या मनावर इतिहासाचे ओझे आहे, काहींच्या मनात तो राग-द्वेष लहानपणापासूनच्या संस्कारातून पेरला गेलेला आहे. काहींच्या मनात तो सभोवतालच्या घटकांकडून होत असलेल्या विखारी प्रचारामुळे आहे, काहींच्या मनात स्वत:च्या अनुभवांचा चुकीचा अर्थ लावण्यातून तो राग द्वेष आहे. तर उर्वरितांच्या मनात दुरावा आहे, सामाजिक व सांस्कृतिक अभिसरण न घडण्यातून, म्हणजे प्रत्यक्ष संबंध-संपर्क न येण्यातून किंवा कमी प्रमाणात येण्यातून!

परिणामी सर्वसामान्य हिंदू लोक, धर्मपरायण हिंदू लोक, धर्मनिष्ठ हिंदू लोक, हिंदुत्ववादी लोक आणि धर्मांध हिंदू लोक या सर्वच घटकांकडून मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे 'अखेर मुस्लीमच' अशा पद्धतीने पाहिले जाते. अर्थातच वरीलपैकी काही घटकांना मुस्लीम सत्यशोधक मंडळाविषयी थोडीबहुत सहानुभूती वाटत असते; पण त्याचे मुख्य कारण हे मंडळ मुस्लीम मूलतत्त्ववादावर टीका करते म्हणून, मुस्लीम समाजातील रूढी-परंपरांवर प्रहार करत असते म्हणून! मात्र हेच सत्यशोधक जेव्हा हिंदू समाजातील रूढी-परंपरा यांच्यावर किंवा तिथेही स्त्रियांचे व दलितांचे होत असलेले शोषण याबद्दल बोलायला लागतात, तेव्हा हिंदूंमधील सुधारणावाद्यांनाही ते फारसे रूचत नाही, कडव्यांचे तर विचारायलाच नको. म्हणजे हिंदूंमधील बहुतांश लोक मुस्लीम सत्यशोधकांकडे 'काट्याने काटा काढणे' अशा पद्धतीने बघत असतात, त्यापलीकडे या सत्यशोधकांची तमा त्यांना अजिबात नसते.

मुस्लीम सत्यशोधकांची तिसरी बाजू अडवली आहे, त्यांना पाठिंबा, मदत व साथसंगत करणाऱ्या उदारमतवादी, पुरोगामी वा सुधारणावादी लोकांकडून. यांच्यात अनेक प्रकारचे गट-तट आहेत, पण त्यांच्या भूमिकांना तीन प्रमुख आयाम आहेत. एक- काहींना वाटते की, मुस्लीम सत्यशोधक मंडळ ज्या प्रकारची भूमिका घेते, त्यामुळे धर्माचा पगडा असलेला मुस्लीम समाज आपल्यापासून दूर जाईल. तर काहींना वाटते की, स्वधर्मावर टीका करणाऱ्या सत्यशोधक मंडळाच्या भूमिकांचा गैरफायदा हिंदुत्ववादी शक्ती उचलतील आणि मग मंडळाला जे हवे त्याच्या नेमके उलट घडेल. तिसरा आयाम असणाराही एक वर्ग आहे, त्यांच्या मतांनुसार धर्म ही

अतिशय गंभीर व जटिल बाब आहे; तिला हात न घालता शिक्षण, बेरोजगारी असे विषय हाताळूनच मुस्लीम समाजाला सुधारणांच्या दिशेने सरकवता येईल.

वरील तीनही आयाम असणाऱ्या लोकांच्या भूमिका स्थूल मानाने बरोबर आहेत आणि त्यांच्या आक्षेपांमध्ये वा त्यांना वाटणाऱ्या भीतीमध्येही तथ्य काही प्रमाणात आहे. मात्र त्या आधारावर हे लोक मुस्लीम सत्यशोधकांवर ज्या प्रकारचा दबाव कळत-नकळत निर्माण करतात, त्याचा परिणाम या सत्यशोधकांची अवस्था 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी होऊन जाते. त्यातही विशेष हे आहे की, धर्मनिष्ठ हिंदू वा हिंदुत्ववादी समजल्या जाणाऱ्या व्यक्ती-संस्था-संघटना यांच्याशी जरा कुठे संबंध आला किंवा संवाद झाला की, या सत्यशोधकांकडे संशयी नजरेने पाहिले जाते, 'हे शत्रूच्या कळपात जातील किंवा शत्रू यांचा गैरफायदा उठवतील' अशी काहीशी ती समजूत असते. आणि बरोबर याच्या उलट हिंदुत्ववाद्यांमधील उदारमतवादी समर्थक वा सहानुभूतीदार वागत असतात, त्यांच्या उक्ती-कृतीला या सत्यशोधकांनी 'हो' म्हणावे, अशी अपेक्षा बाळगून असतात.

सत्यशोधकांची चौथी बाजू अडवली जाते सरकारकडून व प्रशासनाकडून. कोणतेही सरकार मग ते राज्यांतील असो वा केंद्रातील आणि कोणत्याही पक्षाचे असो (डाव्या, उजव्या, मधल्या), ते या सत्यशोधकांपासून चार हात दूर राहणे पसंत करतात. 'हे सत्यशोधक इतके अल्पसंख्य आहेत की, यांचा आपल्याला सत्ता मिळवण्यासाठी काही फायदा नाही' अशी ती भावना. पण एकवेळही भावना परवडली, अशी त्यांची दुसरी भावना असते. ती अशी की, या सुधारणावाद्यांशी संपर्क संवाद ठेवणे म्हणजे सर्वसामान्य वा धर्मश्रद्ध मुस्लीम समाज (जो आपला मतदार आहे वा होऊ शकतो) आपल्यापासून दुरावेल! म्हणजे एकदा सरकार दरबारी अशी मानसिकता असेल तर मुस्लीम सत्यशोधकांच्या वाट्याला प्रशासनाच्या स्तरावर बेपर्वाई, बेफिकिरी व असहकार येणार यात विशेष ते काय!

या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे, मुस्लीम समाजातील सुधारणांसाठी काही कायदे करायचे असतील वा काही पुरोगामी पावले टाकणारे कार्यक्रम-उपक्रम राबवण्याची मागणी करायची असेल, तर सरकार व प्रशासन यांच्याकडून चालढकल वा साफ दुर्लक्ष केले जाते. तरीही या सत्यशोधकांनी आग्रह धरलाच तर, 'तुमच्या या मागण्यांना तुमच्या समाजातून पाठिंबा नाही, तो तयार झाला की आम्ही हे करू' असे निर्लज्ज उत्तर अजिजीच्या सुरात दिले जाते. 'दाता' व 'याचक' असे काहीसे स्वरूप त्याला प्राप्त होते. वस्तुत: असे म्हणून आपण समोरच्यांचा तर सोडाच, देशाचाही अवमान करत आहोत, हे त्यांच्या गावीही नसते.

तर अशा प्रकारे मुस्लीम सत्यशोधकांची चहूबाजूंनी होत आलेली कोंडी आहे. या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी खुष्कीचा म्हणावा, असा मार्ग दिसत नाही. परिणामी या सत्यशोधकांचे प्रभावक्षेत्र वाढत नाही. मात्र वरील परिस्थिती लक्षात घेता, मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केलेली वाटचाल कौतुकास्पद आहे, देशपातळीवर तरी अनन्यसाधारण आहे.

तरीही प्रश्न उरतोच, या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी काही उपाय आहेत का? अर्थातच दीर्घकाळच्या जटिल परिस्थितीतून निर्माण झालेली ही कोंडी असल्याने, सोपी उत्तरे त्यासाठी

असणार नाहीत. मात्र एक लक्षात घेतले पाहिजे की, ही कोंडी हमीद दलवाई यांनाही होतीच! त्यांनी त्यातून धडका मारून झंझावात कसा निर्माण केला, हे समजून घेतले, तर काही एक वाट प्राप्त परिस्थितीतून पुढे जाण्यासाठी दिसू शकेल. बौद्धिक व नैतिक बळ गोळा करणे, संघटनशक्ती वाढवणे आणि विरोधकांच्या टीकेला व समर्थकांच्या आक्षेपांना तोडीस तोड उत्तरे देण्यासाठी वाद-विवादाची तयारी ठेवणे, प्रसंगी किंमत चुकवण्याची तयारी असणे, हीच ती वाट! अर्थातच, यासाठी नि:स्पृह वृत्ती अंगी बाणवावी लागेल. ते सर्व करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधकांना बळ मिळो अशी प्रार्थना! आणि त्यासाठी त्यांना मोकळा श्वास व खुले अवकाश मिळू द्यावे अशी (सर्व प्रकारच्या) हिंतचिंतकांना आग्रहाची विनंती!

*('साधना' साप्ताहिक, २८ मार्च २०२०, संपादकीय)*

*(विनोद शिरसाठ : लेखक, पत्रकार आणि 'साधना' साप्ताहिकाचे संपादक.)*

# ६.२१ मुस्लीम शिक्षण परिषदेतील ठराव – प्रा. शमसुद्दिन तांबोळी

(हमीद दलवाई यांच्या पुढाकाराने मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना १९७०मध्ये झाली. मंडळाच्या वतीने कोल्हापूर येथे ११-१२ ऑगस्ट १९७३ दरम्यान कार्यकर्त्यासाठी शिक्षण शिबिर आणि ३०-३१ डिसेंबर १९७३ दरम्यान महाराष्ट्र शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. या ऐतिहासिक घटनेस येत्या आठवड्यात पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा झालेली चर्चा आणि सर्वानुमते मंजूर करण्यात आलेले ठराव आजही तेवढेच महत्त्वाचे कसे आहेत, यावर प्रकाश टाकणारा हा लेख.)

भारतीय राज्यघटना अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत असताना म्हणजे २६ नोव्हेंबर २०२३ रोजी वर्तमानपत्रांतून एक बातमी प्रसिद्ध झाली. त्याचे शीर्षक होते– 'शिक्षणात ५ टक्के आरक्षणाची मुस्लीम धर्मीयांची मागणी'. विद्येचे माहेर समजण्यात येणाऱ्या पुणे शहरातील 'ऑल इंडिया उलेमा बोर्डा'ने तीन मागण्या पुढे केल्या आणि या मागण्या मान्य न झाल्यास मराठा आणि धनगर समाजाप्रमाणे रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याचा इशाराही दिला.

या तीन मागण्या अशा आहेत–

१) राज्य सरकारने शिक्षणात मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण द्यावे.

२) राज्यातील उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये अरेबिक भाषा अनिवार्य करण्यात यावी.

३) मदरशातील शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न सोडवावा. वास्तविक आरक्षण हे धर्माधिष्ठित नसते, तर ते सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक निकषांवर ठरवायचे असते. १९५०च्या राष्ट्रपतींच्या संविधानात्मक आदेशानुसार हिंदू धर्मातील मागास जातींना आरक्षणाची शिफारस केली आहे. नंतर बौद्ध आणि शीख पंथाचा समावेश करण्यात आला. कालेलकर समिती (१९५५) आणि मंडल आयोगाने मुस्लीम समाजातील जातिव्यवस्था स्पष्ट केली आहे. (तत्वतः इस्लामला जातिव्यवस्था मान्य नाही) आरक्षण हे मागासलेपणाची शहानिशा करून मागास जातींसाठी असते; ते सरसकट एखाद्या धर्मासाठी नसते, याचे भान उलेमा बोर्डाला दिसत नाही. मुस्लीम समाजात मागास जाती आहेत आणि त्यांना शैक्षणिक आरक्षण असावे यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती आणि न्यायालयाने मुस्लीम मागास जातींसाठी ५ टक्के शैक्षणिक आरक्षणाची शिफारस केली होती. ती शिफारस सरसकट सर्व मुस्लिमांसाठी नाही.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली डिसेंबर १९७३मध्ये कोल्हापूर येथे जी महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषद आयोजित केली होती, त्यात स्पष्टपणे मांडण्यात आले होते की, उर्दू ही भारतीय भाषा आहे. तिची धर्माशी सांगड घालून विभक्ततावाद जोपासणे अपरिमित नुकसान करणारे आहे. मुस्लिमांनी मराठी/प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेण्यास चालना द्यावी आणि मुख्य प्रवाहातील शाळा-महाविद्यालयांतून उर्दू ही एक ऐच्छिक भाषा

म्हणून उपलब्ध असावी. त्यामुळे मुस्लीम आणि मुस्लिमेतरांनाही उर्दू शिकण्याची संधी मिळेल. तथापि, आजही मुस्लीम समाजात उर्दू आणि मुस्लीम यांची सांगड कायम आहे.

आता उलेमा बोर्डाने अशी मागणी केली आहे की, उर्दू माध्यमाच्या शाळेत अरेबिक भाषा सक्तीची (ऐच्छिक नाही) करावी. कारण असे सांगितले आहे की, आखाती देशांत नोकरी मिळवताना ती अतिरिक्त गुणवत्ता समजली जाते. आखाती देशांत नोकरीसाठी फक्त मुस्लीम जातात असे नाही, तर मुस्लिमेतरही जातात. शिवाय, मुस्लिमांना नोकरीसाठी आखाती देशच कशाला हवा? इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशात जाऊन तेथे नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक त्या पात्रता का अवगत करू नयेत?

उलेमा बोर्ड सांगते की, मदरशातील शिक्षकांच्या पगाराचा प्रश्नदेखील गंभीर असून त्या संदर्भात आम्ही पाठपुरावा करणार आहोत. ही बातमी प्रत्यक्ष वक्फ कक्षाच्या अध्यक्षांनी दिली आहे. वास्तविक वक्फ बोर्डाकडे कोट्यवधीचा पैसा आणि मालमत्ता आहे. या संपत्तीचा उपयोग मुस्लिमांच्या आधुनिक, विज्ञानवादी, कौशल्य-व्यवसायाभिमुखपाया असणाऱ्या शिक्षणासाठी वापरण्याची भाषा न करता शासनाने सरसकट मुस्लिमांना आरक्षण द्यावे, उर्दू माध्यमाच्या शाळांतून अरेबिक भाषा अनिवार्य करावी, मदरशातील शिक्षकांचा पगाराचा प्रश्न मार्गी लावावा अशा मागण्या घेऊन रस्त्यावर उतरण्याची भाषा करावी, हे केवळ हास्यास्पद नसून, अनाठायी कांगावाच म्हणावा लागेल. कारण मुस्लीम समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाण्याऐवजी काळाचे काटे उलट्या दिशेने फिरवून समाजाला पुन्हा मध्ययुगीन काळात घेऊन जाण्याचा हा प्रकार आहे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे किंवा शिक्षणाच्या माध्यमातून जग बदलता येते इथपासून ते 'एवढे अनर्थ एका अविद्येने केले' असे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे वाक्य, आपण अनेक वेळा ऐकत आणि वाचत असतो. पण मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडून हे सांगण्यात येते, तेव्हा त्याचे संदर्भ फार वेगळे असतात आणि ते गांभीर्याने समजून घ्यावे लागतात.

शिक्षणतज्ज्ञ प्रा. अ. भि. शहा, समाजप्रबोधक हमीद दलवाई आणि इतर आधुनिकतावाद्यांनी एकत्र येऊन १९६८मध्ये 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली, परंतु दलवाईंना अनेकविध कारणांनी मुस्लीम समाजप्रबोधनावर लक्ष केंद्रित करणे प्राधान्याचे वाटले. त्यानंतर दलवाई आणि सहकारी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मंडळाने समान नागरी कायदा अस्तित्वात यावा, यासाठी स्त्री-पुरुषांच्या सह्यांचे निवेदन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक, राज्यपाल मा. अलियावर जंग, पंतप्रधान इंदिरा गांधी यांना दिले. संवाद यात्रा, व्याख्यानमाला आयोजित केल्या. कार्यकर्त्यांसाठी अभ्यास शिबिरांचे आयोजन केले. विविध जिल्ह्यांत मंडळाच्या शाखा स्थापन केल्या.

१९७१मध्ये दिल्ली येथे 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स' आयोजित केली. मंडळाच्या या उपक्रमात 'इंडियन सेक्युलर सोसायटी'चा सहभाग होता. मंडळाने १९७३ या वर्षात अनेक महत्त्वाचे उपक्रम आयोजित केले. मंडळाचे मुखपत्र 'मुस्लीम सत्यशोधक

पत्रिका' सुरू झाली, 'वंदे मातरम'च्या पहिल्या दोन कडव्यांच्या गायनासाठी अभियान सुरू केले, मुंबई येथे महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषदेचे आयोजन केले, तलाकपीडित महिलांच्या परिषदांचे आयोजन करण्यात आले.

परिणामी मंडळाच्या कार्यास विरोध करण्यासाठी मुंबई येथे 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' स्थापनेसाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले. तेव्हा या स्थापनेस विरोध दर्शवण्यासाठी कार्यकर्त्यांनी दलवाईंच्या नेतृत्वाखाली निदर्शने केली. जनजागृती आणि लोकशिक्षण करताना धर्मांधता आणि जमातवादी राजकारणाचे जे दर्शन घडले, त्याच्या मुळाशी आधुनिकता आणि वैज्ञानिक मनोभावाचा अभाव आहे, हे पुनश्च अधोरेखित केले.

मुस्लीम समाज आधुनिकताभिमुख झाला पाहिजे, समाजात शैक्षणिक प्रेरणा आणि अनुकूल परिस्थिती निर्माण केली पाहिजे, यासाठी मंडळाने कोल्हापूर येथे प्रथम ११ आणि १२ ऑगस्ट १९७३ रोजी कार्यकर्त्यांसाठी शैक्षणिक शिबिर आणि नंतर कोल्हापूर येथेच ३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषदेचे आयोजन केले. तेव्हा मंडळाचे अध्यक्ष स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले होते, तर सरचिटणीस हमीद दलवाई होते. या निमित्ताने तयार केलेल्या समितीचे सचिव सय्यदभाई होते, तर परिषदेचे प्रमुख आयोजक म्हणून हुसेन जमादार आणि सोलापुरे यांनी काम पाहिले. परिषदेचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले; अध्यक्षस्थानी हमीद दलवाई होते. या परिषदेत मा. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, प्रा. ना. गो. कालेलकर, एस. एम. जोशी आणि अन्य मान्यवरांनीही मार्गदर्शन केले.

केशवराव भोसले नाट्यगृह कोल्हापूर येथील या परिषदेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून सुमारे १००० मुस्लीम प्रतिनिधी सहभागी झाले. त्यात सुमारे २५० महिला होत्या. आज या महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषदेला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. तथापि त्याची प्रस्तुतता आणि प्रासंगिकता आजही समाजाला अंतर्मुख होण्यास प्रेरणादायी आहे.

१९७१च्या जनगणनेअनुसार भारताची सरासरी साक्षरता २९ टक्के होती. त्यात ३९.५ टक्के पुरुष आणि १८.७० टक्के महिला नोंदवण्यात आली. याच जनगणनेअनुसार मुस्लीम समाजातील साक्षरता पुरुष १० टक्के आणि महिला फक्त ०.५ टक्के साक्षरता होती. मुस्लिमांची सरासरी साक्षरता तर ६ टक्क्यांपेक्षाही कमी होती. ज्या समाजात साक्षरतेचा अभाव आणि धर्मांधतेचा प्रभाव आहे, त्या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे स्वतंत्र विश्लेषण करण्याची गरजच नाही.

इस्लामचा पहिला शब्द 'इकरा' (वाचन) आणि पैगंबरांचा 'ईल्म' (ज्ञान-शिक्षण) हासील करण्याचा सल्ला, फक्त 'कुराण'चे वाचन आणि इस्लामचे ज्ञान इथपर्यंतच मर्यादित ठेवल्यामुळे समाजात ज्ञान, ज्ञानाचा उपयोग व ज्ञान निर्मिती याबद्दल उदासीनताच दिसून येते. महाराष्ट्रातील गतिशून्य मदरसा शिक्षण आणि तुटपुंज्या स्वरूपाचे उर्दू माध्यमातून घेतलेले शिक्षण समाजपरिवर्तन कसे घडवून आणणार, हा कळीचा मुद्दा मुस्लीम सत्यशोधक मंडळाने तेव्हा विचारात घेतला आणि मुस्लीम समाजाला आधुनिक, प्रवाही, तंत्रज्ञानसन्मुख, रोजगाराभिमुख शिक्षणाकडे वळवण्यासाठी, त्या संदर्भात लोकशिक्षण करण्यासाठी त्या परिषदेचे आयोजन केले होते.

आज मुस्लीम समाजात जी निराशा, एकाकीपणा आणि वैफल्याची भावना दिसून येते, त्यास आधुनिक शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव आहे, हे महत्त्वाचे कारण आहे. फक्त 'शिक्षण, आरक्षण आणि संरक्षण' मिळवून देण्याच्या घोषणा उपयोगाच्या नाहीत. आमच्या अवनतीस आम्हीच कारणीभूत आहोत का नाही, याबाबत आत्मपरीक्षण केल्यास उत्तर मिळेल आणि पुढील मार्ग सापडेल. विचारशक्तीला वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आधार न आमची ही दुरवस्था झाली आहे. सर सय्यद अहमद खान यांच्यासारख्या दृष्ट्या शिक्षणतज्ज्ञास नाकारल्याने ही अवस्था झाली आहे.

स्वतंत्र भारतातील पहिल्या पाच शिक्षणमंत्र्यांमध्ये मौलाना आझाद, हुमायून कबीर, बॅरिस्टर एम. सी. छगला, फखरुद्दिन अली अहमद हे चार शिक्षणमंत्री जन्माने मुस्लीम होते. परंतु, समाजाने त्यांचे विचार स्वीकारले नाहीत. भारतीय मुस्लीम समाजाने आपल्या सार्वजनिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जडणघडणीत हे लक्षात घेतले पाहिजे की, आज इस्लामिक संस्कृती कालबाह्य ठरली आहे.

आपण आधुनिक जगाच्या संदर्भात नव्याने विचार केला पाहिजे. आधुनिकतेची आव्हाने स्वीकारणे, याचा अर्थ आपले शिक्षण, राहणीमान आणि जीवनध्येये ठरवताना आपले धार्मिक जीवन आणि सामाजिक जीवन वेगळे करून आपल्या सर्वांगीण विकासासाठी मार्ग शोधणे. शिक्षण हेच या नव्या जीवनाचे साधन आहे. हा विचार प्रसारित करण्यासाठी पन्नास वर्षांपूर्वी ती परिषद आयोजित केली होती. या परिषदेत मांडण्यात आलेल्या ठरावांचे सर्व उपस्थित प्रतिनिधींनी समर्थन आणि स्वागत केले होते.

परिषदेतील पहिला ठराव हा मुस्लीम विद्यार्थ्यांना उर्दूऐवजी प्रादेशिक भाषेतून शिक्षण देण्यासंदर्भात होता. १९४० मध्ये मुस्लीम लीगच्या प्रभावामुळे उर्दू ही अखिल भारतीय मुस्लिमांची भाषा असल्याचा प्रसार सुरू झाला. परिणामी, ते शासकीय आणि आर्थिक क्षेत्रांत मागे पडले. विविध स्पर्धांत मागे पडले. बंगाली, गुजराती, पंजाबी, दक्षिण भारतातील मुस्लीम आपल्या प्रादेशिक भाषांना मातृभाषा समजून व्यवहार करतात, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील मुस्लिमांनी मराठीला मातृभाषा म्हणून स्वीकारले, तर त्यांच्यातील अलगतावाद कमी होऊन दैनंदिन जीवनात सौहार्दाचे व्यवहार होतील. मुस्लीम किंवा मुस्लिमेतरांनाही उर्दू शिकता यावी, यासाठी मराठी, इंग्रजी माध्यमांच्या शाळा-महाविद्यालयांतून उर्दू भाषा ऐच्छिक स्वरूपात उपलब्ध असावी.

परिषदेतील दुसरा ठराव इतर समाजांप्रमाणेच मुस्लीम समाजालाही विविध क्षेत्रांत सवलती आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, समाजाची स्पर्धात्मक ताकद वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे, पण अशी ताकद वाढवण्याच्या मार्गात प्रतिगामी आणि विभक्ततावादी नेतृत्वाने अडथळे निर्माण केले आहेत. मुस्लिमांच्या ताब्यात असणारे वक्फचे कोट्यवधी रुपये आणि संपत्तीचा वापर मुस्लीम समाजात आधुनिक वैज्ञानिक पाया असलेले शिक्षण देण्यासाठी उपयोगात आणला गेला, तर एका पिढीच्या कालमर्यादेत मुस्लीम समाजाचे शैक्षणिक मागासलेपण दूर करता येईल. वक्फकडे असणारा पैसा पारंपरिक नेतृत्वाकडे असल्याने तो कालबाह्य शिक्षण आणि धार्मिक विधीवर खर्च केला जातो.

परिषदेतील तिसऱ्या ठरावाचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होते. हा ठराव मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी होता. यात नमूद करण्यात आले की, माध्यमिक शाळेपर्यंतचे शिक्षण सरकारने मोफत करावे, उच्च शिक्षण १२०० रुपये उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना मोफत आहे. त्याऐवजी ही सवलत वार्षिक ५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात यावी. या मागणीच्या पूर्ततेसाठी सर्व जाती-जातींतील आर्थिक मागासलेल्या गटांचे सहकार्य मिळवून आपली मागणी मान्य करावयास सरकारला भाग पाडण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने धर्मनिरपेक्ष पातळीवर आंदोलन उभारावे, असा ही परिषद मुस्लीम सत्यशोधक मंडळास आदेश देत आहे. (या संदर्भात तत्कालीन म्हणजे ५० वर्षांपूर्वीची आर्थिक-सामाजिक स्थिती लक्षात घेतली पाहिजे.)

चौथा ठराव मदरसा शिक्षणावर होता. मदरसा शिक्षण मुस्लीम समाजात संकुचित प्रवृत्ती जोपासण्यास कसे कारणीभूत आहे, हे त्यात स्पष्ट करण्यात आले. मदरसा शिक्षण आज कसे गैरलागू आहे, हे ठरावात मांडून, एका आधुनिक लोकशाही देशाचे नागरिक म्हणून येथील मुस्लिमांच्या प्रगतीत आणि कल्याणाच्या आड येणारे आहे हे स्पष्ट केले. या ठरावाचे सूचक, अनुमोदक आणि वाचक म्हणून निवृत्त शिक्षण अधिकारी मोहिय्युद्दीन शेख, प्राचार्य ए. डी. अत्तार, प्रा. विलायत शेख, सय्यद मुनीर, वजीर पटेल, गुलाब पांजवानी व इतरांनी जबाबदारी पार पाडली.

आज पन्नास वर्षांनंतर यात थोडाफार फरक पडल्याचे लक्षात येते. मराठी माध्यमातून शिकणाऱ्यांची संख्या लक्षणीय पद्धतीने वाढत आहे. मराठीतून लेखन करणाऱ्या साहित्यिकांची संख्या वाढत आहे, दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढला आहे. 'जमात-ए-इस्लामी'ने तर 'कुराण'चा मराठीत अनुवाद केला आहे. तरीही त्या परिषदेत मांडण्यात आलेले विषय आजही तेवढेच महत्त्वाचे आहेत.

मुस्लीम समाजाचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा न्या. राजेंद्र सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग तसेच महाराष्ट्रातील डॉ. मेहमूद-उर-रेहमान अभ्यासगटाने समाज आणि शासनासमोर ठेवला आहे. शासनाने याबाबत सकारात्मक धोरण आखले, तर मुस्लीम समाजाची स्थिती सुधारेल आणि स्वतःच्या विकासाबरोबरच देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी तो समाज योगदान देऊ शकेल. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने आपल्या निकालपत्रात मुस्लीम समाजातील मागास जातींना शिक्षणात ५ टक्के आरक्षण देण्याची शिफारस मंडळाने केली होती. मात्र, सरकारने त्यास अनुकूल प्रतिसाद दिला नाही, याची खंत आहे.

अलीकडेच अल्पसंख्याकांसाठी उपलब्ध असलेली प्रीमॅट्रिक स्कॉलरशिप बंद केली आहे, संशोधनास प्रोत्साहन देणारी मौलाना आझाद अधिछात्रवृती केंद्र सरकारने रद्द केली आहे, स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या 'उडाण' योजनेस कात्री लावली आहे. यामुळे विद्यार्थी, पालक आणि पर्यायाने मुस्लीम समाजात नैराश्य येणे अगदी स्वाभाविक आहे.

खरे म्हणजे महाराष्ट्रात शिक्षण, संशोधन आणि नेतृत्व विकासासाठी 'बार्टी', 'सारथी'सारख्या संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर मुस्लीम समाजाच्या शिक्षण, प्रशासन,

संशोधन, नेतृत्व विकासासाठी संस्था निर्माण झाल्यास या समाजात बुद्धिजीवी वर्ग निर्माण होईल, समाजातून चांगले नेतृत्व उभे राहील आणि मुस्लीम समाज पर्यायाने समृद्ध भारतीय समाज निर्माण करण्यास हातभार लागेल.

*(डॉ. शमसुद्दिन तांबोळी : 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे कार्यकर्ते आणि अध्यक्ष आहेत. 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चे संपादक, हमीद दलवाईंचे अभ्यासक, इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त अध्यापक आहेत.)*

## ६.२२ धर्मातीततेचे प्रतीक : बाबुमियाँ बँडवाले – प्रा. ना. द. शिरोळकर

(श्रीगोंदे येथील स्वातंत्र्यसैनिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे २५ वर्ष अध्यक्ष राहिलेले बाबुमियाँ बँडवाले यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा परिचय करून देणारा हा लेख.)

धर्मातीततेचे व राष्ट्रीय एकात्मतेचे मूर्तीमंत प्रतीक असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्रीगोंद्याचे बाबुमियाँ बँडवाले यांचे दुःख निधन झाल्याची वार्ता ऐकून अत्यंत वाईट वाटले.

१९४२च्या 'चले जाव' चळवळीच्या काळात बाबुमियाँ येरवडा मध्यवर्ती कारागृहात असताना बेचाळीसच्या लढ्यात भाग घेतल्याबद्दल मलाही ३० सप्टेंबर १९४२पासून पुढे अडीच महिने तेथेच 'ब' वर्गात स्थानबद्ध करून ठेवले होते. त्या वेळी बाबुमियाँचा परिचय झाला. बाबुमियाँ थोर संगीततज्ज्ञ आणि संगीताचे उत्तम शिक्षक होते. त्या वेळी माझा आवाज बरा असल्यामुळे त्यांनी मला तुरुंगात गाणे शिकवावयास सुरुवात केली. या शिकवणीमुळे मला त्यांचा निकट सहवास लाभला. त्यांची शिस्तप्रियता आणि छाप पाडणाऱ्या त्यांच्या प्रेमळ व्यक्तिमत्त्वामुळे मी भारावून गेलो.

शुद्ध आणि स्पष्ट मराठी बोलणाऱ्या माझ्या या गुरुवर्याचे खरे नाव निराळेच असावे. बँडचा व्यवसाय करणारे असल्यामुळे त्यांना 'बाबुमियाँ' या टोपणनावाने संबोधिले जात असावे, अशी माझी त्या वेळी चुकीची समजूत झालेली होती. बाबुमियाँ मुस्लीम असल्याचे कळले, तेव्हा माझा विश्वास बसेना. शेवटी भीतभीत मी बाबुमियाँना 'तुम्ही मुसलमान आहात का?' असा प्रश्न केला. तेव्हा 'मी माणूस आहे, बस्स.' असे उत्तर त्यांनी मला दिले. या साध्या उत्तराने मला धर्मातीततेचा व्यवहारातील खरा अर्थ समजला. सामाजिक संबंधात कोणीही व्यक्ती हिंदू, मुसलमान या कोणत्याही धर्माची नसते. ती फक्त 'माणूस' असते. याची जाणीव या उत्तराने मला झाली. धर्मातीततेचा हा अर्थ माझ्या मनावर कायमचा ठसलेला आहे.

१९७० साली मी त्या वेळी काम करत असलेल्या धुळ्याच्या विद्यावर्धिनी महाविद्यालयात हमीद दलवाई आले असताना पुरोगामी विचारांचा मुस्लीम कार्यकर्त्यांबद्दल बोलणे झाले. त्यात प्रकर्षाने बाबुमियाँच्या नावाचाही उल्लेख झाला. बाबुमियाँ हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते व अध्यक्ष असल्याचे मला नंतर समजले. त्यांच्या कार्याबद्दल, विशेषतः मुस्लीम स्त्रियांना हक्क मिळवून देण्याबाबत त्यांनी केलेल्या सततच्या प्रयत्नांमुळे मी प्रभावित झालो.

१९८५च्या जानेवारी महिन्यात मला बाबुमियाँना भेटण्याची नामी संधी मिळाली. मी त्यांच्या बैठकीच्या खोलीत गेलो. त्यांना आदरपूर्वक नमस्कार केला आणि भोवतालच्या भिंतीकडे पाहू लागलो. या भिंतीवर सर्वांना सहज वाचता येईल अशा मोठ्या अक्षरात राष्ट्रीय एकात्मतेची सूत्रे त्यांनी लिहून ठेवलेली होती. त्यांच्याशी बोलताना, स्वातंत्र्य सैनिकास मिळणाऱ्या कोणत्याही सवलती त्यांनी घेतल्या नाहीत, शासनाने देऊ केलेली आठ एकर जमीनही घेतली नाही. हे

समजले आणि त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला. त्यांच्याकडून निघताना त्यांनी मला राष्ट्रीय एकात्मतेची सूत्रे पत्राने कळवावीत अशी मी त्यांना विनंती केली. माझ्या विनंतीनुसार बाबुमियाँनी १९८५मध्ये दोन पोस्ट कार्डे पाठवून मला ती सूत्रे कळविली –

राष्ट्रीय एकात्मतेसाठी–

१) धर्मासोबत देवांचीही राज्यकारभारातून उचलबांगडी झाली पाहिजे.

२) यात्रा, उत्सव, उरूस यांची राज्यकारभारामार्फत दखल घेऊ नये.

३) धार्मिक सणांच्या सुट्ट्या बंद कराव्यात.

४) देवस्थानांचे जीर्णोद्धार वगैरेंसारख्या बाबींना सरकारी मदत देऊ नये.

५) हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध वगैरेंकरिता समान नागरी कायदा हवा.

६) शाळाशाळांतून धर्मशिक्षणाचे उच्चाटन व्हावे.

७) सरकारी अनुदान मिळणाऱ्या कोणत्याही संस्थेत नमाज, पूजा इत्यादी धार्मिक विधी करण्यात येऊ नयेत.

८) कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने वा प्रतिनिधीने सरकारी अधिकारी वा प्रतिनिधी म्हणून कोणत्याही धार्मिक समारंभात वा उत्सवात भाग घेऊ नये.

९) कोणत्याही सरकारी सार्वजनिक कार्यालयात देवदेवतांची चित्रे वा शिल्पे असू नयेत. सरकारी अनुदान मिळणाऱ्या संस्थांनाही हा नियम लागू करण्यात यावा.

या पत्राच्या शेवटी एस. बाबुमियाँ अशी त्यांनी स्वाक्षरी केली आहे.

या सूत्रांच्या प्रत्येक ओळीतून राष्ट्रीय एकात्मतेचा त्यांना लागलेला ध्यास आणि त्यांची धर्मातीत वृत्ती प्रकट होते. गेल्या काही दिवसांत भारतामध्ये धर्मांधता आणि जातीय प्रवृत्तींनी धुमाकूळ घातलेला आहे. मूलतत्त्ववादी प्रवृत्तींचा प्रभाव वाढत चाललेला आहे. अशा घातक प्रवृत्तींशी सर्व सामर्थ्यानिशी लढा देणे आवश्यक आहे. अशा वेळी आदरणीय बाबुमियाँनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी सांगितलेली सूत्रे अंमलात आणली, तर तीच त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरू शकेल.

*(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, बाबुमियाँ बँडवाले विशेषांक, २२ मार्च १९९८)*

*(प्रा. ना. द. शिरोळकर : समाजवादी वर्तुळातील ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच शिक्षण व शिक्षकांच्या प्रश्नावर काम केले आहे.)*

## ६.२३ भारतमातेसाठी (भाषण) – बाबुमियाँ बँडवाले

मी सन १९३०मध्ये काँग्रेस चळवळीत भाग घेऊन कार्यास सुरुवात केली. वर्षभराच्या आतच पूज्य रावसाहेब पटवर्धनांचा परिचय झाला व मनोमन त्यांना गुरु मानून कार्य करू लागलो. १९३२मध्ये माझ्यावर भाषणबंदीची नोटीस इंग्रजांनी बजावली होती. ती नोटीस एका जाहीर सभेत फाडून, बंदी मोडून भाषण केले व तुरुंगाचा रस्ता धरला. हा माझा पहिला तुरुंगवास. नंतर श्रीगोंदे तालुक्यात काँग्रेसचे कार्य जोरात सुरू झाले. पुढे १९३५च्या सुमारास गांधी जयंतीच्या दिवशी जाहीर सभेत माझ्या घरातील बुरखा पद्धत बंद केल्याचे जाहीर केले.

सन १९४०मध्ये गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू करून भारतातले पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. आम्हीही सत्याग्रहासाठी गांधीजींच्याकडे परवानगी मागितली. १९४१ची ९ जानेवारी ही तारीख मला मिळाली. ही तारीख निवडण्याचे कारण, त्या तारखेस आम्हा मुसलमानांचा बकरी ईदचा प्रमुख सण होता. मक्केच्या यात्रेचा महत्त्वाचा पवित्र दिवस. त्या दिवशी मुस्लीम धर्मात परमेश्वराच्या नावाने कुर्बानी देण्याचा (बली) दिवस असतो. कुर्बानी पशूची देतात व ती सर्व जण प्रसाद म्हणून ग्रहण करतात. म्हणून मीही भारतमातेसाठी अल्पशी कुर्बानी देण्याचे ठरवून त्या दिवशी सत्याग्रह करून तुरुंगात गेलो. पुढे सुटून आल्यावर काही महिने बाहेर राहून ९ ऑगस्ट १९४२ रोजी अचानक मी व माझे मित्र रामलिंग पकडले गेलो.

ज्या दिवशी महात्मा गांधी, पंडित नेहरू व काँग्रेस वर्किंग कमिटेचे सभासद पकडले गेले, त्याच दिवशी आम्हाला सरकारने पकडले, याबद्दल आम्हाला मोठा अभिमान वाटला, धन्यता वाटली. या वेळच्या काही गोष्टी म्हणजे आम्ही नगर जिल्ह्यातील काही लोक येरवडा जेलमध्ये होतो. स्थानबद्ध असल्यामुळे घरून खाण्याचे पदार्थ मागवता येत होते. त्यामुळे दररोज कुणा ना कुणा मित्रांना त्यांच्या घरून मेवामिठाई वगैरे येत असे व ते मित्र आम्हाला सोडून खात नसत. परंतु मला ते प्रशस्त वाटेना. मी माझ्या स्वभावानुसार २ ऑक्टोबर १९४२ गांधी जयंतीला निश्चिय केला की, आजपासून तुरुंगातून सुटेपर्यंत जेलच्या अन्नाशिवाय बाहेरचे काहीही खायचे नाही व तो निश्चय तुरुंगातून सुटेपर्यंत पाळला. त्यामुळे काही मित्रांना वाईट वाटले असेल. हा तुरुंगवास बेमुदत असल्यामुळे केव्हा सुटका होईल, याचा अंदाज नव्हता. आठ-दहा महिन्यांच्या आतच सरकारने असे जाहीर केले की, जो कोणी आमच्या अटी मान्य करून लिहून देईल, त्यांना सोडण्यात येईल. मग आमच्यापैकी बरेचसे सत्याग्रही अटी मान्य करून सुटू लागले. त्याचबरोबर माझाही विचार पक्का झाला की, सरकारच्या अटी मान्य करून सुटायचे नाही. येरवडा तुरुंगातून बरेच लोक सुटून गेले, मग आम्हा थोड्या लोकांना येरवड्याहून विसापूर जेलमध्ये अगदी साग्रसंगीत बेड्या घालून आणले.

याच येरवडा तुरुंगातील एक गोष्ट. मी काविळीने आजारी पडलो. हॉस्पिटल बॅरेकमध्ये पूज्य रावसाहेबांनी माझी भेट घेतली व त्या रोगावर औषधे, इंजेक्शनची भरपूर मदत केली म्हणून मी जगलो. रावसाहेब म्हणाले होते की, आजारी आहात, घरी जाता का? मी त्यांना सांगितले की, सरकार जेव्हा बिनशर्त सोडील, तेव्हाच मी बाहेर जाईन. एरवी कुठल्याही अटीवर किंवा पॅरोलवर मी सुटका करून घेणार नाही.

हे ऐकून पूज्य रावसाहेबांना खूप आनंद झाला. त्या काळची, रावसाहेबांची आजही आठवण झाली म्हणजे डोळ्यात अश्रू येतात. रावसाहेबांचा माझ्यावर अतिशय जीव. यामुळेच आपल्या जिल्ह्यातील किंवा बाहेरील त्यावेळचे कार्यकर्ते अजूनही म्हणतात की, बाबुमियाँ हे रावसाहेबांचे प्रिय शिष्य. माझ्या मुलाचे लग्न २६ जानेवारी १९५५मध्ये झाले, त्या वेळी रावसाहेब मुलामुलीस शुभाशीर्वाद देण्यासाठी श्रीगोंद्यास आले होते. त्या वेळी मी मुलामुलीस स्टेजवर आणून बसवले होते. आमच्या समाजात नवरा मुलगाच बाहेर मांडवात बसतो. नवरी मुलगी घरात असते. मी आमची जुनी रूढी मोडून मुलामुलीस बाहेर स्टेजवर आणून बसवले, मध्ये रावसाहेबांना बसवले. मात्र लग्न धार्मिक पद्धतीने केले. सदर लग्नप्रसंगी रावसाहेबांनी खादी सिल्कची शाल माझ्या मुलाच्या अंगावर घातली. ती शाल आम्ही एका महापुरुषाने दिलेले पवित्र वस्त्र म्हणून जतन करून ठेवली आहे.

मी मराठी भाषेचा कट्टर पुरस्कर्ता आहे. महाराष्ट्रातील मुस्लिमांनी मराठीतूनच आपल्या मुलांना शिक्षण द्यावे असे माझे मत आहे. मात्र उर्दूला माझा विरोध नाही. महाराष्ट्रातील एक थोर मुस्लीम विचारवंत हमीद दलवाई यांच्याबरोबर मी काम करत असतो. त्यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा मी सध्या अध्यक्ष आहे. मी काँग्रेस सोडावी म्हणूनच १९४६मध्ये मुसलमानांनी मला निनावी खुनाच्या धमकीची पत्रे पाठवली. मी बरेच वर्षे अहमदनगर जिल्हा काँग्रेसचा उपाध्यक्ष होतो. १९५०नंतर आजपावेतो काँग्रेसच्या कोणत्याही अधिकारपदावर नाही व आतापावेतो ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत कोणत्याही इलेक्शनला कधी उभा राहिलो नाही व त्यामुळेच मते बदलण्याचा, टोपी फिरवण्याचा प्रसंग माझ्यावर कधीच आला नाही.

महाराष्ट्र राज्य सामाजिक समता परिषदेचा मी सभासद आहे. हल्ली अहमदनगर जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीवर मी सभासद म्हणून आहे. मला नाट्यकलेची आवड असल्यामुळे काही मित्रांच्या सहकाराने तीस वर्षांपूर्वी 'अभिनव नाट्य मंडळ' ही संस्था स्थापन केली. अनेक नाटकांचे प्रयोग करून आतापर्यंत तीस हजार रुपये सार्वजनिक संस्थांना मदत म्हणून दिले. चीनच्या आक्रमणाच्या वेळी नाटक करून ६००१ रुपयांची थैली कै. ना. कन्नमवार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यांना दिली व पाकिस्तान आक्रमणाच्या वेळी नाटक करून ९१०१ रुपये राष्ट्रीय संरक्षण निधीस दिले. महात्मा गांधी जन्मशताब्दीनिमित्त 'एकच प्याला' नाटकाचे अनेक प्रयोग करून ५०,००० लोकांच्या पुढे दारूबंदीचा प्रचार केला. या नाटकातील विशेष म्हणजे मी सहकुटुंब सहपरिवार नाटकातून भूमिका केल्या

मी भारत सरकारच्या निमंत्रणावरून 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून दिल्लीच्या लाल किल्ल्यातील दिवान-ई-आममध्ये पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या हस्ते ताम्रपट घेऊन आलो. हा माझ्या आयुष्यातील आनंदाचा क्षण. मी स्वातंत्र्यसैनिक म्हणून आजपावेतो सरकारकडे कुठल्याही प्रकारची (जमीन, पेन्शन, मुलांच्या शिक्षणासाठी वगैरे) मदत मागितली नाही व पुढेही मागण्याची इच्छा नाही.

*(३ जानेवारी १९७३ रोजी बाबुमियाँ बँडवाले यांनी लिहिलेला हा मजकूर श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी महाविद्यालयाने प्रकाशित केलेल्या विशेषांकात प्रकाशित करण्यात आला.)*




# ७. मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते

### ७.१ आरंभापासूनचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य –

- ☐ हमीद दलवाई (मुंबई)
- ☐ बाबुमियाँ बँडवाले (श्रीगोंदा)
- ☐ मेहेरून्निसा दलवाई (मुंबई)
- ☐ अब्दुल कादर मुकादम (मुंबई)
- ☐ सय्यद महेबुब (पुणे)
- ☐ सय्यद मुनीर (पुणे)
- ☐ सय्यद रफीउद्दिन (पुणे)
- ☐ हुसेन जमादार (कोल्हापूर)
- ☐ वजीर पटेल (अमरावती)
- ☐ फझल शेख (पुणे)
- ☐ दादाभाई पटेल (चिपळूण)
- ☐ हुसेन दलवाई (मुंबई)
- ☐ मुमताज रहिमतपुरे (कोल्हापूर)
- ☐ अन्वर राजन (पुणे)
- ☐ महंमद हनीफ तांबोळी (सोलापूर)
- ☐ विलायत शेख (फलटण)
- ☐ इब्राहिम सिद्दीकी (पुणे)
- ☐ मकबूल तांबोळी (पुणे)
- ☐ इलाही मोमीन (पाटण)
- ☐ बशीर तांबोळी (फलटण)
- ☐ शमसुद्दिन तांबोळी (पुणे)
- ☐ मुमताज इनामदार (पुणे)
- ☐ ऐनुल अत्तार (कोल्हापूर)
- ☐ प्रा. कुलसुम पारेख (नेरळ)
- ☐ ॲड. अब्दुल शेख (संगमनेर)
- ☐ निजाम मुलाणी (कोल्हापूर)
- ☐ हबीब रेथपुरी (कोल्हापूर)
- ☐ अझीझ बारी (पुणे)
- ☐ समीर मणियार (श्रीगोंदा)
- ☐ महंमद दलवाई (मुंबई)
- ☐ आय. एन. बेग (निपाणी)
- ☐ महंमद गौस नाईक (निपाणी)
- ☐ बशीर तांबोळी (सांगली)
- ☐ रशीद शेख (पुणे)
- ☐ आशा अपराद (कोल्हापूर)
- ☐ प्रा. बाबासाहेब काझी (कोल्हापूर)
- ☐ चांद अब्दुल शेख (पुणे)
- ☐ मुसा मुलाणी (मुंबई)
- ☐ अकबर पठाण (श्रीगोंदा)
- ☐ गाझियोद्दीन सलाती (इचलकरंजी)



- ☐ शरिफा पेंढारी (कोल्हापूर)
- ☐ जी. आय. मुल्ला–वळसंगकर (सातारा)
- ☐ आयेशा शेख (कोल्हापूर)
- ☐ मजीद नगारजी (कोल्हापूर)
- ☐ सय्यद जावीद (पुणे)
- ☐ दिलावर शेख (पुणे)
- ☐ डॉ. बेनझीर तांबोळी (पुणे)
- ☐ प्रा. जमीर शेख (भोर)
- ☐ अझरुद्दीन पटेल (कराड)
- ☐ बशीर शेख (पुणे)
- ☐ तमन्ना इनामदार (पुणे)
- ☐ नियाज अत्तार (कोल्हापूर)
- ☐ प्रा. सायरा मुलाणी (फलटण)
- ☐ रुबिना पटेल (नागपूर)
- ☐ मुफिद सलीम शेख (पुणे)
- ☐ जावेद शाह (शिर्डी)
- ☐ नवाब अल्ताफ हुसेन (फलटण)
- ☐ प्रा. उम्मीद शेख (रावेत, पुणे)
- ☐ समीर शेख (पुणे)
- ☐ समीना पठाण (नाशिक)
- ☐ गुलाब अत्तार (कोल्हापूर)
- ☐ बेनझीर काझी (सोलापूर)
- ☐ शाहीद शेख (पुणे)
- ☐ श्रीरूपा बागवान (पुणे)

## ७. २ मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीतील निमंत्रित मान्यवर

महंमद युसुफ शेख (पुणे)
अमिर शेख (पुणे)
डॉ. आर. बी. मणेर (सातारा)
प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर (सोलापूर)
प्रा. ए. डी. अत्तार (सातारा)
इलाही मोमीन (पाटण)
प्रा. के. जी. पठाण (सांगली)
प्रा. अकबर खान (पुणे)
मरियम रफाई (मुंबई)
इस्माईल दलवाई (चिपळूण)
प्रा. शब्बीर शेख (सातारा)
गनी फरास (कोल्हापूर)
एम. बी. सोलापूरे (कोल्हापूर)
राजेसाहेब मुलाणी (अंधेरी)
हुसेन गुलाब मुल्ला (अंधेरी)
अब्दुल रेहमान शेख (अंधेरी)
इब्राहिम भाटकर (चिपळूण)
जे. आय. शेख (मुंबई)
इब्राहिम सिद्दीकी (पुणे)
अन्वर शेख (पुणे)
एजाजुद्दिन शेख (पुणे)
अब्दुल सत्तार शेख (पुणे)
बशीर मोहीयुद्दीन शेख (पुणे)
सिकंदर भालदार (सोलापूर)
अमीन मोदी (फलटण)
बापू मुलाणी (कोल्हापूर)
सोमजल मेहबूब दावलसाब (मुंबई)
आयशा जमादार (कोल्हापूर)
सय्यद एस. एच. (कोल्हापूर)
गुलाब मुल्ला इमाम (सातारा)
समदभाई शेख (घोरपडी, पुणे)
के. एच. रहिमतपुरे (कोल्हापूर)
बी. वाय. मुलाणी (कोल्हापूर)
फिरोझ पठाण (कोल्हापूर)
अभय अझहर (पुणे)
ॲड. नजमा शेख (पुणे)
हशमुद्दीन सय्यद (कोल्हापूर)
आजम सय्यद (कोल्हापूर)
शाहिदा नाईक (निपाणी)
ॲड. तबस्सुम इनामदार (पुणे)
अप्सरा आगा (पुणे)
डॉ. जमीर इलाही मोमीन (सातारा)
दिलावर बादशाह जमादार (कोल्हापूर)
अब्दुल सलीम शेख (नांदेड)
सलीम पठाण (सातारा)
इस्माईल मुजावर (पुणे)
अमीन शेख (पुणे)
रमजान शेख (कोल्हापूर)
आसिफशेख (कोल्हापूर)
वहिदा पटेल (कराड)
करीम मणियार (पुणे)
सलीम शेख (फलटण)
डॉ. अन्वर शेख (पुणे)
आयेशा पापामियां मुलाणी (फलटण)

## ७.३ आरंभापासूनचे अध्यक्ष

**१) ए. जे. शेख**

पुण्यातील मुस्लीमबहुल भाग असणाऱ्या मोमिनपुऱ्यात राहणारे ए. जे. शेख हे राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झालेले आणि प्रागतिक व उदारमतवादी विचारांचे होते. ते पुण्यातील बँक ऑफ इंडियामध्ये नोकरीस होते. हमीद दलवाईंच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांच्याशी जोडले गेले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची हंगामी समिती स्थापन केली, तेव्हा ए. जे. शेख यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

**२) स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले**



नगर जिल्ह्यातील श्रीगोंदे येथील स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होणार असल्याचे वर्तमानपत्रात वाचून 'साधना' येथील पहिल्या बैठकीस हजेरी लावली. या पहिल्याच बैठकीत हमीद दलवाई यांनी त्यांना मंडळाचे अध्यक्ष होण्याची विनंती केली, ती त्यांनी स्वीकारली आणि १९९५पर्यंत ते मंडळाचे अध्यक्ष राहिले.

**३) मेहेरून्निसा दलवाई**



हमीद दलवाई यांच्या पत्नी. सुरुवातीच्या काळात नोकरी आणि कुटुंब अशा मर्यादित परिघात राहणाऱ्या मेहेरून्निसाभाभींनी हमीद दलवाई यांच्या मृत्यूनंतर मंडळाच्या कार्यात अधिक सक्रिय झाल्या. बाबुमियाँ बँडवाले यांच्यानंतर त्यांनी मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेतृत्व केले. त्यांनी 'मी भरुन पावले आहे' हे हमीद दलवाईंसोबतच्या सहजीवनातील आठवणींना उजाळा देणारे आत्मचरित्र लिहिले आहे.

**४) सय्यदभाई**



मंडळाच्या आरंभकाळातच दलवाईंशी जोडल्या गेलेले मेहबूब गौस शाह कादरी उर्फ सय्यदभाई यांना त्यांच्या बहिणीच्या तलाकमुळे मुस्लीम महिला प्रश्नांची जाणीव झाली. मंडळाचे सचिव, सरचिटणीस आणि संघटक म्हणूनही त्यांनी कार्य केले. तसेच अध्यक्ष म्हणून नेतृत्व केले. 'दगडावरची पेरणी' हे कार्यकथनात्मक पुस्तक प्रसिद्ध झाले. भारत सरकारने त्यांना २०२०मध्ये 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले.

**५) मोहम्मद गौस नाईक**



मंडळाच्या सुरुवातीच्या काळापासूनचे निपाणी येथील कार्यकर्ते. कोल्हापूर परिसरात त्यांनी मंडळाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. इस्लामच्या उदारमतवादी विचारांचे ते अभ्यासक होते. त्यांनी 'सच्चर का सच' हे न्या. राजेंद्र सच्चर यांच्या अहवालावर आधारित पुस्तक लिहिलेले आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली.

**६) हुसेन जमादार**



मंडळाच्या आरंभकाळातील कोल्हापूर येथील कार्यकर्ते, वि. स. खांडेकर शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून नोकरी केली. तलाक मुक्ती मोर्चाचे नेतृत्व केले, मंडळाचे सरचिटणीस, उपाध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यांचे 'जिहाद' हे आत्मकथन प्रसिद्ध आहे. ते 'पुरोगामी मुस्लीम' मासिकाचे संपादक होते, तसेच त्यांनी 'मुस्लीम समाजप्रबोधन संस्था' स्थापन केली. त्यांनी मंडळाचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली.

**७) डॉ. शमसुद्दिन तांबोळी**



डॉ. शमसुद्दिन तांबोळी हे परभणी जिल्ह्यातून पुण्यात शिक्षणासाठी आलेले, विद्यार्थीदशेपासून मंडळाच्या संपर्कात आले. शहाबानो प्रकरणापासून मंडळाच्या कार्यात सक्रिय झाले. मंडळाचे सचिव, सरचिटणीस, कार्याध्यक्ष म्हणून काम पाहिले. बकरी ईद निमित्त रक्तदान, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी 'तिमिरभेद' मंच सुरू केला. 'हमीद दलवाई – क्रांतिकारी विचारवंत' या पुस्तकाचे संपादन. मंडळाचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत.

## ७. ४ विद्यमान कार्यकारिणी

- अध्यक्ष : डॉ. शमसुद्दिन तांबोळी (पुणे)
- उपाध्यक्ष : प्रा. सायरा मुलाणी (कोल्हापूर)
- कार्यवाह : नबाब अल्तापहुसेन (सातारा)
- खजिनदार : दिलावर शेख (पुणे)
- सदस्य : समीना पठाण (नाशिक)
- सदस्य : गुलाब अत्तार (कोल्हापूर)
- सदस्य : बेनझीर काझी (सोलापूर)

## ७.५ विद्यमान मंच प्रमुख

- मुस्लीम सत्यशोधक पत्रिका : डॉ. शमसुद्दिन तांबोळी
- सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच : श्रीरूपा बागवान
- हमीद दलवाई स्टडी सर्कल आणि शैक्षणिक उपक्रम मंच : डॉ. बेनझीर तांबोळी, प्रा. जमीर शेख
- तिमिरभेद (अंधश्रद्धा निर्मूलन) : शाहेद शेख




# ८. परिशिष्टे

### ८.१ तक्रार निवारणाकरिता अर्ज

मुस्लीम सत्यशोधक मंडळ संचालित
मुस्लीम महिला मदत केंद्र

प्रति,
मा. केंद्रप्रमुख,
मुस्लीम महिला मदत केंद्र

१) अर्जदाराचे नाव : ..........................................................................
२) पत्ता आणि फोन नंबर : ....................................................................
३) शिक्षण : ....................................................................................
४) व्यवसाय : ..................................................................................
५) मासिक उत्पन्न : ...........................................................................
६) विवाहाचा दिनांक : ........................................................................
७) विवाहाचे स्थळ : ..........................................................................
८) कुटुंबातील अन्य सदस्यांची माहिती –

| नाव | वय | शिक्षण | व्यवसाय | नाते |
|---|---|---|---|---|

९) पती/पत्नीचे नाव : .........................................................................
१०) पत्ता आणि फोन नंबर : ..................................................................
११) शिक्षण : ..................................................................................
१२) व्यवसाय : ................................................................................
१३) मासिक उत्पन्न : .........................................................................

१४) कुटुंबातील अन्य सदस्यांची नावे :

| नाव | वय | शिक्षण | व्यवसाय | नाते |
|---|---|---|---|---|

१५) मंडळासंबंधी / मदत केंद्राविषयी कोणाकडून माहिती मिळाली?

..........................................................................................

१६) समस्येचे संक्षिप्त स्वरूप :

..........................................................................................

..........................................................................................

१७) यासाठी अन्य संघटना पोलीस / वकील यांच्याकडून काही मदत घेतली होती का?

– हो / नाही

..........................................................................................

१८) असल्यास कोणाकडून व काय मदत झाली?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१९) मंडळामार्फत देण्यात येणारे प्रशिक्षण–व्यवसाय कौशल्य हवे आहे काय?

– हो / नाही

..........................................................................................

२०) मंडळाकडून आपल्या अपेक्षा काय आहेत?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२१) तोंडी, एकतर्फी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला या पद्धती मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात असाव्यात का?

हो / नाही

..........................................................................................

..........................................................................................

२२) सोबत जोडण्यात आलेली अन्य कागदपत्रे –

अ) ......................................................................................

ब) ......................................................................................

क) ......................................................................................

अर्ज भरून घेणाऱ्याचे नाव :

.....................................................................................

सही :

मी, वर दिलेली सर्व माहिती सत्य असून त्याला अनुसरून मला योग्य मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, ही विनंती.

दिनांक :
अर्जदाराची सही :
पालकाची सही :

(अधिक तपशील द्यावयाचा असल्यास वेगळी पाने जोडावीत.)

## ८.२ पंतप्रधान राजीव गांधी यांना दिलेले निवेदन

२१-२२ फेब्रुवारी १९८६ रोजी तलाकपीडित महिलांसह मंडळाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना दिलेले निवेदन

Memorandum to
Shri Rajeev Gandhi
Prime Minister of India.

From :
Muslim Satyashodhak Mandal
12, Pune-Bombay Road
Pune - 411003.

Hon`ble Sir,

We, the undersigned, representatives of Muslim Satyashodhak Mandal, a forward-looking reformist organisation of Muslims wedded to the policy of total modernisation of the Muslim Community, have the honour to present our compliments and make the following submissions for your priority consideration.

You may kindly recall that a delegation of our Mandal, led by our General Secretary, Shri Sayed Bhai and which included Ms. Shah Bano, the litigant in the Supreme Court judgment of April 1985 and Ms. Pramila Dandavate, of the Mahila Dakshata Samiti called on you in New Delhi on 13 th Aug. 1985 and presented a memorandum welcoming the Supreme Court judgment allowing the right of the Muslim divorcee to maintenance allowance under Sec. 125 of Cr. P. C. urging the Government to enact a uniform civil code in accordance with the provision of Article 44 of the Constitution and not to give in to the pressures of the All India Muslim Personal Law Board and others of its thinking to do anything that would nullify the effects of the aforesaid judgment. Your Honour were kind enough to assure us that you would not do anything in this regard under pressures from any quarters. Your Honour were kind enough to tell us that you would, during your visit to Maharashtra, be pleased to talk to Muslim

divorcees.

Developments during the last few months on this issue have caused us and all those who value the principles of democracy, secularism, social justice and equality and creation of a modern egalitarian society, grave anxiety. Pressures from the fundamentalist and obscurantist quarters among the Muslims and Muslim leaders from all the political parties including those from your own, were built up to reverse the Supreme Court judgment, amend Sec. 125 of Cr. P. C. and Article 44 of the Constitution to exempt the Muslim community from their perview. Surprisingly, Your Honour made an announcement at the Momin Conference held in Delhi to the effect that your Govt. would consider making suitable amendments in Sec. 125 to assuage the feelings of the communalist and obscurantist lobby. An impression that the Union Govt. was considering issuing an ordinance to meet the pressures of this lobby emerged from the press reports of your meeting with some leaders on 17 Dec. 1985. We are also concerned over the fact that delegations representing only the obscurantist views were allowed to meet Your Honour.

We followed up your assurance referred to in para 2 above and requested for appointment, to meet Muslim divorcees in Pune during your visit to Raigad in September, 1985. This visit did not materialise and we were assured, vide letter No. 14(1)/85-PMF-1 dt. 4 Sept. , 1985 of your Officer on Special Duty that our request would be considered when Your Honour`s visit to Maharashtra was finalised. We, therefore, wrote to you vide our letter No. MSM/ MD/85 dated 15 December, 1985 and sent a telegram dated 15 December 1985 requesting for Your Honour`s appointment during your visit to Bombay in connection with the Congress Centenary celebrations. We regret to find that we were not only not given any appointment but our telegram and letter did not bring forth any acknowledgments.

Meanwhile, religious feelings were and still continue to be roused what with Shri A. Ansari launching a tirade against the Supreme Court judges, its judgment and defending whatever he means by Shariat from the august forum of the Lok Sabha, Mrs. Najma Heptullah asking for application and implementation of the full Shariah (presumably as contained in the classical texts) in this country, Mr. Syed Shahabuddin making this as an election

issue in Karimganj and other organisations rousing communal feelings, holding demonstrations as in Bombay and making inflammatory speeches totally in bad taste and defamatory of the Supreme Court and the laws of this land. These forces have a field day. They even disrupted the Talaq Mukti Morcha organised by us to advocate and propogate the needs for reforms in Maharashtra in November, 1985 and even succeeded in banning its entry into the Aurangabad town. The family planning programmes organised by our Vidarbha region Organiser, Mr. Shaikh Vazir Patel are being disrupted and they have pressured the district authorities to ban the programme in some places in Maharashtra a nationally accepted programme, a programme which has been praised even by your Honour and is being assisted by the Government of Maharashtra. We may add for Your Honour's information that Shaikh Vazir Patel has succeeded in motivating over 6000 Muslim Men and women to undergo tubectomy operations. His is the first organised attempt in the history of Islam to propogate family planning through modern means among the Muslim community.

These developments should cause grave concern to all as they threaten the very foundation of our nationhood and it is because of this that we have come here to put forth our views in a number though limited because of our resources.

We submit that issue of reforms cannot be discussed, settled and decided in consultation with religious and obscurantist leaders. We hardly remind you, Hon'ble Sir, that the provisions of the various Hindu Code Bills were not enacted in consultations with the Shankaracharyas and even the opposition to them from the occupant of the highest office of this country was totally disregarded. How can then the codification of the Muslim laws be done in consultation with those whose opposition to reforms is known or those who demand application of the classical Shariat to the Muslims of this country knowing fully that in this country the writ runs in the name of the President of India and not in the name of any Khalifa or Imam ? Changes or codification can be done by those who go by the rule of dynamics, those who are social scientists, jurists not necessarily Muslims and reformists. Changes must be in accordance with the modern values of social justice and equality and they must conform to the provisions of our Constitution

especially those contained in its preamble and fundamental rights. There cannot be any amendment or change of social laws that we think of which would take the society back into the sixth or seventh centuries.

We submit that Shariat as a legal system was not at all in existence either during the lifetime of the prophet or even during the first hundred years of Islam. We quote two noted authorities on Islam jurisprudence in this contention, viz. Joseph Schacht's "An introduction to Islamic Law" Oxford 1955 and N. J. Coulson's "A History of Islamic Law", Edinburgh 1971. Of the total 6236 verses of the Quran, only about 80 deal with legal topics as such and they too" have the appearance of adhoc solutions for particular problems". It was never followed in totality even under the Caliphs. And it underwent changes at the hands of successive Caliphe deviations from what was contained in the Quran. For instance, the Quran prescribes flogging as a punishment for unlawful intercourse but it was changed to stoning to death. Similarly, according to Quran (V. 38), a thief's hands are to be cut off. This punishment was replaced by flogging. Oral divorce was introduced by the 2nd Caliph. Shariah evolved through complex historical circumstances over centuries and it contained pre- Islamic customory laws, tribal laws and Sassanian Persian elements. It underwent vast changes in West Asia during the present century. Polygamy is a criminal offence in Turkey and Tunisia. It is also restricted in most of the West Asian countries. We, therefore, maintain that there is nothing immutable, rigid or sacrosanct about the Shariat.

Quran (4, 3-4) recommends 4 wives in certain circumstances and it does not enjoin. The said verse read with the verse 4129 leads one to conclude that the Quran enjoins to have only one living wife. Early Islamic jurists like Jamaluddin Afghani held this view. Similarly, the Prophet has said that the most despicable things in the eye of God is divorce and there are restrictions in the relevant verses of the Quran (V. 2:228-289) on the males' right to divorce. The right to divorce to women has been given in the Shariat Act of 1937 too. Jurists have considered oral diverce as forbidden also. (It was introduced by the 2nd Caliph under special circumstances). Therefore, we maintain that a legal ban on poligamy and instant divorce can and be imposed without violating what is contained either in the Quran or

the classical Shariat texts.

The Supreme Court, in its judgment of April 85 has relied on verses 2. 240-41 of the Quran and stated that what is contained in the said verses is inconsistent with the provisions of Sec. 125 of Cr. P. C. No verse or Hadith could be quoted by the legal adviser of the Muslim personal Law Board in the Supreme Court which could negate this interpretation. Therefore, the feelings roused on this are entirely against the principles of justice and social equality. We urge Your Honour to please think over the feasibility of the demand made by persons like Syed Shahabuddin and Najama Heptullah that after the iddat period, the divorcee be looked after by her father, relations, the society and the State in that order. We are living in a secular democratic state and not in a tribal society where such a practice was in force. Even on economic considerations of an average Muslim family in this country, such an orthodox/outdated suggestion will not find acceptance. In this context we also state that a mere increase in the amount of Meher will not solve the problem. In most cases a written undertaking is taken from the wife on the first day of the wedding that she has "foregone" her right to the Meher amount. Again, how is one to decide the amount of Meher which will take care of a divorcee's maintenance till her death or remarriage and further can an average Muslim afford the amount that would be decided upon? If not, what happens to the divorcee if that amount of meher is not paid? The Supreme Court in the afore- said judgment has stated that meher is not the amount payable on divorce but it is an amount payable out of respect in consideration of marriage. How can then Meher be declared as payable on divorce? We, therefore, state that justice demands that Sec. 125 of Cr. P. C. should provide protection to Muslim divorcees and its provisions should be made more explicit to apply to the Muslim women too. And these laws can be administered by the Courts of Law and not by any private courts as are reportedly set up by the All-India Muslim Personal Law Board et al. Can we allow parallel judicial system to emerge to administer & adjudicate private laws which challenges the authority of the Courts of Law and the laws of the land as laid down under the Constitution? We urge Your Honour to take this seriously and abolish any private courts set up in the name of administering Shariat.

We state that Article 44 of the Constitution was adopted in the teeth of opposition to it from Muslim members. A demand that its provisions would not apply to the Muslim community was firmly turned down. We state that the provisions of this Article regarding enactment of a uniform civil code was proposed to be included in the fundamental rights. Dr. Babasaheb Ambedkar, Mr. Minoo Masani, Ms. Hansa Mehta and Rajkumari Amrit Kaur were of this opinion. However, it was included in the Directive principles by a majority of merely one vote. We are a secular country and the main objective, according to us, of secularism is to eliminate the domineering influence of religion and its traditions from the social field of our public life, and reduce religion to regulate a man's relationship with his God. We further invite your kind attention to the proviso contained in clause 2(b) of 25 of the Constitution which says that nothing in that article' shall affect the operation of any existing laws or prevent the state from making any laws providing for social welfare and reform. A uniform civil code, we state, will not be based on or derive its inspiration from scriptures or traditions of any religions whatsoever. It might absorb and assimilate what is good from all but its guiding principles will be social justice, equality and creation of a modern democratic, egalitarian society. We state that such a code will help total Muslim participation in the social life of the country and participation will make absorption and national integration possible. We therefore, demand that your Honour give priority consideration to the enactment of a uniform civil code. If this is not done, communal tensions will be an endemic feature of Hindu-Muslim relations. National integration will remain a pious hope to be expressed from public platforms which is what it has remained so far. The reactions to the Shah Bano judgment should leave no one in this sc''.

The state that the issues of social reforms cannot be decided by majority and minority considerations. We also state that such issues cannot be decided by considering what is contained in the religious scriptures. We have quoted hereinabove verses from the Quran, we know. But we have given our liberal interpretations of the verses. We essentially believe that the demands for reforms or the demand for a uniform civil code are modern demands and their utility and need should be considered mainly outside the

framework of Shariat or Hadith. These demands should be considered in the context of changed values and the changed circumstances, by the laws of dynamics. We also do not think that we need consider what changes have taken place in other Muslim countries in the personal laws or Shariat because 4/5 of Shariat is not in force in our country e. g. criminal law, law of contracts, law of evidence etc. Social laws are always a step or two ahead of the times and opposition to such laws is bound to be there especially within the Muslim community which has hardly experienced any organised movement or attempts for reforms, Islam has not gone through any renaissance in its history. We, therefore, appeal to your honour to consider what is best for the Muslim women, for the society and for this country and decree, without waiting to verify whether such decrees have religious sanctions or sanction of a majority of Muslims. We fully trust you will not throw the Muslim women to the wolves and take bold steps on this front. The issues more crucial than the issues in Assam or Punjab. We will be grateful if Your Honourable Sit is pleased to give favourable consideration to our submissions. We are voicing feelings of thousands upon thousands of Muslim women and Muslim divorcees and Muslims who stand for the total modernisation of their community to make this country Sujalam and Sufalam. We make these submissions in utmost earnest- ness and hope they will find a favourable echo. Vie look forward to your favourable response in action.

Thanking you.

Yours truly,
Muslim Satya Shodhak Mandal

Babumiya Bandwale, President
Sayed Bhai, Gen. Secretary
Shaikh Vazir Patel, Organiser, Vidharbh
Mehrunnisa Dalwai, Hussein Jamadar, Executive Members

## ८.३ पाचवी राष्ट्रीय मुस्लीम सामाजिक परिषद

वृतान्त
ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स
१२, पुणे-मुंबई रस्ता, पुणे ४११००३
५ वी राष्ट्रीय, मुस्लीम सामाजिक परिषद
३०, ३१ मे १९९२ पुणे (महाराष्ट्र).

भारतातील विविध राज्यांतून आलेल्या पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, सुधारणावादी, विचारवंत आणि कार्यकर्त्यांची ५वी राष्ट्रीय मुस्लीम सामाजिक परिषद दिनांक ३०-३१ मे १९९२ रोजी पुण्यातील 'भारत इंग्लिश स्कूल', शिवाजीनगर पुणे-५ या ठिकाणी भरवण्यात आली. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनाच्या जागेला 'शहाबानोनगर' असे नाव देण्यात आले. या परिषदेमध्ये गुजरात, बिहार, दिल्ली, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांतून तसेच महाराष्ट्रातून सुमारे ६०० प्रतिनिधी उपस्थित होते. या उपस्थितीमध्ये सुमारे ६० टक्के महिला होत्या, ही एक उल्लेखनीय बाब आहे.

दि. ३० मे रोजी दुपारी ३-०० वा. परिषदेचा उद्घाटन समारंभ सुरू झाला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस हुसेन जमादार यांनी सर्व प्रतिनिधींचे आणि प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे सरचिटणीस सय्यदभाईंनी प्रास्ताविक भाषणामध्ये यापूर्वीच्या चार राष्ट्रीय परिषदांचा आढावा घेतला आणि आजच्या परिस्थितीत मुस्लिमांच्या सामाजिक परिषदेची आवश्यकता स्पष्ट केली. तामिळनाडू राज्यातील मदुराईच्या सामाजिक कार्यकर्त्या व पुरोगामी विचारवंत प्रा. आय्. नाझनीन यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी दिल्लीचे डॉ. के. एस. दुराणी होते.

**मुस्लीम महिलांमध्ये हक्कांविषयी जागृतीची आवश्यकता :**

प्रा. आय्. नाझनीन उद्घाटनाच्या प्रसंगी म्हणाल्या की, मुस्लीम समाजातील महिला आपल्या हक्कांच्या बाबतीत जागृत झाल्याखेरीज त्यांच्या स्थितीत सुधारणा होणार नाही. केवळ अशिक्षितच नव्हे, तर शिकल्या-सवरलेल्या मुस्लीम महिलांमध्येदेखील स्वतःच्या हक्कांविषयी पुरेशी जाणीव दिसून येत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या अन्यायाला तोंड देण्याची वेळ त्यांच्यावर येते. या बाबतीत मुस्लीम समाजाचा दोष नसला, तरी काही मंडळी कुराणातील मजकुराचा विपर्यस्त अर्थ लावून महिलांना पुढे येण्यास ब स्वतःचा विकास करण्यास मज्जाव करतात. हे चित्र बदलायचे असेल, तर आपण 'कुराण' नीट समजावून घेतले पाहिजे. आपल्या पत्नीस असहाय्य परिस्थितीत सोडून दुसरा विवाह करणे हे पूर्णतः चुकीचे आहे. 'मी तुला तलाक देत आहे' एवढे सांगून एखादा पुरुष सहजरित्या त्या महिलेशी असलेले संबंध कसे काय तोडू शकतो? अरब देशातील संस्कृती आणि परंपरा भारतापेक्षा वेगळी आहे, तेथील हिंदू-मुस्लीम एकमेकांविरुद्ध नाहीत. प्रसंगी

एकमेकांसाठी जीव पणाला लावण्यासही ते तयार असतात. भारतात मात्र आज असे चित्र दिसत नाही. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांच्यात अधिक सामंजस्य निर्माण होण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. के. एस्. दुराणी म्हणाले, "ऐक्य टिकवण्यासाठी विविध जातिधर्मांना एकत्र आणण्याची जबाबदारी जेवढी अल्पसंख्याकांवर आहे त्यापेक्षा जास्त बहुसंख्याकांवर आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे केवळ आपल्या धर्माचा प्रचार करणे असा चुकीचा अर्थ लावण्यात येत आहे. त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनून खरी धर्मनिरपेक्षता निर्माण होऊ शकली नाही." मुस्लीम समाजात काही मूलगामी सुधारणा होण्याची आवश्यकताही त्यांनी स्पष्ट केली. या वेळी मुमताज बेगम (कर्नाटक), अब्दुलभाई वफाणी (गुजरात), शाहीद कमाल (बिहार) यांचीही भाषणे झाली. प्रा. एस्. एम्. तांबोळी यांनी आभार मानले. अन्वर राजन यांनी सत्र संचालन केले.

**पुरुषांच्या सोयीने मुस्लीम कायद्यांचा वापर :**

परिषदेचे दुसरे सत्र 'मुस्लीम महिलांच्या समस्या' या विषयावर झाले. श्रीमती मेहेरून्निसा दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रामध्ये स्त्रियांच्या शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या संघटितपणे उभे राहण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली. मुस्लीम स्त्रियांच्या कल्याणासाठी, पर्यायाने मुस्लीम समाजाच्या प्रगतीसाठी, परिवर्तनासाठी कार्य करण्यास गावोगावी संघटना उभारण्यात याव्यात, असे मनोगत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

चंदा बेगम (धारवाड) म्हणाल्या, "मुस्लीम समाजात पुरुषांच्या सोयीने मुस्लीम कायद्यांचा वापर केला जातो, याचे उदाहरण म्हणजे 'तलाक'च्या वेळी मुस्लीम कायद्याचा पुरुष आधार घेतो. परंतु अपराधाबद्दल शिक्षा देताना मात्र शरीयतमधील गुन्हेगारी कायद्याचा विसर पडतो."

रजिया पटेल म्हणाल्या, "मुस्लीम युवतीच्या आणि स्त्रियांच्या मनात प्रथम आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे आणि त्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे. मुस्लीम स्त्रियांनी चौकटीबाहेर पडून अन्यायाविरुद्ध आवाज उठविला पाहिजे, अन्यथा वर्षानुवर्षे ती घरात रडतच बसेल."

वक्फ बोर्डाकडून अडचणीत असलेल्या स्त्रियांना मदतीची अपेक्षा आहे, परंतु तसा आधार वक्फ बोर्डाकडून मिळत नाही. उलट पुरूषांना बोर्डाची मदत मिळते, अशी खंत मदुराईच्या ॲड. हाफीजा यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राबाहेरील प्रतिनिधींबरोबरच काही तलाकपीडित महिलांनी आपले अन्यायी अनुभवांचे हृदयस्पर्शी वर्णन केले.

या सत्रात मुमताज बेगम (मंगळूर), खुर्शीद चौधरी, सुरय्या दुराणी (दिल्ली), शांतीलाल मुथा (पुणे), विद्या बाळ, कुसुमताई पटवर्धन आणि इतर महिला कार्यकर्त्यांनी भाग घेतला. सत्र संचालन प्रा. ऐनुल आतार यांनी केले.

**प्रादेशिक भाषा, आधुनिक, व्यवसायाभिमूख शिक्षणाची आवश्यकता :**

दि. ३१ मे रोजी परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये 'मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक समस्या' या विषयावर चर्चा झाली. या सत्रात प्रा. विलायत शेख, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, प्रा. बाबासाहेब काझी आणि हेमलता राईरकर यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. म. अ. तांबोळी

होते. मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणावर चर्चा होऊन, शैक्षणिक विकासासाठी निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पारंपरिक अडथळ्यांसंबधी चर्चा झाली. मुस्लीम समाजाने उर्दू माध्यमाचा केवळ अस्मितेसाठी आग्रह न धरता आपल्या विकासासाठी प्रांतीय भाषेतून शिक्षण घ्यावे, असे आवाहन करण्यात आले.

जास्तीत जास्त तरुणांनी व्यवसायाभिमुख, तांत्रिक, वैज्ञानिक शिक्षणाकडे वळावे, कारण शिक्षणाच्या अभावामुळेच अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या असल्याचे स्पष्ट केले. व्यक्ती, समाज, कुटुंब, राष्ट्र यांच्या विकासासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. त्यासाठी मुस्लीम समाजाने पारंपरिक दृष्टीकोनाचा त्याग करून आधुनिक शिक्षण स्वीकारून काळाबरोबर चालण्याच्या गरजेवर भर देण्यात आला.

**राष्ट्रीय एकात्मतेसाठी अल्प व बहुसंख्यांकांची जबाबदारी :**

परिषदेच्या चौथ्या सत्राचा विषय 'राष्ट्रीय एकात्मता आणि आर्थिक, धार्मिक सामंजस्य' असा होते. या सत्रामध्ये प्रा. आय्. एन्. बेग, ताहेरभाई पूनावाला, शाहीद कमाल (बिहार) यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय एकात्मता आणि धार्मिक सामंजस्य निर्माण करण्यासाठी अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजेत. अनेक सामाजिक प्रश्नांना राजकीय स्वरूप आल्याने प्रश्न सुटण्याऐवजी ते आणखी गंभीर होत आहेत. राजकीय पुढारी या प्रश्नांचे भांडवल करून सर्वसामान्य लोकांच्या भावना भडकावून समाजाचे आणि देशाचे नुकसान करीत आहेत.

ताहेर पूनावाला यांनी स्त्री-पुरुष समानता आणि समान नागरी कायद्याची आवश्यकता सांगून ही मागणी पुढे येण्याची सध्या गरज असल्याचे स्पष्ट केले. या सत्रात हिंदू आणि मुस्लीम समाजातील धर्मांध लोकांवर टीका करण्यात आली. पंजाब, काश्मीर, रामजन्मभूमी-बाबरी मस्जिद यांसारख्या राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा झाली.

**न्याय व नीतीच्या आधारावर समाजरचना हवी :**

परिषदेच्या समारोप प्रसंगी ज्येष्ठ समाजवादी विचारवंत मा. विनायकराव कुलकर्णी आपल्या प्रमुख भाषणात म्हणाले की, राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रथम न्याय व नीतीच्या आधारावर समाजात एकता निर्माण झाली पाहिजे. आर्थिक विवंचना, संपत्ती किंवा रोजगार मिळाला पाहिजे म्हणजे संस्कृतीविषयीचे प्रश्न आपोआप मार्गी लागतात, असा भ्रम कोणी बाळगू नये. भाकरीचा प्रश्न महत्त्वाचा आहेच, परंतु केवळ त्याचे उत्तर शोधून काम संपत नाही. ज्या देशात स्त्रिया मानवताबादी दृष्टीकोनातून वागवल्या जात नाहीत, तेथे समता अस्तित्वात नसते. मग तिला भाषण, लेखन वगैरे स्वातंत्र्य मिळूनही उपयोग होत नाही. स्त्रीला सतत कोणीतरी मालक म्हणून सांभाळले पाहिजे, ही वृत्ती वाईट आहे.

समारोपप्रसंगी सय्यदभाई म्हणाले, "महिलांमध्ये हक्कांची जाणीव निर्माण व्हावी यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ सततचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे 'महिलांना भडकविणारी संघटना' अशी टीका विरोधक आमच्यावर करतात. परंतु महिलांवरील अन्यायाचा विचार करण्यास कोणी पुढे

येत नाही. परंतु आम्ही निराशावादी नसल्याने परिवर्तन घडून येण्यास विलंब लागला, तरी तोपर्यंत आमचे कार्य चालूच राहील. सरकारने दिलेल्या सवलतींचा मुस्लीम समाजास काडीचाही फायदा झाला नाही. जे अन्यायकारक, चुकीचे आहे ते स्पष्टपणे बोलल्याशिवाय आपल्याला प्रगती करता येणार नाही.” मते मिळवण्यासाठी राजकारणी मंडळी धर्माचा वापर ‘शॉर्टकट’ म्हणून करत असल्याबद्दल त्यांनी टीका केली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे पूर्वीपासूनचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले सर्व सत्रांत उपस्थित होते.

पाचव्या राष्ट्रीय मुस्लीम परिषदेमध्ये वक्त्यांनी तलाकपीडित महिलांच्या समस्यांचा आपल्या भाषणातून आवर्जून उल्लेख केला. तलाकपीडित मुस्लीम महिलांचे प्रश्न समजावून घेण्यासाठी आणि ते सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याच्या उद्देशाने परिषदेमध्ये १९९२ हे वर्ष ‘तलाकपीडित मुस्लीम महिला वर्ष’ म्हणून पाळण्याचा व ठिकठिकाणी या विषयावर कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

परिषदेमध्ये झालेल्या विविध विषयांवरील चर्चेतून काही ठराव करण्यात आले. या ठरावांचे वाचन श्रीमती मुमताज बेगम (कर्नाटक) यांनी केले. अन्वर राजन आणि हुसेन जमादार यांनी परिषदेची ठरावाच्या संदर्भात असलेली भूमिका स्पष्ट करून ठराबास अनुमोदन दिले. सर्व उपस्थित प्रतिनिधींनी ठरावाचे स्वागत करून मान्यता दिली. शेवटी राष्ट्रगीताने पाचव्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेची सांगता झाली.

**परिषदेत मांडण्यात आलेले ठराव खालीलप्रमाणे –**

– हेरगिरीचा खोटा आरोप ठेवून दूतावासातील एक अधिकारी  मित्तल यांना अकारण मारझोड करून भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. या कृत्यांचा ही कॉन्फरन्स तीव्र धिक्कार करत आहे. त्याचप्रमाणे पंजाब, काश्मीर, आसाममध्ये पाकिस्तान सतत घुसलोरी करत आहे, याचाही सर्व भारतीयांच्या वतीने ही परिषद निषेध करीत आहे.

– ही परिषद देशातील सर्व मुस्लीम आयाबहिणींतर्फे मागण्या करत आहे की, मुस्लीम वूमेन प्रोटेक्शन बिल ८६ रद्द करून त्याऐवजी भा. द. वि. १२५ कलमाप्रमाणे तलाकपीडित महिलांना पोटगी सुरू करण्यात यावी.

– एकतर्फी मनमानी ‘तलाक’ ताबडतोब बंद करण्यात यावा.

– तलाकचा निर्णय कोर्ट किंवा समाजापुढे व्हावा.

– प्रत्येक मस्जिदमध्ये समाजाच्या लग्नाच्या नोंदीप्रमाणे तलाकचेही रजिस्टर ठेवण्यात यावे.

– भारत आपली मातृभूमी आहे, जेथे धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. जीवनात सर्व भारतीय समान आहेत. यासाठी प्रादेशिक, जातीय, धार्मिक सांप्रदायिकता इ. वादांचा अंत करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

– मुस्लीम समाजाच्या मुलामुलींना शालेय शिक्षण प्रादेशिक भाषेतच देण्याची गरज आहे. त्याचबरोबर तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण देण्याकडेही अधिक लक्ष देऊन वैयक्तिक आणि सामाजिक उन्नती करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

वरील ठरावांची देशभर चर्चा होऊन, त्याचा प्रसार व्हावा आणि अंमलबजावणी करण्यासाठी काही उपक्रम घ्यावेत, या हेतूने आणि १९९३ हे वर्ष परिषदेने 'तलाकपीडित वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले. त्याचप्रमाणे देशात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांची प्रांतीय शिबिरे घेण्याचे ठरले. ते याप्रमाणे : २६ जुलै १९९२ – भडोच (गुजरात), ३० ऑगस्ट १९९२ – मुझफ्फरपूर (बिहार), नोव्हेंबर १९९२चा पहिला आठवडा – दिल्ली, २६–२७ डिसेंबर १९९२ – मदुराई (तामिळनाडू).

परिषदेच्या समारोपानंतर कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सचे अध्यक्ष  अब्दुल लतिफ आझमी (दिल्ली) यांनी त्यांचे वय व आजारपणाच्या कारणामुळे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. बैठकीत राजीनामा मान्य केला व मदुराईच्या (तामिळनाडू) कार्यकर्त्या प्रा. आय्. नाझनीन यांनी विनंती स्वीकारून परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली.

**परिषदेची पार्श्वभूमी**

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची चळवळ मुस्लीम समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी व ह्या समाजात आधुनिकतेच्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठी दिवंगत मरहूम हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली २२ मार्च १९७० रोजी सुरू झाली. मुस्लीम समाजातील स्त्रियांच्याबर जबानी तलाकच्या पद्धतीमुळे होणाऱ्या अन्यायाविरुद्ध व एकंदरीत सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर त्यांच्याकरता काम करणारी भारतातील ही पहिलीच चळवळ आहे. जबानी तलाकखेरीजही मुस्लीम पुरुषांना चार बायका करण्याचा अधिकार जो मान्य केला आहे. यामुळेही मुस्लीम स्त्रियांवर अन्याय होत आहे. या अन्याय्य रूढीविरुद्ध आवाज उठवण्यात ही संघटना प्रथम आहे. या अनिष्ट रूढींबाबत समाजात जागृती करण्याकरता मंडळातर्फे वारंवार परिषदा, सभा, संमेलने, परिसंवाद, चर्चा इ. प्रकारचे कार्यक्रम आयोजिले जातात. गेल्या २२ वर्षांतील या प्रकारच्या कार्यामुळे आता संपूर्ण भारतभर या प्रश्नांसंबधी एक जाग उत्पन्न झाली आहे. महाराष्ट्रात तर आता मुस्लीम महिला मदत केंद्रे अनेक ठिकाणी सुरू असून, अशा अनिष्ट रूढींना बळी पडलेल्या अभागी स्त्रियांना मदत करण्याचे कार्य ही केंद्रे करत आहेत. सामान्यतः जबानी तलाकची शिकार झालेल्या निराधार महिलांना मदत करण्याचे काम हे अग्रक्रमाने या केंद्रांवर केले जाते. यासाठी आम्हाला समतेवर आधारित समान नागरी कायदा हवा आहे. त्यामुळे या महिलांना सुरक्षितता प्राप्त होईल. यासाठी राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान यांच्याकडे निवेदनेही दिली आहेत.

प्रादेशिक भाषांमधून मुस्लीम मुलांनी शिक्षण घ्यावे, यासाठीही मंडळ प्रयत्नशील असते. मुलांना त्यासाठी शैक्षणिक साधनांची मदत समाजातील सधन व्यक्तींच्या क्रियाशील सहकार्याने करण्याचा प्रयत्न मंडळाकडून केला जातो. शिक्षणाच्या प्रसाराद्वारे मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा, धार्मिक असहिष्णुता इ. दोष दूर होतील, असा मंडळाला विश्वास वाटतो.

आमची चळवळ सुधारणावादी असल्याने कर्मठ मुस्लीम समाजाकडून आम्हाला सातत्याने विरोधच झाला आहे. परंतु आमच्या अभागी भगिनींचा मात्र आमच्या मागण्यांस भरघोस पाठिंबा मिळाला आहे. त्याचप्रमाणे गेल्या २२ वर्षांतील कार्याने समाजातील विचारी वर्गालाही आपल्या समाजातील महिलांच्या दुःस्थितीची जाणीव उत्पन्न झाली असून, त्यांच्यासाठी काही तरी करण्याची

आवश्यकता पटली आहे.

१९८५मध्ये शहाबानो प्रकरण बरेच पेटले होते. त्या वेळी मंडळाने शहाबानोंचा पक्ष उचलून धरला. या निमित्ताने समाजातील सर्व सुधारणावादी व धर्मनिरपेक्षतावादी शक्ती एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाला वैयक्तिक व संघटनात्मक पातळीवर चांगला प्रतिसाद लाभला व एका अखिल भारतीय प्रागतिक मुस्लीम परिषदेच्या व्यासपीठाची कायम स्वरूपाची निर्मिती झाली. या अखिल भारतीय प्रागतिक मुस्लीम परिषदेमध्ये देशातील सर्व सुधारणावादी धर्मनिरपेक्षतावादी व्यक्ती व संघटना सहभागी झाल्या आहेत.

१९८७ साली महाराष्ट्रात कोल्हापूर येथे या परिषदेचे पहिले अधिवेशन झाले व त्यात मुस्लीम समाजाच्या सामाजिक प्रश्नांचा विचार झाला. दुसरे अधिवेशन १९८८ साली गुजरातमध्ये अहमदाबाद येथे झाले. त्यात प्रामुख्याने मुस्लीम महिलांच्या समस्यांचा विचार करण्यात आला. तिसरे १९८९ साली कर्नाटकात बंगलोर येथे व चौथे १९९० साली तामीळनाडूत मदुराई येथे घेण्यात आले. मुस्लीम समाजाच्या व विशेषतः महिलांच्या प्रश्नाखेरीज या अधिवेशनांतून राष्ट्रीय स्तरावरच्या राष्ट्रीय एकात्मता, काश्मीर प्रश्न, रामजन्मभूमी–बाबरी मस्जिद या प्रकारच्या प्रश्नांवरही विचारविनिमय झाला आहे.

या प्रागतिक मुस्लीम परिषदेच्या माध्यमातून भारतातील अन्यधर्मीय बांधवांबरोबर संवाद साधण्याचाही प्रयत्न केला जात आहे.

**प्रागतिक मुस्लीम परिषदेची आवश्यकता :**

सध्याच्या कठीण परिस्थितीतून देश जात असताना व अलगतावादी व फुटीर प्रवृत्तींनी पंजाब, आसाम, तामीळनाडू, नागाप्रदेश इ. ठिकाणी जोर धरलेला असताना अशा प्रकारच्या प्रयत्नांची आवश्यकता वेगळी सांगण्याचे कारण नाही. सर्व धर्मीयांमध्ये एकप्रकारचा मूलतत्त्ववाद जोर धरत असून भारतासारख्या बहुधर्मीय समाजामध्ये त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता साधणे कठीण होऊ लागले आहे. धर्मनिरपेक्षतावादी शक्ती क्षीण झाल्याचे दृश्य दिसत आहे. सर्वच राजकीय पक्ष आपला संकुचित राजकीय स्वार्थ साधण्याकरता समाजातील या अपप्रवृत्तींना खतपाणी घालताना दिसत आहेत.

भारतामध्ये मुस्लीम समाज हा प्रमुख व लक्षात घेण्याजोगा अल्पसंख्य समाज आहे. काश्मीर, रामजन्मभूमी, मुस्लीम स्त्रियांचे सामाजिक व न्याय्य प्रश्न, राष्ट्रीय एकात्मता, भिन्नधर्मीय समाजातील बंधुभाव इ. प्रश्नांबाबत आपण जागरूक राहणे आवश्यक आहे. या प्रागतिक मुस्लीम परिषदेद्वारा आपल्या समाजाला या सर्व प्रश्नांची जाण करून देणे व त्या बाबत योग्य प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी आवश्यक ते शिक्षण देणे, ही कार्ये घडत आहेत. आम्हाला राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, जागतिक धर्मनिरपेक्षतावादी समाजजीवन यासाठी कार्य करणाऱ्या शक्ती बळकट करावयाच्या आहेत.

**आमची उद्दिष्टे :**

१) राष्ट्रीय एकात्मता व भिन्न धर्मीय समाजात बंधुभाव प्रस्थापित करणे.

२) प्रागतिक व धर्मनिरपेक्षतावादी विचारांचा समाजात प्रसार करणे व मुस्लीम समाजाची

धर्ममार्तंडांच्या तावडीतून सुटका करणे.

३) मुस्लीम समाजाला कुटुंबनियोजनाबाबत जागृत करणे.

४) मुस्लीम महिलांना सामाजिक न्याय कायद्याच्या आधारे मिळवून देण्याची मागणी करणे.

५) जबानी तलाकची प्रथा बंद व्हावी. बहुपत्नीत्वावरही बंदी यावी आणि तलाकपीडित महिलांना पूर्वीप्रमाणे (क्रि. प्रो. को. १२५) पोटगीचा हक्क मिळावा, अशी मागणी करणे; त्याचप्रमाणे मूल दत्तक घेण्याचा अधिकारही प्राप्त व्हावा, अशी मागणी करणे.

६) प्रामुख्याने प्रादेशिक भाषांतून मुस्लिमांना शिक्षण देणे.

७) मुस्लीम समाज हा भारतीय समाज परंपरेचा एक अविभाज्य घटक आहे म्हणून त्याच्या बद्दलचा संशय दूर करण्याचा प्रयत्न करणे.

**कार्यकारिणी**

अध्यक्ष : प्रा. आय्. नाझनीन,

सरचिटणीस : सय्यदभाई,

खजिनदार : प्रा. शमसुद्दिन तांबोळी

सदस्य

श्रीमती रहिमा शेख (गुजरात), डॉ. यासीन दलाल (गुजरात), ॲड. महंमद मुस्तफा (केरळ), सी. एन्. मामूसाब (केरळ), श्रीमती मेहेरून्निसा दलवाई (महाराष्ट्र), हुसेन जमादार (महाराष्ट्र), रहमान खान (कर्नाटक), कु. सीमा काझी (दिल्ली), कलीम मोकाशी (गुजरात), अब्दुल भाई (तामीळनाडू), महंमद रऊफ (उत्तर प्रदेश), रिझवान अ. खान (उत्तर प्रदेश), शहीद कमाल (बिहार), कु. रजिया मुजावर (गोवा), कु. रोमिना शेख (गोवा), नूर महंमद कुरेशी (मध्यप्रदेश), एस्. के. अशरफ अली (पश्चिम बंगाल), इफ्तकार अहमद (पंजाब), अन्वर राजन (खास निमंत्रित)

## ८.४ भिन्न धर्मीय बुद्धिवाद्यांच्या बैठकीचा अहवाल

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'मंदिर मस्जिद सूलाह समिती'च्या वतीने दि. १८ एप्रिल १९९३ रोजी आयोजित केलेल्या भिन्न धर्मीय बुद्धिवाद्यांच्या बैठकीचा अहवाल-

A meeting of progressive Social workers and intellectuals belonging to both the Hindu and Muslim Communities was held at Pune on the 18th of April, 1993. This meeting convened at the initiative taken by the Muslim Satyashodhak Mandal formally endorsed the formation of a Committee to be known hereafter as the Mandir-Masjid Sulah Committee. The Committee aims to restore peace and harmony which has been ruptured in the wake of the demolition of the Babri Masjid in December 1992, and the tragic riots and bomb blasts which rocked the country subsequently.

The Committee proposes to hold at an early date a Conference at the national level to seek support for the following three proposals :

1) Muslims should earn the goodwill of the Hindu Community by gracefully surrendering their claim to the land on which the Babri Masjid stood until its demolition on the 6th of December, 1992.

2) The leaders and followers of 'Hindutva ideology should in future avoid organising any agitation in favour of the claim of the prior existence of a Mandir at the present site of a Masjid.

3) Both the parties to the Mandir-Masjid dispute and all others should solemnly abide by the recent legislation which unequivocally upholds the status quo of all places of religious worship as on 15th of August, 1947.

The acceptance of these proposals by both the main parties to the Mandir-Masjid dispute will hopefully pave the way for putting an end to the bitterness in relationship between the Hindu and Muslim Communities which has been threatening the process of national integration in our country more particularly during the last few months.

The task of mobilising public opinion in favour of these proposals will be taken up after the proposed Conference at the national level.

We give below the names of those who have already agreed to extend full support for bringing about a peaceful settlement. The Committee will

be glad to work in consultation with these personalities. It is confident that more names will be added to this list after the Conference at the national level.

1. Barrister V. M. Tarkunde, Delhi
2. Advocate C. R. Dalvi, Bombay
3. Professor Devadatta Dabholkar, Ex-Vice-Chancellor, University of Pune
4. Shri. Nilu Phule, Eminent Film Actor
5. Dr. Narendra Dabholkar, Acting President, Superstition Eradication Committee.
6. R. P. Nene, Org. Secy. , People's Union for Civil Liberties
7. Tahir Poonawalla, Ex-President, PUCL, Maharashtra
8. Prof. Kulsum Parekh, ex-Principal Ismail Usuf College, Bombay
9. Prof. Mrs. I Naznin, Madurai
10. Advocate Mohamed Mustafa, Calicut
11. Abdul Latif Azmi, New Delhi

The following office bearers were elected at the Pune meeting, for consolidating the activities of the Committee.

1. Sayyedbhai, President.
2. Dr. Shriram Lagoo, Vice-President.
3. Hussein Jamadar, Secretary.

## ८.५ नवा 'निकाहनामा'

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे,
ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स
१२, पुणे – मुंबई मार्ग, पुणे–४११ ००३

नवा निकाहनामा
इस्लामिक कायद्याच्या कक्षेत

१. वराचे संपूर्ण नाव : ..........................................................................
२. पत्ता : ..........................................................................................
३. वय : ..........................................................................................
४. व्यवसाय / चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित.
५. वर्तमान वैवाहिक दर्जा: विवाहित / अविवाहित / घटस्फोटित / विधुर
६. विवाहित असल्यास प्रथम पत्नीची संमती घेतली आहे काय? होय/ नाही
७. वधूचे नाव : ....................................................................................
८. पत्ता : ..........................................................................................
९. वय : ..........................................................................................
१०. व्यवसाय चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित
११. वर्तमान वैवाहिक दर्जा : पूर्व विवाहित / अविवाहित / विधवा / घटस्फोटिता
१२. वधू पक्ष वकील–इ–निकाहचा नाव, पत्ता, तपशील :
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
१३. पत्ता : ..........................................................................................
..........................................................................................
१४. (व्यवसाय) चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित
१५. वधूशी असलेले नातेसंबंध : ...........................................................
..........................................................................................
..........................................................................................
१६. वरपक्षाचा वकील–इ–निकाह संदर्भातील तपशील:
..........................................................................................
..........................................................................................

१७. पत्ता : ..........................................................................................

१८. व्यवसाय चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित

१९. वराशी असलले नातेसंबध :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२०. साक्षीदाराचे नाव (क्र. १) :

..........................................................................................

..........................................................................................

२१. पत्ता :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२२. चरितार्थाचे साधन :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२३. साक्षीदाराचे नाव (क्र. २) :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२४. पत्ता: ..........................................................................................

२५. व्यवसाय / चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित

२६. काझीचे नाव :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२७. पत्ता / कार्यालय :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२८. पत्ता / घर :

..........................................................................................

..........................................................................................

२९. व्यवसाय / चरितार्थाचे साधन : नोकरी / धंदा / स्वयंरोजगार / बेकार / सुस्थापित

३०. विवाहस्थळ : ..........................................................................

३१. विवाहाची वेळ व तारीख : .............................................................

३२. निकाहनामानुसार नोंद केली की आज ता. .............., दिवस ................ रोजी अनुक्रमे नावे (.......................................................) यांचा आजपासून नवरा-बायको (पती-पत्नी) असा उल्लेख होईल. दोन्ही पक्षास परस्पर संमती व सामंजस्याने तो मान्य व मंजूर असून दोघांवर कबुली पद्धतीने तो साक्षीदारांसमक्ष वैध व अधिकृत आहे.

३३. मेहेरची रक्कम: .......................................................................

अ) रोख / अप्रत्यक्ष (वस्तू, दागिने इ.) : ................................................

..............................................................................................

..............................................................................................

ब) विवाहप्रसंगी द्यावयाची (कबूल केलली) रक्कम (वराच्या वार्षिक उत्पन्नापेक्षा जास्त किंवा कमीत कमी दहा ग्रॅम सोन्याची रक्कम यांना अनुरुप असावी.)

विशेष शर्ती / अटी :

१. तोंडी तीन वेळा 'तलाक' शब्द उच्चारून नवरा बायकोस तलाक देऊ शकणार नाही. नवरा-बायकोमधील भांडणतंटा हा जमात किंवा त्रयस्थ लवादासमोर दोन्ही पक्षांच्या समोर साक्षीने सोडवला जाईल व ते दोन्ही पक्षांवर बंधनकारक असेल.

२. घटस्फोट अपरिहार्य / अटळ असेल, तर नवरा मेहेरची रक्कम अदा करेल. पत्नीचा द्वितीय विवाह होईपर्यंत किंवा तिने विवाह न केल्यास कायमस्वरूपी उदरनिर्वाह व वरखर्चाची हमी घेईल.

३. घटस्फोटानंतर बायको / पत्नीस विवाहप्रसंगी अथवा विवाहनंतर कोणताही रोख वस्तू, दागिने वा कपडे स्वरूपात मिळालेल्या भेटी परत करायचे बंधन नवऱ्यावर असेल. त्या सर्वं वस्तुंवर तिचाच हक्क प्रथमपासून असेल.

४. नवऱ्याला दुसरा किंवा पुनर्विवाह करायचा असेल तर –

(अ) प्रथम पत्नी, जमात व लवादाकडून पूर्व संमती घेणे बंधनकारक राहील.

(ब) तिला तिच्या हक्काच्या राहत्या जागेत जगण्यास अडथळा आणू नये, हरकत घेऊ नये.

(क) पत्नी व मुलांची जबाबदारी स्वीकारावी व पालनपोषण पूर्वीप्रमाणेच करावे.

५. अपत्ये कोणाच्याही ताब्यात असली, तरी त्यांची संपूर्ण जबाबदारी नवरा / पिता यांच्याकडे असेल, बायकोने स्पष्ट शब्दात जबाबदारी अथवा ताबा नाकारला, तरच मुले नवऱ्याकडे जातील.

६. विवाहप्रसंगी वधूला तिचे पालक नातेवाईक, वरपक्ष व अन्य संबंधितांकडून मिळालेली रोख रक्कम, भेटवस्तू दागिने याच्या सविस्तर तपशीलाची नोंद सोबत दिली आहे. दोन्ही पक्षांनी काळजीपूर्वक व तपशीलवार ही कलमे व अटी वाचून, समजावून घेतल्या आहेत आणि राजीखुषीने, कोणताही दबाव वा दडपणाला बळी न पडता संमतीने मंजुरी दिली आहे.

वराची सही : ..............................................................................

वधूची सही : ..............................................................................

काझीची सही :............................................................................

साक्षीदार नं. १

नाव : ........................................................................................

पत्ता : .......................................................................................

...................................................................................................

सही : ........................................................................................

साक्षीदार नं. २

नाव : ........................................................................................

...................................................................................................

...................................................................................................

पत्ता : .......................................................................................

...................................................................................................

...................................................................................................

सही : ........................................................................................

## ८.६ जाहीरनामा – नवी दिशा

### मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा सुधारित जाहीरनामा

हमीद दलवाई यांनी देशभर फिरून मुस्लीम समाजाचा अभ्यास केला, लेखन व संवादातून समाजाचे प्रबोधन केले आणि २२ मार्च १९७० रोजी आम्हा सहकाऱ्यांसह 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची पुणे येथे स्थापना केली.

आता मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होऊन चार दशकांचा काळ लोटला आहे. या काळात भारतातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत दखल घेण्यासारखे खूप बदल झाले आहेत. या बदलांची नोंद घेऊन चळवळीच्या मूळ उद्दिष्टांमध्ये गुणात्मक बदल न करता काही विषयांच्या अग्रक्रमात बदल करून नवी दिशा ठरवणे आवश्यक झाले आहे, म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ पुढीलप्रमाणे भूमिका घेत आहे–

१) उदारमतवादी 'कुराण'भाष्याचा आधार : इस्लाममध्ये 'कुराणा'चा अर्थ सामान्य माणूससुद्धा लावू शकतो. तरीही मुस्लीम समाजात असा पुरोहितवर्ग निर्माण झालाच. इस्लामी धर्मशास्त्राचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच असून तो अर्थ सर्वांनी मान्य केला पाहिजे, अशी टोकाची भूमिका घेऊन उलेमांनी मुस्लीम समाजावर आपले प्रभुत्व व नेतृत्व लादले आहे. या पारंपरिक उलेमांच्या प्रभावातून मुस्लीम समाजाला मुक्त करणे, ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची प्राथमिकता राहील. त्यासाठी 'कुराणा'च्या प्रागतिक व उदारमतवादी भाष्यकारांचा आधार घेऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळ यापुढे आपली वाटचाल करील.

२) मुस्लीम समाजासमोरील जमातवादाचे आव्हान : गेल्या काही वर्षांत हिंदू जमातवादाचे प्रचंड आव्हान मुस्लीम समाजासमोर उभे राहिले आहे. क्रिया-प्रतिक्रियात्मक स्वरूपात अस्तित्वात असणारा 'हिंदू जमातवाद' आता उघडपणे आक्रमक आणि हिंसक झाला आहे. त्यामुळे मुस्लीम समाजातही जमातवादी वृत्ती वाढत आहे; पण एका समाजातील जमातवादाला दुसऱ्या समाजातील जमातवाद हे उत्तर होऊ शकत नाही. त्याचबरोबर जातीयवादी दंगली कुणामुळेही, तसेच कुठल्याही कारणास्तव सुरू झाल्या, तरी अंतिमतः त्यात अल्पसंख्य समाजाची जीवित व वित्तहानी अधिक होते. त्यामुळेच सामान्य मुस्लीम असुरक्षित, हतबल व अगतिक झाला आहे. अशा परिस्थितीत मुस्लीम समाजातील जातीयवादी प्रवृत्ती व संघटना यांच्याविरुद्ध भूमिका घेत असतानाच मुस्लीम सत्यशोधक मंडळ 'हिंदू जमातवादा'च्या विरोधातही निःसंदिग्ध भूमिका घेईल. भारतीय समाज बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक समूह घटकांनी तयार झाला आहे. अशा वैविध्यपूर्ण समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास सहिष्णुतेच्या आधारावर परस्पर सामंजस्य व भावनिक एकता निर्माण करणे आवश्यक असते. त्याचे भान ठेवून मुस्लीम सत्यशोधक मंडळ या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहील. त्याचबरोबर हिंदू वा इतर समाजात अशा तऱ्हेच्या प्रागतिक व्यक्ती, संघटना वा चळवळी असतील, त्या सर्वांशी मुस्लीम सत्यशोधक मंडळ सर्वतोपरी सहकार्य करील. मात्र मुस्लीम किंवा हिंदू समाजातील कुठल्याही प्रतिगामी, जातीयवादी प्रवृत्ती, संघटना वा व्यक्ती यांपासून

मुस्लीम सत्यशोधक मंडळ, त्याचे सदस्य आणि कार्यकर्ते कटाक्षाने दर राहतील.

३) सेक्युलॅरिझम व निरीश्वरवाद याबद्दल भूमिका : विविधतेतून एकात्म समाज निर्माण करण्यासाठी व सामाजिक न्याय, समता या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी भारत 'सेक्युलर' राष्ट्र झाले; पण सर्वच सेक्युलर राजकीय पक्षांनी त्यांच्या सोयीप्रमाणे मतांचे गणित मांडून सेक्युलॅरिझमचा अर्थ लावला. सेक्युलॅरिझमचा हा अर्थ मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही, कारण तो अर्थ भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत स्वीकारल्या गेलेल्या मानवी मूल्यांच्या विरोधात जातो. म्हणूनच धर्म, जाती, लिंग, वर्ण, भाषा इ. कसलेही भेद न मानता सामाजिक न्याय आणि समता या मानवी मूल्यांवर आधारित एकात्म समाज निर्माण करण्यास साहाय्यभूत होणारी विचारप्रणाली म्हणजे सेक्युलॅरिझम, हा अर्थ मुस्लीम सत्यशोधक मंडळाला अभिप्रेत आहे.

अशा तऱ्हेचा एकात्म समाज निर्माण करण्यात मुख्य अडसर असतो, तो धर्मसत्तेचा! मग ती धर्मसत्ता कुठल्याही प्रकारची असो, म्हणून समाजकारण, राजकारण आणि धर्मसत्ता यांची फारकत केल्याशिवाय सामाजिक न्याय व समता यांवर आधारित एकात्म समाज निर्माण करता येणार नाही, अशी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची धारणा आहे. त्याचबरोबर सेक्युलॅरिझम म्हणजे निरिश्वरवाद हे समीकरणही मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही. व्यक्तीस्वातंत्र्याचा भाग म्हणून एखादी व्यक्ती निरीश्वरवादी असू शकते. त्याला कुणाचा विरोध असण्याचे काही कारण नाही. पण निरीश्वरवादाचे समर्थन, पुरस्कार किंवा विरोध करणे, ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका नव्हती व पुढेही असणार नाही.

४) भारतीय मुस्लीम समाजाच्या विकासाचे स्वप्न : स्वातंत्र्योत्तर काळात सर्वच राजकीय पक्षांनी मुस्लीमांचा केवळ 'मतपेटी' (व्होट बँक) म्हणून विचार व वापर केला. त्यामुळे समाजाचे रोजीरोटीचे व आर्थिक विकासाचे प्रश्न सतत दुर्लक्षित राहिले. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनेक आयोगांच्या व सर्वेक्षणांच्या अहवालातून हे विदारक सत्य बाहेर आले आहे. सुदैवाने केंद्र शासनाने अलीकडे या वास्तवाची दखल घेऊन मुस्लीम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी काही ठोस पावले उचलण्याचे जाहीर केले आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ अशा नव्या शासकीय धोरणांचा सतत पाठपुरावा करील. त्याचबरोबर अन्य मागासवर्गीयांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे शासकीय सवलती, सुविधा मिळतात, त्या मुस्लीम समाजातील दुर्बल घटकांनाही मिळाव्यात म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ आग्रही राहील.

मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासात उलेमांच्या सनातनी भूमिकेमुळे अडसर निर्माण झाला आहे. या समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ विविध पातळ्यांवर प्रयत्न करील.

५) मुस्लीम महिलांच्या समस्या : मुस्लीम महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय-अत्याचारांचे प्रश्न मुस्लीम सत्यशोधक मंडळाने नेहमीच ऐरणीवर आणून ते दूर करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न केले आहेत; परंतु उलेमांनी शरीयत 'दैवी' म्हणून अपरिवर्तनीय आहे, अशी भूमिका घेऊन या प्रयत्नांना सतत विरोध केला आहे. वास्तविक इस्लामी धर्मशास्त्र व इतिहास यांच्या दृष्टीने उलेमांची ही भूमिका चुकीची आहे. इस्लामच्या सुरुवातीच्या काळापासून तत्कालीन इस्लामी

धर्मशास्त्राच्या विद्वानांनी शरीयतकडे समाजशास्त्र म्हणून पाहिले व त्याचा सतत विकास केला, हा इतिहास आहे. १३व्या शतकानंतर उलेमांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली ही विकासाची प्रक्रिया बंद केली. आजही हीच भूमिका घेऊन हे मुस्लीम समाजाची दिशाभूल करत आहेत. या त्यांच्या चुकीच्या भूमिकेमुळे मुस्लीम स्त्रियांवर अन्याय होत आहे.

शरीयत दैवी असल्यामुळे अपरिवर्तनीय आहे, अशी उलेमांची भूमिका आहे. वास्तविक मुस्लिमांच्या विविध पंथांमध्येसुद्धा एकाच प्रकारचे शरीयत कायदे नाहीत, किंबहुना त्यात प्रचंड विविधता आहे, म्हणूनच जगातील अनेक मुस्लीम राष्ट्रांनी 'शरीयत कायद्या'त कालसुसंगत बदल करून एका दमात तीन तोंडी तलाक देण्यास प्रतिबंध करण्यासारखे कायदे केलेले आहेत. ब्रिटिशांनी लागू केलेल्या १९३७च्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातही शरीयतचा बहुसंख्य भाग रद्द करून तलाक, बहुपत्नीत्व, वारसाहक्क, मूल दत्तक विधान एवढ्यापुरताच भाग ठेवला आहे. हा कायदासुद्धा मुस्लीम महिलांवर अन्याय करणाराच आहे. त्यामुळे १९३७च्या मुख्य कायद्यातही कालसुसंगत व न्याय्य बदल झाले पाहिजेत, अशी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची ठाम व आग्रही मागणी आहे. म्हणून भारतीय संसदेने विद्यमान कायद्यात न्यायसंगत बदल करावेत. मुस्लीम महिलांना संविधानात्मक अधिकार मिळावेत, तसेच मुस्लीम समाजानेही अशा कायद्यांचे स्वागत करावे, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ प्रयत्नशील राहील.

६) देशासमोरील संवेदनशील समस्या : काश्मीर, दहशतवाद, बाबरी मशीद-रामजन्मभूमी, समान नागरी कायदा यांसारख्या विद्यमान व भावी काळात निर्माण होणाऱ्या संवेदनशील समस्यांबाबत मुस्लीम सत्यशोधक मंडळ नेहमी बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन आणि न्याय व देशहित यांच्याशी सुसंगत अशी भूमिका घेईल व त्याविषयी सतत आग्रही राहील. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचे वर्तमान व भावी कार्यक्रम निश्चित करताना भारतीय संविधान, त्यात अभिप्रेत असलेली सामाजिक न्याय, समता व बंधुत्व, ही मानवी मूल्य, समान नागरिकत्व, त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्य या बाबी आधारभूत धरूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळ आपल्या कार्यक्रमांची भावी दिशा निश्चित करेल.

## ८.७ मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषद

मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषद
शनिवार, तारीख २६ नोव्हेंबर २०१६ (भारतीय संविधान दिन)
सुबह १० बजेसे शाम ५ बजे तक

: बमुकाम :
खुला नाट्यगृह, राष्ट्र सेवा दल, साने गुरुजी स्मारक, पर्वती पायथा, पुणे ४११०३०.

: आयोजक :
मुस्लीम सत्यशोधक मंडळ
सी, ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण रोड, पुणे ८.
दूरध्वनी : ०२०-२५८९९१७३, ९८२२६७९३९१
Email : msatyashodhak@gmail.com
Website: www.muslimsatyashodhak.org

**मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषद**

भाईयों और बहनों,

समाजसुधारक हमीद दलवाई ने १८ एप्रिल १९६६ में मुस्लीम महिलाओं को संविधानिक इन्साफ दिलवाने के लिए, ऐतिहासिक कदम उठाकर आंदोलन छेडा और २२ मार्च १९७० में मुस्लीम सत्यशोधक मंडल की स्थापना की। मुस्लीम सत्यशोधक मंडल की तरफ से पिछले पचास सालों से आम मुस्लमानों के मसायल लेकर महाराष्ट्र के कोने कोने में सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक और जातीय समस्याओं पर सभासम्मेलन, मोर्चे और धरणा देना यह कार्यक्रम किये गये । शहाबानो की पोटगी रद्द करने के विरोध में दिल्ली तक दो बार मोर्चा गया। इसीके असरसे यह तहरीक मुल्कगीर बनी। देश के अलग अलग राज्यों में लिये गये सामाजिक परिषदों में स्थानिक मुसलमानों ने बढ़ चढ़कर हिस्सा लिया।

मुस्लीम समाजप्रबोधन का यह कार्य आंतरराष्ट्रीय स्तरपर मुस्लीम महिलाओं को कानूनी हिफाजत दिलाने के लिये Women under Muslim Law नामसे दुनियाभर चल रहा हैं। इसकी सदस्य सिर्फ मुस्लीम महिलाएँ हैं। भारतमें भी करिबन पचास मुस्लीम महिला संघटन इस विषय को लेकर संघर्ष कर रहे हैं। दुनिया के कई मुस्लीम देशों में मुस्लीम महिलाओं की स्थिती में सुधार लाने के लिये कानुनी बदलाव किये गये हैं।

१९३७ के शरीयत अ‍ॅक्ट पर आधारित आज के मुस्लीम पर्सनल लॉ में एकतर्फा तलाक, बहुपत्नीत्व, हलाला जैसे प्रावधान हैं। इस वजहसे मुस्लीम महिला भारतीय संविधानिक अधिकार प्राप्त करने में कमजोर पडती है और इन बेइन्साफी प्रावधानों का शिकार होती हैं। मुस्लीम सत्यशोधक

मंडल इस में सुधार लाना चाहता हैं।

इसी मकसद को सामने रखकर मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषद २६ नोव्हेंबर १६ को पूना में, राष्ट्र सेवा दल, साने गुरुजी स्मारक, सिंहगड रोड, पुणे ३० इस स्थान पर ले रहे हैं। जिसमे कई नामवर सामाजिक कार्यकर्ते और कानूनदाँ हिस्सा लेंगे। आपसे गुजारिश हैं की, आप भी इस कान्फरन्स में हिस्सा लेकर अपना फर्ज अदा करे ।

**हमारी मांगे**

१) मुस्लीम पर्सनल लॉ का कोडीफिकेशन करते हुए, एकतर्फा जुबानी या लिखित तलाक, बहुपत्नित्व और हलाला जैसी मुस्लीम पर्सनल लॉ में शामिल नाइन्साफी बातों को खारिज करके उनपर तुरंत पाबंदी लायी जाए और पोटगी जैसे कानूनी अधिकार मिलवाने के लिए ऐसे विवादों का निर्णय न्यायालयीन प्रक्रिया द्वारा ही सुलझाया जाए।

२) भारत के सभी लिंग, धर्म, जात, पंथ के लोगों को पारिवारिक विवाद सुलझाने के लिए समान अधिकार और उनके अन्याय निवारण के लिए न्यायालयीन प्रक्रिया द्वारा न्याय मिलवाने के लिए समतापूर्ण अधिकार हो। इसलिए धर्मनिरपेक्ष एकात्म भारतीय समाज के हित में संविधानात्मक मूल्यों पर आधारित युनिफॉर्म सिव्हिल कोड का प्रारूप (Model) बनाकर ही उसपर उचित बहस हो।

३) जिला स्तर पर फॅमिली कोर्ट स्थापन हो, या जहाँ फॅमिली कोर्ट हैं वहाँ विभागीय स्तर पर महिलाएँ अपने पारिवारिक सवालों पर न्याय की माँग कर सके ऐसा प्रावधान हो।

४) भारतीय मुसलमानों के हालात सुधारने के लिये न्या. राजेंद्र सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग, डॉ. मेहमूद-उर-रेहमान अभ्यासगट द्वारा की गयी शिफारशों पर फौरन अमल किया जायें।

**प्रमुख उपस्थिती**

मा. नूर जहीर (नई दिल्ली)
मा. सायरा बानो (गाजीयाबाद)
मा. अर्शद अली (काशीपूर)
मा. सोफीया खान (अहमदाबाद)
मा. रूबिना पटेल (नागपूर)
मा. मुमताज शेख (मुंबई)
डॉ. तसनीम पटेल (नांदेड)
मा. रेहाना बेलीम (यवतमाळ)
मा. रूबिना मिर्झा (चंद्रपूर)

**मुस्लीम सत्यशोधक मंडळ**

**कार्यकारिणी**

- **अध्यक्ष :** प्रा. शमसुद्दिन तांबोळी (पुणे)
- **उपाध्यक्ष :** प्रा. सायरा मुलाणी (कोल्हापूर)
- **सरचिटणीस :** प्रा. जमीर शेख (भोर)
- **चिटणीस :** बशीर शेख (पुणे), प्रा. अझरुद्दीन पटेल (कराड)
- **खजिनदार :** दिलावर शेख (पुणे)
- **संघटक :** नियाज अत्तार (कोल्हापूर)
- **कार्यकारिणी सदस्य**

  रशिद शेख (पुणे)

  मुफिद शेख (पुणे)

  रुबिना पटेल (नागपूर)

  जावेद शहा (शिर्डी)

  तमन्ना इनामदार (पुणे)

  डॉ. बेनझीर तांबोळी (पुणे)

**राष्ट्रीय और राज्यस्तरपर कार्यरत मुस्लीम महिला संघटना के कार्यकर्ता प्रतिनिधी –**

मुमताज इनामदार, परविन शेख, आसमा अत्तार, समीना शेख, आबेदा शेख, हिना कौसर खान, सहारा मुलाणी, आर्शिया बागवान, साजीया शेख, नर्गीसबानो शेख, आरजू तांबोळी, वहिदा पटेल, शेहनाज शेख, मिनाज लाटकर, फरहीन अली, रुक्साना शेख, जरीना तांबोळी, रुक्सार शेख, खुर्शिद इनामदार, अप्सरा अगा, आयेशा सय्यद.

**संयोजन :**

- ☐ मुस्लीम सत्यशोधक महिला मंच
- ☐ मुस्लीम सत्यशोधक युवा मंच
- ☐ हमीद दलवाई स्टडी सर्कल

## ८.८ मंडळाच्या शिष्टमंडळाकडून देण्यात आलेले निवेदन

(१८ डिसेंबर २०१७ रोजी भारताचे पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि विविध पक्षांचे संसद सदस्य यांना भेटून प्रस्तावित तलाकबंदी विधेयकाच्या संदर्भात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिष्टमंडळाकडून देण्यात आलेले निवेदन.)

Stand of Muslim Satyashodhak Mandal on the proposed bill - Muslim Women Protection of Rights on Marriage

Hon. Sir/Madam,

Muslim Satyashodhak Mandal is founded by visionary social reformer Hamid Dalwai. Muslim Satyashodhak Mandal has been striving for the welfare and constitutional rights of Muslim women. We have been constantly demanding reform in Muslim Personal Law and to eradicate one sided triple talaq, polygamy, inhuman practice of Halala and other discriminatory provisions of Muslim Personal Law which is based on Shariyat Act of 1937. Hamid Dalwai led a procession on 18th April, 1966 and submitted memorandum to the then Chief Minister of Maharashtra Hon. Vasantrao Naik. Muslim Satyashodhak Mandal has organized various programs for mass education as well as submitted memorandums to the State and Central government.

It is our great pleasure to state that the judicial system has always supported and given verdict in favour of women in the landmark cases. We also welcome and support the verdict of Supreme Court Bench given on 22nd August, 2017. Simultaneously we welcome the stand of Central government and the efforts to ban instant triple talaq i. e. Talaq-e Biddat.

However, considering the complexity of Muslim women's problems, the proposed bill-Muslim Women Protection of Rights on Marriage- may not be able to address all the crucial issues and extend full justice to Muslim women. We wish that Muslim women should get the constitutional protection of Article 14, Article 15 and Article 21, so we demand-

1) Just banning instant triple talaq i. e. Talaq-e Biddat is not enough. Other forms of talaq i. e. Talaq-e-Hasan, Talaq-e-Ahasan, Talaq-e-Khula, etc. (Talaq-e-Sunnat) are also one sided and male dominated

provisions which may bring injustice and discrimination to the victims. Banning instant triple talaq i. e. Talaq-e Biddat without banning polygamy may intensify the existing problems of Muslim women.

We strongly demand that to avoid injustice and discrimination, all such Talaq disputes should be settled by main judicial system of India.

2) Without the settlement of Talaq through judicial system, neither of the couple should be allowed to go for second marriage. Hence, while making the legal provision on talaq, there should be a ban on polygamy, prevention of Bigamous Marriage Act, 1946 should be applicable to the community.

3) All the disputes of Talaq should be resolved as fast as possible so that the victims may be able go ahead in their lives. This will encourage Muslim women to approach the judicial system for getting justice.

4) Apart from the custody of minor children, sufficient provision of maintenance of children and the victims should be included in the proposed bill.

5) There is an outdated and inhuman provision of Halala in Muslim Personal Law. it is observed that Halala is still practised by the community. The Muslim woman has to suffer a lot due to this humiliating and discriminatory provision of Muslim Personal Law. We strongly demand not only to ban this practice but also to make it a punishable offence.

6) Keeping in the view all these aspects, we demand that instead of banning only Talaq-e-Biddat i. e. instant triple talaq; the government should prepare a codified & comprehensive draft of Muslim Marriage and Divorce Act at the earliest. We also demand that the government should form a committee consisting of social activists, representatives of women's organisations and legal experts for preparing this draft.

We would like to mention that Muslim Satyashodhak Mandal has been continuously supporting Article 44 of the Directive Principles of our constitution. Considering our commitment to Secularism, Equality and Gender Justice, we appeal to prepare Indian Marriage Act for the entire multi religious & multicultural India. If we could draft and enforce Indian Marriage Act, it may give legal protection, equal rights and social justice to all the women of India as well as help to strengthen Communal Harmony

and National Integration.

Muslim Satyashodhak Mandal
Shamsuddin Tamboli, President
Sayyad Bhai, Ex-President
Jameer Shaikh, Secretary
Dilawar Shaikh, Treasurer
Niyaz Attar, Member
Sameer D. Shaikh, Member

## ८.९ हमीद दलवाई यांची ग्रंथसंपदा

१) लाट – हमीद दलवाई, मंजुळ प्रकाशन, पुणे, १९६१

२) इंधन – हमीद दलवाई, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६६

३) आग्नेय आशियातील संघर्ष – ब्रायन क्रोझियर, मराठी अनुवाद – हमीद दलवाई, जनपद प्रकाशन, मुंबई, १९६७

४) मुस्लीम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय (४ लेख – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, १९६८

५) Muslim Politics in India – Hamid Dalwai (Ed. and Trans. by Dilip Chitre), Nachiket Publications, Mumbai, 1968.

६) 'इस्लामचे भारतीय चित्र' – हमीद दलवाई (दै. 'मराठा'त १९६८मध्ये क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला), श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९८२, दुसरी आवृत्ती, साधना प्रकाशन, पुणे, २०१६

७) राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान (लेखसंग्रह) – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पहिली आवृत्ती, २००२, दुसरी आवृत्ती, २००५, तिसरी आवृत्ती, २०१२ (सुगावा प्रकाशन) पुणे

८) जमीला जावद आणि इतर कथा – हमीद दलवाई (१९५२–६६ काळात प्रसिद्ध झालेल्या कथा), साधना प्रकाशन, पुणे, २०१६

९) भारतातील मुस्लीम राजकारण ('मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया'चा अनुवाद) – हमीद दलवाई, अनुवादक – मिलिंद चंपानेरकर, साधना प्रकाशन, पुणे, २०१७.

१०) कानोसा : भारतातील मुस्लीम मनाचा – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, २०१७

## ८.१० हमीद दलवाई यांच्याविषयीची संदर्भसाधने

१) जिहाद – हुसेन जमादार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९३
२) दगडावरची पेरणी – सय्यदभाई, अक्षर मानव प्रकाशन, पुणे, २००९
३) हमीद (आठवणी मित्राच्या) – अनिल अवचट, नीलकंठ प्रकाशन, १९७७
४) हमीद दलवाई स्मृतिविशेषांक, साधना साप्ताहिक विशेषांक, १४ मे १९७७
५) हमीद दलवाई स्मृती अंक, मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, १९७७
६) मी भरून पावले आहे – मेहेरून्निसा दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, १९९५
७) हमीद दलवाई विशेषांक, मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, १९९८
८) हमीद दलवाई – क्रांतिकारी विचारवंत – संपादक प्रा. शमशुद्दीन तांबोळी, डायमंड पब्लिकेशन्स, पहिली आवृत्ती, २००९
९) पुनर्भेट हमीद दलवाईंची, साधना साप्ताहिक विशेषांक, १५ ऑगस्ट २०१५
१०) अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट : संकलन – मेहेरून्निसा दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, २०१७

## ८.११ संदर्भसूची


१. अवचट, अनिल, 'हमीद', नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९७७.

२. उगले, जी. ए., 'सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२२.

३. कुंभार, नागोराव, 'मुस्लीम साहित्य व समाज चिंतन', प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९७.

४. कुरुंदकर, नरहर, 'जागर', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. , सहावी आवृत्ती, पुणे, २००८.

५. गर्गे, स. मा. , 'भेटी-गाठी', मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००२.

६. चंद्र, बिपन, 'कम्युनलिझम इन मॉडर्न इंडिया', अनु. तरवडे विजय, चेतक बुक्स, पुणे, २०२१.

६. जमादार, हुसेन, 'जिहाद', मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९३.

७. डॉ. दाभोलकर, नरेंद्र, 'समता-संगर', साधना प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पुणे, २०१८.

८. डॉ. पठाण, अक्रम, हबीबखान, 'मुस्लीम मराठी साहित्य', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २०१४.

९. डॉ. फडके,य.दि., 'स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान', लोकमित्र सहकारी मुद्रण प्रकाशन संस्था मर्यादित, मुंबई, १९८६.

१०. डॉ. मोरे, सदानंद, 'महाराष्ट्राची लोकयात्रा', सकाळ प्रकाशन, पुणे, २०२२.

११. डॉ. राजूरकर न. गो., 'वेगळी माणसं, वेगळ्या वाटा', संगत प्रकाशन, नांदेड, २०१३.

१२. तांबोळी, शमसुदिद्न, 'आझाद कलाम', अक्षर मानव प्रकाशन, पुणे, २०११.

१३. तांबोळी, शमसुदिद्न, 'मुस्लीम समाज व्यक्ती-विचार-साहित्य', नवीन उद्योग, पुणे, २०१०.

१४. तांबोळी, शमसुदिद्न (संपा.), 'हमीद दलवाई - क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, दुसरी आवृत्ती, पुणे, २०१४.

१५. थत्ते, यदुनाथ, 'निवडक तवारीख', मंजुल प्रकाशन, पुणे, १९८१.

१६. थत्ते, यदुनाथ, 'मुसाफिरनामा', आन्तरभारती प्रकाशन, औरादशहाजानी, १९९३.

१७. थत्ते, यदुनाथ, 'मुस्लीम मनाचा कानोसा', साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०२१.

१८. थत्ते, यदुनाथ, 'मुस्लीम समाजातील वाहते वारे', साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०२१.

१९. दलवाई हमीद, 'जमीला जावद आणि इतर कथा', साधना प्रकाशन, चौथी आवृत्ती, पुणे, २०२२.

२०. दलवाई हमीद, 'भारतातील मुस्लीम राजकारण', अनु. चंपानेरकर मिलिंद, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०१९.

२१. दलवाई, मेहेरून्निसा , 'अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट', साधना प्रकाशन, पुणे, २०१७.

२२. दलवाई, मेहेरून्निसा, ‘मी भरून पावले आहे’, साधना प्रकाशन, सातवी आवृत्ती, पुणे, २०२०.
२३. दलवाई, हमीद, ‘इंधन’, मौज प्रकाशन, अकरावी आवृत्ती, मुंबई, २०२१.
२४. दलवाई, हमीद, ‘इस्लामचे भारतीय चित्र’, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२.
२५. दलवाई, हमीद, ‘मुस्लीम जातीयतेचे स्वरूप – कारणे व उपाय’, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, १९७८.
२७. दलवाई, हमीद, ‘राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान’, चौथी आवृत्ती, पुणे, २०२२.
२८. दलवाई, हमीद, ‘लाट’, मौज प्रकाशन गृह, तिसरी आवृत्ती, मुंबई, २००३.
२९. देशपांडे, पु. ल.,‘मैत्र’, मौज प्रकाशन, सातवी आवृत्ती, मुंबई, २००६.
३०. नाईक, एम. ए., ‘एका सत्यशोधकाची स्मरणगाथा’, मुस्लीम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, कोल्हापूर, २०१६.
३०. पगडी, सेतुमाधवराव, ‘भारतीय मुसलमान : शोध आणि बोध’, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००६.
३१. पवार शरद, 'लोक माझे सांगाती...', राजहंस प्रकाशन पुणे, सुधारित आवृत्ती,२०२३
३२. प्रा. तांबोळी, शमसुद्दिन, ‘मुस्लीम समाज प्रबोधन आणि विकास’, नवीन उद्योग प्रकाशन, पुणे, २०१०.
३३. प्रा. फ. म. शहाजिंदे आणि प्रा. तांबोळी, फारुख, ‘मुस्लीम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप’, मुस्लीम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळ आणि भूमी प्रकाशन, लातूर, २०१४.
३४. प्रा. फ. म. शहाजिंदे, ‘मुस्लीम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची’, भूमी प्रकाशन, लातूर, दुसरी आवृत्ती, २०१३.
३५. प्रा. बेन्नूर, फक्रूद्दीन, ‘भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१२.
३६. प्रा. बेन्नूर ,फक्रूद्दीन , ‘हिंदुत्व, मुस्लीम आणि वास्तव’, भूमी प्रकाशन, लातूर, २००७.
३७. प्रा. मुजीब, ‘भारतीय मुसलमान’, अनु. वसंत नगरकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९.
३८. फैजी, असफ, ए. ए., ‘इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टीकोन’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
३९. बेग, एम. आर. ए., ‘भारतातील मुसलमानांपुढील पेच’, अनु. खोडवे, अच्युत, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.
४०. माळी, संदीप, कडू, ‘हमीद दलवाई निवडक कथा : आकलन आणि आस्वाद’, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८.
४१. मुकादम, अब्दुल कादर, ‘इस्लाम – ज्ञात आणि अज्ञात’, अक्षर प्रकाशन, मुंबई, २०१९.
४२. मुकादम, अब्दुल कादर, ‘दास्तान भारतीय मुसलमानांची’, बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर,

मुंबई, २००५.
४३) मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जानेवारी १९७३, कोल्हापूर.
४४) हमीद दलवाई स्मृति विशेषांक, साधना प्रकाशन, १४ मे १९७७, पुणे.
४५) मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पुणे.
४६) मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२०, पुणे.
४७) मुस्लीम सत्यशोधक मंडळ, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ - उद्देश व भूमिका', इंडियन सेक्युलर सोसायटी, पुणे, १९७९.
४८) रानडे, प्रतिभा, 'बुरख्याआडच्या स्त्रिया', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७.
४९) रॉय. एम. एन, 'इस्लामचे ऐतिहासिक योगदान', अनु. प्रा. भिंगे सुभाष, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २०२२.
५०) लिमये, मधू, 'धर्मांधता राज्यसंस्थेवरील घोर संकट', अनु. दामले, वासंती, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मुंबई आणि साधना प्रकाशन, पुणे, २०२२.
५१) लेव्ही, रूबेन, 'इस्लामची सामाजिक रचना', अनु. केळकर, श्रीपाद, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथामावृत्ती, पुनर्मुद्रण, २०१९.
५२) वकील, अलीम, 'सुफी संप्रदायाचे अंतरंग', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००.
५३) वैद्य, द्वा. गो. आणि दीक्षित राजा, 'प्रार्थनासमाजाचा इतिहास', एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई, द्वितीयावृत्ती, मुंबई, २०१९.
५४) शरीफ, जफर, 'इस्लामची जीवनपद्धती', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.
५५) शिरसाठ, विनोद (संपा.), 'पुनर्भेट हमीद दलवाईंची', साधना प्रकाशन, पुणे, २०१५.
५६) सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी', अक्षर मानव प्रकाशन, पुणे, २००९.
५७) सरदार, बाळकृष्ण गंगाधर, 'महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल', नवनिर्माण प्रकाशन, पुणे, १९८६.

**English :**

1) Dalwai, Hamid, 'Muslim Politics in India', Trans. Chitre, Dilip, Penguin Random House India, Gurugram, 2023.
2) Fayzee, Asaf, A. A., 'A Modern Approach to Islam', Oxford University Press, Delhi, 1981.
3) Fyzee, Asaf A. A., 'The Reform of Muslim Personal Law in India', Nachiketa Publications Limited, Bombay, 1971.
4) Guha, Ramachandra, 'Makers of Modern India', Viking in Penguin Books India, New Delhi, 2010.
5) Sayyadbhai, 'Jihad-E-Teen Talaq', Trans. Patwardhan-Kulkarni

Anjali, Samakalin Prakashan, Mumbai, 2014.
6) Shah, A. B., 'What Ails Our Muslims?', Indian Secular Society, Pune, 1981.
7) Shahin, Sultan, 'Introducing New Age Islam', New Age Islam Foundation, 7th Vol. , New Delhi, 2013.
8) The Secularist, Bulletin of Indian Secular Society, July-September 1970, Pune.
9) The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1972, Pune.
10) The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1973, Pune.
11) The Secularist, Journal of Indian Secular Society, September-October 1973, Pune.
12) The Secularist, Journal of Indian Secular Society, November-December 1973, Pune.
13) The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1974, Pune.
14) The Secularist, Journal of Indian Secular Society, March-April 1974, Pune.
15) The Secularist, Journal of Indian Secular Society, May-June 1977, Pune.
16) The Secularist, A Journal of Secularism, Rationalism and Humanism, July-August 2002, Pune.




# वृत्तचित्र

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वाटचालीची विविध वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल.

**१२ एप्रिल १९८३, दै. महाराष्ट्र टाइम्स**



महाराष्ट्र टाइम्स

१२ एप्रिल १९८३

# मुस्लिम सत्यशोधक मंडळ : २८ कार्यकर्त्यांना अटक

पुणें, दि. ११ (प्रतिनिधी) — पहिल्या पत्नीला न नांदविता दुसऱ्या मुलीशी लग्न करणाऱ्या अब्दुल मणियार यांच्या दुसऱ्या लग्नाला विरोध करणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या २८ कार्यकर्त्यांना पोलिसांनी काल अटक केली.

अटक झालेल्यांमध्यें पहिली पत्नी श्रीमती मरीयमबी अब्दुल मणियार हिच्यासह तीन मुस्लिम महिलांचा समावेश आहे.

अब्दुल मणियार यांचें १२ वर्षांपूर्वी श्रीमती मरियमबी यांच्याशी लग्न झालें. अलिकडेंच त्याना माहेरी पाठवून दिलें व आज मणियार १६ वर्षांच्या सुरय्या नावाच्या तरुणीशीं लग्न करणार होते. मणियार ४० वर्षांचे असून श्रीमती मरियमबी ३० वर्षांच्या आहेत.

### पेशइमाम परत

हें लग्न होणें चुकीचें असल्यानें सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते व दहा-तोंड मुस्लिम जमातीचे सदस्य महाराशिंगार येथील लग्नाच्या ठिकाणी गेले. तेथें लग्न लावण्यास आलेले लकडीपूल मशिदीचे पेशइमाम यांना कार्यकर्त्यांनी एकूण माहिती देताच ते लग्न न लावता परत गेले.

**१५ एप्रिल १९८३, दै. लोकसत्ता**

# 'पहली बीबी को इन्साफ दो, दूसरी शादी बंद करो' निदर्शनें

## मुस्लिम सत्यशोधक निदर्शकांना अटक

पुणे, दि. १४ — [लो. वा.] पहिल्या बायकोला किरकोळ कारणानं माहेरी पाठवून सोळा वर्षांच्या तरुणीशी लग्न करणाऱ्या अब्दुल मणियार [वय ४५] यांच्या विरुद्ध हें लग्न होऊ नये यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनें केली. २८ निदर्शकांना पोलिसांनी स्थानबद्ध केलं आणि अखेर दुसरा विवाह विनाविघ्न पार पडला.

**पहली बीबीको इन्साफ दो दूसरी शादी बंद करो।**

वा घोषणांनी कार्यकर्ते दुसरं लग्न न होण्याचा प्रयत्न करीत होते. लग्न लावणाऱ्या काझीलाही अंधारात ठेवून हा मुस्लिम जमातीचा इसम लग्न लावत होता. कार्यकर्त्यांनी सर्व प्रकार सांगितल्यावर त्यानं लग्न लावण्याचं नाकारलं. पण निदर्शक, काझी गेल्यावर नवऱ्यानं दुसऱ्या काझीला हजर करून आला लग्न हट्ट पूर्ण केला.

अब्दुल मणियार यांचं १२ वर्षांपूर्वी ईद्र रोडच्या श्रीमती मरियमबी यांचेंशी लग्न झालं. पाच वर्षांपूर्वी अब्दुलांनी बायकोला किरकोळ भांडणावरून तिच्या सामानासह माहेरी पाठवलं. आणि काही दिवसांनी दुसरं घर घेऊन आपण स्वतंत्र राहू असं आश्वासनही दिलं. पण पुढे मात्र त्यानं बायकोला नांदवण्याचं नाकारलं. मध्यंतरीच्या काळात ईद्र रोड मुस्लिम जमातीच्या मंडळींनी अब्दुल मणियार यांना मरियमबीला सांभाळण्याची विनंती केली पण त्यांचा नकार कायमच होता.

पाच-सहा महिन्यापूर्वीच मणियार दुसरं लग्न करीत असल्याची तक्रार मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडे आल्यानं कार्यकर्त्यांनी यावेळी नव्याने प्रयत्न केले. पण ज्यावेळी कार्यकर्ते भेटले तेव्हा या दुसऱ्या लग्नाचा त्यांनी इन्कार केला. आणि मरियमबीला सांभाळतो असंही सांगितलं. मात्र प्रत्यक्षात चर्चेला येण्याचं मणियार टाळत होते.

मात्र महर्षीनगरात सुरय्या या १६ वर्षांच्या मुलीशी मणियार लग्न करीत असल्याचं समजताच कार्यकर्त्यांनी हे लग्न होऊ नये यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे मुस्लिम जमातीचे ट्रस्टी, मंडळाचे नेते सय्यद भाई, पहिली पत्नी मरीयमबी यांचेसह ५०-५५ कार्यकर्त्यांनी निदर्शनाचा पवित्रा घेतला. पहिल्या काझीला लग्न लावण्यापासून परावृत्त करण्यासाठी ते यशस्वी झाले. मात्र निदर्शकांना स्थानबद्ध करून नेल्यानंतर दुसरं लग्न निर्धास्तपणे पार पडलं.

निदर्शनाच्या कार्यात सय्यदभाई यांचेशिवाय अन्वर राजन, शेख अब्दुल्लाभाई, रसूल शेख, अन्सार खानू, रईस अय्यूब, कजार खान, इसाक अतार, आवेदा हनिफ आतार, महमूद निसार, इत्यादी कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

**७ जून १९८३, दै. महाराष्ट्र हेराल्ड**

# MAHARASHTRA HERALD

TUESDAY, JUNE 7, 1983

## Fight for reforms

THE two-day convention of reformist Muslims, organised by Muslim Satyashodhak Mandal in the city over the weekend, reminded one of the Dawoodi Bohra reformists' convention held in this city in February last because of the opposition it evoked from status quoists. If the status quoists could not disturb the two conventions in any way, that was, firstly, because of the lack of public sympathy for them and, secondly, because of the police alertness. What makes status quoists nervous about such conventions is their feeling, mistaken though, that the reformist movement is a challenge to their tradition. They do not realise that far from challenging anyone or anything, such meets are aimed at inculcating among their fellowmen the virtue of looking at social issues rationally. In a sense, if the traditionalists have a right to stick to their traditions, reformists too have a right to oppose the oppressive traditions. To treat the articulation of the latter's opinions as any kind of challenge is, therefore, not only to misunderstand the dynamics of social change but also to be untrue to one's convictions. Muslim status quoists needlessly tried to create heat on the question on the eve of the convention by their threat to stage protest demonstrations. Some of them, indeed, tried to carry out their threat at the venue of the convention. But the fact that they could not evoke any response amply proved that their stand has no public support. We drew a parallel between the two conventions only to prove a point that if the message of reforms is to reach the wider section of people belonging to oppressed communities, it is necessary that the reformists not only concentrate on reforming their own communities but also join hands to fight oppression in all communities. In other words, far from keeping the movement confined to the members of their own communities they should make it a joint movement against oppression in all communities to give it a wider base. By their mission, reformists have been assisting the government in bringing about social transformation, which must be the aim of any egalitarian government. As such, not only the government but also political parties must support the reformists to the hilt. The work being done by the Muslim Satyashodhak Mandal, particularly in bringing succour to Talaq-afflicted women, cannot be underestimated. True, the work is at present going on in a slow way. But it can gather tempo only when people come forward with their support. The government too on its part must give all help to the reformists among Bohras, Muslims and Dalits. Obscurantism must be fought with all one's might.

## ७ नोव्हेंबर १९८५, दै. दैनिक संध्या

# मुस्लीम सत्यशोधक समाजाचे काम थांबवण्यासाठी धमक्या

पुणे, दि. ७– पंधरा दिवसात आपल्या चळवळीचे काम थांबले नाही तर आम्ही तुमच्याविरुद्ध ठोस पावले उचलू अशा धमकीचे पत्र मुस्लिम सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष श्री. सय्यदभाई यांनी त्यांना आल्याचे पत्रकारांना सांगितले

हे पत्र पाठवल्याचे डॉ. झेड ये शेख (मुस्लिम पर्सनल लॉ प्रोटेक्शन कमिटीचे अध्यक्ष) यांचे आहे, या पत्रात त्यांनी म्हटले आहे की हमीद दलवाईनंतर आपली चळवळ थांबेल असे वाटले होते, परंतु तसें दिसत नाही म्हणून तुमच्या विरुद्ध ठोस पावले उचलू असे त्यांनी म्हटलें आहे.

तलाक पिडीत महिला संघाच्या चळवळीला आता कर्नाटक, आंध्र, केरळ या प्रांतातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून त्या भागातील असंख्य पत्रे आम्हाला येत आहेत असेही श्री. सय्यदभाई यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यात गेल्या १५ वर्षांत तलाकची प्रकरणे जवळ २ हजारा-पर्यंत आम्ही कोर्टात सोडवली तर काही प्रकरणे पती पत्नी यांना एकत्र बसवून सोडवली असल्याचेही श्री. सय्यदभाई यांनी सांगितले

# मुस्लीम महिलांच्या पोटगीची प्रकरणे कोर्टांत रेंगाळली

पुणे, दि. ७– भिवंडीच्या न्याया-लयात मुस्लिम महिलांच्या पोटगीची अनेक प्रकरणे रेंगाळत असून तलाक मिळणाऱ्या महिलांना नियमित पोट-गीची रक्कम मिळत नाही व वारं-वार कोर्टात खेटे घालून एक प्रकारे छळवणूक केली जाते अशा आशयाची माहिती भिवंडीमधील एक शिक्षिका श्रीमती शाकेरा मुस्ताक बोबडे यांनी आज पत्रकारांना दिली,

त्या पुढे म्हणाल्या की माझे लग्न १९६४ मध्ये भिवंडी येथील नावाज-लेले वकील ॲड. मुश्ताक बोबडे ह्यांच्याशी झाले. त्यांच्यापासून मला ४ मुले आहेत किरकोळ मतभेदावरून १९७४ मध्ये त्यांनी मला घराबाहेर काढले. १९७५ साली भिवंडी न्याया-लयात मी माझ्या पतीकडून पोटगी मिळावी यासाठी दावा लावला न्याया-लयाचा निकाल लागून मला दरमहा १०० रु पोटगी मिळाली ती पोटगी दरमहा मिळण्यासाठी मला मला आजही खूप कष्ट करावे लागत आहेत. भिवंडी तलाक मिळून पोटगी मिळवणाऱ्या अन्याय स्त्रिया आहेत परंतु त्या पुढे येत नाहीत याचे कारण त्यांनी बाजू मांडण्या-साठी किंवा त्यांना संघटित करण्या-साठी कुठलीही संघटना भिवंडीत नाही असे श्रीमती शाकेरा म्हणाल्या.

## १८ ऑक्टोबर १९८४, दै. सकाळ

# दुसऱ्या लग्नाचा बँड थांबवून पहिलीस तलाक देण्यास भाग

पुणे, ता. १०–पहिल्या बायकोला नांदवणार नाही आणि तिला तलाकही देणार नाही उलट तिला 'सडा सडाके मारेंगा', अशी दहशत घालून दुसऱ्या लग्नासाठी 'सेहरा' बांधून सज्ज झालेले नवरदेवाला आज आपल्या दुसऱ्या लग्नासाठी वाजणारा बँड थांबवून पहिल्या पत्नीला तलाक देणे भाग पडले.

याबाबतची हकीकत अशी की, येथील पुणे-मुंबई रस्त्यावरील पाटील इस्टेटशेजारी राहणाऱ्या अबू बकर मोमीन याचा आज दुसरा विवाह होता. पण सात वर्षांपूर्वी विवाह झालेल्या नसीम बानो या पहिल्या पत्नीला त्यांनी तलाक दिला नव्हता, उलट त्यांच्यामध्ये वाद सुरू झाल्यावर गेली तीन वर्षे त्यांनी नसीम बानोला व मुलीला माहेरीच घालवून दिले होते. तिचे वडिल कासम नदीम यांनी अबू बकर यांनी नसीम बानोला नांदवा-वयास न्यावे म्हणून खूप प्रयत्न केले पण ते व्यर्थ ठरले. तेव्हा त्यांनी अबू बकरने नसीमला तलाक द्यावा, अशी मागणी केली. पण तीही त्याने धुडका-वून लावली होती.

आज त्यांचा दुसरा विवाह होणार असल्याचे कासम नदीम यांस समजल्या-वर त्यांनी मुस्लीम सत्यशोधक समा-जाचे कार्यकर्ते सय्यदभाई यांच्याकडे संपर्क साधला तेव्हा सत्यशोधक समा-जाचे कार्यकर्ते घेऊन सय्यदभाई लग्न मांडवात गेले व त्यांनी अबू बकर मोमीन यांना नसीम बानोला प्रथम तलाक द्या व मगच दुसऱ्या विवाहाला उभे राहा, असे बजावले.

यापूर्वी सय्यदभाई यांनी मरीआई पोलिसचौकीवर कासम नदीम यांच्या-तर्फे अबू बकर यांच्या दुसऱ्या लग्ना-बद्दल तक्रारही नोंदविली आणि या लग्नमांडवासमोर निदर्शने करणार असल्याचे कळविले. तेव्हा मरीआई पोलिसचौकीचे फौजदार वसंतराव म्हेत्रे यांनी अर्जदारांना संरक्षणाचे आश्वासन दिले व ते त्यांचेबरोबर लग्नमांड-वाच्या ठिकाणी गेले.

लग्नमांडवात तंग झालेले वाता-वरण, बंद झालेला बँड आणि मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांचा निग्रह यापुढे अखेर अबू बकर मोमीन यांना हार पत्करावी लागली. त्यांनी नसीम बानो या पहिल्या पत्नीला तलाक लिहून दिला आणि मेहेरची रक्कमही दिली.

## २ मे १९८५, दै. केसरी

# व्यक्तिगत कायद्यात बदल करणे गैर नाही

पुणे : ब्रिटिशांनी केलेल्या मुस्लिम व्यक्तिगत कायद्याचा आणि 'शरीयत'-चा कांहीहि संबंध नसल्यामुळे मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात बदल करण्याची मागणी करण्यांत कांहीहि गैर नाही आणि त्यामुळे मुस्लिम कायद्यात हस्तक्षेप होत नाही, असे मत मुस्लिमांच्या सामाजिक परिषदेत बुधवारी येथे व्यक्त करण्यांत आले.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या-वतीने सुरू झालेली ही परिषद दोन-दिवस चालणार आहे. काल पहिल्या दिवशी या परिषदेत मुस्लिम महिलांतील 'पडदा' पद्धती, मुस्लिम कायदा या विषयांवर चर्चा झाली. तलाक-पीडित महिलांनी आपले अनुभव सांगितले. मुस्लिम महिलांची उपस्थिति मोठ्या प्रमाणावर होती. राज्याच्या सर्व भागातून तसेच हैदराबाद व गोवे येथून महिला प्रतिनिधि परिषदेसाठी आल्या होत्या.

मेहरुन्निसा दलवाई, रशिद मुजावर, रजिया पटेल, मुमताज रहिमतपुरे यांचा उपस्थितात समावेश होता. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या कुलसुम पारीख महिला सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर श्रीमती रहिमतपुरे दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे नेते सय्यदभाई आणि राजन अन्वर यांनीहि चर्चेत भाग घेतला.

**पुणे-परिसर**

गोव्यात अस्तित्वात असलेला समान नागरी कायदा रद्द केला जाऊ नये, यासाठी आंदोलन करणाऱ्या नेत्या रशिद मुजावर यांनी गोव्यातील आंदोलनाची माहिती सांगितली आणि आणि हा समान नागरी कायदा संपूर्ण देशासाठी लागू करावा, अशी मागणी केली. मुस्लिम कायद्यात बदल करता येत नाहीत ही भूमिका चुकीची असून अनेक देशांत मुस्लिम कायद्यात बदल झाले आहेत असे श्रीमती पारीख यांनी सांगितले.

रजिता पटेल यांनी पडदा पद्धतीवर बोलतांना सांगितले की, पडदा पद्धती-विरुद्ध इराण, पाकिस्तान या देशांत महिलांनी चळवळी केल्या. पण भारतातील मुस्लिम महिला मात्र अशी चळवळ करूं शकल्या नाहीत. कारण त्यांच्यात ते सामर्थ्य नाही. एकीकडून धर्मगुरूंचा दबाव आणि दुसरीकडून सरकारचा सहानुभूतिशून्य दृष्टिकोन अशा दुहेरी संकटात मुस्लिम महिला सापडली आहे. मतांसाठी मुस्लिमांचा अनुनय केला जातो, असे सांगून त्या म्हणाल्या "मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात बदल केला जाणार नाही, असे आश्वासन महामंत्री देतात ही लाजिरवाणी गोष्ट आहे."

मुस्लिमांचे कायदे आणि न्यायालयांनी अलीकडे दिलेले निर्णय यांची माहिती सर्वसामान्य मुस्लिमांना द्यावी, असे ए. डी. आत्तार यांनी सांगितले.

## २७ सप्टेंबर १९८७, दै. तरुण भारत

### पुरोगामी मुस्लिम परिषदेचे उद्घाटन

# 'धर्मनिष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठा महत्त्वाची'

कोल्हापूर, दि. २६ (प्रतिनिधी)- धर्मनिष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठा महत्वाची आहे. अनेक जाती, धर्म, भाषा, प्रांत असलेला हा खंडप्राय देश एकसंघ राहण्यासाठी घटनेच्या चौकटीत राहूनच प्रत्येकाने आपली प्रगती करून घेतली पाहिजे. राष्ट्राच्या घटनेलाच कुराण- बायबल मानले पाहिजे तरच प्रगती होणार आहे. अशा आशयाचे विचार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. दाऊद यांनी आज दुपारी येथे बोलताना व्यक्त केले. कोल्हापूर जिल्हा सत्यशोधक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय पुरोगामी मुस्लिम परिषदेचे उद्घाटन न्यायमूर्ती श्री. दाऊद यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. परिषदेच्या अध्यक्षस्थानी श्री. बाबूमिया बँडवाले होते.

न्यायमूर्ती श्री. दाऊद यांनी आपल्या भाषणात धर्म, घटना, देशातील महिलांचे प्रश्न, देशाची संस्कृती या विषयावर आपले विचार मांडले ते म्हणाले, प्रत्येकाने आपले प्रश्न विवेकाने, संयमाने, तोल ढळू न देता सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रस्त्यावर येऊन, दगडफेक करून प्रश्न सुटणार नाहीत. घटनेने दिलेले धार्मिक स्वातंत्र्य सार्वजनिक हिताच्या आड येता कामा नये. कुठल्याही धर्मांना दिलेले स्वातंत्र्य हे त्या धर्माच्या लोकांना उपकारक आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सेक्रेटरी श्री. हुसेन जमादार यांनी प्रारंभी देशातील मुस्लीम राष्ट्रीय प्रवाहात यावेत याच हेतूने कोल्हापूरात या परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. या गेल्या वर्षी कोल्हापूरातून तलाक मुक्ती मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात धाडसाने सहभागी झालेल्या चाळीस स्त्री पुरुष, मुलांचा मानचिन्ह देऊन न्यायमूर्ति दाऊद यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सर्वश्री, सय्यदभाई, अब्दुल लतीफ आजमी, मेहबूला अलि, श्रीमती साराबी अबुबकर, रमजान खान आदिंची भाषणे यावेळी झाली.

शनिवार आणि रविवार अशी सलग दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेला एकूण ३०० प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यापैकी २४० जण महाराष्ट्रातील आहेत तर अन्य साठजण कलकत्ता, दिल्ली, बंगाल, तामिळनाडू, आंध्र, बंगलोर, आदि परप्रांतातून आलेले आहेत. आज उद्घाटनाचा राजर्षिशाहू स्मारक भवनातील सोहळा संपल्यानंतर उद्या रविवारी दि. २७ रोजी अक्षता मंगल कार्यालयात विविध महत्वपूर्ण ठरावांवर चर्चा होणार आहे.

कोल्हापूरात होणाऱ्या अखिल भारतीय पुरोगामी परिषदेला कोल्हापुरातील जात्यंध मुस्लीम पुढाऱ्यांनी येणकेण प्रकारेन विरोध करण्याचा प्रयत्न केला पण पोलिसांनी खंबीर भूमिका घेतली आणि परिषदेच्या ठिकाणी काही गडबड करण्याचा प्रयत्न झाला तर तो कदापिही सहन करणार नाही असा इशारा पोलिसांनी या पुढाऱ्यांना दिला होता. राजर्षिशाहू सभागृहामध्ये परिषदेचे कामकाज चालू असताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली होती. सभागृहात नागरी वेषातील पोलिस विखरून ठेवले होते.

**धमक्यावण्या**

या परिषदेचे दुसऱ्या दिवशीचे म्हणजे रविवार दि. २७ रोजीचे कामकाज येथील अक्षता मंगल कार्यालयात होणार आहे. या मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापकांना गेल्या दोन दिवसापासून जात्यंध मुस्लीम पुढाऱ्यांकडून फोनवरून धमक्या दिल्या जात आहेत. मुस्लीम परिषदेला जागा देऊन तुम्ही फार मोठी चूक केली आहे. तुमच्या कार्यालयाचे नुकसान झाले, तर ती तुमचीच जबाबदारी राहिल. अशी इशारेवजा धमकी मुल्लानीनामक व्यक्तीकडून फोनवरून येत आहे असे कार्यालयाच्या व्यवस्थापकांनी सांगितले.

पुरोगामी मुस्लीम परिषदेला कोल्हापुरातील सर्व मुस्लीम जमात फेडरेशन नामक जात्यंध संघटनेने जाहीर विरोध केला आणि या परिषदेला मुस्लीम आणि हिंदू समाजातील लोकांनी उपस्थित राहू नये असा आगाऊ सल्ला दिला. विशेष म्हणजे या संघटनेने मुस्लीम सत्यशोधक मंडळावरच ते कोल्हापुरातील हिंदु मुस्लीमांतील सामंजस्य बिघडवित असल्याचा आरोप केला आहे. जात्यंध पुढाऱ्यांच्या आणि त्यांच्या अनुयायांच्या धमकीला भीक न घालता मुस्लीम मंडळी या परिषदेला उपस्थित होती.

परिषदेच्या ठिकाणी म्हणजे राजर्षि शाहू स्मारक भवनासमोरच एक मुसलमान गृहस्थ मुस्लीम धर्मविषयक धार्मिक पुस्तके विक्रीचे दुकान थाटून बसले होते. पण पोलिसांनी या पुस्तक विक्रेत्याला तेथून पिटाळून लावले.

**११ नोव्हेंबर १९८५, दै. तरुण भारत**

# तलाक मुक्ती मोर्चावर नांदेड येथेही दगडफेक

**नांदेड, दि. १० (वार्ताहर):- परभणी पाठोपाठ नांदेड येथेही तलाक मुक्ती मोर्चाचे शनिवार आगमन होताच मुस्लीम गुंडानी दगडफेक करून स्वागत केले.**

गुंडानी शहरातील बसेसवर देखील तुफान दगडफेक केली. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे. दगडफेकीत सुमारे २० जण जखमी झाले.

सायंकाळी कलामंदिर येथे तलाक मुक्ती मोर्चाची जाहीर सभा होती तथापि नंतर• जागा बदलून पिपल्स कॉलेजच्या पटांगणावर सभा झाली.

या जाहीर सभेत श्रीमती मेहसन्निसा दलवाई, हुसेन जमादार आदिंनी भाषण केली व दडपणाला आम्ही बळी पडणार नाही प्रसंगी तलाक मुक्ती मोर्चा दिल्लीत नेण्यात येईल असा. इशाराही त्यांनी दिला.

पोलीस सूत्रानुसार परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचे सांगण्यात आले.

**परभणीत ४५ अटकेत**

परभणी येथे झालेल्या दगडफेकीच्या संदर्भात ४५ जणांना अटक करण्यात आली असल्याचे आमच्या औरंगाबादच्या प्रतिनिधीने कळविले आहे. अटक झालेल्यात सलाउद्दीन झहीरुद्दीन आणि शेख रशीद शेख चाँद या दोघा नगर-सेवकांचा सामावेश आहे.

**१७ सप्टेंबर १९८५, दै. केसरी**

# दडपणासच शाहबानो बळी पडल्याचा आरोप

**पुणे : मागणी करूनहि शासनाने संरक्षण न दिल्यामुळे शाहबानो यांनी जमाते इस्लामी आणि मुस्लिम व्यक्तिगत कायदा संरक्षण समितीच्या कार्यकर्त्यांच्या प्रचंड दडपणाला बळी पडून पोटगीसंबंधात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय मागे न्यावा या पत्रकावर अंगठा दिल्याचा आरोप मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे सय्यदभाई यांनी शनिवारी केला.**

घटस्फोटित महिलेला पोटगीदेण्या विषयीच्या आपल्या अर्जावरील निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मागे घ्यावा, अशी मागणी वरील अर्ज करणाऱ्या शहाबानो हिनेच केली आहे.

श्रीमती शाहबानो यांना पोटगी देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर सुमारे तीन महिन्यांपूर्वी श्रीमती शाहबानो यांनी महामंत्री राजीव गांधी यांची भेट घेतली, तेव्हा त्यांनी संरक्षण देण्याची ताबडतोब व्यवस्था केली जाईल, असे आश्वासन दिले होते, असे सांगून सय्यदभाई म्हणाले, "मध्यप्रदेश सरकारने त्यांना कोणतेहि संरक्षण दिले नाही. जमाते इस्लामी आणि समितीच्या कार्यकर्त्यांचा सतत त्रास सुरू होता. त्यांना धमक्या जदिल्या जात होत्या, असे श्रीमती शाहबानो यांचा मुलगा जमिल अहमदखान



शाहबानो

याने नुकतेच येथे येऊन सांगितले होते."

कोणत्याहि दबावाला बळी पडून आपण निवेदनावर अंगठा दिला नाही असे जरी शाहबानो यांनी सांगितले असले तरी ते खरे नाही, असे सांगून सय्यदभाई म्हणाले, "वरील दोन संघटनांच्या कार्यकर्त्यांनी इंदूरमध्ये नुकताच एक मेळावा घेतला, तसेच 'बंद' पाळला होता, त्याच्या दुसऱ्या दिवशी त्या कार्यकर्त्यांनी शाहबानो यांची भेट घेऊन इस्लाम धर्म वाचविण्यासाठी पोटगीवरील हक्क सोडा, तुमची व्यवस्था आम्ही करू असे सांगितले. पण त्यासहि त्यांनी नकार दिला होता. असे असताना कांही दिवसांतच त्या पत्रकावर अंगठा देतात. हे केवळ प्रचंड दडपणास त्या बळी पडल्याचे लक्षण आहे.

**१७ नोव्हेंबर १९८५, दै. प्रभात**

# शाहबानोंकडून सक्तीने अंगठा घेतला असावा

## सय्यदभाईंचा आरोप

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी)– पंतप्रधानांकडे श्रीमती शहाबानो यांनी संरक्षणाची मागणी केली. परंतु ते न मिळाल्याने दडपणाखाली त्यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल मागे घेण्याची मागणी वदविली गेली, असा आरोप मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाई यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

पोटगी संबंधी श्रीमती शहाबानो यांच्या बाजूने निकाल दिल्याने मुस्लीम समाजात खळबळ उडाली होती. सय्यदभाई म्हणाले, श्रीमती शहाबानो या निरक्षर आहेत. राजीव गांधी यांची शहाबानों, त्यांचा मुलगा माजी खासदार प्रमिलाताई दंडवते, राजन अन्वर व मी भेट घेतली तेव्हा त्यांनी मी मुस्लीम मोहल्यात रहाते. तिथे मला ठार मारण्याच्या वारंवार धमक्या दिल्या जातात तरी संरक्षण मिळावे असे निवेदन दिले त्या निरक्षर असल्याने हे निवेदन त्यांच्या मुलाने लिहिले होते.

ऑगस्ट महिन्यानंतर आतापर्यंत त्यांना संरक्षण मिळाले नाही.त्यामुळेच त्यांच्याकडून निर्णय फेटाळण्याच्या निवेदनावर अंगठा उठवून घेतला असावा, असे ते म्हणाले.

### आधीचे वृत्त

इंदूर, दि. १६–घटस्फोटात मुस्लीम महिलांना पोटगी मिळण्याबाबत सुप्रीम कोर्टाने गेल्या एप्रिल महिन्यांत दिलेला निर्णय मागे घ्यावा अशी आश्चर्यकारक विनंती स्वतः शाहबानो यांनी सुप्रीम कोर्टाला केली आहे.

श्रीमती शाहबानो यांनीच त्यासंबंधात कोर्टात अर्ज केला होता.

श्रीमती शाहबानो यांनी काल पत्रकार परिषद घेऊन ही विनंती केली त्यामुळे देशभर उठलेल्या वादळाला वेगळेच वळण लागले आहे.

**१८ नोव्हेंबर १९८३, दै. सकाळ**

# शहाबानूंचे वक्तव्य गुप्तचर चौकशी हवी

## मुस्लीम सत्यशोधकांची मागणी

पुणे, ता. १७ – शहाबानू यांनी नुकतेच केलेले जाहीर निवेदन कोणत्या परिस्थितीत झाले याची केंद्रीय गुप्तचरांमार्फत चौकशी करावी, अशी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे मागणी करणारे आवाहन मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केले आहे.

"शहाबानू यांना दडपणाखाली निवेदन करणे भाग पडले आहे," असा आरोप मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केला आहे.

मंडळाचे सरचिटणीस सय्यदभाई आपल्या निवेदनात म्हणतात, "शहाबानू यांनी नुकतीच इंदूरमध्ये मुस्लीम स्त्रियांना फौजदारी दंडसंहितेच्या १२५ व्या कलमाच्या क्षेत्राबाहेर ठेवण्याची मागणी केली. ही मागणी त्यांच्यावर जोरदार दडपण आल्याने केली गेली असावी कारण गेल्या ऑगस्ट महिन्यात शहाबानू यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन पोलिस संरक्षणाची मागणी केली होती. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी न झाल्यास देशातील पुरोगामी विचारांची मोठी पीछेहाट होईल."



मुस्लिम सत्यशोधक समाज

# धार्मिक दलाली-जमातवादाविरोधात लढा

## भाई वैद्य यांचे आवाहन, डॉ. इंजिनीअर यांना 'समाज प्रबोधन पुरस्कार'

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

'धर्माच्या नावाखाली चालत असलेली दलाली आणि फोफावत चाललेल्या जमातवादाविरुद्ध निकराने लढण्याची गरज आहे,' असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी रविवारी व्यक्त केले.

मुस्लिम सत्यशोधक समाजातर्फे देण्यात येणारा 'मुस्लिम समाज प्रबोधन पुरस्कार' आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभ्यासक आणि विचारवंत डॉ. असगरअली इंजिनीअर यांना देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते. शाल, स्मृतिचिन्ह आणि अकरा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्याध्यक्ष सय्यदभाई कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

'प्रत्येक धर्मामध्ये पुरोहितशाहीच्या विरोधात असणारा संघर्ष सुरूच आहे. तो संपत नाही, हे आपले दुर्दैव आहे. धर्माच्या दलालांनी त्यांची राजकीय-आर्थिक सत्ता निर्माण करण्यासाठी धर्माचा वापर करून घेतला आहे. त्यांनी निर्माण केलेल्या या धर्मवादाचे आता जमातवादामध्ये रूपांतर झाले आहे. हा जमातवाद रोखून मानवतावादाच्या आधारे समाजाची प्रगती साधणे आवश्यक आहे,' असे वैद्य म्हणाले.

डॉ. इंजिनीअर म्हणाले, 'कोणताही धर्म आपसात भांडत नाही. धर्माला कमाईचे साधन मानणारे लोकच आपसात भांडतात आणि भांडणेही लावतात. सर्वच धर्मांमध्ये सामायिकतेचे अनेक दुवे आहेत. ते शोधायला हवेत. समाजामध्ये चांगुलपणा आणण्यासाठी धर्म असायला हवा. त्यासाठी धर्मसुधारणांची कायमच गरज असते. या सुधारणा करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांनी स्वतः धर्माचा अभ्यास करायला हवा.' मुस्लिम धर्मामध्ये सुधारणा करण्यासाठी या समाजामध्ये साक्षरता वाढविण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आय. एन. बेग यांनी आभार मानले.

**७ मे २०१२**
**दै. महाराष्ट्र टाइम्स**

**२६ सप्टेंबर १९८७**
**दै. पुढारी**



# मुस्लीम सत्यशोधकची अ. भा. परिषद आज कोल्हापुरात

**कोल्हापूर, दि. २५ (प्रतिनिधी) : मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे दि. २६ व २७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय स्तरावरील मुस्लीम सत्यशोधक परिषदेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दाऊद यांच्या हस्ते व बाबूमियाँ बॅण्डवाले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती मंडळाचे सरचिटणीस पुण्याचे सय्यद भाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

पुरोगामी मुस्लिमांनी एकत्र येण्याची गरज होती. या भावनेतून ही परिषद घेण्यात येत आहे. यामागे एक व्यासपीठ तयार व्हावे हा उद्देश असल्याचे सांगून सय्यद भाई म्हणाले, 'अहिंसामार्गाने प्रश्न सोडविण्यासाठी हे व्यासपीठ आहे.'

परिषदेचे उद्घाटन शाहू स्मारक भवनात होणार असून दि. २७ रोजीचे कार्यक्रम अक्षता मंगल कार्यालयात होणार आहेत. परिषदेत मुस्लीम तरुणांसमोरील आर्थिक शैक्षणिक व इतर आवाहने, मुस्लिमांच्या समस्यांचे राजकीय विश्लेषण, देशातील जातीय दंगली व राष्ट्रीय एकात्मता तसेच मुस्लीम कायदा व स्त्रियांचे प्रश्न आदी प्रमुख ठरावांवर चर्चा होणार आहे.

परिषदेस दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, लखनौ आदी भागातील प्रतिनिधी येणार आहेत. यामध्ये राजस्थानचे माजी मंत्री मेहबूब अली हेही येणार आहेत. राज्यातील दोनशेवर प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित राहतील, असे हुसेन जमादार यांनी सांगितले.

**२६ ऑक्टोबर २०१२, दै. महाराष्ट्र टाइम्स**

## 'मुस्लिम सत्यशोधक'चा अभिनव उपक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बकरी ईदच्या निमित्ताने रक्तदान करून मुस्लिम सत्यशोधक समाजाने आदर्श घालून दिला आहे. समाजातर्फे गुरुवारी आयोजित रक्तदान शिबिरात २२ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले.

एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनमध्ये आयोजित या शिबिराचे उद्‌घाटन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हस्ते झाले. निवृत्त पोलिस महासंचालक सुरेश खोपडे, मंडळाचे सय्यदभाई, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, बेनझीर तांबोळी, आबेदा शेख आदी या वेळी उपस्थित होते. 'बकरी ईदच्या निमित्ताने बकऱ्याची कुर्बानी देण्याऐवजी रक्तदान करून समाजोपयोगी काम करण्याचा उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात [illegible] होते. रक्तदानाच्या माध्यमातून समाजासाठी त्याग करण्याची भावना निर्माण होईल. रक्ताला कोणतीही जात, धर्म नसतो, त्यामुळे रक्तदानाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा वाढण्यासही मदत होईल,' असे प्रा. तांबोळी यांनी सांगितले. दिलावर शेख, रशीद शेख, मुश्ताक शेख, बशीर शेख आदींनी संयोजन केले.

**१६ जानेवारी २०१३, दै. महाराष्ट्र टाइम्स**

## शरियत पंचायत प्रस्तावाचा मुस्लीम सत्यशोधककडून निषेध

■ पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) - पंजाबमधील संगरूर या मुस्लीम बहुल जिल्ह्यातील मालेरकोटला या गावी देशातील पहिली शरियत पंचायत स्थापन केली जाणार आहे. या पंचायतीला मुस्लीम सत्यशोधक मंडळाने विरोध दर्शवला आहे.

देशात धर्मनिरपेक्ष न्यायव्यवस्था उपलब्ध असताना शरियत न्यायालयाच्या दिशेने जाणारी पंचायत समाजाला हजारो वर्षे मागे नेऊन तालिबानी प्रवृत्तीला खतपाणी घालणारी आहे. अशा पंचायतीचे अस्तित्व केवळ मुस्लीम महिलांसाठीच नव्हे तर भारतीय समाजासाठी सुद्धा आपत्तीजनक ठरेल, असा इशारा मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस प्रा.शमसुद्दीन तांबोळी यांनी एका पत्रकाद्वारे दिला आहे. सर्व पुरोगामी संघटनांनी या विरोधात आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मुस्लीम समाजाला जलद व कमी खर्चात न्याय देण्याच्या उद्देशाने ही शरियत पंचायत स्थापन केली जाणार असल्याचा दावा पंजाब वक्फ बोर्डाचे अध्यक्ष मोहमंद ईझहार आलम यांनी केली आहे. मात्र त्यांचा हा प्रयत्न संविधानात्मक मूल्यांच्या विरोधात व कालचक्र उलटे फिरवणारा आहे, असेही प्रा.तांबोळी यांनी या पत्रकात म्हटले आहे.

**२३ मार्च २०१४, दै. सकाळ**

## मुस्लिमांनी संवादाची भूमिका ठेवावी

### मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या परिसंवादातील सूर

**पुणे :** मुस्लीम समाजामध्ये शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती होणे शक्यच नाही. त्यामुळे शिक्षण आणि प्रबोधनाला समाजातील धुरिणांनी महत्त्व द्यावे, पण त्याचबरोबर आपण ज्या परिसरात राहतो, तेथील विविध धर्मीय बांधवांशी सलोख्याची व संवादाची भूमिका ठेवावी. जेणेकरून एकमेकांबद्दल आपलेपणा व विश्वासाची भावना निर्माण होईल, असा सूर 'मुस्लीम समाजासमोरील आव्हानें' या परिसंवादातून निघाला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या ४४ व्या वर्धापनदिनानिमित्त मुस्लीम समजासमोरील आव्हाने याविषयावर परिसंवाद आयोजित केला होता. त्यात डॉ. इरफान इंजिनिअर, प्रा.जहीर अली, ऐनुल आतार, प्रा. बेनझीर तांबोळी आदींनी सहभाग घेतला.

डॉ. इंजिनिअर म्हणाले, मुस्लिमांमध्ये जाणूनबुजून असुरक्षिता निर्माण करण्याचे काम सुरू आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये समाजात आपण रुजविली पाहिजेत. मुस्लिमांची प्रतिमा जाणूनबुजून खराब केली जात आहे. यासाठी प्रबोधन व शिक्षणाची गरज आहे.

जहीर अली म्हणाले, मुल्ला-मौलवींनी मुस्लिमांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे पाप केले आहे. जमातवाद्यांना भांडवलदार पैसे पुरवतात. कारण त्यांना आपली स्थाने बळकट करायची असतात. कोणत्याच दंगलीत श्रीमंत, उच्चवर्गीय मारला जात नाही. सर्वसामान्य माणूसच बळी पडतो. आदिवासी, दलितांना भडकवून त्यांचा दंगलीत वापर केला जातो. उच्चवर्णीय हिंदू दंगलीत कधीच सहभागी होत नाहीत. समाजाच्या हिताचा विचार करा. त्यांना शिक्षणाची दारे खुली करा.

या परिसंवादानंतर खुले चर्चासत्र घेण्यात आले. त्याचे सूत्रसंचालन राजन खान यांनी केले. राज्यभरातून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. आभार बशीरभाई यांनी मानले. या अधिवेशनात न्या. राजेंद्र सच्चर, रंगनाथ मिश्रा समितीच्या शिफारशी तातडीने स्वीकाराव्यात, मुस्लिमांकडे संशयाने पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी शासनाने पावले उचलावीत, मूल दत्तक कायदा मुस्लिमांनाही लागू करावा हे ठराव हुसेन जमादार यांनी मांडले. आभार बशीरभाई यांनी मानले.

## २६ नोव्हेंबर २०१६, दै. लोकसत्ता

# कालबाह्य शरियत कायद्यात बदल आणि संशोधन आवश्यक

### मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषदेतील सूर

प्रतिनिधी, पुणे

पुरुषांप्रमाणेच महिलांनाही तलाक देण्याचा हक्क असायला हवा. तोंडी तलाक पद्धत बंद करून मुस्लीम महिलांना त्यांचे अधिकार द्यावेत. मुस्लीम वैयक्तिक कायदे कालानुरूप बाद ठरत आहेत. अशा कालबाह्य शरियत कायद्यांमध्ये बदल आणि संशोधन होणे आवश्यक आहे, असा सूर मुस्लीम महिला अधिकार राष्ट्रीय परिषदेत शनिवारी व्यक्त झाला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे आयोजित परिषदेचे उद्घाटन तलाकबंदीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या उत्तराखंड येथील सायरा बानो यांच्या हस्ते करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष प्रा. शमसुद्दीन तांबोळी, लेखिका डॉ. नूर जहीर, अर्शद अली, मुमताज शेख, रुबिना पटेल सहभागी झाले होते. ज्येष्ठ सामाजिक नेते भाई वैद्य, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ या वेळी उपस्थित होत्या. मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे प्रकाशन आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार या वेळी करण्यात आला.

सायरा बानो म्हणाल्या, माझ्या सासरच्या लोकांनी माझ्यावर अत्याचार केले. मानसिक आणि शारीरिक शोषणही करण्यात आले. मला मुलांना भेटू दिले जात नाही. दावा मागे घेण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जात आहे. मात्र, सरकारने माझी बाजू उचलून धरीत सहकार्याचे आश्वासन दिले असून याबाबत न्यायालयीन लढाई सुरू आहे. मुस्लीम संघटना आणि महिला माझ्या पाठिशी आहेत. त्यामुळे मला निश्चित यश मिळेल.

डॉ. नूर जहीर म्हणाल्या, केवळ तोंडी तलाक बंद करून प्रश्न सुटणार नाहीत. तर संबंधित महिलेचे भविष्य सुरक्षित राहण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पुरुषांप्रमाणेच महिलांनाही तलाक देण्याचा हक्क मिळायला हवा. कायद्यात बदल व्हावेत म्हणून अन्यायाविरोधात लढले पाहिजे.

सायरा बानो यांच्या बरोबरीने आम्ही उभे राहणार असून मुस्लीम सत्यशोधक मंडळ समान नागरी कायद्याला पाठिंबा देईल. मात्र, त्याचा मसुदा जाहीर केला जावा. जिल्हा स्तरावर कौटुंबिक न्यायालय असावे, अशी मागणी शमसुद्दीन तांबोळी यांनी केली.

महिलांना दुय्यम वागणूक मिळू नये आणि त्यांना पुढे जाता यावे यासाठी कायद्यात बदल केले पाहिजेत, अशी मागणी भाई वैद्य यांनी केली. इतिहासात महिलांचे योगदान मोठे असले, तरी त्याचा उल्लेख प्राधान्याने केला जात नाही, अशी खंत व्यक्त करून विद्या बाळ यांनी महिला अत्याचाराच्या विरोधात धैर्याने उभे राहिले पाहिजे, ही अपेक्षा व्यक्त केली.

## २७ नोव्हेंबर २०१६, दै. सकाळ



साने गुरुजी स्मारक : 'मुस्लिम महिला अधिकार राष्ट्रीय परिषदे'च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना नूर जहीर. सोबत इतर मान्यवर.

# महिलांना न्याय मिळेपर्यंत लढणार

### शायरा बानो यांचा एल्गार; आता परिस्थिती बदलायलाच हवी

पुणे, ता. २६ : "मुस्लिम कायद्यात परिवर्तन व्हायला हवे... जे शोषण आणि अत्याचार मी भोगले, ते इतर कुणालाही भोगावे लागू नयेत. मला माझ्या लढ्यात यश मिळेल, ही मला खात्री आहे. मला मदत केलेल्या सर्वांचीच मी आभारी आहे. मला आणि इतरही मुस्लिम महिलांना न्याय मिळेल ही अपेक्षा ठेवून मी माझा लढा सुरू ठेवणार आहे... हा आपण स्वतःसाठी देण्याचा लढा आहे," तोंडी तलाक देण्याच्या मुस्लिम समाजातील परंपरेच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या शायरा बानो यांचा हा एल्गार.

पुरुषी वर्चस्वाने बुरसटलेल्या मानसिकतेत पतीने तलाक दिल्याचे लक्षात आले, तेव्हा डगमगून न जाता या तलाक परंपरेला थेट सर्वोच्च न्यायालयातच आव्हान देणाऱ्या हिंमतीच्या महिला शायरा बानो यांचे छोटेसेच पण मनात धाडस जागवणारे आत्मकथनपर व्याख्यान अनेकांना शनिवारी ऐकता आले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधत आयोजिलेल्या 'मुस्लिम महिला अधिकार राष्ट्रीय परिषदे'च्या उद्घाटनाच्या निमित्ताने शायरा बानो पुण्यात आल्या होत्या. या वेळी आपल्या मोजक्या शब्दांनी त्यांनी अनेकांना अंतर्मुख केले.

बानो यांच्यासह या एक दिवसीय परिषदेला डॉ. नूर जहीर, भाई वैद्य, विद्या बाळ, खातून शेख, प्रा. शमसुद्दीन तांबोळी तसेच विविध राज्यांतील मुस्लिम महिला उपस्थित होत्या.

बानो म्हणाल्या, "मुस्लिम समाजात हलाला, तोंडी तलाक, ट्रिपल तलाक अशा अनेक बुरसटलेल्या अमानुष प्रथा अस्तित्वात आहेत. या प्रथा स्त्री सन्मानाच्या विरोधात असल्याने तातडीने बंद व्हायला हव्यात. मुस्लिम समाजात कर्मठपणे या प्रथा राबवील, हा प्रश्न आपल्यापुढे पडायला हवा. माझ्या पतीचा माझ्याशी असणारा व्यवहार अतिशय अमानुष असाच होता. मी त्याच्या विरोधात माझ्या मानवी हक्कांसाठी एक स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून उभी राहिले."

#### मुस्लिम मागास नाहीत

नूर जहीर म्हणाल्या, "मुस्लिम म्हणजे फक्त मागासच, अशी परिस्थिती मुद्दाम निर्माण केली जात आहे. वास्तव तसे नाही. मुस्लिम समाजातील महिलांची बाजू मांडली जाईल, अशी वेळ कधी येणार, हा प्रश्न आम्हाला पडतो. अगदी नेहरूंनीही हे केले नाही. महिला हक्काची मोहीम फक्त ट्रिपल तलाकवर अवलंबून नाही. महिलांनाही पुरुषांना तलाक देता येण्याचा अधिकार आणि पोटगीचा मुद्दाही यात आवश्यक आहे. शायरा यांच्याप्रमाणे प्रत्येकच महिला सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकणार नाही. त्यांच्यामागे आपण उभे राहायला हवे."

#### परिषदेतील मागण्या

- तोंडी एकतर्फी तलाक रद्द करा
- न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाच्या शिफारसी लागू कराव्यात
- मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा हवी
- जिल्हा पातळीवर कौटुंबिक न्यायालय स्थापन करावे

#### महिलांनी हाती 'हंटर' घ्यावा!

भाई वैद्य म्हणाले, "महिलांनी आवश्यकता भासल्यास हातात 'हंटर' घ्यावा. त्याशिवाय त्यांना मिळणाऱ्या दुय्यम दर्जाच्या वागणुकीत सुधारणा होणार नाही. प्रत्येकच धर्माने महिलांवर अन्याय केला आहे. त्यांना सापत्नभावाची वागणूक दिली आहे. ही परिस्थिती बदलायलाच हवी."




जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करताना मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते आणि महिला.

# संविधानात्मक हक्कासाठी मुस्लिम महिलांचा मोर्चा

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणला

पुणे : प्रतिनिधी

[illegible]

हलाला बहुपत्नीत्व आदी पद्धती बंद करून समान नागरी कायदा आणावा, अशा मागण्या शासनाकडे वेळोवेळी करण्यात आल्या आहेत. २६ नोव्हेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय पातळीवर मुस्लिम महिला अधिकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली होती; तसेच मुस्लिम महिलांना न्यायालयीन संरक्षण मिळावे, यासाठी कायदा करण्याची मागणी देखील केली आहे. मुस्लिम महिलांना संविधानिक हक्क मिळावेत, यादृष्टीने राज्यातील उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने देखील स्वागतार्ह निवाडे दिले असल्याचे तांबोळी यांनी सांगितले.

हमीद दलवाई यांनी १८ एप्रिल १९६६ रोजी काढलेल्या मोर्चाला ५१ वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्ताने तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला ह्या कालबाह्य प्रथा रद्द करण्यासाठी कायदा करावा, जिल्हा पातळीवर कौटुंबिक न्यायालयांची स्थापना करावी, समान नागरी कायद्याचा प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी तत्काळ समिती नेमावी, सच्चर समिती, रंगनाथ मिश्रा आयोग, डॉ. महेमूद-उर-रहेमान अभ्यासगटाच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी धोरण आखावे, तसेच मुस्लिम महिलांना शिक्षण आणि नोकरीत आरक्षण द्यावे, अशा मागण्यांचे निवेदन या वेळी अपर जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

१९ एप्रिल २०१७, दै. सकाळ

५ मे २०१४, दै. सकाळ




संत ज्ञानेश्वर सभागृह : लक्ष्मी ऊर्फ योजना यांचा पीएच.डी. मिळविल्याबद्दल डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी (डावीकडून) डॉ. बाबा आढाव, पी. बी. सावंत, लक्ष्मी ऊर्फ योजना, पंडित विद्यासागर आणि भाऊसाहेब जाधव.

# दलवाई हे मुस्लिम समाजातील महात्मा फुले : पी. बी. सावंत

## 'हमीद दलवाई-क्रांतिकारी विचारवंत' पुस्तकाचे प्रकाशन

पुणे, ता. ४ : "मुस्लिम समाजामध्ये 'सुधारणा' हा शब्द उच्चारला तरी गुन्हा ठरत असतानाच्या काळात हमीद दलवाई यांनी समाजात परिवर्तनाची ज्योत पेटवली. सत्यशोधक चळवळीतून समाजाला सुधारणेचा मूलमंत्र दिला. मानवतावादी, धर्मनिरपेक्ष, तर्कशुद्ध आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचाराने बदल घडवणारे दलवाई हे मुस्लिम समाजातील महात्मा जोतिराव फुले होते," अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांनी हमीद दलवाई यांचा शब्दांत गौरव केला.

'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' आणि 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान'तर्फे सत्यशोधक दिनकरराव जवळकर आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'हमीद दलवाई-क्रांतिकारी विचारवंत' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी पहिल्या देवदासी कार्यकर्त्या गिरजाबाई सलगदे यांची नात लक्ष्मी ऊर्फ योजना यांचा पीएच.डी. मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई, प्राचार्य भाऊसाहेब जाधव या वेळी उपस्थित होते. प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांनी पुस्तक संपादित केले आहे.

न्यायमूर्ती सावंत म्हणाले, "प्रत्येक कालखंडात जातिव्यवस्थेत सुधारणा सुचविणाऱ्या समाजसुधारकांना संघर्ष करावा लागला. मानवी मूल्य जपणाऱ्या आणि लोकशिक्षणाची क्रांती घडवणाऱ्या समाजसुधारकांमुळेच आज मुस्लिम समाजात बदल घडला आहे."

डॉ. आढाव म्हणाले, "अस्पृश्यता आणि लिंगभेद ही विचारसरणी देशासाठी घातक आहे. हे चित्र बदलण्यासाठी जातिअंताच्या दिशेने प्रवास झाला पाहिजे. माणूस म्हणून जगण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी तरुणांपासून सुरवात व्हावी. शिक्षणात विद्यापीठस्तरावर जातिअंताचा विषय आणला पाहिजे, जेणेकरून लोकशाही पद्धतीत परिवर्तन घडेल." सध्या माणूस मागासलेपण मारून राजकारण करतोय, ही परिस्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी मानसिकता बदलण्याची गरज सय्यदभाई यांनी व्यक्त केली. आंतरजातीय विवाहाचा विचार पसरतोय, ही परिवर्तनाची बाब असली तरी अजूनही लोकांची मानसिकता बदलली नाही, अशी खंत पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केली.

१९ डिसेंबर २०१७, द इंडियन एक्सप्रेस

# Triple talaq not a religious issue, it is about women's rights, PM tells MSM



**Members of the Muslim Satyashodhak Mandal with Prime Minister Narendra Modi in New Delhi on Monday.** *Express*

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, DECEMBER 18

A DELEGATION of the Muslim Satyashodhak Mandal (MSM) held a discussion with Prime Minister Narendra Modi on the draft law on instant triple talaq, in New Delhi on Monday.

MSM chief Shamsudin Tamboli said, during the meeting, they submitted a memorandum of their demands to the PM. The panel has suggested that the government should consider not only triple talaq, but also focus on polygamy and the practice of *halala*; with a compulsory condition of judicial intervention in every talaq, he added.

In response to their suggestions, Modi said, "The issue of triple talaq is not religious. It is about the rights of Muslim women. We are genuinely trying to make this draft effective. I assure you that we will consider your recommendation and the opinions of other stakeholders and political parties. We will come up with a comprehensive and an all-inclusive draft."

Tamboli said they had a "fruitful" discussion with the PM, who has assured to consider all of their recommendations before finalising the draft.

"The meeting was successful. Tomorrow, our delegation will meet the heads of political parties to appeal to them to not to politicise the matter. We will also ask them not to bring the matter of religion and hold fruitful discussions on the draft in the Parliament," he added.

Vinay Sahasrabuddhe, national vice-president of BJP, was also present during the meeting. The MSM delegation included its president Tamboli, secretary Jameer Shaikh, treasurer Dilawar Shaikh, member Sameer Shaikh and former chief Sayyadbhai alias Sayyad Mehboob Qadri.

## २२ मार्च २०१८, दै. महाराष्ट्र टाइम्स

# 'फतवे नाही; मनाचे ऐका'

## तिहेरी तलाक हा दखलपात्र गुन्हा ठरावा : आरिफ महंमद खान

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'जे कुराणातील लेखनही मानत नाहीत आणि या देशाच्या संविधानासही सरसकट झुगारतात, अशा लोकांना मुस्लिम महिलांच्या हक्कांची पायमल्ली करू देत रस्त्यावर बिनदिक्कतपणे मोकळे फिरू कसे द्यावे? मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि त्यांच्यासारख्या संघटना संविधानाची थट्टा करत फिरणे हे या देशाच्या कायद्याच्याच नव्हे तर, मुस्लिम महिलांच्या सन्मानाच्या दृष्टीनेही भयंकर आहे. 'तुम कानून बनाते जाओ, हम तीन तलाक देते जाएंगे,' असे उच्चरवाने म्हणणाऱ्यांना आपण कधीतरी चाप लावणार आहोत की नाही? तिहेरी तलाकविरोधी कायदा शक्य तेवढ्या लवकर करून तिहेरी तलाक हा दखलपात्र गुन्हा ठरायला हवा. तसे न झाल्यास हा कायदा तयार होऊनही त्याची धार नसलेल्या बोथट हत्यारासारखी अवस्था होऊन बसेल,' असा इशारा माजी खासदार आरिफ महंमद खान यांनी दिला.

'फतवे नाही, आपल्या मनाचे ऐका. आपण आधी माणूस आहोत, मग भारतीय आणि नंतर एखाद्या धर्माचे आहोत. तिहेरी तलाकचा प्रश्न हा प्रश्न केवळ महिलांचा नाही, तर तो मानव अधिकार हननाचा प्रश्न आहे,' असेही त्यांनी स्पष्टपणे मांडले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या ४८व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मंडळातर्फे यंदाचा 'समाज प्रबोधन पुरस्कार' मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ आंदोलनांच्या मार्गाने लढा देणाऱ्या कार्यकर्त्या डॉ. नूरजहाँ सफिया नियाझ यांना ख्यातनाम अभिनेते नसीरुद्दीन शाह यांच्या हस्ते देण्यात आला. सर्वोच्च न्यायालयात शायराबानो प्रकरणात तिहेरी तलाकविरोधात लढा देणारे वकील ॲड. बालाजी श्रीनिवास यांचाही कृतज्ञता सन्मान करण्यात आला. या वेळी खान यांनी 'मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातील [illegible]' या विषयावर व्याख्यान दिले. मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी उपस्थित होते.

खान म्हणाले, 'न्यायालयाने तिहेरी तलाकबंदी केली असली, तरी अजूनही संसदेत त्याबाबत कायदा संमत झालेला नाही. लोकसभेत विधेयक संमत झाल्यानंतर आता ते राज्यसभेत संमत होऊ नये, यासाठी मोठ्या प्रमाणावर दबाव टाकण्याचे काम होत आहे. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच नाही, तर अनेक पक्षांचे खासदार हा कायदा होऊ नये यासाठी प्रयत्नरत आहेत.'



यंदाचा 'समाज प्रबोधन पुरस्कार' मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ आंदोलनांच्या मार्गाने लढा देणाऱ्या कार्यकर्त्या डॉ. नूरजहाँ सफिया नियाझ यांना ख्यातनाम अभिनेते नसीरुद्दीन शाह यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी शमसुद्दीन तांबोळी उपस्थित होते.

> वंशवाद हा प्रश्न जेवढा गंभीर आहे, तेवढाच समाजातील महिलांचा प्रश्न गंभीर आहे. मुस्लिम समाजातील महिलांच्या गंभीर प्रश्नांना अतिशय प्रतिकूल काळात हमीद दलवाई यांनी जी वाचा फोडली आणि त्या महिलांच्या न्यायासाठी ते अखेरपर्यंत लढत राहिले, ते शिवधनुष्य पेलणे क्वचितच कुणाला जमू शकेल. आज तसे काम मुळातून करायचे म्हटले तर दलवाईंना जो विरोध सहन करावा लागला, त्याहीपेक्षा कदाचित जास्त विखार आणि विरोध निर्माण होईल, अशी भीती मला वाटते.
>
> – नसीरुद्दीन शाह, अभिनेते

### दलवाईंवर माहितीपट

मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणारे थोर समाजसुधारक हमीद दलवाई यांच्या आयुष्यावर ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती सुभाष एक माहितीपट करत असल्याची घोषणा या कार्यक्रमात करण्यात आली. विशेष म्हणजे, या माहितीपटात नासिरुद्दीन शाह यांचीही एक भूमिका असणार आहे, असे या वेळी जाहीर करण्यात आले.

### 'महिलांचा बुद्धिभेद'

मुस्लिम महिला किती मोठ्या प्रमाणावर मुस्लिम धर्मातील पितृसत्ताक रुढींच्या बळी ठरल्या आहेत, हे वेळोवेळी दिसून येते. मुस्लिम पितृसत्ताक रचनेत त्यांचा शब्दशः बुद्धिभेद घडवला गेला आहे. हा याचाच परिपाक आहे की, एकीकडे तिहेरी तलाकबंदी हा निर्णय महिलांच्या भल्यासाठी केला गेला असला, तरी आज ठिकठीकाणी 'आम्हांला आमच्या धर्मात हस्तक्षेप नको' म्हणणाऱ्या हजारो मुस्लिम महिलांचे 'प्रतिमोर्चे' निघत आहेत. खरेतर, बुद्धिभेद झालेल्या हजारोंच्या संख्येने मुस्लिम महिलांना हेतुपुरस्सर प्रतिगामी समाजघटक रस्त्यावर आणत आहेत, असे खान म्हणाले.

### 'देशात ७८ टक्के तलाक एकतर्फी'

पुणे : देशातील मुस्लिम महिलांचे प्रश्न वरून दिसतात त्यापेक्षा कितीतरी गंभीर असल्याचे विदारक वास्तव एका राष्ट्रीय पाहणीतून पुढे आले आहे. या पाहणीच्या नुसार, मुस्लिम समाजातील महिलांना केवळ अधिकारांपासून वंचितच ठेवण्यात येत नसून, त्यांचे अनेक प्रकारे शोषण सुद्धा केले जात असल्याचे पुढे आले आहे. सुमारे ६० टक्के विवाहित मुस्लिम महिलांकडे त्यांचा 'निकाहनामा' नाही, तब्बल ७८ टक्के तलाक हे एकतर्फी (पुरुषांच्या बाजूने) होतात, ८२ टक्के विवाहित महिलांकडे स्वतःच्या नावावरील मालमत्ता नाही, तर सुमारे ५५ टक्के मुस्लिम मुलींचे विवाह त्यांच्या वयाच्या १८ वर्षांच्या आत केले जात असल्याचे ही पाहणी सांगते.

मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ आंदोलनांच्या मार्गाने लढा देणाऱ्या कार्यकर्त्या डॉ. नूरजहाँ सफिया नियाझ यांनी त्या पुरस्का[र स्वीकारताना] आल्या असताना ही धक्कादायक माहि[ती] दिली. देशभरातील सुमारे पाच हजा[र] मुस्लिम महिलांशी व्यक्तीशः बोलून [ही] पाहणी करण्यात आली आहे.

नूरजहाँ म्हणाल्या, 'मुस्लिम महिला[ंना] अनेकदा त्यांच्या हक्कांची जाणी[व] करून दिली जात नाही. आमही सु[मारे] ७८ टक्के गृहिणी या कुठल्याही आ[र्थिक] स्रोताविना आपल्या नवऱ्यावर अवलं[बून] राहतात. तब्बल ७५ टक्के महिल[ांशी] बोलल्यावर लग्नाचे वय १८ [पेक्षा] अधिक असावे, असे त्यांनी सांगि[तले,] तर, ९१ टक्के मुस्लिम महिला बहुपत्नीत्वाविरुद्ध आहेत.'

नूरजहाँ म्हणाल्या, 'आमचा मुस्लिम समाज स्वातंत्र्योत्तर भारताच्या [illegible] वर्षांनंतरही मागास राहिला, [illegible] कारण म्हणजे आम्हाला रसातळा[ला] नेणारे आमचे नेतृत्व. आता आ[मचा] धर्म त्यांच्या हातातून पुन्हा हिसका[वून] आमचे हक्क आम्हाला परत हवेत. आ[म्ही] त्यासाठी लढू. हे कुराण आमचेच [आहे] आणि त्याचा अर्थही लावू.'

## २३ ऑगस्ट १९८९, दै. केसरी

# असमतोल दूर होणे अशक्य : तेंडुलकर

**पुणे : सर्वच क्षेत्रातील असमतोल हा विघटनाचा पाया असून हा असमतोल दूर करण्याचे काम नजीकच्या भविष्यकाळात होईल असे आपल्याला वाटत नसल्याचे मत प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांनी सोमवारी येथे व्यक्त केले.**

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने 'राष्ट्रीय एकात्मता : काळाची गरज' या विषयावर आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात श्री. तेंडुलकर अध्यक्ष-पदावरून बोलत होते.

**विसंगत इतिहास**

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक सदस्य सैय्यदभाई यांनी प्रास्ताविक भाषण केले. शाळेत शिकलेला इतिहास मोठे झाल्यावर आम्हाला विसंगत वाटू लागला, असे सांगून प्रसिद्ध अभिनेते निळू फुले म्हणाले, मुस्लिम बादशहांच्या चांगल्या कार्याचे महत्त्व इतिहासकारांनी आम्हाला शालेय आयुष्यात का पटवून दिले नाही, त्याचे कोडे अजूनहि आपल्याला उलगडलेले नाही.'

चित्रपट व दूरदर्शन मालिकांचे निर्मिति-दिग्दर्शक सईद मिर्झा यांनी माणसामाणसातील भेद ज्या हेतूने निर्माण केले गेले त्यांचा शोध घेण्याची

**पुणे-परिसर**

आवश्यकता आपल्या भाषणात प्रतिपादन केली.

**पीडित महिलांचा प्रश्न**

मानवाला जगण्यासाठी धर्म पुरेसा नसतो असे सांगून नाट्य व चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल म्हणाले, ''मुस्लिम समाजातील महिला सर्वाधिक पीडित आहेत. पुरेशा शिक्षणाअभावी त्यांचे अतोनात हाल होत आहेत. हिंदु आणि मुस्लिम समाजातील महिलांची परिस्थिति काही वेगळी आहे असे आपणास वाटत नाही. परस्परांना समजावून घेऊन परस्परांच्या प्रश्नाचे निराकरण करण्याचा प्रयत्न दोन्ही समाजातील मध्यमवर्गीयांनी करण्याची गरज आहे.

मुस्लिमधर्मियांना एकात्मतेच्या प्रवाहात येण्याची नितांत गरज असून ते तसे येत नसतील तर त्याचे कारण शोधणे केवळ मुस्लिम समाज सुधारकांचे नव्हे तर अन्य धर्मातील समाज-सुधारकांचे काम आहे असे मी मानतो, असेहि श्री. पटेल म्हणाले.

**अपुरे प्रयत्न**

एकात्मतेची गरज जेवढ्या जोराने मांडली जाते तेवढ्याच वेगाने विघटनाची प्रक्रियाहि चालू असते, असे सांगून श्री. तेंडुलकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''पंजाब आणि आसाममधील परिस्थतीचा विचार केला तर हा देश भौगोलिकदृष्ट्या एकत्र राहणार आहे काय असा प्रश्न पडतो आणि हा देश एकत्र राहावा यासाठी केंद्राने जे प्रयत्न करणे आवश्यक आहे, ते प्रयत्न योग्य दिशेने होत आहेत असे निदान आपणास तरी वाटत नाही.

विघटनाचा वाढता वेग कमी करून मागे जाता येईल काय याचा विचार करीत असताना एकात्मतेचा विचार पुढे येतो आणि या देशातील जाति, धर्म, भाषा, आचार, विचार, ग्रंथ, पोषाख, भोजन या सर्व बाबीतील भिन्नता डोळ्यासमोर उभी राहते. 'विविधतेत एकात्मता' असे प्रचारी थाटाचे कितीहि बोलले जात असले तरी या विविधतेतून परस्परांत स्पर्धा सुरू होते. स्पर्धेतून कटुता वाढते आणि त्यातून आक्रमणाची भावना वाढीस लागते. या आक्रमणामागे आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्याची प्रवृत्ती दिसून येते व त्यातून विघटनाच्या प्रक्रियेला वेग येतो,'' असे प्रतिपादन श्री. तेंडुलकर यांनी केले.

**घातक राजकीय स्वार्थ**

राजकीय स्वार्थ आणि मतांचे गठ्ठे यांचा विचार करून राजकीय पक्षहि असमतोल कसा राहील याचाच विचार करीत असतात, त्यामुळे देशाच्या सर्वांगीण विकासाचा तोल ढासळतो आणि विघटनवादी शक्ति फोफावतात. म्हणून असमतोल हाच विघटनाचा पाया असून तो दूर करणे हाच एकात्मते-वरील एकमेव उपाय आहे, असे आपणास वाटते असेहि श्री. तेंडुलकर यांनी सांगितले.

मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती मेहरुन्निसा दलवाई यांनी आभार मानले.

## ३० सप्टेंबर २०१९ दै. लोकमत

**डॉ. अनिल अवचट : सत्यशोधक हमीद दलवाई जयंती, अभ्यास शिबिर**

# हमीद दलवाई यांच्यात होते धर्मातील रूढीबद्ध चौकटीबाहेर जाण्याचे धाडस

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सतत आपल्या कार्याने इतरांना ऊर्जा व प्रेरणा देण्याचे काम हमीद दलवाई यांनी केले. विशेष म्हणजे आपल्या धर्मातील रूढीबद्ध चौकटीच्या विरोधात जाण्याचे धाडस त्यांनी दाखवले. महात्मा फुले यांचे द्रष्टेपण हमीद यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येते. ते खऱ्या अर्थाने फुले यांचे अनुयायी होते. म्हणून त्यांना फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा कार्यकर्ता व समाजसेवक असे म्हणता येईल, अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केली.

**शेवटी माणसांतील माणुसकी महत्त्वाची...**

- प्रत्येकाची आवड वेगळी आहे. विचार वेगळे आहे. यामुळे आपण एकमेकांच्या विचारांचा आदर राखणे गरजेचे आहे. शेवटी माणसांतील माणुसकी महत्त्वाची आहे. ज्याला दुसऱ्याचे दुःख कळते, वेदना जाणवते असा माणूस जास्त महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपला मार्ग शोधून काढावा आणि चांगले माणूस व्हावे. प्राणी, झाडांवर मनापासून प्रेम करावे. सगळ्यात जास्त हेच महत्त्वाचे असल्याचे अवचट यांनी सांगितले.



मुस्लीम सत्यशोधक मंडळ आयोजित हमीद दलवाई जयंतीनिमित्त हमीद दलवाई व्यक्ती-विचार-साहित्य अभ्यास शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अवचट बोलत होते. साने गुरुजी स्मारक येथे झालेल्या या कार्यक्रमाला मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी, सरचिटणीस जमीर शेख आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यदभाई उपस्थित होते. अवचट यांनी हमीद दलवाई यांच्यासमवेतच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, अनेक वर्षे त्यांच्या समवेत सामाजिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. त्यांचे विचार, जगण्याची पद्धत हे सगळे वेगळे होते. हे आमच्याकरिता प्रेरणादायी होते. हमीद यांनी आपल्या कामातून कार्यकर्ते उभे करण्याचे काम केले. 'लोग अच्छे होते है, उनसे गलती हो जाती है' असे त्यांचे म्हणणे असायचे. या माणसाचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यामुळेच की काय त्यांनी आपल्याच धर्मातील न पटणाऱ्या गोष्टींविरोधात बंड पुकारले. कुठलीही पर्वा न बाळगता त्या विचारांशी दोन हात केले. मुस्लीम धर्मात स्त्रियांच्या बाबत जे अन्यायकारक आहे, त्यावर बोलण्याचे धाडस त्यांनी दाखवले.

> हमीद यांचे सामाजिक सुधारणेचे काम मोठे आहे. शेवटपर्यंत त्यांच्यातील कार्यकर्ता जिवंत होता. आजच्या तरुणाईला त्यांचा प्रवास समजून घ्यावा लागेल. त्यांनी त्यांचे साहित्य वाचण्याची गरज आहे. याप्रसंगी झालेल्या प्रश्नोत्तराला अवचट व तांबोळी यांनी उत्तरे देऊन श्रोत्यांच्या शंकांचे निरसन केले.
>
> - डॉ. शमसुद्दीन तांबोळी

हमीद हे निर्भीड होते. कुठेही अन्याय होतोय असे त्यांना दिसल्यास ते चवताळून उठत असत. त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्व आणि विचार यामुळे ते समाजसुधारक महात्मा फुले यांचे अनुयायी होते असे म्हणावे लागेल. फुल्यांमध्ये असणारी निर्भयता हमीद यांच्यात होती.

# निवडक छायाचित्रे



*यदुनाथ थत्ते मार्गदर्शन करताना. सोबत गं. बा. सरदार, वसंतराव नगरकर, बाबुमियाँ बँडवाले आणि वजीर पटेल.*



*वजीर पटेल यांचा सत्कार करताना गं. बा. सरदार.*



*स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले यांचा सत्कार करताना गं. बा. सरदार.*



*गोवा येथील कार्यकर्त्या रशिदा मुजावर यांचा सत्कार करताना प्रमिलाताई दंडवते.*



*विजय तेंडुलकर यांचा सत्कार करताना मेहेरून्निसा दलवाई.*




*दिलीप चित्रे, भाई वैद्य, नसीमा हुरजूक, अब्दुल कादर मुकादम, महंमद गौंस नाईक आणि मेहेरून्निसा दलवाई.*




*हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये स. मा. गर्गे, मेहेरून्निसा दलवाई, आमिर शेख, अन्वर शेख आणि इतर.*




*चर्चासत्रात बोलताना दिलीप चित्रे, शमसुद्दिन तांबोळी, मेहेरून्निसा दलवाई आणि भाई वैद्य.*




*मेहेरून्निसा दलवाई बोलताना. सोबत तेज निवळीकर, ग. प्र. प्रधान, डॉ. राम ताकवले आणि कुमार केतकर.*




*डॉ. रावसाहेब कसबे, भाई वैद्य आणि मेहेरून्निसा दलवाई.*



*शब्बीर शेख यांना पुरस्कार देताना मे. पुं. रेगे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, मेहेरून्निसा दलवाई.*




*वर्धापनदिनी नूर जहीर आणि जाकिया सोमण यांच्यासमवेत फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मानित महिला आणि मंडळाच्या कार्यकर्त्या.*




*गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप प्रसंगी बोलताना अन्वर राजन, सोबत शमसुद्दिन तांबोळी, अभय कांता, शेख चाँद, प्रा. कुलसुम पारेख*




*राजेश पेंढारी आणि शरिफा मुल्ला या तलाकपीडित महिलेचा नोंदणीपद्धतीने विवाह. सोबत सुरेश शिपुरकर, हुसेन जमादार, जिल्हाधिकारी देशमुख, ऐनुल अत्तार आणि इतर.*



*'मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे दोन शतक' पुस्तिकेचे प्रकाशन – सय्यदभाई, मेहेरून्निसा दलवाई, बाबा आढाव, आणि हुसेन जमादार.*



*मंडळाच्या वतीने व्यसनमुक्ती कार्यक्रमातील व्यक्तींचा सत्कार करताना ना. ग. गोरे, डॉ. अनिल अवचट आणि कार्यकर्ते.*




*श्रीगोंदा येथे कुमार सप्तर्षी, बाळासाहेब भारदे, बबनराव पाचपुते.*



*मा. शरद पवार यांच्यासोबत मेहेरून्निसा दलवाई.*




*हमीद दलवाई स्मृतिदिनी पुस्तक प्रकाशन, हस्ते न्या. पी. बी. सावंत व इतर.*



*सामाजिक सलोखा कार्यक्रमात सय्यदभाई, अब्बास खान, ॲड. एस. के. रेहमान, मोहन धारिया आणि मेहेरून्निसा दलवाई.*



*मंडळाच्या कार्यक्रमातील उपस्थित*




*महिला मोर्चातील सहभागी कार्यकर्ते*




*वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. मंगला आणि जयंत नारळीकर.*




*आपलं घर' नळदुर्ग येथील अभ्यास शिबिरात मा. पन्नालाल सुराणा डॉ. जयदेव डोळे.*




*मंडळाच्या पुढाकाराने तलाक झालेल्या रुबिना आणि आफरोज यांचा अनुक्रमे कुणाल आणि अमितसोबत नोंदणी पद्धतीने आंतरधर्मीय विवाह.*




*लोहियानगरमध्ये जनजागृती करताना.*



मराठी व्याकरणतज्ज्ञ डॉ. यास्मीन शेख यांना डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान' प्रदान करताना.




माजी खासदार अन्वर अली, उर्मिला मातोंडकर यांच्यासमवेत प्रा. तांबोळी आणि प्रा. जमीर शेख.




*संविधान चर्चासत्रात सुरेश शिपूरकर, राजू परूळेकर, अशोक धिवरे, सरोज पाटील आणि एम. बी. शेख.*




*मिश्र विवाह समर्थनार्थ लखनौ येथील चयन परिषदेत आसिफइक्बाल, बेनझीर तांबोळी आणि अन्य मान्यवर.*

# संपादकाचा अल्प परिचय



**डॉ. शमसुद्दिन तांबोळी**

एम. ए., एम. एड., एल. एल. बी., पीएच. डी.

**निवास :** सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण रोड, पुणे ४११००८

**मूळ गाव :** राणीसावरगाव, जि. परभणी

**भ्रमण ध्वनी :** ९८२२६७९३९१ आणि ९१७२०६१९६२

**इमेल :** tambolimm@rediffmail.com

**पीएच.डी. :** 'हमीद दलवाई यांचे लोकशिक्षणातील योगदान', शिक्षणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

- **पद आणि कार्य :**
  सेवानिवृत्त उपप्राचार्य, मराठवाडा मित्रमंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४
- **अध्यक्ष :** मुस्लीम सत्यशोधक मंडळ
- **संपादक :** मुस्लीम सत्यशोधक पत्रिका
- **माजी सचिव :** हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट
- **सदस्य :** महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार समिती
- **प्रकाशित पुस्तके**

  १. हमीद दलवाई : क्रांतिकारी विचारवंत,
  २. प्रभावशाली शिक्षण तज्ज्ञ
  ३. आझाद कलाम
  ४. शहाबानो ते शबानाबानो (मुस्लीम महिला अधिकार संघर्ष)
  ५. मुस्लीम समाज : प्रबोधन व विकास
  ६. मुस्लीम समाज : व्यक्ती, विचार व साहित्य
  ७. समान नागरी कायदा : अपेक्षा व वास्तव
  ८. महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास : नवे दालन, नव्या संधी
  ९. तिमिरभेद

- **सह संपादक :**

  १०. बहुजनांचे शिक्षण : वास्तव व अपेक्षा

  व्यक्ती, घटना, विशेष या विषयांवरील विशेषांक, तसेच दीपावली व अनियमित विशेषांकांचे संपादन. याचबरोबर विविध साप्ताहिके, मासिके तसेच वर्तमानपत्रे यांमधून नियमित लेखन
- **पुरस्कार :**
  - ☐ गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट : बा-बापू विधायक कार्यकर्ता पुरस्कार, २००८
  - ☐ महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशन : भास्कर अवॉर्ड, २००९
  - ☐ मुंबई मराठी पत्रकार संघ : भाई तांबे पुरस्कार, २०१०
  - ☐ महाराष्ट्र ग्रंथेत्तोजक सभा : उत्कृष्ट साहित्य पुरस्कार, २०११
  - ☐ मौलाना आझाद बहुउद्देशीय संस्था, वाई : कृष्णा साहित्य गौरव पुरस्कार, २०१२
  - ☐ आवाबेन देशपांडे नवरचना केंद्र : सुमतीबाई साठे आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, २०१४
  - ☐ शुभचिंतक फाउंडेशन : अहिंसा सन्मान, २०१४
  - ☐ आझम कॅम्पस, पुणे : पी. ए. इनामदार सामाजिक कृतज्ञता पुरस्कार, २०१५
  - ☐ सत्यशोधक रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, २०१६
  - ☐ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त दिला जाणारा जगन्नाथ राठी पुरस्कार, २०१७
  - ☐ मराठवाडा समन्वय समिती : मराठवाडा साहित्य भूषण पुरस्कार, २०१७
  - ☐ प्रा. पाटील सेवा प्रतिष्ठान, महात्मा फुले पुरस्कार, जळगाव, २०१८
  - ☐ पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील समाजप्रबोधन पुरस्कार, लोणी, प्रवरानगर, ऑगस्ट, २०१९
  - ☐ कोविड योद्धा पुरस्कार, आरोग्य मंत्री मा. राजेश टोपे आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. अमित देशमुख, महाराष्ट्र राज्य, २०२१
  - ☐ कृतज्ञता सन्मान पुरस्कार, २०२१, मा. एकनाथ शिंदे, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य
  - ☐ लोकहक्क फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य : मा. बाळासाहेब भारदे गांधी विचार प्रसार पुरस्कार, २०२३
  - ☐ महाराष्ट्र साहित्य परिषद : डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार, २०२३
  - ☐ सामाजिक-सांस्कृतिक प्रतिष्ठान : त्रिनेत्र कृतज्ञता पुरस्कार, हडपसर, पुणे, नोव्हेंबर, २०२३
  - ☐ कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक : गोदावरी गौरव पुरस्कार (लोकसेवा), १० मार्च २०२४

- **आदित्य साने निर्मित आणि दिग्दर्शित 'व्हेन द केज बर्ड सिंग्ज' हा माहितीपट प्रदर्शित.**

  (डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक कार्यावर आधारित)

“... इस्लामच्या मूलभूत श्रद्धेलाच आव्हानित करणे हा एक भाग आणि धर्माच्या नावाने होणारे शोषण, धर्मनिरपेक्ष विचाराला नकार याला विरोध करणे, हा दुसरा भाग. यातील दुसऱ्या मार्गावरून मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आपली वाटचाल चालू ठेवली आहे आणि ते योग्यच आहे. लोकांचे जे प्रश्न आहेत, ते घेऊन उभे राहिले की, मतभिन्नता असूनही लोक बरोबर येतात, हा त्यांचा अनुभव आहे. तो आश्वासक आहे. तलाकपीडित महिला हा मुस्लीम समाजातील असाच एक वास्तवातला विदारक प्रश्न आहे...”

**– डॉ. नरेंद्र दाभोलकर**

“....मंडळाच्या बहुतांश कार्यक्रमांत माझा सहभाग असतो. गेल्या एक-दीड दशकांमध्ये मंडळाने ज्या पद्धतीने काम पुढे चालवले आहे, त्याबद्दल मी निश्चितच समाधानी आहे. मध्यंतरीच्या काळात हे मंडळ संपत चालले आहे, अशा प्रकारची भावना निर्माण होण्यासारखी परिस्थिती झाली होती. परंतु एखाद्या वाळलेल्या झाडाला पुन्हा कोंब फुटावा, नवीन पालवी यावी, अशी स्थिती पुन्हा निर्माण झाली आहे. याचा माझ्यासारख्यांना खूप आनंद वाटतो. विशेषतः आज मंडळासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आहे. सर्वच बाजूंनी कोंडमारा होत असताना तग धरून उभं राहणं हेच जिथं मुश्किल असतं, तिथं मंडळ आपापल्या पद्धतीने नवे उपक्रम घेऊन वाटचाल करत आहे, समाजाशी संवाद करण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या दृष्टीने हे खूप मोठं आहे. ज्या हिंदू समाजात फुले, आंबेडकर झाले, त्या समाजात आज काय चाललेलं आहे, हे आपण पाहतोय. आता मंडळाला यांचाही सामना करावा लागतोय. तलाकपीडित महिलांचं काम संपलेला नाही. नवनवीन विषय निर्माण केले जातात. अशा परिस्थितीत प्रबोधनाविषयी बोलणं हेच मुश्किल आहे, पण ते बोलतात. बकरी ईदनिमित्त रक्तदानासारखे कार्यक्रम, मुस्लीम समाजातील अंधश्रद्धांविषयी बोलणं, बाहेरच्यांची साथ नसतानाही हे सगळं टिकवून ठेवणं, हे सगळं अवघड काम आहे. आमच्या सारख्यांना वाटत असतं की, ‘सेवासदन’सारखी एखादी संस्था मुस्लीम महिलांसाठीही निर्माण व्हायला पाहिजे होती. मंडळाने हातावर पोट असणाऱ्यांची संघटना सुरू केली पाहिजे, पण हे शक्य झाले नाही. ज्या पद्धतीने मंडळाने गेली 50 वर्षे आपले काम चालवले आहे, ते खूप विलोभनीय आहे. आम्ही कायम त्यांच्याबरोबर आहोत...”

**– डॉ. बाबा आढाव**


**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.